खंड : एक

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा इतिहास

संपादन

शमसुद्दिन तांबोळी

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा इतिहास

खंड १

संपादन : शमसुद्दिन तांबोळी

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

पुस्तकाचे नाव : मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा इतिहास : खंड १

संपादक : शमसुदिद्न तांबोळी

आयएसबीएन : ९७८-८१-९९०२६०-३-२

प्रथमावृत्ती : २०२६

प्रकाशक : सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

© प्रकाशकाधीन

मुखपृष्ठ : गिरीश सहस्रबुद्धे

मुद्रक : व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१

किंमत : रु. ३२१/-

या पुस्तकात व्यक्त झालेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही. सदर पुस्तकातील मजकुराची संपूर्ण जबाबदारी ही संपादकाची आहे.

समाजसुधारणेचा विचार मांडताना किंवा विशिष्ट सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करताना धर्माचा पाया घेऊ नका. धार्मिक पुनरुत्थानाचा पाया घेतला की प्रबोधनाची भूमिका मागे पडते.

हमीद दलवाई

ऋणनिर्देश

डॉ. सदानंद मोरे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई),
डॉ. बाबा आढाव (ज्येष्ठ सत्यशोधक नेते आणि कार्यकर्ते),
सय्यदभाई ('मुस्लीम सत्यशोधक मंडळा'चे संस्थापक सदस्य आणि माजी अध्यक्ष),
अब्दुल कादर मुकादम (मुंबई),
विनोद शिरसाठ (संपादक, साप्ताहिक 'साधना'),
पन्नालाल सुराणा (ज्येष्ठ समाजवादी नेते-अभ्यासक),
मा. अशोक धिवरे (निवृत्त अतिरिक्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य),
डॉ. श्रद्धा कुंभोजकर (इतिहास विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे),
मा. सुरेश शिपूरकर (सामाजिक कार्यकर्ते, कोल्हापूर),
अन्वर शेख (ज्येष्ठ कार्यकर्ते, मुस्लीम सत्यशोधक मंडळ),
डॉ. अभिजित वैद्य (समाजवादी नेते, कार्यकर्ते आणि लेखक, पुणे),
मीनाक्षी रा. पाटील (मुंबई), रामेश्वर मु. गोकडे (मुंबई),
डॉ. बेनझीर तांबोळी (पुणे), प्रा. सायरा मुलाणी (कोल्हापूर),
नबाब अल्ताप हुसेन (सातारा), दिलावर शेख (पुणे),
प्रा. समीना पठाण (नाशिक), गुलाब अत्तार (कोल्हापूर),
बेनझीर काझी (सोलापूर), प्रा. जमीर शेख (भोर),
प्रा. अझरुद्दीन पटेल (कराड), समीर शेख (पुणे),
श्रीरूपा बागवान (पुणे), डॉ. बी. टी. काझी (तुळजापूर)
आणि
मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे आजी-माजी कार्यकारिणी सदस्य,
मंडळाचे विविध मंच प्रमुख आणि कार्यकर्ते,
असीम सय्यद (पुणे), प्रा. मोईन खान (बार्शी),
सुनील अंबिके (पुणे), भाग्यश्री भागवत आणि राम जगताप (डोंबिवली),
अभिजित सोनावणे (पुणे) आणि गिरीश सहस्रबुद्धे (पुणे)
या सर्वांचे आभार.

निवेदन

समाजप्रबोधक हमीद दलवाईनी मुस्लीम समाजात आधुनिक आणि मानवतावादी मूल्ये रुजवण्यासाठी वैचारिक आणि संघटनात्मक प्रयत्न केले. समाजप्रबोधनासाठी जनसंवाद, जाणकारांसोबत बैठका, अभ्यास दौरा अशा पाच-सहा वर्षांच्या तयारीनंतर निवडक कार्यकर्त्यांसमवेत २२ मार्च १९७० रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. १९६६ चा सात मुस्लीम महिलांचा मुंबई विधानसभेवरील मोर्चा हा आरंभ बिंदू समजला तर मुस्लीम सत्यशोधकचा कार्यकाळ सहा दशकांचा आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष शमसुद्दिन तांबोळी यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा द्विखंडात्मक इतिहास संपादित केला आहे. यात मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे वैचारिक अधिष्ठान, संघटनात्मक बांधणी, संघर्षात्मक कार्यक्रम तसेच विधायक कार्याचा सविस्तर तपशील मांडला आहे.

पहिल्या खंडात मंडळाची पार्श्वभूमी, हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखालील संघर्षमय प्रबोधनकार्य, समाजाचा प्रतिसाद आणि प्रामुख्याने हमीद दलवाईनी एका दशकात केलेल्या शतकभराच्या कार्याचा इतिहास आहे.

दुसऱ्या खंडात हमीद दलवाई नंतरच्या सामूहिक नेतृत्वातील जवळपास पन्नास वर्षांच्या प्रबोधनात्मक कार्याचा आणि संघटनात्मक योगदानाचा सविस्तर आढावा घेतला आहे. या दोन्ही खंडांना स्वतंत्र आणि विस्तृत प्रस्तावना दिली आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या प्रेरणा, प्रबोधन कार्य आणि सामाजिक योगदान याचा हा महत्त्वाचा दस्तावेज अभ्यासक व वाचकांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल. हा द्विखंडात्मक इतिहास प्रकाशित करताना मंडळास आनंद वाटतो.

– डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई.

भारत देश समर्थ व्हावा, जगातील शक्तिमान राष्ट्रांच्या पंक्तीला बसावा असे आपल्याला वाटत असेल तर, या देशातील समाज हा शास्त्रीय आणि विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनावर आधारलेला, भौतिक श्रध्दा बाळगणारा आणि चैतन्यशील बनला पाहिजे, याबद्दल कोणाचे दुमत होईल असे वाटत नाही.

हमीद दलवाई

अनुक्रमणिका

भूमिका / १४
संपादकीय / १६

१. मंडळाची पूर्वपीठिका आणि स्थापना / ६३
१.१ मंडळाच्या शाखा / ७५
१.२ कोल्हापूरमधील शैक्षणिक शिबिरे / ८३

२. प्राधान्याचे विषय / ८४
२.१ धर्मनिरपेक्षता : भूमिका / ८४
अ. धर्मनिरपेक्षता आणि निवडणुका / ९३
२.२ मुस्लीम महिला प्रश्न : भूमिका / ९५
अ. मुस्लीम महिला परिषद, पुणे / १००
ब. मुस्लीम महिलांचे मनोगत / १०४
क. मुस्लीम महिलांच्या हक्कासाठी / ११०
ड. जिहाद-ए-तलाक या विषयावर चर्चा सुरू / ११४
इ. मुस्लीम महिला परिषद – कोल्हापूर / ११५
ई. तलाकपीडितांची परिषद / ११७
२.३ समान नागरी कायदा: भूमिका / १२४
अ. समान नागरी कायद्यास विरोध आणि मंडळाची भूमिका / १३०
ब. जनता सरकारच्या धोरणाबद्दल मंडळास खेद / १३६
२.४ इबादत व आदत : भूमिका / १३७
२.५ राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय एकात्मता / १४०
अ. वंदे मातरम्च्या निमित्ताने... / १४१
ब. वंदे मातरम् प्रकरण : सेक्युलर पक्षांची जबाबदारी / १४४
२.६ भाषेची समस्या : भूमिका / १४९
अ. मुस्लीम शिक्षण परिषद / १५५
२.७ लोकसंख्या नियंत्रण : भूमिका / १६३
२.८ उपसंहार / १६८

३. उपक्रम, बातम्या आणि घडामोडी / १७१
३.१ मंडळाच्या पहिल्या दशकातील ठळक घटना / १७१
३.२ मंडळातर्फे घेण्यात आलेले जनजागृतीचे कार्यक्रम / १७६
३.३ मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना / १७९
३.४ मुस्लीम सत्यशोधक मंडळ / १८२
३.५ अब्दुल हमीद व्याख्यानमाला / १८४
३.६ कोल्हापूर येथील अब्दुल हमीद व्याख्यानमाला / १८५
३.७ राज्यस्तरीय परिषद (अधिवेशन) / १८७
३.८ मुस्लीम महिलांतील जागृती / १९४
३.९ मुस्लीम महिला परिषद आव्हान व आवाहन / १९८
३.१० समान नागरी कायद्यासाठी सायकल मोर्चा / २०३
३.११ मंडळाचे अभ्यास व स्नेहमीलन शिबिर – कोल्हापूर / २०७
३.१२ मुस्लिमांना एकत्र आणण्यास 'इस्लाम' ही शक्ती अपुरी / २१०
३.१३ मुखपत्र : मुस्लीम सत्यशोधक पत्रिका / २१४
३.१४ मुस्लीम सामाजिक परिषद – मुंबई / २१४
३.१५ मुस्लीम परिषदेचे सत्यस्वरूप / २२१
३.१६ मुस्लीम महिलांचे प्रश्न – हमीद दलवाई यांचे भाषण / २२५
३.१७ मुस्लीम सत्यशोधक / २२८
३.१८ मुस्लीम सुधारणा / २२९
३.१९ मंडळाच्या वतीने मुस्लीम महिलांचे सर्वेक्षण / २३२
३.२० ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम्स / २३४
३.२१ हे किती काळ चालणार? / २३६
३.२२ हमीद दलवाईंचे आजारपण / २४०
३.२३ मुस्लीम युवतीची मंडळाकडे तक्रार / २४२
३.२४ कोल्हापूर येथील मुस्लीम महिला परिषद / २४३
३.२५ तलाकविरुद्ध पोलिसात तक्रार / २४४
३.२६ तलाक आणि बहुपत्नीत्व / २४५
३.२७ हमीद दलवाई यांचे निधन / २४६
३.२८ नवजागृती करणारे हमीद दलवाई : उजळणी / २४८
३.२९ दलवाईंना लंडनमध्ये श्रद्धांजली / २५३

३.३० महिला मदतीचे कार्य / २५४
३.३१ मुस्लीम अबलेस न्याय व तलाक / २५५
३.३२ धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाला मुस्लीम जातीयवाद्यांचे आव्हान – सय्यद मुनीर / २५६
३.३३ तलाकपीडित महिलांची परिषद – अमरावती / २६१
३.३४ हमीद दलवाई यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त / २६३
३.३५ तलाकपीडित महिलांचा मोर्चा – अहमदनगर / २६४
३.३६ हमीद दलवाई स्मृतिदिनानिमित्त निवेदन / २६५
३.३७ हिंदूंच्या सहकार्याशिवाय मुस्लिमांच्या समस्या सुटणार नाहीत / २६७
३.३८ मुस्लीम सत्यशोधक चळवळीतील ठळक उपक्रम / २६८

४. विरोध, वाद-प्रतिवाद आणि प्रतिसाद / २७४
४.१ मोमिनपुरा हल्ला प्रकरण (२१ जून १९७०) / २७५
४.२ हल्ला प्रकरणासंदर्भात मुस्लीम नेत्यांच्या प्रतिक्रिया / २७९
४.३ ताहेर महमुद व हमीद दलवाई यांच्यातील वाद-प्रतिवाद / २८१
४.४ हमीद दलवाई पाकिस्तानचा हेर? / २८९
४.५ कोल्हापुरातील कार्यकर्त्यांना जातिबहिष्काराच्या धमक्या / २९१
४.६ Brave Women Defended / २९४
४.७ शरीयतमध्ये बदल झाल्यास बंड होईल / २९६
४.८ मुस्लीम नेत्यांकडून समाजाची दिशाभूल / २९८
४.९ मुस्लीम लीग आणि मंडळामधील वाक्युद्ध व वाद-प्रतिवाद / २९९
४.१० महिला परिषदेवर उर्दू पत्रांची भाष्ये / ३०३
४.११ मुस्लीम लीगचे पत्रक / ३०६
४.१२ ॲड. गाझीयोद्दिन आणि शरीयत-तलाकचा प्रश्न / ३०८
४.१३ मुस्लीम सत्यशोधकाच्या घरावर हल्ला / ३०९
४.१४ जमात-ए-इस्लामी, मुस्लीम लीग आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांत फरक नाही! / ३१०
४.१५ हरिजन अत्याचाराविरुद्ध युवकांनी झगडा दिला पाहिजे / ३१४
४.१६ कायद्यातील बदलास विरोध करण्यासाठी परिषद / ३१३
४.१७ मुस्लीम नेत्यांची विषारी टीका / ३१९
४.१८ दलवाईंना मदत दिल्याने जातीयवाद्यांचा तिळपापड / ३२२
४.१९ महाराष्ट्र मुस्लीम लीगचा खुलासा / ३२५

४.२० दलवाईंना मदतीच्या प्रतिक्रिया / ३२७
४.२१ मंडळाच्या सभेत दगडफेक आणि गोंधळाचा प्रयत्न / ३३०
४.२२ पुणे महानगरपालिकेतील गोंधळ / ३३१
४.२३ अलीगढ विद्यापीठातील प्रसंग / ३३३

५. मंडळाशी निगडित लेख, संपादकीय, मुलाखती आणि भाषणे / ३३४
५.१ गरज आहे सामाजिक पुनर्रचनेची – हमीद दलवाई / ३३४
५.२ नुरार्णीच्या चलाखीचा आलेख – हमीद दलवाई / ३३९
५.३ सिमला कराराचा अन्वयार्थ – हमीद दलवाई / ३४७
५.४ मुसलमानांमध्ये गांधी निर्माण करावयाचे मला बेड – हमीद दलवाई / ३५२
५.५ मंडळाविषयी प्रश्नोत्तरे – हमीद दलवाई / ३५५
५.६ हमीद दलवाईंची अखेरची मुलाखत – यदुनाथ थत्ते / ३६३
५.७ एक इटुकला मोर्चा – विजय तेंडुलकर / ३७८
५.८ मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे एक वर्ष / ३७०
५.९ मंडळाची कोल्हापूर शाखा – आय. एन. बेग / ३७५
५.१० व्यक्तिगत कायदा अपरिवर्तनीय: एक भ्रामक युक्तिवाद – अ. का. मुकादम / ३७८
५.११ मुस्लीम महिला: एक दुर्दैव-एक झगडा – अनिल अवचट / ३८४
५.१२ लीगच्या दादागिरीच्या घटका आता भरल्या! – सय्यदभाई / ३९४
५.१३ भारतातील मुस्लीम स्त्रिया – कमल पाध्ये / ३९८
५.१४ मंडळाचे कार्य : एका कार्यकर्त्याचा दृष्टीकोन – प्रा. आय. एन. बेग / ४१०
५.१५ सामाजिक बदल वैचारिक संघर्षातूनच शक्य! – सय्यद मुनीर / ४१४
५.१६ निमकहराम – आचार्य प्र. के. अत्रे / ४२०
५.१७ दक्षता नाही, दिशाभूलही नको! – संपादकीय / ४२२
५.१८ उगाच बाऊ कशाला करता? – संपादकीय / ४२५
५.१९ तलाक व सवतपीडित मुस्लीम महिला परिषद – यदुनाथ थत्ते / ४२८
५.२० मुस्लीम समाज व सामाजिक सुधारणा – प्रा. वि. अ. शेख / ४३१
५.२१ जिनांचा सल्ला मानणाऱ्यांचा हमीद दलवाई-द्वेष – संपादकीय / ४३३
५.२२ तलाकपीडित मुस्लिम महिलांचा आवाज – यदुनाथ थत्ते / ४३६
५.२३ 'जिहाद-ए-तलाक' परिषद: अनुभव व मर्यादा – यदुनाथ थत्ते / ४४०
५.२४ मुस्लीम सत्यशोधक मंडळ : दुर्दैवी स्त्रियांना आसरा / ४४४

५.२५ ही ज्योत आम्ही कधी विझू देणार नाही! – बाबुमियाँ बँडवाले / ४४८
५.२६ हमीदभाई : एक द्रष्टा – शेख वजीर पटेल / ४४९
५.२७ एक क्रांतिकारी समर्पित जीवन! – अण्णासाहेब सहस्रबुद्धे / ४५४
५.२८ हमीद : एक तुफान – भाई वैद्य / ४५६
५.२९ असे होते हमीदभाई – सय्यदभाई / ४६०
५.३० सय्यदभाई यांचे साताऱ्यात व्याख्यान / ४६३
५.३१ मुस्लीम स्त्रियांचे प्रश्न– मेहेरून्निसा दलवाई / ४६५
५.३२ मुस्लीम सत्यशोधक मंडळाची दहा वर्षे – सय्यदभाई / ४७०
५.३३ मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे बहुमोल कार्य – नानासाहेब गोरे / ४७८
५.३४ मुस्लीम सत्यशोधक मंडळ – रा. ना. चव्हाण / ४८१
५.३५ दलवाईंशी मैत्री माझ्या जीवनातील विशेष उपलब्धी – भाई वैद्य / ४८३
५.३६ त्यांचे कार्य पुढे निश्चित चालू राहील – वसंत नगरकर / ४८८
५.३७ मुस्लीम स्त्रियांमधील घटस्फोट – अनु. प्रा. मुमताज रहिमतपुरे/ ४९२
५.३८ व्यक्ती नव्हे शक्ती (कविता) – बाबा आमटे / ४९६

६.१ निवडक प्रमुख कार्यकर्ते / ४९८
१. ए. जे. शेख / ४९८
२. स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले / ४९९
३. मेहेरून्निसा दलवाई / ५०१
४. मेहबूब गौस शाह कादरी उर्फ सय्यदभाई / ५०३
५. हुसेन जमादार / ५०४
६. वजीर पटेल / ५०६
७. मुमताज रहिमतपुरे / ५१०
८. ॲड. अब्दुल शेख / ५११
९. प्रा. अ. भि. शहा / ५१३
१०. प्रा. असफ अली असगर फैजी / ५१४
६.२ आरंभ काळातील कार्यकर्त्यांची विभागवार नावे / ५१७
६.३ मुस्लीमेतर समर्थक आणि मार्गदर्शक / ५१८
६.४ मंडळाच्या वाटचालीत समर्थन देणाऱ्या संस्था व संघटना / ५१८
७. परिशिष्ट / ५१९

७.१ नोंदणी प्रमाणपत्र / ५१९
७.२ मुस्लीम सत्यशोधक मंडळाची घटना / ५२०
७.३ मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा / ५२७
७.४ सभासदाची प्रतिज्ञा / ५२९
७.५ मंडळाचे पहिले अधिकृत पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य / ५३०
७.६ हमीद दलवाईंचे व्याख्यान / ५३१
७.७ Muslim Opposition to Secular Integration / ५३६
७.८ Declaration on Secularism / ५४०
७.९ Inaugural Address by Major General E. Habibullah (Retd) / ५४३
७.१० PROBLEMS OF INDIAN MUSLIMS / ५४७
७.११ Speech Delivered by MAHBUBUL HOK / ५४८
७.१२ Presidential Address by Hamid Dalwai / ५६२
७.१३.१ निमंत्रणपत्रिका / ५७२
७.१३.२ हमीद दलवाईंना मूत्रपिंड देण्याबाबतचे आवाहन / ५७३
७.१४ निवेदन / ५७४
७.१५ मुस्लीम महिला परिषदेतील प्रमुख वक्त्या / ५७७
७.१६ MUSLIM SOCIAL CONFERENCE / ५७९
७.१७ केंद्रीय कार्यकारिणी सभा वृत्तान्त / ५८४
७.१८ अखेरची इच्छा (मृत्युपत्र) / ५८८
७.१९ मुस्लीम सत्यशोधक विश्वस्त निधी / ५८९
७.२० हमीद दलवाई प्रथम स्मृतिदिनाच्या निमित्ताने निवेदन / ५९१
७.२१ हमीद दलवाई यांची ग्रंथसंपदा / ५९२
७.२२ हमीद दलवाई यांच्याविषयीची संदर्भसाधने / ५९३
७.२३ संदर्भसूची / ५९४

वृत्तचित्र / ५९९
निवडक छायाचित्रे / ६२१
संपादकाचा अल्प परिचय / ६३७



अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, त्याच बरोबर मुस्लीम जातीयवादाला सतत विरोध करणे ही भूमिका मुस्लीम राजकारणाला वळण देण्याबाबत उपयुक्त ठरेल. त्यायोगे मुस्लीम समाजात एका नव्या समंजस नेतृत्वाचा उदय होईल.

हमीद दलवाई

भूमिका

'महाराष्ट्र' ही संत, साहित्यिक आणि प्रबोधकनकार यांची भूमी आहे. त्यांच्या व्यापक जीवनदृष्टीमुळे सामाजिक बदल स्वीकारण्याची सकारात्मक मनोभूमिका निर्माण होण्यास मदत झाली. परिणामी, समाजामध्ये नवीन विचार रुजण्यास अनुकूलता निर्माण झाली. तसेच भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातही महाराष्ट्राच्या अनेक सुपुत्रांनी महत्वपूर्ण योगदान दिल्याचा इतिहास आहे. महात्मा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, फातिमा शेख आणि त्यांच्या समकालीन प्रबोधकांनी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळीस वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक स्थान आहे. या चळवळीशी केवळ नामसाधर्म्य न ठेवता विचारसाधर्म्य असणारी 'मुस्लीम सत्यशोधक चळवळ' महाराष्ट्रात सुरू होणे, हा केवळ योगायोग नाही, तर त्यास विशेष अर्थ आणि नाते आहे. समाज सुधारक हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली, २२ मार्च १९७० रोजी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना झाली. तत्पूर्वी पाच वर्षे याची पेरणी झाली होती. १८ एप्रिल १९६६ रोजी काढलेला 'सात मुस्लीम महिलांचा मोर्चा' ही मंडळाच्या स्थापनेची नांदी म्हणायला हरकत नाही.

महाराष्ट्रातील दिग्गज साहित्यिक, विचारवंत, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि राजकीय नेत्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे केवळ स्वागत केले नाही, तर ही चळवळ रुजावी, तिचे अभिसरण व्हावे आणि तिला समाजमान्यता मिळावी, यासाठी तिचे हर प्रकारे समर्थन केले आणि तिला मनापासून सहकार्य दिले. मंडळाच्या पाच दशकांच्या वाटचालीत अनेक घटना घडल्या, समाजहित आणि देशहित लक्षात घेऊन मंडळाने वेळोवेळी कळीच्या भूमिका घेतल्या; लोकशिक्षणासाठी, जाणीव-जागृतीसाठी कार्यक्रम घेतले. या घटना-घडामोडींना अनेकांनी विरोध

केला, मात्र अत्यंत सामंजस्याने आणि संवादीपणे हा विरोध समजून घेत, त्याचा प्रतिवाद करीत, प्रतिकूल परिस्थितीत मंडळाने प्रबोधनाचे कार्य कायम ठेवले आहे. येथे घेतलेला मंडळाच्या कामकाजाचा एकूण आढावा वर्तमानासाठी आणि भविष्यात अनेक क्षेत्रांसाठी, अनेक अर्थांनी महत्त्वाचा ठरणार आहे.

'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'च्या कार्याचा इतिहास लिहिला जावा' अशी अपेक्षा साप्ताहिक साधनाचे संपादक विनोद शिरसाठ यांच्यासह अनेकांनी व्यक्त केली. मुस्लीम सत्यशोधक मंडळासदेखील त्याची गरज जाणवली. याच काळात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'समग्र हमीद दलवाई' प्रकल्पास मान्यता दिली. हमीद दलवाई यांचे ललित आणि वैचारिक साहित्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून प्रकाशित होणार आहे, ही खूप आनंदाची बाब आहे. परंतु हमीद दलवाई यांचे साहित्य जेवढे महत्त्वाचे आहे, तेवढेच त्यांचे सामाजिक कार्य आणि समाज-प्रबोधनासंबंधीचे विचारही महत्त्वाचे आहेत. दलवाई यांनी स्थापना केलेल्या 'मुस्लीम सत्यशोधक चळवळी'स एक ऐतिहासिक महत्त्व आहेच, शिवाय दलवाईंनंतर जवळपास पाच दशके ही चळवळ चालली-विस्तारली, यासही अनन्यसाधारण महत्त्व आहे. यास्तव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या द्विखंडात्मक इतिहास-लेखन प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. या प्रस्तावास साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आणि सदस्य यांनी मान्यता दिली. या मान्यतेमुळे हा प्रकल्प हाती घेता आला आणि तो पूर्ण करण्यात यश आले, याचा मुस्लीम सत्यशोधक मंडळास विशेष आनंद वाटतो.

आरंभी हे डोंगराएवढे मोठे काम वाटत होते. तसेच 'हे काम वेळेत पूर्ण होईल का?' अशी शंका होती. सर्व संदर्भ साहित्य मिळवण्याचे एक मोठे आव्हान होते. मात्र हे आव्हान स्वीकारणेही तेवढेच महत्त्वाचे होते. सर्व अडचणी आणि आव्हाने यांवर मात करून हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्णत्वाकडे जात असल्याचा खूप आनंद वाटतो.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या द्विखंडात्मक इतिहासातील पहिल्या खंडात सर्वसाधारणपणे दीड दशकाच्या कालखंडाचा समावेश आहे. साधारणपणे १९६५-६६ पासून सुरू झालेला इतिहास दलवाई यांच्या मृत्यूपर्यंत (१९७७) संपतो. परंतु दलवाईंच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचा आणि झंझावाती कर्तृत्वाचा प्रभाव त्यांच्यानंतरही तीन वर्षे टिकून होता. म्हणून १९८०पर्यंतच्या कालखंडाचा पहिल्या खंडात समावेश केला आहे. त्यापुढील कालखंड दुसऱ्या खंडात घेतला आहे.

प्रा. डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि या मंडळाचे सर्व सदस्य, कर्मचारी यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन यांमुळेच हा प्रकल्प पूर्ण करणे शक्य झाले आहे. याबद्दल सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करीत आहे. संगणकीय कामकाजासाठी प्रा. मोईन खान, खंडाची मांडणी आणि मुखपृष्ठ यासाठी अनुक्रमे अभिजित सोनावणे आणि गिरीश सहस्त्रबुद्धे, तसेच दोन्ही खंडांच्या संपादनकार्यात डॉ. बेनझीर तांबोळी यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

– संपादक

संपादकीय

एखादी संघटना किंवा चळवळ निर्माण होणे, स्थिरावणे आणि दीर्घ काळ टिकणे यास काही ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भ असतात. या दृष्टीने समाज प्रबोधनाची दिशा आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाची ऋजवात आणि पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे. 'मुस्लीम सत्यशोधक' ही चळवळ मुस्लीम जगताच्या इतिहासातील 'क्रांतिकारी' घटना समजण्यात येत असली, तरी कोणतीही चळवळ अचानक निर्माण होत नाही. प्रत्येक चळवळीचा एक इतिहास असतो. त्याचा संक्षिप्त आढावा घेणे आवश्यक आहे.

भारतीय समाज प्रबोधन :

समाज प्रगतिशील होण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक प्रबोधकांनी, तसेच विविध संस्था, संघटना आणि चळवळी यांनी योगदान दिले आहे. 'समाज सुधारणा करणे' हा या प्रयत्नांमागचा मुख्य हेतू असतो. समाज सुधारणा म्हणजे काय? तर समाजामध्ये प्रचलित असलेल्या, परंतु कालबाह्य झालेल्या रूढी-परंपरांना विरोध करून त्यांपासून निर्माण होणाऱ्या अनिष्ट परिणामांना पायबंद घालणे. भारतातील धर्म आणि परंपरा जगामधील प्राचीनतम धर्म आणि परंपरा यांपैकी एक असल्या आणि काळाच्या ओघात त्यांचे समकालीनत्व नष्ट झाले असले, तरीदेखील अनेक रूढी, चालीरीती समाजाचा भाग बनून समाजाला जखडून राहिल्या. याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे, भारतीय समाजावर असलेले धर्माचे प्रभुत्व! 'भारत' हे जगातील काही प्रमुख धर्मांचे उगमस्थान आहे. वैदिक, बौद्ध, जैन इत्यादी धर्म भारताच्या भूमीत जन्मले, परंतु जैन आणि बौद्ध धर्माचा उगम भारतीय लोकांना पर्याय देण्यासाठी निर्माण झाला. समाजातील विशिष्ट समूहाला सामावून

घेणारा आणि खर्चिक असल्यामुळे वैदिक धर्म इतर गरीब व निम्न स्तरातील लोकांना परका वाटू लागला. आणि तेथे बौद्ध आणि जैन धर्म एक पर्याय म्हणून लोकांना उपलब्ध झाले. सुरुवातीला जैन आणि बौद्ध धर्मामध्ये कर्मकांड आणि वैदिक चालीरीती यांसारख्या प्रथांचा समावेश नव्हता, परंतु काळाच्या ओघात आपल्याला या नवीन, पर्यायी धर्मांचे 'वैदिकीकरण' झालेले दिसते.
बाराव्या शतकात भारतामध्ये आलेला इस्लाम धर्म इतर कारणांबरोबरच राजाश्रयामुळे वेगाने पसरला. मूळ इस्लाम धर्मामध्ये सामाजिक वर्गीकरण नसले, तरी भारतामध्ये आल्यावर या धर्मनिदेखील भारतातील धार्मिक गुणधर्म आत्मसात केले. त्यामुळे मध्ययुगीन काळात निर्माण झालेला भारतीय समाज विषमतेवर आधारित, कालबाह्य रूढींवर चालणारा आणि असामाजिक तत्त्वांचा समावेश असलेला होता. बहुतेक राज्यांवर धर्माचा पगडा असल्यामुळे एखाद्या अमानुष परंपरेमध्येदेखील राज्य हस्तक्षेप करत नसत. त्यामुळे अशा परंपरा टिकून राहण्यास मदत झाली.

सुफी संप्रदाय :

मुस्लीम समाज प्रबोधनात हिंदू-मुस्लीम संवाद आणि सलोखा यांना महत्त्वाचे स्थान आहे. प्रबोधन कार्य अधिक जटिल करण्यास स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात असलेला हिंदू-मुस्लीम वैरभाव कारणीभूत ठरत आला आहे. या वैरभावातून टोकाच्या अस्मिता जपल्या जातात आणि अशा अस्मिता सामाजिक बदलास अडसर ठरतात. धार्मिक वैरभाव कमी करून बंधुभाव प्रस्थापित करण्यात सुफी संप्रदायाच्या योगदानाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आपला देश स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात असतानाही हिंदू-मुस्लिमांमधील संशयाचे वातावरण कमी झालेले नाही. उलट ते अधिक गडद झाल्याचे आपण अनुभवत आहोत. आजमितीस भारतातील धर्म, तसेच जाती-जमातींमध्ये सौहार्द निर्माण करण्याचे प्रयत्न ज्या सुफींनी हजार वर्षांपासून सुरू केले, ते विस्मृतीत जात असल्याचे दिसून येते. सुफींनी धार्मिक आणि सामाजिक सलोख्यासाठी केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सुफीझमचा अभ्यास केल्यानंतर ठळकपणे लक्षात येते. अर्थात, सुफीझमवर लेखन केलेल्या मान्यवर लेखकांमध्येच वेगवेगळ्या मुद्द्यांवर मतभिन्नता दिसून येते. या मतभिन्नतेमुळे काही संभ्रम निर्माण होतात. हे संभ्रम दूर करणे, हा समाज प्रबोधनाचा महत्त्वाचा विषय आहे.

आजच्या विज्ञानाच्या, तंत्रज्ञानाच्या आणि आधुनिकतेच्या वातावरणात समाजाला सुफी विचारांची आवश्यकता आहे का, हाही एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. 'सुफी विचार समाजाला अंधश्रद्धेकडे घेऊन जातो' असे सांगणाऱ्यांचाही एक प्रवाह आहे. तसेच 'सुफी विचार समाजाला चमत्काराकडे आकर्षित करतो आणि वैज्ञानिकतेपासून दूर नेतो' असाही निष्कर्ष काही लेखकांनी काढला आहे.

मुस्लीम समाजात अनेक पंथ, संप्रदाय आणि विचारधारा आहेत. त्यामुळे मुस्लीम समाजात बहुविधता दिसून येते. तथापि, मुस्लीम समाज एकजिनसी आहे, असा एक गैरसमज आहे. सुफी संप्रदायातही विविध उपपंथ आणि भिन्न विचारप्रवाह आहेत. या बहुविधतेमुळे संप्रदायात जशी सर्वसमावेशकता येते, तसाच तिच्यात मतभेदांचा शिरकावही होतो. उदाहरणार्थ, पीर-मुरीदची

(गुरू-शिष्य परंपरा) संकल्पना इस्लामचा भाग नाही, असे काही मतप्रवाह मांडतात. मुस्लिमांनी कोणाला गुरू करावे किंवा करू नये, तसेच दर्ग्यात जाऊन माथा टेकवावा किंवा टेकवू नये, या संदर्भात मुस्लीम समाजात विविध समजुती आहेत. याला 'अकीदा' असे म्हणतात. या विषयावरील अनेक पैलू उलगडण्याचा प्रयत्न अनेक लेखकांनी केला आहे. अलीगढ विद्यापीठातील इतिहासाचे मान्यवर प्राध्यापक हबीब यांनी खालिक निजामींच्या, १९५२मध्ये लिहिलेल्या 'तवारीख मशाइखे चिश्त' या पुस्तकास प्रस्तावना लिहिली. यात ते म्हणतात की, 'केवळ चमत्काराच्या आधारावर सुफी संप्रदायाविषयी भूमिका तयार करणे योग्य ठरणार नाही.' १८६२मध्ये शेख गुलाम सरवर लाहोरी यांनी सुफी परंपरेवर 'ख़ज़ीनत-उल-अस्फिया' हे पुस्तक लिहिले. प्रा. हबीब यांच्या मते, 'या पुस्तकात चमत्काराच्या कथा इतक्या तपशीलवार सांगितल्या आहेत की, मानवी बुद्धीला लाज वाटावी.' ते पुढे स्पष्ट करतात की, 'चमत्काराच्या या निरर्थक कथांचा आणि सुफी तत्वज्ञानाचा दुरान्वयानेही संबंध नाही.' यासाठी प्रा. हबीब निजामुद्दीन औलियांचा संदर्भ देतात. निजामुद्दीन औलिया म्हणतात, 'चमत्काराचे सुफी तत्वज्ञानाशी नाते नाही. वास्तविक, सुफी तत्वज्ञान नैतिक जीवन पद्धती आणि सृष्टिक्रमाचे परिपूर्ण विश्लेषण सादर करते.' प्रा. हबीब हे सुफी तत्वज्ञानाच्या 'वहदत उल वजूद' (एकेश्वरवाद) या सिद्धान्ताला धर्माच्या पलीकडे जाऊन अखिल मानवतेच्या पातळीवर जाण्याइतपत व्यापक स्तराबर नेतात आणि महत्त्व देतात.

सुफी संप्रदायातही काही प्रवाह आहेत. यातील नक्शबंदी नावाचे सुफी घराणे आणि मुस्लीम बादशहा यांच्यात घनिष्ठ संबंध असल्याचे दिसून येते. औरंगजेबासारख्या राजे लोकांत धार्मिक कट्टरपणा वाढवण्यात, सामान्यांवर जिझिया कर लादला जाण्यात कय्यूमचे नक्शबंदी घराणे कारणीभूत असल्याचे सांगितले जाते. तसेच जुनेद बगदादी यांनी आवाहन केल्यानंतर जवळपास पाचशे वर्षे सुफींनी राजकीय छत्रापासून लांब राहण्याचा प्रयत्न केला. मात्र चौदाव्या शतकापासून सुफींनी हे पथ्य पाळले नाही, असे निजामी मान्य करतात.

निजामुद्दीन औलिया शिष्य बनवताना साधकांना त्यांची संपत्ती विकायला लावीत व आलेला पैसा गोरगरिबांना वाटण्यास सांगत. कमी कपडे, जपमाळ, नमाजसाठी चटईचा तुकडा, दोनचार धांडी यांखेरीज कोणतीही वस्तू बाळगण्याची परवानगी साधकांना नसे. फरीदुद्दीन गंजशकर (तेरावे शतक) यांच्या गुरुकुलात साधकांना अंगमेहनतीची कामे करावी लागत. त्यांच्या शिष्यांना ते आलिम (धर्माभ्यासक) बनवीत. यांपैकी अनेक सुफींनी समाजसेवेचे व्रत घेतले होते. धर्म, जात यांच्या पलीकडे जाऊन अन्नछत्रात आणि गुरुकुलात सर्वांना सामावून घेतले जात असे. स्त्रियांना अपशकुनी मानण्याच्या पद्धतीला काही सुफींनी विरोध केला.

त्याग, बंधुभाव, प्रेम, एकेश्वरवाद, चांगुलपणा, साधी राहणी, नैतिकता ही जीवनमूल्ये सुफी संप्रदायाची वैशिष्ट्ये म्हणता येईल. मात्र सुफी संप्रदायाचा पाया आध्यात्मिक आहे. त्यामुळे आजच्या विज्ञान युगात सुफी विचारधारा आणि वैज्ञानिकता यांच्यातील संघर्ष साहजिक आहे. परंतु सुफी संप्रदायातील चांगुलपणा आणि व्यापक मानवता लक्षात घेऊन मानवी कल्याण साध्य करण्यासाठी सुफी विचार आणि वैज्ञानिक जीवनशैली यांच्यात समन्वय आणि सुसंगतता आणण्यासाठी प्रयत्न केले, तर ते समाजहिताचे ठरेल. 'बेफाम भौतिक आकांक्षामधून माणुसकीचा बळी जाऊ न देण्याची क्षमता सुफी विचारांमध्ये आहे. सुफी विचाराचे औचित्य आजही आहे.

विज्ञान युगात निर्माण होणाऱ्या क्रौर्याला 'सुफी विचार' हा उतारा आहे. सुफी विचार म्हणजे कोणत्या एका विशिष्ट धर्मीयांचे विचार नव्हेत. बुद्ध, सेंट क्लेमेंट, बाबा फरीद, गुरू नानक, ज्ञानेश्वर, तुकोबा सर्वांना सामावून घेण्याचा आवाका सुफी विचारांमध्ये आहे' असे सुफी संप्रदायाचे व इस्लामचे अभ्यासक प्रा. डॉ. अलीम वकील यांना वाटते (अलीम वकील, 'सुफी संप्रदायाचे अंतरंग', प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २०००). या दृष्टीने सुफी संप्रदायाचे समाज प्रबोधनात महत्त्व आहे.

प्रबोधनाची प्रेरणा :

अठराव्या शतकामध्ये ब्रिटिशांनी भारतामध्ये आपल्या सत्तेचा पाया घातला आणि भारतातील समाज सुधारणेसाठी आशेचा एक किरण निर्माण झाला. ब्रिटिशांच्या भारतावरील वर्चस्वाचे अनेक दुष्परिणाम असले, तरी त्यात काही चांगल्या गोष्टीदेखील आहेत. 'समाज सुधारणा' ही त्यांपैकीच एक बाब आहे.

भारतामध्ये सती प्रथा, जातिव्यवस्था, बालविवाह, विधवा स्त्रियांचे प्रश्न अशा अनेक कुप्रथा होत्या. त्या कालविसंगत होत्या, परंतु त्या समाजामध्ये मोठ्या प्रमाणात प्रचलित होत्या. भक्ती संप्रदाय आणि सुफी संप्रदाय यांच्या इतिहासात भारतातील समाज सुधारणेचा इतिहास दिसतो, परंतु खऱ्या अर्थाने भारतातील समाज सुधारणेचा पाया आद्य समाज सुधारक राजा राममोहन राय यांनी घातला. त्यांनी समाज सुधारणा करण्यासाठी कायदेशीर मार्गाचा वापर केला, हे त्यांच्या कार्याचे वेगळेपण होते. सामाजिक इतिहासामध्ये, कोणत्याही काळामध्ये, कोणत्याही प्रदेशामध्ये सर्वांत जास्त अन्याय झालेला सामाजिक घटक म्हणजे 'स्त्री'. समाज सुधारणेची सुरुवात स्त्रियांच्या प्रश्नांवरूनच झाल्याचे आपल्याला दिसते. भारतीय उच्च जातीच्या स्त्रियांमध्ये सती प्रथा प्रचलित होती. बंगालमध्येदेखील मोठ्या प्रमाणात स्त्रिया सती जात. राजा राममोहन राय यांनी या प्रथेचा विरोध केला आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे भारतामध्ये १८२९ साली सतीबंदीचा कायदा लागू करण्यात आला. त्यांनी १८२८मध्ये 'ब्राह्मो सभे'ची स्थापना केली. या सभेला नंतरच्या काळात 'ब्राह्मो समाज' असे नाव पडले. यानंतर भारतामध्ये वेगवेगळ्या संस्था स्थापन झाल्या. त्यांनी वेगवेगळ्या सामाजिक विषयांना धरून काम करायला सुरुवात केली आणि भारतीय समाजात सामाजिक सुधारणांचे वारे वाहू लागले.

१८४९मध्ये महाराष्ट्रातील पुणे, सातारा आणि इतर काही शहरांमध्ये दुर्गाराम मेहताजी, दादोबा पांडुरंग आणि त्यांचे मित्र यांनी एकत्र येऊन 'परमहंस मंडळी'ची स्थापना केली. या संस्थेने जातिव्यवस्थेला फक्त शाब्दिकच विरोध केला नाही, तर त्यांच्या बैठकांमध्ये संस्थेचे सदस्य निम्न जातीय लोकांना जेवण बनवायला लावून त्यांच्या हाताचे जेवण खात असत. ही त्या काळाच्या दृष्टीने खूपच क्रांतिकारक गोष्ट होती. या संस्थेने स्त्री-शिक्षण तसेच विधवा पुनर्विवाहासाठी प्रयत्न केले.

धर्मसुधारणेशिवाय समाज सुधारणा करणे अशक्य असल्याचे लक्षात घेऊन आत्माराम पांडुरंग यांनी मुंबई येथे १८६७ साली 'प्रार्थना समाजा'ची स्थापना केली. प्रार्थना समाजाच्या विचारांमध्ये ईश्वराचे अस्तित्व मान्य करण्यात आले होते, परंतु मूर्तिपूजेला विरोध करण्यात आला होता.

'आत्मिक उन्नतीसाठी देवावर श्रद्धा ठेवणे आणि त्याची प्रार्थना करणे गरजेचे आहे; परंतु देव निराकार आहे' असे त्यांचे मत होते. न्यायमूर्ती रानडे यांनी महाराष्ट्रामध्ये प्रार्थना समाजाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात काम केले.

१८७३ साली महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्याने स्त्रिया, दलित, शूद्र, कष्टकरी वर्ग, शेतकरी, बहुजन समाज यांच्या कल्याणासाठी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. ही भारतातील खेडोपाड्यांत पोहोचलेली पहिली चळवळ आहे. विषमता निर्मूलन, आधुनिक संस्कृती आणि ज्ञानप्रसार यांवर सत्यशोधक विचाराचा प्रामुख्याने भर होता.

पंजाब येथे १९७५ साली स्वामी दयानंद सरस्वती यांनी 'आर्य समाजा'ची स्थापना केली. आर्य समाजाचे तत्त्वज्ञान मांडण्यासाठी त्यांनी 'सत्यार्थ प्रकाश' या ग्रंथाचा वापर केला. आर्य समाजाने वैदिक धर्माचे महत्त्व पटवून दिले. त्याचबरोबर धर्मामध्ये असलेल्या त्रुटीदेखील अधोरेखित केल्या. 'वेद हे सत्यविद्येचे शास्त्र आहे. माणसाने सत्यग्रहण आणि असत्याचा त्याग करण्यासाठी नेहमी तयार असावे. माणसाने अविद्येचा नाश व विद्येची प्रगती केली पाहिजे' असा आर्य समाजाचा प्रमुख विचार होता. आर्य समाजाने रूढिग्रस्त आणि कर्मठ समाजावर टीका केली. आर्य समाजाच्या उद्दिष्टांबाबत मतमतांतरे आणि मतभिन्नता आहे, परंतु समाज प्रबोधनातील त्यांचे योगदान नाकारता येत नाही.

भारतामध्ये संस्थांतर्गत पातळीवर समाज सुधारणेचे काम झालेले आहेच, परंतु अनेक भागांत व्यक्तिगत पातळीवरदेखील मोठ्या प्रमाणात समाज सुधारकांनी काम केले. गुणाभिराम बरूआ (आसाम), कंदुकूरी विरेशलिंगम पंतुलु (आंध्र प्रदेश), स्वामी श्रद्धानंद, सर सय्यद अहमद खान, शिवदयाळ सिंघजी (उत्तर प्रदेश), मधुसूदनदास फकीर, मोहन सेनापती, गोपबंधु दास, गौरी शंकर (ओरिसा), नारायण प्रभू, के. पी. करुप्पन, वरभदानंद (केरळ), के. रंगराजन (कर्नाटक), धोलानाथ साराभाई, महिपतराम छोटालाल, उमियाशंकर, लालशंकर (गुजरात), विरेशलिंगम पंतुलु, आर. व्यंकटरामन (तामीळनाडू), हिजाम इराबोट (मणिपूर), राजर्षी शाहू महाराज, गोपाळ हरी देशमुख, महर्षी कर्वे, आगरकर (महाराष्ट्र) अशा अनेक समाज सुधारकांचा उल्लेख या निमित्ताने करता येईल. भारतीय समाज प्रबोधनात या आणि अशा संस्था, संघटना, चळवळी आणि व्यक्ती यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

मुस्लीम विचारवंत :

मुस्लीम समाजाच्या कल्याणासाठी आणि राष्ट्रीय एकात्मतेचा पुरस्कार करण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात अनेक मुस्लीम विचारवंत होऊन गेले. मुस्लीम प्रबोधनाचा विचार मांडणाऱ्या या मान्यवरांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सर्वसाधारणपणे असा एक समज आहे की, 'आधुनिक विचारांचे आणि सामाजिक प्रबोधनांचे विचार मांडणारे मुस्लीम विचारकच नाहीत.' या गृहीतकाला छेद देणारा मुस्लीम प्रबोधकांचा एक इतिहास आहे आणि तो बऱ्याच प्रमाणात दुर्लक्षित राहिला आहे. केवळ स्वातंत्र्याच्या आंदोलनातच नव्हे, तर आधुनिक विचारांच्या मांडणीमध्येदेखील त्यांचे योगदान फार मोठे आहे. पोथीनिष्ठ आणि साचेबंद इस्लामला विरोध करून सुधारणेचा विचार मांडणाऱ्या या विचारवंतांमध्ये काही प्रबोधनवादी उलेमाही आहेत. एकूण मुस्लीम

प्रबोधनाचा विचार मांडताना या सर्व विचारवंतांची दखल घेतली पाहिजे.

ज्याप्रमाणे भारतातील समाजसुधारणेची सुरुवात राजा राममोहन राय यांनी बंगालमधून केली, त्याचप्रमाणे मुस्लीम समाज सुधारणेची सुरुवातदेखील बंगालमध्येच झाल्याचे दिसते. बंगाली मुस्लीम समाजामध्ये आधुनिकता यावी आणि वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण व्हावा, यासाठी एकोणिसाव्या शतकापासून वेगवेगळ्या समाज सुधारकांनी वेगवेगळे मुद्दे घेऊन प्रयत्न केलेले दिसतात.

फराईजी आंदोलनाची स्थापना हाजी शरीयतुल्लाह यांनी पूर्व बंगाल (सध्याचा बांग्लादेश) येथे १८१८-१९च्या दरम्यान केली. या आंदोलनाची सुरुवात मुख्यतः इस्लामने घालून दिलेल्या तत्वांनुसार जीवन व्यतीत करत असताना इस्लाममध्ये प्रतिबंध लावण्यात आलेल्या गोष्टींपासून लांब राहून मानवी हिताच्या तत्वांचा प्रचार करणे आणि इस्लामच्या मूलभूत कर्तव्यांचे आचरण करणे, या उद्दिष्टाने झाली होती. एका मर्यादेपर्यंत याचे महत्व आहेच. १८१९मध्ये या आंदोलनाने शोषित शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करून निळीचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अधिकारांचे रक्षण करण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. पारलौकिकतेबरोबरच मानवाच्या ऐहिक जीवनातील प्रश्नांवरही त्यांनी काम केले. विशेषतः धार्मिक, सामाजिक आणि राजकीय सुधारणा करून, इंग्रजांच्या विरोधात जनमत निर्माण करून, सत्ताबदल करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केलेले दिसून येतात.

सय्यद नवाब अब्दुल लतिफ खान बहादुर (१८३८-१८९३) यांच्या नावाचाही उल्लेख करता येईल. ते इंग्रजी भाषेचे सहजतेने लेखन करीत. त्याचबरोबर ते बंगाली, उर्दू आणि हिंदुस्थानी भाषेचे उत्कृष्ट वक्ता होते. १९४८मध्ये त्यांनी कोलकाता मदरशाच्या अँग्लो-अरबी विभागात व्याख्याता म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर ते लगेचच प्रशासकीय सेवेत रुजू झाले. १८४९मध्ये ते डेप्युटी मॅजिस्ट्रेट म्हणून काम करू लागले आणि १८६३मध्ये लॉर्ड एल्गिन यांनी त्यांना कोलकाता विद्यापीठाचा फेलो म्हणून नियुक्त केले. १८७७ साली लॉर्ड लिटनने त्यांना 'खान बहादुर' ही पदवी बहाल केली. लॉर्ड रिपन यांच्याकडून त्यांना भारतीय साम्राज्याचा 'ऑर्डर ऑफ कंपॅनियन' मिळाला. १८८४मध्ये ते प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट या पदावर असताना निवृत्त झाले. बंगाली मुस्लीम विधान परिषदेत सभासदत्व मिळालेले ते पहिले बंगाली मुस्लीम होते. १८६१मध्ये त्यांनी लिहिलेल्या 'अ मिनिट ऑन हुगली मदरसा' या लेखामध्ये मुस्लिमांच्या शैक्षणिक समस्या आणि त्यांचे वेगवेगळे पैलू यांवर भाष्य केले आहे. तसेच 'सद्य परिस्थितीत इंग्रजी ही अशी भाषा आहे, जी शिकणाऱ्याच्या जीवनामध्ये प्रगती घडवून आणू शकते.' असा युक्तिवाद त्यांनी केला. अरबी आणि फारसी या भाषांसोबतच मुस्लिमांनी प्राथमिक इंग्रजी भाषा शिकावी यासाठी त्यांनी वेगवेगळ्या स्तरांतून प्रयत्न केले. १८५३ साली त्यांनी कोलकाता मदरशातील अँग्लो-पर्शियन विभागात 'फारसी भाषेसोबतच प्राथमिक इंग्रजी भाषा शिकवली जावी' अशी शिफारस केली.

अब्दुल लतिफ त्यांच्या या कार्यामध्ये त्यांना जौनपुर येथील तयुनी चळवळीचे मौलाना करामत अली (१८००-१८७३) यांचे सहकार्य लाभले. करामत अली हे ब्रिटिश हिताच्या वृत्तीचे असल्याचे सांगण्यात येते. मुस्लिमांमध्ये आधुनिक दृष्टीकोन निर्माण होण्यासाठी त्यांनी मुस्लिमांना युरोपीय भाषा शिकण्याची विनंती केली होती. इस्लामीकरण, तसेच मुस्लिमांमध्ये धार्मिक-

सामाजिक ऐक्य निर्माण व्हावे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते.

अब्दुल लतिफ यांचा प्रभाव सय्यद अमीर अली (१८४९-१९२८) यांच्यावरदेखील मोठ्या प्रमाणात पडलेला दिसून येतो. सय्यद अमीर हे शिया मुस्लीम होते. १८९०मध्ये ते कोलकाता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. नंतरच्या आयुष्यात त्यांनी एका इंग्लिश महिलेशी लग्न केले आणि ते इंग्लंडमध्ये स्थायिक झाले. अमीर अली यांनी असे प्रतिपादन केले की, 'इंग्रजी भाषेच्या शिक्षणाशिवाय बंगाली मुस्लिमांना इतर समाजघटकांसोबत यशस्वीरीत्या स्पर्धा करणे खूप अवघड होईल.' 'मुस्लिमांनी आधुनिकतेच्या प्रकाशात इस्लामचा अर्थ लावावा' असे अमीर अलींचे मत होते. 'मुस्लिमांनी हिंदू बांधवांच्या बरोबरीने राजकीय प्रशिक्षण घ्यावे आणि राजकारणामधील सहभाग वाढवावा' यावर अमीर अलींचा भर होता. मुस्लीम 'मागासलेपणा' आणि सरकारमध्ये मुस्लिमांचे प्रतिनिधित्व करण्यामध्ये असलेल्या अडचणी लक्षात घेऊन अमीर अलींनी १८७७ साली 'सेंट्रल नॅशनल मुहम्मदन असोसिएशन'ची स्थापना केली.

अमीर अलींचे अनुयायी असलेले अमीर हुसेन स्वतः कलेक्टर होते. त्यांनी अमीर अलींचे विचार पुढे घेऊन जाण्यात महत्त्वाचे योगदान दिले. इंग्रजी शिक्षणाचा वापर करून त्यांनी मुस्लीम समाजाचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. 'मुस्लिमांनी मोठ्या प्रमाणात प्रशासकीय सेवांमध्ये काम करावे' असे त्यांचे मत होते. 'हुगली मदरशावर बंदी आणून मदरशावर होणारा खर्च मुस्लिमांना इंग्रजी शिक्षण देण्यावर करण्यात यावा' असे पत्र अमीर हुसेन यांनी ब्रिटिशांना लिहिले.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक-सांस्कृतिक बदल घडवून आणण्यासाठी सामूहिकरित्या संस्थात्मक पातळीवर वेगवेगळे प्रयत्न सुरू झाले. यामध्ये अब्दुर रऊफ यांनी स्थापन केलेल्या अंजुमन-ए-इस्लामी (१८५५), नवाब अमीर अली यांच्या नॅशनल मुहम्मदन असोसिएशन (१८५६), अब्दुल लतिफ यांच्या मुहम्मदन असोसिएशन ऑफ कलकत्ता (१८६३) आणि सय्यद अमीर अली यांच्या सेंट्रल नॅशनल मुहम्मदन असोसिएशन ऑफ कलकत्ता (१८७६) या संस्थांनी खूप महत्त्वाचे योगदान दिले. यांमधील अब्दुल लतिफ आणि अमीर अली यांनी आपल्या कामाचा परिप्रेक्ष्य फक्त बंगालपुरताच मर्यादित ठेवला नाही, तर तत्कालीन भारतातील इतर प्रदेशांतील मुस्लीम समाजापर्यंत आधुनिक शिक्षण आणि दृष्टीकोन यांविषयी जागृती निर्माण करण्याचे काम त्यांनी केले.

सद्यःस्थितीत 'केरळ' हे भारतातील सर्वांत जास्त साक्षर राज्य असले, तरी त्यामागील समाज प्रबोधनाची पार्श्वभूमी स्वातंत्र्यपूर्व काळापासून चालत आलेली दिसून येते. केरळमधील नायर लोकांची धार्मिक सुधारणेची चळवळ किंवा एझावा समुदायाची जातिविरोधी चळवळ यांमुळे केरळमध्ये सामाजिक सुधारणेचे वारे वेगात वाहू लागले. केरळमधील मुस्लीम सुधारणावादी चळवळींनी या विविध चळवळींकडूनच ऊर्जा संपादन केली आणि त्यांना आधुनिक शिक्षण आणि पुरोगामी विचार यांची साथ मिळाली.

केरळमधील सुधारणावादी चळवळींतील प्रमुख समाज सुधारकांमध्ये सनाउल्ला मक्ति थंगल, वक्कोम मौलवी, चलीलाकथ कुंचहम्मद हाजी आणि हमदानी थंगल यांचे प्रामुख्याने नाव घेता येईल. मुस्लिमांमध्ये सामाजिक सुधारणा घडवण्यासाठी त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. यामध्ये सर्वांत जास्त वापर मुद्रण तंत्रज्ञानाचा केलेला दिसून येतो. या सुधारकांनी सर्वप्रथम

मुस्लिमांमध्ये आधुनिक शिक्षण लोकप्रिय करण्याचे काम हाती घेतले आणि त्याचा वापर करून वसाहतवादी धारतातील बदलत्या वास्तवाकडे सकारात्मक दृष्टीने पाहून, मुस्लीम समाजात त्यासाठी स्वीकारार्हता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या मुस्लीम सुधारकांच्या अजेंड्यामध्ये धार्मिक सुधारणा घडवणे, आधुनिक शिक्षण लोकप्रिय करणे आणि स्त्री-सबलीकरण करणे इत्यादी मुद्दे होते.

वक्कोम मोहम्मद अब्दुल कादीर मौलवी (१८७३-१९३२) हे एक स्वातंत्र्य सेनानी, प्रभावी लेखक, पत्रकार आणि मुस्लीम अभ्यासक होते. त्यांनी मुस्लीम समाज सुधारणेमध्ये दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'केरळमधील मुस्लीम पुनरुज्जीवनाचे जनक' म्हणून ओळखले जाते. त्यांनी १९०५मध्ये 'स्वदेशाभिमानी' नावाचे वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्रावर १९१०मध्ये बंदी घालण्यात आली. याचे कारण, त्यांनी इंग्रजी प्रशासनाच्या धोरणांना आणि त्रावणकोरचे दिवाण पी. राजगोपालाचारी यांच्यावर टीका केली होती.

वक्कोम मौलवी यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठीदेखील बरेच प्रयत्न केल्याचे दिसते. त्यांनी 'दीपिका', 'अल्-इस्लाम' आणि 'अल्-मुस्लीम' या पुस्तकांमधून स्त्रियांच्या शिक्षणासंदर्भातील समस्या अधोरेखित केल्या. स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी धर्मादाय संस्थांना आणि मुस्लीम पुढाऱ्यांना शाळा सुरू करण्याची विनंती केली. मुस्लिमांमध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी त्यांनी 'ऑल त्रावणकोर मुस्लीम महाजनसभा' आणि 'चिरायिंकील तालुक मुस्लीम समाजम' या संस्थांची स्थापना केली.

चलीलाकथ कुंचहम्मद हाजी (१८६६-१९१९) यांनी केरळमधील मदरसा शिक्षणाच्या आधुनिकीकरणामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. मदरशामधील धार्मिक शिक्षण देण्यासाठी राज्यात अवलंबलेल्या कालविसंगत अध्यापनशास्त्रीय पद्धती बदलण्याचे क्रांतिकारक काम त्यांनी केले. केरळच्या धार्मिक संस्थांमध्ये प्रथमच प्रादेशिक शिक्षणाची सुविधा त्यांनी उपलब्ध करून दिली आणि वैज्ञानिक विषयांची ओळख करून दिली. त्यांनी स्वतःच्या कुटुंबातील स्त्रियांना शाळेमध्ये पाठवून स्त्री-शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे काम केले. त्यांच्या समाज सुधारणेच्या योगदानाला अधोरेखित करण्यासाठी त्यांना 'केरळचे सर सय्यद' अशी उपाधी देण्यात आली.

एम. हलिमा बीबी (१९१८-२०००) यांनी केरळमध्ये स्त्रियांच्या प्रश्नांच्या संदर्भात केलेले काम खूप महत्त्वाचे आहे. त्या एक स्वातंत्र्य सेनानी, समाजसुधारक, पत्रकार आणि इस्लामी स्त्रीवादी होत्या. त्यांनी आपल्या भाषणांतून आणि लेखणीतून महिलांची दुर्दशा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. १९३८ साली, वयाच्या विसाव्या वर्षी त्यांनी 'मुस्लीम वनिथा' नावाचे नियतकालिक सुरू केले होते. 'महिलांना जबाबदार, समजदार आणि शहाणे बनवणे तुमच्या हातात आहे' असे म्हणत त्यांनी पुरुष वर्गाला आवाहन केले. 'केवळ शिक्षणानेच महिलांचे समाधान होऊ शकत नाही, तर आपल्या गरजा स्पष्ट करण्यासाठी आणि आपले हक्क सुरक्षित करण्यासाठी महिलांनी एकत्र येणे आवश्यक आहे' असे मत त्यांनी व्यक्त केले. १९३८मध्ये थिरुवल्ला येथे झालेल्या महिला परिषदेमध्ये त्यांनी केलेले भाषण हा स्त्रियांच्या पुनर्जागरणासाठी एक महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून संबोधला जाऊ शकतो. हलिमा बीबी यांच्याकडे केरळच्या मुस्लीम समाजातील महिलांच्या प्रगतीचे प्रतीक म्हणून बघितले जाते.

बंगाल आणि केरळ या राज्यांप्रमाणेच उत्तर प्रदेश हेदेखील मुस्लीम समाज सुधारणेचे एक महत्त्वाचे केंद्र होते. सर सय्यद अहमद खान, मुहम्मद इकबाल, अल्ताफ हुसैन हाली पानिपती, मौलाना अबुल कलाम आझाद इत्यादी लोकांनी मुस्लीम समाजातील सामाजिक, धार्मिक आणि राजकीय सुधारणांमध्ये महत्त्वाचे योगदान दिलेले आहे.

सर सय्यद अहमद खान (१८१७-१८९८) यांनी मुस्लिमांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षणाचा मार्ग वापरला. त्यांनी १८६४मध्ये 'गाझीपुर लिटररी सोसायटी' आणि १८६५मध्ये 'मोहम्मदन लिटररी सोसायटी' यांची स्थापना केली. या सोसायटीने राजकीय जागृतीपेक्षा इंग्रजी भाषा अवगत करून देण्याचा आणि सांस्कृतिक जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आधुनिक शिक्षणाच्या प्रसारासाठी सर सय्यद अहमद खान यांनी १८६४मध्ये 'सायंटिफिक सोसायटी फॉर मुस्लीम'ची स्थापना केली. यामध्ये आधुनिक इतिहास, विज्ञान, राजकीय अर्थशास्त्र या विषयांबरोबरच इंग्रजी विषयाचा अभ्यासक्रमही शिकवला जाऊ लागला.

सर सय्यद अहमद खान यांची अशी धारणा होती की, 'मुस्लीम समाजाचे कल्याण दोन प्रमुख घटकांवर अवलंबून आहे. पहिला घटक, मुस्लीम समाजाने आधुनिक पाश्चिमात्य शिक्षणाचा अंगीकार करावा आणि दुसरा घटक, मुस्लिमांनी प्रशासनातील नोकरीचे महत्त्व समजून ऐहिक उन्नती करावी.' सनातनी मुस्लिमांनी खान यांच्या सूचनांना दुर्लक्षित तर केलेच, परंतु त्यांनी खान यांच्या विरोधात वेगवेगळ्या पद्धतीने विरोधी मोहिमा सुरू केल्या. त्यांनी खान यांना 'काफिर' ठरवले, त्यांच्यावर ख्रिश्चन आणि इंग्रजांचा प्रभाव जास्त असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केला. मात्र खान यांनी आपल्या लेखणीद्वारे 'तलवारीचा धर्म' अशी तयार झालेली इस्लामची प्रतिमा दूर करून हा धर्म उदारमतवादी असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केला.

मुस्लीम समाजातील निरक्षरता आणि अशिक्षितपणा दूर व्हावा या उद्देशाने त्यांनी १८७५मध्ये अलीगढ येथे 'द मुहम्मदन अँग्लो-ओरिएंटल कॉलेज'ची स्थापना केली. मुस्लीम कुटुंबीयांना प्रत्यक्ष भेटून महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांना आवाहन केले. १९२०मध्ये या मुहम्मदन अँग्लो-ओरिएंटल कॉलेजचे नामांतर 'अलीगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी' असे करण्यात आले. 'मुस्लीम समाजातील सामाजिक आणि आर्थिक दुरवस्था दूर करण्यासाठी शिक्षणाचा कसा वापर करता येईल' याची प्रेरणा सर सय्यद अहमद खान यांच्या कार्यापासून घेता येईल.

सर सय्यद अहमद खान यांनी आधुनिकतेचा स्वीकार केला. 'ब्रिटिशप्रणित आधुनिक शिक्षणाचे स्वागत केले पाहिजे' असा आग्रह त्यांनी धरला. तसेच नवीन शिक्षणात समाविष्ट असलेल्या शास्त्रीय, बुद्धिवादी दृष्टीने त्यांनी कुराणाकडेदेखील पाहिले. तरीही कुराणावरील त्यांच्या भाष्यात बुद्धिवादाचा मोठा कल्पनाशील विलास होता. 'अल्लाहच्या निसर्गरचनेत आढळणाऱ्या शक्तीचाच मोठा अर्थपूर्ण आविष्कार कुराणात झाला आहे' असे इस्लाम शास्त्रशुद्ध असल्याचे आणि कुराण श्रेष्ठ धर्मग्रंथ असल्याचे सिद्ध करण्यासाठी सर सय्यद अहमद प्रतिपादन करतात. सर सय्यद अहमदखान यांचे मित्र व शिष्य हैदराबादचे चिराग अली यांची आधुनिकता याहून प्रखर असली, तरी तिचा रोख आणि आशय तोच होता. परिणामी, आधुनिकतावादाच्या या मुस्लीम प्रवक्त्यांनी मुसलमानांची अलिप्तता कमी केली नाही. उलट तिला आधुनिक अधिष्ठान दिलं. सर सय्यद यांनी मुसलमानांना आधुनिक शिक्षण घेण्याचा आग्रह धरला, तोच मुळी सुशिक्षित हिंदूंशी

सख्य, समरसता किंवा सहकार्य करण्यासाठी नसून त्यांच्याशी यशस्वी स्पर्धा करण्यासाठी धरला होता. मुस्लिमांना राष्ट्रीय काँग्रेसपासून दूर ठेवण्यासाठी सर सय्यद अहमदखान, चिराग अली आणि अमीर अली यांनी आपले सारे बुद्धिवैभव, कार्यशक्ती आणि संघटनाचातुर्य पणाला लावले. काही वेळा असेच निरीक्षण इतरही प्रबोधकांच्या प्रयत्नांमध्ये आढळून येते.

मुस्लीम स्त्रियांच्या हक्कांचे पुरस्कर्ते म्हणून ओळखले जाणारे मौलवी मुमताज अली खान हे सर सय्यद अहमद खान यांच्या बरोबरीच्या सहकाऱ्यांपैकी एक होते. सर सय्यद अहमद खान यांनी सुरू केलेल्या समाज सुधारणेच्या चळवळीतील ते एक प्रमुख विचारवंत होते. त्यांनी पोथीनिष्ठ आणि प्रतिगामी प्रवृत्तीच्या उलेमांना फार मोठी टक्कर दिली. त्यांनी कुराणातील स्त्री-हक्कांचे समर्थन केले. ब्रिटिश काळात काही उलेमांनी मुस्लीम स्त्रियांचे हक्क काढून घेऊन पुरुषांच्या वर्चस्वाचे समर्थन केले होते; स्त्रियांना मालमत्तेच्या हक्कापासूनही वंचित ठेवले होते. हे ब्रिटिशप्रणित कायदे स्त्रियांवर अन्याय करणारे होते. मौलवी मुमताज अलीखान यांनी या कटकारस्थानाविरुद्ध मोहीम उघडून उर्दू भाषेत 'हकुक-अल्-निस्वान' म्हणजे 'स्त्रियांचे हक्क' या नावाचे पुस्तक लिहिले आणि त्याच्या आधारे स्त्री-हक्क समर्थनाची चळवळ उभी केली. 'हिजाबच्या (बुरखा) आड स्त्रिया गुलामगिरीतच असतात' असे सांगून त्यांनी या पद्धतीवर चौफेर टीकाही केलेली आहे. त्यांच्या मते, 'हिंदुस्थानातील बुरखा आणि पडदा पद्धत शरीयतनुसार नाही. स्त्री आणि पुरुष या दोहोंबर मर्यादा व सभ्यता पाळण्यासाठी पुरेसे कपडे घालण्याचे समर्थन शरीयतमध्ये दिसून येते, मात्र 'पडदा किंवा बुरखा घालावा' असे शरीयतमध्ये सांगितलेले नाही. त्यामुळे 'स्त्रियांनी बुरख्यात राहावे' किंवा 'बाहेर जाऊ नये' अशी बंधने निरर्थक आहेत.' विविध सुधारणा सुचविणारे आणि स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन करणारे हे क्रांतिकारक विचार मुळातूनच समजून घेतले पाहिजे.

मुहम्मद इकबाल (१८७७-१९३८) यांचे मुस्लीम प्रबोधनामधील योगदान महत्त्वाचे आहे. ते इस्लामचे गाढे अभ्यासक होते. इस्लामचा अभ्यास करताना 'इज्तिहाद'बर (ज्येष्ठ, अनुभवी तज्ज्ञांनी विचारपूर्वक दिलेला सल्ला) भर देऊन, कुराणाचा अर्थ कालसुसंगत लावण्याची तरतूद अधिकाधिक वापरून प्रस्थापित मुल्ला, उलेमा, परंपरावादी लोकांना त्यांनी इस्लामच्या उदारमतवादी दृष्टीकोनाकडे खेचण्याचा प्रयत्न केला.

अशाच पद्धतीने मुस्लीम महिलांच्या हक्काचा कैवार घेणारे मौलाना उमर अहमद उस्मानीसुद्धा प्रबोधनाच्या इतिहासात उपेक्षित राहिले आहेत. इतिहासात अनेक उलेमांची आणि धर्मगुरूंची भूमिका वादग्रस्त राहिली आहे. त्यांनी इस्लामचा संकुचित अर्थ लावून राज्यकर्त्यांना एक प्रकारे मदतच केलेली दिसते. भारताची फाळणी झाल्यानंतर मौलाना उमर अहमद उस्मानी पाकिस्तानात गेले. इस्लामी कायदेशास्त्राच्या बाबतीत त्यांचे विचार अतिशय पुरोगामी आणि उदारमतवादी होते. त्यांनी 'फिक्र-अल-कुराण' नावाचा सात खंडांतील ग्रंथ लिहिला. त्यांनी मांडलेल्या अन्वयाबद्दल उलट-सुलट मते असली, तरी त्यांच्या विद्वत्तेबद्दल कोणालाही शंका नाही. त्यांच्या या सुधारणावादी विचारांचा परामर्श घेणे आवश्यक आहे. तलाक, बहुपत्नीत्व आणि स्त्रियांचा वारसा या संदर्भात त्यांनी केलेले विवेचन अत्यंत पुरोगामी आणि स्त्रियांच्या स्वतंत्र अस्तित्वाचे समर्थन करणारे आहे. हे स्पष्टीकरण देताना ते कुराणातील अरबी शब्दांच्या मूळ मर्यादांचा शोध घेतात

आणि आपल्या विचाराच्या समर्थनार्थ दाखले देतात. त्याच्याच आधारे ते चार बायकांचा सिद्धान्त नाकारतात. 'जर काही अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाली, तरच बहुपत्नीत्वाला मान्यता आहे; अन्यथा नाही' असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

'एक पत्नी असताना तुम्ही दुसरे लग्न करू शकत नाही. त्यासाठी प्रथम पहिल्या पत्नीशी तलाक घ्यावा लागेल. तसेच तिला दिलेले महेर व अन्य स्त्री-धन परत घेता कामा नये.' तलाक-इ-बिद्दतसंदर्भात सुन्नी पंथाच्या चार उपपंथातील संस्थापकांनी (इमाम हनफी, इमाम शाफई, इमाम मलिक आणि इमाम हंबल) मांडलेल्या विचारांतील परस्पर विरोधी भूमिका आणि त्यांच्या विचारांतील आंतरविरोध मौलाना उस्मानींनी अशा पद्धतीने स्पष्ट करून दाखवले आहे. इस्लामी कायद्यातील गैरप्रकारांवर बोट ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य मौलाना उस्मानी यांनी केले आहे. स्वतः धार्मिक असूनही सुधारणावादी असणाऱ्या मौलाना उस्मानी यांचा प्रभाव समाजावर पडला नाही, हे एक दुर्दैव आहे.

तुफेल अहमद मंगलोरी हे राष्ट्रवादी विचारवंत महाराष्ट्रात फारसे परिचित नाहीत. कारण त्यांचे लेखन उर्दूत झालेले आहे आणि त्या लेखनाचा इंग्रजीत अनुवाद झाला नाही. ते मुस्लीम लीगच्या राजकारणाच्या पूर्ण विरोधी होते. तसेच धर्माच्या बाबतीत त्यांची भूमिका सुधारणावादी होती. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे, सर सय्यद अहमद खान यांच्या राजकारणावर त्यांनी कडाडून टीका केली होती. त्याचबरोबर या मानसिकतेचे सविस्तर विवेचन केले. त्यांचे उर्दूत लिहिलेले 'मुसलमानों का रोशन मुस्तकबील' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. अलिगढ कॉलेजमध्ये शिकलेल्या व पुढे त्याचेच विश्वस्त झालेल्या तूफेल अहमद मंगलोरी यांनी वेगवेगळ्या गावांत शाळा काढल्या. तसेच त्यांनी केवळ मुस्लिमांच्या शिक्षणासाठीच प्रयत्न केले नाहीत, तर व्यापार-उद्योगात त्यांची प्रगती व्हावी, म्हणूनदेखील प्रयत्न केले. त्यांचे 'सेल्फ गवर्नमेंट' हे पुस्तकही लोकप्रिय आहे. आधुनिक शिक्षण घेतलेल्या आणि सामाजिकदृष्ट्या प्रगत असलेल्या मुस्लिमांनी राजकारणात घेतलेल्या प्रतिगामी भूमिकेला त्यांनी कडाडून विरोध केला व उलट हिंदू-मुस्लीम ऐक्याचा प्रसार केला. त्यांनी लिहिलेल्या 'मुसलमानों का रोशन मुस्तकबिल' या ग्रंथात उदारमतवादी धार्मिक दृष्टीकोन व्यक्त होतो. तसेच साम्राज्यविरोधी भूमिका, धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रवाद ही मूल्येदेखील व्यक्त होतात.

मौलाना हुसैन अहमद मदनी हे संमिश्र राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते. खिलाफत चळवळ चालू असताना लोकसमूहांच्या संख्येचे राजकारण सुरू झाले. या बेळी ज्याप्रमाणे हिंदू समाजातील धर्मवादी अभिजन वर्गाला संख्येच्या गणिताचे महत्त्व लक्षात आले, तसेच ते मुस्लीम समाजातील 'अशरफ' वर्गाच्याही लक्षात आले. आर्य समाजाने शुद्धीची चळवळ गतिमान केली आणि इस्लामीकरण न झालेल्या जमातीचे शुद्धीकरण केले. अशरफांनीसुद्धा 'अजलाफ'बद्दल वाटणारी तुच्छतेची भावना टाकून दिली. या चढाओढीतून हिंदू-मुस्लिमांतील कडवे धर्मवादी एकमेकांवर हल्ला करू लागले. या काळात मौलाना हुसैन अहमद मदनी यांनी समन्वयाचा विचार मांडला. या काळात अनेक मुस्लीम नेते गांधीजींपासून दूर गेले. मात्र मौलाना मदनी शेवटपर्यंत गांधीजींसोबत राहिले. मदनींनी पॅन इस्लाम नाकारून हिंदू-मुस्लिमांच्या संयुक्त राष्ट्रवादाचा विचार मांडला.

१९३७मध्ये मौलाना मदनी यांनी आघाडी उघडून जाहीर केले की, 'राष्ट्रवादाचा आधार मातृभूमी असल्यामुळे हिंदू, मुस्लीम, शीख, पारशी असा भेद न करता सर्वांनी हिंदुस्थानी म्हणून राहायला पाहिजे.' या वेळी प्रसारमाध्यमे आणि मुस्लीम नेत्यांनी मौलाना मदनींसंदर्भात गैरसमज करून घेऊन त्यांच्या वक्तव्यावर मोठ्या प्रमाणात हल्ले केले. मोहम्मद इकबालनेसुद्धा अगदी खालच्या पातळीवर जाऊन टीका केली. तेव्हा मदनी यांनी जाहीर खुलासा केला की, 'मजहब आणि मिल्लत हे भूप्रदेशाच्या किंवा मातृभूमीच्या तत्त्वावर आधारित नसतात.' परंतु डॉ. इकबाल यांनी मौलाना मदनी यांच्याविरुद्ध मोहीम उघडली. त्यांची तुलना अहमदिया लोकांच्या पंथाशी करून 'गैरइस्लामी गोष्टी सांगणारे' अशी जनमानसांत त्यांची प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. डॉ. इकबाल यांनी केलेल्या आरोपांचे खंडन करण्यासाठी मौलाना मदनी यांनी 'मुत्तहिदा कौमियत और इस्लाम' हे पुस्तक लिहिले. ते मानवी ऐक्याचे समर्थक होते. 'भारतातील लोकसमुदायांत असणारी विविधता, म्हणजेच भाषा, संस्कृती, परंपरा हे लक्षात घेऊनच कौमियतचा विचार करावा लागतो' असे त्यांचे मत होते. मौलाना हुसेन मदनी हे जागतिक प्रवाहांची जाण असलेले, व्यवहारवादी चिंतक होते. मौलाना मदनी यांचा आदर्शवाद व समन्वयाचा विचार मुस्लीम लीग आणि धर्मांध उलेमा यांच्या चिथावणीच्या राजकारणामुळे निष्प्रभ ठरला. म्हणजेच भारताच्या बहुसांस्कृतिकतेवर आणि धर्मस्वातंत्र्यावर आधारित संमिश्र राष्ट्रवादाचा मुद्दा प्रभावहीन ठरला. धर्मनिष्ठ असणारे मौलाना आझाद त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात समन्वयवादी झाले. मौलाना मदनी मात्र सुरुवातीपासूनच समन्वयवादी होते. ते शेवटपर्यंत देशाच्या फाळणी विरोधात होते. दुर्दैवाने त्यांचा विवेकनिष्ठ समन्वयवाद जमातवादी राजकारणात क्षीण झाला. आझादांपेक्षाही जास्त क्रांतिकारक असणारे मौलाना मदनी अनेक अर्थांनी उपेक्षित राहिले.

मध्यपूर्वेत ज्ञानसाधना करणारे अनेक अरबी, पर्शियन, इजिप्शियन मुस्लीम विचारवंत आणि अभ्यासक होऊन गेले आहेत. भारतातदेखील ज्ञानाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत ऐतिहासिक स्वरूपाचे कार्य करणारे मुस्लीम विचारवंत झाले आहेत. किंबहुना भारतातील मुस्लीम विद्वानांचे योगदान मध्यपूर्वेतील विद्वानांच्या पेक्षा काही बाबतींत श्रेष्ठ दर्जाचे आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी पाटण्याचे मोहमद खुदाबक्ष आणि त्यांचे पुत्र सल्हुद्दीन खुदाबक्ष हे ज्ञान-साधनेच्या क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणारे पिता-पुत्र होऊन गेले. निरनिराळ्या देशांतील अमूल्य ग्रंथ, हस्तलिखिते, पेंटिग्ज, 'कॅलिग्राफिक' संग्रह यांचा शोध घेऊन, ती प्राप्त करून पाटणा येथे इस्लामी संस्कृतीचा ठेवा असणारे ग्रंथालय तयार करण्यासाठी त्या दोघांनी आपल्या आयुष्याची संपूर्ण कमाई खर्च केली. ऐतिहासिक महत्त्व असणारे अमूल्य ग्रंथ आणि हस्तलिखिते गोळा करण्याच्या छंदामुळे मोहमद खुदाबक्ष कफल्लक झाले. त्यांचे ग्रंथसंचयाचे कार्य त्यांचे पुत्र सलाहुद्दीन खुदाबक्ष यांनी तेवढ्याच ध्येयनिष्ठेने पुढे चालविले. विशेष म्हणजे, आपल्या व्यक्तिगत ग्रंथालयाचे रूपांतर त्यांनी 'पाटणा इस्लामी सार्वजनिक ग्रंथालयात' केले. आपल्या ज्ञानाचा अमोल साठा त्यांनी समाजाला अर्पण केला. या ग्रंथालयाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन ब्रिटिश म्युझियमने त्यासाठी प्रचंड मोठी रक्कम देऊन हे ग्रंथालय विकत घेण्याचा प्रस्ताव दिलेला होता. त्यावर एस. खुदाबक्षनी उत्तर दिले की, 'मी एक गरीब माणूस आहे. मला देऊ केलेली रक्कम माझे भाग्य बदलून टाकणारी आहे, परंतु ज्या ग्रंथांसाठी मी आणि माझ्या वडिलांनी आपले सर्वस्व अर्पण केले,

तो मी ब्रिटिशांच्या हवाली कसा करीन? अजिबात नाही! हा संग्रह 'पाटण्यासाठी' आहे. मी हा ठेवा पाटण्याच्या जनतेच्या चरणांशी अर्पण करणार आहे.'

या पिता-पुत्रांच्या योगदानाची आणि असीम त्यागाची नोंद अनेक ब्रिटिश विद्वानांनी घेतली. १९६९मध्ये आपल्या संसदेने कायदा करून 'राष्ट्रीय ग्रंथालय' म्हणून त्याला मान्यता दिली. 'खुदाबक्ष ओरिएंटल पब्लिक लायब्ररी पाटणा' हा इस्लामी संस्कृतीचे अभ्यासक आणि संशोधक यांच्यासाठी ज्ञानाचा अमोल ठेवा आहे.

खुदाबक्ष पिता-पुत्रांनी हा सर्व ज्ञानाचा ठेवा त्यांच्या परीने मिळवून जतन करून ठेवण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे 'खुदाबक्ष ओरिएंटल ग्रंथालय' आहे. न्यायालयातील आपले वकिलीचे काम संपवून आल्यानंतर महंमद खुदाबक्ष सायंकाळपासून सकाळपर्यंत पूर्णपणे इस्लामी संस्कृतीच्या अभ्यासात गढून जात असत; अनेक ठिकाणांहून दुर्मीळ हस्तलिखिते मिळविण्याचा प्रयत्न करीत असत. आपल्या आयुष्याची सारी कमाई त्यांनी त्यासाठी खर्च केली; आपले जीवन हलाखीत व्यतीत केले; स्वतःहून लादून घेतलेल्या गरिबीत आनंदाने राहिले. त्या काळात भारतातील सुशिक्षित मुसलमानांनी धर्मवादी राजकारणाचा खेळखंडोबा केला होता. त्यापासून अलिप्त राहत त्यांनी पुढील पिढ्यांसाठी मुस्लिमांचे योगदान जतन करून ठेवण्याचे कार्य केले. खुदाबक्ष कुटुंबाने आपली ज्ञानसाधनेची परंपरा सोडली नाही. आजही मुस्लीम अभ्यासक त्यावर फारसे काम करताना दिसत नाहीत.

ग्रंथप्रेमी विद्वान महंमद खुदाबक्ष यांच्या विषयीची माहिती अनेकांपर्यंत पोहोचलेली नाही. खुदाबक्ष यांनी धर्मांध उलेमांना आणि जमातवादी राजकारण्यांना 'विवेकशून्य धर्मवेडे' म्हणून संबोधले. यांच्यामुळे मुस्लिमांनी देशासाठी केलेल्या योगदानाकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यांच्या मते, 'पाश्चात्त्य विचारवंतांनी केलेल्या इस्लामच्या समीक्षेवर आक्षेप घेण्यात मुस्लीम अभ्यासकांनी आपली शक्ती खर्ची घातली. पाश्चात्त्यांच्या इस्लामवरील चौफेर हल्ल्यामुळे मुस्लीम विद्वान केवळ इस्लामच्या समर्थनाच्या मागे लागले. कुराण, हदिस, धर्मशास्त्र हाच त्यांच्या समर्थनवादी अभ्यासाचा मुख्य घटक बनला. भारतात हे मोठ्या प्रमाणात झाले. त्यामुळे मुस्लिमांनी ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत जी घर घातली, तिच्याकडे दुर्लक्ष झाले. आजही मुस्लीम विद्वान ठराबीक चाकोरीबद्ध निरीक्षणाच्या पलीकडे जात नाहीत.'

भारताच्या मुस्लीम विद्वानांच्या इतिहासात 'खुदाबक्ष कुटुंब' हे असाधारण घराणे होऊन गेले. केवळ हस्तलिखिते आणि दुर्मीळ पुस्तके संग्रहित करणे एवढेच कार्य त्यांनी केलेले नाही. महंमद खुदाबक्ष यांनी लिहिलेली कवने, कसिदे, विराण्या यांचे चार मोठे खंड आहेत. स्वतः सल्हुद्दीन खुदाबक्ष हे अत्यंत पुरोगामी विचारांचे प्रबोधनकार होते. त्यांनी इस्लामवर केलेले लिखाण क्रांतिकारक आहेत. ते जर उर्दू भाषेत आणले गेले, तर पोथीनिष्ठ उलेमा हादरून जातील. त्यांचा 'थॉट्स ऑन दी प्रेझेंट सिच्युएशन' हा प्रदीर्घ निबंध वाचल्यास पोथीनिष्ठ इस्लामवर त्यांनी चढविलेला हल्ला लक्षात येतो. खुदाबक्ष यांनी लिहिलेल्या ग्रंथांवर आधारित काही इंग्रजी पुस्तके आहेत. मुस्लीम अभ्यासकांनी हे सर्व ज्ञान हिंदीतून अनुवादित करण्याचे फारसे प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे मुसलमानांच्या योगदानाची माहिती पुढे येत नाही.

आधुनिक भारतात मुस्लीम समाजाचे धर्माच्या अंगाने प्रबोधन करणारे अनेक प्रबोधनकार होऊन

गेले. या प्रबोधनकारांमध्ये कुराणचे आदर्श भाष्यकार म्हणून ओळखले जाणारे मौलाना महंमद अली लाहोरी हे जागतिक कीर्तीचे प्रबोधनकार होऊन गेले. मूळ इस्लामचे सहिष्णू आणि उदारमतवादी स्वरूप दुर्लक्षित होऊन मध्ययुगीन कर्मठपणा आणि पोथीनिष्ठा यांचे परिणाम कुराणच्या भाष्यावर झालेले दिसून येतात. परिणामी, कुराणातील तत्त्वे आणि शिकवणीबद्दल अनेक गैरसमज निर्माण झालेले आहेत.' 'कुराण' हा अल्लाहचा अंतिम शब्द आहे. त्यामध्ये बदल किंवा फेरफार होऊ शकत नाही' असा धर्मग्रंथांचा चुकीचा अर्थ लावल्यामुळेही घोटाळे निर्माण झाले आहेत. तसेच कुराणातील अपरिवर्तनीय चिरंतन तत्त्वे कोणती आणि तात्कालिक तत्त्वे कोणती यांबद्दलही विचारवंतांमध्ये मतभेद आहेत. इस्लामनंतरच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या शतकापासून हा वाद सुरू झालेला आहे. प्रत्येक शतकात धर्मवेत्त्यांनी कुराणभाष्ये लिहिली आहेत. कुराणभाष्याच्या माध्यमातून कालसुसंगतता आणण्याचे प्रयत्नही केले गेले आहेत. भारतात अनेक प्रबोधनवादी भाष्यकार होऊन गेले. मौलाना आझादांचे 'तर्जुमा-अल्-कुराण', मौलाना महंमद अलीप्रणित 'कुराणभाष्य' आणि मौलाना अब्दुला यूसुफ अली यांचे 'कुराणभाष्य' अशी काही जगप्रसिद्ध कुराणभाष्ये आहेत. मौलाना महंमद अली यांच्या कुराणभाष्यात अनेक प्रचलित गैरसमजांची उत्तरे सापडतात. त्यांनी कुराणभाष्य लिहीत असताना कुराणातील श्लोकांचे हवाले देत अनेक गैरसमजांचे खंडन केले आहे. त्यांनी आधीच्या धर्मग्रंथांशी कुराणाचा असणारा संबंध स्पष्ट करून सांगितले आहे की, 'कुराण फक्त स्वतःवरच श्रद्धा ठेवण्यास सांगत नाही, तर 'निरनिराळ्या राष्ट्रातील प्रेषितांना दिलेल्या धर्मग्रंथांवरही इस्लामच्या अनुयायांनी श्रद्धा व विश्वास ठेवावा' असा ते आदेश देते. कुराण हे इतर कोणत्याही धर्मग्रंथाविरुद्ध नसून ते सहिष्णू आहे.' 'पैगंबरांनी तलवारीच्या जोरावर धर्मप्रसार केला' असा गैरसमज जोपासला गेला. त्यालाही मुहम्मद अलींनी खोडून काढले आहे. 'सर्वांप्रति समान प्रेम, सर्वांप्रति समान आदरभाव' हे तत्त्व त्यांनी आपल्या प्रतिपादनात अधोरेखित केले आहे. 'जबरदस्तीने केल्या गेलेल्या आणि सक्तीच्या धर्मांतराला कुराण विरोध करते; सत्याचा मार्ग दाखवते' हे दाखवून 'जिहाद', 'काफिर' यांसारख्या अनेक संकल्पनांचे व्यापक अर्थ मांडले आहेत. कुराणाचे संकुचित अर्थ लावणारे अनेक धर्मगुरू आहेत. त्यामुळेच इस्लामबद्दल गैरसमज निर्माण झालेले आहेत. अशा वातावरणात मौलाना मुहम्मद अलींच्या योगदानाची नोंद महत्त्वाची ठरते.

राजकीय विचारवंत, इतिहासाचे अभ्यासक, इस्लामी संस्कृतीचे तज्ज्ञ म्हणून के. एम. अशरफ म्हणजेच डॉ. कुंवर मुहम्मद अशरफ ओळखले जातात. ते परखड स्वभावाचे धर्मनिरपेक्ष विचारवंत होते. त्यांच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव होता. त्यांच्या डॉक्टरेटच्या प्रबंधावर आधारित असलेले 'लाईफ अँड कंडिशन्स ऑफ द पीपल ऑफ हिंदुस्थान' हे प्रसिद्ध पुस्तक आहे. कम्युनिस्ट पक्षाबरोबर काम करत असतानाच 'हिंदू-मुस्लीम प्रश्न आणि स्वातंत्र्यचळवळ' तसेच 'हिंदुस्थानातील मुस्लीम प्रश्नांची पार्श्वभूमी' हे त्यांनी लिहिलेले दोन अभ्यासपूर्ण ग्रंथ आहेत. त्यांच्या लेखनात मुस्लीम सरंजामी मानसिकता, उलेमांनी केलेले राजकारण आणि मध्ययुगातील व आधुनिक काळातील मुस्लीम विद्वान या संदर्भात केलेले विश्लेषण अतिशय महत्त्वाचे आहे.

डॉ. अशरफ यांनी मुस्लिमांच्या राजकीय मागासलेपणाची चर्चा करताना महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. त्यांच्या मते, मुस्लीम राजकारण आणि स्वातंत्र्य चळवळीचे राजकारण यांच्यातील संघर्ष

आणि मतभेद हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील मध्यमवर्गाच्या हितसंबंधांमुळे निर्माण झालेले होते. 'राजकारणात धर्म आणल्याने किंवा धर्माचा वापर केल्याने त्याचे समाजावर कोणते परिणाम झाले' याबद्दल त्यांनी केलेली चर्चा अतिशय महत्त्वाची आहे. त्यांनी हिंदूंच्या आणि मुस्लिमांच्या पुनरुज्जीवनवादी राजकारणावरदेखील आपले मत मांडले आहे. 'भारतीय मुस्लिमांचे राजकारण - एक दृष्टिकोन' नावाच्या पुस्तकात मुस्लीम राजकारणातील अनेक प्रश्नांचा ऊहापोह त्यांनी केलेला आहे. त्यांनी अत्यंत परखडपणे मुस्लीम राजकारणातील धर्मवादी घटक आणि उलेमांनी उपस्थित केलेले प्रश्न यांवर हल्ला चढविलेला आहे.

अल्ताफ हुसैन हाली पानिपती (१८३७-१९१४) हे भारतातील प्रसिद्ध शायर व समीक्षक होते. त्यांनी त्यांच्या शायरींमधून, कवितांमधून लोकजागृती करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. हाली यांनी समाजातील अनिष्ट चालीरीती, भ्रष्टाचार, स्त्रियांचे प्रश्न, धार्मिक भेदभाव इत्यादी प्रश्नांवर साहित्य-लेखन केले आहे. समाजातील अंधश्रद्धा, धार्मिक कर्मकांड आणि त्यांचा समाजाच्या प्रगतीवर होणारा अनिष्ट परिणाम हे सर्व त्यांनी वेळोवेळी अधोरेखित केले आहे. राष्ट्रभक्ती, स्त्री-पुरुष-समानता या आधुनिक विचारांवर साहित्य-लेखन करून त्यांनी जनजागृती करण्याचे महत्त्वाचे काम केले.

इस्लामच्या संदर्भात त्यांचे मत असे होते की, 'हा एक प्रगतिशील धर्म आहे. तो शांतता, बंधुभाव व प्रेम यांचा संदेश देतो, परंतु आज तो अनेक विघटनवादी समस्यांनी ग्रस्त झालेला आहे.' संपूर्ण देशामध्ये एकता, बंधुभाव, समानता आणि स्वातंत्र्य असावे अशी त्यांची धारणा होती.

मौलाना अबुल कलाम आझाद (१८८८-१९५८) भारताच्या राजकारणामध्ये सक्रिय असले, तरी त्यांचे मुस्लीम समाज प्रबोधनातील योगदानदेखील महत्त्वाचे आहे. धार्मिक पार्श्वभूमी लाभलेल्या आझादांनी चिकित्सक दृष्टीने जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन निर्माण केला. त्यांनी लोकजागृती करण्यासाठी १९१२ साली कोलकाता येथून 'अल-हिलाल' नावाचे नियतकालिक प्रसिद्ध केले. यामध्ये ते मुस्लीम राजकारण, इंग्रजांविषयक प्रक्षोभक विचार आणि कुराणावर भाष्य करत असत. इंग्रजांनी आझादांना अटक करून हे नियतकालिक बंद पाडले. तुरुंगातून बाहेर आल्यावर आझादांनी 'अल-बलाल' हे नवे नियतकालिक सुरू केले व लेखणी कायम सुरू ठेवली.

आझादांनी धर्मग्रंथांचे लोकसमजुतीविरुद्ध क्रांतिकारक स्पष्टीकरण दिले. त्यांनी संपूर्ण कुराणावर नवे भाष्य लिहिले. ते इंग्रजांनी जाणीवपूर्वक नष्ट केले. 'तर्क-विवेक-कालसापेक्षता, सर्वधर्मसमभाव आणि शुद्ध मानवता हा कुराणाचा गाभा आहे, तसेच 'जिहाद', 'काफिर', 'दारुल हर्ब' यांसारखे विचार त्या काळात स्वार्थ, राजकारण व भ्रष्टाचार यांनी प्रेरित होऊन निर्माण झालेले आहेत' असे विचार मांडणारे ते इस्लामच्या इतिहासातील पहिले अभ्यासक होते.

त्यांनी पाकिस्तान निर्मितीला विरोध केला होता. हिंदू-मुस्लिमांचे ऐक्य आणि हित साधण्यासाठी पाकिस्तानची मागणी अयोग्य असल्याचे त्यांना प्रामाणिकपणे वाटत होते.

त्यांनी मांडलेल्या विचारांमुळे त्यांना परंपरावादी मुस्लिमांच्या तीव्र विरोधाला सामोरे जावे लागले. त्यांच्याविरुद्ध द्वेषात्मक टीका करण्यात आली. इतकेच नव्हे, तर त्यांना जीवे मारण्याची भूमिकादेखील कट्टर मुस्लिमांकडून घेण्यात आली होती. तरी ते स्वतःचे विचार मांडत राहिले. स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी केलेले योगदान सर्वश्रुत आहेच.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात धार्मिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात आपले विचार मांडणारे, मुस्लीम अलगतेच्या राजकारणाला विरोध करणारे डॉ. मोईन शाकीर, इम्तियाज अहमद, एजाज अहमद यांव्यतिरिक्त अनेक अज्ञात आणि उपेक्षित विचारवंत आहेत. त्यांत हैदराबादच्या डॉ. आलम खुंदमिरी यांचा समावेश होतो. त्यांनी इंग्रजी मासिक 'क्वेस्ट'मध्ये अनेक लेख लिहिले आहेत. 'इस्लाममधील परंपरा आणि आधुनिकता' हा त्यांचा लेख भारतातील मुस्लीम प्रबोधनासंदर्भातील अनेक कोंड्या फोडतो. त्यांनी 'आंतरधर्मीय सामंजस्याचा समस्या' या लेखात स्पष्ट केले आहे की, 'पूर्वी प्रत्येक धर्मातील धर्मपंडित आपापल्या धर्मातील श्रेष्ठत्व प्रतिपादन करीत आणि अन्य धर्माचे अस्तित्व आणि श्रेष्ठत्व नाकारत. आधुनिक जगात धर्मांच्या श्रेष्ठत्वाचे आणि अंतिमत्वाचे सिद्धान्त कालबाह्य झालेले आहेत.' 'या संकल्पना कशा वादग्रस्त आहेत' याबरही त्यांनी प्रकाश टाकला आहे.

हमीद दलवाई यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरू केलेल्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या आरंभ काळात योगदान दिलेल्या कार्यकर्त्यांमध्ये डॉ. मोईन शाकीर यांचा महत्त्वपूर्ण वाटा होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी आणि संवेदनशील होते. त्यांच्या निधनानंतर करण्यात आलेल्या दफनविधीच्या तिसऱ्या दिवशी औरंगाबादमधील परंपरावादी, धर्मवादी घटकांनी ते काफिर असल्याची घोषणा केली. तसेच फतवा काढण्यात आला की, 'मोईन शाकीर हे मुसलमान नव्हते. कारण ते नास्तिक होते. म्हणून त्यांना कब्रस्तानात जागा देऊ नये आणि त्यांचे शव दफन केलेल्या ठिकाणाहून काढायला पाहिजे.' पोलिस अधिकाऱ्यांच्या संरक्षणाखाली त्यांचे शव काढण्याची मागणी केली गेली. यामुळे औरंगाबाद येथे तणावाचे वातावरण निर्माण झाले. अशा परिस्थितीत अनेक मान्यवर व्यक्ती, साहित्यिक आणि सुजाण धर्मगुरू असे सर्व शाकिरांच्या समर्थनार्थ पुढे आले. 'इमारत-इ-शरिया मराठवाडा'चे प्रमुख मौलाना अब्दुल वाहिद यांनी शाकीरांना विरोध करणाऱ्या धर्मांध गटाचे प्रतिपादन चुकीचे असल्याचे सांगितले. मुस्लीम समाजाच्या प्रबोधनासाठी शाकीर यांनी अनेक पुस्तकेही लिहिली होती. म्हणूनच कर्मठ, पोथीनिष्ठ मुस्लिमांनी त्यांचे शव उखडण्याची मागणी केली होती. शाकिरांच्या मुस्लीम समाजावरील टीकेच्या मांडणीत मुस्लीम जमातवाद, जातीय दंगली आणि अलगतावाद हे मुख्य मुद्दे आहेत. डॉ. शाकिरांनी हिंदू व मुस्लीम जातीयवाद्यांचा रोष पत्करला. त्याचबरोबर मुस्लिमांवर होणारे अन्याय थेट मांडले. डॉ. शाकिरांनी बॅ. छगला किंवा हमीद दलवाई यांच्याप्रमाणे व्यक्तिगत किंवा सैद्धान्तिक पातळीवर इस्लामचे अस्तित्व नाकारण्याची भूमिका कधीच घेतली नाही. तरीही मूलतत्त्ववाद्यांनी त्यांना विरोध केला. मुस्लीम समाज अशिक्षित, अंधश्रद्ध आणि शोषित असल्याने जमातवादी त्यांचा गैरवापर करतात. मात्र कुराणची मूळ शिकवण उदारमतवादी, समाजवादी व सहिष्णू असल्याचे मत शाकिरांनी व्यक्त केले आहे.

डॉ. रफिक झकेरिया हे साक्षेपी आणि सव्यसाची विचारवंत होते. भारतीय विचारवंतांमध्ये त्यांचे स्थान अग्रभागी आहे. त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स विद्यापीठात मुस्लीम प्रश्नांचा अभ्यास करून डॉक्टरेट मिळविली. राजकारणापासून दूर जाऊन त्यांनी मुस्लिमांच्या प्रश्नांचा, स्वातंत्र्यचळवळीचा अभ्यास करून अतिशय महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. 'भारतातील मुस्लीम नेतृत्वाचे स्वरूप' हा त्यांच्या व्यासंगाचा मुख्य विषय होता. मात्र त्यांनी इस्लामवर फारसे लेखन

केले नाही. डॉ. असगर अली इंजिनिअर हे जागतिक दर्जाचे इस्लामचे अभ्यासक आणि समाजसुधारक होते. तसेच मुंबईचे बॅ. ए. जी. नुराणी हेदेखील जागतिक कीर्तीचे अभ्यासक होते. डॉ. झकेरिया यांचा 'महंमद अँड कुराण' हा ग्रंथ इस्लामकडे नकारात्मकतेने पाहणाऱ्यांना वेगळी दृष्टी देतो. ते सुरुवातीपासूनच द्विराष्ट्रवादाच्या विरोधी होते. त्यांनी 'भारतातील मुस्लीम राजकारणाचा उदय' या पुस्तकातून 'राजकारण आणि समाजकारण धर्मनिरपेक्ष व समतावादी असावे' ही भूमिका मांडली आहे. याव्यतिरिक्त 'गांधी आणि भारताची फाळणी' या पुस्तकात महात्मा गांधींवर घेण्यात येणाऱ्या आक्षेपांना त्यांनी उत्तरे दिली आहेत. हिंदू व मुस्लीम यांच्यावरून केल्या जाणाऱ्या धर्मवादी राजकारणाच्या ते कायम विरुद्ध राहिले.

बुद्धिप्रामाण्यवादी, तर्कशुद्ध आणि राष्ट्रीय विचारवंत-प्रशासक म्हणून बॅ. एम. सी. छगला यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांनी शिक्षण क्षेत्रात काम करताना, समाजकारण, राजकारण आणि प्रशासन करताना घेतलेल्या भूमिका राष्ट्रवादी आणि मानवतावादी होत्या. ते समान नागरी कायद्याचे खंदे समर्थक होते. देशाचे शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी केलेले योगदान सर्वश्रुत आहे. याबरोबरच प्रा. मुजीब, एम. आर. ए. बेग यांनी उदारमतवादी आणि प्रागतिक भूमिका घेऊन मुस्लीम प्रश्नांची मांडणी केली आहे.

या आणि अनेक मुस्लीम अभ्यासकांनी मुस्लीम प्रबोधनाला आणि राजकारणाला दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा प्रभाव समाजमनावर किती पडला, हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. असे असतानाही या सर्वांहून हमीद दलवाई यांचे अल्पशा कार्यकाळातील योगदान असाधारण म्हणावे लागेल. कारण त्यांचे विचार केवळ पुस्तकापुरते किंवा अभिजनवर्गापुरते मर्यादित न राहता सर्वसामान्य मुस्लिमांच्या आयुष्यात बदल घडून यावा, यासाठी ते आयुष्यभर प्रत्यक्ष पातळीवर, लोकांमध्ये काम करत राहिले. परखड चिकित्सा करून समाजप्रबोधन करणारे हमीद दलवाई त्यामुळेच वेगळे ठरतात.

'हमीद दलवाई यांनी फक्त मुस्लीम समाज आणि मुस्लीम महिला यांच्या संदर्भातच भाष्य केले आणि या प्रश्नांना घेऊन मुस्लीम प्रबोधनाचा मार्ग अवलंबिला' अशी एक टिप्पणी केली जाते. वास्तविक, हमीद दलवाई यांनी काही मूलभूत स्वरूपाचे प्रश्न उपस्थित करून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या विषयांबरही लेखन केले आहे. काश्मीर, जुनागड, हैदराबाद या ठिकाणी फाळणीच्या वेळेस निर्माण झालेली परिस्थिती, बांग्लादेशाची निर्मिती, तसेच इतरही अनेक विषयांसदर्भात त्यांनी विश्लेषणात्मक लेखन केले आहे. भारतातील विविध समाजघटकांच्या आणि धर्मसमूहांच्या प्रश्नांची दखल घेऊन त्यांनी त्यावर संवेदनशीलपणे भाष्य केले आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रामध्ये विविध चळवळी, आंदोलने, संस्था स्थापन करण्याच्या प्रक्रियेला वेग आला. 'दलित पँथर'सारख्या विविध चळवळी या काळात निर्माण झाल्या. या चळवळींच्या कार्याचा मुख्य घटक 'विद्रोह' असलेला दिसतो. या चळवळी प्रामुख्याने सामाजिक न्यायाचा आणि एकतेचा पुरस्कार करण्याच्या उद्देशाने कार्य करत होत्या, परंतु मुस्लिमांमध्ये अशा पद्धतीच्या चळवळी, विचार आणि कार्याचा अभाव होता. या सर्व चळवळींचे हमीद दलवाई यांनी खूप बारकाईने निरक्षण केल्याचे दिसून येते. 'राष्ट्रीय ऐक्य' या विषयावर

सांगली भागातील कस्तुरभाई बालचंद कॉलेजमध्ये हमीद दलवाई यांचे व्याख्यान आयोजित केले होते. तेव्हा त्यांनी असे प्रतिपादन केले की, 'देशातील राष्ट्रीय ऐक्याला इतर कोणत्याही समाजापासून धोका नसून तो देशातील दारिद्र्यापासूनच आहे.' अशी मांडणी करत असताना पार्श्वभूमी होती, राजा ढाले यांनी केलेल्या राष्ट्रध्वजासंबंधीच्या वक्तव्याची. या वेळी दलवाईंनी अनेक प्रतिष्ठित बोलघेवडे पुढारी आणि संधीसाधू लोक यांवर टीका केली आणि म्हणाले की, 'ढाले यांनी हरिजनांच्या व्यथांसंबंधी मांडलेले विचार गंभीरपणे लक्षात घ्यायला पाहिजेत. केवळ राष्ट्रध्वजासंबंधी किंवा मान्यवर व्यक्तींसंबंधी त्यांनी लिहिलेल्या अनुदार लिखाणावर चर्वितचर्वण करत बसण्यापेक्षा असंख्य अस्पृश्यांना समाजाकडून मिळणाऱ्या संतापजनक वागणुकीसंबंधीच्या मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष करता येणार नाही.' राजा ढाले यांनी केलेल्या वक्तव्यामुळे सर्वत्र टीका होत असताना दलवाई यांनी ढाले यांचे केलेले समर्थन अत्यंत तर्कशुद्ध, संवेदनशील आणि महत्त्वाचे आहे.

काही मुस्लीम प्रबोधकांच्या मांडणीमध्ये आढळून येणारा दोष म्हणजे, त्यांनी समाजाला विज्ञानवादी, उदारमतवादी दृष्टी देण्याचा प्रयत्न केला, परंतु हा प्रयत्न करीत असताना आपली धार्मिक अलिप्तता कायम ठेवली. त्यांच्या मांडणीत आक्रमकता होती, मुस्लीम येथील पूर्वीचे सत्ताधीश असल्याची जाणीव होती. या मांडणीचे स्वरूप सामाजिक नव्हते. ते धार्मिक आणि राजकीय होते. म्हणून या मांडणीत सांस्कृतिक बाबी असल्या, तरी त्यात विशाल जीवन व्यापून टाकण्याचा आग्रह आणि ईर्ष्या तुलनेने कमी होती. या मांडणीतील अलिप्तता इतकी आग्रही होती की, ब्रिटिशांनी आणलेल्या काही जीवनविषयक कल्पनांचा हिंदूंप्रमाणेच स्वीकार करून हिंदूंशी समरसतेचा किंवा सहकार्याचा पूल बांधण्यासाठी मुस्लीम समाजाने त्या कल्पनांचा उपयोग केला गेला नाही. यांत प्रामुख्याने दोन कल्पना होत्या. पहिली, धर्मातीतता आणि दुसरी, लोकसत्ता. अर्थात, आर्थिक परिवर्तनाची तिसरी कल्पना मुस्लिमांनी स्वीकारली. ब्रिटिशांच्या राज्यात भारतात उद्योगीकरण आले. त्याचा मुस्लिमांनीही स्वीकार केला. व्यापक व्यापार, उद्योग यांची परंपरा मुस्लिमांत पूर्वापार होती. त्यात ब्रिटिशांनी यंत्रांची भर घातली. मुस्लिमांनी त्याचा स्वीकार केला. पण या उद्योगीकरणाबरोबर अपरिहार्यपणे आलेल्या सांस्कृतिक परिवर्तनाचा स्वीकार करण्यात त्यांनी खळखळ केली. या परिवर्तनात असलेली सर्वंकष आधुनिकता मुस्लिमांनी आणि त्यांच्या थोर विचारवंतांनीसुद्धा नाकारली.

मुस्लीम प्रबोधनाचे बदलते स्वरूप :

इस्लामच्या इतिहासात धर्मचिकित्सेची परंपरा नाही. परिपूर्ण मानल्या गेलेल्या या धर्मात तसा वावच नाही, असा एक मत प्रवाह आहे आणि त्यात काही अंशी तथ्यदेखील आहे. हिंदू धर्माच्या इतिहासात महात्मा जोतिबा फुले, राजा राममोहन राय, गो. ग. आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी सुधारकांची धर्मचिकित्सेची प्रदीर्घ परंपरा दिसते. थॉमस पेन, ब्रुनो, रॉजर बेकन, मार्टिन लुथर, इरॅस्मस आदींनी ख्रिश्चन धर्माची कठोर चिकित्सा करून ही परंपरा घालून दिली होती. इस्लाममध्ये या परंपरेचा धक्कम पाया हमीद दलवाईंनी घातला. अतिसंवेदनशील, कर्मठ व अंधश्रद्ध मुस्लीम समाजात दलवाईंइतके मूलगामी चिंतन करणारा निर्भय सत्यशोधक दुसरा नाही.

ते म्हणत, 'मुसलमानांना चिकित्सेचा अंगीकार करायला लावणे, हे काम इतके मोठे आणि कठीण आहे की, कोणीही एक माणूस त्याला पुरा पडणार नाही, याची मला जाणीव आहे. पण म्हणून या समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने या कामाचे महत्त्व किती आहे, हे ओळखणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने हे काम हाती घेतले पाहिजे. मी माझ्या अल्प कुवतीनुसार या कामाला वाहून घेतले आहे. हाच माझा लढा आहे आणि एक मुसलमान म्हणून मी तो लढणार आहे.'

ज्या भारतीय मुस्लीम समाजात हमीदभाईंनी हा लढा लढवला, तो समाज मोठ्या प्रमाणात सनातनी, कर्मठ, अंधश्रद्ध व संघटित आहे. एकूण भारतीय समाजाप्रमाणेच तो दारिद्र्याने, निरक्षरतेने, बेकारीने, महागाईने आणि अशाच इतर आर्थिक प्रश्नांनी ग्रासलेला आहे. पण धार्मिकतेचा पगडा, धर्मचिकित्साविरोध आदी बाबतीत तो अत्यंत संवेदनशील आहे. अनेक प्रकारच्या चळवळी व आंदोलने उभारून एकूण समाजाला पुढे नेण्याचा इतिहास असलेल्या संघटित मध्यमवर्गाचा त्यात अभाव आहे. अल्पसंख्य असल्याने या समाजात असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे आणि म्हणूनच त्याचा सतत राजकीय वापर होत राहिला आहे. याशिवाय आपला धर्म 'परिपूर्ण व सर्वश्रेष्ठ' असल्याबद्दलची या धर्मातील लोकांची आंधळी आणि पराकोटीची श्रद्धा असल्याने मुस्लीम समाजाच्या बाबतीत धर्मनिष्ठा जास्त प्रभावी असल्याचे दिसते. दलवाईंचे विश्लेषण असे की, 'मुस्लीम समाजात मोकळ्या मनाने विचार करणारी, आत्मनिरीक्षणाची सवय असलेली, अंतर्मुख बनलेली आणि धर्मातीत विचार करणारी माणसे बोटावर मोजण्याइतकीच सापडतील. यासाठी आवश्यक निरपेक्ष, आत्मनिरीक्षणपर, बौद्धिक आणि सांस्कृतिक पातळीचा अभाव मुस्लीम समाजात मोठ्या प्रमाणात आहे, असे मला खेदाने म्हणावे लागते.'

भारतीय समाजाच्या नेतृत्वाच्या इतिहासात पुरोगामी नेत्यांचा अभाव असलेला आढळतो. समाजाच्या बंदिस्त व कट्टर धर्मश्रद्ध चौकटीमुळे उदारमतवादी नेतृत्वाचा विकास खुंटल्याचे दिसते. त्यातून धार्मिक व सांप्रदायिक नेत्यांचा मुस्लीम समाजात सुळसुळाट झालेला आढळतो. दलवाईंनी या मुस्लीम नेतृत्वाचे वर्णन 'हेकेखोर, मुक्त चर्चा विरोधी, मूलतत्त्ववादी, इतरांना दोष देणारे व आत्मनिरीक्षकाची पात्रता नसलेले' असे केले आहे. याला काही अपवाद आढळतात. उदा. मौलाना अबुल कलाम आझाद, रफी अहमद किडवाई, डॉ. झाकीर हुसेन. परंतु भारतीय मुसलमान बाजवी संख्येने या नेत्यांच्या मागे कधी गेले नाहीत व स्वातंत्र्यानंतरही आझादांच्या बाबतीत बोलायचे झाले तर, त्यांना शिक्षण खाते देण्यापलीकडे काँग्रेसने त्यांना महत्त्व दिले नाही.

भारतीय मुस्लीम समाजाला प्रगतीच्या मार्गाकडे वळविण्यासाठी त्या समाजाचे सध्याचे कुचकामी नेतृत्व आणि मुस्लीम समाज यातील विसंगती व दरी स्पष्ट करणे गरजेचे आहे. मुस्लीम समाजातील धर्मांतर्गत सुधारणेबरोबरच आर्थिक व शैक्षणिक विकास, तसेच सामाजिक सुधारणा घडवून आणून मुस्लीम समाजाला सांप्रदायिकतेच्या व धर्मप्रामाण्यवादाच्या जोखडातून मुक्त करण्याची कालोचित निकड आहे. आधुनिक लोकशाही समाजवादी मूल्ये व धर्मातीत इहवाद्यांच्या मदतीनेच ते शक्य व्हावे. या दृष्टीने प्रयत्न करणारे हमीद दलवाई हे पहिले समाज सुधारक होते.

हमीद दलवाई :

हमीदभाईंचा जन्म २९ सप्टेंबर १९३२ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिपळूण तालुक्यातील

मिरजोळी या गावी झाला. त्यांचे माध्यमिक शिक्षण चिपळूणमध्ये झाले. १९५१ साली ते मॅट्रिक झाले. मुंबईच्या इस्माईल यूसुफ कॉलेजमध्ये व रूपारेल कॉलेजमध्ये त्यांनी इंटरमिडीएट आर्ट्सपर्यंतचे शिक्षण घेतले. या वेळी प्रा. कुलसूम पारेख त्यांच्या शिक्षिका होत्या. विचाराने प्रागतिक असणाऱ्या कुलसूम पारेख यांना दलवाईंबद्दल अपार आस्था होती. दलवाईंनी शिक्षण सोडून दिल्यानंतर व त्यांची 'साहित्यिक', तसेच 'सामाजिक कार्यकर्ता' अशी ओळख निर्माण झाल्यानंतर त्याही मंडळाच्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ लागल्या. हमीद दलवाई यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. ते १९५४ ते१९६३पर्यंत काही किरकोळ नोकऱ्या करत राहिले. त्यापूर्वीपासून ते राष्ट्र सेवा दलातर्फे व समाजवादी पक्षातर्फे राजकीय व सांस्कृतिक कार्य करीतच होते. दरम्यान, हमीदभाईंनी 'मौज', 'सत्यकथा', 'वसुधा' आदी नियतकालिकांतून कथालेखन चालू ठेवले होते. 'लाट' हा त्यांचा कथासंग्रह १९६० साली साधना प्रकाशनाने काढला. 'मौज' प्रकाशनातर्फे 'इंधन' ही त्यांची एकमेव कादंबरी १९६६ साली प्रसिद्ध झाली. ही कादंबरी व काही कथांना मुस्लीम समाजाची पार्श्वभूमी होती. 'कफनचोर' या कथेमुळे हमीदभाई 'सर्जनशील लेखक' म्हणून प्रसिद्धीस आले. कोकणातील एका गावात स्वातंत्र्योत्तर काळात वातावरण कसे बदलत गेले... हिंदू-मुसलमान तणाव कसा वाढत गेला... इरेस पेटलेल्या दोन्हीकडच्या लोकांनी गावाचे एरवीचे वातावरण कसे ढवळून काढले या सगळ्याचे तरल, संवेदनशील आणि वास्तव चित्रण 'इंधन' या आत्मकथनपर कादंबरीत आहे.

या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचे राज्य पातळीवरचे १९६६ सालचे पारितोषिक मिळाले. सामान्य वाचक व समीक्षक यांना आवडणाऱ्या या कादंबरीने चिपळूणमध्ये मात्र लोकक्षोभाला तोंड दिले. ही कादंबरी हिंदीमध्ये याच नावाने भाषांतरित करण्यात आली आहे.

दलवाईंनी 'मराठा'त १९६३ ते १९६८ या काळात पत्रकारिता केली. नंतर त्यांनी 'मराठाचे सहसंपादक' म्हणूनही काम केले. १९६८ सालानंतर मुस्लीम समाज सुधारणेचे पूर्ण वेळ काम करण्यासाठी त्यांनी नोकरी सोडली. त्यानंतर त्यांचे साहित्य लेखनही थांबले. त्या वेळी मराठी भाषेने एक सर्जनशील, वास्तववादी लेखक गमावला; पण मुस्लीम समाज सुधारणेच्या महत्त्वपूर्ण कामासाठी दिले गेलेले साहित्यिकाचे हे बलिदान वाया गेले नाही.

भारतीय मुस्लीम समाजाचे वास्तव आकलन करून घेण्यासाठी हमीदभाई भारतभर फिरले. त्यांच्या या दौऱ्यासाठी 'इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम', 'आंतरभारती', कोल्हापूरचा 'कोरगांवकर ट्रस्ट', 'सेक्युलर फोरम', 'मराठा', 'मौज' वगैरेंनी सर्वतोपरी साहाय्य केले. 'भारतभर पसरलेले मुसलमान हे वेगवेगळ्या विचारसरणीचे, विविध व्यक्तिमत्त्वांचे आहेत व तथाकथित मुस्लीम नेतृत्वाचा मुसलमान समाज संघटित असल्याचा दावा फोल आहे' असे या दौऱ्यानंतर हमीदभाईंचे मत बनले. या दौऱ्यानंतर त्यांनी आपली विश्लेषणे, विचारप्रणाली व भूमिका स्पष्टपणे मांडावयास सुरुवात केली. भारतात बहुसंख्याक असलेल्या हिंदूंना दलवाईंचे सांगणे असे, 'ज्या हिंदूंना मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार करावयाचा आहे, ते हिंदूंना सनातनी बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि ज्या हिंदूंना हिंदू समाजाला आणि पर्यायाने देशाला आधुनिकतेच्या रस्त्याने न्यायचे आहे, ते मुस्लीम जातीयवाद्यांना मिठ्या मारीत आहेत. हे दृश्य बदलले पाहिजे. मी मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार करणाऱ्या हिंदूंच्या बाजूचा आहे; पण हिंदूंना सनातनी बनविण्याच्या

त्यांच्या प्रयत्नांचा मी विरोधक आहे. त्याचबरोबर हिंदूंना आधुनिक बनवणाऱ्यांना माझा पाठिंबा आहे; परंतु मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार न करण्याच्या त्यांच्या धोरणाचा मी विरोधक आहे.'

हमीदभाई एक लोकशाही समाजवादी कार्यकर्ता होते. राम मनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण व काही प्रमाणात महात्मा गांधींचा त्यांच्यावर प्रभाव होता. एकंदर भारतीय समाजात व विशेषतः भारतीय मुस्लिमांमध्ये झालेल्या धर्म आणि राजकारण यांच्यातील गल्लतीवर प्रहार करून त्या दोहोंची फारकत दलवाईंना अभिप्रेत होती. याशिवाय 'सध्याच्या मुस्लीम जातीयवादाला भारतातील सर्वच राजकीय पक्ष कारणीभूत आहेत; त्यांनीच मतांच्या राजकारणापायी मुस्लिमांचा जातीयवाद अप्रत्यक्षपणे पोसला आहे' असा विचार हमीदभाईंनी मांडला. मुस्लीम-अनुनय सोडण्याचे कळकळीचे आवाहन देशातील राजकीय पक्षांना त्यांनी वारंवार केले.

धर्मातीतता, धर्मनिरपेक्षता, इहवाद या प्रतिशब्दांनी परिचित असलेले 'सेक्युलॅरिझम' हे मूल्य हमीदभाईंना स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, राष्ट्रीयत्व, विज्ञाननिष्ठा आदी आधुनिक जागतिक मूल्यांइतकेच महत्त्वाचे वाटत होते. तसेच मुस्लीम समाजाच्या सांस्कृतिक व सामाजिक जीवनात 'सेक्युलॅरिझम'ची प्रत्यक्ष अंमलबजावणी त्यांना मुस्लीम समाज प्रबोधनाच्या दृष्टीने अत्याधिक आवश्यक वाटे.

१८ एप्रिल १९६६ रोजी त्यांनी काढलेल्या सात मुस्लीम महिलांच्या मोर्चापासून स्त्रियांना हक्क मिळवून देऊन स्त्री-मुक्तीच्या मागनि स्त्री-पुरुष समानता साधण्याच्या प्रयत्नांची सुरुवात केली. या सात महिलांमध्ये हमीद दलवाईंच्या पत्नी मेहेरून्निसा दलवाई आणि बहीण फातिमा यांचाही समावेश होता. मुस्लीम स्त्रीला इस्लाममध्ये व पुरुषप्रधान मुस्लीम समाजात दुय्यम स्थान आहेच; पण भारतातील प्रचलित कायद्यानुसरा हिंदू स्त्रीइतकेही तिला अधिकार नाहीत. आधी दलवाईंनी व नंतर मुस्लीम सत्यशोधक मंडळाने घेतलेले बरेच कार्यक्रम या विचारमालिकेशी संबंधित होते. तलाकपीडित स्त्रियांना पोटगी मिळवून देण्यासाठी लढा उभारून केलेले विधायक कामही याशीच संबंधित होते!

हे विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी लेख, भाषणे, जाहीर सभा यांद्वारे दलवाईंनी एक मोहीमच काढली. आपल्या विचारांची व त्यांना जोड देणाऱ्या अनुभवांची मांडणी करणारी तीन भाषणे त्यांनी 'साधना ट्रस्ट'तर्फे दिली. याशिवाय आपल्या विचारांच्या तरुणांशी संपर्क साधण्यासाठी त्यांनी अ. भि. शहांच्या बरोबरीने मुंबईत १९६८ साली 'इंडियन सेक्युलर सोसायटी' स्थापन केली. मुस्लिमांना इंडियन सेक्युलर सोसायटीमध्ये आणता येणे शक्य असल्याचे, उदारमतवादी विचारांचे वर्तुळ मोठे करणे शक्य असल्याचे दलवाईंना वाटत होते, परंतु त्यानंतर दोन वर्षांपर्यंत स्वत: दलवाईंखेरीज एकही मुस्लीम त्या सोसायटीकडे न फिरकल्याने दलवाई निराश झाले. दरम्यान, भाषणे देणे, प्रसारमाध्यमांत लेख लिहिणे, दौरे आदी गोष्टी त्यांनी चालूच ठेवल्या. पुणे, कोल्हापूर, बेळगाव या शहरांत आणि गडहिंग्लज, निपाणी, आजरा, उत्तूर, संकेश्वर, कुरुंदवाड या ग्रामीण भागांत राष्ट्रसेवा दलातर्फे त्यांचा एक महत्त्वाचा दौरा आयोजित केला गेला. भाषणे, सभा, चर्चा इ. मार्गांनी मुस्लीम तरुणांशी होणाऱ्या परस्परसंवादात आपल्या विचारसरणीबाबत तरुणांची प्रतिक्रिया अजमावण्यासाठी दलवाई संवाद साधत.

अ. भि. शहा, यदुनाथ थत्ते, नरहर कुरुंदकर, प्रा. असफ ए. ए. फैजी, डॉ. मोईन शाकीर

आर्दीबरोबरच भाई वैद्य व डॉ. बाबा आढाव यांच्यासारख्या समविचारी मंडळींनी हमीदभाईंना साहाय्य केले. हमीदभाईंच्या विचारांना प्रतिसाद देतील अशा पुण्यातील काही मुस्लीम तरुणांशी भाई वैद्य व बाबा आढाव यांचा परिचय होता. सय्यदभाई, सय्यद मुनीर, अमीर शेख, अन्वर शेख, रफीऊद्दीन सय्यद, बशीर तांबोळी, मकबूल तांबोळी आदी तरुणांशी त्यांनी हमीदभाईंचा परिचय करून दिला. शिवाय कोल्हापूरच्या हुसेन जमादारांचा कोल्हापूर दौऱ्यात हमीदभाईंशी परिचय झाला होताच. एन. आर. बारगीर, महंमद गौसनाईक, आय. एन. बेग व मुमताज रहिमतपुरे ही मंडळी जमादारांबरोबर होती. अशा प्रकारे पुणे, कोल्हापूर, अहमदनगर, मुंबई, सातारा येथील सर्व तरुणांशी एकत्रित चर्चा झाल्यावर मुस्लिमांसाठी म्हणून मुस्लिमांची अशी एखादी संघटना काढण्याची हमीदभाईंना गरज वाटू लागली व पुढे सुमारे दीड वर्षे चर्चा होऊन २२ मार्च १९७० रोजी पुण्यात 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना करण्यात आली. हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली १९७१ साली, वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना, मंडळाच्या वतीने समान नागरी कायद्याची मागणी व त्यासंदर्भात निवेदन देण्यासाठी मंडळाचे शिष्टमंडळ गेले. त्यात मेहेरून्निसा दलवाई यांचा समावेश होता.

हमीद दलवाई यांच्या कार्याचे महत्त्व लक्षात घेऊन अनेक ऐतिहासिक आणि समकालीन समाज प्रबोधन करणाऱ्या संस्था-संघटनानी दलवाई यांच्यासमवेत संवाद आणि सार्वजनिक उपक्रमांचे आयोजन केले.

प्रार्थनासमाजाच्या वतीने २१ जुलै १९७३ रोजी मुंबई येथील प्रार्थना मंदिरात 'तरुणतरुणींसाठी समाजसेवा' या विषयावर प्रश्नोत्तररूपी चर्चा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी त्यांच्या बरोबर कोल्हापूर येथील कार्यकर्ते हुसेन जमादार सहभागी झाले होते. युवा श्रोत्यांसमवेत हमीद दलवाई यांचा संवाद प्रेरणादायी ठरल्याचे नोंदवण्यात आले आहे. प्रार्थनासमाजाच्या इतिहासात गौरवाने काही प्रातिनिधिक विचारवंत आणि साहित्यिकांची नोंद करण्यात आली आहे त्यात बालगंधर्व, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, सेतु माधवराव पगडी आणि दुर्गा भागवत या यादीत हमीद दलवाई यांचा समावेश करण्यात आला आहे आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ ही महात्मा फुले यांच्या सत्यशोधक वटवृक्षाचीच एक पारंबी आहे असा उल्लेख केला आहे. (वैद्य, द्वा. गो. आणि दीक्षित राजा, 'प्रार्थनासमाजाचा इतिहास', एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई, द्वितीयावृत्ती, मुंबई, २०१९. पृ. क्र. १२, १४, ५८८)

हमीदभाईंना मुस्लीम सत्यशोधक चळवळीसाठी १९६६ ते १९७७ अशी उणीपुरी ११ वर्षे देता आली. नवी दिल्लीची 'ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम्स', पुण्याची 'महाराष्ट्र राज्य मुस्लीम महिला परिषद', मुंबईची 'मुस्लीम सामाजिक परिषद' व कोल्हापूरची 'मुस्लीम शिक्षण परिषद' असे काही ठळक कार्यक्रम हमीदभाईंनी मंडळादवारे आयोजित केले व यशस्वी करून दाखवले. त्यांनी अगदी मोजकेच लेखन केले आहे. 'मुस्लीम जातीयतेचे स्वरूप: कारणे व उपाय', 'इस्लामचे भारतीय चित्र' व 'मुस्लीम पॉलिटिक्स इन सेक्युलर इंडिया' हे इंग्रजी भाषेतील पुस्तक या लेखनाचा त्यांच्या लेखनसंग्रहात समावेश होतो. याशिवाय आपल्या विचारांच्या प्रसारासाठी व मुस्लीम समाजासंदर्भातील तत्कालीन घटनांवर आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी विविध विषयांवरील अनेक लेख त्यांनी लिहिले व व्याख्याने दिली. हे लेख त्यांनी 'क्वेस्ट',

'सेक्युलॅरिस्ट', 'टाइम्स ऑफ इंडिया', 'इंडियन एक्स्प्रेस' आदी इंग्रजी व 'मराठा', 'महाराष्ट्र टाइम्स', 'साधना' आदी मराठी प्रकाशनांत लिहिले, तर बहुतांश भाषणे महाराष्ट्रात व काही भाषणे महाराष्ट्राबाहेरही दिली.

हमीद दलवाई यांचे अप्रकाशित ललित साहित्य 'जमीला जावद व इतर कथा' व वैचारिक साहित्य 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान', तसेच इतर काही लेखन त्यांच्या मृत्युपश्चात प्रकाशित करण्यात आले. तसेच त्यांचे मराठीतील लेखन इंग्लीश व इतर भाषांमध्ये अनुवादित झाले आहे.

३०-३१ डिसेंबर १९७३ रोजी कोल्हापूर येथे मुस्लीम शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याच वेळी प्रथमतः हमीद दलवाई यांची तब्येत बिघडली आणि ते फार वेळ या परिषदेसाठी देऊ शकले नाहीत. कालांतराने त्यांना मूत्रपिंडाचा विकार जडला आणि हमीद दलवाई यांच्या प्रवासावर मर्यादा पडल्या. मुंबई येथील जसलोक रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात येत होते. उपचारांना फारसा प्रतिसाद मिळत नव्हता, त्यामुळे डायलिसिस करणे भाग पडले. या काळात माननीय शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. माननीय शरद पवार यांनी हमीद दलवाई यांच्या आजारपणाची कल्पना मुख्यमंत्र्यांना दिली. त्या वेळी हमीद दलवाई यांच्यावरील शस्त्रक्रिया व औषधोपचार यांसाठी मुख्यमंत्री निधीतून ५०,०००/- रुपये देणगी देण्यात आली. या आर्थिक मदतीस धर्मवादी मुस्लिमांनी हरकत नोंदवली. 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या इस्लामविरोधी कारवाया वाढल्या असून मुस्लीम समाजात अशांततेचे वातावरण पसरत आहे' असे मुस्लीम लीगच्या पुणे शाखेचे चिटणीस मिर्झा हमीद बेग यांनी एका पत्रकात नोंदवून दलवाईंना दिलेल्या आर्थिक मदतीवर आक्षेप नोंदवला. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांना हे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात प्रारंभी उर्दूच्या विकासासाठी महाराष्ट्रात उर्दू अकादमी स्थापन केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करण्यात आले होते. निवेदनात पुढे म्हटले होते की, 'उर्दू अकादमी स्थापन करण्याच्या निर्णयामुळे शंकरराव चव्हाण यांना मुस्लीम समाज आपला 'निकटचा साथी' समजू लागला होता, पण दलवाई यांना दिल्या गेलेल्या देणगीमुळे मुस्लीम समाजाचा अपेक्षाभंग झाला आहे. दलवाई स्वातंत्र्य सैनिक किंवा आगरकर, फुले यांच्यासारखे समाज सुधारकही नाहीत. मग त्यांना कोणत्या सबबीवर मुख्यमंत्री निधीतून आर्थिक साहाय्य देण्यात आले?' असा प्रश्न निवेदनात विचारण्यात आला होता. 'एक प्रकारे आमच्या शत्रूला मदत करून मुख्यमंत्र्यांनी आमच्या जखमेवर मीठ चोळले आहे' अशी भावना धर्मवादी मुस्लिमांनी या निवेदनाद्वारे व्यक्त केली होती.

या काळात मेहेरून्निसा दलवाईंना, हमीद दलवाईंना नावे ठेवणारी, शिवीगाळ करणारी आणि शाप देणारी अनेक पत्रे येत असत. त्यांतील अनेक पत्रे उर्दू भाषेतील होती. अशा पत्रांमुळे मनस्ताप वाढत असे. मुख्यमंत्र्यांचा निधी मिळण्यापूर्वी, पैशांची गरज असतानाच हमीद दलवाईंना फाय फाउंडेशनचा पुरस्कार जाहीर झाला होता. या पुरस्काराची रक्कम म्हणून १५ हजार रुपये मिळणार होते. पुरस्कार प्रदान सोहळा मुंबईतच होणार होता. मेहेरून्निसा दलवाई यांनी हमीद दलवाईंच्या वतीने पुरस्कार स्वीकारला आणि तो प्रा. अ. भि. शाह यांच्या हातात देऊन त्यातून हॉस्पिटलचा काही खर्च भागवला.

हमीद दलवाई यांच्या मूत्रपिंडाचा आजार वाढत असल्याने मूत्रपिंडरोपण करण्याशिवाय पर्याय

नव्हता. हमीद दलवाई यांच्या आजाराचा तपशील सांगून मूत्रपिंडदाता उपलब्ध होण्यासाठी आवाहन करणारे निवेदन वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाले. पुण्यातील येरवडा तुरुंगात गंभीर गुन्ह्यासाठी फाशी सुनावण्यात आलेला कैदी फिरोज दारूवाला याने ही बातमी वाचली आणि आपले एक मूत्रपिंड दलवाई यांना देण्याची इच्छा प्रकट केली. योगायोगाने मूत्रपिंड रोपणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व चाचण्या अनुरूप ठरल्या आणि फिरोज दारूवाला यांनी आपली किडनी दलवाईंना दिली. ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली. 'मूत्रपिंड दिल्यामुळे आपल्याला फाशीच्या शिक्षेत सूट मिळावी' अशी फिरोज दारूवाला यांची आंतरिक इच्छा होती. याच काळात 'फिरोज दारूवाला यांची फाशीची शिक्षा माफ करावी' अशी विनंती समाजवादी नेते एस. एम. जोशी यांनी राष्ट्रपती फखरुद्दिन अली अहमद यांना एक पत्र पाठवून व्यक्त केली होती.

मात्र 'फिरोज दारूवाला यांची फाशीची शिक्षा माफ करण्यात येऊ नये' अशी भूमिका त्यांच्या आई-वडलांनीच घेतल्यामुळे शेवटी फिरोज दारूवाला यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. (महाराष्ट्र टाइम्स, ११ ऑक्टोबर; लोकसत्ता, १४ ऑक्टोबर १९७५ या वर्तमानपत्रांमधील संदर्भानुसार)

मुस्लीम समाज प्रबोधन व्हावे, यासाठी मंडळाच्या स्थापनेनंतर जेमतेम पाच वर्षे तुफानासारखे काम करणारे हमीद दलवाई यांचे निधन ही मुस्लीम समाज प्रबोधनासाठी फार मोठी हानी होती. मुंबई येथील जसलोक रुग्णालयात उपचार घेत असलेले समाज सुधारक हमीद दलवाई यांचे मंगळवार दिनांक ३ मे १९७७ रोजी सकाळी ७:००च्या सुमारास, वयाच्या ४५ व्या वर्षी मूत्रपिंडाच्या आजाराने निधन झाले. फिरोज दारूवाला या गुन्हेगाराची किडनी २ ऑक्टोबर १९७५ रोजी त्यांना बसवण्यात आली होती. मुंबईच्या जसलोक रुग्णालयात ही शस्त्रक्रिया करण्यात आली होती. या शस्त्रक्रियेचा खर्च रुपये ५०,००० महाराष्ट्र शासनाने दिला होता. त्यांच्या इच्छेनुसार, मुंबईतील चंदनवाडी विद्युत दाहिनीत, सायंकाळी ४:०० वाजता त्यांचा अत्यंत साध्या पद्धतीने, कोणत्याही धर्माचे संस्कार न करता अंत्यविधी करण्यात आला. या प्रसंगी मुस्लीम किंवा हिंदू यांपैकी कोणत्याही पद्धतीने कोणतेही विधी करण्यात आले नाहीत. त्याचप्रमाणे श्रद्धांजलीची भाषणेही झाली नाहीत. महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री माननीय शरद पवार, स्नेही प्रा. अ. भि. शहा, माजी सनदी अधिकारी वसंतराव नगरकर व महाराष्ट्र टाइम्सचे तत्कालीन संपादक गोविंदराव तळवलकर या व्यक्तिगत मित्रांना नऊ एप्रिल रोजी पत्र लिहून साधेपणाने अंत्यविधी करण्याची अखेरची इच्छा दलवाई यांनी व्यक्त केली होती. चंदनवाडीत प्रा. अ. भि. शहा यांनी हे पत्र वाचून दाखविले आणि त्यानंतर अंत्यविधी करण्यात आला. हमीद दलवाई यांच्या पत्नी मेहेरून्निसा, कन्या रुबिना व इला यांना या यावेळी दुःखावेग आवरला नाही. डॉ. इंदुताई पारेख, श्रीमती दुर्गा भागवत आणि इतर उपस्थित महिलांनी त्यांचे सांत्वन केले. आपले प्रगतिशील विचार कृतीत आणण्यासाठी त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. या ध्येयवादी समाज सुधारकाचे अंत्यदर्शन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, गृहमंत्री शरद पवार, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवदत्त दाभोलकर, ना. ग. गोरे, बाबा आढाव, प्रभूभाई संघवी, विजय तेंडुलकर, कायदेमंत्री हुसेन दलवाई (ज्येष्ठ), मे. पुं. रेगे, प्रा. नलिनी पंडित, कुमुद मेहता, आमदार पी. बी. पाटील, जगन्नाथ जाधव, डॉ. पी. व्ही. मंडलिक, सदानंद रेगे आणि हमीद दलवाईंचे धाकटे भाऊ हुसेन दलवाई यांनी घेतले.

हमीदभाईंना श्रद्धांजली वाहण्यासाठी पुण्यासह महाराष्ट्राच्या विविध शहरांत शोकसभांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच लंडनमधील इंडिया क्लब येथे गोविंद दवरेकर यांच्या अध्यक्षतेखाली २९ मे १९७७ रोजी श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत महाराष्ट्रासह भारतातील विविध प्रांतांतील नेतेही उपस्थित होते.

हमीद दलवाई यांच्या निधनाची आणि त्यांच्या इच्छेनुसार करण्यात आलेल्या दहनाची बातमी देशभर प्रसारमाध्यमांमधून प्रसिद्ध झाली. मंडळाचे विरोधक दलवाईंच्या निधनाने सुखावले, मात्र त्यांच्या दहनामुळे ते भयंकर चिडले. त्यांनी असे जाहीर केले की, 'दलवाईंनी स्वतःचं दहन केलं, आम्ही त्यांच्या मंडळाचं दहन करू.' चिडलेल्या विरोधकांच्या विविध बातम्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचत होत्या. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. काही विरोधकांनी पुण्यातील नव्या पुलावर उभे राहून दलवाईंच्या दहनाच्या विरोधात पत्रकेही वाटली. त्यामध्ये दलवाईंबरोबर त्यांच्या सत्यशोधक मंडळाचे दहन झाल्याचे लिहिले होते. काहींनी तर दलवाईंच्या निधनानंतर पेढे वाटून आपला आनंद व्यक्त केला. मंडळ बंद करण्यासाठी पुण्यातील व इतर शहरांच्या शाखांवर दबाव टाकण्यात येत होता. या प्रसंगी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी निर्भीडपणे सांगितले की, 'मंडळात आस्तिक आणि नास्तिक दोन्ही तऱ्हेचे सभासद आहेत. मंडळाच्या ध्येयधोरणांशी दहनाचा किंवा दफनाचा काहीही संबंध नाही.' साधनाच्या आंतरभारती सभागृहात झालेल्या बैठकीत कार्यकारिणीतील सदस्यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी दोन ठराव मांडण्यात आले. पहिला ठराव हमीद दलवाई यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करणारा होता. दुसरा ठराव दलवाईंचे दहन आणि त्या संदर्भात मुस्लीम सत्यशोधक मंडळाची भूमिका याबाबत होता. आपल्या मृत्युपत्रात दलवाईंनी मरणोत्तर दहनाची इच्छा व्यक्त केली होती. ही त्यांची वैयक्तिक बाब होती किंवा हा त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा भाग होता. मुस्लीम सत्यशोधक मंडळ प्रत्येकाच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा सन्मान करते. तथापि त्याचा मंडळाच्या ध्येयधोरणांशी काहीही संबंध नाही व नव्हता. मुस्लीम सत्यशोधक मंडळ प्रत्येकाच्या विचारस्वातंत्र्याचा आदर करते. अशा आशयाचा ठराव मांडून व मंडळाच्या तत्त्वांशी एकनिष्ठ राहून मंडळाचे कार्य जोमाने पुढे नेण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला. दलवाई यांच्या नेतृत्वाची जागा इतर कोणी घेऊ शकणार नसल्याचे मत पुढे आल्याने सामुदायिक नेतृत्व निर्माण करून मंडळाचे कार्य पुढे घेऊन जाण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

विरोधकांनी मात्र मंडळविरोधी मोहीम अधिक तीव्र केली. 'दलवाई नास्तिक होते. ते मुसलमान नव्हते. हे मंडळ नास्तिकांचे आहे. नास्तिकांना इस्लाममध्ये स्थान नाही. अशांना मेल्यावर स्वर्गात जागा मिळत नाही. तुम्ही मुसलमान आहात म्हणून हे मंडळ ताबडतोब सोडा' असा दबाव प्रत्येक कार्यकर्त्याच्या घरी जाऊन विरोधक टाकू लागले. परिणामी, काही कार्यकर्ते विचलित झाले आणि मंडळापासून दूर गेले. (सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी', अक्षर मानव प्रकाशन, २००९, प्रथम आवृत्ती, पान क्र. ११०, १११ या पुस्तकाचा संदर्भ येथे दिलेल्या माहितीसाठी घेतला आहे.)

हमीदभाईंनी मुस्लीम राजकारणावर टीका केल्याने चिडलेल्या मुस्लीम जातीयवादी नेतृत्वाने 'इस्लामविरोधक', 'काफिर', 'हिंदूंचा एजंट' वगैरे विशेषणे लावून हमीदभाईंच्या बदनामीची मोहीमच आखली होती. धमक्या तर नेहमीच्याच, पण त्यांच्यावर हल्ल्याचे प्रयत्नही झाले होते.

त्यांच्या मृत्यूनंतरही पुणे व मुंबई महापालिकेत मुस्लीम नगरसेवकांनी दलवाईंना श्रद्धांजली वाहण्यास विरोध केला. नरहर कुरुंदकर म्हणतात, 'दलवाईंच्या कार्यातील अडचणी लक्षात घेता, खऱ्या आश्चर्यकारक गोष्टी दोन आहेत: पहिली आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे, त्यांना आजारी पडून मरण्याची संधी मिळाली; त्यांना हुतात्मा व्हावे लागले नाही. त्याहून अधिक आश्चर्याची गोष्ट म्हणजे तेराशे वर्षांच्या परंपरेविरुद्ध बंड करणाऱ्या या बंडखोराला पाहता पाहता तीन-चारशे अनुयायी मिळाले.' यांतील पहिल्या आश्चर्यतील आश्चर्य असे आहे की, अन्य मुस्लीम देशांत सुधारकांच्या हत्या झाल्या असतील; मात्र भारतात धमकावण्यात आले असले, हल्ले झाले असले, तरी मुस्लिमांनी सुधारकांची हत्या केल्याचे उदाहरण नाही.

धर्माविषयी दलवाईंची भूमिका वेगळी व टोकाची होती, हे या अंतिम इच्छेसंदर्भात नमूद करणे आवश्यक आहे. 'आपण मुसलमान आहोत म्हणून आपल्या समाजातील दोषांचे दिग्दर्शन करून ते सुधारणे, हे आपले पहिले कर्तव्य आहे' असा दलवाईंचा आग्रह होता. 'धर्म ही खासगी बाब आहे' असे मानणारे दलवाई नास्तिक, निरीश्वरवादी होते; पण आपली भूमिका त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळावर अथवा कार्यकर्त्यांवर लादायचा पुसटसा प्रयत्नही कधी केला नाही. 'नास्तिकता' ही दलवाईंची वैयक्तिक भूमिका होती; पण मंडळाची भूमिका कधीही नास्तिकतेची नव्हती व नाही. तो व्यक्तिस्वातंत्र्याचा भाग आहे. प्रत्येकाने हे व्यक्तिस्वातंत्र्य मान्य केले पाहिजे.

हमीद दलवाई यांचे वैचारिक आणि सामाजिक सामर्थ्य आणि योगदान याची दखल घेऊन इतिहासकार डॉ. रामचंद्र गुहा यांनी 'मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया' या आपल्या नावाजलेल्या पुस्तकामध्ये हमीद दलवाईंचा उल्लेख 'शेवटचे आधुनिकतावादी' (The Last Modernist) असा केला आहे.

आक्षेप आणि वस्तुस्थिती :

हमीद दलवाई हयात असताना आणि त्यांच्या मृत्युपश्चात त्यांचे वैचारिक विरोधक तसेच त्यांचे सहकारी म्हणून राहिलेल्या कार्यकर्त्यांनी दलवाई यांच्या विषयी काही निरीक्षणे, आक्षेप नोंदवलेले आहेत. त्यासंदर्भात मंडळाचे म्हणणेदेखील समजून घेणे गरजेचे आहे. अशा तक्रारी किंवा आक्षेप नोंदविणाऱ्यांमध्ये धर्मवादी राजकीय पुढाऱ्यांपासून इस्लामच्या उदारमतवादी विचारांचा प्रसार करणारे आणि त्यासंदर्भात लेखन करणारे कार्यकर्तेही आहेत. या तक्रारी आणि निरीक्षणे वेळोवेळी व्यक्त करण्यात आल्या आहेत. त्यांचा निरपेक्षपणे प्रतिवाद केला नाही, तर तो हमीद दलवाईंवर अन्याय ठरेल.

हमीद दलवाईंवर नोंदवलेले काही आक्षेप आणि त्यांबद्दलची वस्तुस्थिती इथे मांडता येईल. हमीद दलवाईंवर असा एक आक्षेप केला जातो की, 'ते हिंदुत्ववादयांच्या प्रभावाखाली होते. तसेच मुस्लीम आकसापोटी लिहिलेले पाश्चिमात्य साहित्य वाचून त्यांनी आपली मते तयार केली. या प्रभावातून निर्माण झालेले त्यांचे विचार त्यांच्या साहित्यातून आणि कार्यातून पुढे आलेले दिसतात.' वस्तुस्थिती अशी की, हमीद दलवाई यांची प्राथमिक जडणघडण राष्ट्र सेवा दलाच्या मुशीत झाली. सेवा दलाचे असल्यामुळे महात्मा गांधी, राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण आदींच्या कार्याचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्या काळात कार्यरत असणाऱ्या परिवर्तनवादी

चळवळींच्या ते संपर्कात आले. यातून आपण जन्म घेतलेल्या समाजाकडे पाहण्याची त्यांची एक आंतरदृष्टी निर्माण झाली आणि आपल्या निरीक्षणांच्या आधारे कथालेखन, कादंबरीलेखन आणि पत्रकारितेतून त्यांनी विचार मांडले. मुळात निरपेक्ष, तर्कशुद्ध, आधुनिकतावादी पिंड तयार झाल्यामुळे प्रत्येक गोष्टीची ते स्वतंत्रपणे चिकित्सा करू लागले. यादरम्यान त्यांनी अनेक बुद्धिप्रामाण्यवादी, धार्मिक व राजकीय नेत्यांशी, तसेच सर्वसामान्य मुस्लिमांशी संवाद साधून प्रश्न समजून घेण्यासाठी अभ्यास दौरेदेखील केले. यातून तयार झालेली दृष्टी त्यांच्या लेखनामागची आणि सामाजिक कार्यामागची प्रेरणा आहे. या दृष्टीमुळे घडून आलेली दुसरी गोष्ट म्हणजे, मुस्लीम समाजातील अंधश्रद्धा, जमातवादी राजकारण, महिलांचे प्रश्न आणि मुल्ला-मौलवी-उलेमा यांच्या प्रभावातून निर्माण झालेला सामाजिक मागासलेपणा दूर करणे त्यांना गरजेचे वाटले. 'आपला जन्म मुस्लीम समाजात झालेला आहे. म्हणून ती आपली जबाबदारी आहे' याचे भान ठेवून त्यांनी मुस्लीम प्रबोधनाचा विचार मांडला आणि त्यानुसार जनजागृती, लोकशिक्षण करण्याचा प्रयत्न केला. हे करत असताना 'हिंदुत्ववादी शक्ती याचा दुरुपयोग करतील' याचीही त्यांना जाणीव होती. मात्र त्या भीतीपोटी मुस्लीम प्रबोधनाचा प्रश्न न हाताळणे हे मुस्लीम हिताचे नसल्याचे भान ठेवून त्यांनी मुस्लीम समाज प्रबोधनावर कार्य सुरू केले आणि आपल्या भूमिका सुस्पष्टपणे मांडल्या. हिंदुत्ववाद्यांनी आपले विषय हायजॅक करून ते मुस्लीम विरोधासाठी वापरू नयेत, याची काळजी हमीद दलवाईंनी घेतल्याचे अनेक किस्से आहेत. अनेक वेळा हिंदुत्ववाद्यांनी त्यांना व्याख्यानासाठी निमंत्रित केले आणि दलवाईंनी त्यांच्या मंचावर जाऊन विचार मांडले. अशा वेळी त्यांनी मुस्लीम प्रबोधनाचे विषय न हाताळता हिंदुत्ववाद्यांचे दोष, उणिवा या गोष्टी त्यांच्या समक्ष मांडल्या. दलवाईंचा धर्मवादाकडे निरपेक्ष पद्धतीने पाहण्याचा दृष्टीकोन आणि चिकित्सक स्वभाव समजून घेण्यासाठी 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' हे त्यांचे पुस्तक अभ्यासले पाहिले.

दलवाईंच्या स्वतंत्र विचारांचे महत्त्व कमी करण्यासाठी त्यांचे मूल्यमापन करताना विरोधक म्हणतात की, 'त्यांच्यावर प्रा. अ. भि. शहा व प्रा. नरहर कुरुंदकर अशा विभुतींचा प्रभाव होता आणि ते दलवाईंना गुरुस्थानी होते.' तथापि वस्तुस्थिती अशी आहे की, त्यांनी वयाच्या अठराव्या वर्षापासून कथालेखनाला सुरुवात केली. 'लाट' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९६१मध्ये आला आणि १९६५ साली त्यांची 'इंधन' ही कादंबरी प्रकाशित झाली. दलवाईंची वैचारिक दिशा या ललित साहित्यातही प्रतिबिंबित होते. १९६३-६८ या काळात त्यांनी आचार्य अत्रे यांच्यासमवेत दैनिक मराठामध्ये पत्रकारिता केली; अभ्यास दौरा केला आणि त्या संदर्भातील निरीक्षणे 'मराठा'त क्रमशः प्रकाशित करण्यात आली. ही निरीक्षणे नंतर 'इस्लामचे भारतीय चित्र' या नावाने पुस्तक रूपात प्रकाशित करण्यात आली. १९६६ साली त्यांनी काढलेला सात मुस्लीम महिलांचा मोर्चा ही शहा-कुरुंदकरांच्या भेटीपूर्वीची घटना आहे. तसेच 'मुस्लीम जातीयतेचे स्वरूप - कारणे व उपाय' या पुस्तकाची पहिली आवृत्तीही साधना प्रकाशनाने १९६७ साली, शहा-कुरुंदकरांच्या भेटीपूर्वीच प्रकाशित केली.

यानंतरच्या काळात शहा आणि दलवाई यांनी 'इंडियन सेक्युलर सोसायटी'ची स्थापना केली. शहा-कुरुंदकर यांच्याशी जमलेली दलवाईंची गट्टी आणि त्यांनी एकमेकांना केलेले सहकार्य हा सर्व प्रकार त्यांच्यातील प्रागतिक, मानवतावादी, सेक्युलर व बुद्धिप्रामाण्यवादी साम्यस्थळांचा

परिपाक आहे. म्हणून हे सर्व चित्र पाहता, दलवाईंवर घेतलेले हे आक्षेप निरर्थक वाटतात.

दलवाईंवरील दुसरा महत्त्वाचा आक्षेप म्हणजे, 'ते निधर्मी आणि निरीश्वरवादी असल्याने त्यांनी सातत्याने मुस्लीमविरोधी भूमिका घेतल्या आणि इस्लामच्या उदारमतवादाकडे सकारात्मकतेने पाहिले नाही. तसेच इस्लामच्या उदारमतवादाचा उपयोग मुस्लीम समाज प्रबोधनासाठी केला नाही.' वास्तविक, हमीद दलवाई स्वतः निधर्मी किंवा निरीश्वरवादी असले, तरी त्यांनी हा विचार इतरांवर लादण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. तसेच 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ हे निधर्मी किंवा निरीश्वरवादी आहे' असेही त्यांनी कधी म्हटले नाही. उलट मनोवृत्तीने धार्मिक असणारे स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले यांना मंडळाचे अध्यक्ष होण्यासाठी दलवाईंनी विनंती केली. ती बँडवाले यांनी मान्य केली. तहहयात ते मंडळाचे अध्यक्ष राहिले. याव्यतिरिक्त असफ ए. फैजी आणि अनेक मुस्लीम अभ्यासकांशी दलवाईंची मैत्री होती. हमीद दलवाईंनी इस्लामचे संस्थापक प्रेषित मोहम्मद यांचा कधीही अनादर केला नाही किंवा त्यांच्यावर बोचरी टीकाही केली नाही. उलट 'प्रेषित मोहम्मद हे इस्लामच्या इतिहासातील सर्वांत पहिले व शेवटचे सुधारक होते' असा त्यांचा गौरव दलवाईंनी केला आहे. 'धर्म शोषणास कारणीभूत होऊ नये' अशी भूमिका दलवाईंनी मांडली आणि मुस्लीम जमातवादी राजकारणाची तर्कशुद्ध चिकित्सा केली. हे करत असताना सामान्य मुस्लिमांबद्दल त्यांनी आस्था बाळगली आणि त्यांचे कल्याण व्हावे, ऐहिक जीवनात प्रगती व्हावी यासाठीच मंडळामार्फत प्रबोधन कार्य केले. भारतीय संविधानाला अपेक्षित असलेल्या धर्मस्वातंत्र्याचे ते समर्थक होते आणि तेच त्यांनी आपल्या आचरणात आणले. 'कुणी धर्मस्वातंत्र्याचा संकोच केला, तर ते मानवाधिकाराविरुद्ध असल्याने शोषितांच्या बाजूने मी उभा राहीन' अशीही भूमिका त्यांनी प्रसंगी घेतली. इस्लामच्या इतिहासात असणाऱ्या उदारमतवादी व्यक्ती व प्रवाहांबद्दलची जाणीव हमीद दलवाईंना होती. तसेच त्याच्या मर्यादाही त्यांच्या लक्षात आल्या होत्या. म्हणून इस्लाममध्ये जे-जे चांगले आणि पूरक आहे, त्याविरुद्ध त्यांनी कधी भूमिका घेतली नाही. मात्र जे अन्यायी आहे, अमानवी आहे त्याविरुद्ध भूमिका घेऊन त्यात बदल करण्याचा निर्धार त्यांनी केला होता.

प्रा. मुजीब, डॉ. असगर अली इंजिनिअर यांच्या कार्याकडेही त्यांनी समाजप्रबोधनासाठी असणारे पूरक कार्य म्हणूनच पाहिले. फरक एवढाच होता की, दलवाईंची दृष्टी धर्मापलीकडे पाहणारी असल्यामुळे त्यांनी आपल्या विचाराशी प्रामाणिक राहून हे काम पुढे नेले. कालबाह्य श्रद्धा बाळगणाऱ्या पारंपरिक समाजाला ऐहिक जीवनाचे महत्त्व सांगून आधुनिक जगात नेण्याच्या प्रयत्नांत काही अंतरापर्यंत धर्माचे बोट धरणे दलवाईंना मान्य होते. मात्र त्यानंतर कुठेतरी धर्माचे बोट सोडण्याची तयारी दाखवावी लागते, या विचाराचे ते होते. 'धर्माच्या नावाने लोकांची जाणूनबुजून दिशाभूल करणाऱ्यांना गोडीगुलाबीने सांगून चालत नाही, तर त्यांच्यावर प्रहारच करायला हवा' हा दलवाईंचा दृष्टीकोन होता. दलवाई धर्मचौकटीबाहेरचा विचार मांडणारे होते. त्यामुळे दलवाईंचे अनेक तत्कालीन सहकारी आरंभापासूनच द्विधा मनःस्थितीत होते. त्यातून असे आक्षेप घेतले जातात.

इस्लामचा उदारमतवाद, त्याचा नवा अर्थबोध यासाठी अनेक जागतिक विद्वानांनी प्रयत्न केलेले आहेत. त्यांचा प्रभाव त्या-त्या देशात किती पडला, हे मुस्लीम जगतातील अद्ययावत

घडामोडींकडे पाहिल्यास लक्षात येते. भारतातही सर सय्यद अहमद खान, मोहम्मद इकबाल, मौलाना आझाद, असफ ए. ए. फैजी ते असगर अली इंजिनिअर अशी धर्मसुधारकांची एक नामावली आहे. या सर्वांनी उलेमा वर्गाला उघडे पाडण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यामुळे समाजप्रबोधनाच्या पारड्यात काय पडले, याचा अभ्यास केल्यास अशा प्रयत्नांच्या मर्यादाही लक्षात येतात. धर्मअभ्यासक आणि धार्मिक मौलाना आझादांनी धर्माची सकारात्मक चिकित्सा केली. त्यांना किती यश आले? उलट आझादांना नाकारून स्वतः निधर्मी असणारे, धर्मनिषिद्ध गोष्टी आचरणारे, शिया पंथीय जिन्ना यांना मुस्लीम समाजाने जवळ केले. म्हणून दलवाईंना धर्मचिकित्सेपेक्षा धर्मांध आणि धर्मवादी राजकारणाची चिकित्सा करणे महत्त्वाचे वाटले. धर्मसुधारकांच्या परंपरांची री ओढण्यात त्यांना स्वारस्य नव्हते. तरीही या धर्म सुधारकांवर टीका न करता धर्माच्या नावाखाली चाललेल्या बाईट आणि विद्रूप गोष्टी बदलण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी मुस्लीम समाज प्रबोधनाच्या स्वतंत्र बीजांचे त्यांनी रोपण केले. त्यातच हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे वेगळेपण आहे.

दलवाईंचे टीकाकार पुढे असाही आक्षेप नोंदवतात की, 'दलवाईंनी मुस्लीम समाजाशी संवाद साधला नाही. त्यांचे कार्यक्रम सदाशिवपेठी, मुस्लीमेतर लोकांसाठी होते.' हमीद दलवाई यांच्या जीवन कार्याकडे वस्तुनिष्ठपणे पाहिल्यास या आक्षेपातील फोलपणा समोर येतो. कारण मंडळाच्या स्थापनेपूर्वीच त्यांनी महाराष्ट्रातील विविध भागांत जाऊन मुस्लिमांच्या प्रश्नांवर चर्चा केली, बुद्धिवादी लोकांशी संवाद साधला, तसेच मंडळाच्या स्थापनेनंतर मुस्लीम मोहल्ल्यात जाऊन त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. मुस्लीम समाजातील अनेक नेते त्यांचे व्यक्तिगत मित्रही होते; तसेच फैजी, एम. आर. ए. बेग, मोईन शाकीर, कुलसूम पारेख असे अनेक अभ्यासक त्यांच्यासमवेत होते. हमीद दलवाईंना स्वतःला निधर्मी किंवा निरीश्वरवादी म्हणून घेऊन मिरवून घ्यायचे नव्हते, तर 'समाजातील प्रबोधनाचा कोणताही छोटा मुद्दा घेऊन काम करणाऱ्यांनी एकत्र यावे' यासाठी ते समाजाशी संवाद करत होते. मात्र धर्मवादी राजकीय नेत्यांना हे आवडणारे किंवा परवडणारे नसल्यामुळे त्यांनी दलवाईंना 'काफिर', 'इस्लाम का दुश्मन', 'हिंदू का एजंट' असे संबोधून त्यांची प्रतिमा मलिन केली आणि समाज आणि दलवाई यांच्यामध्ये भिंत उभी केली. दलवाईंच्या काळात त्यांनी घेतलेल्या संवादी भूमिकेचे अनेक दाखले देता येतील.

'हमीद दलवाई उच्च शिक्षित नव्हते. त्यामुळे त्यांच्या अभ्यासात आणि आकलनात मर्यादा होत्या' अशी एक टिप्पणी सुशिक्षित, पदवीधर आणि अभ्यासक असणारे टीकाकार करतात. वास्तविक, शैक्षणिक पदव्या आणि विचार करण्याची व्यापक दृष्टी यांच्यात सहसंबंध लावणे, हेच तर्कशुद्ध नाही. 'दलवाईंना महाविद्यालयीन शिक्षण घेता आले नाही. त्यामुळे त्यांच्या जडणघडणीवर आणि चळवळीच्या व्यापकतेवर परिणाम झाला' असे बाळबोध आक्षेप नोंदविणारे एकाअर्थी आजवरच्या इतिहासातील रूढार्थाने शिक्षित नसलेल्या मात्र असामान्य कर्तृत्व केलेल्या थोर व्यक्तिमत्त्वांचा अवमान करतात. इस्लामचे संस्थापक मोहम्मद पैगंबर यांच्याकडेही लौकिक पदवी नव्हती. तरीही त्यांनी जगावर प्रभाव टाकलेला आहे. उच्च शिक्षण नव्हते, म्हणून पैगंबरांचे महत्त्व कमी होत नाही. या वस्तुस्थितीकडे पाहिल्यास अभ्यास आणि आकलनाच्या मर्यादा दलवाईंवर होत्या की टीकाकारांवर हे तपासावे लागेल.

काही टीकाकार हमीद दलवाईंच्या व्यक्तिमत्त्वातील मर्यादा दाखवण्यासाठी अनिल अवचटांच्या 'हमीद' या पुस्तकाचा आधार घेऊन 'दलवाईंचा स्वभाव आत्मकेंद्री होता. त्यांना अल्प काळात लोकप्रियता मिळाली. त्यामुळे त्यांच्यात अहंगंडाची भावना निर्माण झाली' असे म्हणतात. वास्तविक 'हमीद' या पुस्तकाची जन्मकहाणी समजून घेतली पाहिजे. दलवाईंच्या मृत्यूनंतर काही दिवसांत मैत्रीतील आठवणी जागवत हे पुस्तक तयार झाले. हे पुस्तक म्हणजे हमीद दलवाईंचे समग्र चरित्र नाही. स्वतः अनिल अवचट यांनी या पुस्तकाच्या मर्यादा वेळोवेळी सांगितल्या आहेत. विजय तेंडुलकरांनीही पुस्तकाच्या मर्यादा दाखवून 'या पुस्तकाकडे कसे बघावे' हे सुचविले आहे. 'या पुस्तकाचा दुरुपयोग दलवाईंचे विरोधक करतील' अशी शंका अनेक हितचिंतकांना वाटत होती. त्यामुळे दलवाईंच्या स्वभाव वैशिष्ट्यांवर त्या पुस्तकाच्या आधारे टिप्पणी करणे दलवाईंवर अन्याय करणारे आहे.

'हमीद दलवाई किंवा मुस्लीम सत्यशोधक परिपूर्ण आहेत. त्यांच्यात उणिवा नाहीत' असा दावा कोणीही करत नाही. माणसांची आणि चळवळींची जशी काही बलस्थाने असतात, तशा काही मर्यादासुद्धा असतात. विज्ञान, इहवाद आणि आधुनिक मूल्यांवर आधारित सामाजिक सुधारणा घडविण्यासाठी आणि लोकशाही, समता, व्यक्तिस्वातंत्र्य रुजवण्यासाठी मंडळ कुराण वा हदिसकडे पाहण्याऐवजी भारतीय जनतेने शपथपूर्व स्वीकारलेल्या संविधानाचा आधार घेते आणि धर्माकडे व्यक्तिगत श्रद्धेचा भाग म्हणून पाहते. 'हमीद दलवाईंनी संघटनात्मक बांधणी केली नाही', तसेच 'शेवटच्या काळात असताना मंडळाचा उत्तराधिकारी नेमला नाही' असा एक आक्षेप नोंदवला जातो. हमीद दलवाईंनी आपले व्यक्तिगत जीवन, वैचारिक अधिष्ठान आणि सामाजिक कार्य यांच्यात कधीही तफावत राखली नाही किंवा लपवालपवी केलेली नाही. त्यांनी विचार, वर्तन यांबाबत स्वीकारलेली भूमिका ते शेवटपर्यंत जगले. 'मुस्लीम सत्यशोधक ही नास्तिक आणि निधर्मी कार्यकर्त्यांची चळवळ व्हावी' असे मत त्यांनी कधीच आणि कुठेही नोंदवले नाही. मृत्युपूर्वी काही दिवस आधी त्यांनी मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्यांना रामटेक येथे बोलावून चर्चा केली आणि तेथेच मंडळाचा राजीनामाही दिला.

आपला उत्तराधिकारी म्हणून त्यांनी कोणावरही जबाबदारी दिली नाही, याकडे दोष म्हणून पाहायचे की दलवाईंच्या लोकशाहीवादी स्वभावाची पावती म्हणून पाहायचे, हे ठरवायला पाहिजे. उलट 'मंडळाने लोकशाही पद्धतीने जबाबदारी स्वीकारून मंडळ पुढे चालवावे' असे संकेत त्यांनी दिले असतील, तर तोही त्यांचा व्यापक विचार म्हणून पाहता येईल. तसेच हमीद दलवाईंनी काम सुरू केल्यानंतर त्यांना लाभलेल्या अल्पायुष्यामुळे संघटनात्मक बांधणी करायचे राहिल्याने याचा दोष त्यांना देणे उचित वाटत नाही. या आक्षेपात गांभीर्य दिसत नाही.

'मुस्लीम सत्यशोधक मंडळामुळे सामान्य मुसलमानांवरील उलेमांची पकड घट्ट झाली' असाही एक सूर लावला जातो. तथापि हे म्हणणे अतिशयोक्तीचे होईल. उलट दलवाईंमुळे व मंडळाच्या कार्यामुळे मुस्लीम समाजात इस्लामचा उदारमतवाद सांगणारे लोक पुढे आले; संघटना पुढे आल्या. मुस्लीम समाजात उलेमांचा प्रभाव आणि पकड या बाबी मंडळाच्या स्थापनेपूर्वीपासूनच अस्तित्वात आहेत. त्यांच्यामुळेच प्रबोधनाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. मंडळाच्या कामामुळे अनेक मुस्लीम महिलांना बळ मिळाले आणि त्यांनी उलेमांना आवाहन देण्याचेच नव्हे, तर सर्वोच्च

न्यायालयापर्यंत जाण्याचे धाडस दाखवले; प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पद्धतीने मुस्लीम प्रश्नांवर काम करणाऱ्या संघटना अस्तित्वात आल्या.

हमीद दलवाई यांचे झंझावाती कार्य, प्रबोधनकार्याची दृष्टी आणि त्यांना मिळणारा मुस्लीम महिलांचा प्रतिसाद यांमुळे मुल्ला, मौलवी, उलेमा आणि राजकीय नेते यांची झोप उडाली. दलवाईंना आणि कार्यकर्त्यांना हर प्रकारे नामोहरम करण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र असे न होता कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार केला. 'हमीद दलवाईंनंतर ही चळवळ संपेल' असे मंडळाच्या विरोधकांना वाटले आणि दलवाईंच्या मृत्यूनंतर त्यांनी पेढेही वाटले. विविध ठिकाणी मांडण्यात येणाऱ्या शोक प्रस्तावास विरोधही केला गेला. मात्र ही चळवळ थंडावली नाही. दलवाईंनंतर काही काळाने निधन पावलेल्या प्रा. मोईन शाकीर, प्रा. मुमताज रहिमतपुरे, ॲड. अब्दुल शेख या कार्यकर्त्यांच्या मृतदेहांस स्थानिक कब्रस्तानात दफन करण्यासही धर्मवाद्यांनी विरोध केला. यातूनही मुस्लीम समाज प्रबोधनाच्या आव्हानांची कल्पना येते. दलवाईंनी दिलेली व प्रबोधनासाठी आवश्यक असलेली स्वदोष दिग्दर्शनाची प्रेरणा निर्माण झाल्यास प्रबोधनाचे कार्य सोपे होणार आहे. यासाठी आत्मपरीक्षण आणि आत्मसुधारणा करण्याचा संदेश मुस्लीम सत्यशोधक मंडळाने दिला आहे.

हमीद दलवाई यांचा जीवनपट :

संपूर्ण नाव – हमीद उमरखाँ दलवाई.

- २९ सप्टेंबर १९३२ – मिरजोळी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथे जन्म.
- १९४६ – राष्ट्र सेवा दलात सहभाग
- १९५१ – चिपळूण येथून मॅट्रिक उत्तीर्ण.
- १९५४ – इस्माइल युसूफ कॉलेज व रुपारेल कॉलेजमधून कला शाखेतून इंटरमिजिएटपर्यंत शिक्षण.
- १९५४ ते १९६३ – किरकोळ स्वरूपाच्या नोकऱ्या व मौज, सत्यकथा, मराठवाडा, साधना, वसुधा या नियतकालिकांमधून कथालेखन.
- १६ जुलै १९५८ – इस्लामी पद्धतीने मेहेरून्निसा खान यांच्याशी विवाह.
- ४ ऑगस्ट १९५८ – (विशेष विवाह कायदा १९५४प्रमाणे) नोंदणी पद्धतीने मेहेरून्निसा खान यांच्याशी पुनश्च विवाह.
- १९६० – 'लाट' हा कथासंग्रह साधना प्रकाशन, पुणेतर्फे प्रकाशित. कन्या रूबिना यांचा जन्म.
- १९६२ – पत्नीसह पाकिस्तानचा दौरा.
- १९६६ – 'इंधन' ही कादंबरी मौज प्रकाशन, मुंबईतर्फे प्रकाशित. कन्या इला यांचा जन्म.
- १९६६ – 'इंधन' कादंबरीस महाराष्ट्र शासनाचे राज्य पातळीवरील पारितोषिक.
- १८ मार्च, १९६६ – मुंबई विधानसभेवर सात मुस्लीम महिलांचा मोर्चा
- १९६३–१९६८ – प्र. के. अत्रे यांच्यासमवेत दैनिक 'मराठा'मध्ये पत्रकारिता.
- १९६७–१९६८ – उत्तर भारत, जम्मू-काश्मीर आणि भारत-पाकिस्तान सीमालगत भागात प्रवास-अभ्यास दौरा.

- एप्रिल १९६८ – 'सदा-ए-निसवाँ' (स्त्रियांचा आवाज) या नावाची मुस्लीम स्त्रियांची संघटना उभारली.
- १९६८ – 'मुस्लीम पॉलिटिक्स इन सेक्युलर इंडिया' नचिकेत प्रकाशन, मुंबईतर्फे प्रकाशित.
- १९६८ – 'मुस्लीम जातीयतेचे स्वरूप : कारणे व उपाय' साधना प्रकाशन, पुणेतर्फे प्रकाशित.
- १९६८ – 'इंडियन सेक्युलर सोसायटी'ची स्थापना, (प्रा. अ. भि. शहा अध्यक्ष व हमीद दलवाई उपाध्यक्ष). सोसायटीच्या वतीने 'द सेक्युलॅरिस्ट' हे नियतकालिक एप्रिल १९६९पासून सुरू करण्यात आले.
- १९६८-७० – मुस्लीम समाज प्रबोधनासाठी संघटना उभारणीसाठी प्रयत्न.
- २२ मार्च, १९७० – मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना.
- ८ एप्रिल, १९७० – 'इंडियन सेक्युलर सोसायटी' व 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'तर्फे तत्कालीन मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांना 'समान नागरी कायदा' व्हावा यासाठी सुमारे ५०० मुस्लीम स्त्री-पुरुषांच्या सह्यांचे निवेदन मुंबई मंत्रालयात जाऊन दिले.
- ३ ऑगस्ट, १९७० – पुण्याच्या अहिल्या आश्रमात परमवीर अब्दुल हमीद व्याख्यानमालेस सुरुवात. स्वातंत्र्यवीर मोहन रानडे, प्रा. असफ ए. ए. फैजी यांचे व्याख्यान.
- ३१ मे, १९७१ – वि. स. खांडेकर यांच्या हस्ते व भाई माधवराव बागल यांच्या उपस्थितीत मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कोल्हापूर शाखेचे उद्घाटन.
- १८-१९ सप्टेंबर, १९७१ – पहिले कार्यकर्ता शिबिर, गणेश मंगल कार्यालय, कोल्हापूर.
- ४ नोव्हेंबर, १९७१ – 'इस्लामचा आधुनिक दृष्टीकोन' या विषयावर प्रा. असफ ए. ए. फैजी यांचे कोल्हापूर येथे व्याख्यान.
- २८ नोव्हेंबर, १९७१ – अखिल महाराष्ट्र मुस्लीम परिषद, पुणे.
- नोव्हेंबर १९७१ – गांधीभवन, पुणे येथे कार्यकर्त्यांचे अभ्यास शिबिर. यामध्ये हमीद दलवाई, अ. भि. शहा, यदुनाथ थत्ते यांनी मार्गदर्शन केले.
- ३-४ डिसेंबर, १९७१ – 'ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम' दिल्ली.
- २७-२८ डिसेंबर, १९७१ – मुस्लीम महिला परिषद, पुणे.
- १९७१ – समान नागरी कायदा व्हावा म्हणून, तसेच अन्य मागण्यांसाठी पुण्यातील कार्यकर्त्यांतर्फे तत्कालीन राज्यपाल अली यावर जंग यांना निवेदन दिले.
- १९७१ – मुस्लीम महिलांच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी दिल्ली, बुलंद शहर, तंजावुर, बेंगळुरू, हैदराबाद, लखनौ, मुंबई, पुणे, कोल्हापूर येथील सुमारे ५०० मुस्लीम महिलांची पाहणी. त्यांपैकी सुमारे १५० महिला तलाकपीडित होत्या.
- २३-२४ सप्टेंबर, १९७२ – आंतरभारती हायस्कूल, कोल्हापूर इथल्या कार्यकर्त्यांसाठी स्नेहमिलन शिबिर. यामध्ये हमीद दलवाई, बाबुमियाँ बँडवाले, अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी मार्गदर्शन केले.
- जानेवारी १९७३ – मुस्लीम सत्यशोधक पत्रिका हे मंडळाचे मुखपत्र कोल्हापुरातून व नंतर १९७४ साली पुणे येथून सुरू झाले.
- फेब्रुवारी १९७३ – हमीद दलवाई यांनी व्याख्यानांमधून आणि लेखांतून 'वंदे मातरम्' या

गीताच्या पहिल्या दोन कडव्यांच्या गायनासाठी अभियान सुरू केले.

- ११ मार्च, १९७३ – मराठा मंदिर, मुंबई येथे भरलेल्या 'महाराष्ट्र मुस्लीम सामाजिक परिषदे'मध्ये सुमारे ३०० प्रतिनिधींची समता, शिक्षण, कायदा या विषयांवर चर्चा. दलवाई, फैजी, शहा, डॉ. मोईन शाकीर इ. कार्यकर्त्यांचा समावेश.
- ११ व १२ ऑगस्ट, १९७३ – कोल्हापूर येथे सुमारे २०० कार्यकर्त्यांच्या शैक्षणिक शिबिरात दलवाई, अ. भि. शहा, भाई वैद्य यांनी मार्गदर्शन केले.
- ३०-३१ डिसेंबर, १९७३ – मुस्लीम शिक्षण परिषद, कोल्हापूर
- १९७३ – सनातनी मुस्लिमांनी 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड'ची स्थापना करून समान नागरी कायद्यास विरोध करणारी परिषद घेतली. यामध्ये १०,००० प्रतिनिधी होते. त्यांच्या विरोधात त्याच ठिकाणी हमीद दलवाई आणि कार्यकर्त्यांनी निदर्शने केली.
- ९ जून, १९७४ – चिपळूण येथे मुस्लीम महिलांचा मेळावा.
- २ नोव्हेंबर, १९७५ – खादी ग्रामोद्योग केंद्र, कोल्हापूर येथे तलाकपीडित महिलांची विभागीय परिषद.
- २३ नोव्हेंबर, १९७५ – जिहाद-ए-तलाक परिषद, (५०० महिला) राज्यव्यापी सामाजिक परिषद, पुणे.
- १९७६ – अमेरिकी स्वातंत्र्याच्या द्विशताब्दीनिमित्त फिलाडेल्फिया येथे जगातील निवडक सामाजिक कार्यकर्ते, लेखक, विचारवंत यांना निमंत्रित करण्यात आले. त्या निमित्ताने फिलाडेल्फिया (अमेरिका), जर्मनी, इंग्लंड असा परदेश दौरा.
- १९७४-७७ – या काळात दलवाई अधूनमधून आजारी होते. मुंबईच्या जसलोक रुग्णालयात किडनीचा आजार – डायलिसिस – किडनी ट्रान्सप्लांट या प्रक्रियांना सामोरे जावे लागले.
- ३ मे, १९७७ – वयाच्या ४५व्या वर्षी निधन.
- १९८२ – 'इस्लामचे भारतीय चित्र' या पुस्तकाचे मरणोत्तर प्रकाशन.
- २००२ – 'भारतीय मुसलमान आणि राष्ट्रीय एकात्मता' या पुस्तकाचे साधना प्रकाशनातर्फे मरणोत्तर प्रकाशन.

मंडळाच्या स्थापनेमागील सामाजिक-राजकीय पार्श्वभूमी :

ब्रिटिशांच्या दीडशे वर्षांच्या जुलमी राजवटीच्या जोखडातून १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी भारत मुक्त झाला. हे स्वातंत्र्य त्याने काँग्रेसच्या नेतृत्वाखाली सतत ६२ वर्षे लढा देऊन मिळवले. टिळक, गांधी यांनी या लढ्याचे नेतृत्व केले. त्यासाठी लक्षावधी भारतीयांना असीम त्याग करावा लागला; कित्येकांनी आपल्या आयुष्याची होळी केली; हजारोंना बलिदान करावे लागले आणि त्याचे फळ स्वातंत्र्याच्या रूपाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी मिळाले; पण हा स्वातंत्र्याचा लढा कोणी चालविला? त्यात प्रामुख्याने कोणी भाग घेतला? या देशात बहुसंख्य असलेल्या हिंदूंनीच तो लढा चालविला; काही मुस्लीम होते, नाही असे नाही, पण बहुसंख्य मुस्लीम समाज या लढ्यात सामील होऊ शकला नाही. मुस्लीम समाजाला या लढ्यात ओढण्यासाठी टिळक, गांधी यांनी आटोकाट प्रयत्न केले, पण त्यांना म्हणावे तितके यश लाभले नाही.

टिळकांनी त्यासाठीच लखनौ करार केला, पण त्यातून मुसलमानांची अलगपणाची भावनाच वाढीला लागली. महात्मा गांधींनी खिलाफत चळवळीच्या निमित्ताने मुसलमानांना ब्रिटिशांविरोधात परत एकदा उभे करण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना थोडेफार यश आलेही; पण त्यामुळे स्वातंत्र्याच्या चळवळीपासून मुस्लीम समाज दूरच गेला, कारण खिलाफत चळवळ ही धार्मिक चळवळ होती. फायदा फक्त एकच झाला, मुस्लीम समाज ब्रिटिशविरोध करण्यास फक्त धार्मिक लढ्यापुरता का होईना, पण उभा ठाकला.

खिलाफत चळवळीचा उत्साह ओसरल्यावर मुस्लीम समाज काँग्रेसपासून (स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीपासून) दूर गेला व त्याने मुस्लीम लीगसारखी संघटना बळकट करण्यास सुरुवात केली. मुस्लीम लीगचे ध्येय अत्यंत मर्यादित, संकुचित होते. 'काँग्रेस लढा देत असता ज्या काही सवलती मिळतील, त्यात आपला वाटा मागायचा.' थोडक्यात आयत्या पिठावर रेघोट्या ओढायच्या, हाच लीगचा उद्देश होता.

ब्रिटिशांच्या 'फोडा आणि झोडा' या धोरणाचा हा विजय होता. हिंदू आणि मुस्लीम एकत्र येऊन स्वातंत्र्याची मागणी करत असल्याचे चित्र त्यांना नकोच होते. त्यांच्या या कुटिल धोरणाला मुस्लीम लीग बळी पडली. त्यामुळे लीगच्या झेंड्याखाली एकवटलेले मुसलमान स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी होऊच शकले नाहीत. दुसरीकडे स्वातंत्र्याचा लढा तीव्र झाला. भारत स्वतंत्र होण्याची चिन्हे दिसू लागताच मुस्लीम लीगने आपला मोठा वाटा, म्हणजे वेगळे राष्ट्रच मागायचे ठरविले. १९४०च्या सुमारास मुस्लीम लीगने बॅ. जिनांच्या नेतृत्वाखाली वेगळ्या राष्ट्राची, पाकिस्तानची मागणी केली. तेच त्यांचे ध्येय ठरले.

या मागणीमागचा त्यांचा हेका एका क्षणी इतक्या पराकोटीला पोहोचला की, 'एक वेळ ब्रिटिश या देशातून गेले नाहीत तरी चालतील, स्वातंत्र्य मिळाले नाही तरी चालेल; पण जर ते मिळणारच असेल, तर मग मात्र आम्हाला हिंदुस्थानात राहावयाचे नाही. आम्ही विभक्त होणारच. आम्हाला आमचे वेगळे मुस्लीम राष्ट्र हवे' असे मुस्लीम लीगचे नेते म्हणू लागले.

याउलट, काही सनातनी, कडवे मुसलमान मात्र याच्या विरुद्ध होते. त्यांना या देशाचे विभाजन नको होते, फाळणी नको होती. त्यांचा फाळणीविरोध वेगळ्या कारणांसाठी होता. त्यांचे म्हणणे होते की, 'फाळणी स्वीकारून त्या एका लहानशा पाकिस्तानच्या तुकड्यावर आम्ही काय म्हणून समाधान मानावे? हा सर्व देश आमचाच, म्हणजे मुसलमानांचा आहे. नुसते पाकिस्तान मिळवून उरलेल्या भारतावरील ताबा आम्ही काय म्हणून सोडावा? ते शक्य नाही. सर्व भारत हा परत मुसलमानी अमलाखाली आला पाहिजे.' हे त्यांचे स्वप्न होते व म्हणून त्यांचा फाळणीला विरोध होता. देवबंदचे उलेमा त्या बाबतीत आघाडीवर होते.

या दोन्हींपेक्षा पूर्णपणे वेगळे विचार असणारेही काही मुसलमान होते. उदा. मौलाना आझाद. त्यांना फाळणीही नको होती व धर्माधिष्ठित राष्ट्रही नको होते. हिंदू आणि मुस्लीम यांनी एकत्र येऊन धर्मनिरपेक्ष समाजाच्या पायावर उभारलेले सर्वार्थाने नवे असे राष्ट्र त्यांना हवे होते, पण मौ. आझादांना अनुयायीच नव्हते. मुस्लीम समाज त्यांना नेता समजत नव्हता. मुस्लिमांचे नेते होते, बॅ. जीना आणि मुस्लिमांचे आशास्थान होते मुस्लीम लीग. मुस्लीम लीगच्या नेतृत्वाखाली वेगळ्या राष्ट्राची, पाकिस्तानची मागणी चांगलीच फोफावली. 'मुस्लीम लीग' हीच मुस्लिमांची एकमेव

प्रबळ संघटना बनली व 'वाटेल ते करून पाकिस्तान मिळवायचेच' असा लीगने चंग बांधला.

जसाजसा देशाच्या स्वातंत्र्याचा क्षण जवळ येऊ लागला, तसातसा लीगच्या चळवळीचाही जोर चढला. लीगने देशातील मुसलमानांना प्रत्यक्ष कृतीचा आदेश दिला. प्रत्यक्ष कृती म्हणजे दंगली, हिंदूंच्या कत्तली! या आदेशाचे लीगच्या अनुयायांनी निष्ठेने पालन केले. कोलकाता, नौखाली या ठिकाणी भयानक रक्तपात झाला. त्याचा वचपा म्हणून बिहारमध्ये हिंदूंनी मुस्लिमांच्या कत्तली केल्या. यामुळे 'देश यादवी युद्धाच्या खाईत ढकलला जातो की काय' अशी परिस्थिती निर्माण झाली. शेवटी फाळणी अपरिहार्य ठरली. म. गांधी सोडून काँग्रेसच्या नेत्यांनी फाळणीला, वेगळ्या मुस्लीम राष्ट्राला मान्यता दिली.

गेली अनेक वर्षे एकत्र राहणाऱ्या देशवासी भारतीय मुसलमानांपैकी जवळजवळ ९५% पूर्वीपासून या देशातील रहिवासी होते; बाहेरून आलेल्या मुसलमानांची संख्या जेमतेम पाच टक्के भरत होती. फाळणीमुळे ते धर्माच्या नावाखाली एका रात्रीत वेगळे झाले... लाखो लोक निर्वासित झाले... लाखोंच्या कत्तली झाल्या... स्त्रियांवर अत्याचार झाले... अनेक वर्षांपासून जोपासलेली मानवी मूल्ये पायदळी तुडवली गेली... म. गांधींना आपले प्राण गमवावे लागले. भारतमातेच्या या सुपुत्रांनी (हिंदू-मुस्लीम जमातींनी) आपल्या मातेला रक्ताने न्हाऊ घातले. रक्ताने माखलेल्या हातांनी मुस्लीम लीगने पाकिस्तान मिळविले. हिंदू-मुस्लीम लढ्याच्या कटकटी नकोत म्हणून भारतीय नेत्यांनी पाकिस्तानला मान्यता दिली. लक्षावधी भारतीयांना वाटले, 'आता तरी हा हिंदू-मुस्लीम प्रश्न संपला'; पण ते होणे नव्हते. 'फाळणीने हिंदू-मुस्लीम प्रश्न संपणार' हे एक स्वप्नच ठरले.

आजच्या परिस्थितीत वरील ऊहापोहांचा विचार करता लक्षात येते की, भारतातील हिंदू-मुस्लीम प्रश्न हा ऐतिहासिक मुद्दा आहे. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान महत्त्वाचे आहे. हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदुत्ववादी संघटना स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला आक्रमक झालेल्या दिसतात. मुस्लीम समाजावर मौलाना आझाद आदी नेतृत्वापेक्षा बॅ. जिनांचा प्रभाव अधिक प्रमाणात होता. असे असतानाही पाकिस्तानच्या निर्मितीनंतर भारतात राहणाऱ्या मुस्लिमांची संख्या लक्षात घेण्याइतकी मोठी होती. स्वातंत्र्योत्तर काळात धर्मनिरपेक्ष एकात्म समाजनिर्मितीसाठी जमातवाद बाजूला ठेवून राष्ट्र घडवण्याच्या प्रक्रियेत आवश्यक प्रयत्न पुरेशा प्रमाणात झाल्याचे दिसत नाही. विषाची बिजे नष्ट झाली नाहीत, म्हणून आजतागायत हा प्रश्न राष्ट्राच्या एकात्मतेमधील मोठा अडथळा ठरला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात व सध्याही हिंदू-मुस्लीम जमातवाद आपापल्या परीने जिवंत ठेवण्याचा प्रयत्न होताना दिसतो. परिणामी, धार्मिक ध्रुवीकरणास हातभार लागत आहे. यातून मुस्लीम समाजाची असुरक्षितता वाढताना दिसते; पण आजही सर्वसमावेशक सेक्युलर नेतृत्व मुस्लीम समाजात निर्माण होताना दिसत नाही. या दृष्टीने अधिकाधिक प्रयत्न करण्यास प्राधान्य दिले पाहिजे.

फाळणीनंतरची काही दशकं हिंदू-मुस्लीम प्रश्नाच्या दृष्टीने फारच तणावाची होती. भारतातील मुस्लिमांना पाकिस्तानबद्दल आकर्षण होते. यामुळे क्रिकेटच्या सामन्यानंतर फटाके उडविण्यासारखे प्रकार होत. आताच्या भारतीय मुस्लिमांमध्ये तसा प्रकार नाही. पाकिस्तान मात्र कुरापती काढत असतोच व हिंदुत्ववादी भारतीय मुसलमानांना पुनःपुन्हा पाकिस्तानची वाट दाखवतात. हे चित्र

बदलले पाहिजे.

भारत स्वतंत्र राष्ट्र झाल्यावर बनवलेल्या राज्यघटनेमुळे भारत हे एक प्रजासत्ताक राष्ट्र बनले. घटनेनुसार, या देशातील सर्व नागरिकांना समान हक्क मिळाले. समान नागरिकत्व, तसेच धर्मनिरपेक्षता हा घटनेचा गाभा ठरला. त्यामुळे हिंदूंच्या इतकेच राजकीय अधिकार मुसलमानांना मिळाले. मुसलमानांसाठी वेगळा देश देऊन टाकल्यावरसुद्धा हे अधिकार मिळणे, ही गोष्ट येथे विशेषत्वाने लक्षात घ्यायला हवी. फाळणीची मागणी करणारे सर्वच मुसलमान देशाची फाळणी झाल्यावर पाकिस्तानात गेले नाहीत. त्यामुळे मागे उरलेल्यांना कोठल्यातरी राजकीय पक्षात शिरणे भाग होते. काँग्रेस सत्तेवर होता म्हणून सुरुवातीला ते बहुसंख्येने काँग्रेसमध्ये गेले. जे मनाने थोडेसे डावे होते, ते इतर पक्षांतही घुसले; पण ते ज्या ज्या पक्षांत गेले, तेथे तेथे त्यांनी आपला मुसलमानीपणा जपला; सत्तेच्या राजकारणापुरतेच तेथे ते समरस होत राहिले.

राजकीय पक्षही आपल्या पक्षीय राजकारणातच दंग होते. हैदराबाद व जुनागडचे विलीनीकरण होऊन चुकले होते; नाही म्हणायला काश्मीरची डोकेदुखी थोड्याफार प्रमाणात त्रास देत होती.

१९५२ साली देशात पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली आणि काँग्रेस पक्ष सत्तेवर आला आणि नेमक्या याच वेळी देशातील मुस्लीम नेतृत्वाला 'अजूनही आपल्या एकगठ्ठा मतांची किंमत काय आहे' याचा साक्षात्कार झाला. मग तेथून पुढे मुस्लिमांचे वेगळेच राजकारण सुरू झाले. स्वातंत्र्यपूर्व सौदेबाजीच्या राजकारणाला ऊर्जितावस्था प्राप्त झाली. 'निवडून येण्यासाठी मतांची आवश्यकता असते व अशी एकगठ्ठा मते मुसलमानांजवळ आहेत' हे काँग्रेसच्या, तसेच इतर विरोधी पक्षांच्या लक्षात आल्यावर त्यांनी मुसलमानांच्या सौदेबाजीच्या राजकारणाला खतपाणी घालून ते रोपटे चांगलेच पोसले. अर्थात, त्याचा सर्वांत जास्त उपयोग काँग्रेस पक्षाने करून घेतला. त्यामुळे जवळजवळ सर्वच राजकीय पक्षांनी मुस्लीम अनुनय सुरू केला. 'मुसलमानांना दुखवायचे नाही' यावर सर्व पक्षांचे एकमत होते.

एक उद्योगप्रधान, स्वयंपूर्ण, तसाच लोकशाहीवर व समतेवर आधारलेला समाज भारतात उभा करण्यासाठी भारतीय नेतृत्व धडपडत होते. त्यासाठी नवीन नवीन सुधारणा असणारे कायदे बनविले जात होते. लोकशाहीवादी नवीन समाजरचनाच उभारायची होती. त्यासाठी कालबाह्य, जुनाट रूढी, परंपरा न मानणारा, जातिधर्मनिरपेक्ष असा समाज उभा करायचा होता. हे सर्व घडवून आणायचे, तर स्त्रियांना दूर ठेवणे योग्य ठरले नसते. म्हणून जवाहरलाल नेहरूंनी हिंदू सनातन्यांच्या विरोधाला न जुमानता किमान हिंदू स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क देणारे 'हिंदू कोड बिल' १९५५-५६ साली पास केले; पण मुसलमान स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या कायद्याला ते हातही लावू शकले नाहीत. मात्र 'भविष्यात, मुस्लीम जनमत अनुकूल झाल्यावर हिंदू-मुसलमानांना लागू होणारा समान नागरी कायदा बनविण्याचा आपण प्रयत्न करू' असे त्यांनी या वेळी स्पष्ट केले होते. याचा अर्थ एवढाच होता की, मुस्लीम दुखावले न जाण्याची दक्षता प्रत्येक पक्ष घेत होता.

मुस्लीम नेतृत्वाला आपल्या मतांच्या सामर्थ्याची जाणीव होताच, त्याने मुसलमानांना संघटित करण्यास सुरुवात केली. हे सर्व त्यांनी धर्माच्या नावाखाली केले! यात सिंहाचा वाटा उचलला, जमात-ए-इस्लामीने. त्यांचे प्रेरणास्थान मौ. मौदुदी होते. नंतर ते पाकिस्तानात गेले.

तामिरे-मिल्लतसारख्या संघटनाही जोमाने कार्यास लागल्या. लीगचेही पुनरुज्जीवन करण्यात

आले व तिने बाळसे धरले. दक्षिणेत केरळमध्ये इतरही अनेक मुस्लीम संघटना आपले कार्य करू लागल्या. तबलीगची चळवळही देशभर पसरली. पण या चळवळी वेगवेगळ्या दिसत असल्या तरी सर्वांचा उद्देश मात्र एकच होता. तो म्हणजे, मुसलमानांचे वेगळेपण कायम राखणे आणि त्यांना राष्ट्रीय प्रवाहापासून वेगळे पाडणे. हे करण्यासाठी त्या वेगवेगळ्या युक्त्या अमलात आणीत. इतर राजकीय क्षेत्रांत विखुरलेले मुसलमानही यापेक्षा वेगळे नव्हते. सर्व जण एकाच माळेचे मणी होते. याचे उदाहरण म्हणजे, जेव्हा जेव्हा समान नागरी कायदा करण्याची मागणी करण्यात येते, तेव्हा तेव्हा ही सर्व मंडळी आपले भेदभाव विसरून एकत्र येतात व विरोध करतात. हे आजतागायत चालू आहे.

दरम्यानच्या काळात, १९६५ साली पाकिस्तानशी भारताचे युद्ध झाले. त्या वेळी सर्वसामान्य मुस्लीम समाज जरी भारतीयांच्या बरोबरीने उभा राहिला, तरी मुस्लीम नेतृत्व मात्र मूग गिळून गप्प बसले होते. पाकिस्तानच्या आक्रमणाचा निषेध करणेसुद्धा जमात-ए-इस्लामीसारख्या संघटनेच्या जिवावर आले. उलट, भारतीय मुस्लिमांना भारताविरुद्ध जिहाद करण्याचा वाईट सल्ला देणारे मौ. मौदुदीचे फतवे जमात-ए-इस्लामीच्या 'दावत' या उर्दू दैनिकाने छापले होते. येथपर्यंत मुस्लीम जातीयवादाने मजल मारली. पण तरीही या जातीयवादाला धक्का लावण्याचे साहस कोठलाही राजकीय पक्ष करेना. एकगठ्ठा मते घालवायला सहजासहजी कोण तयार होणार? उलट, मुस्लिमांचा अनुनय करण्याची स्पर्धाच पक्षापक्षांत दिसत होती.

पण हे किती दिवस चालणार? शेवटी याची प्रतिक्रिया कोठेतरी उमटणारच होती, हे सांगायला काही एखाद्या ज्योतिषाची गरज नव्हती. त्याची प्रतिक्रिया हिंदू जातीयवादी पक्ष बलवान होण्यात झाली. हिंदूंच्या मनात असंतोष खदखदू लागला... एकूण मुस्लीम जमातीविषयी द्वेष बळावला... क्षुल्लक कारणावरून हिंदू-मुस्लीम दंगे होऊ लागले. वास्तविक दंग्यांची दर्शनी कारणे निराळीच होती. म्हणजे गोहत्या, मशिदीवरून वाद्ये वाजवणे, लहान मुलांच्या भांडणाचे पर्यवसान जातीय दंगलीत होऊन रक्त सांडले जाणे ही फक्त दिखाऊ कारणे होती. खरे कारण होते, दोन्ही जमातींना एकमेकांविषयी वाटणारा पराकोटीचा द्वेष आणि कमालीचा अविश्वास! मात्र दोन्हीकडची जातीयवादी पुढारी मंडळी या मनभेदाला खतपाणीच घालीत होती. त्यामुळे त्यांचे पक्ष चांगलेच बाळसे धरू लागले होते.

एक प्रश्न नेहमी विचारला जातो. तो म्हणजे, 'हिंदू जातीयवाद आणि मुस्लीम जातीयवाद यांपैकी अगोदर कोठला?' या प्रश्नाचे उत्तर देणे म्हणजे 'कोंबडी आधी की अंडे आधी' या प्रश्नाचे उत्तर देण्यासारखे आहे. हे दोन्हीही जातीयवादी लोक देशाला रसातळाला नेण्याचे कार्य मात्र एकदिलाने करताहेत, यावर दुमत होणार नाही. मुस्लीम सत्यशोधक मंडळाला तरी निदान स्वातंत्र्योत्तर काळात हिंदू जातीयवाद हा मुस्लीम जातीयवादाचीच प्रतिक्रिया आहे, असे वाटते.

१९६५नंतर देशात जातीय दंगलींनी एवढे भयानक रूप धारण केले की, संपूर्ण देशात हिंदू-मुस्लीम दंगा झाला नाही, असा एकही दिवस जाईनासा झाला... रांची, अहमदाबाद, भिवंडी, मालेगाव येथील दंगलींनी कहरच केला. त्यांची मीमांसा मात्र जो-तो आपापल्या परीने करीत होता. दंगलीचे खापर हिंदूंच्याच माथ्यावर फोडण्याचे कार्य करणाऱ्यांमध्ये सेक्युलर म्हणवणारेसुद्धा होते आणि राज्यकर्त्यांनीही हिंदूंनाच शांत राहण्याचा, त्यांनाच दोष देण्याचा उद्योग चालविला होता.

दंगली थांबविण्याचे उपायही वरवरची मलमपट्टी करण्यासारखे होते... कोठे शांतता-समित्या स्थापन करा, कोठे हिंदू-मुस्लीम मेळावे घ्या, कोठे मुसलमानांना राख्या बांधा, कोठे हिंदूंना शीरखुरमा खायला घाला... यामुळे तात्पुरता परिणाम झाला; नाही असे नाही, पण यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कोणीच सांगेना.

दरम्यानच्या काळात, १९६४ साली मजलिशे मुशावरत स्थापन करण्यात आली. हिंदू-मुस्लीम सामंजस्य वाढविणे, या सकारात्मक उद्देशाने ही संघटना स्थापण करण्यात आली. काही उदारमतवादी हिंदूंचा तिला पाठिंबाही होता; पण पुढे तिचासुद्धा कब्जा जमात-ए-इस्लामीने घेतला. किंबहुना जमात-ए-इस्लामी च्या पडद्याआडच्या प्रेरणेनेच मुशावरची स्थापना झाली होती, असे म्हणावयास जागा आहे. त्यामुळे आशेचा तोही किरण विझला. हे कालचक्र फिरत असतानाच निवडणुका होत होत्या, हिंदू-मुस्लीम दंगलीही चालूच होत्या आणि पुन्हा-पुन्हा त्याच चाकोरीबद्ध पद्धतीने हिंदूंना दोष देण्याचे व मुसलमानांना न दुखविण्याचे -थोडक्यात मुस्लीम अनुनयाचे - कार्य काही राजकीय पक्ष चालवीत होते. मुस्लीम लीगने तर बाजीच मारली; तिने केरळपध्ये मल्लापुरमही (मोपलास्तान) मिळविले.

जातीय दंगलींनी राष्ट्रीय एकात्मतेचा विचका केला. त्यामुळे भारताच्या निधर्मी लोकशाहीचे जगभर धिंडवडे निघाले. देशाचे, त्यातील लोकशाहीचे भवितव्य धोक्यात येते की काय, धर्माच्या नावाखाली देशाची फाळणी करण्याची वेळ नजीकच्या काळात परत येते की काय, या शंकेने देशातील विचारवंत हतबुद्ध होऊन बसले. नेमक्या याच वेळी मुस्लीम जातीयवादी राजकारणाची कारणमीमांसा करणारा एक मुस्लीम तरुण बाहेर पडला. त्याने मुस्लीम जातीयवादावर चौफेर हल्ला चढविला. आक्रमक मुस्लीम जातीयवादावर घणाघाती प्रहार सुरू केले. एवढेच नव्हे, तर आक्रमक मुस्लीम जातीयवाद हा इस्लामच्या परंपरेचेच दृश्य स्वरूप असल्याचे त्याने इतिहासाच्या आधाराने उघड करून सांगण्यास सुरुवात केली. 'हा मुस्लीम जातीयवाद संपवायचा असेल, तर कोठलेही थातुरमातुर बाह्य उपचार करून चालणार नाहीत. इस्लामी परंपरेची व धर्माचीच चिकित्सा केली पाहिजे व त्या चिकित्सेनंतर धर्माकडे बघण्याचा आपला पारंपरिक दृष्टीकोन बदलला पाहिजे. थोडक्यात, धर्मातील टाकाऊ भाग बदलला पाहिजे.' तसाच आणखीही एक धक्कादायक सिद्धान्त त्याने मांडला. तो म्हणजे, 'आता दिसत असलेल्या मुस्लीम जातीयवादाला हिंदूच कारणीभूत आहेत. त्यांनीच मतांच्या राजकारणापायी मुस्लिमांचा जातीयवाद अप्रत्यक्षपणे पोसला आहे. त्याकरिता या देशातील राजकीय पक्षांनी मुस्लीम अनुनय करण्याचे सोडून द्यावे.'

हे सर्व विशद करून सांगणाऱ्या तरुणाचे नाव होते, 'हमीद दलवाई'. त्याच्या या अनपेक्षित हल्ल्याने मुस्लीम जातीयवादी सनातनी चांगलेच गांगरले. हा हल्ला त्यांच्या जिव्हारी लागला; हिंदूसुद्धा अंतर्मुख बनले; कडवे व सनातनी मुस्लीम जातीयवादी दलवाईंविरुद्ध खवळून उठले. त्यांनी दलवाईंविरुद्ध विषारी प्रचार सुरू केला. 'काफिर', 'जनसंघी', 'हिंदूंचा एजंट', 'अस्तनीतला निखारा' अशा शेलक्या विशेषणांनी दलवाईंची संभावना केली जाऊ लागली आणि 'धमक्या' ही तर नित्याचीच बाब होऊन बसली.

पण दलवाई थांबायला तयार नव्हते. त्यांना थांबून चालणारही नव्हते. कारण परिस्थिती हाताबाहेर जाण्याअगोदर इलाज करायला हवा होता. रुग्ण दगावण्याअगोदरच उपचार करायला हवे

होते. दलवाईंची खात्री झाली होती की, 'मुस्लीम समाजाला आंधळ्या धर्मश्रद्धेच्या जोखडातून मुक्त केले पाहिजे. धर्माच्या नावाखाली त्याला कोंडवाड्यात कोंडून ठेवणाऱ्यांच्या तावडीतून सोडविले पाहिजे. कारण धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद, लोकशाही या संकल्पनांचा उगमच आधुनिक काळातील असल्याने मुस्लिमांना या संकल्पनांचा स्वीकार करायचा, तर तो आंधळ्या धर्मश्रद्धेचा पगडा दूर करूनच करता येईल.' ही खूणगाठ बांधूनच दलवाई कामाला लागले होते. त्याचा अपेक्षित परिणाम झाल्याशिवाय कसा राहिला असता? सारासार विचार करणारे काही मुस्लीम तरुण दलवाईंच्या मतांचा विचार करू लागले. ते दलवाईंच्या बोलण्यातील खरेपणा पडताळून पाहू लागले. मुस्लीम जातीयवादाचा अभ्यास करताच दलवाईंच्या विचारांतील सत्यता त्यांच्या लक्षात आली.

राजकीय पक्षांकडून होणारा मुस्लीम अनुनय भारतीय समाजाने १९८५-८६मध्ये शहाबानो प्रकरणाच्या निमित्ताने अनुभवला. जमाते-इस्लामी, मुस्लीम पर्सनल लॉ व इतर जमातवादी संघटनांनी लाखोंच्या संख्येने सर्वोच्च न्यायालयाचा पोटगी संदर्भातील निर्णय मागे घेण्यास भाग पाडले. यातूनच १९८६चा नवा कायदा अस्तित्वात आणला. या काळात मुस्लीम सत्यशोधक मंडळाने भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, कायदामंत्री व लोकप्रतिनिधी यांना भेटून मुस्लीम महिलांच्या पोटगी-समर्थनात मागणी केली. महाराष्ट्रभर तलाक मुक्ती मोर्चा काढला; पण तरीही पुन्हा मुस्लीम अनुनयाचा प्रत्यय आला. बाबरी मशिदीचा पाडाव व नंतरचे क्रिया-प्रतिक्रियांचे राजकारण समाजाने अनुभवले.

'सुधारणेस प्रतिकार' या मुस्लीम जमातवाद्यांच्या भूमिकेमुळे हिंदुत्ववाद अधिक आक्रमक झाल्याचे आपल्या लक्षात येते. २००२मधील गुजरात हत्याकांड आणि नंतरच्या दंगली या मुस्लीम अनुनयाच्या पुढच्या होत्या. सरकारनेसुद्धा न्या. सच्चर समिती, न्या. रंगनाथ मिश्रा आयोगाची स्थापना केली. मात्र त्यांच्या शिफारशी गुंडाळण्यात आल्या. हिंदुत्ववादी शक्ती जशा वाढल्या, तशी ओवेसींची एम. आय. एम. ही मुस्लीम संघटना समाजात मूळ धरू लागली. विविध राज्यांत गोहत्या प्रतिबंधक कायदा लागू झाला. त्यातून अनेक अनुचित प्रकारही घडले. आज मुस्लीम समाज मुस्लीम जमातवादाचा जसा बळी ठरत आहे, तसाच हिंदुत्ववादी शक्तींमुळे असुरक्षितता आणि विषमताही अनुभवत आहे. आता धर्मनिरपेक्ष एकात्म समाज निर्माणाचे आव्हान अधिक गंभीर स्वरूप धारण करीत आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळामार्फत सेक्युलर, विज्ञानवादी तरुण घडवला जात आहे. या तरुणांच्या सहभागातून मंडळाचे कार्य अधिक गतिमान होईल, असा विश्वास वाटतो.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना करताना एक उद्दिष्ट समोर होते. ते म्हणजे, हिंदू समाजात अंधश्रद्धा, महिलांचे प्रश्न, जमातवाद यांविरुद्ध लढा देणाऱ्या परिवर्तनवादी व्यक्ती व संघटना आहेत; समाज प्रबोधनाच्या चळवळीचा एक इतिहास आहे. मुस्लीम समाजात मात्र अशा व्यक्ती आणि संघटना तुलनेने कमी आहेत. यासाठी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' मुस्लीम समाज सुधारण्यासाठी आवश्यक असणारा संघर्ष व आत्मटीका करीत राहील; रचनात्मक कार्य व विविध उपक्रमांतून समाजकल्याणाचे कार्य करीत राहील.

१९६५ साली पुण्यात हिंदू-मुस्लीम दंगल झाली. भारतात इतरत्रही दंगली चालूच होत्या. हे सर्व

टाळण्यासाठी, याला कोठेतरी आवर घालण्यासाठी पुरोगामी मुसलमानांची संघटना आवश्यक होती. सुरुवातीला आवर घालणारे दलवाई एकटेच होते. काही काळानंतर त्यांच्या पाठीमागे पुण्यातील पुरोगामी विचारसरणीचे काही मुस्लीम तरुण उभे राहिले. हे मुस्लीम तरुण व हमीद दलवाई यांना एकत्र आणण्याचे काम प्रामुख्याने समाजवादी नेते भाई वैद्य व डॉ. बाबा आढाव यांनी केले. त्यातूनच २२ मार्च १९७० रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा जन्म झाला. पुढे त्याचे संगोपन करण्याच्या कामी प्रा. अ. भि. शहा, यदुनाथ थत्ते अशा कार्यकर्त्यांनी मोलाची कामगिरी बजावली.

मंडळाच्या स्थापनेचा उद्देश होता, मुस्लीम समाजामध्ये प्रबोधन घडवून आणणे. म्हणजे त्यांना उदारमतवादी राष्ट्रवादी बनविणे, त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टी निर्माण करणे, धर्माकडे बघण्याच्या त्यांच्या दृष्टीकोनात बदल घडवून आणणे. मंडळाच्या नावात 'सत्यशोधक' हा शब्ददेखील विशिष्ट हेतू मनात ठेवूनच वापरला होता. म. जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून हिंदू धर्मातील जुनाट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला होता. म. फुलेंचाच आदर्श समोर ठेवून सामाजिक सुधारणेचे कार्य मुसलमान समाजात करावयाचे असल्याने संस्थेचे नाव 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' असे ठेवण्यात आले. हिंदू समाजात धर्माची चिकित्सा करणारे; रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांच्यावर टीका करणारे राजा राममोहन राय, फुले, आगरकर यांच्यासारखे अनेक सुधारक होऊन गेले. त्यांचीच परंपरा पुढे चालविणारे अनेक हिंदू अजूनही ते कार्य करताहेत; पण मुस्लीम समाजात असे कार्य करणारे फार थोडे असल्याने प्रबोधनाची चळवळ मुसलमानांमध्ये सुरू करण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकणे हाही मंडळाच्या स्थापनेमागचा दुसरा महत्त्वाचा उद्देश होता.

लोक जोडले गेले, तसा हमीद दलवाईंचा उत्साह वाढला. पुण्याप्रमाणे दलवाईंच्या नवविचारांनी भारलेले मुस्लीम तरुण महाराष्ट्रात ठिकठिकाणी विखुरलेले होते. त्यांनी एकत्र येऊन दलवाईंना पाठिंबा दिला. अमरावती, कोल्हापूर, मुंबई, चिपळूण, सोलापूर अशा ठिकाणी मंडळाच्या शाखा निघाल्या. ठिकठिकाणी परिषदा, शिबिरे, परिसंवाद भरविण्यात येऊन प्रबोधनाचे कार्य झपाट्याने सुरू झाले. मुस्लीम जातीयवादाचे विश्लेषण करणारी एक परिषद डिसेंबर १९७१मध्ये दिल्ली येथे अखिल भारतीय पातळीवर घेण्यात आली. स्त्रियांच्या दुःखांना वाचा फोडणारी 'मुस्लीम स्त्रियांची परिषद' त्यानंतर थोड्याच दिवसांत पुण्यात घेण्यात आली. या परिषदेत जवळजवळ १७५ मुस्लीम स्त्रिया एकत्र आल्या व त्यांनी आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी समान नागरी कायद्याची मागणी केली. त्यानंतर कोल्हापूर येथे डिसेंबर १९७३मध्ये एक शिक्षण परिषद भरविण्यात येऊन मुसलमानांनी शालेय शिक्षण उर्दूमधून घेण्याऐवजी आपल्या प्रादेशिक भाषेतून घ्यावे, असे आवाहन मुस्लीम समाजाला करण्यात आले.

याचा विपरीत परिणाम मुस्लीम सनातन्यांवर व जातीयवादी राजकारण्यांवर झाला. 'मुस्लीम सत्यशोधक हिंदूंचे एजंट आहेत. ते इस्लाम धर्म नष्ट करू इच्छितात. त्यांचे ऐकू नका' असे म्हणत त्यांनी मुस्लीम समाजाला भडकवण्याचा प्रयत्न केला. एवढेच म्हणून ते थांबले नाहीत, तर त्यांनी पुणे येथे दलवाईंवर व त्यांच्या साथीदारांवर हल्ला चढवून मारहाण करण्यापर्यंत मजल मारली व आपल्या हिंसक वृत्तीचे दर्शन घडविले. ही जून १९७०मधील घटना होय; पण या घटनेमुळे मुस्लीम

सत्यशोधकांना आपल्या कामाची आवश्यकता पुन्हा एकदा जाणवली व ते दलवाईंसह दुप्पट जोमाने कामास लागले. मुस्लीम जातीयवादाचे स्वरूप उघड करीत हमीद दलवाई भारतभर फिरतच होते; पण नेहमी चांगल्या कामाला आडवा येणारा 'पण' येथेही आडवा आला.

हमीद दलवाई किडनीच्या विकाराने आजारी पडले. काही काळ काम थंडावल्यासारखे वाटले. सनातनी मंडळींना दम खायला उसंत मिळाली असे वाटले; पण मुस्लीम सत्यशोधकांनी आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने तलाकचा बळी ठरलेल्या स्त्रियांची तलाकपीडित महिला परिषद घेऊन शरीयतच्या कालबाह्य कायद्याविरुद्ध आवाज उठविला व तलाकपीडित महिलांची एक नवीन चळवळ सुरू केली. ही चळवळ अद्याप सुरूच आहे व शरीयतचा स्त्रियांवर अन्याय करणारा कायदा बदलून घेईतो ती तशीच चालणार आहे. ३ मे १९७७ रोजी हमीद दलवाईंना काळाने ओढून नेले. आता मार्गदर्शन करणारे प्रमुख नेतृत्व कोणी नव्हते. मुस्लीम सत्यशोधक आणि या कामाबद्दल आस्था दाखविणारे लोक शोकमग्न असतानाच ठिकठिकाणाहून बातम्या येऊ लागल्या की, 'दलवाईंच्या निधनाबद्दल मुस्लीम सनातन्यांनी पेढे वाटले.' ठिकठिकाणच्या नगरपरिषदा, नगरपालिका यांमधून शोकप्रस्तावाला विरोध करून मुस्लीम जातीयवादी नगरसेवकांनी आपल्या कोत्या वृत्तीचे दर्शन घडविले. एवढेच नव्हे, तर 'आता इस्लामचा शत्रू गेला. त्याचे मूठभर साथीदार काय करणार! 'मुर्गी मरी, बच्चे दानादान' अशी अवस्था होईल... मंडळ संपले' असा अपप्रचार सुरू झाला. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कामाकडे सहानुभूतीने पाहणारी मंडळीसुद्धा 'दलवाईंच्या निधनानंतर मंडळाचे काम चालेल की नाही?' या विषयी साशंक बनली; पण दलवाईंचा विचार ही एक शक्ती होती. तो विचार कधीच नष्ट होणार नव्हता. ती काळाची गरज होती. त्या गरजेपोटीच काळाने दलवाई नावाचा अवलिया घडवला होता. ज्या काळाने दलवाईंना ओढून नेले, त्याच काळाने दलवाईंच्या विचारांचा प्रसार करणारे, त्यासाठी अविरत श्रम करणारे, त्या विचाराने झपाटलेले कार्यकर्ते निर्माण केले आहेत, हेसुद्धा काही विचारवंतांच्या लक्षात येऊन चुकले होते.

या सर्व परिस्थितीचे भान आल्याबरोबर महाराष्ट्रातील मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्यांचा पुण्यात एक मेळावा घेण्यात आला. 'हमीद दलवाई आम्हाला सोडून गेले असले, तरी त्यांनी पेटविलेली ही ध्येयवादाची ज्योत आम्ही तेवत ठेवणार आहोत; काय वाटेल ते झाले, कितीही त्याग करावा लागला, तरी आम्ही मुस्लीम प्रबोधनाचे कार्य पुढे चालविणारच आहोत' असा निर्णय या मेळाव्यात सर्वानुमते घेण्यात आला. 'मुस्लिमांमध्ये योग्य तो बदल घडवून आणण्यास, धर्माच्या नावाखाली असणारे त्यांच्यातील अज्ञान घालविण्यास, त्यांना सनातनी व जातीयवादी राजकारणाच्या तावडीतून सोडविण्यास सर्व मुस्लीम सत्यशोधक कटिबद्ध आहेत व हे सर्व करण्यासाठी झटणे म्हणजेच दलवाईंना खरी श्रद्धांजली वाहण्यासारखे आहे; तेच त्यांचे खरे स्मारक ठरेल' अशी प्रतिज्ञा करून सर्व सत्यशोधक कामास लागले. परत एकदा त्यांनी सनातन्यांना व जातीयवादी मुस्लीम राजकारण्यांना धक्के देण्यास सुरुवात केली.

अशा विचारांनी भारावलेले, विशुद्ध विज्ञानवादी दृष्टीकोन डोळ्यांसमोर ठेवून, परिवर्तनशील असा मुस्लीम समाज घडविण्याचा ध्यास घेतलेले उदारमतवादी, राष्ट्रवादी व लोकशाही विचारांचे कंकण हाती बांधलेले मुस्लीम तरुण व तरुणी म्हणजेच मुस्लीम सत्यशोधक मंडळ होय.

मंडळाच्या स्थापनेपूर्वी साधारणपणे पाच वर्षे मंडळाच्या कार्याच्या पाऊलखुणा लक्षात येत होत्या. १८ एप्रिल १९६६ रोजी दलवाईंनी सात मुस्लीम महिलांचा मोर्चा काढून 'मुस्लीम महिला दास्यमुक्ती'चा नारा दिला. या अनुषंगाने विचारवारे वाहत असताना 'सदा-ए-निसवाँ' ही महिला संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या अनुषंगाने ठिकठिकाणी व्याख्याने, संवाद, लेख प्रसिद्ध झाले. १९६८ साली 'इंडियन सेक्युलर सोसायटी'ची स्थापना झाली. कार्यकर्ते जमवण्यासाठी समविचारी सेवादलाच्या नेत्यांशी चर्चा, विचारविनिमय सुरू झाले. काही कार्यकर्ते यात उत्साहाने सामील झाले. त्यांच्या बैठका झाल्या. मुस्लीम समाजातील नेते, कार्यकर्ते आणि मान्यवरांशी संवाद साधला गेला आणि २२ मार्च १९७० रोजी मंडळाची स्थापना झाली. जेमतेम पाच वर्षांच्या कालावधीत मंडळातर्फे भरघोस कार्यक्रम घेण्यात आले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेनंतर प्राधान्याचा विषय म्हणून मुस्लीम महिलांच्या समस्या सोडवण्याच्या कार्याला अग्रक्रम देण्यात आला. या दृष्टीने मुस्लीम महिलांची परिषद पुण्यात भरविण्यात आली. 'मुस्लीम महिलांच्या परिषदेचे आयोजन' हीच अनेकांसाठी अचंबित करणारी घटना होती. मात्र ही परिषद आणि हमीद दलवाईंनी काढलेला १९६६मधील मुस्लीम महिलांचा मोर्चा ही मुस्लीम सुधारणेची नांदी म्हटली पाहिजे. जवळपास सर्व धर्मातील स्त्रियांना पुरुषप्रधान मानसिकतेमुळे दुय्यम स्थान मिळते आणि सर्वच महिलांच्या समस्या जवळपास सारख्या असतात. मात्र मुस्लीम स्त्री इतर धर्मीय स्त्रियांपेक्षा वेगळी आहे. 'मुस्लीम' म्हणून तिच्या काही अधिकच्या समस्या आहेत.

तिचे दैनंदिन जीवन इस्लाम धर्माच्या चौकटीत बांधले गेलेले असल्यामुळे तिचा बाहेरच्या जगाशी फारसा संबंधच येत नाही. बुरख्याबाहेरचे जग आकर्षक असले, मोकळे असले, हवेसे वाटणारे असले तरी तिला धर्मपंडितांनी बुरख्याबाहेर पडू दिलेले नाही. त्यामुळे रात्रंदिवस बुरख्यात बांधलेली स्त्री परिषदेच्या निमित्ताने संघटित होऊन आपल्या अडचणी उच्चारवाने सांगण्यासाठी व्यासपीठावर आली. वास्तविक, ही एक ऐतिहासिक आणि आनंदाची घटना होती.

एखाद्या आजन्म बंदिस्त पोपटाला कुणीतरी पिंजऱ्याबाहेर मोकळे सोडल्यानंतर आणि त्याने उंच आकाशात भरारी घेतल्यानंतर त्याला जो आनंद होत असेल, तो सांगण्यासाठी शब्द अपुरे ठरतात. जन्मठेपेच्या कैद्याला शिक्षेपायी प्रदीर्घ कारावास भोगून मुक्त झाल्यावर त्याला जो आनंद होतो, अगदी तसाच आनंद प्रदीर्घ काळानंतर स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर मुस्लीम स्त्रीला होणार होता.

यातून मुस्लीम स्त्री संघटित होऊ पाहत होती. तिच्या ह्या धाडसाचे कौतुक करावे तेवढे थोडे होते. मुल्लामौलवींनी आणि त्यांच्या हस्तकांनी ह्या स्त्रीला प्रगतीची सर्व दारे बंद केली होती. धर्माच्या नावावर मुस्लीम स्त्री मुल्ला-मौलवींनी गुलाम करून टाकली होती. दास्याच्या ह्या लोखंडी शृंखला तोडून आणि प्रगतीच्या आड येणाऱ्या पारंपरिक जीवनपद्धतीचा अव्हेर करून मुस्लीम सत्यशोधक मंडळ आयोजित मुस्लीम महिला परिषदेला हजारो मुस्लीम स्त्रिया एकत्र आल्या. या परिषदेचे आयोजनच मुळात 'मुस्लीम-स्त्री-दास्य-विमोचन' ह्यासाठी करण्यात आले होते. समता, धर्मनिरपेक्षता मानणाऱ्यांनी, पुरोगामी मुस्लीम समाजातील बुद्धिजीवींनी आणि मुस्लीमेतर उदारमतवाद्यांनी ह्या परिषदेचे स्वागत केले. ह्या निमित्ताने सर्वधर्मीय महिलांवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली होती. विशेषतः ह्या देशात हिंदू धर्मीय स्त्रिया बहुसंख्येने असल्यामुळे

त्यांच्यावरची जबाबदारी तर खूपच वाढली होती. त्यांनी पुढे येण्यासाठी म्हणून विविध समाजसुधारकांनी प्रयत्न केले आहेत. मुस्लीम महिलांच्या समस्यांचे निवारण करताना ही महत्त्वपूर्ण पार्श्वभूमी साहजिकपणे अधोरेखित होते.

पूर्वी हिंदू स्त्रीदेखील अशीच दास्यात जीवन जगणारी गुलाम होती. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री-दास्य-विमोचनाचा पाया घातला. 'धर्माच्या नावाखाली स्त्रियांवर होणारे अनंत अत्याचार बंद झाले पाहिजेत' हे त्यांनी तथाकथित पोथीनिष्ठांना बजावून सांगितले. प्रारंभी कठोर, कर्मठ आणि प्रतिगामी लोकांकडून त्यांची खूपच उपेक्षा झाली. तरीही त्यांनी हिंदू स्त्रीला जागे करण्याची मोहीम चिकाटीने चालूच ठेवली.

हिंदू महिलांना विद्याबंदी होती. 'शिक्षण हे महिलांचे क्षेत्र नाही' अशी परंपरावाद्यांची मानसिकता होती. म्हणून काही काळ त्यांना शिक्षण बंद होते. प्राचीन काळात हिंदू महिलांवर लादण्यात आलेल्या बंधनांचा सविस्तर इतिहास सुपरिचित आहे.

आजही सर्व धर्मीय पुरुष स्त्रीला केवळ उपभोग्य वस्तू समजतात. इस्लाम धर्मातही स्त्रियांना ह्यापेक्षा फारसे वेगळे वागविले गेले आहे, असे नाही.

धर्मभेद लक्षात घेता, मुस्लीम समाजाच्या काही जीवननिष्ठा व जीवनपरंपरा वेगळ्या आहेत. म्हणूनच मुस्लीम स्त्रीचे प्रश्न इतर धर्मीय स्त्रीपेक्षा, सर्वसाधारण भारतीय स्त्रीपेक्षा काहीसे निराळे आहेत. इस्लाममध्ये एक पत्नी हयात असताना पुरुषाला पुन्हा लग्न करण्याची मुभा आहे. पतीच्या निधनानंतर सासरा जिवंत असेल, तर पतीची इस्टेट पत्नीला मिळण्याची कोणतीच तरतूद इस्लामी जीवनपद्धतीत नाही.

शरीयत कायद्याच्या आधारे मुस्लीम समाजात पुरुष स्त्रीला व तिच्या मर्जीविरुद्ध केव्हाही घटस्फोट देऊ शकतो. अशा कायद्यामुळे मुस्लीम स्त्री असाहाय्य बनली. विसाव्या शतकात येऊन आजही बुरखा पद्धती कायम आहे. बुरखा पद्धतीचे हे बंदिस्त जीवन मुस्लीम स्त्रीला नकोसे झाले आहे. तरीही आज खेड्यांतून मुस्लीम स्त्री 'हा बुरखा नको' असे स्पष्टपणे सांगू शकत नाही. हिंदू कोड बिलाने हिंदू स्त्रीच्या स्वातंत्र्याची परिसीमा विस्तारली आणि 'मुस्लीम कायदा' वेगळा निर्माण करूनही मुस्लीम स्त्री होती तिथेच आहे. हिंदू स्त्रीला मिळणाऱ्या सर्वसाधारण सवलती मुस्लीम स्त्रीला मुल्ला-मौलवींच्या प्रभावामुळे लाभत नाहीत.

'अमुक एक गोष्ट धर्माने सांगितली आहे, म्हणून ती योग्य आहे. ती टाकाऊ असूच शकत नाही.' अशी शिकवण सुरुवातीपासूनच मुस्लीम समाजाने आत्मसात केली आहे. मुस्लीम समाज कोणत्याही बाबीकडे धर्माच्या चौकटीतूनच पाहत असल्यामुळे 'सुधारणा झाली पाहिजे' ही कल्पनाच मुस्लिमांच्या मनाला स्पर्श करीत नाही. 'शरीयतप्रमाणे मुस्लीम स्त्रीवर लादलेली गुलामी, बहुपत्नीत्वाची पद्धत इस्लाम व प्रेषिताचीच आहे' असेच समाजातील धुरीण पुढील पिढीवर सतत बिंबवीत राहतात. त्या काळात तसे वागणे कदाचित आवश्यकही वाटले असेल. धर्म टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी आचरणात आणलेला तो एक उपाय होता. मात्र मुस्लीम समाज त्या उपायालाच धर्म वा परंपरा समजत गेला.' 'उपाय' कायम तसाच ठेवावयास हवा काय? त्यात काही सुधारणा होणे किंवा करणे शक्यच नव्हते काय?' या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची आवश्यकता आहे.

आज शरीयतचा कायदा किती प्रमाणात अस्तित्वात आहे? त्यातला ऐंशी टक्के भाग कालबाह्य

झाला आहे. शरीयतचे आंतरराष्ट्रीय कायदे आता कुठेच मानीत नाहीत. मग आहे तो बीस टक्के भाग तरी काय म्हणून पाळायचा, तेच कळत नाही. 'धर्मरूढीविरुद्ध कायदेपालन आमच्या प्रेतावरून जाऊनच करावे लागेल' ही केवळ वल्गना करून काय उपयोग आहे? ज्या वेळी ऐंशी टक्के भाग कालबाह्य मानला गेला, तेव्हा कुठे प्रेते पडली? मग ही धमकी का आणि कुणाला? त्या बाबतीत संसदीय निर्णय करणेच योग्य आहे. मात्र या निर्णयाची टप्प्याटप्प्याने किंवा झटपट अंमलबजावणी करण्यासंदर्भात चर्चा शक्य आहे.

भारतीय संविधानाचे ४४वे कलम 'सर्व भारतीय नागरिकांना समान कायदा असावा' असे सांगत असतानाही हिंदूंसाठी वेगळे 'हिंदू कोड' तयार केले व अल्पसंख्याकांच्या नावाखाली मुस्लीम समाजाचे तुष्टीकरण करण्यासाठी म्हणून मुस्लीम व्यक्तिगत कायदा कायम ठेवला. त्यामुळे मुस्लीम महिलांच्या प्रश्नांचे निराकरण करताना होणाऱ्या प्रयत्नांवर मर्यादा पडल्या. यापुढे संसदीय निर्णय करून हा प्रश्न मार्गी लावता येणार नाही का? याबद्दलही समाजात चर्चा झाली पाहिजे. हिंदू कोड बिल संसदेत आले, त्या वेळी पं. नेहरूंनी ' 'शरीयत'मध्ये हस्तक्षेप केला जाणार नाही' असे आश्वासन दिलेले नव्हते. उलट 'कालांतराने यात सुधारणा केल्या जातील' असेच प्रतिपादन केले होते.

हिंदू कोड बिल आले, त्या वेळी त्याला हिंदूंनी विरोध केला होता. तरीही तो कायदा अस्तित्वात आला. मग मुस्लिमांच्या विरोधाला भिऊन राजकारण करणारे आपले राजकीय पुढारी स्वतःला सेक्युलरवादी कसे म्हणवतात? ही कुणाची दिशाभूल आहे?

हमीद दलवाई यांनी एका नवीन विचारमंथनाला सुरुवात केली. त्यांची भूमिका धर्मनिरपेक्षतावादी भूमिका आहे. मुस्लीम महिलांच्या हक्कांसाठी असा सांविधानिक लढा उभारणे, ही निश्चितच एक चांगली बाब असल्याचे मान्य करायला हवे. म्हणून हमीद दलवाईंच्या विचारधारेचा अंगीकार केला पाहिजे.

'हदीस' हे इस्लामच्या धर्मशास्त्राचे एक अंग आहे. त्यातून निर्माण झालेला कायदा म्हणजे 'शरीयत'. आज विविध मुस्लीम देशांतील कायदे लक्षात घेतले, तर भारतातील शरीयत कायदा बऱ्याच अंशी कालबाह्य झाला आहे. तरी त्याचा भारतीय मुस्लीम जगतावर फार मोठा ठसा उमटलेला आहे. तथाकथित शरीयतला कायदेशीर स्वरूप दिले असल्यामुळे राज्यसत्तेनेही मुस्लीम स्त्रीच्या गुलामीवर एका अर्थी शिक्कामोर्तब केले आहे. त्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही बदल न करण्यात आल्याने 'राजसत्तेनेही अखेरीस धर्मसत्तेशी हातमिळवणी केली' हे ऐतिहासिक कटु सत्य जन्माला आले. परिणामी, मुस्लीम स्त्री वेगळी पडली आणि तिच्या समस्यांचे निवारण करण्यात आव्हाने निर्माण झाली.

अंधश्रद्ध, कर्मठ धर्मपंडितांचे एक वेळ आपण मान्य करू, पण सुशिक्षित मुस्लीम पुरुषही 'आपण 'हदीस'प्रमाणे वागलेच पाहिजे' असा आग्रह धरतात, तेव्हा ते मात्र क्षम्य ठरू शकत नाही.

'भारतीय संविधान एक 'मॉहिदा' (करार) आहे' असे मौ. हुसैन अहमद अली म्हणतात व आजचा सुशिक्षित मुस्लीम प्राध्यापकही त्यांचीच री ओढतो, तेव्हा आश्चर्य वाटते. 'बांग्लादेश' ह्या विषयावर हमीद दलवाई यांनी औरंगाबादला तीन व्याख्याने दिली. त्या वेळी पहिल्या व्याख्यानाला एक मुस्लीम प्राध्यापक अध्यक्ष म्हणून आले होते. हमीद दलवाई चिकित्सक

असल्याने ते कोणाला भिऊन स्वतःची मते मांडीत नसत. 'इस्लाम' धर्म सुधारला पाहिजे' हे सांगून प्राध्यापकसाहेब आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले, 'हमीद दलवाई विषयान्तर करून वाहवत गेले.' याचा अर्थ 'हमीद दलवाई यांनी आधुनिक विचार मांडूच नयेत' असे सुशिक्षित मुस्लिमांचे मत होते. त्यांच्या मते हमीद दलवाई हा शुद्ध काफिर होता. मौ. अबुल कलाम आझाद यांचे कुराणावरील भाष्य मुस्लीम समाज स्वीकारू शकला नाही, हा मुस्लीम मनावर जीर्ण विचारसरणी केवढ्या प्रकर्षाने बिंबवली गेली आहे, याचा हा पुरावा आहे. 'हा कडव्या मुस्लीम जातीयवादाचा विजय आहे' हे आपण मान्य केले पाहिजे.

बहुपत्नीत्वाचा कायदा बदलला पाहिजे, घटस्फोटाच्या पद्धतीत सुधारणा झाली पाहिजे; त्याचप्रमाणे स्त्री बुरख्यातून बाहेर आली पाहिजे. तिला शिक्षणापासून वंचित न करण्यासारख्या सुधारणांची गरज आजही भासते आहे. म्हणूनच मुस्लीम सत्यशोधक मंडळ महिलांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करत असते. 'आम्हालाही कुटुंब नियोजन हवे आहे' असे आता मुस्लीम स्त्री सांगू लागली आहे. ही आनंदाची बाब मुल्लामौलवींनी स्वीकाराबी. त्यांनी ती स्वीकारली नाही, तरी काळ पुढे त्यांना ती स्वीकाराबयास भाग पाडणारच आहे, हे त्यांनी कृपया विसरू नये.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने गेल्या पन्नास वर्षांत मुस्लीम महिलांच्या विविध समस्या समाजासमोर मांडल्या. महिला संघटन, शासन दरबारी निवेदन, जनआंदोलन उभारून महिला समस्यांच्या निवारणासाठी संविधानाला अपेक्षित असणाऱ्या समान नागरी कायद्याची मागणी असे विविध उपक्रम सातत्याने राबवले. परिणामी, मुस्लीम महिलांमध्ये या प्रश्नाबाबत जागृती निर्माण झाली आणि त्या निर्भीडपणे न्यायालयीन मार्गाचा अवलंब करू लागल्या. अनेक वेळा मुस्लीम व्यक्तिगत कायदेमंडळानेही यावर चर्चा केली आहे. महिला प्रश्नांवर काम करणाऱ्या अनेक संघटना मुस्लीम समाजात अस्तित्वात आल्या. तसेच उच्च व सर्वोच्च न्यायालयाने मुस्लीम महिलांसंदर्भात सकारात्मक भूमिका घेऊन निवाडे दिले आणि शासनाला या संदर्भात कायदे करण्याविषयी वेळोवेळी शिफारसवजा सूचना केल्या. या सर्व घडामोडींतून आता मुस्लीम समाजातही या प्रश्नाकडे वेगळ्या अंगाने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.

अलीकडेच 'फोरम फॉर जेंडर इक्वालिटी अमंग मुस्लीम्स' या संस्थेने कोची येथे एका परिषदेचे आयोजन केले होते. यात मद्रास उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती के. चंद्रु, ॲनी राजा, ॲड. शकूर यांनी विचार मांडले. मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात अस्तित्वात असलेल्या मुस्लीमविरोधी तरतुदी रद्द करून, या कायद्यात सुधारणा करून, स्त्रियांना कायद्याचे संरक्षण मिळण्यासाठी तरतूद करण्यासंदर्भात परिषदेत विचार मांडण्यात आले. मुस्लीम समाजातून पुढे आलेल्या कार्यकर्त्यांनी मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. ही स्वागतार्ह बाब म्हणावी लागेल. या प्रसंगी संयुक्त राष्ट्र संघाने १९७६ मध्ये स्वातंत्र्याचा जाहीरनामा स्वीकारला. त्यात म्हटले होते, 'सर्व पुरुष समान आहेत.' त्यात महिलांचा उल्लेख नव्हता, परंतु २०० वर्षानंतर त्या वाक्याचा अर्थ 'सर्व समान आहेत' असा लावण्यात आला. आज आपण अमेरिकेकडे पाहिल्यानंतर असे दिसते की, कायदा सर्व स्त्री-पुरुषांना समान लेखतो. आपणसुद्धा अमेरिकेचा आदर्श समोर ठेवून मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करण्यासाठी तत्परता

दाखविली पाहिजे. आज भारतात विविध धर्मीयांसाठी स्वतंत्र व्यक्तिगत कायदे आहेत. परंतु इस्लाममधील कायदे वगळता इतर सर्व धर्मांमध्ये पुरुषांना असलेले जवळजवळ सर्व अधिकार स्त्रियांना आहेत. 'बहुपत्नीत्व हा नियम नाही; एकपत्नीत्व हाच नियम आहे' असे न्या. चंद्रचूड म्हणाले होते.

याच पद्धतीने गेल्या दशकात अस्तित्वात आलेल्या भारतीय मुस्लीम महिला आंदोलनानेही मुस्लीम महिला प्रश्नांवर मोठ्या प्रमाणात जनआंदोलन उभारून; तलाक, बहुपत्नीत्व आदी संदर्भात असणाऱ्या अन्याय्य तरतुदी रद्द करून व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करण्याची आग्रही मागणी केली आहे. अलीकडच्या 'फोरम फॉर जेंडर इक्वालिटी अमंग मुस्लीम्स' या संस्थेने एक ठराव मांडला आहे. 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा कराव्यात. 'लिंगभावसमता साधणारा आणि न्याय देणारा' असे या कायद्याचे स्वरूप असावे. तसेच त्यातील वारसाहक्काच्या आणि संपत्तीतील वाट्याबाबतच्या तरतुदींमध्येही सुधारणा कराव्या' अशी मागणी या संस्थेने केली आहे. 'या सुधारणा भारतीय संविधानाने दिलेल्या संविधानात्मक अधिकारावर म्हणजेच समतेच्या आणि न्यायाच्या तत्त्वावर आधारित असाव्यात, मुस्लीम समाजातील धार्मिक पंडितांनीही पुढे येऊन मुस्लीम महिलांच्या लोकशाही अधिकारांसाठी समर्थन द्यावे' असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. मुस्लीम समाजांतर्गत होणाऱ्या अशा बदलांची नांदी हे हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पहिल्या दशकात आहे.

३ मे १९७७ रोजी हमीद दलवाईंचे निधन झाले. दलवाईंच्याच खोल प्रभावातील पुढील तीन वर्षे धरली, तर १९८०पर्यंतच्या काळातील घटनांचा समावेश पहिल्या खंडात केला आहे. म्हणजे पहिल्या खंडात साधारणपणे दीड दशकांचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मंडळाच्या पहिल्या खंडाचा विचार करताना लक्षात घ्यावे लागेल की, या खंडातील विविध संदर्भ आणि तेव्हा घेतलेल्या भूमिका तत्कालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थितीला अनुरूप अशा होत्या. गेल्या पन्नास वर्षांत अनेक बदल झाले आहेत. धर्मप्रभाव आणि धर्मवादी मानसिकतेतही लक्षणीय म्हणावी अशी सकारात्मक आणि नकारात्मक स्थिती निर्माण झाली आहे. याची जाणीव ठेवूनच मंडळाच्या एकूण भूमिकांचा आणि विवेचनाचा अर्थ लावणे अपेक्षित आहे.

हमीदभाईंना एकदा असा प्रश्न विचारला होता की, इस्लाम त्यामानाने प्रस्थापित धर्मांमध्ये सर्वांत अलिकडचा, तरुण धर्म आहे, त्याच्या विचारांमध्ये काही नवीन हक्क आहेत आणि महिलांच्या अनुषंगाने थोडी समानताही आहे. तर तुम्हाला काय वाटतं की इस्लाम हा इतरांच्या तुलनेत जास्त आधुनिक आहे का? तेव्हा हमीदभाईंनी असं उत्तर दिलं होतं की, तुम्ही धर्म आणि आधुनिकता हे एका वाक्यात बोलूच शकत नाहीत. धर्म हे तसे १४००-२०००-४००० वर्षे जुने आहेत तर आधुनिकतेची मुळं ३००-४०० वर्षांची आहेत. कोणताही धर्म आधुनिक असू शकत नाही आणि आधुनिकतेच्या संकल्पनांना तुम्हाला आधुनिकतेचाच निकष लावला पाहिजे.

१८ एप्रिल १९६६ रोजी हमीद दलवाईंच्या नेतृत्वात काढण्यात आलेला सात मुस्लीम महिलांचा मोर्चा.

१. मंडळाची पूर्वपीठिका आणि स्थापना

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेपूर्वी हमीद दलवाई यांनी केलेला अभ्यास दौरा, त्यातून झालेले लेखन, 'मराठा' या वर्तमानपत्रातील त्यांची पत्रकारिता, त्यांनी काढलेला सात महिलांचा मोर्चा, तसेच स्थापन केलेली 'सदा-ए-निस्वाँ' ही महिलांची संघटना, ठिकठिकाणी दिलेली व्याख्याने हा सर्व महत्त्वाचा ऐवज आहे. तसेच प्रा. अ. भि. शहा यांच्यासमवेत स्थापन केलेली 'इंडियन सेक्युलर सोसायटी' ही संस्था आणि तिच्यामार्फत केलेले प्रयत्नदेखील मंडळाच्या स्थापनेची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी महत्त्वाचे ठरतात. १९६८ साली पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात युवक क्रांती दलाच्या वतीने तिकीट लावून हमीद दलवाईंची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. तेव्हापासून ते प्रकाशझोतात आले. हमीद दलवाई यांच्या भोवती हळूहळू मुस्लीम तरुण जमा होऊ लागले. त्यातूनच मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेची नांदी झाली.

कोल्हापूर येथील कोरगावकर ट्रस्टने हमीद दलवाई यांना अभ्यासदौरा करण्यासाठी एक वर्षाची फेलोशिप दिली होती. त्यानुसार दलवाईंनी पूर्व पाकिस्तान (आताचा बांग्लादेश) व पश्चिम पाकिस्तान यांच्या सीमारेषेजवळील भारतीय प्रदेशांत भ्रमंती केली. त्या दौऱ्यात त्यांनी विविध स्तरांतील लोकांशी संवाद साधला, बुद्धिवंतांशी चर्चा केली आणि त्यावर आधारित लेखनही केले. पूर्व पाकिस्तानच्या सीमेजवळील भारतीय प्रदेशांत गेल्यावर त्यांनी पश्चिम बंगाल व आसाम या राज्यांतील लोकांशी संवाद साधला. १९६८मध्ये आचार्य अत्रे संपादक असलेल्या 'मराठा' दैनिकात त्यावर आधारित लेखमाला प्रसिद्ध झाली. या अभ्यास-दौऱ्यादरम्यान झालेला संवाद आणि चर्चा व त्यावरील चिंतन हे सर्व दलवाईंचा सुधारणाविषयक दृष्टीकोन घडवण्यास साहाय्यभूत ठरले.

मंडळाच्या स्थापनेपूर्वी हमीद दलवाईंनी १८ एप्रिल १९६६ रोजी काढलेला सात मुस्लीम महिलांचा मोर्चा, इंडियन सेक्युलर सोसायटीची स्थापना व त्यातून निर्माण झालेल्या वातावरणातून अनेकांनी मुस्लीम कायद्यात सुधारणा करण्यासाठी अनुकूलता दाखवली. याचाच एक भाग

म्हणजे, मुस्लीम समाजासाठी काढलेले द्विभार्या प्रतिबंधक विधेयक. १९७० साली ह. स. बारमुख (काँग्रेस) यांनी विधानपरिषदेत हे विधेयक विचारार्थ ठेवले. 'एकपत्नीत्वाला मुस्लिमांतील सार्वजनिक मत अनुकूल होत असून त्यांच्या धार्मिक कायद्याने बहुपत्नीत्वाला मान्यता दिली असली, तरी त्यांनी ही प्रथा जवळ-जवळ सोडून दिली आहे' असे हे विधेयक मांडण्यामागचे उद्दिष्ट व कारण असल्याचे बारमुख यांनी सदर विधेयकात नमूद केले होते. ते पुढे असेही म्हणतात की, 'हा कायदा अमलात आणण्याच्या वेळी एखाद्या मुस्लीम गृहस्थाच्या एकापेक्षा अधिक बायका असल्या, तर तशा नवऱ्याच्या पत्नीस मदत मिळण्याची तरतूद या विधेयकात केलेली आहे.' 'हा कायदा संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्यात यावा' अशी त्यांनी सूचना केली. या विधेयकात एकूण ११ कलमे होती. *(दैनिक लोकसत्ता, फेब्रुवारी १९७०)*

मंडळाची स्थापना करताना काही पुरोगामी विचारांचे मुस्लीम कार्यकर्ते उपलब्ध व्हावेत, यासाठी प्रयत्नशील होते. या कामी अनेकांनी आपापल्या परिचयातील मुस्लीम कार्यकर्त्यांची हमीद दलवाईंशी ओळख करून दिली. समाजवादी वर्तुळातील आपल्या मित्रांच्यादेखील हमीदभाई याच उद्देशाने भेटी घेत होते. तत्पूर्वी शहा, दलवाई यांनी 'इंडियन सेक्युलर सोसायटी'ची स्थापना केली होती. एप्रिल १९६७मध्ये 'द सेक्युलॅरिस्ट' हे नियतकालिक सुरू करण्यात आले. त्यामार्फत उदारमतवाद, लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि आधुनिकतावादी मूल्ये या सर्वांच्या विस्तारासाठी मोठे कार्य केले गेले, परंतु इंडियन सेक्युलर सोसायटीचे काम करताना हमीद दलवाई सातत्याने अस्वस्थ होते. कारण या संस्थेच्या कार्यात मुस्लिमांचा सहभाग नव्हता. तसेच मुस्लीम समाजात हे विचार प्रसारित करण्यासाठी फारसा प्रतिसादही मिळत नव्हता. दलवाईंनी ही खंत प्रा. अ. भि. शहांना बोलून दाखवली आणि मुस्लीम समाजात हा आधुनिकतावादी विचार मांडण्यासाठी काही स्वतंत्र प्रयत्न करण्याची गरजही व्यक्त केली.

हे प्रयत्न करत असताना माननीय भाई वैद्य यांच्या ३३, गुरुवार पेठ, पुणे येथील दोन खोल्यांच्या घरात भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव, हमीद दलवाई आणि काही मुस्लीम कार्यकर्ते यांच्या बैठका झाल्या. या वेळी दलवाई म्हणाले,

"गेली १० वर्षं मी मुस्लीम प्रश्नावर देशभर फिरतोय... एखाद-दुसरा जवळ येतो, पण हाती कुणीच लागत नाही."

मग राष्ट्र सेवा दल, युक्रांद अशा संघटनांमधील मुस्लीम कार्यकर्त्यांची यादी करण्यात आली. या यादीमध्ये सय्यदभाई, अमीर शेख, बशीर शेख, रफी सय्यद या कार्यकर्त्यांचा समावेश होता. अशाच एका बैठकीत दलवाई म्हणाले, मुस्लीम समाज प्रबोधनासाठी संघटनेशिवाय पर्याय नाही. बैठकीत जमलेले कार्यकर्ते राष्ट्र सेवा दलाचे असल्यामुळे समाज प्रबोधनाबाबत त्यांना अधिक सांगायची गरज नाही."

हळूहळू सय्यद मुनीर, मकबूल तांबोळी, मुहम्मद यूसुफ शेख अशी दहा-बारा मंडळी बैठकीला येऊ लागली. भाईंच्या घरी झालेल्या बैठकीत एकदा भाई म्हणाले,

"आज तुम्ही दहा-बारा जण एकत्र येऊन मुस्लीम समाज प्रबोधनाचं कार्य सुरू करणार आहात. याचा इतिहास सुवर्णाक्षराने लिहिला जाईल. मी दलवाईंना आणि त्यांच्याबरोबर उभ्या राहणाऱ्या

दलवाई यांच्या नेतृत्वाखालील सात मुस्लीम महिलांचा मोर्चा. (१८ एप्रिल १९६६)

कार्यकर्त्यांना शुभेच्छा देतो."

भाईंच्या घरी अशा बैठका होत असत. एका रविवारी पूर्वीच्या कार्यकर्त्यांसह इतर काही मान्यवर उपस्थित होते. त्यांत डॉ. रमेशचंद्र शहा, ॲड. म. वि. अकोलकर, त्यांचा साहाय्यक सय्यद, डॉ. बाबा आढाव, प्रा. अकबर खान, काँग्रेसचे जुने कार्यकर्ते मकदुम मास्तर आलेले होते. या वेळी डॉ. बाबा आढाव म्हणाले,

"आपण दलवाईंच्या नेतृत्वाखाली मुस्लीम समाजात परिवर्तनाचे कार्य सुरू करत आहोत. मुस्लीम समाजातील अनेकांचा आपल्याला पाठिंबा मिळावा, असं मला वाटतं. या विषयावर आपण संवाद साधला पाहिजे आणि मगच संघटनेची घोषणा करावी."

मग बाबा आढाव आणि भाई वैद्य यांच्या परिचयातील अनेकांच्या भेटी घेण्यात आल्या. भाईंच्या आणि बाबांच्या बरोबरच एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे यांना मानणारा मोठा गट मुस्लीम समाजात होता. परंतु 'हमीद दलवाई इस्लामवर जाहीर टीका करतात. त्यामुळे ते मुस्लीमविरोधी आहेत' अशी त्यांची दलवाईंबाबत प्रतिमा होती. या कसोटीच्या काळात कार्यकर्त्यांनी भाईंसोबत आणि बाबांसोबत पन्नासेक मुस्लीम कार्यकर्त्यांचे उंबरे झिजवले; परंतु दलवाईंच्या विषयी नकारात्मक प्रतिमा असल्यामुळे लोक अशा बैठकांना येण्यासाठी नाक मुरडत असत. एका रविवारी तोपर्यंत भेटीगाठी झालेल्या आणि थोडेफार ऐकून घेणाऱ्या कार्यकर्त्यांसमवेत बैठक झाली. या बैठकीत पंधरा-वीस नवीन कार्यकर्ते आले होते.

'या बैठकीत काही वाद होतील' असा अंदाज काही जणांनी व्यक्त केला होता. बैठकीत काही जणांचा परिचय झाला. भाईंनी बैठकीचे उद्दिष्ट सांगून दलवाईंच्या आणि उपस्थितांच्यामध्ये

चर्चा घडवून आणण्यासाठी ही प्रातिनिधिक बैठक आपल्या घरी घेतली असल्याचे सांगितले. भाई पुढे म्हणाले,

"या बैठकीत सगळे प्रश्न सुटतील असे नाही, आपल्याला कदाचित वारंवार बसावे लागेल." 'आधी हमीद दलवाई यांनी बोलावं' असे कादर मेमन यांनी सुचवले. ते व्यापारी आणि राजकीय पुढारी होते. तेव्हा हमीद दलवाई म्हणाले,

"मला वाटतं, मराठीत चर्चा करायला कुणाची हरकत नसावी. मी गेली दहा वर्षं मुस्लीम प्रश्नावर देशभर फिरतो आहे, पण माझा समाजाशी नीट संवाद झाला नाही. आपल्याकडे एकतर्फी तलाकचा प्रश्न आहे, मुस्लीम जातीयवादाचा प्रश्न आहे, शिक्षणाचा प्रश्न आहे... आपल्या शिक्षणाचं माध्यम मराठी असावं. 'उर्दू' ही एक भाषा म्हणून आपण शिकायला काहीच हरकत नाही. याशिवाय महिलांना न्याय देणारा, समतेवर आधारित समान नागरी कायद्याचा प्रश्न आहे. त्याचबरोबर मानवी जीवनाशी निगडित अनेक ऐहिक प्रश्न आहेत. ते आपण धर्माशी जोडले आहेत. ते आधी बाजूला केले पाहिजेत, असं मला वाटतं."

दलवाईंना प्रश्न विचारणाऱ्यांमध्ये कादर मेमन, अब्दुल करीम आतार, अमिनुद्दिन पेनवाले, यूसुफ सिद्दीकी हे लोक आघाडीवर होते. सिद्दीकी म्हणाले,

"मला आणि माझ्या इतर बंधूंना यांच्यापेक्षा चांगलं मराठी येतं, परंतु आमच्यावर जबरदस्ती केली, तर आम्ही मराठीत बोलणार नाही; आम्ही उर्दूतच बोलू."

यावर बाबा आढाव म्हणाले,

"हे पाहा दादा मास्तर, तुम्ही कुठल्याही भाषेत बोला... मात्र एकदाचं बोला!"

काही काळ वातावरण तापलं, तेव्हा कादर मेमन यांनी प्रश्न विचारला,

"दलवाई साहब, आपने अभी जो बाते बतायी, वो सब इस्लाममें है ही, तो तुम इस्लाम को पकडकर काम क्यूँ नहीं करते? इस्लामने औरतों को जो दर्जा दिया है, वो किसी मजहबने नहीं दिया. अब रहा तालीम का मसला, तो इस्लामने मर्द और औरत दोनों को बराबर की पढ़ाई के लिए कहा है, हमारे पैगंबरने तो कहा है, तालीम हासिल करने चीन तक जाओ. सवाल रहा मराठी की तालीम का, तो मराठी में इस्लामिक मालूमात नहीं है, और अगर है भी, तो गलत है, इसलिए हमको उर्दू पढ़ना पड़ता है."

अमिनुद्दिन पेनवाले म्हणाले,

"मेरा अपना एक मुद्दा है. इस्लामने सबको बराबरी का हक दिया... तुमको चार शादियां करने की इजाजत है. मगर चारों को बराबरी से रखने को कहा है. अगर एक को कुछ कम मिला, तो वह शिकायत कर सकती है; अपना हक मांग सकती है. इतना सबकुछ रहने पर तुमको समान नागरी कायदा किसके वास्ते होना? समान नागरी कायदा यानी हिंदुओं का कायदा हमको लगाएंगे क्या?"

कागदीपुऱ्याचे रिझवान शेख म्हणाले,

"देखो दलवाई साहब, परसों रात बोहरी मस्जिद चौकी की सभा में तुमने कहा की मैं नास्तिक हूं. मैं किसी मजहब को नहीं मानता. ठीक है, फिर अब तुमको मुसलमान की फिक्र क्यों हो रही

है? हमको तुम्हारी बातों पर भरोसा नहीं है."

अशाच पद्धतीचे उलटसुलट संवाद होताना दलवाई म्हणाले,

"मैं बारी-बारीसे और एक-एक को जवाब नहीं दे सकता. इसलिए आप लोगोंने जितने सवाल किए उन सबका एक साथ जवाब देने की कोशिश करूंगा. देखिए, दुनिया में जब जब नया मजहब आया, तब-तब उसने कोई उसूल, कानून बनाया, जिसमें रीति रिवाजोंका इंसाफ था. मगर उस उसूल, कानून से आज इंसाफ नहीं मिलता. इंसाफ नहीं मिलता, तो उसे बदलना चाहिए. हमें किसीके मजहबी जज्बातों को ठेस पहुंचाना नहीं चाहिए. मगर सामने वाले को इंसाफ नहीं मिलता, तो दुनियाका कानून बदलना चाहिए."

दलवाईंच्या या वक्तव्यावर दादा मास्तर भडकले व म्हणाले,

"अरे दलवाई साहब, क्या बात कर रहे हो! दुनिया की हर चीज बदल सकती है मगर इस्लामी कानून ना बदला है, ना बदलेगा."

या युक्तिवादाने वातावरण पुन्हा गरम झालं. दादा मास्तरांनी डोक्यावरचा घाम पुसला. सगळे जण एकमेकांकडे पाहू लागले. तेव्हा दलवाई म्हणाले,

"हम अपने मतलब का इतिहास याद रखते हैं. आपको मालूम हैं, हमारे मुल्क में हिंदू और मुसलमान के लिए मजहबी, गुन्हेगारी कायदे खत्म कर के ब्रिटिशोंने एक हिंदुस्तानी गुन्हेगारी कायदा बनाया. धार्मिक गुन्हेगारी कायदे में सजा बड़ी सख्त थीं, गुन्हेगार को सुधरने का मौका नहीं था... आज के अपने इस कायदे में सजा कम और सुधरने का मौका ज्यादा है. ब्रिटिशोंने हमारा इस्लामी कायदा बदला, तब किसी ने विरोध नहीं किया. क्योंकि अपने हाथ-पांव कटने से बच गए. अगर ये मेरा कहना झूट हैं, तो आप सच बताइए. रिफॉर्म के मूवमेंट में ऐसा ही होता है. फिर भी मेरी आपसे गुजारिश है के हम जिस मुद्दे पर सहमत हो, हम उतना ही सब्जेक्ट लेकर काम करेंगे. हमें बार-बार मिलना होगा, तभी हम एक-दूसरे को जानेंगे. दो घंटे की बैठक में हम किसी नतीजे तक नहीं पहोंच सकते."

भाई-बाबांनी या बैठकीचा समारोप केला आणि एक महिन्यानंतर भेटण्याचे ठरवले.

एक महिन्यानंतर पुन्हा भाई वैद्य यांच्या घरी बैठक झाली. मात्र चर्चा फारशी पुढे सरकत नव्हती. या सर्व मुस्लीम पुढाऱ्यांचं म्हणणं होतं की, माणसाच्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर इस्लामने दिलेलं आहे आणि इस्लामला बाजूला ठेवून कोणतंही काम करण्याची गरज नाही. दलवाईंनी एकतर्फी तलाकचा मुद्दा घेऊन महिलांवर पुरुषाकडून होणाऱ्या अन्यायावर बोट ठेवलं आणि 'महिलांचा मोठा दर्जा कुठे आहे?' असा प्रश्न विचारला. अशा पद्धतीने वाद आणि प्रतिवाद वाढतच होते. विविध मुस्लीम देशांत बदललेल्या परिस्थितीचा दाखला देत होते, परंतु प्रबोधनाच्या विषयावर एकमत होण्याची शक्यता दिसत नव्हती. वर्षभरात अशा जवळपास बारा बैठका झाल्या. या बैठकांची चर्चा मुस्लीम समाजातही पसरली होती. एक बैठक शाहू मंदिर महाविद्यालयाचे प्राध्यापक अकबर खान यांच्या घरी झाली. या बैठकीला भाई आणि बाबा काही कारणांमुळे उपस्थित राहू शकत नव्हते. तेव्हा 'प्रा. खान यांनी ही बैठक चालवावी' अशी भाईंनी त्यांना कल्पना दिली होती. या बैठकीला अपेक्षेपेक्षा मोठ्या प्रमाणात लोक जमले. बैठक

सुरू झाली, तेवढ्यात कुणीतरी दलवाईंना विचारलं की, "तुमच्या बरोबर पुण्यातील कोण कोण माणसं आहेत?" तेव्हा दलवाईंनी सय्यद मुनीरकडे हाथ दाखवत त्यांची ओळख करून दिली. तेव्हा सय्यद मुनीर गडबडून गेले आणि म्हणाले,

"मी बरोबर बगैरे नाही. फक्त ऐकायला आलोय."

मुनीरची पिछेहाट पाहून दोघातिघांनी त्यालाच प्रश्न विचारले.

"तू मुसलमान हैना, फिर इनके साथ कैसे? तुझे इस्लाम मंजूर नहीं क्या?"

सय्यद मुनीरची घाबरगुंडी उडालेली पाहून काठावरचे कार्यकर्तेही गडबडले आणि ते म्हणाले, "हम भी सुनने आए हैं तुम्हारे जैसा."

दलवाईंना प्रश्न विचारण्याऐवजी एकाने प्रा. खान यांना प्रश्न विचारला,

"तुम इनके साथ कैसे क्या? तुमको मालूम नहीं ये आदमी कौन है? तुमने इनको तुम्हारे घर में मीटिंग की जगह कैसे दी?"

तेव्हा प्रा. खानदेखील गडबडले आणि 'भाई वैद्य यांच्या विनंतीवरून मी ही जागा दिली, परंतु म्हणून मी यांच्यासोबत आहे, असं नाही.' असे म्हणाले. प्रा. खान घाबरले होते, तेव्हा कार्हीनी खान यांच्या शेजारी राहणाऱ्या मकदुम मास्तरांना विचारलं,

"तुम्ही भाई वैद्यांच्या घरीही होता आणि आज इथेही आहात. काय कारण आहे?"

तेव्हा मकदुम मास्तर म्हणाले, "मीपण ऐकायलाच आलो आहे, परंतु दलवाई मुस्लीम महिलांच्या संदर्भात करणार असलेलं काम तुम्ही केलंत, तर दलवाई स्वतः हे काम करणार नाहीत."

मकदुम मास्तर हे स्वभावाने फटकळ आणि वयस्कर असल्याने लोक त्यांना थोडे वचकून होते.

या बैठकीस ए. जे. शेख उपस्थित होते. ए. जे. शेख हे एम. कॉम. होते आणि बँक ऑफ इंडियामध्ये नोकरीस होते. ते आरंभापासूनच भाई वैद्य यांच्या ओळखीचे असल्याने पहिल्यापासूनच दलवाईंसोबतच्या बैठकींना उपस्थित राहायचे. पुण्यातील मुस्लीमबहुल मोमिनपुऱ्यात ते राहायला होते. त्यामुळे दलवाईंचे विरोधक ए. जे. शेख यांना जवळून ओळखत होते. त्यांनी ए. जें.ची हजेरी घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ते म्हणाले,

"तुम्ही रागावता कशाला? आपण सगळे मुस्लीम आहोत, आपण सगळे एकत्र मिळून काम करू या."

शेवटी दलवाई यांनी सर्वांशी संवाद साधून किमान एखाद्या विषयावर एकमत करून कामाला सुरुवात करण्याची इच्छा व्यक्त केली. दलवाईंना प्रचंड प्रमाणात विरोध होत होता, प्रत्येक बैठकीत चर्चा पुढे न जाता वादविवादच वाढत होते. मात्र हे काम उपलब्ध कार्यकर्त्यांना सोबत घेऊन सुरू करण्यासाठी दलवाई आशावादी होते. शेवटी पुन्हा एका रविवारी भाईंच्या घरी निर्णायक बैठक झाली. या बैठकीत सय्यदभाई, अमीर शेख, बशीर शेख, रफिक शेख, मकबूल तांबोळी, मोहम्मद यूसुफ तांबोळी, ए. जे. शेख, मकदुम मास्तर, सय्यद मुनीर, अन्वर शेख, भाई वैद्य, डॉ. बाबा आढाव आणि हमीद दलवाई उपस्थित होते. या बैठकीतच मुस्लीम समाज

प्रबोधनासाठी मुस्लीम तरुणांची संघटना उभारण्याचा निर्णय झाला. तसेच संघटनेची ध्येय-धोरणे, उद्दिष्ट्ये, भूमिका यांवरही सखोल चर्चा झाली. नंतरच्या बैठकीत विरोधकांची संख्या मंदावली; संघटनेच्या नावाचीही चर्चा झाली. कार्हींनी उर्दू, इंग्लीश नावं सुचवली, परंतु या बाबतीत निर्णय झाला नाही. त्यानंतरच्या रविवारी झालेल्या बैठकीत डॉ. बाबा आढाव म्हणाले, "तुमचं कार्य हे सामाजिक विषमतेविरोधी आहे, महिलांसाठी समान अधिकार मागणारं आहे, धर्माच्या आणि जातीच्या नावे उभं राहणारं भूत तुम्हाला गाडायचं आहे. म्हणून तुमचं कार्य महात्मा फुलेंच्या मार्गावरच आहे. महात्मा फुलेंचा 'सत्यशोधक समाज' होता. त्याच्याशी तुमची बांधिलकी असावी, असं मला वाटतं. तेव्हा तुमच्या संघटनेचं नाव 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' असावं, असं मला वाटतं."

बाबा आढावांचा हा प्रस्ताव दलवाईंसह सगळ्यांनी मान्य केला.

हा कार्यक्रम होण्यापूर्वी 'विरोधक काय गोंधळ घालतील' याबद्दल कार्यकर्त्यांच्या मनात शंका निर्माण होत होती. तसेच 'कार्यक्रमासाठी लोकांचा प्रतिसाद मिळेल का?' याबद्दलही काळजी वाटत होती. या नियोजित कार्यक्रमापूर्वी हमीद दलवाईंनी पत्रकार परिषदा घेऊन मंडळाच्या स्थापनेविषयी भाष्य केले होते. २७ जानेवारी १९७० रोजी दैनिक प्रभातमध्ये या संदर्भातली बातमी प्रसिद्ध झाली. त्याबरोबरच समान नागरी कायदा अस्तित्वात यावा आणि वक्फ बोर्डाकडील २५० कोटी रुपयांच्या निधीचा वापर मुस्लिमांच्या शिक्षणासाठी करावा, या मागण्या हाती घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेपूर्वी एकत्रित आलेल्या कार्यकर्त्यांच्या अनेक बैठका झाल्या. यामध्ये कामाची दिशा, उद्दिष्टे आणि उपक्रम ठरवण्यासंदर्भातही चर्चा झाल्या. त्याप्रमाणे १ फेब्रुवारी १९७० रोजी झालेल्या बैठकीमध्ये हमीद दलवाईंनी मंडळाचे काम करण्यासाठी एका हंगामी समितीची निवड केली. यामध्ये मंडळाचे अध्यक्ष म्हणून ए. जे. शेख, चिटणीस म्हणून सय्यदभाई, सहचिटणीस म्हणून मकबूल तांबोळी आणि खजिनदार म्हणून आर. ए. शेख यांची नियुक्ती करण्यात आली. २२ मार्च, १९७० रोजी एक परिषद आयोजित करून मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय या बैठकीमध्ये घेण्यात आला. या बैठकीला हमीद दलवाई आणि इंडियन सेक्युलर सोसायटीचे अध्यक्ष प्रा. अ. भि. शहा यांनी मार्गदर्शन केले.

१८ मार्च १९७० रोजी दलवाईंनी पुण्यात डेक्कन जिमखाना येथील हॉटेल पूनम येथे पत्रकार परिषद घेऊन मुस्लीम जागृतीसाठी सत्यशोधक मंडळ स्थापन करणार असल्याची घोषणा केली. दलवाई आपल्या निवेदनात म्हणाले की,

"मुस्लीम समाजात धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद निर्माण व्हावा आणि सामाजिक समतेची आधुनिक मानवी मूल्ये प्रस्थापित व्हावीत, या हेतूने सामाजिक जागृती करण्यासाठी पुणे शहरात २२ मार्चला 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना होत आहे. भारतात अशा प्रकारचं मंडळ आम्ही प्रथम पुण्यात स्थापन करत आहोत. हे मंडळ केवळ मुस्लीम बांधवांपुरतंच मर्यादित काम करील."

मंडळाची तात्त्विक बैठक आणि सामाजिक अपेक्षा यांबद्दल बोलताना दलवाई म्हणाले,

"स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय मुसलमानांपुढं नवी आव्हानं उभी आहेत. भारतातल्या हिंदूंनी

परंपरागत श्रद्धांविरुध्द आंदोलनं केली, पण मुस्लीम समाज मात्र परंपरागत धर्माला नि श्रद्धांना कवटाळून बसला. बदलत्या परिस्थितीत भारतातल्या हिंदू-मुसलमानांमध्ये सामाजिक प्रबोधनाची निर्माण झालेली दरी भरून काढावी, असा मंडळाचा वैचारिक दृष्टीकोन आहे.''

पुणे शहरातून हा वैचारिक दृष्टीकोन देशभर पसरण्याचा विश्वासही दलवाईंनी व्यक्त केला.

"मुस्लीम समाजाच्या प्रबोधनाचा विचार पुणे शहरात चांगल्या रीतीने रुजला. त्यामुळे मंडळाच्या स्थापनेसाठी या शहराची निवड केली. या वैचारिक क्रांतीचे लोण पुणे शहरातूनच सर्वत्र पसरेल.''

अशी अपेक्षा दलवाईंनी व्यक्त केली. मंडळाची स्थापना होत असताना मंडळाची ५० सभासदांची यादी तयार झाली होती. त्यामध्ये सात महिलांचा समावेश होता.

"भारतात सर्व धर्मीयांसाठी एकाच प्रकारचा सामाजिक कायदा (कॉमन कोड) असावा, यासंबंधी जनमत संघटित करण्यासाठी मंडळातर्फे स्वाक्षरी संग्रह 'मोहीम' सुरू होईल. तसेच, महाराष्ट्रात उर्दूचा आग्रह न धरता मराठी भाषेच्या माध्यमाचा स्वीकार मुस्लिमांनी करावायासाठीही हे मंडळ प्रयत्नशील राहील.''

'मंडळाच्या कार्याला कितपत प्रतिसाद मिळेल?' या प्रश्नाला उत्तर देताना पत्रकार परिषदेमध्ये दलवाई म्हणाले,

"मुस्लीम समाजातील तरुण मंडळी हा विचार लवकर स्वीकारतील, अशी परिस्थिती आहे. बेळगाव, कोल्हापूर इ. भागांत दौरा करीत असताना मंडळाच्या कार्याबद्दल उत्सुकता दिसून आली. मुस्लीम समाजातील पुढारी मंडळी राजकारणात गुरफटून स्वार्थी बनली आहे आणि बहुसंख्य वृद्ध लोक धार्मिक विचारांनी संकुचित वृत्तीचे बनले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून या कार्याला विरोध होण्याची शक्यता आहे. तरीपण मिळालेल्या प्रतिसादावरून मुस्लीम समाजात सुधारणेची लाट वाढेल.''

या पत्रकार परिषदेत मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते आणि दुसऱ्या दिवशी विविध वर्तमानपत्रांनी मोठ्या प्रमाणात या बातमीला स्थान दिले. दलवाईंचे विरोधक दलवाईंसोबत जाणाऱ्या कार्यकर्त्यांची माहिती घेऊन, त्यांच्या घरी जाऊन, त्यांना धमकावण्याचा प्रयत्न करीत होते. इस्लामच्या इतिहासात असे कार्य पहिल्यांदाच होत असल्यामुळे त्याला देश पातळीवरही प्रसिद्धी मिळाली. २२ मार्च १९७० हा दिवस जसा आनंदाचा आणि उत्साहाचा होता, तशाच अनेक शंकाकुशंका कार्यकर्त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होत्या. वर्तमानपत्रातील मंडळाच्या स्थापनेची बातमी वाचून स्वातंत्र्य सैनिक बाबुमियाँ बँडबाले कार्यक्रमाच्या एक-दोन तास अगोदर आले होते. खादीचे धोतर, नेहरू शर्ट, जाकीट, डोक्यावर टोपी, पायात काळे बूट, हातात खाकी रंगाची पिशवी असा पेहराव केलेल्या बाबुमियाँनी स्वतःची ओळख करून दिली –

"मी बँड वाजवतो आणि वर्तमानपत्रातील बातमी वाचून श्रीगोंद्याहून आलो आहे.''

मात्र ते स्वातंत्र्य सैनिक असल्याचे आणि अनेक गांधीवादी नेत्यांच्या सोबत त्यांचा परिचय असल्याचे त्यांनी सांगितले नव्हते. अत्यंत साधे आणि पवित्र वाटावे, असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. दलवाई येताच त्यांनी बाबुमियाँचा परिचय करून घेतला. तिथे अ. भि. शहा प्रा. यास्मिन

लुक्मानी यांच्यासोबत आले. या बैठकीचे वैशिष्ट्य म्हणजे डॉ. बाबा आढाव हमाल पंचायतीच्या मुस्लीम हमालांसोबत बाजत गाजत, घोषणा देत, मिरवणूक काढत उद्घाटनाच्या कार्यक्रमाला आले होते. 'भारत माता की जय', 'समान नागरी कायदा झालाच पाहिजे', 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ जिंदाबाद' अशा घोषणा मोर्च्यामध्ये दिल्या जात होत्या. बाबा आढाव अशा पद्धतीने कार्यक्रमाला उपस्थिती लावणार असल्याची कोणालाही कल्पना नव्हती. बाबांमुळे एकूण वातावरणात चैतन्य निर्माण झाले. गच्च भरलेल्या आंतरभारतीच्या सभागृहाच्या मंचावर हमीद दलवाई, अ. भि. शहा, गुरुवर्य जगताप, प्रा. यास्मिन लुक्मानी आणि ए. जे. शेख होते (ए. जे. शेख हे मंडळाच्या हंगामी समितीचे अध्यक्ष होते). सभागृहात बॅ. विठ्ठलराव गाडगीळ, सदाशिवराव बागायीतकर, विनायकराव कुलकर्णी, प्रा. ग. प. प्रधान, बा. न. राजहंस, शिरुभाऊ लिमये, डॉ. रमेशचंद्र शहा, डॉ. अरविंद लेले, फादर डलरी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. आरंभापासूनच सोबत असणारे साधनाचे संपादक यदुनाथ थत्ते बाहेरगावी असल्यामुळे उपस्थित नव्हते. वर्तमानपत्राने ठळक बातम्या आणि संपादकीय लिहून मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे स्वागत केले. या वेळेस नानासाहेब गोरे यांनी अभिनंदनाचे पत्र पाठवले. त्यात ते म्हणाले, 'कुठलीही संघटना उभी करणं फार सोपं असतं, परंतु ती टिकवणं आणि सातत्याने चालवणं फार अवघड असतं. तुम्ही मंडळी हे कार्य बंद पडू न देता चिकाटीने कराल, असा मला विश्वास वाटतो.' कार्यक्रमात मालतीबाई तुळपुळे, अनुताई लिमये, भाई वैद्य, ए. जे. शेख, सय्यदभाई व मंचावरील मान्यवरांनी भाषणे केली आणि प्रा. यास्मिन लुक्मानी यांनी मंडळाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. या प्रसंगी हमीद दलवाई यांनी केलेले भाषण ऐतिहासिक ठरले.

ते भाषणात म्हणाले, 'पुणे शहरातल्या काही मुस्लीम तरुणांनी मुस्लीम समाज सुधारण्याची जबाबदारी अंगावर घेतली आहे. मी त्यांचं स्वागत करतो.' ते पुढे म्हणाले, 'समाज सुधारणेचा विचार मांडताना किंवा विशिष्ट सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करताना धर्माचा पाया घेऊ नका. धार्मिक पुनरुत्थानाचा पाया घेतला की प्रबोधनाची भूमिका मागे पडते. 'जी गोष्ट कालविसंगत आहे, जी तर्कशुद्ध विचाराला पटत नाही, ती करू नका' असं सांगण्याची वैचारिक भूमिका समाज सुधारकांनी घेतली पाहिजे. मुस्लीम समाजाचे प्रश्न केवळ शिक्षणानं सुटतील, असं मानणं चुकीचं ठरेल. शिक्षण आवश्यक असलं, तरी ज्या परिस्थितीमुळं विषमतावादी प्रवृत्ती निर्माण होतात, त्यांना मुळातच विरोध करणं आवश्यक आहे. यासाठी 'इस्लाम धर्माच्या विरोधात बोलायचं नाही' असं म्हणून चालणार नाही. मात्र म्हणून 'इस्लामविरोधी बोललंच पाहिजे' असा माझा आग्रह नाही. परंतु जे जे काल विसंगत असेल, त्याच्या विरोधात बोललं पाहिजे. जर धर्माचा आधार घेऊन सुधारणा करण्याचं पुनरुत्थानवादी धोरण आपण अवलंबलं, तर आपल्याला अनुयायी मिळतील, पण मग समाज प्रबोधनाच्या कार्याला मर्यादा पडतील. मुस्लीम सत्यशोधक मंडळाला राजकीय पक्षांच्या आहारी जाऊ दिलं जाणार नाही, असं ठरवलं, तरी राजकीय पक्षांपासून दूर राहणं अवघड जाईल. आपल्या या समाज प्रबोधनाच्या कार्याचं हिंदुत्ववाद्यांकडूनही स्वागत होईल; या कार्याला विरोधही होईल. 'मुसलमान हा निसर्गतःच वाईट आहे' असं हिंदुत्ववाद्यांमध्ये जे लोक मानतात, त्यांचे गैरसमज दूर करायच्या फारसं फंदात पडू नये.' असं

सांगून दलवाई पुढे म्हणाले, 'स्वातंत्र्यानंतर अशी एखादी वेगळी, सुधारणावादी, विशिष्ट धर्मगटासाठी संघटना काढायची आवश्यकता भासायला नको होती, हे जरी खरं असलं, तरी मुस्लीम समाजाच्या प्रबोधनावर भर देण्यासाठी आज तरी मंडळाचं कार्यक्षेत्र मुस्लीम समाजापुरतंच मर्यादित ठेवणं भाग आहे. सामाजिक बदलाची ही दरी जेव्हा नष्ट होईल, तेव्हा हे मंडळ मुस्लीम समाजापुरतं काम करणार नाही.'

नंतर राष्ट्रगीत होऊन सभा संपली.

मंडळाच्या स्थापनादिनी अधिकृत सभासद म्हणून पन्नास कार्यकर्त्यांनी आपली नावे नोंदवली. त्यांत तेरा महिला होत्या. हमीद दलवाईंनी काही कार्यकर्त्यांची पदाधिकारी म्हणून नेमणूक केली. ते खालीलप्रमाणे :

अध्यक्ष : *स्वातंत्र्य सैनिक बाबुमियाँ बँडवाले*

चिटणीस : *मोहम्मद गौस कादरी (सय्यदभाई)*

सहचिटणीस : *मकबूल तांबोळी*

खजिनदार : *ए. आर. शेख*

हमीद दलवाईंनी कोणतेही पद न घेता काम करण्याचा निश्चय केला होता आणि पत्रव्यवहारासाठी '२१०/७, रेंजहिल्स, पुणे' हा सय्यदभाई यांच्या घरचा पत्ता देण्यात आला होता.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाची रीतसर स्थापना झाल्यानंतर त्याची घटना तयार करण्यात आली, तसेच त्याचा जाहीरनामा तयार करण्यात आला. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था १९५० अन्वये बृहन्मुंबई विभाग, मुंबई येथील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालयात दस्तऐवज नोंदवण्यात आला. त्याप्रमाणे मुस्लीम सत्यशोधक मंडळ सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक एफ – ३२६४नुसार (मुंबई) हमीद दलवाई यांना प्रमाणपत्र देण्यात आले. मंडळाच्या घटनेमध्ये मंडळाचे उद्दिष्ट, नियमावली, अधिकार, पदाधिकारी आणि आनुषंगिक बाबींचा उल्लेख केला गेला. घटनेतील जाहीरनाम्यामध्ये नमूद करण्यात आले की, 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ ही संस्था मुस्लीम समाजाच्या धार्मिक आणि ऐहिक दृष्टीकोनात मूलभूत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करणार असून या समाजाच्या कल्याणासाठी कार्य करणार आहे. भारतात, हिंदू समाजात अनेक पुरोगामी आणि आधुनिकतावादी संघटना कार्यरत झाल्या. मात्र मुस्लीम समाजातील कालविसंगत श्रद्धांसंदर्भात प्रबोधन करणाऱ्या संघटना झाल्या नाहीत. हिंदू समाजात जसे आधुनिक राष्ट्रवादाचे, समानतेचे, मानवी मूल्यांचे प्रवाह बळकट होत गेले, तसा प्रकार मुस्लीम समाजात झालेला नाही. त्यामुळे मुस्लीम समाजात आधुनिकता आणि प्रबोधन रुजले नाही. ही प्रबोधनाची दरी भरून काढण्यासाठी, राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी आणि संविधानात्मक मूल्यांचा प्रसार करण्यासाठी मंडळाची स्थापना करण्यात येत आहे. महात्मा फुलेंच्या 'सत्यशोधक' शब्दाला महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात एक अर्थ आणि पार्श्वभूमी आहे. म्हणून या मंडळाचे नाव 'मुस्लीम सत्यशोधक' ठेवताना महराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची जाणीव मंडळाच्या संस्थापक सभासदांसमोर आहे. ही संघटना सुधारणावादी आहे, परंतु विशिष्ट धर्मगटांसाठी कार्य करण्याची आवश्यकता निर्माण

झाल्याने मुस्लीम समाजाच्या प्रबोधनावर अधिक भर देण्यात येत आहे. जेव्हा हिंदू-मुस्लीम प्रबोधनाची दरी नष्ट होईल, तेव्हा मंडळ मुस्लीम समाजापुरते कार्य करणार नाही किंवा त्याच्या अस्तित्वाची आवश्यकता पडणार नाही. त्या वेळी मुस्लीम सत्यशोधक या नावातील 'मुस्लीम' शब्द गळून पडावा आणि हे मंडळ सर्वांसाठी कार्य करण्यास तत्पर व्हावे, अशी अपेक्षा आहे. ही अवस्था लवकर यावी म्हणून मंडळ कार्य करणार आहे.' या आशयाचा निर्धार मंडळाच्या जाहीरनाम्यामध्ये नोंदवलेला आहे. या कार्यकाळात मंडळाचा कार्यालयीन पत्ता म्हणून साधना, ४३०-३१, शनिवार पेठ, पुणे ४११०३० हा पत्ता देण्यात आला होता.

प्रारंभीच्या काळात मंडळाचे कार्य पुणे शहरापुरते मर्यादित होते. कामाची सुरुवात 'एकतर्फी तोंडी तलाकला विरोध' हा विषय घेऊन करण्याचे निश्चित करण्यात आले. 'पुणे शहरातील किमान पाचशे मुस्लीम महिलांच्या सह्या असलेले निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना द्यावे आणि निवेदनात समतेवर आधारित समान नागरी कायद्याची मागणी करण्यात यावी' असे ठरवण्यात आले. मुस्लीम वस्तीत जाऊन, मुस्लीम महिलांच्या सह्या घेताना अनेक अडचणींचा आणि विरोधाचा सामना करावा लागला. कार्यकर्त्यांनी आपल्या नात्यातील महिलांच्या सह्या घेतल्या आणि शेवटी पाचशे सह्या गोळा झाल्यानंतर ९ एप्रिल १९७० रोजी मुंबईत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची मंडळाच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन सह्यांचे निवेदन दिले. या वेळी मुख्यमंत्री म्हणाले, "निवेदनाची छाननी करून आपल्याला पुन्हा चर्चेसाठी बोलवू." या प्रसंगी मंडळासोबत इंडियन सेक्युलर सोसायटीचे कार्यकर्ते होते. शिष्टमंडळात जाबीर अली, श्रीमती झुबेदा बिबीजी (मुंबई), हुसेन जमादार (कोल्हापूर), श्रीमती यास्मीन लुक्मानी (मुंबई), प्रा. कुलसूम पारेख (मुंबई), ए. जे. शेख, अमीर शेख, नुरून्निसा शेख, अख्तर सय्यद, मकबूल तांबोळी आणि सय्यदभाई (पुणे) यांचा समावेश होता. शिष्टमंडळाचे नेतृत्व हमीद दलवाई आणि अ. भि. शहा यांनी केले.

या प्रसंगी डॉ. बापू काळदाते (स. स. प.), राम महाडिक (प्र. स. प.), रामभाऊ म्हाळगी (जनसंघ), सी. रा. पारकर (सं. काँग्रेस), डॉ. चौधरी (कम्युनिस्ट), शरद पवार (काँग्रेस) आदी विधानसभेचे प्रमुख सभासद हजर होते. या निवेदनाला आपला पाठिंबा असल्याचे या नेत्यांनी सांगितले. 'स्वातंत्र्यानंतर बीस वर्षे लोटली तरी पोथीनिष्ठ धर्माच्या पायावर आधारलेल्या कायद्यामुळे अनेक भारतीय महिलांना आज विषमतेच्या बागणुकीला तोंड द्यावे लागत आहे. सामाजिक बांधिलकी आणि नैतिक जबाबदारीचे भान यांच्याशी कायदा सुसंगत असेल, तरच तो सामाजिक न्यायाचे प्रभावी हत्यार ठरतो. म्हणून समान नागरी कायद्याची गरज आहे. 'समान नागरी कायदा हा केंद्र सरकारचा विषय आहे' असे सांगून राज्य सरकारने आपली जबाबदारी टाळू नये. द्विभार्या प्रतिबंधाची तरतूद, घटस्फोटित व परित्यक्ता स्त्रियांना पोटगी मिळण्याची तरतूद राज्य सरकारला करता येईल. म्हणून राज्य सरकारने पुढाकार घ्यावा' असे या निवेदनात म्हटले होते. हमीद दलवाईंनी मुस्लीम मोहल्ल्यात जाऊन मुस्लीम प्रश्नावर संवाद करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे पुण्यातील मुस्लीमबहुल भागात जाऊन त्यांनी लोकांशी चर्चा केली. 'संवाद पदयात्रा करताना काही कार्यकर्ते मिळतील आणि मंडळाला समर्थन लाभेल' अशी दलवाईंची अपेक्षा

होती. या काळात अनेकांनी 'दलवाईसोबत बोलू नका' अशा सूचना मोहल्ल्यात देऊन ठेवल्या होत्या. मंडळाच्या विरोधकांची अनेक वेळा आक्षेपवजा तक्रार असे की, 'दलवाई मुस्लिमांशी संवाद करत नाहीत.' परंतु दलवाई मुस्लीम मोहल्ल्यात जाऊन संवाद करण्याचा प्रयत्न करत, तेव्हा त्यांच्याशी संवाद न करण्याचा पवित्रा घेतला जात असे. अशाच पद्धतीने १६, १७, १८ जून १९७० रोजी दलवाईंनी तीन दिवसांची पदयात्रा काढली. या वेळी प्रतिसाद मिळाला नाही, तसेच फारसा विरोधही झाला नाही. गंज पेठ, घोरपडी पेठ, मोमिनपुरा, मॉडर्न बेकरी चौक, नाना चावडी अशा ठिकाणी दलवाईंनी स्थानिक मुस्लिमांशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. काहींच्या घरी जाऊनही त्यांच्याशी दलवाई संवाद साधत. दलवाईंचा हा संवाद रोखण्यासाठी आणि त्यांना विरोध करण्यासाठी मोमिनपुऱ्यात १००-१५० लोकांनी काळे झेंडे दाखवून घोषणा देत विरोध केला. तसेच ते दलवाईंवर आणि कार्यकर्त्यांवर धावून गेले. "नारा-ए-तकबीर- अल्लाहू अकबर", "हमीद दलवाई नाम बदलो", "हमीद दलवाई वापस जाओ", "कौम के गद्दार वापस जाओ" अशा घोषणा काठ्या आपटत दिल्या जात होत्या. दलवाई शांतपणे उभे राहून "मैं आपसे बात करने आया हूं, हम कहीं बैठ कर बात करेंगे" असं सांगण्याचा प्रयत्न करत. तेवढ्यात एकाने दलवाईंवर काठीने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. असा विरोध होत असतानाही हमीद दलवाई पुन्हा-पुन्हा मुस्लीम भागात जाऊन संवाद साधण्याचा प्रयत्न करीत असत. २० जून १९७० रोजी हमीद दलवाईंवर आणि कार्यकर्त्यांवर पुण्यातील मोमिनपुरा भागात हल्ला करण्यात आला. १३ जुलै १९७० रोजी दलवाई-विरोधकांनी मोमिनपुऱ्यात जाहीर सभा आयोजित केली होती. ही सभा रात्री ९:३०पासून ते रात्री १:३०पर्यंत चालली. यात दलवाईंविरोधी प्रक्षोभक भाषणे करण्यात आली. या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी पुणे महापालिकेत २४ जुलै १९७० रोजी निषेध व्यक्त करण्यात आला.

सततचा विरोध होत असतानादेखील मंडळाने आपले कार्य थांबविले नाही. मंडळाच्या वतीने ३ ऑगस्ट १९७० रोजी मंडळाच्या वतीने परमवीर अब्दुल हमीद व्याख्यानमालेची सुरुवात केली गेली. अभ्यास शिबिरे, कार्यकर्त्यांच्या बैठका आणि कार्याच्या झंझावातात मंडळाचे पाहिले वर्ष पूर्ण झाले. मंडळाच्या कार्याच्या बातम्या महाराष्ट्रभर पसरल्या आणि विरोधाबरोबरच कार्यकर्त्यांचा सकारात्मक पाठिंबाही मिळत गेला. स्थानिक कार्यकर्त्यांनी आपापल्या भागात मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या शाखा स्थापन करण्याचा मनोदय व्यक्त केला आणि हमीद दलवाई यांच्या उपस्थितीत अनेक ठिकाणी मंडळाच्या शाखा कार्यरत झाल्या.

१.१ मंडळाच्या शाखा

पुणे शाखेची स्थापना

मुस्लीम समाजाच्या धार्मिक आणि ऐहिक दृष्टीकोनात मूलभूत बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळाची पुण्यातील शाखा २२ मार्च १९७० रोजी स्थापन करण्यात आली. या प्रसंगी मुंबईच्या यास्मिन लुक्मानी , औरंगाबादचे प्राध्यापक अन्सारी, पुण्याचे गुरुवर्य बाबुराव जगताप, मालतीताई तुळपुळे, अनुताई लिमये, प्रा. अ. भि. शहा यांच्याबरोबरच हमीद दलवाई यांनी विचार मांडले. या वेळी मंडळाचे तत्कालीन ॲडव्होकेट समितीचे अध्यक्ष ए. जे. शेख यांनी प्रास्ताविक केले आणि चिटणीस सय्यदभाई यांनी मनोगत व्यक्त केले. मंडळाच्या स्थापनेबरोबरच पुण्यासह अन्य शहरांतही मंडळाच्या शाखा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

१९७३मध्ये पुण्यात हिंदू-मुस्लीम दंगल उसळली. या काळात शांतता प्रस्थापित करण्यासाठी हमीद दलवाई पुण्यात आले होते. पुण्यातील कार्यकर्त्यांनी दलवाईंबरोबर शहरात ठिकठिकाणी मुस्लीम लोकांच्या भेटी घेऊन त्यांना धीर दिला. दंगल काळात निर्माण केलेल्या मदतकेंद्राला त्यांनी भेटी दिल्या. तसेच दंगलग्रस्त भागांतील लोकांना आणि कार्यकर्त्यांना भेटून शांतता राखण्याचे आवाहन दलवाईंनी केले. पुण्याच्या जामा मशिदीत झालेल्या शांतता समितीच्या बैठकीला मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. मोलेदिना उर्दू शाळेतील मदतकेंद्रातील दंगलपीडित बांधवांना पुणे शाखेच्या वतीने ब्लँकेट्सचे वाटप केले गले. पोलीस आयुक्तांनी बोलवलेल्या शांतता समितीच्या बैठकीला सय्यदभाई आणि पुण्याचे कार्यकर्ते उपस्थित होते. या काळात हमीद दलवाई पुण्यात वास्तव्याला होते.

दंगलीनंतर मंडळाची भूमिका समजावून सांगण्याकरिता ठिकठिकाणी बैठका घेण्यात आल्या. दंगलीचे वातावरण निवळत असताना मुस्लीम लीगचे जनाब बनातवाला पुण्यात आले आणि त्यांच्या वक्तव्याने शहरातील वातावरण परत बिघडले. या वेळी बनातवालांचा निषेध करणारे, वंदे मातरमला पाठिंबा देणारे आणि 'बनातवालांना पुण्यात येण्यास बंदी घालावी' अशा आशयाचे निवेदन मुस्लीम बांधवांच्या सहीनिशी तयार केले गेले. हे निवेदन मुस्लीम बांधवांच्या शिष्टमंडळाने मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या नेतृत्वाखाली माननीय पोलीस आयुक्तांना दिले. पुण्यातील मुस्लीम कार्यकर्त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद करून सक्रिय कार्यकर्ते मिळवण्यासाठी प्रयत्न केले. अमीर शेख, रफीउद्दिन सय्यद, सय्यद मेहबूब यांनी अहमदनगरला जाऊन स्थानिक कार्यकर्त्यांशी चर्चा केली आणि अहमदनगर येथे मंडळाचे काम सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. परिणामतः अहमदनगर येथे महिलांची मोठी परिषद आयोजित करण्यात आली. (येथे दिलेल्या माहितीसाठी 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, अंक तिसरा, ऑगस्ट १९७३, कोल्हापूर' या अंकांचा संदर्भ म्हणून वापर करण्यात आला आहे.)

सोलापूर शाखेची स्थापना

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पोहोचविण्याच्या उद्देशाने मंडळाची शाखा सोलापूर येथे स्थापन करण्यात आली. या शाखेची स्थापना प्रा. फक्रूद्दीन बेन्नूर यांच्या पुढाकाराने झाली. या स्थापनेप्रसंगी हमीद दलवाई स्वतः उपस्थित होते. तसेच मंडळाचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी या कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदवला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाची बैठक दिनांक २२ सप्टेंबर, १९७१ रोजी सोलापूर येथे पार पडली. सोलापूर शाखेच्या या विशेष बैठकीसाठी अध्यक्ष म्हणून सय्यदभाई उपस्थित होते. बैठकीत मुस्लीम महिला परिषदेच्या व दिल्ली येथे होणाऱ्या परिषदेच्या संदर्भात विचारविनिमय करण्यात आला. सोलापूर शाखेप्रसंगी तयार करण्यात आलेली अस्थायी समिती विसर्जित करून सन १९७१-७२साठी नव्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यात प्रा. फक्रूद्दीन बेन्नूर - अध्यक्ष, मकबूल कारभारी - सचिव यांची निवड होऊन बालम, आय. के. मुल्ला, इसाक शेख, आय. आर. मुल्ला व राज अहमद शेख यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली. *(येथे दिलेल्या माहितीसाठी 'दैनिक सोलापूर समाचार, २३-०९-१९७१' या अंकाचा वापर करण्यात आला आहे.)*

तत्पूर्वी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची पाचवी शाखा पंढरपूर येथे सुरू करण्याबद्दल निर्णय झाला. याच पद्धतीने मुंबई, कराड, सासवड आणि सातारा येथे शाखा उघडण्यात येणार असल्याचे घोषित करण्यात आले. *(येथे दिलेल्या माहितीसाठी महाराष्ट्र टाइम्स, २२-०९-१९७१ या अंकाचा वापर करण्यात आला आहे.)*

सोलापूर शाखेचा वर्धापन दिन

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सोलापूर शाखेचा वर्धापन दिन १ एप्रिल १९७२ रोजी विकास सभागृहात आयोजित करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. या वेळी प्रा. फडकुले म्हणाले की, 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य म्हणजे सत्ता मिळविण्याचे साधन नसून जीवनातील गतीतत्त्वाचे समर्थन करणारा विचारवंतांचा प्रवाह आहे. तो सत्तेकडे जात नाही, तर सुधारणेकडे जात आहे. मुस्लीम समाज हा भारतीय समाजापेक्षा वेगळा आहे, असे मानणे चुकीचे आहे. ही वेगळेपणाची भाषा वेड्या लोकांची आहे. ग्रंथालयात अनेक पुस्तके असतात- इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, मराठी अशा निरनिराळ्या विषयांची निरनिराळी पुस्तके असतात. ती कप्प्यात विषयावारी ठेवलेली असतात, पण ती सगळी पुस्तकेच असतात. भारतीय समाजाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे येथील बहुविधता. भारतात वास्तव्याला असणारे हिंदू, मुस्लीम, जैन, बौद्ध हे विविध धर्म म्हणजे केवळ लेबल लावलेले एकेक पुस्तक आहे. या पुस्तकांचे विविध कप्पे मिळून भारतीय समाज बनला आहे. मात्र म्हणून या लेबलांचा दुरभिमान बाळगता कामा नये. 'आपला समाज हिंदूंचा... आपला मुसलमानाचा... त्यात इतरांनी येण्याचे कारण नाही' असे मानणे वेडेपणाचे आहे. दुसऱ्या समाजाच्या मनात यामुळे निरनिराळ्या क्रिया-प्रतिक्रिया होतात. यामुळे अलिप्तपणा वाढतो.

तुपाची शाई

मराठीतील पहिले वृत्तपत्रकार बाळासाहेब जांभेकर यांना अशा अर्थाची एक जाहिरात आपल्या दैनिकात प्रसिद्ध करावी लागली की, 'आमच्या दर्पण या वृत्तपत्रासाठी वापरण्यात येणारी शाई कुठल्याही चरबीपासून बनवलेली नसून ती सोवळ्या साजूक तुपापासून बनवलेली आहे. त्यामुळे हे वृत्तपत्र हातात धरून वाचायला काही हरकत नाही.'

ही जाहिरात देण्याचे कारण असे की, सनातनी ब्राह्मण लोकांमध्ये असा समज प्रसारित झाला होता की, वृत्तपत्राच्या शाईमध्ये गाईची चरबी वापरली जाते. त्यामुळे ते हातात धरल्यास विटाळ होतो.

हे कळल्यावर बाळशास्त्री जांभेकरांनी कपाळावर हात मारून घेतला. कारण त्यांनी ज्या समाजाच्या उद्‌बोधनासाठी 'दर्पण' चालवायला हाती घेतले होते, तो समाज हे वृत्तपत्र हातातदेखील धरायला तयार नव्हता. मग हताश होऊन कपाळावर हात मारून घेतलाच पाहिजे!

नंतर त्यांनी वरील जाहिरात दिली, तेव्हा कुठे कचरत कचरत विद्‌वान सनातनी, कर्मठ ब्राह्मण 'दर्पण' वाचू लागले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सोलापूर शाखेत वर्धापन समारंभाच्या वेळी अध्यक्षीय भाषणात ब्राह्मणांच्या कर्मठ व सनातनी वृत्तीचे उदाहरण सांगताना प्रा. फडकुले यांनी ही माहिती दिली.

याच कारणामुळे भारतीयांवर आक्रमणे झाली; गुलामगिरी आली; दोन हजार वर्षांची राजकीय व मानसिक गुलामगिरी पत्करावी लागली. वास्तविक, दोन्ही समाज प्रबळ आहेत आणि तेवढेच दुबळे आहेत. या दोन्ही समाजांत कित्येक शतकांपर्यंत सुधारणाविरोधी चळवळच उभी होती, हाच त्यांचा दुबळेपणा होय.

'भारतातील मुस्लीम समाजाची सुधारणा झाली नाही, तर भारताची सुधारणा कशी होणार? हा साधा प्रश्न आहे, पण राजकीय नेते हे समजून घेत नाहीत. राजकीय नेत्यांना केवळ मुसलमानांचीच नव्हे, तर कोणाचीही सुधारणा व्हावीशी वाटत नाही. सामाजिक सुधारणांपासून ते भारताला दूर ठेवू पाहतात. कोणत्याही राजकीय नेत्याने कधीही वर्णव्यवस्थेवर प्रहार केलेला नाही, हे त्याचे उदाहरण होय. 'आपली राजकीय सत्ता संपुष्टात येईल' म्हणून ते सामाजिक सुधारणेकडे दुर्लक्ष करतात. काँग्रेसनेदेखील हे केलेच आहे. कर्मठ, प्रतिगामी, सनातनी वृत्तीला आलिंगन देऊन, जातीयवादाच्या कुबड्या घेऊन पुढारी हळूहळू सत्तेच्या सिंहासनाकडे चालत जातात. अशा वेळी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने हाती घेतलेले कार्य महत्त्वाचे आहे. कारण मुस्लीम सत्यशोधक मंडळ हे केवळ मुस्लिमांसाठी, त्यांच्या सुधारणेसाठी नसून भारतीय समाजाच्या सुधारणेसाठी सरसावले आहे. मुस्लिमांप्रमाणे हिंदूंनीदेखील आपला समाज अधोगतीकडे फरफटत नेलेला आहे. खरे म्हणजे, हिंदूंपेक्षा मुस्लिमांनी स्त्रियांना अधिक अधिकार दिले आहेत, कारण तो हिंदू धर्माच्या नंतर उदयास आलेला आणि त्यापेक्षा नव्या विचारांचा धर्म आहे. मुस्लीम व हिंदू धर्मांत

साम्यदेखील आहे. इस्लामच्या 'इबादत-आदत' प्रमाणेच हिंदूंमध्ये 'यम-नियम' आहेत. आपण त्यांना आराधना व आचार म्हणू शकतो. यांतील यम किंवा इबादत हे अपरिवर्तनीय आहे, पण आदत परिवर्तनीय आहे. आता आपण बदलत आहोत. परिवर्तनाच्या लाटा जीवितात येणे, यालाच जीवित अर्थाने जीवित राहणे म्हणतात. जीवन परिवर्तनीय हवे. मात्र याचा अर्थ ते चंचल हवे, असा नव्हे.

'काळ आणि परिस्थिती यांच्या संज्ञेच्या साहाय्याने प्रश्न सुटायला हवेत. १८७० साली शंकराचार्यांनी पुण्याच्या सदाशिव पेठेत स्त्रियांच्या पुनर्विवाहबाबत चर्चा केली. कशाच्या आधारावर? तर जुन्या मनुस्मृती, पोथी, पत्रावळीच्या आधारावर स्त्रियांच्या प्रश्नाचा या पुरुषांनी विचार केला. अर्थात, जे निष्पन्न व्हायला हवे होते, तेच झाले. स्त्रीला पुनर्विवाहाचा अधिकार अमान्य करण्यात आला. वास्तविक, देश, धर्म, सनातन आदी चौकटी बांधून असे सामाजिक प्रश्न सुटत नाहीत. तसे पाहिले तर विवाहाचा संबंध येतोच कुठे? खरे म्हणजे लग्न हा सर्वांत सनातन धर्म आहे. एका स्त्रीचा आणि पुरुषाचा तो एक निसर्गधर्म आहे. म्हणून धर्माच्या नावाखाली पुरुषांनी स्त्रियांना दुःख द्यायला नकोत. हिंदूंनी ती एक चूक केली. नऊ वर्षांची एक बालविधवा जीवनभर दैन्यावस्थेत होरपळत राहायची. तसे भारतीय मुस्लिमांनी करू नये. स्त्रीवरचा असा अन्याय बंद करायला हवा. इतर राष्ट्रांतील मुस्लीम सुधारले. त्यांनी काळाची, परिस्थितीची, विज्ञानाची कास धरली. म्हणून ते प्रगत झाले. आता मुस्लीम सत्यशोधक मंडळाने बंडखोरी केली पाहिजे. बंडखोरीच्या कपाळावर बनवासाचा शिक्का ठरलेला असतो, तसा मुस्लीम सत्यशोधक समाजाच्या कपाळावरही आणखी काही वर्षं हा शिक्का ठरलेला आहे. पण या तरुणांनी छातीवर समाजाचा रोष झेलून पुढे जायला हवे. विधायक कार्यासाठी विध्वंसन आवश्यक ठरले, तर ते जरूर करावे. त्यात 'शिक्षण' ही सर्वांत महत्त्वाची बाब आहे. माझ्यासारख्या दुरून पाहणाऱ्यांना असे दिसून येते की, मागासलेल्या वर्गापेक्षाही मुस्लीम वर्गात शिक्षणाचे वितरण कमी होत आहे. याबाबत महात्मा फुलेंचा आदर्श ठेवावा. त्यांनी स्त्रियांना शिक्षण देण्याची चळवळ सनातनाच्या कट्टर विरोधाला न जुमानता सुरू केली. प्रथम आपल्या शिरुभाऊ लिमयेंनी बायकोला शिकविले. स्त्रियांना शिक्षण म्हणजे त्या काळी पाप मानले जाई. एखादी मुलगी शिकायला निघाली की सदू भट विष्णू भटाला म्हणायचे, "अरेरे, आपल्या आर्य संस्कृतीचे कसे होणार?" त्यावर विष्णू भट उत्तरायचे, "हा सारा अधर्म पाहून माझा तर पित्त प्रकोप होतो." शिक्षण घेणाऱ्या आजच्या मुलींना गुंडांचा त्रास होतो, तर त्या काळी धार्मिक पंडितांचा होई. वास्तविक, स्त्रीला सोडून प्रगती होऊच शकत नाही. पुरुष म्हणजे स्थिती, तर स्त्री म्हणजे प्रकृती. प्रकृती ही गतिमान आहे. स्त्री सोडून प्रगती नाही.' प्रा. निर्मलकुमार फडकुले यांनी आपल्या भाषणात मुस्लिमांबरोबरच हिंदू महिलांच्या परिस्थितीवर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रा. बेन्नूर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. फडकुले यांचा परिचय करून दिला व मंडळाच्या ध्येयधोरणांचे आणि विचारसरणीचे विवेचन केले. प्रा. बेन्नूर आपल्या भाषणात म्हणाले की, 'प्रत्येक समाजाने आधुनिक विचारसरणी स्वीकारली पाहिजे. तशीच ती मुस्लीम समाजानेदेखील अंगीकारायला

हवी. मुस्लिमांमधील मध्ययुगीन, प्रतिगामी विचारांना बगल द्यायला हवी; नव्या, प्रागतिक विचारानेच या समाजाची प्रगती शक्य आहे. खरे म्हणजे, मुस्लिमांनी आधी 'आपण मुस्लीम आहोत' हे विसरले पाहिजे; संकुचित दृष्टी सोडून दिली पाहिजे; उर्दू भाषेचा दुराग्रह धरू नये. त्यामुळे कसलाच फायदा होणार नाही. एक श्रेष्ठ भाषा म्हणून उर्दूचा अभ्यास करायला मुळीच हरकत नाही. पण 'केवळ तीच भाषा हवी' हे व्यवहाराच्या दृष्टीने चुकीचे ठरते. प्रत्येकाने राजभाषेचा अभ्यास आधी केलाच पाहिजे.' ते पुढे म्हणाले की, 'मुस्लिमांवर सर्व राज्यकर्त्यांनी अभ्यास केला आहे, मात्र कुणीच आमच्या सुधारणेसाठी झटला नाही. कारण आमच्या अज्ञानावरच त्यांची सत्ता अवलंबून आहे. म्हणून समाजाने स्वतः सुधारले पाहिजे.' पुढे त्यांनी आपल्या भाषणात 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य म्हणजे असिधारा वृत्ती आहे; सतीचे वाण आहे' असे सांगून मंडळाच्या शैक्षणिक, सामाजिक, स्त्रीविषयक व कायदेविषयक आणि आर्थिक धोरणांचा ऊहापोह केला. शेवटी ते म्हणाले की, 'इतरांपेक्षा आम्हीच आमच्या समाजावर जास्त अन्याय करतो. प्रत्येकाला धर्मस्वातंत्र्य असते, पण धर्माला इतके मोकाट स्वातंत्र्य द्यायला नको, ज्यामुळे आपली प्रगती थांबेल.'

मंडळाचे कार्यकर्ते बालम यांनी भाषाप्रश्न, पुनर्विवाह यांबाबत हिंदीतून आपले विचार मांडले. ते म्हणाले की, 'सत्यशोधक मंडळाबद्दल मुस्लीम समाजात असलेले गैरसमज कार्यकर्त्यांनी काढून टाकले पाहिजेत. आम्ही आमचा धर्म बुडवू इच्छित नाही; विचार बदलू इच्छितो. 'हिंदू हिंदूही रहेगा, मुसलमान मुसलमानही रहेगा और दोनों भारतीय रहेंगे'. कार्यक्रमामध्ये हिंदू-मुस्लीम मोठ्या संख्येने जमले होते.

कोल्हापूर शाखेची स्थापना

मंडळाच्या स्थापनेपूर्वी राष्ट्र सेवा दल, कोल्हापूरच्या वतीने हमीद दलवाई यांचा दौरा, संवाद आणि व्याख्याने असा कार्यक्रम आयोजित केला होता. या काळात हमीद दलवाईंचा हुसेन जमादारांशी जवळून परिचय झाला. तसेच कोल्हापूर भागातील काही मुस्लीम कार्यकर्तेही हुसेन जमादार यांच्या संपर्कात आले. दलवाईंची कार्यकर्त्यांसोबत होणारी चर्चा कार्यकर्त्यांची ऊर्जा वाढवणारी असे. बिंदू चौकातील रंगराव साळुंखे विद्यालयात झालेल्या मुस्लिमांच्या बैठकीत हनीफ बागवान, हुसेन जमादार व इतर मुस्लीम कार्यकर्ते होते. या बैठकीच्या अध्यक्ष स्थानी एन. आर. बारगीर होते. येथे मुस्लिमांची उपस्थिती लक्षणीय होती. सभेची सुरुवात एका मौलानांनी कुराण तिलावतने (पठणाने) केली. सभेमध्ये अनेक धार्मिक व राजकीय संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते. यात अनेकांनी कुराण, शरीयत, मुस्लीम समाज या विषयावर दलवाईंना प्रश्न विचारले आणि त्या प्रश्नांना दलवाईंनी समर्पक उत्तरे दिली. या प्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना एन. आर. बारगीर म्हणाले, 'दलवाईंनी खुलासा केला आहे. आम्ही फक्त त्यांच्या बातम्यांचे मथळे वाचून त्यांच्या विषयी वाईट मतं बनवली होती. परंतु त्यांचं भाषण ऐकल्यावर असं लक्षात येतं की, त्यांनी हाती घेतलेले प्रश्न योग्य आहेत.' हमीद दलवाई यांच्याशी ज्या प्रकारे प्रत्यक्ष संवाद आणि चर्चा होत, त्याच पद्धतीने दलवाईंशी पत्रव्यवहार करणारेदेखील अनेक

लोक होते. दलवाई अशा पत्रांना उत्तरे लिहीत. याच काळात इंडियन सेक्युलर सोसायटीने एक परिषद घेतली होती. त्यात हुसेन जमादार उपस्थित होते. दलवाईंनी हुसेन जमादार यांनी पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काम करावे, अशी इच्छा त्यांच्याकडे व्यक्त केली आणि त्यासाठी पुरेसे मानधन देण्याचेही कबूल केले. त्याप्रमाणे जमादारांनी दलवाईंचा हा प्रस्ताव स्वीकारला. त्यानंतर एका वर्षात कोल्हापूर येथे मंडळाची शाखा सुरू करण्याचा निर्णय झाला. कोल्हापूर परिसरात कार्यकर्त्यांचा चांगला गट तयार झाला होता. ३१ मे १९७१ रोजी कोल्हापुरात मंडळाची शाखा स्थापण्याचा समारंभ झाला. यात हमीद दलवाईंसह प्रा. ए. डी. अत्तार, भाई माधवरावजी बागल, साहित्यिक वि. स. खांडेकर यांनी मनोगते व्यक्त केली. भाई माधवरावजी बागल यांनी हिंदू देवदेवतांवर टीका केल्यामुळे सभेमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच उपस्थित मौलानांनी काही खोचक, आडवे-तिडावे प्रश्न विचारून गोंधळ माजवण्याचा प्रयत्न केला. परंतु तो निष्प्रभ ठरला. या वेळी निपाणीचे मोहम्मद गौस नाईक, आय. एन. बेग, इचलकरंजीचे गाझीयोद्दिन सलाती इत्यादी मंडळी हुसेन जमादारांसोबत होती. मंडळाच्या स्थापनेनंतर १५ ऑगस्ट रोजी समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी राष्ट्र सेवा दलाच्या साहाय्याने शहरातून सायकल फेरी काढण्यात आली आणि कोल्हापुरातील आमदारांना निवेदने दिली गेली.

१९७१मध्ये धर्माच्या नावाने वेगळ्या झालेल्या पाकिस्तानचे दोन तुकडे झाले. राष्ट्राला एकत्र ठेवण्यासाठी धर्म उपयोगी पडत नसल्याचे यातून समोर आले. भाषिक व आर्थिक प्रश्नावर बांग्लादेश स्वतंत्र झाला. लाखों निर्वासित भारतात आले. या वेळी मंडळाने आपल्या परीने बांग्ला निर्वासितांसाठी निधी गोळा करण्याचे ठरवले. कोल्हापुरात कार्यकर्त्यांनी लोकांकडून एक-एक रुपया मदत गोळा करून १०१/- रुपयांचा निधी जमवला व शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू आप्पासाहेब पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा निधी जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपुर्द केला गेला.

१८-१९ सप्टेंबर १९७१ रोजी कोल्हापुरात मंडळाच्या वतीने अभ्यास शिबिर आयोजित केले होते. मुस्लिमांनी या शिबिरात सहभागी व्हावे म्हणून वर्तमापत्रांतून आवाहन केले होते.

इस्लामी राष्ट्रातील कायदे व समान नागरी कायदा, राष्ट्रीय एकात्मता, इस्लाम धर्माचा अभ्यास अशा विविध विषयांवर बोलण्यासाठी सर्वश्री हमीद दलवाई, प्रा. नरहर कुरुंदकर, यदुनाथ थत्ते व कोल्हापूरच्या अकबर मोहल्ल्यातील मौलानांना निमंत्रित करण्यात आले होते. कोल्हापुरातील मुस्लीम समाजाने या अभ्यास शिबिरची चांगलीच दखल घेतली होती. मौलानांवर दबाव आणण्यात आला होता. त्यामुळे ऐन वेळी त्यांनी व्याख्यानास येण्यास असमर्थता व्यक्त केली होती.

'कोल्हापूर शहर मुस्लीम जमात'च्या वतीने या अभ्यास शिबिरात भाग घेण्यास बंदी करणारे फतवावजा पत्रक काढण्यात आले होते. ते पत्रक 'ऐलाने-आम-होशियार' अशा भडक शीर्षकाखाली प्रसिद्ध करण्यात आले. ज्या मुद्राणालयात ते छापले होते, त्याचा निर्देशही त्यावर करण्यात आलेला नव्हता. खरेतर या आगळिकीसाठीदेखील पत्रक प्रसिद्ध करणाऱ्यांना सरकारने शासन करायला हवे होते, पण पत्रकात असलेला धमकावणीवजा मजकूर अधिकच भयंकर,

आक्षेपार्ह व कायद्याच्या दृष्टीने दंडनीय होता.

पत्रकात म्हटले होते, 'कोल्हापूर और अतराफके तमाम मुसलमान भाईंको इस बातकी खबर दी जाती है के मुस्लीम सत्यशोधक मंडल के नामसे हमीद दलवाई मुसलमानोंको मजहबे इस्लाम के नामपर धोका देकर और मुसलमानोंमें फूट डालनेकी और मजहबे इस्लामसे मुसलमानोंको नफरत दिलानेकी एक जमात बनानेकी फिकर लेकर कोल्हापूर आ रहा है। इस जमात का कोई भी मुसलमान मेंबर न बने और उसके किसी कारोबारके अंदर शरीक न होवे। जो उसका मेंबर बनेगा और उसका साथ देगा वो मुसलमान न रहेगा। लिहाजा अपने इमान को बचाते हुए अपने घरवालोंको और दोस्त अहबाब को और हर मुसलमानभाई को इस खतरेसे आगाह करे।'

याचा परिणाम होऊन स्थानिक मुस्लीम या शिबिरापासून लांब राहिले. पण जिल्ह्यातील मंडळाचे कार्यकर्ते दोन्ही दिवस शिबिरात उपस्थित होते.

या पत्रकाविरुद्ध 'साधना' साप्ताहिकात 'सरकार झोपा काढीत आहे काय?' या शीर्षकाखाली अग्रलेख प्रसिद्ध झाला. 'जातीय बहिष्काराची मुस्लीम जमातने सदर पत्रकाद्वारे धमकी दिली आहे, आणि महाराष्ट्र राज्यात कायद्यान्वये हा सरळ सरळ गुन्हा आहे. महाराष्ट्र सरकार अशा मंडळींचा बंदोबस्त करणार आहे की नाही? की सरकार झोपा काढण्याचं सोंग करणार आहे? धर्म पाळण्याचं स्वातंत्र्य म्हणजे भिन्न मत असणाऱ्यांना धमकावण्याचं स्वातंत्र्य नव्हे. हमीद दलवाई व मुस्लीम सत्यशोधक मंडळाचं कार्य याबाबत मतभेद असतील तर असोत आणि त्याबद्दल चर्चा व वादविवाद असेलही. परंतु धमक्या देणं आणि लोकांना भडकवण्याचा उद्योग कोणी करत असेल, तर त्याला कठोरपणे अटकाव करण्यात आला पाहिजे' या आशयाचा अग्रलेख

चिपळूण शाखा कार्यक्रमात हमीद दलवाई

प्रसिद्ध झाला होता.

महाराष्ट्र टाइम्सनेही 'मुसलमान समाजातील अज्ञानाचा फायदा घेऊन जाहीररीत्या जातीय बहिष्काराची धमकी देणं हा गुन्हा आहे. सरकारनं या गुन्ह्याची गय करता कामा नये. हे पत्रक कोणत्या छापखान्यात व कोणी काढलं ह्याचा शोध घेऊन या बहिष्कारवाद्यांना कायद्याचा तडाखा दाखवावा. निवडणुकीच्या राजकारणासाठी 'जात'वेडाकडे डोळे झाक करू नयें' अशा आशयाचा स्पष्ट अग्रलेख लिहिला होता.

मुस्लिमांच्या धमकावणीचा कोल्हापुरातील कार्यकर्त्यांवर काही परिणाम झाला नाही. त्यांचं कार्य आणखी जोमाने सुरूच राहिलं.

याच पद्धतीने मुंबई, नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, चिपळूण, पंढरपूर, कराड, सासवड, सातारा, अमरावती आणि इतर ठिकाणी मंडळाच्या शाखा उघडण्यात आल्या. दलवाईंच्या हयातीत या शाखा जोमाने कार्यरत होत्या.

शैक्षणिक शिबिरात हमीद दलवाई, भाई वैद्य, बाबुमियाँ बँडवाले, प्रा. अ. भि. शहा.

१. २ कोल्हापूरमधील शैक्षणिक शिबिरे

महाराष्ट्र मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने दि. ११ ऑगस्ट १९७३ रोजी कोल्हापूर येथे आंतरभारती विद्यालयाच्या सभागृहात शैक्षणिक शिबिर घेण्यात आले. कोल्हापूरला मे १९७१ रोजी शाखा स्थापन झाल्यानंतर घेण्यात आलेले हे तिसरे शिबिर होते. दि. १८, १९ सप्टें. १९७१ रोजी अभ्यास शिबिर झाले होते. दि. २३, २४ सप्टेंबरला स्नेहमीलन शिबिर व नंतरचे शैक्षणिक शिबिर. यातून कार्यकर्त्यांचा अभ्यास व्हावा, नवीन येणाऱ्या तरुणांना मार्गदर्शन व्हावे, शंका-समाधान व्हावे व सर्व प्रश्नांची सांगोपांग चर्चा व्हावी, हा उद्देश होता. म्हणूनच सातत्याने तिसऱ्या वर्षीदेखील शिबिर भरविण्यात आले होते.

इंडियन सेक्युलर सोसायटीचे अध्यक्ष प्रा. अ. भि. शहा यांनी शिबिराचे उद्घाटन केले. ते म्हणाले, 'मुस्लिमांनी एकत्र येऊन सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी स्थापलेली मुस्लीम सत्यशोधक मंडळ ही इस्लामच्या चौदाशे वर्षांच्या इतिहासातली पहिलीच संघटना होय. सामाजिक सुधारणा करणाऱ्या कोणत्याही संघटनेला प्राथमिक अवस्थेत व्यापक पाठिंबा मिळतोच असे नाही. हजरत महंमद पैगंबर यांनी मक्केहून मदिनेस प्रयाण केले, तेव्हा त्यांना अवघे दोनच अनुयायी लाभले होते. वैचारिक बदलाचे कार्य अत्यंत मंद गतीने होत असते. म्हणून मंडळाच्या कार्यकर्त्यांनी खंबीरपणे व सातत्याने कार्य करीत राहिले पाहिजे.' सुरुवातीला कोल्हापूर शाखेचे सेक्रेटरी हुसेन जमादार यांनी प्रास्ताविक केले. मंडळाचे अध्यक्ष बाबुमियाँ बँडवाले यांनी या शिबिराचे संचालन केले. मुंबई, पुणे, अमरावती, सोलापूर, पंढरपूर, नगर, श्रीगोंदा, सांगली, मिरज, गडहिंग्लज, आजरा, निपाणी, इचलकरंजी, हेर्ले, पन्हाळा आणि कोल्हापूर शहर येथील व विशेषतः शहरांतील निरनिराळ्या महाविद्यालयांमधून आलेले मुस्लीम तरुण असे एकूण मिळून १७५ ते २०० स्त्री-पुरुष या शिबिराला उपस्थित होते. पहिल्या सत्रात प्रा. शहांनी 'मुस्लीम प्रश्नांची सैद्धान्तिक बाजू' या विषयावर आपले विचार मांडले. याबरोबरच समाजवादी नेते भाई वैद्य, हमीद दलवाई, बाबुमियाँ बँडवाले, हुसेन जमादार आणि इतर मान्यवर अशा सर्वांनी विचार मांडले.

यानंतर ३०-३१ डिसेंबर १९७३ रोजी ऐतिहासिक ठरलेल्या महाराष्ट्र मुस्लीम शिक्षण परिषदेचे मंडळाच्या वतीने आयोजन करण्यात आले. त्याच्या पूर्वतयारीसाठी कोल्हापूर येथील कार्यकर्त्यांनी कोल्हापूर, गडहिंग्लज, इचलकरंजी, सांगली आणि परिसरातील मुस्लीम तरुणांशी संवाद साधून मंडळाविषयी माहिती दिली आणि या परिषदेस उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले.

२. प्राधान्याचे विषय

२.१ धर्मनिरपेक्षता : भूमिका

'धर्मनिरपेक्षता' हा शब्द इंग्रजीतल्या 'सेक्युलॅरिझम' या शब्दाच्या ऐवजी सध्या सर्रास वापरला जातो. त्यामुळे सेक्युलॅरिझमचा नेमका अर्थ व्यक्त होत नाही; पण दुसरा कोणताच चपखल शब्द मराठीत नाही. 'धर्मनिरपेक्ष' या विचारसरणीला नेमके काय हवे आहे? धर्मनिरपेक्षता म्हणजे काय, याचा खुलासा वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक वेगवेगळा करतात. जो-तो आपापल्या परीने फायद्याचा ठरेल असा अर्थ त्यातून काढीत असतो. तो कोणी कसाही काढो; पण त्याचा अर्थ 'धर्माचे सार्वजनिक जीवनातून उच्चाटन करणे' किंवा 'आपल्या सार्वजनिक जीवनातून धर्माचा प्रभाव नाहीसा करणे' हाच अभिप्रेत आहे. अर्थात, 'धर्म म्हणजे काय' व 'सार्वजनिक जीवन म्हणजे काय' यावर मतभेद होणे अपरिहार्य आहे.

आता अस्तित्वात असलेले जवळजवळ सर्वच धर्म आपल्या धर्माचा परमेश्वराशी निकट संबंध असल्याचे मान्य करतात. 'परमेश्वरावाचून धर्म' अशी कल्पनाच करवत नाही, इतका धर्म व परमेश्वर यांचा निकटचा संबंध असल्याचे दिसून येते. बौद्ध व जैन हे धर्म मात्र याला सर्वार्थाने नव्हे, तर अंशतः अपवाद म्हणता येतील. कारण त्या धर्मांमध्ये 'विश्वाचा निर्माता' या अर्थाने ईश्वर ही कल्पना नाही. पण या दोन्ही धर्मांचे मूळ हिंदू धर्मात असल्याने मूळच्या हिंदू परंपरा, ईश्वरविषयक कल्पना या दोन्ही धर्मांत येणे अपरिहार्य ठरले, नपेक्षा गौतम व महावीर यांना 'भगवान' ही उपाधी जोडण्यात आली नसती. अर्थात, हे सर्व नंतर घडले; पण सुरुवातीच्या काळात हे धर्म बरेचसे बुद्धिवादावर आधरलेले होते, हे नाकबूल करता येणार नाही. म्हणजेच, 'धर्म' ही कल्पना 'ईश्वर' या कल्पनेशी निगडित आहे.

'माणसाची आध्यात्मिक भूक भागविणे' हे धर्मसंस्थेच्या निर्मितीचे कारण आहे व त्यात काही चूक आहे, असेही मंडळास वाटत नाही. याचा अर्थ, सर्व धर्मांमध्ये 'ईश्वर' ही कल्पना समान आहे. मग तिला त्यांनी नाव कोणतेही दिलेले असो... फरक पडतो तो पुढे... त्याला प्रसन्न कसे

करून घ्यायचे, त्याच्यापर्यंत पोहोचायचे कसे आणि त्यासाठी साधने कोठली वापरावयाची याबाबतच्या मतभिन्नतेत. 'परमेश्वरप्राप्ती' हेच सर्व धर्मांचे साध्य आहे व हेच त्यांचे ध्येय आहे, हे सर्व धर्मांच्या धर्मग्रंथांतून सांगितले आहे. म्हणजेच धर्मांचा संबंध फक्त परमेश्वराशीच आहे. ज्याला जो योग्य वाटेल, मानवेल त्याने तो धर्म निवडून आपापली आध्यात्मिक भूक भागविण्यास कोणाचाच आक्षेप असू नये; पण असे सरळ कधी घडलेले नाही व आताही घडत नाही.

व्यक्ती व तिचा परमेश्वर यांना जोडणारा 'धर्म' हा खरा दुवा असायला हवा; पण तसे घडले नाही. एकाच विचाराने भारलेली, सारख्याच कल्पना असलेली माणसे जेव्हा एकत्रितपणे आपापल्या ईश्वरविषयक कल्पनांनाच धर्म म्हणून आपली विचारसरणी इतरांवर लादू पाहतात, तेव्हा सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येते; वेगळे विचार करणाऱ्यांना छळाला तोंड द्यावे लागते. अर्थात, जे संख्येने, शक्तीने जास्त असतील, ते हा मार्ग अवलंबितात आणि जे संख्येने, शक्तीने कमी असतील, तेसुद्धा हृदयपरिवर्तन, आमिष, प्रचार इ. मार्गांनी आपापल्या धर्माचा प्रचार करण्याचे काम चालूच ठेवतात. असा हा क्रम धर्माच्या निर्मितीपासून आजतागायत चालू आहे.

धर्माचा उगम व विकास ज्या काळात झाला किंवा ईश्वरविषयक कल्पना ज्या वेळी धर्माच्या नावाने संघटित झाली, त्या वेळी या सगळ्यामागचा उद्देश परमेश्वरप्राप्ती किंवा परमेश्वराची भक्ती असला, तरी त्या विचारांचा प्रसार करण्यासाठी, म्हणजेच अनुयायी मिळविण्यासाठी प्रचारकांनी जेव्हा राजसत्तेचा उपयोग करण्याचे ठरविले, त्या वेळी एक नवीनच समस्या निर्माण झाली. कारण राजसत्ता निरनिराळ्या देशांत, निरनिराळ्या काळांत वेगवेगळी असणे स्वाभाविक होते. राजसत्ता, समाजव्यवस्था सर्व ठिकाणी, सर्व काळी सारखी असणे शक्यच नाही. त्या वेळी अस्तित्वात असलेला समाजच त्या वेळच्या प्रसारकांना अभिप्रेत असला पाहिजे हे उघड आहे. त्या वेळच्या समाजाला अनुलक्षूनच त्या वेळी सार्वभौम असलेल्या धर्मसत्तांनी कायदे, नियम व इतर सामाजिक बाबी यांची रचना केली हेही उघड आहे. समाजनियंत्रणासाठी आवश्यक असलेला अधिकार त्या काळी धर्मसत्तांनी मिळविला होता.

अशा रीतीने या समाजनियंत्रणाच्या भागालासुद्धा आपल्या सोयीसाठी पुढे धर्मामध्ये सामावून घेण्यात आले आणि हा प्रकार थोड्याफार फरकाने सर्वच धर्मांच्या बाबतीत घडून आला. या दोन्ही भागांना मिळून 'धर्म' अशी संज्ञा प्राप्त झाली व आतासुद्धा बरेच लोक धर्माचा अर्थ असाच घेत आहेत. वास्तविक, त्यातील आध्यात्मिक, पारलौकिक, उपासनाविषयक म्हणजेच व्यक्तीचा परमेश्वराशी संबंध येणाऱ्या तेवढ्याच भागाला धर्म मानले पाहिजे.

वर सांगितल्याप्रमाणे, ईश्वरविषयक कल्पनांमधून धर्माची निर्मिती झाली व पुढे समाजधारणेसाठी ईश्वरविषयक कल्पना राबविली गेली, असेही काहींचे मत आहे. त्यात बरेचसे तथ्य असावे, असे वाटते. इतिहासात डोकावून पाहता, धर्मगुरू हे राजाचे अधिकार गाजवताना, म्हणजे समाजनियंत्रण करताना आढळून येतात, तर काही वेळा धर्मगुरू राजा झाल्याचे दिसून येते. थोडक्यात, राजसत्ता व धर्मसत्ता हातात हात घालूनच चालत होत्या, असे दिसते. क्वचित प्रसंगी त्यांच्यात संघर्ष झाल्याचेही दिसून येते. असा संघर्ष उभा राहण्याचे कारण दोघांची सत्तेची वाटणी झालेली नव्हती, दोघांनी आपापली क्षेत्रे वाटून घेतली नव्हती, हेच होते. या दोन्ही कल्पना तत्कालीन

परिस्थितीच्या दबावाखाली एकत्र जोडण्यात येऊन धर्माची रचना करण्यात आली, हे उघड होते. या दोन्ही कल्पनांचे विभाजन करावे, धर्मांमधील ईश्वरविषयक कल्पना असलेल्या भागाचा राजसत्तेतील हस्तक्षेप थांबवावा, हे ज्या वेळी काही विचारवंतांना वाटू लागले, त्याच वेळी सेक्युलॅरिझमची प्रक्रिया सुरू झाली. अमूर्त अशा ईश्वरविषयक कल्पनांनी भारलेले मानवसमूह किंवा धर्मगुरू समूर्त असलेल्या मानवसमाजाचे नियंत्रण करायला पुढे सरसावले आणि यात त्यांना यशही आले. ते यश टिकून राहण्यासाठी त्यांनी काही साधने वापरली व काही नियम, कायदे इ. द्वारा त्यांनी समाजनियंत्रण केले. जरी त्या वेळी हे समाजनियंत्रण शक्य झाले, तरी पुढे मात्र समाजाची प्रगती अशक्य होऊन बसली. कारण अंतिमतः असा समाज गतिहीन व मृतप्राय होतो. त्यात समाजनियंत्रणाचे बनवलेले नियम धर्माचेच एक अंग म्हणून मांडले गेल्याने त्या नियमांचे समाजाकडून काटेकोरपणे पालन केले जावे म्हणून प्रयत्न केले जातात. काळ बदलतो, धर्माचा प्रसार झाल्याने ठिकाणही बदलते; पण समाजनियंत्रणाचे नियम न बदलण्याने केवळ कुंपण म्हणूनच बनवलेले नियमच पुढे मानवी मनाला विकास करण्यास प्रतिबंध करतात.

यासाठीच मानवी विकासाला प्रतिबंध करणारे व धर्माचा अविभाज्य भाग सांगितले जाणारे हे नियम म्हणजे थोडक्यात इहलौकिक बाबी यांची धर्मापासून संपूर्णपणे मुक्तता करणे म्हणजे सेक्युलॅरिझम स्वीकारणे होय.

ज्या वेळी धर्माचा उदय झाला किंवा त्याला 'धर्म' अशी संज्ञा प्राप्त झाली, त्या वेळी अस्तित्वात असलेला मानवसमाज बाळगत असलेल्या ईश्वरविषयक कल्पना किंवा त्याचा त्या वेळचा आध्यात्मिक दृष्टीकोन आजही तसाच राहिला असता, तर त्याचे व्यवहारात फारसे काही बिघडले नसते. मात्र तो दृष्टीकोन कोणी कोणावर लादता कामा नये. आपण परमेश्वराशी संबंध कसा ठेवायचा, हा ज्या-त्या व्यक्तीचा खासगी प्रश्न असला पाहिजे. धर्मामध्येच गृहीत धरलेल्या सामाजिक बाबी, समाजनियंत्रणाच्या कालबाह्य झालेल्या कल्पना त्याज्य ठरविल्या पाहिजेत. हे करण्यासाठी धर्मामधील आध्यात्मिक भाग व सामाजिक भाग वेगवेगळे मानले पाहिजेत. तरच आपल्याला समाजात बदल घडवून आणता येईल. तसा बदल करणे आवश्यकच आहे. कारण काळाबरोबर समाज बदललाच पाहिजे. नाहीतर तो प्रगत होत नाही. हे करणे म्हणजेच धर्मनिरपेक्षता मान्य करणे होय.

'ईश्वरविषयक कल्पनांचा, म्हणजेच धर्माचा समाज नियंत्रित करण्याचा अधिकार, धर्माची ही सामाजिक व्यवस्थेतील ढवळाढवळ, त्याचे आक्रमण यांना कोठेतरी मर्यादा घातली पाहिजे' अशी विचारसरणी प्रथम युरोपमध्ये उदय पावली. तेथेच राजसत्ता व धर्मसत्ता यांत खरा संघर्ष उभा राहिला. युरोपमधील धर्मयुद्धे संपल्यावर व त्यांत अपयश आल्यावर युरोपीय विचारवंत विचार करू लागले. 'समाज पद्धतीत आमूलाग्र बदल झाला पाहिजे' असे त्यांना वाटू लागले. ते त्या दिशेने प्रयत्न करू लागले, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, असे करण्यासाठी त्यांना धर्माची म्हणजे चर्चची बंधने झुगारून देणे आवश्यक होते. चर्चच्या अधिकाराला कोठेतरी मर्यादा घातल्याशिवाय विकास व बदल शक्य नव्हता. कारण तेव्हा धर्म जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत अंमल गाजवत होता. त्यामुळे बदल अशक्य होऊन बसला होता. मानवी मन बदलाकडे धाव घेत होते;

नवीन समस्यांवर नवीन उत्तरांचा शोध घेत होते व त्यासाठी मानवी बुद्धी ज्ञानाची नवीन दालने धुंडाळत होती; पण धर्म त्यांना प्रत्येक ठिकाणी अडवत होता. याचे उदाहरण म्हणजे बेकन, ब्रुनो, गॅलिलिओ यांपैकी लुनाला जिवंतपणीच जाळले गेले; गॅलिलिओ बाचला, पण त्याला आपले विचार मागे घ्यावे लागले आणि तरीही काही वर्षे तुरुंगात काढावी लागली. म्हणजे धर्मापिक्षा वेगळे कोणीच बोलता व करता कामा नये, असा त्याचा अर्थ होता. केवळ शास्त्रज्ञांचा छळ झाला असे नव्हे, तर सर्व समाजच धर्माच्या तावडीत सापडला होता. यातून मार्ग काढण्यासाठीच युरोपमध्ये सेक्युलॅरिझमची प्रक्रिया सुरू झाली. राजसत्ताही सेक्युलॅरिझमला अनुकूल बनली. कारण धर्माला समाजजीवनातून दूर सारणे व त्याचा हस्तक्षेप थांबविणे जितके महत्त्वाचे होते, तितकेच त्याला राजसत्तेच्या मार्गातूनही बाजूला ठेवणे आवश्यक होऊन बसले होते. फ्रेंच राज्यक्रांतीत असाच प्रयत्न केला गेला. या सर्व घटनांमधून स्फूर्ती घेऊन आज तरी युरोपने त्या अर्थाने धर्मापासून आपली सुटका करून घेतली आहे व प्रगतीही करून दाखविली आहे.

युरोपप्रमाणेच सध्या भारतातसुद्धा सेक्युलॅरिझमची अत्यंत आवश्यकता आहे. हे परकीय तत्त्वज्ञान असल्याचे सांगत बरेच लोक त्याची हेटाळणी करताना दिसतात. बाकी बाहेरचे इतर सर्व काही आम्हास चालते... अगदी धान्यसुद्धा चालते, यंत्रे चालतात; पण सेक्युलॅरिझम मात्र नको, असे भारतातील बहुतेक सर्व धर्माभिमानी म्हणू लागतात. याचेही कारण उघड आहे. येथेसुद्धा धर्म वेगवेगळे असले, तरी ते आपल्या अनुयायांच्या, पर्यायाने भारतीय नागरिकांच्या जीवनात इतके ठाण मांडून बसले आहेत, आमच्या जीवनाचे सर्वच क्षेत्र त्यांनी इतके व्यापले आहे की, धर्मामध्ये गृहीत धरलेला समाजधारणेचा भाग काळानुसार बदलणे आवश्यक असल्याचे व तो न बदलणे समाजाच्या निकोप वाढीला घातक असल्याचे आमच्या लोकांना दिसेनासे झाले आहे. सर्व धर्मांनी आपल्या अनुयायांच्या मनाचा व बुद्धीचाही इतका कब्जा घेतला आहे.

एकदा माणसाचे मन धर्मसंकल्पनांचे गुलाम झाले व मानवी बुद्धी त्यात अडकली की, मग त्याला त्यातून सोडविणे कठीण होऊन बसते. तसेच माणसाने यातून बाहेर पडूच नये, म्हणून धर्माने करून ठेवलेल्या तजवीजीची योग्य अंमलबजावणी धर्मगुरू करीत असतातच आणि यासाठीच सेक्युलर विचारसरणीची आवश्यकता वाटू लागते.

मुस्लिमाने धर्म सोडून वेगळा विचार करावयाचा नाही; धर्मापासून स्वतंत्र काही असूच शकत नाही; वेगळा विचार मांडणारा नास्तिक ठरवला जातो. परिणामी, सामान्य जन या धर्माच्या चाकोरीतून बाहेर पडण्यास धजावत नाहीत; असे दीर्घ काळ चालत राहिले की, मग त्यातूनच अंधश्रद्धा निर्माण होतात, त्यातूनच खुळचटपणाच्या रूढी, परंपरा निर्माण होऊन त्यांनाही धर्माचाच भाग समजण्यात येते. अशा रीतीने धर्माचे स्वरूप विकृत होत जाते. अशा कडव्या धर्मनिष्ठांमधूनच अंधश्रद्धा व क्रौर्य ही घातक मूल्ये निर्माण होतात आणि अशा अंधश्रद्ध समाजामध्ये तर्कबुद्धी, विवेक, सदसद्विवेकबुद्धी यांना बावच राहत नाही.

मग तर्क व विवेक हे पारंपरिक धर्माला आपले शत्रू वाटू लागतात. 'स्वतंत्र विचारशक्ती' त्याला आपली वैरीण वाटू लागते. मनुष्य स्वतंत्र विचार करू लागला व त्यासाठी त्याने तर्क व विवेक यांचा आश्रय घेतला की, धर्मात सांगितलेल्या पुष्कळ गोष्टी योग्य नसल्याचे त्याला ज्ञान

होते आणि हेच धर्माला नको असते. एकदा मानवाला तर्क, विवेक, स्वतंत्र विचारशक्ती यांचे फायदे उमजले, त्याला तसा अनुभव आला की, मग तो आवश्यक त्या सर्व गोष्टींवर तर्काची कुऱ्हाड चालवितो; प्रत्येक गोष्ट पारखून घेतो; विज्ञाननिष्ठ बनतो. या तडाख्यातून मग धर्मही सुटत नाही. शेवटी या चिरफाडीमधून पोथीनिष्ठ धर्मात गोवलेल्या अज्ञानाचे बिंग फुटते. परिणामी, अशा धर्मांवरील लोकांची श्रद्धा कमी होते. त्यांच्या मनावरील त्याचा प्रभाव कमी कमी होत जाऊन व शेवटी तो प्रभाव नाहीसा होऊन मानवसमाज पारंपरिक धर्माच्या गुलामगिरीतून मुक्त होतो. असे होण्याला कुठला धर्म मान्यता देईल? असे होऊ नये म्हणून तर मानवी मनाला आंधळ्या धर्मश्रद्धेच्या दास्यात जखडून टाकण्यात येते. 'धर्मात सर्व समस्यांची उत्तरे आहेत. मानवी समस्या सोडविण्याचा सर्वोत्तम उपाय म्हणजे धर्म' इ. अंधश्रद्धांच्या माध्यमातून हे दास्य लादले जाते. जे यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात त्यांना नास्तिक, पाखंडी ठरवले जाते व इतरांनी अशा बाबींना बळी पडू नये म्हणून प्रस्थापित धर्माविषयी कमालीचा आदर शिकवला जातो. धर्माविषयी कुणीही तर्क वगैरेसारखी हत्यारे वापरू नयेत, धर्माबद्दल मानवी मनात शंकाच निर्माण होऊ नये म्हणून प्रयत्न केला जातो व त्यासाठी धर्मगुरू अहोरात्र खपत असतात. कारण तसे करण्याशिवाय गत्यंतरच उरत नाही. मानवाला स्वतंत्ररीत्या विचार करू देणे, त्याला विज्ञाननिष्ठ बनू देणे यास प्रोत्साहन तर सोडाच, धर्म त्याचे व्यक्तिस्वातंत्र्यही मान्य करीत नाही. कारण 'स्वातंत्र्य मान्य करणे' म्हणजे धर्मासाठी स्वतःच स्वतःची कबर खोदणे होय. आपला मृत्यू कशात असतो, हे धर्माला माहीत असल्यामुळे तो टाळण्यासाठी धर्मनिष्ठांनी आटोकाट प्रयत्न करणे स्वाभाविकच आहे. त्यासाठीच त्यांनी माणसांवर अनेक प्रकारची बंधने लादली आहेत.

अशी बंधने लादण्यात आली की, मानवी मन गुलाम होते. त्याची प्रतिभा व स्वतंत्र विचारशक्ती यांना तिलांजली देण्यात आली की मग व्यक्तीच नव्हे, तर पूर्ण समाजच्या समाज अक्षरशः बुद्धिहीन बनतो. बुद्धी असते, पण तिचा वापर करण्यास धर्मने बंदी घातलेली असते. कारण तसे करणे धर्मबाह्य असते. अशा रीतीने माणसे म्हणजे जणू मानसिक गुलामांची फौज तयार होते. 'धर्मने केलेल्या आज्ञा पाळणे' हाच त्यांचा धर्म होतो; लढायासुद्धा धर्माच्या नावाखाली केल्या जातात; कत्तली, जाळपोळ, अत्याचार इ. अनेक प्रकारच्या पशुवृत्ती त्यांच्यात दिसून येतात. परिणामी, मानव समाज अत्यंत अवनत अवस्थेला जाऊन पोहोचतो; प्रगती थांबते; विकास खुंटतो; कूपमंडुकवृत्ती वाढते. जग कुठे चालले आहे, याकडे कोणाचे लक्षच नसते व हे सर्व धर्माच्या गोंडस नावाखाली खपवले जाते. जो-तो आपापल्या धर्माच्या आज्ञेत चूर राहतो! अशा रीतीने मानवी समाज धर्मात गुंगून पडल्यामुळे झपाट्याने ऱ्हासाकडे जाऊ लागतो. हा ऱ्हास टाळणे, किंबहुना तो होण्याअगोदर त्याला कारणीभूत होणाऱ्या धर्माचाच मानवाच्या सार्वजनिक जीवनातून ऱ्हास करणे म्हणजे सेक्युलॅरिझम – म्हणजेच धर्मनिरपेक्षता स्वीकारणे – होय.

भारतातील सर्वच धर्मांमधील अतिधर्माभिमानी ठेकेदारांना धर्मनिरपेक्षता का नको असते, याचे कारण वरील विवेचनावरून लक्षात येईल. धर्मनिरपेक्षतेपासून पळवाट काढण्यासाठी धर्मनिरपेक्षतेसारखी वाटणारी, पण मुळातच भिन्न असणारी एक कल्पना अलीकडे शोधून काढण्यात आली आहे. ती अत्यंत फसवी आहे. या नव्या कल्पनेचे नाव आहे 'सर्वधर्मसमभाव'.

धर्म-कल्पनेचा प्रचंड प्रभाव जाणत्यांवरसुद्धा किती प्रमाणात पडला आहे, याचेच हे द्योतक आहे; परंतु अशी पळवाट मंडळाला मान्य नाही. कारण अशा पळवाटा शोधणे, म्हणजे समस्येवर तोडगा नव्हे. त्याने समस्या सुटत नसतात. 'समस्यांवर मूलगामी उपाययोजना' हेच समस्या दूर करण्याचे एकमेव साधन होऊ शकेल व 'धर्मनिरपेक्षता' हेच ते साधन होय.

या देशातील लोकांनी व शासनाने 'सर्वधर्म समभाव' या कल्पनेप्रमाणे वागायचे ठरवले, तर किती गोंधळ निर्माण होईल, याची कल्पनाच करवत नाही. कारण हा देश कितीतरी भिन्न संस्कृतींनी, अनेक धर्मांनी, अगणित पंथांनी व जातींनी बनलेला आहे. त्यांतील कितीतरी धर्माच्या आज्ञा, पंथाचे व जातींचे रीतिरिवाज हे सगळे एकमेकांच्या विरोधी आहेत. या सर्वांना आपला धर्म व आपले रीतिरिवाज एकाच वेळी कसे अमलात आणता येतील? साप व मुंगूस एका वेळी एकाच घरात कसे ठेवता येतील? जर त्यांपैकी कोणालाही मरायचे नसेल, तर त्यावर एकच उपाय आहे. तो म्हणजे, दोघांनाही आपल्या वृत्तीत बदल करण्यास भाग पाडणे. 'सर्वधर्म समभाव' या कल्पनेने ते कसे शक्य होणार? तिला दोघांच्याही वृत्तीकडे समभावाने बघावे लागेल. या देशात असलेल्या धर्माधर्मांमधील परस्परविरुद्ध अशा गोंधळातून वाट काढण्यासाठी 'धर्मनिरपेक्षते'चाच पाठपुरावा करावा लागेल. 'धर्मनिरपेक्षता' ही कल्पना आपल्या मनातच बदल घडवील. म्हणजे धर्माकडे बघण्याच्या आपल्या पारंपरिक कल्पनेत बदल घडवील; 'दृष्टीकोनातच बदल घडवून आणणे' हे तिचे ध्येय आहे.

इतर अनेक उदाहरणे देऊन 'सर्वधर्म समभाव' या कल्पनेचा भोंगळपणा सिद्ध करता येईल. समजा, एखाद्या धर्माच्या मंदिराला मदत करण्याचे शासनाने ठरविले, तर इतर धर्मांच्या मशिदी, चर्च, गुरुद्वारा यांनाही मदत करावी लागेल... नपेक्षा समभाव राहणार नाही; विषमभाव होईल! मग मागण्यांची स्पर्धा सुरू होणे स्वाभाविकच आहे. तेव्हा शासन कुणाकुणाच्या मागण्या पुऱ्या करणार! पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा प्रश्न असा निर्माण होतो की, राज्यसंस्थेची मूलभूत कर्तव्ये कोणती? राज्यसंस्था कशासाठी निर्माण झाली? ती जर धर्मसंस्थेला प्रोत्साहन देणारी व धर्माचे रक्षण करणारीच संस्था होऊन बसली, तर मोडून पडेल. तिचे रूपांतर धर्मसंस्थेत होईल व सर्वांत जास्त अनुयायी असणाऱ्या धर्मांचेच तिच्यावर प्राबल्य राहील, हे उघड आहे. मग प्रबलांनी आपल्या धर्माज्ञा इतरांवर लादण्याचा प्रयत्न केला, तर कुठे चुकले? कारण त्या आज्ञा अमलात आणणे, हेच त्यांचा धर्म सांगत असतो. त्यास आपणही 'सर्वधर्म समभावा'च्या नावाखाली अगोदरच मान्यता दिलेली असते! याचाच दुसरा अर्थ लहान धर्मांनी नामशेष होणे, असा होतो. तेव्हा 'सर्वधर्म समभाव' ही भोंगळ कल्पना आहे. ती मान्य करणे, म्हणजे अनागोंदीला आमंत्रण देण्यासारखेच आहे, याचा सर्व नागरिकांनी, विशेषतः अल्पसंख्याकांनी विचार करणे अगत्याचे आहे.

त्याकरिताच बहुसंख्याकांना एक वेळ 'सर्वधर्म समभाव', 'धर्माधिष्ठित राज्य' या कल्पना पेलवतील. अर्थात, तेही शक्य नाही; पण तसे गृहीत धरले, तरीसुद्धा अल्पसंख्याकांनी यातील धोका वेळीच ओळखला पाहिजे. 'धर्मनिरपेक्षते'ची जितकी आवश्यकता बहुसंख्याकांना आहे, त्याहीपेक्षा जास्त आवश्यकता अल्पसंख्याकांना आहे. धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) विचारसरणी ही

मतदान करताना निधर्मीपणाचे धोरण असावे

पुण्यातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धार्मिक मुस्लीम कार्यकर्त्यांनी प्रार्थना स्थळे, दर्गे बांधून देणाऱ्याला व उर्दूला तिसऱ्या भाषेचा दर्जा येण्यासाठी झटणाऱ्याला मते देण्याचा फतवा काढला होता. या पार्श्वभूमीवर मुस्लीम सत्यशोधक मंडळाने सांगितले की, 'धर्माचा उपयोग राजकारणासाठी करता कामा नये. निवडणुकीचा आणि इस्लामचा काहीही संबंध नाही. प्रार्थना स्थळे नागरिकांना उपद्रव करत असतील, तर खुशाल हलवावित. उर्दूचा व इस्लामचा काहीही संबंध नाही. उलट उर्दूच्या दुराभिमानाने मुस्लीम विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. महाराष्ट्रातील मुस्लीम विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचाच आस्थेने अभ्यास करावा. त्यातच त्यांचे हित आहे.

'शरीयत कायद्याचा मौलवींनी लावलेला प्रचलित अर्थ भारतातील मुस्लीम कायद्यात अंतर्भूत झाला. तो मुसलमानांच्या, विशेषतः मुस्लीम स्त्रियांच्या मूलभूत हक्कास मारक आहे. त्यात कालानुरूप बदल व्हावला व्हावा. या गोष्टी मान्य असणाऱ्या व समान नागरी कायदा प्रस्थापित करण्याच्या दिशेने पावले टाकणाऱ्या उमेदवारास हिंदूंनी व मुस्लिमांनी मते द्यावीत' असे मंडळाच्या वतीने आवाहन करण्यात आले. *(येथे आलेल्या माहितीसाठी 'प्रभात, २६ जानेवारी १९५२' या अंकातील संदर्भ वापरला आहे.)*

फक्त धर्माला सार्वजनिक जीवनातून हद्दपार करते; परंतु खाजगी जीवनात आपला धर्मपालनाचा हक्क ती अबाधित ठेवते. व्यक्तिगत पातळीवर उपासना पद्धतीला – मग ती कोठल्याही धर्माची असो – धर्मनिरपेक्षता मान्यता देते; मात्र त्यासाठी प्रोत्साहन किंवा मदत करत नाही. ज्याप्रमाणे धर्मनिरपेक्षता कोठल्याही धर्माचा खाजगी बाबतीतील अधिकार मान्य करते, त्याचप्रमाणे कोठलाही धर्म न पाळणाऱ्या व कोठल्याच धर्मावर विश्वास न ठेवणाऱ्या व्यक्तीचा हक्कही ती मान्य करते. म्हणजेच, आपला धर्म दुसऱ्यांवर लादण्यास धर्मनिरपेक्षता मान्यता देत नाही; पण धर्माधिष्ठित राजवटीत किंवा 'सर्वधर्म समान' सांगणाऱ्या राजवटीत मात्र अल्पसंख्याकांच्या त्या उपासनेच्या हक्कावरसुद्धा गदा येण्याचा संभव असतो.

हे सर्व टाळण्यासाठीच आपल्या देशाने, भारतीय राज्यघटना बनवताना धर्मनिरपेक्षतेची, म्हणजेच सेक्युलर विचारसरणीची कल्पना स्वीकारली आहे. घटनेत कोठेही 'सेक्युलर' असा शब्द नसला, तरी सेक्युलॉरिझममध्ये अभिप्रेत असलेलीच समाजरचना किंवा तशाच स्वरूपाची समाजव्यवस्था आपल्या घटनाकारांनी डोळ्यांपुढे ठेवली होती. ज्या देशात अनेक धर्मांचे, पंथांचे नागरिक राहतात, त्या देशाने एकदा 'लोकशाही स्वीकारायची' असे ठरवले की, धर्मनिरपेक्षता स्वीकारण्याबाचून गत्यंतरच उरत नाही. कारण कोणतेही धर्माधिष्ठित राज्य खरी लोकशाही राबवूच शकणार नाही. लोकशाहीत नागरिकांचे विचारस्वातंत्र्य मान्य केलेले असते; पण कोठलाही धर्म ते मान्य करीत नाही. अशा परिस्थितीत लोकशाही स्वीकारायची म्हटले की, धर्माची फारकत करूनच पुढे जावे लागते; धर्माच्या आज्ञा बाजूला सारूनच पुढे जाता येते आणि

याचसाठी 'लोकशाही नको' असे उघडपणे म्हणणारे धर्माभिमानी लोक सर्वच धर्मांमध्ये आढळून येतात. काही लोक तसे बोलत नाहीत. धर्मासाठी लोकशाहीला विरोध करणे त्यांना परवडत नाही, म्हणून ते तोंडाने फक्त लोकशाहीचा उच्चार करतात, पण मागच्या दाराने 'सर्वधर्म समभाव'सारखी कल्पना लोकशाहीत आणून धर्माचा प्रभाव कायम राखण्याचा प्रयत्न करतात.

'राज्य कसे चालवावे' एवढेच सांगून धर्म थांबत नाही, तर नागरिकांचे खाजगी जीवनातील सर्व व्यवहारसुद्धा नियंत्रित करण्याचा धर्माला हव्यास असतो. अगदी काय खावे, काय प्यावे, काय शिकावे, स्त्रियांना कसे वागवावे, किती बायका कराव्यात, त्या कशा सोडाव्यात... इ.पर्यंत माणसांच्या जीवनात धर्म आक्रमण करतो. व्यक्तीच्या खाजगी जीवनावर आक्रमण करणाऱ्या या आज्ञा पाळणे शक्य नसते; नव्हे ते घातकसुद्धा ठरते. कारण त्या कालबाह्य व प्रगतीस अडथळा करणाऱ्या असतात. असे असूनसुद्धा या सर्व बारीकसारीक गोष्टींमार्फत धर्माच्या नावाखाली समाजाला बंदिस्त करून ठेवण्याची पारंपरिक धर्म धडपड करतो. तेव्हा आपल्याला एकसंध, लोकशाहीवादी आणि विज्ञाननिष्ठ समाज निर्माण करायचा असेल व त्याचबरोबर भिन्न भिन्न धर्म असलेले व भिन्न भिन्न पंथांचे सर्व नागरिक एका राष्ट्रात गुण्यागोविंदाने नांदवावयाचे असतील, आणि असा धर्मनिरपेक्ष भारतीय समाज उभा करावयाचा असेल, तर ज्या-ज्या क्षेत्रांत धर्मनि प्रगती अशक्य करून टाकली असेल, अशा सर्व क्षेत्रांतून – उदा. राजकारण, समाजव्यवस्था, शिक्षण इ. क्षेत्रांतून – धर्माला घालवून देणे, त्याला या क्षेत्रात येण्यास पायबंद करणे अपरिहार्य आहे. हे ज्या वेळी घडून येईल, त्याच वेळी आपण धर्मनिरपेक्ष ठरू.

या अभिप्रेत धर्मनिरपेक्षतेला फक्त मुसलमानांचाच विरोध होतो असे नाही; इतर धर्माचे लोकही या बाबतीत मागे नाहीत. पण समाधानाची बाब एवढीच की, त्या विविध धर्मांमध्ये 'सेक्युलर विचारसरणी'चा प्रचार करणारे विविध लोक व संस्था काम करीत आहेत. त्यांना बऱ्याच प्रमाणात यशही मिळत आहे. मुस्लीम समाजात मात्र असा प्रयत्न झालेला नाही. काही विचारवंत व्यक्तिगत पातळीवर हा विचार मान्य करतात, पण संघटनात्मकरित्या असा प्रयत्न झालेला नाही. मुस्लीम सत्यशोधक मंडळ तसा प्रयत्न करीत आहे. मंडळाने सध्या 'मुस्लीम समाज' हेच प्रबोधनाचे क्षेत्र का निवडले, हे यावरून लक्षात यावे. या देशातील प्रत्येक व्यक्तीने, सर्व धर्मांच्या अनुयायांनी धर्मनिरपेक्ष बनणे तर आवश्यक आहेच; परंतु त्याहीपेक्षा अल्पसंख्याकांनी व विशेषतः मुस्लीम धर्मीयांनी धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार करणे जास्त आवश्यक आहे. अल्पसंख्याकांनी धर्माधिष्ठित राज्याची कल्पना उराशी बाळगणे मूर्खपणाचे आहे. वास्तविक, जिथे मुस्लीम बहुसंख्य आहेत, अशा देशांनासुद्धा धर्मावर आधारित राज्य करणे अव्यवहार्य व न परवडणारे ठरते. म्हणून जगातील बऱ्याच मुस्लीम राष्ट्रांनी धर्माधिष्ठित राज्याची कल्पना त्याज्य ठरविली आहे.

जर भारतातील मुसलमान समाजाने धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार केला नाही व जर हा समाज धर्माच्या कोंडाळ्यातून बाहेर पडणार नसेल, तर त्याला मुस्लीम धर्मावर आधारित राज्य आणणे शक्य तर नाहीच, उलट येथे हिंदू धर्माधिष्ठित राज्य येणे अपरिहार्य होईल. मग मुस्लिमांना आपला 'इबादत'चा हक्कसुद्धा बजावता येईल की नाही, याची शंकाच आहे. कारण 'मोठा मासा लहान माशाला गिळतो' या न्यायाने इस्लाम व इतर धर्मही भारतातून नामशेष होण्याची शक्यता

धर्माधिष्ठित राज्यात निर्माण होईल.

मुस्लीम समाजाला (सेक्युलर) धर्मनिरपेक्ष बनवणे, हे दुसऱ्याही एका कारणाने आवश्यक होऊन बसले आहे. धर्माच्या बाबतीत मुस्लीम मन इतके संवेदनाक्षम बनले आहे की, सुधारणा, बदल हा विचारच त्याला सहन होत नाही. इतका त्यावर धर्माचा प्रचंड पगडा आहे. मुस्लीम मनाची घडणच अशी बनली आहे की, 'धर्म हा परिपूर्णच आहे. सर्व समस्यांवरची उत्तरे धर्मातच आहेत' असे त्याच्यावर बिंबवले गेल्यामुळे 'बदल' हा शब्द ऐकताच तो बिथरून जातो. हा विचारच मुस्लीम समाज सहन करू शकत नाही. धर्माच्या पलीकडे जग असू शकते, याचा विचारच न केल्यामुळे जग कोठे चालले आहे, विज्ञानाने किती प्रगती केली आहे हे या समाजाला कळू शकत नाही. परिणामी, जीवनाच्या बऱ्याच क्षेत्रांत, प्रगतीत मुस्लीम समाज बाहेर फेकला गेल्याशिवाय राहणार नाही. यासाठीही या समाजाने धर्मनिरपेक्ष बनणे आवश्यक ठरले आहे.

पण मुस्लिमांना हे सांगण्यासाठी कोणीच पुढे येत नाही. उलट, काही मुस्लीम जातीयवादी संघटना, राजकीय पक्ष व धर्मगुरू मुस्लिमांच्या अज्ञानाला, भ्रमाला खतपाणीच घालतात. बहुसंख्य मुस्लीम जनतेचे अज्ञान हेच या मुखियांचे खरे बळ असते. त्यातूनच त्यांना मुस्लिमांचे राजकारण करावयाचे असते; प्रतिष्ठा टिकवायची असते. मंडळाला मात्र मुस्लिमांचे वेगळे राजकारण करायचे नाही व मतेही मागायची नाहीत; प्रतिष्ठा मिळवण्याची तर त्याला अगदीच गरज नाही व त्याच कारणामुळे हे कटू सत्य मुस्लीम बांधवांना ते सांगू शकते. ते सांगण्यासाठीच मुस्लीम सत्यशोधक मंडळ ही संघटना निर्माण झाली आहे. 'धर्मनिरपेक्ष, सेक्युलर बना' हा प्रचार सर्व मुस्लिमांच्या हितासाठीच आहे, तरीही ते दुखावले जात आहेत; पण ते अटळ आहे. परंतु मंडळाला हे कर्तव्य बाजवलेच पाहिजे, नपेक्षा इतिहास मुस्लिमांना क्षमा करणार नाही.

धर्मनिरपेक्षता ही मुस्लीम समाजासाठी कशी अपरिहार्य आहे आणि धर्मनिरपेक्षता अंगीकारली नाही तर समाजाला कोणती किंमत मोजावी लागणार याचे मंडळाने वेळोवेळी भाकित केले आहे. चार दशकांपूर्वी केलेली ही मांडणी आज जशीच्या तशी स्वीकारण्यायोग्यच आहे. धर्मनिरपेक्षतेला विरोध केल्यामुळे आणि आधुनिकता न स्वीकारल्यानेच मुस्लीम समाजाची दुरवस्था झाली आहे आणि भारतातील हिंदुत्ववाद वाढताना दिसतो आहे. सेक्युलॅरिझम, धर्मनिरपेक्षता, निधर्मीपणा, धर्मातीतता, धर्मतटस्थता, सर्वधर्मसमभाव हे समानार्थी शब्द नसून त्यांत भिन्नता आहे. धर्मनिरपेक्षतेपेक्षा सेक्युलॅरिझमला 'इहवाद' हा अधिक जवळचा शब्द वाटतो. धर्मनिरपेक्षतेला, इहवादाला आजच्या काळात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

भारताने धर्मस्वातंत्र्य देत असतानाच घालून दिलेल्या मर्यादा समाजाला धर्मनिरपेक्षतेकडे घेऊन जाणाऱ्या आहेत. धर्मस्वातंत्र्य हे व्यक्तीला दिले आहे; ते धर्माला नाही. म्हणून धर्मस्वातंत्र्य हे उपासनेचे स्वातंत्र्य आहे. त्याचा पारलौकिकाशी संबंध आहे. तर इहलोकी व्यवहार हे मानवी मूल्यांवर, संविधानात्मक मूल्यांवर आधारलेले हवेत, असा आग्रह आहे.

धर्म आणि ईश्वर या संकल्पना मुस्लीम सत्यशोधक मंडळ नाकारते, असा काही लोकांचा समज आहे. मंडळ आस्तिकता-नास्तिकता, धार्मिकता-निधर्मीपणा हा व्यक्तीचा खाजगी अधिकार समजते. ज्यांना जे मानायचे आहे, ते मानण्याचे व्यक्तिगत पातळीवर स्वातंत्र्य असावे.

धर्म व ईश्वर या संकल्पना समाजाचे शोषण करणाऱ्या नसाव्यात. त्यांच्यातून विषमता, अन्याय यांना उत्तेजन दिले जाऊ नये, अशी कल्पना आहे. धर्मसंकल्पना ही कालसापेक्ष असली पाहिजे. त्यात पुरोहितवर्गाचा वरचष्मा असू नये व ती प्रगतीच्या आड येऊ नये. आज मौलाना आझाद किंवा डॉ. असगर अली इंजिनिअर यांना अपेक्षित असणारा धर्म मुस्लिमांनी स्वीकारल्यास बरेच प्रश्न कमी होतील. हा धर्म आधुनिक काळाशी सुसंगत असेल; पण प्रत्येक ठिकाणी धर्माज्ञा शोधण्यापेक्षा 'आज सुसंगत काय आहे', 'विवेकी काय आहे' आणि 'संविधानात्मक काय आहे' यावर अधिक जोर दिला पाहिजे. धर्मापलीकडे जाण्याची तयारी ठेवणे, हेच याला उत्तर आहे.

हमीद दलवाईंनी अनेक वेळा असेही स्पष्ट केले आहे की, 'मी जरी निधर्मी असलो, तरी भारतीय संविधानाने दिलेले धर्मस्वातंत्र्य कोणी हिरावून घेत असेल, तर त्याविरोधात सर्वप्रथम पुढे येऊन निकोप व संविधानात्मक धर्मस्वातंत्र्याचे समर्थन करीन, कारण तो संविधानाने दिलेला अधिकार आहे; पण या धर्मस्वातंत्र्याचा अर्थ नीटपणे समजून घेतला पाहिजे. अनिष्ट, अन्यायकारक, कालबाह्य प्रथा जपणे म्हणजे धर्मवर्तन नाही, व या अनिष्ट रूढी काढून टाकण्याने धर्म संकटात येत नाही.'

विवेकी विज्ञानवाद, स्त्री-पुरुष समता, लोकशाही हे सेक्युलॅरिझमचे आधारभूत घटक आहेत. 'संपूर्ण भारतीय समाजाने धर्मनिरपेक्षता अंगीकारावी व धर्मनिरपेक्ष एकात्म समाज निर्माण व्हावा' हा दलवाईंचा विचार आजही पूर्वीइतकाच महत्त्वाचा आहे. मुस्लीम जमातवाद व अन्य धर्मीय जमातवाद्यांना धर्मनिरपेक्षता नको आहे. कारण त्यांचे राजकारण धर्माशी-धर्मवादाशी निगडित आहे. या धोक्यापासून समाजाला बाहेर काढले पाहिजे.

अ. धर्मनिरपेक्षता आणि निवडणुका

इंडियन सेक्युलर सोसायटी व मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे आवाहन

(मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटी यांच्या वतीने १९७१च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संयुक्तपणे आवाहन करणारे पत्रक काढण्यात आले होते.)

भारतीय लोकशाहीसाठी ज्याप्रमाणे समाजवादाची चौकट गृहीत धरण्यात आली आहे, तशीच भारतीय राष्ट्रवादाची धर्मनिरपेक्ष चौकट आपण मान्य केली आहे. 'धर्मनिरपेक्षतेची ही बैठक अधिक मजबूत करण्याच्या आणि पर्यायाने नवा, जातिभेदातीत भारतीय समाज निर्माण करण्याच्या प्रयत्नाचे एक पुढचे पाऊल' या दृष्टीने इंडियन सेक्युलर सोसायटी आगामी निवडणुकांकडे पाहत असून खालील जाहीरनामा प्रसिद्ध करीत आहे.

हा जाहीरनामा आणि विविध पक्षांचे निवडणूक जाहीरनामे यांत एक मूलभूत फरक आहे. पक्षीय जाहीरनाम्यातून आपल्या पक्षाच्या उमेदवारांना मते देण्याचे मतदारांना आवाहन करण्यात आले आहे आणि सत्तेवर आल्यास आपल्या जाहीरनाम्यातील कार्यक्रम अमलात आणण्याचे आश्वासन दिले गेले आहे. इंडियन सेक्युलर सोसायटीच्या या जाहीरनाम्यात असे कोणतेच

आश्वासन नाही. कारण सोसायटी हा राजकीय पक्ष नाही की तो निवडणूक लढवीत नाही. धर्मनिरपेक्षतेचे आंदोलन बळकट करणारी ती एक बिगर राजकीय संस्था आहे आणि मतदारांनी धर्मनिरपेक्षतेच्या कसोट्या लावून डोळसपणे मतदान करावे, असे ती मतदारांना आवाहन करीत आहे.

राजकीय पक्षांना आम्ही असे आवाहन करतो की, त्यांनी आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात भारतीय राष्ट्रवादाच्या धर्मनिरपेक्ष चौकटीवरील आपली श्रद्धा निःसंदिग्धपणे जाहीर करावी. ही श्रद्धा धर्मनिरपेक्षतेच्या आधुनिक अर्थावर आधारलेली असावी. जात, धर्म, लिंग व / आणि वर्णभेदातीत दोन व्यक्तींची समानता हा धर्मनिरपेक्षतेचा आधुनिक आणि खरा अर्थ आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाने मंजूर केलेल्या मूलभूत मानवी हक्कांवरील विश्वास त्यांनी जाहीरनाम्यात प्रकट करावा. त्याचबरोबर राज्याची सार्वभौमता आणि या देशातील कोट्यवधी जनतेच्या आर्थिक आणि भौतिक उन्नतीकरिता आवश्यक असलेली पाऊले धर्मनिरपेक्षतेने उचलण्याचा या देशाच्या संसदेला अधिकार आहे, असे स्पष्टपणे घोषित करावे. 'शासन धर्मातीत भूमिकेवरून चालले पाहिजे' ही भूमिका राजकीय पक्षांनी घ्यावी.

आणि या मूलभूत धर्मनिरपेक्ष सिद्धान्ताच्या विरुद्ध प्रचार अथवा वक्तव्ये किंवा लिखाण करू नये; धार्मिक प्रतीके वापरू नयेत. धर्माच्या नावाने गोहत्याबंदी किंवा संततिनियमानाला विरोध असे मुद्दे निवडणुकीत वापरू नयेत.

या देशाच्या सेक्युलर राष्ट्रवादावरील आपली श्रद्धा जाहीर करून तो बळकट करण्याची संधी या देशातील अल्पसंख्याकांना निवडणुकीच्या निमित्ताने लाभणार आहे. राष्ट्रवादाच्या या सर्वव्यापक सिद्धान्तानेच त्यांना समान दर्जा लाभलेला आहे व आपले जीवन संपन्न करण्याचा मार्ग खुला केलेला आहे. परंतु सेक्युलर राष्ट्रवाद म्हणजे जॉइंट स्टॉक कंपनी नव्हे; सेक्युलर राष्ट्रवाद म्हणजे सर्व जमातींना सर्व क्षेत्रांत पॅरिटी नव्हे; अल्पसंख्याक आणि बहुसंख्याक जसमातींची अधिकारातील निम्मी निम्मी भागीदारी नव्हे. 'व्यक्तींची समान भागीदारी' हा राष्ट्रवादाचा पाया आहे. म्हणून सेक्युलर राष्ट्रवादाच्या नावाखाली 'आपली जमात म्हणजे एक राष्ट्र आहे' या भूमिकेला थारा मिळता कामा नये. राष्ट्रांतर्गत राष्ट्र समजण्याची, 'आपला समाज स्वायत्त आहे' असे मानण्याची भूमिका अल्पसंख्यांकानी आणि विशेषतः मुस्लीम समाजाने घेता कामा नये. या भूमिकेतून मुस्लीम कायदा न बदलण्याचे आश्वासन मागणाऱ्या, अलीगढ विद्यापीठाबाबत संसदेला हस्तक्षेप न करण्याची हमी मागणाऱ्या, मुस्लीम समाजासाठी नोकऱ्यांत प्रतिनिधित्व मागणाऱ्या... थोडक्यात, मुस्लीम विभक्तवादी (separatist) राजकारणाला मुस्लीम समाजाने पाठिंबा देऊ नये आणि मतदारांनी मतदान करू नये, असे आम्ही आवाहन करतो. जुन्या, विभक्तवादी मागण्या करून मुस्लीम समाजाची न्याय्य गाऱ्हाणी दूर होणार नाहीत. उलट विभक्तवादी मागण्या न केल्यानेच ती दूर होऊ शकतील, असे आम्ही या प्रसंगी मुस्लीम समाजाला सांगू इच्छितो. अशा मागण्या करणाऱ्या पक्षांशी सेक्युलर पक्षांनी निवडणूक करार करू नयेत. जे पक्ष त्यांच्याशी हातमिळवणी करतील, त्यांना जनतेने पाठिंबा देऊ नये, असे आम्ही आवाहन करतो.

२. २ मुस्लीम महिला प्रश्न : भूमिका

धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अन्याय्य चालीरीती, परंपरा व रूढी यांविरुद्ध लढण्याचा मुस्लीम सत्यशोधकांचा निर्धार आहे व अशा अनेक प्रश्नांपैकी सर्वांत अन्याय्यकारक बाब म्हणजे, स्त्रियांना तलाक देण्याची पद्धत.

तलाकसंबंधी मंडळाची भूमिका स्पष्ट आहे. पती व पत्नी यांना एकत्र राहणे कठीण होत असले, तरी त्यांनी आपल्या स्वभावांना कोठेतरी मुरड घातली पाहिजे व तडजोड करून आपले भावी आयुष्य सुखी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यात निव्वळ पती-पत्नी यांच्याच सुखाचा प्रश्न गुंतलेला नसून त्यांना अपत्ये असतील, तर त्या निष्पाप बालकांच्या जीवनाची आपल्या आईबापांच्या केवळ लहरीपणामुळे राखरांगोळी होऊ नये, यासाठी तरी पती-पत्नीने तलाक घेण्याचे टाळावे. पती-पत्नीला एकत्र राहणेच दुःखाचे होत असेल, एकत्र राहण्यानेच मुलांच्या जीवनावर आघात होणार असेल, म्हणजे नवरा-बायको म्हणून राहणे अशक्य होत असेल किंवा इतर काही कारणांमुळे त्यांचा संसार सुखाचा होत नसेल, तर मात्र न्याय्य पद्धतीने विभक्त होऊन आपापले संसार उभे करण्याचा त्यांचा हक्क कोणीच नाकारणार नाही.

पुष्कळांचा असा गैरसमज असेल किंवा तसा गैरसमज जाणूनबुजून पसरविला जात असेल की, मुस्लीम सत्यशोधक तलाकच्याच विरुद्ध आहेत. अर्थात, मंडळ तलाकच्या विरुद्ध आहे, हे फक्त अर्धसत्य आहे. त्यातील सत्य एवढेच की, कोणीही उठल्याबसल्या, अगदी क्षुल्लक कारणांवरून तलाकच्या हक्काचा वापर करू नये. मुस्लीम सत्यशोधकांची भूमिका वेगळी आहे. ती अधिक विशाल आहे. त्यांचा खरा लढा तलाकविरुद्ध नसून स्त्रियांना तलाक देण्याच्या अन्याय्य पद्धतीविरुद्ध आहे. त्यासाठी मुस्लीम स्त्रीला तलाक कसा दिला जातो, हे समजून घेतले पाहिजे.

आता अस्तित्वात असलेल्या मुस्लीम व्यक्तिगत कायद्याप्रमाणे पतीने पत्नीला 'तलाक, तलाक, तलाक' असे म्हटले किंवा तशी नोटीस पाठविली... एवढेच काय, तलाक दिल्याबद्दल नुसता निरोप पाठविला, तरी तलाक अमलात येतो. तीन वेळा 'तलाक' शब्दाचा उच्चार मुस्लीम स्त्रीला रस्त्यावर आणतो. अर्थात, तलाक देण्यासाठी ठेवल्या जाणाऱ्या आरोपांमध्ये व्यभिचाराचा आरोप सर्रास वापरला जातो. मात्र मेहरची रक्कम मुळातच जास्त नसते व जास्त असली, तरी कोणीही नवरा ती सुखासुखी देत नाही. त्यासाठी स्त्रीला न्यायालयात जावे लागते. हे सर्व घडत असताना मुलाबाळांची दुर्दशा होते, ती वेगळीच!

क्रिमिनल प्रोसीजर कोडमधील नवीन सुधारणेद्वारा (कलम १२५ अन्वये) पत्नीला पतीपासून पोटगी मिळविता येत होती व कित्येक स्त्रिया त्याचा फायदा घेत होत्या; पण वरील कायद्यातील कलम १२७ (३) ब अन्वये तिचा तो हक्कही हिरावून घेण्यात आला. शिवाय हे सर्व करण्यासाठी स्त्रीला कोर्ट-कचेऱ्या कराव्या लागतात. गरीब मुस्लीम स्त्रिया हे कसे काय करणार? समजा, पोटगी मिळाली, तरी तलाकमुळे व नंतर पोटगी मिळविण्यासाठी केलेल्या सव्यापसव्यामुळे

स्त्रीच्या मनाला झालेल्या जखमा थोड्याच भरून निघतात! पोटगीचे पैसे मिळाले म्हणून काय मुलांना पिता मिळणार आहे? यासाठी असे सहजासहजी तलाक होऊ नयेत, असे मंडळ मानते.

पण खरा प्रश्न आहे तो पुढेच! तलाक देण्याच्या अजूनही काही पद्धती आहेत. त्या सर्व पद्धतींमध्ये पत्नीवर आरोप ठेवून तलाक देण्यात येतो; पण त्या आरोपात कितपत तथ्य असते, हे पडताळून बघण्याची काहीच व्यवस्था नाही. त्यासाठी पतीने पत्नीवर केलेले आरोप न्यायालयात सिद्ध करण्याची जबाबदारी पतीवर असली पाहिजे व जर ते आरोप सत्य असतील, तरच तलाक देण्याबद्दल न्यायालयाने विचार करायला हवा अन्यथा कोर्टापुढे आरोप सिद्ध न करता दिला गेलेला तलाक बेकायदेशीर समजण्यात यावा. तसेच हे सर्व प्रकरण न्यायालयात गेल्यावर पत्नीलासुद्धा आपली कैफियत मांडता आली पाहिजे; पण सध्या तसे काहीच बंधन पुरुषांवर नाही व तो घरबसल्या आपल्या पत्नीस सहजासहजी तलाक देऊ शकतो. जर स्त्रीलाच पुरुषापासून तलाक मिळवायचा असला, तर ती असे काही करू शकते काय? नाही. पत्नीला पतीपासून तलाक मिळवायचा असेल, तर तिला मात्र न्यायालयात जाऊनच तो मिळवावा लागतो, असा हा विचित्र न्याय आहे.

तेव्हा शरीयतच्या नावाने प्रचलित असलेल्या आजच्या कायद्यानुसार पुरुषांवर काहीही कायदेशीर बंधने नाहीत; फक्त धार्मिक बंधने आहेत, पण ती पाळतो कोण? धार्मिक बंधने पाळली नाहीत, तरी त्याचा जाब विचारतो कोण? 'असा बेजबाबदार पती नरकात शिक्षा भोगील' असे सांगून धार्मिक नेते – मुल्ला-मौलवी मोकळे होतात. म्हणजे पत्नीला तिच्याबरच्या खऱ्याखोट्या आरोपांसाठी या जन्मी, या लोकातच शिक्षा व आपल्या पत्नीवर अन्याय करणाऱ्या, ज्याच्या गुन्ह्याबद्दल सगळ्यांना खात्री असते अशा पतीला अपराधाचे प्रायश्चित्त मेल्यानंतर नरकात-परलोकात! या जन्मी तो ख्यालीखुशालीत मस्त राहणार! ही स्त्रियांवर अन्याय करणारी तलाकची घातक पद्धत विसाव्या शतकात, स्त्री-पुरुष समानतेच्या युगात 'शरीयतचा कायदा' म्हणून मुस्लीम समाज उराशी कवटाळून बसला आहे. यात पुरुषी स्वार्थाशिवाय अन्य काय हेतू असणार?

तो कायदाच बदलून घेण्याचा आणि मुस्लीम स्त्रीला न्याय मिळवून देण्याचा मुस्लीम सत्यशोधक प्रयत्न करताहेत. नुसता तलाकचा कायदा बदलून ही मंडळी गप्प बसणार नाहीत. शरीयतच्या कायद्यानुसार स्त्रियांवर होणारा दुसरा ठळक अन्याय म्हणजे, मुस्लीम पुरुषाला एका वेळी चार बायका करण्याचा असणारा अधिकार. याविरुद्धही मंडळ लढा देत आहे; परंतु यातील खरी अडचण म्हणजे, मुस्लीम पुरुषाला एका वेळी चार बायका करण्याचा अधिकार प्रचलित कायद्यानेच दिलेला आहे. हा बहुपत्नीत्वाचा अधिकार देणारा कायदाच बदलण्यास सरकारला भाग पाडणे, हे मंडळ आद्य कर्तव्य समजते.

'तलाक देण्याची पद्धत व चार बायका करण्याचा अधिकार हे आम्हाला धर्माने दिलेले हक्क आहेत' असे जेव्हा मुसलमान समाज म्हणत असतो व 'हा कायदा बदलणे म्हणजे धर्मात ढवळाढवळ' असे म्हणू लागतो, तेव्हा पैगंबरांचा आत्मा स्वर्गात अश्रू ढाळीत असेल, हे निश्चित! कारण पैगंबराच्या वचनांचा इतका विपर्यास पैगंबरांचे अनुयायी म्हणवणाऱ्यांनीच करावा, यापेक्षा

दुर्दैव ते कोणते?

ज्या काळात महंमद पैगंबरांचा जन्म झाला, त्या काळात अरबस्तान हा एक असंस्कृत, मागासलेला व रानटी टोळ्यांचा प्रदेश होता. तेथे गुलामांसारखे स्त्रियांचे बाजार भरत. 'स्त्री' ही उपभोग्य वस्तू (कमॉडिटी) समजली जाई; मालमत्ताच समजली जाई. स्त्रीला पुरुषांप्रमाणेच भावना असतात, सुखदुःख असते, तीही माणूस आहे, हा विचारच ते रानटी अरब करू शकत नव्हते. पैगंबरांनी या रानटी, मागासलेल्या जमातीस स्त्रीकडे बघण्याच्या दृष्टीकोनातच बदल करण्यास भाग पाडले. युद्धात मरण पावलेल्यांच्या विधवांचे हाल होऊ नयेत, मुलांचे पुनर्वसन व्हावे व अनेक बायकांचे कळप बाळगणाऱ्यांना लगाम घालावा या उद्देशाने चार बायका करण्याचा अधिकार त्या काळात पैगंबरांनी दिला. त्यातही अनेक शर्ती घातल्या. स्त्रियांना किमान माणूस म्हणून जगविण्याची यामागे धडपड होती. त्या कायद्यांनाच त्यांचे अनुयायी 'धर्म' म्हणून कवटाळून बसले आहेत?

तलाक कसा द्यावा, किती बायका कराव्यात... या व अशा इतरही अनेक कायद्यांचा संबंध परमेश्वराच्या भक्तीशी नसून माणसामाणसांमधील सद्भावनेशी आहे; समाजाशी व देशाशी आहे. ज्यांचा 'आदत'शी संबंध येतो, त्यालाच जर मुस्लीम समाज धर्म मानत असेल, तर मानोत बापडे... मंडळ मात्र धर्माचे 'आदत' आणि 'इबादत' असे सरळ दोन भाग मानते व 'त्यातील आदतचा भाग परिवर्तनीय असला पाहिजे' असे मंडळाचे स्पष्ट मत आहे. तेव्हा पैगंबरांविषयी अत्यंत आदर बाळगून त्यांनी त्या काळात केलेल्या क्रांतिकारक प्रगतीबद्दल सद्भाव दाखवूनही मंडळ असे मानते की, काळाबरोबर मानवी व्यवहार, कायदे बदलत असतात; नीति-अनीतीच्या संकल्पनापण बदलत असतात; नवीन नवीन मानवी मूल्यांची नवीन काळाशी सुसंगत अशी उभारणी करावी लागते. म्हणून आजच्या काळातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी सातव्या शतकातील, अरबस्तानातील चालीरीतींवर आधारित शरीयतचा कायदा उघडण्याची जरुरी नाही. आधुनिक काळात निर्माण झालेल्या समस्यांची उत्तरे नवीन सामाजिक जाणिवेने, वैज्ञानिक दृष्टीकोन डोळ्यांसमोर ठेवून शोधली पाहिजेत आणि म्हणूनच स्त्रीला जर तलाक द्यायचाच असेल, तर त्यासाठी काजीकडे न जाता आधुनिक राज्यव्यवस्थेने निर्माण केलेल्या न्यायालयात जावे, तेथे आरोप सिद्ध करावेत, आणि मगच घटस्फोट व्हावा. जर स्त्रीला न्यायालयात जाऊनच घटस्फोट घेता येतो, तर तोच मापदंड पुरुषाला का नसावा?

या आधुनिक जगात स्त्रीकडे बघण्याचा समग्र दृष्टीकोन बदलला आहे. सातव्या शतकातील परिस्थितीचा मागमूसही आता नाही. 'सर्व स्वातंत्र्यांचा भोक्ता एकटा पुरुषच' ही भावनाच चूक आहे. केवळ 'धर्मात सांगितले आहे', 'तो आमचा हक्क आहे', 'त्यात बदल म्हणजे आमच्या धर्मात ढवळाढवळ' अशी आरोळी ठोकणाऱ्या सनातन्यांना जग कोठे चालले आहे, हेच माहीत नसावे.

१) जगातील अनेक मुस्लीम राष्ट्रांनीही या बाबतीत नवीन काळाशी सुसंगत असे कायदे बनविले आहेत. आता तेथे शरीयतचे कायदे चालत नाहीत. आधुनिक मूल्यांना अनुसरूनच संपूर्णपणे नव्हे; पण निदान काही प्रमाणात तरी नवीन कायदे चालतात. मुल्ला-मौलवींच्या व

धार्मिक म्हणविणाऱ्यांच्या ध्यानीमनीही हे नसावे, हे आश्चर्यच नव्हे काय?

२) आता प्रचलित असलेला मुस्लीम व्यक्तिगत कायदा हाही इंग्रजांनी बदल करूनच बनविलेला कायदा आहे.

३) फौजदारी कायदा तर केव्हाच बदलला गेला आहे. फौजदारी गुन्ह्यांसाठी शरीयतचा कायदा चालत नाही. भारतीय दंडसंहिता लागू होते. इंग्रजांनी केलेल्या या बदलामुळे जर धर्म धोक्यात आला नव्हता, ती धर्मात ढवळाढवळ नव्हती, तर लोकशाही पद्धतीने निवडून दिलेले सरकार स्त्रियांना हक्क मिळवून देणारे कायदे बनवू पाहते, ती धर्मात ढवळाढवळ कशी ठरू शकेल? हे अजब तर्कशास्त्र आहे.

स्त्रियांना हक्क मिळवून देण्यासाठी, त्यांच्यावर अन्याय करणारे कायदे बदलून घेण्यासाठी मंडळ झगडणारच आहे. हे सर्व करताना मंडळाच्या सदस्यांना जरी धर्म मोडणारे काफिर, बंडखोर असे काहीही म्हटले, तरी त्यांना दिलेल्या या पदव्यांचा ते आनंदाने स्वीकार करतील; पण आता माघार घेणार नाहीत. एवढेच नव्हे, तर यापुढे जाऊन वस्तुस्थिती अशी आहे की, या देशात सर्व नागरिक समान आहेत, सर्वांना सारखेच हक्क आहेत, घटनेने सर्वांना समान नागरिकत्व बहाल केले आहे. सर्वांना लागू पडणारा फौजदारी कायदाही एकच आहे; मग सर्व नागरिकांना समान लेखणारा, हिंदू-मुस्लीम भेदभाव न करणारा मुलकी समान नागरी कायदा का नको? सर्व नागरिकांना लागू होणारा असा समान नागरी कायदा व्हावा म्हणूनही मंडळ झगडणार आहे. असा समान नागरी कायदा केल्यास राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने उचललेले ते एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. समान नागरी कायदा हा समानता, समान नागरिकत्व, धर्मनिरपेक्षता या महत्त्वाच्या विषयांशी संबंधित आहे. मात्र व्यक्तिगत कायद्यातून बाळगण्यात येणारा अलगतावाद आणि धर्मवादी राजकारण हे राष्ट्रीय एकात्मतेसमोर मोठे अडथळे ठरतात.

अलीकडे असे दिसून येते की, हमीद दलवाईंनी १८ एप्रिल १९६६ रोजी सात मुस्लीम महिलांचा मोर्चा काढून तेव्हाचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्याकडे व्यक्तिगत कायद्यातील बदलाची किंवा संविधानाच्या ४४व्या कलमाची अंमलबजावणी करण्यासाठी समान नागरी कायद्याची मागणी केली होती. या घटनेलाही पन्नास वर्षे उलटली आहेत. मात्र व्यक्तिगत कायद्यात काडीचाही बदल झाला नाही किंवा समान नागरी कायद्यासाठी 'मसुदा' ही बनवला गेला नाही. यास पोर्तुगीजांनी तयार केलेला गोव्यातील समान नागरी कायदा आणि अलीकडे उत्तराखंड अपवाद ठरले आहेत.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सातत्यपूर्ण मागणीमुळे, लोकशिक्षणामुळे समाजात तोंडी एकतर्फी तलाकच्या विरोधात काही महिला संघटना उभ्या राहिल्या आहेत व संघर्ष करीत आहेत. डॉ. असगर अली इंजिनिअर आदींची उदारमतवादी इस्लामची भूमिका घेऊन 'इस्लामच्या तत्त्वज्ञाना'चा आधार घेत एकतर्फी तोंडी, लिखित तलाक यांविरोधात काही संघटना पुढे आल्या आहेत.

हमीद दलवाईंची भूमिका अधिक बुद्धिवादी आणि संविधानात्मक मूल्यांवर आधारित स्त्री-पुरुष समतेच्या दिशेने जाणारी होती आणि तीच भूमिका मंडळाने कायम ठेवली आहे. समावेशकता

व समन्वय म्हणून या अन्यायी प्रथांच्या विरोधात असलेले सगळे आपले साथी आहेत. या मुद्द्यांपुरती का होईना, प्रश्नांची उकल करण्यासाठी हा समन्वय महत्त्वाचा वाटतो.

शहाबानोनंतर शबानाबानो प्रकरण आले व आता सायराबानोचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे. या तिघींनाही मंडळाने केवळ समर्थनच दिले नाही, तर या त्यांना पुण्यात आणून त्यांचा सत्कार केला व त्यांच्या लढ्यात सहभाग व पाठिंबा नोंदवला.

भाजपप्रणित सरकारच्या भूमिकेमुळे विधी आयोगाने प्रश्नावलीस प्रतिसाद मागवला; परंतु जमात-ए-इस्लामी व मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड यांनी याला विरोध करीत पुन्हा समाजाची व मुस्लीम महिलांची दिशाभूल करुन महिलांनाच महिलांच्या विरोधात उभे केले आहे. हमीद दलवाईंच्या काळात जे झाले होते, तेच पन्नास वर्षांनंतर आपण अनुभवत आहोत. असे असले तरी हा पेच सुटण्याच्या दृष्टीने सकारात्मक वातावरण दिसत आहे व एकतर्फी तलाकच्या प्रश्नावर कायदेशीर मार्ग काढला जाईल, अशी आशा वाटते. तथापि मुस्लीम महिलांसाठी 'तोंडी-एकतर्फी तलाक' हाच एक प्रश्न नाही, तर 'बहुपत्नीत्व-हलाला' सारखेही प्रश्न आहेत. तसेच 'जरी 'तलाक-ए-हसन'मार्फत तलाक दिला गेला (म्हणजे एक-एक महिन्याच्या अंतराने दिलेला तलाक), तरी ही प्रक्रिया न्यायालयामार्फतच झाली पाहिजे' अशी मंडळाची भूमिका आहे. यासाठी शरीयत अदालत नको. तर सर्वच महिलांसाठी कुटुंब न्यायालयांची संख्या वाढविण्याची मागणी मंडळ करीत आहे. त्यास महाराष्ट्र शासनाने अनुकूल प्रतिसाद दिला आहे. महाराष्ट्रात अशा कुटुंब न्यायालयांची संख्या वाढवण्यात आली आहे.

स्त्री-पुरुषांना समान अधिकार, सेक्युलर मूल्यांचा प्रसार व राष्ट्रीय एकात्मतेसाठी समान नागरी कायदा किंवा समान कुटुंब कायदा ही आजच्या काळाची गरज आहे. यासाठी शासनदरबारी मागणी करीत असतानाच विविध उपक्रमांतून मंडळ लोकशिक्षणही करीत आहे. जोपर्यंत असा कायदा निर्माण होत नाही, तोपर्यंत मंडळ विशेष विवाह कायदा १९५४, म्हणजेच नोंदणी पद्धतीने विवाह करण्याबाबत जनजागृती करीत आहे. नोंदणी पद्धतीने विवाह अनिवार्य केल्यास नव्वद टक्के प्रश्न निकाली निघतील.

२२ ऑगस्ट २०१७ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सायराबानो प्रकरणात निवाडा देऊन 'तलाक-ए-बिद्दत' म्हणजे बाईट पद्धतीने दिलेला, धर्मसंमत नसणारा तलाक हा असांविधानिक असल्याचे स्पष्ट केले. असा तलाक बेकायदेशीर ठरवला; केंद्र शासनाने तलाकबंदी विधेयक आणले आणि मनमानी तलाक होण्यावर मर्यादा आणल्या. यातून तोंडी तलाकच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली; पुरुषी, बेलगाम वर्तनावर अंकुश आला. हे खरे असले, तरी मुस्लीम महिलांच्या तलाक, बहुपत्नीत्व, हलाला वगैरे समस्या अद्याप आहेत तशाच आहेत. या संदर्भात मंडळाने केलेल्या प्रयत्नांचा आढावा विचारात घेणे उपयुक्त ठरेल.

अ. मुस्लीम महिला परिषद, पुणे

भारतीय मुस्लीम महिलांच्या सामाजिक समस्यांची चर्चा करण्यासाठी आणि धर्म आणि रूढींच्या बंधनात खितपत पडलेल्या भारतीय मुस्लीम स्त्रियांना उन्नतीसाठी एकत्र आणून सुधारणेची चळवळ उभारण्यासाठी मुस्लीम जगतातील पहिलीच परिषद दिनांक २७-२८ डिसेंबर, १९७१ रोजी पुण्यात, राज्य शिक्षण संस्था सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या दोन दिवसीय परिषदेसाठी अखिल भारतातून २५० प्रतिनिधी उपस्थित होते. मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती.

'पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या निर्विवाद व कर्तव्यदक्ष राष्ट्रीय नेतृत्वाने सर्व धर्मीयांना सारखेच लागू होणारे नागरी कायदे लागू करण्यात येतील आणि जीर्ण-शीर्ण झालेला १९३७चा शरीयत कायदा इतिहासजमा होईल' अशी अपेक्षा उपस्थित प्रतिनिधींनी व्यक्त केली होती. शरीयत कायद्याने मुस्लीम महिलांना सामाजिक न्याय कायमच नाकारलेला असल्याची उपस्थित कार्यकर्त्यांची धारणा होती. कायदेतज्ज्ञ प्रा. असफ ए. ए. फैजी यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन झाले. त्यांनी मुस्लिमांच्या सनातनी धर्मांधतेवर कडाडून हल्ला चढविला. ते म्हणाले की, 'शरीयत कायद्याप्रमाणे मुस्लीम पर्सनल लॉच्या प्रत्यक्षात सुरू असलेल्या अंमलबजावणीमुळे मुस्लीम महिलांना आजपर्यंत अनंत यातना भोगाव्या लागत आहेत. म्हणून तो बाद करुन सर्व धर्मीयांना समान असा नागरी कायदा अस्तित्वात आला पाहिजे.'

'शरीयत कायद्याने लग्न, घटस्फोट, वारसा आणि पालकत्वाचे हक्क यांचे नियंत्रण होते. तो कायदा ब्रिटिशांनी बनविला होता. वस्तुतः समाज कल्याणासाठी आझाद भारतात त्या कायद्यात सुधारणा होणे आवश्यक होते. पण दर वेळी धर्मात हस्तक्षेप होत असल्याच्या आरोळ्या ठोकून धर्मांध मुस्लीम पुढाऱ्यांनी समाज कल्याणाची वाट लावली. खिलाफत अस्तित्वात असलेल्या तुर्कस्तानातील शरीयत कायदा बाजूला सारुन सर्व जनतेसाठी तेथे नागरी कायदा अस्तित्वात आला आहे. तसेच अनेक प्रमुख मुस्लीम देशांत शरीयत कायद्याचे कालसापेक्ष अर्थ काढून महिलांना न्याय्य व समान अधिकार देणारे कायदे आणण्यात आले आहेत. शरीयत कायद्याचा धर्माशी मुळींच संबंध नाही. तसा तो असल्याचे म्हटले जाते, तेव्हा ती राजकीय बंडलबाजी असते. मुस्लीम महिलांनी शरीयत कायद्याचे चौदाशे वर्षांचे जोखड भिरकावून द्यावे.' भारतातील मुस्लीम समाजात क्रांती व सुधारणा घडवून आणण्याच्या कामी मुस्लीम नेत्यांचे दुर्लक्ष झाल्याबद्दल प्रा. फैजी यांनी टीका केली. 'एकाही शब्दाचा अर्थ कळत नसलेली अरबी प्रार्थना म्हणण्यात काय हशील?' असाही प्रश्न त्यांनी विचारला. परिषदेच्या अध्यक्ष व अहमदनगरच्या प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती शरिफा तैय्यबजी यांनी उपस्थित महिलांना आवाहन केले की, 'फक्त उर्दू भाषक शाळेतच शिक्षण दिल्याने सबंध समाजहिताला बाधा निर्माण होते. म्हणून फक्त उर्दू शाळांमधून मुलींना शिक्षण देण्यात येऊ नये. भारतातील मुसलमानांना आज दिले जाणारे शिक्षण प्रागतिकच असणे अनिवार्य आहे.' कुटुंब नियोजन मोहिमेत अहमहमिकेने

हमीद दलवाई, बाबुमियाँ बँडवाले, ॲड. नजमा शेख, मरियम रिफाई आणि इतर

भाग घेण्याचे आवाहन करताना श्रीमती तैय्यबजी यांनी एक इशाराही दिला की, 'त्यातून धर्माला बाजूला सारा. आपण बदलत्या काळानुसार बदलला नाहीत, तर बुडून जाल.' 'न्याय आणि समान हक्क मिळवण्यासाठी आज मुसलमान स्त्रिया प्रचंड लढा द्यायला सिद्ध झाल्या आहेत. आता त्यांना कोणीही अडवू शकणार नाही. सध्या मुसलमान पुरुषाला 'तलाक' हा शब्द केवळ तीनदा उच्चारून बायकोला घटस्फोट देता येतो. त्याऐवजी यासाठी लहान न्यायालय स्थापन करण्यात यावे' असे श्रीमती तैय्यबजी म्हणाल्या. शरीफा तैय्यबजी यांनी बांग्लादेश मुक्तीबद्दल पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचा गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख केला. 'मुल्ला-मौलवींनी हिंदुस्थानचाच नाही, पण पाकिस्तानचाही विध्वंस केला आहे. या मौलवींची गुंडगिरी चालत असल्यामुळे मुसलमान समाजात सामाजिक सुधारणेचे व स्त्री-विमोचानाचे कार्य करण्यासाठी सुसंस्कृत व्यक्ती पुढे येत नाहीत' असे परखड उद्‌गार 'परचम-ए-हिंद' या उर्दू साप्ताहिकाचे संपादक अनिस-उर्-रहिमान यांनी काढले. 'आपला दबाव कायम ठेवण्यासाठी मुल्ला-मौलवी प्रागतिक मंडळींचा काटा काढण्यासही बिलकूल कच खात नाहीत' असा धमकीवजा इशारा रहमान यांनी दिला. 'इस्लामला सामाजिक सुधारणा व स्त्री-विमोचन निषिद्ध नाही' असे अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक, समाज कार्यकर्ते व मंडळाचे अध्यक्ष बाबुमियाँ बँडवाले म्हणाले. इंडियन सेक्युलर सोसायटीचे अध्यक्ष प्रा. अ. भि. शाह म्हणाले की, 'भारतातील सहा कोटी मुसलमान अज्ञान-अंधकारात राहिले, मागासलेले राहिले तर भारताची प्रगती होणार नाही. समान नागरी कायद्यासाठी कोट्यवधी मुसलमान स्त्रियांच्या सह्यानिशी एक निवेदन पंतप्रधान

श्रीमती इंदिरा गांधी यांना सादर करावे. अन्य मुस्लीम देशाने तयार केलेले प्रागतिक कायदे भारतातील मुस्लीम महिलांना उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत' असे दिल्ली येथील प्रतिनिधी श्रीमती सुलताना फैजी यांनी सांगितले.

'मुस्लीम पर्सनल लॉ कायद्याच्या आधारे एखाद्या पुरुषाने पुनर्विवाहासाठी पत्नीला घटस्फोट दिल्यास तिने सत्याग्रह करावा' असे लेखक आणि विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सुचविले.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी विविध मान्यवरांनी विचार मांडले. त्याचबरोबर ठराव संमत करण्यात आले. श्रीमती आस्मा मस्कती (सुरत) यांनी महिला व आर्थिक स्वावलंबन विषयक ठराव मांडला. 'मुस्लीम महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी त्यांना व्यवसाय-उत्पन्नाचे शिक्षण देण्याच्या दृष्टीने सरकार, विचारवंत व खाजगी संघटना यांनी कार्यक्रम आखावा, तसेच सहकारी बँका, समाजकल्याण खाते, लघुउद्योग, महामंडळे यांनीही महिलांसाठी आर्थिक चळवळीचे योग्य कार्यक्रम आखावेत' अशी मागणी ठरावात करण्यात आली. कार्यकर्त्या सबा जैदी पाठिंबा देताना म्हणाल्या की, 'मुस्लीम स्त्रियांनी यापुढील काळात स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. तरच त्यांना आपल्यावरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवता येईल.' अभ्यासक व कार्यकर्त्या जहाँआरा बेगम या ठरावावर बोलताना म्हणाल्या, 'शासन या बाबतीत सहकार्य करेल, परंतु आपण मागे राहिलो, तर आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ शकणार नाही. त्यासाठी शिक्षणाबरोबर समाजात मिसळण्याची सवय ठेवली पाहिजे.' दिल्लीच्या फखरबेगम ठराव मांडताना म्हणाल्या, 'समान नागरी कायदा निर्माण झाल्याशिवाय मुस्लीम स्त्रियांना स्वातंत्र्य मिळणे अशक्य आहे.' मिनाबाई बँडबाले यांनी ठरावाला पाठिंबा दिला. अनेक मुस्लीम महिलांनी या ठरावावर बोलताना 'द्विभार्या प्रतिबंधक कायदा व्हावा, मुस्लीम महिलांनाही घटस्फोटाचा अधिकार मिळावा, संपत्तीत योग्य हिस्सा मिळावा.' अशा मागण्या केल्या.

'धार्मिक नियम अथवा परंपरा यांचा मुलाहिजा न ठेवता कुटुंब नियोजनाबद्दलचे आपले धोरण ठरविण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. धर्म आणि तत्त्वप्रणाली यांचे नाव घेऊन काही बुरसटलेली मंडळी याला विरोध करतात. ही परिषद या गोष्टींचा निषेध करते.' असा ठराव बिनविरोध मंजूर झाला. पुण्याच्या मरियम शेख यांनी तो मांडला व इचलकरंजीच्या पालिका सदस्य बानूबी पठाण यांनी त्याला पाठिंबा दिला. पाठिंबा देताना त्या म्हणाल्या, 'विरोध करणाऱ्या माणसांना आपण आपली भूमिका समजावून दिली पाहिजे. मुस्लीम समाज दारिद्र्यातून वर यायचा असेल आणि त्यांची मुले सुशिक्षित बनून त्यांना समृद्धीचे जीवन उपलब्ध करून द्यायचे असेल, तर हे आवश्यक आहे.' या ठरावावर आयेशा शेख , जैतून अथणीकर व अनेक महिलांची समर्थनार्थ भाषणे झाली आणि त्यात 'कुटुंब नियोजनाला विरोध करणाऱ्या मौलावींच्या प्रचाराला बळी पडू नये' असे आवाहन करण्यात आले.

'मुस्लीम मुले आणि मुली यांना आधुनिक, व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांना सरकारने विशेष प्रोत्साहन द्यावे, मुस्लीम संस्थांनी चालविलेल्या शाळांमध्ये बुरसटलेल्या विचारांचे लोक

करत असलेल्या पैशाच्या दुरुपयोगाला प्रतिबंध करावा.' असाही ठराव मंजूर करण्यात आला. हा ठराव सुरत महापालिकेच्या सदस्या आस्मा मस्कती यांनी मांडला आणि दिल्लीच्या सबा जैदी यांनी त्याला पाठिंबा दिला. या ठरावावर दिल्लीच्या नाट्यशास्त्राच्या विद्यार्थिनी एन. शेहर यांच्याबरोबर इतर महिलांची भाषणे झाली. काँग्रेस महिला फ्रंटच्या सौ. ॲड. अनिता पवार या मुस्लीम महिलांच्या जागृतीचे स्वागत करताना म्हणाल्या, 'न्याय्य हक्कांसाठी या जागृतीचा उपयोग करून घेतला पाहिजे.' राज्यसभेच्या माजी सदस्य ताराबाई साठे यांनी परिषदेचे स्वागत करून 'मुस्लीम महिलांच्या हक्कासाठी इतर महिलाही प्रयत्न करतील' असे आश्वासन दिले. तसेच 'धर्म आणि कायदा यांची कोणीही करू नये. धर्म हा वैयक्तिक सुखशांतीसाठी आहे, तर कायदा हा सामाजिक उद्दिष्टांसाठी आहे. म्हणून धर्माच्या नावाखाली या कायद्याला कोणी विरोध करू नये. तसा विरोध झाल्यास घरोघरी व गल्लोगल्ली फिरून सभा घेऊन मतपरिवर्तन करणे आवश्यक आहे' असेही सांगितले. श्रीगोंद्याच्या सलमा सय्यद यांनी द्विभार्या प्रतिबंधक कायदा त्वरित लागू करण्याची मागणी केली. सासवडच्या श्रीमती हबाबी शेख यांनी कुराणातील दाखले देऊन शरीयत कायद्यातील तरतुदींचे जाचकपण स्पष्ट केले.

हमीद दलवाई यांनी परिषदेचा समारोप केला. परिषद यशस्वी व्हावी म्हणून ॲड. नजमा शेख, सय्यदभाई, कमल पाध्ये, मकबूल तांबोळी, यूसुफ शेख, शमिमा अत्तार, मुमताज मोमीन यांनी परिश्रम घेतले. परिषदेसाठी पुण्यातील संयुक्त स्त्री-संघटना, राष्ट्र सेवा दल, समाजवादी महिला सभा, जनसंघ महिला आघाडी इत्यादी संघटनांच्या सुमारे ५० महिला कार्यकर्त्याही उपस्थित होत्या.

परिषदेनंतर मंडळाचे कार्यकर्ते आणि समविचारी संघटनेचे नेते, कार्यकर्ते यांची महाराष्ट्र राज्य मुस्लीम महिला परिषदेनिमित्त पुण्यातील सेवासदन सभागृहात, २२ डिसेंबर, १९७१ रोजी बाबुभियाँ बँडवाले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. या सभेत प्रा. गं. बा. सरदार, प्रा. अ. भि. शहा, यमुताई किर्लोस्कर, आस्मा मस्कती, तारा शास्त्री, जयश्रीबाई वैद्य, मालिनीबाई तुळपुळे, आबाबेन देशपांडे आणि हमीद दलवाई यांची भाषणे झाली. या सभेत 'बांग्लादेशच्या स्वातंत्र्यामुळे भारतातील मुस्लीम समाजाच्या परिवर्तनाची समस्या सुकर झाली आहे. मुस्लीम समाजाने जागृतपणे आधुनिकतेकडे तोंड वळविले, तर हा समाज हिंदूंच्या पेक्षाही अधिक प्रगती करू शकेल' अशा आशयाचे विचार प्रा. गं. बा. सरदार यांनी व्यक्त केले. यमुताई किर्लोस्कर म्हणाल्या, 'या देशातील सर्व समाज एकत्र आल्याखेरीज देशाची प्रगती होणार नाही. सामाजिक एकता निर्माण होण्यासाठी भाषा हे एक चांगले माध्यम आहे. म्हणून महाराष्ट्रातील सर्व जातीजमातींच्या आणि धर्माच्या मुलांना मराठी भाषेतून शिक्षण दिले पाहिजे.' त्या पुढे असे म्हणाल्या की, 'हिंदू कायद्यात सुधारणा झाल्या असल्या, तरी त्या अद्यापि कागदावरच आहेत. मुस्लीम महिला परिषदेने केलेल्या सर्व मागण्यांशी पुण्यातील महिला सहमत आहेत. पुण्यातील मुस्लीम महिलांनी त्यांचे धार्मिक सण, समारंभ स्वतंत्रपणे साजरे केले, तरी महिला मंडळाचे व्यासपीठ त्यांच्यासाठी खुले आहे. तारा शास्त्री म्हणाल्या, 'स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले आहे असे म्हटले जाते, पण प्रत्यक्षात तसा अनुभव येत नाही. स्त्रियांनी आपल्या हक्कांसाठी सदैव बंडखोर

वृत्ती स्वीकारली पाहिजे.' जयश्री वैद्य म्हणाल्या, 'बायका गप्प बसल्या म्हणून आजपर्यंत अंधारात राहिल्या. त्यांना स्वतःची गुलामगिरी घालवून द्याबी लागेल. मुस्लीम महिलांनी आपले हक्क मिळवून घेण्यासाठी स्वतःच्या मनाची तयारी केली पाहिजे; हिंदू महिला त्यांना जरूर मदत करतील.' 'पंतप्रधान पुण्यात येतील त्या वेळी मुस्लीम महिलांनी त्यांना भेटावे व आगामी निवडणुकीत या विषयावर भर द्याबा' असे मालिनीबाई तुळपुळे यांनी सुचविले. 'मुस्लीम महिला परिषदेत संमत झालेले ठराव हे मौलवींना दिलेले आव्हानच होय' असे सांगताना गांधीवादी कार्यकर्त्या आबाबेन देशपांडे म्हणाल्या, 'मुस्लीम समाजावरील अन्याय तरी दूर करा, किंवा तुम्ही तरी दूर व्हा' असे मौलवींना सांगण्याची वेळ आली आहे.'

'पुण्यात भरलेली परिषद यशस्वी करण्यासाठी हिंदू समाजाकडून आपणास चांगला प्रतिसाद मिळाला' असे सांगताना हमीद दलबाई म्हणाले, 'मुस्लीम महिलांनीच आपल्या प्रश्नांना वाचा फोडली पाहिजे, या भूमिकेतून मी या परिषदेत बोललो नाही. मुस्लीम महिलांनी आपल्या समाजात व्यापक स्वरूपात आपले विचार मांडले पाहिजे. आपण हिंदू-मुसलमान जुने मतभेद विसरून नवा भारत घडविण्यासाठी एकत्र येऊ या! मुस्लीम समाजात जागृती निर्माण झाली, तर त्याला वळण लावून नवविचाराकडे झुकविणे सोपे जाईल. त्यासाठीच आम्ही प्रयत्न करीत आहोत' असे मत व्यक्त करून दलवाई यांनी सर्वांचे आभार मानले.

सुरतच्या आस्मा मस्कती म्हणाल्या, 'अज्ञानी व दरिद्री मुस्लीम समाज पुढे जाण्यास हिंदू समाजानेही प्रयत्न करावेत.' बाबुमियाँ बँडवाले म्हणाले, 'गरज संपल्यावर ही संस्था केवळ 'सत्यशोधक' म्हणूनच काम करेल.' शेवटी ॲड. नजमा शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

ब. मुस्लीम महिलांचे मनोगत

२६, २७ डिसेंबर १९७१ रोजी पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या मुस्लीम महिला परिषदेमध्ये विविध भागांतून सहभागी झालेल्या काही मुस्लीम महिलांनी आपले मनोगत निर्भीडपणे व्यक्त केले. तलाकबंदी, बहुपत्नीत्व, मालमत्ता हक्क, शैक्षणिक व आर्थिक स्वावलंबन यांसारख्या प्रश्नांवर या महिलांनी आपले अनुभव व्यक्त केले.

काही मुस्लीम स्त्रियांनी बुरखा पद्धतीचा त्याग केल्याच्या सुधारणेला फार वर्ष लोटली नाहीत, पण आपल्या मनावरचा वैचारिक बुरखा दूर करायला, तसेच तो दूर केला असल्याचे बाहेरच्या जगाला सांगायला मुस्लीम परिषदेने मंच उपलब्ध करून दिला आहे. या परिषदेसाठी जमलेल्या उत्साही प्रतिनिधित्वात दिल्लीतील इंद्रपुरीपासून छोट्या, सासवडच्या गल्लीपर्यंतच्या महिलांचा समावेश होता. विशेष म्हणजे, या सर्व महिला स्वतः पदरमोड करून पुण्यापर्यंत पोहोचल्या होत्या आणि त्यांच्यापैकी बहुतेकींची स्थिती मध्यम वर्गीयांत मोडणारी होती. अनेक जणी केवळ वृत्तपत्रात बातमी वाचल्यावर निमंत्रणाची वाट न पाहता ही परिषद म्हणजे घरचे कार्य समजून त्यात सहभागी होण्यासाठी आणि परिषदेच्या उद्दिष्टांना हातभार लावण्यासाठी आल्या होत्या. केवळ वास्तव्याच्याच नव्हे, तर वय आणि पेशा या दृष्टीनेही विविध स्तरांतील मुस्लीम

प्रा. अ. भि. शहा, हमीद दलवाई, असफ ए. ए. फैजी.

महिला उपस्थित होत्या. वयाच्या सोळा-सतरा वर्षापासून ते साठी ओलांडलेल्या या महिला शिक्षक, प्राध्यापक या पेशापासून विद्यार्थी आणि गृहिणी इथवर सगळ्या घटकांमधील होत्या. या महिलांनी आणि सोबत आलेल्या आया-आज्यांनी बुरखा घातलेला नव्हता. या महिला बोलत असताना बुरखा पद्धतीवर कडाडून हल्ले चढवत होत्या. 'ज्यांच्यासाठी ही परिषद भरविली गेली, त्या बुरख्यात अडकून पडलेल्या महिलाच इथे नाहीत' असं कुणीतरी म्हटलं. तेव्हा एक महिला म्हणाली 'त्या इथे कशा असतील? बुरख्यातून बाहेर पडायला मिळालं तरंच त्या इथे येणार ना? पण लक्षात ठेवा, त्या इथे आल्या नसल्या, तरी त्यांच्या प्रतिनिधी म्हणून आम्ही इथे आलेलो आहोत.' परिषदेतील मुस्लीम महिलांचे हे नवे दर्शन अत्यंत विलोभनीय होते. पुण्याच्या एका प्रसिद्ध तालुक्यात मुख्याध्यापिकेच्या पदावर असलेल्या एका स्त्रीला शाळेत जाता-येताना बुरखा घ्यावा लागत होता, ही वस्तुस्थिती होती. बुरख्याविना ती पुण्यात हिंडली! 'जिंदगी भर की आदत' पडल्याने आपल्या गावी तिला बुरख्याचे काही विशेष वाटत नव्हते. पण इथे, बुरख्याविना पहिल्यांदा मोकळेपणाने फिरताना तिला खुल्या हवेचा अनुभव मिळाला. म्हणून आपल्या गावी बुरखा पद्धती उठावी म्हणून ती जोरदार प्रयत्न करणार होती. ही या मुस्लीम परिषदेची मोठी फलश्रुती होती. परिषदेमध्ये 'शादी' आणि 'तलाक' या विषयावर अत्यंत कडाडून चर्चा झाली. मुस्लीम पुरुषाला एकाहून अधिक बायका करता येतात, भाजीची जुडी फेकून द्यावी तशा सहजतेने 'तलाक-तलाक-तलाक' असे तीनदा उच्चारून बायकोची धोंड दूर करता येते... याबद्दल सार्वत्रिक चीड दिसून आली. या मनमानी प्रवृत्तीमुळे तलाक

मिळालेल्या स्त्रीची अवस्था अनुकंपनीय होते, यावर सर्वसहमती होती. 'नुकतंच लग्न झालं असेल, मूलबाळ झालेलं नसेल, तर एखाद्या घटस्फोटित स्त्रीचा साहजिकच पुनर्विवाह होऊन जातो. पण पदरी चार कच्चीबच्ची असलेल्या, मध्यम वयाच्या चौकटीत बंद झालेल्या स्त्रीला घटस्फोट दिला गेला, तर तिने काय करायचं? अशा अनेकांजवळ शिक्षण नसतं. 'अगदी वाटेल ते काम करू' असं ठरवलं तर तथाकथित मध्यम वर्गीय प्रतिष्ठा स्वयंपाक-पाणी, धांडी घासणे अशी कामे करू देत नाही. त्याऐवजी तिला आश्रय देणाऱ्यांना तिला मोलकरणीप्रमाणे वागवून घेणं अधिक सोयीचं आणि प्रतिष्ठेचं वाटतं.' अशी अत्यंत कडवट प्रतिक्रिया एका महिलेने बोलून दाखवली. हे तलाक विचित्र आणि विविध कारणांवरून दिले जात असल्याचा एक किस्सा एका महिलेने ऐकवला. 'अचानकपणे आजारी पडलेल्या आपल्या बहिणीच्या शुश्रूषेसाठी म्हणून एक स्त्री आपल्या बहिणीकडे नवऱ्याच्या अनुपस्थितीत गेली. आजाराने मुक्काम वाढवला, म्हणून या महिलेला तो वाढवणे भाग पडले. आपल्याला न कळविता माहेरी गेली म्हणून तिला तलाक देण्यात आला होता.' दुसऱ्या एका महिलेने सांगितले की, 'तिच्या बहिणीला काही दुखणे जडले होते. त्याची अधिकची वैद्यकीय तपासणी करून उपचार योजनेच्या खर्चापेक्षा तिच्या मेव्हण्याला दुसरे लग्न करणे अधिक सोपे वाटले.' एका प्राध्यापकाची सत्यकथा अशी की, आपल्या एका तरुण विद्यार्थिनीशी लग्न लावून त्याने आपल्या सहधर्मचारीणीला सोडून दिले. पदरी आठ अपत्ये असलेली ही स्त्री आपल्याला या परिषदेत काहीतरी न्याय मिळेल या आशेने आली होती. आणखीन एक हास्यास्पद उदाहरण म्हणजे, लग्नानंतर आठ दिवसांतच डोक्याचा आकार 'बाजवीपेक्षा मोठा आढळला' म्हणून तलाक देण्यात आलेल्या एका नववधूचा चमत्कारिक किस्सा उपस्थितांनी ऐकला. महाविद्यालयीन विद्यार्थिनी असलेल्या एका युवतीने असे मत मांडले की, 'मुस्लीम समाजात वधू-वरांना एकमेकांना पाहता येत नाही; आई-बडिलांनी पसंत केलेल्या जोडीदाराशी थेट लग्न करावे लागते. विवाहाची ही पद्धत मोडून काढली पाहिजे. एकमेकांना पाहून आपल्या खुशीने लग्न जमली, तर तलाकची प्रकरणे उद्भवणार नाहीत.'

परिषदेत एक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे, 'पुरुषांना बहुपत्नीत्वाचा अधिकार आहे, म्हणून स्त्रियांना बहुपतीत्वाचा अधिकार मिळावा' अशी भावनिक मांडणी कोणीही केली नाही. बहुपतीत्व स्त्रीला बदनामीच्या चिखलात रुतवेल, असे सर्वांना वाटत होते. 'स्त्रीला सवत नसावी' एवढीच त्यांची मागणी होती.

तलाकचा प्रश्न असो किंवा कुटुंब नियोजनाचा किंवा आर्थिक स्वावलंबनाचा... स्त्रीने नव्या, आधुनिक शिक्षणाचा स्वीकार केला पाहिजे आणि तशी संधी महिलांना उपलब्ध करून दिली पाहिजे. 'शिक्षण म्हणजे अनेक सामाजिक दुखण्यांवरचा उपाय आहे' असेच या स्त्रिया म्हणत होत्या. 'आपल्याला शिक्षण मिळाले नाही, तरी आपल्या मुलींना शिक्षण मिळायला हवे. त्यांनी शाळा-महाविद्यालयात जायला हवे. याशिवाय मुस्लीम महिलांची प्रगती होणार नाही.' 'शिक्षण मिळाले नाही, म्हणून आमचे हक्क आम्हाला मिळत नाहीत' अशी कैफियत एका स्त्रीने मांडली. 'चार बायका करण्याचा कायदा इस्लाममध्ये मौज-मजेसाठी नाही. अनाथ, अपंग महिलेला आधार देण्यासाठी कुराणने चार बायका करण्याची परवानगी दिली आहे आणि ही संधीदेखील

चारही बायकांना समानतेने वागवणाऱ्यालाच दिली आहे! इतर वेळा बहुपत्नीत्वाला धर्माचा मुळीच पाठिंबा नाही. आम्हाला शिक्षण मिळालं नाही, म्हणून आम्ही काही वाचत नाही आणि वाचत नाही, म्हणून स्त्रियांचं असं झालं आहे, हे आम्हाला काही कळत नाही. शिक्षणाच्या अभावामुळेच मुस्लीम समाजात कुटुंब नियोजनाबद्दल उदासीनता दिसून येते. अशा नियोजनामुळे आपल्या जमातीचं इतर जमातींतलं अस्तित्व कमी होईल, अशी भीती दाखवली जाते आणि अपप्रचार केला जातो. शस्त्रक्रिया करायची ठरल्यास पुरुष शस्त्रक्रिया टाळतात आणि ती महिलांवर लादतात. एका महिलेने कुटुंब नियोजनाचे समर्थन करून आपल्या आई-बहिर्णींना कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवून देण्याचे आवाहन केले.' एका महिलेने तर अविवाहित राहून, शिक्षण घेऊन, डॉक्टर होऊन कुटुंब नियोजनाचा प्रसार करण्याचे आयुष्याचे प्रयोजन ठरवणार असल्याचे सांगितले. 'स्वतःच्या मनाप्रमाणे शिक्षण घेण्याचं, पुढे पती निवडण्याचं स्वातंत्र्य, याबरोबरच व्यक्तिमत्त्वाचं स्वातंत्र्यही स्त्रीला मिळायला हवं' असा विचार अनेकांनी आत्मविश्वासाने व्यक्त केला.

पित्याच्या किंवा पतीच्या मृत्यूनंतर मुस्लीम स्त्रियांना मालमत्तेत नगण्य वाटा मिळतो. या हवाल्याने सहा मुले असलेल्या एका विधवेने आपली करुण कहाणी मांडली. पतीच्या आकस्मित निधनानंतर तिने ज्या कागदावर अंगठा उठवला होता, त्यादवारे तिने मालमत्तेवरचा हक्क सोडल्याचे लिहून दिले होते. एका रात्रीत घर सोडावे लागल्यानंतर हे तिला कळले होते. या हक्काची जाणीव होण्यासाठी म्हणून समाजातल्या सगळ्या स्तरांपर्यंत शिक्षण पोहोचण्याची आवश्यकता अधिक वाढली असल्याचे एका प्राध्यापिकेने सांगितले. 'स्वातंत्र्य मिळत नाही. ते झगडून मिळवावे लागते आणि तितक्याच झगड्याने ते टिकवावे लागते' याची जाणीव एका नवयुवतीने करून दिली. मुस्लीम महिला आपल्या भविष्याचा विचार करतात, हेच यावरून दिसून येते. काही महिला असे म्हणाल्या की, 'न्याय, हक्क मिळवण्यासाठी आपल्या धर्माविरुद्ध किंवा समाजातल्या पुरुषाविरुद्ध बंड पुकारले नाही, तर ते आपल्याला मिळणार नाहीत. आपल्याच गल्लीततील, दुसऱ्या जमातीतील स्त्रियांना बसण्या-उठण्याचे, शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य मिळते. ते आपल्यालाही मिळावे, एवढीच त्यांची माफक आणि वाजवी अपेक्षा आहे. या सगळ्या महिला पुण्यातील परिषदेत बावरताना मोकळ्या झालेल्या दिसून येत होत्या. इतर महिलांसोबत त्या भाराबून गेल्या होत्या. पुरुषांशी भांडण करण्याची, त्यांच्या वरचढ होण्याची इच्छा त्यांच्यापैकी कोणीही व्यक्त केली नाही. एक महिला म्हणाली, 'वो क्युं फॅमिली प्लॅनिंग करेंगे? एक बीवी मर गयी, तो झट दुसरी मिल जाती हैं ना' अशा स्फोटक प्रतिक्रिया मांडत असताना आपल्या समाजातील काही चांगल्या पुरुषांमुळेच आपल्याला या परिषदेला येता आले आणि आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी अशा अनेक पुरुषांची गरज आहे. 'आमचा झगडा पुरुषांविरुद्ध नाही. तो जाचक रुढींशी आणि अन्यायाशी आहे' असे या महिला खणखणीत आवाजात सांगत होत्या. उपस्थित महिलांतील शिकलेल्या महिला मात्र तोलून, मापून आणि सावधपणाने बोलत होत्या. 'हे कार्य पुढे घेऊन जायचे कसे?' या प्रश्नावरसुद्धा महिलांनी आपली मते मांडली. अशिक्षित महिला म्हणत होत्या की, 'शिकलेल्या महिलांप्रमाणे आपल्याला

बोलता आले नाही, तरी दारोदार जाऊन या परिषदेच्या कार्याची आणि विचाराची माहिती आपल्या परिषदेच्या महिलांना करून द्यायची.' उच्चभ्रू सोसायटीतील एका महिलेने अस्सल उर्दू ढंगातील वाक्य ऐकविले, 'शमा जलाये बगैर दुःख का अंधेर दूर नहीं होगा, सबकी ताकत एक कर के ही इस जालीम अन्याय को गाडना चाहिए.' काही सुशिक्षित महिलांनी सभा घेऊन, लेखन करून आवाज उठविण्याचा आणि वेळ पडली तर मोर्चे आणि सत्याग्रह यांच्या मार्फत आपल्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा निश्चय व्यक्त केला. नाट्याभिनयाचे शिक्षण घेणाऱ्या एक तरुणीने आपल्याकडे स्त्री-प्रश्नावर प्रचार करण्याचे एक मोठे साधन असल्याचे आत्मविश्वासाने सांगितले. तसेच या परिषदेचे कार्य जास्तीत-जास्त मुस्लीम महिलांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य करणार असल्याचेही तिने सांगितले. शिक्षित-अशिक्षित महिलांच्या या परिषदेने महिलांमध्ये एक उत्साह संचारला होता. मात्र काही महिलांना या परिषदेसाठी पोलीस संरक्षणात आणावे लागले आणि परिषदेनंतरही त्यांना पोलीस संरक्षण द्यावे लागणार असल्याचे सांगितले. 'या कार्याचा प्रचार करताना तुम्हाला भीती वाटत नाही का?' असे विचारले असता वय, शिक्षण या मर्यादा ओलांडून त्या म्हणाल्या 'बिलकूल नही! एकदा काम करायचं ठरलं म्हणजे ठरलं. घराबाहेर काय, प्रत्यक्ष घरातही आम्हाला विरोधाला तोंड द्यावं लागण्याची शक्यता आहे. पण आता काय होईल ते होईल... 'लेकीन सच तो यह है कि वही होगा जो मंजूरे खुदा होगा.' परिषदेतील महिलांच्या या मनोगतातून एका महत्त्वाच्या विषयाची सुरुवात अत्यंत चांगल्या पद्धतीने झाल्याचे दिसून आले. तसेच या कार्याला समाजातून सहकार्य मिळविण्याची अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. *(येथे दिलेल्या माहितीसाठी 'केसरी, रविवार, २ जानेवारी १९७२' या अंकाचा संदर्भ घेण्यात आला आहे.)*

काही महिलांच्या हृदयद्रावक कथा ऐकून उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू येत होते. समाजाचे हे पडद्याआडचे वास्तव पहिल्यांदा या महिला मांडत होत्या. 'या वेदना ऐकून समाजातील धार्मिक आणि राजकीय नेते काही मार्ग काढतील' अशी अपेक्षा होती. मात्र झाले उलटेच! परिषदेत उपस्थित असणाऱ्या महिला आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींवर बहिष्कार घालण्याचे प्रकार पुढे आले आणि महिला अत्याचारविरुद्धच्या आंदोलनाविरोधात मुस्लीम महिलांनाच आंदोलनासाठी पुढे करण्याचे प्रकारही झाले. त्याचा तपशील असा –

पुण्यात पार पडलेल्या महाराष्ट्र मुस्लीम महिला परिषदेसाठी अमरावती येथील मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि यंग मुस्लीम सोशल असोसिएनचे कार्यकर्ते शेख वजीर पटेल यांच्यासह अमरावती येथील चौदा आणि बडनेरा व मूर्तिजापूर येथून आलेल्या दोन महिला प्रतिनिधींवर गावी परत गेल्यानंतर अपमानाचा व शिव्यांचा वर्षाव झाला. तसेच त्यांच्या आई-वडलांना धमक्याही देण्यात आल्या. अमरावती येथील मुस्लीम लीग, जमात-ए-इस्लामी, तबलीग जमात व धार्मिक लोक यांनी परिषदेत सहभाग घेणाऱ्या प्रतिनिधींना त्रास द्यायला सुरुवात केली. वास्तविक, महिला प्रतिनिधी परिषदेहून परत आल्यानंतरच्या कारवायांचे नियोजन या धर्मांध मुसलमानांनी महिला परिषद चालू असतानाच केले होते. कारण या प्रतिनिधींपैकी महाविद्यालयीन विद्यार्थिनी परत गेल्यानंतर चार दिवस महाविद्यालयात जाऊ शकल्या नव्हत्या. त्या महाविद्यालयात जाऊ

लागल्या तेव्हा जाता-येता त्यांच्या आजूबाजूला उभे राहून मुस्लीम विद्यार्थी वेश्यांनाही शिव्या देण्याची लाज वाटावी, अशा अभद्र शिव्या देऊन त्या मुलींचा छळ करत होते. 'वजीर पटेल यांनी आम्हाला बहकवले आहे' असे आपल्या मुलींकडून लिहून घेण्यासाठी मुलींच्या आई-वडिलांवरही दडपण आणले जात होते. परंतु या मुलींनी काहीही लिहून दिले नाही. मात्र वजीर पटेल यांना जाहीर सभांतून धमक्या देण्यात आल्या. त्यामुळे त्यांना पोलीस संरक्षणात राहावे लागत होते. निवडणुकीचे वातावरण असल्यामुळे राजकीय लोक धर्मांधांचीच बाजू घेऊ लागले. अमरावती नगरपरिषदेच्या शाळेतील एक शिक्षिका या परिषदेसाठी उपस्थित होत्या. त्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली. या निवडणुकीच्या वातावरणात धर्मवाद्यांची बाजू घेताना काँग्रेसवाले म्हणत होते की, 'आम्ही मुस्लीम पर्सनल लॉ बदलू इच्छित नाही. त्यात बदल करू इच्छिणारे जनसंघाचे एजंट आहेत.' या प्रकरणी काँग्रेसवाल्यांनी अशा प्रकारचे खुशामतीचे धोरण स्वीकारले होते. बडनेरा येथेही धर्मवादी लोकांनी एक मोठी सभा घेऊन या मुलींना शिव्या दिल्या व त्यांच्या पालकांना क्षमायाचना करावयास लावली. या मुली अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालय व राज महाविद्यालय येथे शिकत होत्या. त्या रोज अमरावतीला ये-जा करत असताना त्यांना मानसिक त्रास देण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. या संदर्भात वजीर पटेल म्हणाले, "माझ्यावर तर समाजाने बहिष्कार टाकला आहेच, माझ्या मित्रांना माझ्याविरुद्ध भडकविण्यात येत आहे. मात्र त्यात त्यांना अद्यापही यश आले नाही." मंडळाचे व यंग मुस्लीम सोशल असोसिएशनचे अध्यक्ष महंमद अय्युब, सेक्रेटरी अब्दुल अजीज बारी, उपाध्यक्ष अझीझ खान आणि आपण स्वतः या परिस्थितीचा सामना करत असल्याचे सांगून वजीर पटेल म्हणाले की, "तथापि अमरावतीचे हे दहशतीचे वातावरण पाहून असे वाटू लागले आहे की, येथे इस्लामचे राज्य आहे का? अन्य लोक निवडणुकीच्या वातावरणात गुंग आहेत. दुर्भाग्याची गोष्ट अशी की, अमरावती मुस्लीम स्त्री-प्रतिनिधींवर आणि कार्यकर्त्यांवर असा बाईट प्रसंग आला असताना वृत्तपत्रांनी यास प्रसिद्धी दिली नाही. स्थानिक महिला मंडळे अनेक असतानाही परिषदेत सहभागी झालेल्या महिलांच्या साहाय्यासाठी कोणीही पुढे येत नाही." (येथे दिलेल्या माहितीसाठी 'दैनिक मराठा, १० जानेवारी १९७२' या अंकाचा संदर्भ घेण्यात आला आहे) अमरावती आणि परिसरातील अठरा मुस्लीम महिलांचा होणारा सामाजिक छळ थांबावा, यासाठी मंडळाचे चिटणीस सय्यद मेहबूब यांनी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना तार पाठवून विनंती केली. परिषदेमध्ये मुस्लीम व्यक्तिगत कायदा, शरीयत कायदा रद्द करून समान नागरी कायदा निर्माण करण्याची मागणी या महिलांनी केली म्हणून त्यांचा छळ केला जात असून वजीर पटेल यांना खून करण्याच्या धमक्या देण्यात आल्याचे या तारेमध्ये लिहिले. 'या महिलांचा आणि कार्यकर्त्यांचा छळ त्वरित थांबवला नाही, तर सत्यशोधक मंडळातर्फे मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर धरणे धरले जाईल' असा इशारा सय्यद मेहबूब यांनी दिला.

'मंडळाच्या कार्यकर्त्यांना धमकावण्याच्या अगर दबाव घालण्याच्या प्रकाराला मंडळ भिक घालणार नाही. उलट एक पत्नी हयात असताना तलाक घेऊन आणखी निकाह करणाऱ्या मुस्लीम नागरिकांना घेराव घालण्याचे मुस्लीम सत्यशोधक मंडळाने ठरवले आहे. तसेच असे लग्न करणारे

कोणी आपल्या आजूबाजूला लक्षात आल्यास मंडळाला ती माहिती कळवावी' असे सय्यद मेहबूब यांनी धर्मबांधवांना आवाहन केले. *(येथे वापरलेल्या माहितीसाठी 'लोकसत्ता, प्रभात, १२ जानेवारी १९७२' या अंकाचा संदर्भ घेण्यात आला आहे)*

क. मुस्लीम महिलांच्या हक्कासाठी

'मुस्लीम महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळाले पाहिजेत' या मागणीकरिता इंडियन सेक्युलर सोसायटी आणि महाराष्ट्र मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्या संयुक्त प्रयत्नाने पुण्यात दोन दिवस परिषद भरली होती. ती भारतीय मुस्लीम समाजाच्या इतिहासातील अभूतपूर्व घटना होय. ही सभा प्रथम पुण्यात झाली. हा या शहराच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील अग्रस्थानाचा आणखी एक पुरावा म्हणता येईल. फाळणीपूर्वी मुस्लीम लीगच्या अधिवेशनाला जोडून महिलांचे पडद्याआड मेळावे होत, पण जिनांच्या जातीय राजकारणाला दुजोरा देण्यापलीकडे त्यांच्यापुढे विषय नसत; स्वातंत्र्यानंतर तेही बंद पडले. महिला परिषदांचे आणि अन्य स्त्री संघटनांचे मेळावे वेळोवेळी भरतात, पण त्यांतील मुस्लीम महिलांची अनुपस्थिती डोळ्यात भरण्यासारखी असते. चार भिंतींच्या बाहेर न पडणाऱ्या या महिला घरातील आणि समाजातील विरोधाला न जुमानता परिषदेत मोठ्या संख्येने हजर राहिल्या. भाषा आणि बोलण्याचा सराव यांची जोड नसूनही आपली गाऱ्हाणी त्यांनी पोटतिडकीने मांडली, त्याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे. 'पुण्यात जातीय दंगा चालू आहे; जाऊ नका' अशी भीती त्यांना अनेकांनी घातली होती. 'ही परिषद धर्मांतरासाठी आहे' असाही अपप्रचार करण्यात आला होता. अमरावतीच्या प्रतिनिधींना तर पोलिसांच्या संरक्षणात स्टेशनपर्यंत आणावे लागले होते. या धाकदपटशाला न जुमानता अमरावती, कोल्हापूर, श्रीगोंदा, मुंबई अशा महाराष्ट्राच्या सर्व भागांतून दीडशेवर प्रतिनिधी आले होते. त्यांची धडाडी वाखाणण्यासारखी होती. मुस्लीम समाजातील कर्मठ आणि बुरसट विचारसरणीविरुद्ध सत्यशोधक मंडळ आंदोलन करीत होते, पण त्याला तोपर्यंत पुरेसा प्रतिसाद मिळाला नव्हता. त्याने आता एका अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयाला हात घातला होता. समाजातील निदान निम्म्या महिलांकडून त्यांना पाठिंबा मिळण्याचा आणि महाराष्ट्राप्रमाणे देशाच्या इतर भागांतही या विचारास चालना मिळाल्याखेरीज राहणार नसल्याचा अदमास होता. परिषदेने केलेली मुख्य मागणी इतकी वाजवी होती की, त्याबद्दल अधिक तपशीलाची गरज नाही. ज्या शरीयत कायद्याने मुस्लिमांचे व्यक्तिगत संबंध ठरविले जातात, तो कायदा चौदाशे वर्षांपूर्वीचा असून महंमद पैगंबराच्या काळातील आणि त्यानंतरच्या काळातील परिस्थिती विचारात घेऊन केलेला होता. तो आपल्या देशातील परिस्थितीत, विशेषतः चालू परिस्थितीत गैरलागू असल्याने बदलला पाहिजे, हा मंडळाचा युक्तिवाद सहज पटण्यासारखा होता. तीन बाबतींत त्यांना तातडीने बदल अपेक्षित होता. तलाकची घातक रूढी बंद करणं आवश्यक होतं. पत्नीला 'तलाक' म्हणजे 'सोडचिठ्ठी दिली' असे एका साक्षीदारासमोर नवऱ्याने तीन वेळा म्हटले की, त्याला घटस्फोट मिळतो. तसे करण्यास वाजवी कारणाचा विचार करण्याचे किंवा

पत्नीचे म्हणणे ऐकून घेण्याचे बंधन नसते. घटस्फोट पत्नीला हवा असेल, तर मात्र कोर्ट-कचेरीच्या बिकट मार्गाने जावे लागते. ही विषमता घोर असल्याबाबत शंका नाही. तलाक दिल्यावर पत्नीला तीन महिन्यांची पोटगी आणि असल्यास तिचे स्त्रीधन एवढेच मिळण्याचा हक्क असतो. एखाद्या हंगामी कामगारालाही कमी करावयाचे झाल्यास त्यासाठी सयुक्तिक कारण लागते. शिवाय त्याला नोटीस, भरपाई, ग्रॅच्युइटी द्यावी लागते. तेवढीही सुरक्षितता मिळण्याचा मुस्लीम पत्नीला कायद्याने हक्क नाही. परिषदेची दुसरी मागणी 'एकपत्नीत्वाची सक्ती हवी' ही होती. चालू कायद्याप्रमाणे चार बायका करण्याची मुभा आहे. तिसरा प्रश्न वारसा हक्काचा होता. पतीच्या प्रॉपर्टीत बायकोस मुले असल्यास आठवा, नसल्यास चौथा हिस्सा मिळतो. सासरा हयात असताना पती वारला, तर त्या स्त्रीचा मालमत्तेवर काहीच हक्क उरत नाही. शरीयतमधील या तरतुदी अन्याय्य आणि कमालीच्या विषम असल्याबाबत वाद नाही. मुस्लीम समाजात तलाकची प्रकरणे सर्रास चालतात किंवा प्रत्येक पुरुष चार बायका करतो, असे मुळीच नाही. इतर समाजाप्रमाणेच त्यांच्यातही सुसंस्कृत आणि सुविचारी लोक निश्चितच आहेत. पण पुरुषांना कायद्याने दिलेल्या या हक्कांचा दुरुपयोग होऊ शकतो. तो झाल्याची मन विषण्ण करणारी उदाहरणे आढळतात, हे नाकारता येणार नाही.

आणखी खेदाची गोष्ट अशी की, इतर मुस्लीम देशांत शरीयत कायद्यांत अनेक चांगल्या सुधारणा झाल्या आहेत, तरी भारतीय मुस्लिमांतील कर्मठ आणि सनातनी मंडळी म्हणतात की, 'हा कायदा इस्लाम धर्माचाच एक भाग आहे. त्यात बदल करणे, ही धर्मात लुडबुड होय.' केमाल पाशाने तुर्कस्तानात शरीयत कायदा बदलून आधुनिक केल्यामुळे ते राष्ट्र आधुनिक झाले. इराणने चार पत्नींची संख्या कायद्याने दोनपर्यंत मर्यादित केली; बालविवाहवर बंदी घातली. त्याचा परिणाम म्हणजे, त्या देशाच्या कारभारात महिलाही पुरुषांच्या बरोबरीने भाग घेताना आढळतात. चार पत्नी करण्याच्या स्वातंत्र्यावर कायद्याने मर्यादा घातल्या आहेत. मग 'भारतामध्ये शरीयत कायद्यात बदल केल्याने इस्लाम धर्मात ढवळाढवळ होते' असे कसे म्हणता येईल? म्हणजेच या सुधारणेस खरोखरी धर्माच्या तत्त्वाबर विरोध नाही. 'आपल्या कायद्यात सुधारणा केली, तर आपले वेगळे अस्तित्व नष्ट होईल. समाज म्हणून आपले वेगळेपण जाईल' याची मुस्लीम समाजाच्या तथाकथित पुढाऱ्यांना भीती वाटते. मात्र हा विचार प्रतिगामी आहे. इतर समाजापासून वेगळे राहण्याची वृत्ती राष्ट्रीय ऐक्यास आणि एकजिनसीपणास बाधक आहे. 'वेगळे राहिल्याने संख्येच्या जोरावर सत्तेत वाटा मिळेल' हा त्यामागचा हिशेब असतो. समाजातील बऱ्याच मोठ्या वर्गाची मते आणि विचार मुल्ला, मौलवी किंवा एखादा दादा यांच्या आदेशानुसार दिली जातात, हे सत्य आहे. त्याच्या जोरावर समाजाचे नेते सौदेबाजी करतात. त्यात त्यांचा स्वार्थ साधतो, पण सबंध समाजाचे हित खात्रीने होत नाही.

दुर्दैव असे की, देशातील प्रमुख राजकीय पक्षही मुस्लिमांतील वेगळेपणाच्या भावनेस प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे उत्तेजन देत असतात. काँग्रेस, दोन्ही कम्युनिस्ट आणि समाजवादी यांत केरळमध्ये मुस्लिमांची मते मिळवण्याची चुरस चालू असते. वास्तविक, या पक्षांनी मुस्लिमांतही

सामाजिक सुधारणेचा प्रचार करावयास हवा. सत्तारूढ काँग्रेसचे धर्मनिरपेक्षपणाचे धोरण या बाबतीत विकृत म्हटले पाहिजे. 'धर्मात हस्तक्षेप केल्याचा आरोप केला जाईल' या भीतीने काँग्रेसवाले मुस्लिमांतील सामाजिक सुधारणांबद्दल गप्प राहतात, पण 'राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात सुधारणा आणि सामाजिक बाबतीत मागासलेपणा' ही विसंगती टिकूच शकणार नाही. देशातील सर्व नागरिकांकरिता एकच सिव्हिल कोड किंवा व्यक्तिगत कायदा करण्याचा आदेश घटनेने दिला आहे, पण 'मुस्लीम दुखावतील' या भीतीने तो प्रत्यक्षात आणण्याचा काँग्रेसने कधीही प्रयत्न केला नाही. 'झटपट कायदा करून टाकावा' असे मुस्लीम सत्यशोधक मंडळास म्हणावयाचे नव्हते आणि नाही, पण या सुधारणेसाठी लोकांचे करावयाचे शिक्षण, करावयाचे मतपरिवर्तन करावयास हवे त्यांनी आजपर्यंत केलेले नाही. ते केले असते, तर समान नागरी कायदा अमलात आणणे अवघड नव्हते. मुस्लीम महिलांची मागणी मानाने, सुरक्षिततेने जीवन जगू देण्याची आहे. या देशाच्या नागरिकांपैकी एका वर्गाच्या मूलभूत हक्कांची ही मागणी आहे. तिच्याकडे राज्यकर्त्यांना दुर्लक्ष करता येणार नाही (येथे वापरलेल्या माहितीसाठी 'सकाळ, ०१-०१-१९७२' या अंकाचा संदर्भ वापरण्यात आला आहे). या प्रश्नावर शक्य तेवढ्या तत्परतेने उपाययोजना करणे आवश्यक होते व आहे. पक्षीय हित बाजूला ठेऊन या विषयाकडे पाहण्याची इच्छाशक्ती असणे गरजेचे होते व आहे.

ड. जिहाद-ए-तलाक या विषयावर चर्चा सुरू

मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात मुस्लीम महिलांवर सर्वाधिक अन्याय करणारी तरतूद म्हणजे एकतर्फी, तोंडी, एकाच वेळी तीन वेळा 'तलाक' उच्चारून घटस्फोट देण्याची प्रथा. अशा प्रकारचा तलाक देण्याचा अधिकार मुस्लीम पुरुषास होता. वास्तविक, तलाकची पद्धत इस्लामच्या तरतुदीचा भाग नव्हता. म्हणून याला 'तलाक-ए-बिद्दत' असे म्हणतात. ही पद्धत कुराणबाह्य व इस्लामला अमान्य असली, तरी प्रथा म्हणून याचा वापर मुस्लीम समाजात केला जात होता. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळात, म्हणजे १९३७च्या शरीयत कायद्यामध्ये ही तरतूद होती. हाच कायदा स्वातंत्र्योत्तर काळात 'मुस्लीम पर्सनल लॉ' या नावाने ओळखला जात होता.

या पद्धतीचा तलाक वापरून अनेक वेळा महिलांच्या आयुष्याशी खेळले जात असे. यातून या महिला रस्त्यावर येऊन त्यांचे संसार उद्ध्वस्त होत असत. भारतात या विषयाला धरून फारशी चर्चा होत नव्हती. ती हमीद दलवाई यांच्या निमित्ताने सुरू झाली. त्यांनी १८ एप्रिल १९६६ रोजी सात मुस्लीम महिलांचा मोर्चा काढून या पद्धतीविरुद्ध प्रथमच आवाज उठवला. ही इस्लामच्या जगतातील पहिली क्रांतिकारी घटना म्हणता येईल.

या तलाक पद्धती-विरुद्ध अभियानाचा भाग म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळाने रमजान ईदच्या शुभ मुहूर्तावर, म्हणजे ९ ऑक्टोबर १९७५ रोजी 'जिहाद-ए-तलाक' ही चळवळ सुरू केली. या तलाक पद्धतीची झळ बसलेल्या मुस्लीम महिलांच्या न्याय्य हक्काचे रक्षण करण्यासाठी मुस्लीम समाजात विचारमंथन सुरू करण्याच्या दृष्टीने ही मोहीम सुरू करण्यात आली होती. या

संबंधात मुस्लीम सत्यशोधक मंडळाने एक छापील पत्रक प्रसिद्ध केले होते व त्यात तलाकच्या एकेरी पद्धतीवर कायदेशीर बंदी घालण्याची निकड असल्याचे म्हटले आहे. तलाक न देता पतीने सोडून दिलेल्या भगिनींना कायदेशीर सल्ला देण्याचेही मंडळाने ठरवले होते. याचसाठी कार्यकर्त्यांच्या एका गटाने ईदच्या दिवशी मुस्लीम बहुसंख्याक भागात फेरी मारून अशा महिलांसाठी निधीही गोळा केला होता. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पुणे शहरातील निरनिराळ्या मशिदींपुढे उभे राहून, निधी जमा करून रमजान ईद साजरी केली होती.

अशा स्त्रियांची स्थिती अत्यंत नाजूक आणि केविलवाणी असे. त्यांना आपुलकीने जवळ करून आश्रय देण्यास सहसा कुणी तयार होत नसे. तलाक देणाऱ्याने त्यांच्या कपाळी 'बदचलन' म्हणून कलंक लावलेला असे. त्यामुळे माहेरची मंडळीही त्यांना जवळ करीत नसत. त्यांना मुले असली, तर स्थिती आणखीनच वाईट होत असे. कारण मुलांच्या पोषणाची, शिक्षणाची सारी जबाबदारी या स्त्रियांवरच पडत असे. त्यांच्यावर होत असलेला हा घोर अन्याय दूर होणे अगत्याचे असल्याचे मुस्लीम सत्यशोधक मंडळास वाटत होते. निधी गोळा करण्यापेक्षा एकतर्फी दिलेल्या तलाकमुळे अशा स्त्रियांचे होणारे हाल व त्यांच्यावर होत असलेला अन्याय जमातीच्या वारंवार निदर्शनास आणून हा प्रश्न जिवंत ठेवणे अधिक महत्त्वाचे मंडळाला अधिक महत्त्वाचे वाटत होते. मशिदीनंतर निरनिराळ्या मुस्लीम मोहल्ल्यातूनही निधी गोळा करण्यात आला. हा कार्यक्रम दिवसभर चालू होता. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पुण्यातील जामा मशीद, कॅम्प येथे ईदच्या नमाजाच्या वेळी 'कौम के नाम अपील' हे पत्रक वाटून तलाक पीडित महिलांसाठी मदत गोळा केली. त्यानंतर मुस्लीम मोहल्ल्यात जाऊन पत्रके वाटणे, मदत गोळा करणे या उपक्रमांस चांगला प्रतिसाद मिळाला. यात मंडळाचे कार्यकर्ते मेहबूब सय्यद, बशीर मोहीयुद्दीन शेख, फजल शेख, अमीर शेख, मकबूल तांबोळी यांनी व इतर कार्यकर्त्यांनी भाग घेतला. अशा महिलांना कायदेशीर मदत मिळवून देण्याचा निर्णय मंडळाने घेतला होता.

त्या काळात पुण्यामध्ये जवळपास लाखभर मुस्लीम असावेत. या लाखभर संख्येत तीन हजार महिला तलाक मिळालेल्या/घटस्फोटित होत्या. यांत तलाकपीडित किंवा प्रत्यक्ष तलाक दिला नसला, तरी नवरा सांभाळत नसलेल्या महिला होत्या. या महिलांना एकत्र करून, त्यांची परिषद घेऊन त्यांना संघटित करण्याचे कार्य मुस्लीम सत्यशोधक मंडळाने हाती घेतले होते. इस्लाममध्ये चार लग्ने करण्याची परवानगी होती आणि तलाक देण्याची पद्धत सोपी होती. निदान धर्माचे नाव घेऊन मुस्लीम महिलांना स्वातंत्र्य देण्याचे नाकारणाऱ्यांनी तरी स्वतःपुरती सोपी सोय करून घेतली होती. तलाक द्यायचा व घ्यायचा झाल्यास तो केव्हा व कसा द्यावा, या विषयी धर्मात काही आज्ञा आहेत. अनेक लग्ने करून पाहिल्या बायको-पोरांना सोडणाऱ्यास सजा सांगितली आहे, पण या आज्ञा न पाळताच तलाक देण्याचा आणि पुन्हा लग्न करण्याचा अधिकार गाजविला जात असे. काही पुरुष तलाक देत नव्हते आणि आपल्या पत्नीस सांभाळतदेखील नव्हते. उलट त्यांना पोरांबाळांसह देशोधडीस लावत होते. अशा महिलांना पुनर्विवाह करता येत नसे आणि धडपणे जगणे अवघड होऊन जात असे. या महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडून न्याय मिळवण्याचा प्रयत्न व्हायला हवा होता. ते काम मुस्लीम सत्यशोधक मंडळाने सुरू केले. या कामास फार विरोध

झाला नाही, उलट चांगला प्रतिसादच मिळाला ही स्वागतार्ह बाब होती.

'जिहाद-ए-तलाक' मोहिमेचे मालेगाव मुस्लीम महिला कार्यकर्त्यांकडून स्वागत करण्यात आले आणि मालेगाव शहरात जिहाद-ए-तलाक मोहीम हाती घेण्याचे ठरवले गेले. 'देशदूत' या वर्तमापत्राने २२ ऑगस्ट १९७५ रोजी मुस्लीम महिलांच्या अन्यायावर वाचा फोडणारा लेख प्रसिद्ध केला होता. मालेगाव शहरातील मुस्लीम महिलांनी सदर लेखाचे मोठ्या प्रमाणात स्वागत करून या मोहिमेबद्दल समाधान व्यक्त केले आणि 'समाज बांधवांनी पुढाकार घेऊन जिहाद-ए-तलाक मोहीम यशस्वी करावी' अशी इच्छाही व्यक्त केली.

'जिहाद-ए-तलाक' या मोहिमेला समाजातील जाणकारांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यांमध्ये इस्लामचे अभ्यासक अब्दुल रज्जाक बियाबानी यांचा समावेश आहे. त्यांनी हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या तलाक-विरोधी अभियानाचे वर्तमानपत्रातून स्वागत केले. 'प्रचलित तलाक पद्धत ही कुराणातील मूळ विचारांशी विसंगत आहे.' मुस्लीम समाजाच्या वर्तनामुळे पवित्र कुराणाबद्दल गैरसमज होऊ नये म्हणून या संदर्भात ते म्हणतात, 'नवरा-बायकोमध्ये बेबनाव निर्माण झाल्यास नवऱ्याने आपला वकील नेमावा आणि बायकोने आपला वकील नेमावा. याचा अर्थ दोन्ही वकिलांनी सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. या बाबतीत संपूर्ण न्यायनिवाडा होईपर्यंत वकिलांची कामगिरी संपत नाही. सलोखा निर्माण होऊ न शकल्यास तीन वेळा तलाक म्हणावे म्हणजे झाले!' इस्लाम धर्माचे एक महान कायदेपंडित इमाम शाफी यांनी स्पष्ट केले आहे की, 'एकाच वेळी तीनदा तलाक म्हणता येत नाही; तीन निरनिराळ्या वेळी तलाक म्हणावयास हवे. कायद्याच्या लवचीकपणाच्या आधारे त्यांनी तीन वेळा तलाक म्हणण्याची मुदत एक-एक महिन्याची ठेवली आहे. म्हणजे पहिल्यांदा तलाक म्हटल्यावर एका महिन्याने दुसऱ्यांदा आणि पुन्हा एका महिन्यानंतर तिसऱ्यांदा तलाक म्हणावे.' पवित्र कुराणात एके ठिकाणी स्पष्ट आदेश आहे की, ' 'सकर'च्या मन:स्थितीमध्ये, म्हणजे समतोल मनोवृत्ती ढळल्यास फर्जपासून (बंधनकारक कर्म) दूर व्हा. कारण अशा अवस्थेत केलेले कर्म चुकीचे असण्याची शक्यता अधिक आहे. म्हणून रागाच्या भरात शंभरदा जरी तलाक म्हटले, तरी तलाक होत नाही (इस्लाममधील सुन्नी पंथामध्ये असलेल्या चार प्रमुख उपपंथांपैकी शाफई हा उपपंथ / विचारधारा इमाम शाफई यांच्या नावाने अस्तित्वात आला)'

पवित्र कुराणात असेही म्हटले आहे की , 'तलाक' या रूढीकडे ईश्वर रागीट मुद्रेने पाहतो. म्हणजे त्याला तलाक पसंत नाही. त्याला पसंत नसलेले काही इस्लाम धर्मात नाही. म्हणजे तलाक इस्लाम धर्मात नाही, आणि जे आहे, ते 'सहुलत' (अपवाद) म्हणून आहे. स्त्रीस तलाकचा संपूर्ण अधिकार आहे. तिने नेमलेल्या वकिलाचे कार्य तिला काजीकडून अगर जमातीकडून न्याय मिळवून देईपर्यंत संपत नाही.

'इस्लाम धर्मात चार बायका करण्याची सहुलत आहे; हा कायदा नव्हे. सहुलत म्हटले की, काही अटी आल्याच. त्यांपैकी एक अट म्हणजे, बायकांना समान पद्धतीने वागविणे शक्य

होणार नसल्याबाबत थोडीशी जरी शंका वाटली, तरी एकच बायको करण्याचा इस्लाम धर्मात कायदा आहे. दिलेल्या सहुलतीचा गैरफायदा घेणाऱ्याच्या कृतीमुळे धर्मातील कायदे जुनाट झाले. त्यांच्यात बदल करावयास हवा असे म्हणणे पवित्र कुराणाबद्दल आणि इस्लाम धर्माबद्दल संपूर्ण माहिती नसणे होय.'

'मुस्लीम कायदा' या विषयावर प्रबंध लिहून सन १९७२मध्ये पुणे विद्यापीठाकडून डॉक्टरेटची पदवी मिळविलेले डॉ. एम. ए. दळवी पुण्यातील ब्रिटिश काऊन्सिलचे ग्रंथपाल होते. त्यांनी आपल्या प्रबंधात पटवून दिले आहे की, 'पवित्र कुराणातील मूळ कायदे चौदाशे वर्षांपूर्वी समतोल जीवन जगण्यासाठी, समाजाच्या उन्नतीसाठी व माणुसकीच्या रक्षणासाठी जितके उपयुक्त होते, तितकेच ते आजही उपयुक्त आहेत. त्यांत लवचीकपणा आहे. मूळ कायद्यात बदल न करता आजच्या परिस्थितीत अनुकूल असा बदल करणे शक्य आहे.' अब्दुल रज्जाक बियाबानी या विचाराचे समर्थन करत.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आयोजित केलेल्या जिहाद-ए-तलाकच्या निमित्ताने एक सकारात्मक चर्चा सुरू होणे, हेही फार महत्त्वाचे होते.१ अशा प्रयत्नांमुळे महिलांमध्ये, तसेच आपत्ती कोसळलेल्या कुटुंबांमध्ये या प्रथेविरुद्ध लढण्याचा आत्मविश्वास आला. त्यांनी मंडळाच्या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद दिला आणि समाजांतर्गत संवादाची प्रक्रिया सुरू झाली.

इ. मुस्लीम महिला परिषद – कोल्हापूर

२ नोव्हेंबर १९७५ रोजी, कोल्हापूर येथे, जिल्हा खादी ग्रामोद्योग संघाच्या मंडपात मुस्लीम महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. चौदाशे वर्षांहून अधिक जुनाट असा, कालबाह्य झालेला मुस्लीम व्यक्तिगत कायदा मुस्लीम स्त्रीला सतत असुरक्षिततेच्या वातावरणात जगण्यास भाग पाडणारा व न्याय्य हक्कांपासून वंचित ठेवणारा असल्याने 'भारत सरकारने हा कायदा रद्दबातल ठरवून मुस्लीम स्त्रीला समाजातील आणि कुटुंबातील समानत्व, प्रतिष्ठा मिळवून देणारा, तसेच एकूण भारतीय समाजाला लागू होणारा असा समान नागरी कायदा तयार करावा आणि घटनेच्या आदेशासह ४४वे कलम कृतीत आणावे' असा ठराव कोल्हापूर येथे आयोजित मुस्लीम महिला परिषदेने एकमताने संमत केला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या कोल्हापूर व सांगली या जिल्ह्यांतील मुस्लीम महिला परिषदेने केंद्राच्या कायद्याची वाट न पाहता 'महाराष्ट्र शासनाने तरी कायदा करून मुस्लीम स्त्रियांना पारंपरिक अन्यायातून मुक्त करावे' अशी विनंती या ठरावाद्वारे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांना केली.

प्रा. मुमताज रहिमतपुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेने जमात-ए-इस्लामीसारख्या जातीयवादी व प्रतिगामी संघटनेवर बंदी घातल्याबद्दल पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींचे दुसऱ्या एका ठरावाद्वारे अभिनंदन केले. या बंदीमुळे मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात बदल घडवून

आणण्यास योग्य संधी प्राप्त झाली असल्याचे या ठरावात म्हटले गेले. लग्नानंतर दोन वर्षांत तलाक मिळालेल्या श्रीमती शहनाज नूर महंमद कागवाडे या पंचविशीतील तरुणीने मुस्लीम कायदा बदलण्याच्या मागणीला पाठिंबा दिला. 'लग्नानंतर सहा महिन्यांत तलाक घेणाऱ्या किंवा बायकोला टाकणाऱ्या नवऱ्यांना तुरुंगात डांबा' अशी आक्रमक मागणी तलाकपीडित महिलांनी केली. 'जबानी तलाक बंद करून सक्तबंदी झालीच पाहिजे' या महिलांच्या घोषणांत ठराव पास झाला.

या ठरावाला सौ. बिबी आयेशा अब्दुलवहाब बेग यांनी अनुमोदन दिले. पहिल्या बायकोला तलाक दिलेल्या नवऱ्याने त्यांनापण टाकले होते. 'आपल्या मुलीचा छळ जावई कसा करतो' त्याची हृदयद्रावक हकिकत हुसेनखान पठाण यांनी सांगितली. सौ. फातिमा बारगीर, तलाकपीडित श्रीमती अशरफबी अब्बास आवळकर (वय २२), मरियम चांदसाब जमादार, सौ. मेहबूब बी चांद शेख, गाझीयोद्दिन सलाती (यांच्या बहिणीस एम. बी. बी. एस. असलेल्या डॉक्टराने तलाक दिला होता), नसिरुद्दीन सलाती, रोशन रमजान सुळकुडे (परित्यक्त्या, वय २२) यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यवाह हुसेन जमादार यांनी मुस्लीम मोहल्ल्यातील अनुभव सांगितले. कोल्हापूरला मोपला (केरळमधील एक मुस्लीम जमात) मुसलमान पावसाळ्यात येऊन राहत असल्याचे व गरिबांच्या मुलींना हेरून एका दिवसात लग्न उरकून कोकणात नेत असल्याचे त्यांनी सांगितले. पावसाळा संपला की, हे नवरे बोटीवर नोकरीला जात असत; आठ-आठ महिने परत येत नसत. या काळात सासू-सासरा सुनेस माहेरी सोत व यादरम्यान अनेकांचे तलाकही होत. अशा महिलांच्या आयुष्यात पुन्हा आनंदी जीवनाची आशा मंदावत असे. अशा प्रकारे या महिला समाजातील पुरुषप्रधान मानसिकतेच्या बळी ठरत.

एकाच घरातील दोन बहिणींना तलाक देण्यात आला होता आणि त्यांचे वडील आपल्या दोन्ही मुलींना तलाक मिळाला असूनही 'इज्जत जाईल' म्हणून कोर्टात जायला तयार नव्हते. तलाकपीडित महिलांना कायद्याचा मोफत सल्ला मंडळाकडून उपलब्ध झाल्यानंतर बीस दिवसांत तीस प्रकरणे मंडळाकडे आली होती.

मंडळातर्फे कायदाविषयक काम पाहणारे ॲड. जगन्नाथ समुद्रे, ॲड. कु. सोनटक्के, ॲड. अविनाश महाडिक यांनी कायद्यातील तरतुदी सांगितल्या आणि मंडळाकडे येणाऱ्या अशा महिलांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. मंडळाच्या कार्याबद्दल आस्था बाळगणारे अनेक वकील या कामी वेळ देत होते; आजही देतात ही मंडळाची जमेची बाजू म्हणावी लागेल.

परिषदेच्या अध्यक्ष मुमताज रहिमतपुरे यांनी 'मुसलमानांनी नोंदणी पद्धतीने लग्न करावे, मेहेरची रक्कम जास्त ठेवावी' अशा काही सूचना केल्या. हनीफ बागवान यांनी आभार मानले.

या परिषदेत मिरज, सांगली, इस्लामपूर, कागल, निपाणी वगैरे ठिकाणच्या आणि स्थानिक अशा सुमारे १५० महिला सहभागी झाल्या होत्या.

सर्वोदयी पदयात्री महिलांनी परिषदेस भेट दिली व मुस्लीम स्त्रियांच्या मागणीला पाठिंबा

दिला.

परिषद संपल्यानंतर मुस्लीम कायद्याबद्दलचा मुख्य ठराव मांडणाऱ्या श्रीमती शानूरबी शेख व तिचे वडील यांनी जुना राजवाडा पोलीस ठाण्यावर श्रीमती शेख यांना टाकून देणाऱ्या पती नूर महंमद समशेर कागवाडे यांच्याविरुद्ध फिर्याद दाखल केली. श्रीमती शेख परिषदेनंतर बाहेर पडल्यावर कागवाडे यांनी रस्त्यात अर्ध नग्न होऊन बिभत्स हावभाव व लज्जास्पद वर्तणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले होते. अशा बेलगाम वर्तनाविरुद्ध महिलांना संघटित करण्याचा निर्धार मंडळाने केला.

ई. तलाकपीडितांची परिषद

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने एकतर्फी तलाक देण्याच्या प्रथेविरुद्ध मोहीम सुरू केल्यानंतर केवळ एका महिन्यात पुणे शहरातील शेकडो महिलांनी आपले गाऱ्हाणे पुराव्यांसह मंडळाकडे मांडले. मंडळाकडे रोज किमान तीन आणि कमाल २० महिला आपली माहिती आणून देत असत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने पत्रक काढून ही माहिती बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर १९७५ रोजी जाहीर केली; प्रतिसाद दिवसेंदिवस वाढत राहिला.

या महिलांची वये मुख्यतः १५-२२, तर काहींची वये ४५-५८पर्यंत होती. यांतील ९९ टक्के महिला मध्यमवर्गीय, गरीब किंवा अत्यंत गरीब होत्या. लग्न होताच दोन-चार महिन्यांत टाकून दिलेल्या महिला सुमारे १५ टक्के होत्या. पत्नीला टाकून देण्याच्या कारणांमध्ये जवळजवळ ९५ टक्के आढळलेले कारण 'पत्नीच्या बदचलनाचे' देण्यात आले होते. तलाकचा त्रास सुशिक्षित महिलांनाही होत असे. त्याचे प्रमाण १५-२० टक्के होते. या संदर्भात तीस वर्षांच्या एक मुस्लीम तरुणाने लिहिले होते, 'माझे वडील ६० वर्षांचे आणि आई ५२ वर्षांची आहे. आम्ही त्यांची दोन मुले आहोत. वडलांनी आईस एकतर्फी तलाक दिला. मी माझ्या या म्हाताऱ्या आईस घेऊन मशिदीपुढे निकाह पढविणाऱ्या काजीकडे गेलो, तेव्हा त्या सर्वांनी सांगितले की, 'आता तुमचे वडील १९ वर्षांच्या एका मुलीशी दुसरे लग्न करणार आहेत.'

एकाने अशी कैफियत मांडली की, '४५ वर्षांच्या, तीन मुलांची आई असलेल्या पत्नीस नवऱ्याने टाकले व आणखी ५ वर्षांत २ लग्ने केली.' मुस्लीम समाजात प्रतिष्ठा मिळणाऱ्या ४० वर्षांच्या एका गृहस्थाने ७ वर्षांआधी, १९६८ साली पहिल्या बायकोस तलाक दिला होता; १९७३ साली त्याने दुसरीस व १९७४ साली तिसरीसही तलाक दिला. या तिघींची वयये २६, २३ व १८ अशी होती. त्यानंतर हा गृहस्थ १७ वर्षांच्या एका मुलीबरोबर चौथे लग्न करणार होता.

तलाकपीडित मुस्लीम महिलांची एक परिषद रविवार दिनांक २३ नोव्हेंबर १९७५ रोजी पुण्यातील क्वार्टर गेट चौकातील पूना गोवन्स हॉटेल येथे भरणार असल्याची माहिती देण्यात आली. 'तलाक प्रथेविरुद्ध तातडीची उपाययोजना करावी' अशी मागणी या परिषदेत करण्यात येणार होती. याबरोबरच पुढील मागण्या करण्यात आल्या होत्या –

१) शासनाने एकतर्फी तोंडी तलाकवर बंदी घालावी, तसेच सक्तबंदीचा कायदा मुसलमानांनाही

लागू करावा.

२) घटस्फोटित स्त्रीला दुसरे लग्न होईपर्यंत किंवा तिच्या मृत्यूपर्यंत पोटगी मिळावी.

३) विनाकारण दिलेल्या घटस्फोटामुळे स्त्रीची समाजात बेअब्रू होते. त्यासाठी तलाक देणाऱ्या नवऱ्यास नुकसान भरपाई देण्यास भाग पाडावे.

४) तलाकपीडित महिला समाजाचा एक दुबळा घटक असल्यामुळे नोकरीसाठी शासनाने आणि सार्वजनिक व खाजगी उद्योगधंद्यांनी त्यांना अग्रक्रम द्यावा.

५) तलाकपीडित महिलांच्या मुलांना शासनाने व शिक्षण संस्थांनी शैक्षणिक व वसतिगृहांसंबंधित सवलती द्याव्यात.

६) वक्फ बोर्ड फंड सर्व मुस्लीम समाजाच्या मालकीचा असल्याने त्यामधून दहा कोर्टींचा तलाकपीडित मुस्लीम महिला पुनर्वसननिधी कायद्याने निर्माण करावा.

वर दिलेल्या संख्याशास्त्रीय माहितीवरून तलाक पद्धतीची भयावहता आणि मुस्लीम पुरुषाची मानसिकता लक्षात येते. मंडळाने सुरू केलेल्या या मोहिमेचे स्वागत करून मुस्लीम समाजातील जाणकारांनी पाठिंबा व्यक्त केला.३ या प्रथेविरुद्ध पुढे येण्याची अनेकांना इच्छा असतानाही सामाजिक दडपणामुळे उघडपणे बोलण्याचे धाडस करणे त्यांना अवघड होई.

तलाकपीडित मुस्लीम महिला परिषद पुण्यातील पूना गोवन्स हॉलमध्ये ठरवल्याप्रमाणे २३ नोव्हेंबर १९७५ रोजी आयोजित करण्यात आली. अनेक मुस्लीम महिलांना आयुष्यातून उठवणारा तलाक, बहुपत्नीत्व, वारसा हक्क इ. संदर्भात तरतुदी रद्द करून मुस्लीम महिलांना कायद्याचे संरक्षण आणि न्याय्य हक्क मिळवून देणारा कायदा अस्तित्वात आणण्याची गरज परिषदेत व्यक्त करण्यात आली. 'भारतीय समाजाला लागू होणारा, मानवी हक्क व समान नागरी हक्क यांवर आधारलेला समान नागरी कायदा शक्य तितक्या लवकर उपलब्ध करावा' अशी मागणी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने या परिषदेत करण्यात आली.

नजमा बेगम यांनी घटस्फोटितांची कहाणी कथन केल्यानंतर वरील आशयाचा ठराव परिषदेत मांडण्यात आला. या परिषदेला पुण्यातील सुमारे १०० तलाकपीडित महिला उपस्थित होत्या. शिवाय या महिलांच्या प्रती सहानुभूती व्यक्त करण्यासाठी सुमारे १५० मुस्लीम महिला आणि १५० मुस्लीम बांधवही उपस्थित होते. राज्यशास्त्र व इतिहास या विषयांच्या प्राध्यापिका कुलसूम पारेख यांनी प्रमुख भाषण केले. अध्यक्षस्थानी ॲड. नजमा शेख होत्या. परिषदेच्या प्रारंभी सय्यदभाई यांनी प्रास्ताविकात परिषदेचे उद्दिष्ट सांगितले. दलवाई आजारपणामुळे या परिषदेत उपस्थित राहू शकले नव्हते. त्यामुळे दलवाईंनी परिषदेच्या निमित्ताने पाठवलेला खास संदेश वाचून दाखवण्यात आला. परिषदेत रजिया बेगम, आमिनाबी अली मनिसा, इलाईस बेगम, शहाजहाँ औंधवाले इत्यादी तलाकपीडित भगिनींनी आपल्या जीवनातील घटस्फोटाच्या कहाण्या व्यक्त केल्या. या परिषदेमध्ये महाराष्ट्र शासनाला विनंती करताना –

१) जबानी व एकतर्फी तलाक रद्द करावेत

२) नाइलाजाने घटस्फोट घ्यायचा असणाऱ्या जोडप्यांना तो फक्त न्यायालयामार्फतच मिळवण्याची व्यवस्था व्हावी.

३) सक्तबंदीचा कायदा मुस्लिमांना लागू करावा.
४) पत्नी हयात असताना दुसरा विवाह करणे, हा दखलपात्र गुन्हा समजावा.
५) वक्फ बोर्डाने तलाकपीडित मुस्लीम महिला पुनर्वसन निधी उभारावा.

इत्यादी मागण्या ठराव रूपाने मंजूर करण्यात आल्या.

या तलाकपीडित मुस्लीम महिला परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे, तलाकच्या बळी ठरलेल्या महिला प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने एकत्रित आल्या होत्या. अशा महिलांना आपल्या वेदना मांडण्यासाठी अशा प्रकारचा मंच पहिल्यांदाच उपलब्ध झाला होता, आणि एकमेकांना आधार देत या महिला व्यक्त होत होत्या. 'मेरी कहानी अपनी जुबानी' या सत्रात ज्या पद्धतीने महिला व्यक्त होत होत्या आणि कायदा बदलण्याची मागणी करत होत्या, तो एक प्रकारचा दीर्घ पल्ल्याच्या जिहाद-ए-तलाकच होता. यांतील काही भगिनींच्या व्यथा उपस्थित श्रोत्यांच्या डोळ्यात अश्रू आणून अंजन घालण्याचे काम करत होत्या. यांतील काही प्रातिनिधिक व्यथा पुढीलप्रमाणे –

"परपुरुषाकडे पाहायचे नाही. आपला शौहर सोडून बाकीचे बच्चे, जवान, बुढे, भाई... कुणाकडेच पाहायचे नाही' हा आई-बडिलांनी घालून दिलेला दंडक मी पाळला. अय्याशी जीवन कधी घालवले नाही; दिवसातून पाच वेळचा नमाज कधी चुकला नाही; आजही माझा नमाज चुकत नाही. 'तो परवरदिगारच मला सहारा देणार' या विषयी मला मुळीच शंका नाही.' ही कहाणी होती, २२ वर्षांच्या अहमदुन्निसा शेखची. दिसायला सुंदर असणारी अहमदुन्निसा तीन मुलांची आई असल्याबर विश्वास बसत नव्हता. ती एस. एस. सी. नापास होती, म्हणजे मुस्लीम समाजात खूपच शिकलेली, आणि नवरा मॅट्रिक होता. तीन मुले होईपर्यंत अगदी व्यवस्थित चालले होते. अहमदुन्निसा स्वयंपाक चांगला करत नसल्याचा एका भल्या सकाळी नवऱ्याला शोध लागला. बस्स... त्याने जुबानी तलाक दिला. त्यानंतर अहमदुन्निसा शिक्षिका असलेल्या आईसोबत राहून एस. एस. सी.चा अभ्यास करत होती.

तिशीतल्या शहाजहाँ बेगमला मारहाण सहन करावी लागली. टॅक्सी ड्रायव्हर असलेल्या तिच्या नवऱ्याकडून तिला चांगला मुलगा झाला होता. तो तीन-चार वर्षांचा होईपर्यंत ती नवऱ्याची आवडती होती. मग कुठली तरी मुलगी त्याच्या मनात भरली आणि साडेसाती सुरू झाली. बी. एड. झालेली २४ वर्षांची नजमा शेख शिकलेली होती आणि दिसायलाही सुंदर होती. तिची नवऱ्याविरुद्ध तक्रार नव्हती, पण तिचा आदमी कमजोर ठरल्याने तिच्या सासू-सासऱ्यांचा जोर वाढला आणि त्यांनी तिला हाकलून लावले. मूळची मुस्लीमेतर असलेल्या ६० वर्षांच्या जैनबबीने मराठा खानदान सोडून प्रेमापायी मुस्लीम प्रियकराशी लग्न केले होते. लग्नानंतर १७व्या वर्षी तिला तलाक देण्यात आला होता. अनेक वर्षे संसार सुखी झाला आणि एके दिवशी ती नवऱ्याला नावडती झाली आणि नवऱ्याने तिला तलाक दिला. विड्या बनवण्याचं काम करून तिने आपली उपजीविका केली होती. एका दुसऱ्या मुस्लीम पुरुषाने जैनबला विवाहाचे आमिष दाखवून तिच्या जवळचे सोनेनाणे ओरबाडले, मात्र इच्छा पूर्ण झाल्यानंतर लग्नास नकार दिला. नंतर या पुरुषाने एका नर्ससमवेत विवाह केला. मात्र जेव्हा तिला जैनबबीची कहाणी समजली, तेव्हा त्या नर्सने या

पतीला सोडून दिले. तेव्हा जैनबबीने या पुरुषाला विवाह करण्याची विनंती केली व त्याने विवाह केला. त्या पुरुषापासून जैनबला ९ मुले झाली. त्यानंतरही एक तिसरी महिला त्याच्या जीवनात आली आणि त्याने जैनबला तलाक दिला. नंतर या नऊ मुलांची काळजी घेण्यासाठी जैनबबी पडेल ते काम करत होती. वयाच्या साठीनंतर तिचा मुलगा आणि सून दोघांनीही जैनबची काळजी न घेता तिला वाऱ्यावर सोडले. नंतर जैनबबी एकटी राहू लागली आणि आपल्या शेजार-पाजाऱ्यांच्या उपकारांवर जगत राहिली.

साबिरा बेगमचीही कथा अशीच आहे. तिशीत असलेल्या नियाज बेगमनेही उर्दूचा शिक्षक असलेल्या पुरुषाशी लग्न केले. त्याची बदली मिरजेला झाली, तेव्हा त्याने मुलाबरोबर तिलाही बाहेर काढले, कारण त्याला एका दुसऱ्या मुलीशी विवाह करायचा होता. सुदैवाने या उर्दू शिक्षकाचे भाऊम म्हणजे नियाज बेगमचे दीर भावीच्या बाजूने उभे राहिले, पण या शिक्षकाने दाद दिली नाही. जानेवारीच्या कडक थंडीत नियाज मुलासमवेत घराबाहेर राहिली, पण हटली नाही. 'हे घर सोडून मी जाणार नाही' हा तिचा हेका तिने कायम ठेवला. असे तीन दिवस आणि रात्री गेल्या. मग दोन वर्षांच्या मुलाला सडकून कफ भरला. मग मात्र तिचे अवसान गळाले. ती उठून माहेरी चालती झाली. एक घटस्फोटित स्त्री म्हणाली की, ती बाईट, पापी, बदचलन असल्याचे खोटे आरोप लावून तिला सोडून दिल्यामुळे त्याचा डाग तिला आयुष्यभर लागल्यागत झाला. त्यामुळे इस्लाममध्ये तलाकपीडित महिलांशी विवाह करण्याची शिफारस केलेली असली, तरी एकदा स्त्रियांवर बदचलनपणाचा डाग लागल्यानंतर त्यांना चांगला नवरा मिळणे व त्यांचा संसार उभा राहणे या गोष्टी कठीण होऊन जातात. अशा महिलांकडे समाज नेहमीच बाईट नजरेने पाहतो.

शमा शेख अब्दुल गफुर ही तरुणी बोलण्यासाठी उभी राहिली, मात्र दुःखद भावना अनावर झाल्यामुळे ती काहीही बोलू शकली नाही. 'तलाकनंतर अनेक मुस्लीम महिला जिवंत असूनही मुडद्यासारख्या जगतात' असे एका महिलेने सांगितले.

दुःखी, बेसहारा मुलींच्या आणि स्त्रियांच्या अशा या दर्दभऱ्या कहाण्या होत्या, पण त्याही कोणाच्या कानी पडू नयेत, म्हणून बुजुर्ग मंडळींनी आटोकाट प्रयत्न केले. या 'पाखंड्यांच्या' परिषदेला त्यांनी येऊ नये म्हणून खूप प्रयत्न केले, पण या स्त्रियांनी दाद दिली नाही. जे काही बाईट करायचे होते, ते त्यांनी केलेच होते. त्यापलीकडे आणखी काही बाईट होण्याची त्यांना भीती नव्हती. शिवाय त्यांनी आता जिहाद-ए-तलाक चालू केला होता. बुरखा टाकून आपल्या हक्कांसाठी उभ्या राहिलेल्या या मुस्लीम स्त्रिया हीच एक घोषणा परिषदेत सारख्या देत होत्या - 'जिहाद-ए-तलाक जिंदाबाद'. या प्रसंगी व्यक्त केलेल्या मनोगतात प्रा. कुलसूम पारेख म्हणाल्या, 'तलाक देण्याघेण्यात काहीच गैर नाही; कधीकधी तो आवश्यकही असतो, परंतु मानवी हक्कांवर आधारित तलाक पद्धती असावी, एवढीच आमची मागणी आहे.' त्यांनी हिंदू कोड बिलाची बरीच स्तुती केली. 'या बिलामुळे हिंदू महिला २००० वर्षे पुढे गेल्या, तर आमच्या शरीयतमुळे मुस्लीम महिला १४०० वर्षे मागे राहिल्या. भारतीय मुस्लिमाला अन्य धर्मातील बाईट गोष्टींवर टीका करण्याचा जरूर हक्क आहे. तसाच हक्क अन्य धर्मीयांनाही मुस्लीम धर्मातील बाईट गोष्टींवर टीका करण्याचा आहे. 'आपले कायदे बेहतरीन असून ते बदलण्याचा कोणालाही

अधिकार नाहीं असे मुस्लीम बांधवांना वाटते. बालपणापासूनच हे असे संस्कार त्यांच्यावर केले जातात.' या प्रसंगी त्यांनी मुंबईतील शारदाच्या विवाहाची व त्यापायी पहिल्या बायकोच्या आयुष्याच्या झालेल्या दुरवस्थेची सत्यकथा सांगितली. एका साठ वर्षाच्या इसमाने वीस वर्षे वयाच्या तरुणीशी लग्न केले. ती सलवार घालत असे. 'साडीतील महिला अधिक आवडते' या फुसक्या सबबीपायी त्याने पहिल्या पत्नीला तलाक दिला आणि सोळा वर्षाच्या दुसऱ्या मुलीशी विवाह केला. पहिल्या पत्नीच्या नशिबी मात्र ५५ वर्षाच्या दुसऱ्या इसमाशी लग्न करणे आले. 'अशा अविचारांना पुसून टाकण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक समाजाने निधर्मी शाळा सुरू करण्याची वेळ आता आली आहे' असे सांगून प्रा. कुलसूम पारेख म्हणाल्या, 'आजपासून ५० वर्षांनी जेव्हा मुस्लीम महिला तलाकच्या बंधनातून मुक्त होतील, त्या वेळी आजच्या दिवसाचे महत्त्व किती आहे, हे समजू शकेल. हमीद दलवाई त्या वेळी थोर समासुधारक म्हणून ओळखले जातील आणि आज ज्याप्रमाणे आपण सर सय्यद अहमद यांच्यासमोर नतमस्तक होतो, तसेच त्या वेळी दलवाईंच्या समोर आपण नतमस्तक होऊ. आजचे शहीद हे उद्याचे पैगंबर असतात' अशा शब्दांत प्रा. कुलसूम पारेखांनी हमीद दलवाईंचा गौरव केला. ॲड. नजमा शेख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात तलाक, चार विवाह आदी संबंधीचा इतिहास कथन करून आपल्या व्यक्तिगत फायद्यासाठी या अन्यायी पद्धती नष्ट केल्या जाणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

या परिषदेसाठी उपस्थित राहण्याची इच्छा अनेक महिलांनी व्यक्त केली, मात्र 'आपण परिषदेस गेलो, तर आपल्याला 'तलाक' देऊन हाकलण्यात येईल' अशी भीती त्यांना वाटत होती, असे परिषदेनंतर भेटलेल्या महिलांनी सांगितले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने सुरू केलेल्या तलाकच्या प्रश्नावरील मोहिमेस महिलांनी चांगला प्रतिसाद दिला होता. अनेक महिलांना लहान मुलांच्या खेळण्यासारखे वागवण्यात येत असल्याचे निदर्शनास येत होते. तरुण वयापासून ते वृद्धावस्थेत पोहोचलेल्या महिलांपर्यंत सगळ्या महिला मंडळाकडे अपेक्षेने पाहत होत्या. या महिलांकडे फक्त उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्यात येत होते आणि त्याच प्रकारे त्यांना वापरण्यात येत होते. अशा महिलांना माणूसपणाची वागणूक मिळवून देण्यासाठी मंडळ प्रयत्नशील असताना अनेकांनी या कार्यास पाठिंबा दिला. तथापि जिहाद-ए-तलाक चळवळीस अखिल भारतीय मुस्लीम व्यक्तिगत कायदा मंडळाने विरोध केला. या मंडळाचे चिटणीस मिनातुल्ला रहमानी म्हणाले की, 'मंडळाची ही चळवळ अयोग्य आहे. महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्याची भरपूर तरतूद मुस्लीम वैयक्तिक कायद्यात आहे. दुर्दैवाने काही व्यक्ती या कायद्याचा आपल्या फायद्यासाठी वेगळा अर्थ लावतात व गैरफायदा घेतात.' कुराणातील काही चांगल्या बाबी गाळला जात असल्याचा आरोपही रहमानी यांनी या वेळी केला. 'सत्यशोधक मंडळाच्या परिषदांना शंभर-दीडशे महिला असतात, तर व्यक्तिगत कायदा मंडळाच्या कार्यक्रमासाठी हजारो महिला उपस्थित राहून व्यक्तिगत कायद्याला पाठिंबा देतात' असे रहमानींनी सांगितले. अर्थात, असे वाद-प्रतिवाद मंडळाला नवे नव्हते. प्रत्येक समाजातील पुरोगामी-प्रतिगामी, सनातनी-उदारमतवादी यांच्यात असे वाद होत असतात. मात्र या मंडळींनी

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या प्रबोधन कार्याविरुद्ध मोहीम उघडून मंडळ मुस्लीमविरोधी असल्याचा अपप्रचार केला आणि तो मुस्लीम प्रबोधनातील मोठा अडथळा ठरला.

तलाकची अन्याय्य रूढी

तलाकपीडित मुस्लीम महिलांची परिषद पुण्यात भरत असताना या महिलांच्या समस्यांकडे लक्ष वेधणारे दोन लेख प्रसिद्ध झाले. 'या आंतरराष्ट्रीय महिला वर्षात आपल्या तलाकपीडित भगिनींचा विचार मुस्लीम समाज करील आणि ही अनिष्ट प्रथा रद्द करण्याच्या प्रयत्नांना परिषदेमुळे वेग येईल' अशी आशा या लेखांमधून व्यक्त करण्यात आली होती.

पुण्यात मुस्लीम सत्यशोधक मंडळाने सप्टेंबर १९७५च्या महिन्यात तलाकपीडित महिलांचा प्रश्न हाती घेतला. त्याला चांगला प्रतिसाद मिळत होता. 'एका महिन्यात शेकडो महिलांनी आपली गाऱ्हाणी मंडळापुढे मांडली' असे मंडळाचे कार्यकर्ते सय्यदभाईंनी एका निवेदनात म्हटले आहे. 'तलाकला विरोध करणे म्हणजे काही इस्लाम धर्मविरोधी वर्तन करणे नव्हे. धर्माच्या नावाखाली मुस्लीम समाजाचे जे नेते या सुधारणेला विरोध करीत आहेत, ते धर्म आणि सामाजिक सुधारणा यांची गल्लत करीत आहेत. परंपरेने काही सामाजिक प्रथा धर्माशी निगडित केल्या गेल्याचे प्रत्येक धर्मातच आढळते, पण या प्रथा काही त्या धर्माचा आवश्यक भाग नसतात. त्यांपैकी कालबाह्य अनिष्ट प्रथा बदलत्या काळानुसार रद्द केल्या पाहिजेत. हिंदू समाजात एके काळी सतीची चाल रूढ होती. ती कायद्याने रद्द करण्यात आली. द्विभार्याबंदी कायदा, घटस्फोट कायदा या सुधारणाही कायद्याने करण्यात आल्या. सामाजिक सुधारणा कायद्याने कराव्यात की नाहीत, हा टिळक-आगरकरांच्या काळात एक वादाचा विषय होता. संमती वयाच्या बिलावर त्या वेळी केवढे रण माजले होते! सामाजिक सुधारणा कायद्याने घडवून आणणे शक्य असेल, तर जरूर घडवून आणाव्यात, अशी आगरकरांची भूमिका होती, तर सामाजिक सुधारणांबाबत परकीय ब्रिटिश सरकारने कायदे करण्यास टिळकांचा विरोध होता. आता हा वाद कालबाह्य झालेला आहे. सामाजिक सुधारणा केवळ कायद्याने होत नाहीत, हे अस्पृश्यता निवारण, हुंडाबंदी, दारूबंदी यांसारख्या कायद्यांच्या अनुभवाने दिसून आले आहे. सामाजिक सुधारणा यशस्वीपणे अमलात येण्यासाठी कायद्याच्या जोडीला लोकजागृतीची आवश्यकता असते. सत्यशोधक मंडळ अशी जागृती आणि लोकशिक्षण करीत आहे.

'नवऱ्याने तोंडाने तीन वेळा 'तलाक' शब्द उच्चारला की, मुस्लीम समाजाच्या रूढीप्रमाणे त्याला बायकोपासून घटस्फोट मिळतो. हा एकतर्फी घटस्फोट असतो. त्यासाठी बायकोची संमती आवश्यक नसते. घटस्फोटित पत्नीला पोटगी देणे, नुकसान भरपाई देणे याबाबतची कोणतीही जबाबदारी नवऱ्यावर राहत नाही – ही प्रथा स्त्रीवर उघड उघड अन्याय करणारी होती. अनेक दुर्दैवी मुस्लीम स्त्रियांचे संसार त्यामुळे विस्कळीत झाले. त्यांच्या मुलांचे हाल झाले. या महिला रस्त्यावर आल्या आणि व्यवस्थेच्या बळी ठरल्या.

"हिंदू, मुस्लीम, शीख, जैन ख्रिस्ती वगैरे धर्मांच्या लोकांसाठी विवाहविषयक कायदे वेगवेगळे न ठेवता सर्व समाजासाठी एकच कायदा असणे सर्वांत चांगले. धर्मनिरपेक्ष भूमिकेचा पुरस्कार

करणाऱ्या आपल्या सरकारने असा कायदा का केला नाही?' अशी समाज सुधारकांची तक्रार होती. सरकारचे त्यावर असे उत्तर होते की, 'अशा सुधारणांच्या बाबतीत त्या-त्या समाजाची तयारी व्हावयास हवी व त्या समाजाकडूनच त्यासंबंधी मागणी झाल्यानंतर सरकारने त्या बाबतीत पावले टाकणे योग्य होईल.' मात्र अशी आदर्श परिस्थिती निर्माण होण्यापूर्वी अनेकांचा बळी जाणे क्रमप्राप्त ठरते.

'सर्व भारतीयांसाठी समान नागरी कायदा होत नाही, तोपर्यंत निदान मुस्लीम कायद्यातील सामाजिकदृष्ट्या अनिष्ट तरतुदी रद्द करण्यात आल्या पाहिजेत. 'तलाक' ही त्यांपैकीच एक रूढी आहे. या रूढीत पती-पत्नीला समान लेखण्यात येत नाही. हिंदू विवाह कायदा, स्पेशल मॅरेजेस ॲक्ट यांत घटस्फोट व इतर कायदेशीर इलाजाकरता पती-पत्नीला समान लेखले आहे; मुस्लीम कायद्यातही अशी तरतूद होणे आवश्यक आहे. 'जबानी एकतर्फी तलाक देण्याच्या पद्धतीस कायद्याने बंदी करावी, द्विभार्याबंदीचा कायदा मुस्लिमांनाही लागू करावा, घटस्फोटित स्त्रीला दुसरे लग्न होईपर्यंत वा मृत्यूपर्यंत पोटगी मिळावी, विनाकारण दिलेल्या तलाकने समाजात होणाऱ्या स्त्रीच्या बेअब्रूबद्दल तिला नुकसान भरपाई देण्यास नवऱ्यास भाग पाडावे, तलाकपीडित महिलांना नोकऱ्यांत प्राधान्य द्यावे व अशा महिलांच्या मुलांना शिक्षणाच्या बाबतीत सवलती द्याव्यात' या प्रमुख मागण्या या परिषदेत केल्या गेल्या. तलाकपीडित मुस्लीम महिलांवरील अन्याय दूर होण्यासाठी या मागण्या मान्य होणे आवश्यक आहे. अशा परिषदा ठिकठिकाणी होऊन या मागण्यांवर मुस्लीम समाजात जागृती करण्यात येणे आवश्यक आहे. मुस्लीम स्त्रियाही आपल्या हक्कांबद्दल हळूहळू जागरूक होऊ लागल्या आहेत. त्यामुळे सामाजिक सुधारणेची प्रगती आता कोणी फार काळ रोखू शकणार नाही. अशा प्रकारचा विश्वास निर्माण होण्यासाठी म्हणूनच अशा परिषदांचे आयोजन उपयुक्त ठरते. यातून समाजाला आणि शासनाला संदेश मिळतो.'

२.३ समान नागरी कायदा: भूमिका

स्त्रियांना कायदेशीर संरक्षण मिळवून देणे, त्यांना मिळणारा एकतर्फी तोंडी तलाक व त्यांच्या मनाविरुद्ध घरात आणल्या जाणाऱ्या तीन सवतींपासून मुस्लीम स्त्रीचे रक्षण करणे व त्यासाठी हिंदू स्त्रियांना न्याय्य संरक्षण मिळवून देणाऱ्या हिंदू कोड बिलाप्रमाणे मुस्लीम स्त्रियांनाही न्याय्य संरक्षण मिळवून देणे हे 'समान नागरी कायदा करा' असे म्हणण्यामागचे एक उद्दिष्ट होते; परंतु केवळ तेवढेच एक मर्यादित उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून सत्यशोधक समाज नागरी कायद्याची मागणी करीत नव्हता. 'मुस्लीम स्त्रियांना न्याय मिळावा' ही एक ठळक बाब झाली; पण 'समान नागरी कायदा' असे म्हणताना त्याकडे बघण्याचा आणखी एक दृष्टीकोन आहे. तो दृष्टीकोन स्पष्ट करण्यापूर्वी 'मुस्लीम समाज समान नागरी कायद्याला विरोध का करतो' हे समजून घेतले पाहिजे.

मुस्लीम समाज एके काळी देशाचा राज्यकर्ता समाज होता. मुस्लीम अल्पसंख्य असूनही राज्यकर्ते म्हणून त्यांनी बहुसंख्याकांकरिता कायदे बनविले. हे करीत असताना मुस्लीम समाज जेता म्हणून या देशात वावरत होता व बहुसंख्य समाजाकडे जित म्हणून बघण्याची मुस्लीम समाजाची दृष्टी होती. पुढे ब्रिटिशांनी हा देश मुस्लीम व हिंदू यांच्याकडून हिसकावून घेतला, तरी ब्रिटिशांच्या 'फोडा व झोडा' या धोरणाप्रमाणे त्यांनी मुस्लिमांना जवळ केल्यामुळे मुस्लीम समाज एका संरक्षक छत्राखाली वावरत होता. पुढे देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे 'राजा' ही कल्पनाच इतिहासजमा झाली. यातून 'कोठल्याही एका जमातीचे राज्य' ही कल्पनाही अडगळीत जाऊन बसली. भारताने लोकशाही पद्धत स्वीकारली व 'धर्माधिष्ठित राज्य' ही कल्पनाच फेटाळून लावली. असे सर्व घडूनही मुस्लीम समाज अजून भूतकाळातच वावरत आहे. तो लोकशाहीची कल्पनाच मनापासून स्वीकारण्यास तयार नाही. 'कोठलाही धर्म नसलेले सरकार असू शकते' यावर मुस्लिमांचा विश्वासच बसत नाही. 'एके काळी आम्ही जेते होतो, राज्यकर्ते होतो, कायदे करण्याचा अधिकार आमचा होता. आता लोकशाहीत बहुमत हिंदूंचे असल्याने ते आमच्यावर अन्याय करणारेच कायदे बनवणार' अशा समजुतीच्या कोंडीत सापडल्यामुळे मुस्लीम समाज समान नागरी कायद्याला विरोध करीत राहिला आहे.

या कारणाबरोबरच समान नागरी कायद्याला विरोध करताना तो आपल्या दोन लाडक्या धर्म-कल्पनांचा वापर करतो. त्या म्हणजे, एक दारुल इस्लाम व दुसरी दारुल हर्ब. 'दारुल इस्लाम' म्हणजे मुस्लीम सत्ता असलेले राज्य व 'दारुल हर्ब' म्हणजे मुस्लीम सत्ता नसलेले राज्य. या दोन्ही कल्पनांचा मुस्लिमांवर अजून पगडा आहे. अर्थात, या कल्पना मांडीत असताना मुस्लीम समाज बरेच काही सांगून जातो. तो या कल्पनांचा उपयोग समान नागरी कायद्याला विरोध करताना कसा करतो, एवढेच आपण पाहावयाचे आहे.

इतर मुस्लीम राष्ट्रांनीही शरीयतच्या कायद्यात बदल करून आधुनिक काळाशी सुसंगत असे कायदे मुस्लीम समाजासाठी बनविले असल्याचे दाखवून द्यायला लागताच भारतीय मुस्लीम

उत्तर देतात की, 'तेथे मुस्लीम राज्य आहे, सत्ता मुसलमानांच्या हातात आहे. म्हणजे तेथे दारुल इस्लाम आहे. म्हणून त्यांनी मुस्लिमांसाठी कायदा बनविला तरी बिघडत नाही. मुस्लीम सत्तेला तो अधिकारच आहे; पण भारत हे बहुसंख्य हिंदूंचे राष्ट्र आहे. येथे लोकशाही असली, तरी बहुमत हिंदूंचेच आहे. त्यामुळे येथे दारुल इस्लाम नसून दारुल हर्ब आहे व दारुल हर्बला मुसलमानांसाठी कायदे बनवण्याचा अधिकारच पोहोचत नाही.' याचाच अर्थ, येथील लोकशाही पद्धत स्वीकारण्यासाठीच मुस्लीम मन तयार नसल्याचे उघड़ दिसते; पण हे उघडपणे सांगण्यास ते धजावत नाहीत. काही जण ते धाडस करतातही; पण सर्वसामान्य मुस्लीम समाज मात्र वेगळी भूमिका घेतो.

त्यांची ती वेगळी भूमिका म्हणजे – 'कुराण हा आमचा दैवी धर्मग्रंथ आहे. त्यातील आज्ञा साक्षात अल्लानेच पैगंबरांकरवी आमच्यासाठी धाडल्या आहेत. त्यातील कायद्यासंबंधीच्या आज्ञादेखील अल्लानेच पाठविल्या आहेत. त्यासुद्धा चिरंतनच आहेत. त्यांत बदल करण्याचा मर्त्य मानवाला अधिकारच नाही. तो अधिकार कोठल्याच सत्तेला नाही. जर कायदेच बनवायचे असतील, तर ते कुराणातील आज्ञेविरुद्ध असता कामा नयेत, आणि जर सर्व नागरिकांना समान नागरी कायदाच बनवायचा असेल, तर एकच मार्ग मोकळा आहे. तो म्हणजे, आमच्या शरीयतचा कायदा! तो सर्व नागरिकांना – हिंदूंना, ख्रिश्चनांना – लागू होईल, अशी तरतूद करण्यात यावी.' असा घातक युक्तिवाद ते करतात. समान नागरी कायद्याला विरोध करणारे असे दोन प्रवाह प्रामुख्याने भारतीय मुसलमानांमध्ये आढळून येतात.

तिसराही एक प्रवाह असल्याचे आढळून येते. हा निव्वळ अज्ञानावर आधारित आहे. त्यांचे म्हणणे असे की, 'आम्हा मुसलमानांना भारतीय घटनेने अल्पसंख्याकांचे 'खास हक्क' म्हणून काही हक्क बहाल केलेले आहेत. त्यानुसार आम्हाला आमची संस्कृती, भाषा व धार्मिक स्वातंत्र्य दिलेले आहे. याचाच अर्थ असा की, आमच्या शरीयतच्या कायद्याचा उगम आमच्या धर्मातच असल्याने तो अबाधित ठेवण्याचे आश्वासन आम्हाला घटनेनेच दिलेले आहे. त्यात बदल करण्याचा, त्याऐवजी दुसरा कायदा आमच्यावर लादण्याचा सरकारला किंवा संसदेला अधिकारच नाही. जर त्यांनी आमच्या शरीयतचा कायदा बदलून भारतातील सर्व नागरिकांना समान लेखणारा कायदा केला, तर आमचा धार्मिक व सांस्कृतिक हक्क हिरावला गेला, असा अर्थ होईल. ते आम्ही कदापि सहन करणार नाही.' जर असे काही घडलेच, तर जिहादची भाषा करायलाही ते कमी करत नाहीत.

याप्रमाणे भारतीय मुसलमानांचा समान नागरी कायदा करण्यास विरोध आहे. या विरोधी वृत्तीमध्ये इतरही काही वेगळ्या छटा आहेत; पण 'समान नागरी कायदा नको' यावर सर्वांचे एकमत आहे आणि केवळ याच कारणासाठी 'समान नागरी कायदा फार आवश्यक आहे' असे मंडळाला वाटत आले आहे. समान नागरी कायदा बनविला की, संसदेच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या मुस्लीम समाजाच्या वृत्तीत बदल घडवून आणणे शक्य होईल. त्यांच्यात हा नेमका बदल पडवून आणण्यासाठीच समान नागरी कायदा बनविणे अगत्याचे आहे. औषध घेण्यास काऽकू करणाऱ्या रुग्णाला चतुर डॉक्टर आळेबळेच कडू औषध पाजतात. त्याचप्रमाणे

या समाजाला हा समान नागरी कायद्याचा कडू वाटणारा, पण अंती हिताचा असणारा डोस पाजणे येथील राज्यकर्त्यांचे कर्तव्यच आहे.

दारुल हर्बच्या सबबीखाली समान नगारी कायद्यास विरोध करणाऱ्यांच्या हे लक्षात येत नाही की, 'निधर्मी घटना आणणाऱ्या एका देशाचे नागरिक म्हणून आपण राहत आहोत व भारत ही कधीही दारुल इस्लाम होण्याची कणभरदेखील शक्यता नाही. शिवाय दारुल हर्ब, दारुल इस्लाम या दोन्हीही कल्पनाच आता कालबाह्य ठरल्या आहेत.' ज्या काळात अल्पसंख्याकांना धार्मिक छळांना तोंड द्यावे लागत असे, अशा काळात जन्मलेल्या त्या कल्पना होत्या. अल्पसंख्याकांना आपला धर्म, संस्कृती टिकविता यावी, अल्पसंख्य हे बहुसंख्य होऊन किंवा युद्धाच्या मागनि सत्तेवर येण्याची शक्यता निर्माण व्हावी, असा काळ आता केव्हाच मागे पडला आहे.

धर्मनिरपेक्ष घटना असलेल्या देशात मुस्लीम राहत आहेत. येथे त्यांचा धार्मिक छळ होण्याची काडीमात्र शक्यता नाही. येथे बहुसंख्याकांच्या बरोबरीने त्यांना अधिकार आहेत. त्यांच्यावर दुसरे कोणीही राज्य करत नसून नागरिकच नागरिकांवर राज्य करीत आहेत. या देशाने लोकशाही पद्धतीची घटना स्वीकारली असून लोकशाहीत संसद सार्वभौम मानली जाते. 'संसदेला कोणत्याही धर्माच्या, जातीच्या नागरिकांसाठी कायदे बनविण्याचा अधिकार आहे' हे वास्तव मुस्लीम मान्य करणार आहेत काय, हा खरा प्रश्न आहे. कारण लोकशाहीत सर्व नागरिक समान असतात. असे असताना हिंदूंना एक कायदा, मुसलमानांसाठी दुसरा, इतर धर्मीयांकरिता तिसरा असे धर्मावर आधारलेले कायदे धर्मनिरपेक्ष लोकशाही राष्ट्रात कसे चालू शकतील, याचाही मुस्लिमांनी विचार करावा.

'आपण या देशाचे नागरिक आहोत' असे मानल्यावर येथील संविधानाने मान्य केलेले व संसदेने बनविलेले कायदे भारतीय मुसलमानांनी मानले पाहिजेत. ते जर या देशाच्या संविधानाचे सार्वभौमत्व, संसदेचा (मुस्लिमांसाठीही) कायदे बनविण्याचा अधिकार मान्य करणार नसतील, तर घटनेने दिलेले समान नागरिकत्व नाकारून 'दुय्यम दर्जाचे नागरिकत्व स्वीकारणें किंवा 'दारुल हर्ब म्हणून या देशातून निघून जाणें' हे दोनच पर्याय त्यांना उरतात. हे करणे किती महागात पडेल, याचा ज्याचा त्यानेच विचार केलेला बरा! या देशाचे नागरिक म्हणून राहण्यात, आपले कर्तव्य बजावण्यात भारतीय मुसलमानांचे हित आहे, अशी मंडळाची खात्री आहे.

समान नागरी कायद्यास विरोध करणाऱ्यांचा दुसराही एक वर्ग आहे. त्याचे म्हणणे, 'आमचे कायदे 'शरीयत ' हे दैवी, म्हणजे परमेश्वरनिर्मित आहेत.' त्यांचा हा युक्तिवादही फोल आहे.

पहिली गोष्ट, 'कायदे दैवी असू शकतात, परमेश्वरनिर्मित असू शकतात' हेच मंडळ नाकारते. धर्माचे सरळ दोन भाग पडतात. इहलोकाशी संबंध येणारा म्हणजे 'आदत' हा एक भाग, तर दुसरा 'पारलौकिक' म्हणजे शुद्ध आध्यात्मिक असणारा 'इबादत'चा भाग. त्यांपैकी आदतशी संबंधित असणाऱ्या, म्हणजे इहलौकिक बाबी समाजच ठरवीत असतो. 'कायदे बनविणें' ही इहलौकिक बाब असल्याने तेपण समाजच बनवीत असतो. त्याचा आध्यात्मिक बाबींशी संबंध असूच शकत नाही. निदान 'तो तसा नसावा' अशी मंडळाची भूमिका आहे. अर्थात, धर्मस्थापनेच्या वेळच्या सामाजिक परिस्थितीला अनुसरूनच कुराणातील कायदे बनवावे लागले; कारण पैगंबरांना

धर्मांबरोबरच सत्तापण टिकवायची होती, वाढवायची होती. तेव्हा त्या काळात बनविलेले कायदे त्या काळच्या समाजाला योग्य असतीलही; पण आता एकविसाव्या शतकात आणि तेही एका निधर्मी राज्य असलेल्या देशात, 'आमचे कायदे दैवी आहेत, ते बदलण्याचा मानवाला अधिकारच नाही' असे म्हणणे म्हणजे शुद्ध अंधश्रद्धपणाचे, वेडगळपणाचे आहे. मंडळ असे स्पष्टपणे सांगू इच्छिते की, कोठल्याही धर्मग्रंथामध्ये सांगितलेल्या इहलौकिक बाबी (मग त्या कायदे, हक्क, कर्तव्ये अशा काहीही असोत) काळाबरोबर बदलल्या पाहिजेत. तसे बदलण्याइतका लवचीकपणा त्यांच्यात असला पाहिजे आणि तसे केल्यानेच धर्माचा गाभा कायम ठेवता येईल, धर्माला अभिप्रेत असलेली मूल्ये जिवंत ठेवता येतील. कदाचित तो धर्म 'वेगळा' असेल, त्याचा मुखवटा वेगळा असेल, कोणी त्याला धर्मही म्हणणार नाही; पण यातून सर्व धर्मांचा गाभा असलेला 'मानवतावाद' मात्र आपण कायम ठेवू शकू, असा मंडळाला विश्वास आहे.

समान नागरी कायद्याला विरोध करणाऱ्या तिसऱ्या गटाच्या मते, या देशाच्या घटनेनेच मुस्लिमांना धार्मिक हक्क दिलेले आहेत; पण संधिसाधू व आपमतलबी मंडळी धार्मिक हक्कांचा ज्या पद्धतीने अर्थ लावतात, ती पद्धतच मंडळाला मान्य नाही. शब्दच्छल करून आपल्याला अनुकूल असाच अर्थ घटनेतून काढणे, हा निव्वळ दांभिकपणाचा प्रकार आहे. अल्पसंख्याकांना व विशेषतः मुस्लिमांच्या संदर्भात दिलेले धार्मिक हक्क फक्त 'इबादत'पुरतेच (आध्यात्मिक बाबी) मर्यादित आहेत आणि 'आदत'चे, म्हणजे समाज नियंत्रणाचे कायदे बनवण्याचे सर्व अधिकार घटनेने संसदेला दिलेले आहेत. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांमधील चव्वेचाळिसाव्या कलमान्वये, देशातील सर्व नागरिकांना लागू पडेल असा एक समान नागरी कायदा करण्याचे आवाहन शासनाला करण्यात आले आहे. याचाच अर्थ असा की, सर्व धर्मांच्या नागरिकांसाठी कायदे बनविण्याचे सर्व अधिकार घटनेने शासनाला दिलेले आहेत. नागरिकांना फक्त इबादतचे म्हणजे केवळ आध्यात्मिक उपासनेचे स्वातंत्र्य आहे. २५ (२ ब) कलमही हेच सांगते. घटनेने मर्यादित अर्थाने धार्मिक स्वातंत्र्य मान्य केलेले आहे. यावर समान नागरी कायदा बनविण्याचा शासनाला अधिकार देणारे घटनेतील चव्वेचाळिसावे कलमच घटनेतून काढून टाकण्याची मागणी स्वतःला धर्माचे ठेकेदार समजणारे करतात! यातून त्यांच्या वृत्तीवर स्पष्ट प्रकाश पडतो.

समान नागरी कायद्याला मुस्लीम विरोध का करतात व त्यातील फोलपणा पाहूनही प्रश्न येथेच का संपत नाही? कारण खरा प्रश्न निव्वळ समान नागरी कायद्यापुरताच मर्यादित नाही. या देशातील सहा कोटी मुस्लिमांच्या वृत्तीत बदल घडवून आणल्यानेच हा प्रश्न संपविता येईल. मुस्लिमांनी मनापासून लोकशाही मान्य केली, तरच 'ही वृत्ती बदललीं' असे होईल. लोकशाही मान्य करताना तिचे काही संकेत पाळले पाहिजेत. सर्वांना समान अधिकार असतात, हे मान्य केले पाहिजे. या देशाची घटना इतर धर्मीयांइतकीच मुस्लिमांनाही मान्य असली पाहिजे. येथील बहुसंख्याकांच्या हितातच त्यांचे हित सामावले आहे, हे त्यांना समजले पाहिजे. सवतासुभा करण्याचे दिवस आता संपलेले असून सहजीवन जगण्यातच मुस्लिमांचे हित आहे. त्यांनी हक्कांबरोबरच कर्तव्यांचे निष्ठेने पालन करण्याची तयारी दाखविली पाहिजे. मुस्लीम समाज ज्या वेळी इतर समाजापासून स्वतःला वेगळा समजणार नाही, 'आम्हीही या देशाचे नागरिक असून हा

देश आमचा आहे. येथील इतर नागरिक हे आमचे बांधव आहेत' असे समजेल, त्याच वेळी हे घडेल. 'आमच्याइतकेच इतरांनाही अधिकार आहेत, या देशातील सर्व धर्माचे नागरिक पुरुष-स्त्रियांसह समान आहेत' असे ज्या वेळी मुस्लीम धर्मीय मान्य करतील, त्याच वेळी मुस्लिमांच्या वृत्तीत बदल घडून आल्याचे सिद्ध होईल. अर्थात, हे करण्यासाठी मुस्लीम समाजाला आपल्या तर्कदुष्ट मागण्या सोडल्या पाहिजेत. त्यांना शरीयतच्या कायद्यापेक्षा या देशाची घटना पवित्र वाटली पाहिजे. संसदेचे सार्वभौमत्व मान्य करून 'सर्वांना समान लेखणारा समान नागरी कायदा व्हावा' अशी मागणी आता मुसलमानांनीच केली पाहिजे व असे केल्यानेच ते बहुसंख्याकांचा विश्वास संपादन करू शकतील, असा मंडळाला दृढ विश्वास आहे.

समान नागरी कायदा केल्याने अजूनही बरेच फायदे पदरात पाडून घेता येतील. त्यामुळे या देशामधील निरनिराळ्या नागरिकांमधील दरी कमी होईल व एकराष्ट्रीयत्वाची भावना वाढीला लागेल, एकमेकांविषयीचा अविश्वास कमी होईल व सर्व नागरिकांना एकाच पातळीवर आणले गेल्याने समानतेच्या व लोकशाहीच्या पायावर देशाच्या नव-उभारणीचे कार्य करणे सुलभ होईल. त्यामुळेच खरीखुरी राष्ट्रीय एकात्मता साधण्याच्या बाबतीत एक पाऊल पुढे पडेल, असा मंडळाचा विश्वास असल्याने 'अनेक ध्येयांपैकी समान नागरी कायदा' हे एक ठळक ध्येय मंडळाने उराशी बाळगले होते व आहे. तो लवकरात लवकर व्हावा, म्हणून मंडळ त्या वेळी सर्व शक्ती पणाला लावण्याच्या तयारीत होते.

सध्या समान नागरी कायदा अस्तित्वात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र त्याच्या प्रेरणा संविधानात्मक कर्तव्याच्या आहेत का, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. समान नागरी कायद्यासंदर्भात मंडळाची भूमिका पन्नास वर्षांपूर्वी जशी होती, तशीच ती आजही आहे. या संदर्भात केले गेलेले तर्कशुद्ध विश्लेषण आजही मंडळासाठी मार्गदर्शक आहे.

समवर्ती सूचीत असणारा हा विषय स्वातंत्र्योत्तर काळात एकाही राज्यात अमलात आणला गेला नाही. याला अपवाद फक्त गोवा आहे. पोर्तुगालांनी केलेला हा कायदा आजही गोव्यात कार्यरत आहे आणि त्यामुळे इस्लामसह कोणताही धर्म संकटात सापडला नाही. या कायद्यासोबत लोक सुखा-समाधानाने नांदत आहेत. २०२४ मध्ये उत्तराखंड राज्यात समान नागरी कायदा अस्तित्वात आला आहे. मुस्लीम महिलांसाठी त्याचा नक्कीच उपयोग होणार आहे. मात्र भारतीय संविधानास अपेक्षित असलेल्या समान नागरी कायद्याच्या दृष्टीने यात अनेक उणिवा आहेत.

२०१६ मध्ये भारताच्या विधी आयोगाने १६ प्रश्न विचारले. त्यात शेवटचा प्रश्न होय-नाही स्वरूपात विचारला होता. 'समान नागरी कायदा असावा का?' या प्रश्नामुळे प्रतिसाद कमी आणि प्रतिक्रिया अधिक उमटल्या, कारण संविधान-निर्मितीपासून हा विषय चर्चेत आहे. मुस्लिमांना समान नागरिकत्व नाकारण्यासाठी संघ परिवाराने सुरुवातीला समान नागरी कायद्यास विरोध केला. हमीद दलवाई, समाजवादी लोहिया आदींनी हा विषय लावून धरला होता. मुस्लिमांनी याला कसा व का विरोध केला, याची चर्चा आपण या प्रकरणात केली आहेच; पण नंतर संघ व भाजपा यांनी हा विषय राजकीय व धार्मिक ध्रुवीकरणासाठीच वापरला. भाजप केंद्रात व राज्यात शासनात असताना मात्र त्यांने समान नागरी कायद्यावर कोणतीही कृतिशीलता

दाखवली नाही. समान नागरी कायदा केवळ मुस्लीम समाजासंदर्भात वापरला गेला. हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध व अन्य धर्मीयसुद्धा या संदर्भात कोणती भूमिका घेतात, हा चर्चेचा विषयच झाला नाही.

समान नागरी कायद्याचा साधा मसुदाही तयार न करता 'तो हवा का नको?' असे विचारणे हास्यास्पद आहे. दलबाई व मुस्लीम सत्यशोधक मंडळाने समान नागरी कायद्याची मागणी करताना समता, धर्मनिरपेक्षता, एकात्मता, समान नागरिकत्व हे आधारभूत घटक गृहीत धरलेले आहेत, पण समान नागरी कायद्याबद्दल अनेक गैरसमज असताना व मसुदा न दाखवता, तयार न करता त्यावर चर्चा करणे हे फक्त राजकीय हेतू साध्य करण्यासाठी हत्यार बनवल्याचे लक्षण आहे, अशी धारणा होण्याची शक्यता आहे.

देशातील बहुधार्मिकता-बहुसांस्कृतिकता व विविधता गृहीत धरून काही लोकशाहीवादी व्यक्तिगत कायद्याचे समर्थन करीत, या कायद्यातील विषमता, अन्याय दूर करून तो राज्यघटनेच्या कलम १४-१५शी सुसंगत करण्यास समर्थन देतात. या भूमिकेत तथ्यही आहे; परंतु समान नागरी कायद्यामुळे जे जे शक्य होणार आहे, ते ते सर्व या बदलामुळे शक्य होईलच, असे म्हणता येणार नाही.

शासनाने विशेष विवाह कायदा १९५४, गोव्यातील समान नागरी कायदा, डॉ. सत्यरंजन साठे यांचा समान नागरी कायद्याचा मसुदा समोर ठेवून, कायदेतज्ज्ञांची समिती नेमून या विषयाला सकारात्मक वाचा फोडली पाहिजे.

मुस्लीम समाजातील धर्मवादी गट याला विरोध करतीलच. असा विरोध हिंदू कोड बिल आणताना हिंदू जमातवाद्यांकडून झाला होताच. स्वातंत्र्यपूर्व काळात सतीची पद्धत बंद करतानाही विरोध झाला होता. तशा विरोधाला न जुमानता संविधानात्मक समाज निर्मितीसाठी नवे कायदे, सुधारणा आवश्यकच असतात. या संदर्भात लोकशिक्षण हवे; लोकानुनय नको.

कुराणमध्ये नसलेल्या, पण इस्लामवाद्यांना प्रिय वाटणाऱ्या दारुल इस्लाम, दारुल हर्ब या गोष्टी कालबाह्य झाल्या आहेत. धर्मनिरपेक्ष लोकशाही मूल्यांच्या काळात हा अट्टाहास चालणार नाही. पन्नास वर्षांपूर्वीचीच, 'संसदेला व्यक्तिगत कायद्यात बदल करण्याचा हक्क नाही' ही भाषा आजही वापरण्यात येत आहे. हे समाजाच्या व एकात्म राष्ट्राच्या दृष्टीने घातक आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने समान नागरी कायद्यासंदर्भात वेळोवेळी भूमिका स्पष्ट केली आहे; गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न केले आहेत. वास्तविक, आज ९५% समान नागरी कायदा अस्तित्वात आहेच. ५% असणारा कौटुंबिक कायदा व्यक्तिगत कायद्याच्या नावाखाली शिल्लक आहे. त्याला एक पर्याय म्हणून 'समान-सेक्युलर कौटुंबिक कायदा' तयार केल्यास व तो अनिवार्य केल्यास अनेक प्रश्न सुटतील. या प्रकारच्या कायद्यामुळे विविध धर्मांतील परंपरा, संस्कृती कायम ठेवूनही या कायद्यानुसार विवाह नोंदणी केल्यास विविधता जपत असतानाच समान अधिकार, समान न्यायाची भावना निर्माण होईल. याला मुस्लीम जमातवादी संघटना नक्कीच विरोध करतील, कारण धर्मवादी पुरुषप्रधान मानसिकता लवकर सुसंगत पर्याय स्वीकारत नाही. 'विवाह' हा धर्माचा भाग नसून तो परंपरेचा भाग आहे. परंपरा कालसुसंगत केल्यास धर्माला

धोका पोहोचत नाही, हे वास्तव पचवायला काही काळ जाईल. मात्र त्या दिशेनेच पुढचे पाऊल उचलले पाहिजे. मंडळाचे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

(या प्रकरणात सेक्युलॅरिझमसाठी काही ठिकाणी 'निधर्मी' असा शब्दप्रयोग वापरला आहे. त्यापेक्षा धर्मनिरपेक्षता, इहवादी हेच शब्द अधिक योग्य वाटतात किंवा 'सेक्युलर' हाच शब्द अधिक अर्थवाही वाटतो.)

अ. समान नागरी कायद्यास विरोध आणि मंडळाची भूमिका

(समान नागरी कायद्याविरुद्ध आयोजित मुंबई येथील मुस्लीम परिषदेच्या संदर्भात मुस्लीम सत्यशोधक मंडळाची भूमिका)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यास आणि मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करण्यासाठी किंवा समान नागरी कायदा अस्तित्वात आणण्यासाठी होत असलेल्या जनजागृतीच्या

मुस्लीम परिषदेच्या आयोजकांवर हमीद दलवाई यांचा आरोप

या परिषदेबाबत स्पष्टीकरण देताना हमीद दलवाई यांनी सांगितले की, 'या परिषदेत व्यासपीठावर असलेल्यांचा इतिहास पाहता याची कल्पना येईल. हाफिजखाँ माजी लीगवाले आहेत. अध्यक्ष मौलाना तैय्यबजी हे तर पाकिस्तानात गेले होते. तिथे जमेना म्हणून मौलाना आझाद यांना त्यांनी पत्र लिहिले व भारतात परत येण्याची परवानगी मिळवली. नेहरूंना सद्गती मिळावी म्हणून काही मुसलमानांनी नेहरूंच्या मृत्यूनंतर प्रार्थना केली. त्या वेळी त्या मुसलमानांचा निषेध करणारा फतवा मौलाना तय्यबजी यांनी काढला होता व दि. २० जून १९६४ रोजी दिल्लीच्या 'दावत' मध्ये तो प्रसिद्ध झाला होता. 'नेहरू हे काफिर असल्याने स्वर्गात जाऊच शकत नाहीत, तेव्हा त्यांच्यासाठी प्रार्थना अनावश्यकच आहे' असे त्यांनी त्यात म्हटले होते. मौलाना अब्दुल हसन हे मोतेमार संघटनेचे असून ही संघटना भारतविरोधी आहे. सर्व राष्ट्रविरोधी गट या परिषदेत एकत्र आले आहेत.

'झाल्या प्रकाराबाबत मी एवढी प्रतिक्रिया व्यक्त करतो की, मुस्लीम जातीयवाद्यांनी आणि सनातन्यांनी आपल्या विरोधकांविरुद्ध हिंसात्मक मार्ग अवलंबण्याचे ठरविलेले दिसते. हुल्लडीचे शस्त्र दुधारी असते. हे त्यांच्यावरही उलटू शकेल, हे मी त्यांना सांगू इच्छितो. झाल्या प्रकारानंतर मी पळालो असे त्यांनी म्हटले आहे. पैगंबरही आपल्या पाच अनुयायांसह मक्केहून मदिनेस पळाले होते. म्हणजे आम्ही त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून चालत आहोत. त्यांनी मक्का पुन्हा जिंकल्यानंतर जशी सर्वांना क्षमा केली होती, त्याप्रमाणे आम्हीही त्यांना क्षमा करू.

'धर्म' आणि 'राज्य' या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. लॉर्ड बेंटिंक ने सतीची चाल बंद

प्रयत्नांना विरोध करण्यासाठी डिसेंबर १९७२मध्ये मुंबईत आयोजित केलेल्या मुस्लीम परिषदेचे विविध पडसाद वृत्तपत्र माध्यमातून दिसून आले. या प्रकरणी मुस्लीम परिषदेच्या नऊ कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. यांत अहमद इस्माईल इब्राहिम (२६), अब्दुल हमीद अब्दुल खलील (२१), कमरुद्दिन अब्दुल (२१), मुसा युका (३०), गुलाम हुसेन अन्वर हुसेन (२०), महंमद जान महंमद (२५), अब्दुल गनी महंमद (२२), कुर्बान अली शकुरसाब (२४), कुदरत अली रूखमुद्दिन (२८) यांचा समावेश होता. पोलिसांनी काही लाठ्याही जप्त केल्या. अटक करण्यात आलेले कार्यकर्ते वय वर्ष २० ते ३० दरम्यानचे होते. तरुणांनाच मुस्लीम सत्यशोधक मंडळाविरुद्ध भडकवण्याचे प्रयोजन यातून स्पष्ट होते. मुस्लीम उलेमा, तसेच तथाकथित सुशिक्षित मुसलमान यांनी समान नागरी कायद्याविरुद्ध घेतलेल्या परिषदेत वृत्तप्रतिनिधींनादेखील मज्जाव करण्यात आला होता. ज्या अर्थी ही परिषद बुरख्यात घेण्यात आली, त्या अर्थी परिषदेतील चर्चा, कारस्थाने ही संशयास्पद असली पाहिजे. त्यामुळे 'या प्रकाराची चौकशी करावी' अशी मागणी हमीद दलवाई यांनी पत्रकार परिषद घेऊन केली. 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांवर

करताना काही हिंदूंना विचारले नव्हते. एक समाज मागासलेला राहिला, तर त्याचा अनिष्ट परिणाम इतरांवरही होतो. म्हणून समाज सुधारणा करण्यासाठी सरकारने कायदा करणे आवश्यक आहे. 'मुसलमान तयार झाले, तरच सरकार काही करील' ही भूमिका मला मान्य नाही. इजिप्तमध्ये नासेरने जे केले, तसेच इथे करावे लागेल. या देशात कुराण किंवा मनुस्मृती प्रमाण नसून घटना प्रमाण आहे आणि घटनेप्रमाणे समानतेसाठी संसदेला कायदा करण्याचा अधिकार आहे. म्हणून 'मुस्लीम कायदा हवा असेल, त्यांनी लिबियात जावे' असे मी म्हटले.'

'मुसलमानांना भारतांतर्गत पाकिस्तान हवे आहे काय?' असा प्रश्न विचारण्यात आला असता हमीद दलवाई म्हणाले, 'त्यांना वेगळा भूभाग नको असेल, पण तसा वेगळा दर्जा टिकविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. नागरिक म्हणून चालू कायद्याचे फायदे त्यांना हवेत आणि कौटुंबिक कायद्याबाबत मात्र ते स्वतंत्र मुस्लीम कायद्याची कास धरतात. असा स्वतंत्र दर्जा ठेवणे समानतेच्या विरुद्ध आहे.

'मराठी मुसलमानांचे नेतृत्व बिगर मराठी मुस्लिमांकडे आहे व त्यांनी महाराष्ट्र सोडून जावे, अशी घोषणा आम्हाला द्यावी लागेल' असे सांगून हमीद दलवाई म्हणाले, 'बुखारी उत्तर प्रदेशचे आहेत, तर हाफिजखाँ मंगलोरचे आहेत; बनातवाला गुजराती आहेत. उत्तर प्रदेशातील मुस्लिमांच्या समस्या, म्हणजे सर्व भारतातील मुस्लिमांच्या समस्या असल्याचे बुखारी मानतात. उर्दूचा प्रश्न तर उत्तर प्रदेशी मुसलमानांपुरता मर्यादित आहे, पण तो आमच्या मराठी मुस्लीम बांधवांवर लादण्यात येतो. त्यामुळे मराठी मुस्लिमांची प्रगती होत नाही. ते नालबंदीवाले व रिक्षावालेच राहतात. तेव्हा या बिगर मराठी मुस्लीम नेत्यांविरुद्ध आम्हाला मोहीम उभारावी लागेल.'

झालेला हल्ला पूर्वनियोजित होता' असे सांगून हमीद दलवाई म्हणाले, 'मुस्लीम जातीयवाद्यांनी व सनातन्यांनी आपल्या विरोधकांविरुद्ध हिंसक मार्ग अवलंबिण्याचे ठरविलेले दिसते. वास्तविक, असे हुल्लडीचे शास्त्र दुधारी असते. ते त्यांच्यावरही उलटू शकते.' या परिषदेत मुस्लीम स्त्रियांना मज्जाव असणे सूचक असल्याचे स्पष्ट करून दलवाई म्हणाले, 'दबल्या गेलेल्या मुस्लीम स्त्रियांच्या वतीने निर्णय घेण्याचा अधिकार या पुरुष मंडळींना कोणी दिला, हे स्पष्ट केले तर बरे होईल.'

'भारताच्या लोकसंख्येत बिगर मुस्लिमांचे बहुमत असल्याने तिला मुस्लीम कायदा बदलण्याचा

यांनी लिबियात जावे

या परिषदेसंदर्भात ३० डिसेंबर १९७२ रोजी महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्राने संपादकीय लिहिले. त्यात अशा प्रकारची परिषद आयोजित करणाऱ्या लोकांवर आणि तिच्या समर्थकांवर ताशेरे ओढले आहेत. 'जगातील नवे बदल लक्षात घेण्यास ही मंडळी तयार नाहीत. त्यांनी आपल्या बुद्धीची कवाडे बंद केली आहेत. सर्व मुस्लिमांनाही त्यात प्रवेश नव्हता. मुस्लीम कायद्यात बदल नको असणाऱ्यांच फक्त या परिषदेत आमंत्रण होते. तरीही 'सर्व मुस्लिमांची परिषद' म्हणून या परिषदेचा गाजावाजा केला जातो. बनातवाला वगैरेंनी लोकशाही, फॅसिझम वगैरे बरेच मोठे शब्द वापरले आहेत. कवाडे बंद करून, पत्रकारांनाही मज्जाव करून घेतलेल्या परिषदेच्या चालकांनी लोकशाहीच्या गोष्टी करणे तळीरामांनी दारूबंदीवर व्याख्यान देण्यासारखे आहे. या चालकांची दडपणेही इतकी की, परिषदेला पाठिंबा देऊन शरीयतमध्ये बदल नको असे सांगणाऱ्या, निवेदनावर सह्या करणाऱ्या मुस्लीम स्त्रियांनाही परिषदेत प्रवेश नव्हता.

'हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ ठिकठिकाणी सभा, परिषदा यांच्या द्वारे समाज सुधारणेच्या करत असलेल्या प्रचारामुळे मुस्लीम समाजातील बुरसटलेल्यांच्या झोपा उडू लागल्या आहेत. 'केंद्र सरकार मुस्लीम कायद्यात बदल करणार नाही' अशी इतके दिवस यांची समजूत होती, पण हा बदल सरकार स्वतः कायदा करून अमलात आणू पाहत नसले, तरी 'मुस्लीम समाजात सुधारणा व्हावी' असे पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना जरूर वाटते. म्हणून सुधारणांच्या प्रयत्नांचे त्या स्वागत करतात. हे प्रयत्न वाढीस लागले की, सरकार कायदा करील. 'अशा प्रकारचा कायदा व्हावा' अशी मागणी महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे केली आहेच. हमीद दलवाई यांनी केलेल्या जागृतीचा हा परिणाम आहे. ही जागृतीची लाट आता थांबवणे शक्य नाही, परंतु मुस्लीम समाजातील अज्ञानावरच ज्यांचे पुढारपण अवलंबून आहे, त्यांनी असा विरोध करून समाजाचे अज्ञान कायम ठेवण्याचे उद्योग चालवले आहेत.

सरकारने या मंडळींचे उद्योग बंद पाडले पाहिजेत. कारण त्यामुळे हिंदू जातीवाद्यांनाही प्रोत्साहन मिळेल. मुस्लीम कायद्यात बदल न करण्याची मागणी करण्यासाठी परिषद

अधिकार नाही, हा या परिषदेच्या संयोजकांचा युक्तिवाद अजब आहे असे प्रतिपादन करून दलवाई पुढे म्हणाले, 'भारतात मुस्लीम नेहमीच अल्पसंख्यांक राहणार. म्हणजे हा कायदा कधीच बदलता येणार नाही, असे संयोजकांना सांगायचे आहे काय? अथवा कायदा बदलावा म्हणून भारतात मुस्लिमांची बहुसंख्या करून इस्लामी राज्य प्रस्थापित करण्याचा जमात-ए-इस्लामीचा कार्यक्रम कसा अमलात आणावा, याचाही विचार या बुरख्यात घेतलेल्या परिषदेत करण्यात आला का? या प्रश्नांचा जाब फकी आणि हाफिजखाँ यांना विचारला पाहिजे. जातीय दंगली होतात तेव्हा नागरिक म्हणून संसदेचे संरक्षण घेणारे हेच मुस्लीम पुढारी त्याच संसदेपासून काही

भरल्याने आतापर्यंत जो युक्तिवाद शेकडो वेळा खोडला गेला, त्याचीच पुनरावृत्ती परिषदेत झाली असेल, तर नवल नव्हे. मुस्लीम कायदा म्हणे परमेश्वरप्रणित आहे. सर्वच धर्म परमेश्वर प्रणित असल्याने प्रत्यकाचे कायदे परमेश्वर प्रणितच होतात. पण म्हणून त्यांत बदल झाले नाहीत, असे नाही. व्यक्तिगत कायदे हे भारतीय घटनेने सर्व नागरिकांना दिलेल्या समान हक्कांना बाधा आणणारे आहेत. या कायद्यांत इजिप्त, इंडोनेशिया, मलेशिया, तुर्कस्तान इत्यादी मुस्लीम देशांत बदल झाले; पाकिस्तानातही झाले. पण येथे मात्र असा बदल करण्यास विरोध होतो, याचे कारण काय? तर म्हणे मुस्लीम बहुसंख्य असलेल्या देशात कायदा बदलला तरी चालेल, पण येथे मुस्लीम बहुसंख्य नाहीत. कायदा जर परमेश्वर प्रणित असेल, तर मग कोण बहुसंख्य व कोण अल्पसंख्य यावर त्यातील बदल कसा काय अवलंबून राहतो? शिवाय, या देशात संसद सार्वभौम आहे; मुस्लीम धर्मगुरू नव्हेत. या सार्वभौमत्वाला मुस्लीम परिषदेने आव्हान दिले असून ते स्वीकारले पाहिजे. परिषदेचा युक्तिवाद प्रमाण मानायचा, तर दोन पर्याय राहतात.

एक म्हणजे, हा देश मुसलमान होणे. ते अशक्य! दुसरा म्हणजे, मुसलमान अल्पसंख्य म्हणून त्यांना विशेष नकाराधिकार – व्हेटो – देणे. हे घटनेशी विसंगत! हे नकाराधिकाराचे राजकारणच जिना यांनी फाळणीपूर्वी केले आणि आता त्याच राजकारणाला ही मंडळी उजाळा देत आहेत. या स्थितीत 'यांनी पाकिस्तानात जावें' असे म्हणता आले असते, पण त्यांच्या दुर्दैवाने तेथेही शरीयतचे पूर्णतः अवलंबन होत नाही. खरे पाहता, येथील ब्रिटिशांनी अमलात आणलेले पिनल कोड चालते, पण संपूर्ण शरीयत नव्हे. फक्त विवाह, मालमत्तेचे अधिकार, घटस्फोट इत्यादी बाबतींत स्वतंत्र कायदे आहेत.

मुसलमानांचे खटले मुसलमान न्यायाधीशच चालवीत नाहीत किंवा मुसलमानाने चोरी केली म्हणून शरीयतप्रमाणे त्यांचे हात तोडीत नाहीत. मग 'शरीयतच हवें' असा बकवास कशासाठी? तो करायचा असेल, तर पाकिस्तानपेक्षा लिबिया बरा! तेथे कर्नल गद्दाफी मुस्लीम कायदे मूळ स्वरूपात आणू पाहतात. फकी, हाफिजखाँ, यूसुफ पटेल, बुखारी आणि त्यांच्या मतांच्या लोकांनी लिबियात जावे, जेणेकरून त्यांचा आत्मा शांत होईल. तेथे राहवायचे तर कोणालाच व्हेटो आंदोलन करावे लागणार नाही.

अधिकार हिसकावून घेत आहेत. हा शुद्ध दुटप्पीपणा आहे. मुस्लीम समाज देशाचे आणि लोकसभेचे सार्वभौमत्व मानतो की नाही, याचे या परिषदेच्या मुस्लीम नेत्यांनी स्पष्ट उत्तर देणे जरुरीचे आहे. समान कायद्याचा प्रश्न मुसलमानांच्या भावनेवर सोपविणे, हे अनिष्टतेचे व दुबळेपणाचे लक्षण आहे' असे सांगून हमीद दलवाई म्हणाले, 'सतीबंदीचा कायदा करण्यात लॉर्ड बेंटिकला जर धर्मभावनेची अडचण पडली नाही, तर मुस्लीम खिसतयांच्या दास्यमुक्तीसाठी कायदा करण्यास इंदिरा गांधींना का अडचण पडावी? सामाजिक कायदे गोडीगुलाबीने होत

मुस्लीम पर्सनल लॉ संरक्षणासाठी आटापिटा

दिनांक २४, २५ फेब्रुवारी १९७३ रोजी नांदेड येथे परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचा उद्दिष्ट मुंबईच्या पर्सनल लॉ परिषदेला पाठिंबा देणे, हा होता. सभेसाठी मुस्लीम नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहिल्या दिवशीच्या जाहीर सभेमध्ये हैदराबादचे माजी काँग्रेस आमदार अबू यूसुफ अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले की, 'मुसलमान राजकीय क्षेत्रात विभागले, तरी इस्लाम धर्माच्या नावाखाली ते सर्व एक आहेत. मुसलमान भारतात जिवंत राहावा, म्हणून आम्ही एकत्रित आलो आहोत व आम्हीच खरे देशभक्त आहोत.' जमात-उल्-उलुमाचे अध्यक्ष अब्दुल सुभान म्हणाले की, 'भारतीय घटनेतील कलम ४४ म्हणजे मुसलमानांसाठी संकट आहे. आम्हाला समान नागरी कायदा मंजूर नाही. लॉ कमिशनचे सदस्य गजेंद्र गडकर यांनी मुस्लीम पर्सनल लॉमध्ये बदल पाहिजे असल्याची मागणी करून मुसलमानांची मने दुखावली आहेत. सध्याचे सरकार मुस्लिमांचा धर्म भ्रष्ट करू इच्छिते. म्हणून मुस्लिमांनी अरबी व उर्दू शाळांद्वारे मुसलमानांचे संरक्षण केले पाहिजे.' या परिषदेत हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा उल्लेख 'इस्लामचे शत्रू' म्हणून उल्लेख केला गेला आणि समाजाला दलवाईंविरोधात उभे करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हैदराबादचे सुलतान सलाहुद्दिन ओवैसी म्हणाले की, 'अलीगढ विद्यापीठाचा दुरुस्ती कायदा करून मुस्लीम संस्कृती नष्ट करण्यात आली आहे. बॅरिस्टर एम. सी. छगला, फखरुद्दिन अली अहमद, डॉ. झाकिर हुसैन, मौलाना आझाद, पंडित नेहरू यांच्या षड्यंत्रामुळे मुस्लीम संस्कृती धोक्यात आली आहे. इंदिरा गांधी यांच्या हुकूमशाहीमुळे लोकशाही नष्ट झाली आहे.' असे धर्मवादी राजकारण करणारे नेते म्हणत होते. अबू यूसुफ हे काँग्रेसचे माजी आमदार काँग्रेसला घरचा आहेर देताना म्हणाले, 'इस्लाममध्ये हस्तक्षेप करणे मला मान्य नाही. अलीगढचा नवा कायदाही मला मान्य नाही. मला समान नागरी कायदा मंजूर नाही. स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये मुस्लिमांच्या योगदानाचे उल्लेख नाहीत आणि 'सेक्युलर' म्हणवणाऱ्या हिंदूंनी अगोदर सेक्युलर व्हावे आणि स्वतःच्या महिलांना न्याय द्यावा; मुसलमानांना उपदेश करून काही उपयोग नाही.'

२५ फेब्रुवारी रोजी झालेल्या जाहीर सभेत हैदराबाद येथील मुस्लीम इत्तेहादुल मुसलमान (एम. आय. एम.) नेते सुलतान सलाहुद्दीन ओवैसी यांनी विचार मांडले आणि यात दोन

नसतात; ते करण्यासाठी थोडी धडाडीच हवी. एखादा कायदा केला की, जे मुसलमान उलेमा इस्लामच्या नावाने विरोध करीत आहेत, तेच बदललेल्या कायद्याचे स्वागतही करतील. इजिप्तमध्ये असेच झाले होते. केंद्र व राज्य सरकारने टोलवाटोलवी न करता समान नागरी कायदा करण्याचे धाडस दाखविले पाहिजे' असे सांगून दलवाई म्हणाले, 'आपला कायदा ईश्वराने निर्मिलेला आहे, असे सर्वच धर्माचे सनातनी म्हणतात. कायदा आज सर्व व्यक्तींना समान अधिकार देऊ शकतो की नाही, यावरून तो चांगला की वाईट हे ठरवले जाते; तो ईश्वराने

ठराव मंजूर करण्यात आले. पहिल्या ठरावामध्ये डिसेंबरमध्ये मुंबई येथे झालेल्या मुस्लीम पर्सनल लॉ अधिवेशनात मंजूर करण्यात आलेल्या ठरावाचे स्वागत करून त्यास पाठिंबा व्यक्त केला गेला आणि मुस्लीम कायद्याच्या संरक्षणार्थ जिवाची बाजी लावण्याचा निर्धार केला गेला. गजेंद्र गडकर यांनी अहमदाबाद येथील भाषणात मुस्लीम पर्सनल लॉमध्ये बदल व्हावा म्हणून केलेल्या मागणीचा निषेध करून त्यांची लॉ कमिशनवरून हकालपट्टी करण्याचा ठराव मंजूर केला गेला. सर्वश्री मिर्झा अहमद अली बेग चुगताई (नांदेड), मिर तिलावर अली (परभणी), मोईनुद्दीन (बीड), जान महंमद सेठ (नांदेड), इस्मालजबी (हैदराबाद) व मुसा वकील यांनी भाषणे करून या ठरावास पाठिंबा दिला. या सभेला सुमारे पंधरा ते बीस हजार मुस्लीम उपस्थित होते. त्यांनीही 'नारा-ए-तकबीर अल्लाहू अकबर'चे नारे देऊन ठरावाला पाठिंबा दिला. या जाहीर सभेमध्ये उस्मान नबी नसाले (हैदराबाद), शरफुल हक वकील (देगलुर), मिर्झा जमीर अहमद बेग वकील (हैदराबाद), अब्दुल कय्युम (जमात -ए- इस्लामीचे प्रमुख), सुलतान सलाहुद्दिन ओवैसी आणि इतरांनी भाषणे करून इंदिरा गांधी, झाकिर हुसैन, मौलाना आझाद, पंडित नेहरू या राष्ट्रीय नेत्यांवर टीकेचा भडिमार केला. 'हैदराबादचे उस्मानिया विद्यापीठ, अलीगढ मुस्लीम विद्यापीठ या संस्था उर्दू भाषा आणि मुस्लीम संस्कृती नष्ट करून इस्लामचे भारतातून उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न करत आहेत' अशा भावना या वक्त्यांनी या वेळी व्यक्त केल्या. 'आम्ही प्राण अर्पण करू, सर्वस्वाची होळी करू, पण मुस्लीम पर्सनल लॉमध्ये बदल घडवू देणार नाही. मुसलमानांच्या प्रेतांची उंची कुतुबमिनार इतकी उंच झाली, तरी आम्ही घाबरणार नाही व समान नागरी कायदा आणू देणार नाही. काँग्रेस हा मुसलमानांचा शत्रू आहे. खरा मुस्लीम त्यांचा सभासद होऊच शकत नाही व कोणताही काँग्रेसी माणूस विश्वासास पात्र नसतो. 'इंदिरा हटाव' ही घोषणा करीत मुसलमानांनी भारतातून काँग्रेसलाच नष्ट केले पाहिजे. मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे मुसलमानांचे संरक्षक नाहीत. भिवंडी, जळगाव इथल्या दंगली त्यांच्याच काळात झालेल्या आहेत... तरी सर्व मुसलमानांनी एकत्रित येऊन, एक मजबूत संघटन बनवून मुस्लिमांचे संरक्षण केले पाहिजे. हे घडले नाही, तर भारतातून इस्लाम धर्म व मुसलमान नाहीसे होतील.' अशा पद्धतीचे वक्तव्य करून परिषदेने सुधारणेस विरोध केला.

पाठविला आहे की नाही यावरून त्याचे चांगले-वाईटपण ठरवता येत नाही.'

एका प्रश्नाचे उत्तर देताना दलवाई म्हणाले, 'मुस्लीम पुढारी आपले स्वतःचे प्रश्न गरीब, मुसलमान जनतेवर लादत आहेत. विशेषतः मराठी मुसलमानांनी त्यांच्या डोक्यावर बसलेले बिगर मराठी मुसलमान नेतृत्व उखडून टाकल्याशिवाय त्यांच्या उन्नतीचा मार्ग खुला होणार नाही. मराठी मुसलमानांचा उर्दूशी काहीच संबंध नाही, पण बिगर मराठी मुसलमान नेते तो प्रश्न त्यांच्यावर लादत आहेत.'

ब. जनता सरकारच्या धोरणाबद्दल मंडळास खेद

केंद्रीय कायदामंत्री शांतीभूषण यांनी ध्वनित केलेल्या जनता सरकारच्या 'मुस्लिमांच्या संमतीशिवाय त्यांच्या वैयक्तिक कायद्यात कुठलाही बदल केला जाणार नाही' या धोरणाबद्दल मुस्लीम सत्यशोधक मंडळाने खेद व्यक्त केला होता. या संदर्भात आयोजित केलेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बाबुमियाँ बँडवाले होते.

दि. ३ जुलै १९७७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मंडळाच्या कार्यकारिणी सदस्य बैठकीत हा ठराव संमत करण्यात आला. ठरावात म्हटले होते की, 'एका बाजूला जनता सरकारचे परराष्ट्रमंत्री अटल बिहारी वाजपेयी हमीद दलवाई यांच्या कार्याचा गौरव करतात. दुसऱ्या बाजूस दलवाईंनी केलेल्या मागण्यांना त्याच शासनातील कायदामंत्री बाजूला सारतात. ही विसंगती असून मंडळास जनता सरकारच्या या धोरणाबद्दल तीव्र दुःख होत आहे.'

लग्नानंतर टाकून दिलेल्या व तलाकपीडित, निराश्रित मुस्लीम महिलांना व त्यांच्या मुलांना आश्रय, रोजगार व त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी एक महिलाश्रम बांधण्याचा निर्णय घेण्यात आला.

दुसऱ्या एका ठरावान्वये कार्यकारिणीने मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेच्या संपादकपदी सय्यद मुनीर यांची, तर मुद्रक-प्रकाशक म्हणून मेहबूब सय्यद यांची नियुक्ती केली. हमीद दलवाई यांच्या निधनाने ही जागा रिकामी झाली होती. पत्रिका मासिक स्वरूपात काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

समान नागरी कायदा हा मंडळाच्या दृष्टीने मुस्लीम समस्या आणि जमातवादी राजकारण यांवरील अनेकलक्ष्यी उपाय आहे. मात्र ज्याप्रमाणे समाजांतर्गत विरोध अनुभवास येतो, त्याचप्रमाणे शासन पातळीवरील बोटचेपी भूमिका नाउमेद करणारी असते. असाही अनुभव येत असतो. या निमित्ताने विचारविनिमय करण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची आणि कार्यकारिणी सदस्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

२.४ इबादत व आदत : भूमिका

'मुस्लीम सत्यशोधक मंडळ मुस्लिमांना 'नास्तिक बना' असे सांगते. ते इस्लामला नष्ट करायला निघाले आहे' असा दुष्ट प्रचार सनातनी, जातीयवादी व राजकारणावर आपल्या तुंबड्या भरणारे लोक मंडळाविरुद्ध करीत असतात. त्यांचा हा प्रचार फोल आहे. त्यात काहीही तथ्य नाही. वास्तविक, 'सेक्युलर बना, धर्मनिरपेक्षवृत्ती अंगी बाणवा' असे सांगणे म्हणजे 'नास्तिक बना' असे सांगणे नव्हे. कारण धर्माचे सरळ दोन भाग आहेत; एक परलोकाविषयीचा व दुसरा इहलोकाविषयीचा. म्हणजे मुस्लिमांच्या संदर्भात 'इबादत' व 'आदत' असे ते दोन भाग होत. पहिल्यात व्यक्तीचा परमेश्वराशी संबंध असतो व दुसऱ्यात व्यक्तीचा इतर माणसांशी, समाजाशी व देशाशी संबध असतो. 'धर्मनिरपेक्ष किंवा सेक्युलर बना' याचा अर्थ 'या दोन्ही भागांची गल्लत करू नका. ते संपूर्णपणे वेगळे ठेवा.' मात्र 'या दोन्ही भागांचा मिळून धर्म बनला आहे' असे मुस्लीम समजतात. मंडळ तसे मानीत नसल्याने व 'दुसरा भाग परिवर्तनीय असावा' असा मंडळाचा आग्रह असल्याने त्याविरुद्ध मुस्लीम समाजात प्रचार केला जातो. मंडळाच्या मते, मुस्लिमांच्या इबादतच्या भागासच खरा धर्म म्हणता येईल. त्याबद्दल मंडळाचा काही आक्षेप नाही. उलट, इबादतचा भाग हा मुस्लिमांचाच काय, सर्व धर्मीयांचाच हक्क आहे, तो नाकारता येणार नाही असेच मंडळाचे मत आहे. मग ' 'नास्तिक बना' असे मंडळ मुस्लिमांना सांगते' असे म्हणणे कितपत योग्य आहे, याचा मुस्लीम समाजानेच विचार करावा. खऱ्या अर्थाने सेक्युलर (धर्मनिरपेक्ष) बनणे, म्हणजे आपला इबादतचा भाग व आदतचा भाग वेगवेगळे असल्याचे मानणे; इबादतची व आदतची गल्लत न करणे; इबादतच्या मर्यादा ठरवून देणे; आदतचे क्षेत्र परिवर्तनीय असल्यामुळे ते राज्यसत्तेच्या अखत्यारीत ठेवणे.

सुरुवातीस सांगितल्याप्रमाणे धर्मसंस्थेच्या निर्मितीची कारणे मानवाची ईश्वरविषयक कल्पना, मानवाची ईश्वरोपासना, त्याची आध्यात्मिक भूक ही आहेत. एवढ्या बाबतीतच धर्माची मर्यादा ठरवून देणे व इतर सर्व क्षेत्रांत येण्यास धर्माला मज्जाव करणे, म्हणजे 'धर्मनिरपेक्षता स्वीकारणे' होय.

पण असे घडत नाही. ऐतिहासिक परिस्थितीमुळे इस्लाम धर्माची बांधणीच अशी झाली आहे की, वरील दोन्ही भागांना मिळून 'धर्म' असे संबोधण्यात येते. हे दोन्ही भाग एकमेकांशी इतके संलग्न झाले आहेत की, त्यांचे विभाजन करणेच अवघड होऊन बसते; आणि असे दोन भाग पाडणे, विभाजन करणे म्हणजेसुद्धा धर्मात ढवळाढवळ करणे, हस्तक्षेप करणे असे धर्मगुरू उर्फ उलेमा समजतात. कारण त्यांच्या मते हा अधिकार फक्त त्यांचाच, म्हणजे उलेमांचाच असतो! तेच धर्माचा अर्थ सांगू शकतात. धर्म कशाला म्हणावे व कशाला म्हणू नये, हे सांगण्याचा सर्व अधिकार ते त्यांचाच मानतात. या क्षेत्रात त्यांचीच मक्तेदारी निर्माण झाली आहे व ती मक्तेदारीही धर्माचाच एक भाग होऊन बसली आहे. मंडळ नेमकी मक्तेदारीच तोडू इच्छिते. मंडळालासुद्धा धर्माबर, धर्माच्या अर्थावर बोलण्याचा व 'धर्म म्हणजे नेमके काय' हे सांगण्याचा अधिकार

मिळाला पाहिजे. एवढेच काय, कोठल्याही मुसलमानाला तो अधिकार मिळाला पाहिजे. त्या हक्काला अनुसरूनच मंडळाने धर्माचे दोन भाग मानले आहेत. यावर उलेमा व त्यांचे समर्थक मंडळावर चवताळून उठणे स्वाभाविक आहे.

याच कारणामुळे सर्वसामान्य मुस्लीम जनतेलाही तथाकथित पारंपरिक धर्माच्या, म्हणजे धर्मगुरूंच्या, मुल्लामौलवींच्या तावडीतून सोडविण्याचा प्रयत्न मंडळ करीत आहे. अशा रीतीने एकदा मुस्लीम समाज या धर्मगुरूंच्या व राजकारण खेळणाऱ्या जातीयवाद्यांच्या पकडीतून निसटला की, मगच त्याला ज्ञानाची इतर कवाडे उघडी होतील. नंतरच त्याला लोकशाही म्हणजे काय व मुसलमानांचे हित कशात आहे, हे समजू लागेल. अर्थात, हे सर्व घडायला फार काळ लागेल. ती हळूहळू होणारी प्रक्रिया आहे; पण म्हणून मुस्लीम समाजाला थांबून चालणार नाही. त्याने धर्मनिरपेक्षतेच्या सेक्युलॅरिझमच्या दिशेने झपाट्याने चालू लागले पाहिजे, नपेक्षा मुसलमान व जग यांच्यात न संपणारे अंतर पडेल.

केवळ मुसलमानांचे हित आहे, त्यांचा इबादतचा हक्क अबाधित राहणार आहे, म्हणूनच नव्हे, तर मुस्लीम या देशाचे एक प्रमुख घटक आहेत, या देशाचे शिल्पकार म्हणूनही त्यांना बाबरायचे आहे, लोकशाही यशस्वी करायची आहे याचीही जाणीव मुस्लीम समाजाने ठेवली पाहिजे. त्यासाठी ही धर्मनिरपेक्षता आवश्यक असल्याने त्यांनी तिचा स्वीकार केला पाहिजे. तसेच न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता यांवर उभारलेला एक आदर्श भारतीय समाज घडवण्यासाठी, नवसमाज उभारण्यासाठी धर्मनिरपेक्षता आवश्यक असल्याने मुस्लिमांनी आपला वाटा उचलला पाहिजे.

हे सर्व घडून येण्यासाठी, मुस्लिमांनी धर्मनिरपेक्ष बनण्यासाठी त्यांनी आपल्या धार्मिक दृष्टीकोनात बदल करणे आवश्यक आहे. मुल्ला, मौलवी सांगतात तेच खरे मानण्याची वृत्ती त्यांनी सोडून दिली पाहिजे. त्यांनी आपल्या इबादतच्या स्वातंत्र्याला जपले पाहिजे व आदतच्या भागातील राजसत्तेचे सार्वभौमत्व मान्य केले पाहिजे. तरच 'मुस्लिमांनी सेक्युलॅरिझमची कल्पना स्वीकारली' असे होईल. त्याच वेळी त्यांच्यावर असलेला धर्माचा पगडा दूर होऊन त्यांची मानसिक गुलामगिरीतून मुक्तता होईल. तेव्हाच आपला इबादतचा खरा धार्मिक हक्क बजावूनही ते ताठ मानेने आदर्श, धर्मनिरपेक्ष भारतीय नागरिक म्हणून राहू शकतील. म्हणूनच धर्मनिरपेक्षतेचा मुस्लिमांमध्ये प्रचार करण्याचा व त्यांना खरेखुरे धर्मनिरपेक्ष मुस्लीम बनवण्याचा चंग मंडळाने बांधला होता व आहे.

अलीकडचे वातावरण लक्षात घेता मुस्लीम सत्यशोधक मंडळास वाटते की, आदत आणि इबादत यांतील फरक समजून घेण्यासाठी एक परिपक्व मानसिक पातळी गाठणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाने धर्मस्वातंत्र्य दिले आहे. याचा अर्थ ते इबादतचे स्वातंत्र्य आहे. मुस्लीम समाजाच्या दृष्टीने श्रद्धा, नमाज, रोजा, जकात आणि हज यात्रा या पंचस्तंभांना महत्त्व आहे. यातही या पाचपैकी काही आज्ञा आहेत, काही सूचना आहेत, काही शिफारशी आहेत, तर काही अपेक्षा आहेत. यामुळे इबादतचे स्वरूपही व्यक्तिसापेक्ष असू शकते.

आदतमध्ये परंपरा, चालीरीती, संस्कृती यांचा व जीवनव्यवहाराचा संबंध येतो. तो पूर्णतः

ऐहिक जीवनाशी संबंधित आहे. आदतचा भाग जरी कालसापेक्ष आणि संविधान-सन्मुख झाला, तरी निम्म्याहून अधिक प्रश्न सुटू शकतात. 'इबादत'ला प्राधान्य न देता 'आदत'लाच इबादत समजणारे लोक मुस्लीम समाजात मोठ्या प्रमाणात आहेत व 'आदत'ला अनुसरूनच आतापर्यंत अनेक फतवे काढण्यात आले आहेत. ही फतवे काढणारी मंडळी स्वतःला धर्माचे रक्षक समजतात आणि आपले विचार धर्मपालनाच्या नावाखाली सामान्यांच्या गळी उतरवतात. याबद्दल समाजात जागरूकता निर्माण झाली पाहिजे.

प्रत्येक धर्माचे तीन भाग असतात. त्या-त्या धर्मात परमेश्वर, अध्यात्म यांविषयी काही निकोप गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. त्या पाळल्यामुळे कोणास उपद्रव होत नाही. धर्मात योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक गोष्टींचा उल्लेख करून नैतिकतेबद्दल काही उपदेश करण्यात आलेले असतात. समाजधारणेत त्याला महत्त्व असते. प्रत्येक धर्माची स्वतःची ओळख म्हणून प्रतीके तयार करण्यात आली आहेत. उदा. प्रार्थनास्थळे, अंत्यविधी, पेहराव पद्धती, भाषा पद्धती (भाषा, वेष आणि भोजन) इ. अलीकडे लोक या प्रतीकांनाच धर्म समजतात आणि अध्यात्म व नैतिकता पाळत नाहीत. धर्माचा सोयीचा अर्थ लावण्यात येतो व यातून अलगतावाद निर्माण होतो. त्याचे राजकारणही होते. म्हणूनच 'इबादत', 'आदत' समजून घेऊन वर्तन केल्यास व आदत कालसापेक्ष ठेवल्यास सामाजिक व धार्मिक प्रश्नांचा गुंता सोडवणे सोपे जाईल. या दृष्टीने समाज जागृती झाली पाहिजे व मंडळ त्यासाठी कृतीशील राहील. सामाजिक सद्भाव आणि एकात्म समाजरचना यांसाठी 'आदत' पूरक ठरावी. म्हणजेच संविधानात्मक वर्तन हेच आदर्श 'आदत' होण्याचे दृश्य रूप असेल.

सध्या कला, क्रीडा, संगीत या गोष्टी धर्माशी निगडित असल्याचे सांगून अनेक तरुण-तरुणींविरुद्ध फतवे काढण्यात येतात. त्यांच्या निकोप अभिव्यक्तीवर धर्माच्या नावाने बंधने लादण्याचे धर्मवादी म्हणवणाऱ्यांकडून आक्रमकपणे प्रयत्न होतात. मुस्लीम सत्यशोधक मंडळ धर्माचे असे अर्थनिर्वचन करणाऱ्यांविरुद्ध भूमिका घेते आणि भविष्यातही घेत राहील.

२.५ राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय एकात्मता

कोणत्याही देशातील नागरिकांचे आपल्या देशावर प्रेम असणे किंवा देशासाठी हुतात्मा होणे हे निश्चितच गौरवास्पद आहे. जगात आधुनिक काळात धार्मिक आणि धर्मनिरपेक्ष देश अस्तित्वात आहेत. धर्मवादी देशात राष्ट्रभक्तीला धर्माचे आवरण असणे गृहीत धरण्यात गैर नाही. कारण तेथे धर्माला देण्यात आलेले महत्त्व जगजाहीर आणि सुस्पष्ट असते. ते योग्य की अयोग्य, हा भाग नंतरचा, परंतु स्वतःला धर्मनिरपेक्ष मानणाऱ्या देशात राष्ट्रवादाला धर्माचे आवरण असणे किंवा धर्मवादाचे प्राबल्य बाळगणे राष्ट्रवादाच्या मूल्यांशी विसंगत ठरते.

धर्मनिरपेक्ष देशांची स्वतःची अशी एक स्पष्ट राज्यघटना असते. ही राज्यघटना देशातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची असते. सार्वजनिक जीवनात आणि राज्यकारभार करताना धर्माला प्राधान्य देण्यापेक्षा सांविधानिक मूल्यांना प्राधान्य देण्यात यावे, अशी अपेक्षा असते. देशातील नागरिकांनी व्यक्तिगत जीवनात धर्म आचरणात आणावा किंवा आणू नये. हा त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा भाग असतो. असे व्यक्तिस्वातंत्र्य खूप महत्त्वाचे असते आणि सर्वांनी एकमेकांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर राखणे, हा सांविधानिक कर्तव्याचा भाग असतो.

राष्ट्राचे हित, राष्ट्राचे संरक्षण, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रासाठी प्रसंगी बलिदान देणे, तसेच आपल्या देशाशी एकनिष्ठ असणे हे प्रत्येक नागरिकाचे विहीत कर्तव्य असते. प्रत्येक देशात बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक नागरिकांचे अस्तित्व असते. अनेक वेळा बहुसंख्याकडून धर्मवर्चस्ववाद व्यक्त होत असतो, तर अल्पसंख्याकांकडून धर्मरक्षणाच्या नावाखाली धर्माभिमान, धार्मिक संस्कृती यांना महत्त्व देण्यात येते. अशा प्रसंगी धार्मिक संघर्ष उद्‌भवतात.

राष्ट्रवादाला धार्मिकतेपेक्षा सांविधानिक मूल्यांचे अधिष्ठान असेल, तर असे संघर्ष होत नाहीत. तथापि अस्मिता, असुरक्षितता आणि वर्चस्ववाद यांतून धार्मिकता जोपासण्यासाठी अग्रक्रम देण्यात येतो. यामुळे राष्ट्रवादासमोर काही आव्हाने उभी राहतात आणि ती राष्ट्रीय एकात्मतेस अडचणीची ठरतात.

'राष्ट्रीय एकात्मता' ही राष्ट्रासाठी आणि पर्यायाने राष्ट्रातील नागरिकांसाठी आवश्यक असते. सलोखा, शांतता, विकास, देशहित, समाजहित या गोष्टी राष्ट्रीय एकात्मतेतून साध्य करता येतात. 'सामाजिक सुधारणा' हा जरी प्रबोधनाचा, समाजकल्याणाचा विषय असला, तरी धार्मिक अस्मिता, अभिमान, हितसंबंध, असुरक्षितता या घटकांमुळे सुधारणेस विरोध होत असतो. असा विरोध सामाजिक आणि धार्मिक संघर्षाला कारणीभूत ठरतो आणि प्रसंगी धार्मिक तणाव, धार्मिक दंगली, धार्मिक द्वेष इ. संघर्ष निर्माण होतात. यातून सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मतेसमोर आव्हाने निर्माण होतात. राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करणे, जतन करणे, वाढवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. 'विविधतेत एकता' हे भारताचे खास वैशिष्ट्य आहे. तसेच विविधतेतून निर्माण होणारे प्रश्न ही राष्ट्रीय एकात्मतेसमोरील डोकेदुखी आहे.

धार्मिक, सांस्कृतिक, भाषिक विविधता लोकशाही अधिक समृद्ध करते. मात्र विविधतेच्या

नावाखाली विषमतेला खतपाणी घालणे, हे पुन्हा समाजाच्या मागासलेपणास कारणीभूत ठरते. काही बहुसंख्याकांची अपेक्षा असते की, अल्पसंख्याकांनी आपले स्वतंत्र अस्तित्व बाळगता बहुसंख्याकांच्या प्रवाहात मिसळून किंवा वितळून जावे. याला ते 'समरसता' असे गोंडस नाव देतात. परंतु अशी समरसता बहुविधता आणि तिच्या स्वतंत्र अस्तित्वाला नाकारते. म्हणूनच एकात्मता, बहुविधता आणि लोकशाही एकत्र आणण्यासाठी काही राष्ट्रीय प्रतीकांना महत्त्व देण्यात येते. उदा. राष्ट्रगीत, राष्ट्रीय ध्वज आणि संविधानिक बाबी अशा प्रत्येक राष्ट्रीय घटकाबद्दल सन्मान, आदरभाव बाळगणे राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यास पूरक ठरते.

सांस्कृतिक किंवा धार्मिक बाबींपेक्षा संविधानिक बाबींना प्राधान्य देण्यासाठी मानसिकता विकसित झाल्यास गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होत नाहीत. यासाठी मंडळ विविध उपक्रमांचे आयोजन करते आणि त्या उपक्रमांना अनुरूप भूमिका घेते.

'भारतीय समाजात धर्मनिरपेक्ष एकात्मता वाढावी, धर्मनिरपेक्ष एकात्म भारतीय समाज निर्माण व्हावा' ही मुस्लीम सत्यशोधक मंडळाची भूमिका आहे. धार्मिकतेपेक्षा वैश्विक मानवी मूल्ये अधिक महत्त्वाची ठरतात. या दृष्टीने मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आरंभापासूनच धर्मनिरपेक्ष राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. यासाठी सर्व प्रकारच्या धर्मवादाला, जमातवादाला विरोध करून धर्मनिरपेक्षता आणि एकात्मतेला मंडळाने प्राधान्य दिले आहे. प्रादेशिकवाद, धर्मवाद, भाषावाद, जातीयवाद, पुरुष प्रधानता, सांस्कृतिक अस्मिता या बाबी राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यातील प्रमुख अडथळे ठरतात. या अनुषंगाने मंडळ राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्यासाठी प्रयत्न करते. त्यामुळे देशाचे आणि मानवतेचे हित जोपासले जाण्यावर मंडळाचा विश्वास आहे.

अ. 'वंदे मातरम्'च्या निमित्ताने...

मुस्लीम जमातवादी लोक आपले धर्मवादी राजकारण चालवण्यासाठी आधुनिक काळाशी विसंगत भूमिका घेऊन धर्माच्या नावावर अलगतावाद जोपासण्याचा प्रयत्न करतात. यातील एक प्रकार म्हणजे, 'वंदे मातरम्'च्या संदर्भात घेतलेली भूमिका. दिनांक २३ फेब्रुवारी, १९७३ रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने हमीद दलवाई यांची पुण्यात जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत हमीद दलवाई म्हणाले की, 'जे मुस्लीम नेते ऐशारामात राहतात, दारू पितात, ज्यांच्या मुली बॉब कट करून फिरतात आणि आपल्या गैरसोयीचे इस्लामचे कायदे मोडतात, तीच मंडळी अज्ञानी मुस्लीम समाजाचा उपयोग करून घेण्यासाठी शरीयत कायदा आणि 'वंदे मातरम्' सारख्या प्रश्नावर त्यांना चिथावतात. यात बॅरिस्टर जिना, जनाब भुट्टो, जनाब बनातवाला यांसारखी माणसे येत असल्याचे सांगितले.

राष्ट्र सेवा दल, आंतरभारती व मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्या वतीने 'मुंबईतील मुस्लिमांचा वंदे मातरम्'ला विरोध या विषयावर दलवाई यांचे भाषण होते. साधनाचे संपादक यदुनाथ थत्ते व मंडळाचे सय्यदभाई यांचीही या वेळी भाषणे झाली.

'मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत मुस्लिमांची मते आपल्याला मिळतील या भ्रामक समजुतीने काँग्रेसची काही मंडळी या प्रकरणी मुस्लीम लीगचेच राजकारण खेळत आहेत' असाही आरोप दलवाई यांनी केला. 'मुस्लिमांचा अनुनय केल्याने त्यांची जातीयता वाढते, हा आतापर्यंतचा अनुभव असताना काँग्रेस नेत्यांच्या अशा वागणुकीमुळे बळकट होणार आहे ते लीगच, काँग्रेस नव्हे.' ते पुढे म्हणाले की, 'यातून मुस्लीम जातीयवाद बळकट होणार आहे. याच दृष्टीकोनातून मुंबई मुस्लीम लीगच्या जाहीरनाम्याकडे पाहिले पाहिजे. हाच जातीयवाद आणखी पेटवण्यासाठी 'शरीयत कायदा' आणि 'वंदे मातरम्' या प्रश्नांवर मुस्लीम लीग निवडणुका लढवित आहे. 'आज वंदे मातरम् म्हणणे इस्लाममध्ये बसत नाही' असे म्हणणारे जातीयवादी उद्या 'भारत भाग्य विधात्याचा जयजयकार करणे, राष्ट्र प्रमुखाविषयी आदर दाखविणे याही गोष्टी इस्लाममध्ये बसत नाहीत' असे सांगू लागतील. वंदे मातरम् प्रकरणी मी काही मुस्लीम

हिंदूंचेही भारतीयीकरण झाले पाहिजे
हमीद दलवाई यांचे भाषण

२८ सप्टेंबर १९७२ रोजी सांगली येथील शांतिनिकेतन लोकविद्यापीठात 'राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही व धर्मनिरपेक्ष शासन व्यवस्था' या विषयावर हमीद दलवाई यांचे व्याख्यान झाले आणि त्यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. हा कार्यक्रम सांगली येथील साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाने आयोजित केला होता. प्रा. माया पाटील यांनी हमीद दलवाई यांचा परिचय करून दिला.

जातीयवादाबद्दल बोलताना दलवाई म्हणाले की, 'जातिव्यवस्था व दारिद्र्य असेच राहिले, तर लोकशाही टिकू शकणार नाही. म्हणून सर्वांमध्ये एकात्मतेची भावना आली पाहिजे. यासाठी मुस्लिमांच्या बरोबर

हिंदूंचेही भारतीयीकरण झाले पाहिजे. आता धर्माचा काळ राहिला नाही. जास्तीत जास्त शांततेने व सुखाने कसे जगावे, या ऐहिक गोष्टीचा विचार करण्याचा काळ आला आहे. तेव्हा भारतीयीकरण म्हणजे आधुनिकीकरण होय, व त्यासाठी धर्मांच्या श्रद्धा बदलल्या पाहिजेत.' 'शासनाचे धर्मनिरपेक्ष स्वरूप कसे असावे?' याबद्दल चर्चा करताना दलवाई म्हणाले की, 'धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्म सोडून देणे नव्हे, तर आपल्या धर्मामुळे सामाजिक व आर्थिक व्यवस्थेत अडथळा येऊ न देणे होय. धर्मनिरपेक्ष शासनव्यवस्थेत शासन कोणत्याही धर्माच्या आधारे चालणार नाही. तेव्हा धर्माची अध्यात्मिक व सामाजिक दृष्टी वेगवेगळी ठेवता आली पाहिजे. व्यक्तिगत धर्म पाळण्याचे स्वातंत्र्य घटनेने प्रत्येकाला दिले आहे, तथापि व्यक्तिगत धर्मश्रद्धांना सामाजिक मर्यादा आहेत.' मुस्लीम महिलांचे प्रश्न, द्विभार्या प्रतिबंधक कायदा व युवकांच्या जबाबदाऱ्या इत्यादी विषयांवर सविस्तर प्रश्नोत्तरे झाली. प्रा. आर. एस. पाटील यांनी आभार मानले.

नेत्यांची भेट घेतली. तेव्हा हाफिजखाँ म्हणाले की, मी शरीयत कायदा बदलण्याच्या मागे लागू नये... तर फकी साहेबांना इस्लामी कायदाच पुरोगामी वाटतो. डॉ. रफिक झकेरिया आणि बॅ. अंतुले साहेब ही पुरोगामी मंडळी बोलावयास तयार नाहीत.

'सुशिक्षित मुसलमान राजकारणातील विभक्तवाद आणि जातीयता पोसत असून तेच खरे गुन्हेगार आहेत. 'वंदे मातरम्' ला विरोध करण्यामागील आशय मोठा आणि खोल असून त्याबाबत तडजोडीचे धोरण न स्वीकारता भारत संरक्षण कायद्याखाली 'वंदे मातरम्' ला विरोध करणाऱ्या त्या चार शिक्षकांना पकडून त्यांना ताकीद द्यायला हवी.' मुंबईत 'वंदे मातरम्' या गीताला मुस्लीम शिक्षकांनी केलेल्या विरोधासंदर्भात दलवाई बोलत होते.

'मुस्लीम लीगने आणि एकूण मुसलमान पुढाऱ्यांनी सुरू केलेला 'विभक्ततावाद' हा खरा रोग आहे' असे सांगून ते म्हणाले, 'वंदे मातरम्' चा वाद त्या गीतापुरता मर्यादित नाही. ' 'राष्ट्रभूमीला वंदन करणे' असा या गीताचा असलेला आशय इस्लाम धर्मानुसार आपणास मान्य नाही' असे मुस्लीम म्हणणार असतील, तर यापुढच्या काळात ही विरोधाची मजल आणखी पुढे नेण्याचा या मंडळींचा प्रयत्न आहे. जन-गण-मन या गीतातील 'भारत भाग्य विधाता' हा जयजयकारही इस्लाम धर्माच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना करता येणार नाही. 'कोणापुढे नमायचे नाही, ही आपल्या धर्माची आज्ञा आहे' असे जर मुसलमान म्हणणार असतील, तर मग लोकसभेत किंवा विधानसभेत प्रवेश करताना किंवा बाहेर जाताना सभापती पुढे नमावे लागते, त्याचे काय? या हिशोबाने 'राज्याचा प्रमुख, सेनादलाचा प्रमुख हाही मुसलमानच असावा; एरवी वंदन करणार नाही' अशी भूमिका घेतली जाईल. मुस्लिमांच्या परंपरागत भूमिकेतून केले जाणारे हे युक्तिवाद आहेत. कारण 'गैर-मुस्लिमांची आज्ञा पाळणे धर्माच्या विरुद्ध आहे' असे ते मानतात. मुंबईत 'पर्सनल लॉ' संदर्भात झालेल्या बैठकीत हे सर्व तणाव कायम ठेवण्याचे मुद्दे उपस्थित करण्याचे ठरले आहे. मुंबईत 'वंदे मातरम्' ला झालेला विरोध हा त्याचा पुरावा आहे. पुरोगामी मुस्लीम नेते या विषयावर गप्प आहेत, कारण मुंबईतील महापालिकेची निवडणूक आहे. विधानसभेत हा प्रश्न उपस्थित होऊन चर्चा घडतानाच शिवसेना सत्तेत असलेल्या मुंबई महापालिकेने 'वंदे मातरम् म्हटलेच पाहिजे' असे फर्मावले. काँग्रेसने मुसलमानांची मते मिळविण्यासाठी हा देखावा केला आहे. पण यामुळे मुसलमानांची मते काँग्रेसला किंवा इतर कोणत्याही विरोधी पक्षाला मिळतील, हा केवळ भ्रम आहे. या खेपेला मुस्लीम लीगच दहा जागा मिळवणार आहे. कारण मुसलमानांची मते त्या पक्षालाच मिळणार आहेत. मुस्लीम लीग निवडणुकीत वंदे मातरम् गाऊन जास्त मते मिळवणार, अशी माझी माहिती आहे. सर्व माहिती असूनही मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष बॅ. रजनी पटेल यांनी स्वतःच्या आसनाला धक्का लागू नये म्हणून आणि दिल्लीत व मुंबईत आपले राजकीय वजन वाढविण्यासाठी 'वंदे मातरम्' च्या बाबतीत ही अश्लाघ्य तडजोड केली आहे. पण बॅ. रजनी पटेल यांचे हात बळकट करण्यासाठी या तडजोडी सुरू राहणार असतील, तर सर्व फुटीर चळवळी उदयाला येतील.

'मुस्लीम पुढाऱ्यांना आपल्या समाजाच्या दारिद्र्याची, बेकारीची, शैक्षणिक प्रगतीची चाड नाही किंवा जातीय दंगलींमध्ये मुस्लीम समाजाच्या होणाऱ्या नुकसानाचीही त्यांना फिकीर नाही'

हे सांगताना दलवाई पुढे म्हणाले, 'मुस्लीम पुढाऱ्यांना आर्थिक प्रश्नांची जाणीव नाही, तोपर्यंत धार्मिकता राहणार आहे. धर्माचा प्रभाव कमी केल्याशिवाय आर्थिक लढ्यांना तोंड फुटणार नाही, याची दखल समाजवादी, कम्युनिस्ट आणि विरोधी पक्षांनीही घेतली पाहिजे. 'मुंबईच्या महापालिकेच्या निवडणुकांमध्ये कोणता धार्मिक प्रश्न उभा करायचा?' याची लीगच्या पुढाऱ्यांना चिंता होती. त्यातूनच 'वंदे मातरम्'चा प्रश्न निर्माण केला गेला.' दलवाई म्हणाले, 'वंदे मातरम् हे स्वातंत्र्य लढ्यातील निर्धाराचे प्रतीक होते. त्याच्या गायनाबद्दल लहानपणीही मला अनेकदा मार खावा लागला आहे. मुंबई येथील सारस्वतांच्या एका सभेत वंदे मातरम् गीताच्या वेळी तेथे उपस्थित असलेले चार शंकराचार्य उठून उभे राहिले नाहीत आणि त्या संदर्भात 'राष्ट्रवादाचे नीतिनियम त्यांना लागून नाहीत. ते ईश्वरी अंश आहेत.' असे सांगितले गेले. स्वतः हिंदूच जर या बाबतीत दक्ष राहणार नसतील, तर इतरांना जातीयवाद कसा नष्ट करता येणार, याचाही विचार झाला पाहिजे.'

ब. वंदे मातरम् प्रकरण : सेक्युलर पक्षांची जबाबदारी

'मुस्लीम समाज भारतीय राष्ट्रप्रवाहाशी समरस झालेला नाही' असा एक आरोप या समाजावर कायमच केला जातो. मुंबई महापालिकेतील त्या वेळच्या 'वंदे मातरम्' प्रकरणाने या आरोपाला पुन्हा एकदा दुजोराच मिळाला होता. विधानसभेतही मुस्लीम लीगचे आमदार बनातवाला यांनी हा प्रश्न उपस्थित केला व धर्माच्या नावाखाली 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताला आपला विरोध दर्शविला. तेव्हा पालिका आयुक्तांनी पुन्हा हुकूम काढून 'हे राष्ट्रगीत पूर्वीसारखेच पालिकेच्या सर्व शाळांतून म्हटले जावे' असा आदेश दिला असला, तरी त्यामुळे हा प्रश्न संपलेला नव्हता. अर्थात, महानगरपालिकेच्या निवडणुका तोंडावर आल्या असता हा प्रश्न उपस्थित करण्यामागे मुस्लीम लीग व मुसलमानांच्या इतर नेत्यांचा हेतू उघडच होता. त्यांना या प्रश्नाचे राजकीय भांडवल करून निवडणुका लढवायच्या होत्या. परंतु निवडणुकीच्या राजकारणापुरताच हा प्रश्न मर्यादित नव्हता. तसा तो असता, तर त्या विषयी फारसा गंभीर विचार करण्याची आवश्यकता नव्हती. हा वादग्रस्त प्रश्न भारताच्या राष्ट्रीय अस्मितेशी व राष्ट्रवादाशी निगडित असल्यामुळे मुस्लीम समाजावर त्याचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता होती. म्हणून 'वंदे मातरम्'ला विरोध दर्शवून बहुसंख्याकांच्या मनात मुसलमानांविषयी असलेला संशय वाढविण्याऐवजी त्यांनी एकूण भारतीय राष्ट्रवादाबद्दलच पुनर्विचार केला असता, तर ते या समाजाच्या हिताचेच ठरले असते. दुर्दैवाने असा विचार या समाजाकडून झाल्याचे दिसले नाही. मुस्लीम नेत्यांनी या विषयाबाबत व्यक्त केलेली मते व विचार यांचीच रेकॉर्ड मुस्लीम समाजाच्या सर्व थरांत ऐकू येत असताना याशिवाय वेगळा निष्कर्ष काढताच आला नाही.

एक शोकान्तिका

वास्तविक, स्वातंत्र्यानंतर पाव शतकाचा काळ लोटला असताना राष्ट्रगीताबाबत निर्णायक

भूमिका घेता येऊ नये, ही या समाजाची एक शोकान्तिकाच समजली पाहिजे. १९५० साली घटना समितीने याबाबत ठराव करून 'जन-गण-मन' या गीताइतकेच 'वंदे मातरम्' या गीताला महत्त्वाचे स्थान दिले आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात मरहूम जिनांनी या गीताला कसून विरोध केला होता. त्या वेळी त्यांनी काँग्रेसला घातलेल्या अटीत ' 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत नसावे' अशी एक अट घातली होती व तेव्हाही काँग्रेसने ती फेटाळली होती. परिणामतः या व अशा अटी मान्य होत नसल्याने मुसलमानांचे वेगळे राष्ट्र निर्माण झाले आणि त्याच वेळेस हा प्रश्न कायमचा निकालात निघाला. ज्यांना भारतीय राष्ट्रवाद मान्य नव्हता, ते पाकिस्तानात गेले. जे येथे राहिले, त्यांनी हा राष्ट्रवाद व तदनुषंगिक राष्ट्रगीतासारख्या संकल्पना स्वीकारल्या असल्याचे गृहीत धरण्यात आले. त्यांच्या धर्माची अनुज्ञा असली तरी आणि नसली तरी अशा परिस्थितीत हा प्रश्न पुन्हा उकरून काढल्याने 'आपल्याला हव्या त्या सवलती पदरात पाडून घेता येतील' अशा भ्रमात मुसलमानांनी राहू नये, अशी त्या वेळी मंडळाची स्पष्ट भूमिका होती. कारण त्यामुळे गैरसमज व कटुताच वाढली असती. पालिकेच्या सभागृहात काँग्रेसच्या नगरपित्यांनीही याबाबत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली होती. त्यावरून हेच सूचित होत होते. विधानसभेतही या विषयावर चर्चा झाली असती, तरी तिथेही वेगळे काही घडण्याचा संभव नव्हता. स्थगन प्रस्ताव फेटाळून लावताना सभापतींनी केलेल्या निवेदनातून हेच सूचित होत होते. याउपर सरकारने या गीताबाबत मुस्लीमधार्जिणे धोरण स्वीकारले असते, तर केवळ सभागृहातच नव्हे, तर इतरत्रही त्याला तीव्र विरोध होण्याची चिन्हे दिसत होती.

अपरिहार्य निवड

'इस्लामचा तात्त्विक विरोध असल्यामुळे हे राष्ट्रगीत म्हणण्याची आम्हावर सक्ती केली जाऊ नये' अशी मुसलमानांची याबाबत भूमिका होती. परंतु राष्ट्रगीतालाच नव्हे, तर एकूण आधुनिक राष्ट्रवादालाच इस्लामचा तात्त्विक विरोध आहे. इस्लाम मुस्लीम विश्वबंधुत्वावर विश्वास ठेवण्याची शिकवण देतो आणि मुसलमानांना ती आजही मान्य आहे. इस्लामचा हा विश्वबंधुत्वाचा सिद्धान्त व आधुनिक राष्ट्रवादाचा सिद्धान्त परस्परविरोधी आहेत. म्हणूनच 'यांपैकी एकाचा स्वीकार म्हणजे दुसऱ्याचा त्याग' हाच याचा अर्थ आहे. मुसलमान हे इस्लामच्या पैगंबरांनी निर्मिलेल्या समाजाचे घटक असल्याने आपापसांत बंधुत्वाचे नाते व 'सर्व एकाच ईश्वराचे सेवक आहेत' यावर इस्लामचा विश्वबंधुत्वाचा सिद्धान्त आधारलेला आहे. यांनी भारतीय राष्ट्रवादाचा स्वीकार केला, तर यांना आपल्या सर्व निष्ठा या देशाच्या भौगोलिक व राजकीय मर्यादितच सीमित ठेवाव्या लागतील. इतकेच नव्हे, तर 'या देशात राहणारे ते आपले आणि या देशाबाहेरील ते परके' ही जाणीवही सतत ठेवावी लागेल व या राष्ट्राच्या सर्वच नागरिकांना समानतेच्या व बंधुत्वाच्या भावनेने वागवावे लागेल. इस्लाम यालाही मान्यता देत नाही. इस्लामी राष्ट्रवादात बिगर मुसलमानाला स्वातंत्र्य व समानतेचे हक्क मिळू शकत नाहीत. 'एकतर त्याने इस्लामचा स्वीकार करावा किंवा मरण पत्करावे; किमानपक्षी जिझिया कर देऊन किंवा गुलाम म्हणून राहावे' अशी इस्लामची बिगर मुसलमानांविषयीची भूमिका आहे. या पार्श्वभूमीवर मुसलमानांनी आपल्या

राष्ट्रनिष्ठेचा कस लावून पाहावा. एकतर 'इस्लामचा विरोध असला, तरी भारतीय राष्ट्रवादाचा आम्ही निष्ठेने स्वीकार केला आहे' हे त्यांना सिद्ध करावे लागेल किंवा 'इस्लामच्या सिद्धान्तावर आमची अजूनही निष्ठा असल्यामुळे भारताचे नागरिकत्व स्वीकारण्यास आम्ही अपात्र आहोत' अशी कबुली तरी द्यावी लागेल. एकाच वेळी आंतरिक निष्ठा इस्लामच्या विश्वबंधुत्वावर ठेवून राष्ट्रनिष्ठेचा देखावा त्यांना फार काळ करता येणार नाही.

अप्रामाणिक भूमिका

मुळातच, धर्माच्या नावाखाली राष्ट्रगीताला व तत्सम कोणत्याही राष्ट्रीय संकल्पनेला विरोध करण्याची ही भूमिका प्रामाणिकपणाची होती, असे म्हणता येणार नाही. कारण इस्लामच्या अनेक आज्ञांचे मुसलमान सर्रास उल्लंघन करीत असतात. उदाहरण द्यायचे झाले, तर व्याजाबाबतच्या धर्माज्ञेचे देता येईल. व्याज देणे व घेणे या दोन्ही गोष्टी इस्लामने त्याज्य ठरविल्या आहेत. व्यवहारात मात्र जवळजवळ सर्वच मुसलमान ही आज्ञा मोडत असतात. शरीयतच्याही अनेक तरतुदी अशाच कालबाह्य झालेल्या असल्यामुळे त्या व्यवहारातून बाद झाल्या आहेत. विधानसभेत 'वंदे मातरम्' ला विरोध करताना मुस्लीम लीगचे ओमदार बनातवाला यांनी लोकशाही व धर्मनिरपेक्षतेचा मुद्दाही उपस्थित केला होता. मुसलमानांच्या श्रद्धेविरुद्ध त्यांना 'वंदे मातरम्' हे गीत म्हणण्याची सक्ती करणे हे लोकशाही व धर्मनिरपेक्षता यांच्या विरोधी असल्याचे त्यांचे म्हणणे होते. सर्वांना समानता नाकारणारी इस्लामची तत्त्वप्रणालीही लोकशाहीविरोधी असल्यामुळे ती त्याज्य ठरविण्यास बनातवाला तयार होते का? लोकशाहीत विरोधी मताचाही आदर करावा लागतो व त्याकरता सहिष्णू व उदारमतवादी व्हावे लागते, याची जाणीव बनातवाला यांना होती का? ती असेल, तर मुस्लीम पर्सनल लॉ कन्व्हेन्शनच्या वेळेस पंचवीस जणांच्या मोर्च्यावर जवळजवळ दोन हजार मुसलमानांनी हिंसात्मक हल्ला चढविला होता. त्याचा त्यांनी निषेध का केला नाही? धर्मनिरपेक्षता म्हणजे शासनात व राजकारणात कुठल्याही धर्माचे वर्चस्व नसावे. धर्मनिरपेक्षतेचा हा अर्थ बनातवाला व त्यांच्या मुस्लीम लीगला मान्य होता का? या अर्थाने 'भारतीय संसद' सार्वभौम असल्याचेही त्यांना मान्य होते का? या साऱ्या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे बनातवाला यांनी एकदा देऊन मगच लोकशाही व धर्मनिरपेक्षता यांच्या गोष्टी बोलायला हव्या होत्या.

बनातवाला यांनी या प्रश्नांची उत्तरे दिली असती वा नसती, तरी सामान्य मुसलमानांनी एका गोष्टीची जाणीव ठेवणे आवश्यक होते. ती म्हणजे, भारतात धर्मनिरपेक्ष लोकशाही असली, तरी राष्ट्रहिताशी संघर्ष करणाऱ्या व राष्ट्रीय अस्मितेचा अवमान करणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तींना इथे कधीच मोकळीक मिळणे शक्य नव्हते. तसेच 'वंदे मातरम्' या गीताला विरोध म्हणजे राष्ट्रीय अस्मितेचा अवमान असल्याचीच बहुजन समाजाची धारणा होती. म्हणून 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताबाबतची मुस्लीम समाजाची भूमिका त्याने पुन्हा एकदा तपासून पाहण्याची आवश्यकता होती.

या गीताला विरोध हा केवळ मुसलमानांच्या धार्मिक श्रद्धेचा प्रश्न असता, तर त्याचा वेगळा

विचारही करता आला असता, परंतु या विरोधाचा संबंध मुसलमानांच्या वेगळेपणाच्या प्रवृत्तीशीच भिडत असल्यामुळे तो गंभीर झाला. या वेगळेपणाच्या प्रवृत्ती त्यानंतर सतत जोपासत राहणे, मुस्लीम समाजाच्या हिताचे ठरणारे नव्हते. म्हणून या पृथकवादी राजकारणाचा त्यांनी नव्याने विचार करणे आवश्यक होते. मुस्लीम लीग, जमाते-इस्लामी वा तत्सम जातीयवादी संघटना किंवा त्यांच्या नेत्यांकडून हा विचार होण्याची सुतराम शक्यता नव्हती. हा विचार सामान्य मुसलमानांनीच करणे आवश्यक होते. कारण या पृथकवादी राजकारणाचे परिणाम त्यांनाच भोगावे लागणार होते. भारतीय राष्ट्रवादाचा निष्ठेने स्वीकार करून या राष्ट्रप्रवाहाशी समरस होण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्यानेच या नव्या विचाराला चालना मिळणे शक्य होणार होते. असे केल्यानेच घटनेने दिलेले समानतेचे हक्क प्रस्थापित करता आले असते व विकासाची समान संधीही उपभोगता आली असती. याच अर्थाने त्यांना धर्मस्वातंत्र्यही मिळाले असते. हे स्वातंत्र्य उपासना पद्धतीपुरतेच (इबादत) आहे. त्याचा विपरीत अर्थ लावून वेगळेपणाच्या प्रवृत्ती जोपासत राहिल्याने बहुजन समाजातील केवळ जातीयवादी वृत्तीच प्रबळ झाल्या असत्या असे नव्हे, तर त्या समाजातील समंजस, सहिष्णू व उदारमतवादी प्रवृत्तीही दुर्बल होत जाण्याची शक्यता होती, याचीही त्यांनी जाणीव ठेवणे आवश्यक होते.

सेक्युलर पक्ष व जातीयता

याबरोबरच समाजवादी, काँग्रेस इत्यादी स्वतःला सेक्युलर समजणाऱ्या सर्वच राजकीय पक्षांनी अल्पसंख्याकांबाबतची आपली भूमिका पुन्हा तपासून पाहण्याची वेळ आली होती, असे मंडळाला सांगावेसे वाटत होते. १९५२ सालच्या पहिल्या निवडणुकीपासून ते १९७२ सालच्या निवडणुकीपर्यंत सर्वच सेक्युलर पक्षांनी केवळ जातीय भावनांना आवाहन करून मते मिळविण्याचा प्रयत्न केला होता. 'मुस्लीम समाजाला अशा तऱ्हेने जवळ केल्याने त्याला भारतात सुरक्षितता वाटेल व तो आधिकाधिक सेक्युलर व राष्ट्रवादी होईल' असा कदाचित या राजकीय पक्षांचा अंदाज असावा. हे वादापुरते मान्य केले, तरी काही वर्षांतील घटनांनी तो सपशेल फसला असल्याचेच सिद्ध केले आहे. मुस्लीम लीग अज्ञातवासात होती, तोपर्यंत मुसलमानांनी इतर राजकीय पक्षांचा आधार घेतला होता. परंतु तीच लीग पुन्हा राजकीय आखाड्यात उतरल्याबरोबर हे चित्र पालटले असल्याचे निवडणुकींच्या निकालावरून स्पष्ट झाले. काँग्रेस व समाजवादी पक्षात असलेले मुसलमान (काही सन्माननीय अपवाद सोडल्यास) जातीयवादी राजकारणातून मुक्त झाले असल्याचे म्हणता आले नसते. तसे नसते, तर समान नागरी कायद्याला विरोध करण्याकरता मुस्लीम लीग, जमात-ए-इस्लामी यांसारख्या जातीयवादी संघटनांबरोबर ते एकाच व्यासपीठावर गेले नसते. तसेच मुंबईत 'बेस्ट'मधील समाजवादी कामगार संघटनेचे मुस्लीम कार्यकर्ते मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या मोर्च्याला विरोध करण्यास पुढे सरसावले नसते. तेव्हा मुस्लीम अनुनयाच्या धोरणामुळे पक्षीय स्वार्थ साधला जात असला, तरी त्यामुळे या समाजाचे हित साधले जात नाहीच, पण त्याबरोबर राष्ट्रहितालाही त्याने बाधा येते. तेव्हा 'निदान राष्ट्रहितासाठी तरी जातीय वृत्तींना प्रोत्साहन देणाऱ्या तडजोडी सेक्युलर पक्षांनी थांबवाव्यात व

या परखड वस्तुस्थितीची जाणीव मुस्लीम समाजाला करून देण्याचे प्रयत्न करावेत' अशी त्या वेळी मंडळाची भूमिका होती. कारण या पक्षांनी ही जबाबदारी टाळली असती, तर मुस्लीम समाजात सुरू झालेला आधुनिकतेचा व राष्ट्रवादी प्रवाह खंडित झाला असता आणि ते मुस्लीम समाजालाच नव्हे, तर राष्ट्रालाही महागात पडले असते.

(प्रस्तुत लेखन हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे तत्कालीन सरचिटणीस व प्रमुख कार्यकर्ते अ. का. मुकादम यांनी तत्कालीन वाद-प्रतिवाद लक्षात घेऊन प्रसिद्ध केलेल्या लेखाच्या अनुषंगाने केलेले लेखन आहे.)

२.६ भाषेची समस्या : भूमिका

मुस्लीम समाजापुढील अनेक महत्त्वाच्या प्रश्नांपैकी 'भाषेचा प्रश्न' ही एक जटील बाब होऊन बसली आहे. जातीयवादी मुस्लीम पुढारी सामान्य मुसलमानांच्या भावना भाषेच्या प्रश्नावर नेहमीच प्रक्षुब्ध करीत असतात आणि बहुसंख्य मुस्लीम स्वतःला उर्दू येत नसतानासुद्धा आपली मातृभाषा उर्दूच असल्याचे समजत असतात. धार्मिक नेते, म्हणजे मुल्ला-मौलवीसुद्धा 'ज्याला उर्दू येत नाही तो मुसलमान कसला?' येथपर्यंत मजल मारून अज्ञानी लोकांच्या भावना भडकविण्यात आपला वाटा उचलतात.

तेव्हा 'उर्दू ही मुसलमानांची खरोखरच मातृभाषा आहे काय?' याचा पूर्णपणे विचार करण्याची वेळ आली आहे. त्यासाठी 'उर्दू भाषेची निर्मिती कशी झाली' ते बघू या. ज्या काळी मुसलमान धर्मीय राजवटी भारतात स्थिरावल्या, त्या काळी राज्यकारभार चालविण्यासाठी लागणारा वरिष्ठ नोकरवर्गसुद्धा मुसलमान राजांप्रमाणेच परकीय होता. त्यामुळे राजा, अमीर, उमराव, सैनिक, इतर अधिकारी वर्ग व धर्मगुरू हे परकीय म्हणजे फारसी भाषा बोलणारे होते. साहजिकच राज्यकारभार फारसी भाषेतून चालत असे. मोगल अमदानीत स्थानिक जनतेचा राज्यकारभाराशी, दरबाराशी, घनिष्ट संबंध येऊ लागला. तेव्हा मोगलांच्या काळातही फारसी हीच दरबाराची व राज्यकारभाराची भाषा होती.

वरिष्ठ नोकरवर्ग परकीय व फारसी भाषा बोलणारा असला, तरी कनिष्ठ नोकरवर्ग स्थानिक, भारतीय होता. साधे सैनिकसुद्धा रजपूत, जाट असत व त्यांची मातृभाषा हिंदी होती. त्यांना फारसी येत नसे. या गरज भागविण्याच्या निकडीतूनच फारसी व हिंदी यांच्या मिश्रणातून उर्दू भाषेचा जन्म झाला. अर्थात, हे काही एका दिवसात घडून आले नाही. ही प्रक्रिया दीर्घ काळ चालू होती. पुढे उर्दूचा विकास झाला, तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा लाभला, एक 'भारतीय भाषा' म्हणून ती गणली जाऊ लागली, तिच्यात विपुल वाङ्मय, काव्य, साहित्य निर्माण झाले आणि विशेषतः उत्तर प्रदेश व दिल्ली येथील बहुसंख्य मुसलमानांची ती मातृभाषा बनली; पण उर्दू भाषेचा वापर फक्त मुसलमानच करीत होते, असे नव्हे. अनेक हिंदूसुद्धा उर्दूचा वापर करीत होते व आजसुद्धा उत्तर भारतात 'आमची मातृभाषा उर्दू आहे' असे अभिमानाने सांगणारी हिंदू कुटुंबे आहेत. उर्दूची वाङ्मयसंपत्ती वाढविण्याच्या कामात अनेक हिंदूंनी मोलाची कामगिरी बजावली आहे व आजही बजावीत आहेत. अशी उर्दूच्या जन्माची व विकासाची कहाणी असताना 'ती भारतातील सर्व मुसलमानांची मातृभाषा आहे' असा आग्रह धरणे म्हणजे विनोदच नव्हे काय? फार तर उत्तर भारत, दिल्ली व हैदराबाद येथील काही हिंदूंची आणि मुसलमानांची ती मातृभाषा असेल; पण भारतातील इतर ठिकाणचे मुसलमानसुद्धा 'आमची मातृभाषा उर्दूच' असा आग्रह धरतात, हे मोठे आश्चर्य आहे.

उर्दू ही एक विकसित भारतीय भाषा आहे; परकीय मुळीच नाही. ती काही राज्यांतील हिंदू-मुस्लिमांची, विशेषतः शाही घराण्यातील लोकांची मातृभाषा असू शकेल आणि तरीही तिच्यातील

काव्यात, साहित्यात रस घेणाऱ्या, भारतातील कोणत्याही नागरिकाने उर्दू शिकण्यास हरकत नाही; परंतु जेव्हा काही मुस्लीम पुढारी, तसेच धार्मिक नेते 'सर्व भारतातील मुसलमानांची मातृभाषा उर्दू आहे' असे आग्रहाने सांगतात, तसा प्रचार करतात, मुसलमानांनी आपले शालेय शिक्षणसुद्धा उर्दूतून घ्यावे यासाठी अविरत प्रयत्न करतात, तेव्हा मात्र हे मुस्लीम नेते, धार्मिक पुढारी सामान्य मुस्लीम जनतेची फसवणूक, दिशाभूल करतात. त्यामुळे त्यांच्या उर्दूच्या आग्रहाबद्दल, हेतूबद्दल शंका निर्माण होते. याला कोठेतरी आळा घातला पाहिजे. सामान्य लोकांना वस्तुस्थितीची जाणीव करून दिली पाहिजे.

उर्दूचा दुराग्रह धरण्यामागे मुस्लीम जातीय पुढाऱ्यांचा हेतू स्पष्ट आहे. मुस्लीम जनतेत अलगपणाची भावना निर्माण करणे, इतर भारतीय समाजापासून तिला वेगळे पाडणे, 'आपण इतरांपासून वेगळे आहोत' अशी अस्मिता निर्माण करणे हेच त्यांना साधावयाचे आहे. त्याचीही कारणे स्पष्ट आहेत. असे केल्यानेच त्यांना मुस्लिमांचे स्वतंत्र राजकारण करता येते. मुस्लिमांना भाषेच्या प्रश्नावर एकत्र आणून, त्याला धर्माची जोड देऊन, त्यातून निर्माण होणाऱ्या असंतोषाचा फायदा राजकारणासाठी व सत्तेसाठी घेता येतो. नेमक्या याच कारणासाठी मुस्लीम धर्मगुरूही हाच उद्योग करीत असतात. वस्तुस्थिती अशी आहे की, मुस्लीम राजकारण करणारे नेते व धार्मिक नेते मुळीच वेगळे नसतात. त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत. त्यांना एकमेकांपासून वेगळे करता येत नाही.

असा जर प्रकार असेल, तर 'भारतीय मुसलमानांची मातृभाषा कोणती?' असा प्रश्न साहजिकच निर्माण होतो. याचे उत्तर देण्याअगोदर हे पाहिले पाहिजे की, भारतातील हे मुस्लीम आहेत तरी कोण? मुस्लीम होण्याअगोदर ते कोण होते, याचे समाधानकारक उत्तर सापडले की, मातृभाषेचे उत्तरही सापडते. भारतातील अनेक जाती-जमातींपैकी अनेकांनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला व ते मुस्लीम बनले. म्हणजेच भारतातील सर्व मुस्लीम काही अरबस्तानातून आलेले नाहीत. ते मूळचे भारतीयच होत. त्यांचे पूर्वज भारतीयच होते व त्यांची जी भाषा होती, तीच आजच्या मुसलमानांची मातृभाषा होय. आपल्याच रक्तामांसाच्या, पण भिन्न धर्माच्या, बहुसंख्य असलेल्या समाजाची जी मातृभाषा आहे, तिच्यापेक्षा मुस्लिमांची मातृभाषा वेगळी असणे तर्काला न पटण्यासारखेच आहे. धर्म बदलण्यामुळे भाषा बदलण्याचे कारणच नाही. धर्मांतरामुळे फक्त ईश्वरविषयक कल्पना, भक्तीची कल्पना बदलत असेल; पण त्यासाठी संस्कृती, पेहराव त्याचप्रमाणे भाषा बदलण्याचे कारण नाही.

वरील विवेचनावरून स्पष्ट होईल की, महाराष्ट्रातील मुस्लिमांची मातृभाषा मराठी, त्याचप्रमाणे इतर प्रांतांतील मुस्लिमांची मातृभाषा त्या प्रांताची असलेली अधिकृत भाषा असेल. ती तशीच असणे स्वाभाविक आहे आणि वस्तुस्थितीही तशीच आहे. आजही केरळ, तामीळनाडू, कर्नाटक, गुजरात, बंगाल व इतर राज्यांतील मुसलमान त्या-त्या प्रांतांतील भाषाच आपली मातृभाषा समजतात. त्यांच्या घरांतही तिचाच वापर होतो व शालेय शिक्षणही त्याच भाषेत घेतले जाते. असे असताना गेल्या काही दशकांमध्ये त्यांच्यावर उर्दू भाषेचे कलम करण्यात येत आहे! त्याचे कारण वर दिलेच आहे आणि त्याच कारणासाठी मंडळ चिंतातूर झाले आहे. धर्माच्या नावाखाली

भाषिक प्रश्नावरसुद्धा मुस्लीम समाजाला वेगळे पाडण्यात आल्यामुळे मुस्लीम समाजाचे अतोनात नुकसान होत आहे. 'मुस्लिमांची मातृभाषा उर्दूच आहे' असा अपप्रचार करणाऱ्यांचा प्रसार इतका झपाट्याने व विषारी पद्धतीने चालला आहे की, महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास 'महाराष्ट्रीय मुसलमानांची मातृभाषा मराठी आहे' (उत्तरेकडून व इतर प्रांतांतून आलेले सोडून) हे स्वतःला उर्दू न येणारा मुसलमानसुद्धा कबूल करीत नाही. त्याला आपली भाषा उर्दूच असल्याची खात्री वाटू लागल्याची किमया या जातीयवादी पुढाऱ्यांनी मुल्ला-मौलवींच्या साहाय्याने घडवून आणली आहे आणि इतका अटीतटीचा प्रयत्न करूनसुद्धा या जातीयवादी मुस्लिमांचा उर्दू भाषा हीच मुसलमानांची मातृभाषा आहे हा दावा फोल ठरला आहे. कारण अजूनही बहुसंख्य मुस्लीम समाज, विशेषतः दक्षिणेतील, उर्दूला आपली मातृभाषा मानत नाही. १९७१ च्या शिरगणतीनुसार भारतातील एकूण मुस्लीम संख्या ६,१४,१८,००० एवढी असून फक्त २,८६,०८,००० लोकांनी मातृभाषा उर्दू नोंदविली आहे. तिच्यात काही हिंदूही असण्याची शक्यता आहे. थोडक्यात भारतातील सर्व मुसलमानांची मातृभाषा उर्दू हीच असा दावा करणारे खोटे बोलतात हेच सिद्ध आहे.

'मुसलमानांची भाषा उर्दूच' असा प्रचार केल्याचा घातक परिणाम म्हणजे, भाषेची धर्माशी सांगड घातली जाते आणि स्वतःला उर्दू येत नसले, तरी 'आपल्या मुलाबाळांना उर्दू यावी', 'उर्दू आली तरच आपण मुस्लीम ठरू' आणि 'आपल्या धर्माचे सर्व वाङ्मय फक्त उर्दूतूनच आहे' असा गैरसमज परसतो. मुस्लीम पुढारी आणि मुल्ला-मौलवी या कामी मुस्लिमांना सतत प्रोत्साहन देत असल्यामुळे सर्वसामान्य मुस्लीम समाज आपल्या मुलांना उर्दू शाळेत घालतो. अशा रीतीने उर्दू माध्यमात शिकून मुस्लीम तरुण-तरुणी बाहेर पडले की, निदान शासकीय नोकऱ्या मिळविण्यासाठी तरी प्रादेशिक भाषेतून शिकणे आवश्यक असल्याची नोकरीचा शोध घेताना त्यांना जाणीव होते. म्हणजे महाराष्ट्रात मराठी माध्यमातून शिकणे आवश्यक आहे, असा त्याचा अर्थ आहे. म्हणजेच मुस्लिमांच्या बेकारीच्या अनेक कारणांपैकी 'उर्दू शिक्षणाचा आग्रह' हे एक कारण आहे. मग उर्दूतून शिकलेल्या या मुस्लीम तरुणांच्या बेकारीचा प्रश्न मिटविण्यासाठी महाराष्ट्रातसुद्धा उर्दूला दुय्यम राज्यभाषेचा दर्जा देण्याची मागणी मुस्लीम राजकारणी करू लागतात. असे हे दुष्टचक्र आहे.

शहरांतील मुस्लीम मुले निदान माध्यमिक शिक्षण उर्दूतून घेऊ शकतात. शहरांत उर्दू हायस्कूल्स तरी आहेत; काही ठिकाणी कॉलेजेससुद्धा आहेत, पण उर्दूच्या आग्रहापायी खेड्यांतील मुस्लीम मुलांच्या शिक्षणाचा होत असलेला खेळखंडोबा फारच भयानक आहे. खेड्यांमधून चालविल्या जाणाऱ्या उर्दू शाळांमध्ये मुलांच्या संख्येनुसार चौथी ते सातवीपर्यंत वर्ग असतात. मराठी शाळेत मुलांना पाठविल्यास मुल्ला-मौलवी विरोध करतात. विशेषतः मुलींना तर मराठी शाळेत जाऊच दिले जात नाही. कारण अर्धवट ज्ञान असणारा मौलवी 'तिने धार्मिक शिक्षण घेतलेच पाहिजे व धार्मिक शिक्षण फक्त उर्दूमध्येच होऊ शकते' असे पालकांच्या मनावर ठसवतो. मराठी शाळेत मुलांना व मुलींना न पाठविण्याचे दुसरे कारण म्हणजे, 'वर्ग टिकला पाहिजे; उर्दू शाळा चालली पाहिजे.' अशा रीतीने प्राथमिक शाळेत उर्दू शिकलेली, चौथी पास झालेली मुले पुढच्या

शिक्षणासाठी मराठी पाचवीत जातात व सातवी पास झालेली मुले मराठी शाळेच्या आठवीत जातात. शिक्षणाच्या माध्यमात असा एकदम बदल झाल्यामुळे मराठीतून पुढचे शिक्षण घेणे त्यांना अवघड जाते; समजत नाही; बुद्धीला पेलवत नाही. याचा परिणाम नापास होण्यात होतो. त्यामुळे खेड्यातील बहुसंख्य मुस्लीम मुले शाळाच सोडून देतात व आपल्या बापजाद्यांच्या व्यवसायाला वाहून घेतात व मुली 'चूल व मूल' या आपल्या जन्मसिद्ध हक्काकडे वळतात. यावरून खेड्यातील उर्दू शाळा खेड्यांतील मुलांच्या शिक्षणाची, त्यांच्या जीवनाची, किती राखरांगोळी करीत आहेत, याची कल्पना येते.

शहरांतील मुस्लीम मुलांची, उर्दू माध्यमातून शिकणाऱ्यांची परिस्थिती यापेक्षा काही वेगळी आहे काय? मुळीच नाही! पुण्यासारख्या शहरात, कॉलेजशिक्षणाची सोयसुद्धा उर्दूतून असलेल्या ठिकाणी मुस्लीम विद्यार्थ्यांचा एस. एस. सी.चा निकाल एक टक्काच लागतो. यावरून परिस्थिती कोणत्या थराला पोहोचली आहे, हे लक्षात यावे. अशी अवस्था असतानासुद्धा 'मुस्लिमांची मातृभाषा उर्दू आहे', 'त्यांनी उर्दू माध्यम असलेल्या शाळेतून शिकावे', 'त्यासाठी उर्दू शाळा काढाव्यात', 'उर्दूतून शिक्षण देणारी हायस्कूल्स-कॉलेजे काढावीत' व 'बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी उर्दूला दुय्यम राज्यभाषेचे स्थान द्यावे' अशी मागणी करण्यात येते. हे मुस्लीम जातीयवाद्यांचे उद्योग व त्यांचा खटाटोप पाहून सामान्यांची मती गुंग होते. आता 'महाराष्ट्रातील मुस्लीमेतरांनीसुद्धा उर्दूतून शिकले पाहिजे' अशीही मागणी आली, तरी आश्चर्य वाटणार नाही, इतके मुस्लीम जातीयवादी राजकारण खालच्या पातळीवर उतरले आहे.

उर्दूतून शिकणाऱ्या मुलांच्या शिक्षणाच्या हेळसांडीवर असाही उपाय सुचविण्यात येतो की, 'मुलांना सर्व शिक्षण उर्दू माध्यमातून पूर्ण करता येईल, अशी व्यवस्था करा. म्हणजे जिथे उर्दू शिक्षणाचे चौथीपर्यंत वर्ग असतील तेथे सातवीपर्यंत वर्ग काढा; जिथे सातवीपर्यंत असतील, तेथे एस. एस. सी.पर्यंत काढा व एस. एस. सी. असेल, तेथे कॉलेज काढा... उर्दू शिक्षणाचा दर्जा वाढवा' पण हे सर्व उपाय योजूनसुद्धा मुस्लीम विद्यार्थ्यांचा काही फायदा होणार नाही, हे उघड आहे. समजा, मुस्लीम विद्यार्थ्यांना चांगले उर्दू शिक्षण मिळाले, अगदी उच्चशिक्षणसुद्धा मिळाले, तरी त्यांचा नोकऱ्यांचा प्रश्न कसा काय सुटेल? नोकऱ्या मिळविण्यासाठी त्यांनी प्रादेशिक भाषमधूनच शिकणे आवश्यक आहे, हेही उघडच आहे. निदान महाराष्ट्र व दक्षिणेकडील काही राज्यांत तरी अशी अवस्था आहे की, उर्दूला दुय्यम दर्जा देण्याची मागणी केली तरी कोणत्याही पक्षाच्या सरकारला ते मान्य होणार नाही. तशी मागणी करणाऱ्या सुपीक मेंदूच्या मुस्लीम पुढाऱ्यांच्या पदरी अपयशच येणार, हे निश्चित व उर्दू शिकलेल्या बेकारांचा प्रश्न कायम राहील, हेही निश्चित! असे हे दुष्टचक्र आहे. या कोंडीत मुस्लीम समाजाला हेतुपूर्वक अडकवले गेले आहे. उर्दू भाषा ही सर्व भारतीय मुस्लिमांची भाषा नसल्याचे माहीत असूनसुद्धा तीच भारतीय मुसलमानांची मातृभाषा असल्याचा डांगोरा पिटून धर्माच्या नावाखाली मुसलमानांना उर्दू शिकायला भाग पाडले जाते. त्यांच्यावर तसे मानसिक दडपण आणले जाते. मानसिक गुलाम झाल्यानंतर ते उर्दूतून शिकले की, बेकारांचा प्रश्न निर्माण होणारच! मग तो टाळण्यासाठी 'उर्दूला दुय्यम राज्यभाषेचा दर्जा द्या' असे म्हणायचे. तो कोणीही देणार नसल्याचे माहीत असल्यामुळे

'मुस्लिमांवर अन्याय होतो आहे' अशी हाकाटी पिटायची व या सर्व प्रश्नांवर मुसलमानांना एकत्र आणून, त्यांच्या भावना एकवटून, त्यांना समाजापासून, म्हणजेच राष्ट्रीय प्रवाहापासून वेगळे पाडायचे, हा जातीयवादी मुस्लीम राजकारणाचा मुख्य ढाचाच होऊन बसला आहे. म्हणूनच ह्या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी मुस्लीम बांधवांनी कोठल्याही राजकीय किंवा धार्मिक दडपणाला बळी न पडता, आपली मानसिक गुलामगिरी झुगारून देऊन, आपल्या डोक्यातून उर्दूचे खूळ काढून टाकले पाहिजे. त्यांनी आपली मुले आपापल्या प्रादेशिक भाषांतून शिकणाऱ्या शाळेतच पाठवावीत. यातच त्यांचे हित आहे. यातूनच त्यांच्यातील बेकारीची समस्या दूर होऊ शकेल. महाराष्ट्रातील मुसलमानांनी आपल्या मुलांना मराठी शाळेतच पाठवावे. नेमक्या याच कारणास्तव मुस्लीम सत्यशोधकांनी मंडळाचा कारभार मराठी भाषेत ठेवला आहे. त्याच न्यायाने उद्या समजा केरळमध्ये मंडळाचे काम करायचे असल्यास तेथील शाखेचे कामकाज तेथील प्रादेशिक भाषेतून, मल्याळममधून चालेल; उर्दूतून तर मुळीच चालणार नाही. 'उर्दू हीच मुसलमानांची मातृभाषा आहे' ही विचारसरणीच मंडळाला मान्य नाही.

शेवटी भाषा म्हणजे तरी काय? विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी मानवाने निर्माण केलेले ते एक साधन आहे. तेव्हा विचारांची देवाणघेवाण कोठल्या भाषेत चालते, याला महत्त्व नसून ती देवाणघेवाण सुलभ आहे की नाही, ती समजते किंवा नाही यालाच महत्त्व आहे.

भारतातील एकूण किती मुसलमानांना उर्दू समजते? शंभर टक्के मुसलमानांना ती भाषा बोलता येते, लिपी लिहिता येते असे नाही, हे आम्ही आकडेवारी देऊन दाखविलेच आहे; परंतु आपापल्या प्रादेशिक भाषा जवळजवळ सर्वांनाच समजतात. निरक्षर सोडले, तर सर्वांना ती भाषा लिहिता, वाचता येते. तेव्हा त्याच भाषेतून शिक्षण घेणे सोपे, सोयीचे व फायदेशीर आहे.

ज्याला उर्दू शिकण्याची हौस असेल, त्या भाषेतील वाङ्मयीन रस ज्याला चाखायचा असेल, मग तो कोठल्याही धर्माचा असो, त्याला ती भाषा शिकण्याची सोय असावी. त्यासाठी प्रादेशिक भाषेतून चालणाऱ्या शाळेमधूनच उर्दूचेही वर्ग असावेत. त्यायोगे तरी निदान हिंदू, मुस्लीम व इतर धर्मीय मुले एकत्र शिकतील, एकमेकांविषयीचे गैरसमज दूर होतील, अविश्वासाचे वातावरण निवळेल. तसेच उर्दू माध्यमातून शिकल्यामुळे मुस्लीम तरुणांपुढचा निर्माण झालेला बेकारीचा प्रश्नही दूर होण्यास मदत होईल; राष्ट्रीय एकात्मता वाढीला लागेल. मुस्लीम मुलींची निदान खेड्यांतून वर्गाच्या अभावी होणारी शैक्षणिक हेळसांड थांबून त्यांना पुढचे शिक्षण घेण्याची संधी प्राप्त होईल, अशी आमची खात्री आहे.

भारतीय मुस्लीम समाज नोकऱ्यांच्या व आर्थिक बाबतीत आज मागासलेला दिसतो. त्याचे खरे कारण तो शिक्षणात मागासलेला आहे. त्यातूनच त्याचे दैन्य निर्माण झाले आहे. ते दूर करायचे असेल, तर मुस्लीम समाजाने आपला भाषाविषयक, शिक्षणविषयक दृष्टीकोन बदलला पाहिजे. वर सांगितलेल्या कोंडीतून मुस्लीम समाजाला बाहेर काढायला मुस्लीम पुढारी व धार्मिक नेतेच आड येतात. कारण त्यात त्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. मुस्लीम समाजाचे तेच खरे शत्रू आहेत. हे मुसलमानांच्या जितके लवकर लक्षात येईल तितके बरे. त्या दृष्टीने मंडळाचे प्रयत्न सुरू आहेत. सर सय्यद अहमद यांनी मुस्लिमांच्या इंग्रजी शिकण्याचा पुरस्कार केला, त्या वेळी

धर्माचा पुकारा करणाऱ्या असल्याच लोकांनी त्यांना 'काफिर ' व 'इस्लामचा शत्रू' म्हणून संबोधिले व मुस्लिमांनी इंग्रजी शिकू नये म्हणून आटोकाट प्रयत्न केला. त्याचाच परिणाम होऊन, इंग्रजी शिक्षण न घेतल्यामुळे मुस्लीम समाज इंग्रजी अमदानीत खास संरक्षण मिळूनसुद्धा शिक्षणात व परिणामी नोकऱ्यांत, आर्थिक बाबतींत मागासलेला राहिला, हे आज स्पष्ट दिसत आहे. तेव्हा या देशातील मुस्लिमांनी काळाची पावले ओळखून 'उर्दू हीच मुस्लिमांची मातृभाषा आहे' या घोषणेला निदान यापुढे तरी बळी न पडता आपापल्या प्रादेशिक भाषांतून आपल्या मुलांना शिकविण्याचा निश्चय करावा. तरच ते या दुष्टचक्रातून बाहेर पडू शकतील; अन्यथा नाही.

या संदर्भात विचार करता असे दिसून येते की, आजही मुस्लीम मुलींना उर्दू भाषेतून व मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. इंग्रजी माध्यम आर्थिकदृष्ट्या न परवडणारे पालक आपल्या पाल्यांना मराठी माध्यमात पाठवतात. चार दशकांपूर्वी भाषेची जी

'महाराष्ट्र शासनाने विविध धार्मिक समूहांसाठी समान नागरी कायदा न आणता कुटुंब नियोजनाची मोहीम आखणे म्हणजे एक प्रकारे गाडीपुढे घोडा चालवण्याचा प्रकार आहे' अशी टीका मुस्लीम सत्यशोधक मंडळाने केली. महाराष्ट्राचे राज्यपाल अली यावर जंग यांनी राष्ट्राची प्रगती आणि काळाची गरज विचारात घेऊन कुटुंब नियोजन अनिवार्य करण्याबाबतची घोषणा केली. मंडळाचे कार्यकर्ते सय्यदभाई यांनी असे सांगितले की, 'प्रथम समान नागरी कायदा अस्तित्वात आणून लोकसंख्याविषयक धोरण आखण्यात यावे. डॉ. अली यावर जंग हे स्वतः अल्पसंख्याक समूहाचे असून त्यांनी मुस्लीम व इतर अल्पसंख्याकांना सामाजिक न्याय आणि समानता यांचा पाठपुरावा करण्यासाठी समान नागरी कायद्याचे महत्त्व समजावून सांगायला पाहिजे. मंडळाने समान नागरी कायद्याच्या समर्थनार्थ सुमारे ५०० मुस्लीम महिलांच्या सह्यांचे निवेदन महाराष्ट्र शासनाला वर्षापूर्वी दिले असून शासन या दिशेने काहीही करत नसल्याचेही लक्षात आणून दिले.'

मंडळाच्या वतीने असे सांगण्यात आले की, 'नव्या समाजाच्या निर्मितीसाठी जातीय आणि धार्मिक मतभेद बाजूला ठेवणे आवश्यक आहे.' पुणे येथील शनिवारवाडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. सय्यदभाई यांनी सांगितले की, 'धर्माधतेमुळे देशाची फाळणी झाली. पुढील काळात हा धर्मवाद थोपवण्याचे कार्य प्राधान्याने करावे लागेल. हरिजनांना आणि गिरिजनांना दिली जाणारी अवमानजनक वागणूक थांबवून एकात्म व प्रबळ समाज निर्माण करणे हे आपले नागरी कर्तव्य आहे.' मधुकर निरपराके, बाळासाहेब शेंडगे यांनी हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य पद्धती संपवण्याची गरज व्यक्त केली. सत्यशोधक समितीचे निमंत्रक सयाजी लहाने यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याच प्रसंगी सय्यदभाई यांनी मुस्लीम समाजाची दिशाभूल करणाऱ्या मुस्लीम लीगवर टीका केली. मुस्लीम लीगने मुस्लीम सत्यशोधकच्या कार्यकर्त्यांना घेराव घालण्याची भाषा केली होती.

समस्या होती, तीच आजही आहे. या स्थितीत काही प्रमाणात सुधारणा होत असलेल्याही दिसतात. मंडळातर्फे १९७३ मध्ये मुस्लीम मराठी शिक्षण परिषद घेऊन ' मुस्लिमांनी मराठी भाषेचा अंगीकार करावा' यासाठी ठराव करून तसा प्रसारही करण्यात आला. हमीद दलवाई यांनी इंधन, लाट या पुस्तकांबरोबरच अनेक कथा, लेख मराठीत लिहिले... 'महाराष्ट्रातील मुसलमानांनी मराठीतून व्यवहार केल्यास त्याचे फायदे कसे होतील' हे स्पष्ट केले... मंडळाने मराठी भाषेचा पुरस्कार केला. आज मराठी भाषकांची संख्या वाढत आहे... मराठी साहित्यिक वाढताहेत व मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्यांचेही प्रमाण वाढले आहे. मुस्लीम मराठी साहित्य संमेलने तर होतातच; पण जमात-ए-इस्लामी सारख्या संघटनांकडूनही कुराणचे अनुवाद मराठीत करून ते मोफत वाटण्यात येतात. मराठी भाषेत धर्मप्रसारही केला जातो. म्हणजेच मराठी भाषेबद्दलचा पूर्वीचा आडमुठेपणा कमी होताना दिसतो आहे. गेल्या काही वर्षांत हे स्वरूप स्पष्ट होत आहे.

'कुराण अरबी भाषेतून वाचल्यास अधिक पुण्य लाभते' असा अपप्रचारही करण्यात येतो. वास्तविक, कोणतीही भाषा गर्वाची होऊ शकत नाही किंवा अस्वीकार्ह असू शकत नाही. अधिकाधिक भाषा येणे, हे एक कौशल्य असते. म्हणूनच मौलाना आझाद हे बहुभाषक होते. पैगंबरांनीसुद्धा 'चीनपर्यंत जा विविध भाषा शिका आणि ज्ञान मिळवा' असा संदेश दिला आहे. पण आडमुठे मुस्लीम किंवा बोकोहरामसारख्या दहशतवादी संघटना आपली अरेरावी सोडत नाहीत, हे जगासमोरचे दुष्ट उदाहरण आहे.

मानसशास्त्रज्ञांनीसुद्धा मातृभाषेतून शिक्षण अधिक प्रभावी होत असल्याचे अनेक वेळा सांगितले आहेच; परंतु मुसलमानांनी 'आपली प्रादेशिक भाषा हीच मातृभाषा होऊ शकते' हे वास्तव स्वीकारून तिचा मनापासून वापर केला पाहिजे. भाषा ही संवादाची जननी असते. संवादासाठीच भाषा असावी. अलगतावाद जोपासण्यासाठी विशिष्ट भाषेचा आग्रह धरणे, ही आत्मघातकी व समाजघातकी कृती आहे. उर्दू भाषा ही भारतीय भाषा आहे. कोणतीही भाषा संपुष्टात येऊ नये, यासाठी उर्दू भाषा ऐच्छिक केल्यास हवे ते लोक या भाषेचा अभ्यास करतील व तिच्यात कौशल्य प्राप्त करतील. भाषेविषयी निकोप दृष्टीकोन वाढत आहे, हे एक सुचिह्नच म्हणावे लागेल.

अ. मुस्लीम शिक्षण परिषद

(मुस्लीम समाजात मराठी भाषेचा मनापासून स्वीकार व्हावा, आधुनिक आणि रोजगाराभिमुख शिक्षणास चालना मिळावी, या हेतूने ३०-३१ डिसेंबर १९७३ रोजी कोल्हापूर येथे मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र मुस्लीम शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. मुस्लीम समाज प्रबोधनासाठी आयोजित केलेल्या उपक्रमातील हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेमागील विचार महत्त्वाचा आहे. या परिषदेच्या काळातील परिस्थिती आणि त्या निमित्ताने केलेला विचार समजून घेणे महत्त्वाचे आहे.)

शिक्षण परिषदेसाठी नोंदणी करताना हमीद दलवाई आणि कार्यकर्ते गाडीधोदिद्न सलाती आणि मोहम्मद सोलापूरे

'महाराष्ट्रातील मुस्लीम समाजाच्या इतर अनेक समस्यांप्रमाणे काही शैक्षणिक समस्या आहेत. एक तर मुस्लीम समाजातच शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. भारतातील सर्वसाधारण साक्षरतेचे प्रमाण ३० टक्के आहे, तर मुसलमानांमधील हेच प्रमाण १० टक्के आहे. भारतातील सुमारे १० टक्के स्त्रिया साक्षर आहेत; मुसलमान स्त्रियांमध्ये तर हे प्रमाण एक टक्का आहे. महाराष्ट्रात मुसलमानांतील साक्षरतेचे प्रमाण याहूनही कमी असण्याची शक्यता आहे.

'महाराष्ट्रात आणखी एक समस्या मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक प्रगतीच्या आड येते. ही समस्या म्हणजे, 'उर्दूचे माध्यम' ही होय. उर्दू ही महाराष्ट्रातील भाषा नाही; उत्तर प्रदेश ही उर्दूची जननी आहे. काही ऐतिहासिक कारणामुळे महाराष्ट्रात मुसलमानांनी उर्दू शिक्षण घेण्यास प्रारंभ केला. मुस्लीम समाजाला काही धार्मिक व सांस्कृतिक कारणांमुळे उर्दूतून शिक्षण घेणे आवश्यक असल्याचे वाटू लागले. पुढे, १९४० साली मुस्लीम लीगच्या वाढत्या प्रभावामुळे 'उर्दू ही अखिल भारतीय मुसलमानांची भाषा आहे' असा प्रचार सुरू झाला. यामुळे महाराष्ट्रात मुस्लीम समाज उर्दू माध्यमातून शिक्षण घेऊ लागला. ब्रिटिश सत्ता असेपर्यंत या धोरणाचे दुष्परिणाम जाणवू शकले नाहीत. स्वातंत्र्यानंतर स्थानिक भाषांतून कारभार करण्याकडे कल वाढू लागला. मात्र प्रादेशिक भाषा नीट आत्मसात न केल्यामुळे मुस्लीम समाजापुढे नोकऱ्यांचे आणि चरितार्थाचे काही गंभीर प्रश्न उपस्थित झाले. एकतर उर्दू माध्यमाच्या एस. एस. सी. पर्यंतच्या शाळा ग्रामीण भागात टिकत

शिक्षण परिषदेत मांडणी करताना हमीद दलवाई

नाहीत; तेथे चौथीपर्यंत उर्दू माध्यमाच्या शाळा आहेत. पुढे मुस्लीम विद्यार्थ्याला मराठी माध्यमाच्या शाळांतून जावे लागते. माध्यमात होणाऱ्या या आकस्मिक बदलामुळे त्याला विषय समजून घेणे जड जाते. याचा परिणाम म्हणजे, एस. एस. सी. पर्यंत मजल मारणे, बऱ्याचशा मुस्लीम विद्यार्थ्यांना कठीण झाले. या समस्येचा मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक आणि इतर उन्नतीसाठी गंभीर विचार होणे आवश्यक आहे.

'मुस्लीम धर्मशिक्षण अरबी व उर्दू या दोन भाषांतून देण्यात येते. एकतर ते परंपरागत पद्धतीने देण्यात येते. अरबी भाषा कुणालाच कळत नाही; उर्दू बेतानेच कळते. अशा परिस्थितीत सखोल आणि व्यापक धर्मशिक्षण मुस्लीम मुलांना प्राप्त होऊ शकत नाही. 'आपली मातृभाषा कोणती?' या संबंधी जोपर्यंत मराठी मुसलमान स्पष्ट भूमिका घेत नाहीत, तोपर्यंत ही समस्या राहणार आहे. यामुळे मुसलमानांना त्यांच्या धर्माचीही नीट ओळख होऊ शकत नाही. तसेच ते मराठी, सांस्कृतिक आणि भाषिक जीवनप्रवाहातून अलग पाडण्यात याची परिणती झालेली आहे. यामुळे मुस्लीम समाजाचे नुकसान होत आहे, आणि यापुढे ते अधिकाधिक होत राहणार आहे.'

या गोष्टी ध्यानात घेऊनच महाराष्ट्र मुस्लीम सत्यशोधक मंडळाने महाराष्ट्रातील मुसलमानांची एक शैक्षणिक परिषद आयोजित करण्याचे ठरविले. ही परिषद कोल्हापूर येथे दि. ३० व ३१ डिसेंबर १९७३ रोजी झाली. मराठी मुसलमानांच्या शैक्षणिक समस्यांचा सर्वांगीण विचार करणे,

शिक्षण परिषदेत मांडणी करताना प्रा. अ. भि. शहा.

हे या परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट होते. मुसलमानांत शिक्षणाचा अधिक प्रसार करणे, स्त्रियांना शिक्षण देणे, मराठी माध्यमातून शिक्षण घेणे, उर्दू भाषेबाबत 'एक भाषा म्हणून आवश्यक तेवढी कशी शिकता येईल' याचा विचार करणे, आधुनिक पद्धतीने आणि सोप्या-सुटसुटीत मराठी भाषेत इस्लामी धर्मशिक्षणाची पुस्तके तयार करणे, तसेच मराठीत सटीक आधुनिक भाषेत लिहिलेले पवित्र कुराणाचे भाषांतर प्रसिद्ध करणे या बाबींचा विचार परिषदेत मांडण्यात आला. महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील नामवंत शिक्षणतज्ज्ञांना, तसेच आधुनिक विचार करणाऱ्या मुस्लीम धार्मिक विद्वानांना परिषदेत बोलवण्यात आले. त्यांच्याशी विचार-विनिमय करून व त्यांच्या सल्ल्याने परिषदेतील कार्यक्रम ठरविण्यात आला. मुस्लीम सत्यशोधक मंडळाची ही भूमिका स्थूलमानाने मान्य असलेल्या मुस्लीम बांधवांनी या परिषदेस हजेरी लावली; तिच्यात प्रत्यक्ष सहभाग नोंदवला आणि ही परिषद यशस्वी केली.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटी यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या मुस्लीम शिक्षण परिषद, कोल्हापूर. दि. ३०-३१ डिसेंबर, १९७३ रोजी मांडण्यात आलेले ठराव:

ठराव क्र. १

अ) ही परिषद असा ठराव करते की, मुस्लीम मुलांना उर्दूऐवजी प्रादेशिक भाषेच्या माध्यमातून शिक्षण देण्यात आले पाहिजे. बहुसंख्य मुस्लीम मुलांची मातृभाषा प्रादेशिक भाषेहून वेगळी नाही. उर्दू माध्यमातून शिक्षण देण्याने या मुलांच्या भावी आयुष्यावर होणाऱ्या परिणामांची फारशी पर्वा न करता आज उर्दू माध्यमातून शिक्षण देण्याची प्रथा सुरू आहे. उत्तर प्रदेश व

बिहार वगळल्यास इतर राज्यांतील मुसलमान तेथील प्रादेशिक भाषेतूनच बोलतात व लिहितात. शेकडो वर्षे ते त्याच भाषेतून व्यवहार करीत आले आहेत. ज्याप्रमाणे बंगाल, तामीळनाडू व केरळ येथील मुसलमानांची मातृभाषा अनुक्रमे बंगाली, तामीळ व मल्याळी आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्रातही काही विभाग वगळल्यास, गेली शेकडो वर्षे मुसलमानांची मातृभाषा मराठीच राहिली आहे. काही विभागांत उत्तरेकडील मुसलमानांनी उर्दूची धर्माबरोबर चुकीची सांगड घालून स्थानिक मुसलमानांमध्ये अलगपणाची भावना हेतुपुरस्सर निर्माण केली आहे.

'महाराष्ट्रातील मुसलमानांची मातृभाषा उर्दू आहे' असा भास व्हावा म्हणून मराठी भाषेबाबत मुस्लीम समाजाने दाखवलेल्या अनास्थेमुळे मुस्लीम समाजाचे अत्यंत नुकसान झाले आहे. विशेषतः सरकारी व खाजगी क्षेत्रांत नोकऱ्या मिळविण्याच्या स्पर्धेत तो मागे पडला आहे. शासकीय सेवांतून, तसेच व्यापार व उद्योगांतून मराठी व काही प्रमाणात इंग्रजी भाषांचा वापर करण्यात येतो.

मराठी भाषेवर प्रभुत्व नसल्यामुळे मुसलमानांना आर्थिक तसेच शासकीय क्षेत्रात योग्य तो वाटा उचलता येत नाही. 'मराठी ही आपली मातृभाषा आहे' हे मुसलमान जोपर्यंत मान्य करीत नाहीत, तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. तसेच मराठी भाषेवर प्रभुत्व मिळविल्याखेरीज त्यांना भारतीय घटनेने दिलेले हक्कही उपभोगता येणार नाहीत.

असे केल्याने त्यांना केवळ भाषेवरच प्रभुत्व प्राप्त करता येईल किंवा स्पर्धेत त्यांची कुवत वाढेल, एवढेच नसून उर्दू भाषेमुळे निर्माण झालेला कृत्रिम अलगपणाचा दुरावा नष्ट होऊन ते आपल्या इतर धर्मीय बांधवांबरोबर सहज मिळूमिसळू शकतील.

'शाळेतून मुस्लीम मुलांना मराठी माध्यमातून शिकविण्यात यावे व महाविद्यालयातून मराठी किंवा इंग्रजी माध्यम असावे' याचा अर्थ मुसलमानंना उर्दू शिकण्यासाठी आवश्यक त्या सोयी नसाव्यात, असे या परिषदेचे मत नाही. संस्कृत, पर्शियन, फ्रेंच किंवा इतर कोणत्याही प्राचीन अथवा आधुनिक भाषांप्रमाणेच 'उर्दू' ही भाषा 'एक ऐच्छिक विषय' म्हणून शिकण्याची सोय उपलब्ध असावी. केवळ मुस्लीम विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर मुस्लीमेतरांनाही उर्दूचा अभ्यास करता येईल. यासाठी विशेष सोयी उपलब्ध करून देण्यात याव्यात. यामुळे भविष्यकाळात उर्दूचा सांस्कृतिक वारसा नीट समजून घेण्यास मदत होईल, असे या परिषदेचे मत आहे. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे, तर उर्दूचा अभ्यास कोणीही करण्यास या परिषदेचा विरोध नाही. 'मातृभाषेच्या (मराठी) माध्यमातून, विशेषतः प्राथमिक अवस्थेत शिक्षण देणे' या शिक्षण शास्त्रातील एका महत्त्वाच्या तत्त्वावर ही परिषद भर देऊ इच्छिते.

ब) इतर कुठल्याही क्षेत्राप्रमाणे शिक्षणाच्या क्षेत्रातही इतर समाजांना मिळत नसलेल्या विशेष सवलतीची मुस्लीम समाजाला आवश्यकता नसून आपली स्पर्धात्मक ताकद वाढविण्यासाठी आवश्यक सोयी त्यांना हव्या आहेत. ही ताकद वाढविण्याच्या मार्गात त्यांच्या प्रतिगामी व विभक्ततावादी नेतृत्वाने अडथळे निर्माण केले आहेत. विशेषतः या नेत्यांपैकी वक्फचा पैसा

शिक्षण परिषदेत ठराव मांडताना मोहियुद्दिन शेख. (आबा मास्तर)

ताब्यात असणारे नेते या गोष्टीस जास्त जबाबदार आहेत. केवळ महाराष्ट्रातच हा पैसा दहा कोटी रुपयांच्या घरात आहे. मुस्लीम समाजात आधुनिक, वैज्ञानिक पाया असलेले शिक्षण देण्यासाठी जर हा पैसा उपयोगात आणला गेला, तर एका पिढीच्या कालमर्यादित मुस्लीम समाजाचे शैक्षणिक मागासलेपण दूर करता येईल. परंतु जोपर्यंत वक्फ पारंपरिक नेतृत्वाच्या ताब्यात आहे, तोपर्यंत हा पैसा कालबाह्य पद्धतीवर आधारित शिक्षणावर व धार्मिक विधींवर खर्च होत राहील. ही परिषद शासनाकडे अशी मागणी करते की, हे सर्व धार्मिक निधी, विशेषतः वक्फची सर्व मालमत्ता आधुनिक विचारसरणीच्या, धर्मनिरपेक्ष व नि:स्वार्थी वृत्तीची माणसे असलेल्या संयुक्त मंडळाच्या हाती सोपविण्यात यावी, जेणेकरून हा पैसा

मुस्लीम समाजाचा शैक्षणिक मागासलेपणा धालवण्यासाठी उपयोगात आणता येईल.

क) ही परिषद अशी मागणी करीत आहे की, माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण सरकारने मोफत करावे व सध्या उच्च शिक्षण १२०० रू. पर्यंत उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलांना मोफत आहे. त्याऐवजी ही सवलत वार्षिक पाच हजार रु. पर्यंत उत्पन्न असलेल्या पालकांपर्यंत वाढविण्यात यावी. या मागणीच्या पूर्तीकरिता सर्वच जातीजमातींतील आर्थिक मागासलेल्या गटांचे सहकार्य मिळवून आपली मागणी मान्य करावयास सरकारला भाग पाडण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने धर्मनिरपेक्ष पातळीवर आंदोलन उभारावे, असा ही परिषद मुस्लीम सत्यशोधक मंडळाला आदेश देत आहे.

या ठरावाचे सूचक उदारमतवादी अभ्यासक, रयत शिक्षण संस्थेशी जोडले गेलेले प्राचार्य ए. डी. अत्तार होते आणि सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी आणि मराठी लेखक मोहीयुद्दीन शेख, तसेच मंडळाचे कार्यकर्ते व फलटण येथील प्राचार्य विलायत शेख यांनी या ठरावाला अनुमोदन दिले.

ठराव क्र. २

भारतीय मुसलमानांमध्ये संकुचित प्रवृत्ती जोपासण्यास सर्वांत जास्त जबाबदार गोष्ट म्हणजे, पारंपरिक मदरसा पद्धतीने देण्यात येणारे धर्मशिक्षण होय, असे या परिषदेचे मत आहे. या मदरसा पद्धतीतील अभ्यासक्रम शेकडो वर्षांपूर्वी बनविण्यात आलेला आहे. त्या वेळी माणसाजवळ आधुनिक काळापेक्षा कितीतरी कमी ज्ञान होते. शिवाय मदरसा पद्धतीच्या शिक्षणाची पद्धत त्या वेळी ज्या उद्देशाने बनविण्यात आली होती, तो उद्देश आजच्या काळात गैरलागू बनला आहे. इतकेच नव्हे, तर एका आधुनिक, लोकशाही देशाचे नागरिक म्हणून येथील मुसलमानांच्या प्रगतीच्या व कल्याणाच्या आड येणारी ही पद्धत आहे.

याकरता 'शिक्षणाचे आधुनिकीकरण करावे' अशी ही परिषद मागणी करते. तशा प्रकारची क्रमिक पुस्तके मराठीतून तयार करावीत व त्यांचा मुस्लीम समाजात प्रचार करावा, असाही आदेश परिषद मुस्लीम सत्यशोधक मंडळाला देत आहे.

अमरावती येथील मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते वजीर पटेल या ठरावाचे सूचक होते आणि पत्रकार सय्यद मुनीर आणि सामाजिक कार्यकर्ते गुलाब पांजवानी यांनी या ठरावाला अनुमोदन दिले.

या ठरावातून मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे भाषा आणि शिक्षणविषयक धोरण स्पष्ट होते. मुस्लीम समाजात याचा प्रसार आणि प्रचार व्हावा म्हणून विविध ठिकाणी शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले.

कुटुंब नियोजन विधेयकाविरुद्ध फतवा

सक्तीच्या कुटुंब नियोजनाचे विधेयक मांडल्याबरोबर मुस्लीम लीगच्या काही कार्यकर्त्यांनी उत्तर प्रदेशातील देवबंद येथील आलमी इस्लामी इदार यांच्याकडून कुटुंब नियोजनविरोधी फतवा मागवून, पुण्यातील प्रमुख मशिदींसमोर उभे राहून तो येणाऱ्या-जाणाऱ्यांना वाटला. त्यामुळे पुण्यातील मुस्लीम समाजाच्या नागरिकांत गोंधळ उडाला असल्याचे एक पत्रक मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे उपाध्यक्ष सय्यद मेहबूब उर्फ सय्यदभाई यांनी सोमवारी काढले.

सक्तीचे कुटुंब नियोजन विधेयक मांडून देशहिताच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकण्याबद्दल या पत्रकात शासनाचे अभिनंदन करून राजकीय व सामाजिक संघटनांमध्ये काहीही मतभेद असले, तरी सक्तीच्या कुटुंब नियोजनाबद्दल विसंवादी सूर काढण्याचे काहीही कारण नसल्याचे म्हटले आहे. 'समाज आणि देश यांच्या हिताच्या दृष्टीने या विधेयकासंदर्भात मुस्लिमांनी फितुरी कारवायांना थारा देऊ नये व या विधेयकास विरोध हा राष्ट्रविघातक प्रचार असल्याने पुरोगामी प्रवृत्तीच्या सर्व धर्मीयांनी या प्रचाराला विरोध करावा' असेही पत्रकात म्हटले आहे. 'विधेयकाला विरोध करणाऱ्यांचा निषेध करावा आणि विरोधाचा प्रचार करणाऱ्यांना कठोर शासन करावे' अशी मागणी या पत्रकात केली आहे.

'मुस्लीम बांधवांनी अशा कारवायांना प्रतिसाद न देता कुटुंब नियोजनाच्या आदेशाचे पालन करावे आणि विधेयकाविरुद्ध प्रचार करणाऱ्यांना विरोध करावा' असे आवाहनही पत्रकात करण्यात आले आहे.१४ मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या दृष्टीने लोकसंख्या नियंत्रण हा विषय प्रमुख उद्दिष्टांतील एक आहे.

मंडळाच्या विविध शाखांमार्फत कुटुंब नियोजन, लोकसंख्या नियंत्रण यांस चालना देणारे उपक्रम राबविण्यात आले. यांत अमरावती शाखा अग्रेसर होती. अमरावतीतील मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते वजीर पटेल यांनी हमीद दलवाई यांच्या सूचनेवरून अनेक नसबंदी शिबिरांचे आयोजन केले. यांतील काही शिबिरांत हमीद दलवाई स्वतः उपस्थित होते. या उपक्रमांचा आणि वजीर पटेल यांच्या योगदानाचा इतरत्र उल्लेख केला आहे.

२.७ लोकसंख्या नियंत्रण: भूमिका

सर्व समस्यांवर 'धर्म' हा एकमेव तोडगा मानल्यावर खरोखरच काही भाबडे, धर्मभोळे लोक ते सत्य मानू लागतात. ते स्वाभाविकही आहे. त्यांची बिचाऱ्यांची तशी समजूत करून दिली जाते; पण त्याअगोदर त्यांना धर्माचे दास केले जाते आणि याला धर्माबद्दलची अंधश्रद्धाच कारणीभूत असते. अशा भाबड्या, श्रद्धाळू लोकांचे अज्ञान दूर करता येईल. ते करणे आवश्यकच आहे. कारण जवळजवळ सर्वच धर्मांमधील बहुतेक अनुयायी वर्ग धर्माच्या कचाट्यात सापडला आहे. अजूनही त्यांच्या मनावर धर्माचा जबरदस्त पगडा आहे. त्यांच्या मानेवरचे हे जू काढलेच पाहिजे. त्यांचे प्रबोधन करून, म्हणजे त्यांचे त्या बाबतीतील अज्ञान दूर करूनच ते करता येऊ शकते; पण शिकलेले, स्वतंत्र बुद्धीने विचार करू शकणारे, विज्ञानाची ओळख असलेले लोक धर्माच्या नावाखाली काही अज्ञानी लोकांचे अज्ञान दूर करण्याऐवजी त्यांचे नेतृत्व करू लागतात व धर्माच्या नावाखाली काही राष्ट्रीय कार्यक्रमांना खो घालण्याचा प्रयत्न करतात. म्हणजेच दुसऱ्या अर्थाने राष्ट्र दुबळे करण्याचाच ते प्रयत्न करतात. अशा दांभिक लोकांचे अज्ञान कसे दूर करता येईल? त्यांच्याकडे अज्ञान नसतेच मुळी. ते पक्के स्वार्थी असतात. त्यांना सर्व प्रकार माहीत असतो. ते अंधश्रद्धाळू नसतात, 'सर्व समस्यांवर धर्मात उत्तरे नसतात' हेही त्यांना माहीत असते; पण तरीही धर्माचा कैवार घेऊन ते राष्ट्रविरोधी कृत्य करण्याला उभे ठाकतात. त्यांच्यावर प्रबोधनाचे हत्यार उपयोगी ठरत नाही. त्यांच्यासाठी राज्यसंस्था वापरीत असलेले एकमेव हत्यार वापरणेच योग्य ठरते आणि ते हत्यार म्हणजे 'कायदा'. या दंडशक्तीच्या जोराबरच त्यांना वठणीवर आणता येईल, असे म्हणावे लागते.

भारतातील मुस्लीम समाजाने कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाला धर्माच्या नावाखाली विरोध दर्शविला. हिंदूमधील काही गटांकडून व ख्रिश्चनांमधील रोमन कॅथॉलिकांकडूनही असा विरोध झाला. समाजाच्या नेत्यांनी केलेल्या विरोधासाठी वेगवेगळी कारणे सांगितली गेली असली, तरी सर्वांचा उद्देश मात्र सारखाच होता. तो म्हणजे, 'कुटुंब नियोजन कार्यक्रम यशस्वी होऊ द्यायचा नाही.' 'कुटुंब नियोजन करण्याची आवश्यकताच नाही; उत्पादन वाढवा' असा पवित्रा कोणी घेतला, तर कोणी 'साधनांच्या (निरोध, लूप, शस्त्रक्रिया) ऐवजी संयम पाळा' असा सल्ला दिला. हे पवित्रे घेताना व सल्ला देताना मूळ प्रश्नाला बगल देण्याचाच त्यांचा हेतू स्पष्ट होतो. कोठल्याही अविकसित देशात लोकसंख्यावाढीबरोबरच उत्पादनवाढ करणे शक्य नसते. 'संयम करणे' लाखात एखाद-दुसऱ्या असामान्य व्यक्तीला शक्य असते. हे सर्व ठाऊक असूनही जे स्वार्थी नेते जनतेची फसवणूक करतात, ते दांभिक, समाजाचे शत्रू असतात व त्यांचा दांभिकपणा उघडकीस आणण्यासाठी व समाजाला त्यांच्या तावडीतून सोडविण्यासाठी 'कायदा' व 'प्रबोधन' या दोन्हींचा वापर करण्यात यावा, हे कुटुंब नियोजन यशस्वी करण्यासाठी आवश्यक आहे, असे मंडळ मानते.

येथे फक्त मुस्लीम समाजाबद्दल विचार करावयाचा आहे. कारण सध्या तरी मंडळाचे क्षेत्र

मुस्लीम समाजापुरतेच मर्यादित आहे. भारतातील बहुसंख्य मुस्लीम अशिक्षित, आर्थिकदृष्ट्या मागासलेले, मुल्ला-मौलवींच्या मानसिक दास्यात जखडलेले व पक्के धर्मवादी आहेत. जे सुशिक्षित आहेत, ते आपल्या खाजगी कौटुंबिक जीवनात इतके मग्न आहेत की, 'आपल्या समाजाला अज्ञानातून बाहेर काढले पाहिजे, त्याच्यासाठी आपल्या बुद्धीचा उपयोग केला पाहिजे' याचे भानच त्यांना उरलेले नाही. मुस्लिमांचे नेतेपण करणारी व सुशिक्षित मंडळी मात्र पक्की स्वार्थी, दांभिक व आपले नेतृत्व टिकविण्यापुरताच मर्यादित विचार करणारी असल्यामुळे, तसेच मुल्ला-मौलवींच्या विरोधामुळे मुस्लीम समाजात अजूनही कुटुंब नियोजनाला विरोध होतो आहे.

समाधानाची बाब एवढीच की, निदान एवढ्या बाबीपुरते का होईना, मुस्लीम समाजातील काही लोकांनी आपल्या धर्मगुरूंचे आदेश धुडकावून व कोठल्याही अपप्रचाराला बळी न पडता वैयक्तिक पातळीवर कुटुंब नियोजन अमलात आणले आहे. त्यांना त्यातील फायदे उमजले आहेत. कुटुंब नियोजनाचा मार्ग चोखाळलेल्यांचा प्रश्न नाही. त्यांचे अभिनंदन! पण बरेच लोक अद्यापपावेतो या कार्यक्रमास विरोध करताहेत आणि त्यांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन नेते त्यांना या विषयावर भडकविण्याचा उद्योग करीत आहेत. असे हे कुटुंब नियोजनाला विरोध करणारे व त्यांचे नेतृत्व करणारे लोक जोपर्यंत मुस्लीम समाजात आहेत, तोपर्यंत या लोकांचे अज्ञान दूर करणे व त्यांना भडकविणाऱ्या दांभिकांच्या दांभिकतेचा पर्दाफाश करणे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कर्तव्यच आहे. मुस्लीम समाजातील बहुसंख्य लोक धर्माच्या नावाखाली कुटुंब नियोजन कार्यक्रमाला अजूनही विरोध दर्शवितात. 'इस्लाममध्ये, कुराणात कुटुंब नियोजन करू नये असे सांगितले आहे काय?' किंवा 'त्यास कुराणात मान्यता आहे काय' किंवा 'यावर कुराण काय म्हणते' याचे विवरण करून अज्ञानी मुस्लिमांचे अज्ञान दूर करताही येईल. काही विद्वान मंडळी तसा प्रयत्न करताहेत. त्यांना किती प्रमाणात यश मिळेल, हा भाग वेगळा; पण त्यांना यश आलेच पाहिजे.

परंतु मंडळ मात्र केवळ तेवढाच मार्ग अनुसरत नाही. केवळ तोच मार्ग पुरेसा ठरणारही नाही. विज्ञानयुगात निर्माण झालेल्या समस्येची उत्तरे अज्ञानयुगातल्या धर्मग्रंथांत शोधता येणार नाहीत. 'धर्मग्रंथांत सर्व समस्यांवर उपाय आहेत' असे अज्ञानी लोक समजतात. त्यांच्यात तसा गैरसमज आहे. कुराणात शोध घेणाऱ्याच्या दृष्टीने त्या गैरसमजाला पुन्हा जीवदान मिळते आणि 'सश्रद्ध लोक सांगतात तेच तेवढे खरे आहे' असे मानल्यासारखे होते. मंडळाला ते करायचे नाही. धर्माच्या साहाय्याने विचार करण्याची व धर्मग्रंथांत शोधून मग निर्णय घेण्याची मुस्लिमांची ही वाईट सवयच मोडायला हवी. मुस्लीम समाजाने कुटुंब नियोजन केलेच पाहिजे; पण त्याला केवळ धर्माची मान्यता आहे व विरोध नाही, धर्म कुटुंब नियोजनाला अनुकूल आहे यासाठी ते करता कामा नये, तर तो एक राष्ट्रीय कार्यक्रम आहे, यासाठी ते केले पाहिजे. आपल्या कुटुंबात प्रमाणापेक्षा जास्त बाढ झाल्याने आपण कोणाच्याच जीवनावश्यक गरजा पूर्ण करू शकत नाही; मुलांचे संगोपन, शिक्षण चांगल्या रीतीने करू शकत नाही. या दारिद्र्याला आळा घालण्यासाठी बुद्धिवादी दृष्टीकोनातूनच मुस्लीम समाजाने कुटुंब नियोजनाचा स्वीकार केला पाहिजे.

वजीर पटेल आणि कार्यकर्ते

या स्पर्धेच्या युगात आपली मुले, भावी पिढी आहार, आरोग्य इ. बाबतीत मागासलेली राहिली, तर या दुर्बल-सबलांच्या संघर्षात तिचा निभाव लागणे अशक्य होईल. कुटुंबच काय, पण सर्व समाजच दारिद्र्याच्या, अज्ञानाच्या प्रचंड दरीत कोसळल्याशिवाय राहणार नाही. सर्व जग इतके गतिमान झाले आहे, झपाट्याने पुढे निघाले आहे... प्रगतीच्या या स्पर्धेकडे दुर्लक्ष केले, 'प्रजोत्पादन' एवढेच जीवितकार्य समजून त्या उद्योगाला मुस्लीम समाज लागला, तर तो रसातळाला गेल्याशिवाय राहणार नाही. याची लक्षणे थोड्याफार प्रमाणात आजच दिसत आहेत. मुस्लीम समाज शैक्षणिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या किती मागासलेला आहे, हे आता आपण पाहत आहोत. याचाही विचार मुस्लीम समाजाने केला पाहिजे. अर्थात, मुस्लीम समाजाच्या मागासलेपणाची इतरही कारणे असू शकतील; पण कुटुंब नियोजनाला विरोध करून प्रमाणापेक्षा जास्त प्रजोत्पादन होणे, हेही फार महत्त्वाचे कारण आहे. अशा या मागासलेल्या मुस्लीम समाजाला जर स्पर्धेत टिकून राहायचे असेल, त्याला इतर पुढारलेल्या समाजांबरोबर यायचे असेल, निदान आपले कौटुंबिक हित का होईना साधायचे असेल, तर त्याने आपल्या मुलाबाळांचा शैक्षणिक, बौद्धिक व आरोग्यविषयक दर्जा उंचवला पाहिजे. कुटुंबाच्या भरमसाट वाढीने असा दर्जा उंचावणे शक्यच नाही, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. त्यासाठी त्याला आपल्या जनन-प्रवृत्तीला आळा घातलाच पाहिजे.

काही मुल्ला-मौलवी व जातीयवादी पुढारी 'मुस्लिमांची लोकसंख्या वाढावी', 'इस्लामचे

अनुयायी वाढावेत', असाही प्रचार करीत असतात. अर्थातच तसे उघड बोलताना ते सहसा दिसत नाहीत. कारण त्यामुळे त्यांच्यावर जातीयवादाचा आरोप येईल, असे त्यांना वाटते; पण काही जण तसेही धाडस करायला कमी करत नाहीत. कुटुंब नियोजनाला विरोध करण्यात येतो; पण मुस्लीम बांधवांनी त्या प्रचाराला बळी पडू नये. कारण निव्वळ संख्येने जास्त; पण दुर्बल, अज्ञानी, मागासलेला, रोगट असा अनुयायी वर्ग इस्लामचे काय भले करू शकेल, याचा मुस्लीम समाजाने विचार करावा. मागासलेला समाज व दुर्बल असलेली पिढी आपल्या कुटुंबाचे व देशाचे निश्चितच नुकसान करील. असा बलहीन समाज देशाच्या प्रगतीमध्ये धोंड बनल्याशिवाय राहणार नाही व अशी मुले आपल्या कौटुंबिक जीवनातही अयशस्वीच ठरतील, ही खात्री असू द्या.

जननप्रमाण वाढल्याने कायम स्वरूपी लोकसंख्यावाढ होते. तज्ज्ञांच्या मते, हे अयोग्य आहे. कारण जननप्रमाण वाढल्याने लोकसंख्या वाढते; पण त्या लोकसंख्यावाढीबरोबर उत्पादनवाढ होत नाही. विशेषतः दरिद्री, अविकसित देशांत ती होत नाही. त्यांच्यात असलेला तोल ढळतो. त्यामुळे दारिद्र्य वाढते; समाजाचा ऱ्हास होतो; दुष्काळ, रोगराई, अज्ञान बोकाळते. हे सर्व अपुऱ्या उत्पादनवाढीमुळे होते. नंतर बालमृत्यू, दुष्काळ, दारिद्र्य, युद्धे हे सर्व जीवनकलह उद्भवता!

म्हणून जर आपल्याला शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेला, बुद्धीने उच्च प्रतीचा, आरोग्य संपन्न, आधुनिक जगातील स्पर्धेत उतरू शकेल असा समाज निर्माण करायचा असेल; संख्येच्या ऐवजी गुणांनी वाढलेला, जिवंतपणा व गुणांनी बहरलेला समाज हवा असेल, तर आपली मुले सदृढ व गुणसंपन्न होण्याकडे मुस्लिमांनी प्रथम लक्ष दिले पाहिजे; आपले कुटुंब मर्यादित ठेवून, मुलांच्या वाढीवर आळा घालूनच त्यांना हे साध्य करता येईल; मुलांची अमर्याद वाढ करून नव्हे. यासाठी दुसऱ्यांच्या चितेवर पोळी भाजणाऱ्या, आपल्या राजकीय व दिखाऊ धार्मिक स्वार्थाला बळी पडलेल्या, तसेच जातीयवादी राजकीय नेत्यांच्या व मुल्ला-मौलवींच्या धर्माच्या नावाने चाललेल्या हाकाटीला मुस्लीम समाजाने बळी न पडता आपली कुटुंबे मर्यादित ठेवावीत. यातच त्यांचे हित आहे व देशाचेही हित आहे. अमर्याद लोकसंख्यावाढीमुळे देशाच्या सर्व नियोजन-योजनाच धोक्यात आल्या आहेत आणि कोठल्याही पक्षाचे सरकार आले, तरी त्यांना हे मान्य करावेच लागेल.

कुटुंब नियोजनाचे महत्त्व मुस्लीम समाजाच्या लक्षात यावे म्हणून धर्मधोळ्या लोकांचे अज्ञान दूर करून त्यांना वास्तवाची जाणीव करून देण्यासाठी, म्हणजे प्रबोधनाद्वारे मंडळ कार्य करीत आहे. मुस्लीम व मुस्लीमेतर समाजांतील दांभिक व स्वार्थी लोकांविरुद्ध, समाजाच्या धर्मधोळेपणाचा फायदा घेऊन त्याला चुकीच्या मार्गाने नेणाऱ्यांविरुद्ध मंडळ कार्य करते. अशा सर्व प्रकारच्या लोकांविरुद्ध दंडशक्तीचा, म्हणजे कायद्याचा वापर झाला पाहिजे, असे मंडळाचे मत आहे. कायद्याने सक्ती करून कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम पार पाडावयास हवा. कारण त्याशिवाय तरणोपाय नाही. लोकसंख्यावाढीला आळा घातल्याशिवाय देशाची सर्वांगीण प्रगती शक्य नाही. तशा सर्वांगीण प्रगतीसाठी मुस्लीम समाजानेपण आपला वाटा उचलला पाहिजे. कुटुंब नियोजन करून त्यांनी आपल्या कुटुंबाचे, समाजाचे व पर्यायाने देशाचे हित साधण्यासाठी सहभागी

झाले पाहिजे. यानेच 'खऱ्या अर्थाने हा समाज राष्ट्रीय प्रवाहात सामील झाला' असे होईल.

वर्तमान परिस्थितीत असे लक्षात येते की, धर्म आणि धर्मांधता यांत फरक करण्याची क्षमता सर्वसामान्यांमध्ये नसते. त्या-त्या धर्मातील पुरोहित वर्ग विशिष्ट चालीरीती व परंपरा यांनाच धर्म मानतात व त्या परंपरा अंध पद्धतीने पाळत असतात. धर्माचा आणि धर्मांधतेचा फरक करण्याची चिकित्सक दृष्टी समाजमनात निर्माण केल्याशिवाय धर्माला अपेक्षित असणारा समाज उभा करता येणार नाही.

भारतातील मुस्लीम नेत्यांनी धर्माचा आधार घेत कुटुंब नियोजन व लोकसंख्या नियंत्रण यांच्या प्रचारास अडथळा आणला. इतर धर्मसमुदायांपेक्षा मुस्लीम समाजात लोकसंख्या नियंत्रणाची साधने कमी वापरली जातात आणि मुस्लीम समाजाची लोकसंख्या वाढत जात आहे. यामुळे भारतातील मुस्लिमांची संख्या वाढून ते हिंदू समाजापेक्षाही अधिक होतील, असा अपप्रचार मोठ्या प्रमाणात होत आहे. 'हम पाँच, हमारे पच्चीस'चे नारे देत मुस्लीम समाजाची बदनामी करण्याचे प्रयत्न सातत्याने झाले. याला उत्तर म्हणून संघपरिवारप्रणित हिंदुत्ववादी पुन्हा पुन्हा 'हिंदूंनी आपली संख्या वाढवायला पाहिजे', 'प्रत्येक महिलेने किमान चार मुलांना जन्म दिला पाहिजे', 'हम दो हमारे दस' असे वक्तव्य करतात व पुन्हा मुस्लिमांनाच या चर्चेच्या केंद्रस्थानी आणले जाते. मुस्लीम धर्मांधांच्या लोकसंख्या नियंत्रणास विरोध करण्याच्या भूमिकेचा हिंदुत्ववाद्यांनी पुरेपूर वापर करून मुस्लीमविरोधी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

सद्य:स्थितीमध्ये असे लक्षात येते की, मुस्लिमांमध्ये कुटुंब नियोजन वा लोकसंख्या नियंत्रण याबद्दल जागृती येऊन त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळतो आहे आणि मुस्लीम समाजातील जन्मदर कमी होत आहे. या बदललेल्या स्थितीकडे दुर्लक्ष करीत हिंदुत्ववादी पुन्हा पुन्हा हा विषय काढून धर्मद्वेष वाढवत आहेत. हिंदू नेत्यांच्या अशा प्रक्षोभक व बेताल वक्तव्यांना सामान्य हिंदू प्रतिसाद देत नाहीत किंवा मुलांना जन्म घालीत नाहीत. कारण सामान्य लोकांना तसे शहाणपण आहे. मुस्लीम समाजातसुद्धा आता बुद्धिजीवी वर्ग वाढलेला असल्याने धर्मवाद्यांकडून निघणाऱ्या फतव्यांना दाद दिली जात नाही. हे वातावरण स्वागतार्ह आहे.

कुटुंब नियोजनाचे फायदे लक्षात आल्याने हे परिवर्तन समाजात दिसत आहे. हा मुद्दा आता धर्मप्रभावाचा न राहता तो अज्ञान, निरक्षरता, शैक्षणिक व आर्थिक दुरवस्था आणि दारिद्र्य यांच्याशी जोडलेला आहे. त्यामुळे शैक्षणिक-आर्थिक प्रगती व दारिद्र्य निर्मूलनाचे प्रयत्न लोकसंख्या नियंत्रणासाठी अधिक उपयुक्त ठरणारे आहेत. या दृष्टीने नेत्यांनी व शासनाने पुढाकार घेतला पाहिजे.

शिकल्यासवरलेल्या मुस्लीम कुटुंबांतही 'एक मूल धोरण' आचरणात आणले जात आहे. याकडेही एक आदर्श म्हणून पाहणाऱ्यांची संख्या समाजात वाढत आहे. त्यामुळे चार दशकांपूर्वी असलेली स्थिती आज राहिलेली नाही. याचे आपण स्वागत करू व जेथे अज्ञान आहे, तेथे ते दूर करून समजावून सांगण्याचा अविरत प्रयत्न करण्याचा निर्धार कायम ठेवू.

२.८ उपसंहार

मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना का व कशी झाली याचा इतिहास, तसेच त्याने चालविलेले कार्य व आपल्या डोळ्यांपुढे ठेवलेल्या अनेक ध्येयांपैकी काही ध्येयांची त्रोटक माहिती आतापर्यंत दिली. ती ध्येये 'तत्कालीन व तातडीची गरज' म्हणूनच डोळ्यांसमोर ठेवली असल्याने मंडळाला अपेक्षित असलेल्या सुधारणांची मुस्लीम समाज व इतर नागरिक यांना कल्पना येते. याचा अर्थ असा नव्हे की, स्त्रियांचे हक्क, समान नागरी कायदा, कुटुंब नियोजन इ. कार्यक्रम मुस्लीम समाजाने मान्य केले, शासनाने तसे कायदे केले व तशा सुधारणा घडून आल्या म्हणजे मंडळाचे कार्य संपले. मंडळ ज्या ठळक, तातडीच्या सुधारणा मागत आहे, जसा समाज उभा करू इच्छित आहे, तशा सुधारणा घडून आल्या, म्हणजे मंडळाचे काम संपले, असे मानता येणार नाही. सुधारणांचा अर्थ असा मर्यादित करता येणार नाही. 'सुधारणा पदरात पडल्याबर जो थांबतो, तो खरा सुधारकच नव्हे' असा आगरकरी बाणा मंडळाने पत्करला असल्याने काही समस्या सोडवताना सुधारणा घडून आल्या, काही ध्येये साध्य झाली, तरी मंडळ थांबणे शक्य नाही. एक बदल घडून आला की दुसऱ्याची मागणी आणि त्यासाठी समाजमन तयार करणे, अनुकूल करणे, अधिकाधिक सुधारणा होण्यासाठी झगडत राहणे, एका नवसमाजाची उभारणी करणे हे मंडळाचे अंतिम ध्येय आहे. जोपर्यंत मानवी स्वभाव असाच राहणार आहे, जोपर्यंत त्याच्यातील हीन पशुवृत्तीही जागया राहणार आहेत, तोपर्यंत तो पूर्णत्वाला पोहोचणार नाही. एक सुसंस्कृत मानव म्हणून जगण्याची त्याची इच्छा तोपर्यंत अपूर्णच राहणार. हा फक्त काही व्यक्तींचा, केवळ मुस्लीम समाजाचा, फक्त या देशातील सर्व नागरिकांचा नव्हे, तर अखिल मानवजातीचाच प्रश्न आहे. म्हणूनच मंडळाने बाळगलेले ध्येय फक्त काही मुसलमानांपुरतेच मर्यादित नाही. त्याची व्याप्ती संपूर्ण मानवजातीलाच जाऊन भिडते.

या भूतलाबर जोपर्यंत मानवजात अस्तित्वात आहे, तोपर्यंत ती आपल्यापुढे नवीन नवीन समस्या निर्माण करणार. जगण्याच्या धडपडीतूनच समस्या निर्माण होत असतात. म्हणजेच या समस्या ही न संपणारी साखळी आहे. त्याचमुळे 'समस्यांबर उपाय' हीही न संपणारी धडपड बनते. त्या न संपणाऱ्या सुधारणा मंडळ मागत राहणार, असा त्याचा अर्थ आहे. मुस्लीम समाजापासून सुरुवात करून इतर समाजांतील, भिन्नभिन्न धर्मांतील सुधारणावादी कार्य करणारे व मंडळासारखेच ध्येय उराशी बाळगून त्यासाठी झटणारे काही लोक, तशाच स्वरूपाच्या संस्था असे सर्व एकत्र येऊन हे कार्य नेटाने करू शकतील. या पुस्तिकेत उल्लेखिलेल्या सुधारणा मुस्लीम समाजात घडून आल्या, तरी मंडळाचे काम बंद पडणार नाही. कारण जी गोष्ट मानवजातीलाच लागू पडते, तीच मुस्लिमांच्या बाबतीतही खरी आहे. प्रश्न आहे, त्या चुका सुधारण्यासाठी समस्यांची उकल करून त्या दूर करण्यासाठी कोठली साधने वापरणार, याचा... कोठला मार्ग चोखाळणार याचा... अर्थात पुढे निर्माण होणाऱ्या समस्यांबद्दल आत्ताच काही कल्पना येत नाही; पण समस्या जरी नेमक्या सांगता येत नसल्या, तरीही त्या समस्या दूर करता येतील, बदल

घडवून आणता येईल. त्यासाठी 'शुद्ध वैज्ञानिक दृष्टीकोन' हाच एकमेव उपाय अमलात आणता येईल व त्याद्वारेच प्रगती करता येईल. हे करण्यासाठी नवीन सामाजिक जाणिवेमधून धर्माची जळमटे बाजूला करूनच समस्येची उत्तरे शोधता येतील. हे कार्य कठीण आहे. त्यासाठी कितीतरी कालावधी जावा लागेल. ते अनेक पिढ्यांचे कार्य आहे. प्रबोधन, दृष्टीकोनात बदल, सुसंस्कृत समाजाची उभारणी, जाती, धर्म यांच्या भिंती नसलेला समाज उभा करणे हे सर्व काही ठराबीक दिवसांत घडून येणार नाही. त्याला काळाची मर्यादा घालता येणार नाही. हे सर्व घडून येण्यासाठी कोणाच्या रागलोभाची, मानापमानाची पर्वा करून चालणार नाही.

मुस्लीम समाजाने अमलात आणावयाच्या काही सुधारणांचा येथे निर्देश केला. त्याचबरोबर आणखीही एक बदल व्हावयास हवा. मुस्लिमांनी राष्ट्रवादी दृष्टीकोन स्वीकारावयास हवा. याचा अर्थ मुस्लीम समाज आता अराष्ट्रीय आहे असा नाही, तर मुस्लिमांना त्यांच्या धर्मातत्त्वात असणारी पॅन इस्लामिझमची कल्पना धुरळ घालीत असते. इतर कल्पनांप्रमाणेच तीसुद्धा धर्माचाच भाग आहे, असे मानणारे काही मुस्लीम महाभाग आहेत. त्यासाठी धर्माकडे बघण्याच्या समग्र दृष्टीकोनातच बदल करावा लागेल. धर्मनिरपेक्षतेप्रमाणेच 'राष्ट्रवाद' हा विचारसुद्धा आधुनिकच आहे आणि तो स्वीकारण्यासाठीसुद्धा धर्माची कवचकुंडले फोडूनच बाहेर पडावे लागते, हे काही पुन्हा सांगण्याची गरज नाही. यापुढे जाऊन असेही म्हणता येईल की, एक वेळ अशी यावी की, राष्ट्रवादसुद्धा त्याज्य ठरावा. माणसाला माणसापासून दूर ठेवण्याचा, आपसांत द्वेष, मत्सर, कलह, युद्धे व परिणामी मानवसंहार व नैतिक मूल्यांची पायमल्ली हे सर्व घडून आणण्यास कारणीभूत ठरणाऱ्या राष्ट्राराष्ट्रांच्या सीमा हव्यात तरी कशाला? त्यासुद्धा नकोशा वाटाव्यात.

न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांवर उभारलेला, अखिल जागतिक पातळीवरचा समाज उभारायला हवा. तो आदर्श आहे. म्हणजेच विश्वबंधुत्व हवे; पण हे विश्वबंधुत्व पॅन इस्लामिझमपेक्षा वेगळे आहे. पॅनइस्लामिझममध्ये नुसते मुस्लीम बंधुत्व आहे. त्यालाच मुस्लीम राजकारणी 'मुस्लीम ब्रदरहुड' असे म्हणतात. ते पुरेसे नाही, तर ते नकोही आहे. मुस्लीम ब्रदरहुडची कल्पना विश्वबंधुत्वाच्या आड येणारी आहे. आदर्शच बाळगायचा असेल, तर तो परिपूर्ण हवा. असा आदर्श समाज प्रत्यक्षात येण्यासाठीचे पहिले पाऊल म्हणून मंडळ मुस्लीम समाजाकडे पाहत आहे; एक सुसंस्कृत मुस्लीम समाज घडविण्याच्या दृष्टीने पावले टाकत आहे. त्यात मुस्लीम समाजाने – विशेषतः तरुणांनी येऊन या कामातला – आपला वाटा उचलावा, असे सर्वच मुस्लीम धर्मीयांना कळकळीचे आवाहन आहे.

मुस्लीम प्रश्नांवर, धर्मावर, राजकारणावर, इतिहासावर, समाजजीवनावर, कायद्यावर व इतरही अनेक बाबींवर जगातल्या अनेक तज्ज्ञांनी संशोधन केले आहे; अभ्यास करून, आपली लेखणी चालवून ग्रंथनिर्मिती केली आहे. त्यामुळे या विषयांवर अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. अधिक जिज्ञासूंनी अशी पुस्तके वाचावीत; वस्तुस्थिती समजून घ्यावी. त्यावर अभ्यासपूर्वक विचार करून मगच त्यांनी आपली मते निश्चित करावीत. मंडळाने बाळगलेल्या ध्येयाविषयी, मंडळ मुस्लीम समाजात करू इच्छिणाऱ्या सुधारणांविषयी जाणून घेण्याची इच्छा, जिज्ञासा

तरुणांमध्येही घडावी. 'मुस्लीम समाजातील काही लोक का होईना, धर्मग्रंथाबाहेरसुद्धा विचार करण्यासारखे बरेच आहे असे मानतात' असा त्याचा अर्थ होईल आणि बदलास चालना मिळेल.

आज असे लक्षात येते की, मुस्लीम सत्यशोधक मंडळाने गेल्या चार दशकांत प्राधान्यक्रमाने हाताळलेल्या विषयांमध्ये मुस्लीम महिलांचे प्रश्न, समान नागरी कायदा, भाषेचा प्रश्न, लोकसंख्या नियंत्रणाचा प्रश्न आणि जमातवादी राजकारणाचा प्रश्न यांचा समावेश होता. या प्रश्नांपैकी भाषेचा प्रश्न आणि लोकसंख्या नियंत्रण या संदर्भात आज स्थिती बदललेली आहे. मात्र अन्य विषय अद्याप जागचे हललेले दिसत नाहीत; पण या प्रश्नांबर विचार करणारी, संघर्ष करणारी माणसे व संघटना कार्यरत झाल्या आहेत. काही प्रमाणात या संघटनांची भूमिका व कार्य पद्धती यांबद्दल मतभेद आहेत; तरीही प्रश्न घेऊन संघर्ष करणाऱ्या मुस्लीम महिला संघटना आणि इतर पुरोगामी संघटनांचे मंडळ स्वागत करते. मुस्लीम समाजाचे सर्वच प्रश्न मंडळ हाती घेऊ शकत नाही; पण ज्या-ज्या संघटना विविधांगी ऐहिक प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करतात, त्यांच्या प्रति आम्ही आस्था बाळगतो. मुस्लीम समाजाप्रमाणेच समस्त भारतीय समाजाचे म्हणून अनेक प्रश्न आहेत. पर्यावरण, भ्रष्टाचार, असुरक्षितता, समाजस्वास्थ्य या प्रश्नांबर कार्य करणाऱ्या संघटनांसोबत आम्ही आहोतच.

या प्रश्नांबरोबरच काही प्रश्नांची भरही पडलेली आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय दहशतवाद, भारतातील दहशतवाद, शैक्षणिक-आर्थिक मागासलेपणा आणि मुस्लीम समाजाविषयी संशय, असुरक्षितता-विषमता यांत वाढ होत आहे. या दृष्टीकोनातूनही कार्य करीत असताना मुस्लीम जमातवादाबरोबरच हिंदू जमातवादाविरोधात संघर्ष करणे अपरिहार्य झाले आहे. कारण एकात्म धर्मनिरपेक्ष समाजासाठी ती गरज आहे. प्रबोधनाबरोबरच विकास आणि कल्याणासाठी दृष्टी निर्माण करण्याचे कार्यही महत्त्वपूर्ण आहे. हे लक्षात घेऊन मंडळ आपल्या ध्येयसिद्धीकडे वाटचाल करीत आहे.

३. उपक्रम, बातम्या आणि घडामोडी

३.१ मंडळाच्या पहिल्या दशकातील ठळक घटना

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेपासून ते मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांच्या निधनानंतरची दोन वर्षं या मंडळाच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटना, कार्यक्रम आणि उपक्रम, यांचा आढावा येथे घेण्यात आला आहे. मुस्लीम सत्यशोधक चळवळीच्या उण्यापुऱ्या एक ते दीड दशकाच्या वाटचालीचा हा इतिहास आहे.

२२ मार्च १९७० या दिवशी हमीद दलवाईंच्या नेतृत्वाखाली मंडळ स्थापन होत असताना सुमारे १०० पुरोगामी मंडळी वाजत गाजत 'साधना' कार्यालयातील आंतरभारती सभागृहात जमली आणि तिथे गुरुवर्य बाबुराव जगताप यांच्या अध्यक्षतेखाली व यास्मिन लुकमानी यांच्या हस्ते उद्घाटन होऊन मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली. मंडळाचा जाहीरनामा व घटना या बाबी या वेळी हमीद दलवाईंनी प्रसारित केल्या. 'भारतीय मुस्लीम समाजात प्रबोधनाचे आंदोलन चालविणे' हे मंडळाचे उद्दिष्ट असल्याचे घटनेद्वारे जाहीर करण्यात आले.

७ मे १९७० रोजी पुण्यात शिवजयंतीची मिरवणूक काढण्यात आली. शिवाजी महाराज संत तुकाराम महाराजांचे दर्शन घेत असल्याचे, तसेच अफझलखान-वधाचे देखावे या मिरवणुकीत होते. हिंदू बांधवांनी काढलेल्या या मिरवणुकीचे मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे हमजे खान चौकात स्वागत करण्यात आले. मंडळाचे सचिव सय्यदभाई यांनी शिवप्रतिमेला हार घातला. मंडळाचे कार्यकर्ते या मिरवणुकीत सहभागी झाले होते.

स्थापनेनंतर कार्यकर्त्यांचा हा चमू ठिकठीकाणी जोमाने कामास लागला. या कामाला संघटित कार्यक्रमाचे स्वरूप आणण्यासाठी १९७० सालच्या २८ नोव्हेंबरला, महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनी, पुण्याच्या नेहरू मेमोरियल हॉलमध्ये मुस्लीम सत्यशोधक मंडळ व इंडियन सेक्युलर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'अखिल महाराष्ट्र मुस्लीम परिषद' घेण्यात आली. बेळगांव, कोल्हापूर, अमरावती, इंदोर, त्रिवेन्द्रम येथून सुमारे २०० प्रतिनिधी या परिषदेस हजर राहिले.

यांतील ५६ मुस्लीम प्रतिनिधींमध्ये १२ स्त्री-प्रतिनिधी होत्या. हमीद दलवाईंनी अध्यक्ष स्थानावरून प्रतिनिधींना मार्गदर्शन केले.

या परिषदेत कामाविषयी स्पष्टता लाभलेले कार्यकर्ते आपापल्या गावी गेले आणि स्थानिक पातळीवर कामास लागले. यांतून कोल्हापूर, मुंबई, श्रीगोंदा (अहमदनगर), सोलापूर, सातारा, पंढरपूर, फलटण, अमरावती, चिपळूण, निपाणी, इचलकरंजी, अलिबाग येथे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थानिक शाखा स्थापन होत गेल्या. पुण्यातील कार्यकर्ते स्थापनेपासूनच पुणे भागात कामास लागले होते.

मुस्लीम सत्यशोधक चळवळ राष्ट्रीय पातळीवर नेण्याचा ध्यास हमीद दलवाईंनी सुरुवातीपासूनच घेतला होता. त्याचाच एक परिणाम म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळ व इंडियन सेक्युलर सोसायटीच्या वतीने १९७१च्या डिसेंबर महिन्यात नवी दिल्ली येथे 'ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लिम्स' आयोजित करण्यात आली. संपूर्ण भारतातून व बांग्लादेशातून सुमारे १०० प्रतिनिधी या परिषदेस उपस्थित राहिले. एकट्या महाराष्ट्र राज्यातूनच ५० प्रतिनिधी परिषदेत सहभागी झाले. हमीद दलवाईंच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या कॉन्फरन्सचे संचालन प्रा. अ. भि. शहांनी केले. बांग्लादेशातून आलेले प्रतिनिधी मेहबूब उल हक यांचे मुख्य भाषण ठेवण्यात आले होते. समान नागरी कायद्याची मागणी, कुटुंब नियोजन-प्रसारास पाठिंबा व प्रोत्साहन, बांग्लादेशाला मान्यता इत्यादी विषयांवर परिषदेने चर्चा करून ठराव संमत केले.

लगेचच २७-२८ डिसेंबर १९७१ रोजी पुण्यात मंडळाने इंडियन सेक्युलर सोसायटीच्या सहकार्याने 'मुस्लीम महिला परिषद' भरवली. महाराष्ट्राशिवाय अहमदाबाद, दिल्ली, कोलकाता येथील सुमारे १७६ महिला परिषदेस उपस्थित होत्या. पुण्याच्या वाकडेवाडी उपनगरातील जमातीने दमदाटी केल्याने काही महिला येऊ शकल्या नव्हत्या. मुस्लीम स्त्रियांना समान हक्क, द्विभार्या प्रतिबंध, जुबानी तलाक इत्यादी विषयावर महिलांनी चर्चा केली व ठराव संमत केले. शरीफा तैय्यबजी यांनी या परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविले. हमीद दलवाईंसह मंडळाचे कार्यकर्ते हजर होतेच, पण आदरणीय एस. एम. जोशी, हरिभाऊ पराजपे दोन्ही दिवस हजर होते.

या परिषदेविषयी दोन गोष्टी नमूद करणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे, मुस्लीम स्त्रियांनी एकत्र येऊन आपल्या हक्कांची मागणी केलेली ही जगातील पहिली परिषद होती. दुसरी गोष्ट म्हणजे, ज्या वाकडेवाडी जमातीने परिषदेवर बहिष्कार घालून कडवा विरोध दर्शविला, त्या जमातीने अलीकडे, १९८५ साली जेव्हा 'जमात उल मुस्लिमिन, वाकडेवाडी' हा ट्रस्ट स्थापन केला, तेव्हा मंडळाचे स्थापनेपासूनचे कार्यकर्ते सय्यदभाई यांना त्या ट्रस्टचे सदस्य नियुक्त केले.

मंडळाच्या उपक्रमांविषयी जाहीर संघटित कार्यक्रमातून माहिती देण्याचा सुरुवातीचा प्रयत्न झाल्यानंतर हमीद दलवाई व पुण्यातील कार्यकर्त्यांनी एक वेगळाच उपक्रम हाती घेतला. मुस्लीम समाजातील नेत्यांना भेटून त्यांच्याशी चर्चा करणे बाजूला ठेवून प्रत्यक्ष सामान्य मुसलमानांना आपले विचार पटविण्यासाठी व चर्चा करण्यासाठी त्यांनी पुणे शहरात घरोघरी संपर्क मोहीम चालू केली. पुण्यातील मोमीनपुरा या मुस्लीम बहुसंख्य वस्तीत हे काम करत असताना गैरसमजाने पछाडलेल्या काही जात्यंध मुस्लिमांनी हमीदभाई व इतर कार्यकर्त्यांवर हल्ला केला. या हल्ल्याची

दखल महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी अग्रलेख लिहून व तपशीलवार वृत्त देऊन तर घेतलीच, पण पुणे महापालिकेतही यावर चर्चा झाली. पण मंडळाच्या कार्यकर्त्यांवर या हल्ल्याचा परिणाम उलट झाला. आपले कार्य किती कठीण आहे, हे लक्षात आल्याने ते जास्त नेटाने कामास लागले.

१९७३ च्या जानेवारी महिन्यात 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' या मंडळाच्या मुखपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला. हमीद दलवाई हे त्याचे संपादक व हुसेन जमादार कार्यकारी संपादक होते. मंडळ व त्याचे कामकाज या विषयी कार्यकर्ते, हितचिंतक व सामान्य हिंदू-मुसलमान यांना अधिकृत माहिती देण्यासाठी या पत्रिकेचा मंडळाच्या उमेदीच्या काळात उपयोग झाला.

कार्यक्रमांचा वेगळेपणा हे तर मंडळाचे एक वैशिष्ट्यच मानावे लागेल. १९७३ च्या जानेवारीत 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड' या सनातनी मुस्लिमांच्या संघटनेने समान नागरी कायद्यास विरोध करणारी एक परिषद भरवली होती. तेथे दहा हजार प्रतिनिधी उपस्थित होते. त्या परिषदेच्या विरोधात त्याच ठिकाणी हमीद दलवाई, मंडळाचे इतर कार्यकर्ते आणि युक्रांदचे कार्यकर्ते यांनी निषेधात्मक निदर्शने करण्याचे जीवघेणे धाडस केले. महाराष्ट्रभर या घटनेचा प्रसार माध्यमांतून गवगवा झाला.

जातीयवाद्यांच्या या परिषदेला आव्हान देण्यासाठी ११ मार्च १९७३ या दिवशी मराठा मंदिर, मुंबई येथे मंडळाने 'महाराष्ट्र मुस्लीम सामाजिक परिषद' भरविली. नेहमीप्रमाणे इंडियन सेक्युलर सोसायटीचे सहकार्य होतेच. पुणे, मुंबई, मुंबई उपनगरे, कोल्हापूर, निपाणी, आजरा, सांगली, सोलापूर, अमरावती, नागपूर, अहमदनगर, वर्धा, फलटण, चिपळूण, सासवड, भिवंडी, पालघर, गुलबर्गा, श्रीगोंदा, इत्यादी ठिकाणांहून सुमारे ३०० प्रतिनिधी परिषदेस हजर होते. त्यांत ५० महिलांचा समावेश होता. प्रा. असफ ए. ए. फैजी, अ. भि. शहा, डॉ. मोईन शाकीर आदींनी प्रतिनिधींना मार्गदर्शन केले. मुस्लीम स्त्रियांना समान हक्कांची कायदेशीर व्यवस्था; मुस्लिमांचे शिक्षण मातृभाषेतून व्हावे, समान नागरी कायदा इत्यादी विषयांवर चर्चा होऊन मागण्या करणारे ठराव झाले. 'ब्लॅक डिसेंबर' या जात्यंध दहशतवादी मुस्लिमांच्या संघटनेने 'मराठा मंदिर हे परिषदेचे ठिकाण उडवून देऊ' अशी धमकी दिली होती, पण परिषदेवर त्याचा परिणाम झाला नाही. मुंबई पोलिसांनी योग्य ती काळजी घेतली आणि सहकार्य केले.

मुस्लीम स्त्रीच्या पोटगीविषयी एक महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने या काळात घेतला. फौजदारी कायद्याच्या १२५ कलमाखाली घटस्फोटित स्त्रीला पोटगी मिळू शकत असे. या कलमात दुरुस्ती होऊन मुस्लीम तलाकपीडितेचा त्यात अंतर्भाव झाला. त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी १९७३च्या १ एप्रिलपासून सुरू झाली. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने या निर्णयाचे स्वागत केले आणि मुस्लीम तलाकपीडित महिलांना कायद्याने पोटगी मिळवून देण्याचा प्रश्न मंडळाने हाती घेतला. ठिकठिकाणी तलाकपीडित स्त्रियांसाठी मोफत कायदेविषयक सल्ला केंद्रे सुरू झाली आणि मंडळाने आपल्या समाजपरिवर्तनाच्या कामाला विधायक कार्याची जोड दिली.

यानंतर मंडळातर्फे सोसायटीच्या सहकार्याने कोल्हापूरच्या केशवराव भोसले नाट्यगृहात 'मुस्लीम शिक्षणपरिषद' ३० व ३१ डिसेंबर १९७३ रोजी घेण्यात आली. परिषदेचे उद्घाटन प्रा. अ. भि. शहा यांनी केले व हमीद दलवाई अध्यक्ष होते. याशिवाय अण्णासाहेब सहस्रबुद्धे, प्रा.

ना. गो. कालेलकर, एस. एम. जोशी आदींनी परिषदेत मार्गदर्शन केले. परभणी, जळगाव, उस्मानाबाद, नाशिक, बीड, ठाणे, कुलाबा, धुळे, चंद्रपूर, रत्नागिरी, चिपळूण, कणकवली, मनमाड, श्रीगोंदा, अहमदनगर, अमरावती, पंढरपूर, सोलापूर, सांगली, सातारा, कराड, पुणे, मुंबई, आजरा, अकोळ, निपाणी, कोल्हापूर आदी ठिकाणांहून सुमारे ८०० मुस्लीम प्रतिनिधी या परिषदेला हजर होते. त्यांपैकी सुमारे २५० स्त्रिया होत्या.

'शिक्षणाचे माध्यम म्हणून उर्दूऐवजी प्रादेशिक भाषेचा अंगीकार', ' 'वक्फ' संस्था सरकारने धर्मनिरपेक्ष संस्थांच्या ताब्यात द्याव्या व 'मुस्लिमांचा विकास – विशेषतः शैक्षणिक विकास – साधण्यासाठी त्याचा विनियोग करावा', 'माध्यमिकपर्यंतच्या मोफत शिक्षणाची सोय व मोफत उच्च शिक्षणासाठीची पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा १२००/- रु.वरून ५०००/- रु.पर्यंत न्यावी' : 'मदरसा पद्धतीच्या शिक्षणाचे आधुनिकीकरण' इत्यादी विषयांवर चर्चा व ठराव अशा बाबी झाल्या. श्रीमती गुलाब बानू बंजवाणी, मुख्तार अहमद, नझिर अली सुलेमान पठाण, एस. इ. तांबोळी, शेख शब्बीर, एम. एस. बेग, प्रा. के. जी. पठाण, पीरजादे, प्राचार्य ए. डी. अत्तार, मोईयुद्दीन शेख, ए. जी. खान, जनाब लसणे गुरूजी, जी. बी. तांबोळी, ए. के. शेख, म. बा. पठाण, अब्बास तांबोळी, शायरखान साहेब, इत्यादी परिषदेत सहभागी झाले होते. या परिषदेस उपस्थित राहण्यासाठी मंडळाचा सभासद असण्याची अट नव्हती व 'मुस्लिमांच्या शिक्षणाविषयी आस्था असणाऱ्या मुस्लिमांनी परिषदेस यावे' असे जाहीर आवाहन मंडळाने केले होते. त्यामुळे मंडळाच्या कार्यकर्त्यांशिवाय या आवाहनास प्रतिसाद देऊन पहिल्यांदाच आलेली वरील मंडळी चर्चेत सहभागी झाली होती.

दिनांक ९ जून १९७४ रोजी चिपळूण येथे मुस्लीम महिलांचा मेळावा तणावाच्या वातावरणात पार पडला. मेळाव्याला सुमारे ९० मुस्लीम महिला उपस्थित होत्या. हा मेळावा होऊ नये म्हणून चिपळूण येथील काही सनातनी मंडळींनी निदर्शने केली, रस्ते अडविले आणि धमक्या दिल्या. आदल्या रात्री या मंडळींनी मिरजोळी येथील दलवाईंच्या राहत्या घरावर मध्यरात्री दोन ट्रक व जीप्समधून मोठ्या संख्येने येऊन दंगा केला व दलवाईंच्या गाडीची मोडतोड केली. पण या सगळ्याला न जुमानता मेळावा पार पडला. विरोधी निदर्शनामुळे काही महिला येऊ शकल्या नाहीत. मेळाव्याचे उद्घाटन डॉ. शमीम अत्तार यांनी केले. अध्यक्षस्थानी मेहेरुन्निसा दलवाई होत्या. समान नागरी कायदा करण्यासाठी सरकारकडे मागणी करण्यात आली. शेवटी स्थानिक मुस्लीम भगिनींची एक समिती नेमण्यात आली. या समितीतर्फे मुस्लीम महिलांमध्ये मंडळाचा प्रसार करण्याचे ठरले.

१९७४ ते १९७७ या काळात बव्हंश काळ दलवाई अधूनमधून आजारीच होते. या आजारपणाच्या काळात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी तलाकच्या प्रश्नावर ठिकठिकाणी 'जिहाद-ए-तलाक परिषदा' घेऊन यशस्वी केल्या. दलवाईंना याचे फार समाधान वाटले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने मुस्लीम स्त्रीचे हक्क, समान नागरी कायदा, तलाकचा प्रश्न यांवर भरघोस कार्यक्रम घेतले.

३ मे १९७७ या दिवशी हमीद दलवाईंचा मृत्यू झाला. मुस्लीम सत्यशोधक मंडळ एका अर्थाने

नेतृत्वहीन झाले. मुस्लीम प्रबोधन चळवळीसाठी ही घटना नुकसानकारक होती. नंतरच्या काळात मंडळाने सामुदायिक नेतृत्व स्वीकारले.

१९७८ साली अलीगढ दंगलीनिमित्त मेहेरून्निसा दलवाई, महंमद दलवाई व हुसेन जमादार यांनी मंडळातर्फे पाहणी दौरा केला. त्यावर त्यांनी नंतर लेखनही केले. अलीगढ शहरात जातीयवाद्यांचा सुळसुळाट झाल्याने धर्मनिरपेक्ष प्रवाहांचा अत्यंत अभाव जाणवला. विद्यापीठामुळे या शहरात काही वेगळ्या समस्या उभ्या राहिल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यात शहराचे दोन भाग दिसले. एका भागात सनातनी, शिक्षित मुसलमान व दुसऱ्या भागात व्यवहारी, मेहनती मुसलमान असे चित्र होते. या शहरावर त्या काळात बीस वर्षे नगरपालिकेवर कुठलाही लोकप्रतिनिधी नसून प्रशासक होता, ही एक बाबच या शहारातील जातीय तणावावर पुरेसे भाष्य करते.

३. २ मंडळातर्फे घेण्यात आलेले जनजागृतीचे कार्यक्रम

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याची सुरुवात 'स्त्री-दास्यमुक्ती' या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेऊन केलेली आहे. भारतीय समाज प्रबोधनाच्या चळवळींनी आणि सुधारकांनीही आपले कार्य स्त्री-दास्यमुक्तीच्या कार्यातून सुरू केलेले आढळून येते. 'स्वातंत्र्योत्तर धर्मनिरपेक्ष भारतामध्ये समान नागरी कायदा अस्तित्वात यावा' अशी संविधानकर्ते आणि उदारमतवादी नेतृत्व यांची इच्छा होती. तथापि धार्मिक नेते आणि धर्मवादी राजकारण करणारे सर्वधर्मीय नेते यांनी समान नागरी कायद्यास विरोध केला. त्यामुळे समान नागरी कायदा राज्याघटनेच्या भाग चारमध्ये, म्हणजेच मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाविष्ट करण्यात आला. योग्य परिस्थिती निर्माण होताच आणि समाजातून मागणी झाल्यानंतर समान नागरी कायदा अस्तित्वात आणण्याची तरतूद मांडण्यात आली आणि भिन्न धर्मीय समुदायासाठी त्या-त्या धर्माचे स्वातंत्र्यपूर्व काळातील धर्माधिष्ठित व्यक्तिगत कायदे स्वातंत्र्योत्तर काळातही कार्यरत ठेवण्यात आले. हिंदू धर्मीयांसाठी असलेल्या कायद्यामध्ये महिलांच्या बाबतीत विषमता आणि अन्यायकारक तरतुदी काढून टाकून समतेवर आधारित असे 'हिंदू कोड बिल' १९५५ मध्ये मांडण्यात आले. हिंदू धर्मवाद्यांनी या कायद्यास विरोध केला. मात्र तरीही हिंदू कोड बिल अस्तित्वात आले. याच पद्धतीने शीख, ख्रिश्चन, पारशी समुदायातील व्यक्तिगत कायद्यांत वेळोवेळी सुधारणा करून अन्यायाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न झाला. मात्र मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात कोणत्याही प्रकारची सुधारणा करण्यात आली नाही. मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील तोंडी-एकतर्फी तलाक, बहुपत्नीत्व, हलाला, मूल दत्तक घेण्यावर बंदी यांसारख्या तरतुदींमुळे मुस्लीम महिलांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होऊन या महिला संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांपासून वंचित राहिल्या. तरीही या महिला आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध खुल्या पद्धतीने व्यक्त होत नव्हत्या. व्यक्तिगत कायद्यातील अन्यायकारक तरतुदी, पुरुषप्रधान मानसिकता आणि मुल्ला-मौलवी अशा पुरोहित वर्गाचे वर्चस्व असल्यामुळे एक प्रकारची मूक मानसिक गुलामगिरी सहन करण्यापलीकडे महिलांना पर्याय नव्हता. अशा महिलांना एक आवाज देण्याचे कार्य मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेच्या निमित्ताने झाले. म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळाने तोंडी-एकतर्फी तलाक पद्धत रद्द करण्याची मागणी करण्यासाठी स्वाक्षरी मोहीम सुरू केली. तीन वेळा 'तलाक' हा शब्द उच्चारून स्त्रीला सोडता येते, या अर्थाच्या हक्काचा पुरुषाकडून गैरवापर झाल्याची अनेक उदाहरणे समाजात घडतात आणि ही पद्धत चुकीची आहे, याची जाणीवही बऱ्याच कुटुंबवत्सल मुस्लिमांना आहे. हे लक्षात घेऊन मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे सर्वप्रथम स्वाक्षरी मोहीम हाती घेण्यात आली. मुस्लीम नागरिकांचे आणि विशेषतः स्त्रियांच्या सह्या जमविण्याचे कार्य मंडळाने केले आणि त्याचे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना देण्याचे ठरविण्यात आले.

तलाक आणि इतर अन्यायकारक तरतुदी रद्द करण्यासाठी आणि समान नागरी कायदा

अस्तित्वात आणण्याची मागणी करण्यासाठी इंडियन सेक्युलर सोसायटी आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांनी १२५ महिलांच्या सह्यांचा समावेश असलेले ५०० सह्यांचे निवेदन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना १० एप्रिल १९७० रोजी दिले. या निवेदनाची प्रत तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनादेखील पाठवण्यात आली. मुख्यमंत्र्यांना भेटण्यास गेलेल्या शिष्टमंडळाचे नेतृत्व हमीद दलवाई आणि प्रा. अ. भि. शाह यांनी केले. या शिष्टमंडळात जाबिर अली, श्रीमती जुबेदा बिबजी (मुंबई), हुसेन जमादार (कोल्हापूर) प्रा. यास्मिन लुक्मानी (मुंबई), प्रा. कुलसूम पारेख (मुंबई), सय्यदभाई, ए. जे. शेख, श्रीमती ए. जे. शेख, मकबूल तांबोळी, श्रीमती अख्तर सय्यद (पुणे) आणि इतर कार्यकर्ते यांचा समावेश होता. तसेच, या शिष्टमंडळासमवेत डॉ. बापूसाहेब काळदाते (स. स. प.), रामभाऊ म्हाळगी (जनसंघ), शी. रा. पाटकर (स. काँग्रेस), राम महाडिक (प्र. स. प.), डॉ. चौधरी (कम्यु.), शरद पवार (सत्ता. काँग्रेस) आदी विधानसभेचे प्रमुख सभासद हजर होते. या नेत्यांनी निवेदनाला आपला पाठिंबा असल्याचे सांगितले. या शिष्टमंडळाचे वसंतराव दादा पाटील यांनी स्वागत केले. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी शिष्टमंडळाच्या उपक्रमाची स्तुती केली. सादर केलेल्या निवेदनाचा अभ्यास करून मंडळास चर्चेसाठी पुन्हा बोलवणार असल्याचे आश्वासन दिले गेले. तसेच मंडळाच्या कार्यास शुभेच्छा दिल्या गेल्या. तोंडी तलाक पद्धत बंद व्हावी, भारतीयांना समान नागरी कायदा असावा, मुस्लीम धार्मिक ग्रंथांची शिकवण इतर भाषांतूनही असावी, अशा तऱ्हेच्या सुधारणांसाठी मुस्लिमांचे जनमत तयार करण्याचे कार्य मंडळाने हाती घेतले असून त्यासाठी सह्यांची मोहीम सुरू केल्याचे या प्रसंगी शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांना सांगितले.

'स्वातंत्र्यानंतर २० वर्षे लोटली, तरी पोथीनिष्ठ धर्माच्या पायावर आधारलेल्या कायद्यामुळे अनेक भारतीय महिलांना आज विषमतेची वागणूक सोसावी लागत आहे. ही परिस्थिती नष्ट व्हावी' असे या निवेदनात म्हटले होते. 'सामाजिक तत्त्वज्ञान व नैतिक दृष्टीकोन यांच्याशी कायदा सुसंगत असेल, तरच तो सामाजिक न्यायाचे प्रभावी हत्यार ठरतो. म्हणून समान नागरी कायद्याची गरज आहे' असे प्रतिपादन या निवेदनात केले असून 'समान नागरी कायदा हा केंद्र सरकारचा विषय आहे, असे सांगून राज्य सरकारने आपली जबाबदारी टाळू नये' असा इशारा देतानाच 'द्विभार्या प्रतिबंधाची तरतूद, घटस्फोटित व परितक्त्या स्त्रियांना पोटगी मिळण्याची तरतूद राज्य सरकारला करता येईल' असेही या निवेदनात स्पष्ट केले होते.

'महाराष्ट्रात समान नागरी कायद्याचा शुभारंभ करावा' अशी मागणी करणारे 'मुस्लीम सत्यशोधक' हे पहिले संघटन आहे. समान नागरी कायद्याची मागणी माजी न्यायाधीश आणि माजी केंद्रीय शिक्षण मंत्री बॅ. एम. सी. छगला यांच्यासारख्या विचारवंत मुस्लिमांनी जाहीरपणे अनेक प्रसंगी केली आहे. 'आपल्या देशात समान फौजदारी कायदा लागू आहे. तसेच इतर सर्व कायदे धर्म, पंथ, जात, भाषा यांचा विचार न करता अमलात आणले जातात. आपली राज्यघटना सेक्युलर असल्याचे आपण मोठ्या अभिमानाने सांगतो. मग सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा का नसावा? अशा कायद्याच्या बाबतीत धर्माचा बाऊ करून अडथळा आणणारे लोकशाहीचे व समतेचे शत्रू आहेत, असे समजले पाहिजे. महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांचे

नेहमीच स्वागत झाले आहे. महाराष्ट्र शासनाने समान नागरी कायद्याच्या बाबतीत पुढाकार घेऊन सुधारक महाराष्ट्राचा लौकिक वाढवला पाहिजे' अशी भूमिका मंडळाकडून घेण्यात आली.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने हाती घेतलेल्या या मोहिमेची नोंद देशपातळीवर घेण्यात आली आणि भारतातील विविध ठिकाणांहून नामवंत व्यक्ती आणि संस्था यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यास पाठिंबा दर्शविला. तत्कालीन केंद्रीय बीज व पाणीपुरवठा उपमंत्री सिद्धेश्वर प्रसाद यांनी पत्र पाठवून मंडळाच्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले. पत्रात त्यांनी म्हटले आहे की, 'सत्य एकच आहे – लोकांमधील अंधश्रद्धा व भ्रम दूर करण्यासाठी आपण आरंभिलेल्या कार्यात आपण यशस्वी व्हाल.' मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा प्रभाव गुरगाव येथेही जाणवला. ३० मार्च १९७० रोजी गुरगाव येथील मुस्लीम भगिनींनी मुस्लीम व्यक्तिगत कायद्यास विरोध दर्शवत बुरखा फेकून रस्त्यावर संचार केला. कौटुंबिक जीवन व बहुपत्नीत्वाला मोकळीक या मुस्लीम कायद्यातील तरतुदींविरुद्ध मेवात येथील मुस्लीम भगिनींनी बंडाचा झेंडा उभारला. या प्रश्नाची तड लावून घेण्यासाठी मुस्लीम खासदार आणि मंत्र्यांची भेट घ्यावी लागणार होती. म्हणून सात सभासदांची समिती स्थापन करण्यात आली. 'कायद्यासंदर्भात मुस्लीम व बिगर मुस्लीम स्त्रियांमध्ये भेदभाव असू नये' अशी भूमिका या समितीने घेतली. मुस्लीम कायद्यातील अशा तरतुदींमुळे मुस्लीम स्त्रियांचे सामाजिक स्थान आणखी खालच्या स्तरावर घसरल्याची व घरगुती जीवन हालअपेष्टांचे झाल्याची समितीने कैफियत मांडली. या महिलांनी आयोजित केलेल्या सभेत १०० मुस्लीम महिलांनी बुरखे फेकून रस्त्यावरून संचार केला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या या आरंभीच्या उपक्रमाची माहिती वर्तमानपत्रातून महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर पसरली. मुस्लीम समाजातील धर्मवादी नेतृत्वाने मंडळाकडे शत्रूभावाने पाहिले. मात्र सर्वसामान्य जनतेमधून यास सकारात्मक पाठिंबाही देण्यात आला. उदाहरणार्थ, पुणे जिल्ह्यातील सासवड येथील दर्गाह मशिदीत मे १९७०मध्ये करम अली उर्स पार पडला. या कार्यक्रमाला गावातील सुमारे २०० मुस्लीम उपस्थित होते. या कार्यक्रमातील धार्मिक भाग संपल्यानंतर त्याचे छोट्या सभेत रूपांतर झाले. मुस्लीम समाजात नव्यानेच निघालेल्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाची माहिती सांगणारी अब्दुलभाई नगारजी, अहमद स. बागवान, हिराबजीभाई बागवान यांची भाषणे झाली आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाची तालुक्यात शाखा सुरू करून, मुस्लीम समाजाला एकत्र आणून मंडळाचे कार्य करण्याचा ठराव करण्यात आला.

३.३ मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना
(केसरी – २१ फेब्रुवारी १९७०, संपादकीय)

देशातील एकात्मतेचा विचार बलवत्तर करण्यासाठी भारतातील मुस्लीम समाजाला मार्गदर्शन करणारे 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' पुणे येथील बैठकीत स्थापन करण्यात आले. रूढी आणि परंपरा यांच्या मगरमिठीत सापडून आजवर भारतातील इतर नागरिकांच्या मानाने मागासलेल्या मुसलमान बहुजन समाजाला हे मंडळ नवे विचार, नवे आचार यांची अधिकाधिक ओळख करून देणार आहे. हा उद्देश खचित स्तुत्य असून मंडळाचे प्रवर्तक त्याबद्दल अभिनंदनास पात्र आहेत. या मंडळाला मुसलमान समाजाकडून मिळणाऱ्या प्रतिसादावर मंडळाच्या कार्याचे महत्त्व अवलंबून आहे, असे मानण्याचे कारण नाही. मुसलमान समाजात सुधारणा करण्यासाठी आजवर ज्या उदारमनस्क प्रवृत्तीच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले, त्यांचा अनुभव लक्षात घेतल्यास संकल्पित कार्य कठीण आहे, हे नव्या मंडळाचे प्रवर्तकही बहुधा जाणून असतीलच. तरी त्यांनी पुन्हा एकवार हे कार्य शिरावर घेतले आहे. तेव्हा त्यांना वाटणारी त्याची पोटतिडीक खरी महत्त्वाची होय.

उपक्रमांचे महत्त्व

मुसलमान समाजाचा पिंड हा सर्वसाधारणतः गतानुगतिकतेचा आहे. धर्माज्ञा व तीही मुल्ला-मौलवींनी मान्य केलेली असली, तरच मुसलमान स्वीकारार्ह मानतात. नवशिक्षित मुसलमान नेत्यांनी समाज सुधारण्यासाठी केलेले प्रयत्न त्यामुळेच यशस्वी होऊ शकले नाहीत. अगदी आजच्या बदलत्या युगातही मुसलमानांच्या समजुतींत फरक पडलेला नाही. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी हिताचा सल्ला दिला, तरी तो मुसलमान समाजाच्या धर्मगुरूंच्या द्वारा आलेला नसल्याने तो सल्ला 'पाक' नसल्याचे प्रतिपादन मंडळाच्या कार्यकर्त्यांना धुडकावून लावण्यासाठी केले जाण्याची शक्यता दृष्टीआड करता येत नाही. 'धर्मगुरूंना बाजूस ठेवून समाज सुधारणेची तरफदारी करणारे मुसलमान कार्यकर्ते खरे मुसलमानच नाहीत' अशी दृढ भावना मुसलमान समाजाच्या बुरसटलेल्या मनोवृत्तीत आजही कायम आहे. मुसलमान समाजाच्या या मनोवृत्तीत सत्यशोधन करण्यास निघालेल्या मंडळाच्या कार्यकर्त्यांचे नव्या परिस्थितीत कसे स्वागत होईल, ते सहज जाणता येण्यासारखे आहे. पण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी नाउमेद न होता, विरोधाला आव्हान देतच समाजाच्या अंतरंगात प्रवेश करण्याची सातत्याने जिद्द दाखविली, तरच त्यांना त्यांच्या अंगीकृत कार्यात यश लाभेल!

प्रगतीतील अडसर

स्वातंत्र्योत्तर काळातच भारतीय नागरिकांची विविध क्षेत्रांत भरीव प्रगती झाली आहे. आजवर मागासलेला अस्पृश्यादी वर्गसुद्धा या प्रगतीचा वाटेकरी झाला आहे. नव्या सामाजिक व आर्थिक

परिवर्तनाचा लाभ घेण्यासाठी तो वर्ग त्यामुळे सिद्ध झालेला दिसतो. मिळालेल्या गोष्टींमध्ये अधिक भर घालण्यासाठी त्या वर्गाचा प्रयत्न चालू झालेला आहे. मुसलमान समाजातील कार्यकर्त्यांना या नव्या बदलाची जाणीव झाली असली, तरी त्या समाजातील बहुसंख्य जनतेला अद्याप त्याचे पुरेसे महत्त्व उमगलेले नाही. उलट हिंदू समाजाबद्दलचा त्यांच्या मनातील दुरावा हिंदूंच्या प्रगतीमुळे वाढत चालला आहे आणि त्या समाजाला अज्ञानात ठेवण्यास कारणीभूत झालेला मुल्ला-मौलवींचा वर्ग त्यास खतपाणी घालीत आहे. ते नेतृत्व आपले हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी मुसलमान समाजाच्या सुधारणेच्या प्रयत्नाला सतत विरोध करताना दिसते. समाजाला घातक ठरणारी ही बाब मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मुसलमान समाजाला पटवून देण्यात यश मिळविले, तर त्यांचे कार्य सुकर होऊ शकेल; नहून त्यांनाही मुल्ला-मौलवींपुढे शरणागती पत्करावी लागेल.

राष्ट्रहिताला प्राधान्य

भारतातील मुसलमानांची संख्या सुमारे आठ कोटींच्या आसपास आहे. हा समाज तुलनेने अप्रगत राहणे राष्ट्राच्या केव्हाही हिताचे नाही. तथापि त्याचबरोबर 'आपल्या समाजाची प्रगती साध्य करून घ्यावयाची असेल, तर ती राष्ट्राच्या प्रगतीबरोबरच होईल, अन्यथा नव्हे' हे मुसलमान समाजानेही ओळखले पाहिजे. या विचारापासून मुसलमान समाजाला वंचित करण्यात येत असेल, तर ती समस्या राज्यकर्त्यांनी हर प्रयत्नाने दूर केली पाहिजे. तथापि राज्यकर्त्यांनी आजवर या विधायक कामाकडे लक्ष दिलेले नाही. मुसलमान समाजाला परखडपणे दोन गोष्टी सुनावण्याचे धाडस तर दूरच राहिले, उलट त्या समाजाचा अनुनय करण्याची रीतच काँग्रेसच्या राज्यकर्त्यांनी अवलंबिली. त्यामुळे देशाचे प्रस्थापित कायदेकानून लागू करण्यासारख्या गोष्टी मागे पडल्या आणि व्यापक समाजहिताची उपेक्षा करण्याचा प्रसंग आला. राज्यकर्त्यांनी तोही पत्करला. या उपक्रमामुळे देशातील नागरिकांच्या समान हिताला एक पाया उपलब्ध करून देण्याऐवजी, हिंदू व मुसलमान या समाजांतील द्वैत कायम ठेवण्याचा पायंडा मात्र अनाठायी रूढ झाला. 'आपले पृथकत्व राखण्यात आपण आपला स्वाभिमान कायम ठेवीत आहोत' अशी भ्रामक समजूत मुसलमान समाजात बळावली आणि तीच आग्रही भूमिका या समाजात लोकप्रिय ठरू लागली. राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक असलेले अद्वैत निर्माण करणे वरील परिस्थितीत असाध्य झाले, यात नवल ते कोणते?

दुहेरी जबाबदारी

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने भारतातील आजवरची ही सारी पार्श्वभूमी लक्षात घेऊन आपल्या कार्याची दिशा ठरवावी. 'केवळ मुसलमान समाजात जागृती करावयाची आहे' एवढ्यावरच त्यांना थांबता येणार नाही. विद्यमान राज्यकर्ते सत्तास्वार्थापोटी मुसलमान समाजाला खूश ठेवण्यासाठी त्यांच्या कलाने चालण्याचा जो अतिरिक्त अधिकार बहाल करीत आहेत किंवा सामाजिक प्रगतीच्या गतीत नकाराधिकार वापरून समान कायद्यांची अंमलबजावणी करण्यास

होत असलेला मुसलमानांचा विरोध खपवून घेत आहेत, त्याला प्रतिरोध करण्याचे काम मुस्लीम सत्यशोधक मंडळाला करणे आवश्यक आहे. ही दुहेरी जबाबदारी पूर्ण करण्याचे बिकट कार्य योग्य दिशेने व जिद्दीने पूर्ण करण्यात कार्यकर्त्यांची खरी कसोटी लागणार आहे.

३.४ मुस्लीम सत्यशोधक मंडळ

(महाराष्ट्र टाइम्स, १९७०)

भारतीय मुस्लीम समाज आज अशा काही चमत्कारिक परिस्थितीत सापडला आहे की, या समाजाने स्वतःच प्रयत्न करून जुन्या चौकटी तोडल्याशिवाय तो भारतीय जीवनात समरस होऊ शकणार नाही. एकीकडे राजकीय पक्षांकडून होत असलेला अनुनय आणि दुसरीकडे परंपरागत श्रद्धांचा जबरदस्त पगडा यांमुळे मुस्लीम समाज एकाकी पडल्यासारखा झाला आहे. धर्माच्या नावावर वाटेल तो उद्दामपणा सहन करून घेण्यास भारतीय जनता तयार नाही. तसेच 'भारतीय नागरिक म्हणूनच मुस्लिमांनी वावरले पाहिजे' अशी मागणी होऊ लागली आहे. 'धर्माचे नसते स्तोम माजवले, तर यापुढे ते चालवून घेऊ नये' असा विचार पुढे येत आहे. शिवाय, आत्यंतिक धर्मवेडेपणा बाळगणारे लोकही मुस्लिमांच्या मनात द्विधा निर्माण करीत असतात. भारतीय घटनेने सर्वच नागरिकांना समान संधी व अधिकार दिलेले असताना व सरकारने निधर्मी धोरणाचा पुरस्कार सातत्याने केला असतानाही मुस्लीम समाजाची अलगता वाढलेली आहे. जातीय दंगलींचे प्रमाणही गेल्या काही वर्षांत वाढतच आहे. केवळ राजकीय हक्कांनी किंवा सर्वांना समान संधी मिळाली, तरी तेवढ्याने कोणताही समाज पुढे येऊ शकत नाही किंवा निकोप दृष्टीकोन स्वीकारू शकत नाही. अशा परिस्थितीत बाह्य वातावरणाबरोबरच मुस्लीम समाजात अंतर्गत बदल घडवून आणणे आवश्यक झाले आहे व हा बदल त्या समाजातील जाणत्यांनीच घडवून आणला पाहिजे. या दृष्टीने पुण्यात स्थापन झालेल्या मुस्लीम सत्यशोधक समाजाचे स्वागत अनेकांनी केले. मुस्लीम समाजात नव्या विचारांचे प्रवर्तन करण्याचे असिधारा व्रत स्वीकारलेले हमीद दलवाई यांनीच या नवीन संघटनेसाठी पुढाकार घेतला होता आणि आपल्या हयात काळात सर्व शक्तिनिशी कार्यास वाहून घेतले होते.

मुस्लीम समाजाच्या धार्मिक आणि ऐहिक दृष्टीकोनातत मूलभूत बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने या सत्यशोधक समाजाची स्थापना झाली होती. महाराष्ट्रातील बहुजन समाजात जागृती घडवून आणण्याच्या कामी महात्मा जोतिबा फुले यांनी 'सत्यशोधक समाज' स्थापन करून केलेल्या कार्यासारखेच कार्य मुस्लीम सत्यशोधक समाजाला करावयाचे आहे. सनातन, परंपरागत श्रद्धा उखडून काढल्याशिवाय नव्या समाजाला पुढे जाता येणार नाही. आज विसंगत ठरलेल्या कल्पनांना धार्मिक कोंदण असल्यामुळे त्या नाहीशा करणे सोपे काम नाही. परंतु मुस्लीम समाजातील तरुणांना आता अशा कार्याची आवश्यकता वाटू लागली आहे, हे एक सुचिह्नच आहे. तरीही फार मोठ्या जिद्दीने जुनाट भिंतीशी टक्कर द्यावी लागणार आहे. हमीद दलवाई असे प्रयत्न करीत होतेच. यामुळे त्यांचे नेतृत्व उपयुक्त ठरले. म्हणूनच त्यांच्या पाठीमागे मुस्लीम तरुणांची मोठी शक्ती उभी राहिली. या सामाजिक प्रबोधनाच्या जोडीला शिक्षणाचा प्रसार करण्यावरही भर देणे आवश्यक आहे. कार्य कठीण आहे व परिस्थिती फारशी अनुकूल नाही. शिवाय राजकारण्यांची स्वार्थी लुडबुडही या कार्यात अडथळा ठरण्याची शक्यता आहे.

उपक्रम *(दैनिक मराठा, १९७०)*

मंडळाच्या स्थापनेनंतर स्वतः हमीद दलवाई आणि प्रमुख कार्यकर्त्यांनी समविचारी, समतावादी संघटनांच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी होऊन आपले विचार आणि कार्य यांचा प्रचार करण्याचे धोरण आखले. त्याप्रमाणे १९ जुलै १९७० रोजी मुंबईत 'कौमी एकता युवा समिती'चे अधिवेशन झाले. यात पुणे शाखेचे अध्यक्ष ए. जे. शेख आणि हमीद दलवाई यांनी भाग घेतला. ए. जे. शेख यांनी 'हिंदूंप्रमाणेच मुस्लिमांच्या सामाजिक कायद्यात बदल झाला नाही, तर मुस्लीम समाज झपाट्याने अधोगतीस जाईल' असे सांगून मुस्लीम सत्यशोधक मंडळ घरोघरी जाऊन समाजात बदलास अनुकूल वातावरण करत असल्याचे सांगितले. कौमी एकता युवा समिती आणि युक्रांद यांनी पुढाकार घेऊन विविध सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांना या अधिवेशनासाठी आमंत्रित केले होते. अधिवेशनात हमीद दलवाई हे प्रमुख वक्ते होते. ते म्हणाले की, 'सध्या देशात व लोकसभेत श्रीमती इंदिरा गांधी मुस्लिमांचा व बाजपेयी हिंदूंचा आवाज उठवतात. मात्र सबंध देशात हिंदी माणसांचा प्रवक्ता कोणीच नाही.' भारतातील हिंदू-मुस्लीम समस्या सोडवून धर्मनिरपेक्ष, राष्ट्रीय एकात्मता असलेला देश निर्माण करण्याची आवश्यकताही या वेळी दलवाईंनी स्पष्ट केली. अधिवेशनात हेमंत गोखले, प्रा. शम्स, ब्लिट्ज चे साहाय्यक संपादक शमसुल यांनी विचार मांडले. कौमी एकता युवा समितीचे कार्यवाह हुसेन दलवाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

३.५ अब्दुल हमीद व्याख्यानमाला

(दै. मराठा, दै. तरुण भारत, दै. केसरी, दै. सकाळ, सोलापूर समाचार, १९७१ या सर्व वृत्तपत्रांमधील बातम्यांमधून साभार)

मुस्लीम समाजात विविधांगी विचारांचा प्रसार व्हावा आणि सामाजिक सुधारणांबरोबरच धर्मनिरपेक्ष, एकात्म समाजाच्या निर्मितीसाठी मुस्लीम समाजात अनुकूल वातावरण निर्माण व्हावे, यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने परमवीर चक्र सन्मानित अब्दुल हमीद यांच्या नावाने व्याख्यानमाला आयोजित करण्याचे ठरवण्यात आले. त्यानुसार, ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ, सुप्रसिद्ध विद्वान आणि भारताचे इजिप्तमधील भूतपूर्व राजदूत प्रा. असफ ए. ए. फैजी यांचे 'इस्लामकडे पाहण्याचा आधुनिक दृष्टीकोन' या विषयावर दिनांक ९ ऑगस्ट १९७० रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानमालेचे उद्घाटन मोहन रानडे यांनी केले. या उद्घाटनपर भाषणामध्ये मोहन रानडे म्हणाले की, 'परक्या राष्ट्रांशी युद्ध केव्हातरी होतच असते, परंतु हिंदू समाजात गेली हजार वर्षे अंतर्गत युद्ध चालूच आहे. सामाजिक समतेचा पुरस्कार करणारे आणि त्यांचा धर्माच्या नावाने विरोध करणारे यांच्यामधील हा संघर्ष आहे. अजून हा लढा संपलेला नाही. या संदर्भात खरा भारतीय तोच, जो लोकांना आधुनिक मूल्यांची शिकवण देतो. मग तो हिंदू असो, मुसलमान असो किंवा ख्रिस्ती असो. अशा कार्यकर्त्यांना सर्व प्रकारचे साहाय्य करणे हे प्रत्येक देशप्रेमी नागरिकाचे कर्तव्य आहे.' प्रा. असफ ए. ए. फैजी आपली भूमिका विशद करताना म्हणाले की, 'आधुनिक काळात कुठलेही धर्मशास्त्र अंधपणे अनुसरून, 'लकीर के फकीर' म्हणून राहता येणार नाही. कुराणात काही गोष्टी कालातीत महत्त्वाच्या आहेत, तर काही इस्लाम उदयास आला, त्या विशिष्ट परिस्थतीच्या संदर्भातच अर्थपूर्ण आहेत. म्हणून कुराणात दिलेल्या आदेशांचे आधुनिक सदसद्विवेकबुद्धीस पटेल असे अर्थ लावले पाहिजेत. उदाहरणार्थ, कुराणात गुलाम ठेवण्यास मुभा दिली आहे, परंतु आज ते चालणार नाही. तशीच गोष्ट बहुपत्नीत्व, मुस्लीम स्त्रियांचे वारसाहक्क, जुबानी तलाक इत्यादी प्रश्नांचीही होय. तुर्कस्तान, इराण, इजिप्त, ट्युनिशिया इत्यादी मुस्लीम देशांत या क्षेत्रात अनेक सुधारणाही झाल्या आहेत. भारतातील प्रत्येक मुसलमानाने, एक डोळा दिल्लीवर व दुसरा डोळा कराचीवर न ठेवता दोन्ही डोळे दिल्लीवरच ठेवले पाहिजे. तसेच धर्म आणि कायदा यांची संपूर्ण फारकत केली पाहिजे. 'सर्व नागरिकांकरिता एकच नागरी संहिता' हे आपले ध्येय असले पाहिजे, परंतु अशा संहितेची मागणी मुसलमानांच्या कडून येईपर्यंत शासन काही करणार नाही.

या व्याख्यानादरम्यान श्रोत्यांशी प्रश्नोत्तरे झाली. एका श्रोत्याने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना प्रा. फैजींनी सांगितले की, 'मुस्लीम अल्पसंख्य असलेल्या देशांतही संसदेस अशा सुधारणा घडवून आणण्याचा अधिकार आहे.' सदर व्याख्यानास हमीद दलवाई, प्रा. अ. भि. शहा यांच्यासह २००हून अधिक स्त्री-पुरुष आणि भिन्न धर्मीय श्रोते उपस्थित होते.

३.६ कोल्हापूर येथील अब्दुल हमीद व्याख्यानमाला

मंडळाच्या वतीने पुण्यात प्रा. असफ ए. ए. फैजी यांच्या व्याख्यानाने परमवीर अब्दुल हमीद व्याख्यानमाला सुरू झाली. याच अंतर्गत कोल्हापूर नगरपालिकेच्या विठ्ठल रामजी शिंदे चौकात, गुरुवार, दि. ४ नोव्हेंबर १९७० रोजी सायंकाळी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कोल्हापूर व्याख्यानमालेचे वक्ते आणि उद्घाटक म्हणून हमीद दलवाई यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. व्याख्यानासाठी ५००–६०० श्रोत्यांमध्ये जवळपास ५० मुस्लीम तरुण उपस्थित होते. या वेळी दलवाई म्हणाले, "मी कुणालाही भीत नाही. मी आजपर्यंत कधीही भिऊन कार्य केलेले नाही. पाच वर्षांपूर्वी जेव्हा मी एकटा मुस्लीम समाजप्रबोधनाचे कार्य करत होतो, तेव्हादेखील भ्यायलो नाही, मग सबंध महाराष्ट्रभर आज २०० कार्यकर्ते माझ्या पाठीशी असताना भिण्याचा प्रश्न येतो कुठे!" असे म्हणण्याचे कारण होते की, काही दिवसांपूर्वी कोल्हापूर येथे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे एक अभ्यास शिबिर भरलेले होते. तेव्हापासून येथील मुस्लीम समाजात खळबळ माजून राहिली आहे. मंडळ व हमीद दलवाई यांच्या विषयीचा धर्मवादी मुस्लिमांचा द्वेष इतका पराकोटीला पोहोचला आहे की, शिवराळ भाषेत धमकी देणारी पत्रके काढणे, धर्मांध मौलानांची भाषणे ठेवणे वगैरे प्रकार कोल्हापूर येथील मुस्लिमांनी चालवले आहेत. शिबिराच्या वेळेला त्यांनी बेंगलोरहून खास विमानाने एका मौलानांना आणले होते... परवा, दहा–पंधरा दिवसांपूर्वी इरशाद अहमद नावाच्या एका मौलानांचे भाषण त्यांनी याच शिंदे चौकात ठेवले होते. 'मौलाना' ही बिरुदावली मिरवणाऱ्या या धर्मांध माणसाने मंडळ व दलवाई यांच्यावर अत्यंत शिवराळ व असंस्कृत भाषेत टीका केली. हमीद दलवाईंचे भाषण हे मौलाना इरशाद अहमद यांच्या असंस्कृत, धर्मांध टीकेस सुसंस्कृत, बुद्धिवादी उत्तर होते.

दमबाजी चालणार नाही

आपल्या भाषणात दलवाई पुढे म्हणाले की, 'मुस्लीम समाजाला दमबाजी करून, या समाजात खोटा प्रचार करून आपले राजकारण व समाजकारण कोणाला चालवता येणार नाही; आणि ते चालू दिले जाणार नाही. त्यांना आधुनिकता स्वीकारावीच लागेल; धर्मांधता सोडावीच लागेल.'

मूलगामी प्रयत्न

मुस्लीम समाजाला आहे तसेच ठेवून देशाचा विकास करण्याचा आजवर प्रयत्न केला गेला; सुधारणा करण्याचा प्रयत्न केला गेला, परंतु तो मुळातच चुकीचा होता. देशाच्या विकासाच्या संदर्भात मुस्लीम समाज सुधारणे, हे अगत्याचे आहे. शिवाय ही सुधारणा केवळ व्हाइटवॉश करून किंवा थातुरमातुर करून होणार नाही. तसे प्रयत्न आजपर्यंत पुष्कळ झाले, परंतु मुस्लीम प्रबोधनाचे फळ चार हात दूरच राहिले. आता हे प्रयत्न मुळापासून होण्याची आवश्यकता आहे. मुस्लीम

सत्यशोधक मंडळ हे कार्य करत आहे.

सामाजिक समतेनेच आर्थिक समता

आपल्या देशामध्ये 'गरिबी हटाव'च्या घोषणा देत आर्थिक समता आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. केवळ 'गरीबी हटाव' ही घोषणा दिल्याने गरिबी हटेल, अशी कुणाची समजूत असेल, तर ती चुकीची आहे. भारताच्या हाडीमाशी खिळलेली सामाजिक विषमता आधी नष्ट केल्याशिवाय आर्थिक विषमता नष्ट होणार नाही. तेव्हा एकंदर भारतीय समाजाचेच प्रबोधन होण्याची आवश्यकता आता निर्माण झाली आहे.

विशाल उद्दिष्ट

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य सध्या मुस्लीम समाजापुरते मर्यादित आहे. समजा, हे मुस्लीम समाज सुधारणेचे कार्य पूर्ण झाले (ते कठीण आहे व त्याला वेळही लागेल), तरी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य संपले' असे नव्हे. मग आम्हाला एकंदर भारतीय समाजाचा प्रश्न हाती घ्यावा लागेल. सध्या मंडळाचे कार्य मर्यादित क्षेत्रापुरते असले, तरी त्याचे उद्दिष्ट विशाल आहे.

आपले भाषण संपवताना शेवटी हमीदभाई म्हणाले, 'दमबाजीला भिऊन आम्ही आमचे कार्य थांबवू किंवा पळून जाऊ, अशी कुणाची समजूत असेल, तर ती चुकीची आहे. आम्ही भारतीय राष्ट्राला पोषक असेच कार्य करणार, त्याला पोषक अशीच भूमिका घेणार'... आणि टाळ्यांच्या गजरात ते खाली बसले.

ही सभा बाबुमियाँ बँडवाले यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. त्यांच्याशिवाय सय्यदभाई, डॉ. भालदार, प्रा. अत्तार, हनीफ बागवान व नसरुद्दीन बारगीर हेही वक्ते म्हणून व्यासपीठावर होते. व्यासपीठावर सगळेच्या सगळे मुसलमान वक्ते असणे, हे एक या सभेचे वैशिष्ट्य होते. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, मुस्लीम सत्यशोधक मंडळाला नेतृत्व देऊ शकणारी माणसे मुस्लीम समाजातूनच दिवसेंदिवस मिळत आहेत. हे चिन्ह आशादायक आहे.

('दोन दशकांची वाटचाल' या मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तिकेत मंडळाचे कार्यकर्ते आय. एन. बेग यांनी वरील अहवाल लेखन केले आहे.)

३.७ राज्यस्तरीय परिषद (अधिवेशन)

महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात 'मुस्लीम सत्यशोधक' या चळवळीचा जन्म झाला. या जन्मवर्षातील महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनी, म्हणजेच २८ नोव्हेंबर १९७० रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित करण्यात आले. इंडियन सेक्युलर सोसायटी व मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांचे हे संयुक्त अधिवेशन पुणे येथील कॅम्प भागातील नेहरू मेमोरियल हॉलमध्ये आयोजित करण्यात आले होते. अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेल्या या अधिवेशनाची माहिती देण्यासाठी हमीद दलवाईंनी पत्रकार परिषद आयोजित करून परिषदेचा उद्देश, मांडण्यात येणारे ठराव आणि अधिवेशनाचे स्वरूप या संदर्भात माहिती दिली. 'प्रामुख्याने सेक्युलॅरिझमच्या विचाराचे महत्त्व आणि आवश्यकता याकडे देशातील राजकीय नेते व विचारवंत यांचे लक्ष वेधणे' हा या अधिवेशनाचा हेतू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या अधिवेशनात एकूण आठ ठराव चर्चिले जाणार होते. तसेच जातीय सलोखा राखण्यासाठी क्रमिक पुस्तकात योग्य तो बदल करण्यासाठी सरकारने नेमलेल्या समितीचे स्वागत ठरावामार्फत करण्यात येत असल्याचे सांगण्यात

राज्यस्तरीय परिषदेत बोलताना बाबुमियाँ बँडवाले, ॲड. नजमा, प्रा. शहा, दलवाई, मरियम रिफाई

राज्यस्तरीय परिषदेत ॲड. नजमा शेख. व्यासपीठावर डावीकडून मरियम रिफाई, प्रा. अ. भि. शहा आणि हमीद दलवाई.

आले. याव्यतिरिक्त अधिवेशनात हमीद दलवाई यांच्यावर जून १९७०मध्ये झालेला हल्ला, तसेच आचार्य तुलसींच्या 'अग्निपरीक्षा' या पुस्तकाविरुद्ध मध्य प्रदेशात हिंदूंनी केलेल्या आंदोलनाचा निषेध एका ठरवान्वये करण्यात येणार असल्याचे सांगितले गेले. 'मशिदी, मंदिरे, गुरुद्वारा, चर्च इत्यादी धार्मिक स्थानांच्या विश्वस्तांच्या व्यवहारावर सरकारी नियंत्रण असावे' असे सुचविण्यात येणार होते. 'विश्वस्त निधीतील पैसा धार्मिक व सामाजिक विकासाच्या कामांपेक्षा राजकीय कारणासाठी वापरला जाऊ नये' असा या ठरावामागचा उद्देश असल्याचे सांगण्यात आले. या अधिवेशनाचे उद्घाटन प्रा. असफ ए. ए. फैजी यांच्या हस्ते होणार होते. अधिवेशनात अ. भि. शहा, प्रा. मे. पुं. रेगे, जाफर फत्तेह अली व विविध राज्यांतील प्रतिनिधींनी विचार मांडले.

या अधिवेशनाचे स्वागत करण्यासाठी वर्तमापत्रातून संपादकीय प्रसिद्ध करण्यात आले होते.

पत्रकार परिषदेत नमूद केल्याप्रमाणे २८ नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मांडणी करत असताना 'विवाह, घटस्फोट, वारसा व कौटुंबिक जीवनाच्या इतर पैलूसंबंधीच्या हल्लीच्या सर्व कायद्यांची केंद्र सरकारने फेरतपासणी करावी' असे आवाहन या अधिवेशनात करण्यात आले. 'धर्मादाय देणग्यांच्या व्यवस्थापनासाठी असलेल्या समितीवर इतर धर्मांचे लोक घ्यावेत. रस्ते-रुंदीकरणाच्या व शहर-नियोजनांच्या आड येणाऱ्या मूर्ती, देवळे, मशिदी, थडगे, समाधी यांचे अडथळे राहू देऊ नयेत.' या संदर्भात

ठराव संमत करण्यात आला. पुण्यात रस्ता-रुंदीकरणाच्या कामी एका धार्मिक स्थळाचा अडथळा येत होता. ते हलविण्याविरुद्ध धार्मिक भावना चेतविण्याचा प्रयत्न एका केंद्रीय उपमंत्र्याने केला होता. त्या संदर्भात पुणे महापालिकेने घेतलेल्या धाडसी व धर्मनिरपेक्ष भूमिकेचे अभिनंदन अधिवेशनात करण्यात आले. 'पाठ्यपुस्तके पंथ व धर्म यांच्या अभिनिवेशापासून मुक्त असावीत' अशी मागणी करणारा व धर्मवादाविरुद्धचा असे विविध ठराव मांडण्यात आले. कार्यक्रमात फैजींव्यतिरिक्त मे. पुं. रेगे, अ. भि. शहा, हमीद दलवाई यांचीही भाषणे झाली. केरळमध्ये काँग्रेसने मुस्लीम लीगशी केलेली हातमिळवणी राजकीयदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या लाजिरवाणी आणि जातीयवादाला उत्तेजन देणारी असल्याचे खुल्या सत्रामध्ये मोहन धारिया यांनी सांगितले. परिषदेत ज. स. भागवत, अच्युतराव पटवर्धन, विनायकराव कुलकर्णी, बाबुमियाँ बँडवाले आणि इतर मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्राबरोबरच दिल्ली, गुजरात, उत्तर प्रदेश, केरळ व इतर राज्यांतील प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला.

प्रा. असफ ए. ए. फैजी म्हणाले की, 'धर्माधर्मांत विरोधी भावना निर्माण न करता प्रत्येकाने आपल्या धर्माचे आचरण केले व इतर धर्मांबाबत सहिष्णू वृत्ती ठेवली, तर समाजातील तणाव कमी होऊ शकतील. तसेच स्वतःच्या श्रद्धेला तडा जाऊ न देता आधुनिक विचार आत्मसात केले पाहिजेत.' वेगवेगळ्या परिस्थितींत व कालखंडांत झालेल्या सामाजिक स्थित्यंतरांची माहिती सांगून फैजी म्हणाले, 'बाइटाचे फळ बाईट मिळते व चांगल्याचे चांगले मिळते हे सर्वांना कळत असूनही माझ्या मुसलमान बांधवांनी चांगल्या गोष्टींकडे डोळेझाक केली आहे. याचे कारण त्यांना शिक्षणाची आवड नाही. 'आपण शिकावे', 'आपली मुले शिकावीत' याचे महत्त्व त्यांच्या लक्षात येत नाही. त्यामुळे त्यांच्या विचारांत फरक पडत नाही. जुन्या रूढी, परंपरा यांना ते चिकटून बसतात. हिंदू बांधवांतील अनेक जण पुरोगामी विचारांकडे वळू लागले आहेत. पण त्यांच्यातही अजून सामंजस्याची भावना कमीच दिसते. जातीय दंगलींचे मूळ उखडून टाकले पाहिजे, असे म्हणून किंवा शासन तिकडे पाहील म्हणून ते संपत नसते, तर धर्मा-धर्मांतील मूळ ग्रंथांचा अभ्यास साकल्याने करून, परंपरागत चालत आलेल्या धर्मविषयक भाव-भावनांमध्ये मानवता व साम्यवाद यांचा समावेश करून सहिष्णू तेची भावना वाढीस लागण्याचे कार्य होणे अगत्याचे आहे. कुठल्याही धर्माचे आचरण न करणे, म्हणजे धर्मनिरपेक्षता व धर्मसहिष्णू ता नव्हे, तर स्वतःच्या धर्मावर व तत्त्वावर दृढ श्रद्धा ठेऊन दुसऱ्यांच्या जीवनमार्गाबद्दल सहिष्णू ता व समज ठेवणे म्हणजे धर्मनिरपेक्षता आहे. भारतात राहणारा, भारताशी एकनिष्ठ असणारा व भारताच्या वैभवासाठी झटणारा असा प्रत्येक नागरिक भारतीय आहे. पाकिस्तानच्या निर्मितीबद्दल एकट्या बॅरिस्टर जिनांनाच दोष देऊन चालणार नाही. या फाळणीच्या पापात आपण सर्वच भागीदार आहोत. जिना हे महान राष्ट्रीय नेते होते, परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात समकालीन भारतीय नेत्यांनी अल्पसंख्याकांबाबत दिलेल्या आश्वासनांचा किमान चार वेळा तरी भंग केला. त्यामुळे जिनांनी आपली राष्ट्रीय मते बदलून जातीय राजकारणाचा आधार घेतला.' असे प्रतिपादन फैजी यांनी केले. तसेच हिंदू धर्मांतर्गत होणारा अन्याय आणि छळ, मुस्लीम धर्मातील शिया-सुन्नी यांच्यातील वाद आणि कत्तली, बौद्ध व ख्रिश्चन यांच्यातील संघर्ष

यांचेही त्यांनी सविस्तर विवेचन केले. धर्मांतरासंदर्भात फैजी म्हणाले की, 'भारतात लक्षावधी मुसलमान आहेत. त्यांतील काही अंशी जबरदस्तीने झाले असतील, पण 'सर्वच सक्तीने मुसलमान झालें' असे समजणे चूक आहे.'

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे प्रवर्तक हमीद दलवाई यांनी प्रा. फैजी यांनी केलेल्या मांडणीतील काही मुद्द्यांबद्दल मतभेद व्यक्त केले. त्यांनी निःसंदिग्ध शब्दांत सांगितले की, 'प्रत्येक देशातील मुसलमानाला त्या-त्या देशाचे व्हावे लागते. इस्लाम धर्म त्या सगळ्यांना समान असला, तरी इंडोनेशियातील मुसलमान जसे इंडोनेशियन आहेत, तसेच भारतातील मुसलमान हे भारतीय असले पाहिजेत. येथील जीवनाचा स्वाभाविक रंग त्यांना चढला पाहिजे. मुख्य म्हणजे, येथील जीवन पद्धतीला विरोध करण्याचे त्यांनी सोडले पाहिजे. कोणी त्यांच्या कपाळाला गुलाल लावला, तर त्यांनी संतापू नये किंवा मशिदीपुढे बाद्यबंदीचा आग्रह करू नये. क्रिया झाली की प्रतिक्रिया होते, हा निसर्गाचा नियम आहे. त्या नियमाची उपेक्षा जशी हिंदूंनी करू नये, तशीच मुसलमानांनीही करू नये. मुसलमान समाजाला हे स्पष्टपणे सांगणारा मुस्लीम सत्यशोधकचा आवाज आहे.' 'बॅरिस्टर जिना एकटे भारताच्या फाळणीला जबाबदार नाहीत' या फैजी यांच्या विधानाचासुद्धा हमीद दलवाई यांनी समाचार घेतला. 'आपण भारतीय आहोत. त्यामुळे भारतावरील आपली निष्ठा व्यक्त करण्यासाठी मुसलमानांनी पुढे यायला पाहिजे' असे आवाहन बाबुमियाँ बँडवाले यांनी परिषदेत केले. निधर्मी राज्यात धर्मामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा ऊहापोह करून समाजात वैमनस्य निर्माण करणाऱ्या गोष्टींपासून परावृत्त होण्याचे आग्रही प्रतिपादन प्रा. अ. भि. शहा यांनी केले. हमीद दलवाई यांनी अत्यंत ठोस शब्दांत रूढी, धर्मभावना, जातीय दंगली यांवरील वस्तुस्थितीचा परामर्श घेऊन हिंदू व मुसलमान बांधवांतील एकी वाढवण्याच्या दृष्टीने व प्रत्यक्ष कार्य करण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढे आले पाहिजे, असे आवाहन केले. मुसलमान समाजातील रूढींमुळे या समाजाचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक असा कोणताच विकास होऊ शकला नाही, हे दारुण सत्य असल्याच्या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधून दलवाईंनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या धोरणांचा पुनरुच्चार केला व धर्माच्या नावाखाली चाललेल्या अन्यायी परंपरांचा निषेध केला. 'अशा चुकीच्या प्रथांमुळे संधिसाधूंचे फावते व त्यातूनच नवीन बखेडे निर्माण होतात. म्हणून नवजागृतीची गरज आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळ विविध पातळ्यांवरील

राज्यस्तरीय परिषदेत बोलताना मरियम रिफाई

विरोध पत्करूनही आपले कार्य करीत राहील' असा विश्वास दलवाईंनी व्यक्त केला.

परिषदेत (अधिवेशनात) मांडण्यात आलेले ठराव :

१) सेक्युलॅरिझम –

समाजातील मान्यवर अभ्यासक, राजकीय पक्ष व राज्य सत्ताधारी यांच्यामध्ये 'सेक्युलॅरिझम' या संकल्पनेचा केवळ 'निधर्मी', 'सर्वधर्मसमभाव' असा अर्थ लावला जातो. त्याद्वारे सर्व धर्मांची वाढ व्हावी, तसेच जीवनाकडे धार्मिक दृष्टीकोनातून पाहिले जावे, यासाठी उत्तेजन तसेच सोयी-सवलती देण्यात येतात. वास्तविक, राज्यसत्ता अशा धार्मिक सोयी-सवलती देण्यास बांधील नसते. मात्र 'राज्यसत्तेला तसा अधिकार आहे असे' सूचित करण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यसत्तेचे असे वर्तन अनुचित असल्याने मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे आयोजित केलेली ही परिषद राज्यसत्तेच्या अशा वर्तनाची गंभीर दखल घेत आहे. सरकारने कोणत्याही धर्माला उत्तेजन देऊ नये, किंबहुना कोणत्याही धार्मिक समारंभात भाग घेऊ नये, राज्यसत्तेने आणि तिच्या प्रतिनिधींनी अशा सर्व धार्मिक समारंभांपासून अलिप्त राहावे अशी अपेक्षा करते. तसेच भारत सरकारने सर्व धार्मिक गटांच्या न्याय्य हक्कांचा योग्य आदर केला आहे. त्याबद्दल परिषदेला समाधान वाटते.

२) पाठ्यपुस्तके –

प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतून अध्ययन-अध्यापनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाठ्यपुस्तकांची तपासणी करण्यासाठी एक समिती नेमण्याचा भारत सरकारने निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे ही परिषद स्वागत करते. पुस्तकातून कोणत्याही पंथाच्या किंवा पोथीनिष्ठ धर्माच्या बाजूने झुकते माप न दिले जाता 'मानवविश्व' यासंबंधी बुद्धिवादी, शास्त्रीय दृष्टीकोन मुलांच्या मनावर ठसावा, असा प्रयत्न करण्याचा आग्रह ही परिषद करते.

३) धर्माच्या नावाखाली होणारा छळ –

अनेक गटांकडून धर्माच्या नावाखाली इतरांच्या होणाऱ्या छळाचा ही परिषद निषेध करते. पुणे येथे जूनमध्ये हमीद दलवाई यांच्यावर धर्मांध मुस्लिमांनी केलेला हल्ला व रायपूर येथे आचार्य तुलसी यांच्याविरुद्ध हिंदू सनातन्यांनी चालवलेली हिंसक, अत्याचारी चळवळ यांचा ही परिषद कडक शब्दांत निषेध करते.

४) देवळे, चर्चेस, वक्फ इत्यादींजवळ असणारा पैसाअडका व इतर सर्व धार्मिक विश्वस्त निधी यांवर देखरेख करण्यासाठी सर्व धर्मीय व सर्व जमातींच्या व्यक्ती सभासद म्हणून असाव्यात.

५) मूर्ती, देवळे, मशिदी, थडगी, कबरी यांमुळे रस्तेकोंदी अगर नगर-रचना-योजना यांना अडथळा येता कामा नये. अशा वास्तूंना दुसरीकडे जागा देऊन हे अडथळे दूर करण्याच्या कामाकडे सरकारने विशेष लक्ष द्यावे, असे ही परिषद आग्रहपूर्वक प्रतिपादन करते.

६) समान नागरी कायदा –

धर्म-लिंगनिरपेक्ष समान जबाबदाऱ्या याने सामाजिक व राजकीय हक्क सूचित होतो. भारत सरकारने घटनेच्या ४४व्या कलमात दिग्दर्शित केल्याप्रमाणे भारतातील सर्व जनतेसाठी एक

समान नागरी कायदा निर्माण करण्यासाठी आवश्यक ते विधेयक सादर करावे, अशी ही परिषद मागणी करते.

७) जातीय राजकारणाचे पुनरुज्जीवन –

जातीय राजकारणाच्या पुनरुज्जीवनाची, विशेषतः भारताच्या फाळणीला आणि फाळणीच्या पाठोपाठ झालेल्या भीषण जातीय दंगलींना कारणीभूत झालेल्या मुस्लीम लीगच्या पुनरुज्जीवनाविषयी ही परिषद तीव्र चिंता व्यक्त करीत आहे. फाळणीपूर्व राजकारण पुनरुज्जीवित करण्याच्या प्रयत्नांचा ही परिषद धिक्कार करते.

८) जातीय दंगली –

अपप्रचाराद्वारा अथवा इतर मार्गाने भारतातील निरनिराळ्या धार्मिक जमातींमध्ये परस्परांविषयी द्वेष आणि संशयाचे वातावरण कायम ठेवण्यात काही यंत्रणा सहभागी होतात. अशा सर्वांचा ही परिषद धिक्कार करते. तेढ निर्माण करण्यास कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्ती, गट, संस्था यांच्या राजकीय महत्त्वाचा विचार न करता त्यांच्याविरुद्ध वेळीच कडक उपाययोजना केली जावी, जेणेकरून तेढ वाढीस लागणार नाही. प्रबुद्ध नागरिकत्वाच्या जाणिवेची निकड सर्वांच्या मनावर ठसविण्यासाठी, जनमत निर्माण करण्यासाठी कार्य करण्याचा ही परिषद निश्चय करीत आहे.

या अधिवेशनात समान नागरी कायद्याचा ठराव कोल्हापूर येथील प्रा. श्रीमती मुमताज रहिमतपुरे यांनी मांडला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुणे शाखेचे अध्यक्ष ए. जे. शेख यांनी प्रास्ताविक केले. मुख्यमंत्री वसंतराव नाईक, कोदंडराव, डॉ. मोईन शाकीर, डॉ. के. एम. मुन्शी, अब्दुल गनी दार, रत्नाप्पा कुंभार, एम. आर. मसानी, कमल नयन बजाज आणि इतर मान्यवर यांचे आलेले संदेश प्रा. मे. पुं. रेगे यांनी वाचून दाखवले. आचार्य भागवत, अच्युतराव पटवर्धन, विनायकराव कुलकर्णी यांची येथे प्रमुख उपस्थिती होती.

या परिषदेसाठी महाराष्ट्रातून बरेच पुरोगामी कार्यकर्ते आले होते. हे दलवाईंच्या सततच्या संपर्कातील कार्यकर्ते होते. त्यात कोल्हापूरचे हुसेन जमादार, अमरावतीचे वजीर पटेल, श्रीगोंद्याचे बाबुमियाँ बँडवाले, हुसेन दलवाई, अब्दुल कादर मुकादम, चिपळूणचे दादामियाँ, फलटण-साताऱ्याचे प्रा. बि. अ. शेख, पुणे शहरातील अमीर शेख, बशीर शेख, महंमद युसूफ शेख, चांद तांबोळी, मकबूल तांबोळी, ए. जे. शेख, रफी सय्यद , ए. आर. शेख, सय्यद मुनीर, बी. जे. सय्यद, अन्वर शेख ही मंडळी उपस्थित होती.

शेवटी, इंडियन सेक्युलर सोसायटीचे व्ही. के. सिन्हा यांनी आभार मानले.

(दै. मराठा, दै. तरुण भारत, दै. केसरी, दै. सकाळ, सोलापूर समाचार, २९ नोव्हेंबर, १९७१)

समान नागरी कायदयाच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांचे उत्तर :

फेब्रुवारी, १९७१ : विधानपरिषदेत उत्तमराव पाटील, मुकुंदराव कुलकर्णी व डॉ. वसंतराव पंडित यांनी 'मुस्लीम सत्यशोधकांच्या निवेदनावर शासनाची भूमिका' या संदर्भात विचारलेल्या

प्रश्नाला मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी सांगितले की, 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याविषयी शासनास आस्था आहे. या मंडळाने राज्यपालांना एक निवेदन सादर करून काही मागण्या केल्या आहेत. त्या मागण्यांत बहुभार्या प्रतिबंध, समान नागरी संहिता आदी मागण्यांचा उल्लेख आहे. या मागण्यांबाबत राज्य पातळीवरून केलेली कार्यवाही परिणामकारक होऊ शकणार नाही. म्हणून राष्ट्रीय पातळीवरच या संदर्भात निर्णय घेतला जावा. त्या निर्णयाची राज्यशासन अंमलबजावणी करेल.'

कोल्हापूर शाखेची स्थापना आणि कार्यक्रम :

दि. ३ मे १९७१ रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची शाखा कोल्हापूर येथे स्थापन झाली. या प्रसंगी हमीद दलवाई, प्रा. ए. डी. अत्तार, भाई माधवराव बागल, साहित्यिक वि. स. खांडेकर उपस्थित होते.

स्थानिक मुस्लीम संघटनांनी मंडळाचा अपप्रचार केला व 'या कार्यक्रमात सहभागी होऊ नये' असा फतवा काढला. तथापि कार्यकर्त्यांवर त्याचा परिणाम झाला नाही; कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

मुक्तिसंग्रामास निधी

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने २७, २८ डिसेंबर १९७१ रोजी आयोजित केलेल्या मुस्लीम महिला परिषदेची माहिती देण्यासाठी हमीद दलवाई यांनी २४ सप्टेंबर १९७१ रोजी पत्रकार परिषद आयोजित केली होती. या महिला परिषदेची माहिती देत असताना बांग्लादेश मुक्तिसंग्रामाला मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने १५०० रुपयांचा निधी दिला असल्याची माहिती हमीद दलवाई यांनी पत्रकारांना दिली. *(दै. विशाल सह्याद्री, २५ सप्टेंबर, १९७१)*

मुस्लीम महिला परिषद, पुणे

सामाजिक महत्त्व असणारी इस्लामी जगतातील मुस्लीम महिला परिषद पुण्याच्या राज्य शिक्षण संस्थेत दि. २७, २८ डिसेंबर १९७१ रोजी आयोजित करण्यात आली होती. या दोन दिवसीय परिषदेस हिंदू-मुस्लीम समाजातील जवळपास २५० महिला उपस्थित होत्या. परिषदेत महत्त्वाचे ठराव संमत करण्यातआले.

विविध भागांतून आलेल्या महिलांनी परिषदेमध्ये व्यक्त केलेल्या मनोगतांत आपल्या दुःख, यातना व्यक्त केल्या. यामुळे तोंडी तलाक, बहुपत्नीत्व समाजातील महिलांची गळचेपी हे प्रश्न सामाजिक पटलावर आले.

३.८ मुस्लीम महिलांतील जागृती

महाराष्ट्रातील मुस्लीम महिलांची परिषद पुणे येथे भरली. ती भारतातील ह्या स्वरूपाची पहिलीच परिषद होय. मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटी यांनी या उपक्रमात घेतलेला पुढाकार अभिनंदनीय होता. मुस्लीम महिला जगतात नवचैतन्याचे वारे पसरवण्यासाठी या परिषदेचा खास उपयोग झाला. मुसलमान महिला गेली कित्येक शतके पडदानशीन अवस्थेत राहिल्या आहेत. साहजिकपणे त्यांच्या वाट्याला केवळ बंदिस्त नव्हे, तर गुलामाचेच जिणे आले! घराबाहेर वावरणाऱ्या पुरुषांना त्यांच्या या परिस्थितीची कधी जाणीव झाली नसेल, असे नाही, पण धार्मिक व सामाजिक रूढींची बंधने झुगारून देण्याचे धैर्य जेथे पुरुषांना कधी झाले नाही, तेथे मुसलमान महिलांमध्ये जागृती होण्याची शक्यता व अपेक्षा अर्थातच दुर्मीळ होती. 'भारताची फाळणी झाल्यानंतर मुसलमान समाजाचा दृष्टीकोन बदलेल' अशी महिलांची समजूत होती, पण त्यांच्या वाट्याला निराशा आली. एवढेच नव्हे, तर उलट धर्माच्या संरक्षणाच्या नावाखाली आपली वेगळी राहुटी कायम ठेवण्याचा अट्टाहास मुस्लीम धर्मवाद्यांनी धरल्याने एकूण मुसलमान समाज राष्ट्रीय प्रवाहापासून सदैव दूर राहिला. परिणामी, भारताने सामाजिक प्रगतीसाठी केलेल्या अनेक कायद्यांचा लाभ मुसलमान समाजाला मिळवता आला नाही.

झोप उडाली :

भारतातील सारा पट बदलत असताना मुसलमान समाज 'जैसे थे' अवस्थेत राहिल्याने त्याच्या वाट्याला उपेक्षा येणे क्रमप्राप्त होते. एवढेच नव्हे, तर त्या समाजाबद्दल संशयी दृष्टीसुद्धा वाढू लागली. मुसलमान समाजातील व्यापार-उदीम करणाऱ्या, नोकरीपेशा स्वीकारणाऱ्या व इतर भारतीयांच्या बरोबरीने जीवनाच्या साऱ्या क्षेत्रात भाग घेऊ पाहणाऱ्या लोकांना – त्यांतही विशेषतः नवयुवकांना – इतर समाजामध्ये आपणाबद्दल वाटत असलेला दुरावा जाणवू लागला. त्या जाणिवेतून 'प्राप्त परिस्थितीत आपले काही चुकते आहे की काय?' याचे सत्यशोधन करण्याची त्यांची चिकित्सक प्रवृत्ती जागृत झाली. 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाची निर्मिती' हे तिचे पहिले दृश्य फल ठरले. या मंडळाच्या कार्यकर्त्यांना अर्थातच प्रथम उपेक्षा, उपहास व विरोध या नित्याच्या सर्व अडचणींना तोंड द्यावे लागले. पण त्यातून त्यांनी पुढे मजल मारण्यात यश मिळविल्याने मंडळाच्या कार्यकर्त्यांचा हुरूप वाढलेला दिसतो. सामान्यतः मागासलेल्या मुसलमान समाजात पोहोचून, तेथे आपले ईप्सित साध्य करून घेण्याच्या दृष्टीने मुस्लीम सत्यशोधक समाजाला अद्याप पुरेशी प्रगती करता आलेली नसली, तरी बुद्धिवादी समाजांत सत्यशोधनाचे विचारचक्र वेगाने फिरू लागले आहे. मुसलमान समाजाची झोप उडविण्याला हा बदल कारण ठरला आहे, हे मात्र विसरता येण्यासारखे नाही.

महिला परिषदेत बोलताना आवाबेन देशपांडे, सोबत. प्रा. अ. भि. शहा, हमीद दलवाई आणि इतर

विकलांग अर्धांग :

समाजाच्या यंत्रणेत स्त्री व पुरुष यांची समान भागीदारी मानली जाते. हिंदू समाजाची यंत्रणा प्रगतीकडे झेपावण्याला या समान भागीदारीच्या सहकार्याचा मोठा लाभ झाला. मुसलमान समाजातील महिला त्या तुलनेने बऱ्याच मागे असल्याने मुसलमान समाजातील एकूण सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक स्थिती मागास राहिली. ही उणीव तीव्रतेने जाणवू लागल्याने मुस्लीम सत्यशोधक मंडळाची नजर आपल्याच समाजातील या केवळ उपेक्षित अंगाकडे नव्हे, तर विकलांग अर्धांगाकडे वळली. महिलांना जागृत केल्याशिवाय कुटुंबात नवविचाराची बीजे रुजणे कठीण ठरते. वास्तव महिलांनाच आपल्या विचाराची कवाडे उघडावयाला प्रवृत्त करण्याचा उपक्रम मुस्लीम सत्यशोधक मंडळाने हाती घेतला. 'मुस्लीम महिला परिषद' हे त्यातील पहिले पाऊल होते. मुसलमान समाजातील महिला आपल्यापुढील समस्या सोडविण्यासाठी उघडपणे एकत्र आल्या, ही घटनाच उत्तेजक ठरली. या परिषदेत मूठभर महिलांनी भाग घेतला असला, तरी त्यापुढे हे लोण अधिक शीघ्र गतीने पुढे सरकण्याचा विश्वास यातून निर्माण झाला. 'सामान्यांतील सामान्य मुसलमानाच्या घरात मुस्लीम महिलांच्या मुक्तीची हाक पोहोचविण्याचा यापुढे प्रयत्न करावा' ही प्रा. असफ ए. ए. फैजी यांनी मुस्लीम महिला परिषदेत केलेली सूचना त्या विश्वासाची निशाणी होती.

शरीयतचा कायदा फेकून द्या :

'मुस्लीम स्त्रियांवर मध्ययुगीन गुलामगिरीचे जिणे लादणारा शरीयतचा कायदा १९३७पासून

आमच्या महिलांच्या बोकांडी बसला आहे. वस्तुतः धर्माचा व या कायद्याचा संबंधच नाही. विसाव्या शतकात हा कायदा आपण मोडून फेकून दिला पाहिजे' हे फैजी यांचे आवाहनपर मार्गदर्शन मुसलमान महिलांनी नीट समजून घेतले. त्याचा पाठपुरावा केलेल्यांनी आपली सुटका लवकरच करून घेतली असेल. बांग्लादेशात पिसाट पाकिस्तान्यांनी आपल्या धर्मभगिनींची केलेली बेअब्रू व मुसलमान सैनिकांनी केलेले रानटी वर्तन बांग्लादेशामधील मुसलमान स्त्रिया कधी विसरणार नाहीत. 'या स्त्रिया अवमानित राहणार नाहीत, तर त्या 'वीर रमणी' समजल्या जातील' अशी घोषणा बांग्लादेश सरकारने केली होती. ती त्या स्त्रियांच्या उद्धारासाठी नव्हे, तर त्यांना झळाळी प्राप्त करून देण्यासाठी कारण ठरणार होती. या 'वीर रमणी' त्यानंतर पाशवी गुलामगिरीतून कायमच्या मुक्त झाल्या. त्यांच्या अनुभवाचा मागोवा घेऊन भारतातील मुस्लीम महिलांनी तशी परिस्थिती पुन्हा कधी निर्माण होऊ नये, यासाठी कंबर कसणे गरजेचे होते. धर्माच्या नावाखाली त्यांना अंधारात ठेवणाऱ्या पुरुष वर्गाला योग्य मार्गावर आणण्यासाठी घरात बसूनसुद्धा महिलांना विविध मार्गांनी पुरुषसत्ताक व्यवस्थेवर दडपण आणणे शक्य असते. यातून त्यांचा मुक्ती लढा अपेक्षेपेक्षा लवकर मार्गी लागण्याची शक्यता निर्माण होऊ शकला असता. भारतातील मुस्लीमेतर महिलांनी केलेल्या प्रगतीबद्दल मुसलमान महिलांना मनोमन असूयाच वाटत असणार, पण ती बोलून दाखवण्याची संधीदेखील त्यांना कधी मिळाली नाही. धार्मिक अंधश्रद्धेने ही पाळी त्यांच्यावर ओढवली.

आव्हानाचा स्वीकार करा :

बांग्लादेशाच्या अनुभवाने शहाणे होऊन भारतातील मुसलमान समाजाने नवयुगातील आव्हानाचा स्वीकार करण्याला झापडे मोडून सिद्ध होणे आवश्यक होते. त्याची बहुतांश जबाबदारी महिलांवर होती. कारण नवी पिढी नीट तयार करण्याचे काम त्यांच्या हाती होते. मुस्लीम महिला परिषदेच्या अध्यक्ष श्रीमती शरीफा तैय्यबजी यांनी आवाहन केल्याप्रमाणे, मुस्लीम स्त्रियांना आधुनिक जीवनाची मूल्ये व ज्ञान यांचे शिक्षण मिळणे आवश्यक होते. मुलांवर जातीयतेच्या विकृत शिक्षणाचा परिणाम होऊ नये, यासाठी शिक्षण क्षेत्रात कार्यरत बुरसट व प्रतिगामी प्रवृत्तीच्या संस्थांवर सार्वजनिक हिताच्या दृष्टीने मुसलमान समाजाने दडपण घालणे आवश्यक होते. सरकारनेही त्यांच्यावर कडक निगराणी ठेवणे आवश्यक होते. सरकारने अल्पसंख्याकांच्या मताचा बाऊ करून हे कर्तव्य टाळले असते, तर सरकारला जाब विचारण्यासाठी मुसलमान महिलांनी सज्ज राहणे आवश्यक होते. भारताचा खराखुरा नागरिक राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप होणारा ठरावयाला हवा. जुनी चाकोरी टाकून दिल्याशिवाय हा प्रवाह दृष्टिपथातही आला नसता. वास्तव जुनाट रूढी, कालबाह्य बाबी नाकारण्याचे निर्भीड प्रयत्न महत्त्वाचे ठरणार होते. *(केसरी, २९ डिसेंबर १९७१)*

इंडियन सेक्युलर सोसायटी व मंडळाचे आवाहन :

निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष धर्माचा वापर करून आपली मतपेटी तयार करण्याचा

प्रयत्न करतात. धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही अशी सांविधानिक मूल्ये अनेक वेळा व्यवस्थितपणे बाजूला सारून धार्मिक समूहांना प्रलोभने दाखवली जातात. काही धार्मिक समूह या निमित्ताने आपली पोळी भाजून घेतात.

या पार्श्वभूमीवर राजकीय पक्ष आणि धार्मिक समूह यांना उद्देशून मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटीच्या वतीने पत्रक काढून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला गेला.

३.९ मुस्लीम महिला परिषद आव्हान व आवाहन

(डिसेंबर १९७१ हा महिना भारताच्या इतिहासातील एक गौरवशाली प्रकरण मानले जाईल. याच महिन्यात भारताने अगतिकतेची कात टाकून देऊन तेजस्वी स्वरूप धारण केले. अगदी प्रथमच कोणत्याही पाश्चात्त्य गुंडगिरीला न जुमानता राष्ट्रहितासाठी व उच्च मानवी आदर्शासाठी लढा देऊन भारताने विजय मिळविला. बांग्लादेशच्या निर्मितीने भारताने इतिहास व भूगोल दोन्ही घडविले. या काळात भारतीय जनतेच्या एकात्मतेचे घडलेले दर्शन खरोखरच विलोभनीय होते. बांग्लादेशच्या निर्मितीसारखीच दुसरी एक क्रांतिकारक घटना याच वेळी पुणे शहरात, दिनांक २६ व २७ डिसेंबर १९७१ रोजी भरलेल्या अखिल भारतीय मुस्लीम महिला परिषदेच्या निमित्ताने घडली. भारतातील मुस्लीम महिला इतिहास काळात प्रथमच पुण्याच्या व्यासपीठावर येत होत्या. मुस्लीम महिलांच्या जागृतीचे हे दृश्यही तितकेच क्रांतिकारक होते. शतकानुशतकांच्या गुलामगिरीविरुद्ध, जाचक परंपरेविरुद्ध मुस्लीम स्त्रीने या परिषदेत क्रांतीची तुतारी फुंकली.)

बांग्लादेशच्या निमित्ताने द्विराष्ट्रवादाला मूठमाती दिली गेली. तसेच कोणताही धर्म आधुनिक काळात राष्ट्रबांधणीचा पाया होऊ शकत नाही, हे सिद्ध केले. या क्रांतीचा अर्थ सर्वांनी समजून घेणे आवश्यक आहे. बांग्लादेशचा लढा केवळ हुकूमशाहीविरुद्ध नव्हता, तर शतकानुशतकांपासून श्रेष्ठ मानवी मूल्यांवर आधारित न्यायाधिष्ठित समाजरचना निर्माण करण्याच्या मानवी धडपडीसाठी होता. भाषा, वंश, वर्ण व प्रादेशिक स्वार्थ यांच्या आधारे मानवी मूल्ये पायदळी तुडविणाऱ्या सैतानालाही लाजवितील, असे अत्याचार करणाऱ्या पाशवी शक्तिविरुद्ध तो झगडा होता.

मुस्लीम महिला परिषददेखील उच्च मानवी मूल्यांसाठी झगडणाऱ्या समाजाच्या मानवी इतिहासातील एक क्रांतिकारक घटना होती. आजतागायत मानवी समतेच्या झालेल्या चळवळींमधील ती एक महत्त्वाची पायरी आहे. या परिषदेचे स्वरूप केवळ सुधारकी थाटाचे नव्हते, तर स्त्री व पुरुष यांच्या समानतेच्या व समान प्रतिष्ठेच्या आदर्शासाठी केलेली ती एक धडपड आहे. भारतीय जनतेने आपल्या संविधानामधून न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व व्यक्तीची प्रतिष्ठा या आदर्शांवर आधारित सार्वभौम लोकसमाज, कल्याणकारी गणराज्य निर्माण करण्याची प्रतिज्ञा केली आहे. 'मुस्लीम महिला परिषद' हे त्या प्रतिज्ञापूर्तीच्या चळवळीचे एक अंग होते. माणसांमाणसांवरील व गटांगटांवरील अन्याय, तसेच कोणत्याही प्रकारची पिळवणूक जशी भयंकर आहे, तसेच फार मोठ्या प्रमाणावर भोगदासी व आपल्या मालकीची वस्तू म्हणून वागविल्या जाणाऱ्या मुस्लीम स्त्रीची हीन अवस्था संतापजनक आहे. पुण्याच्या मुस्लीम महिला परिषदेने या शतकानुशतकांच्या अन्यायाविरुद्ध मुलुख मैदान तोफ डागून सामाजिक क्रांतीचा पाया घातला.

प्राचीन काळापासून ते आजतागायत सर्वांगीण कल्याण साधण्यासाठी माणसाने अनेक लढे दिले. माणसाला जखडून टाकणाऱ्या रूढी व परंपरा यांविरुद्ध त्याने बंड केले. या संघर्षामधून

धर्म उदयास आले. त्यात मानवी कल्याणाचा भाव होता, पण वर्चस्व गाजविण्याच्या मानवी प्रवृत्तीमुळे सर्व धर्मांनी आक्रमक रूप धारण केल्याचे दिसून येते. मध्ययुगाचा इतिहास धर्माच्या रूढीवादी बंधनातून मनुष्याला मुक्त करण्याचा इतिहास आहे. युरोपातील प्रबोधनाने भौतिक कल्याणावर आधारित विज्ञाननिष्ठ जीवनाचा पाया घातला. राजेशाही, सरंजामशाही व परंपरा यांविरुद्धचा लढा फ्रेंच व अमेरिकन राज्यक्रांतीमधून साकार होऊन तेथे प्रजासत्ताक निर्माण झाले. 'ब्रिटिशांच्या विरुद्ध भारतीयांचा स्वातंत्र्य संग्राम' या वैश्विक चळवळीचा एक भाग होता. भारतामध्ये इंग्रजी शिक्षणाबरोबरच सामाजिक प्रबोधन सुरू होऊन राजकीय जागृती निर्माण झाली. सामाजिक व राजकीय संकल्पनांनी व प्रेरणांनी भारत ढवळून निघाला... स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली. पण त्याचबरोबर मुस्लीम नेत्यांनी द्विराष्ट्रवादाची चळवळ करून पाकिस्तानची निर्मिती केली. येथे या सर्व इतिहासाच्या फारसे खोलात जाण्याचे कारण नाही. महिला अशिक्षित असल्यानेच तिच्यावर अन्याय होतात, तिचे हक्क पायदळी तुडविले जातात... ती स्वावलंबी होऊ शकत नाही, म्हणून तिला परावलंबित्वाचे किंबहुना गुलामाचे जिणे जगावे लागले. तलाकची टांगती तलवार नजरेसमोर ठेवून व जीव मुठीत धरून पुरुषांच्या भोगदासीचे जिणे जगावे लागत असल्याने 'आधुनिक विज्ञाननिष्ठ शिक्षण' हाच अन्याय दूर करण्याचा पहिला उपाय उदारमतवादी नेत्यांनी प्रतिपादित केला. कुटुंबातील स्त्री अडाणी असल्याने सर्वांग परिपूर्ण कौटुंबिक जीवन निर्माणच होऊ शकत नाही. परिणामी, मुस्लीम समाजाच्या मागासलेपणात भर पडते. असे हे दुष्टचक्र असल्याने शासनाने मुस्लीम महिलांच्या शिक्षणाला पुरेपूर पाठिंबा दिला पाहिजे. सर्व महिलांनी अत्यंत कळकळीने हा मुद्दा मांडला. या म्हणण्याला तरी आधुनिक मुस्लीम पुरुष वर्गाचा विरोध नसावा, असे वाटते.

विवाह व तलाक पद्धतीविरुद्ध कायदा हवा :

तसाच दुसरा ठरावही अत्यंत क्रांतिकारक स्वरूपाचा होता. मुस्लिमांच्या परंपरागत विवाह पद्धती व तलाक पद्धती बदलण्याची मागणी करणारा हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला–

'अंगावरचा शर्ट बदलावा तितक्या सहजतेने मुस्लीम पुरुष आपली बायको बदलू शकतो. या प्रसंगी मूळच्या धार्मिक तत्त्वात काय आहे, ही तत्त्वचर्चा कुचकामी आहे आणि प्रत्यक्षात सामाजिक परंपरा कशी घातक बनली आहे, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. परंपरावाद्यांचे नेहमीचे प्रतिपादन असते की, 'जगाला वाटते तितक्या सहजतेने मुस्लीम पुरुषाला तलाक घेता येत नाही.' पुरुषी अहंकाराने ग्रासलेले धर्मांध मुल्ला–मौलवी हे कधीच कबूल करणार नाहीत. प्रत्यक्षात अगदी वाटेल त्या कारणावरून पुरुष तलाक घेतात व बायका बदलतात. सर्व पुरुष तसे नसतील, म्हणून त्याबद्दलचा कायदा करून होणारा अन्याय दूर करू नये, हे म्हणणे चुकीचे आहे. 'बायकोच्या डोक्याचा आकार थोडा मोठा म्हणून' तलाक दिल्याचे उदाहरण पुढे आले. तसेच मुस्लीम पर्सनल लॉचा वीस टक्के चांगला भाग कोठेही प्रचलित नाही आणि शिल्लक राहिलेला भाग अन्यायकारक आहे. पित्याच्या मृत्यूनंतर मुस्लीम कन्येला १/८ वाटा मिळतो. सासरा हयात

असताना विधवा झालेल्या मुस्लीम सुनेला काहीच हिस्सा मिळत नाही. या गोष्टी कलियुगातील जीवन संघर्षात महाभयंकर स्वरूपाच्या आहेत.'

त्यामुळे ब्रिटिशांनी तयार केलेल्या शरीयतवर आधारित संमत केलेल्या १९३७च्या कायद्यामध्ये बदल करण्याची मागणी या परिषदेने केली.

बुरखा हटाव :

मध्ययुगीन गुलामगिरीचे प्रतीक असणारा 'बुरखा हटाव'ची महिला परिषदेने केलेली घोषणा ही त्यांच्या जागृतीचा अविष्कार होती. पडदानशीन महिलांच्या या घोषणेला दुहेरी अर्थ होता. स्त्रीने गुलामगिरीची चौकट मोडून टाकावी व निकोप, स्वातंत्र्ययुक्त वातावरणात तिचा विकास घडावा, ही त्यामागील प्रेरणा होती. तसेच स्त्रीला भोगवस्तू मानणाऱ्या पुरुषी अहंकाराचा पडदा फाडून टाकावा, हे क्रांतीचे आवाहन आहे. तसेच भारताचा विकास घडविण्यासाठी लोकसंख्या मर्यादित ठेवणे, हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे आद्य कर्तव्य असल्याने कुटुंब नियोजन हे राष्ट्रीय कर्तव्य मानून त्याच्या प्रचाराची घोषणा या महिलांनी केली. तीनपेक्षा अधिक मुले असलेल्या व धार्मिक श्रद्धांच्या बुरख्याआड दडून कुटुंब नियोजनाला विरोध करणाऱ्या सरकारी नोकर किंवा समाज गट यांना मिळणाऱ्या सरकारी सवलती कमी अगर रद्दच कराव्यात' ही परिषदेची शिफारस मुस्लीम महिलांनी व्यक्त केलेल्या राष्ट्रीय जबाबदारीचे द्योतक होती व त्यामुळे अभिनंदनीय होती. तसेच 'बुद्धिप्रामाण्य, धर्मनिरपेक्ष व समानतेवर आधारित असे आधुनिक, व्यावसायिक व विज्ञाननिष्ठ शिक्षण मुस्लिमांनी घेतले, तरच राष्ट्रीय जीवनात मुस्लीम समाज आपले योग्य स्थान घेऊ मिळवू शकेल' हा मुद्दा ठराव रूपाने मांडला गेला. विशेषतः 'मुस्लीम महिलांना प्रादेशिक भाषेतून व्यावसायिक शिक्षण मिळाल्याखेरीज त्या अन्यायाविरुद्ध लढू शकणार नाहीत. म्हणून त्यांना प्रादेशिक भाषेतून शिक्षण मिळणे आवश्यक आहे. म्हणून मुस्लीम संस्थांनी चालविलेल्या शाळांमधील शिक्षणक्रमांत बुरसट विचार शिकविण्यासाठी सार्वजनिक पैशाचा विनियोग होऊ नये, यासाठी काटेकोर व कडक तपासणीची पद्धत चालू केली पाहिजे' ही त्यांची मागणी रास्तच होती. इतर जातीजमातींची मुले जात असलेल्या शाळांमध्येच प्रवेश घेण्याबाबत मुस्लीम मुलांना उत्तेजन देण्याची चळवळ सुरू करण्याचे आवाहन परिषदेत केले गेले.

थांबला तो संपला :

या सर्व क्रांतिकारक ठरावांच्या विरुद्ध परंपरावाद्यांनी धर्मसंकट आल्याचे निमित्त करून हुशारीचा बिगुल वाजविला, यात काहीच आश्चर्य नव्हते. परंतु परंपरावादी मुस्लिमांनी काळाचे बदलते प्रवाह जाणले पाहिजेत. सृष्टी ही स्थिर नाही, तिच्या प्रवाहाचे चक्र अविरत सुरू असल्याचे विसरता कामा नये. या प्रवाहात 'जो थांबला, तो संपला.' भारतीय मुस्लिमांच्या सामाजिक जीवनात आलेला हा क्षण अत्यंत क्रांतिकारक होता. या एकविसाव्या शतकात सर्व घटक अत्यंत वेगाने बदलत आहेत. आपले विचार, साहित्य, धर्मकल्पना, आपला समाज, राष्ट्रीय हितसंबंध, भौतिक व अध्यात्मिक जीवनाच्या कल्पना या सर्व बदलत असताना दुर्दैवाने मुस्लीम हा एकच

समाज स्थिर राहण्याचा प्रयत्न करणारा घटक असल्याचे दिसून येते. १४०० वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या आणि पृथ्वीच्या अंतापर्यंत टिकणाऱ्या शाश्वत सत्याचा दावा सांगून स्थिर राहण्याचा प्रयत्न मुस्लीम समाज करतो आहे. पण स्थितिशीलत्वदेखील परिस्थितीसापेक्ष असते. इस्लामपूर्व काळात घडलेल्या वैचारिक इतिहासाच्या संदर्भात पाहिले, तर लक्षात येते की, त्या काळाच्या तुलनेने इस्लामने अनेक सुधारणात्मक बदल घडवून समाजाला पूर्णत्वास नेले. कालांतराने तत्त्वांत स्थिर घटकांचा विस्फोट होतो व विनाश होतो, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. म्हणजे मुस्लिमांनी परिवर्तनाकडे पाठ फिरवली, तर त्यांचा अध:पात अटळ आहे आणि आज सारा मुस्लीम समाज या विस्फोटाच्या क्षणाप्रत येऊन पोहोचला आहे. याची दखल निदान सुशिक्षित व समंजस मुसलमानांना घ्यावीच लागेल. महिला परिषदेने याची जाणीव करून दिली.

कोणताही धर्म निसर्गप्रेरणा व त्यांवर आधारित श्रेष्ठ मूल्ये यांवर उभा असतो आणि त्या मूल्यांना चिरंतनत्वाच्या आकर्षक मखरात बांधण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु तथाकथित शाश्वत मूल्ये आधारित असलेल्या प्रेरणाच अस्थिर व गतिमान असतात, हे आपण नेमके विसरतो आणि बदलत्या परिस्थितीत ठराबीक मूल्यांना चिकटून राहण्याचा अनैसर्गिक प्रयत्न केल्यानेच सामाजिक विस्फोटाचा धोका निर्माण होतो. स्वातंत्र्योत्तर काळात धर्म व जातिनिरपेक्ष समाज, न्याय, स्वातंत्र्य, समता व व्यक्तीची प्रतिष्ठा यांवर आधारित लोकसत्ताक समाज ही आपल्या संविधानाने स्वीकारलेली मूल्ये क्रांतिकारक व विसाव्या शतकातील नव्या वैचारिक प्रेरणांवर आधारित आहेत. सारा भारत परिवर्तनाच्या प्रक्रियेने प्रभावित झाला असताना मुस्लीम समाज स्थिर राहिला, तर ते त्यालाच अनर्थकारक ठरणार असल्याची जाणीव या महिला परिषदेने करून दिली.

महमंद पैगंबर हे प्रेषित असल्याचे, द्रष्टे असल्याचे कोणीही नाकारलेले नाही. पण द्रष्ट्याची दृष्टीही तत्कालीन सृष्टीवर आधारित असते व सृष्टी बदलत असताना प्रेषितांच्या शिकवणुकीचा नवा अर्थ लावला गेला नाही, तर ती शिकवणूक साचेबंद परंपरा बनून त्यातील प्रवाही, काळसापेक्षता संपून विनाशाकडे वाटचाल सुरू होते. *(मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सोलापूर शाखेचे तत्कालीन अध्यक्ष प्रा. फक्रूद्दीन बेन्नूर यांचा १६ जानेवारी १९७२ रोजी संचार या वृत्तपत्रामधील लेख)*

वजीर पटेल यांचे पत्रक या शीर्षकाखालील मजकूर चौकटीत टाकावा.

वजीर पटेल यांचे पत्रक

(धर्माचे आड बहुपत्नीत्वाची सहुलत म्हणजे हास्यास्पद आणि निंदनीय प्रथा)

मुस्लीम समाजातील बहुपत्नी विवाह पद्धती ही अत्यंत घातक विवाह पद्धत आहे. अशी विवाह पद्धती प्राचीन काळी प्रचलित होती. बहुपत्नीत्वाचा हक्क नबाब, सरदार, जहागीरदार यांना होता, परंतु आज जिथे संस्थानिकांचे विशेष अधिकारही रद्द करण्यात आले आहेत, तिथे बहुपत्नीत्वाची पद्धत असणे खरोखरच हास्यास्पद आणि निंदनीय आहे. या अर्थाचे पत्रक मुस्लीम सत्यशोधक समाजाचे अमरावती येथील नेते वजीर पटेल यांनी काढले. मुस्लीम

समाजातील या बहुपत्नीत्वाच्या पद्धतीमुळे मुस्लीम स्त्रियांवर अनेक प्रकारच्या आपत्ती ओढवत आहेत. म्हणून या अंध, गलिच्छ, निंदनीय प्रथेला आळा घालण्यास बहुपत्नी प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होणे आवश्यक आहे. मुस्लीम समाजाला धर्माच्या नावावर देण्यात आलेल्या सर्व सवलती रद्द करण्यात याव्यात. कारण अशा सवलतींमुळे मुस्लीम समाजाची प्रतिमा वेगळी ठरविण्यात आली आहे. भविष्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी ही पद्धत अत्यंत घातक आहे. 'मुस्लीम समाज, त्याच्या चालीरीती आणि रक्तही वेगळे आहे' अशी भावना देशातील अन्य समाजांत दिवसेंदिवस बळकट होत आहे. अनेक ठिकाणी झालेल्या दंगलींस हे कारण पुरते आणि या विषारी भावनेला काही जातीय संघटना खतपाणी घालतात, असे वजीर पटेल यांनी म्हटले आहे. समाजाच्या समस्या निवारणासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ अविश्रांत झटत आहे. या मंडळाच्या विदर्भ विभागाचा प्रमुख या नात्याने मी अमरावती जिल्ह्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, युवक, शिक्षण, कामगार, महिला संघटना, बार असोसिएशन, नगर परिषदा, समाज सुधारक संघटना यांना विनंती करतो की, 'मुस्लीम समाजाला बहुपत्नी विवाह प्रतिबंधक कायद्यात धर्माच्या नावावर देण्यात आलेल्या सवलती रद्द कराव्यात आणि कायद्यात आवश्यक ते बदल घडवून आणावेत' यासाठी त्यांनी ठराव करून त्याची प्रत पंतप्रधान इंदिरा गांधी, राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी, कायदेमंत्री गोखले, राज्यपाल अली यावर जंग यांना तसेच मला पाठवावी. असे आवाहन पटेल यांनी आपल्या पत्रकात केले आहे. या आवाहनास सकारात्मक प्रतिसाद देऊन, युवक-युवतींनी सक्रिय भाग घेऊन जनजागृती करावी; विद्यार्थी संघटनांनी बौद्धिके घ्यावीत, असाही ठराव वजीर पटेल यांनी केला. *(दैनिक बातमीपत्र, अमरावती. ४ सप्टेंबर १९७२)*

सोलापूर शाखेचा वर्धापन दिन

सोलापूर शाखेच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. धार्मिक समूह धर्माचा आधार घेऊन कालबाह्य परंपरा जपतात आणि प्रगतीची दारे बंद करतात, असे प्रतिपादन या वेळी करण्यात आले. तसेच हिंदू-मुस्लीम दोन्ही समाजांत असलेली प्रबोधनाची गरज व्याख्यानातून व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमात हिंदू-मुस्लीम दोन्ही समूहांतील अनेक लोक उपस्थित होते.

३.१० समान नागरी कायद्यासाठी सायकल मोर्चा

(समान नागरी कायद्याच्या आग्रही मागणीसाठी महाराष्ट्राच्या विविध भागांत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कोल्हापूर, पुणे व इतर ठिकाणी सायकल मोर्चा काढण्यात आला. यात मंडळाचा पुढाकार होता आणि अनेक ठिकाणच्या या उपक्रमात हमीद दलवाईंनी भाग घेतला होता.)

१२ ऑगस्ट १९७२ रोजी सकाळी कोल्हापुरातील बिंदू चौकातून युवकांचा सायकल मोर्चा गावातून घोषणा करीत फिरताना दिसला, तेव्हा नागरिकांचे लक्ष स्वाभाविकच त्याकडे वेधले गेले. 'समान नागरी कायदा ताबडतोब', 'साने गुरुजी की आरमान, सब नागरिक है एकसमान' या घोषणांनी सर्व गल्ल्या दुमदुमून निघाल्या. 'ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंत सर्वत्र समान नागरी कायद्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत' असा ह्या युवकांचा आग्रह होता. 'संविधानाच्या ४४व्या कलमाचा आदेश त्वरित अमलात आणा व नागरिकांमध्ये जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत, लिंग असा कोणताही भेदभाव न करता सर्वांसाठी एकच कायदा करून राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातील भिन्न कायद्यांची धोंड दूर करा' असा उद्याच्या नियंत्यांचा आग्रह होता. बिंदू चौकातून निघालेला हा मोर्चा आमदार बोंद्रे, आमदार कारखानीस, नगरपालिका व जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्या निवासस्थानी गेला व त्यांनी निवेदने दिली. जिल्हा परिषदेचे मावळते अध्यक्ष दिनकरराव यादव यांनी मोर्च्याचे निवेदन स्वीकारले व ' 'केंद्र सरकारने त्वरित समान नागरी कायदा करावा' अशी मागणी करणारा प्रस्ताव जिल्हा परिषद करील' असे आश्वासन दिले.

कॉमर्स कॉलेजवर मोर्च्याचे रूपांतर एका सभेत झाले. या सभेचे मुख्य पाहुणे हमीद दलवाई होते आणि अध्यक्ष स्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू अप्पासाहेब पवार होते. हमीद दलवाई म्हणाले, 'समान नागरी कायदा करा' याचा अर्थ काही मतलबी लोक 'हिंदू कोड बिल इतरांना लागू करणें' असा करतात. पण आम्हाला ते अभिप्रेत नाही. हिंदू कोड बिलातदेखील अनेक उणिवा आहेत. त्यांचेही उच्चाटन आम्ही करू पाहतो. २६ जानेवारी १९७५ रोजी आपल्या संविधानाचा रौप्य महोत्सव आहे; तत्पूर्वी 'सर्वांना लागू होणारा समान कायदा अस्तित्वात यावा' अशी युवकांची मागणी आहे; आणि ती सर्वांनीच उचलून धरली पाहिजे. कोल्हापूरचे युवक या बाबतीत आघाडीवर आहेत याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.'

कुलगुरू आप्पासाहेब पवार आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'युवकांच्या ह्या मोर्च्याच्या समारोपाच्या सभेत यायला मिळाले, यामुळे आनंद वाटला. खरेतर मोर्च्यात सामील व्हायला मला विशेष आनंद वाटला असता. कोल्हापूरच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या कामी पुढाकार घेतला, याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. धर्माच्या नावाखाली आता कोणालाही स्त्रियांना गुलामीत ठेवता येणार नाही. स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे झाली, तरीही या देशात धर्माच्या नावावर वेगवेगळे कायदे कायम राहावेत, ही गोष्ट चांगली नाही. हा प्रश्न काहीसा नाजूक आहे, आणि त्याची सोडवणूक रेशमी, पण बळकट हातांनी करावी लागेल. युवकांची या कामी

जबाबदारी मोठी आहे; आणि तेच अशा प्रश्नांची तड लावू शकतील. या कामासाठी जेव्हा युवक बोलवतील, तेव्हा मी अवश्य यायला तयार आहे.'

कोल्हापूरच्या महाविद्यालयात जुलै महिन्यात या विषयासंबंधी राष्ट्र सेवा दल व मुस्लीम सत्यशोधक मंडळ या संघटनांनी प्रबोधनाची मोहीम आयोजिली होती. तेव्हाच अप्पासाहेब पवारांनी आपला पाठिंबा व्यक्त केला होता. विद्यापीठातही याबाबत चर्चा आयोजित करण्याची त्यांची इच्छा होती, पण त्या वेळी ते घडून येऊ शकले नव्हते. युवकांच्या या सभेचे अध्यक्षपद भूषवून त्यांनी समान नागरी कायद्यासाठी चाललेल्या चळवळीबद्दल आपणाला वाटणारी सहानुभूती प्रकट केली. विद्यापीठे व महाविद्यालये यांनी प्रबोधनाची ही मोहीम हाती घेतली, तर ती अधिक प्रभावी झाल्याखेरीज राहणार नाही.

१४ ऑगस्ट १९७२ रोजी रात्री, पुणे येथे, अप्पा बळवंत चौकातून समान नागरी कायद्याची मागणी करणारा एक सायकल मोर्चा राष्ट्र सेवा दल, मुस्लीम सत्यशोधक मंडळ व युक्रांद यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. मोर्चात दोनशेवर सायकलस्वार होते. मोर्चा प्रथम केंद्रीय श्रममंत्री रघुनाथराव खाडिलकर यांच्या घरी गेला. तेथे निवेदन देण्यात आले. 'घटनेच्या चौवेसाळीसाव्या कलमाच्या त्वरित अंमलबजावणीचा आग्रह धरावा व अठराव्या वर्षी मतदानाचा अधिकार दिला जाण्यासाठी खटपट करावी' अशा मागण्या या निवेदनात करण्यात आल्या होत्या. 'या बाबतीत चालढकल केल्यास युवकांना आपली चळवळ तीव्र करावी लागेल' असाही इशारा या निवेदनात देण्यात आलेला होता. घरच्या मंडळींनी निवेदनाचा स्वीकार केला आणि ते खाडिलकर यांच्याकडे पोहोचते करण्याचे आश्वासन दिले.

मोर्चा पुण्यातील अत्यंत गजबजलेल्या लक्ष्मी रोडवरून गर्जत निघाला, तेव्हा त्यामागील अभिनव दृष्टीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मोर्चा गावातील प्रमुख रस्त्यांनी फिरून टिळक रस्त्यावर आला व केंद्रीय नियोजन मंत्री मोहन धारिया यांच्या घरच्या मंडळींकडे युवकांच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. समान नागरी कायद्याची मागणी करून युवकांनी अभिनव पद्धतीने स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचा प्रारंभ केला. साने गुरुजी स्मारकावर मोर्चाचे विसर्जन झाले. तेथे क्रांतिगाथा निवेदनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता; आणि महापौर निळूभाऊ लिमये यांच्या हस्ते मध्यरात्री राष्ट्रध्वज फडकावून त्याला मानवंदना देण्यात आली.

'समान नागरी कायदा त्वरित करण्यात यावा' अशी मागणी करणारा ठराव १३ ऑगस्ट १९७२ रोजी जळगाव येथे नागरिकांच्या प्रकट सभेत बहुमताने पास करून तो केंद्र व राज्य सरकारकडे पाठवण्यात आला. सभेला बरीच मुस्लीम मंडळी हजर होती, पण बहुतेकांनी ठरावाला विरोध केला. जळगावच्या नगराध्यक्षांनीच ठराव मांडला होता. जळगाव नगर पालिकेपुढेही हा ठराव विचारार्थ ठेवण्यात आला आहे.

१६ ऑगस्ट १९७२ची संध्याकाळ... दादरचा वनमाळी हॉल... राष्ट्र सेवा दल, मुस्लीम सत्यशोधक मंडळ, समाजवादी युवक सभा, युक्रांद यांच्या वतीने युवक परिषद आयोजित केलेली... संपामुळे नागरी जीवन पुष्कळसे विस्कळित झालेले, पण सभागृह युवकांनी भरलेले... आमदार प्रा. ग. प्र. प्रधान अध्यक्षस्थानी असतात. राष्ट्र सेवा दलाचे पांडुरंग कांबळी सर्वांचे

स्वागत करून परिषदेची कल्पना विशद करतात. त्यानंतर यदुनाथ थत्ते, श्रीमती मरियम रिफाई, आमदार पी. बी. पाटील व हमीद दलवाई हे समान नागरी कायद्याचे विविध पैलू सांगतात. 'समान नागरी कायदा भारतीय एकात्मतेसाठी आधारभूत होईल, पण त्याचबरोबर त्या दृष्टीने समाजाचे प्रबोधन करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत, जनशक्तीचा रेटा पाहिजे, अन्यथा कायद्याच्या पुस्तकातच तो बंदिस्त राहून जाईल' असे बजावण्यात येते. 'विषमतेमुळे मिळणाऱ्या लाभांचा लोभ युवकांना त्यासाठी सोडावा लागेल. समाजक्रांतीचा मार्ग खडतरच असतो, म्हणून तो तरुणांनीच चोखाळला पाहिजे' असे सांगण्यात येते. अध्यक्ष प्रधान म्हणतात, 'ज्यांनी कूळ कायद्याला व हिंदू कोड बिलाला विरोध केला, तीच मंडळी 'सीलिंग कायदा आणि समान नागरी कायद्याचे खरेखुरे पुरस्कर्ते आपणच आहोत' असे सांगताना दिसतात, तेव्हा सिनर्स हॅव फ्यूचर – पाप्यांना भविष्यकाळ असतो, या म्हणीची आठवण होते. 'समान नागरी कायदा' हे युवकांपुढील एक आव्हान असून युवक त्याचा मुकाबला कसा करतात, हा खरा प्रश्न आहे. मराठी युवकांनी याबाबत मागणी केली, ही अभिमानाची गोष्ट आहे. हा प्रश्न तडीला जाईपर्यंत त्यांनी स्वस्थ बसता कामा नये.'

युक्रांदचे गोपाळ दुखंडे हे समान नागरी कायद्याची मागणी करणारा ठराव मांडतात आणि समाजवादी युवक सभेचे कमलाकर सुभेदार त्याचे समर्थन करतात. टाळ्यांच्या गजरात ठराव पास होतो. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे मुकादम आभार मानतात आणि राष्ट्रगीतानंतर सभा संपते.

यानंतर कोणती पावले टाकायची, ते या संघटना ठरवणार आहेत. *(साप्ताहिक साधना, २९ जुलै १९७२, पृष्ठ क्र. १३-१४)*

'या देशातील विविध जाती-धर्माची माणसे शेजारी राहूनही भिन्न भिन्न अस्मितांमुळे कधीही एकमेकांजवळ येऊ शकली नाहीत. म्हणून माणसांचे सहजीवन संपन्न व साकार करणाऱ्या मानव्याच्या निर्मितीकरता भारतात समान नागरी कायदा केला पाहिजे' असे प्रतिपादन आचार्य दादा धर्माधिकारी यांनी नागपूर येथे केले.

'समान नागरी कायदा' या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन इंडियन सेक्युलर सोसायटीच्या (नागपूर) वतीने, हमीद दलवाई यांच्या उपस्थितीत व प्रा. र. बि. रानडे यांच्या अध्यक्षतेखाली येथील मातृसेवा संघात केले गेले. त्या प्रसंगी दादांचे भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले, 'जगात जशी भिन्नभिन्न संस्कृतींची व धर्मांची माणसे राहतात, तशीच ती या विशाल देशातही राहतात. म्हणून भारतीय नागरिकत्व हे विश्वनागरिकत्वाचे जुळे भावंड आहे, व भारतात होणारा समान नागरी कायदा जगातील सर्व नागरिकांकरता लागू होऊ शकेल. नागरिक आता नुसते एकमेकांशेजारी राहू नयेत, तर ते एकमेकांचे नातलग झाले पाहिजेत. यापुढे जगात जे कायदे होतील, त्यांचे उद्दिष्ट माणसांना भौतिकदृष्ट्या व सांस्कृतिकदृष्ट्या जवळ आणण्याचे असावे; धार्मिकदृष्ट्या वेगळे पाडण्याचे नसावे.'

हे विचार व्यक्त करण्यापूर्वी धर्माबद्दल विवेचन करताना दादा म्हणाले, 'जीवनाचे नियमन धर्माने झाले पाहिजे' असे आपण म्हणतो, तेव्हा एक अपसिद्धान्त मांडत असतो. ज्याला तुम्ही

धर्म-धर्म म्हणता, त्याने माणसाच्या जीवनाचा विकास होणे अशक्य आहे. प्रचलित धर्म कालबाह्य झाला आहे. माझ्या दृष्टीने आजचा धर्म हा अध्यात्म व नीतिशास्त्र सोडून उरलेला धर्म आहे! आजचा धर्म पृथक्तावादी (अलगतावादी) आहे. 'अस्पृश्यता धर्ममान्य असली, तरी ती आम्ही मान्य करणार नाही' अशी प्रतिज्ञा आपण करतो, तेव्हा जे समाजहिताला प्रतिकूल आहे, ते धर्ममान्य असले, तरी ते आम्ही चालू देणार नाही, असा त्याचा अर्थ होय. मानवी संबंधांत जो बाधा आणतो, तो धर्म हे पाप आहे!

'कोणत्याही धर्माने स्त्रीचा स्वीकार व्यक्ती म्हणून क्वचितच केला आहे. तिला त्याने वस्तू किंवा संपत्तीच मानले आहे. मानव्यापेक्षा धर्म गौण आहे' याबर भर देऊन दादांनी शरीयत कायद्याच्या संदर्भात सुचविले की, 'स्त्री व पुरुष विवाहाच्या संदर्भात समान पातळीवर मानले गेले पाहिजेत. सर्वांचे विवाह एकाच पद्धतीने व्हावेत. हिंदू-मुसलमानांचेही विवाह व्हावयास हवेत. हे नको म्हणणारे पृथक्तावादी (आयसोलेशनिस्ट) आहेत. त्यांची भूमिका वैज्ञानिकदृष्ट्या चुकीची आहे.

'चार बायका करण्याची सवलत देणाऱ्या धर्मात बदल न करणे, हा स्त्रीत्वाचा उपमर्द आहे! ज्या विवाहपद्धतीने स्त्रीवर अन्याय होतो, ती पद्धती कुराणात सांगितलेली असो, बायबलात सांगितलेली असो किंवा हिंदू धर्मशास्त्रात सांगितलेली असो... ती बदलली पाहिजे. संपत्तीच्या आकांक्षेतून, विशेषतः संचयाच्या कल्पनेतून वंशपरंपरा व वारसा हक्क या कल्पनांचा जन्म झाला. कुलीनतेच्या भावनेचे मूळ यातच आहे. 'हा कुलीन, तो अकुलीन' हे सर्व बुरसटलेले विचार आहेत.'

त्यानंतर हमीद दलवाई आपल्या भाषणात म्हणाले की, ' 'समान नागरी कायदा असावा' ही भूमिका धर्मविरोधी नाही. 'धर्म पाळूच नये' असे आमचे म्हणणे नाही. 'हा कायदा मुसलमानांवर लादला जात आहे' असे समजणे चुकीचे आहे; हिंदूसाठीही तो असणार आहे. सध्या सनातनी हिंदू चूप बसलेले दिसतात, पण जेव्हा कायद्याचा तपशील ठरेल, तेव्हा त्याला मुसलमान समाजच विरोध करणार नाही, तर सनातनी हिंदू व केरळातील सनातनी कॅथॉलिकदेखील विरोधासाठी उफाळतील.' असा इशारा देऊन ते म्हणाले, 'या बाबतीत प्रथम सर्वांना शिक्षित करणे आवश्यक आहे.' *(साप्ताहिक साधना, ९ सप्टेंबर, १९७२, पृष्ठ क्र. १४)*

३.११ मंडळाचे अभ्यास व स्नेहमीलन शिबिर – कोल्हापूर

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे यशस्वी शिबिर

'आपण भारतीय पूर्वी कधी एक नव्हतो. आपले कधी एक राष्ट्र नव्हते. म्हणून एका संघराष्ट्राची उभारणी करणे, ही गोष्ट भारतीयांना नवीन आहे. त्यासाठी केवळ राजकीय व आर्थिक प्रश्न सोडविणे पुरेसे नाही. लोकांची मानसिक तयारी करणे आवश्यक आहे. हे कार्य कोणत्याही एकट्यादुकट्या समाजाचे नसून भारतीयांचे आहे.' असे उद्‌गार येथील आंतरभारती महाविद्यालयाच्या सभागृहात भरलेल्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या शिबिराचे उद्‌घाटन करताना पद्मभूषण अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी काढले.

सत्यशोधकाची भूमिका :

मंडळाच्या स्थापनेमागे, कार्यामागे आपली प्रेरणा व साहाय्य असल्याचे सांगून हमीद दलवाई म्हणाले, 'कार्यकर्त्यांची एकमेकांशी ओळख होणे व मंडळाच्या कार्याला गती देणे हा या शिबिराचा उद्‌देश आहे.' मंडळाच्या नावातील औचित्य व मंडळाचे कार्य याबाबत माहिती सांगून शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना दलवाई म्हणाले की, 'धर्म हेच मुस्लिमांच्या मागासलेपणाचे कारण नाही. येथे त्यांच्या राजकारणाचा, त्याचप्रमाणे सामाजिक व आर्थिक परिस्थितीचाही विचार केला पाहिजे. हिंदू मुसलमान फाळणीनंतरच भांडू लागले, असे नसून पूर्वीपासून त्यांची

हमीद दलवाई, बाबुमियाँ बँडवाले, हुसेन जमादार, अब्दुल कादर मुकादम, सुरेश शिपुरकर आणि इतर. (कार्यकर्ता शिबिर – १९७२)

भांडणे होत होती. त्याचबरोबर हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की, आमच्या काळात एक सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी मुस्लीम नेतृत्व असमर्थ ठरले. म्हणून पुरोगामी मुस्लीम तरुणांनी मुसलमानांच्या खुळचट कल्पना नष्ट करून त्या वास्तवाच्या पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. भारतीय उपखंडातील बदलत्या परिस्थितीत मंडळाचे कार्य अतिशय महत्त्वाचे ठरणार आहे. देशात एक अशी परिस्थिती निर्माण होते आहे की, हिंदू-मुस्लीम प्रतिगामी व एकमेकांविरुद्ध भांडणारे एकत्र येत आहेत, तसेच सर्व समाजातील पुरोगामीही एकत्र येत आहेत. अशा परिस्थितीत मरीव कार्य करून मंडळाने सिंहाचा वाटा उचलायला हवा.'

त्यानंतर मरियम रिफाई यांनी मंडळाचे कार्य करताना आलेले अनुभव सांगितले. निरनिराळ्या ठिकाणांहून आलेले शंभर मुस्लीम तरुण व पन्नास मुस्लीम स्त्रिया शिबिराला उपस्थित होत्या. त्यांमध्ये बाबुमियाँ बँडवाले, अ. का. मुकादम, अमीर शेख, रफी सय्यद, सौ. बानुबी पठाण वगैरेंचा समावेश होता. पहिल्या दिवशी सकाळी दहा वाजता कार्यकर्त्यांची बैठक झाली. रात्री शिबिरार्थींची चर्चा होऊन पहिल्या दिवशीचा कार्यक्रम संपला.

सामाजिक कायदे फसले :

हमीद दलवाईंच्या भाषणाने दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम सुरू झाला. 'स्वातंत्र्याची २५ वर्षे व सामाजिक सुधारणा' या विषयावर भाषण देताना दलवाई म्हणाले, 'आपल्या देशात कधीही समानता नव्हती. इतकेच नव्हे, तर मुसलमान-मुसलमानांतही कधी समानता नव्हती, हे आपण समजून घेतले पाहिजे. आपल्याकडे आलेल्या सुधारणा स्वातंत्र्यानंतर आल्या आहेत. लोकशाही व समता यांमुळे एक नवी जाणीव निर्माण झाल्यामुळे देशातील कटकटी होत आहेत. देशात प्रौढ लोकही आहे. बहुसंख्य लोक अशिक्षित, धर्मभोळ्या स्वभावाचे असल्याने त्यांचे सरकारही तसेच असणे शक्य आहे. यासाठीच त्यांच्याकरता सोयीसुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्यामध्ये आपल्या अधिकाराविषयी योग्य जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. हे न झाल्याने आपल्या देशातील सर्व सामाजिक कायदे फसले आहेत. कारण इथल्या नागरिकांना न भांडता समानतेचे फायदे मिळाले आहेत. त्यामुळे त्यांना या फायद्यांची कदर नाही. उलट युरोपात लोकांनी भांडून समानता आणली. म्हणून ती आदराने जोपासली जाते.'

समान नागरी कायदा :

आपल्या खुसखुशीत, पण विचारप्रवर्तक भाषणात दलवाई पुढे म्हणाले की, 'आशिया-आफ्रिका खंडांत भारताचे स्थान महत्त्वाचे आहे. या खंडातील इतर देशांपेक्षा भारतामध्ये स्थिर लोकशाही आहे; समाज जिवंत आहे. म्हणून भारतात इतर देशांप्रमाणे नाट्यमय किंवा रक्तमय क्रांती कधीही होणार नाही. होणारे बदल हळूहळू पण निश्चितपणे होत राहतील. हिंदू समाजात सुधारणा झाल्यामुळे त्यांच्यात लोकशाही, समानता, राष्ट्रवाद ही मूल्ये रुजण्यास मदत झाली आहे. या गोष्टी मुस्लीम समाजातही घडवून आणण्यासाठी त्यांच्याही समाजात सुधारणा व्हायला हवी. 'समान नागरी कायदा' हा त्याचाच एक भाग आहे. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्य वाढविण्यास मदत

होणार आहे. मुस्लिमांनी आपले दोष जाणून घ्यावेत, शास्त्रीय दृष्टीने सर्व परिस्थितीचा विचार करावा, कितीही कटू असले तरी सत्य मान्य करून त्याप्रमाणे आपल्यात बदल घडवून आणावा' असे सांगून त्यांनी आपले भाषण संपविले. अ. का. मुकादम यांनी कार्यकर्त्यांना आपण संघटनेचे जबाबदार सभासद आहोत याची जाणीव ठेवून आपल्या कार्याविषयी अढळ निष्ठा ठेवण्याचे आवाहन केले.

कार्यकर्त्यांचे योगदान :

दुपारी ३ ते सायंकाळी ७पर्यंत कार्यकर्त्यांच्या अनुभव कथनाचा कार्यक्रम झाला. समाजात मंडळाविषयी काय भूमिका आहे, आपणाला कसे कसे विचित्र प्रश्न विचारण्यात येतात, काही वेळेला काफिर ठरवून आपला छळ कसा केला जातो, याची मनमोकळी, दिलखुलास चर्चा झाल्यामुळे सर्वच कार्यकर्ते अधिक जवळ आले.

सायंकाळी सहा वाजता राजाराम हायस्कूलच्या सभागृहात जाहीर सभा झाली. गनी फरास यांनी प्रास्ताविक केले. हमीद दलवाई, मरियम रिफाई, बाबुमियाँ बँडवाले यांची भाषणे झाली. एन. वाय. मुलाणी यांनी आभार मानले.

मुस्लीम स्त्री-पुरुषांची वाढलेली उपस्थिती, दोन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम, निष्ठेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची मनमोकळी चर्चा हे या शिबिराचे यश होते व या शिबिराचे यश म्हणजे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे पाऊल पुढे पडत असल्याची पावती होती. *(दैनिक इंद्रधनुष्य २८ सप्टेंबर, १९७२)*

भावे नाट्यमंदिर, सांगली येथे २९ सप्टेंबर १९७२ रोजी हमीद दलवाई यांची जाहीर सभा या शीर्षकाखालील मजकूर चौकटीत टाकावा.

भावे नाट्यमंदिर, सांगली येथे २९ सप्टेंबर १९७२ रोजी हमीद दलवाई यांची जाहीर सभा :

'या देशातील मुस्लीम समाज आपल्या स्त्रियांना बरोबरीने वागविणार नाही, तोपर्यंत या समाजाची उन्नती होणे कठीण आहे. सामाजिकदृष्ट्या देशातील बहुसंख्य हिंदू धर्मीयांशी मुस्लीम समाजाने एकोप्याचे संबंध वाढीस लावले पाहिजे. या काळात त्यांनी दुसरीकडे कुठेही आपला डोळा ठेऊन चालणार नाही. आपली निष्ठा भारत देशाशी आहे, हे ठासून सांगण्याची व आचरण्याची बाब आहे' असे विचार हमीद दलवाई यांनी भावे नाट्य मंदिरात झालेल्या जाहीर भाषणात व्यक्त केले. *(दैनिक नवसंदेश, ३० सप्टेंबर १९७२)*

३.१२ मुस्लिमांना एकत्र आणण्यास 'इस्लाम' ही शक्ती अपुरी

बांग्लादेशाच्या निर्मितीनंतर, १९७२ च्या सुरुवातीला हमीद दलवाई यांचे सोसायटी ऑफ व्हॅन्गार्डतर्फे औरंगाबाद येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी बाबुमियाँ बँडवाले होते. या कार्यक्रमानिमित्त औरंगाबाद येथे गेले असताना दलवाईंनी औरंगाबाद येथील डी. एड.च्या मुस्लीम विद्यार्थिनींसोबत संवाद साधला आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याची माहिती दिली... दुपारी, सरस्वती भुवन येथे मुस्लीम नागरिकांच्या समोरही त्यांनी विचार मांडले... 'मुस्लीम समाजातील सामाजिक समस्यांसंदर्भात चर्चा करून मुस्लिमांनी काळानुसार बदलण्याची तयारी दाखवली पाहिजे' या विषयी सविस्तर भूमिका मांडली. या वेळी औरंगाबाद येथील कार्यकर्ते वली अहमद यांनीही आपले विचार मांडले. सहजीवन संघटनेतर्फे मुस्लीम युवकांच्या महाराष्ट्र हिंदी विद्यालयात युवकांशी संवाद साधण्यात आला. या वेळी ७५ हून अधिक मुस्लीम युवक व प्राध्यापक उपस्थित होते. या बैठकीत प्रश्नोत्तरांच्या रूपाने चर्चा झाली. एका प्रश्नाचे उत्तर देताना दलवाईंनी सामाजिक सुधारणा करताना येणाऱ्या संभाव्य अडचणींची कल्पना दिली. तसेच 'हे काम करताना थोडा-बहुत त्रास होणे, अडचणी येणे अपरिहार्य आहे, तरी मार्गात येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ सर्व प्रकारची मदत करेल' असे आश्वासन त्यांनी युवकांना दिले. नागरिकांच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी स्वातंत्र्यसैनिक गोविंदभाई श्रॉफ होते. जाहीर व्याख्यानात भारतीय मुस्लिमांचे राजकारण व त्यांची बांग्लादेशाच्या संदर्भातील भूमिका यावर हमीद दलवाईंनी भाष्य केले. 'राजकीय शक्ती म्हणून मुस्लिमांना एकत्र आणायला इस्लाम कमी पडत आहे, हा बांग्लादेशाच्या चळवळीचा अन्वयार्थ आहे' असे ते म्हणाले. 'मुस्लीम समाजाला बदलण्याची संधी आली असून त्याचा फायदा घेतला पाहिजे. या दृष्टीने भारतात अनेक ठिकाणी थोड्याफार का होईना, हालचाली चालू आहेत. मुस्लीम समाज हा अखेरीस एक समाज असल्याने त्यांच्यात वेगळ्या पद्धतीने का होईना, सावकाश का असेना, बदल होईल यावर माझा विश्वास आहे. लखनऊ, गुजरात, केरळ, तामीळनाडू येथे मुस्लीम समाजात सुधारणा व्हावी म्हणून संघटना निर्माण झाल्या आहेत. येत्या चार-पाच वर्षांत राष्ट्रीय पातळीवर अशांचा एक प्रभावी गट निर्माण होईल.

'बांग्लादेशासंबंधांत भारतीय मुस्लिमांच्या तीन प्रकारच्या प्रतिक्रिया आहेत. बऱ्याच मोठ्या गटाला वाटते, याह्या खानांचे बरोबर आहे; मुजीब अनुयायांना चिरडले पाहिजे. 'पाकिस्तानात ऐक्य राहणे आपल्या हिताचे आहे' असे या गटातील मुस्लिमांना वाटते. दुसऱ्या गटाला 'बंगाल्यांवर अन्याय झाला' हे पटते, पण 'त्यांनी बंड करू नये' असे त्यांचे मत आहे. 'अन्याय दूर व्हावा व बंड मोडून काढावे' असा त्यांचा आग्रह आहे. फारच थोड्यांचा तिसरा गट आहे. या गटाचा पूर्व बंगालच्या चळवळीला पाठिंबा आहे.'

'सुशिक्षित मुसलमानांचे डावपेच समजून घेतले पाहिजेत' असे सांगताना दलवाई म्हणाले की,

'जेथे मुस्लीम लीगचा अभिमान बाळगणारा सुशिक्षित मुसलमान 'भारतीय उपखंडाची राजकीय व्यवस्था कशी असावी, याचा विचार व्हावा' असे म्हणू लागेल, तेव्हा खरा बदल होईल. तसे हळूहळू व्हायला लागले आहे. माझा संघराज्य कल्पनेला विरोध आहे. डॉ. लोहिया यांची कल्पना आज उपयोगी नाही. कारण संघराज्याच्या कल्पनेतून जातीयता संपणार नाही. उलट लोकसंख्येच्या बळावर ते जातीयतेला खतपाणी घालतील. अखंड हिंदुस्थानच्या पुरस्कर्त्यांनी हे जाणून घ्यावे.'' भारतीय मुस्लिमांच्या प्रवृत्तीबद्दल बोलताना ते म्हणाले की, 'त्यांना पाकिस्तानबद्दल प्रेम का? भारतीय मुसलमान येथे राज्यकर्ते होते. त्यातून काही प्रवृत्ती निर्माण झाल्या आहेत. सुशिक्षित मुसलमानांना 'आपल्या हाती सत्ता असावी' असे वाटते. फिलिपाइन्समधील मुसलमान, इथियोपियातील मुसलमान याचकरिता संघर्ष करतात. रशियात लोकशाही नसल्याने तेथे मुस्लिमांचा प्रश्न नाही. ज्या देशात मुस्लीम बहुसंख्याक आहेत, तेथे ते थोडेसे का होईना उदारमतवादी असतात. जेथे ते अल्पसंख्याक आहेत तेथील राष्ट्रवाद मात्र ते मानत नाहीत.'

आपल्या अध्यक्षीय भाषणात बाबुमियाँ बँडवाले म्हणाले की, 'समाजाला धक्का देणे हे धाडसाचे कार्य आहे. हे कार्य दलवाई करीत आहेत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य धर्मविरोधी मुळीच नाही.'

प्रा. अदवंत यांनी बांगला मुक्ती संग्राम निधीसाठी १०१ रु. हमीद दलवाई यांच्या स्वाधीन केले व 'स्मरणिकेच्या विक्रीतून येणारी रक्कम त्यांना देण्यात येईल' असे जाहीर केले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. दाते यांनी आभार मानले. *(मंडळाच्या दफ्तरातून)*

३.१३ मुखपत्र : मुस्लीम सत्यशोधक पत्रिका

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या केंद्रीय कार्यकारिणीची सभा शनिवार, दिनांक २३ सप्टेंबर १९७२ रोजी, सकाळी १० वाजता, आंतरभारती सभागृह, कोल्हापूर येथे झाली. या बैठकीला बाबुमियाँ बँडवाले, अब्दुल कादर मुकादम, रफीउद्दिन सय्यद , हुसेन जमादार आणि कार्यकर्ते उपस्थित होते. 'मंडळाचे मुखपत्र म्हणून एक नियतकालिक त्रैमासिक स्वरूपात काढावे. या नियतकालिकात मंडळाच्या कार्याची माहिती, मंडळाच्या कार्याशी संबंधित अशा विषयांवर विद्वानांचे लेख, सेक्युलॅरिस्टमध्ये प्रसिद्ध झालेल्या काही लेखांचा मराठी अनुवाद, मंडळाच्या कार्यकर्त्यांचे लेख व पत्रे अशा तऱ्हेचा मजकूर प्रसिद्ध करण्यात यावा. या मुखपत्राचा पहिला अंक डिसेंबर महिन्याच्या शेवटी प्रसिद्ध करण्यात यावा. प्रत्येक अंकाच्या सुमारे ५०० प्रती काढण्यात याव्यात व त्या सर्व सभासद, काही राजकीय पुढारी, खासदार, आमदार, काही मंत्री, काही मुस्लीम पुढारी व संस्था यांना पाठवण्यात याव्यात.' असे या बैठकीत निश्चित करण्यात आले. या मुखपत्राचे नाव 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' ठेवून त्याची आर्थिक जबाबदारी केंद्रीय कार्यकारिणीने घेतली. या पत्राचे संपादन, प्रकाशन व इतर दैनंदिन कामाची जबाबदारी कोल्हापूर शाखेने स्वखुशीने उचलली.'

या निर्णयाप्रमाणे हुसेन जमादार यांनी पत्रिकेचे कार्यकारी संपादक म्हणून जबाबदारी घेतली.

मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचा पहिला अंक ५ जानेवारी १९७३ रोजी करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर येथे हमीद दलवाई यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. पत्रिकेचे पहिले पाच अंक सुरेश शिपूरकर यांच्या भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथून प्रकाशित करण्यात आले. नंतरच्या काळात ही पत्रिका पुण्यातून प्रसिद्ध होण्यास सुरुवात झाली.

मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे प्रकाशन या शीर्षकाखालील मजकूर चौकटीत टाकावा

मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे प्रकाशन

महाराष्ट्र मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे मुखपत्र 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' या मासिकाचा प्रकाशन समारंभ ५ जानेवारी १९७३ रोजी कोल्हापूर येथील करवीर नगर वाचन मंदिरात हमीद दलवाई यांच्या हस्ते पार पडला.

दलवाई आपल्या भाषणात म्हणाले, 'दिवसेंदिवस मंडळाचा व्याप हळूहळू, पण निश्चितपणे वाढतो आहे. त्या दृष्टीने मंडळाचे विचार अधिकृतपणे व्यक्त करणारे एखादे पत्रक असणे आवश्यक होते. म्हणून ही पत्रिका आम्ही सुरू करीत आहोत. मंडळाचे कार्य करणाऱ्यांना वेळोवेळी आलेल्या अडचणी किंवा पडलेले प्रश्न यांचे विवेचन करणे, हे या पत्रिकेचे उद्दिष्ट राहील. आज, या घडीला अनेक मुस्लीम पत्रके असली, तरी त्यांपैकी बरीच जातीयवादी आहेत. 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' हे पुरोगामी विचारांचे प्रतीक राहील. 'जातिधर्माच्या बेड्या मोडणे' हे तिचे उद्दिष्ट आहे. या पत्रिकेत केवळ मुसलमानांनीच आपली मते मांडावीत, असे नसून ती

सर्वांना खुली आहे. इतकेच नव्हे, तर यात सामाजिक प्रश्नही चर्चिले जावेत. थोडक्यात, या देशात आधुनिकतेचे वारे निर्माण करणारे सर्व प्रश्न या पत्रिकेमधून मांडले जातील.'

सुरुवातीला आय. एन. बेग यांनी प्रास्ताविक केले व शेवटी कोल्हापूर शाखेचे चिटणीस व पत्रिकेचे कार्यकारी संपादक हुसेन जमादार यांनी आभार मानले.

हमीद दलवाईंचे व्याख्यान आणि चर्चा

मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेच्या प्रकाशनाच्या निमित्ताने ५ जानेवारी १९७३ रोजी मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे प्रकाशन कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आले होते. या निमित्त हमीद दलवाई कोल्हापूरला गेले असता, समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष, साथी शंकरराव पाटील यांनी राधानगरी तालुक्यात फेजीवडे व कसबा तारळे येथे हमीद दलवाईंचा दौरा आखला. या ठिकाणी हमीद दलवाईंच्या जाहीर सभा झाल्या. येथे मुस्लीम समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. तारळ्यात मुस्लीम महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. जाहीर सभेनंतर मुस्लीम समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांवरही चर्चा झाली. यात उपस्थित केलेल्या प्रश्नांची हमीदभाईंनी साध्या-सोप्या भाषेत उत्तरे देऊन मंडळाच्या कार्याचा उद्देश स्पष्ट केला. आधुनिक शिक्षण आणि मराठी भाषेचा स्वीकार करून महाराष्ट्रातील उद्योग-व्यवसाय आणि नोकरी यांमध्ये मुस्लिमांचा टक्का वाढावा, यासाठी शासनानेही विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे हमीदभाईंनी या वेळी अधोरेखित केले. मुस्लीम महिलांच्या शिक्षणाची गरज व्यक्त करत असतानाच मुस्लीम महिलांना समान हक्क मिळण्यासाठी तोंडी तलाक आणि सवतबंदी करण्याची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली. हमीदभाईंचा हा दौरा, सभा आणि संवाद यशस्वी करण्यासाठी फेजीवड्याचे गनीसाहेब कलोट यांनी विशेष प्रयत्न केले. *(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, मे १९७३, कोल्हापूर)*

३.१४ मुस्लीम सामाजिक परिषद – मुंबई

मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटी यांच्या वतीने २५ मार्च १९७३ रोजी मुंबई येथे मुस्लीम सामाजिक परिषद आयोजित करणार असल्याची माहिती मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक आणि इंडियन सेक्युलर सोसायटीचे उपाध्यक्ष हमीद दलवाई यांनी वार्ताहर परिषदेत दिली. या वेळी प्रा. अ. भि. शहा, साहित्यिक दिलीप चित्रे आणि कार्यकर्ते अब्दुल कादर मुकादम उपस्थित होते. 'वंदे मातरम्' प्रश्नावरून मुसलमान समाजात निर्माण झालेले वादंग आणि त्यातून व्यक्त होणाऱ्या राष्ट्रविरोधी प्रवृत्ती हाणून पाडण्यासाठी व बहुजन अज्ञानी मुस्लीम समाजास त्यांचे खरे प्रश्न समजावून सांगण्यासाठी ही परिषद आयोजित करण्यात येत असल्याचे दलवाई यांनी सांगितले.

'मुंबई काँग्रेसने मुस्लीम जातीयवादाचा अनुनय केल्यामुळे महापालिका निवडणुकीत लीगला यश मिळू शकले' असे 'वंदे मातरम्' प्रश्नाबाबत सांगून दलवाई म्हणाले, 'गेले काही दिवस मुसलमानांतील जातीय शक्ती एकवटायचा पद्धतशीर प्रयत्न चालू आहे. अलीकडील अनेक घटनांवरून हे सिद्ध करता येईल. मुसलमानांच्या आजच्या आक्रमक पावित्र्याची योजना डिसेंबरात मुंबई येथे झालेल्या मुस्लीम पर्सनल लॉ परिषदेच्या वेळी आखण्यात आली होती.'

'देशाच्या विभाजनापूर्वी बॅरिस्टर जिना यांनी ज्या पद्धतीच्या हिंसाचाराचा अवलंब केला होता, त्याच पद्धतीचा हिंसाचार मुस्लीम जातीयवादी आज जाणून बुजून करीत आहेत' असे मत दलवाई यांनी व्यक्त केले. 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ व युवक क्रांती दल यांच्यातर्फे मुस्लीम पर्सनल लॉ परिषदेवर करण्यात आलेल्या शांततापूर्ण निदर्शकांवर झालेले हल्ले व जनसंघ मिरवणुकीवर रविवारी रात्री कामाठीपुरा भागात झालेला हल्ला अशी अनेक उदाहरणे याच्या पुराव्यादाखल देता येतील.' मुसलमान वस्तीत आपणांस व आपल्या कार्यकर्त्यांस फिरणेही अशक्य करण्यात आले असल्याचे व आपणांस जिवाचा धोका असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, '१० मार्च १९७३ रोजी मी काही मित्रांना भेटावयास गेलो असता, मला पंचवीस मुसलमानांच्या एका गटाने घेरले व मारावयाचा प्रयत्न केला. मुसलमान जातीयवाद्यांच्या या आक्रमक प्रवृत्ती मुळातच निपटून काढल्या नाहीत, तर मुसलमानांना आधुनिक बनवून राष्ट्रीय, राजकीय प्रवाहांशी एकरूप करणे शक्य होणार नाही. तसे झाले नाही, तर हिंदू जातीय प्रवृत्तीही डोके वर काढतील.' *(महाराष्ट्र टाइम्स, १४ मार्च १९७३)*

मुस्लीम सामाजिक परिषद

जनसंघ व कम्युनिस्ट यांच्या भीतीने मुसलमान समाज काँग्रेसच्या कच्छपी लागला, पण मुस्लीम स्त्रीला संरक्षण मिळवून देणे, मुस्लीम तरुणांना विचारी बनवणे काँग्रेसने त्याज्य मानले. 'आजच्या विज्ञान युगात मुस्लीम समाजात अनेक विसंगती आढळतात.' असे उद्‌गार या परिषदेचे उद्‌घाटक, इजिप्तमधील माजी राजदूत प्रा. असफ ए. ए. फैजी यांनी मराठा मंदिर, मुंबई येथील

सामाजिक परिषदेत बोलताना हमीद दलवाई.

मुस्लीम सामाजिक परिषदेत काढले. ते पुढे म्हणाले की, '१८२७च्या हेस्टिंग्जच्या रेग्युलेशननंतर कुराण व वेद यांना कायदा मानताही येणार नाही. म्हणून ज्याप्रमाणे हिंदूंच्या करिता हिंदू कोड बिल काढले, तसे मुस्लिमांकरिताही हवे. आपल्या संकुचित राजकीय हेतूसाठी काँग्रेसने मुस्लिमांना जवळ केले, पण मुस्लिमांत निकोप सुधारणा घडवण्याचे मात्र टाळले. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर पंचवीस वर्षे होऊनही मुस्लीम समाज मागासलेला राहिला. मुस्लीम सत्यशोधकांच्या कार्याविषयी गैरसमज पसरविणाऱ्या मंडळींनी गुपचूप अफवा व निंदानालस्ती करीत बसण्याऐवजी जाहीर व्यासपीठावरून वैचारिक पातळीवर मुकाबला करण्याचे आव्हान स्वीकारावे.'' इंडियन सेक्युलर सोसायटी व मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्या वतीने आयोजित या परिषदेसाठी सोलापूर, कोल्हापूर, भिवंडी, गुलबर्गा, चिपळूण, फलटण, श्रीगोंदा, पुणे अशा विविध ठिकाणांहून तीनशे प्रतिनिधी आले होते. यांत पंच्याहत्तर महिलांचा सहभाग होता.

स्वागताध्यक्ष बाबुमियाँ बँडवाले म्हणाले, 'मुस्लिमांना मानाने जगायचे असेल, तर भारताशी निमकहराम होऊन चालणार नाही. भारत हीच मातृभूमी व पितृभूमी मानून सुखाने नांदले पाहिजे. मुल्ला-मौलवींनी चुकीचे अर्थ लावल्याने व मतलबी नेत्यांनी चुकीचे मार्गदर्शन केल्याने मुस्लीम समाज मागासलेला राहिला.''

परिषदेचे अध्यक्ष हमीद दलवाई म्हणाले, 'आज आम्ही मुठभर असलो, तरी परिस्थीतीला

सामाजिक परिषदेत बोलताना प्रा. वि. अ. शेख.

शरण जाणार नाही. येत्या दहा वर्षांत जात्यंधतेचे कवच फोडून लाख-लाख उभे राहतील. ग्रामीण भागात आता नवा विचार फोफावत असून शहरी व पोशाखी नेत्यांना घेराव घालून जाब विचारू.' वैचारिक स्वातंत्र्यावर गदा आणणारे मुस्लीम जात्यंध नेते व संघटना यांच्या दहशतवादाचा दलवाईंनी कडाडून निषेध केला. या जात्यंध गुंडांकरवी शारीरिक बळाचा वापर करून आपल्याला आपले विचार मांडू देण्यास प्रतिबंध होत असल्याबद्दल खंत व्यक्त करून जर हा दहशतवाद थांबला नाही, तर दहशतवादाचा मुकाबला तशाच पद्धतीने करावा लागेल व तसे सामर्थ्य मुस्लीम सत्यशोधकाच्या ठायी आता संघटित झाले असल्याचा इशाराही त्यांनी दिला. 'मुस्लीम स्त्रियांना अन्यायकारक व विषमतेची वागणूक देणारे कायदे बदलणे, ही या काळाची गरज आहे आणि काळाची ही हाक दुर्लक्षणारा समाज कधीही प्रगती करू शकणार नाही' असे त्यांनी बजावले.

'वंदे मातरम्'च्या मुद्द्यावरून उठलेल्या वादळाचा उल्लेख करून दलवाई म्हणाले, 'मुसलमान असणे व या देशाचा नागरिक असणे या दोन गोष्टींत संघर्ष का उद्भवावा, हेच मला समजत नाही. मला मुस्लीम असण्याचा, त्याचा अभिमान बाळगण्याचा जसा हक्क आहे, त्याचप्रमाणे माझी मातृभूमी वंदनीय मानून तिच्यापुढे नतमस्तक होणे, हे माझे कर्तव्य आहे. 'मुसलमानांनो एक व्हा' हा नारा आकर्षक असला, तरी नुसते देशभराचे मुसलमान एक झाल्याने त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यांचे प्रश्न हे हिंदू समाजाचेही प्रश्न आहेत. आर्थिक विषमता किंवा सामाजिक उपेक्षा यांच्याशी सामना करताना 'तो मानव तितुका एकची आहे' याच भावनेतून व्हायला हवा. हिंदू व मुस्लीम पददलित समाजाचे तथाकथित नेते राजकीय स्वार्थाकरिता या समाजाची दिशाभूल करून

सामाजिक परिषदेत बोलताना मेहेरून्निसा दलवाई.

त्यांना आपसांत झुंजवित आहेत. वस्तुस्थिती जाणून आणि काळाची गरज ओळखून मुस्लीम समाजाने धर्मांधतेचे व खोट्या, भ्रामक, रूढ समजुतीचे ओझे फेकून दिले; तसेच हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध या साऱ्या देशबांधवांच्या खांद्याला खांदा भिडवून, या मातृभूमीशी निष्ठा राखून त्याने वाटचाल केली, तर मुस्लीम समाजाचा व या देशाचा उत्कर्ष निश्चित आहे.

परिषदेत काही प्रमुख ठराव मंजूर करण्यात आले. 'भारतीय राष्ट्रवादाच्या भक्कम पायावर समान नागरिकत्वाचा कायदा हवा. तो मान्य नसेलेल्यांनी पाकिस्तानात जावे.' असे मेहेरून्निसा दलवाई यांनी मांडलेल्या ठरावावर बोलताना फलटणचे प्राध्यापक वि. अ. शेख म्हणाले. या ठरावास मरियम रिफाई यांनी अनुमोदन दिले. 'सर्व धर्मीयांना समान हक्क असणारा कायदा हवा' अशी मागणी करणारा व हमीद दलवाई यांनी मांडलेला ठराव मंजूर करण्यात आला.

प्रा. अ. भि. शहा यांनी या परिषदेच्या आयोजनाचे प्रयोजन सांगितले. जमातवादी मुस्लिमांकडून होत असलेल्या कारवायांबद्दल चिंता व्यक्त करून या संकुचित जातीयतेच्या प्रभावातून मुक्त झाल्याखेरीज मुस्लीम समाजाचा विकास दुरापास्त असल्याचे शहांनी सांगितले.

या परिषदेवर ब्लॅक डिसेंबरवाल्यांनी धमकी दिली होती. या धमकीच्या सावटात ही परिषद आयोजकांनी निर्धाराने पार पाडली.

परिषदेच्या दुपारच्या सत्रात मुस्लीम समाज व राजकीय एकात्मता, शिक्षण, समान नागरी कायदा या विषयांवर चर्चा झाली. त्यात सय्यदभाई, कुलसूम पारेख, प्रा. फक्रूद्दीन बेन्नूर , श्रीमती मेहेरून्निसा दलवाई, मरियम रिफाई अशा अनेक प्रतिनिधींनी भाग घेतला. परिषदेच्या शेवटी, मुस्लीम फुटीरतेचा निषेध करणारा ठराव, आधुनिक विज्ञानाधिष्ठित शिक्षण प्रणाली

अंगीकारण्याचे आवाहन आणि समान नागरी कायदा या तीनही बाबींवर चर्चा झाली. शेवटी 'वंदे मातरम्' या गीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

या परिषदेमध्ये मराठवाडा विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्रा. डॉ. मोईन शाकीर यांचे भाषण झाले. ते म्हणाले, 'धर्मांध मुस्लीम नेते हिंदूंमधील जातीयवादाला खतपाणी घालत आहेत.' आजच्या मुस्लीम नेतृत्वावर त्यांनी टीका केली. 'ज्या तत्त्वज्ञानातून फाळणी झाली, त्या फाळणीमुळेही मुसलमानांचे प्रश्न सुटलेले नाहीत. उलट ते अधिक गहन झाले आहेत, पण आजचे मुसलमान नेते आपल्या राजकीय स्वार्थासाठी तेच तत्त्वज्ञान अजून मुसलमानांच्या गळी उतरवू पाहत आहेत. भूतकाळात वावरणारी या लोकांचीच वृत्ती धर्मनिरपेक्ष लोकशाहीच्या मार्गाच्या आड येत आहे' असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी बोलताना हमीद दलवाई म्हणाले की, 'राजकारणाच्या फायद्यासाठी सत्ताधारी पक्षही ही वृत्ती चालवून घेत आहेत.' हे योग्य नसल्याचे सांगून ते पुढे म्हणाले की, 'मुसलमान पुढारी हिंदूंमधील जातीयवादी वृत्तींना खतपाणी घालत आहेत. 'मागे पडलेल्या जनतेने तथाकथित पुढारलेल्यांना घेराव करून खतम करावे' ही माओची भूमिकाच आपण बठवणार आहोत.' असे सांगून, हमीद दलवाई म्हणाले, 'खेड्यातील अशिक्षित, अर्धशिक्षित मुसलमानांना घेऊन आम्ही शहरातील तथाकथित पुढारलेल्या मुसलमानांच्या वृत्तीला खतम करणार आहोत.' ते पुढे म्हणाले की, 'माझे माझ्या मुस्लीम बांधवांना एकच सांगणे आहे. ते म्हणजे, 'माझे मत माना' असा माझा आग्रह नाही; 'बनातवाला यांचे मानू नका' असाही माझा आग्रह नाही. माझा आग्रह इतकाच आहे की, तुम्ही विचार करा. मुसलमान विचार करतील, तर ते आमच्या मागे येतील, याची मला खात्री आहे. भारतातील मुसलमानांना विचार स्वातंत्र्य देण्याचा आमचा हा पहिला प्रयत्न आहे.' हिंदूंनी प्रागतिक राहण्यातही मुसलमानांची ही कृती अडथळा बनत असल्याचे दलवाई म्हणाले. 'जिनांपासून भुट्टोंपर्यंत आमचे सर्व नेते पूर्ण पाश्चिमात्य होते आणि तरीही त्यांनी धर्माबाबतचा जुनाटपणा चालू ठेवला. कारण त्यात त्यांचा स्वार्थ होता' असाही आरोप दलवाई यांनी केला.

प्रा. अ. भि. शहा यांनी आपल्या भाषणात 'स्वातंत्र्याच्या पंचवीस वर्षांनंतरही अर्धी मुसलमान जनता गुलाम आहे' याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. 'बांग्लादेशासारखे मुसलमान धर्मनिरपेक्ष राष्ट्र निर्माण झाल्यावरही आमच्या देशात जातीय वृत्ती असावी' याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. 'मुस्लीम समाज आधुनिक बनवावा' असे फैजी यांनी आवाहन केले. सत्ताधारी पक्षाला कोणताही मूलभूत फरक घडवून आणण्याची इच्छा नसल्याचेही त्यांनी सांगितले. 'शरीयतप्रमाणे कोणतीच गोष्ट होत नाही, हे शरीयतचा आग्रह धरणारे विसरतात. शरीयतप्रमाणे खलिफा कुठे आहे?' असा प्रश्न विचारून फैजी यांनी 'शरीयतसाठी लढणाऱ्यांना राजकीय क्षेत्रात खुर्चीची हाव आहे किंवा त्यांच्याकडची कुठलीही गोष्ट त्यांना सोडायची नाही' असा आरोप केला. 'आयोजित केलेल्या या सभेचा असा विश्वास आहे की, 'धर्म' ही प्रत्येक व्यक्तीची वैयक्तिक बाब आहे. म्हणूनच ही सभा मुस्लीम विघटन वृत्तीचा निषेध करत आहे. ही सभा आपल्या मातृभूमीवर प्रेम करणाऱ्या सर्व मुसलमानांना एकत्र येण्याचे आवाहन करत आहे. धर्म व संस्कृती यांच्या नावाखाली कोणतीही अधिक सवलत न मागता राष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात

एकरूप होऊन वैयक्तिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ही सभा सर्व मुसलमानांना आवाहन करत आहे.' हा ठराव मांडत असताना केलेल्या भाषणात दलवाई म्हणाले की, 'मुस्लिमांचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. भारतात जशी धर्मनिरपेक्षता आहे, तशी कोणत्याही मुस्लीम राष्ट्रात नाही. 'नाबाला धर्मनिरपेक्षता आहे' असे काही जण म्हणतात, म्हणूनच मी म्हणतो, 'जो नाम से है, वो हम काम मे लायें'.

'शरीयतमध्ये 'मुसलमानांनी हिंदुस्थानात राहावे' असे कुठे लिहिले आहे? मग 'तुम्ही हिंदुस्थान सोडून जा' असे तुम्हाला जर कोणी म्हणाले, तर त्यांना दोष देता येईल का?' या राजकीय ठरावाला सय्यद मेहबूब (पुणे) यांनी पाठिंबा दिला. त्याचप्रमाणे सर्वश्री हसन शेख (बोरीवली), शब्बीर शेख (कल्याण), कमरुद्दिन (वर्धा), सिकंदर हयात (पार्ले) यांनी या ठरावाला पाठिंबा देणारी भाषणे केली. शिक्षण विषयक ठरावाला प्रा. पठाण, प्रा. बेन्नूर , प्रा. शेख, इब्राहिम सिद्दीकी, आयेशा शेख, शब्बीर शेख, शफी एडवणकर यांची पाठिंबा देणारी भाषणे झाली. त्यांनी 'मुसलमानांनाही उर्दूऐवजी प्रादेशिक भाषेतून आधुनिक व शास्त्रीय शिक्षण देण्यात यावे व अशा संस्थांना शासनाने उत्तेजन द्यावे' अशी मागणी केली. तसेच 'काही मुस्लीम संस्था विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञानापासून परावृत्त करणारे व संकुचित मनोवृत्ती घडविणारे शिक्षण देत असतील, तर त्याकडे सरकारने कडक लक्ष पुरवावे' असेही सांगितले. याच ठरावात 'धर्माला काटेकोरपणे व्यक्तिगत आणि व्यक्ती आणि परमेश्वर यांच्या संबंधांपुरतेच मर्यादित राखले जावे. राजकारण किंवा समाजकारण यांत धर्माला स्थान नसावे आणि जातीजमातींतील तणाव वाढविण्यासही धर्माचा आधार घेतला जाऊ नये. मुस्लीम गृहिणीला बदलती सामाजिक मूल्ये व आधुनिक ज्ञान यांचे शिक्षण दिले, तर शेकडो वर्षे पडदानशीन राहिलेली ही स्त्री-शक्ती धर्मनिरपेक्ष लोकशाहीसाठी अनुरूप अशी नवी पिढी निर्माण करू शकेल. इतर धर्माची मुले असलेल्या शाळांतूनच मुस्लीम मुलांना शिक्षण दिले गेले पाहिजे' अशाही मागण्या करण्यात आल्या.

मेहेरून्निसा दलवाई यांनी समान नागरी कायदा करण्याची मागणी करणारा ठराव मांडला. त्यास श्रीमती मरियम रिफाई यांनी पाठिंबा दिला. श्रीमती मदिना अहमदुल्लाह यांनी या ठरावाला पाठिंबा देताना समान नागरी कायद्याची आवश्यकता प्रतिपादित केली व त्या म्हणाल्या, 'समान नागरी कायदा होईपर्यंत तलाकच्या पद्धतीत बदल होऊन तो कोर्टामार्फत घेण्याचा तरी कायदा ताबडतोब व्हायला हवा.' शेख वजीर पटेल यांनी सांगितले की, 'कुराणात काय आहे, याचा अभ्यास न करता मुस्लीम नेते सामान्य मुसलमानांना चुकीचे मार्गदर्शन करीत आहेत.' 'जातीयवादाचे मूळ नाहीसे होण्यासाठी व राष्ट्रीय एकात्मतेसाठी समान नागरी कायदा पोषक ठरणार आहे' असे श्रीमती बँडवाले यांनी सांगितले. 'समान नागरी कायदा ही काळाची हाक आहे' असे सांगून प्रा. व्ही. ए. शेख म्हणाले, 'एकदा पाकिस्तान झाल्यावर येथील मुसलमानांनी राष्ट्रवाद मान्य करणे किंवा पाकिस्तानात जाणे हाच पर्याय आहे. या राष्ट्राने सेक्युलॅरिझम मान्य केला आहे. मुसलमानांनी विचार प्रामाण्याकडे लक्ष दिले पाहिजे. पदवीधर झाला तरी येथील मुसलमानाला विचार प्रामाण्य माहीत नसते, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. हिंदुत्ववाद नष्ट करायचा असेल, तर प्रथम मुसलमानवाद नष्ट केला पाहिजे, आणि याच गोष्टीकडे शासनाने लक्ष दिले

पाहिजे.'

बाबुमियाँ बँडवाले यांनी काही दिवसांपूर्वी मुंबईत भरलेल्या मुस्लीम परिषदेच्या वेळी निदर्शकांवर झालेल्या दगडफेकीचा व नांदेड येथे झालेल्या मुस्लीम परिषदेचा उल्लेख केला. ते म्हणाले, 'नांदेड परिषदेत मौलाना आझाद, पंडित नेहरू यांच्यापासून इंदिराजीपर्यंतच्या महान व्यक्तींवर तोंडसुख घेण्यात आले. या तोंडसुख घेण्याऱ्यांत खादीचे डगले घालणारे, राष्ट्रीय म्हणवून घेणारे लोक होते. समान नागरी कायदा झालाच पाहिजे' असे सांगून त्यांनी 'माझ्या डोळ्यादेखत हा कायदा होईल' असा विश्वास व्यक्त केला. कमरुद्दिन, बेग साहेब, बारगीर, अशताफ पटेल यांची ठरावास पाठिंबा देणारी भाषणे झाल्यावर टाळ्यांच्या कडकडाटात एकमताने ठराव मंजूर झाला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अधिवेशन झाल्यास मराठा मंदिरची संपूर्ण इमारत उद्ध्वस्त करण्याची धमकी ब्लॅक डिसेंबर या संघटनेने दिली होती. यामुळे संपूर्ण पोलीस बंदोबस्तात ही परिषद सकाळी सुरू करण्यात आली. या धमकीचा प्रतिनिधींच्या उपस्थितीवर कोणताही परिणाम झाला नाही. *(नवशक्ती, मराठा, तरुण भारत २६ मार्च १९७३)*

३.१५ मुस्लीम परिषदेचे सत्यस्वरूप

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सुधारणावादी प्रयत्नांविरोधात मुस्लीम नेत्यांनी परिषद घेण्याचे ठरवले. या निमित्ताने सय्यदभाईंची वर्तमानपत्रात मुलाखत घेतली गेली. या वेळी सय्यदभाईंनी 'ऐंशी टक्के शरीयत रद्दबातल ठरली हे सांगत का नाही?' असा प्रश्न उपस्थित केला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक सदस्य व कार्यकर्ते असलेले सय्यदभाई हे एक आघाडीचे नेते होते. ते पुस्तकी विद्वान नव्हते, पण समाजाच्या दुःखाशी ते समरस झालेले असल्याने त्यांच्या बोलण्यात एक प्रकारची आच जाणवत असे.

प्रश्न – मुस्लीम व्यक्तिगत कायद्यासंबंधी मुंबईत परिषद भरत आहे, हे तुम्ही वाचलेच असेल. त्याबाबत तुमचे मत काय?

उत्तर – 'आपण मुस्लीम समाजाला रूढी, अज्ञान यांच्या अंधारात कायम ठेवू शकू' अशा अटकळीने ही परिषद घेण्यात येत आहे, असे मी समजतो. पण हे प्रकार फार दिवस चालू शकणार नाहीत. मुस्लीम समाजातही शिक्षणाची वाढ होत आहे आणि या तथाकथित पुढाऱ्यांचा उर्दू शाळा काढण्याचा खटाटोप चाललेला असला, तरी मुस्लीम मुले व मुली फार मोठ्या प्रमाणात मराठी माध्यमांच्या शाळा-कॉलेजातून शिकत आहेत. उर्दू शाळांत आपली मुले पाठवणे, म्हणजे आपल्या मुलांना तालुक्याच्या व जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या महाविद्यालयीन सोयींची दारे बंद करणे आहे, हे आता सामान्य मुसलमानांच्याही ध्यानी येऊ लागले आहे. एकदा ही मुले मोकळ्या मनाने व उघड्या डोळ्यांनी जगाकडे पाहू लागली, म्हणजे या मंडळींच्या अशा प्रयत्नांना फारशी साथ मिळणार नाही.

प्रश्न – तुम्ही फारच अल्पसंख्य आहात, असे परिषदेच्या चालकांनी पत्रकारांना सांगितले.

उत्तर – उपहास करून प्रश्न मिटत नसतात, हे ह्या मंडळींना अद्याप समजायचे आहे. हे राजकीय अपरिपक्वतेचे लक्षण आहे, असे मी समजतो. एवढा प्रचंड समाज त्यांच्या पाठी आहे, तर परिषदेचे दरवाजे बंद का? पत्रकारांना कोणत्या लोकशाही संस्थेचे दरवाजे कधी बंद असतात काय? निर्भयपणे, सर्वांसमक्ष आपले विचार येऊ देण्याची हिंमत ज्यांच्यात नाही, त्यांनी 'आपल्याच मागे जनता आहे' अशी कितीही हाकाटी केली, तरी ती कोण खरी म्हणेल? दुसरी गोष्ट म्हणजे, ज्यांना मुस्लीम व्यक्तिगत कायद्याचा जाच भोगावा लागतो, त्या स्त्रियांनाही या परिषदेची दारे बंद आहेत! त्यांच्या म्हणे सहया घेण्यात येणार आहेत. मग ह्या सहया देणाऱ्या स्त्रियांना तरी परिषदेत प्रवेश द्यावा ना? पण परिषदेचे संयोजक किती प्रतिगामी आहेत, तेच स्त्रियांना परिषदेची दारे बंद करून त्यांनी सिद्ध केले आहे. त्यात काँग्रेसचे फकी आणि हाफिज काझी आहेत याचे मात्र आश्चर्य वाटते!

प्रश्न – शरीयत ही देवाची म्हणून इतरांनी तिला हात लावता कामा नये, अशी परिषदवाल्यांची भूमिका दिसते.

उत्तर – त्यांचा देवावर पुरेसा विश्वास नाही, हेच त्यावरून सिद्ध होते. देवाने निर्माण केलेल्या गोष्टींचे रक्षण करण्याला देव असमर्थ आहे आणि ही दिवाभीते आता त्याचे हात बळकट करायला निघाली आहेत! कोंबडे झाकल्याने सूर्य उगवणार नाही, अशी त्यांची समजूत दिसते. शरीयतचा व्यक्तिगत कायद्याबाबतचा भाग पवित्र आणि अपरिवर्तनीय आणि बाकीचा तसा नाही, हे हे कुठल्या तोंडाने सांगतात? ऐंशी टक्के शरीयत रद्दबातल झाली. त्याबाबत बोलताना ही मंडळी काहीच सांगत नाहीत की तो भाग पुन्हा लागू व्हावा म्हणून खटपटही करीत नाहीत. शरीयतचा गुन्हेगारीविषयक व पुराव्याबद्दलचा कायदा काय चालू आहे?

पण हे सत्य हे लोक मुसलमानांना कधी सांगणार नाहीत. 'मुसलमान चोरांचे हात तोडण्यात येत नाहीत, हा शरीयतचा भंग आहे' असे सांगण्यासाठी या नेत्यांनी कधी मोर्चे काढले आहेत काय? शरीयतच्या यांच्या बाता हा शुद्ध खोटेपणा आहे. असत्याच्या बाजूला बहुसंख्य आहेत, म्हणून असत्य सत्य ठरणार नाही. स्वतः पैगंबर इस्लामच्या गोष्टी करू लागले, तेव्हा त्यांच्या बाजूला किती लोक होते आणि विरोधी किती होते? तेव्हा 'आम्ही किती' हा प्रश्न महत्त्वाचा नाही; 'आम्ही काय म्हणतो' ते महत्त्वाचे आहे. सत्य आमच्या बाजूला असेल, तर ते लोकांना आमच्या पाठीशी उभे केल्याबाचून राहणार नाही.

प्रश्न – तुर्कस्तानशिवाय इतरत्र मुस्लीम कायद्यात कोठेही बदल झाला नाही, असा त्यांचा दावा आहे.

उत्तर – महात्मा गांधींचे एक वचन या ठिकाणी आठवते. गांधी म्हणाले, 'असत्य हजार पायांनी पळते. तेव्हा त्याचा पाठलाग करण्यात अर्थ नाही.' परिषदेच्या चालकांचे हे विधान धडधडीत खोटे आहे. बहुतेक मुस्लीम देशांत बदल झाले आहेत... पाकिस्तानातदेखील झाले आहेत. तेथे आता मुक्तपणे तलाक घेता येत नाही. त्यासाठी न्यायालयाकडे जावे लागते. पण परिषदवाल्या मुसलमानांची अशी समजूत दिसते की, 'आपणच जगातले एकमेव सर्वश्रेष्ठ मुसलमान आहोत!' पुण्याच्या एका नेत्याला हा प्रश्न विचारला, तेव्हा तो म्हणाला, 'काय करणार, तेथे हुकूमशाही आहे ना?' म्हणजे एखाद्या हुकूमशहाने लाथा घातल्या की, हे मोकाटपणे ऐकायला तयार आहेत! तिथे यांची लोकशाहीची जाणीव कुठे शेण खायला जाते, ते कळत नाही! माफ करा एवढे कठोर बोलल्याबद्दल.

प्रश्न – भारतात मुसलमान अल्पसंख्य आहेत. तेव्हा शरीयतमध्ये एकदा बदल झाला, तर चूक झाल्याचे कळले, तरी ती दुरुस्त करता येणार नाही, असे परिषदवाल्यांचे म्हणणे आहे.

उत्तर – भारतातील या मुसलमानांनी आपल्या संसदेचे सार्वभौमत्व अद्याप मान्य केलेले नाही, हा त्याचा सरळ सरळ अर्थ आहे. ते पाकिस्तानी वृत्तीचेच निदर्शक आहे. घटनेच्या एकनिष्ठतेची त्यांची शपथ फसवी आहे. या देशात संसदेपेक्षाही शरीयतचे सार्वभौमत्व आहे,

अशी त्यांची समजूत झालेली दिसते. मुसलमान स्वतःला स्वतंत्रपणे या देशात सार्वभौम समजतात काय? देशात असलेले समान नागरीकत्वही त्यांना मान्य नाही, असे त्यावरून दिसते. मुस्लीम स्त्रियांना दिलेले मताधिकार काढून घेण्याचाही ही मंडळी प्रस्ताव करतील! सार्वभौमत्वाचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र विधानसभेत बनातवाला म्हणाले होते, 'महाराष्ट्र विधानसभेलाच काय, पण संसदेलासुद्धा मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात बदल करण्याचा अधिकार नाही!' हे आपण चालू देणार आहोत काय, हा खरा प्रश्न आहे. अर्थातच त्यांना प्रचाराचे स्वातंत्र्य आहे, पण संसदेच्या सार्वभौमत्वाला दिलेले आव्हान कोणताही भारतीय नागरिक सहन करू शकणार नाही, हे या मंडळींना बजावले पाहिजे.

प्रश्न – घटनेच्या ४४व्या कलमाबद्दल काय?

उत्तर – फकीसारख्यांनी याबाबत हातचलाखी करावी, हे आश्चर्यजनक आहे. त्या कलमात 'स्टेट शाल सेक्युअर' असे शब्द आहेत. 'शाल' आणि 'बुईल' यांतला फरक फकीसाहेबांना समजत नाही काय? 'सेक्युअर' याचा अर्थ काय? 'राज्याने पुढाकार घेऊन समान नागरी कायदा केला पाहिजे' असा हा आदेश आहे. त्यात 'जर-तर'ची भाषा नाही आणि घटनेचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यापूर्वी असा कायदा झाला पाहिजे, असा आमचा आग्रह आहे.

प्रश्न – तुमचा आग्रह ठीक आहे, पण बहुसंख्य मुसलमानांच्या पाठिंब्याचे काय?

उत्तर – समान नागरिकत्वाचा अर्थ असा की, त्या-त्या जातीजमातीपुरते कायदे त्या-त्या जमातीकडून केले जाणार नाहीत. भारतीय नागरिकांना घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांमध्ये 'सर्वांसाठी समान कायदा आणि सर्वांना कायद्याचे समान संरक्षण (इक्वॅलिटी बिफोर द लॉ ॲन्ड इक्वल प्रोटेक्शन ऑफ द लॉ)' हा एक हक्क आहे. कायदा समान नसल्यामुळे या मूलभूत हक्काची विटंबना होते, हे आम्ही ध्यानी घेणार नाही काय? असे प्रत्येक जातीजमातीचे कायदे त्या त्या जमातीच्या बहुमताने होऊ लागले, तर ह्या देशाचे पुन्हा अनंत तुकडे होतील, हे आपण विसरता कामा नये.

प्रश्न : या परिषदेबाबत तुम्ही काय विचार करता?

उत्तर : मुसलमानांना वस्तुस्थिती समजून घ्यावी लागेल. ते कार्य आम्ही करीत आहोत. ह्या मुस्लीम नेत्यांचा खोटेपणा त्यांच्या गळ्यात बांधला पाहिजे. 'देवाचा कायदा' हा त्यांचा बकवास आहे, हे शुद्ध ढोंग आहे, हे मुसलमानांना समजावून सांगितले पाहिजे. इस्लामने व्याजबट्ट्याचा निषेध केला आहे, पण इन्शुरन्स आणि बँकिंग हे धंदे सर्व मुस्लीम राष्ट्रांत चालतात आणि हिंदुस्थानातील मुसलमानही त्यात आहेतच!

काळाप्रमाणे बदलावे लागते, हे प्रेषितांनाही मान्य होते आणि म्हणून त्यांनी 'इज्मा' व 'कयास' यांना वाव ठेवला आहे. पण या तथाकथित पुढाऱ्यांनी 'इज्मा' म्हणजे मुस्लीम विद्वानांची परिषद बोलवतानाही हा आदेश धडपणे पाळलेला नाही. मुस्लीम लॉचे विख्यात भाष्यकार प्रा. फैजी

त्यांच्या लेखी कःपदार्थ होत! जातीयवादी, रूढीचुस्त व रूढिअंध तेवढे त्यांच्या दृष्टीने 'इज्मा'त दाखल होण्याला पात्र! 'बदल हवा' म्हणणारे ह्यांच्या दृष्टीने विद्‌वान होण्याला अपात्र! मुस्लीम कायदा शिकवणारे व त्या कायद्यान्वये खटले चालवणारे 'इज्मा 'त यायला बिगर मुसलमान म्हणून अपात्र! ही सर्व धर्मांच्या मूलतत्त्वांची शुद्‌ध विटंबना आहे. 'इस्लाम' हा बरोबरीचा, समतेचा धर्म, पण ही समता चौदाशे वर्षं पुरुषांपुरतीच अडकून राहिली आहे! इस्लामची मूलभूत दृष्टी महत्त्वाची आहे. ही दृष्टी फक्त परधर्मीयांपुढे मांडण्यासाठी आहे काय? हे व्यवहाराचे सूत्र बनले पाहिजे, असा आमचा आग्रह आहे. गतिहीनता हा करंटेपणा आहे. हे स्वार्थी नेते मुसलमानांवर हा करंटेपणा लादण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि आम्ही तो मोडून काढल्याशिवाय राहणार नाही.

प्रश्न : पण काँग्रेसवाले, पुरोगामी, बुद्‌धिवादी मुस्लीम या परिषदेत आहेत, असा दावा संयोजकांनी केला आहे ना?

उत्तर : जातीयवादी मुसलमान सर्वच राजकीय पक्षांत दबा धरून आहेत, असा याचा अर्थ होतो. परिषदेची दारे पत्रकारांनाही बंद ठेवून बुद्‌धिवादी म्हणवणाऱ्यांच्या बुद्‌धिमत्तेचे प्रदर्शन त्यांनी केले आहेच! खरा प्रश्न महाराष्ट्र काँग्रेसचा आहे. बॅ. अंतुले यांनी केशवराव धोंडगे यांच्या ठरावावर विधानसभेत भाषण करून टाळ्या मिळवल्या. काँग्रेसमधील या दबा धरून बसलेल्या जातीयवाद्यांना त्यांनी बाहेर काढले पाहिजे. हे कर्तव्य त्यांनी न केले आणि परराष्ट्रीय खासदारांनी संसदेत समान नागरी कायदा आणायला भाग न पाडले, तर त्यांच्या भाषणाची त्यांनीच विटंबना केली, असा त्याचा अर्थ होईल. 'या देशात दुहेरी सार्वभौमत्व चालू देणार नाही' हे अलीगढ मुस्लीम विद्यापीठ कायदा करून संसदेने दाखवून दिले आहे. तोच प्रकार बळकट झाला पाहिजे. *(नवशक्ती, २९-१२-१९७२)*

समान नागरी कायद्याविरुद्‌ध आयोजित मुंबई येथील परिषदेच्या संदर्भात मंडळाची भूमिका :

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यास आणि मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा किंवा समान नागरी कायदा अस्तित्वात आणण्यासाठी होत असलेल्या आणि त्यासाठी जनजागृतीच्या प्रयत्नांना विरोध करण्यासाठी मुंबईत आयोजित केलेल्या मुस्लीम परिषदेचे विविध पडसाद वृत्तपत्र माध्यमातून पडलेले दिसून आले.

या निमित्ताने परिषदेसंदर्भात मंडळाची भूमिका स्पष्ट करण्यात आली. हमीद दलवाई यांनी पत्रकार परिषद घेऊन विरोधकांची चौकशी करण्याची मागणी केली.

३.१६ मुस्लीम महिलांचे प्रश्न – हमीद दलवाई यांचे भाषण

६ मार्च १९७३ रोजी समाजवादी महिला सभेच्या वतीने पुण्यात हमीद दलवाई यांचे 'मुस्लीम महिलांचे प्रश्न' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मुस्लीम समाजातील घटस्फोटावर बंधन घातल्याखेरीज केवळ बहुपत्नीत्वावर बंधन घालणे निरुपयोगी ठरणार असल्याने 'मुस्लीम स्त्रियांच्या दास्यमुक्तीसाठी कायदा करावा' अशी भूमिका हमीद दलवाई यांनी मांडली. ते पुढे म्हणाले, 'महंमद पैगंबर यांची एक पत्नी नऊ वर्षांची होती, तेव्हापासून 'मुलगी नऊ वर्षांची झाली की वयात आली' असे हा समाज मानतो आणि त्या मुलींवर अनेक प्रकारची बंधने लादतो. मुस्लीम समाजात 'लग्न करणे' काहीसे अवघड असते, पण त्या मानाने 'घटस्फोट देणे' सुलभ असते. मुस्लीम पुरुष केव्हाही, कारण न देता, पत्नीला निरोप पाठवून घटस्फोट घेऊन मोकळा होतो. कारण न देता घटस्फोट घेण्याची तरतूद असल्याने त्या बाबतीत काझी काही करू शकत नाही. मुस्लीम धार्मिक कायद्यानुसार 'विवाह' हा एक सामाजिक करार असतो. १९३७ साली अस्तित्वात आलेल्या कायद्याला शरीयत म्हणतात. कुराण हे श्रुती असून शरीयत ही स्मृती आहे. पैगंबरांनंतर झालेल्या स्मृतिकारांनी ठरविलेल्या गोष्टींनाच शरीयत म्हणतात. 'जास्तीत जास्त चार स्त्रिया करू शकतात' असे कुराणात वाक्य आहे. पण त्याचा संदर्भ बाजूला ठेऊन हे वाक्य म्हणजे मुसलमानांनी धर्मस्वातंत्र्य मानले आहे. हिंदूंप्रमाणे मुस्लिमांची श्रुती आणि स्मृती वेगळी राहिलेली नाही. म्हणून 'स्मृती बदलणे म्हणजे धर्म बदलणे' असे मानले जाते. मुस्लीम स्त्रियांच्या प्रश्नाकडे मी नैतिक दृष्टीकोनातून पाहत नसून 'ही एक न्यायाची चळवळ आहे' अशी माझी भूमिका आहे' असे सांगून दलवाई म्हणाले, 'मुस्लिमांमध्ये कोणीही आपल्या पत्नीला केव्हाही घराबाहेर काढू शकतो, या स्थितीबाबत कायदेशीर बंधने घातली पाहिजेत. ट्यूनीशिया, इजिप्त आदी देशांतून अशी बंधने घातली गेली आहेत. एक पत्नी जिवंत असताना दुसरी करण्यास इराणमध्ये बंदी आहे. मुस्लीम समाजात स्त्रीचा आपल्या अपत्यावर हक्क नसतो; पोटगी फक्त तीन महिने देण्याची तरतूद आहे. विवाहाच्या वेळी झालेल्या निकाहनाम्यामध्ये 'घटस्फोटाच्या वेळी अमुक इतकी रक्कम पत्नीला द्यावी' असे करारनाम्यात नमूद करतात. पण या करारनाम्यातील रक्कम ५१ रुपयांपासून काही हजारांपर्यंतही असू शकते. असे असले, तरी घटस्फोटित स्त्रीला ती रक्कम मिळत नाही. ही रक्कम द्यायची टाळण्यासाठी दागिने पळविल्याची तिलाच नोटीस देतात आणि तिचे तोंड गप्प करतात.

'एकापेक्षा अनेक स्त्रिया करून त्यांच्याकडून आर्थिक फायदा मिळविणे, हाही मध्यमवर्गीय मुस्लीम समाजात एक धंदा बनला आहे.' असे सांगून दलवाई म्हणाले 'गरीब वर्गातील मुस्लीम स्त्रियांना शारीरिक कष्ट करून किंवा विडी धंद्यातील कामे करून पैसे मिळवावे लागतात. एकाच्या तीन बायका प्रत्येकी जर महिना एकशे एक रुपये मिळवीत असतील, तर हा स्वतः काहीही उद्योग न करता बायकांच्या पैशावर चैन करीत हिंडत राहतो. बहुपत्नीत्व हे अशा वेळी आर्थिकदृष्ट्या पुरुषांना फायद्याचे ठरते. स्वतः स्त्री मात्र आर्थिकदृष्ट्या कधी स्वावलंबी बनत

नाही. 'सतत बुरख्यात राहून पुरुष किंवा पुढारी सांगेल त्याप्रमाणे वागणे' ही गुलामी वृत्ती तिच्यात मुरली आहे.

'अर्धशिक्षित किंवा अर्धसुधारणावादी हिंदू स्त्रियाही याला जबाबदार आहेत' असे सांगताना दलवाई म्हणाले, 'मुस्लीम, हरिजन, आदिवासी स्त्रियांसाठी महिला मंडळांनी काही काम केलेले आढळत नाही. या महिला मंडळाचे काम पुण्यातील डेक्कन जिमखान्यावरच चालते. 'मुस्लीम स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करणे व त्यांना आपल्या हक्काची जाणीव करून देणे' हे महत्त्वाचे कार्य आहे. अर्थात, मुस्लीम स्त्रियाच बंड करून उठल्या, तर या चळवळीला उठाव येईल. बुरखा पद्धतीमुळे या स्त्रियांपर्यंत प्रचाराच्या दृष्टीने पोहोचता येत नाही, ही अडचण आहे. हिंदू स्त्रियांपेक्षा अधिक कडवेपणा त्यांच्यात असल्याने या स्त्रिया बाहेर पडतील, तर त्या अधिक कडवेपणाने भांडतील, पण त्यांना त्यासाठी प्रवृत्त करावयास पाहिजे. यासाठी अनुकूल वातावरण तयार करण्याच्या कामी सर्वांनी सहभागी होऊन संयुक्तरीत्या प्रयत्न करावेत' असे आवाहन दलवाई यांनी केले. सौ. कमल पाध्ये यांनी आभार मानले. *(महाराष्ट्र टाइम्स, २७ मार्च १९७३)*

३.१७ मुस्लीम सत्यशोधक

(सकाळ, २७ मार्च १९७३, संपादकीय)

उपस्थितांची संख्या विचारात घेता, मुस्लीम सत्यशोधकांची मुंबईतील परिषद अपेक्षेपेक्षा यशस्वी ठरली. या परिषदेला तीनशे प्रतिनिधी हजर होते. ते केवळ मुंबईचे नव्हते; मुंबईबाहेर पुणे, अमरावती, कोल्हापूर, नगर अशा ठिकाणांहून प्रतिनिधी आले होते आणि त्याबद्दल त्यांचे आणि बाकी सर्वांचे नेते हमीद दलवाई यांचे अभिनंदन करावयास हवे. मुस्लीम स्त्रियाही उल्लेखनीय प्रमाणात हजर होत्या. पुण्यात मुस्लीम महिला परिषद झाली, तेव्हा त्याला जरी थोड्या महिला असल्या, तरी मुस्लीम जातीयवाद्यांनी तिचा फार धसका घेतला. म्हणून लगेच काही हजार मुसलमान स्त्रियांची परिषद घेण्यात आली आणि शरीयतचा कायदा योग्य असल्याचा निर्वाळा दिला गेला! हा सर्व बनाव जातीयवादी मुसलमान पुढाऱ्यांनी केला होता, हे उघड आहे. परंतु यामुळे न डगमगता मुस्लीम सत्यशोधकांनी मुंबई परिषद भरविली आणि तिला उपस्थितीही चांगली होती. मुस्लीम सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष बाबुमियाँ बँडवाले यांनी आपल्या स्पष्टोक्तीपूर्ण भाषणात सांगितले की, 'काही वर्षांपूर्वी हमीद दलवाई एकटेच मुस्लीम समाजात सुधारणेचा प्रचार करीत होते, पण आता, महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षांत लहान-मोठे पाचशे कार्यकर्ते तयार झाले आहेत. ही समाधानाची गोष्ट आहे.' प्रस्तुत परिषदेला मध्यमवर्गीय, गरीब असे मुस्लीम बंधू व भगिनी हजर होत्या. कोणाही जवळ सेकंड हँड मोटरसुद्धा नव्हती. या शहरात शिकले-सवरलेले, मोठमोठ्या हवेल्यांत राहणारे मुस्लीम आहेत. त्यांपैकी कोणी परिषदेकडे फिरकले नाहीत. परिषदेचे प्रमुख विद्वान पाहुणे फैजी यांनी म्हटल्याप्रमाणे, 'पूर्वी इंग्रजी सरकारपुढे कुर्निसात करणारे उच्च वर्गातील मुसलमान आता तो कुर्निसात काँग्रेस सरकारपुढे करतात, कारण त्यांना समाजाचे काही प्रेम नाही.' 'या शहरातील तथाकथित विचारवंत मुसलमानही परिषदेकडे फिरकले नाहीत. डाव्या प्रवृत्तीचा उद्घोष करणारे मुसलमानही दूरच राहिले, आणि हे साहजिकच आहे. कारण ते तथाकथित विचारवंत आणि डावे प्रस्थापित नेतृत्वाचे लांगूलचालन करणारे आहेत व म्हणून ते जात्यंध प्रवृत्तीच पोसतात. अशा लोकांविषयी आपल्याला कमालीचा तिरस्कार आहे' हे प्रा. अ. भि. शहा यांनी धडधडीतपणे सांगून टाकले, हे बरे केले. या संबंधात हमीद दलवाई यांनी माओच्या सिद्धान्ताचा आधार घेतला. खेड्यांनी शहरांना व गरीब देशांनी श्रीमंत राष्ट्रांना वेढा घालण्याचा सिद्धान्त माओने मांडला आहे. मुसलमानांतील गरीब, मागासलेले, अज्ञ यांची संघटना बांधून त्यांचा वेढा जात्यंध, प्रस्थापित अशा मुस्लीम नेतृत्वाला घालण्याचा विचार हमीद दलवाईंनी बोलून दाखविला आणि तो रास्त आहे.

अलगता नको

सुप्रसिद्ध विचारवंत फैजी आणि प्रा. मोईन शाकीर यांनी मुस्लीम कायद्यात बदल करण्याच्या

मागणीचा हिरिरीने पुरस्कार केला. स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षे झाली, तरीही मुसलमानांचे नेतृत्व मुल्ला-मौलवी आणि त्यांच्या आधाराने वाढलेले जात्यंध मुसलमान करीत आहेत. त्यांना आपल्या आसनाला सुरुंग लागेल म्हणून मुस्लीम कायद्यात बदल नको आहे व समान नागरी कायदा नको आहे. पण लक्षावधी मुस्लीम स्त्रियांना अज्ञानात व असुरक्षिततेत ठेवण्याच्या या मंडळींचे राजकारण अखेरीस या देशाच्या स्वास्थ्यालाही धोका पोहोचवणारे आहे. म्हणून समान नागरी कायद्याच्या दिशेने पावले टाकणे, हे सरकारचे कर्तव्य राहील. पण 'मुसलमानांनी मागणी केल्याखेरीज कायद्यात बदल केला जाणार नाहीं' असे सरकारी प्रवक्ते अनेकदा सांगतात. अशी मागणी नजीकच्या काळात होणार नाही. पण 'समान नागरी कायदा हवा' अशी मागणी मुस्लीम समाजातील अल्पसंख्य का होईना, आता उघडपणे करू लागले आहेत. नुकत्याच केरळमध्ये झालेल्या परिषदेत दोघा मुस्लीम न्यायाधीशांनी ही मागणी केली, पण मुस्लीम समाजाच्या मागासलेपणात ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत, त्यांना कसलाच बदल नको आहे. 'अलीगढ विद्यापीठाचा कायदा बदलला' म्हणूनही ते संतप्त झाले आहेत. 'अलीगढ विद्यापीठ हे अल्पसंख्य मुसलमानांचे विद्यापीठ करावे' अशी मागणी होत आहे. अशा तऱ्हेने विद्यापीठाचे जातीय स्वरूप टिकविण्याचा हा अट्टाहास किती काळ चालू देणार? कोणतेही विद्यापीठ असे जातीय, एका पंथाचे असता कामा नये. त्याला सर्व समाजाकडून पैसा मिळतो. म्हणूनच ते एका जातीचे असणे अयोग्य. पण अलीगढ विद्यापीठाच्या कायद्यातील बदल असो वा 'वंदे मातरम्'चे प्रकरण असो, राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप होण्यास या जात्यंध मंडळींचा विरोध असतो. या प्रवाहाशी फटकून वागून सामान्य मुसलमानांचे निभावणार नाही, हे मुस्लीम सत्यशोधक परिषदेने ठणकावून सांगितले. या निमित्ताने परिषदेने केलेल्या विविध मागण्या सरकारने विचारात घ्याव्यास हव्यात. मुस्लीम सत्यशोधकांच्या कार्याचे स्वरूप विस्तारत आहे. अर्थात, यापुढे त्यांना अधिक मोठ्या विरोधाला तोंड द्यावे लागेल; पण फैजी, शाकीर यांच्यासारखे विचारवंत व हमीद दलवाई यांच्यासारखे नेते यांच्यात ही तोंड देण्याची हिंमत आहे. आम्ही त्यांना सुयश चिंतितो.

३.१८ मुस्लीम सुधारणा

'मुस्लीम समाजातील विवाह, घटस्फोट, वारसा हक्क यांचे नियमन करणारा शरीयत कायदा रद्द करून देशातील सर्व नागरिकांकरिता एकच समान नागरी संहिता बनवावी' या मागणीसाठी इंडियन सेक्युलर सोशलिस्ट सोसायटी आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्या वतीने मुंबईत रविवारी भरलेल्या परिषदेने मुस्लीम सामाजिक सुधारणेच्या चळवळीस गती आणली; निदान त्या समाजातील विचारमंथनास आणखी चालना मिळाली. परिषद भरली एवढ्यानेच हे मर्यादित उद्दिष्ट साधले, असे म्हणावयास हरकत नाही. 'शहरवासीय आणि पैसेवाले मुस्लीम एकतर जातीयवाद्यांच्या आहारी गेले आहेत (मुंबई महापालिकेच्या निवडणुकांत त्याची प्रचिती आली.) किंवा सुधारणांबद्दल उदासीन झाले आहेत. म्हणून ग्रामीण भागातील गरीब मुस्लिमांच्या प्रतिनिधींनाच परिषदेस बोलाविले' असे तिचे मुख्य प्रवर्तक हमीद दलवाई यांनी सांगितले. कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, अहमदनगर, पुणे, अमरावती, भिवंडी वगैरे ठिकाणांहून तीनशेच्या वर प्रतिनिधी आले. त्यांत साधारणपणे ७५ महिला होत्या. सामाजिक सुधारणेची चळवळ मुस्लीम समाजातील खालच्या थरात, ग्रामीण भागात नेण्याची दलवाईंची कल्पना चांगली आहे. त्यासाठी परिषद मुंबईत भरवावी लागली, हे विसंगत दिसले, तरी 'आपल्या चळवळीस चांगली प्रसिद्धी मिळावी' हा संयोजकांचा त्यामागचा हेतू असावा. मात्र नुसत्या वृत्तपत्रांतील प्रसिद्धीने काम होणार नाही. त्यासाठी दीर्घ काळ चळवळ चालवावी लागेल, हे त्यांनी विसरता कामा नये.

सुधारणावाद्यांची भूमिका पुन्हा विस्ताराने सांगण्याची गरज नाही. शरीयतमध्ये, म्हणजे मुस्लिमांच्या व्यक्तिगत कायद्यात गेल्या १३०० वर्षांत सुधारणा झालेली नाही. इंडोनेशिया, अल्जेरिया, जॉर्डन, सुदान, ट्युनिशिया... एवढेच नव्हे, तर पाकिस्तान या देशांतसुद्धा शरीयत कायद्यात कितीतरी बदल झाले, पण भारतात त्याचा कानामात्राही बदललेला नाही. त्यामुळे येथील मुस्लीम समाजात बहुपत्नीत्व, 'तलाक' शब्द तीन वेळा उच्चारून नवऱ्याने घटस्फोट देण्याची रूढी आणि वारशातील वाटा या बाबतीत स्त्रियांना मुळीच संरक्षण नाही. भारतीय नागरिकांना घटनेने दिलेले मूलभूत हक्क तीन कोट मुस्लीम स्त्रियांना शरीयतमुळे नाकारले जातात, ही परिस्थिती सुधारली पाहिजे. त्यासाठी 'शरीयत कायदा रद्द करून सर्व नागरिकांकरता एकच नागरी संहिता असावी' अशी हमीद दलवाईंची व त्यांच्यासारख्या सुधारणावाद्यांची मागणी आहे.

भारताचे इजिप्तमधील माजी वकील, कायदातज्ज्ञ आणि मुस्लीम समाजाच्या प्रश्नाचे गाढे अभ्यासक प्रा. असफ ए. ए. फैजी यांनी या आंदोलनाला जोरदार पाठिंबा दिल्याने अधिकाधिक मुस्लीम विचारवंत तिकडे वळतील, अशी आम्हाला आशा वाटते. परिषदेचे अध्यक्ष, मराठवाडा विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. मोईन शाकीर यांनी सांगितले की, 'शरीयत कायद्यात बदल केला, तर आपले इस्लामी व्यक्तिमत्त्व नष्ट होईल, अशी जातीयवाद्यांनी

लोकांची समजूत करून दिली आहे. त्यासाठी त्यांनी ऑल इंडिया मुस्लीम मजलीस-ए-मुशावरत संघटना स्थापली. तिच्याविरुद्ध सुधारणावाद्यांना झगडावे लागत आहे.' मुस्लीम समाजाचा शैक्षणिक आणि सांस्कृतिक मागासलेपणा, पुरोगामी विचारवंतांची उणीव यांमुळे सुधारणावाद्यांचे काम किती अवघड झाले आहे, याचे प्रा. शाकीर यांनी वर्णन केले, पण त्यामुळेच सुधारणावाद्यांनी अधिक निर्धाराने काम करणे आवश्यक झाले आहे. त्यांच्या विचारास देशाच्या इतर भागांतही पाठिंबा मिळत आहे. केरळमधील तेलिचेरी न्यायालयाचा शतसांवत्सरिक महोत्सव गेल्या सोमवारी झाला. त्या निमित्ताने शरीयत कायदा सुधारणेवर एक परिसंवाद घेण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बेग यांनी त्या वेळी 'सर्व नागरिकांसाठी समान नागरी संहिता आवश्यक असल्याचे सांगितले. त्याची सक्ती ताबडतोब करणे शक्य नसेल, तर सरकारने अशी संहिता तयार करावी. शरीयतचा अमल नको असलेले मुस्लीम त्याचा आधार घेतील. त्यांची संख्या वाढत गेली की, सक्ती न करता ही सुधारणा अमलात येईल' असे त्यांनी सुचविले.

केरळ उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मोईदु यांनी सांगितले की, 'कुराणातील मूळ शरीयत कायद्याची अंमलबजावणी व्हावयास हवी. रूढीने शरीयतमध्ये आलेले दोष कायद्याने दुरुस्त करावयास हवेत. कुराणाने बहुपत्नीत्वाचा पुरस्कार केलेला नाही; काही विशिष्ट परिस्थितींत तशी मुभा ठेवली. पण जी बाब अपवादात्मक होती, ती रूढीने पुरुषाचा सरसकट हक्क झाला, हे अनिष्ट होय.' असे ते म्हणाले. केरळ उच्च न्यायालयाचे आणखी एक न्यायमूर्ती खालिद यांनी सांगितले की, 'मुस्लीम कायद्याची एक संहिता करून तो राष्ट्राच्या कायद्याचा भाग करावयास हवा. एकाहून अधिक पत्नी करण्याचा हक्क कुराणाने अपवादात्मक परिस्थितीत मान्य केला आहे,' पण त्याचा विपर्यास कसा होतो, याचे एक उदाहरण त्यांनी सांगितले. कोचीनमध्ये डिसेंबर १९७२मध्ये एका मौलवीने अरबी भाषेत वराला आशीर्वाद देताना सांगितले की, 'एक पत्नी करून समाधान झाले नाही तर दुसरी, तिसरी किंवा चौथी करता येईल.' विवाहाच्या शुभ समारंभात हे प्रवचन अनुचित तर होतेच, पण मुल्ला-मौलवींनी शरीयतचा जो अर्थ रूढ केला आहे, त्यावर या उदाहरणाने चांगला प्रकाश पडतो.

'बहुपत्नीत्व' किंवा 'लहरीप्रमाणे तलाक' मुस्लीम समाजात सर्रास रूढ आहे, असे आम्हाला म्हणावयाचे नाही. इतर समाजाप्रमाणे मुस्लिमांतही सुसंस्कृत आणि विवेकी वर्ग निश्चितच आहे, पण शरीयतमधील अनिष्ट रूढींचा जाच त्या समाजातील स्त्रियांना बऱ्याच प्रमाणात सोसावा लागतो, हे नाकारता येणार नाही. त्यांना घटनेने दिलेल्या नागरिकत्वाच्या हक्कांचा उपभोग घेता आला पाहिजे. त्यासाठी आवश्यक ती सुधारणा कायद्याने करावयास हवी. मतलबी मुस्लीम पुढारी आपल्या राजकीय आणि अन्य स्वार्थासाठी या सुधारणांना विरोध करतात. आज मुस्लिमांची एकगठ्ठा मते त्यांना गोळा करता येतात... त्यांच्या जोरावर जागा मिळविणे किंवा इतर पक्षांशी सौदेबाजी करून फायदा उपटणे त्यांना या विरोधामुळेच शक्य होते. म्हणून त्यांना शरीयतमध्ये सुधारणा नको आहेत. मुस्लीम मुलांना आधुनिक शिक्षण देण्यासही ते विरोध करतात. इतर समाजापासून मुस्लिमांना अलिप्त ठेवण्याचा त्यांचा खटाटोप असतो.

मुंबईतील परिषदेत प्रो. फैजी यांनी सांगितल्याप्रमाणे, 'सत्तारूढ पक्षाने 'मते जातील' या

भीतीने आजपर्यंत मुस्लीम सामाजिक सुधारणांकडे लक्ष देण्याचे टाळले. त्यामुळे त्या समाजातील मुल्ला-मौलवींची आणि जातीयवाद्यांची मिरासदारी वाढली. ती हटविण्याचे काम करणाऱ्या सुधारणावाद्यांचे हात राज्यकर्त्यांनी बळकट करावयास हवेत.'

३.१९ मंडळाच्या वतीने मुस्लीम महिलांचे सर्वेक्षण

(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, अंक तिसरा, ऑगस्ट १९७३)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने मुस्लीम महिलांच्या विविधांगी प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी घटस्फोटित मुस्लीम महिलांचे १९७२ मध्ये सर्वेक्षण केले. हमीद दलवाई यांचा यावर आधारित लेख टाइम्स ऑफ इंडियामध्ये प्रसिद्ध झाला होता. भारतामध्ये ८०पेक्षा जास्त विद्यापीठे असूनही तलाक व बहुपत्नीत्व अशा विषयांवर कुठलाही पद्धतशीर अभ्यास झालेला नाही. कलकत्ता येथील इंडियन स्टॅटीस्टीकल इन्स्टिट्यूटचे डॉ. कांती पत्रासी यांनी काही वर्षांपूर्वी हिंदू-मुस्लीम समाजाची या विषयावर माहिती जमवली होती. मात्र ती त्या शहरापुरतीच मर्यादित होती. स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीच्या दिल्ली केंद्रातून डॉ. गोपाळकृष्ण यांनी मुस्लिमांच्या दृष्टीकोनावर व्यापकपणे अभ्यास केला. मात्र त्यांचा अहवाल प्रसिद्ध व्हायचा असल्याने मुस्लीम सत्यशोधक मंडळाने तलाकच्या प्रकरणाची दोन वर्षे पाहणी केली आणि पाचशे महिलांच्या मुलाखती घेतल्या. बेंगलोर, मुंबई, बुलंदशहर, कलकत्ता, कोचिन, दिल्ली, हैदराबाद, कोल्हापूर, लखनौ, सोलापूर, पुणे येथील लहान-मोठ्या भागांतून करण्यात आलेल्या पाहणीतून निष्कर्ष काढण्यात आला. यातून महिलांची दयनीय स्थिती, असुरक्षितता आणि मागासलेपणा अशी सगळी विपरीत परिस्थिती समोर आली. एक प्राथमिक चाचणी म्हणून याकडे पाहिले असता, या पाहणीचा निष्कर्ष मुस्लीम सनातन्यांच्या दाव्याच्या विरुद्ध जातो. तळागाळातील मुस्लीम महिलांची समस्या आणि स्थिती यांचे चित्र स्पष्ट होण्यासाठी व्यापक प्रमाणात पाहणी करण्याचा निर्णय मंडळाने घेतला. *(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, अंक तिसरा, ऑगस्ट १९७३, कोल्हापूर, पृ. क्र. ३५-४३)*

समान नागरी कायद्यासाठी अन्न सत्याग्रह

(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, अंक तिसरा, ऑगस्ट १९७३)

सोलापूरचे हुतात्मा मलाप्पा धनशेट्टी यांच्या पत्नी नीलव्वाबाई धनशेट्टी यांनी समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी पंतप्रधानांच्या निवासस्थानी उपोषण करण्याची प्रतिज्ञा केली होती. त्यांची ही प्रतिज्ञा त्यांच्या स्नुषा सौ. अन्नपूर्णा शिवशंकरप्पा धनशेट्टी व पुत्र शिवशंकरप्पा मलाप्पा धनशेट्टी पूर्ण करीत असताना त्यांच्याबरोबर मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे दोन तरुण कार्यकर्ते रफिक बागवान व इब्राहिम कासिमसाहेब मुल्ला हे दिनांक ८ ऑगस्ट १९७३पासून दिल्ली येथे पंतप्रधानांच्या निवासस्थानाच्या समोर समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी आमरण उपोषणास बसले आहेत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने यास पाठिंबा दिला आहे आणि या उपोषणात सहभाग नोंदविला आहे. *(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, अंक तिसरा, ऑगस्ट १९७३, कोल्हापूर, पृ. क्र. ४४)*

मुस्लीम लीग रुजू देणार नाही

(दैनिक पुढारी (कोल्हापूर), १३ ऑगस्ट १९७३, बातमी)

'जोपर्यंत महाराष्ट्रात मुस्लीम सत्यशोधक मंडळ आहे, तोपर्यंत महाराष्ट्रात मुस्लीम लीग रुजू देणार नाहीं' असे उद्‌गार १२ ऑगस्ट १९७३ रोजी कोल्हापूर येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत, मुस्लीम लीगच्या जातीयवादी राजकारणावर चर्चा करताना मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सरचिटणीस हमीद दलवाई यांनी काढले. या परिषदेस प्रा. अ. भि. शहाही उपस्थित होते.

३.२० ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम्स

मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटी यांचे सेक्युलॅरिझम, आधुनिकता, लोकशाही आणि वैज्ञानिकता या संदर्भातील विचार परस्परांना पूरक होते. हमीद दलवाई आणि प्रा. अ. भि. शहा यांच्यातील वैचारिक मैत्री सर्वश्रुत आहे. या दोन्ही संघटनांच्या संयुक्त विद्यमाने अनेक उपक्रम राबविण्यात आले. यांतील महत्त्वाचा आणि खऱ्या अर्थाने राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम म्हणजे, दिल्ली येथील 'फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम कॉन्फरन्स.' पाकिस्तान- बांग्लादेश युद्धाचे सावट असताना ही परिषद आयोजित करण्यात आली होती. यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील बुद्धिजीवी मुस्लीम उपस्थित होते.

मुस्लीम सत्यशोधक चळवळ राष्ट्रीय पातळीवर घेऊन जाण्याचा ध्यास हमीद दलवाईंनी सुरुवातीपासूनच घेतला होता. त्याचाच एक परिणाम म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळ व इंडियन सेक्युलर सोसायटी यांच्या वतीने ४ आणि ५ डिसेंबर १९७१ रोजी दिल्ली येथील 'गांधी पीस फाउंडेशन' (२२३, दीनदयाल उपाध्याय मार्ग) येथे 'ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लिम्स'चे आयोजन करण्यात आले. यात भारताच्या विविध राज्यांतून तसेच बांग्लादेशातून सुमारे १०० प्रतिनिधी उपस्थित होते. महाराष्ट्रातून सुमारे ५० प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले. हमीद दलवाईंच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या कॉन्फरन्सचे संचालक स्वतः प्रा. अ. भि.

कॉन्फरन्समध्ये मांडणी करताना हमीद दलवाई.

कॉन्फरन्समध्ये सहभागी प्रतिनिधी.

हमीद दलवाईंसमवेत कॉन्फरन्समध्ये सहभागी झालेले प्रतिनिधी

शहा होते. बांग्लादेशातून आलेल्या माननीय मेहबूब उल हक यांचे भाषण मुख्य होते. समान नागरी कायद्याची मागणी, कुटुंब नियोजन प्रसारास पाठिंबा व प्रोत्साहन, आधुनिकता, बांग्लादेशास मान्यता इत्यादी विषयांवर परिषदेत चर्चा करून ठराव संमत करण्यात आले.

या परिषदेत हमीद दलवाईंनी 'भारतीय मुस्लिमांच्या समस्या' या विषयावर भाषण केले. तसेच त्यांनी या परिषदेचे अध्यक्षीय भाषण केले. माननीय मेहबूब उल हक यांनी केलेले भाषण मुस्लीम समाजाला अंतर्मुख होऊन विचार करण्यास भाग पाडणारे होते. या तिन्हीही भाषणांच्या मूळ इंग्रजी टिपणांचा समावेश परिशिष्टामध्ये केला आहे.

३. २१ हे किती काळ चालणार?

(महाराष्ट्र टाइम्स, १८ ऑक्टोबर १९७५)

(मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना होऊन जेमतेम पाच वर्षांचा कालावधी होत असताना मंडळाकडून विविध उपक्रम राबवण्यासंदर्भात चर्चा होत असे. यातून एक अभिनव कल्पना पुढे आली असताना त्यातील दुबळेपणा व्यक्त करणारा हा अभिप्राय समजून घेणे संघटनेसाठी उपयुक्त असल्याने त्याचा समावेश केला आहे.)

घटस्फोट देऊन परित्यक्त झालेल्या मुस्लीम स्त्रियांच्या मदतीसाठी निधी गोळा करण्याचा उपक्रम यंदा ईदच्या दिवशी पुण्यात मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी हाती घेतला. यास थोडाफार प्रतिसाद मिळाला. हमीद दलवाई यांनी प्रा. अ. भि. शहा वगैरेंच्या साहाय्याने मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी स्त्री-पुरुष कार्यकर्ते मिळवले व तयार केले. 'मुस्लीम समाजाचे प्रबोधन होऊन जुनाट व दुष्ट सामाजिक चालीरीती नष्ट व्हाव्यात', 'हा समाज आधुनिक बनावा' यासाठी जागृती करण्याचे कार्य मुस्लीम सत्यशोधक समाजाने हाती घेतले. या समाजाच्या वतीने मुंबई, कोल्हापूर अशा ठिकाणी परिषदा झाल्या आणि दलवाई प्रभृतिंनी लेख, भाषणे व मोर्चे यांच्या द्वारे समाज प्रबोधनाचे काम शक्य तेवढे रेटले. हे करताना सनातनी, पोथीनिष्ठ मुसलमान पुढाऱ्यांचा विरोध होणे साहजिक होते. त्यातच या पोथीनिष्ठेचा, अंधश्रद्धेचा उपयोग राजकीय फायद्यासाठी करता येत असल्याने सनातनी वा धार्मिक पुढाऱ्यांना मुस्लीम राजकीय पुढाऱ्यांचे साहाय्य झाले व होते. त्यांनाही सुधारणेची चळवळ नामंजूर आहे, कारण त्यांच्या सुरक्षित आसनाला ती आव्हान देते. दलवाई यांच्यावर मूत्रपिंडाची शस्त्रक्रिया करण्यासाठी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी ५० हजार रुपये सरकारी निधीतून देताच लीगच्या चिटणिसाचे पित्त खवळले. यावरून हमीद दलवाई यांच्या समाज सुधारणेच्या कार्याचा खरा तडाखा कोणाला बसतो, हे स्पष्ट होते. दलवाई यांच्याच पुण्यातील सहकाऱ्यांनी मिळून घटस्फोटित असणाऱ्या परित्यक्त मुस्लीम स्त्रियांसाठी निधी गोळा करण्याचा उपक्रम ईदच्या दिवशी हाती घेतला. हा मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या जागृतीचा एक भाग झाला.

शपथविधी

जमलेला हा निधी प्रतीकात्मतच होता. यातही आश्चर्य नाही. यापुढे पुण्याच्या मुस्लीम सत्यशोधक कार्यकर्त्यांनी आणखी एक कार्यक्रम करण्याचे ठरविले आहे. पंतप्रधानांपुढे हिंदू तरुण-तरुणी हुंडा न घेण्या-देण्याच्या शपथा घेतात, त्याचप्रमाणे पंतप्रधान पुण्यात येतील किंवा दिल्लीत जातील, तेव्हा एकतर्फी जबानी तलाक न देण्याच्या शपथा घेण्याचा कार्यक्रम मुस्लीम सत्यशोधक करणार आहेत. या शपथविधीसाठी किती मुस्लीम पुढे येणार, दिल्लीला किती जाणार हे आताच स्पष्ट होणे कठीण आहे. दिल्लीला जावयाचे, तर पैसे हवेत. शपथ घेणारा प्रत्येक जण हा खर्च करू शकेलच, असे नव्हे, पण हा खर्च समाज देईल, अशी कार्यकर्त्यांची

अपेक्षा आहे. आम्हाला या कार्यकर्त्यांच्या प्रामाणिक हेतूबद्दल संशय नाही; पण असल्या शपथांचा काही उपयोग आहे वा परिणाम होईल, असे वाटत नाही. एकतर मुस्लीम सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते या रीतीने जबानी तलाक न देण्यास बांधलेलेच आहेत. त्यांच्याव्यतिरिक्त इतर कोणी जबानी तलाक न देण्याची शपथ घेण्यास तयार होतील, ते सत्यशोधक समाजाची तत्त्वे स्वीकारणारेच असतील वा स्वीकारतील. मग आणखी जाहीर शपथविधीची गरज काय? दिल्लीत वा कोठेही पंतप्रधानांपुढे शपथविधी झाला, तर वृत्तपत्रीय प्रसिद्धी मिळेल, छायाचित्रेसुद्धा प्रसिद्ध होतील, पण म्हणून खऱ्या सुधारणेचे पाऊल पुढे पडेल असे नव्हे. अण्णासाहेब कर्वेंनी शपथा वगैरे घेण्याचे कार्यक्रम केले नव्हते; त्यांनी परित्यक्तांसाठी आश्रम स्थापन केला, त्यांच्या शिक्षणाचे कार्य हाती घेतले व शेवटपर्यंत तेच केले. या स्थितीत या शपथविधीच्या प्रकरणाचे महत्त्व व उपयोग उमजत नाही. कदाचित आजकालचा जमाना प्रसिद्धीचा असल्याने कालप्रवाहाशी सुसंगत राहण्याचा हा प्रयत्न असेल, पण तो कार्यसिद्धीकारक ठरणारा नव्हे. अशी रास्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

आवर्तातच फिरणार?

याखेरीज दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, मुसलमानांना चार लग्न करावयास देऊ नये, जबानी तलाक व बुरखा पद्धती नसावी, यासाठी मुस्लीम समाजात जागृती करणे आवश्यक आहे हे खरे; पण केवळ एवढ्याबरच थांबून चालणारे नाही. तलाक, चार विवाह, बुरखा या सर्व रूढींविरुद्ध जागृती करीत असताना गरीब मुस्लीम समाजाच्या आर्थिक संघटनेवर भर द्यावयास हवा. टांगा, सायकल रिक्षा चालविणारांत बरेच मुसलमान आहेत. त्यांच्या सहकारी संस्था स्थापून त्यांना ऑटो रिक्षा मिळवून देण्याचे काम करता येईल. विणकरांत मुसलमानांचा भरणा आहे. त्यांच्या सहकारी संघटना स्थापून यंत्रमाग संस्था चालविता येतील. गवंडी काम, सुतार काम इत्यादी बरीच कारागिरी मुसलमानांत परंपरेने आहे. तिचा उपयोग करून सहकारी संस्थांच्या द्वारा नवा उद्योग निर्माण करता येईल. यासाठी एकेका क्षेत्रास वाहून घेतलेले कार्यकर्ते लागतात; व्यवस्थापन, अर्थव्यवहार यांचे ज्ञानही करून घ्यावे लागेल. या विविध क्षेत्रांत नव्यानेच पडणारांना जड जाईल, पण या क्षेत्रात काम करणाऱ्या अनुभवी कार्यकर्त्यांचे साहाय्य होऊ शकेल. हे सर्व जिकिरीचे आणि दीर्घ काळानंतर फळ देणारे आहे. अशा रीतीने आर्थिक क्षेत्रात संस्थात्मक स्वरूपाचे कार्य हाती घेण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक पुढे येतील व त्यासच वाहून घेतील, तेव्हा त्यांच्या हाती मनुष्यबळ व आर्थिक बळही येईल. त्यामुळे ईदला जमणारांपुढे मदतीसाठी कटोरे फिरविण्याची गरज पडणार नाही. संस्थात्मक, संघटनात्मक कार्यातून उभा राहणाऱ्या नेतृत्वाचा पाया अधिक भक्कम असेल. मुस्लीम सत्यशोधक या मार्गाने जाण्यास तयार आहेत की त्यांना सतत निदर्शने, परिषदा आणि परिसंवाद असा प्रतीकात्मक व प्रदर्शनात्मक कार्यक्रमच हाती घ्यावयाचा आहे? सनातनी मुस्लीम पुढाऱ्यांनी रूढी व अंधश्रद्धा जपून राजकीय बळ मिळविले, पण गरीब मुस्लीम समाजाच्या आर्थिक सुधारणेचा प्रयत्न केला. आता मुस्लीम सत्यशोधक बुरखा, तलाक आणि चार विवाह एवढेच प्रश्न आहेत, असे मानू लागले, तरीही गरीब मुस्लीम

समाज दुर्लक्षितच राहणार. म्हणजे दोघेही वेगळ्या मागनि जाऊन एकाच प्रकारची चूक करीत आहे. प्रदर्शनात्मक, प्रतीकात्मक अशा कार्याची कात टाकून मुस्लीम सत्यशोधक समाज सामान्य मुसलमान समाजाच्या जीवनाशी निगडित आर्थिक प्रश्नांना हात घालून आर्थिक संघटनेचे काम करणार आहे की नाही? की परिषदा, परिसंवाद, निदर्शने व भाषणे यांच्याच आवर्तात फिरणार?

'मुस्लीम समाजात तोंडी तलाकचा प्रश्न गंभीर नाही' असा मुस्लीम समाजातील तथाकथित धार्मिक नेते दावा करतात. वास्तविक, अशा घटना सर्रास होत असल्याने मुस्लीम समाज स्वतःच संभ्रमात सापडला आहे. अनेक वेळा पहिल्या पत्नीस तलाक न देता पुरुष दुसरे लग्न करतो. अशा वेळी मुस्लीम महिला पूर्णतः निराधार बनते. योग्य पद्धतीने तलाक न देता दुसरा विवाह केल्यास पहिली पत्नी पतीबरोबर व्यवस्थित नांदू शकत नाही, तसेच तलाक न झाल्यामुळे अन्य पुरुषाशी निकाह करून वेगळा संसारही थाटू शकत नाही. याउलट पुरुष आपल्या नव्या पत्नीबरोबर सुखोपभोग घेत असतो. 'माझा नवरा मला घटस्फोट न देता दुसरे लग्न करीत आहे, यावर समाज बांधवांनी विचार करून मला न्याय द्यावा' अशी जाहीर विनंती शाहिदा परवीन बेगम या २५ वर्षाच्या विवाहित महिलेने, मशिदीत लग्न समारंभ सुरू असताना तेथे जाऊन केली व तेथील मुस्लीम बांधवांना आश्चर्यचकित करून सोडले. हा प्रकार २२ ऑगस्ट १९७५ रोजी दुपारी १२:०० वाजता, पुण्यातील मोदीखाना मशिदीत घडला. तेथे सय्यद रियाज मोहंमद या रिक्षा ड्रायव्हर तरुणाच्या विवाहाचा कार्यक्रम सुरू होता. त्याची पहिली पत्नी शाहिदा हिला घटस्फोट (तलाक) न देता तिचा नवरा इस्लाम प्रचारक आणि धर्मवादी संघटनेच्या (तबलीग) इमाम शहाबुद्दीन नावाच्या सदस्याच्या मुलीशी विवाह करीत होता. हा समारंभ सुरू असताना शाहिदा बेगमने मुस्लीम सत्यशोधकचे कार्यकर्ते सय्यद मेहबूब , स्वतःचे आई-वडील व अन्य काही कार्यकर्ते यांच्यासमवेत प्रवेश केला. मशिदीत एक महिला प्रवेश करीत असल्याचे दिसताच सर्व उपस्थित लोक थक्क झाले व काही जण चुळबुळ करू लागले. पण शाहिदा बेगमने निर्भीडपणे समाज बांधवांसमोर आपली फिर्याद मांडण्यास सुरुवात केली. ती म्हणाली, 'भाई हो! तुम्ही सर्व जण मला भावा-वडिलाप्रमाणे आहात. या पंचविशीच्या वयात नवरा मला सोडून देतो आहे. त्याने निदान तलाक जरी दिला, तरी माझा मार्ग मला रिकामा होईल.' तिची ही जाहीर विनंती सर्वांनी ऐकून तर घेतलीच, पण नवऱ्याला सर्वांसमक्ष तलाक देणे भाग पाडले. या समारंभाच्या वेळी मशिदीत व बाहेर प्रक्षुब्ध वातावरण निर्माण झाले होते. त्या मुलीचे नातेवाईक जमले होते. शिवाय काही हितचिंतकांनी पोलिसांचीही मदत घेतली होती. रीती-रिवाजाप्रमाणे स्त्रियांना अनेक ठिकाणी मशिदीत येण्यास मज्जाव आहे. पण या प्रसंगात वराच्या पहिल्या पत्नीने ही रीत मोडली व तलाक मिळवला. या वेळी तिचा नवरा नव्याने लग्न करीत असलेल्या मुलीचे वडील त्या मशिदीचे पेश इमाम होते. 'तलाक न घेता हा दुसरा निकाह कसा होऊ शकतो?' असा सवाल पहिल्या पत्नीने थेट पेश इमाम यांनाच केला. या प्रकरणात मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते या महिलेच्या पाठीशी उभे होते.

महिलांवर अशा प्रकारे अन्याय करणाऱ्या घटना आजूबाजूला घडत असल्याचे लक्षात आल्याने मुस्लीम सत्यशोधक मंडळाने घटस्फोटित, घटस्फोट न देता टाकून दिलेल्या मुस्लीम

महिलांना पोटगी आणि इतर हक्क मिळवून देण्यासाठी मोफत कायदेशीर सल्ला केंद्र सुरू केले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुणे शाखेने याचे पहिले कार्यालय केअर ऑफ सय्यदभाई, भारत पेन्सिल, बाकडेवाडी, १२ मुंबई रस्ता, पुणे-०३ येथे दुपारी १:३० ते ३:३० दरम्यान सुरू केले. *(सकाळ, प्रभात, २३ सप्टेंबर १९७५; महाराष्ट्र टाइम्स, २४ सप्टेंबर १९७५)*

मुस्लीम पर्सनल लॉ संरक्षणासाठी आटापिटा

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या मुस्लीम महिला जागृतीसाठी आणि व्यक्तिगत कायद्यातील अन्यायी तरतुदींविरोधात चालवण्यात येत असलेल्या आंदोलनास विरोध करण्यासाठी मंडळाच्या विरोधकांनी नांदेड येथे दि. २४, २५ फेब्रुवारी १९७३ रोजी परिषदेचे आयोजन केले होते. प्रामुख्याने मुस्लीम पर्सनल लॉ परिषदेला पाठिंबा आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळास विरोध करण्यासाठी ही परिषद घेण्यात आली होती. *(केसरी, २७ फेब्रुवारी १९७३)*

३.२२ हमीद दलवाईंचे आजारपण

३०-३१ डिसेंबर १९७३ रोजी कोल्हापूर येथे मुस्लीम शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याच वेळी प्रथमतः हमीद दलवाई यांची तब्येत बिघडली आणि ते फार वेळ या परिषदेसाठी देऊ शकले नाहीत. कालांतराने त्यांना मूत्रपिंडीचा विकार जडला आणि हमीद दलवाई यांच्या प्रवासावर मर्यादा पडल्या. मुंबई येथील जसलोक रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात येत होते. उपचारांना फारसा प्रतिसाद मिळत नव्हता, त्यामुळे डायलिसिस करणे भाग होते. या काळात माननीय शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. प्रा. अ. वि. शहा आणि माननीय शरद पवार यांनी हमीद दलवाई यांच्या आजारपणाची कल्पना मुख्यमंत्र्यांना दिली. त्या वेळी हमीद दलवाई यांच्यावरील शस्त्रक्रिया व औषधोपचार यांसाठी मुख्यमंत्री निधीतून ५०,००० रुपये देणगी देण्यात आली. या

हमीदभाईच्या कार्याचा झपाटा आवाक करणारा....

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेत तसेच सुरूवातीच्या काळातील उपक्रमांचे आयोजन करण्यात इंडियन सेक्युलर सोसायटीचा वाटा मोठा आहे. हमीदभाईंचा जनसंवाद, व्याख्याने, परिषदा आणि तत्सम कार्यक्रमात सहभाग झपाटल्याप्रमाणे होता. मार्च १९७० मध्ये मंडळाची स्थापना झाल्यानंतर जून, जुलै, ऑगस्ट १९७० या तीन महिन्यातील कार्यक्रमावर नजर टाकली तरी हमीदभाईंच्या कामाचा झंझावात लक्षात येईल.

युवक क्रांती दलाने ३ जून रोजी मुंबई येथे दलवाईंचे "धार्मिक दंगली - स्वरुप आणि कारणे" या विषयावर भाषण आयोजित केले होते. ७ जून रोजी पुण्यातील रोटरी क्लबमध्ये "जमातवादाचा प्रश्न आणि उपाय" यावर हमीदभाईनी चर्चा केली. १० जून रोजी समाजवादी महिला सभेमार्फत दादर, मुंबई येथे धार्मिक दंगली विषयावर व्याख्यान आणि प्रश्नोत्तरे झाली. ११ जून रोजी साने गुरुजी विद्यालय, मुंबई येथे साने गुरुजींच्या पुण्यतिथीनिमित्त हमीदभाईंनी "सानेगुरूजींचे धर्मनिरपेक्ष समाजाचे स्वप्न" याविषयावर प्रमुख मांडणी केली. १३ जून रोजी युवक क्रांती दलाने धार्मिक दंगलींचा आधुनिक राष्ट्रवादावर होणारा घातक परिणाम या विषयावर युवकांची परिषद आयोजित केली. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी हमीदभाई होते. या कार्यक्रमात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने तसेच काही मुस्लीम विद्यार्थ्यांनी अडथळा निर्माण करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. हे दोन व्यत्यय सोडले तर ही परिषद यशस्वी झाली. १४ जून रोजी दलवाईनी मध्यप्रदेशातील इंदोर येथे भेट दिली. तिथे काही मान्यवर व्यक्ती, कार्यकर्ते आणि मुस्लीम युवकांशी चर्चा केली. इंदोर येथे इंडियन सेक्युलर सोसायटी आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या धर्तीवर कार्य सुरु करण्याची इच्छा स्थानिकांनी व्यक्त केली आणि दलवाईंनी पुन्हा इंदोरला यावे अशी विनंती करण्यात आली होती.

आर्थिक मदतीस धर्मांध मुस्लिमांनी हरकत नोंदवली. 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या इस्लामविरोधी कारवाया वाढल्या असून मुस्लीम समाजात अशांततेचे वातावरण पसरत आहे' असे मुस्लीम लीगच्या पुणे शाखेचे चिटणीस मिर्झा हमीद बेग यांनी एका पत्रकात नोंदवून दलवाईंना दिलेल्या आर्थिक मदतीवर आक्षेप नोंदवला. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांना हे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात प्रारंभी उर्दूच्या विकासासाठी महाराष्ट्रात उर्दू अकादमी स्थापन केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करण्यात आले होते. निवेदनात पुढे म्हटले आहे की, 'उर्दू अकादमी स्थापन करण्याच्या निर्णयामुळे शंकरराव चव्हाण यांना मुस्लीम समाज आपला 'निकटचा साथी' समजू लागला होता, पण दलवाई यांना दिल्या गेलेल्या देणगीमुळे मुस्लीम समाजाचा अपेक्षाभंग झाला आहे. दलवाई स्वातंत्र्य सैनिक किंवा आगरकर, फुले यांच्यासारखे समाज सुधारकही नाहीत. मग त्यांना कोणत्या सबबीवर मुख्यमंत्री निधीतून देणगी देण्यात आली?' 'आमच्या शत्रूला मदत करून एक प्रकारे मुख्यमंत्र्यांनी आमच्या जखमेवर मीठ चोळले आहे' अशी भावना धर्मवादी मुस्लिमांनी व्यक्त केली.

१५ जुलै रोजी हमीद दलवाईंचे अहमदाबाद येथील लायन्स क्लबमध्ये राष्ट्रीय एकात्मता विषयावर व्याख्यान झाले. १८ जुलै रोजी युवक क्रांती दलामार्फत स्थापन करण्यात आलेल्या कौमी एकता युवा परिषदेत हमीदभाई प्रमुख वक्ते होते. २० जुलै रोजी रोटरी क्लब, पुणे येथे हमीदभाईंनी राष्ट्रीय एकात्मता विषयावर मांडणी करून उपस्थितांशी संवाद केला.

१ ऑगस्ट रोजी रामनारायण रुईया महाविद्यालय, मुंबई येथील मराठी साहित्य समाजाच्या सदस्यांसमोर दलवाईंचे लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त व्याख्यान झाले. ९ ऑगस्ट रोजी पुण्यात परमवीरचक्र अब्दुल हमीद व्याख्यानमाला सुरू झाली. यावेळी असफ ए ए फैजी यांचे मॉडर्न अप्रोच टू इस्लाम या विषयावर व्याख्यान झाले. स्वातंत्र्यसैनिक मा. मोहन रानडेंनी व्याख्यानमालेचे उद्घाटन केले. ए जे शेख आणि हमीद दलवाई उपस्थित होते. १४ ऑगस्ट रोजी रोटरी क्लब ऑफ बडोद्याच्या वतीने "सेक्युलर स्टेट इन इंडिया" विषयावर व्याख्यान झाले. १५ ऑगस्ट रोजी बडोदा येथील मुस्लीम युवकांशी दलवाईंचा चर्चा संवाद कार्यक्रम झाला. १८ ऑगस्ट रोजी दिल्ली येथील जुनियर चेंबरसोबत जमातवादाचा प्रश्न विषयावर भाषण झाले. २१ ऑगस्ट रोजी प्रा. अ. भि. शाह आणि हमीदभाईंचे 'सेक्युलॅरिझम विषयावरील व्याख्याने बॉम्बे सोशल रिफॉर्म असोसिएशनच्या वतीने, मुंबई येथील सव्हेंट ऑफ इंडिया सोसायटीच्या कार्यालयात आयोजित करण्यात आले. यावेळी शिक्षणतज्ज्ञ आणि सोसायटीचे अध्यक्ष मा. जी. एल. चंदावरकर अध्यक्षस्थानी होते. २३ ऑगस्ट रोजी जोगेश्वरी येथील मुस्लीम समाजासोबत दलवाईंनी चर्चा केली. हे सर्व १९७० च्या तीन महिन्यातील आहेत. अशाच प्रकारे हमीद दलवाई यांनी मंडळाच्या स्थापनेनंतरच्या पाच वर्षांत मंडळाच्या वैचारिक आणि प्रबोधन कार्याची धक्कम पायाभरणी केली. ही धावपळ पुढे हमीदभाईंच्या आजारपणास कारणीभूत ठरली असावी.

हमीद दलवाई यांच्या मूत्रपिंडाचा आजार वाढत असल्याने मूत्रपिंडरोपण करण्याशिवाय पर्याय नव्हता. हमीद दलवाई यांच्या आजाराचा तपशील सांगून मूत्रपिंडदाता उपलब्ध होण्यासाठी आवाहन करणारे निवेदन वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाले. पुण्यातील येरवडा तुरुंगात गंभीर गुन्ह्यासाठी फाशी सुनावण्यात आलेला कैदी फिरोज दारूवाला याने ही बातमी वाचली आणि आपले एक मूत्रपिंड दलवाई यांना देण्याची इच्छा प्रकट केली. योगायोगाने मूत्रपिंड रोपणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व चाचण्या अनुरूप ठरल्या आणि फिरोज दारूवाला याने आपली किडनी दलवाईंना दिली. ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली. फिरोज दारूवाला याची अशी आंतरिक इच्छा होती की, मूत्रपिंड दिल्यामुळे त्याला फाशीच्या शिक्षेत सूट मिळावी. याच काळात 'फिरोज दारूवाला यांच्या फाशीची शिक्षा माफ करावी' अशी विनंती समाजवादी नेते एस. एम. जोशी यांनी राष्ट्रपती फखरुद्दिन अली अहमद यांना एक पत्र पाठवून केली.

मात्र फिरोज दारूवाला याच्या आईवडिलांनीच 'फाशीची शिक्षा माफ करण्यात येऊ नये' अशी भूमिका घेतल्यामुळे शेवटी त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. *(महाराष्ट्र टाइम्स, ११ ऑक्टोबर; लोकसत्ता, १४ ऑक्टोबर १९७५)*

३. २३ मुस्लीम युवतीची मंडळाकडे तक्रार

(महाराष्ट्र टाइम्स, २२ ऑक्टोबर १९७५, बातमी)

'पहिल्या बायकोला तलाक दिला, दुसरीला नांदवत नाहीं' असा नवरदेव आता तिसऱ्या वधूच्या शोधात आहे. अशा मोकाट सुटलेल्या नवरदेवांना जाब विचारणारे कुणीच नाही काय? लग्न झाल्यानंतर सहा महिन्यात बायकोला सोडपत्र देतात, अशा महिलांना वाली कोण? जुलमी नवरेशाहीच्या शिकार झालेल्या माझ्यासारख्या दुर्दैवी मुली फार कठीण परिस्थितीत जगत आहेत. त्यांनी कोणापाशी दाद मागावी?' प्रश्नांचा असा भडिमार करणारे पत्र श्रीमती शानूरबी उर्फ शहनाज नूर महमंद कागवाडे या तरुण, मुस्लीम महिलेने कोल्हापूर मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडे पाठविले होते. तिचे पत्र मिळाल्यानंतर मंडळाचे कार्यकर्ते तिला भेटण्यासाठी गेले. तेव्हा ही दुर्दैवी भगिनी म्हणाली, "या जुलमापासून आमची सुटका कधी होणार? माझ्या पतीने पहिल्या बायकोला तलाक दिला होता. आता त्याचसाठी माझ्या मागेही त्यांचा ससेमिरा चालू आहे. गेले वर्षभर मी माहेरीच आहे व ते आता तिसऱ्या लग्नाच्या तयारीत आहेत. ते आणखी किती जणांचा गळा कापणार आहेत, देव जाणे!"

मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडे अशी प्रकरणे येत असतात. या निमित्ताने मंडळाने पत्रक काढून अशा महिलांना संपर्क करण्याचे आवाहन केले. आजही मंडळाच्या वतीने शक्य ती सर्व मदत अशा महिलांना करण्याचा प्रयत्न केला जातो. या आंतरराष्ट्रीय महिला वर्षात मुस्लीम महिलांची दुःखे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी महाराष्ट्रात विविध ठिकाणी महिला मेळावे घेण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांतील मुस्लीम

महिलांचा मेळावा नोव्हेंबर महिन्यात कोल्हापूर येथे आयोजित करणार असल्याचे या पत्रकात सांगण्यात आले आहे. महिला मेळाव्याचे निमंत्रक म्हणून प्रा. मुमताज कासिम रहिमतपुरे, खदिजाबी हनीफ बागवान, लालबी यूसुफसाहेब मुलाणी, शहनाज महंमद शरीफ शेख, जैतूनबी इस्माईल अथणीकर, फातीमाबी नसरुद्दीन बारगीर आणि बिलालबी बादशाह जमादार या महिलांचा पत्रकामध्ये समावेश आहे.

३. २४ कोल्हापूर येथील मुस्लीम महिला परिषद

(महाराष्ट्र टाइम्स, ६ नोव्हेंबर १९७५ ; दै. सकाळ, ७ नोव्हेंबर १९७५, संकलित बातमी)

कोल्हापूर येथे दिनांक २ नोव्हेंबर १९७५ रोजी, जिल्हा खादी ग्रामोद्योग संघाच्या मंडपात, मुस्लीम महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. १३०० वर्षांहून अधिक जुनाट, कालबाह्य झालेला मुस्लीम व्यक्तिगत कायदा मुस्लीम स्त्रीला सतत असुरक्षिततेच्या वातावरणात जगण्यास भाग पाडणारा व तिला तिच्या न्याय्य हक्कांपासून वंचित करणारा आहे. म्हणून 'भारत सरकारने हा कायदा रद्दबातल ठरवून मुस्लीम स्त्रीला समाजातील आणि कुटुंबातील समानत्व व प्रतिष्ठा मिळवून देणारा, तसेच एकूण भारतीय समाजाला लागू होणारा असा समान नागरी कायदा तयार करावा आणि घटनेच्या आदेशासह ४४वे कलम कृतीत आणावें' असा ठराव कोल्हापूर येथील आयोजित मुस्लीम महिला परिषदेने एकमताने संमत केला.

पंतप्रधान इंदिरा गांधींचे आर्थिक साहाय्य

हमीद दलवाई यांचे आजारपण आणि मूत्रपिंडाच्या उपचारासाठी इंडियन सेक्युलर सोसायटीमार्फत आर्थिक मदतीचे आवाहन करण्यात आले होते. यावेळी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी आपणहून हमीद दलवाईंच्या उपचारासाठी दोन हजार रूपये पाठवले होते. तसेच केंद्रीय आरोग्य मंत्रालयानेही एक हजार रुपये पाठवले. गरज पडल्यास अधिक मदतीचेही आश्वासन त्यांनी दिले होते. त्यावेळी मूत्रपिंडाचे आरोपण करावे लागेल, असे निदान झाले नव्हते. त्यामुळे छोट्या छोट्या देणग्यांनी काम भागेल, असे वाटले होते. नंतर मूत्रपिंड आरोपणाच्या खर्चाचा प्रश्न मुख्यमंत्री मा. शंकरराव चव्हाण यांनी सोडविला होता. तत्कालीन पंतप्रधान, केंद्रीय आरोग्य विभाग आणि मुख्यमंत्र्यांच्या देणग्यांनी एक गोष्ट सिद्ध होते की हमीद दलवाई यांच्या कार्याचं महत्त्व नुसत्या महाराष्ट्रातील जाणकारच नव्हे तर संपूर्ण देशाला उमगलं होतं. दिल्ली, सिमला, हैदराबाद यांसारख्या महाराष्ट्राबाहेरच्या अनेकांनी फूल ना फुलाची पाकळी म्हणून शक्य ती मदत पाठवली होती. हमीद दलवाईंच्या आजाराबद्दल देशभर चिंता व्यक्त करण्यात येत होती.

(संदर्भ: महाराष्ट्र टाइम्स, २३ ऑक्टबर १९७५)

३. २५ तलाकविरुद्ध पोलिसात तक्रार

पुण्यात २९ एप्रिल १९७६ रोजी तलाकसंदर्भात एक विचित्र घटना समोर आली. आपल्या बहिणीच्या घरी एक गृहस्थ स्वतःच्या पत्नीसह गेले. तेथे तीन दिवस ते दांपत्य राहिले. नंतर ते गृहस्थ आपल्या घरी परत आले व 'बायको घरातून पळून गेली आहे' असे जाहीर करून त्या गृहस्थाने बहिणीच्या घरी राहिलेल्या प्रौढ पत्नीला एकतर्फी तलाक देऊन टाकला. त्या पत्नीने वरील आशयाची तक्रार पुलगेट पोलीस स्टेशनवर रीतसर नोंदवली. 'मला माझ्याच नवऱ्याने त्याच्या बहिणीच्या घरी नेले आणि नंतर 'मी घरातून पळून गेलें' असा आरोप केला. हा आरोप खोटा आहे.' असे या पोलीस तक्रारीत म्हटले होते.

या प्रकरणी पोलिसांनी असे सांगितले की, 'शेख अब्बास या ४२ वर्षे वयाच्या पुरुषाला पहिल्या बायकोपासून पाच मुले आहेत. पहिल्या पत्नीचे निधन झाल्यानंतर त्याने आणखी एका तरुणीशी रीतसर निकाह लावला. गेली सहा वर्षे या विवाहितेने आपला पती व त्याची पाच मुले यांचा सांभाळ केला. मात्र गेल्या महिन्याच्या, म्हणजे ९ मार्च १९७६ रोजी, हा गृहस्थ पुण्यात राहणाऱ्या आपल्या बहिणीच्या घरी सपत्नीक गेला व १२ मार्चपर्यंत राहिला. एके दिवशी तो घरी परतला आणि आपल्या बायकोला त्याने तलाक पाठवून दिला. त्यात 'तू घरातून पळून गेली आहेस' असे कारण लिहिल्याचे समजते.' या प्रकरणानंतर समाजातील काही कार्यकर्त्यांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी एक बैठकही भरविण्यात आली, परंतु तो या बैठकीस आला नाही. समाजातील प्रतिष्ठित लोकांमध्ये या प्रकरणाबद्दल दोन्हीही मतप्रवाह दिसून आले. काही जण 'हा रीतसर घटस्फोट झाला' या मताचे होते, तर काही जणांना हा सरळसरळ अन्याय वाटत होता. पोलिसांनी या प्रकरणात शेख अब्बास यांच्या बहिणीचा जबाब नोंदवून घेतला. त्यात तिने स्पष्टच सांगितले की, 'हे दोघे जण माझ्याकडे आले; राहिले. माझ्या भावाची बायको घरातून पळून आली आहे, हे खरे नाही.' या प्रकरणी बराच गाजावाजा झाला. बऱ्याच जणांचे या प्रकरणाकडे लक्ष लागून राहिले होते.

अशा प्रकारचे अनेक प्रकार तलाकच्या संदर्भात घडत. म्हणूनच महिलांवरील अन्याय रोखण्यासाठी एकतर्फी तलाक बंद करण्याची मागणी मंडळाकडून होत असे. *(विशाल सह्याद्री, ३० एप्रिल १९७६)*

३. २६ तलाक आणि बहुपत्नीत्व

(तरुण भारत, ९ मार्च, १९७६; महाराष्ट्र टाइम्स, २३ नोव्हेंबर, १९७६, संकलित बातमी)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर कार्य सुरू केल्यानंतर या प्रश्नाचे बळी ठरलेल्या महिला व त्यांचे कुटुंबीय मंडळाकडे मदत मागण्यासाठी येण्याचे प्रमाण वाढत आहे. 'लग्नानंतर केवळ दोन वर्षांनी तलाक दिलेल्या शेख कादिर उस्मान (रा. येरवडा, पुणे) याने पत्नी शरफुन्निसाला दरमहा १०० रुपये पोटगी द्यावी' असा हुकूम माननीय न्या. शेळके यांनी दिला. क्षुल्लक कारणावरून मारहाण करणे, शिवीगाळ करणे, घरातून हाकलून देणे असे प्रकार शेख कादिर उस्मान करत होते. पोस्टाने पाठवलेला तलाक पत्नीने घेतला नाही, म्हणून त्यांनी स्थानिक वर्तमान पत्रातून तलाक प्रसिद्ध केला. तलाकनंतर मेहेरच्या व इद्दतच्या रकमेचा आकडा शेख कादिर यांना न्यायालयासमोर सिद्ध करता आला नाही. तसेच त्यांनी दिलेली मेहेरची व इद्दतची रक्कम योग्य नसल्याने शरफुन्निसाला अर्जाच्या तारखेपासून दर महा १०० रुपये पोटगी देण्याचा निर्णय न्यायालयाने दिला. तसेच 'खर्चापोटी १०० रुपये द्यावेत' असाही न्यायालयाने हुकूम दिला. सुधारित गुन्हेगारी कायद्याच्या १२५व्या कलमान्वये न्यायालयाने हा निर्णय दिला होता. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुणे शाखेने या महिलेस मदत केली होती व मार्गदर्शन केले होते.

याचप्रमाणे पुणे येथील मोमिनपुरा भागात राहणारा शेख कमरुद्दिन याने पुण्यातील कागदीपुरा – कसबा पेठ भागात आज दुपारी होणारा दुसरा निकाह आदल्या रात्रीच गुपचूपपणे उरकून घेतला. या निकाहचा विरोध करण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते दुपारी कागदीपुरा येथे गेले होते. त्या वेळी त्यांना ही बातमी समजली. या वेळी त्या ठिकाणी शेख कमरुद्दिन यांची दुसरी सासू व काही पुरुष हजर होते. शेख यांनी आपली पहिली बायको मैमुना हिला सोडून दिले होते. ती पुण्यातच, शिवाजीनगर भागात आपल्या आईकडे राहत होती. तिच्या वतीने खडक पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल करण्यात आला. शेख यांची नवी बायको १४ वर्षांची असल्याचे समजले. मुस्लीम पर्सनल लॉमध्ये या संबंधी स्पष्ट तरतूद नसल्याने मुलगी अल्पवयीन असल्याने न्यायालयातून या विवाहास स्थगिती आणण्याचा मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा प्रयत्न अपयशी ठरला.

३. २७ हमीद दलवाई यांचे निधन

मुस्लीम समाजात प्रबोधन व्हावे, यासाठी मंडळाच्या स्थापनेनंतर पाच वर्षे तुफानासारखे काम करणारे हमीद दलवाई यांचे निधन ही मुस्लीम समाज प्रबोधनासाठी फार मोठी हानी होती. मुंबई येथील जसलोक रुग्णालयात उपचार घेत असलेले समाज सुधारक हमीद दलवाई यांचे मंगळवार, दिनांक ३ मे १९७७ रोजी सकाळी ७:०० च्या सुमारास, वयाच्या ४५व्या वर्षी मूत्रपिंडाच्या आजाराने निधन झाले. फिरोज दारूवाला या गुन्हेगाराची किडनी त्यांना २ ऑक्टोबर १९७५ रोजी बसवण्यात आली होती. मुंबईच्या जसलोक रुग्णालयात ही शस्त्रक्रिया करण्यात आली होती. या शस्त्रक्रियेचा खर्च रुपये ५०,००० महाराष्ट्र शासनाने दिला होता. त्यांच्या इच्छेनुसार मुंबईतील चंदनवाडी विद्युत दाहिनीत सायंकाळी ४:०० वाजता, अत्यंत साध्या पद्धतीने त्यांचा अंत्यविधी करण्यात आला. या प्रसंगी मुस्लीम किंवा हिंदू पद्धतीने कोणतेही विधी करण्यात आले नाहीत. त्याचप्रमाणे श्रद्धांजलीची भाषणेही झाली नाहीत. महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री माननीय शरद पवार, स्नेही प्रा. अ. भि. शहा, वसंतराव नगरकर व महाराष्ट्र टाइम्सचे तत्कालीन संपादक गोविंदराव तळवलकर या व्यक्तिगत मित्रांना नऊ एप्रिल रोजी पत्र लिहून, साधेपणाने अंत्यविधी करण्याची अखेरची इच्छा दलवाई यांनी व्यक्त केली होती. चंदनवाडीत प्रा. अ. भि. शहा यांनी हे पत्र वाचून दाखविले आणि त्यानंतर अंत्यविधी करण्यात आला. हमीद दलवाई यांच्या पत्नी मेहेरून्निसा , कन्या रुबिना व इला यांना या या वेळी दुःखावेग आवरला नाही. डॉ. इंदुताई पारेख, श्रीमती दुर्गा भागवत आणि इतर उपस्थित महिलांनी त्यांचे सांत्वन केले. आपले प्रगतिशील विचार कृतीत आणण्यासाठी त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. या ध्येयवादी समाजसुधारकाचे अंत्यदर्शन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, गृहमंत्री शरद पवार, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवदत्त दाभोलकर , ना. ग. गोरे, बाबा आढाव, प्रभूभाई संघवी, विजय तेंडुलकर, कायदेमंत्री हुसेन दलवाई (ज्येष्ठ), मे. पुं. रेगे, प्रा. नलिनी पंडित, कुमुद मेहता, आमदार पी. बी. पाटील, जगन्नाथ जाधव, डॉ. पी. व्ही. मंडलिक, सदानंद रेगे आणि कार्यकर्ते यांनी घेतले. हमीद दलवाई यांचे धाकटे भाऊ हुसेन दलवाई आणि बहीण फातिमा ही भावंडे अंत्यविधीच्या वेळी उपस्थित होती. अंत्यविधी होताच श्रीमती मेहेरून्निसा दलवाई आपल्या मुलींसह काही दिवसांसाठी प्रा. अ. भि. शहा यांच्या अबोली, भांडारकर इन्स्टिट्यूट रोड, पुणे-४ येथे वास्तव्य करण्यासाठी गेल्या.

हमीद दलवाई यांची अखेरची इच्छा

'मृत्यूनंतर माझे शव माझ्या गावी नेऊ नये. विद्युत दाहिनीत माझ्या शवाचे दहन करावे. मुसलमान किंवा हिंदू, कोणत्याही पद्धतीने कोणताही धार्मिक संस्कार अगर श्रद्धांजलीची भाषणे करू नयेत. मी निरीश्वरवादी म्हणून जगलो व निरीश्वरवादी म्हणूनच मला मरायचे आहे. माझे स्मारक उभारू नये.

'या देशात इस्लामिक संशोधन संस्था स्थापन व्हावी, ही माझी आवडती इच्छा. काही खाजगी व निमसरकारी यंत्रणांनी चालविलेल्या तशा काही संस्था आहेत, पण त्यांच्या कामाने माझे समाधान झालेले नाही. इस्लाम व त्याची संस्कृती सुधारू इच्छिणाऱ्या माझ्या मित्रांनी अशी संस्था स्थापन करावी. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय अशा मूलभूत चळवळीचे, तसेच शहरी व सुशिक्षित मुसलमानांनी चालविलेल्या मुस्लीम राष्ट्रवादी, जातीय चळवळीचे प्रतिबिंब या संशोधनात दिसले पाहिजे. इस्लामच्या समस्यांना वाहिलेले एक नियतकालिकही या संस्थेने सुरू करावे. जगातल्या इस्लामिक चळवळीची दखल त्या नियतकालिकांनी घ्यावी.

'मी सुखाने जगलो. माझी आता कोणाही विरुद्ध तक्रार नाही. माझ्याशी मतभेद असलेल्यांशी मी झगडलो, पण माझा कोणाही विरुद्ध आकस नाही. म्हणून त्यांच्याशीही वैयक्तिक संबंध ठेवण्याचा मी प्रयत्न केला.'

– हमीद दलवाई

मुंबई, ९ एप्रिल १९७७.

३.२८ नवजागृती करणारे हमीद दलवाई : उजळणी

हमीद दलवाईंचा जन्म २९ सप्टेंबर १९३२ साली कोकणातील खेडेगावात मिरजोळी येथे झाला. घराणे गरीब त्यामुळे बालपणी फारशी अनुकूलता त्यांच्या वाट्याला आली नाही, फारसे जग कधी दिसले नाही. इंग्रजी शाळेत गेल्याबर त्यांचे अनुभवविश्व थोडे विस्तारले; त्यांचा मुस्लीम समाजाबाहेर संबंध येऊ लागला. १९४६ साली ते राष्ट्र सेवा दलात जाऊ लागले आणि त्यांना एक नवा उल्हास जाणवू लागला. त्यांचे सेवा दलात जाणे मुस्लीम समाजातील अनेकांना पसंत नव्हते. त्या काळी पाकिस्तानी वातावरण पसरू लागले होते; समाजात भिंती ऊभ्या राहू लागल्या होत्या. हमीद यांच्या संवेदनक्षम मनावर या लाटा आदळू लागल्या होत्या. ते अस्वस्थ होते. 'कोकणी मुसलमानाने पाकिस्तानचे प्रेम का दाखवावे' हे त्यांच्या ध्यानी येत नव्हते. 'व्यापक समाज जीवनापासून स्वतःला का तोडायचे' याचा पुन्हा पुन्हा विचार करूनही त्यांना आकलन होत नव्हते.

हमीद दलवाईंच्या लेखनाचा उगम या वैचारिक क्षेत्रातून झालेला आहे. मॅट्रिकच्या आसपास असणाऱ्या या तरुणाने 'उर्दू आणि मराठी मुसलमान' या नावाने लिहिलेला लेख मुंबईच्या दैनिकात आला आणि लोक चमकले; सनातनी मुस्लीम रागावले. 'मुस्लीम द्रोहाचा शिक्का' मारून त्यांना अलग पाडण्याचा प्रयत्न चालू झाला. मॅट्रिक होताच ते मुंबईला आले... नोकरीसाठी वणवण फिरू लागले... अखेरीस नोकरी लागली... पुन्हा एकदा त्यांनी लेखणी हाती घेतली... 'कफन चोर' ही त्यांची कथा गाजली. समाजातील विसंगतीने ते अस्वस्थ होते... नोकरी सोडून ते पत्रकार बनले... 'मराठां'त नोकरी चालू असतानाच ते भारत दौरा करून आले आणि पाकिस्तानातही जाऊन आले.

समाजवादी विचारसरणीतही त्यांचा कल डॉ. लोहियांकडे होता आणि अखेरीस पक्षनिष्ठतेबद्दल ते उदासीन बनले... त्यांची जीवनाभिमुखता वाढली. 'स्वातंत्र्योत्तर भारतीय मुस्लीम माणसाचा' अभ्यास करण्यासाठी त्यांनी देशव्यापी दौरा केला... पत्रकारितेला त्यांनी रामराम ठोकला... अनेक विचारवंतांशी त्यांचा संपर्क आला... 'मुसलमानांत आधुनिक, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही जाणिवा रुजविल्याशिवाय हिंदू-मुस्लीम प्रश्नाची उकल होणार नाही' याबद्दल त्यांची खात्री पटली आणि त्यासाठीच सर्व वेळ खर्च करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. हा मोठा आणि अवघड निर्णय होता. त्यांच्या पत्नीनेही त्यांना या कामात पूर्ण सहकार्य केले.

याच काळात त्यांची 'इंधन' ही कादंबरी आली व गाजली. यामुळे त्यांच्या वृद्ध पित्यालाही वाळीत टाकण्यात आले. परंतु त्यांनी मोठ्या धैर्याने हे सारे सहन केले.

मुस्लीम स्त्रीची गुलामगिरीतून मुक्तता करण्याचे काम हमीद दलवाईंनी हाती घेतले. मुंबईत सर्वप्रथम त्यांनी मुस्लीम महिलांचा एक मोर्चा सबतबंदी व तलाकबंदीसाठी आयोजित केला. त्यामुळे मुस्लीम समाजात मोठीच खळबळ माजली. त्यातून पुढे मुस्लीम महिला परिषद भरविली

तलाकविरुद्ध मुस्लीम महिला सरसावल्या

मुस्लीम समाजात रमजान व बकरी ईदच्या दुसऱ्या दिवशी 'बासी ईद' साजरी करण्यासाठी जवळपासच्या बगीच्यात किंवा पर्यटन स्थळी जाऊन आनंद साजरा करतात. अशाच पद्धतीने दिनांक १७ सप्टेंबर १९७७ रोजी पुण्यातील पेशवे पार्क व सारसबाग येथे महिला जमल्या होत्या. बासी ईद साजरी करणाऱ्या या महिलांचा हा एक मोठा मेळावा होता. तेव्हा मौखिक घटस्फोट देण्याच्या प्रथेविरुद्ध मुस्लीम सत्यशोधक मंडळाने पुकारलेल्या तलाकविरुद्धच्या जिहादची मोहीम पुढे रेटण्यासाठी मुस्लीम महिला स्वयंसेविका पुढे सरसावल्या. यात श्रीमती साहिबा बंग व श्रीमती नजमा शेख यांच्या नेतृत्वाखाली या मुस्लीम स्वयंसेवकांनी मौखिक घटस्फोटाचा निषेध करणारी पत्रके वाटली व भाषणेही केली. बहुसंख्य उपस्थित मुस्लीम महिलांना या प्रचाराबद्दल बरेच कुतूहल वाटल्याचे जाणवले. वाटण्यात आलेल्या पत्रकामध्ये ५ मागण्यांचा समावेश करण्यात आला होता. मुस्लीम महिलांनी जिहाद-ए-तलाक चा संदेश घरोघरी पोहोचवला. एकतर्फी तोंडी तलाकवर बंदी घालावी, बहुपत्नीत्वाची तरतूद रद्द करावी, पहिली पत्नी जिवंत असताना पुरुषाने दुसरे लग्न केल्यास पहिल्या पत्नीस पोटगी मिळण्याची तरतूद असावी, तलाक झालेल्या व परीतक्त्या महिलांना नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे आणि कलम १२७ (३ब) हे महिलांसाठी वरदान असल्याने तो रद्द करू नये या त्या पाच मागण्या होत. महिलांच्या या मोहिमेत सय्यदभाई यांनीही भाग घेतला.

अहमदनगर येथील मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने म्युनिसिपल कौन्सिल हॉलमध्ये दिनांक २३ ऑक्टोबर १९७७ रोजी तलाकपीडित मुस्लीम महिलांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला. तलाकपीडित महिलांनी त्यांच्या जीवनातील दुरवस्था कथन केल्या. श्रीगोंदा येथील कार्यकर्त्या मीनाबी बाबुमियाँ, पुण्याच्या नसीम खान व कार्यक्रमाच्या अध्यक्ष साबिरा बेग यांनी एकतर्फी तोंडी तलाक रद्द करावा, बहुपत्नीत्व कायदा रद्द व्हावा, तलाकपीडित महिलांचे पुनर्वसन व्हावे आदी मागण्या मेळाव्यात केल्या. या कार्यक्रमाचे संयोजक सय्यदभाई होते. स्थानिक कार्यकर्ते निसार अहमद यांनी हा मेळावा यशस्वी करण्यासाठी मोठे योगदान दिले. *(महाराष्ट्र टाइम्स, टाइम्स ऑफ इंडिया, २० सप्टेंबर १९७७; Sunday Standard, १८ सप्टेंबर, उर्दू दैनिक इंकलाब, १९ सप्टेंबर १९७७, केसरी, २६ ऑक्टोबर १९७७)*

गेली. १९६८ साली पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात त्यांची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. तेव्हापासून ते प्रकाशझोतात आले. हळूहळू हमीद यांच्या भोवती मुस्लीम तरुण जमा होऊ लागले. त्यातूनच मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा जन्म झाला.

या मंडळातर्फे कोल्हापूर, पुणे येथे जिहाद-ए-तलाक परिषदा घेतल्या गेल्या आणि मुस्लीम

स्त्रीच्या अपरंपार दुःखाला वाचा फुटली. कोल्हापूरला मुस्लीम शिक्षण परिषद घेऊन त्यांनी धर्म व भाषा यासंबंधी नव्या विचाराचे प्रवर्तन सुरू केले. दोन वर्षे त्यांची मृत्यूशीही झुंज चालूच होती. मृत्यू समोर असतानाही ते कधी क्षुब्ध व मनाने विकल झाले नव्हते. त्यांची मूत्रपिंडाची एक शस्त्रक्रिया यशस्वी झाली; अमेरिकेतही त्यांच्यावर काही उपचार झाले, परंतु पुन्हा त्यांचे मूत्रपिंड काम देईनासे झाले आणि त्यांच्या जीवनासंबंधीची आशा मालवत चालली.

हमीद दलवाई यांची निधनवार्ता समजताच भारतातील अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला आणि शोकसंदेश पाठवले. मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती बॅ. एम. सी. छगला यांनी हळहळ व्यक्त केली. ते म्हणाले, 'दलवाई थोर समाज सुधारक होते. 'घटनेत निर्देश केल्याप्रमाणे समान नागरी संहिता करावी' अशी त्यांची श्रद्धा होती. ते आपल्या मताला चिकटून होते. काही धर्मवेड्यांनी त्यांना विरोध केला, तरी त्यांनी आपले मत बदलले नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे व भारताचे अपरिमित नुकसान झाले आहे.' प्रा. असफ ए. ए. फैजी आपल्या दुखवट्याच्या संदेशात म्हणतात, 'हमीद दलवाई महाराष्ट्रातील मुसलमानांच्या उन्नतीसाठी धैर्याने झटले. त्यांच्या निधनाने मुस्लीम समाज सुधारणा चळवळीची हानी झाली आहे. एखाद्याचा त्यांच्याशी मतभेद असू शकेल, पण त्यांच्या सच्चेपणाबद्दल कोणालाच शंका नाही.' हमीद दलवाई यांच्या आकस्मिक निधनाने मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनाही धक्का बसला. दुखवट्याच्या संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, 'सामान्य माणसांचे दुःख कमी करण्यासाठी दलवाई यांनी आपले आयुष्य घालविले. सत्यशोधक समाजासाठी त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे.'

'महाराष्ट्रातील मुसलमान समाजात सामाजिक प्रबोधनाची मूलगामी चळवळ उभी करणारा नेता हरपला.' असे मुंबई जनता पक्षाचे चिटणीस राम नाईक म्हणाले. पुढे ते म्हणाले, 'दलवाई यांच्या निधनाने या चळवळीची मोठी हानी झाली आहे. या आघाताने खचून न जाता त्यांच्या अनुयायांनी ही चळवळ नेटाने पुढे चालवणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली आहे.' 'हिंदू समाजात महात्मा फुलेंना क्रांतिकारक म्हणून जे स्थान होते, तेच स्थान मुस्लीम समाजात हमीद दलवाईंना होते. मुस्लीम समाजात सामान्यपणे धर्माची व धर्मपरंपरेची चिकित्सा करणारे नेते नाहीत. धार्मिक चिकित्सेचे आंदोलन मुस्लीम समाजात सुरू करणारे, विचाराने पूर्णपणे आधुनिक आणि राष्ट्रवादी असे हमीद दलवाई हे पहिलेच नेते म्हणावे लागतील. त्यांच्या निधनाने एकूण भारतीय तरुणांतील पुरोगामी विचारसरणीच्या, विशेषतः मुसलमान समाजातील सर्व चिकित्सकांची व आधुनिकतावाद्यांची अपरिमित हानी झाली आहे.' असे प्रा. नरहर कुरुंदकर यांनी म्हटले. प्रभाकर पाध्ये, सौ. कमल पाध्ये, केंद्रीय पुरवठा मंत्री मोहन धारिया यांनीही शोकसंदेश पाठवले.

'हमीद दलवाई यांच्या निधनामुळे आपण एका सच्च्या पत्रकाराला व सच्च्या राष्ट्रभक्ताला मुकलो आहोत. दलवाई यांनी मुस्लीम समाजातीलच नव्हे, तर एकंदर भारतीय समाजातील विविध अन्यायांना व अत्याचारांना वाचा फोडण्यासाठी वृत्तपत्रांतून व अन्य माध्यमांतून बरेच कार्य केले होते. त्यासाठी त्यांनी स्वतःच्या प्रकृतीचीही पर्वा केली नाही. त्यांच्या निधनाने मराठी वृत्तपत्रसृष्टीचे बरेच नुकसान झाले आहे.' अशा शब्दांत मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष

पुण्यातील शोकसभा : हमीद दलवाईंच्या निधनानंतरच्या पुण्यातील शोकसभेत ना. ग. गोरे, भाई वैद्य, अ. भि. शहा आणि इतर मान्यवर.

मनोहर देवधर यांनी श्रद्धांजली वाहिली.

'आधुनिक काळात मुस्लीम समाजात प्रबोधन करणारा फुले, आगरकर यांच्या मालिकेतील एक समाज सुधारक हरपला आहे. हमीद दलवाईंपासून मुस्लीम कार्यकर्त्यांना प्रेरणा व स्फूर्ती मिळेल आणि बुद्धिनिष्ठ विचारांची त्यांनी सुरू केलेली परंपरा पुढे चालेल' अशी आशा यदुनाथ थत्ते यांनी व्यक्त केली. तर ना. ग. गोरे म्हणाले, 'निष्ठावंत असलेल्या, निरपेक्ष कार्य करणाऱ्या, समाज सुधारणेची तळमळ असलेल्या हमीदभाई यांची समाज सुधारणेची तळमळ वादातीत होती. मुस्लीम बांधवांशी त्यांचे वैर नव्हते; फक्त मुस्लिमांनी आधुनिक जगाशी, नव्या प्रवाहाशी समरस व्हावे, हीच त्यांची तळमळ होती. याव्यतिरिक्त डॉ. रत्नाकर महाजन, विजय तेंडुलकर आणि मंडळाचे कार्यकर्ते यांनी श्रद्धांजली वाहिली.

पुण्यातील शोकसभा

पुण्यामध्ये दिनांक १० मे १९७७ रोजी हमीद दलवाईंना आदरांजली वाहण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत नानासाहेब गोरे, पु. ल. देशपांडे, गृहमंत्री शरद पवार, बाबा आढाव, भाई वैद्य, अ. भि. शहा, बाबुमियाँ बँडवाले, सय्यदभाई, रत्नाकर महाजन, प्रा. मुमताज रहिमतपुरे आणि कार्यकर्ते यांची भाषणे झाली. या प्रसंगी पु. ल. देशपांडे म्हणाले, 'महाराष्ट्रामध्ये महात्मा जोतीराव फुले यांनी लावलेल्या प्रबोधनाच्या वृक्षावर फुललेले सर्वांत सुंदर फुल म्हणजे हमीद दलवाई. हमीद दलवाई आपल्या फार जवळ होते. त्यामुळे त्यांच्या कार्याची महत्ता आपल्याला समजली नाही. परंतु मला खात्री आहे की, काळाने आपण जेव्हा दूर

जाऊ त्या वेळी आपण महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांचे नाव जितक्या आदराने घेतो, तेवढ्याच आदराने दलवाईंचे नाव घेतले जाईल.' नानासाहेब गोरे म्हणाले, 'मतांवर काय परिणाम होईल ते पाहून सत्ताधारी पक्ष धोरण ठरवीत असल्याने जनता पक्षाचे सरकार समान नागरी कायद्याबाबत काय निर्णय घेईल, हे मलाही सांगता येणार नाही. परंपरागत रूढी दूर करण्यासाठी लढा द्यायचा असेल, तर प्रत्येक शतकात हुतात्मा व्हावे लागेल. मुस्लीम समाजाच्या अलग राहण्याच्या चमत्कारिक वृत्तीविरुद्ध झगडताना हमीद भाई धारातीर्थी पडले.' अ. भि. शहा यांनी अशी माहिती दिली की, 'दलवाईंनी आपल्या अंतिम इच्छेत व्यक्त केलेल्या इस्लामिक संशोधन संस्थेसाठी वार्षिक खर्च एक लाख रुपये येईल. शासनाकडून व इतर बाजूंनी येणाऱ्या दबावाला न जुमानता कार्य करायचे ठरवले, तर दहा लाख रुपयांचा विश्वस्त निधी उभारणे आवश्यक आहे.' महाराष्ट्राचे गृहमंत्री शरद पवार म्हणाले, 'निवडणुका नजरेसमोर ठेऊन सामाजिक प्रश्नांवर तडजोड करण्याची वृत्ती मी काम करीत असलेल्या व सरकारात असलेल्या पक्षांतही अलीकडे शिरलेली दिसते. हमीद दलवाईंचे कार्य यामुळे महत्त्वाचे आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने ते पुढे सुरू ठेवावे. आम्ही पूर्वीप्रमाणेच आपली जबाबदारी घेऊ.' डॉ. बाबा आढाव म्हणाले, 'झुंडशाहीशी मुकाबला करून सर्वसाधारण मुस्लिमांशी संवाद साधण्याचा बळकट प्रयत्न दलवाईंनी केला. त्यांनी पारदर्शकता स्वीकारली होती. त्यांच्याजवळ लपविण्यासारखे काही नव्हते.' 'तलाकपीडित स्त्रियांचे काम मंडळाने हाती घ्यावे व हा प्रश्न भारतीय स्तरावर मांडावा' अशी सूचना माजी महापौर भाई वैद्य यांनी केली.

मंडळाच्या वतीने सय्यदभाई व सय्यद मुनीर, बाबुमियाँ बँडवाले, मुमताज रहिमतपुरे व कार्यकर्ते यांनी विचार मांडले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ, युक्रांद, आंतरभारती, महात्मा फुले प्रतिष्ठान, मराठी पत्रकार संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद व समतावादी संघटना यांच्या वतीने पुण्यातील राज्य शिक्षणशास्त्र संस्थेच्या सभागृहात ही सभा आयोजित करण्यात आली होती. माननीय यदुनाथ थत्ते यांनी प्रास्ताविक केले, पु. ल. देशपांडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. *(महाराष्ट्र टाइम्स, केसरी, तरुण भारत, विशाल सह्याद्री, लोकसत्ता, सकाळ, ४ मे १९७७; महाराष्ट्र टाइम्स, ११ मे १९७७; सकाळ, १२ मे १९७७; पुना हेराल्ड, ११ मे, १२ मे १९७७)*

३. २९ दलवाईंना लंडनमध्ये श्रद्धांजली

लंडनमध्ये वास्तव्य करून असलेल्या भारतीयांतर्फे २९ मे १९७७ रोजी 'इंडिया क्लब'मध्ये झालेल्या सभेत दलवाईंना श्रद्धांजली वाहण्यात आली. गोविंद दवरेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत डॉ. तारामदा बसू, धरमपाल यांची दलवाईंच्या कार्याचा गौरव करणारी भाषणे झाली. भारतीय वकिलातीतील प्रेस सेक्रेटरी अय्यर यांनी भारत सरकारतर्फे श्रद्धांजली वाहिली.

दलवाईंच्या अंतिम इच्छेनुसार 'इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट स्थापन करावी व त्यासाठी इंग्लंडमधून साहाय्य करावे' असा ठराव या सभेत संमत करण्यात आला. या सभेत भारतातील सर्व प्रांतांतील मंडळी उपस्थित होती. तसेच कोकणी मुस्लीम समाजाचे स्थानिक नेतेही उपस्थित होते.

समान नागरी कायदा–विरोधकांचा निषेध

'मुस्लिमांना समान नागरी संहिता नको', 'राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांतून ४४वे कलम काढून टाकावे' अशा मागण्या लखनऊ येथील मुस्लीम पर्सनल लॉ कमिटीच्या कार्यकारी समितीने केल्या आहेत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने याविरोधात भूमिका घेऊन १० मे १९७८ रोजी समितीचा निषेध केला. 'शासनाने मानवतावादी दृष्टीकोनातून या ४४व्या कलमाची त्वरित अंमलबजावणी करून समान नागरी कायदा अस्तित्वात आणावा' असे पत्रक मंडळाकडून सरचिटणीस सय्यदभाई यांनी प्रसिद्ध केले. या पत्रकात तलाक, नसबंदी, उर्दू माध्यम, वंदे मातरम्, समान नागरी कायदा या सर्व राष्ट्रीय प्रवाहाशी निगडित असलेल्या प्रश्नांना मुस्लीम जातीयवाद्यांचा विरोध आहे. 'त्यांना वास्तवाचे भान नाही, हे मुस्लीम समाजाचे दुर्दैव आहे' असेही पत्रकात नोंदवले आहे. *(केसरी, सकाळ, पुना हेराल्ड, ११ मे १९७८)*

समान नागरी कायद्यासाठी उपोषण

हमीद दलवाई यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त ३ मे १९७९ रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ १२ तासांचे उपोषण केले. यामध्ये पुणे आणि परिसरातील तलाकपीडित मुस्लीम महिलांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. महिलांवरील अन्याय निवारणासाठी समान नागरी कायदा अस्तित्वात आणण्याची मागणी या उपोषणादरम्यान करण्यात आली. *(तरुण भारत, ४ मे १९७९)*

३.३० महिला मदतीचे कार्य

पुण्यातील एका रिक्षा ड्रायव्हरने दुसरे लग्न करण्याचे ठरवले. त्या वधूच्या घरी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते पहिल्या बायकोला तिच्या दहा महिन्याच्या मुलासह घेऊन गेले. त्यामुळे होऊ घातलेल्या मुलीच्या आई-वडिलांनी ठरवलेले लग्न मोडले. ही घटना २० जून १९७७ रोजी घडली. या दिवशी संध्याकाळी ५:०० वाजता लग्न होणार होते. मंडळाच्या या सतर्कतेमुळे पुरुषाचे दुसरे लग्न मोडले गेले. तरीही नियोजित वधूच्या आई-वडिलांनी एका योग्य तरुणाबरोबर त्याच वेळी आपल्या मुलीचा विवाह केला.

अडीच वर्षांपूर्वी या रिक्षा ड्रायव्हरचे पुण्यातील भवानी पेठेतील एका मुलीशी लग्न झाले होते. 'लग्नात सूट शिवण्यासाठी कमी पैसे दिले' या कारणावरून थोड्याच दिवसांत हा तरुण आपल्या बायकोशी भांडू लागला. तिने माहेरहून पैसे आणावेत म्हणून मारहाणही करू लागला.

दोन महिन्यानंतर त्याने बायकोला सराफ कट्ट्यावर नेले व तिच्या कानातील दागिने विकून टाकले. 'आपण सूटचे पैसे वसूल करण्यासाठी हे केले' असे तो सांगत होता. यानंतर थोड्याच दिवसांत बाळंतपणासाठी म्हणून ही मुलगी आई-वडिलांकडे गेली व तिथेच राहिली. हा ड्रायव्हर मुलगा एका कुमारिकेशी विवाहबद्ध होणार असल्याचे त्यानंतर आठ दिवसांनी या मुलीच्या आईवडिलांना समजले. ते धावपळ करीत मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडे आले. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी हे दुसरे लग्न रद्द करण्यात यश मिळवले, परंतु पहिल्या पत्नीचा प्रश्न सुटू शकला नाही. 'या पत्नीला त्याने चांगल्या पद्धतीने वागवून नांदवावे' यासाठी मंडळाने प्रयत्न केले. *(सकाळ, २१ जून १९७७)*

जनजागृती वाढवण्यासाठी..

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने मुस्लीम महिलांसाठी करण्यात येत असलेल्या कार्याबद्दलची आस्था सामान्य मुस्लीम समाजात निर्माण होत असतानाच मंडळाचे विरोधक मंडळाचा अपप्रचार करीत राहिले. मंडळाच्या कार्याची माहिती आणि महिला प्रश्नावरील जनजागृती वाढवण्यासाठी मंडळाच्या वतीने विविध भागांत कार्यक्रमांचे आयोजन केले जात होते. याचाच एक भाग म्हणून नगर येथे तलाकग्रस्त मुस्लीम महिलांची परिषद घेण्याचा निर्णय घेण्यात आला. मुस्लीम समाजातील तलाकपीडित महिलांवरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सप्टेंबर, १९७७मध्ये अशा महिलांची परिषद घेण्याचा निर्णय घेऊन तशी माहिती वर्तमानपत्रातून देण्यात आली. यासाठी मंडळाचे कार्यकर्ते नगरभेटीस गेले असता अवघ्या दोन तासांच्या फेरीमध्ये एकतर्फी तलाकची ४० प्रकरणे आढळली. महिला आता धाडसाने पुढे येऊन चांगला

३.३१ मुस्लीम अबलेस न्याय व तलाक

पुण्यातील बोपोडी परिसरात एका लग्न समारंभात मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी एका अबलेला न्याय मिळवून दिला.

जनवाडीच्या एका मुस्लीम गृहस्थाने आपल्या पहिल्या, २२ वर्षीय पत्नीला तलाक न देता १७ वर्षे वयाच्या युवतीशी दुसरे लग्न करण्याचा घाट घातला. या पहिल्या पत्नीने लगेच मुस्लीम सत्यशोधक मंडळाशी संपर्क केला. तेव्हा सय्यदभाई, सय्यद मुनीर, अन्वर राजन, फजल शेख, रसूल शेख, ए. एस. बागिरे अशा मंडळाच्या ३० कार्यकर्त्यांनी त्याच दिवशी, म्हणजे २६ जून १९७७ रोजी सकाळी लग्नाच्या ठिकाणी धाव घेतली.

लग्नासाठी मुस्लीम समाजातील दोन-अडीचशे लोक उपस्थित होते, पण त्यांपैकी कोणीही मंडळाच्या कार्यकर्त्यांना विरोध केला नाही. फक्त नवऱ्या मुलाकडील मंडळी व स्वतः पेश इमाम यांच्याशी शाब्दिक चकमक झाली. 'कायद्यानुसार मुसलमानाला चार लग्न करता येतात' असा इमाम साहेबांचा दावा होता. त्याबर या २२ वर्षे वयाच्या तरुणीने सांगितले की, "मीसुद्धा माणूसच आहे. प्रथम मला तलाक द्या अन्यथा दुसरे लग्न होणार नाही." शेवटी नवऱ्या मुलाने या तरुणीला तलाक दिला व रिवाजानुसार ५०१/- रुपयाची रक्कम मेहेर म्हणून पेश केली. तेव्हाच मंडळाचे कार्यकर्ते व ही तरुणी परत फिरले.

मुस्लीम पुरुष पहिल्या पत्नीस तलाक न देता दुसरा विवाह करू शकतो. मात्र तलाक झाल्याशिवाय महिलेस दुसरे लग्न करता येत नाही. म्हणून 'या तरुणीस तलाक मिळवून देणे' हा एक प्रकारचा न्याय होता. त्यामुळे शक्य झाल्यास तिच्या दुसऱ्या लग्नाच्या वाटा मोकळ्या होतात. अन्यथा तिला आयुष्यभर 'परितक्त्या' म्हणून आयुष्य जगावे लागते. *(महाराष्ट्र टाइम्स, २७ जून १९७७)*

प्रतिसाद देत असल्याचे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी नोंदविले. प्राचीन काळी युद्धामध्ये मरण पावलेल्यांच्या विधवांना संरक्षण देण्यासाठी मुस्लिमांमध्ये बहुपत्नीत्वाची परंपरा निर्माण झाली. पुढे पैगंबरांनी चार पत्नींपर्यंत हे प्रमाण खाली आणले. 'आता विसाव्या शतकात हे प्रमाण एकवर आणले पाहिजे' अशी मंडळाची भूमिका होती. नगरच्या काही तरुण वकिलांनी तलाकपीडित महिलांना न्यायालयीन प्रक्रियेद्वारे न्याय मिळवून देण्यासाठी मोफत कार्य करण्याचे आश्वासन दिले. 'तलाकपीडित महिलांनी आपल्या तक्रारी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अहमदनगरचे संघटक निसारभाई बाटलीवाला, शहाजी रोड, अहमदनगर यांच्याकडे नोंदवाव्यात' असे सांगण्यात आले. *(दैनिक समाचार, २ जुलै १९७७; गावकरी, १७ जुलै १९७७)*

३.३२ धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाला मुस्लीम जातीयवाद्यांचे आव्हान – सय्यद मुनीर

(तत्कालीन सामाजिक-राजकीय स्थिती आणि धर्मवाद्यांची भूमिका आणि स्वरूप समजून घेण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे तत्कालीन संपादक सय्यद मुनीर यांचा हा लेख महत्त्वाचा ठरतो.)

लोकसभा निवडणुकीत उत्तर भारतात मुसलमानांनी जनता पक्षाला मते दिली. एवढेच नव्हे, तर मुस्लीम तरुणांनी निवडणुकीत मुस्लीमेतर उमेदवारांसाठी कामही केले. यामुळे हिंदू-मुस्लीम-संबंधांबाबत स्वातंत्र्योत्तर काळात कधी नव्हते इतके चांगले वातावरण देशभर निर्माण झाले. या निवडणुकीत मुस्लीम मतदारांनी जात-पात, धर्म न पाहता मतदान केले. हे मतदान त्यांनी लोकशाही मूल्ये टिकवून धरण्यासाठी केले असून त्यामुळे त्यांच्या मतदान पद्धतीत गुणात्मक बदल घडून आल्याचेही काहींना वाटले. परंतु 'जनता पक्षाला मते द्या' असे मुसलमानांना सांगणारे दिल्लीचे शाही इमाम, त्यांचे सहकारी मौलाना व जमात-ए-इस्लामी ची मंडळी कडवी धर्मवादी होती व त्यांचे ऐकून मुसलमानांनी जनता पक्षाला मते दिली, ही वास्तविकता निवडणुकीतील यशाने आलेल्या उत्साहात काही मंडळी विसरली.

'मुसलमानांनी अमुक एका पक्षाला मते द्यावीत' असे फतवे मुस्लीम मुल्ला-मौलवी पूर्वीपासून काढत असले, तरी या बेळी आणीबाणीतील अत्याचार व जमात-ए-इस्लामी वरील बंदी यांमुळे लोकसभा निवडणूक मोहिमेत त्यांनी मोठ्या प्रमाणात सक्रिय भाग घेतला. धर्मगुरूंचा हा सहभाग मुस्लीम समाजाला ५० वर्षे मागे घेऊन जात नाही ना, अशी शंका आज वाटत आहे.

अलगतावादी मागण्या

निवडणूक संपताच दिल्लीचे शाही इमाम व जमात-ए-इस्लामी यांनी जातीयवादी मुस्लिमांच्या नेहमीच्या अलगतावादी मागण्या जोरात मांडण्यास सुरुवात केली. शासनाकडे मागण्या मांडून ते थांबले नसून देशभर धर्मावाद्यांची फळी उभी करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबरोबर सुरू असलेली बोलणी हा जमातच्या या योजनेचा एक भाग आहे. निदान जमात या बोलण्याकडे या दृष्टीने पाहते. या देशात धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या निर्मितीस बद्धपरिकर असणाऱ्या सर्वांनाच हे एक मोठे आव्हान असून ते स्वीकारले जाणे आवश्यक आहे. दिल्लीच्या रामलीला मैदानावर झालेल्या सभेत बोलताना शाही इमाम मौलाना बुखारी म्हणाले की, 'नव्या जनता सरकारमध्ये समाविष्ट असणाऱ्या मुस्लीम मंत्र्यांची नावे आधी त्यांनी मला दाखवावीत.' विधानसभांच्या निवडणुका जाहीर झाल्यावर शाही इमाम मौलाना बुखारी यांनी व जमात-ए-इस्लामी ने निवडणुकीत मुसलमानांना लोकसंख्येच्या प्रमाणात तिकिटे देण्याची मागणी केली. विधानसभा निवडणुकीतील तिकीट-वाटपात मुसलमानांना काही ठिकाणी पुरेसे प्रतिनिधित्व न देण्यात आल्याबद्दल जयप्रकाशजींनी केलेया विधानाचा जमातने आपल्या प्रचारासाठी भरपूर उपयोग केला. याशिवाय 'मुस्लीम वैयक्तिक कायद्यात हस्तक्षेप न करण्याचे आश्वासन द्यावे',

'अलीगढ विद्यापीठाला अल्पसंख्याकांचे विद्यापीठ म्हणून मान्यता मिळावी', 'उर्दूला दुसऱ्या राज्यभाषेचा दर्जा देण्यात यावा' इत्यादी नेहमीच्या मागण्या जमातच्या पत्रांमधून व मुस्लीम लीगसारख्या राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांकडून मांडण्यात येत आहेत. 'जनता पक्षाच्या तिकिटावर निवडून गेलेल्या मुस्लीम उमेदवारांना पक्षशिस्तीचा बडगा दाखवू नये व त्यांना मुसलमानांचे प्रतिनिधी म्हणून बोलू द्यावे' अशी मागणी 'रेडियन्स' या जमात-ए-इस्लामी च्या मुखपत्राने केली आहे. परंतु मुस्लीम समाजाला 'एक समाज' म्हणून वेगळी वागणूक व त्याच्या संस्थांना विशिष्ट दर्जा देण्याच्या मुस्लीम जातीयवादी मंडळींच्या मागण्यांना जनता सरकारकडून प्रतिसाद मिळता कामा नये.

जनता पक्षाची भूमिका

'उर्दू भाषेला संरक्षण मिळेल, परंतु दुसऱ्या राज्यभाषेचा दर्जा देता येणार नाही' असे पंतप्रधान मोरारजी देसाईंनी अगदी स्पष्टपणे सांगितले आहे. 'सरकारमध्ये घ्यावयाच्या मुस्लीम मंत्र्यांच्या नावांची यादी पंतप्रधानांनी आधी आपल्याला दाखवावी' ही शाही इमाम बुखारी यांची मागणीही मान्य करण्यात आलेली नाही.

'विधानसभेच्या निवडणुकीतही मुस्लिमांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मुस्लीम नेत्यांना तिकिटे देण्यात यावीत' अशी मागणी शाही इमाम बुखारी यांनी जनता पक्षाकडे केली होती. 'विवाहांचे कायदे' या विषयावर दिल्ली येथे अलीकडे एक परिसंवाद झाला. या परिसंवादात अध्यक्ष पदावरून बोलताना केंद्रीय कायदेमंत्री शांतीभूषण म्हणाले की, 'मुसलमानांनी त्यांच्या वैयक्तिक कायद्यात बदल करण्यास संमती द्यावयास हवी.'

वरील विवेचनावरून जनता सरकारची यासंबंधीची भूमिका बरीच स्पष्ट होते. ढोबळपणे मांडावयाचे झाल्यास पूर्वीच्या काँग्रेस सरकारपेक्षा मुसलमानांच्या बाबत या सरकारची भूमिका वेगळी असणार नाही. मुसलमानांना 'संवेदनक्षम' असणाऱ्या विषयांना जनता सरकार हात घालणार नाही. परंतु मुस्लीम जातीयवाद्यांच्या अवास्तव मागण्याही ते मान्य करणार नाहीत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांच्या निधनास्तव बोलविण्यात आलेल्या कृतज्ञता सभेत भाषण करताना जनता पक्षाचे एक ज्येष्ठ नेते नानासाहेब गोरे म्हणाले की, 'मंडळाच्या उपक्रमांना माझा पाठिंबा आहे, परंतु या प्रश्नांबाबत जनता पक्ष पूर्वीच्या काँग्रेस पक्षापेक्षा वेगळी भूमिका घेईल, असे मला वाटत नाही. कारण मते जनता पक्षालाही हवी आहेत.'

धर्मवाद्यांची फळी

शासकीय पातळीवर मुस्लीम जातीयवाद्यांना प्रतिसाद मिळणार नाही, असे मानून स्वस्थ बसणे धोक्याचे ठरणार आहे. देशातील धर्मवाद्यांची एक फळी उभी करण्याचा व त्यायोगे सेक्युलर शक्तींना शह देण्याचा प्रयत्न जमात करीत आहे. त्यांच्या काही कार्यकर्त्यांचे लिखाण व संघाबरोबर बोलणी करताना त्यांनी घेतलेली भूमिका या दृष्टीने फार बोलकी आहे.

बिहार आंदोलनामध्ये व त्यानंतर आणीबाणीत शासनाविरुद्ध झालेल्या सत्याग्रहात संघ-

स्वयंसेवकांनी मोठा भाग घेतला. तुरुंगात जाणाऱ्यांमध्ये संघ-स्वयंसेवकांचे प्रमाण सर्वांत जास्त होते. या वेळी लोकांच्या इच्छा-आकांक्षांशी संघ एकरूप झाला व त्यामुळे जनतेची सहानुभूतीही त्याने मिळविली. सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचे ठिकठिकाणी झालेले भव्य सत्कार हेच दर्शवितात.

संघामध्ये मुसलमानांना प्रवेश देण्यावर विचार सुरू आहे. तसेच संघ-स्वयंसेवक हरिजन व वन्य जमातींमध्ये काम करणार आहेत. संघामध्ये होत असलेले हे बदल स्वागतार्ह आहेत.

मुसलमानांशी सामंजस्य साधण्याच्या नवीन धोरणाचा भाग म्हणून सरसंघचालकांनी जमात-ए-इस्लामी या कट्टर धर्मांधवादी संघटनेशी बोलणी सुरू केली आहेत. येथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की एका बाजूस संघात काही स्वागतार्ह बदल होत असताना जमातेइस्लामीच्या भूमिकेत कुठलाही फेरबदल झालेला नाही. उलट 'राजकारणात पडावयाचे नाही' या आतापर्यंतच्या आपल्या धोरणाचा ती फेरविचार करीत आहे.

इंदोरमध्ये झालेल्या दोन्ही संघटनांच्या बैठकीत प्रस्तुत लेखकाचे एक ज्येष्ठ पत्रकार मित्र उपस्थित होते. या बैठकीत जमातच्या मंडळींनी अशी सूचना केली की, 'आपण या देशामध्ये धर्मवादी व धर्म न मानणारे असा भेद करू या.'

जमात-ए-इस्लामी

येथे जमात-ए-इस्लामीचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. 'या देशातील सर्व नागरिकांना मुसलमान धर्माची दीक्षा देणे' हे धर्माचे परमकर्तव्य आहे, असे जमात-ए-इस्लामी मानते. 'हा विचार जिवंत ठेवणे' हे जमातचे उद्दिष्ट आहे. यासाठी मुस्लीम समाज हा इतर समाजांहून वेगळा अथवा पृथक समाज म्हणून राहणे आवश्यक आहे. या संदर्भात भारतीय संसदेला मुस्लीम वैयक्तिक कायद्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार असता कामा नये, उर्दूला दुय्यम राज्यभाषेचा दर्जा मिळावा, अलीगढ विद्यापीठ हे अल्पसंख्यांकांचे विद्यापीठ म्हणून जाहीर करावे, मुसलमानांच्या शिक्षणसंस्थांवर शासनाचे नियंत्रण असता कामा नये, शासकीय नोकऱ्यांमध्ये मुसलमानांच्या संख्येच्या प्रमाणात राखीव जागा असाव्यात, लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे इत्यादी मागण्यांची संगती लागू शकते.

धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या विरोधी असणाऱ्या जमातला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची हिंदू राष्ट्रवादाची कल्पना जवळची वाटते.

या संदर्भात १९५२ साली पाकिस्तानात उसळलेल्या कादियानी विरोधी दंगलींची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या मुनीर कमिशनला जमातेइस्लामीचे संस्थापक मौलाना मौदूदी यांनी दिलेले उत्तर फार महत्त्वाचे आहे. 'भारतातील मुसलमानांना कसे वागविण्यात यावे, असे आपल्याला वाटते?' या न्या. मुनीर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मौलाना म्हणाले, 'भारत हे हिंदू राष्ट्र आहे. हिंदूंच्या धर्मात जसे सांगितले असेल, त्याप्रमाणे त्यांनी तेथील मुसलमानांना वागवावे. त्याबद्दल आमची काही तक्रार असणार नाही.'

याचा अर्थ बहुसंख्य हिंदूंच्या मनास येईल तशी वागणूक भारतात मुसलमानांना मिळाल्यास

मौदूदींची काहीही तक्रार नाही. हीच भूमिका भारतात जमात-ए-इस्लामी ची आहे. समान नागरिकत्वाची कल्पना त्यांना मान्य नाही. असे अपमानास्पद जिणे किती भारतीय मुसलमानांना व पाकिस्तानी हिंदूंना हवे आहे, हे तरी त्यांनी स्पष्ट करावे. कारण जमात आपली ध्येय-धोरणे कधीच स्पष्टपणे सांगत नाही. त्यांची स्वतःची एक परिभाषा आहे. त्या परिभाषेतूनच ती आपली म्हणणे मांडीत असते.

सुधारणावाद्यांशी मुकाबला

पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या दै. तरुण भारतमध्ये येथील जमातेइस्लामीचे प्रमुख एम. एन. बाय. अत्तार यांनी एक पत्र लिहिले होते. या पत्रामध्ये सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्या अहमदाबाद येथील जमात-ए-इस्लामी च्या बैठकीतील भाषणाचा त्यांनी उल्लेख केला आहे. या भाषणात देवरस म्हणाले होते की, 'स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी व स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसने हिंदू-मुसलमानांना वेगळे ठेवले.' दिल्ली येथील भाषणात देवरस म्हणाले की, 'हिंदू-मुसलमानांना दूर ठेवण्यात दिल्लीची 'चौकडी' कारणीभूत होती.' अत्तार पुढे म्हणतात की, 'या तीन शक्तींव्यितिरिक्त आणखी एक गट नव्याने मुसलमानांमध्ये निर्माण झाला असून तो स्वतःला सुधारणावादी व नवमतवादी म्हणवतो व मुसलमानांत विषारी अपप्रचार करून हिंदू-मुसलमानांमध्ये वितुष्ट निर्माण करतो. देवरस यांनी यांचीही दखल घ्यावयास हवी होती.'

अत्तार यांना मुस्लीम सुधारणावाद्यांशी मुकाबला करण्यासाठी संघाचे साहाय्य अपेक्षित आहे, हे वरील पत्रावरून स्पष्ट होईल.

उपेक्षा नको

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी बोलणी करण्यामागे जमातचा हेतू काय आहे, हे वरील विवेचनावरून

अहमदनगर येथील मेळाव्यात मांडणी करताना सय्यदभाई.

स्पष्ट होईल. जमात ही एक राष्ट्रव्यापी संघटना असून अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने काम करते. जमातच्या विचारसरणीचा मुस्लीम जनमानसावर, विशेषतः तथाकथित सुशिक्षित वर्गावर मोठा प्रभाव आहे. यामुळे जमातने उभे केलेले आव्हान दुर्लक्षून चालणार नाही.

जमातचे आव्हान केवळ धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्याच विरोधी नाही. ते सर्व आधुनिक मानवतावादी मूल्यांच्या विरोधी आहे. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद ज्या मूल्यांवर उभा राहतो, त्या समान नागरिकत्वाच्या, लोकशाहीच्या व आधुनिक न्यायाच्या कल्पनेलाही हे आव्हान आहे. *(महाराष्ट्र टाइम्स, १३ जुलै १९७७)*

३.३३ तलाकपीडित महिलांची परिषद – अमरावती

२६ डिसेंबर १९७७ रोजी अमरावती येथे जिहाद-ए-तलाक परिषदेचे आयोजन करण्यात आले. यात तलाकपीडित मुस्लीम महिला परिषदेनेही समान नागरी कायद्याचा पुरस्कार केलेला असला, तरी प्रथम तलाक सहज व सुलभ ठेवू नये; तलाकपीडित महिलांच्या पोटगीची सोय करावी, पहिली पत्नी जिवंत असेपर्यंत दुसऱ्या विवाहास अनुमती मिळू नये; आपल्या पतीबरोबर राहू न इच्छिणाऱ्या महिलांसाठी काहीतरी तरतूद असावी – या प्रश्नांवर या परिषदेचा विशेष भर होता. परिषदेचे हेच मर्यादित उद्दिष्ट होते.

प्राचार्य कुलसूम पारेख यांनी असे सांगितले की, 'तलाक हा अगदी अंतिम उपाय असल्याचे कुराणात म्हटले आहे. यासाठी अंतिम उपाय म्हणूनच तलाकचा वापर व्हावयास हवा किंवा सक्तबंदी कायदा करून अधांतरी लटकत असलेले मुस्लीम स्त्रियांचे संसार स्थिर करण्यात यावेत.' श्रीमती मेहेरून्निसा दलवाई यांनी म्हटले आहे की, ' 'इस्लाम धर्म सोडून द्यावा' अशी शिकवण मुस्लीम सत्यशोधक मंडळ देत नाही. आमचा इस्लामला विरोध नाही, पण इस्लामच्या नावावर चालू असलेले अत्याचार मात्र बंद झाले पाहिजेत, अशी त्याची मागणी आहे. मुस्लिमांचा वैयक्तिक कायदा पूर्णपणे रद्द करावा, असे त्याचे आजचे म्हणणे नाही. पण या कायद्यातील तोंडी तलाकची तरतूद रद्द करण्यात यावी आणि जोपर्यंत तलाकला न्यायालयाची मंजुरी मिळत

अमरावती येथील कार्यक्रमात वजीर पटेल.

नाही, तोपर्यंत तो कायदेशीर मानण्यात येऊ नये, अशी मागणी एका ठरावान्वये या परिषदेने केली आहे. तलाकपीडित महिलांना रोजगार मिळावा, यासाठी सरकारने काही तरतूद करावी; तलाक न देता महिलांना सोडून देण्यात आल्या प्रकरणी सरकारने कारवाई करावी; तलाक दिल्यानंतर पोटगी देण्याचे कारण पडू नये यासाठी मारहाण करून महिलांना घराबाहेर जाण्यास भाग पाडण्यात येते, यासाठी काही उपाय योजावेत... आदी काही ठराव या परिषदेने केले आहेत.'

कोल्हापूर येथील कार्यकर्त्या प्रा. मुमताज रहिमतपुरे यांचेही या परिषदेत भाषण झाले. त्यांनी आपल्या मनोगतात कुराण हे दैवी पुस्तक नसून ते मानवनिर्मित असल्याचे सांगितल्याने परिषदेत वाद निर्माण होऊन हाणामारी करण्यापर्यंत हे प्रकरण जाण्याची वेळ आली. शेवटी मेहेरुन्निसा दलवाई आणि मुमताज रहिमतपुरे यांना आयोजकांनी गच्चीवर नेऊन शांत केले. मुस्लीम समाज अशा विषयांच्या बाबतीत किती संवेदनशील असतो, याची प्रचिती या प्रसंगी आली.

तोंडी तलाक

मुस्लीम वैयक्तिक कायद्याने मुस्लिमांना तोंडी तलाकचे दिलेले 'स्वातंत्र्य' रद्द करण्यात यावे, ही या परिषदेची मुख्य मागणी आहे व इतर मागण्या आनुषंगिक आहेत. मुस्लीम वैयक्तिक कायदा एकदम व लेखणीच्या एका फटकाऱ्यानिशी रद्द करता आला नाही, तरी त्यातील अत्यंत जाचक तरतुदी काढून टाकण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकणे आवश्यक आहे (त्यांपैकीच 'तोंडी तलाक' ही एक तरतूद आहे). अशा उपाययोजनेस उदारमतवादी मुस्लीम नेते व कार्यकर्ते, तसेच अन्याय, अत्याचार व अनीती यांस तीव्र विरोध करणारे व या तरतुदी इस्लाम धर्माचे अविभाज्य अंग असल्याचे न मानणारे मुस्लीम धर्मनेते यांचा पाठिंबा मिळावयास हरकत नसावी. अर्थात, हे वाटते तितके सोपे नाही. पण या दृष्टीने प्रयत्न मात्र केलेच पाहिजेत.

महाराष्ट्रातील अशा प्रकारची ही पहिलीच परिषद असून ती यशस्वीरित्या पार पडली. अमरावती येथील बहुसंख्य मुस्लीम राहणाऱ्या विभागात या परिषदेविरुद्ध पत्रके लावण्यात आली होती. तलाकपीडित मुस्लीम महिलांची ही परिषद हाणून पाडण्याचे प्रयत्न जातीयवाद्यांकडून चालू होते. अशा, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे निमंत्रक वजीर पटेल आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी ही परिषद यशस्वी करून दाखविली, त्याबद्दल त्यांचे जेवढे अभिनंदन करावे, तेवढे थोडेच ठरेल. *(महाराष्ट्र टाइम्स, ५ जानेवारी १९७८)*

३.३४ हमीद दलवाई यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त

३ मे १९७८ या दिवशी, समाज सुधारक हमीद दलवाई यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पुण्यात यानिमित्त मंडळ आणि विविध समविचारी संघटना यांच्या वतीने तलाकपीडित मुस्लीम महिलांचा मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. 'सक्तबंदी करा, तोंडी तलाक रद्द करा आणि समान नागरी कायदा करण्यात यावा' या मागण्यांसाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि विविध संस्था यांच्या वतीने काढलेला मोर्चा साधना कार्यालयापासून पुणे स्टेशन रोडपर्यंत, जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत गेला. तत्पूर्वी साधना प्रेसच्या आंतरभारती सभागृहात दिवंगत हमीद दलवाई यांच्या फोटोस झैनबबी या तलाकपीडित महिलेने पुष्पहार घालून अभिवादन केले. या प्रसंगी डॉ. बाबा आढाव यांचे भाषण झाले. डॉ. आढाव म्हणाले, 'भारतातील सर्व नागरिक न्यायालयासमोर समान आहेत, असे म्हणायचे व मुस्लीम स्त्रीला मात्र तलाकविरुद्ध न्यायालयात दाद मागता येत नाही, ही चमत्कारिक परिस्थिती आहे. त्यासाठी समान नागरी कायदा झाला पाहिजे. दलवाईंना ती एक योग्य अशी श्रद्धांजली ठरेल.' मोर्चामध्ये युक्रांद, युवा जनता राष्ट्र सेवा दल, इंडियन सेक्युलर सोसायटी, महात्मा फुले समता प्रतिष्ठान या संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चातर्फे झैनबबी, फरिदा सय्यद , नूरजहाँ, झरीना शेख, साबिरा बेग या महिला आणि डॉ. बाबा आढाव, सय्यदभाई यांनी एक निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले. नंतर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर सभा झाली. सभेत बोलताना अ. भि. शहा म्हणाले, 'मुस्लीम राष्ट्राच्या १३०० वर्षांच्या इतिहासात दलवाईंसारखा पुरोगामी दृष्टीचा हिम्मत असलेला दुसरा नेता झाला नाही. 'सर्वच मानव एकाच जातीचे आहेत असे दलवाई मानत. त्यांचे हक्क व कर्तव्ये यांबाबतीत धर्म, राष्ट्र, भाषा, लिंग यांमुळे भेदभाव होता कामा नयें' अशी त्यांची भूमिका होती. मुस्लीम समाजाचा निम्मा भाग असलेल्या भगिनी स्वतंत्र नागरिक म्हणून इतर समाजाबरोबर जगू शकत नसतील, तर तो राष्ट्राच्याही प्रगतीतील अडथळा आहे, असे दलवाई मानत असत.' या वेळी शहा यांनी हमीद दलवाई यांच्या 'मुस्लीम जातीयवादाचे स्वरूप : कारणे व उपाय' या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाल्याचे जाहीर केले. सभेमध्ये सय्यद मुनीर म्हणाले, 'अकरा वर्षांपूर्वी हमीद दलवाईंनी मुस्लीम स्त्रियांवरील अन्यायाला प्रथम वाचा फोडली. गेली अकरा वर्षे शांततामय व सनदशीर मार्गाने हा लढा सुरू आहे. परंतु शासन मुस्लीम स्त्रियांना या मार्गाने न्याय देणार नसेल, तर कायदा मोडण्याचाही विचार करावा लागेल. मुस्लीम स्त्रीच्या हक्कांचा लढा हा मुस्लीम जातीयवादाविरुद्धचा लढा आहे. दुर्दैवाने जनता पक्षाचे काही नेते आपापसांतील गटबाजी व वैयक्तिक स्वार्थापोटी मुस्लीम जातीवादाला प्रोत्साहन देत आहेत.' इब्राहिम सिद्दीकी म्हणाले, 'मुस्लीम स्त्रियांना हक्क देण्याचा प्रश्न मानवतावादाच्या चौकटीतून सोडवावा, धर्माच्या नावाने मुस्लीम नेते मुसलमानांना किती दिवस मूर्ख बनवीत राहतील, हे समजत नाही.' अन्वर राजन म्हणाले, 'मुस्लीम महिलांच्या मागण्यांना युवा जनतेचा पाठिंबा आहे.' सय्यदभाई म्हणाले,

'राजकीय बदल झाला, परंतु सामाजिक बदल झाला नाही. मुस्लीम महिलांच्या मागे मंडळ सतत उभे राहील.' या वेळी युक्रांदचे अजित सरदार यांचेही भाषण झाले. (सकाळ, ४ मे १९७८)

३.३५ तलाकपीडित महिलांचा मोर्चा – अहमदनगर

दलवाईंच्या प्रथम स्मृदिनानिमित्त अहमदनगर शहरातील तलाकपीडित महिलांचा मोर्चा कलेक्टर कचेरीवर नेण्यात आला. तेथे तलाकपीडित महिलांचे एक शिष्टमंडळ जिल्हाधिकारी जितकर यांना भेटले व जितकर यांच्यापुढे या मंडळाने एक निवेदन सादर केले. या निवेदनात १) एकतर्फी तलाक बंद करा २) पोटगीचा हक्क मान्य करण्यात यावा ३) सवतबंदीचा कायदा लागू करण्यात यावा ४) कायद्यातील कलम १२७ (ब) रद्द करण्यात यावे अशा मागण्या करण्यात आल्या होत्या.

अहमदनगर येथील मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे शहराध्यक्ष सय्यद अब्दुल लतिफ, निसार बाटलीवाला, शमसुदिद्न अगरबत्तीवाला, सय्यद अब्बास व इतर कार्यकर्त्यांसमवेत सुमारे ५० तलाकपीडित महिलांनी या मोर्च्यात भाग घेतला. कलेक्टर कचेरीसमोर मोर्चा आल्यावर तेथे कॉ. राम रत्नाकर, टी. डी. देशमुख, शेखगनी आणि डॉ. महाले यांची भाषणे झाली. (नगर टाइम्स, शुक्रवार दि. ५ मे १९७८)

३.३६ हमीद दलवाई स्मृतिदिनानिमित्त निवेदन

(साधना, शनिवार, १५ एप्रिल १९७८)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकारिणीची सभा रविवार ता. ९ एप्रिल १९७८ रोजी पुणे येथे आंतरभारती सभागृहात भरली होती. ३ मे १९७८ रोजी हमीद दलवाईंचा पहिला स्मृतिदिन येत असून 'हा दिवस कृतिदिन म्हणून साजरा करावा' असे या बैठकीत ठरले आणि त्या दिवसाचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. त्या दिवशी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुढाकाराने तलाकपीडित स्त्रिया शासनाला एक निवेदन सादर करणार आहेत. मुंबईत राज्यपाल व मुख्यमंत्री यांना व इतरत्र त्या-त्या ठिकाणच्या सर्वोच्च शासकीय अधिकाऱ्यांना हे निवेदन सादर करण्यात येईल. मुस्लीम स्त्रिया अनेक ठिकाणी इतक्या भयग्रस्त अवस्थेत जीवन कंठत आहेत की, इच्छा असूनही त्यांना उघडपणे निवेदन सादर करणे शक्य होणार नाही. त्या ठिकाणी मुस्लीम तरुण इतर समाज परिवर्तनवादी संघटनांना बरोबर घेऊन निवेदन सादर करतील. त्यानंतर शक्य असेल त्या ठिकाणी जाहीर सभाही आयोजित करण्यात येतील.

अन्यायांचे स्वरूप

धर्माज्ञा धाब्यावर बसवून एकतर्फी जबानी तलाक सर्रास दिला जातो आणि स्त्रीचे जीवन निराशेच्या अंधाराने भरून जाते. तलाकची ही अन्याय्य पद्धत अनेक मुस्लीम देशांनी बंद केली असून जातिधर्मातीत राष्ट्र असणारा भारत मात्र त्याबाबत मागे राहिला आहे. आपल्या संविधानाने सामाजिक न्यायाचे आश्वासन दिले असूनही मुस्लीम स्त्रियांना मात्र याबाबत वंचित ठेवण्यात आले आहे. ही परिस्थिती बदलली पाहिजे. मुस्लीम स्त्रियांची दुसरी मागणी सवतबंदीच्या कायद्याची आहे. 'अन्य भारतीय स्त्रियांना याबाबत मिळालेले संरक्षण आपल्यालाही मिळावे' अशी मुस्लीम स्त्रीची स्वाभाविक अपेक्षा आहे. 'कायद्यासमक्ष सर्व समान समजले जातील आणि कायद्याचे सर्वांना समान संरक्षण मिळेल' अशी ग्वाही घटनेने दिली असूनही तिचे परिपालन होत नाही, ही मुस्लीम स्त्रीची व्यथा आहे. घटस्फोटित अबलेला पोटगीचा हक्क दिलेला आहे, पण मुस्लीम स्त्रीची मात्र मेहेर देऊन बोळवण केली जाते. इतर स्त्रियांना जशी पोटगी मिळते, तशी मुस्लीम स्त्रीलाही मिळाली पाहिजे. अशी पोटगी देण्याची सक्ती झाली म्हणजे तलाकला काही प्रमाणात आळा बसेल आणि सवतीची टांगती तलवारही थोडी बाजूला होईल.

मानवी संस्कृती

तलाक आणि सवत यांच्या कात्रीतून सुटका झाल्याखेरीज मुस्लीम स्त्रीच्या विकासाची वाट मोकळी होणार नाही. ज्या समाजातील स्त्रीच जखडलेली असेल, त्या समाजाला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संविधानातील मूलभूत तत्त्वांचा प्रत्यय तरी कसा येणार? 'मुसलमान आपले काय ते पाहून घेतील, आपल्याला काय करायचे आहे' ही वृत्ती एकात्मतेला छेद देणारी

आहे आणि ती टाकून दिलीच पाहिजे. माणूस दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी आणि आनंदाने आनंदी व्हायला शिकला आणि जगात संस्कृतीची पहाट झाली. भारतीय घटनेने याच दृष्टीने जाती-धर्म-वंश-भाषा व स्त्री-पुरुषत्व अशा कोणत्याही कारणाने खंडित न होणारे नागरिकत्व दिले आहे. हे नागरिकत्व मजबूत करण्याच्या कामी सर्वांचे साहाय्य आणि सहकार्य मिळाले पाहिजे.

हमीद दलवाईंच्या स्मृतिदिनाचा कार्यक्रम याच दृष्टीने आयोजित करण्यात आला आहे. मानवी हक्कांचा उपमर्द करणाऱ्या सर्व तरतुदी संपुष्टात आल्या पाहिजेत... मग त्या तरतुदी कोणत्याही युक्तिवादाच्या आधारे टिकवण्याचा प्रयत्न केला जात असो.

निवेदनाची रूपरेषा

मा. (शासकीय अधिकाऱ्याचा हुद्दा व पत्ता)

हमीद दलवाई यांच्या पहिल्या स्मृतिदिनी आम्ही हे निवेदन आपणांस सादर करत आहोत. प्रत्येक सहृदय माणूस या निवेदनामागील भूमिकेशी समरस होईल व या मागण्यांना पाठिंबा देईल, याबद्दल शंका नाही.

'निवेदनातील मागण्या ध्यानी घेऊन आवश्यक ती कायदेशीर व प्रशासकीय उपाययोजना त्वरित केली जावी. राज्य व केंद्र सरकारने याबाबत हयगय वा टोलवाटोलवी करू नये. आज भारतीय घटनेतील मूलगामी गोष्टींची होत असलेली विटंबना त्वरित थांबवावी' अशी या निवेदनाद्वारे आम्ही मागणी करत आहोत.

१. जबानी, एकतर्फी तलाकला बंदी करून आवश्यकता असेल तेव्हा न्यायालयातच याबाबतची कारवाई केली जावी, अशी कायदेशीर तरतूद त्वरित करण्यात यावी.
२. तलाक दिलेल्या मुस्लीम स्त्रीला दुसरे लग्न होईपर्यंत किंवा मरेपर्यंत पोटगी मिळावी.
३. तलाक दिला गेल्यामुळे व तलाक देण्याच्या निमित्ताने मुस्लीम स्त्रीच्या होणाऱ्या बेअब्रूचीही योग्य तऱ्हेने भरपाई करण्याची कायदेशीर तरतूद करावी.
४. सक्तबंदीचा कायदा करून मुस्लीम स्त्रीच्या मनातील असुरक्षिततेची व भयाची भावना दूर करण्यात यावी.
५. तलाकपीडित मुस्लीम स्त्री हा समाजातील अतिशय दुबळा घटक समजून तिला सर्व प्रकारच्या सोयी व सवलती देण्यात याव्यात. तिच्या नोकरीबाबत शासनाने व खासगी आणि सार्वजनिक उद्योगधंद्यांनी सहानुभूतीचे व उदार धोरण ठेवावे.
६. तलाकपीडित मुस्लीम महिलांच्या मुला-मुलींना शैक्षणिक व वसतिगृहविषयक सवलती दिल्या जाव्या.

आज ता. ३ मे १९७८ रोजी हमीद दलवाईंच्या स्मृतिदिनी सर्व मुस्लीम स्त्रियांच्या वतीने आम्ही ही मागणी करत आहोत.

सही - नाव व पत्ता

संपर्कासाठी : सरचिटणीस, मुस्लीम सत्यशोधक मंडळ, ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०

३.३७ हिंदूंच्या सहकार्याशिवाय मुस्लिमांच्या समस्या सुटणार नाहीत

मुस्लिमांच्या समस्यांसंदर्भात सहानुभूतीने विचार करणारे आणि मंडळाच्या कार्यात हातभार लावणारे अनेक साहित्यिक, विचारवंत आणि कार्यकर्ते आहेत. 'भारतीय मुस्लिमांच्या समस्या केवळ मुस्लिमांच्या समस्या नसून त्या भारतीय समाजाच्या समस्या आहेत' असा दृष्टीकोन ठेवून मुस्लिमांच्या कल्याणासाठी अनेक व्यक्ती व कार्यकर्ते असे लोक मंडळासमावेत जोडले गेले आहेत.

हमीद दलवाई यांच्या निधनानंतरही या उदारमतवादी कार्यकर्त्यांनी मंडळाच्या कार्यात योगदान दिले आहे. हमीद दलवाईंनंतर मंडळाचे कार्य विस्तारण्यासाठी कार्यकर्त्यांनी महाराष्ट्राबाहेरही कार्य करण्याची तयारी दर्शवली. २८ ऑगस्ट १९८० रोजी सय्यदभाई उत्तर प्रदेशात गेले. त्यांनी आग्रा येथे अनेकांशी संवाद साधला आणि महाराष्ट्रातील मंडळाच्या कार्याची माहिती मुरादाबाद, आग्रा आणि अन्य शहरांत दिली.

यादरम्यान उत्तर प्रदेशात घडलेल्या एका अनुचित घटनेतील संघर्षाला उत्तर प्रदेशमधील काही मुस्लिमांनी धार्मिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. ही कृती उचित नव्हती. सय्यदभाईंनी तेथील मुस्लिमांना शांतता आणि संयम राखण्याचे आवाहन केले. हिंदू बांधवांच्या सहकार्याशिवाय मुसलमानांच्या समस्यांचे निर्मूलन होऊ शकेल असा कुठलाही गैरसमज मुस्लिमांनी बाळगू नये. उलट मुस्लीम बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी हिंदू बांधवांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. हिंदू-मुस्लीम समाजात सामंजस्य आणि बंधुभावाचे नाते स्थापित करण्यासाठी संवादाची गरज असल्याचे आणि कुठल्याही परिस्थितीत धार्मिक दंगे न होण्यासाठी सतर्कता बाळगणे आवश्यक असल्याचे सय्यदभाईंनी सांगितले. 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ एक व्यापक दृष्टी ठेऊन यासाठी कार्यरत आहे. त्यामुळे मुस्लीम समाज राष्ट्राच्या मुख्य प्रवाहाशी जोडला जाऊ शकेल. देशात धार्मिक संघटना व राजकीय पक्ष यांच्यामार्फत पेटवले जात असलेले वैमनस्य वाढू नये, यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ कटिबद्ध आहे' हे सांगून मुस्लीम सत्यशोधक मंडळ राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सद्भाव वाढवण्यासाठी करत असलेल्या कामाची माहिती सय्यदभाईंनी उपस्थितांना दिली. सय्यदभाई म्हणाले की, 'काश्मीरमध्ये जमात-ए-इस्लामी व जमाते तुलुबा यांच्या विघातक कार्याला भारतातील मुस्लीम समाजाने विरोध केला पाहिजे.' *(अमर उजाला, ३० ऑगस्ट १९८०)*

३.३८ मुस्लीम सत्यशोधक चळवळीतील ठळक उपक्रम

- १८ मार्च १९६६ : मुंबई विधानसभेवर सात मुस्लीम महिलांचा मोर्चा.
- १९६३–१९६८ : हमीद दलवाई यांची प्र. के. अत्रे यांच्यासमवेत 'दैनिक मराठा'मध्ये पत्रकारिता.
- १९६७–१९६८ : उत्तर भारत, काश्मीर आणि भारत–पाकिस्तान सीमालगत भागात हमीद दलवाईंचा प्रवास – अभ्यास दौरा.
- एप्रिल, १९६८ : हमीद दलवाई यांनी 'सदा-ए-निसवाँ' (स्त्रियांचा आवाज) या नावाची मुस्लीम स्त्रियांची संघटना उभारली.
- १९६८ : हमीद दलवाईंचे 'मुस्लिम पॉलिटिक्स इन सेक्युलर इंडिया', नचिकेत प्रकाशन, मुंबईतर्फे पुस्तक प्रकाशित.
- १९६८ : हमीद दलवाईंचे 'मुस्लिम जातीयतेचे स्वरूप : कारणे व उपाय' साधना प्रकाशन, पुणेतर्फे प्रकाशित.
- १९६८ : 'इंडियन सेक्युलर सोसायटी'ची स्थापना (प्रा. अ. भि. शहा अध्यक्ष व हमीद दलवाई उपाध्यक्ष).
- १९६८–१९७० : मुस्लीम समाज प्रबोधनासाठी संघटना उभारणीचे प्रयत्न.
- २२ मार्च १९७० : मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना.
- ८ एप्रिल १९७० : 'समान नागरी कायदा'ची मागणी करणारे मुस्लीम स्त्री-पुरुषांच्या सह्यांचे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक यांना देण्यात आले.
- १६, १७, १८ जून १९७० : पुण्यातील मुस्लीम भागात संवादयात्रा
- २० जून १९७० : हमीद दलवाई आणि कार्यकर्ते यांवर मोमिनपुरा, पुणे येथे हल्ला.
- २४ जुलै १९७० : मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई आणि कार्यकर्ते यांच्यावर मोमिनपुऱ्यामध्ये झालेल्या हल्ल्याचा निषेध पुणे महापालिकेत करण्यात आला.
- ३ ऑगस्ट १९७० : परमवीर अब्दुल हमीद व्याख्यानमालेची मंडळाच्या वतीने सुरुवात.
- ३१ मे १९७१ : हमीद दलवाई यांच्या हस्ते मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कोल्हापूर शाखेचे उद्घाटन. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य ए. डी. अत्तार होते व साहित्यिक वि. स. खांडेकर उपस्थित होते.
- १८–१९ सप्टेंबर १९७१ : कोल्हापूर येथे मंडळाच्या पहिल्या कार्यकर्ता शिबिराचे आयोजन.
- २ ऑक्टोबर १९७१ : सोलापूर येथील कार्यक्रमात हमीद दलवाई यांना २००१ रुपयांची थैली भेट देण्यात आली.
- ४ नोव्हेंबर १९७१ : प्रा. असफ ए. ए. फैजी यांचे कोल्हापूर येथे 'इस्लामचा आधुनिक दृष्टीकोन' यावर व्याख्यान.
- २८ नोव्हेंबर १९७१ : अखिल भारतीय मुस्लीम परिषदेचे पुण्यात मंडळातर्फे आयोजन.

महाराष्ट्र राज्य मुस्लीम शिक्षण परिषद प्रवेशद्वार.

- नोव्हेंबर १९७१ : गांधी भवन येथे पुणे कार्यकर्त्यांचे अभ्यास शिबिर.
- ३-४ डिसेंबर १९७१ : दिल्ली येथे 'ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम्स' या परिषदेचे मंडळातर्फे आयोजन.
- १९७१ : कार्यकर्त्यांमार्फत तत्कालीन राज्यपाल मा. अली यावर जंग यांना समान नागरी कायद्याबाबत निवेदन.
- १९७१ : अहमदनगर (श्रीगोंदा) सोलापूर, पंढरपूर येथे मंडळाच्या शाखा स्थापन झाल्या.
- २७, २८ डिसेंबर १९७१ : पुण्यात मुस्लीम सत्यशोधक मंडळ व इंडियन सेक्युलर सोसायटीतर्फे हमीद दलवाई यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लीम महिला परिषदेचे आयोजन.
- ४ जुलै १९७२ : मंडळाच्या सततच्या पाठपुराव्यामुळे मुस्लिमांसाठी द्विभार्या प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आणण्याचे आश्वासन तत्कालीन कायदामंत्री बॅ. अंतुले यांनी विधानसभेत दिले.
- २३-२४ सप्टेंबर १९७२ : कोल्हापूर येथे अभ्यास आणि स्नेहमीलन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन पद्मभूषण अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या हस्ते शाहूपुरी, कोल्हापूर येथील आंतरभारती विद्यालयाच्या सभागृहात झाले. शिबिरात प्रा. अ. भि. शहा, हमीद दलवाई, यदुनाथ थत्ते, बाबुमियाँ बँडवाले, मेहेरून्निसा दलवाई, अ. का. मुकादम, सय्यदभाई व मरियम रिफाई यांनी मार्गदर्शन केले. शिबिराचा समारोप राजाराम हायस्कूल, जुना राजवाडा, कोल्हापूर येथे जाहीर सभेने झाला. शिबिराचे आयोजन मंडळाचे चिटणीस हुसेन जमादार यांनी केले होते.
- २६ सप्टेंबर १९७२ : आर्ट्स व कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर येथील चर्चासत्रात हमीद दलवाई यांचे व्याख्यान.
- २८ सप्टेंबर १९७२ : शांतिनिकेतन लोकविद्यापीठ येथे हमीद दलवाई यांचे व्याख्यान.
- २९ सप्टेंबर १९७२ : हमीद दलवाई यांचे सांगली येथे भावे नाट्य मंदिरात जाहीर भाषण.

मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेच्या पहिल्या अंकाचे मुखपृष्ठ

मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचा हमीद दलवाई स्मृती अंक

- २७ डिसेंबर १९७२ : मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील सुधारणेस विरोध करण्यासाठी मुस्लीम धर्मगुरू आणि बुद्धिजीवी यांची परिषद मुंबई येथे आयोजित करण्यात आली. या परिषदेस विरोध करण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने.
- ५ जानेवारी १९७३ : करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर येथे हमीद दलवाई यांच्या हस्ते मंडळाचे मुखपृष्ठ असलेल्या 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिके'चा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला.
- फेब्रुवारी १९७३ : मंडळामार्फत 'वंदे मातरम्'च्या पहिल्या दोन कडव्यांच्या गायनासाठी अभियानाची सुरुवात.
- ६ मार्च, १९७३ : समाजवादी महिला सभेच्या वतीने हमीद दलवाई यांचे पुण्यात व्याख्यान.
- २५ मार्च १९७३ : मुंबई येथे महाराष्ट्र मुस्लीम सामाजिक परिषदेचे आयोजन.
- ११-१२ ऑगस्ट १९७३ : कोल्हापूर येथे कार्यकर्त्यांसाठी शैक्षणिक शिबिराचे आयोजन.
- १९७३ : मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाच्या स्थापनेसाठी मुंबईत घेतलेल्या परिषदेत त्याच ठिकाणी या स्थापनेला विरोध दर्शविण्यासाठी हमीद दलवाई यांच्यासाह कार्यकर्त्यांची निदर्शने.
- ३०, ३१ डिसेंबर १९७३ : कोल्हापूर येथे मुस्लीम शिक्षण परिषदेचे आयोजन.
- ९ जून १९७४ : चिपळूण येथे मुस्लीम महिलांच्या मेळाव्याचे आयोजन.
- १९७४ : कुटुंब नियोजनासंदर्भात जनजागृती मोहीम.
- ७ ऑक्टोबर १९७५ : पुण्यातील जामा मस्जिद येथे 'तलाक-ए-जिहाद' मोहिमेसाठी कार्यकर्त्यांनी निधी गोळा केला. त्याचबरोबर तलाकविरोधी निदर्शने केली.
- २ नोव्हेंबर १९७५ : खादी ग्रामोद्योग केंद्र, कोल्हापूर येथे तलाकपीडित महिलांच्या विभागीय परिषदेचे आयोजन.
- १५ नोव्हेंबर १९७५ : तोंडी तलाक रद्द करण्यासाठी तलाकपीडित महिलांतर्फे सांगली येथे मुख्यमंत्र्यांना निवेदन.
- २३ नोव्हेंबर १९७५ : 'जिहाद-ए-तलाक' या राज्यव्यापी सामाजिक परिषदेचे पुण्यात आयोजन.

ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम्स्

- १९७६ : अमेरिकी स्वातंत्र्याच्या द्विशताब्दीनिमित्त फिलाडेल्फिया येथे हमीद दलवाई उपस्थित.
- ३ मे १९७७ : दलवाई यांचे निधन.
- ११ मे १९७७ : मुस्लीम सत्यशोधक मंडळ व समविचारी संघटना यांच्या वतीने राज्य शिक्षणशास्त्र संस्थेचे सभागृह, पुणे येथे श्रद्धांजली सभा.
- २९ मे १९७७ : लंडनमध्ये वास्तव्यास असणाऱ्या भारतीयांतर्फे 'इंडिया क्लब' येथे श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली. यात भारत सरकारतर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.
- २२ मे ते २ जून १९७७ : जिल्हा ग्रामोद्योग संघ, कोल्हापूर येथे मुस्लीम महिलांचे दहा दिवसांचे शिबिर.
- ३ जुलै १९७७ : हमीद दलवाई यांच्या निधनानंतरच्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी आणि संघटनात्मक निर्णय घेण्यासाठी साधना सभागृह, पुणे येथे मंडळाची कार्यकारिणी आणि प्रमुख कार्यकर्त्यांची सभा आयोजित करण्यात आली. यास खास निमंत्रित म्हणून अ. भि. शहा, डॉ. बाबा आढाव आणि यदुनाथ थत्ते यांना निमंत्रित करण्यात आले. या सभेत मुस्लीम सत्यशोधक मंडळ विश्वस्त निधी निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि विश्वस्त मंडळ निर्माण करण्यात आले.
- मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे कार्यकारी संपादक म्हणून पत्रकार सय्यद मुनीर यांची नियुक्ती करण्यात आली. मुद्रक व प्रकाशक म्हणून सय्यदभाई यांची नियुक्ती करण्यात आली, तर संपादक मंडळात अब्दुल कादर मुकादम, फजल शेख, अमीर शेख, हुसेन जमादार आणि वजीर पटेल यांचा समावेश करण्यात आला.
- 'सर्व मुस्लीम समाजाने मागणी केल्याशिवाय मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात कसलाही बदल करता येणार नाही' असे विधान लोकसभेत समान नागरी कायद्याविषयीच्या चर्चेस उत्तर देताना कायदेमंत्री शांतीभूषण यांनी केले. त्या विषयी तीव्र दुःख व खेद व्यक्त करण्यात

ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम्स्, दिल्ली परिषदेत इलाही मोमीन

आला. मंडळाच्या व महिलांच्या संदर्भात कार्यविस्ताराची चर्चा करण्यात आली.

- २३ ऑक्टोबर १९७७ : अहमदनगर येथे तलाकपीडित मुस्लीम महिलांच्या मेळाव्याचे आयोजन.
- २६ डिसेंबर १९७७ : अमरावती येथे 'जिहाद-ए-तलाक' परिषदेचे आयोजन.
- ३ मे १९७८ : दलवाई यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त विविध जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांना भेटून मंडळाच्या मागण्यांबाबत निवेदने देण्यात आली.
- ६ मे १९७८ : सातारा येथे 'जिहाद-ए-तलाक' परिषदेचे आयोजन.
- ३ मे १९७९ : दलवाई यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त पुणे, कोल्हापूर येथे जिल्हाधिकारी कचेरीसमोर उपोषण.
- मे १९७९ : नेरळ येथे मुस्लीम तरुणांसाठी अभ्यास शिबिराचे आयोजन. यामध्ये २० तरुणांनी १० दिवस अभ्यास केला. यादरम्यान न्या. पटवर्धन, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, नरहर कुरुंदकर, कुलसूम पारेख यांनी शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन केले. इंडियन सेक्युलर सोसायटीतर्फे 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ : उद्देश व भूमिका' या पुस्तकाचे प्रकाशन केले गेले.
- ८ जुलै १९७९ : 'मुस्लीम स्त्री व पोटगीचा कायदा' या विषयावर मंडळाच्या वतीने प्रा. व्ही. एन. राव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अ. भि. शहा होते. कार्यक्रमास मंडळाच्या महिला कार्यकर्त्यांबरोबरच डॉ. सत्यरंजन साठे, यदुनाथ थत्ते, बाबा आढाव आणि प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.
- २९ जुलै १९७९ : मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या गरीब मुस्लीम विद्यार्थ्यांना पुस्तके, शालेय साहित्य यांचे साधनाच्या आंतरभारती सभागृहात वाटप करण्यात आले. तसेच दहावीच्या परीक्षेत प्रथम आलेल्या दिनेश पाषाणकर आणि आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत प्रावीण्य मिळवलेल्या कु. परवीन खान यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिक्षणतज्ज्ञ जे. पी. नाईक होते. श्रीमती चित्रा नाईक यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे

कार्यक्रमात हमीद दलवाई आणि हुसेन जमादार

वाटप करण्यात आले. हे विद्यार्थी झोपडपट्टीत राहणारे व मनपा शाळेत शिकणारे होते. या वेळी श्रीमती चित्रा नाईक यांनी मंडळास १०० रुपयांची देणगी दिली.

- १२ ऑगस्ट १९७९ : दापोडी येथील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या सभागृहात मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना मधुकर निरफराके यांच्या हस्ते पुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी इब्राहिम सिद्दीकी होते.
- २५ ऑगस्ट १९७९ : मंडळाच्या पुणे शाखेच्या वतीने रमजान ईदनिमित्त ईदगाहवर जाऊन प्रलयग्रस्त लोकांच्या मदतीसाठी निधी गोळा करण्यात आला. त्या दिवशी २०१/- रुपयांचा निधी गोळा झाला. तो सकाळ रिलीफ फंडास देण्यात आला. ईदगाहवर हमीद दलवाई यांच्या 'मुस्लीम जमातवादाचे स्वरूप, कारणे आणि उपाय' आणि 'मंडळाची ध्येय उद्दिष्टे' या पुस्तकांचा स्टॉल लावण्यात आला. रमजान ईदच्या दुसऱ्या दिवसाला बासी ईद म्हणतात. बासी ईदच्या दिनी पुण्यातील सारसबागेत येणाऱ्या मुस्लीम महिलांना कुटुंब नियोजन, बुरखा पद्धत, समान नागरी कायदा, मुलांना मराठी भाषेतून शिक्षण या संदर्भातील १००० पत्रके वाटण्यात आली.
- सप्टेंबर १९७९ : गरजू महिलांना कायद्याच्या मार्गदर्शनासाठी म्हणून दर रविवारी इब्राहिम सिद्दीकी यांच्या घरी बोलवण्यात येत असे. अशा महिलांना लीगल एड सेंटरमार्फत दिलासा आणि मार्गदर्शन हे दोन्ही देण्यात येत असे. पुणे शाखेच्या वतीने संघटक म्हणून इब्राहिम सिद्दीकी आणि खजिनदार म्हणून एजाज सय्यद काम पाहत असल्याची माहिती पुणे शहराचे चिटणीस फजल शेख यांनी दिली.
- ३० सप्टेंबर – १ ऑक्टोबर १९७९ : जिहाद-ए-तलाक, देशातील वाढता जमातवाद यांवर चर्चा करून समाजामध्ये धर्मनिरपेक्ष विचारांचा प्रसार करण्यासाठी कार्यकर्त्यांचा मेळावा हमाल भवन, पुणे येथे आयोजित करण्यात आला. अ. भि. शहा, बाबा आढाव आणि यदुनाथ थत्ते यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी बाबुमियाँ बँडवाले होते.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेनंतर या मंडळाविषयी अनेकांना कुतूहल वाटले. मंडळाच्या स्थापनेपूर्वीच विविध बैठकांमधून झालेल्या चर्चेत मंडळाची वैचारिक दिशा भिन्न विचार बाळगणाऱ्या मुस्लीम कार्यकर्त्यांच्या लक्षात आली होती. यांमधल्या अनेकांनी विरोधही केला. नंतरच्या काळात मंडळाने विविध उपक्रम आयोजित केले. त्यांना प्रसारमाध्यमातून प्रसिद्धी मिळाली. परिणामी, मंडळाचे चाहते आणि विरोधक असे गटही निर्माण झाले. या कालावधीत मंडळास झालेला विरोध, वाद-प्रतिवाद आणि प्रतिसाद या संदर्भातील काही निवडक भाग....

मंडळाच्या स्थापना काळातील घडामोडी, वैचारिक भूमिका आणि संघर्षमय वाटचालीची कल्पना येण्यासाठी आणि तत्कालीन जनमानस समजण्यासाठी हे संकलन महत्त्वाचे ठरेल.

४.१ मोमिनपुरा हल्ला प्रकरण (२१ जून १९७०)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याला सुरुवात होऊन जेमतेम दोन महिने झाले होते. याचे समाजातून काही प्रमाणात स्वागत झाले असले, तरी मोठ्या प्रमाणात मंडळास विरोध करणाऱ्यांची संख्या एकवटण्यास सुरुवात झाली. विशेषतः धार्मिक आणि राजकीय नेत्यांनी दलवाई यांच्या सामाजिक सुधारणेच्या कार्याबद्दल चुकीचा संदेश समाजात पसरवून दलवाईंना इस्लाम आणि मुस्लीमविरोधी ठरविण्याचा प्रयत्न केला. परिणामी, मुस्लीम समाजात सत्यशोधक विचारधारेला सकारात्मक प्रतिसाद मिळण्यास अडथळा निर्माण झाला. मुस्लीम मुल्ला-मौलवींच्या प्रभावाखाली असणाऱ्या सामान्य समाजाने दलवाईंचा विचार स्वतंत्रपणे समजून घेणे तसे अपेक्षित नसले, तरी मुल्ला-मौलवींच्या प्रभावामुळे दलवाईंना काफिर आणि धर्मद्रोही ठरवण्यात विरोधकांना बऱ्यापैकी यश मिळत होते. मुस्लीम सत्यशोधकाचे विचार आणि कार्य हे समाजहिताचे असून या समाजाच्या कल्याणासाठीच मंडळ कार्य करत असल्याचे सांगण्यासाठी, त्याचबरोबर मुस्लीम सत्यशोधक मंडळाबद्दल झालेला अपप्रचार व गैरसमज दूर करण्यासाठी, तसेच आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी मंडळाचे प्रवर्तक हमीद दलवाई आणि कार्यकर्ते यांनी संवाद दौरा आखण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे हमीद दलवाई आणि कार्यकर्ते पुण्यातील मुस्लीमबहुल अशा मोमिनपुऱ्यात २१ जून १९७० रोजी सकाळी ११ वाजता गेले. त्या वेळी सुमारे १००-१५० मुस्लीम युवकांनी दलवाई आणि कार्यकर्ते यांचा निषेध केला आणि त्यांना काळे झेंडे दाखवले. हे घडत असतानाच एक मौलवी जमावातून पुढे सरसावला आणि हमीद दलवाई यांच्या अंगावर त्याने काठीचा एक तडाखा मारला. हमीद दलवाई यांच्यावर झालेल्या लाठीहल्ल्याची बातमी सर्वदूर पसरली आणि त्याचे पडसाद उमटायला सुरुवात झाली.

भिवंडी, जळगाव इत्यादी ठिकाणी जातीय दंगे झाले. त्या दंग्यांची तीव्र प्रतिक्रिया देशात उमटली. जातीय दंग्यांत होरपळून निघालेल्या हिंदू-मुस्लिमांचे पुनर्वसन योग्य रीतीने झालेले नव्हते. समाजात तेढ आणि दुरावा निर्माण करण्यासाठी धार्मिक ज्वाला पेटवण्याचे काही प्रकार घडून येत होते. अशा पार्श्वभूमीवर पुणे शहरातील मुस्लीम भागात घडलेल्या घटनेचा परामर्श वर्तमान पत्रातून दिसून आला. तसेच वैचारिक प्रतिक्रियाही प्रकट झाल्या. ही घटना लोकांच्या समोर आली, मात्र त्यामागचे राजकारण किंवा धर्मकारण याचा सविस्तर ऊहापोह कुणीही केलेला नव्हता. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा हा उपक्रम सातत्याने चालू राहणार असल्याने झालेल्या प्रकाराची चिकित्सा अनेक विचारवंतांनी विविध पद्धतींनी केली.

हमीद दलवाई यांची समाजात तयार करण्यात आलेली प्रतिमा, 'हमीद दलवाई हे समाजाचे शत्रू आहेत. ते मुस्लिमांची सुधारणा करण्यासाठी प्रचार करतात. म्हणून ते हिंदूंना आवडतात. त्यामुळे ते हिंदूंचे एजंट आहेत' अशी होती. मुस्लीम समाजातील तरुणांनी या चळवळीचे स्वागत केले असले, तरी बहुसंख्य लोकांनी तिला विरोधच केलेला होता. दरम्यानच्या काळात 'समान नागरी कायदा आणि मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील सुधारणा' या मंडळाने केलेल्या मागण्यांमुळे

मुस्लीम समाजात एक प्रकारचा रोष निर्माण झाला होता. त्यामुळे मोमिनपुऱ्यात झालेला हल्ला पूर्वनियोजित होता आणि तो फक्त हमीद या व्यक्तीवर नसून मंडळाने हाती घेतलेल्या कार्यावरच होता. हल्ला करणारे मौलवी, निषेध करणारे शे-दीडशे तरुण आणि त्यांना पाठीशी घालणारे काही नेते यांची ही एकत्रित कृती आणि विचार हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याला विरोध करणारे होते. मुस्लीम समाजात वैचारिक सुधारणा घडवून, या समाजाला आधुनिक काळाशी सुसंगत करून राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणणे, हे अत्यंत खडतर कार्य मंडळाने हाती घेतले होते.

या हल्ल्याच्या पाठीशी असणारे एक नेते मारूफ खान यांनी पत्रकारांना सांगितले की, 'आपणास पसंत नसलेल्या विचारांचा निषेध करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. त्या विचार स्वातंत्र्यानुसारच हा प्रकार घडला असून यात 'निषेध करणे' हा गुन्हा कसा ठरेल?' मात्र एका मौलवीने काठीहल्ला केला, याबद्दल मात्र कोणतीही प्रतिक्रिया देण्यात येत नव्हती. मारूफ खान म्हणतात की, 'सामाजिक बदल चळवळीने होत नाहीत. विशेषतः मुस्लिमांच्या पर्सनल लॉमध्ये बदल करणे मुस्लिमांना बिलकूल मंजूर नाही. कारण आमच्या धर्माचे पालन आमच्या समाजातील लोक बळजबरीने किंवा अनिच्छेने करत नाहीत. त्यामुळे आमच्या समाजातील लग्न पद्धती व इतर पद्धती बदलण्यासाठी चळवळ करण्याची काहीच आवश्यकता नाही. आमचा कायदा बदलण्याऐवजी ज्यांना हवे आहे त्यांनी सिव्हिल मॅरिज ॲक्टनुसार (विशेष विवाह कायदा, १९५४) लग्न करावे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाला मुस्लीम समाजाबद्दल खरोखरच प्रेम असेल आणि मुस्लीम समाज सुधारावा, असे वाटत असेल, तर या समाजापुढे असलेल्या आर्थिक, शैक्षणिक इत्यादी प्रश्नांचे गांभीर्य या मंडळाला का वाटत नाही?'

मुस्लीम नेत्यांचे असे म्हणणे होते की, 'आमचे प्रश्न निर्माण करण्यास अन्य धर्मीय जबाबदार आहेत आणि हा समाज सातत्याने मुस्लिमांना भीती आणि दहशतीच्या छायेत ठेऊन त्यांची कुचंबणा करत असतो.' अशी धारणा घेऊन वावरणारे नेते मुस्लीम सामाजिक सुधारणेच्या आत्मप्रेरणा निर्माण करण्याबाबतीत गांभीर्याने विचार करत नव्हते. दलवाई जेव्हा 'मुस्लिमांचे भारतीयकरण व्हावे' अशी भूमिका घेऊन कार्य करत होते, तेव्हा मुस्लिमांना वाटत असे की, 'दलवाई हे मुस्लिमांच्या हिंदूकरणाची भाषा करत आहेत.' वास्तविक, 'हिंदूंचेही भारतीयीकरण व्हायला पाहिजे' असे विचार दलवाईंनी वेळोवेळी मांडलेले आहेत.

मोमिनपुऱ्यात दलवाईंवर काठीहल्ला झाला, तेव्हा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्याभोवती कडे केले. यादरम्यान सय्यदभाई, अमीर शेख आणि इतर कार्यकर्त्यांनाही काठ्या मारण्यात आल्या. या वेळी दलवाईंनी 'मी तुमच्यासोबत बोलण्यासाठी आलो आहे' असेसांगण्याचा प्रयत्न केला. मात्र निदर्शक दलवाईंचे ऐकून घेण्याऐवजी 'हमीद दलवाई काफिर है', 'हमीद दलवाई मुर्दाबाद' अशा घोषणा देत होते. दलवाई आणि कार्यकर्ते यांच्यामागे हा जमाव आरडाओरडा करत पाठीमागे धावत होता.

आदल्या काही दिवसांपासून या निदर्शनाची तयारी चालू होती आणि त्यात काँग्रेस पक्षाचे तत्कालीन कॉर्पोरेटर अहमद खान, अमिनुद्दिन पेनवाले, ए. के. अत्तार यांचा पुढाकार होता. घटनेची माहिती मिळताच तेव्हाचे महापौर बी. भा. पाटील व नागरी संघटनेचे नगरसेवक रामभाऊ

बडके यांनी सायंकाळी मोमिनपुऱ्यात भेट देऊन घटनेची माहिती घेतली. *(दैनिक सकाळ, २२ जून १९७०, पुणे)*

हिंदूंना शांत करणारे दलवाई

सदर बातमी शहरात पसरली, तेव्हा मुस्लीमविरोधक हिंदू तरुणांमध्ये खळबळ उडाली, पण स्वतः दलवाईंनी त्यांना शांत केले. कारण दलवाईंची भूमिका होती की, 'माझे मुस्लीम समाजावर प्रेम आहे. या समाजाचे भले व्हावे, यासाठीच हे कार्य चालवले आहे. सामाजिक सुधारणा करणाऱ्याला समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागते. हा घडलेला प्रकार याचाच एक भाग आहे, असे मी मानतो.' पोलिसांनी हल्ला करणाऱ्यांवर गुन्हा नोंदवण्याबाबत दलवाईंकडे विचारणा केली, तेव्हा हा गुन्हा नोंदवण्यास नकार देऊन ते पुढे म्हणाले, 'ज्या समाजात मला बदल घडवून आणायचा आहे, त्या समाजाच्या विरोधात गुन्हे नोंदवणे मला पटणारे नाही... आम्ही गांधीजींचा मार्ग स्वीकारला आहे, तेव्हा जिनावादयांच्या तंत्रापुढे आम्ही नमणार नाही. आमचे कार्य चालूच राहणार आहे.'

दलवाईंवरील हल्ल्याचा अनेक संघटनांनी निषेध केला. त्यात युक्रांदच्या मुंबई शाखेने पत्रक काढले. 'हमीद दलवाई यांनी गेली काही वर्षे मुस्लीम समाजाच्या प्रबोधनाची चळवळ कमालीच्या जिद्दीने चालविली व तिचा प्रभाव आता अधिकाधिक मुसलमानांवर पडू लागला आहे, असाच अर्थ या हल्ल्यातून स्पष्टपणे निघतो! अर्थातच, ज्याप्रमाणे हिंदू समाजातील पंड्ये, बडवे, पुरोहित, शंकराचार्य व गुरुजी यांनी आपली सत्ता सहजासहजी सोडली नाही आणि त्यांच्याविरुद्ध फुले, आगरकर, डॉ. आंबेडकर, साने गुरुजी, डॉ. लोहिया, महर्षी कर्वे प्रभृतींना सतत प्रखर आंदोलन करावे लागले, त्याच मार्गाने हमीद दलवाई यांनाही कार्य करावे लागेल, हे उघडच आहे. या त्यांच्या कार्यात 'युक्रांद' नेहमीच त्यांच्याबरोबर राहील.' *(महाराष्ट्र टाइम्स, २४ जून १९७०)*

दलवाईंचा पुन्हा दौरा

याप्रमाणेच दलवाई-हल्ल्याचा प्रजासमाजवादी पक्षातर्फेही निषेध करण्यातआला. याबरोबरच विविध स्तरातील मान्यवर व्यक्तींनी हल्ल्याचा निषेध केला.

मोमिनपुऱ्यात झालेल्या हल्ल्याचा फारसा परिणाम करून न घेता हमीद दलवाईंनी २८ जून रोजी पुन्हा मोमीनपुऱ्यामध्ये दौरा करून हल्ला करणाऱ्या समाजाशी संवाद करण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्याचे पडसाद पुणे महानगरपालिकेतही पडले होते. या विषयावरून खडाजंगी झाली. नागरी संघटनेचे भाई वैद्य यांनी आणलेल्या चर्चा-तहकुबीच्या ठरावावर एका बाजूला नागरी संघटनेचे सभासद आणि दुसऱ्या बाजूला काँग्रेसचे अहमद खान, मोहम्मद खान यांच्यात खडाजंगी झाली. अनेकदा हरकतीचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्षस्थानी उपमहापौर डी. एस. अय्यर होते. भाई वैद्य यांनी मांडलेल्या ठरावावर अहमद खान यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. 'धार्मिक प्रश्नावर महापालिकेत ठराव आणून चर्चा करता येणार

नाहीं' ही त्यांची हरकत अध्यक्षांनी फेटाळून लावली. भाई वैद्य यांनी दलवाईंवरील हल्ल्याचा निषेध तीव्र शब्दांत व्यक्त केला. या संबंधात मुस्लीम व हिंदू जातीयवाद्यांवर त्यांनी कडक टीका केली. मो. के. कल्याणकर यांनीही दलवाईंना 'गद्दार', 'काफिर 'म्हटल्यामुळे चीड व्यक्त केली. हमीद दलवाई यांच्यावरील हल्ल्याप्रकरणी मोहम्मद खान, व्यापारी अमिनुद्दिन पेनवाले व ए. ए. अत्तार यांना अटक करून जामिनावर सोडण्यात आले. *(महाराष्ट्र टाइम्स, २४ जून १९७०)*

४. २ हल्ला प्रकरणासंदर्भात मुस्लीम नेत्यांच्या प्रतिक्रिया

'मुस्लीम समाजाशी संवाद साधण्यासाठी पुण्यातील मोमिनपुऱ्यात दलवाईंनी काढलेल्या संवादयात्रेवर हल्ला करण्यात आल्याच्या बातम्या अतिरंजित असून मुस्लीम समाज धार्मिक बाबतींत ढवळा-ढवळ चालू देणार नाही' अशा प्रतिक्रिया काही नेत्यांनी दिल्या. 'हमीद दलवाईंचे कार्य पसंत नसलेल्या तरुणांनी काळे झेंडे घेऊन निषेध करणे हा त्यांचा अधिकार आहे!', 'हमीद दलवाईंना मारहाण करणाऱ्यांमध्ये ज्यांची नावे घेण्यात आली त्या लोकांचा दलवाई किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांशी राजकीय आकस असावा' अशी वक्तव्ये या नेत्यांनी केली. त्यामधील अमिनुद्दिन पेनवाले यांच्याशी पत्रकाराने केलेली प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे –

प्रश्न – हमीद यांना शे-दीडशे तरुणांनी घेरण्याचा व त्यांच्यावर चाल करून जाण्याचा प्रसंग घडला, त्या वेळी पेनवाले व खान बाजूस उभे राहून तटस्थपणे का पाहत राहिले?

उत्तर – पेनवाले आणि खान तटस्थ नव्हते. त्यांनी समाजातील तरुणांना थोपविण्याचाच प्रयत्न केला. त्यामुळे काल शांततामय निदर्शने झाली.

प्रश्न – मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते व हमीद दलवाई यापुढे आपला उपक्रम चालू ठेवणार आहेत. प्रत्येक वेळी त्यांच्यापुढे अशीच निदर्शने होणार आहेत काय?

उत्तर – हमीद व त्यांचे सहकारी ज्या पद्धतीने प्रचार करतील, त्या पद्धतीने त्यांचा निषेध किंवा त्यांच्या विरोधात निदर्शने होतील. धार्मिक विषय बाजूला ठेवून जर ते प्रचारासाठी येणार असतील, तर आमचा समाज त्यांचे जरूर स्वागत करील आणि लोकांना पटले, तर त्यांना सहकार्य करतील.

प्रश्न – सत्यशोधक मंडळाचे कार्य आपल्या समाजास पसंत नाही का?

उत्तर – आमच्या धार्मिक बाबतींत कोणीच ढवळाढवळ करू नये, असे समाजाला वाटते. कारण आमच्या धर्माचे पालन कोणीच जुलमाने किंवा बळजबरीने करीत नाही. आमच्या धर्मातील लग्न पद्धती किंवा इतर धार्मिक पद्धती बळजबरीने बदलल्या जाव्यात, असे आम्हास वाटत नाही.

ज्या तरुणांना आमच्या धार्मिक लग्न पद्धती पसंत नसतात, ते तरुण सिव्हील मॅरेज ॲक्टनुसार लग्न करतात. अशा पद्धतीने लग्न केलेले काही तरुण आहेत. त्यांची संख्या कमी आहे.

प्रश्न – आपल्या समाजात कोणी सुधारणेचे प्रयत्न करू नयेत, असे आपणांस वाटते काय?

उत्तर – नाही. आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणा घडवून आणाव्यात, या हेतूने सर्व्हे घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला, परंतु त्या प्रयत्नांवरही टीका झाली. तो एक जातीयवादी उपक्रम असल्याचे इतर लोक म्हणू लागले. म्हणून तो विचार तेथेच सोडून द्यावा लागला.

प्रश्न – मुस्लीम सत्यशोधक मंडळाने आपल्या समाजात धार्मिक प्रश्नावर चर्चा करू नये, असे का म्हणता?

उत्तर – राजकीय कार्यकर्त्यांनी धार्मिक प्रश्नांत ढवळाढवळ करू नये. कारण त्यामुळे कटुता निर्माण होते; अडचणी निर्माण होतात. कोणालाही धार्मिक पद्धतीने जीवन जगता यावे, हा त्यामागील आमचा स्थायी विचार आहे.

या संदर्भात मंडळाचे कार्यकर्ते सय्यदभाई म्हणाले की, 'हा हल्ला पूर्वनियोजित होता. कारण संवादापूर्वी आम्ही या भागात जाऊन अनेक नेत्यांशी चर्चा केली होती. नगरपिता खान, पेनवाले व मारूफ खान यांनाही भेटलो होतो. आम्ही तेथे येणार असल्याचे त्यांना माहीत होते. त्या दिवशी मोमिनपुऱ्यात लहान मुलांनी आम्हाला गराडा घातला, 'मुर्दाबाद'च्या घोषणा दिल्या, काठ्यांवर लावलेली काळी निशाणे आमच्या अंगावर फेकली. एका दाढीवाल्याने हमीदभाईंना काठी मारली. हे सर्व प्रकार केवळ एकट्या हमीदच्या निषेधार्थ नव्हते, तर मुस्लीम सत्यशोधक मंडळाने हाती घेतलेल्या कार्याला अपशकुन करण्याचा तो पद्धतशीर प्रयत्न होता.'

या कालावधीत मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांना धमक्याही येत होत्या. सय्यदभाई यांना, 'तुम्ही सत्यशोधक मंडळाचे कार्य नाही थांबवले, तर त्याचा गंभीर परिणाम होईल!' असे म्हणत पत्राद्वारे ठार मारण्याची धमकीही देण्यात आली. तसेच त्यांच्या पत्नीला अश्लील भाषेत काही पत्रेही आली. ही पत्रे सी. आय. डी.कडे सुपुर्द करण्यात आल्याचे सांगून सय्यदभाई यांनी अशा धमक्यांचा कार्यकर्त्यांवर काहीही परिणाम होणार नसून आम्ही आमचे कार्य चालूच ठेवणार असल्याचा निर्धारही व्यक्त केला.

'महात्मा फुलेंनी सत्यशोधक चळवळ उभीकेली. मात्र त्यांनासुद्धा मारण्यासाठी मारेकरी आले होते. हमीद दलवाई यांनी जोतिबा फुले यांची पालखी आम्हा मुस्लीम समाजात पुढे नेण्याचा प्रयत्न करू नये. त्यांची स्थितीसुद्धा जोतिबा फुले यांच्यासारखीच होईल, हे त्यांनी लक्षात ठेवावे.' अशी धमकी पुण्यातील घोरपडी पेठेत झालेल्या मुसलमानांच्या सभेत अब्दुल कादीर यांनी उघडपणे दिली. या सभेच्या अध्यक्षस्थानी मौलाना अब्दुल हक पेश-इमाम होते.

४.३ ताहेर महमुद व हमीद दलवाई यांच्यातील वाद-प्रतिवाद

A Debate - Mr. Tahir Mahmood VS Hamid Dalwai Uniform Civil Code and Muslim Personal Law

(मुस्लीम कायद्याचे ज्येष्ठ अभ्यासक आणि लेखक डॉ. ताहेर महमुद आणि हमीद दलवाई यांच्यामध्ये समान नागरी कायदा आणि मुस्लीम व्यक्तिगत कायदा या विषयावर वाद-प्रतिवाद झाले. याचा तपशील 'द सेक्युलॅरिस्ट' या त्रैमासिकाच्या ऑक्टोबर-डिसेंबर १९७० च्या अंकात प्रसिद्ध झाला. इंग्रजी भाषेतील हा वाद-प्रतिवाद जसाच्या तसा येथे देत आहोत.)

We reproduce below extracts from Mr Tahir Mahmood's article which appeared in the Hindustan Times (October 25, 1970). The article evoked considerable controversy. The extracts are followed by a debate between Mr. Hamid Dalwai and Mr. Mahmood carried in the readers columns.

REFORMATION of the Muslim Personal Law in India, a purely legal subject, has unfortunately become the layman's talk in the country. Many people professing the Islamic religion only because they were born of Muslim parents, wholly ignorant of the legal theories of Islam, are opposed to any move to reformulate its principles as applied in India. On the other hand, champions of the so-called 'national mainstream', equally ignorant of legal concepts, are advocating the cause of a uniform civil code as if that were the only blessed solution to all national problems...

What, then, could be the form of a uniform civil code? Shall such a code provide rules relating to wakfs for the Hindus or enforce the law of joint family for the Muslims? Obviously, that would amount to subjecting one religious community to the religious dogmas and culture of another community. That being ultra verse of the Constitution, will a uniform civil code exclude from its scope those matters of personal law which are not shared by all the religious communities in the country, or make special provisions for them within its framework?

Further, the two major communities have entirely different concepts about certain family institutions. For instance, in Hindu law, marriage is regarded a sanskara (religious sacrament) while Islamic law gives it the

status of a civil contract having a social sanctity. How could these diametrically opposed concepts be reconciled? Any attempt at such reconciliation would amount to State preference for one particular culture and its compulsory imposition over other cultural groups. In view of these apparently insurmountable difficulties in the way of a uniform civil code, one wonders whether the advocates of such a code have really thought of all its implications. If the composite cultural heritage of India is to be preserved, certain socio-legal institutions peculiar to different communities in the country will perhaps have to be maintained....

Muslim masses here are however dead opposed to any reformation of their Personal Law. They in fact misunderstand the matter. What needs a few 'changes in India' is that version of Muslim law which is being traditionally followed by the Muslims here; the required change will essentially remain Islamic in its basis and effect. If they can understand this, I wonder if they would have any grievance.

The actual reasons underlying the mass opposition of any 'tampering' with the Muslim Personal Law in India in fact lies elsewhere. The Muslims believe that, once given the idea that their Personal Law can be changed; any future government might try to replace the whole of it by a uniform civil code. They, therefore, take pains to cover the Indo-Islamic law with the veil of absolute immutability. Their fears are not unwarranted. One of the Directive Principles of State Policy under the Constitution does speak of the feasibility of a uniform civil code. The meaning and scope of this provision are yet to be judicially settled: but it might well be miss-interpreted against Muslim interests. The recent slogans of 'Indianisation of everything has further deepened this apprehension. And to the abandonment of its Personal Law completely, the Muslim community in India cannot afford to agree. That, it believes, would be tantamount to the extinction of Muslim culture in the country. It is generally feared that a community which has accepted an 'official' language representing an entirely different culture, and has been gradually deprived, either by executive action or by judicial decision, of its several educational institutions, agrees to give up its legal system as well, there would remain no more distinctive features of its culture. Muslims have

been told how Islamic culture was destroyed in Russia, China, Albania, Bulgaria and the Philippines. They do not want that history to be repeated in India. These extra-legal and extra-religious considerations are certainly worth pondering. The Muslims' fears should be removed and the protection of their distinct culture effectively guaranteed. As to the questions what undesirable elements have crept into the Muslim Personal Law, how they have been redressed in several countries, and how they can be redressed in India as well, without violating the sanctity of the Islamic religion and without undermining the traditions of the Muslim culture, they are ignorant. They should be educated.

(Courtesy: The Hindustan Times)

Hamid Dalwai Comments

I have read with amazement Dr. Tahir Mahmood's article "Uniform Civil Code and Muslim Personal Law" (The Hindustan Times Weekly, October 25). As one who would belong to what Dr. Mahmood superciliously refers to as the so called "national mainstream" (quotation marks in the original, emphasis mine), may I offer a few comments on the article?

Dr. Mahmood says that those who advocate the enactment of a uniform civil code do so "as if that were the only blessed solution to all national problems". The charge is palpably absurd and, if, one may be blunt, smacks of deliberate distortion. A uniform civil code, as distinct from a modernized personal law, is necessary but by no means sufficient condition for the integration into a single modern nation of the various religious groups which make up the Indian people. For the basis of a modern state is the individual citizen, not any sub national collectivity defined by religion, language or any other incidental attribute its members may share. There has therefore to be a certain minimum degree of homogeneity among the citizens as regards their rights, obligations and outlook, no matter what religion they follow or what language they speak. The champions of a uniform civil code believe that without it such homogeneity cannot be ensured.

That is why the Indian Constitution directs the state to enact a uniform

civil code for all the citizens of India. If the Constituent Assembly did not lay down a time-limit for the implementation of this directive, it was because its members wanted the wounds of partition to heal and the Muslims to come out of the vicious climate generated by the Pakistan movement. Most educated Muslims, generally confined to the higher strata of Indian urban life, use this fact to perpetuate traditional Muslim separatism in the name of cultural pluralism. They would have some hesitant tinkering here and there with the outdated Muslim personal law and call it reform, but vigorously oppose any serious attempt to modernize Muslim society. And all this in the name of Islam and the poor ignorant Muslim masses.

Dr. Mahmood that, "Muslim masses here are ... deadly opposed to any reformation of their Personal Law." According to him, "the Muslims believe that, once given the idea that their Personal Law can be changed, any future government might try to replace the whole of it by a uniform civil code." And he adds: "Their fears are not unwarranted." In support of this contention he mentions that, "the Muslim community has accepted an official language representing entirely different culture and has been gradually deprived (sic) of its several educational institutions."

These statements are highly misleading and cannot be substantiated. For instance, if the issue is properly explained to the ordinary Muslims, many of them will soon see the necessity of a uniform civil code. They see every day the miserable plight of Muslim women who are victims of both polygamy and oral divorce without any statutory provision for a reasonable alimony. I may add that among the signatories to the memorandum to be submitted by the Indian Secular Society to the Prime Minister demanding a uniform civil code; more than 50 percent are members of what educated Muslims describe as the Muslim "masses".

Secondly, what precisely does Dr. Mahmood expect the Government of India to do in the matter of the 'separate identity' of Muslim educational institutions? Does he suggest that they should be maintained as islands of Muslim separatism at public expense? Should Urdu be given the status of a second official language, as demanded by Muslims, in half a dozen States, in none of which Muslims constitute more than 15 percent of the

population? Indeed, in Madhya Pradesh, where Urdu is sought to be made a second official language, Muslims account for less than five per cent of the population. The Constitution, it may be added, requires at least 30 percent of the population speaking a given language for the President to act, and that too at his discretion.

There is another point on which Dr. Mahmood's article is equally misleading. He raises the question of reconciling the social traditions of Hindus and Muslims if a uniform civil code is to be enacted. I fail to see how this question arises. Those who demand a uniform civil code are of the view that it should be based on the freedom of the individual and considerations of equality and social justice as understood in the modern age. They do not want a code which derives its justification from scriptures or history. In some other countries it may be possible to promote modernization without openly disavowing the past. In India, however, we are so situated that growing Hindu-Muslim tension with all that it would mean for the weaker group is the only alternative to a bold and conscious adoption of a programme of modernization in all important spheres of life.

Dr. Mahmood does not accept the sovereignty of the Indian Parliament to enact any legislation to which Muslims are opposed. In recent interview to Jamaat-e-Islami weekly (Radiance, October 25,1970) he says the right to modify the Muslim Personal Law in any way "would wholly vest in the Muslim community itself which it may exercise through its select representatives".

This is the crux of the problem. So long as the Muslims of India do not accept without any reservation the supremacy of the Constitution and the sovereignty of Parliament, they cannot claim any rights as citizens of this country. The stand taken by Dr. Mahmood and many other self-appointed "select representatives of Indian Muslims only lends weight to the RSS charge that Muslims do not consider themselves citizens of this country first and foremost. While the RSS stand is unfortunate and deserves to be condemned, I for one cannot see how the stand of Muslims like Dr. Mahmood is in any way more enlightened. If anything, it is more foolish because it is suicidal for the Muslims themselves.

Tahir Mahmood Replies

Mr. Hamid Dalwai's attack (The Hindustan Times Weekly, November 1) on my article "Uniform Civil Code and Muslim Personal Law" is, to say the least, abusive.

I cannot use offensive language but must say that his comments are quite irrelevant to my article which aimed only at analysis of the existing position of Islamic family law in India and abroad.

Mr. Dalwai's allegation that I do not accept the 'supremacy of the Constitution and the sovereignty of Parliament' is entirely baseless. What I said in my interview to the 'Radiance Views-weekly (October 25) has been grossly distorted by him. I have spent about half of my life in the study of law and do understand these matters. What the legislature under the Constitution, cannot do is one thing, but what it, in one's opinion, shall not do is another. I have only said that whenever Muslim personal law is reformed in India, suggestions for it must come from the Muslim community itself, since if a law is imposed by the legislature on the people against their wishes, it would remain a show-piece and would never be followed in practice.

Referring to my analysis of the distinction between the Hindu and Islamic legal concepts, Mr. Dalwai has said that the proposed uniform civil code would have a secular basis. A secular family law already exists in the country. Any citizen can marry, or register an existing marriage under the Special Marriage Act, 1954 and will, thereupon, be governed by its provisions in family matters and by the Indian Succession Act, 1925, in respect of inheritance. If, therefore, there really are any Muslims, as claimed by Mr. Dalwai, who want a secular family law they can make of these legal provisions. But why should their desire be imposed on the majority of Hindus and Muslims who, I reiterate, wish to be governed by their distinct personal laws? Let only the unsatisfactory aspects of both the personal laws be removed without annoying the people and unless a person opts out of his respective personal law, as reformed, let him be governed by it and have the satisfaction that he is following his religious law in family matters.

Mr. Dalwai also attributes to me many suggestions which I never made

and many expectations which I never had. About what I have actually said in my article, he has the least to say.

Rejoinder from Hamid Dalwai

In his rejoinder (The Hindustan Times Weekly, November 8) Dr. Tahir Mahmood says that my language is, "to say the least, abusive". I wish he had given at least one quotation from my letter to substantiate his charge. It is true that I have been frank in criticizing Dr. Mahmood's position. But frankness, including sharply critical language, is something different from abuse. Nor was I frank as Dr. Mahmood's article in your paper and his interview published in Radiance would have justified. For instance, some of Dr. Mahmood's statements are not only misleading but are based on either ignorance or deliberate disregard of truth. Let me give one example.

In his interview Dr. Mahmood mentions Kenya as one of the countries in which the Muslim minority is being governed by its personal law. This is not correct. As a matter of fact, Mr. Jomo Kenyatta's Government at one stage thought it necessary to ask the Muslims to quit Kenya if they did not want a modern personal law which would be common to all the citizens of the country.

Tahir Mahmood Replies:

This has reference to Mr. Hamid Dalwai's letter (The Hindustan Times Weekly, November 22) about my interview on Muslim Personal Law published in Radiance (October 25). The reference to Kenya in my interview, in the context mentioned by Mr. Dalwai, is inadvertent and needs explanation. The Muslims in that country constitute about six percent of the population, an overwhelming majority of the Kenyans being animists. Since the latter had divergent customary laws relating to marriage, the Government recently enacted a uniform Marriage Law which governs all citizens in the country, including Muslims. A similar step has also been taken in Tanzania where one of the constituent units of the country, namely, Zanzibar, is almost entirely Muslim. It is notable that neither the Kenyan nor the Tanzanian enactment conflicts with any basic principles of Islamic family law. The restriction of polygamy and

unilateral divorce, as I have repeatedly explained in my works on the subject, does not violate the sanctity of Islamic Law. On the contrary, it takes the misinterpreted law back to the spirit of Quranic reforms on these subjects.

(The Secularist, Oct-Dec 1970 (28-32))

४.४ हमीद दलवाई पाकिस्तानचा हेर?

(साप्ताहिक महाराष्ट्र मुस्लिम, १८ डिसेंबर १९७०)

पुण्यामध्ये मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेपासून पुण्याच्या मुस्लीम समाजामध्ये एक प्रकारचा वैचारिक गोंधळ निर्माण झालेला आहे व त्यामुळे मुस्लीम सत्यशोधक मंडळ व हमीद दलवाई यांच्या अगदी बारीकसारीक हालचालींची जनता दखल घेत आहे.

पुण्याहून प्रसिद्ध होणारे पाक्षिक 'प्रेषित'च्या दिनांक २२ नोव्हेंबरच्या अंकात 'जातीयवादी कोण? हमीद दलवाई का मुस्लीम समाज?' या मथळ्याखाली बाबुलाल अत्तार लिखित एक लेख प्रसिद्ध झाला होता. सदरहू लेखामुळे 'हमीद दलवाई खरोखरच पाकिस्तानचा हेर होते काय?' अशी शंका मनात निर्माण होते. हीच शंका आज पुणेकर मुस्लीम समाजाच्या मनात घर करून राहिली असावी, असे वाटते.

या लेखात म्हटले आहे की, 'मुस्लीम धर्म, शरीयत, आचार-विचार यांचा गंध नसलेला हा गृहस्थ (हमीद दलवाई) उठसूठ मुस्लीम समाजाला शिव्या देत सुटला आहे. त्याच्या दृष्टीस सारे भारतीय मुस्लीम अराष्ट्रीय दिसत आहेत. वृत्तपत्रांना हाती धरून, मुस्लीम समाजाविरुद्ध पत्रके काढून भारतीय पातळीवर नेतेपदाचा ध्यास धरणारा हा इसम खरोखरच राष्ट्रीय प्रवृत्तीचा आहे का, हे जनतेने तपासून पाहिले पाहिजे.

'भारतीय स्वतंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करून जनतेमध्ये राष्ट्रीयत्वाची प्रेरणा निर्माण करणारे मौ. आझाद, मौ. हुसैन अहमद मदनी, मौ. हिफ्जुर रहमान, भारताचे माजी राष्ट्रपती मरहुम डॉ. झाकीर हुसेन हे सारे हमीद दलवाई यांच्या दृष्टीकोनातून कट्टर मुस्लीम पंथी व अराष्ट्रीय... फक्त स्वतः हमीद दलवाई तेवढे राष्ट्रीय, अशी धारणा दिसते.

'भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या आरंभापासून व तदनंतर स्वातंत्र्य लढ्यात अनेक ज्ञात-अज्ञात मुस्लिमांनी सर्वांबरोबर खांद्याला-खांदा लावून बलिदान केलेले आहे. मौ. असद, मौ. मदनी यांनी या देशासाठी जो त्याग केला आहे, मुस्लीम समाजामध्ये नवी दृष्टी निर्माण करण्याचा जो प्रयत्न केला तो अतुलनीय आहे.

'वर नमूद केलेल्या राष्ट्रनेत्यांना शिव्या देताना हमीद दलवाई यांनी आपल्या पूर्व इतिहासाकडे व स्वतःच्या कर्तव्याकडे दृष्टी फिरवून राष्ट्रनेते व मुस्लीम समाज यांना बदनाम करण्याचे धाडस केले असते, तर बरे झाले असते.

'ज्या काळात या देशात स्वातंत्र्य प्राप्तीसाठी आंदोलने उभारली गेली, त्या काळी हमीद दलवाई अथवा त्यांच्या कुटुंबीयांपैकी कोणत्या व्यक्तीने देशासाठी त्याग केला आहे? राष्ट्राच्या निर्मितीसाठी हातभार लावला आहे? याचे एक तरी उदाहरण दलवाई अथवा त्यांचे अनुयायी देऊ शकतील काय?

'स्वातंत्र्य लढ्याच्या काळात हमीद दलवाई यांस 'राष्ट्र म्हणजे काय' हेसुद्धा माहीत नव्हते. उलट त्यांच्या कुटुंबीयांपैकी अनेकांनी बॅ. मोहम्मद अली जिनांच्या नेतृत्वाखाली कार्य करून

पाकिस्तान-निर्मितीसाठी हातभार लावला आहे, हा इतिहास जनतेपासून लपविण्याचा हमीद दलवाई का प्रयत्न करीत आहेत, हेच समजत नाही.

'इतकेच नव्हे, तर या गृहस्थाने १९६२ साली पाकिस्तानमध्ये कराची येथे वास्तव्य करण्याचा प्रयत्न केला होता, असे ऐकिवात आहे. आजही हमीद दलवाई यांच्या कुटुंबीयांपैकी अनेक मंडळी तेथे वास्तव्य करीत आहेत.

'सत्यशोधक समाजाद्वारे मुस्लीम समाजामध्ये नवविचाराचे ढोंग पसरवू पाहणाऱ्या हमीद दलवाई यांचे एक निष्ठावंत अनुयायी सय्यद हे दोन महिन्यांपूर्वी पाकिस्तानमध्ये आपल्या नातलगांना भेटण्याच्या निमित्ताने गेले होते, असे आम्हास खात्रीलायकरित्या समजले आहे. याचा अर्थ, यांचे लागेबांधे पाकिस्तानात आजही गुंतलेले आहेत.

'यावरून हमीद दलवाई व त्यांचे सहकारी 'मुख में राम और बगल में छुरी' या उक्तीप्रमाणे मुसलमानांना राष्ट्रीयत्वाचा डोस पाजण्याचा प्रयत्न करीत नाहीत ना, अशी शंका आल्याशिवाय राहत नाही.

'भिवंडी व जळगाव भागांत जातीय दंगली पसरल्या असताना त्याच काळात सत्यशोधक मंडळाच्या नावाखाली मुस्लीम समाजास डिवचण्याचा जो प्रयत्न पुणे येथे दलवाई प्रभृतिंनी केला, त्यावरून आमचे असे स्पष्ट मत बनले गेले आहे ,की राष्ट्रीयत्वाचा बुरखा पांघरून पोसल्या जात असलेल्या या समंधाचे अंतरंग तपासण्याची वेळ आता आलेली आहे.

'राष्ट्रीयत्वाच्या बुरख्याखाली समाजा-समाजामध्ये द्वेष निर्माण करून दंगली निर्माण करणे, राष्ट्रीयत्वाच्या नावाखाली शासनात प्रवेश करून, या देशाच्या अंतर्गत व्यवस्थेमध्ये बिघाड करून राज्य यंत्रणेला धोका आणणाऱ्या भारतात बावरत असलेल्या अराष्ट्रीय प्रवृत्तींचे एक प्रतीक हमीद दलवाई यांच्या रूपाने आज देशात वावरत आहे. शासनाने व जनतेने वेळीच अशा प्रवृत्तीचा बंदोबस्त केला नाही, तर या देशाच्या समाज जीवनास व राष्ट्रीय एकात्मतेला मोठा धोका निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.'

४.५ कोल्हापुरातील कार्यकर्त्यांना जातिबहिष्काराच्या धमक्या

सप्टेंबर १९७१मध्ये कोल्हापूर येथे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष बाबुमियाँ बँडवाले यांच्या नेतृत्वाखाली एक अभ्यास शिबिर भरले होते. कोल्हापूर विभागातील तरुण सत्यशोधक स्त्री-पुरुष मुस्लीम कार्यकर्ते अभ्यास शिबिरासाठी जमले होते. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य नम्र भावाने, पण निश्चितपणाने चाललेले होते. सत्यशोधकांचा हा विशेष होय, पण ज्यांना सत्याची चाड नसते, अन्यायाची चीड नसते आणि लोकहिताची भीड नसते त्यांना असे असण्याची काहीच गरज नसते! बाबुमियाँ बँडवाले, विलायत शेख, नासिरुद्दीन बारगीर यांची या अभ्यास वर्गातील भाषणे मुस्लीम समाजाच्या अनिवार उमाळ्याने भरलेली होती. शिबिरात मुस्लीम कायद्यासंबंधी करण्यात आलेले विवेचन अभ्यासपूर्ण होते; आणि महाराष्ट्रातील समाजसुधारणांचा घेण्यात आलेला आढावा अतिशय उद्‌बोधक होता.

शिबिरार्थी पन्नासच्या घरात आले होते, पण 'आपल्या समाजाच्या उन्नतीची कळकळ' हा त्यांचा विशेष दिसून आला. बाबुमियाँ बँडवाले यांच्यासारख्या जिंदगीची चाळीस वर्षे राष्ट्रसेवेत घालवणाऱ्या व्यक्ती होत्या, तर प्रा. मुमताज रहिमतपुरे व आय. एन. बेग यांच्यासारखे तरुण अध्यापकही त्यांत होते. कोल्हापूरचे सत्यशोधक मंडळाचे तरुण अध्यक्ष डॉ. मालदार, जमादार, वकील ही मंडळी 'आपल्या समाजाचे भले व्हावे' यासाठी तळमळ असणारी होती. श्रीमती मुमताज मोमीन व बॅ. बागवान यांनी आपली मतभिन्नता प्रकट करूनही अशा अभ्यासवर्गांना सुयश चिंतणारी पत्रे पाठवली होती. असा हा एक साधा अभ्यासवर्ग फक्त पन्नास माणसांनी एकत्र येऊन चालवलेला होता. त्यात खरोखर विरोध करण्यासारखे काहीच नव्हते. पण अभ्यास, सत्यशोधन अशा शब्दांनीच काही धर्मांच्या अंगावर काटा उभा राहतो आणि मग असला नसला विवेक ते गमावून बसतात.

'धर्माचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावरच असून त्याबाबत आपण गाफील राहिलो, तर हजारो वर्षे टिकून राहिलेला धर्मही रसातळाला जाईल' अशी धास्ती त्यांना येऊन घेरते आणि मग वाटेल ते अपकृत्य करण्याला ते बिनदिक्कत तयार होतात.

कोल्हापूरच्या ह्या छोट्या अभ्यास वर्गाचीच गोष्ट घ्या. सत्यशोधन आणि अभ्यास ही कोणत्याही धर्माला अमान्य करता येण्यासारखी गोष्ट आहे काय? धर्माचा मुळात हाच दावा नाही काय? 'सत्याचा शोध' आणि 'अभ्यास' या गोष्टींना धर्मनिष्ठांनी प्रोत्साहन द्यायचे की विरोध करायचा? सत्यशोधन व अभ्यास या प्रश्नांना उतरू शकेल की नाही, अशी शंका ज्यांना धर्माबद्दल वाटते, त्यांनी खरे म्हणजे आपली धर्मनिष्ठा तपासून घ्यायला हवी आणि त्यांना तसे कोणीतरी शिकवायला पाहिजे. पण मतयाचनेसाठी लाचारी पत्करणारे कोणीही हे कार्य करायला धजावत नाही. प्रबोधन हा मते मिळवण्याचा मार्ग वाटण्याऐवजी ओंजारणे-गोंजारणे आणि मोडतेच्या कवचात लोकांना राहू देणे, हा मार्ग त्यांना हमखास वट्ट मते उपटण्याचा मार्ग वाटतो! राजकीय जीवनातील लाचारी ओळखूनच ही मूठभर सत्यशोधक मंडळी पक्षनिष्ठा बाजूला सारून

पुढे सरसावली असून निर्भय मनाने आणि चिकाटीने आपले कार्य करत आहेत. वास्तविक पाहता, जे इष्ट कार्य कर्तव्य भावनेने करावे अशी अपेक्षा असते, ते करण्याची कुवत नसेल तर नसो बापडी, पण त्या कार्याचा उच्छेद केला जाणार नाही, विचार स्वातंत्र्यावर व संघटना स्वातंत्र्यावर घाला पडणार नाही एवढी सुज्ञता तरी सत्ताधाऱ्यांनी दाखवली पाहिजे. एवढी माफक अपेक्षाही सरकार पूर्ण करत नसेल, तर ती फार मोठी चूक ठरू शकते.

कोल्हापूरच्या या अभ्यास शिबिराच्या निमित्ताने 'कोल्हापूर शहर मुस्लीम जमात'च्या वतीने फतवावजा पत्रक काढण्यात आले. ते पत्रक 'ऐलाने-आम-होशियार' अशा भडक शीर्षकाखाली काढण्यात आले. ज्या मुद्रणालयात ते छापले, त्याचा निर्देशही त्यावर करण्यात आलेला नाही!

खरेतर अशा रीतीने पत्रक प्रसिद्ध करणाऱ्यांना सरकारने शासनच करायला हवे होते, पण पत्रकात असणारा धमकीवजा मजकूर अधिकच भयंकर, आक्षेपार्ह व कायद्याच्या दृष्टीने दंडनीय होता.

पत्रक म्हणते : 'कोल्हापूर और अतराफ के तमाम मुसलमान भाई को (यातही नेमक्या भगिनी वगळल्या गेल्या आहेत, ही गोष्ट ध्यानी घेण्यासारखी आहे) इस बात की खबर दी जाती है के मुस्लीम सत्यशोधक मंडल के नाम से हमीद दलवाई मुसलमानों को मजहबे इस्लाम के नाम पर धोका देकर और मुसलमानों में फूट डालने की और मजहबे इस्लाम से मुसलमानों को नफरत दिलाने की एक जमात बनाने की फिकर लेकर कोल्हापूर आ रहा है! (हमीद दलवाईंबद्दल आदरार्थी बहुवचन वापरण्याची साधी सभ्यताही नाही!) इस जमात में कोई भी मुसलमान मेंबर न बने और उस्के किसी कारोबार के अंदर शरीक न होवो! जो उसका मेंबर बनेगा और उसका साथ देगा व मुसलमान न रहेगा। लिहाजा अपने इमान को बचाते हुए अपने घरवालों को और दोस्त अहेबाब को इस खतरे से अगाह करो'

या पत्रकात कोल्हापूरच्या मुस्लीम जमात ने जातिबहिष्काराची धमकी दिली होती. मात्र महाराष्ट्र सरकार अशा या मंडळींचा बंदोबस्त करणार होते की नव्हते? की सरकार झोपा काढण्याचे सोंग करीत राहणार होते? धर्म पाळण्याचे स्वातंत्र्य, म्हणजे भिन्न मते असणाऱ्यांना धमकावण्याचे स्वातंत्र्य नव्हे. हमीद दलवाई व मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांचे कार्य याबाबत मतभेद असतील, तरी हरकत नव्हती आणि त्याबद्दल चर्चा, वादविवाद होण्याचाही अप्रत्यवाय नव्हता; परंतु धमक्या आणि लोकांना भडकवण्याचे उद्बोध कोणी करत असेल, तर कठोरपणे अटकाव करण्यात येणे गरजेचे होते.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कोल्हापुरातील कार्यकर्त्यांना झालेला विरोध आणि देण्यात आलेल्या मारण्याच्या धमक्या म्हणजे मुस्लीम समाज परंपरागत धर्मरूढींना कसा चिकटून बसला आहे, याचे एक उदाहरण म्हणता येईल. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यात मुस्लीम सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मुस्लीम विद्यार्थी बोर्डिंग मधून काढून टाकण्याचा दम वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून भरला जात असल्याचेही सांगण्यात आले. मुस्लीम समाज मोठ्या प्रमाणात मागास राहिलेला आहे. पडदा पद्धत, स्त्रियांचे शिक्षण, बहुपत्नीत्व असे अनेक प्रश्न या समाजात आहेत. या प्रश्नांच्या कोंडाळ्यात मुस्लीम समाज गुरफटला असताना या कोंडाळ्यातून बाहेर पडण्याच्या दृष्टीने हमीद दलवाई आणि कार्यकर्ते कार्यरत होते. या सुधारणेच्या कार्यात खीळ घालण्याचा उपद्व्याप काही समाजकंटक धर्ममार्तंडांनी सातत्याने केला. 'समाजसुधारणा घडू लागली, तर समाजातील आपले अस्तित्व नाहीसे होईल आणि धर्माच्या नावावर आपला स्वार्थ साधता येणार नाही' म्हणून अशा प्रकारचे उपद्व्याप केले जात होते. मुस्लीम सत्यशोधकांच्या विरोधात पत्रक काढलेले असून धमकी देण्यात आलेली होती. 'जो उसका मेंबर बनेगा और उसका साथ देगा, वो मुसलमान न रहेगा'

कोणी मुस्लीम सत्यशोधक समाजाचा सभासद होऊ नये, यासाठी हा आटापिटा चालू होता. माणूस चंद्रावर जात असताना मुस्लीम समाजाचे भवितव्य असे जातिधर्म, रूढिबंधनाच्या चिखलात रुतून बसले होते. जो कोणी आपल्या समाजाला चिखलातून बाहेर काढू पाहत होता, त्याला काफिर संबोधून त्याच्याविरुद्ध सारा अज्ञानी समाज उठविण्याचे या धर्ममार्तंडांचे कारस्थान चालू होते. सरकारने धर्ममार्तंडांकडून येणाऱ्या धमक्यांचा व त्यांचा योग्य तो समाचार घेणे आवश्यक होते आणि मुस्लीम समाजातील सुशिक्षित तरुणांनी या मुस्लीम सत्यशोधक समाजाच्या चळवळीला साथ देण्याची गरज होती. 'आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान' या भूमिकेने मुस्लीम समाजात घडणारी सामाजिक क्रांती जिंदाबाद करणे आवश्यक होते. यातूनच मुस्लीम समाजाचे भवितव्य उजळणार होते. *(दैनिक इंद्रधनुष्य संपादकीय, २७ सप्टेंबर १९७१)*

४.६ Brave Women Defended

(मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने २६-२७ डिसेंबर १९७१ रोजी पुण्यात महिला परिषद आयोजित करण्यात आली होती. या ऐतिहासिक परिषदेच्या निमित्ताने बुद्धिजीवी वर्गात चर्चेचे वादळ उठले. त्यामध्ये तत्कालीन अभ्यासक एस. आय. हुसैन यांनी फ्री प्रेस जर्नल या इंग्रजी नियतकालिकात ७ जानेवारी १९७२ रोजी पत्र लिहून मुस्लीम महिला परिषदेबाबतीत काही आक्षेप नोंदवले होते. त्यास मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी फ्री प्रेस जर्नलमध्ये दिलेला प्रतिसाद)

Mr. S.I. Hussain has written a letter to the editor of free press journal on 7th January, 1972. The letter was full of contradictions. Muslim women's conference was held in Pune on 26th, 27th December, 1971 was neither symposium nor a debate but a conference of Forward-Looking Muslim Women. A Hussain's statment that the people of opposite view were not given opportunity to speak in the conference. Actually, the question of opposition to speak in the conference does not arise. Actually, Hamid Dalwai was given rough treatment in Mominpura area of Pune, when he went there to meet and speak with Muslim brothers. And the man handling of Governer Nawab Ali Yavar Jang, who was then the Vice Chancellor of Aligarh Muslim University, when he tried to introduce the system of co-education in that university are glaring instance of how obscurantists debate. After making the ambiguous statment that he is neither in favour of nor evers to Polygamy, one phase to understand how he considers Polygamy or 'a necessary evil'.

The conference has urged the government to take immediate steps to amend the Muslim Personal Law, does Shri. Hussain considered the Indian government to be something 'outside' for the Muslim community. When he advised the Muslim women to seek advices, he Muslim women to seek help from 'within' and not from outside? In tune with Shri. Hussain's advice to Muslim women to resolve not to marry a married man, it would be most appropriate if the Muslim men themselves resolve not to have a second wife when the first is still living with them and not divorce their wife unless they fix and arrange to pay mentenance allowance to them. Till their death or till the time of their remarriage.

The restrictions on Polygamy as suggested by Mr. Hussain are more or less the same as suggested by the conference. The forth restriction suggested by him though correct is impracticable. What is the use of right to divorce to a woman who is economically dependent on her husband? As per the Shariyat Act of 1937, there are no restrictions on Muslim men regarding divorce pronouncement. We have read cases where divorce were pronounced on telephone. Can they be a more bad use of this modern invention? Not only are the divorce pronouncements at a single sitting tyrannical and unilateral but the divorce pronouncements at three intervals are no less unjust and inhuman, if not more. Advocates of this type of 'Talak' conveniently ignore the psychological turmoils and agonies which a woman has to undergo during the period of this pronouncement.

(This letter was written to the editor of free press journal by Muslim Satyashodhak Activist Fazal Shaikh, Maqbool Tamboli, Rafiuddin Shaikh, Pune published on 24th January 1972)

४.७ शरीयतमध्ये बदल झाल्यास बंड होईल

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या महिला परिषदेस विरोध करण्यासाठी अहमदाबाद येथे मुस्लीम महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले. त्यात 'शरीयतमध्ये (मुस्लीम व्यक्तिगत कायदा) बदल अगर सुधारणा करण्याचा प्रयत्न झाल्यास मुस्लीम समाज बंड करून उठेल' असा इशारा येथे भरलेल्या जमात-ए-इस्लामी महिला परिषदेत ठराव रूपाने देण्यात आला.

या ठरावात पुढे म्हटले होते की, 'मुस्लिमांसाठी कोणताही कायदा करण्याचा संसदेला अधिकार नाही. तो अधिकार केवळ उलेमांनाच आहे; लोकप्रतिनिधींनी त्या भानगडीत पडूच नये.'

पुण्यात काही दिवसांपूर्वी भरलेल्या मुस्लीम महिला परिषदेला उत्तर म्हणून ही परिषद संघटित करण्यात आली होती. 'पुण्याची परिषद म्हणजे इस्लामी संस्कृती नष्ट करण्याचा कट होय. हे बादळ वेळीच शमवले नाही, तर ते मुस्लीम समाजाच्या ठिकऱ्या उडवील' असेही ठरावात म्हटले होते.

परिषदेला अनेक बुरखाधारी महिला उपस्थित होत्या. त्यांत गरीब वर्गातील स्त्रियांचा भरणाही बराच होता.

आंदोलनाचा निर्णय

'भारतात मुसलमानांना स्वतःचा कायदा असण्याचा हक्क आहे. त्यामुळे समान नागरी कायदा केल्यास तो निधर्मीपणाच्या तत्त्वाचा भंग ठरेल.'

परिषदेच्या अध्यक्षस्थानी उर्दू शिक्षिका प्रा. सईदा बेगम कादरी या होत्या. त्या आपल्या भाषणात म्हणाल्या, 'शरीयत कायद्यात सुधारणा झाल्यास त्या सुधारित कायद्याखाली झालेले विवाह मुस्लिमांच्या दृष्टीने बेकायदेशीर ठरतील. त्यामुळे मुस्लीम स्त्रियांचा मालमत्तेवरील हक्क नाकारण्यात येईल.'

'स्त्रियांच्या मुक्ततेची भाषा म्हणजे निरर्थक बल्गना आहेत. पाश्चात्त्य विद्याविभूषित मूठभर मुस्लीम महिलांना कुराणाचे आणि प्रेषिताचे वैभव आणि महात्म्य समजत नाही' अशीही चेतावनी ठरावात देण्यात आली आहे. मुस्लीम समाजाच्या व्यक्तिगत कायद्यात हस्तक्षेप करण्याचा सरकारने प्रयत्न केल्यास त्याविरुद्ध देशव्यापी निषेध आंदोलन उभारण्याचा निर्णय परिषदेत एकमताने घेण्यात आला.

त्याचबरोबर पुण्यातही मुस्लीम सत्यशोधक मंडळास विरोध करण्यासाठी, तसेच इस्लामी शरीयत व मुस्लीम कायदा यांचा प्रचार करण्यासाठी पुणे येथे 'मुस्लीम कायदा समिती'ची स्थापना करण्यात आली. या समितीत वकील, डॉक्टर, प्राध्यापक, मौलवी व सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

ही समिती इस्लामी धर्मप्रसारासाठी स्थापन करण्यात आली. मुस्लीम सत्यशोधक मंडळ आदी

संघटनांच्या वतीने इस्लामी धर्मावर होणाऱ्या टीकेचे खंडन करण्यासाठी ही समिती उर्दू व इंग्रजी भाषेत काही साहित्य प्रसिद्ध करणार असल्याचे सांगण्यात आले.

मुस्लीम कायद्याच्या प्रसारासाठी समितीच्या वतीने पुणे शहरात अनेक सभा व संमेलनाचे कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने एक महिला परिषद आयोजित केली होती. या नवीन समितीच्या वतीने येत्या एप्रिलमध्ये मुस्लीम महिलांची एक परिषद आयोजित करण्यात येणार आहे. समितीच्या अध्यक्षपदी पूना कॉलेजचे प्राचार्य ईस्माईल उमरसाहब यांची निवड करण्यात आली होती. या समितीमधील इतर पदाधिकाऱ्यांची नावे पुढीलप्रमाण – उपाध्यक्ष : ॲडव्होकेट एस. ए. रहमान व अब्दुल रझाक बियाबानी, सरचिटणीस – ॲडव्होकेट ए. रहमान चिटणीस – महमूद पटेल. खजिनदार – अब्दुल करीम शेरवानी.

कार्यकारिणीचे सभासद म्हणून मुस्लीम लीगचे अध्यक्ष डॉ. अन्सारी, डॉ. ए. आर. शेख, ॲड. हसन काजी, नगरपिता अ. म. खान प्रभृतींची निवड करण्यात आली. *(महाराष्ट्र टाइम्स, २४ जानेवारी १९७२ आणि मंडळाच्या दफ्तरातून)*

४.८ मुस्लीम नेत्यांकडून समाजाची दिशाभूल

गुजरातप्रमाणेच दिल्ली येथे गेल्या पंधरवड्यात देशांतील काही मुस्लीम नेत्यांची एक परिषद झाली. सामाजिक व राजकीय आघाड्यांवर कार्य करणारे सर्व मुस्लीम नेते या परिषदेत सहभागी झाले होते आणि या परिषदेच्या अध्यक्षस्थानी रूढिप्रिय समाजसेवक जनाब बद्रूद्दीन तैय्यबजी होते!

या परिषदेत मार्गदर्शनासाठी उपस्थित असलेल्या सर्वच नेत्यांनी गगनभेदी गर्जना करून सत्तारूढ इंदिरा काँग्रेस आणि सर्व राजकीय पक्षांना एक प्रकारचे आव्हानच दिलेले आहे. अर्थात, परिषदेने सर्वानुमते एक प्रस्ताव संमत केला की, 'मुस्लिमांच्या मूलभूत 'शरीयत'सारख्या कायद्यांत भारत सरकारने मुळीच हस्तक्षेप करता कामा नये. समान नागरी कायदा व बहुपत्नीत्वास बंदी करणारा कायदा लागू करण्याचा प्रयत्न केला गेला, तर त्याविरुद्ध आम्हास, मुस्लीम समाजाला, म्हणजे उपस्थित नेत्यांना जिहाद (धर्मयुद्ध) पुकारावे लागेल.'

वास्तविक, मुस्लीम समाजाचे हित करू इच्छिणाऱ्या, पण प्रत्यक्षात अहित करणाऱ्या या संधिसाधूंनी आगामी मुदतपूर्व निवडणुका होणार असल्यानेच नवी दिल्लीत जमून तिकिटांची देवाण-घेवाण होण्यापूर्वी एक स्टंट म्हणूनच म्होरक्यांचा हा मेळावा भरविला होता, यात तिळमात्र शंका नाही. कारण या परिषदेत भाग घेणारे काही पक्ष व पुढारी नेहमीच निवडणुकीच्या राजकारणात गुंतलेले आणि 'अमुकच पक्षाला मुस्लिमांनी मते द्यावीत' असा 'फतवा' काढणारे असल्याचे दिसून येते. अर्थात, निवडणुकीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भाग घेणारे हे समाजसेवक सत्तेशिवाय मुस्लीमसेवा करतील काय? हे नेते मुस्लीम समाजाला सत्यापासून किती काळ दूर-दूर ठेवू इच्छितात, हादेखील गूढ प्रश्नच आहे. कारण भारतीय लोकसभा ही सार्वभौम असून देशहित व जनहित यांची खात्री वाटेल, तेव्हाच लोकसभेला राज्यघटनेत काही दुरुस्त्या सुचविता येतात, हे कटू सत्य हे संधिसाधू नेते आपल्या समाजापुढे का ठेवीत नाहीत?

शिवाय, आज पुरोगामी आणि धर्मनिरपेक्ष म्हणविणारे काही पक्ष व नेते केवळ मते बळकविण्यासाठीच मुस्लिमांच्या घोडचुकांवर पांघरूण घालून त्यांचे लाड करीत आहेत, हेदेखील हे नेते का विसरत आहेत? मुस्लिमांच्या दुर्दैवाने कदाचित उद्या जनसंघ, स्वतंत्र, सिंडीकेट यांना जर लोकसभेत बहुमत प्राप्त झालेच, तर ते सरकार या धर्मांध, रूढिप्रिय व हटवादी समाजनेत्यांचा हटवादीपणा व लाड चालू देईल काय? तात्पर्य, मुस्लीम समाज व त्याच्या या नेत्यांनी काळाची पावले ओळखून आपल्या वेगळ्या अस्तित्वाला तिलांजली देऊन बदलत्या युगाबरोबर बदललेच पाहिजे. भविष्यकाळात का होईना, आजच्या तरुणांना बंडखोरी करून 'इन्कलाब' आणल्याशिवाय तरणोपाय नाही, याचा शोध आणि बोध अंधकारमय वातावरणात चाचपडत असलेला मुस्लीम युवक घेईल काय?

महंमद हनिफ तांबोळी, संघटक, मुस्लीम सत्यशोधक मंडळ, सोलापूर. (मंडळाच्या दफ्तरातून)

४.९ मुस्लीम लीग आणि मंडळामधील वाक्युद्ध व वाद-प्रतिवाद

(मा. गं. बा. सरदार, मा. दि. के. बेडेकर, प्रा. देवदत्त दाभोलकर , मा. ए. डेव्हिड, प्रा. मा. श. भनगे, प्रा. रुस्तम चोक्सी, प्रा. मा. प. मंगुडकर, प्रभाकर पाध्ये, वि. अ. नाईक या पुणेकर मंडळींनी 'बहुतांची अंतरे' या महाराष्ट्र टाइम्समधील सदराच्या माध्यमातून लिहिलेले पत्र.)

'मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने २६, २७ डिसेंबर १९७१मध्ये घेण्यात आलेली मुस्लीम महिला परिषद अनेक अर्थांनी बहुचर्चित ठरली. धार्मिक नेते आणि राजकीय पक्ष यांनी यावर गदारोळ माजवला. मुस्लीम लीग आणि मुस्लीम सत्यशोधक यांच्याकडून वादप्रतिवाद झाले. परिषदेने सामाजिक सुधारणांची मागणी करताना तलाक, बहुपत्नीत्व रद्द करण्याची मागणी केली. या मागणीला विरोध दर्शवत पुणे येथील मुस्लीम लीगचे चिटणीस मिर्झा हमीद बेग यांनी एक पत्रक प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या परिषदेतील मागणीवर टीका केली. 'मुस्लिमांच्या कायदयात हस्तक्षेप होत आहे आणि इतर समाजाच्या आणि सरकारच्या प्रेरणेने तो होत आहे' असेही त्यांनी सुचविले. 'स्त्रियांसंबंधी आदर हे तत्त्व मुस्लीम कायदयात आहे' असेही त्यांचे म्हणणे होते. मुस्लिमांचा कायदा अपरिवर्तनीय आहे, असे त्यांचे म्हणणे नाही, ही आनंदाची बाब आहे. त्यामुळे 'स्त्रियांविषयी आदर' या तत्त्वावर मुस्लीम लीगचे अनुयायी, मुस्लीम सत्यशोधक आणि मुस्लीमेतर समाज यांच्यामध्ये संवाद होऊ शकेल, असे आम्हास वाटते. या संवादातून सुधारणेची दिशा दिसू शकेल. आम्हास वाटते की, मुस्लीम पुरुषास चार बायका करण्याची परवानगी आहे, हा मुस्लीम कायदा किंवा ही रूढी 'स्त्रियांविषयी आदर' या तत्त्वाशी विसंगत आहे. मुस्लीम समाज या देशात मोठ्या प्रमाणात आहे. या देशातील विविध समाजांची सामाजिक आणि इतर परिस्थिती जवळजवळ सारखी असणे आवश्यक आहे. इतर समाज पुढे आणि मुस्लीम समाज मागे ही विषमता केवळ मुस्लीम समाजास बाधक आहे, असे नसून संपूर्ण भारतीय समाजास बाधक आहे. या दृष्टीने 'मुस्लीम समाजाची सुधारणा' ही बाब मुस्लीमेतर समाजाच्या आणि सरकारच्याही विचाराची बाब ठरते, असे आम्हास वाटते.' *(महाराष्ट्र टाइम्स, २४ जानेवारी, १९७२)*

सुधारणेचा प्रवाह थांबणार नाही

(म. मो. शेख, वाई यांनी महाराष्ट्र टाइम्समध्ये प्रसिद्ध केलेले पत्र)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या मुस्लीम महिला परिषदेमुळे मुस्लीम लीगच्या कार्यकर्त्यांच्या बुद्धीला झटका बसला आणि त्यांना एकात्मता आठवली. मिर्झा बेग म्हणतात, 'या परिषदेमुळे एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे.' हा समाज गुलामगिरीतच राहावा व स्त्रियांचा जन्म हा गुलामांचाच आत्मा असावा व आपणा पुरुषांस वाटेल तितकी लग्ने करण्यास अल्लाहने मुभा दिली आहे' असा चुकीचा समज डोक्यात घेऊन हे लीगवाले बसलेले दिसतात. काळ बदलला, तर समाज बदलला पाहिजे व समाज बदलला, तर व्यक्ती बदलून आपला विकास करून घेतला

पाहिजे, हे ते विसरलेले दिसतात. लीगवाल्यांना बांग्लादेशाच्या मुक्तीच्या लढ्यामध्ये एकात्मता आठवली नाही, पण या परिषदेमुळे आठवत आहे. मुसलमान मुसलमानांचे शत्रू असल्याचे बांग्ला लढाईवरून दिसून आले. समाज सुधारत असताना जग कोठे चालले आहे व आज या भारतीय स्त्रिया गुलामगिरीच्या पाशात व तलाकमध्ये घुटमळत आहेत, याचा विचार कोण करतोय? जे करावयास निघाले, त्यांचे पाय खेचण्याचे काम हे लोक करीत आहेत. जे घडत आहे, ते स्त्रिया आपल्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करीत असता घडू नये, असे बेग साहेब यांना वाटत असावे. त्यांची सुधारणेच्या मार्गाकडे पाहण्याची दृष्टी कमजोर असावी. दुसरी बाब ही की, 'सात कोटी मुसलमानांची एकात्मता ढासळेल हे म्हणणे चुकीचे आहे' *(महाराष्ट्र टाइम्स, २४ जानेवारी १९७२)*

मुस्लीम महिला परिषदेचा प्रभाव सामान्य मुस्लिमांच्या वरती पडत असतानाच धर्मवादी नेतृत्वाची झोप उडाली आणि 'परिषदेला महिलांचाच विरोध आहे' असे दाखवण्यासाठी ठिकठिकाणी जमात-ए-इस्लामीसारख्या संघटनांकडून महिलांच्या परिषदांचे आयोजन करण्यात येऊ लागले. अशाच प्रकारची परिषद अहमदाबाद येथे आयोजित करण्यात आली. तिच्यात पत्रकारांना मज्जाव करण्यात आला होता. या परिषदा महिलांच्या असल्या, तरी त्याचे सूत्रधार पुरुष होते. 'या परिषदांमध्ये महिला येतात की बुरखाधारी पुरुष हे उद्योग करतात?' अशी शंका अनेकांनी व्यक्त केली. १५ जानेवारी १९७२ रोजी मुस्लीम पर्सनल लॉ कमिटीने पुण्यात मुस्लीम महिलांची एक सभा आयोजित केली होती. त्यात 'मुस्लीम पर्सनल लॉमध्ये काहीही बदल करू नये' असा ठराव पास करण्यात आला. या परिषदेच्या अध्यक्ष मुंबई येथील प्रा. साफिया अनक्रोलवी म्हणाल्या की, ' 'राष्ट्रीय एकात्मतेसाठी समान नागरी हक्कांचा कायदा व्हावा' असे शरीयत विरोधी लोक म्हणतात. 'आम्हालाही राष्ट्रीय एकात्मता पाहिजे आहे, पण ती कायद्यात बदल करून निर्माण होणार नाही. पर्सनल लॉमधील तलाकच्या तरतुदींबद्दल आरडाओरडा केला जातो, पण फारच कमी मुस्लीम पुरुष असा अन्यायकारक तलाक देतात. शिवाय तलाक देण्याची पद्धती शरीयतमध्ये पूर्ण विचार करून दिली आहे. न्यायालयात घटस्फोट मागावयास गेल्यामुळे इज्जत जाते, तशी तलाक घेताना इज्जत जात नाही. बहुपत्नीत्वाच्या कायद्यातही वाईट काय आहे? पूर्वी शेकडो बायका असत. ती संख्या शरीयतने चारवर आणली. शिवाय आधुनिक पाश्चिमात्य समाजात बायको एक असली, तरी मैत्रिणी अनेक असतात. चार बायका असण्यात वाईट काय?' परिषदेपुढे बोलताना मेहेरून्निसा फकी, मिसेस रहेमान यांनीही 'शरीयतचा कायदा महिलांवर अन्याय करणारा नाहीच, पण त्यांच्या दृष्टीने अतिशय आवश्यक आहे' असे सांगितले. 'पटत नसताना एकत्र राहण्यात आयुष्याची बरबादी आहे. तसे होऊ नये यासाठी तलाकची पद्धती आवश्यक आहे' असे परिषदेत जमलेल्या महिलांचे म्हणणे होते.

सामाजिक सुधारणेचे स्वागत न करता, आहे त्या परिस्थितीचे तथाकथित समर्थन करून स्वतःच्या पायावर दगड पाडून घेण्याच्या या मनोवृत्तीचा विविध ठिकाणी आणि विविध प्रसंगांत मंडळाला अनुभव आला. जमात-ए-इस्लामी, मुस्लीम लीग, आदी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित महिलांच्या संदर्भात शंका उपस्थित करून या महिला मुस्लीम नसाव्यात, असा वितर्क

मांडला. उपस्थित चारशे-पाचशे महिलांपैकी फक्त पंधरा-वीस महिलाच मुस्लीम असल्याचे आणि त्यांतील काही हमीद दलवाई यांच्या नात्यातील असल्याचे शाहबाज आणि अब्दुल कादीर यांनी पुण्यातील मराठी वर्तमानपत्रांना सांगितले. या परिषदेतील सुधारणेच्या कार्यास असणारे वैचारिक मतभेद समजण्यासारखे होते, परंतु येथे घेतलेले आक्षेप मुस्लीम लीगशी संबंधित असणाऱ्या वर्तमानपत्रावर आधारित असून ते सरसकट खोटे आणि बिनबुडाचे होते.

जमात-ए-इस्लामी या संघटनेने मुंबईमध्ये, २३ जानेवारी १९७२ रोजी, मोमिनपुऱ्यामधील मदरसा-ए-इस्लामी नावाच्या शाळेत बेगम कबिरा कैफ यांच्या अध्यक्षतेखाली दोन हजारांहून अधिक मुस्लीम महिलांची बैठक आयोजित केल्याचे प्रसिद्ध केले. यात 'मुस्लीम पर्सनल लॉ हा पवित्र कुराणाचा एक अंतर्गत व अविभाज्य भाग आहे' याचा पुरस्कार करणारा व त्यात कोणत्याही प्रकारे बदल करण्यास विरोध करणारा एक ठराव संमत करण्यात आला. सभेला बुरखा घालून जात असलेल्या प्रतिनिधींचे छायाचित्र घेण्यासही मनाई करण्यात आलेली होती. ही सभा श्रीमती शफीका बशीरोद्दिन यांनी बोलवली होती. पडदा, बहुपत्नीत्व, मेहर, वारसा पद्धती इत्यादींवर महिलांनी मते मांडली आणि 'चौदाशे वर्षांपासून हा कायदा चालत आला असून तो काळाच्या कसोटीवर उतरलेला आहे' अशी मांडणी केली. पुण्यास मुस्लीम महिला परिषद भरविल्याबद्दल वक्त्यांनी हमीद दलवाई यांच्यावर टीका केली. 'ते इस्लामचे खरेखुरे प्रतिनिधी नाहीत व प्रगतिकारक उपाय आणि दुरुपयोग होण्याची शक्यता असलेले फाजील स्वातंत्र्य याच्या संबंधी त्यांच्या मनात गोंधळ आहे' अशी टीकाही या वेळी करण्यात आली. वास्तविक, ही परिषद आयोजित करण्यात आलेले सभागृहच जास्तीत जास्त तीनशे लोक बसतील एवढ्या आकाराचे होते. कुठल्याही वर्तमानपत्राचे प्रतिनिधी आणि बाहेरील व्यक्तीस तेथे मनाई करण्यात आली होती. प्राप्त झालेल्या माहितीनुसार उपस्थितांमध्ये रशिदा मधू या सी.पी.एम.चे कार्यकर्ते इब्राहिम मधू, भिवंडी यांच्या पत्नी होत्या. यांना महाराष्ट्र शासनाने १९६५ आणि १९७० साली ताब्यात घेतले होते. सहभागी प्रतिनिधींनी बुरखे घातलेले असल्यामुळे सांगितल्याप्रमाणे त्यातील किती प्राध्यापिका आणि विद्यार्थिनी होत्या, हे निश्चित सांगणे कठीण! परंतु मुस्लीम महिलांची दिशाभूल करून सुधारणा रोखण्यासाठी जमात-ए-इस्लामी भारतात अन्यत्र दोन हजार महिलांच्या बैठका घेऊ शकतात, हे बरोबर आहे. मुस्लीम सत्यशोधकच्या परिषदेत महिला कमी होत्या आणि जमात-ए-इस्लामीने आयोजित केलेल्या बैठकीत जास्त महिला होत्या. मात्र म्हणून मागणीच्या योग्यतेचा निकष उपस्थित महिलांच्या संख्येवरून ठरवणे न्यायाला धरून नाही. कारण तसे पाहिल्यास, मक्केमध्ये महंमद पैगंबरांना विरोध करणाऱ्यांची संख्या हजारोंत होती. त्यामुळे पैगंबरांना मदिनेत स्थलांतर करावे लागले. त्या वेळी पैगंबरांसोबतचे लोक हातावर मोजण्याइतकेच होते. मात्र म्हणून ते चुकीचे होते, असे म्हणता येत नाही.

मुस्लीम व्यक्तिगत कायद्यामुळे महिलांचे दमन होते. त्या स्वातंत्र्य उपभोगू शकत नाहीत. म्हणूनच वर्तमानपत्रातून मुस्लीम महिलांच्या हक्काच्या समर्थनार्थ प्रतिसाद नोंदविण्यात आले.

ही वस्तुस्थिती असतानाही मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडून परिषदेत नोंदणी करण्यात आलेल्या प्रतिनिधींचे नाव आणि पत्ते कोणीही येऊन पाहू शकते आणि मंडळाने या बाबतीत

पारदर्शकता बाळगली असल्याचे सांगण्यात आले. तसेच या निमित्ताने काही महिलांनी वर्तमानपत्रातूनही स्वागतार्ह प्रतिक्रिया नोंदवल्या गेल्या. *(फ्री प्रेस जर्नल, ९ फेब्रुवारी, १९७२)*

वास्तव :

पुण्यामध्ये २७-२८ डिसेंबर १९७२ रोजी मुस्लीम महिला परिषदेत विविध भागांतील महिलांची उपस्थिती होती. या परिषदेत अमरावतीतून १८ मुस्लीम महिला उपस्थित होत्या. परिषदेनंतर त्या परत गेल्यावर अमरावती येथील मुस्लीम लीगच्या कार्यकर्त्यांनी या महिलांना विविध पद्धतींनी त्रास देऊन छळ केला. 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यात महिलांनी सहभागी होऊ नये या उद्दिष्टाने करण्यात येत असलेला छळ त्वरित थांबवावा' यासाठी मंडळाचे चिटणीस सय्यद मेहबूब यांनी मुख्यमंत्र्यांना तार पाठवून केले. तारेमध्ये अमरावती येथील कार्यकर्ते वजीर पटेल यांना मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचे कळवले होते. शासनाने या महिलांची छळातून सुटका करण्यासाठी त्वरित प्रयत्न केला नसता, तर मुख्यमंत्र्यांच्या घरासमोर धरणे धरण्याचा इशारा देण्यात आला होता.

वजीर पटेल यांना पोलिसांचे संरक्षण घेऊन फिरावे लागत असल्याचे लक्षात आणून देऊन शासन व राजकीय पक्षांच्या उदासीनतेबद्दल नाराजी व्यक्त केली गेली. *(दैनिक लोकसत्ता, प्रभात, १२ जानेवारी १९७२)*

४.१० महिला परिषदेवर उर्दू पत्रांची भाष्ये

(२७, २८ डिसेंबर १९७२ रोजी झालेल्या परिषदेसंदर्भात मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते अ. का. मुकादम यांनी २५ जानेवारी १९७३ रोजी महाराष्ट्र टाइम्स या वर्तमानपत्रात लिहिलेला लेख)

पुण्यात झालेली मुस्लीम महिला परिषद साऱ्या देशभर अजूनही गाजते आहे. देशातील अनेक वर्तमानपत्रांनी तिला भरभरून प्रसिद्धी तर दिलीच, पण टाइम्स ऑफ इंडियाअगोदर अनेक पत्रांनी अग्रलेख लिहून परिषदेला जाहीर पाठिंबाही दिला. मुस्लीम समाजात होऊ घातलेली एक वैचारिक क्रांती यशस्वी व्हावी म्हणून अशा जाहीर उत्तेजनाची व पाठिंब्याची आवश्यकता होतीच. याच भावनेने सर्व वर्तमानपत्रांनी तिला पोषक अशी भूमिका घेतली. मुस्लीम जातीयवादी वृत्तपत्रांनी मात्र याउलट भूमिका घेतली आहे. अर्थात, ही भूमिका विसंगत असली, तरी अनपेक्षित खासच नव्हती. तरीही ती जाणून घेणे आवश्यक आहे.

मुद्द्याला बगल

दावत (१ जानेवारी १९७२), इन्किलाब (४ जानेवारी १९७२), वतन (गुजराती, २ जानेवारी १९७२) व रेडियन्स (इंग्रजी, २ जानेवारी १९७२) या पत्रांनी या परिषदेवर टीकात्मक लेख लिहिले. या सर्व लेखांत काही मुद्दे सामान्यपणे सारखे असल्याचे आढळून येते. सर्वांनीच मूळ प्रश्नाला बगल देऊन काही अवांतर व गैरलागू मुद्द्यांवरच चर्चा केली आहे. वास्तविक, शरीयतचा कायदा हा खरेखर अपरिवर्तनीय आहे का? की यापूर्वी त्यात काही परिवर्तने झाली आहेत? इतर मुस्लीम राष्ट्रांनी त्यात कालानुरूप काही सुधारणा केल्या आहेत का? किंवा या कायद्यात बदल केल्यामुळे मुस्लीम स्त्रीचे वा मुस्लीम समाजाचे नुकसान होणार आहे की फायदा होणार आहे? हे व असे प्रश्न उपस्थित करून त्या अनुषंगाने परिषदेवर टीका झाली असती, तर ती अधिक सयुक्तिक झाली असती. पण हे प्रश्न या टीकाकारांना अडचणीत टाकणारे आहेत. म्हणून हे प्रश्न कौशल्याने डावलून आपल्या वाचकांची दिशाभूल करण्याचा मार्ग या टीकाकारांना अधिक सोयीचा वाटला असावा. दुसरे असे की, या परिषदेशी या ना त्या प्रकारे जनसंघाचा संबंध जोडण्याचा प्रयत्नही करण्यात आला आहे. त्यांचे म्हणणे असे की, भारतातील सर्व जातीजमातींसाठी समान नागरी कायदा असावा, ही जनसंघाची फार जुनी मागणी आहे. या मुस्लीम महिला परिषदेने त्याच मागणीचा पुनरुच्चार केला आहे. म्हणून ही परिषद जनसंघाची पुरस्कर्तीच आहे, असे हे अजब तर्कशास्त्र आहे.

थक्क करणारे मुद्दे

'दावत' हे उर्दू दैनिक काय म्हणते पाहा. २ जानेवारी १९७२च्या अंकात 'खबरोनजर' या स्तंभातून दावतने मुस्लीम महिला परिषदेवर टीका केली आहे. त्याचा सारांश असा की, 'मुस्लीम समाजात सुधारणा घडवून आणण्याकरिता सेक्युलर फोरम, सत्यशोधक मंडळ, इस्लाम अँड

मॉडर्न एज सोसायटी अशा अनेक संस्था व व्यक्ती हिरिरीने पुढे येत असता मुस्लीम समाज मात्र त्याची दखल घेत नाही, याला काय म्हणावे? ही मंडळी मुसलमानांना अनेक प्रलोभने दाखवित असताना व त्यांच्यासमोर उज्ज्वल भविष्याची सुंदर चित्रे रंगवीत असताना मुसलमान मात्र याचा विचारही करावयास तयार नाहीत.' अशी उपरोधिक प्रस्तावना करून दावत पुढे म्हणतो की, 'मुल्लामौलवी तर सोडाच, पण चांगले शिकले सवरलेले नवविचारवादी मुसलमानही अशा सामाजिक सुधारणांना अजूनही अनुकूल झालेले नाहीत.' अशी मखलाशी करून दावतने पुढे माननीय मोइनुल हक चौधरी या केंद्रीय मंत्रिमहाशयांनी 'उर्दू डायजेस्ट' या नियतकालिकात दिलेली मुलाखतच पुनर्मुद्रित केली आहे. ज्या अर्थी संपादकांनी ही मुलाखत आपल्या टीकालेखात उद्धृत केली आहे, त्या अर्थी ते त्यातील विचारांशी सहमत आहेत, असे समजण्यास हरकत नाही. उपरोक्त मंत्रिमहाशयांचा मुस्लीम सामाजिक कायद्यात सुधारणा करण्याला विरोध आहे, पण आपल्या विरोधाच्या समर्थनार्थ त्यांनी मांडलेले मुद्दे थक्क करणारे आहेत. त्यांचा प्रश्न असा आहे की, 'समान नागरी कायद्याने राष्ट्रीय एकात्मता कशी साधली जाईल? निरनिराळ्या जातिपंथाच्या सामाजिक व धार्मिक रूढींत अशा कायद्यामुळे समानता येणार आहे का? त्यांच्या प्रार्थना पद्धती, पेहराव, जीवनविषयक दृष्टीकोन यांत विविधता राहणारच. शिवाय ही विविधता नष्ट करण्याची गरजच काय? राष्ट्रीय एकात्मतेकरता इतर धर्मीय आपल्या लग्न पद्धती, संस्कार इत्यादींत बदल करून घेण्यास तयार होतील का? यावर काही वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता आहे, असे वाटत नाही.'

बाष्कळ व बालिश

धर्मवादी मुस्लिमांची प्रतिक्रिया परिषदेच्या आयोजकांपेक्षाही बाष्कळ व बालिश आहे. त्यांच्या मते, 'या परिषदेत भाग घेतलेल्या स्त्रिया उच्चभ्रू वर्गातील होत्या. त्यांच्या घरी स्वयंपाकासाठी बावर्ची व मुलांना सांभाळण्याकरता आया आहेत, तेव्हा त्यांनी समाजकार्य केले, तर त्यात नवल काय? परंतु अशा फॅशनेबल स्त्रियांची समाजसेवाही खरी समाजसेवाच नव्हे आणि या स्त्रिया मुस्लीम समाजाच्या प्रातिनिधीही नव्हेत' असा शेरा मारून 'वतन' वर्तमानपत्र पुढे म्हणते की, 'सामान्य मुस्लीम स्त्रियांची सुख-दुःखे या स्त्रियांनी कधी जाणूनच घेतली नाहीत. मुस्लीम वस्तीत त्यांनी कधी पायच ठेवला नाही. तेव्हा मुस्लीम स्त्रीच्या अडीअडचणींची त्यांना काय कल्पना येणार? यांना जर खरोखर मुस्लीम समाजाची सेवा करावयाची असेल, तर प्रथम त्यांनी समाजकार्याचे पद्धतशीर शिक्षण घेतले पाहिजे. तसेच मुस्लीम वस्तीत रोज काही काळ व्यतीत केला पाहिजे. म्हणजे त्यांना सामान्य मुस्लीम स्त्रीच्या परिस्थितीची योग्य कल्पना येऊ शकेल.' असा मानभावी सल्ला वतनकारांनी या परिषदेत भाग घेतलेल्या तथाकथित उच्चभ्रू स्त्रियांना दिला आहे.

'इन्किलाब' त्या मानाने थोडे मवाळ असल्यासारखे वाटते. त्याने निदान 'हे विचार चांगले आहेत' असे तरी म्हटले आहे... (ये बात यकीन के साथ कही जा सकती है कि ये सब रोशनखयाल है.) परंतु एवढेच! यानंतर मात्र तो इतरांच्याच मागनि गेला आहे. 'मुसलमानांत सामाजिक

सुधारणा झाल्या पाहिजेत, या विषयी दुमत होऊ नयें असे म्हणून इन्किलाब पुढे म्हणतो की, 'हे मान्य केले तरी या परिषदेने याकरिता अवलंबिलेला मार्ग अयोग्य होता. सामाजिक सुधारणा, मुसलमानांचे हक्क, त्यांची विद्यमान आर्थिक व राजकीय परिस्थिती इत्यादी बाबत या परिषदेत काही मूलगामी विचार मांडले जातील, काही मार्गदर्शन केले जाईल, असे वाटले होतें परंतु तसे न होता ही परिषद शासनावर दबाव आणणारी यंत्रणा बनली आहे, असे इन्किलाबकारांना वाटते. 'मुस्लीम समाजाने मागणी केल्याशिवाय त्यांच्यावर सामाजिक सुधारणा लादण्यात येऊ नयेत' असे एकीकडे म्हणायचे, तर दुसरीकडे अशा तऱ्हेची मागणी करण्याचा कुणी प्रयत्न केला, तर 'तो शासनावर दबाव आणण्याचा प्रकार आहे' असे म्हणायची ही दुटप्पी वृत्ती आहे. *(महाराष्ट्र टाइम्स, २५ जानेवारी १९७२)*

४.११ मुस्लीम लीगचे पत्रक

इस्लामविरोध म्हणजेच धर्मनिरपेक्षता?

दि. २७ व २८ डिसेंबर ७१ रोजी पुण्यात सत्याच्या शोधात निघालेल्या, पण असत्य कृत्य करणाऱ्या मंडळींनी 'मुस्लीम महिला' या नावाने, सामाजिक परिवर्तन व काळाचे रूप ह्यांचा आधार घेऊन, परिषद अयोजित करून, शरीयतच्या कायद्याप्रमाणे मुस्लीम महिलांना मिळणारे आदरणीय स्थान नष्ट करण्याचा केलेला खटाटोप मुस्लीम बांधव व भगिनी यांच्या कधीही पसंतीस उतरणार नाही. मुस्लीम महिलांची अनुपस्थिती ही अशा दुष्ट कारस्थान करणाऱ्यांच्या तोंडावरील फार मोठी थप्पड होय.

अशा प्रकारे मुस्लिमांचे नाव घेऊन, सभा-परिषदा आयोजित करून, धर्मनिरपेक्ष राजवटीत घटनेने दिलेले धार्मिक स्वातंत्र्य नष्ट करण्याच्या प्रयत्नांमध्ये लोकशाही धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार करणाऱ्या राजकीय पक्षाचे पुढारी, कार्यकर्ते, शासकीय यंत्रणा वगैरे सहभागी होऊन आर्थिकदृष्ट्याही सहकार्य करीत आहेत. हे ७ कोटी भारतीय मुस्लिमांच्या धार्मिक भावना दुखावण्यासाठी केलेले कृत्य होय.

आमची शासकीय यंत्रणादेखील जाहिरातीच्या रूपाने आर्थिक मदत करून मुस्लीम समाजाविरुद्ध एक चळवळ उभी करण्याच्या प्रयत्नात सहभागी आहे, हे एक अश्चर्य होय. तसेच प्रसिद्धी यंत्रणेनेदेखील सत्य दडवून ठेवून अशा चळवळींना मोठे स्वरूप प्राप्त करून दिले, असेच खेदाने म्हणावे लागत आहे. ह्याच वर्तमानपत्रकारांनी आजपर्यंत मुस्लीम समाजाने दिलेल्या सत्य बाबी कधीही पूर्णपणे प्रसिद्ध करण्याची वृत्ती दाखविली नाही. याउलट इस्लामविरोधी गोष्टींना फार मोठ्या प्रमाणात महत्त्व देण्यात पुढाकार घेतला.

या आणीबाणीच्या परिस्थितीत देशास एकतेची फार मोठी गरज आहे व अशा प्रकारे एकात्मतेस धोका उत्पन्न करणाऱ्यांविरुद्ध, मुस्लीम महिलांचे नाव देऊन मुस्लीमेतर महिलांच्या वतीने धर्मात हस्तक्षेप करणाऱ्यांविरुद्ध सरकारने त्वरित कारवाई करावी. तसेच जाहिरातीच्या रूपात आर्थिक मदत करून ज्या-ज्या शासकीय यंत्रणांनी ७ कोटी भारतीय मुस्लिमांची मने दुखावली व अशा दुष्ट चळवळीत सहभागी होऊन, इस्लाम धर्मात हस्तक्षेप करून आपल्या अधिकाराचा गैरवापर केला, त्यांची शासनाने त्वरित चौकशी करून पुन्हा असे घडू नये, यासाठी दक्षता घ्यावी, अशी पुणे शहर मुस्लीम लीगची शासनास जाहीर विनंती!

(सेक्रेटरी, मुस्लीम लीग पुणे
मिर्झा हमीद बेग, १५५२, शुक्रवार पेठ, पुणे २)

मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे आयोजित करण्यात आलेल्या मुस्लीम महिला परिषदेस मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डपुरस्कृत महिलांनी मुंबई, पुणे, नागपूर अशा ठिकाणी परिषदांचे आयोजन करून मुस्लीम पर्सनल लॉच्या समर्थनार्थ व मंडळाच्या विरोधात भूमिका मांडल्या. याचाच एक

भाग म्हणून मुस्लीम पर्सनल लॉ कमिटीने १५ मार्च १९७२ रोजी पुण्यात सभेचे आयोजन केले. 'मुस्लीम पर्सनल लॉमध्ये काहीही बदल करू नयेत' असा ठराव सभेत पास करण्यात आला. या परिषदेच्या अध्यक्ष, मुंबई येथील प्रा. सौ. साफिया अनकोलवी म्हणाल्या की, ' 'राष्ट्रीय एकात्मतेसाठी समान नागरी हक्काचा कायदा व्हावा' असे शरीयतविरोधी लोक म्हणतात. आम्हालाही राष्ट्रीय एकात्मता पाहिजे आहे. मात्र ती कायद्यात बदल करून निर्माण होणार नाही. पर्सनल लॉमधील तलाकच्या तरतुदीबद्दल आरडाओरडा केला जातो, पण फारच कमी मुस्लीम पुरुष असा अन्यायकारक तलाक देतात. शिवाय तलाक देण्याची पद्धती शरीयतमध्ये पूर्ण विचार करून ठरवून दिली आहे. न्यायालयात घटस्फोट मागावयास गेल्यामुळे इज्जत जाते, तशी तलाक घेताना जात नाही. बहुपत्नीत्वाच्या कायद्यातही वाईट काय आहे? पूर्वी शेकडो बायका असत. ती संख्या शरीयतने चारवर आणली. शिवाय आधुनिक पाश्चिमात्य समाजात बायको एक असली, तरी मैत्रिणी अनेक असतात. मग चार बायका असण्यात काय वाईट आहे?'

या परिषदेत बोलताना सौ. मेहेरून्निसा फकी, मिसेस रहमान यांनीही 'शरीयतचा कायदा महिलांवर अन्याय करणारा नाहीच, पण त्यांच्या दृष्टीने अतिशय आवश्यक आहे' असे सांगितले.

याच पद्धतीने नागपूर येथील परिषदेत 'मुस्लीम पर्सनल लॉ हा पवित्र कुराणाचा एक अंतर्गत व अविभाज्य भाग आहे' असा पर्सनल लॉचा पुरस्कार करणारा व त्यात कोणत्याही प्रकारे बदल करण्यास विरोध करणारा ठराव मंजूर करण्यात आला. ही सभा मोमिनपुऱ्यातील मदरसा-ए-इस्लामी नावाच्या शाळेत जमात-ए-इस्लामतर्फे बेगम कबीरा कैफ यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. परिषदेस पुरुष पत्रकारांना मज्जाव करण्यात आला. सभेचे छायाचित्रण करण्यासही मनाई करण्यात आली होती. ही परिषद श्रीमती शफीका बशीरुद्दिन यांनी बोलवली होती. पडदा, बहुपत्नीत्व, मेहर, वारसा पद्धती यांवर महिला व्यक्त झाल्या आणि मुस्लीम पर्सनल लॉमध्ये बदल करण्यास त्यांनी विरोध दर्शविला. त्या म्हणाल्या की, '१४०० वर्षांपासून हा कायदा चालत आलेला असून तो काळाच्या कसोटीवर उतरलेला आहे.' वक्त्यांनी पुण्यास मुस्लीम महिला परिषद भरवल्याबद्दल हमीद दलवाईंवर टीका केली. 'दलवाई इस्लामचे खरेखुरे प्रतिनिधी नाहीत व प्रगतिकारक उपाय आणि दुरुपयोग होण्याची शक्यता असलेले फाजील स्वातंत्र्य यांच्या संबंधी त्यांच्या मनात गोंधळ आहे' अशी टीकाही करण्यात आली. *(नवशक्ती, २३ मार्च १९७२)*

४.१२ ॲड. गाझीयोद्दिन आणि शरीयत–तलाकचा प्रश्न

दि. १६ जानेवारी १९७२ रोजी 'दैनिक संचार, सोलापूर'मधून प्रसिद्ध झालेला 'मुस्लीम महिला परिषद, आव्हान व आवाहन' या शीर्षकाचा प्रा. एफ. एच. बेन्नूर यांचा विचार प्रवर्तक लेख वाचला. काळाच्या प्रवाहात समाजाला योग्य मार्गदर्शन लाभले, याबद्दल समाधान वाटले, परंतु दुःखाची बाब ही की, दैनिक संचारच्या दिनांक २० जानेवारी १९७२च्या अंकात प्रा. बेन्नूर यांच्या लेखाविषयी प्रतिक्रिया व्यक्त करणारे ॲडव्होकेट गाझीयोद्दीन यांचे लोकमत सदरातील पत्रही वाचनात आले. 'कायद्याचे पदवीधर' ही बिरुदावली लावणाऱ्या ॲडव्होकेट महाशयांच्या ज्ञानाची कीव करावीशी वाटते.

'शरीयतचा व तलाकचा' उल्लेख करून पत्रलेखक महाशयांनी एके काळच्या सेवानिवृत्त न्यायाधीशाने दिलेल्या तत्कालीन परिस्थितीजन्य निकालाचा हवाला देऊन हा कायदा आजही तत्त्वनिष्ठ व व्यवहारनिष्ठ असल्याचे भासवून दिले आहे व अशिक्षित–अज्ञानी मुस्लीम समाजाची दिशाभूल करण्याचा निष्फळ प्रयत्न केला आहे.

आजही समाजात उत्क्रांती घडविण्याच्या मार्गात, विशेषतः माणूस व माणुसकीच्या अभ्युदयाच्या प्रयत्नांत एक फार मोठी अडचण म्हणून धर्माच्या नावाखाली राहिलेल्या अनिष्ट रूढी व परंपरा आजच्या विज्ञाननिष्ठ जगाने हेरल्या आहेत. म्हणूनच मानव उद्धाराचे प्रयत्न सर्वच थरातल्या लोकांकडून होत आहेत. दीड हजार वर्षांपूर्वीचा शरीयतचा कायदा समर्थनीय व अपरिवर्तनशील असल्याचा बालिश विचार बाळगणारा कोणी ही बिरुदावली लावून मोठा असल्याचे म्हणत, असेल तर समाजाच्या दृष्टीने तो छोटाच आहे.

तलाक पद्धतीवर ताशेरे ओढणारे विश्वविख्यात मुस्लीम कायदेतज्ज्ञ मुल्ला यांनी लिहिलेला प्रगल्भ विचारसरणीचा ऐतिहासिक लेख व भारताचे माजी सरन्यायाधीश मा. हिदायतुल्लाह खान यांनी संपादित केलेला 'मुस्लीम कायद्याची तत्त्वे' हा इंग्रजी ग्रंथ कायद्याच्या अभ्यासासाठी भारतातील अनेक विद्यापीठांनी स्वीकारला आहे. या ग्रंथातील पान क्रमांक २८६/२८७ यांवर 'तलाक पद्धती सामाजिकदृष्ट्या किती अनिष्ट आहे' याची कारणमीमांसा केली आहे. कायद्याची ही महत्त्वपूर्ण बाब गाझीयोद्दीन ॲडव्होकेटसाहेब यांनी सोयीस्करीत्या लक्षात घेतली नाही. यापेक्षा दुसरे दुर्दैव ते कोणते?

मुस्लिमांच्या संक्रमण काळात मुस्लीम महिलांनी काळाच्या स्वीकारलेल्या आव्हानास भारतीय इतिहासात तोड नाही, हे नम्रपणे निवेदित करणारा आव्हानात्मक लेख प्रा. बेन्नूर यांनी मुस्लीम समाजापुढे ठेवला आहे. व्यक्तिगत व सामाजिक सुधारणेच्या आड येणारास इतिहास कधीच क्षमा करणार नाही. गाझीयोद्दीन ॲडव्होकेटसाहेबांनी हे लक्षात घ्यावे.

– मोहम्मद हनीफ तांबोळी, राजअहमद शेख, सोलापूर. *(लोकमत, २१ जानेवारी १९७२, प्रतिसाद)*

४.१३ मुस्लीम सत्यशोधकाच्या घरावर हल्ला

(दैनिक तरुण भारत, नागपूर २४-०४-१९७२, बातमी)

मुस्लीम सत्यशोधक समाज आणि यंग मुस्लीम सोशल असोसिएशन, अमरावती येथील पुरोगामी संघटनांच्या कार्यकर्त्यांचा स्थानिक मुस्लीम बांधवांकडून सारखा छळ सुरू असून अलीकडेच समाजाचे कार्यकर्ते मोहम्मद अली यांची पत्नी, त्यांचा सहा वर्षे वयाचा मुलगा आणि वृद्ध माता यांना घरात घुसून बेदम मारहाण करण्याचा प्रकार छायानगरात घडून आला. छायानगर विभागात नझुलच्या मोहम्मद अली यांचे घर असलेल्या जागेवर ताबा सांगणारे शब्बीर टेलर आणि त्यांचे साथीदार यांनी ही मारहाण केल्याची तक्रार नागपुरी गेट पोलीस ठाण्यात करण्यात आलेली आहे. वरील घटना घडली, त्या वेळी मोहम्मद अली व त्यांचे अपंग वडील घरी नव्हते. वरवर पाहता, जागेच्या ताब्याबद्दल दहशतीचा हा प्रकार घडला असल्याचे दिसत असले, तरी मोहम्मद अली यांचे पुरोगामी संघटनांशी असलेले संबंध फोडून काढण्यासाठीच शब्बीर टेलर यांनी कायदा हाती घेतला, असा संबंधित संघटनांचा दावा आहे. असे कळते की, मोहम्मद अली छायानगरी विभागात नझुलच्या जागेवर आपली झोपडी उभारून गेल्या तीन वर्षांपासून राहत आहेत. या जागेवर शब्बीर टेलर मालकी सांगतात. या प्रकारामुळे कुटुंब दहशतीच्या छायेत आहे. हा प्रसंग त्यांच्यावर का आला? याची चौकशी करता समजले की, मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि यंग मुस्लीम सोशल असोसिएशनचे मोहम्मद अली १ जानेवारी १९७२ रोजी सदस्य झाल्यानंतर गेल्या दीड महिन्यापासून अमरावती शहरातील काही मुस्लीम पुढाऱ्यांनी त्यांना या संघटनांपासून दूर करण्याचा प्रयत्न चालविला होता. तो फसल्यामुळेच विरोधकांनी असा हल्ला आणि मारहाण केली. हा प्रकार पूर्वनियोजित आणि आदल्या दिवशीच रात्री रचल्याचे समोर आले. पोलिसांनी गुन्हा दाखल केला, मात्र कोणालाही अटक केली नाही. मुस्लीम सत्यशोधक आणि यंग मुस्लीम सोशल असोसिएशनचे कार्यकर्ते वजीर पटेल आणि मोहम्मद अय्युब यांनी या प्रकरणाचा निषेध केला आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या विचारांना पाठिंबा दिला म्हणून अमरावतीच्या मुस्लिमांनी त्यांना २० एप्रिल रोजी घराबाहेर हुसकून लावले होते.

४.१४ जमात-ए-इस्लामी, मुस्लीम लीग आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांत फरक नाही!

(लोकमत, ४ सप्टेंबर १९७२, प्रतिसाद)

'मुस्लीम सत्यशोधक मंडळाने समान नागरी कायद्याचा पुरस्कार आणि मागणी केल्याच्या पार्श्वभूमीवर वातावरण तापलेले असतानाच 'ऑर्गनायझर' या साप्ताहिकास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांनी दिलेल्या मुलाखतीत समान नागरी कायद्याला विरोध केलेला आहे. भारताची राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही, धर्मनिरपेक्षता यासाठी झुंझणाऱ्या पुरोगामी मुस्लीम कार्यकर्त्यांवर, मुस्लीम समाजातील राष्ट्रवादी लोकशाहीनिष्ठ शक्तींवर हा फार मोठा आघात आहे.' असे विचार मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या विदर्भ विभागाचे प्रमुख शेख वजीर पटेल यांनी लोकमतला दिलेल्या खास मुलाखतीत व्यक्त केले. पटेल पुढे म्हणाले, 'गुरुजींनी समान नागरी कायद्याला विरोध करून भारतीय जनतेला हे पटवून दिले आहे की, जमाते-इस्लामी, मुस्लीम लीग इत्यादी जातीय मुस्लीम संघटना आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांत कोणताही फरक नाही. हिंदू व मुस्लीम जातीयवाद्यांचे रंग वेगळे असले, तरी त्यांचा आवाज एकच आहे; मूळ वैचारिक बैठक अभिन्न आहे. समान नागरी कायद्याला विरोध करून गोळवलकर गुरुजींनी भारतातील जातीय व फुटीर मुस्लीम जातीयवादी शक्तीचे हात बळकट केलेले आहेत.' 'जमाते-इस्लामीसुद्धा समान नागरी कायद्याला कडवा विरोध करत आहे' असे सांगून पटेल म्हणाले, 'मुस्लीम समाजातील पुरोगामी विचारसरणीच्या लोकांना गेल्या काही वर्षांपासून वाटणारी भीती अखेर खरी ठरली आहे.' 'जमात-ए-इस्लामी व मुस्लीम लीगच्या आवाजात आवाज मिसळून राष्ट्रीय स्वयंसेवक संघही समान नागरी कायद्याला विरोध करीत आहे' हे म्हणणे पटवून देण्यासाठी वजीर पटेल म्हणाले, 'जगाचा इतिहास साक्ष देतो की, कोणत्याही देशातील प्रतिगामी शक्तींचा सामाजिक परिवर्तनाला नेहमीच विरोध असतो. अस्पृश्यांना गळ्यात थुंकण्यासाठी मडके बांधून रस्त्यावर हिंडण्यास भाग पाडणाऱ्या वर्णव्यवस्थेस पाठिंबा देणाऱ्या गुरुजींनी समान नागरी कायद्याचा जन्म होण्यापूर्वीच जमाते-इस्लामी व मुस्लीम लीगच्या खांद्याला खांदा लावून समान नागरी कायद्याला विरोध करण्याला प्रारंभ केलेला आहे. गुरुजींच्या या मुलाखतीची सर्व पुरोगामी विचारांच्या पक्षांनी आणि व्यक्तींनी गंभीरपणे दखल घेतली पाहिजे. प्रश्न केवळ समान नागरी कायद्याचा नसून 'भारतात पुरोगामी विचार जिवंत राहू शकेल काय?' असा आहे. गुरुजींची ही मुलाखत म्हणजे भारतातील पुरोगामी शक्तींचा नायनाट करण्यासाठी सर्व प्रतिगामी व जातीय शक्तींचा एका समान पातळीवर संयुक्त मोर्चा बनत असल्याचा पुरावा आहे.'

'समान नागरी कायद्याला गुरुजींनी विरोध केल्यामुळे भारतातील मुस्लीम समाजावर काय परिणाम होणार आहे?' असा प्रश्न पत्रकाराने वजीर पटेलांना विचारला असता, ते म्हणाले की, 'गुरुजींनी ही मुलाखत देऊन भारतातील मुस्लीम समाजातील पुरोगामी व राष्ट्रवादी विचारसरणीच्या

लोकांची स्थिती अत्यंत दयनीय करून सोडलेली आहे. १९७२ साली, स्वातंत्र्याला २५ वर्षे पूर्ण झाली तरी आजही भारतातील दरिद्री व अडाणी मुस्लीम समाज मध्ययुगीन मुस्लीम वैभवाच्या कल्पना, मुल्लामौलवी आणि इरसाल संधिसाधू, स्वार्थी व जातीय पुढारी यांच्या कचाट्यातून सुटलेला नाही. हिंदू समाजासारखी राजकीय जागृती व नवी सामाजिक जाणीव ह्या समाजात अजूनही रुजलेली नाही. राजकीय व सामाजिक क्षेत्रात आम्ही मुसलमान १०० वर्षे मागे आहोत. त्यात आमच्यासारख्या काही नव्या विचाराच्या कार्यकर्त्यांनी मुस्लिमांच्या हितासाठी व राष्ट्रीय एकात्मतेसाठी समान नागरी कायदा करवून घेण्यासाठी थोडीबहुत धडपड केली, तर आमच्यावर 'काफिर', 'गद्दार' आणि 'हिंदू' असा शिक्का मारण्यात येऊन 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जनसंघ यांचे एजंट' म्हणून शिव्यांचा वर्षाव होतो.

४.१५ हरिजन अत्याचाराविरुद्ध युवकांनी झगडा दिला पाहिजे

२६ सप्टेंबर १९७२ रोजी आर्ट्स व कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर येथे हमीद दलवाई यांच्याशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या संवादाप्रसंगी झालेल्या चर्चेत कॉलेजचे विद्यार्थी, प्राध्यापक आणि शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. प्राचार्य एस. एस. घोसले यांनी प्रास्ताविक केले आणि हमीद दलवाई यांचा परिचय करून दिला. प्रा. होली उसुर यांनी 'दलवाई लिखित 'इंधन' या कादंबरीवर मोठी टीका करण्यात आली असल्याचे सांगून या टीकेचा उद्देश काय होता?' असा प्रश्न दलवाईंना विचारला. तेव्हा दलवाई म्हणाले, 'माझे धार्मिक विचार ज्यांना अमान्य आहेत, त्यांनी मुद्दाम धूळ उडविली. यात धर्मविचारापेक्षा राजकीय खूळच खूप आहे.' या प्रसंगी 'मुस्लीम सत्यशोधक चळवळीचे ध्येय काय?' असा प्रश्न विचारला असता, त्यास उत्तर देताना दलवाई म्हणाले, 'मुस्लीम व बिगर मुस्लीम यांना एका पातळीवर आणणे आणि मुस्लीम समाज बदलणे, हे प्रमुख ध्येय आहे.' 'मुस्लिमांच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता, पुढे हा देश संपूर्ण मुसलमान होईल काय?' या प्रश्नावर बोलताना दलवाई म्हणाले, 'या विषयी जनगणनेचा अहवाल प्रमाण धरता, एकूण लोकसंख्येच्या मानाने मुस्लिमांची लोकसंख्या वाढत नसून घटत असल्याचे दिसते.' 'हिंदू धर्म की मनुस्मृती?' असा प्रश्न कॉलेजचे विद्यार्थी एस. बी. कांबळे यांनी उपस्थित केल्यावर दलवाई म्हणाले, 'स्मृती बदलत असतात म्हणून हिंदूंसाठी त्या प्रमाण नाहीत. 'धर्म' ही बाब हिंदू लोक व्यक्तिगत बाब मानतात.' हरिजन अत्याचाराबाबत कांबळे यांनी पुढे उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना दलवाई म्हणाले, 'हरिजन अत्याचाराबाबत सरकारवर पूर्णतः विसंबून राहता येणार नाही, कारण लोकशाही राज्यात प्रत्येकाला झगडण्याचा हक्क आहे. यासाठी प्रत्येक सुशिक्षित दलित तरुणाने खेड्यात जाऊन सत्याग्रह केला पाहिजे. प्रसंगी मारामारी करूनही आपले हक्क मिळविले पाहिजेत. कामगार ज्याप्रमाणे रस्त्यावर येऊन आपले प्रश्न सोडविण्यास तयार असतो, त्याप्रमाणे युवकांनी अत्याचाराविरोधात आघाडी उघडली पाहिजे.' दलित विद्यार्थी सरकारी सवलतीचा पुरेपूर फायदा घेत नाहीत, या आरोपात्मक प्रश्नाचा दलवाई यांनी इन्कार केला. 'स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे झाली, तरी मुस्लीम व हिंदू समाजात फारसा बदल झाला नाही. याला चालू शासनव्यवस्था जबाबदार नाही का?' या प्रश्नाला उत्तर देताना दलवाई म्हणाले, 'निवडून गेलेले पुढारी जनतेप्रमाणेच करत आहेत. आपणच आपले प्रश्न सोडविले पाहिजेत.' *(दैनिक समाज, कोल्हापूर, २७ सप्टेंबर १९७२)*

४.१६ कायद्यातील बदलास विरोध करण्यासाठी परिषद

'ईश्वरनिर्मित मुस्लीम कायद्यात बदल करण्याचा कोणालाही अधिकार नाही, असे बजावून सांगण्यासाठी भारतातील उच्च वर्गीय आणि सुशिक्षित मुसलमान प्रतिनिधींची व धर्मगुरूंची दोन दिवसांची परिषद भायखळा येथील महाराष्ट्र कॉलेजच्या सभागृहात भरणार असल्याचे या परिषदेच्या स्वागत समितीचे चिटणीस यूसुफ पटेल यांनी पत्रकारांना सांगितले. 'ही परिषद वृत्त प्रतिनिधींना खुली असणार नाही' असे हाफिजखाँ यांनी सांगितले. परिषदेतील चर्चा खुल्या व निर्भीड वातावरणात व्हावी म्हणून ती 'दारबंद' ठेवण्यात आली असल्याचे सांगून पुढे ते म्हणाले की, 'परिषदेत झालेल्या चर्चेची माहिती वृत्तप्रतिनिधींना अधिकृतपणे देण्यात येईल. उत्तर प्रदेशातील देवबंद स्कूलचे मौलाना कारी मोहम्मद तय्यब साहेब या परिषदेचे अध्यक्ष आहेत.' 'भारतातील मुसलमानांच्या इतिहासातील एक अत्यंत महान घटना' असे या परिषदेचे वर्णन करून यूसुफ पटेल म्हणाले : 'सुशिक्षित मुस्लीम समाज समान नागरी कायद्याच्या बाजूला असून तो 'मुस्लीम कायद्यात परिवर्तन झाले पाहिजे' या मताचा आहे, असे भासावण्याचा पद्धतशीर प्रयत्न काही हितसंबंधीयांकडून केला जातो. त्याला उत्तर म्हणून ही परिषद आहे. कुराणप्रणित मुस्लीम कायदा अपरिवर्तनीय असून त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता नाही. याच मताचे समर्थन सारे मुसलमान करतात, हे दाखवून देण्यासाठी ही अखिल भारतीय परिषद आहे. 'समान नागरी कायद्याचा पुरस्कार करून मुस्लीम कायद्यात परिवर्तन करावे, असे म्हणणारे मुसलमान 'अति अति अति अल्प' आहेत. सात कोटी मुसलमानात त्यांना सूक्ष्म दुर्बिणीनेच शोधावे लागेल.

'या परिषदेत मुसलमान समाजातील सर्व पंथोपंथ म्हणजे शिया, सुन्नी इत्यादी सहभागी झाले असून सर्वच राजकीय पक्षांतील कार्यकर्ते व इतर धार्मिक संघटनांतील नेते मुस्लीम कायद्याच्या रक्षणासाठी एकत्र येणार आहेत.' स्वतः यूसुफ पटेल समाजवादी विचारसरणीचे होते. मुस्तफा फकीर व काँग्रेसचे हाफिजखाँ पत्रकारांशी बोलताना उपस्थित होते. जमात-ए-इस्लामीचे नेते मौलाना मोहम्मद यूसुफ यांनीही वार्ताहारांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

'पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी मुसलमानांच्या व्यक्तिगत कायद्यात सरकार ढवळाढवळ करणार नाही, असे घोषित केले आहे. मात्र मुसलमानांनी या संबंधी धोरण ठरवावे, चर्चा करावी असे सुचविले आहे' असे सांगून या परिषदेच्या पत्रकात म्हटले आहे की, ' 'मुसलमानांना त्यांच्या देवप्रणित व्यक्तिगत कायद्यात बदल नको आहे' ही भावना निःसंदिग्धपणे स्पष्ट व्हावी म्हणूनच ही परिषद भरविण्यात येत आहे.'

'इतर मुसलमान देशांतही मुस्लिमांच्या व्यक्तिगत कायद्यात बदल झाला असताना भारतातही तो होऊ नये असे आपले मत आहे का?' असे विचारले, तेव्हा इस्लामीचे मौलाना यूसुफ म्हणाले की, 'व्यक्तिगत कायद्यात कोठे परिवर्तन झाले, असे म्हणणे चूक आहे. तुर्कस्तानचा अपवाद वगळता सांगण्यात येणारे बदल हे बदल नाहीतच. मुस्लीम कायद्यात असलेल्या पाटभेदांतील

एक पाट सोडून दुसरा पाट त्यांनी स्वीकारला आहे. हा एक मुद्दा करायचा असेल, तर त्यांनी जरूर करावा, पण तेच साऱ्या मुसलमानांचे मत असल्याचा आभास त्यांनी निर्माण करू नये.'

'मुस्लीम महिलांची या प्रश्नाबद्दल काय भूमिका आहे? या परिषदेत त्या भाग घेणार आहेत काय?' असे विचारता मुस्तफा फकीर म्हणाले, 'मुस्लीम स्त्रिया या परिषदेत भाग घेणार नाहीत, पण त्यांनी परिषदेच्या भूमिकेला पाठिंबा देणारी स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे.'

'अनेक मुस्लीम आमदार व खासदार या परिषदेचे समर्थक आहेत' असेही या प्रसंगी सांगण्यात आले. 'दुसरी गोष्ट, अखेरीस ते मुस्लीम बहुसंख्य देश आहेत. ते बदल करू शकतात व पुन्हा अनुभवान्ति फेरबदलही करू शकतात; भारतात तसे होणार नाही.' मौलाना साहेब पुढे म्हणाले, 'भारतातील संसदेत मुस्लीम अल्पसंख्य असल्याने एकतर या संसदेने मुस्लीम कायद्यात बदल करणे म्हणजे बिगर मुसलमानांनी मुस्लीम कायद्यात हस्तक्षेप करण्यासारखे होते. दुसरे म्हणजे, या बदलात मुस्लीम पुन्हा बदल करू शकणार नाहीत.' घटनेत समान नागरी कायद्याचे मार्गदर्शक तत्त्व आहे. त्या संबंधी विचारले, तेव्हा हाफीजखाँ म्हणाले, 'घटनेत विसंगती आहे. एका कलमाने धर्मस्वातंत्र्य दिले आहे, तर दुसऱ्या कलमाने समान नागरी कायद्याचा पुरस्कार केला आहे. ही विसंगती 'कोणते कलम श्रेष्ठ' याचा निवाडा झाल्याशिवाय संपणार नाही.' मुस्तफा फकीर म्हणाले, 'मला तशी विसंगती वाटत नाही. मार्गदर्शक तत्त्वांत 'शासनाने प्रयत्न करावेत' असे म्हटले आहे. या प्रयत्नांत लोकमत जागृतीही आली. तसे प्रयत्न करण्यास आम्हा मुसलमानांचा विरोध नाही. ज्यांना समान नागरी कायद्याचा प्रचार करायचा आहे, त्यांनी जरूर करावा, पण मुस्लीम समाज त्याला पाठिंबा देणार नाही, हे ठामपणे सांगण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.' या परिषदेचा सविस्तर तपशील उर्दू भाषक वर्तमानपत्रांतून मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झाला. त्यांत 'व्यक्तिगत कायद्यात बदल घडवून आणण्याचा हक्क या समाजातील मुस्लीम धर्मीय उलेमांना आहे आणि व्यक्तिगत कायद्याच्या समर्थनार्थ होणारे वाद आणि विवाद संपवून टाकण्याची आमची भूमिका आहे' असे मत मांडण्यात आले. *(महाराष्ट्र टाइम्स, २६ डिसेंबर १९७२)*

परिषदेचा अहवाल

'मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात बदल करू देणार नाही' हा निर्धार व्यक्त करण्यासाठी सुशिक्षित आणि धर्मगुरू मुस्लीम यांची मुंबई येथे परिषद आयोजित करण्यात आली होती. 'शरीयतने दिलेल्या मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात बदल करण्याची मुळीच आवश्यकता नाही' असे प्रतिपादन सुरतच्या अल-जमियातुस्स सैफियाचे (अरेबिक अकॅडमी) डायरेक्टर डॉ. वाय. नजमुद्दिन यांनी केले. 'शरीयतने दिलेला हा व्यक्तिगत कायदा अनुकरण करण्याजोगा आहे' असेही ते म्हणाले. भारतातील बुद्धिजीवी व सुशिक्षित मुसलमान प्रतिनिधींची व धर्मगुरूंची दोन दिवसांची ही परिषद भायखळा येथील महाराष्ट्र कॉलेजच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी उद्घाटनाचे भाषण करताना डॉ. नजमुद्दीन बोलत होते. ही परिषद पत्रकारांना खुली नव्हती. डॉ. नजमुद्दीन यांच्या उर्दू भाषणाचे इंग्रजी भाषांतर वार्ताहारांना देण्यात आले होते.

'अल्पसंख्याकांना, विशेषतः मुस्लिमांना धार्मिक किंवा शरीयतच्या बाबतीत बदल हवा असेल, तरच केंद्र सरकार तो करेल. एरवी सरकार त्यात ढवळाढवळ करणार नाही.' या सरकारच्या भूमिकेचे डॉ. नजमुद्दिन यांनी स्वागत केले. ते म्हणाले, 'आम्ही या सरकारी धोरणाला पाठिंबा देतो. याहून अधिक आम्हाला काही नको.' 'मुस्लीम समाजाच्या मागासलेपणास व्यक्तिगत कायदा जबाबदार नाही' असेही ते म्हणाले.

'मुस्लीम व्यक्तिगत कायदा म्हणजे काय?' असा सवाल उपस्थित करून ते म्हणाले ''व्यक्तिगत' शब्दाची कल्पना पाश्चात्त्य आहे. व्यक्तीला त्याच्या धार्मिक बंधनातून मुक्त करण्यासाठी पंधराव्या व सोळाव्या शतकात, युरोपात, औद्योगिक युगात हा शब्द वापरला गेला. दीन (इस्लामचे प्रेषितांनी केलेले वर्णन) ही काही केवळ व्यक्तिगत बाब नव्हे, तर ती सामाजिक बाब आहे. 'मुस्लीम व्यक्तिगत कायदा' ही संज्ञाच 'मुस्लिमांचे स्वतःचे धार्मिक कायदे आहेत' हे दर्शविते. कोणा एका व्यक्तीसाठी हा कायदा बनविण्यात आला नसून तो समाजासाठी आहे. या कायद्याचा सखोल अभ्यास केला, तर असे ध्यानात येईल की, शरीयतमध्ये मार्गदर्शन नाही, अशी एकही सामाजिक कृती नाही.' ते पुढे म्हणाले, 'शरीयत कायद्यात बदलाची गरज नाही. प्रेषितांचा 'दीन' हा निसर्गाशी मेळ असलेला आहे. मुक्त समाज व सनातनी समाज यांच्यातील असलेला मध्यम व योग्य मार्ग शरीयतने दाखविला आहे. शरीयतने निश्चित केलेले कायदे त्यांच्या शिष्यांना प्राणाहून प्रिय आहेत.'

'रशिया व चीन यांच्यात बदल व सुधार या कल्पनांबाबत चर्चा व मतभेद होत आहेत.' असे सांगून ते म्हणाले, 'आपण शरीयतचे लोक फार पूर्वीच या टप्प्यातून गेलो आहोत. शास्त्राज्ञा व व्यवहार हातात हात घालून जातात, असे आपण मानतो. सध्या काहींना मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात बदल हवा आहे. अशा लोकांनी शरीयतचा आंतरबाह्य, सर्वांगीण अभ्यास केला आहे काय, त्याचा अर्थ समजावून घेतला आहे काय, अरबी भाषा व साहित्य आणि इस्लामचा आत्मा समजून घेतला आहे का' हे पहिले पाहिजे. असे सांगून डॉ. नजमुद्दीन म्हणाले, ' 'व्यक्तिगत कायद्यात बदल' हवा अशी मागणी करणाऱ्यांनी शरीयत मुळातून अभ्यासलेला नाही. तसा अभ्यास करण्याची त्यांनी पर्वाही बाळगली नाही. ख्रिश्चनांनी केलेले भाषांतर काय ते त्यांनी वाचले आहे. या कायद्यात बदल करण्याचा आग्रह धरणाऱ्यांच्या विधानातील पोकळपणा उघड करण्याने या अधिवेशनाचे उद्दिष्ट साध्य होईल.'

या अधिवेशनाचे अध्यक्ष उत्तर प्रदेशातील, देवबंद येथील, दारुल उलुमचे रेक्टर मौलाना कारी मोहम्मद तय्यब साहेब होते. अधिवेशनास अखिल भारतातून २०० प्रतिनिधी आले होते. स्वागत समितीचे अध्यक्ष मोहम्मद यूसुफ पटेल यांनी प्रतिनिधींचे स्वागत केले.

झुला मैदानावर रात्री खुले अधिवेशन झाले. 'मुसलमान प्राण देईल पण व्यक्तिगत कायद्यात बदल होऊ देणार नाही' असे या प्रचंड सभेत अनेक वक्त्यांनी ठासून सांगितले. सभेत हजारो मुस्लीम हजर होते, भव्य रोषणाई केली होती व विशाल व्यासपीठ उभारण्यात आले होते. त्यावर सुमारे १०० नेते बसले होते.

'मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात बदल नको' म्हणणाऱ्या या परिषदेची माहिती मुस्लीम

सत्यशोधक मंडळास मिळाली. त्यानुसार मुंबईत अखिल भारतीय मुस्लीम परिषदेसमोर समान नागरी कायद्यासाठी निदर्शने करण्याचा निर्णय मुस्लीम सत्यशोधक मंडळाने घेतला व हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली संध्याकाळी निदर्शने करण्याचे निश्चित झाले. निदर्शनात युवक क्रांती दलही सहभागी होणार असल्याचे युक्रांदचे कार्यकर्ते हुसेन दलवाई व विलास कारखानीस यांनी सांगितले. या निदर्शनात दलवाईंसोबत सय्यदभाई, श्रीमती नजमा शेख व मंडळाचे कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचे सांगितले. निदर्शक बॉम्बे सेंट्रल एस. टी. स्टँडपासून संध्याकाळी ५:१५ वाजता महाराष्ट्र कॉलेजकडे (अलेक्झांडर चित्रपट गृहासमोर) मिरवणूक काढून जाणार असल्याचे ठरले. 'ही निदर्शने शांततेने व शिस्तीने होणार असून ती प्रतीकात्मक असणार आहेत. सर्वच सुशिक्षित मुस्लीम अशिक्षित नाहीत, हे दाखविण्याकरिताच ही निदर्शने आहेत' असे दलवाई यांनी सांगितले. 'समान नागरी कायदा सरकारने तावडतोब करावा' असे आग्रहपूर्वक सांगून हमीद दलवाई म्हणाले, 'सामाजिक प्रगतीचे कायदे करताना जनमत आजमावयाचे नसते. यापूर्वी झालेल्या सामाजिक कायद्यांच्या वेळीही कधीही जनमत आजमावले गेले नव्हते. मुस्लीम जनमत समान नागरी कायद्याला अनुकूल होऊ लागले असून त्यावर दबाव आणण्यासाठी मुस्लिमांनी ही परिषद घेतली आहे' असेही दलवाई म्हणाले. निदर्शनात हेमंत गोखले, विजय नाईक, हुसेन दलवाई, शमा पंडित, विकास खासनिस, शांताराम पन्हेरे, जगदीश देशपांडे, माधव साठे, विनय पंडित आणि मंडळाचे कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचे सांगितले गेले.

व्यक्तिगत कायद्यातील सुधारणेला विरोध करणारी ही परिषद समाजाची दिशाभूल करणारी असल्याने आणि या संदर्भात धर्मनिरपेक्ष पद्धतीने लोकशिक्षण व्हावे, यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाने हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखाली, परिषदेच्या समोरच समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी निदर्शने केली. यावर सामाजिक सुधारणाविरोधी धर्मनिष्ठ मुस्लिमांनी दगडफेक केली. त्यात बरेच कार्यकर्ते आणि निदर्शक, तसे चगुप्त वेषातील एक पोलीस हवालदार जखमी झाला. दगडफेक करणाऱ्या जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. त्यात काही जण जखमी झाले. रात्रभर या भागात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मुस्लीम लीगचे आमदार झिया-ऊल बुखारी यांनी नंतर वार्ताहारांना सांगितले की, आपल्याला लाठीचा किरकोळ प्रसाद मिळाला, पण एकंदरीत पोलीस अत्यंत संयमाने वागले. मुस्लीम सत्यशोधक मंडळ व युक्रांदचे कार्यकर्ते महाराष्ट्र कॉलेजकडे मोर्चा घेऊन निदर्शने करण्यासाठी निघाले होते. यात हमीद दलवाई, अब्दुल कादर मुकादम, सय्यद मेहबूब, यदुनाथ थत्ते, श्रीमती मेहेरून्निसा दलवाई, नजमा शेख, सलमा शेख, शमा पंडित, रेखा नाईक, संध्या नाईक, जगदीश देशपांडे, विनायक पंडित, माधव साठे, डॉ. रत्नाकर महाजन, गिरीश नार्वेकर, हिरालाल सोनावणे, हुसेन दलवाई, गोपाल दुखंडे, मधुभाई पंडित, सदानंद थत्ते, कमलाकर सुभेदार अशा २५ हून अधिक निदर्शकांनी भाग घेतला होता.

समान नागरी कायद्याची सातत्याने मागणी करणारे हमीद दलवाई मुस्लीमबहुल वस्तीत प्रथमच येणार होते. साहजिकच त्यांना पाहण्यासाठी समान नागरी कायद्याला विरोध करणारे

शेकडो मुस्लीम जमा झाले होते. हमीद दलवाई आले, तेव्हा 'निदर्शकांपैकी हमीद दलवाई नेमके कोणते?' अशी विचारणा प्रत्येक जण करीत होते. तसेच दलवाई यांच्या बद्दल औत्सुक्य व्यक्त करत होते.

'समान नागरी कायदा झालाच पाहिजे... मुस्लीम स्त्रियांना स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे... जबानी तलाक बंद करा... पुरुषप्रधान संस्कृती नष्ट करा... औरतों की स्वतंत्रता जिंदाबाद! शरीयत क्या है? – औरतों की गुलामी है! हम मुसलमानों के खिलाफ नही... फिरकापरस्ती के खिलाफ है' अशा घोषणा निदर्शकांनी सुरू केल्या. या घोषणा चालू असताना निदर्शन-विरोधी लोक जमले आणि प्रतिघोषणा देऊ लागले. त्यामुळे सुरुवातीलाच घोषणा युद्ध सुरू झाले. 'हमीद दलवाई जिंदाबाद', 'हमीद दलवाई मुर्दाबाद', 'हमीद दलवाई काफिर है' या घोषणांचे चांगलेच युद्ध चालू होते. चक्क उभय बाजूने घोषणा-प्रतिघोषणा चालू होत्या. निदर्शन-विरोधी लोक निदर्शकांच्या मोर्च्याला सुरुवातीलाच भिडले आणि मुठी दाखवून, हातवारे करून निदर्शकांना अडवू लागले. त्यामुळे मोर्चा पुढे सरकू शकला नाही. तोपर्यंत पोलिसांनी काही हस्तक्षेप केला नाही; पोलीस लांबवर उभे होते. मुंगीच्या गतीने निदर्शक मोर्चेवाले काही पाऊले पुढे सरकले आणि एक पोलीस अधिकारी पुढे आला. या पोलीस अधिकाऱ्याने निदर्शन-विरोधकांना अडवून मोर्चेवाल्यांना मोर्चा पुढे नेण्यासाठी परवानगी देण्याची विनंती केली. त्यानुसार निदर्शन-विरोधक थोडे थोडे मागे सरकू लागले. तरीपण निघालेल्या ठिकाणापासून दलवाई यांचा मोर्चा शंभर पाऊले पुढे गेला असेल-नसेल, तोच दहा विरोधक रस्त्यात आडवे झोपले, 'आमच्या प्रेतावरून तुम्हाला पुढे जावे लागेल' अशा आशयाच्या घोषणा ते मुठी वळून देत होते. पण हा प्रकार फार वेळ चालला नाही. झोपलेले लोक उठले आणि निदर्शन-विरोधी लोक बेस्ट डेपोपर्यंत मागे सरकले. मोर्चा निघालेल्या जागेपासून हे ठिकाण अर्धा फर्लांगाहून जास्त नसावे. मात्र तेथे गेल्यावर निदर्शन-विरोधकांचा जमाव ७००-८००च्या आसपास झाला आणि ते मागे हटत नव्हते. वातावरण तंग झाले. नंतर मोर्चा निघाल्यापासून अर्ध्या तासाने विरोधकांनी निदर्शकांना घेरण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी पोलिसांनी व्हॅन्स आडव्या घालून निदर्शकांना विरोधकांपासून अलग पाडण्याचा शिताफीने प्रयत्न केला. तरी काही विरोधकांनी निदर्शकांत घुसून कापडी फलक ओढला. तो फलक धरणाऱ्याने तीव्र प्रतिकार केला, तेव्हा त्याला खेचून विरोधक जास्त असलेल्या ठिकाणी नेले आणि त्याचा फलक काढून घेतला. दरम्यान दलवाई आणि कार्यकर्ते यांना पोलिसांनी स्वतःच्या व्हॅनमध्ये बसवले व सुरक्षित स्थळी नेले. ते गाडीत बसत असतानाच दगडफेकीस सुरुवात झाली. काही मिनटांत दगडांचा खच पडला, चपलांचा वर्षाव झाला. काही लोक खिशातून दगड काढून फेकत होते; बाजूला रस्तादुरुस्तीचे काम चालू होते. तेथील दगडांचा सर्रास उपयोग करण्यात आला. नंतर निदर्शकांना पांगवण्यासाठी गुंडगिरी-विरोधी पोलीस पथकाने लाठीमार केला. विरोधकांना पोलिसांनी बेस्ट डेपोसमोरच्या गल्लीत पिटाळून लावले. तत्कालीन पोलीस उपायुक्त रिबेरो यांना या दंगलीसंबंधी विचारले असता ते म्हणाले, 'दलवाई यांना मोर्चा काढण्याचा हक्क आहे. 'मुस्लीम परिषद चालू असलेल्या ठिकाणापासून १०० मीटर अंतराबर तो अडविण्यात येईल' असे मुस्लीम परिषदेच्या संघटकांना सांगण्यात आले होते. आमदार

जियाउद्दीन बुखारी यांनी हे मान्य केले होते व मोर्च्याला विरोध करणार नाही, असे सांगितले होते, पण त्यांनी शब्द पाळला नाही आणि सुरुवातीसच मोर्चा अडविण्यात आला. दगडफेक झाली, तेव्हा किमान पोलीसबळ वापरून, लाठीमार करून विरोधकांना पांगविण्यात आले.' या प्रकरणासंबंधी हमीद दलवाई यांना विचारले असता ते म्हणाले : 'व्यक्तिगत कायदा बदलून समान नागरी कायदा करण्याची मागणी करण्यासाठी आम्ही प्रतीकात्मक निदर्शने केली. आम्हाला मुस्लीम परिषदेला निवेदन द्यायचे होते, पण सुरुवातीपासून विरोधकांनी प्रतिघोषणा दिल्या, आम्हाला मारहाण केली, गराडा घातला, आमचे फलक फाडले, आमच्यावर दगड, चपला व सोडा वॉटरच्या बॉटलच्या बाटल्या फेकल्या. पोलिसांनी आम्हाला संरक्षण देऊन नागपाडा पोलीस ठाण्यात आणले. त्यामुळे आम्हाला निवेदन देता आले नाही. पण अशा हिंसक कारवायांमुळे आम्ही आमच्या ध्येयापासून तसूभरही मागे हटणार नाही. विचाराने अल्पसंख्य असलेल्या मुसलमानांवर विचाराने बहुसंख्य असलेल्या मुसलमानांनी आज दगड फेकले, तर बहुसंख्य असलेल्या हिंदूंनी अल्पसंख्य असलेल्या मुसलमानांवर दगडफेक केली, तर मुसलमान समाज कोणत्या तोंडाने हिंदूंचा निषेध करणार? आपण निधर्मी राज्यात राहतो. येथे सर्व धर्माच्या व जातीच्या लोकांना समान कायदे असेल पाहिजेत, हे मुसलमानांनी लक्षात घेतले पाहिजे. राजकीय उद्दिष्ट साध्य करण्याचे बॅरिस्टर मोहम्मद अली जिना यांचे तंत्र मुसलमानांनी अजून सोडलेले नाही, हेच आज सिद्ध झाले. आजची घटना त्याचाच पुरावा आहे. मोर्च्यावरील दगडफेकीमुळे मी मुळीच निराश झालेलो नाही. उलट माझे कार्य मी आणखीन जोमाने पुढे चालू ठेवणार आहे.' हिंसक झालेली परिस्थिती पोलिसांनी संयमाने हाताळल्याबद्दल दलवाईंनी समाधान व्यक्त केले.

आमदार झियाउद्दीन बुखारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, 'हा मोर्चा येणार, हे पोलिसांना माहीत होते. मुस्लीम परिषदेवर मोर्चा येऊ देणे, हे लोकशाही विरोधी आहे. लोकांची मनोभूमिका पाहून पोलिसांनी मोर्च्याला परत जावयास सांगणे आवश्यक होते. या मोर्च्यामुळे मुसलमानांच्या धर्मभावनांना धक्का पोहोचला आहे.' आमदार बुखारी पुढे म्हणाले की, 'मी घटनास्थळास भेट दिली व मी आमदार असल्याचे पोलिसांस सांगितले, तरीही एका पोलिसाने माझ्यावर लाठीहल्ला केला. हा मार लागला, त्याचे दुःख नाही; धर्मासाठी प्राण गेला तरी चालेल. बिगर मुस्लीम समाजात लोकप्रियता मिळविण्यासाठी दलवाईंचे चाललेले हे धंदे योग्य नव्हेत. त्याचा काहीही परिणाम मुस्लीम जमातीवर होणार नाही.' याच परिषदेचे दुसरे नेते आमदार बनातवाला म्हणाले, 'मोर्चा आणणे हे हमीद दलवाईंचे लोकशाही विरोधी, फॅसिस्ट वृत्तीचे कृत्य आहे. त्याचा निषेध केला पाहिजे. समान नागरी कायद्यासंबंधी मुस्लिमांचे मत आजमावण्याची भाषा सरकारकडून होत असताना अशा तऱ्हेचा मोर्चा आणला गेला, यात कोणाचा तरी हात आहे.' दिल्लीचे मुफ्ती झिया-ऊल हक हे वृत्तपत्राचे संपादक या परिषदेत प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. ते म्हणाले की, 'या मोर्च्यामागे महाराष्ट्र सरकारचाच हात असावा.' *(महाराष्ट्र टाइम्स, दैनिक मराठा, २८ डिसेंबर १९७२; द उर्दू टाइम्स डेली, द इंकलाब (उर्दू वर्तमानपत्र) २९ डिसेंबर १९७२)*

४.१७ मुस्लीम नेत्यांची विषारी टीका

नेहरू, आझाद, हमीद दलवाई म्हणे इस्लामचे शत्रू!

मुस्लीम पर्सनल लॉच्या मुंबई येथील अधिवेशनाला पाठिंबा देण्यासाठी नांदेड येथे २४ व २५ फेब्रुवारी १९७३ रोजी जाहीर सभा घेण्यात आल्या. या सभांतून अनेक मुस्लीम पुढाऱ्यांची भाषणे झाली. या सभांना मुस्लीम नागरिक प्रचंड संख्येने उपस्थित होते.

दिनांक २४ रोजी अबू यूसुफ (एम. एल. सी.) काँग्रेस हैदराबाद यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. तिचे उद्घाटन करताना अध्यक्ष म्हणाले की, 'मुसलमान राजकीय क्षेत्रात विभागले असले, तरी इस्लाम धर्माच्या नावाखाली ते सर्व जण एक आहेत. मुसलमान भारतात जिवंत राहावा, म्हणून आम्ही एकत्रित आलो आहोत. आम्ही खरे देशभक्त आहोत. भारतीय घटनेत दिलेल्या सवलतीनुसार आम्ही मुसलमान म्हणून भारतात जगू इच्छितो. खरा मुसलमान खरा हिंदू हे मित्र असतात.' अब्दुल सुभान उपाध्यक्ष 'जमीयते-उल उलेमा' हैदराबाद आपल्या भाषणात म्हणाले की, 'भारतीय घटनेतील ४४वे कलम मुसलमानांसाठी एक संकट आहे. आम्हास समान नागरी कायदा मंजूर नाही. गजेंद्रगडकर यांनी 'मुस्लीम पर्सनल लॉमध्ये बदल पाहिजे' ही मागणी करून मुसलमानांची मने दुखविली आहेत. आजचे सरकार मुसलमानांचा धर्म नष्ट करू इच्छिते. म्हणून अरबी व उर्दू शाळांद्वारे मुसलमानांचे संरक्षण केले पाहिजे.'

भारतीय स्त्रियांना इस्लामने स्वातंत्र्य दिले

इस्माईल जबीउल्ला, हैदराबाद म्हणाले की, 'मुसलमानांची संस्कृती संकटात आहे. आम्हास समान नागरी कायदा नको आहे. भारतीय स्त्रियांना इस्लामने स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. समान नागरी कायदा मागणारे, पैशाने विकत घेतलेले काही मुसलमान खरे मुसलमान नाहीत. हमीद दलवाई हा मुसलमान नाही. आम्ही अगोदर इस्लामशी प्रामाणिक आहोत आणि नंतर राहत्या भूमीशी प्रामाणिक आहोत. कुराणातील एक शब्दसुद्धा आपण बदलू शकत नाही. जे लोक मुस्लीम कायद्यात बदल करू इच्छितात, ते मुसलमान नाहीत. भारतीय लोकसभा, भारतीय विधानसभा यांना मुस्लीम कायद्यात बदल करण्याचा अधिकार नाही. समान नागरी कायद्यामुळे राष्ट्रीय एकात्मता साधली जाऊ शकत नाही. भारतीय घटनेतील ४४वे कलम नष्ट केले पाहिजे.'

हमीद : इस्लामचा शत्रू

मसरोदुदीन, अध्यक्ष, मुस्लीम युवक संघटना, हैदराबाद म्हणाले की, 'दोन-चार मूर्ख मुसलमान एकत्र येऊन जर 'मुस्लीम कायद्यात बदल करा' असे म्हणत असतील, तर ही मंडळी मुसलमान नसून इस्लाम धर्माची शत्रू आहेत. कुराणामध्ये सुधारणा करण्याचा प्रश्नच नाही. हमीद दलवाई हा इस्लामचा शत्रू आहे. महाराष्ट्र व उत्तर प्रदेश येथील गव्हर्नर खरे मुसलमान नाहीत; ते सरकारने विकत घेतलेले मुसलमान आहेत. समान नागरी कायद्यास आमचा कडाडून विरोध

आहे.'

सुलतान सलाहुद्दिन ओवैसी, हैदराबाद म्हणाले की, 'अलीगढ विद्यापीठाचा दुरुस्ती कायदा करून मुस्लीम संस्कृती नष्ट करण्यात आली आहे. छगला, फखरुद्दीन अली अहमद, डॉ. झाकिर हुसेन, मौ. आझाद व पं. नेहरू यांच्या षडयंत्रामुळे अलीगढ हे मुस्लीम संस्कृतीचे केंद्र नष्ट झाले आहे. आज श्रीमती इंदिरा गांधींची हुकूमशाही देशात चालत आहे व लोकशाही नष्ट झालेली आहे.'

हाजी अबू यूसुफ , अध्यक्ष म्हणाले, 'मी काँग्रेसी असूनही अलीगढचा नवा कायदा मला मान्य नाही. इस्लाममध्ये हस्तक्षेप करणे मला मान्य नाही. भारतीय स्वातंत्र्याचा लिहिण्यात आलेला इतिहास हा मुसलमान स्वातंत्र्य सैनिकांचा उल्लेख नसलेला इतिहास आहे. हुतात्मा अशफाकुल्ला याचा नामनिर्देश या इतिहासात करण्यात आलेला नाही. सेक्युलर म्हणवणाऱ्या हिंदूंनी अगोदर सेक्युलर झाले पाहिजे.' त्यानंतर यूसुफ यांनी मुसलमानांस उपदेश केला की, "मुसलमानांनी आपल्या स्त्रियांवर अन्याय करू नये व त्यांना समानतेची वागणूक द्यावी.''

गजेंद्रगडकरांची हकालपट्टी करा

मजलीस-ए-इत्तेहादूल या पक्षाचे हैदराबादचे प्रमुख नेते सुलतान सलाहुद्दिन ओवैसी हे दि. २५-०२-१९७३ या दिवशीच्या जाहीर सभेचे अध्यक्ष होते. या सभेत दोन ठराव संमत करण्यात आले :

(१) डिसेंबर १९७२मध्ये मुंबई येथे मुस्लीम व्यक्तिगत कायद्याच्या (मुस्लीम पर्सनल लॉ) समर्थकांनी अधिवेशन भरवले होते. या अधिवेशनात मंजूर करण्यात आलेल्या ठरावांचे नांदेड व मराठवाड्यातील मुसलमान हार्दिक स्वागत करून त्यास पाठिंबा देत आहेत. आम्हास प्रचलित मुस्लीम कायद्याच्या संरक्षणार्थ जेव्हा हाक दिली जाईल, त्या वेळी आम्ही त्या हाकेनुसार अंमल करू.

(२) गजेंद्रगडकर यांनी अहमदाबाद येथील भाषणात मुस्लीम पर्सनल लॉमध्ये बदल व्हावा म्हणून केलेल्या मागणीच्या निषेधार्थ आमची मागणी आहे की, 'त्यांची लॉ कमिशनवरून हाकालपट्टी करण्यात यावी.'

त्या ठरावास सर्वश्री मिर्झा अहमद अली बेग चुगताई (नांदेड), मीर तिलावत अली वकील (परभणी), मोईनुद्दीन (बीड), जान महंमद सेठ (नांदेड), इस्माईल नबी (हैदराबाद) व मुसा वकील यांनी भाषणे देऊन पाठिंबा व्यक्त केला.

पंतप्रधानांवर टीकास्त्र

२५ तारखेच्या जाहीर सभेत सर्वश्री उस्मान बेग सालेसाहेब (हैदराबाद), शरफ-उल-हक वकील (देगलूर), मिर्झा अमीर अहमद बेग वकील (हैदराबाद), सुलेमान सिकंदर (हैदराबाद), अब्दुल कय्यूम (जमात-ए-इस्लामी प्रमुख, मराठवाडा, औरंगाबाद) व सुलतान सलाहुद्दिन ओवैसी यांनी भाषण करून पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींवर विषारी टीका केली. तसेच स्वर्गीय

डॉ. झाकिर हुसेन, मौलाना आझाद, पं. नेहरू यांच्यावर टिकेचा भडिमार करीत ते म्हणाले की, 'इस्लाम नष्ट करण्यास वरील लोक कारणीभूत आहेत. उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद, अलीगढ मुस्लीम विद्यापीठ, उर्दू भाषा मुस्लीम संस्कृती नष्ट करण्यात येऊन आता इस्लामचे भारतीय भूमीतून उच्चाटन करण्याचे प्रयत्न चालू आहेत. आम्ही प्राण अर्पण करू, सर्वस्वाची होळी करू, पण मुस्लीम पर्सनल लॉमध्ये बदल घडवून आणू देणार नाही. मुसलमानांच्या मुडद्यांची उंची कुतुबमीनारइतकी जरी उंच झाली, तरी आम्ही घाबरणार नाही व समान नागरी कायदा बदलू देणार नाही. काँग्रेस हा मुसलमानांचा शत्रू आहे. खरा माणूस काँग्रेसचा सभासदच होऊ शकत नाही व कोणताही काँग्रेसी माणूस विश्वासास पात्र नसतो. 'इंदिरा हटाव' ही घोषणा करीत मुसलमानांनी भारतातून काँग्रेसलाच नष्ट केले पाहिजे.

'वसंतराव नाईक (मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य) हे मुसलमानांचे संरक्षक नाहीत. भिवंडी व जळगाव इथल्या दंगली यांच्या काळात झालेल्या आहेत. तरी सर्व मुसलमानांनी एकत्रित येऊन, एक मजबूत संघटन बनवून मुस्लिमांचे संरक्षण केले पाहिजे. हे जर न घडेल, तर भारतातून इस्लाम धर्म व मुसलमान नाहीसे होतील.' 'मुसलमानांनी मत देताना काँग्रेसला देऊ नयें' असे आवाहन करण्यात आले.

नांदेड येथील वरील कार्यक्रम यशस्वी करण्यात सर्वमिर्झा अहमद अली बेग चुगताई, अब्दुल करीम सिद्दीकी वकील व झुल्फीकारुद्दीन सिद्दीकी वकील यांचा प्रामुख्याने हात होता. *(दैनिक मराठवाडा, औरंगाबाद, २८ मार्च १९७३)*

४.१८ दलवाईंना मदत दिल्याने जातीयवाद्यांचा तिळपापड

(केसरी, १७ ऑक्टोबर १९७५, रफिक सय्यद, लेख)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे नेते हमीद दलवाई यांच्यावर नुकतीच मूत्रपिंड आरोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियेसाठी व उपचारासाठी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी या धाडसी समाजसुधारकास ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली. मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेचे मराठी जनतेने सहर्ष स्वागत केले, परंतु जातीयवादी मुसलमानांना 'मुख्यमंत्र्यांनी आपल्या जखमांवर मीठ चोळले' असे वाटत होते. मुख्यमंत्र्यांना उद्देशून धमकीवजा पत्र लिहिण्यापर्यंत त्यांची मजल गेली.

हे पत्र अर्थातच सध्याच्या परिस्थितीत कोणत्याही मुस्लीम वृत्तपत्राने छापण्याचे धाडस केले नसते. म्हणूनच 'उर्दू ब्लिट्ज' या पत्राचा यासाठी वापर करण्यात आला असावा, असे वाटते. परंतु या निमित्ताने ब्लिट्ज चे पुरोगामीत्व सिद्ध झाले आहे, हे बरे झाले. मुख्यमंत्र्यांनी दलवाईंना ५० हजार रुपयांच्या मदतीची घोषणा करून पंधरवडा उलटला, तरी कुठल्याही उर्दू पत्रात याबरची प्रतिक्रिया आलेली नव्हती. या प्रतिक्रियांची सुरुवात ४ ऑक्टोबर १९७५च्या उर्दू ब्लिट्ज मधील पत्रानंतर झाली, हे लक्षात घ्यावयास हवे. पुण्याच्या मुस्लीम लीगच्या सचिवांची प्रतिक्रिया ९ ऑक्टोबरची आहे. प्रचाराच्या उघडण्यात आलेल्या या आघाडीमागे राजकीय हेतू होता, हे उघड आहे. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांची मुस्लीम समाजातील तत्कालीन लोकप्रियता मुस्लीम समाजाच्या काही ठेकेदारांना चिंताग्रस्त करीत होती. त्यांनी दलवाईंना देण्यात आलेल्या देणगीचा आपले राजकीय स्थान पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी उपयोग करून घेण्याचे ठरविले. ब्लीटझ् मधील पत्रात वापरण्यात आलेली भाषा पाहता, या प्रतिपादनास पुष्टी मिळेल.

मुख्यमंत्र्यांना प्रश्न

पत्रलेखक मुख्यमंत्र्यांना प्रश्न करतो की, 'दलवाई इस्लाम व मुसलमान यांचे शत्रू आहेत, म्हणून मुख्यमंत्र्यांनी दलवाई यांना मदत केली काय?' पुढे तो म्हणतो की, 'मुख्यमंत्र्यांनी लक्षात ठेवावे की, मित्राचा शत्रू हा शत्रूच असतो व मुसलमान हे मुख्यमंत्र्यांचे मित्र आहेत व दलवाई हे मुख्यमंत्र्यांचे शत्रू आहेत. मुसलमानांशी मैत्री मुख्यमंत्र्यांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. हमीद दलवाईंसारख्यांची दोस्ती त्यांना घेऊन बुडेल (ले डुबेगी). महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मुस्लीमद्वेष्ट्या मंत्र्यांचे बहुमत आहे असे दिसते व ते मुख्यमंत्र्यांच्या खांद्यावरून बंदूक चालवीत आहेत' असाही इशारा पत्रलेखकाने दिला. यावरून अशी शंकाही येते की, या प्रचार-मोहिमेत एखाद्या मुस्लीम उच्चपदस्थाचा हात असावा.

या पत्रामध्ये हमीद दलवाई यांच्याबद्दल वापरण्यात आलेली भाषा व त्यांना वाहिलेली लाखोली यांवरून जातीयवादी मुस्लीम मनाचे चांगले दर्शन होते व ते सभ्यतेपासून बरेच लांब असल्याची कल्पना येते. त्यामुळे ह्या पत्रावर सविस्तरपणे चर्चा करण्याची आवश्यकता आहे.

सव्वा कॉलम एवढ्या लांबीचे हे पत्र आहे. या पत्राच्या मथळ्यात 'शासनाने आजपर्यंत उपचारासाठी कोणाला ५० हजार रुपये दिले होते काय?' असा प्रश्न विचारण्यात आला. 'शंकरराव चव्हाण यांनी इस्लाम व मुसलमानांचा शत्रू असलेल्या हमीद दलवाईंना ५० हजार रुपयांची मदत का दिली?' असा प्रश्न विचारून पत्रलेखाने म्हटले आहे की, 'दलवाई यांनी सामाजिक किंवा राजकीय क्षेत्रात कुठलीही महत्त्वाची कामगिरी बजावलेली नसताना, त्यांना मुंबई-पुण्याबाहेर कोणीही ओळखत नसताना, ते स्वातंत्र्य सैनिक नसताना ही मदत का देण्यात आली?' यापुढे पत्रलेखकाने आपली संस्कृती प्रकट केली असून दलवाई यांचे स्थान सांगताना म्हटले आहे की, 'ते हिंदू जातीयवाद्यांचे बूट चाटीत आले आहेत व त्यांच्या विषारी वृत्तीला खूश करण्यासाठी मुसलमान व इस्लाम यांना शिव्या देत आले आहेत.

'महाराष्ट्रात पाहणी केली असता, किमान ५० हजार लोकांना मूत्रपिंडांचा विकार आढळेल. मुख्यमंत्री या सर्वांना ५० हजार रुपये देणार आहेत काय? शिवाय मूत्रपिंड आरोपणाच्या क्रियेला ५० हजार रुपये लागतात काय? आणि दलवाईंनाच काय असे देवपण प्राप्त झाले आहे की त्यांनाच ही मदत द्यावी?

'मदतीशिवाय फाशीवर जाणाऱ्या एका कमनशिबी माणसाचे मूत्रपिंडही दलवाईंना याचसाठी देण्यात येत आहे की, बरे होऊन या माणसाने मुसलमानांना पुन्हा दुखवीत हिंडावे. (सीनेपर मुंग दलने लगे)'

सुसंस्कृतपणाचा अभाव

हमीद दलवाई यांच्याशी अनेकांचे वैचारिक मतभेद असू शकतात. इस्लामच्या इतिहासामध्ये धर्माची वा धार्मिक परंपरांची इतकी शास्त्रशुद्ध चिकित्सा करणारा समाज सुधारक विरळाच, हे आपण लक्षात घेतले, तर परंपराबाद्यांना बसलेले धक्केही आपण समजू शकतो. त्यांनी कडक विरोध करावा, विरोधी चळवळी उभाराव्या, हेही समजून घेता येईल. मात्र आपण ज्या समाजात जगत आहोत, तो समाज वैचारिक मतभेदांमुळे व्यक्तिगत दुष्ट भावना बाळगीत नाही. परंतु हा सुसंस्कृतपणा पत्रलेखकाजवळ वा त्यांच्या जातकुळीतील इतरांजवळ नाही.

शिवाय या पत्रात दलवाईंवर करण्यात आलेले आरोप खोटे आहेत. कारण इस्लामची टिंगल करणे, मुसलमानांना शिव्या देणे हे उद्योग दलवाईंनी कधीही केलेले नाहीत. उलट सामान्य मुसलमानांना सुधारणेपासून लांब नेण्यासाठी जातीयवादी मुस्लीम वृत्तपत्रांनी त्यांच्याविरुद्ध पद्धतशीरपणे केलेला हा विषारी प्रचार आहे. गेली सात-आठ वर्षे मी दलवाईंना जवळून पाहात व ऐकत आलो आहे. या काळात मला तरी वरील एकही आरोप खरा असल्याचे आढळून आलेले नाही.

सवता सुभा

दलवाई जेव्हा जातीयवादी मुसलमानांवर टीका करतात, त्या वेळी त्यांना दलवाई हिंदू जातीयवाद्यांचे हस्तक वाटतात. पाकिस्तानची निर्मिती करण्याला ज्या जातीयवाद्यांनी हातभार

लावला व 'या देशात मुस्लीम वैयक्तिक कायद्यात बदल करण्याचा व अलीगढ विद्यापीठ कायद्यात बदल करण्याचा भारतीय संसदेला अधिकार नाही' असे म्हणून जे आजही आपला सवता सुभा कायम ठेवू पाहत आहेत, त्यांचे शासनाने लाड करीत राहावे व मुसलमानांना राष्ट्रीय प्रवाहात आणू पाहणाऱ्या दलवाईंसारख्या सुधारकाची मदत न करता त्यांना मरू द्यावे, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांचे लाड करण्याचे दिवस संपले आहेत. उर्दू अकॅडमी मिळाल्याने मुसलमान सौम्य होण्याऐवजी कसे चेकाळले आहेत, हे या पत्रलेखकाच्या पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होईल – 'आम्ही शंकरराव चव्हाण यांना असे विचारू इच्छितो की, इस्लामला बरे-वाईट म्हणणे, त्याच्या शिकवणुकीची टिंगल करणे व मुसलमानांच्या भावना दुखावणे हे कायदेशीर आहे का? शासन या वेड्याची बकबक सहन करणार आहे की, त्याला पायबंद घालणार आहे?'

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे, मुस्लिमांच्या तथाकथित पुढाऱ्यांना मुख्यमंत्र्यांच्या मुस्लीम समाजातील लोकप्रियतेमुळे फार भीती वाटू लागली. आपले पुढारपण कायम टिकविण्यासाठी त्यांची ही केविलवाणी धडपड चालली होती. सामान्य धार्मिक मुसलमानाला हे चांगले कळते. पैगंबर साहेबांनी मक्का परत काबीज केली, तेव्हा त्यांचा छळ केला गेला होता. त्यामुळे त्यांना हिजरत करावी लागली होती. त्या सर्वांना पैगंबरांनी क्षमा केली होती व जीवदान दिले होते. पैगंबरांची ही सहिष्णू ता सामान्य मुसलमानाला आठवते. तो या मंडळींच्या राजकारणाला बळी पडणार नाही.

४.१९ महाराष्ट्र मुस्लीम लीगचा खुलासा

– मिर्झा हमीद बेग (सेक्रेटरी, महाराष्ट्र मुस्लीम लीग, पुणे)

पुणे मुस्लीम लीगच्या वतीने दि. १०-१०-७५ रोजी निघालेल्या जाहीर पत्रकाविरुद्ध आपल्या (महाराष्ट्र टाइम्सच्या) १३-१०-७५च्या अंकात 'धावते जग' या मथळ्याखाली लेख छापला आहे. तो आमच्या मते चुकीचा व जनतेची दिशाभूल करणारा आहे. तरी मी या लेखी पत्राद्वारे त्याचा सविस्तर खुलासा करीत आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार शंकरराव चव्हाण यांनी आपल्या निधीतून हमीद दलवाई यांना त्यांच्या आजाराप्रीत्यर्थ ५० हजार रुपये अनुदान देऊ केले. त्या अनुदानास मुस्लीम लीगने केलेला विरोध असंस्कृत समजून केलेला नाही. हमीद दलवाई यांचे व आमचे वैयक्तिक असे काही वैर नाही; मतभेद आहेत. ते विचारांचे मतभेद आहेत. मुख्यमंत्र्यांनी आपल्या स्वतःच्या पैशांतून ५० हजारच काय, पण एक लाख रुपयेही देऊ केले असते, तर त्याला आमचा विरोध नसता. सात-आठ महिन्यांपूर्वी इचलकरंजी सोसायटीतर्फे हमीद दलवाई यांना १५ हजार रुपयांचे आर्थिक सहकार्य देण्यात आले. तरी आपल्या म्हणण्याप्रमाणे आम्ही असंस्कृत असतो, तर आम्ही इचलकरंजी सोसायटीलाही विरोध केला असता. पण आम्ही समजतो की, तो पैसा एका सोसायटीमार्फत दिला गेला आहे. त्याला आम्ही कोणत्या व कशा प्रकारे विरोध करू शकू? परंतु मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी दिलेल्या पन्नास हजार रुपयांच्या अनुदानाचे पैसे प्रत्येक महाराष्ट्रीय व्यक्तीचे आहेत व त्या पैशांचे वाटप अशा तऱ्हेने व्हावे, याचा खेद वाटतो. महाराष्ट्रात हमीद दलवाई यांच्यासारखे कित्येक समाजसेवक, कार्यकर्ते विविध प्रकारच्या रोगाने पीडित असतील... मग त्यांनाही अनुदान का देण्यात आले नाही? आज कित्येक गोरगरीब जनता भयंकर अशा रोगांनी पीडित आहेत. ते या अनुदानाचे बरोबरीचे अधिकारी नाहीत काय?

आगरकर व महात्मा फुले यांनी हिंदू धर्मात परिवर्तन घडवून आणण्याचा केलेला प्रयत्न हिंदू धर्मातील लोकांशी संपर्क साधून केलेला आहे. ते स्वतःला कट्टर हिंदू धर्मीय समजत. त्यांनी हिंदू धर्माची कधीही विटंबना केली नाही. पवित्र धर्माच्या प्रतिष्ठेला बाधा येईल, असेही कृत्य त्यांनी केले नाही. त्यांना आपल्या धर्माचा अभिमान होता. परंतु हमीद दलवाई धर्मात घडवून आणू इच्छित असलेले परिवर्तन आगरकर व महात्मा फुले यांच्या उलट आहे. कारण हमीद दलवाई स्वतःला मुसलमान समजतच नाहीत. त्यांना इस्लाम धर्माचा तिळमात्रही अभिमान नाही. जर धर्माचा अभिमान असता, तर त्यांनी इस्लाम धर्माची व पैगंबरांची वेळोवेळी विटंबना केली नसती.

आपण विचार करा, कारण आम्ही असंस्कृत आहोत, अशा परिस्थितीत हमीद दलवाई धर्मात काही तथाकथित परिवर्तन करू पाहत असतील, तर एक धर्मप्रेमी व्यक्ती त्यांना कोणत्या सबबीवर प्रतिसाद देईल? त्यांनी आजपर्यंत मुस्लीम समाजातील मान्यवर लोकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला नाही. ते धर्मपरिवर्तनाची भाषा फक्त सदाशिव व नारायण पेठेत राहूनच करतात व

मुस्लीम समाजाला व धर्माला बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच त्यांना विरोध आहे.

तरी हमीद दलवाई यांना आमचे आवाहन आहे की, प्रथम त्यांनी मनाने जाहीररीत्या इस्लाम धर्माचा स्वीकार करावा व मगच आमच्याशी परिवर्तनाची भाषा बोलावी. असे झाल्यास लीगच काय, पण भारतातील प्रत्येक मुसलमान त्यांचे परिवर्तनाबाबतचे विचार समजून घेण्यास आतुर होईल. त्याबरोबरच आम्ही हेही नमूद करू इच्छितो की, भारताच्या फाळणीबाबतचे खापर वारंवार मुस्लीम लीगवर फोडण्यात येते. ही जातीय वृत्ती व इंग्रज साम्राज्याची रूढी आहे. यापुढे तरी आपण ती सोडून द्यावी व भारताच्या उन्नतीवर लक्ष केंद्रित करावे. *(महाराष्ट्र टाइम्स, २१ ऑक्टोबर १९७५)*

४.२० दलवाईंना मदतीच्या प्रतिक्रिया

मुल्कपरस्त (यदुनाथ थत्ते)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई मूत्रपिंडाच्या विकाराने गेले सहा महिने गंभीर आजारी होते. फाशीची सजा झालेल्या फिरोज दारूवाला यांनी आपले एक मूत्रपिंड दलवाई यांना देऊ केले आणि मुंबईच्या जसलोक रुग्णालयात ही शस्त्रक्रिया करण्यात आली. हमीद दलवाई एका जिवावरच्या दुखण्यातून सुखरूप बाहेर पडले, हे ऐकून अनेकांना समाधान वाटले असल्यास नवल नाही. मुस्लीम समाजाच्या प्रबोधनाचे कार्य त्यांनी अतिशय निडरपणे चालवले आहे. त्यांच्या या कार्याची महती देशातील सर्व विचारांच्या मंडळींनी ओळखली आहे. त्यांच्या जिवावरचे हे दुखणे टळावे, यासाठी अनेक मंडळी झटत होती. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनीही स्वास्थलाभासाठी उपयोगी पडावेत, म्हणून दोन हजार रुपये त्यांच्याकडे पाठवल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांना माहीत आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या स्वास्थ्यलाभासाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली. मतभेद असतानाही सूजनता राखण्याची ही अदब स्पृहणीय म्हटली पाहिजे. कार्यकर्त्यांची अशी कदर लोकशाही सरकारने दाखवली, हे योग्यच झाले. पण नेमकी हीच गोष्ट फिरकापरस्तांच्या (जातीयवाद्यांच्या) रागाला कारण ठरली आहे.

लीग नेते बेग यांचे पत्रक

पुरोगामीपणाचा ठेका असल्याच्या तोऱ्यात वावरणाऱ्या ब्लिट्ज च्या उर्दू आवृत्तीत मुख्यमंत्र्यांच्या या देणगीवर आग पाखडण्यात आली. मग इतर उर्दू वृत्तपत्रेही मागे राहिली नाहीत. फिरकापरस्त मुस्लीम नेत्यांनी आपल्या अजब अदबचा एक नमुना यामनिमित्ताने पेश केला! मुख्यमंत्र्यांच्या या देणगीबद्दल मुस्लीम लीगचे एक पुढारी मिर्झा हमीद बेग यांनी एक पत्रक काढले आणि मुख्यमंत्र्यांना जाहीरपणे जाब विचारण्याचा आव आणला. उर्दू अकादमी काढण्याचा समंजसपणा दाखवण्याऱ्या मुख्यमंत्र्यांनी हमीद दलवाईंसारख्या 'समाजद्रोह्या'चे प्राण वाचवण्यासाठी एवढी रक्कम द्यावी, हे त्यांना बेअदब वाटले.

बेग यांच्या या उपद्रवीपणावर तीन प्रतिक्रिया मुस्लीम समाजात व्यक्त होताना दिसतात. त्यांच्या मताशी सहमत असणाऱ्या एका गटाला असे वाटते की, 'त्यांनी जाहीरपणे असे मत व्यक्त करायला नको होते. अशा गोष्टी मनात आल्या तरी त्या उघडपणे बोलणे 'दारुल-हर्ब' मध्ये शहाणपणाचे नसते; 'दारुल-इस्लाम' मध्ये असे बोलणे खपून गेले असते, नव्हे, त्याचे स्वागत झाले असते.' 'दारुल-इस्लाम' म्हणजे मुस्लीम शासन असणारा देश आणि 'दारुल हर्ब' म्हणजे मुस्लीमेतरांचे शासन असणारा देश. तरुण सुशिक्षित मुसलमानांना सरकारचे हे कृत्य माणुसकीचे वाटते. एवढेच नव्हे, तर 'मुसलमानांमधील नव्या प्रेरणांनाच त्यामुळे जीवदान मिळाले' असे त्यांना वाटते. बहुसंख्य मुसलमान स्वतःच्या मीठ-मिरचीच्या विवंचनेत इतका गुरफटला आहे की, त्याला असल्या गोष्टीत लक्ष घालायला फुरसत नाही.

हमीद दलवाईंना या फिरकापरस्तांचा राग असण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे, 'दारुल हर्बचे दारुल इस्लाम करता येईल' या आशाळभूतपणावर ते तुटून पडतात आणि 'हा भाबडा दैववाद सोडून मुस्लीम भारतीयांनी वास्तवाचे भान राखावे' असे ते शिकवतात. दारुल हर्ब म्हणजे इस्लामी शासन नसणाऱ्या देशात मुसलमानांनी बरोबरीचे नागरिक म्हणून इतर समाजाशी बंधुभावाने वागायला शिकले पाहिजे, असे ते प्रतिपादन करतात.

आपली बाजू सावरण्यासाठी मिर्झा हमीद बेग यांनी काढलेल्या पत्रात 'सरकारी अनुदानाचे पैसे प्रत्येक महाराष्ट्रीयाचे आहेत' असे त्यांनी म्हटले असले, तरी ते पैसे हमीद दलवाईंना देण्याबद्दल किंवा न देण्याबद्दल त्यांना व्हेटोचा अधिकार हवा आहे.

सरकारी पैसे प्रत्येक महाराष्ट्रीयाचे आहेत, हे तत्त्वतः लावले, तर उर्दू अकादमीला पैसे देणेही गैर ठरेल, ही गोष्ट बेग यांच्या ध्यानी येत नाही.

हमीद दलवाई स्वतःला मुसलमान समजत नाहीत, हा मिर्झा हमीद बेग साहेबांचा दावा खरा नाही. कोण मुस्लीम, कोण बिगर मुस्लीम हे ठरवण्याचा अधिकार मात्र बेग यांच्यासारख्या फिरका परस्तांना देण्याच्या ते विरुद्ध आहेत. 'धर्माचा अभिमान म्हणजे धर्मातील कालबाह्य खुळ्या प्रथापरंपरांची पाठराखण' असे चिकित्सक वृत्तीचा कोणीही माणूस कबूल करणार नाही. धर्माच्या नावाने स्त्रियांना दासीबटकीची कळा आणणाऱ्या 'जबानी तलाक' आणि 'सवतींना मुभा' या सवलती रद्द झाल्या पाहिजेत, असे दलवाईंचे मत आहे आणि ते सहृदयपणाचे आहे.

'दलवाईंनी मुस्लीम समाजातील मान्यवर लोकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला नाही' असे म्हणणे म्हणजे चोराच्या उलट्या... मारण्यासारखा प्रकार आहे. पुण्याच्या भवानी पेठेत मुस्लिमांच्या भेटीगाठी घेण्यासाठी जात असताना बेग यांच्या भाऊबंदांनी दलवाईंना मारहाण केली होती, हे बेग विसरले असले, तरी इतर मंडळी विसरलेली नाहीत. दलवाईंनी पुण्यात भरवलेली मुस्लीम महिला परिषद आणि कोल्हापूरला घेतलेली मुस्लीम शिक्षण परिषद शेकडो प्रतिनिधींनी साजरी केली, ही गोष्ट बेग साहेबांनी खुशाल डोळ्याआड करावी. 'सदाशिव, नारायण पेठांत दलवाई भटकतात' असा आक्षेप घेण्याऐवजी त्यांनी दलवाईंना पाचारण करावे आणि सुदैवाने आणखी काही महिन्यांनी ते येऊही शकतील. छगला, जिनांचे व्यक्तिगत सचिव असणारे एम. आर. ए. बेग, ए. ए. ए. फैझी हे बेग यांना मान्यवर वाटणार नाहीत. डॉ. मोईन शाकीर मराठवाडा विद्यापीठात कितीही मोठ्या हुद्द्यावर असले, तरी त्यांना मिर्झा हमीद बेग मान्यवर समजणार नाहीत. त्यांच्यासारखे फिरका परस्त तेवढेच मान्यवर असतील. दलवाई त्यांना भेटायला तयार असतात, पण तात्त्विक, बुद्धिवादी पद्धतीने चर्चा करायची बेगसारख्या मंडळींच्या मनाची तयारी हवी.

मुस्लीम स्त्रियांना दिलासा

सातारा येथील न्यायालयात रझिया बेगम या तलाकपीडित मुस्लीम तरुणीने 'आपल्याला व आपल्या मुलीला पोटगी मिळावी' असा दावा दाखल केला होता. तिच्या नवऱ्याने मुस्लीम व्यक्तिगत कायद्याचा आधार घेऊन पोटगीला नकार दिला आणि 'तलाकनंतर फक्त तीन महिने,

म्हणजे इद्दतच्या काळापुरतीच भरणपोषणाची जबाबदारी आपल्यावर येते' असा दावा केला. परंतु अलीकडेच, क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या १२५व्या नव्या कलमान्वये प्रत्येक परित्यक्तेला – मग तिचा धर्म कोणताही असो – पोटगीचा अधिकार दिला आहे. न्यायमूर्तींनी या कलमान्वये 'रझिया बेगम हिला मासिक रु. ५० व मुलीला मासिक रु. ३०प्रमाणे नवऱ्याने पोटगी दिली पाहिजे' असा निवाडा दिला. मुस्लीम स्त्रियांच्या दृष्टीने हा एक दिलासा देणारा निवाडा आहे. लहरीखातर, बेजबाबदारपणे तलाक देण्याला त्यामुळे काही प्रमाणात अटकाव होईल. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने पोटगीबाबत तलाकशुदा मुस्लीम स्त्रियांना सल्ला देण्याचे काम सुरू केले असून ते योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. अशा प्रकारचे दावे मोठ्या प्रमाणात न्यायालयात गेले, तर मुस्लीम स्त्रीच्या मानेवरची तलाकची टांगती तलवार दूर होईल. १२५ कलमाविरुद्ध फिरका परस्तांनी चालवलेला प्रचार सरकारने जुमानला नाही, याबद्दल सरकारला मुस्लीम महिला दुआ देत असतील. *(सकाळ, ३१ ऑक्टोबर १९७५)*

४.२१ मंडळाच्या सभेत दगडफेक आणि गोंधळाचा प्रयत्न

हमीद दलवाई यांच्या निधनानंतर, म्हणजे १८ जून १९७७ रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने पुण्यातील भवानी पेठेतील ए. डी. कॅम्प चौकात 'हमीद दलवाई व त्यांचे कार्य' या विषयावर पुणे शाखेतर्फे जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव होते. या सभेत मंडळाच्या विरोधकांनी गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याकडून व्यासपीठावर दगड फेकण्यात आले. तसेच लाऊडस्पीकर व बिजेचे कनेक्शन तोडण्यात आले. वेळेत पोलिसांची मदत आल्यानंतर सभेत व्यत्यय आणणारे विरोधक निघून गेले.

मंडळाचे कार्यकर्ते फजल शेख बोलावयास उभे राहताच 'हे बंद करा, आम्ही हे ऐकून घेणार नाही' अशा घोषणा सुरू झाल्या आणि काहींनी विचारमंचाकडे दगडफेक केली. तरीही शेख बोलत राहिल्याने बीजेचे कनेक्शन तोडून अंधार करण्यात आला. नंतर सय्यदभाई लाऊडस्पीकर व दिव्यांशिवाय भाषण करण्यासाठी उभे राहिले आणि त्यांनी भाषण सुरू केले. तेवढ्यात पोलिसांनी येऊन परिस्थिती आटोक्यात आणली. डॉ. बाबा आढाव सभेचा समारोप करताना म्हणाले, 'आमच्या धर्माबाबत बोलायचा कोणालाही अधिकार नाही' अशी दमबाजी खपवून घेतली जाणार नाही. नुकत्याच झालेल्या निवडणुकीनंतर राष्ट्रीय पातळीवर सुसंवाद सुरू झाल्याचे बोलले जाते, परंतु असे विषय टाळून संवाद होऊ शकणार नाही. 'मुस्लीम महिलांच्या तलाकबद्दल हिंदू समाजाने बोलू नये आणि हरिजनांच्या अत्याचाराबद्दल मुसलमानांनी बोलू नये' हे आता फार दिवस चालणार नाही. सर्वांना समान हक्क हवेत, यासाठी पडेल ती किंमत देण्याची आमची तयारी आहे.' या प्रकरणी पोलिसांनी कोणीही तक्रार न केल्यामुळे कोणावरही गुन्हा नोंदवला गेला नाही.

मंडळाचे कार्यकर्ते सय्यदभाई यांनी सांगितले की, 'मंडळाविषयी मंडळाचे विरोधक जाणीवपूर्वक अपप्रचार करीत असल्यामुळे मंडळाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी मंडळाच्या वतीने ठिकठिकाणी अशा प्रकारच्या सभा आयोजित केल्या जाणार आहेत.' *(रविवार सकाळ, १९ जून १९७७; संध्या, १८ जून १९७७)*

४.२२ पुणे महानगरपालिकेतील गोंधळ

समाज सुधारक हमीद दलवाई यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करणारा तहकुबी ठराव पुणे महानगरपालिकेच्या सभागृहात ६ मे १९७७ रोजी बिनविरोध संमत करण्यात आला. परंतु ही तहकुबी मांडू दिल्याबद्दल काँग्रेसचे अमिनुद्दिन पेनबाले यांनी निषेध व्यक्त करून सभात्याग केला. 'पेनबाले यांनी दुखवटयाच्या तहकुबीवर अशा प्रकारे बागू नये' असे सांगून काँग्रेसच्या काही नगरसेवकांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु पेनबाले यांनी कोणालाही जुमानले नाही. त्यांनी सभागृहात केलेल्या वर्तनाचा नंतर अनेक सभासदांनी आपल्या भाषणामधून निषेध केला.

सायंकाळी ५:३० वाजता महापौर शिवाजीराव भोसले यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली होती. हमीद दलवाई यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करणारी तहकुबी भाई वैद्य मांडू लागताच अमिनुद्दिन पेनबाले यांनी हरकतीचा मुद्दा असल्याचे सांगून भाई वैद्य यांचे भाषण थांबविले. पेनबाले हरकतीचा मुद्दा मांडताना म्हणाले, 'हमीद दलवाई यांनी कुणासाठी कार्य केले, हा वादाचा मुद्दा आहे. ते या सभागृहाचे सभासद नव्हते, तेव्हा त्यांच्या निधनाबद्दल दुखवटा कशासाठी व्यक्त करायचा? हा दुखवटा व्यक्त करून सभागृहातील कोणाच्या भावना दुखवू नका' त्यांचे हे भाषण चालले असताना शिवाजीराव आढाव, प्रकाश संसारे, भाई वैद्य, उल्हास काळोखे, शैल्यम बाशेट्टी एकदम उभे राहून महापौरांना म्हणाले, 'पेनबाले यांनी हरकतीचा मुद्दा काय तो सांगावा. ते भाषण करीत आहेत.'

या वेळी सभागृहात थोडा गोंधळ माजला. मग काँग्रेसचे विठ्ठल लडकत, शिवाजीराव ढमढेरे, हंबीरराव मोझे वगैरे नगरसेवक पेनबाले यांच्या जवळ गेले व त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करू लागले. तेवढ्यात महापौरांनी पेनबाले यांचा हरकतीचा मुद्दा फेटाळला असल्याचा निर्णय दिला. तेव्हा महापौरांना उद्देशून पेनबाले जोरजोराने म्हणाले, 'महापौर, ही तहकुबी मांडण्याची परवानगी देऊन तुम्ही अन्याय करीत आहात. ही तहकुबी मांडण्याचे काहीही अडलेले नाही. या सभागृहात मला संरक्षण दिले जात नाही, याचा निषेध म्हणून मी सभात्याग करतो.' व ते रागारागाने बाहेर गेले.

त्यानंतर तहकुबी मांडताना भाई वैद्य पुढे म्हणाले, 'निधनाच्या दुखवटयाला या सभागृहात अशा प्रकारे यापूर्वी कधी विरोध झाला नव्हता. ही अशा स्वरूपाची पहिलीच घटना येथे घडत आहे. या तहकुबी पत्रावर काँग्रेसचे येथील नेते ॲड. द. सु. अय्यर यांचीही सही आहे. झालेल्या घटनेबद्दल मला दुःख होते. महात्मा फुले, आगरकर, शिंदे, डॉ. आंबेडकर अशा समाज सुधारकांच्या मालिकेत हमीद दलवाई होऊन गेले. दुर्दैवाने ते अल्पायुषी ठरले. 'भारतीय समाज एकात्म असावा' यासाठी त्यांनी ध्यास धरला होता. मुस्लीम सत्यशोधक समाजाची ज्योत त्यांनी या पुण्यात लावली. त्यांचे कार्य आता भारतातच नव्हे, तर जगात पसरले आहे.'

पेनवालेंचे विचार वैयक्तिक

काँग्रेस पक्षातर्फे तहकुबीला पाठिंबा देताना शिवाजीराव ढुमे म्हणाले, 'पेनवाले यांनी आता येथे जे मतप्रदर्शन केले, ते त्यांचे वैयक्तिक विचार आहेत. काँग्रेस पक्षाचा त्यांच्या या विचाराशी काही संबंध नाही. दलवाईंनी प्रचंड विरोध सहन करून दाखविलेल्या कार्याला मुस्लीम समाज सुधारणेच्या इतिहासात तोड नाही.'

पेनवाले यांच्या कृतीचा निषेध करून शिवसेनेचे उल्हास काळोखे म्हणाले, 'पेनवाले यांची ही कृती पुणेकरांना लांछनास्पद आहे. या शहराचे नाव ते खराब करीत आहेत. सुज्ञ पुणेकर जनता पेनवाले यांच्या विचारांशी केव्हाही सहमत होणार नाही. मुस्लीम समाजातील काही मंडळींनी दलवाई यांच्या कुटुंबीयांची क्रूर अवहेलना केली. त्यांच्या या कृत्याचीही आठवण या वेळी येते.'

शैल्यम बाशेट्टी म्हणाले, 'फाशीची शिक्षा झालेले फिरोज दारूवाला यांनी आपले एक मूत्रपिंड हमीद दलवाई यांना दिले. त्यामुळे दलवाई आणखी काही काळ आपल्यात राहू शकले. दारूवाला आता फाशी गेले आहेत, पण तरीही त्यांचे मी अभिनंदन करतो.'

रिपब्लिकन पक्षाचे प्रकाश संसारे म्हणाले, 'जातीयवादी वृत्तीच्या मंडळींना समाज सुधारकांची मते पटत नसतात आणि त्यामुळे समाजसुधारकांच्या मृत्यूनंतरही काही जण त्यांचा द्वेष करीत असतात. तसा द्वेष पेनवाले यांनी येथे दाखविला. त्यांचा मी निषेध करतो.'

पेनवालेंच्या चौकशीची मागणी

'मरणान्ति वैराणि' ही भारतीयांची संस्कृती आहे, असे सांगून काका वडके म्हणाले, 'पेनवाले किती जात्यंध आहेत, हे त्यांनी आता दाखवून दिले आहे. अशा विचारसरणीतूनच भारताचे दोन तुकडे झाले. दलवाईंना अशी भाषणांची नुसती श्रद्धांजली वाहून चालणार नाही. मुस्लीम समाजात सुधारणा करण्याचे त्यांचे कार्य यापुढे त्याच नेटाने चालविणारे मुस्लीम समाजातील तरुण त्यासाठी निर्भीडपणे पुढे आले पाहिजेत. त्यांनी ते कार्य चालू ठेवले पाहिजे. तरच ती दलवाईंना खरी श्रद्धांजली ठरेल.'

भाई वैद्य म्हणाले, 'आपला द्वेष करणाऱ्याचाही राग करायचा नाही, हा अलौकिक गुण हमीद दलवाईंच्यात होता.'

मधुकर निरफराके म्हणाले, 'दलवाई हे बुद्धिवादी होते. 'सतत अभ्यास' या गोष्टीला ते फार महत्त्व देत असत. कुठल्याही मानापानाच्या पदाची अपेक्षा न करता ते कार्य करीत राहिले.'

यानंतर तहकुबी बिनविरोध पास झाली.

सभेनंतर नारायण वैद्य, उल्हास काळोखे, मधुकर निरफराके वगैरेंनी एक पत्र काढून अशी मागणी केली की, 'पेनवाले यांच्या वर्तनाची चौकशी करावी व त्यांना सभागृहाची माफी मागण्यास सांगावे व तोपर्यंत त्यांना सभागृहात येऊ देऊ नये.' *(सकाळ, ७ मे १९७७)*

४. २३ अलीगढ विद्यापीठातील प्रसंग

'हिंदू-मुस्लीम प्रश्न आणि राष्ट्रीय एकात्मता' हा मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यक्रम पत्रिकेतील महत्त्वाचा विषय. महाराष्ट्रात आणि राज्याबाहेर धार्मिक तणावाचे वातावरण असताना तेथे जाऊन परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याला मंडळाने प्राधान्य दिले. याच पद्धतीने १९७८मध्ये अलीगढ येथे हिंदू-मुस्लिमांमध्ये दंगल झाली. या दंगलीचा अभ्यास करून स्थानिक लोकांशी संवाद साधण्यासाठी मेहेरून्निसा दलवाई, हुसेन जमादार आणि मोहम्मद दलवाई अलीगढला गेले होते. अलीगढ विद्यापीठातील हमीद दलवाईंचे मित्र डॉ. बिलगरामी यांचीही या लोकांनी भेट घेतली. अलीगढ विद्यापीठात त्यांनी पूर्वी हमीद दलवाईंचे एक व्याख्यान ठेवले होते. मात्र तेथील पूर्वग्रहदूषित लोकांनी हे भाषण होऊ न देता दलवाईंचा अपमान करून त्यांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला होता. या प्रसंगी बिलगरामी आणि त्यांच्या मित्रांनी दलवाईंना मागच्या दारातून काढून मुंबईला पाठवून दिले होते. या प्रसंगाची आठवण ताजी होती. या प्रसंगी परिस्थिती तेवढी गंभीर नसली, तरी मेहेरून्निसा दलवाईंचे नाव ऐकूनच स्थानिकांनी त्यांना विरोध केला. त्यामुळे विद्यापीठामध्ये हा संवाद साधता आला नव्हता. मात्र अलीगढमधील काही सामान्य लोकांशी बोलून एक छोटेखानी बैठक आयोजित केली होती. अलीगढ येथील सामाजिक कार्यकर्त्या सीमा अन्सारी यांनी या बैठकीचे आयोजन करण्यासाठी सहकार्य केले होते. *(मेहेरून्निसा दलवाई, 'मी भरुन पावले, प्रकरण ७, साधना प्रकाशन, आवृत्ती सातवी, २०२०, पृ. क्र. १६९, १७०, १७१)*

५. मंडळाशी निगडित लेख, संपादकीय, मुलाखती आणि भाषणे

५.१ गरज आहे सामाजिक पुनर्रचनेची – हमीद दलवाई

(इंडियन सेक्युलर सोसायटी व मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्या वतीने दि. ४-५ डिसेंबर १९७१ रोजी दिल्ली येथे पुरोगामी मुस्लीम नेत्यांची एक राष्ट्रीय परिषद भरली होती. या परिषदेचे अध्यक्ष हमीद दलवाई होते. या निमित्ताने त्यांच्या इंग्रजी भाषणाचा मराठी भाषेत गोषवारा 'मुस्लिमांचा तथाकथित उदारमतवाद, गरज आहे सामाजिक पुनर्रचनेची' या शीर्षकाने प्रकाशित करण्यात आला होता. मूळ इंग्रजी भाषणाचा समावेश परिशिष्टात आहे.)

समान विचारांच्या मुस्लीम बांधवांना एकत्र आणून मुस्लीम समाजातील आधुनिक विचार करणाऱ्या मंडळींचे एक अखिल भारतीय व्यासपीठ उभे करता येईल का, याचा मागोवा घ्यावा आणि आपल्या समाजाचे आणि देशाचे प्रश्न धर्मनिरपेक्ष भूमिकेतून सोडविण्याचा एक नवा प्रवाह निर्माण करावा, हा हेतू ही परिषद भरविण्यामागे आहे.

येथे मी हिंदू-मुस्लीम राजकीय तणावांचा आणि फाळणीचा समग्र दुर्दैवी इतिहास सांगण्याचे कारण नाही, कारण आपणापैकी सर्वांना तो माहीत आहे. स्वातंत्र्यानंतर मुस्लीम समाजापुढे उभ्या राहिलेल्या आव्हानांचा मुस्लीम समाज यशस्वीपणे स्वीकार करू शकलेला नाही. त्यामागील कारणे आपल्याला शोधून काढावयाची आहेत.

आपले प्रश्न सोडविण्याचे हमखास साधन म्हणून मुस्लीम समाजाने वेगळ्या (पाकिस्तानच्या) राष्ट्रवादाची कास धरली. वेगळ्या राष्ट्रवादाच्या मागे धावणाऱ्या मुस्लीम समाजातील विविध थरांत विविध विचारप्रवाह अस्तित्वात होते. 'मुस्लीम समाजाला एका राष्ट्रीय व्यासपीठावर 'गट' म्हणून वावरण्याचे हक्क मिळत नसल्यामुळे वेगळे राष्ट्र घेतल्याखेरीज मार्ग नाही' असे अनेकांना वाटते, तर 'संयुक्त भारतात सर्वच मुसलमानांची हिंदूंच्या वर्चस्वामुळे गळचेपी होणार असल्यामुळे

निदान पाकिस्तानातील मुसलमान त्या वर्चस्वातून मुक्त व्हावेत, म्हणून आमच्या हक्कांची कुर्बानी केली' असे काहींनी मानले. 'वेगळ्या पाकिस्तानच्या अस्तित्वाने तेथे हिंदू अल्पसंख्याक राहतील व त्यामुळे भारतीय मुसलमानांना सुरक्षितता आणि स्थान लाभेल' असा काही मंडळींनी गैरसमज करून घेतला. काही उदारमतवादी धर्मनिरपेक्ष वेगळ्या मुस्लीम राष्ट्रवादाला विरोध करीत राहिले, परंतु त्यांचा आवाज क्षीण ठरला.

स्वातंत्र्योत्तर काळ

मुस्लीम समाजाचे स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारण या कल्पनेवरच आधारलेले आहे. राजकीयदृष्ट्या मुस्लीम समाजाला संघटित करण्याचा प्रयत्न करणे आणि राष्ट्रांतर्गत 'स्वयंभू समाज' म्हणून वागवणे ही प्रवृत्ती अजूनदेखील वरचढ आहे. फाळणीमुळे प्रश्न अधिकच बिकट झाले आहेत. त्याचबरोबर फाळणी झाली नसती, तर प्रश्न मिटले असते, असेही मानण्याचे कारण नाही. मुस्लीम समाज 'पॅरिटी'च्या सिध्दान्तावर संयुक्त भारतात राहू इच्छित होता, परंतु अल्पसंख्याकांना किंवा कोणत्याच गटाला 'पॅरिटी' देण्याचा जगात दाखला नाही. 'इक्वॉलटी' हाच राष्ट्रीय जीवनप्रवाहात सगळ्यांना स्थान देण्याचा सर्वोच्च आदर्श समजला जातो.

फाळणीने प्रश्न बिकट झाले, याची अनेक कारणे आहेत. एक तर भारत-पाकिस्तान संबंध कधीच सुधारले नाहीत. पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांना जोपर्यंत प्रादेशिक आकांक्षा आहेत आणि जोवर त्यांच्यात ऐतिहासिक हिंदूविरोधी पूर्वग्रह आहेत, तोपर्यंत हे संबंध सुधारण्याची काही शक्यता नाही. आता बांग्लादेशमधील उठावाने पाकिस्तानचे अस्तित्वच धोक्यात आल्यामुळे भारतीय मुसलमानांच्या सुरक्षिततेच्या आणि भवितव्याच्या संदर्भात भारत-पाक-संबंधांची चर्चा करणे कालबाह्य ठरले आहे. आता बांग्लादेशच्या स्वातंत्र्यप्राप्तीनेच हिंदू-मुस्लीम संबंधाना नवे आशादायी वळण लागणार आहे.

पण आज बांग्लादेशच्या स्वातंत्र्यलढ्याबाबतदेखील मुस्लीम समाजाचे वागणे विचित्र भासते आहे. काही मूठभर व्यक्ती आणि किरकोळ संघटना वगळल्या, तर मुस्लिमांच्या सर्व राजकीय संघटना पश्चिम पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांची तरफदारी करताना दिसतात. 'भारतीय मुसलमान राष्ट्रीय प्रवाहात सहभागी नाहीत' असे म्हटले की मुसलमानांना राग येतो. आज देशातील सर्व जनता आणि सर्व राजकीय पक्ष बांग्लादेशला पाठिंबा देत असताना मुस्लीम जनमत तेवढे विरोधी सूर काढते, हा मुस्लीम समाज राष्ट्रीय प्रवाहात समरस झाला नाही, याचा दाखला आहे.

अपुरे ठोकळेबाज उत्तर

स्त्री-पुरुष समानता आणि समाज प्रबोधनाच्या पातळीवर इतर समाजाबरोबर एका राष्ट्रीय चौकटीत संबंध प्रस्थापित करण्याचे आव्हान मुस्लीम समाज स्वीकारू शकलेला नाही, हे कितीही कटू वाटले, तरी सत्य आहे. त्याचबरोबर आजच्या काळाला अनुसरून समानतेच्या आधारावरील आपली सामाजिक चौकट बदलण्याचे धैर्यही तो दाखवताना दिसत नाही. मुस्लीम समाजांतर्गत संबंधांचा आणि बिगर मुसलमानांशी असलेल्या संबंधांचा पुनर्विचार हे माझ्या मते भारतीय मुसलमानांपुढील आव्हान आहे आणि हे दोन्ही प्रश्न म्हणजे एकाच नाण्याची दोन अंगे आहेत.

कारण मूलतः व्यक्तीतील समानता नाकारण्याचा त्याचा अट्टाहास आहे. 'इस्लामने समानता प्रथम अमलात आणली' हे ठोकळेबाज उत्तर येथे उपयोगाचे नाही. कुठल्याच धर्मने व्यक्तीच्या हक्कांची कदर केलेली नाही. इस्लाम धर्मही याला अपवाद नाही. इस्लामने मुसलमान स्त्री-पुरुष यांत भेद केला आहे आणि मुस्लीम-बिगरमुस्लीम हा भेद नेहमीच तीव्र राहिला आहे. इस्लामच्या सिद्धान्तात हा भेद आहेच आणि मुस्लीम समाजातील व्यक्तींच्या वागण्यात तर तो पराकोटीला गेला आहे. म्हणून जेथे जेथे मुस्लीम बहुसंख्याक राष्ट्र आहेत, तेथे बिगरमुसलमानांना संपूर्ण समान अधिकार प्राप्त झालेले नाहीत आणि जेथे जेथे मुसलमान अल्पसंख्याक आहेत, तेथे तेथे मुस्लीम समाज त्या-त्या देशांच्या राष्ट्रप्रवाहात सहभागी होऊ शकलेला नाही. फिलिपाइन्समधील मुस्लिमांचा झालेला उठाव, थायलंडमधील मुस्लिमांची बंडखोरी आणि इथियोपियातील मुस्लिमांनी उभारलेले बंड हा मुस्लीम समाजाच्या इतरांबरोबर समान व्यवस्थेत न राहण्याच्या ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरांचा वारसा आहे.

हा प्रश्न खोलात जाऊन चर्चिला गेला पाहिजे. 'मुस्लीम समाज सतत धार्मिक राष्ट्रवादाचे निशाण उभारतो' याचा संबंध इस्लामच्या प्रस्थापनेशी आहे. इस्लाम धर्म आणि सत्ता यांचा प्रथमपासून मेळ घालण्यात आला व म्हणून 'सत्ता आणि शासन आपल्या हाती असावे' अशी एक ऐतिहासिक मुस्लीम मनोवृत्ती तयार झाली. अल्पसंख्याक असलेल्या ठिकाणी मुस्लीम समाज त्या-त्या देशांच्या राष्ट्रवादाशी झगडताना दिसतो, याचे इंगित 'आपल्या हाती सत्ता नाही' या ऐतिहासिक मनोवृत्तीशी आहे. पाकिस्तानचे मूळ या मनोवृत्तीत शोधावे लागेल. फिलिपाइन्स, थायलंड, इथियोपिया येथील मुस्लीम उठावांचे मूळ येथेच आहे. भारतीय मुसलमानांनी राष्ट्रीय प्रवाहाशी फटकून वागण्याचेदेखील हेच कारण आहे.

ऐतिहासिक दृष्टिकोण

मुस्लीम समाजाच्या या ऐतिहासिक आणि धार्मिक प्रवृत्तींची चर्चा करताना हे नमूद करणे भाग आहे की, सर्वच धर्मसमुदायांना एक विशिष्ट ऐतिहासिक दृष्टीकोन लाभलेला असतो आणि त्यातून काही प्रश्न निर्माण होतात. परंतु हळूहळू हा ऐतिहासिक दृष्टीकोन नष्ट होऊन समर्थ समाजप्रबोधनाच्या चळवळीचे अस्तित्व आणि प्रभाव इतर समाजांत जाणवतो.

एके काळी ख्रिश्चन समाजही याच अवस्थेत होता, हिंदू समाजाची स्थितीही याहून वेगळी नव्हती. आज ख्रिश्चन समाजाला धर्मनिरपेक्ष मानवी मूल्यांचे अधिष्ठान लाभले आहे आणि हिंदू समाज हळूहळू का होईना, त्या दिशेने वाट चाल करीत आहे. मुस्लीम समाजात या दिशेने झालेली प्रगती तुलनेने अतिशय मंद आहे, असे अतिशय खेदाने म्हणावे लागते. एकाच उदाहरणाने हे विधान सिद्ध करता येईल. पूर्व बंगालमधून आलेल्या निर्वासितांमध्ये मदतकार्य करण्यासाठी ख्रिश्चन धर्मसंघटना प्रथम धावून आल्या आणि रामकृष्ण मिशनही आपल्या अल्पशक्तीनुसार धावून गेली. मानवनिर्मित किंवा निसर्गनिर्मित, कोणत्याही आपत्तीच्या वेळी ख्रिश्चन धर्मसंघटना नेहमी जातिभेदातीत सेवेचे वा मदतीचे कार्य करतात, आणि रामकृष्ण मिशनदेखील – निदान भारतीय उपखंडापुरते – तरी जातिभेदातीत कार्य करते. अशा प्रकारचे जातिभेदातीत मानवी सेवेचे

कार्य करणारी कोणतीही मुस्लीम धर्मसंघटना अस्तित्वात नाही, हे मानवी मूल्यांची कदर न करणाऱ्या मुस्लीम समाजव्यवस्थेच्या प्रचलित प्रवृत्तीचे उदाहरण आहे.

सामुदायिक राष्ट्रवाद

मुस्लीम समाजात धर्म जाणि शासन, तसेच धर्म आणि राज्यव्यवस्था यांच्यात खऱ्या अर्थाने फारकत झालेली नाही. धर्मपंडित अशी फारकत करण्याचे नाकारतात आणि धर्माचा प्रभाव नसलेले सुशिक्षित मुसलमान वेगळ्या सामुदायिक (कलेक्टिव्ह) मुस्लीम राष्ट्रवादाचा आश्रय घेतात. सुशिक्षित मुसलमान धार्मिक नाहीत, म्हणून धर्मनिरपेक्ष ठरत नाहीत. जीना धार्मिक नव्हते आणि धर्मनिरपेक्षही नव्हते; आणि भारतातील आजच्या सुशिक्षित मुसलमानांच्या विचारांवर आणि कृतींवर जीनांच्या वागण्याचाच अधिक प्रभाव आहे. या सामुदायिक प्रवृत्तीमुळेच पाकिस्तानच्या निर्मितीनंतरदेखील जीना नेहमी मुसलमानांच्या भल्याचाच विचार करीत राहिले. आज पुन्हा तोच खेळ डॉ. ए. जे. फरिदी, बद्रुद्दीन तैय्यबजी , शेख अब्दुल्ला, महमद ईस्माईल आदी नेते आणि अब्दुल गफूर मुरानी यांच्यासारखे राजकीय भाष्यकार खेळताना दिसतात.

दुटप्पीपणा

मानवी मूल्यांची कदर न करण्याची आणि इस्लामची सामुदायिक निष्ठा बाळगण्याची ही प्रवृत्ती केवळ भारतीय मुसलमानांपुरती मर्यादित नाही; सबंध मुस्लीम जगतात हेच दृश्य दिसते. फिलिपाईन्समध्ये मुस्लिमांनी उठाव केला असता आणि अहमदाबादला दंगली झाल्या असता, कैरोच्या अल-अझहर विद्यापीठाचे प्रमुख धर्मगुरू 'मुसलमानांच्या कत्तली होत आहेत' अशी हाकाटी पिटतात आणि फिलिपाईन्सच्या व भारताच्या सरकारचा निषेध करतात. त्याचबरोबर 'अल्पसंख्याक पश्चिम पाकिस्तान्यांनी बहुसंख्याक पूर्व बंगाल्यांच्या चालविलेल्या कत्तली पाकिस्तानच्या एकतेसाठी आवश्यक आहेत' असे प्रतिपादन करतात.

मुस्लीम समाजातील तथाकथित उदारमतवाद खऱ्या अर्थाने उदारमतवाद नाहीच. तो समाज प्रामुख्याने अजून टोळ्यांची (ट्रायबल) संघटित (कलेक्टिव्ह) निष्ठा बाळगणारा राहिला आहे. लौकिक अर्थाने धर्माचा तसा फारसा प्रभाव नसलेल्या सुशिक्षित मुसलमानांची दृष्टीदेखील क्वचितच विशाल मानवतावादी जाणीव असलेली आढळून येते.

हकालपट्टीचे मूळ

हे सगळे प्रतिपादन करीत असताना या प्रश्नाच्या दुसऱ्या अंगाकडे मी दुर्लक्ष करू इच्छित नाही. केवळ मुस्लीम समाज धर्मनिरपेक्ष बनल्याने त्यांच्यापुढील समस्यांची उकल होईल, असे मानण्याइतका मी दूधखुळा नाही. अनेकदा केवळ अल्पसंख्याकांनी विवेकाने वागण्याचा प्रश्न नसतो. अल्पसंख्याकांनी कितीही विवेकाने, समंजसपणे आणि न्यायाने वागायचे ठरविले, तरी बहुसंख्याकांत धर्मनिरपेक्ष शक्ती बळकट नसतील, तर सामंजस्य निर्माण करताच येणार नाही. जर्मनी आणि पाकिस्तान ही याची उदाहरणे होत. पाकिस्तानात हिंदूंची व जर्मनीत ज्यूंची

ससेहोलपट झाली. पाकिस्तानात अथवा जर्मनीत जे काही घडले, ते त्या-त्या देशांच्या आणि समाजांच्या ऐतिहासिक परंपरांत शोधले पाहिजे. आपल्याला मी सांगू इच्छितो की, हजरत उमरच्या काळात अरबस्तानातून ज्यूंची व ख्रिश्चनांची हकालपट्टी करण्यात आली. पाकिस्तानातील हिंदूंच्या हकालपट्टीचे मूळ इस्लामच्या या ऐतिहासिक परंपरेला जाऊन भिडते आणि हिटलरच्या दुष्कृत्यांचे मूळदेखील जर्मनीच्या वांशिक, लष्करी परंपरेशी आणि मार्टिन लुथरच्या शिकवणुकीपर्यंत न्यावे लागते. सुदैवाने भारतातील हिंद समाजाच्या परंपरा आपल्याला वेगळ्या आढळतात.

भारतीय मुस्लिमांच्या प्रश्नांकडे या ऐतिहासिक व सामाजिक शक्तींच्या प्रवाहांच्या संदर्भात पाहणे आवश्यक आहे. माझ्या मते हे प्रवाह इतिहासाचे क्रम ठरवतात. 'गांधी आणि जीना यांच्यात समझोता झाला नाही अथवा जीनांचे काँग्रेसच्या नेत्यांनी समाधान केले नाही, म्हणून पुढला दुर्दैवी इतिहास घडला' असे मी मानीत नाही. ऐतिहासिक प्रवाहांच्या संदर्भात व्यक्ती नेहमी गौण ठरत असतात. अनेकदा ते प्रवाहच व्यक्तींना वळण देत असतात, हे आपण समजून घेऊ या.

बदल केव्हा शक्य?

जोपर्यंत मुस्लीम समाजातील व्यक्तीच हे प्रवाह बदलण्याची हिंमत दाखवीत नाहीत, तोपर्यंत मुस्लीम समाज सध्याच्या पेचप्रसंगातून मार्गच काढू शकणार नाही. जोपर्यंत मुस्लीम समाजात 'आपला इतिहास', 'आपला धर्म', 'आपला समाज' आणि 'आपल्या परंपरा' यांच्याकडे अलिप्तपणे पाहण्याची दृष्टी प्राप्त होत नाही, तोपर्यंत नवा विचार या समाजात रुजू शकणार नाही आणि तो रुजणार नाही, तोवर या समाजाला नवे वळणही लावता येणे शक्य नाही. हे कार्य सोपे नाही, याची मला जाणीव आहे, परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, हे फारसे कठीण आहे, असे मानण्याचे कारण नाही. आपण आरोप आत्मप्रौढीचा करणार नसाल, तर मी हे सांगू इच्छितो की, काही प्रमाणात मी हे करू शकलो आहे आणि मला त्याचा अभिमान वाटतो. त्यामुळे हितसंबंधी गटांकडून माझी जाणूनबुजून बदनामी करण्यात येते, याची मला जाणीव आहे. मला प्रखर टीकेला तोंड द्यावे लागले आहे आणि किमान दोनदा मी शारीरिक हल्ल्याला बळी पडलो आहे. याबद्दल तक्रार करण्यासाठी मी हे आपल्याला सांगत नाही. कारण माझी अशी श्रद्धा आहे की, अशा प्रकारच्या टीकेच्या आणि आत्मत्यागाच्या प्रचंड अंधाऱ्या गृहातून जाण्याची तयारी मुस्लीम समाजातील व्यक्तींनी दाखविली नाही, तर ते आपल्या समाजाला सध्याच्या अवस्थेतून बाहेर काढूच शकणार नाहीत. हे कार्य करीत राहिल्याने हळूहळू, महाराष्ट्रात तरी मुस्लीम जातीयवादाच्या आणि सनातन्यांच्या धक्कम किल्ल्याला आम्ही भगदाड पाडले आहे. आजच्या काळाला अनुसरून मुस्लीम समाजाची अंतर्गत पुनर्रचना करणे आणि आधुनिक राष्ट्रवादाच्या पायावर मुस्लीम समाजाचे व्यक्तीच्या पातळीवर बिगर मुसलमानाशी समानतेचे आणि राज्याबरोबर धर्मनिरपेक्ष संबंध अस्तित्वात आणणे हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचे थोडक्यात स्वरूप आहे.

५. २ नुराणींच्या चलाखीचा आलेख – हमीद दलवाई

जनाब अब्दुल गफर नुराणी यांनी काश्मीरवर एक पुस्तक लिहिले आहे. तसेच गेल्या काही वर्षांत 'इंडियन एक्स्प्रेस', 'ओपिनियन', 'करंट' इत्यादींतून लिहिलेल्या लेखांचे दोन संग्रह काढले आहेत. 'आपण कम्युनिस्ट-विरोधक आहोत' असा नुराणींचा दावा आहे. या भूमिकेमुळेच 'इंडियन एक्स्प्रेस' किंवा 'मार्च ऑफ दि नेशन'सारखी पत्रे अजून त्यांचे कंठाळी लिखाण छापत असतात. नुराणींच्या लिखाणाची तऱ्हा ठरून गेलली आहे. 'घटनांची जंत्री सांगणे' याखेरीज त्यात विशेष काही नसते. एखाद्या पुस्तकाचे त्यांनी परीक्षण केले, तर त्यात पुस्तकातील अवतरणे उद्धृत करण्यापलीकडे काही नसते. त्यांच्या कम्युनिस्ट-विरोधामुळे असे फुटकळ लिखाण फ्रंक मोराइस व पिलू मोदी प्रसिद्ध करतात.

त्रिसूत्री योजना

'फाळणीला गांधी-नेहरू आणि काँग्रेसचे इतर नेतृत्व जबाबदार आहे', अशी ठाम भूमिका नुराणींनी नेहमी घेतलेली आहे. जिना समंजस, प्रामाणिक असल्याची शिफारस पत्रे ते देतात. भारतात लोकशाही असल्यामुळे असत्य इतिहास सांगण्याचे स्वातंत्र्य नुराणींना आहे, हे आपण मान्य केले पाहिजे. जिना संत असल्याचे सांगताना ते जिनांच्या वक्तृत्वाचा आधार घेतात आणि गांधी-नेहरूंच्या वक्तृत्वावरून त्यांचे मूल्यमापन न करता त्यांच्या हेतूबद्दल शंका प्रदर्शित करतात. त्रिमंत्र्यांनी सुचविलेली त्रिसूत्री योजना कशी चांगली होती व जिनांनी ती प्रामाणिकपणे कशी स्वीकारली होती, याचे 'संडे स्टँडर्ड'मधील एका लेखात त्यांनी काही महिन्यांपूर्वी प्रतिपादन केले होते. या योजनेप्रमाणे बंगाल आणि आसाम यांचा एक गट; पंजाब, बलुचिस्तान, सिंध, सरहद्द प्रांत यांचा दुसरा गट आणि उरलेल्या भारताचा तिसरा गट असे भारतासारख्या एका दुर्बल संघराज्यात तीन गट केले होते. यांतील पहिले दोन गट मुस्लीम बहुसंख्याक होते आणि संघराज्याला संरक्षण व परराष्ट्र असे दोनच धोरणविषयक अधिकार राहणार होते. शिवाय या प्रांतांना दर दहा वर्षांनी संघराज्यातून फुटून जाण्याचा पर्याय देण्यात आला होता. ही योजना फेटाळल्याने सध्याच्या पाकिस्तानची योजना स्वीकारावी लागली व याचा दोष नेहरूंकडे देण्याचा आपल्याकडील सवंग टीकाकारांचा नेहमी रोख असतो.

फाळणीएवजी त्रिसूत्री योजना स्वीकारली असती, तर कोणता इतिहास घडला असता, याचा या टीकाकारांनी विचार केलेला नाही. ही योजना जिनांनी स्वीकारली होती. ही योजना स्वीकारण्यामागे ती प्रामाणिकपणे राबविण्याचा जिनांचा हेतू असल्याचा निर्वाळा नुराणी जिनांबद्दल देतात व सिमला येथील एका सत्कारात 'मुसलमानांनी नेहमी भांडणाचा विचार करू नये' या त्यांनी काढलेल्या उद्गारांचा हवाला देतात. परंतु त्रिसूत्री योजना स्वीकारावयाच्या कौन्सिलच्या बैठकीत 'भावी पाकिस्तानची बीजे या योजनेत आहेत' असे उलट आश्वासन ते लीगवाल्यांना देतात. मात्र हे विधान मुसलमानांना व मुस्लीम लीगवाल्यांना खूश करण्यासाठी

होते; खरोखर त्यांना पाकिस्तान अभिप्रेत नव्हते, असे नुराणींचे म्हणणे आहे.

जिनांच्या एका वक्तव्यावरून जिनांना संत ठरवायचे, तर हिटलरलादेखील संत ठरवावे लागेल. कारण त्यानेही अधूनमधून शांतता, सदिच्छा, मंत्री इत्यादी भावना व्यक्त करणारी वक्तव्ये केली आहेत. सध्या भुत्तोदेखील शांततेची भाषा करीतच आहेत. आणखी काही वर्षांनी नुराणी त्यांची आधीची, भारताच्या प्रदेशावर दावा सांगणारी वक्तव्ये लपवून व सध्याची वक्तव्ये उद्धृत करून ते भारतमंत्रीसाठी किती उत्सुक होते, अशी मखलाशी करायला कमी करणार नाहीत. तसे त्यांनी केलेले आहे. 'ओपिनियन'मध्ये 'मिथ ऑफ इंडिपेन्डन्स' या भुत्तोंच्या पुस्तकाचे परीक्षण करताना भुत्तोंनी त्या पुस्तकात भारतीय प्रदेशावर दावा केला असल्याचा उल्लेख नुराणींनी टाळला आहे. भुत्तोंना नेहरूंविषयी आदर असल्याचे सांगून त्यांनी भुत्तोंविषयी भारतीय जनमानसांत अनुकूल मत बनवण्याचा चाणाक्षपणा केला आहे.

योजनेतील धोका

त्रिसूत्री योजनेविषयी नुराणींना सध्याच एवढा उमाळा का आला, हे ध्यानी घेतले पाहिजे. ही योजना न स्वीकारल्यामुळे सध्याची फाळणी झाली. परंतु फाळणी झाली नसती, त्रिसूत्री योजना स्वीकारली असती, तर इतिहासाचा क्रम कसा राहिला असता, हा विचार केल्यास नुराणींच्या प्रतिपादनामागील धूर्तपणा लक्षात येतो. या योजनेप्रमाणे, दर दहा वर्षांनी फुटून निघण्याचा अधिकार प्रांतांना दिलेला होता. या योजनेनुसार सबंध बंगाल, आसाम, सबंध पंजाब, काश्मीर, सरहद्द, बलूचिस्तान, सिंध एवढ्या मोठ्या प्रदेशाचे दहा वर्षांनी पाकिस्तान झाले असते. आणि समजा, त्रिसूत्री योजना लीगला प्रामाणिकपणे राबवायची होती, असे वादाकरिता मानले, तरी आता भारतात असलेल्या आसाम, प. बंगाल, भारतीय पंजाब, अधिक काश्मीर व हैदराबाद, भोपाळ, जुनागड इत्यादी मुस्लीम संस्थाने एवढ्या प्रदेशात मुस्लीम समाजाचे आणि पर्यायाने लीगचे वर्चस्व राहिले असते. ही योजना स्वीकारण्यामागे 'अर्ध्या भारतावर मुसलमानांचे वर्चस्व राहत आहे' असा जिनांचा विचार असला, तरी त्यात आश्चर्य मानण्याचे कारण नाही. यामुळे जिना धर्मनिरपेक्ष ठरत नाहीत आणि त्यांची भलावण करणारे नुराणीही धर्मनिरपेक्ष ठरत नाहीत. परंतु नेहरूंनी हा पुढचा धोका ओळखला, त्रिसूत्री योजनेला विरोध केला आणि सध्याची फाळणीची योजना स्वीकारायला जिनांना भाग पाडले, हा नुराणींचा नेहरूंवर असलेला खरा राग आहे. कारण 'कुठल्याही परिस्थितीत भारत एकसंध राहायला हवा होता' अशी लबाड भूमिका नुराणी घेतात. आता बांग्लादेश अलग झाल्यामुळे मुस्लीम राष्ट्र कोलमडले. सामुदायिक संघटनांतून निर्माण होणारी, सवलती मिळवण्याची मुस्लिमांची ताकदही संपुष्टात आली. महासंघांसारख्या योजनेनेच आता मुसलमानांना पुन्हा ही ताकद प्राप्त होऊ शकते, हे नुराणींच्या प्रतिपादनामागचे एक कारण आहे. दुसरे कारण 'देशाची फाळणी' हा हिंदूंनी निष्कारण प्रतिष्ठेचा विषय बनविला आहे, हे आहे. म्हणून 'जिना अटी घालत होते, त्या मान्य करून तुम्ही फाळणी टाळायला हवी होती' असे नुराणी सुचवितात. परंतु अर्ध्या भारतावर मुसलमानांचे वर्चस्व मान्य करून फाळणी टाळावयाची, असे गांधी-नेहरूंनी ठरविले नव्हते; मुसलमानांना न्यायाने व

समानतेने वागवण्याची हमी देऊन त्यांना अखंड भारत निर्माण करावयाचा होता. हे शक्य होत नसल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी फाळणीला नाइलाजाने मान्यता दिली. परंतु न्याय म्हणजे काय? न्यायाची जिनांची व्याख्या उफराटी होती. 'अध्र्या हिंदुस्थानवर आम्हाला वर्चस्व गाजवू देणे, म्हणजे न्यायाने वागवणे' अशी जिनांची न्यायाची भूमिका होती. म्हणूनच नुराणींसारखे जिनावादी त्रिसूत्री योजनेचे समर्थन करून, हीच भूमिका घेत आहेत. 'त्रिसूत्री योजनेनुसार मोठे पाकिस्तान बनले नाही' अथवा 'अखंड भारतात मुसलमानांना ५० टक्के वर्चस्व गाजवायला मिळाले नाही' ही नुराणींची व्यथा आहे.

बांग्लादेश

अर्थात, पाकिस्तानचा आकार वाढविण्याचे आपले प्रयत्न नुराणींनी सोडून दिलेले नाहीत. काश्मीर पाकिस्तानात सामील व्हावे, म्हणून गेली काही वर्षे त्यांनी काश्मीरच्या सार्वमताचा पुकारा चालविला आहे. घटना असत्य सांगण्याचा त्यांचा हातखंडा काश्मीर प्रकरणी चालविलेल्या वकिलीतही दिसून येतो. काश्मीरवर त्यांनी असेच एक रद्दी व प्रचारकी पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकासाठी प्रस्तावना व ओळखवजा मजकूर लिहवून घेऊन जयप्रकाश नारायण व ब. ध. कर्णिक या भाबड्या सर्वोदयी आणि गॅंधवादी नेत्यांनाही नुराणींनी पाकिस्तानी प्रचाराच्या जाळ्यात अडकविले. जयप्रकाशजी आणि वसंतराव कर्णिक यांना अभिप्रेत असलेला मानवतावाद जंगली टोळ्यांचे मध्ययुगीन हिंस्र राजकारण करणाऱ्या, बाह्यतः सुशिक्षित परंतु अंतर्यामी अशिक्षित असलेल्या मुस्लीम नेत्यांना आणि नुराणींसारख्या त्यांच्या प्रचारकांना अभिप्रेत नसल्याचे आता या मंडळींना उमगले असेल, असे मी समजतो. कारण जयप्रकाशजी अथवा वसंतराव कर्णिक खरेखुरे मानवतावादी आहेत. त्यांना काश्मिरी जनतेच्या मूलभूत हक्कांची चाड आहे, तशीच बांग्लादेशच्या आणि पख्तुन जनतेच्या हक्कांचीदेखील आहे. बांग्लादेशमध्ये पाकिस्तानी सैन्याने अत्याचार करताच जयप्रकाशजी आणि वसंतराव कर्णिक यांचे मानवतावादी मन खडबडून जागे झाले.

जयप्रकाशजींनी तर 'युद्ध आवश्यक असल्यास युद्धही केले पाहिजे' ही भूमिका घेतली, परंतु नुराणींनी मात्र 'मार्च ऑफ द नेशन'मधल्या लेखातून 'युद्धाला किती खर्च येतो, हे जयप्रकाशजींना कळते काय?' *(पाहा, दि. १९ जून १९७१चा 'मार्च ऑफ दि नेशन')* असा हेटाळणीवजा प्रश्न विचारला. जयप्रकाशजी काश्मीरच्या सार्वमताचा पुकारा करत होते, तेव्हा 'या सार्वमतामुळे भारताला कोणती किंमत मोजावी लागेल?' असा प्रश्न नुराणींनी उपस्थित केलला नाही. 'त्या बाबतीत सार्वमताचे आश्वासन पुरे करण्यासाठी भारताने कोणतीही किंमत मोजावी' अशी तेव्हा नुराणींची भूमिका होती. कारण त्यामुळे काश्मीर पाकिस्तानला मिळणार होता. भारतावर त्याचे कोणते परिणाम झाले असते, याचा विचार करण्याची गरज नुराणींना मग कशाकरता वाटावी! नुराणींनी ज्या सुरात जयप्रकाशजींची हेटाळणी केली आहे, ती तर अधिक संतापजनक आहे. अखेर इंदिरा गांधींनी युद्ध केले. पाकिस्तानचे दोन तुकडेही झाले आणि जवळजवळ लाख पाक सैनिकांना शरण यावे लागले. या सगळ्याची किती किंमत झाली, हे ते हेटाळणीच्या सुरात इंदिरा

गांधींना विचारतील काय? नुराणी विचारणार नाहीत. कारण सध्या अंतर्गत सुरक्षा कायदा अस्तित्वात आहे. या बाबतीत जमात-ए-इस्लामी वाले निदान प्रामाणिक तरी आहेत. नुराणी 'टोपीबदलू' आहेत.

हे काही मासले

काश्मीरवरील पुस्तकात नुराणींनी केलेल्या चलाखीची उदाहरणे येथे देतो. पुस्तकाच्या आरंभीच त्यांनी जुनागडचा उल्लेख केला आहे व 'काश्मीर व जुनागड या दोन्ही ठिकाणी सार्वमत घेण्याची सूचना पाकिस्तानने केली, परंतु भारत सरकारने त्या सूचनेकडे दुर्लक्ष केले' असे म्हणून या वादात पाकिस्तानची भूमिका न्याय्य व भारताची अन्याय्य असल्याचे खोटे सांगितले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, हंगामी मंत्रिमंडळात पाकिस्तानचे संस्थानविषयक मंत्री अब्दुर्रब निस्तार व काँग्रेसचे नेते यांची माउंटबॅटन यांनी काही धोरणांबाबत मान्यता मिळविली होती. त्यात 'दुसऱ्याच्या प्रदेशात असलेल्या संस्थानाला आपल्या प्रदेशात विलीन करून घेऊ नये' असे ठरले होते. पाकिस्तानने जुनागडप्रकरणी या अलिखित कराराचा भंग केला. माउंटबॅटननी या प्रश्नावर लियाकत अली खानांशी बोलणे केले, तेव्हा 'भारताने हवे तर जुनागडप्रकरणी युद्ध करावे' अशी उद्दाम भाषा लियाकत अली खानांनी वापरली. पुढे काश्मीर भारतात सामील झाले, तेव्हा 'जुनागडचे विलीनीकरण मला न विचारता करण्यात आले' असे जिनांनी माउंटबॅटनना सांगितले. भारताच्या अंतर्गत असलेले एक संस्थान विलीन करून घेताना पाकिस्तानच्या गव्हर्नर जनरलचे मंत्री त्याला सांगत नाहीत, यावर माउंटबॅटनचा विश्वास कसा बसावा?

'काश्मिरात घुसलेले टोळीवाले आपण पाठविले नाहीत' असे जिना प्रथम म्हणाले, परंतु 'भारतीय सैन्य मागे हटावयास तयार असेल, तर आपण टोळीवाल्यांना मागे खेचू' असे विधान त्यांनी नंतर केले व टोळीवाल्यांना घुसविल्याची अप्रत्यक्ष कबुली दिली. 'मिशन विथ माउंटबॅटन' या माउंटबॅटन यांचे चिटणीस अॅलन कॅम्बेल जॉन्सन यांच्या पुस्तकात आपल्याला ही सर्व माहिती सापडते, परंतु सत्य सांगतील तर ते नुराणी कसले! 'संस्थानिकांना सार्वभौम अधिकार बहाल केलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर विलीनीकरणाची सक्ती करू नये' असे जिना सतत म्हणत होते आणि जुनागड, त्रावणकोर, भोपाळ, हैदराबाद, जोधपुर ही संस्थाने भारतात सामील होऊ नयेत म्हणून या संस्थानिकांना स्वातंत्र्य जाहीर करावयास उत्तेजन देत होते. हे करीत असताना 'काश्मीरमध्ये टोळीवाले घुसवून ते संस्थान पाकिस्तानात आणावयाचे' असा त्यांनी पवित्रा घेतला होता. संस्थानातील जनतेच्या आंदोलनाच्या प्रभावामुळे भारतातील संस्थाने स्वतंत्र व्हावयास धजावली नाहीत. हैदराबादसारख्या राज्याला स्वतंत्र व्हावयास भौगोलिक परिस्थितीही प्रतिकूल ठरली. जुनागडसारखे पाकिस्तानात सामील झालेले संस्थान भारताने सैन्य पाठवून खेचून आणले. काश्मीरमधील जनतेच्या नेत्यांच्या संमतीने काश्मीर भारतात सामील झाल आणि टोळीवाल्यांना भारतीय सैन्याने मागे रेटले. अशा रीतीने 'भारताचे विघटन करण्याचे आपले बेत फसले' हे ध्यानी येताच जिना काश्मीरच्या सार्वमताची भाषा बोलू लागले. तोपर्यंत डावपेचांच्या युद्धात जिनांनी सर्वच घालविल्यामुळे आता संस्थानिकांच्या हक्काची भाषा मागे पडून जनतेच्या

हक्काची भाषा सुरू झाली. जिनांनी डावपेचात जे घालविले होते, ते सार्वमताने त्यांना द्यायला हवे होते, असे जिनाभक्त नुराणीच सुचवू शकतात. जिना प्रामाणिक असते, तर भारतीय प्रदेशातील संस्थानांना फुटून निघण्यास त्यांनी उत्तेजन दिले नसते, आणि तशा परिस्थितीत काश्मीरला पाकिस्तानात सामील झाल्याशिवाय गत्यंतर नव्हते, परंतु जिनांसारख्या बाह्यांगी सुशिक्षित आणि अंतर्यामी अशिक्षित असलेल्या माणसाच्या दृष्टीने राजकारण हा लक्षावधी माणसांच्या जीवनाशी खेळ खेळण्याचा उद्योग बनतो, तेव्हा नेहरूंसारख्या उदात्त मानवतावाद्यालाही सार्वमताची ढाल पुढे करून काश्मीरमध्ये सैन्य घुसविणे क्रमप्राप्त ठरते. तेदेखील तेथील जनतेच्या प्रतिनिधींच्या इच्छेनुसार घातले जाते. जिनांच्या डावपेचांना यश आले नाही, भारताचे राजकीय संघटन झाले आणि पाकिस्तानला अधिक प्रदेश मिळाला नाही, याबद्दल जिनाभक्त नुराणींनी जरूर शोक व्यक्त करावा. तथापि इतिहास खोटा सांगू नये.

कायमची सीमारेषा

काश्मीरच्या वादाचा इतिहास येथे नव्याने सांगण्याची जरुरी नाही. या प्रश्नावर भारत सरकारच्या पाकिस्तानशी अनेकदा वाटाघाटी झाल्या. तसेच हा प्रश्न सोडविण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे अनेक योजना सुचविल्या गेल्या. त्यांतील दोन सूचनांचा येथे उल्लख करतो. सर ओवेन डिक्सन यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे केलेल्या मध्यस्थीच्या प्रयत्नांत 'जम्मू आणि लडाख भारताकडे राहावेत, पाकव्याप्त काश्मीर पाकिस्तानकडे राहावे व केवळ काश्मीर खोऱ्याचे सार्वमत घेऊन तेवढा भाग सार्वमताच्या निर्णयानुसार भारत किंवा पाकिस्तानात सामील करून घ्यावा' अशी योजना सुचविली होती. 'भारताने ही योजना फेटाळली' असे नुराणींनी म्हटले आहे, पण त्याची कारणे दिली नाहीत. त्यानंतर चीनचे आक्रमण झाले, तेव्हा डंकन सँन्डस यांच्या मध्यस्थीने स्वर्णसिंग-भुत्तो वाटाघाटी झाल्या. या वाटाघाटींत भारताने पाकिस्तानला काश्मीर खोऱ्यातील काही प्रदेश देऊन सध्याची शस्त्रसंधी देण्याएवजी कायमची सीमा बनवून हा वाद मिटविण्याची तयारी दर्शविली होती. भारत काश्मीर खोऱ्यात बुलर सरोवरापर्यंत मागे हटावयास तयार होता. परंतु पाकिस्तानने जम्मूमधील कटुवा जिल्हा वगळून बाकी सर्व प्रदेशावर दावा सांगितल्यामुळे या वाटाघाटी यशस्वी होऊ शकल्या नाहीत.

नुराणींनी आपल्या पुस्तकात 'या वाटाघाटी अयशस्वी झाल्या' एवढेच म्हटले आहे; कारणे सांगायचे टाळले आहे, परंतु 'जनता' साप्ताहिकात बलराज पुरींबरोबर नुराणींच्या झालेल्या वादात नुराणींचे अंतरंग उघडे झाले. या वाटाघाटींबाबत लिहिताना दि. १६ मे १९६५च्या 'जनता'मध्ये ते म्हणतात, 'भुत्तो-स्वर्णसिंग वाटाघाटींमध्ये पाकिस्तानला सवलती देण्यात आल्याच नाहीत. 'जैसे थे' परिस्थिती कायम ठेवण्याचा भारताचा तो डाव होता.' थोडक्यात, नुराणींच्या मते 'सबंध जम्मू व काश्मीर पाकिस्तानला देणे' म्हणजेच खऱ्याखुऱ्या सवलती देणे ठरले असते. अर्थात एवढ्यानेदेखील नुराणींचे समाधान होईलच असे नाही. नुराणींनी सबंध काश्मीर-जम्मूच्या सार्वमताचा आग्रह धरला आहे, हे फार सूचक आहे. जम्मू आणि लडाख येथील बौद्ध आणि हिंदू यांना दुसरा पर्याय द्यावयास ते तयार नाहीत, असा याचा अर्थ होतो.

'मुसलमानांबरोबर त्यांनीही पाकिस्तानात सामील झाले पाहिजे' अशी ही भूमिका आहे. म्हणजे उपखंडाच्या संदर्भात मुस्लीम अल्पसंख्याकांना फुटून निघण्याचा अधिकार असला पाहिजे, तर जम्मू-काश्मीरच्या संदर्भात मुस्लीम बहुसंख्यांकांना फुटून निघण्याचा अधिकार असला पाहिजे, असे नुराणींचे म्हणणे आहे. 'जेथे हिंदू अल्पसंख्याक आहेत, तेथे त्यांना उपखंडातील मुस्लीम अल्पसंख्याकांचा अधिकार नको' अशी ही भूमिका आहे. नुराणींची ही भूमिका जिनांच्या भूमिकेशी जुळतीच आहे. 'पाकिस्तानच्या प्रदेशात असलेल्या हिंदूंची मने वळवा' अशी गांधीजींनी एकदा जिनांना सूचना केली होती, परंतु 'त्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार नाही' असे म्हणून जिनांनी ती फेटाळून लावली!

सुशिक्षित मुसलमानांच्या अशिक्षित राजकीय विचारप्रणालीशी ही भूमिका सुसंगतच आहे. सतत कोलांटी उडी मारणाऱ्या नुराणींविषयी हे सविस्तर लिहिण्याचे कारण हेच की, बांग्लादेश स्वतंत्र झाल्यानंतर 'आपण जणू भारतीय राष्ट्रवादाचे प्रथमपासून पुरस्कर्ते आहोत' असे सांगायला त्यांनी आपल्या लिखाणातून सुरुवात केली आहे. कालपर्यंत जे नुराणी 'काश्मीर पाकिस्तानला द्या' असे सांगत होते, भारतीय मुसलमानांच्या सगळ्या बऱ्यावाईट चळवळींचे समर्थन करीत होते, ते एकाएकी धर्मनिरपेक्षवादी, राष्ट्रवादी झाले, याच्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. मुस्लीम नेहमी असाच दुटप्पीपणा करीत आले आहेत. बगदाद येथे सुन्नी राजवट उलथून टाकून शिया राजवट आली. काही सुन्नी स्वतःला शिया म्हणवून घेत. याउलट शियांना घालवून सुन्नी सत्ताधीश झाले की, शिया स्वतःला सुन्नी म्हणवून घेत. नुराणींची कोलांटी उडी या पद्धतीची आहे. मुसलमान समाजात सामर्थ्यापुढे झुकण्याची एक विलक्षण परंपरा आहे, आणि नुराणी हे त्याचे चालते-बोलते उदाहरण आहे. म्हणूनच त्यांना स्वतःची कातडी बचावण्यासाठी बांग्लादेशाच्या निर्मितीचे आता दुःख झाले आहे. पाकिस्तानने जिहादची भाषा वापरणे त्यांना अमान्य असल्याचे ते आपल्या लिखाणात भासवतात, परंतु काश्मीरमध्ये टोळीवाले घुसविताना जिना व लियाकत अली खानांनी जिहादचीच भाषा वापरली होती. नुराणींनी त्याबद्दल नापसंती व्यक्त केल्याचे ऐकिवात नाही. उलट जिना व लियाकत खान सेक्युलर कसे आहेत, हे ते टाहो फोडून सांगत असतात. सध्या नुराणींत झालेला हा बदल शिया व सुन्नी यांच्यावर निष्ठा बदलण्याच्या परंपरेतला आहे. अगदी अलीकडचे, हैदराबाद राज्यातील उदाहरण देणे येथे सयुक्तिक ठरेल. पोलिस ॲक्शन होण्यापूर्वी हैदराबादच्या एका खेड्यात हिंदूंना गावातील मुसलमानांच्या छळाला तोंड द्यावे लागले होते. गावात दोन रेडिओ होते. त्यावरून बातम्या कळत. त्यांतील एक हिंदूंकडे होता. सरकारने तो नेमका जप्त करून नेला. त्यामुळे हिंदूंना बाहेरच्या बातम्या कळणेही मुश्किल झाले.

एका मुसलमानाकडे रेडिओ असल्यामुळे मुसलनानांना मात्र सगळे कळत होते. हैदराबादमध्ये भारतीय सैन्य घुसले आणि ते हैदराबाद शहरापर्यंत पोहोचले, तरी तिथल्या गावातील हिंदूंना पत्ताच नव्हता. एक दिवस गावातले मुसलमान गाव सोडून निघून गेले, त्यामुळे हिंदूंची पाचावर धारण बसली. 'आपल्यावर बाहेरील मुसलमानांच्या मदतीने हल्ला करण्याचा यांचा बेत असावा' असे वाटून ते रात्रभर जागत बसले. परंतु तसे काहीच झाले नाही. सकाळी बेगळाच चमत्कार

घडला. बाहेर गेलेले गावातील सगळे मुसलमान घोळक्याने परत आले. त्यांच्या डोक्यावर गांधी टोप्या होत्या. गावातील हिंदू भेटताच ईदच्या दिवशी मिठी मारून भेटतात तसे ते भेटू लागले आणि जोरजोराने 'जय हिंद'च्या घोषणा देऊ लागले. सत्तेचा महिमा असा असतो. सुज्ञास अधिक सांगण्याची गरज नाही. सध्या हैदराबादच्या या परंपरेत नुराणींचा 'जय हिंद'चा घोष 'इंडियन एक्सप्रेस' व 'मार्च ऑफ दि नेशन'मध्ये सुरू झाला आहे.

टोपी बदलू तकय्यावाले

इस्लामी धर्मशास्त्रात 'टोपी बदल' प्रकाराला 'तकय्या' असे म्हणतात. आपल्या आंतरिक निष्ठा कायम ठेवून प्राप्त परिस्थितीशी वरकरणी जुळती भूमिका घेणे, असा तकय्या याचा अर्थ होतो. नुराणींनी तकय्याचे तंत्र चांगलेच आत्मसात केले आहे. उदा. अयुबखानांच्या काळात पाकिस्तानचा प्रभाव वाढला होता आणि पाकिस्तान काश्मीर प्रश्नावर भारताशी आक्रमक पद्धतीने वागत होता, तेव्हा नुराणींनी काश्मीर प्रश्नावर येथे प्रबळ लॉबी निर्माण करण्याचा प्रयत्न केला, परंतु १९६५च्या युद्धात पाकिस्तानने मार खाल्ला, तेव्हा नुराणींची भूमिका बदलली व 'काश्मीर प्रश्नात पाकिस्तान भागीदार नाही' असे ते सांगू लागले. मात्र शेख अब्दुल्लांची तळी उचलण्याचे काम त्यांनी चालूच ठेवले. बांग्लादेशचा लढा सुरू झाला, तेव्हा यांचे सुरुवातीचे धोरण असेच होते. त्यांनी याह्या खानांबरोबर मुजिबलाही दोष दिला, परंतु आता बांग्लादेश स्वतंत्र झाला असल्यामुळे झाल्या प्रकाराबद्दल ते केवळ याह्या खानांना दोष देतात.

'काश्मीरच्या जनतेच्या इच्छा भारताने अजमावल्या नाहीत आणि शेख अब्दुल्लांना न्याय दिला नाही' असा ते रात्रंदिवस टाहो फोडीत होते, परंतु युद्धानंतर भारताचे सामर्थ्य वाढले आणि 'काश्मीर प्रश्न उकरून काढणे पाकिस्तानला कठीण होणार' हे नुराणींना दिसून आले. तसेच पाकिस्तानच्या धार्मिक राष्ट्रवादाचा पायाच उखडला गेला असल्यामुळे काश्मीरमधील फुटीर चळवळीवरही आघात होणार असल्याचे नुराणींना कळून आले. तेव्हा कुठे नुराणी आता 'मार्च ऑफ द नेशन'मध्ये 'काश्मीरचे नेते वस्तुनिष्ठ धोरण ठेवत नाहीत' अशी टीका हळूच करू लागले आहेत. याचा अर्थ असा की, भारत अडचणीत असला, अंतर्गत प्रश्नांनी दुबळा असला, तर नुराणी आणि त्यांच्यासारखे 'टोपीबदलू' तकय्यावाले भारतविरोधी भूमिका घेणार, 'भारतीय प्रदेश दुसऱ्यांना द्या' असे सुचविणार, पण जर भारत सामर्थ्यवान बनला आणि पाकिस्तानसारख्या शत्रूंना त्याने धूळ चारली, तर हेच नुराणी भारताच्या धोरणाची तरफदारी करणार!

अर्थात, भारताने कमावलेल्या या सामर्थ्याच्या क्षणी नुराणींसारख्याने भारताला सर्वस्वी अनुकूल भूमिका घेण्याची काही शक्यता नाही. भारतीय धोरणाला असलेला त्यांचा पाठिंबा नेहमी हातचा राखूनच असेल. हैदराबादेत सैन्य घुसल्यानंतर गांधीटोप्या घालून 'जय हिंद'ची घोषणा देणाऱ्यांनी पुढे अनुकूल परिस्थिती येताच तामिरे मिल्लत काढलीच. नुराणीदेखील परिस्थितीच्या बदलानुसार आपली भूमिका बदलत राहतील. त्यामुळे नुराणींच्या पुढील भूमिकांचा अंदाज घेणे कठीण नाही.

फसवा पाठिंबा

तूर्त ते भारत सरकारच्या भूमिकेला सर्वसाधारण पाठिंबा दर्शवित राहतील. बांग्लादेशच्या स्वातंत्र्याला त्यांची मान्यता असेलच. कारण भुत्तोदेखील मान्यता देण्याच्या अवस्थेला आल्या असल्यामुळे बांग्लादेशच्या स्वातंत्र्याला नुराणी तरी विरोध करून काय करणार?

खरा प्रश्न भारतीय मुसलमानांचा जातीयवाद आणि भारत-पाक संबंध यांविषयीच्या नुराणींच्या भूमिकेचा आहे. या बाबतीत त्यांची भूमिका भारतीय मुसलमानांच्या जातीयवादाची कड घेणारी व 'भारताने पाकिस्तानला सबलती द्याव्यात' असे सांगणारी राहील, याचा पडताळा त्यांच्या लिखाणातून मिळू लागलेलाही आहे. 'मार्च ऑफ द नेशन' साप्ताहिकात गेल्या महिन्यात लिहिलेल्या लेखात भारत-पाक संबंधांवर त्यांनी दोन्ही देशांच्या वाटाघाटी सुचविल्या आहेत. त्यात ते म्हणतात : 'निर्धारित आंतरराष्ट्रीय सीमांपासून भारतीय फौजांनी मागे येण्यास काही अडचण नाही; प्रश्न काश्मीरचा आहे. १९६३ साली भुत्तो-स्वर्णसिंग वाटाघाटींत शस्त्रसंधी रेषा थोडा फेरबदल करून आंतरराष्ट्रीय सीमा बनविण्याची योजना चर्चिली गेली होती. तेच सूत्र पुन्हा पकडून दोन्ही पक्षांनी जर कल्पकता दाखविली, तर हा प्रश्न सुटणे कठीण नाही.' थोडक्यात, नुराणींना असे सुचवायचे आहे की, '१९६३ मधील शस्त्रसंधी रेषा मागे घेऊन आता भारताने पुन्हा तडजोड करण्याची योजना सुचविली पाहिजे' परंतु याच नुराणींनी बलराज पुरींना उत्तर देताना 'शस्त्रसंधी मागे घेण्याची सबलत ही खरी सबलतच नव्हे' असे हेटाळणीवजा सांगितले होते, हे बर नमूद केलेच आहे. अर्थात, याबर नुराणी बकिली थाटाने असे म्हणतील की, 'मी ती योजना आता सुचवलेली नाही.' मग नुराणींना नेमके काय सुचवायचे आाहे? आता युद्धानंतर शस्त्रसंधी रेषा पुढे रेटली गेली आहे आणि आताची परिस्थिती बेगळी आहे. १९६३ साली, चीनच्या हल्ल्यानंतर हे सरकार नीतिधैर्य खचलेल्या अवस्थेत बाबरत होते आणि काश्मीर प्रश्न सोडविण्यास पाश्चात्त्य राष्ट्रांनी भारतावर दडपण आणले. त्या वेळी पाकिस्तान व चीन या दोन शत्रूंशी एकदम लढणे शक्यही नव्हते. १९६३च्या वाटाघाटी अशा परिस्थितीत झाल्या. त्यामुळे तेव्हा देऊ केलेल्या सबलती तेव्हाच्या अडचणीच्या अवस्थेत दिलेल्या होत्या. आता भारत पराभूत झालेला नाही आणि त्याचे नीतिधैर्यही खचलेले नाही. पराभूत भारताला 'या काय सबलती झाल्या?' असे हेटाळणीवजा विचारणाऱ्या नुराणींनी आता पराभूत पाकिस्तानबाबत वकिली करण्याचा आव जाणू नये. भारत युद्धात विजयी झालेला आहे. आपल्या 'मार्च ऑफ दि नेशन'सारख्या फुटकळ साप्ताहिकातील लेखाने भारत दुबळा असतानाच्या सबलती आता, विजयी भारत देईल असा हास्यास्पद भ्रम नुराणी बाळगू शकतात! त्यांनी हे ध्यानी घ्यावे की, आता शस्त्रसंधी रेषा मार्ग येण्याची काही शक्यता नाही; मलबार हिलपर्यंत येण्याची तर मुळीच शक्यता नाही! आता ती पुढे ढकलली जाईल; ढकलली गेलीच आहे. अशा या बदललेल्या परिस्थितीत भारत-पाक वाटाघाटी कशा व्हाव्यात, हे नुराणी अंतरीच्या निष्ठा प्रकट न करता तकय्याच्या टोपीबदल अथनि तरी सांगतील काय?

(महाराष्ट्र टाइम्स, १७ मार्च १९७२)

५.३ सिमला कराराचा अन्वयार्थ – हमीद दलवाई

सिमला येथील इंदिरा गांधी–भुत्तो करारावर नेहमीप्रमाणे परंपरागत प्रतिक्रिया व्यक्त व्हाव्यात, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. जनसंघाने अपेक्षेप्रमाणे कराराचा धिक्कार केला आहे आणि इतर साऱ्या पक्षांनी वेगळ्या परिभाषेत स्वागत करण्याची अहमहमिका चालविली आहे; काही समाजवादी नेत्यांनी तर 'महासंघराज्याशिवाय शांतता नाही' ही आपली जुनी रेकॉर्ड बदलत्या परिस्थितीतदेखील वाजवीत ठेवली आहे.

वास्तविक, या कराराचे पुरस्कर्ते आणि विरोधक यांना वाटतो, तसा हा करार नवयुगाची प्रभात आणणाराही नाही किंवा शरणागती पत्करणाराही नव्हे. कराराचा मसुदा लक्षात घेतला असता भारत–पाक यांच्या दरम्यान झालेल्या इतर करारांच्या चाकोरीतील हा करार नव्हे, हे लक्षात यायला हरकत नाही. गेली तीन वर्षे पंतप्रधानांचे राजकारण ज्या पद्धतीने चालू आहे, त्यावरून पंतप्रधानांनी काही निश्चित पदरात पाडून घेतल्याखेरीज परराष्ट्र धोरणात कोणतेही पाऊल उचललेले नाही, हे त्यांच्या पुरस्कर्त्यांच्या आणि विरोधकांच्याही लक्षात आले पाहिजे. भारत–सोव्हिएत रशिया करार हे याचे एक उदाहरण आहे. त्या करारावरही अनुकूल–प्रतिकूल प्रतिक्रिया झाल्याच. 'बांग्लादेशच्या पेचप्रसंगाचे निमित्त साधून या कराराने पंतप्रधानांनी भारताला रशियाच्या दावणीला बांधले' असे म्हणण्यापर्यंत काही टीकाकारांची मजल गेली होती. कराराचा पुढचा इतिहास पाहिला असता, ही टीका उथळ असल्याचे ओघल्याला आता जाणवले आहे. पंतप्रधानांनी बांग्लादेशच्या पेचप्रसंगावर झालेली कोंडी फोडण्यासाठी कराराची किंमत दिली; परंतु ही किंमत एकतर्फी दिलेली नाही. त्याच्या बदल्यात शस्त्रास्त्रेही मिळवली आणि बांग्लादेशच्या पेचप्रसंगातून सुटण्यासाठी सोव्हिएत रशियाचा पाठिंबाही मिळविला. या कराराने पंतप्रधानांनी मोजलेल्या किमतीपेक्षा अधिक काही मिळविले. त्याची द्यावी लागलेली किंमत अपरिहार्य होती, कारण तेव्हा पेचप्रसंगातून बाहेर पडण्याचा, याहून कमी किंमत द्यायला लावणारा कोणता पर्याय उपलब्ध होता?

परंतु पुढे बांग्लादेश स्वतंत्र झाल्यानंतर या करारासारखाच करार पंतप्रधानांनी बांग्लादेशशी केला. हा करार करण्यासाठी रशियाची कुणी अनुमती मागितलेली नाही, हे या संदर्भात भारत–सोव्हिएत कराराच्या टीकाकारांनी लक्षात घेतलेले नाही. भारत–बांग्लादेश मंत्रीकरार हा निश्चितपणे भारत–सोव्हिएत कराराच्या कक्षा कमी करण्याचा पंतप्रधानांचा हेतुपूर्वक पवित्रा होता, हे आपण आता समजून घेण्याची आवश्यकता आहे.

पाक हरल्याची कबुली

या पार्श्वभूमीवर सिमला येथील इंदिरा गांधी–भुत्तो कराराकडे आपण पाहू. यापुढे पाकिस्तानबरोबरचे सगळेच प्रश्न निकालात निघाले पाहिजेत, ही पंतप्रधानांनी घेतलेली जाहीर भूमिका होती. 'सगळेच प्रश्न निकालात निघणे' या शब्दप्रयोगाचा अर्थ 'काश्मीर प्रश्न निकालात निघणे' असा होतो. 'एकेक प्रश्न सोडवीत मंत्रीच्या मागनि जाऊ या' असे भुत्तो यांनी जाहीरपणे

म्हटले होते. याचा अर्थ राजनैतिक संबंध पुन्हा सुरू करणे, दळणवळणही सुरू करणे, पाकिस्तानचे युद्धकैदी भारताने सोडून देणे, एकामेकांनी एकमेकांचे जिंकलेले प्रदेश सोडून देणे आणि मग काश्मीरसारख्या गुंतागुंतीच्या प्रश्नाला हात घालावा असा होता. थोडक्यात, एकदा इतर सर्व क्षेत्रांत पूर्वस्थिती स्थापन झाली की, अनुकूल परिस्थिती निर्माण होताच काश्मीरवर आपला दावा सांगायला पाकिस्तानला मुभा राहावी. एका दृष्टीने 'काश्मीर' हाच दोघांच्या दृष्टीने तडजोड न होऊ शकणारा खरा प्रश्न होता व आहे, आणि या प्रश्नावर या करारात पंतप्रधानांनी भारतातर्फे तडजोड केलेली नाही. भारताचे सैन्य जुन्या शस्त्रसंधीच्या पुढे गेलेले आहे. ते तेथेच असायला पाकिस्तानने नाइलाजाने का होईना, या कराराने संमती दिलेली आहे. पाकिस्तानने काश्मीरची लढाई जवळजवळ हरल्याची दिलेली ही कबुली आहे.

सैन्य मागे घेण्याचा प्रश्न

या संदर्भात आंतरराष्ट्रीय सीमेवरून सैन्य मागे घेण्याचा प्रश्न फारसा प्रतिष्ठेचा बनविण्याचे कारण नाही. आंतरराष्ट्रीय सीमंवरून आपल्याला आज ना उद्या मागे यावे लागले असते. प्रश्न काश्मीरचा वाद सोडविण्यासाठी पाकिस्तानचा पश्चिम सीमेवर जिंकलेला प्रदेश दडपणासाठी तसाच हाती ठेवण्याचा होता. काश्मीरचा प्रश्न सुटण्यासाठी या दडपणाचा खरोखर किती उपयोग करता आला असता, याचा अंदाज घेऊनच दडपणाचे हे हत्यार वापरता येणे शक्य होते. 'काश्मीरच्या शस्त्रसंधी रेषेला आंतरराष्ट्रीय सीमा म्हणून मान्यता द्या... तरच पश्चिम सीमेवरील जिंकलेल्या प्रदेशातून मागे येतो' अशी उघडउघड दमदाटीची भूमिका घेणे, हा भारतापुढे एक पर्याय होता. या भूमिकेपुढे पाकिस्तानने मान तुकविली नसती, हे तर उघडच आहे. म्हणजे मग आहे ते घोंगडे तसेच भिजत पडले असते, परंतु काश्मीर प्रश्न मिटला नसता, हे येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण कोणत्याही राष्ट्राने (यात सोव्हिएत युनियनचाही अंतर्भाव होतो) सध्याच्या, आपण युद्धानंतर प्रस्थापित केलेल्या नव्या शस्त्रसंधी रेषेवर पाय रोवायला आपल्याला पाठिंबा दिला नसता. 'भारताने पूर्वीच्या शस्त्रसंधी रेषेपर्यंत मागे हटावे' हे दडपण सोव्हिएत युनियनने मित्रत्वाच्या नात्याने आणि चीन व अमेरिका यांनी उघड-उघड विरोधी भूमिका घेऊन आणलेच असते. पंतप्रधानांनी पंजाब आणि सिंधच्या सीमेवर सैन्य मागे घेण्याची तयारी दर्शवून काश्मीरमध्ये नव्या शस्त्रसंधी रेषेला पाकिस्तानची मान्यता घेतली, आहे हे एक दूरगामी परिणाम घडवून आणणारे मुत्सद्देगिरीचे कृत्य आहे, याची कराराच्या टीकाकारांनी दखल घेतली नाही, याचे आश्चर्य वाटते.

या कराराचे काश्मीरच्या संदर्भात दोन परिणाम संभवतात. पाकिस्तानने कराराचे पूर्ण पालन केले, तर त्याचा अर्थ, काही देवाण-घेवाण करून काश्मीर प्रश्न सोडविण्याची पाकिस्तानने तयारी दर्शविली आहे, असा होतो. १९६३ साली झालेल्या स्वर्णसिंग वाटाघाटींच्या वेळी पाकिस्तानने फाळणीची योजना विचारात घेतली होती. हे ध्यानी घेता, पाकिस्तान ती योजना पुन्हा वाटाघाटींत उकरून काढण्याची शक्यता आहे. भारताने काश्मीर खोऱ्यात वुलर सरोवरापर्यंत मागे हटून काश्मीरच्या नव्या आंतरराष्ट्रीय सीमेची सुचविलेली योजना या वाटाघाटींत पुन्हा

उकरून काढण्याचा पाकिस्तान प्रयत्न करील. भारताला आज तेवढे मागे हटण्याचे काही प्रयोजन नाही. आज भारत तसा अडचणीत नाही... असलाच, तर पाकिस्तान अडचणीत आहे. युद्धापूर्वीच्या किंवा सध्याच्या शस्त्रसंधी रेषेच्या आसपासच आंतरराष्ट्रीय सीमाआखणी करावी लागेल, याची पाकिस्तानला जाणीव नाही, असे समजण्यात अर्थ नाही.

पाकिस्तान या तडजोडीला तयार होईल की नाही, हे पुढील घटनांवरून ठरेल. पाकिस्तानचे यापुढील प्रयत्न युद्धकैदी सोडविण्याचे राहतील. हा प्रश्न मुजीब-भुत्तो वाटाघाटी आणि पाकिस्तानने बांग्लादेशला दिलेली मान्यता या वेगळ्या मार्गाने सोडवला जाणार आहे. युद्धकैद्यांची सुटका होईपर्यंत पाकिस्तान पुन्हा भारताशी वाटाघाटी टाळील, हीच शक्यता आहे. त्यानंतर सरळ सिमला कराराची पायमल्ली करणे आणि काश्मीरच्या अंतर्गत प्रश्नावर जनमत प्रक्षुब्ध करणे आणि बाहेरच्या देशांचा पाकिस्तानच्या भूमिकेबर पाठिंबा मिळविणे या मार्गाने पाकिस्तानला जावे लागेल, किंवा सिमल्याला सुरू झालेले वाटाघाटींचे सूत्र पुढे चालवावे लागेल. यातील दुसरा पर्यायच तूर्त तरी पाकिस्तान स्वीकारील. यापुढे भुत्तो सावधपणे पावले टाकतील. पाकिस्तान करार एकदम मोडणार नाही. प्रथम तो वाटाघाटींची पावले टाकील. वाटाघाटींत काश्मीरचा अधिकाधिक प्रदेश पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न करेल, आणि ते जमले नाही, तर करार सरळसरळ धाब्यावर बसवेल. याचा अर्थ पाकिस्तान लगेच युद्ध करील असाही होत नाही. पाकिस्तान आता नजीकच्या काळात भारताशी युद्ध करण्याची तयारी दर्शवील, असे मला वाटत नाही. केवळ युद्धानेच भारताला नामोहरम करण्याचे धोरण पाकिस्तानचे कधीच नव्हते. बड्या राष्ट्रांचे दडपण आणणे आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आणि जवळील छोट्या राष्ट्रांना भारतापासून अलग करणे, भारतातील तथाकथित मुस्लीम प्रश्न जिवंत ठेवणे, भारतात अंतर्गत बंडाळ्या घडवून आणणे आणि भारताची स्थिरता कमकुवत करणे... याच्या जोडीला शक्य असेल तेव्हा अनुकूल परिस्थिती पाहून भारताशी युद्ध करणे असे पाकिस्तानच्या भारतविषयक धोरणाचे सूत्र होते. यांपैकी पाकिस्तानला अनुकूल अशा फारच कमी बाज्या आता शिल्लक उरल्या आहेत. बंगाल तुटून निघाल्यामुळे नागा-मिझोंना पाकिस्तान मदत करू शकत नाही. नेपाळ आणि लंका यांच्याबरोबरील भारताचे संबंध आता पुन्हा सुधारले असल्यामुळे पाकिस्तानला हस्तक्षेप करायला वाव राहिलेला नाही. बड्या राष्ट्रांच्या दडपणाला भारत-रशिया मैत्री कराराने काटशह दिलेला आहे. बांग्लादेशमधील अत्याचारामुळे पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय जगतात सहानुभूती गमावली आहे आणि भारताच्या विजयामुळे भारताची प्रतिष्ठा उंचावली आहे.

अंतर्गत बाबतीतदेखील काँग्रेस पक्ष पुन्हा सावरला आहे आणि देशात स्थिरता आली आहे. याचा परिणाम धार्मिक आणि भाषिक फुटीर गटांच्या चळवळीला पायबंद बसण्यात झाला आहे. यामुळे मध्यपूर्वेतील आणि पश्चिम आशियातील मुस्लीम राष्ट्रांच्या व्यतिरिक्त पाकिस्तानला खास पाठिंबा देणारा गट उरलेला नाही. पाकिस्तानी नेत्यांच्या नजरेतून या सर्व घटना सुटल्या असतील, असे समजणे चुकीचे ठरेल.

याच संदर्भात 'युद्धकैदी सुटल्यानंतर पाकिस्तान लगेच युद्धाच्या मार्गाला लागेल' हा काही मंडळींचा समजदेखील तितकासा बरोबर नाही. काश्मीरमधील पहिले युद्ध बगळता कच्छबरील

हल्ला आणि नंतर १९६५चे युद्ध करण्यामागे पाकिस्तानचे भारतीय परिस्थितीसंबंधीचे चुकीचे अंदाज कारणीभूत होते. 'नेहरूंच्या मृत्यूनंतर भारतात अस्थिरता निर्माण होईल आणि आपण एक धक्का मारला की भारत पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळून पडेल' अशी पाकिस्तानच्या नेत्यांची चुकीची समजूत होऊन बसली होती. १९६५ नंतर पाकिस्तानने काश्मीर प्रश्नावर भारताशी युद्ध करण्याचा धोका पत्करलेला नाही. गेल्या डिसेंबरमध्ये झालेले युद्ध वेगळ्या कारणासाठी आणि वेगळ्या परिस्थितीतील होते. 'बांग्लादेश एरवीतेवी आपल्या हातून गमवावा लागणारच. त्यासाठी न लढता तो गमावून आपली फजिती होण्यापेक्षा तो राखण्यासाठी लढलो, राखण्याची पराकाष्ठा केली' हे सिद्ध करण्यासाठी तेव्हा पाकिस्तानने लढाईचा पवित्रा घेतला. आता तर पाकिस्तान दुबळे आणि खिळखिळे झाले आहे. अशा परिस्थितीत ते नजीकच्या काळात युद्ध करील, असे मानणे हास्यास्पद आहे.

याचा अर्थ पाकिस्तानातील जनतेच्या आणि नेत्यांच्या कडव्या धर्मवादी मनोवृत्तीत बदल झाला आहे आणि भारताबरोबर स्नेहाने राहण्याची पाकिस्तानी नेत्यांची इच्छा आहे, असा होत नाही. उद्या संधी मिळाली, भारत अंतर्गत अथवा काही बाह्य कारणाने दुबळा बनला, तर त्याची मानहानी करण्याचा, त्याला कोंडीत पकडण्याचा आणि प्रदेश मिळविण्याचा पाकिस्तान प्रयत्न करणार नाही, असे मानण्याचे कारण नाही. श्रीमती गांधींनी हे सर्व पवित्रे ध्यानी घेऊन पाकिस्तानबरोबर तडजोड करण्याचे जे पाऊल उचलले आहे. याचा अर्थ एवढाच होतो की, आता असाहाय्य मनःस्थितीत असलेला पाकिस्तान मतलबीपणे का होईना, तडजोडीची भाषा बोलत असेल, तर त्याला तडजोडीत अडकविणे शहाणपणाचे ठरेल. कारण सनातनी मुस्लीम धर्मपंडितांप्रमाणे पाकिस्तानचे सुशिक्षित मुस्लीम नेते 'आम्हाला सर्व भारत इस्लाममय करायचा आहे' असे उघड सांगून जिहादच्या प्रेरणेने भारताविरुद्ध उभे राहिल्याचे दृश्य आपल्याला दिसत नाही. मुस्लीम सुशिक्षित नेतृत्व धर्माच्या हितसंबंधांची भाषा बोलत नाही; मुस्लीम समाजाच्या हितसंबंधांची भाषा बोलते. जीनांनी हेच केले. त्यांनी धर्मनिरपेक्ष मार्गाने संघर्ष केला. कारण धार्मिक मार्गाने गेल्यास त्यांना त्रयस्थ पाठबळ मिळाले नसते. हे पाठबळ मिळावे म्हणून जनतेच्या हक्काची करणे सोयीस्कर होते. काश्मिरी जनतेच्या काही मुस्लीम नेत्यांना अपेक्षित असणारी स्वयंनिर्णयाची भाषा जिनांपासून भुट्टोंपर्यंत सर्व नेते वापरीत राहिले. 'आम्हाला हिंदुस्थानचा प्रदेश हवा आहे' असे उघडपणे म्हणणे राजकीयदृष्ट्या सोयीचे नसल्याने असे म्हणणे ते टाळीत राहिले. काश्मीरवर तडजोड होऊ शकली, (जी होणे सहजासहजी शक्य नाही) तर पाकिस्तानी नेत्यांना भारताशी धर्मनिरपेक्ष मार्गाने धार्मिक संघर्ष करता येणार नाही. त्यांना नंतर धार्मिक संघर्षाचीच भाषा वापरावी लागेल, आणि अशा वेळी काही मुस्लीम राष्ट्र वगळता त्यांना भारताविरुद्ध पाठिंबा मिळणार नाही. पाकिस्तानी नेत्यांना याची जाणीव आहे. म्हणून ते नेहमी धार्मिक संघर्षाला धर्मनिरपेक्षतेच्या मार्गाचा मुलामा देत आलेले आहेत. आणि म्हणून, पाकिस्तानच्या आजच्या दौर्बल्याचा फायदा घेऊन काश्मीरची फाळणी पाकिस्तानच्या गळी उतरवता आली, तर पाहावी, हा श्रीमती गांधी यांचा बेत दिसतो. तसे झाल्यास पाकिस्तानला संघर्षाचे निमित्त शोधून काढणे अवघड आहे. भारतातील जातीयवादी अथवा इतर फुटीर गटांना

चिथावणी देण्यापलीकडे पाकिस्तान फारसे काही करूही शकणार नाही. परंतु पाकिस्तानातच बलूची आणि पठाण प्रदेशात असलेल्या असंतोषाला मग भारतही खतपाणी घालू शकेल आणि असले उद्‌योग पाकिस्तानच्याच अंगलट येतील. यामुळे पाकिस्तानी नेते यापुढे सावधपणेच वागण्याची अधिक शक्यता आहे.

कराराचा खरा अन्वयार्थ

एकमेकांच्या प्रादेशिक अखंडतेचा आदर करणे आणि अंतर्गत बंडाळीला उत्तेजन न देणे व शत्रुत्वाचा प्रचार न करणे या सिमला करारातील कलमांचा मी येथे मुद्‌दामच उल्लेख केलेला नाही. १९५०च्या नेहरू लियाकत करारापासून पाकिस्तानबरोबर झालेल्या प्रत्येक करारात ही कलमे नमूद झालेली आहेत, आणि पाकिस्तानने त्यांचे कधीच पालन केलेले नाही. पाकिस्तान या वेळेला या कलमातील तरतुदी मान्य करील, हीही शक्यता नाही, परंतु काश्मीरच्या तडजोडीला पाकिस्तानने तयारी दर्शविली, तर मात्र या कलमातील तरतुदी बदलत्या परिस्थितीत पाळल्या जाण्याची शक्यता आहे. मी आधी म्हटल्याप्रमाणे 'काश्मीर प्रश्नावर पाकिस्तान तडजोडीला तयार होतो की नाही' हा खरा प्रश्न आहे... तडजोड झाली नाही, तर भारत-पाकसंबंध पुन्हा १९६५चे युद्‌ध होण्यापूर्वीच्या काळासारखे राहतील. कारण या वेळेला १९६५ला खंडित झालेला व्यापार, तसेच हवाई वाहतूक, प्रवास व दळणवळणाचे इतर मार्ग खुले होत आहेत. भारत-पाक संबंधांतील तणाव कमी होण्यास काही प्रमाणात याचेही परिणाम कारणीभूत होणार आहेत. पाकिस्तानने काश्मीरवर तडजोड केली नाही, आणि पुन्हा तणाव वाढले, तर या वेळी आपण काश्मीरच्या नव्या शस्त्रसंधी रेषेवर पाय रोवून उभे राहणार आहोत. हा प्रदेश लगेच युद्‌ध करून पाकिस्तान घेऊ शकत नाही. याचा अर्थ पाकिस्तानने युद्‌धात बांग्लादेश तर गमावलाच, परंतु काश्मीरचाही थोडा भाग घालविला आणि अखेर काहीच साध्य केले नाही, असा होईल. प्रदेश गमावून बोट चिघळत ठेवणे, याला पाकिस्तानच्या मुत्सद्‌देगिरीचा पराभव आणि श्रीमती इंदिरा गांधी यांच्या मुत्सद्‌देगिरीचा विजय म्हटले पाहिजे. सिमला कराराचा हा खरा अन्वयार्थ ठरेल. *(महाराष्ट्र टाइम्स, १६ जुलै १९७२)*

५.४ मुसलमानांमध्ये गांधी निर्माण करावयाचे मला वेड – हमीद दलवाई

'वसंत बाळकृष्ण दाते' हे क्रांतिकारक नाव नव्या पिढीला सतत प्रेरणा देणारे आहे. १९४२ च्या क्रांतिकाळात महाड येथे निघालेल्या किसान मोर्चावर इंग्रज सरकारने अमानुष हल्ला केला अन् वसंत दातेला आपले बलिदान द्यावे लागले. वसंत दाते पुण्याचे... केवळ पुण्याचेच नव्हे तर स. प. महाविद्यालयाचे! या क्रांतिकारकाचे पुण्यस्मरण करण्याची प्रथा सोनोपंत दांडेकरांनी 'वसंत दाते स्मारक निधी' संकल्पनेतून सुरू केली. दि. १० सप्टेंबर १९७२ रोजी 'हुतात्मा दाते दिन' प्राचार्य मालेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली स. प. महाविद्यालयात साजरा झाला. प्रमुख पाहुणे होते, हमीद दलवाई. विषय होता, 'स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तरकाळातील जातीयता'.

मूलगामी अभ्यास नाही

हुमात्मा वसंत दाते यांचे आणि माझे काही एक नाते आहे. हे नाते कदाचित अजूनही काहीसे अव्यक्त आहे. साने गुरुजींनी तीन वसंतांचा केलेला उल्लेख मला स्मरतो. त्यांतले एक वसंत बापट, दुसरे वसंत दाते आणि तिसरे... पण आज त्यांचे नाव घेण्याचे औचित्य नाही. वसंत दातेंसारखी तरुण पिढी नव्या भारताच्या उभारणीच्या उद्दिष्टांसाठी जगलेली आहे. त्यांचे जगणे असेच होते. स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रयत्नांची दिशा निराळी होती. स्वातंत्र्य मिळाले, पण राष्ट्रउभारणीची आवश्यक प्रक्रिया फारशी केलेली आढळत नाही. राष्ट्रउभारणीच्या प्रयत्नात हिंदू-मुस्लीम हा एक प्रश्न असा आहे, ज्यातून मार्ग निघालेला आहे, असे मला वाटत नाही. दोन दृष्टींनी मी ही समस्या मानतो. स्वातंत्र्यानंतर देशांतर्गत निर्माण झालेले हिंदू-मुस्लीम प्रश्न आणि पाकिस्तानशी तयार झालेले संबंध ही एक विचित्र अशी दुहेरी समस्या निर्माण झाली.

इस्लामच्या परंपरेत आजचा भारतीय मुसलमान कसा आहे, त्याच्या मनाचा फारसा विचार कोणी केलेला नाही. त्याचबरोबर अंतर्मुख झालेले एक मुसलमानी मनही गेल्या ५० वर्षांत आढळलेले नाही. हिंदूंची मानसिकता आणि मते समजून घेणे, हासुद्धा एक केविलवाणा प्रयत्न आहे. राष्ट्रउभारणीच्या प्रयत्नांत एकत्मता नांदवताना सेक्युलर पक्षांनी या हिंदू-मुस्लीम मानसिकतेचा मूलभूत विचार केलेला नाही. या जातीय आणि जमातवादी प्रश्नाबाबत ज्या नेत्यांना वस्तुस्थिती कळत होती, ते राजकीय सोय म्हणून त्या संदर्भात स्पष्टपणे बोलणे टाळत राहिले.

राजकीयदृष्ट्या हिंदूंनी लक्षात ठेवावयास पाहिजे अशी एक वस्तुस्थिती म्हणजे, मुसलमान समाज कोणत्याही प्रसंगी लवकर एकवटला जातो. Muslim is the only Politically sensitive Community in our Country हे नेहरूंनासुद्धा लक्षात घ्यावे लागले होते. मुस्लीम एकवटले जाणार नाहीत, असेच प्रयत्न इतर नेत्यांनीही केले आहेत.

एक आश्चर्य

स्वातंत्र्यानंतर नव्या सेक्युलर राज्यात सर्वसाधारण मुसलमानांविषयीची मते, राज्यकर्त्यांची

मुसलमानांविषयीची धोरणे या विषयीही अनेक प्रवाह वाहू लागले. काहींना असे वाटे की, 'काँग्रेसने स्वीकारलेली धोरणे चुकीची आहेत.' कारण अशा विरोधकांना त्यामागच्या धर्मवादी ऐतिहासिक शक्ती ठाऊक होत्या. काही हिंदुत्ववाद्यांनी सांगितले की, यामुळे 'नव्या जातीय शक्ती उदयाला येत आहेत.' 'राजकारणाचे धर्मकारण केले, ही फार मोठी चुकीची गोष्ट आहे' असे काहींनी बोलून दाखविले. परंतु एक गोष्टीचे मला आजही आश्चर्य वाटते. ते म्हणजे, या सेक्युलर कल्पनेत गांधीजींची आणि आझादांची सुसंगत युती कशी जमू शकली?

'अरबी वारी' नावाचा एक कवी आझादांना अत्यंत प्रिय होता. तो आपल्या काव्यात नास्तिक असल्याचे दिसते. 'कुराण, बायबल म्हणजे थापा आहेत' असे त्याने म्हटले आहे. याउलट स्वतः आझाद कट्टर धार्मिक वृत्तीचे होते. गांधीजींनी धर्माचे स्वरूप राजकारणात मिसळू दिले, पण तेही धोरणाने. त्यांचीही काही ठाम धार्मिक मते होती. याउलट नेहरू आणि जिना यांची आधुनिकतेची तार का जुळू शकली नाही? नेहरूंचा आग्रह तर 'समानतेच्या पायावर उभे असलेले एक राष्ट्र असावे' असा होता. यात कोणी आधुनिक राष्ट्रवादाची व्याख्या समजून घेतली नाही. आधुनिक राष्ट्रवादाची कल्पना आजही मान्य होत नाही. ही कल्पना समजून घेणे म्हणजे 'अॅडजस्टमेंट' नाही. सेक्युलर चळवळी, उदारमतवादी चळवळी चालू असताना मुसलमान कधी एकत्र का झाला नाही, याचे मला खरेखरीच आश्चर्य वाटते. या प्रश्नांचा विचार कोणीच व्यवस्थित केला नाही.

किंमत देण्याची तयारी

लोहिया हे माझे गुरू, पण मी एका मर्यादेपर्यंतच गुरू मानतो... मते पटली नाहीत, तर विसर्जित करतो. मुस्लीम जमातवादी मानसिकता विचारात न घेता लोहियांनीसुद्धा देशाच्या फाळणीचे गुन्हेगार मुस्लीमेतरांना ठरविले आहे. 'मुस्लिमांना आधुनिक राष्ट्रवादाची कल्पना मान्य नाही' या वस्तुस्थितीकडे लोहियांनी दुर्लक्ष केले. लोहियांनी असे का केले? लोहियांची मते त्यांचाच अप्रामाणिकपणा आणि अज्ञान दाखविणारी आहेत. त्यांच्यासारख्या नेत्यांनी कधी या शक्ती समजून घेण्याचा प्रयत्न केलेला नाही, असेच वाटते. नव्या शक्ती उदयाला येत असताना आता जातीय प्रश्नाला, जुनी ऐतिहासिक कारणे राहिलेली नाहीत. या जातीय समस्या बैदूंच्या तोडग्याने, स्थलांतराने सुटणाऱ्या नाहीत. नव्या समाजाचे आव्हान स्वीकारताना निदान व्हाइट वॉशिंग तरी बंद करू या. 'जातीयवाद' हा प्रगतीच्या आड येणारा प्रमुख अडथळा आहे.

दंगली होतात, तेव्हा दोन्ही पक्षांना बरे वाटते. अशा वेळी प्रचंड विध्वंस होतो. भिवंडीला दंगल झाली, जळगाव पेटले, तर एकमेकांना समाधान लाभते. अहमदाबादच्या दंगलीत ३८ कोटींचे नुकसान झाले. हे कुठेतरी थांबले पाहिजे. मुसलमान नेते फार हुशार आहेत. त्यांना वाटते, 'उत्तरेत मुस्लीम लीग प्रबळ होईल आणि दंगली झाल्या, तरच ते प्रबळ होईल.' याची किंमत त्यांना द्यायची आहे. त्याची तयारी त्यांच्यापाशी आहे. पण हे आततायी नेते इतरांना पुढे करतात. नेता मेल्याचे कधी ऐकलेले नाही. फंड गोळा करण्याचे वेड या मुसलमानांना फार आहे. कोणत्याही कारणाने तो गोळा होतो. सोलापुरात माझ्या व्याख्यानानंतर 'हमीद दलवाईंच्या विरुद्ध कारवाई

– चंदा दो!' अशा पाट्या चौकाचौकातून आढळल्या... आणि आश्चर्य म्हणजे, धर्म म्हणताच मुसलमान समाज वाटेल तेवढा पैसा देतो.

मुसलमानात गांधी हवा

मी आशावादी आहे. मला मुसलमान समाजात कधीतरी गांधी निर्माण करावयाचे वेड आहे. 'गांधी निर्माण होणे' ही मामुली बाब नाही. गांधीजींची टिंगल करण्याचे श्रेयही त्यांनीच मिळवून दिले आहे! आज गांधीवाद हा एक मठ होऊ पाहत आहे. त्यात गांधींच्या मानवतावादी, उदारमतवादी, लोकशाही मूल्यांची जपवणूक करण्याचे प्रयत्न नाहीत. मला त्या मूल्यांची जपवणूक करावयाची आहे.

नव्या स्वातंत्र्यात एक जबरदस्त बदल घडत आहे... आता व्यवसायातील जाती संपल्या आहेत... पाश्चात्त्य संस्कार रुजविण्याचे प्रयत्न सतत होत आहेत... शंभर वर्षांच्या प्रयत्नांचे, गांधीजींच्या प्रयत्नांचे यश आज दिसत आहे. हे बदल फार झपाट्याने होत असताना हिंदू जितका संस्कारक्षम बनलेला दिसतो, तितका मुसलमान नाही. मी त्यांच्यावर चिडतो, टिंगल करतो यात त्यांची बदनामी करण्याचा हेतू नसतो. मी यासाठीच चिडतो की, त्यांच्यात उदारमतवादाचे प्रतीक दिसत नाही. प्रबोधनाच्या चळवळीत या साऱ्यांना 'इनिशिएट' करणे, एवढेच माझे काम आहे. ते कठीण आहे, म्हणूनच मी ते करतो. हे काम पूर्ण होईल का? हे मी सांगू शकत नाही. या प्रयत्नांत जर मला मारले, तर मुसलमानच मारेल; हिंदू नाही. कारण गांधींना मुसलमानाने मारलेले नाही. कारण मुसलमानांचा त्यांना आधार हवा होता. 'गांधीजींना मारणारा एक हिंदू आहे' असे ज्या वेळी कोणा मुसलमानाने सांगितले, त्या वेळी माऊंटबॅटन म्हणाले, 'असे जर असेल, तर तुम्ही जगण्याच्या लायकीचे नाहीत. गांधीजींच्या मृत्यूने त्यांना सुरक्षितता लाभली. जीवन-मृत्यूत एक मेळ घातला गेला.'

मला एवढेच म्हणावयाचे आहे की, आपल्या कृतीने हिंदूंचे नुकसान होणार नाही, एवढे तरी मुसलमानांनी करावे. ४० कोटी हिंदू ५ कोटींच्या कारवायांनी भयभीत होताना दिसतो. हे चित्र बघितले की, गंमत वाटते. राजकारणात हिंदूंना एकत्र आणणे अवघड आहे. हिंदूची स्लोगन ही नेहमीप्रमाणे केवळ स्लोगन ठरते. पण इस्लामची स्लोगन त्यांना एकत्र आणते. अशा प्रसंगी सामाजिक समतेची खरोखरीच जरूरी आहे. आजच्या काळात हिंदूंनी जुन्या धर्मश्रद्धांच्या चिखलात बसू नये. बऱ्याच सामाजिक श्रद्धांनी आपला घात केलेला आहे. या चौकटीतून बाहेर पडणे आज जरूरीचे आहे.

(पंडित सासवडकर यांनी 'तरुण भारत' या वर्तमानपत्रासाठी अहवाल लेखन केले आहे.)

५.५ मंडळाविषयी प्रश्नोत्तरे – हमीद दलवाई

(मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेनंतर अनेकांच्या कडून मंडळाविषयी अनेक प्रश्न आणि शंका उपस्थित करण्यात आल्या. या प्रसंगी हमीद दलवाई यांनी दिलेली उत्तरे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे मुखपत्र, मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेत प्रसिद्ध करण्यात आली.)

प्रश्न : आपण मुस्लिमांत जागृती करण्यासाठी वेगळे जातिवाचक मंडळ का काढलेत? यामुळे सर्व भारतीय बनविण्याच्या प्रक्रियेला हातभार लागेल का?

उत्तर : भारतीय मुसलमानांना भारतीय बनविण्याच्या हेतूनेच मुस्लीम सत्यशोधक मंडळ काढण्यात आले आहे. वस्तुतः मुस्लीम, हिंदू अथवा ख्रिश्चन असे काही सार्वजनिक जीवनात न मानणाऱ्यांपैकीच मी एक आहे. येथे मी स्वतःविषयी थोडी माहिती सांगितली, तर ते चूक ठरणार नाही. वयाच्या चौदाव्या वर्षापासून मी स्वतःला मुस्लीम समाजाचे समजायचे विसरून गेलो होतो. मला कुणी मुसलमान म्हटले की, राग येई. तथापि समाज बदलायचा म्हटल्यानंतर व्यक्तिशः मी स्वतःला मुसलमान न मानल्याने काही साध्य होणार नाही, हे माझ्या लक्षात आले. चार वर्षांपूर्वी आम्ही इंडियन सेक्युलर सोसायटी काढली. सोसायटीच्या द्वारे सामाजिक तणाव नष्ट करण्याचे कार्य करणे हा सोसायटी स्थापण्यामागील हेतू होता. परंतु सोसायटीत फार कमी मुसलमान मंडळी आली. मुसलमान समाजाने या सोसायटीची दखलच घेतली नाही. मग सोसायटीद्वारा मुसलमानांना बदलणे दूरच राहिले! अशा परिस्थितीत माझ्यापुढे दोन पर्याय उभे राहिले. पहिला म्हणजे, पूर्वीप्रमाणे मुसलमानांचा वेगळा विचार न करता कार्य करीत राहणे. जणू वेगवेगळे समाज आणि त्यांच्या प्रवृत्ती अस्तित्वातच नाहीत, असे गृहीत धरून कार्य करणे व असलेला वेगळेपणा त्या कायने नष्ट होईल, असे गृहीत धरणे; किंवा मग भारतीय समाजातील अंतर्विरोध मान्य करणे आणि त्या-त्या समाजाच्या पातळीवर जाऊन तो नष्ट करण्याचा प्रयत्न करणे. येथे मुसलमान स्वतःला मुसलमानच मानतात आणि हिंदू स्वतःला हिंदूच मानतात, ही विदारक परिस्थिती लक्षात घेऊनच मुसलमानांना बदलण्यासाठी वरवर वेगळे वाटतील, पण खऱ्या अर्थाने एकात्मतेला पोषक ठरतील, असे प्रयत्न करणे.

पहिल्या मार्गाने जाण्यात काही अर्थ नाही, हे सेक्युलर सोसायटीच्या अनुभवाने आम्ही शिकलो होतो आणि म्हणून आम्ही दुसरा पर्याय निवडला. हा निर्णय मनाला अतिशय क्लेशदायक होता, परंतु आपण कितीही नाकारले, तरी भारतातील विविध समाज आपल्याला वेगळे, अलिप्त समजतात, ही वस्तुस्थिती नाकारून आपल्याला कार्य करता येणार नाही, या जाणिवेपोटी आम्हाला व्यवहारातही दुःखदायक तडजोड करावी लागली. म्हणून तर मंडळाच्या पहिल्या जाहीरनाम्यात म्हटले आहे, 'भारतात असली वेगवेगळी जातिवाचक मंडळे नसावीत, अशीच या मंडळाची भूमिका आहे. अशी वेगळी मंडळे अथवा संस्था काढण्याची आवश्यकता भासणार नाही, असा समाज निर्माण करण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ कार्य करणार आहे. तसे

होईल, तेव्हा हे मंडळ स्वतःला बरखास्त करून घेईल.'

अशा प्रकारच्या जातिवाचक अथवा धर्मवाचक संस्थांबाबतचा आपला दृष्टीकोन परंपरागत ठेवण्याची जरुरी नाही, असे या निमित्ताने म्हणावेसे वाटते. याकरिता जातीयवादाची व्याख्या आपण कोणती करतो, याच्यावर अशा प्रकारच्या संस्थांकडे पाहण्याची दृष्टी अवलंबून राहील. एखाद्या संस्थेचे सभासदत्व विशिष्ट जातीच्या अगर धर्माच्या लोकांपुरते मर्यादित असेल, परंतु ध्येयधोरणे, वर्तन आणि भूमिका धर्मनिरपेक्ष असेल, तर त्या संस्थेला जातीयवादी म्हणणे अन्यायाचे आणि चुकीचे ठरेल. उदाहरण द्यायचे असेल, तर काही मुसलमान तरुणांनी एखादा मुस्लीम गट स्थापन केला आणि मुस्लीम समाजात त्यांनी संतति नियमन करण्याचा प्रयत्न-प्रचार केला, तर तो गट जातीयवादी ठरत नाही; धर्मनिरपेक्षवादी ठरतो. कारण तो जातीच्या पातळीवर धर्मनिरपेक्षवादी चळवळी करीत असतो. तो मुसलमानांपुरता गट बनवितो, कारण संतति नियमनाचा प्रचार मुसलमानांत कमी आहे. तो अधिक करावा, हे त्याचे उद्दिष्ट असते. अशा मंडळींना जातीयवादी म्हणून झोडपणे म्हणजे जातीयवादी प्रवृत्तींना अप्रत्यक्षपणे साहाय्य करणे आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे.

याच्या उलट सर्व जातिधर्मांना प्रवेश देणारी एखादी संघटना कायद्याने व घटनात्मकदृष्ट्या धर्मनिरपेक्ष असली, तरी वर्तनाने, ध्येयधोरणाने आणि भूमिकेने ती जातीयवादी असू शकेल. तेव्हा तत्त्वतः धर्मनिरपेक्षतावादी आणि व्यवहारात जातीयवादी असे स्वरूपही आपणाला अनेक संघटनांबाबत आढळून येते. हे गट आपण धर्मनिरपेक्षतावादी असल्याचा, आपल्या संघटनेत सर्व धर्मांना प्रवेश असल्याचे सांगतात, परंतु प्रत्यक्षात विशिष्ट धर्माच्या किंवा जातीच्या लोकांचेच (जातीयवादी) राजकारण करीत असतात. अशा संघटनांची दारे सर्वांना मोकळी आहेत, म्हणून त्या काही धर्मनिरपेक्षवादी ठरत नाहीत. याकरिता युरोपातील प्रबोधनाच्या चळवळीचे स्वरूप समजून घेणे इष्ट ठरेल. तेथे एके काळी प्रोटेस्टंट, कॅथोलिक यांच्या अलग अलग राजकीय संघटना होत्या. प्रबोधनाच्या लाटेने आता त्या संघटनांचे स्वरूप पार बदलले आहे. कुणालाही त्यात प्रवेश तर असेलच, परंतु संस्थेच्या नावाचे जातीपुरते राजकारण आता त्या संघटनेत होत नाही. मात्र त्या संघटनांची नावे अजूनही तीच राहिली आहेत. उदा. ख्रिश्चन वर्कर्स फेडरेशन किंवा ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पार्टी इ.

भारतात याच पद्धतीने प्रबोधनाची वाटचाल होत राहील. येथेही मग नाममात्र, कागदावर वेगळ्या संस्था राहतील. मुस्लीम सत्यशोधक मंडळात सर्वच जातिधर्माची माणसे आहेत आणि ती केवळ मुसलमानांपुरता विचार करीत नाहीत, अशी अवस्था आपल्याला निर्माण करावयाची आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळ त्यासाठी धडपड करीत आहे. *(मुस्लिम सत्यशोधक पत्रिका, जानेवारी १९७३, पान नं. ७ व ८)*

प्रश्न : मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे निश्चित उद्दिष्ट व कार्य? धर्माच्या ऐहिक बाबीबद्दल आपली धोरणे कोणती?

उत्तर : दि. २२ मार्च १९७० रोजी पुणे येथे मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली. भारतातील मुस्लीम समाजात प्रबोधन घडवून आणण्याचे प्रमुख उद्दिष्ट मंडळ स्थापन करण्यामागे होते व आहे.

सुधारणेला विरोध करणारा गट

कुठल्याही सामाजिक सुधारणांना सर्व धार्मिक समाज आरंभी नेहमीच विरोध करीत आलेले आहेत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कामाला विरोध होणार नाही, असे त्यामुळे आम्ही कधी मानले नाही व मानीत नाही, आणि म्हणूनच आमच्या मंडळाच्या कार्याला मुस्लीम सनातनी मंडळींचा असलेला विरोध आम्ही समजू शकतो. या मंडळींनी मंडळाच्या उद्दिष्टांबाबत आता मुस्लीम समाजात मुद्दाम बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न चालविला आहे.

सनातन्यांचा अनाहूत सल्ला

मुस्लीम समाजाच्या बाबतीत सत्यशोधक मंडळ सामाजिक सुधारणांवर तेवढा भर का देते, असा एक प्रश्न उपस्थित केला जातो. विशेषतः मंडळाने समान नागरी विधेयकाच्या चालवलेल्या पुरस्काराबद्दल विशेष आक्षेप घेतला जातो. 'मुस्लीम सामाजिक कायदा बदलणे, म्हणजे धर्म नष्ट करणे आहे किंवा धर्मात ढवळाढवळ करणे आहे' अशी भूमिका मुस्लीम सनातन्यांकडून घेतली जाते. 'आम्ही 'धर्म' हा विषय टाळून बोलावे, इतर काहीतरी कार्य करावे' असाही एक अनाहूत सल्ला मंडळाला हे सनातनी देत असतात.

धर्माच्या कक्षांबाबत मतभेद

वास्तविक, मंडळाने धर्म विरोधी भूमिका कधी घेतलेली नाही. मंडळाची जी उद्दिष्टे घटनेत नमूद करण्यात आली आहेत, त्यात ही गोष्ट स्पष्ट करण्यात आली आहे. तथापि, धार्मिक बाबतींत सर्वच गोष्टींचा समावेश होतो, असे मात्र सनातन्यांप्रमाणे हे मंडळ मानीत नाही. कुटुंब नियोजन करावे की करू नये, पुरुषाने किती बायका कराव्यात, देश आणि त्याची घटना मानावी की मानू नये, भारतातील आणि जगातील इतर जमातींना आणि व्यक्तींना कनिष्ठ मानावे की बरोबरीचे मानावे या गोष्टी धर्माच्या कक्षेत येत नाहीत, अशी आमची स्पष्ट भूमिका आहे.

'इबादत'चे स्वातंत्र्य सर्वांना हवे

धर्माची दोन अंगे असतात. एक : 'इबादत'चा (उपासना) धर्म आहे. दोन : 'आदत'चा (रीतीरिवाज) आहे. मुसलमानांच्या दृष्टीने नमाज, रोजा, हजची यात्रा, जकात या आणि इतर काही गोष्टी 'इबादत'च्या धर्मात मोडतात. 'इबादत'चा धर्म प्रत्येकाला पाळता आला पाहिजे; केवळ मुसलमानांनाच असे नव्हे, तर सर्वच नागरिकांना त्यांच्या धर्माप्रमाणे इबादत (उपासना) करता आली पाहिजे, असे आमचे ठाम मत आहे.

आदत बदलण्याची तयारी हवी

परंतु त्याचबरोबर धर्माचे, 'आदत'चे, म्हणजेच सामाजिक अंगाचे स्वरूप नेहमी बदलत असते. जगातील प्रत्येक धर्माबाबत ते बदलत असते. इस्लामचेदेखील ते स्वरूप बदलले आहे. म्हणून भारतातील मुस्लीम समाजात अशा प्रकारच्या बदलांचा आग्रह धरणे म्हणजे धर्मात हस्तक्षेप नव्हे, हे मुस्लीम बंधूंनी समजून घेणे जरुरीचे आहे. उदाहरणच द्यायचे तर – इस्लामच्या स्थापनेच्या काळात वेगवेगळी राष्ट्रे अस्तित्वात नव्हती; इस्लामची एक मध्यवर्ती सत्ता होती. इतर जग बिगर इस्लामी जग होते. आज प्रादेशिक राष्ट्रवादाचा उदय झाल्यानंतर 'मी मुसलमान असल्यामुळे राष्ट्राला निष्ठा देऊ शकत नाही' असे म्हणणे म्हणजे राष्ट्रद्रोह करणे तर आहेच, परंतु जगात झालेल्या बदलांची दखल न घेण्याचा वेडगळपणा करणे आहे! कारण सर्व मुसलमानांचेही आज एक राष्ट्र अस्तित्वात येऊ शकत नाही; तसे ते नाहीही. मात्र राष्ट्रवादाच्या कल्पनेवरच अनेक अलग मुस्लीम राष्ट्रे अस्तित्वात आली आहेत, ही वस्तुस्थिती नाकारणे चूक आहे. मुसलमानांनी आपल्या धर्माबर निष्ठा ठेवावी, याचा अर्थ 'देशनिष्ठा बाळगून त्यांनी 'इबादत'चा आपला धर्म पाळावा' इतकाच होतो; आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ या भूमिकेचा प्रसार करीत असते. यात धर्मविरोधी काय आहे?

इतर बाबतींतदेखील हेच म्हणता येईल. मुस्लीम सामाजिक कायदा बदलण्याच्या विरुद्ध मुस्लीम सनातनी सतत प्रचार करत असतात व 'हा धर्मात हस्तक्षेप आहे' असे म्हणत असतात. परंतु या बाबतीत वस्तुस्थिती काय आहे? आधीच स्पष्ट केल्याप्रमाणे सामाजिक कायदा आणि 'इबादत'चा धर्म या दोन वेगळ्या बाबी आहेत; आणि जगातील सर्वच मुस्लीम देशांतून सामाजिक कायदे बदलले आहेत. तुर्कस्तानात १९२८ला पाश्चात्त्य धर्तीचा सामाजिक कायदा अस्तित्वात आला. ट्युनिशिया, इजिप्त, लेबनान, इराण या देशांत नवे कायदे अस्तित्वात आले असून, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान अधिकार देण्यात आले आहेत. इतकेच नव्हे, तर केनियासारख्या मुस्लीम अल्पसंख्याक असलेल्या देशातदेखील मुस्लीम कायद्यात बदल करण्यात आला आहे. कारण 'आपल्या स्त्रियांना आपण गुलामीमध्ये ठेवले, त्यांच्यावर अन्याय केला, तर आपलाच समाज मागे पडतो' हे त्या देशांतील मुस्लीम नेत्यांनी ओळखले. जर तेथे इस्लाममध्ये हस्तक्षेप झाला, असे कोणी मानले नाही, तर तो येथे होतो आहे, ही कल्पना हास्यस्पद आहे.

समान कायद्याच्या पुरस्कारामागे भावी पिढ्यांचा कळवळा

भारतातील आजचा मुस्लीम कायदा स्त्रियांवर अन्याय करणारा आहे. पुरुष कितीही बायका करू शकतो. तसेच कुणाही स्त्रीला एकतर्फी घटस्फोट देऊ शकतो. अशा स्त्रियांना कुणाचा आधार राहत नाही. ही परिस्थिती बदलली पाहिजे; सवत-बंदी झाली पाहिजे. तसेच तलाक न्यायालयामार्फत, योग्य कारण असल्यासच देता आला पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. तसे झाल्यास मुस्लीम स्त्रियांना घरात हक्काचे स्थान प्राप्त होईल व मुस्लीम समाजाची चांगली, सुसंस्कृत भावी पिढी निर्माण होईल. मंडळ याचकरता समान कायद्याचा पुरस्कार करत असून

सहयांची मोहीम मंडळाने त्याकरता हाती घेतली आहे.

समतेसाठी सारा खटाटोप

इतर बाबतींतदेखील मंडळाची भूमिका अशीचआहे. सर्व माणसे समान आहेत, असे मंडळ मानते. माणसामाणसांत धर्मावरून, जातीवरून, लिंगावरून, वर्णावरून भेद केला जाता कामा नये. सर्वांना समान अधिकार व सर्वांवर समान जबाबदाऱ्या असलेला समाज निर्माण करण्यासाठी हे मंडळ कार्य करत आहे. या कार्यात आम्हाला सर्वांचे सहकार्य हवे आहे. *(मुस्लिम सत्यशोधक पत्रिका, अंक २ रे, मे १९७३, पान नं. ९ व १०)*

डॉ. मोहम्मद आजम, अहमदनगर यांनी केलेल्या तीन सूचना आणि उपस्थित केलेल्या प्रश्नांना दलवाई यांनी दिलेला प्रतिसाद

(मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेच्या जानेवारी ते ऑगस्ट १९७३ अंकात मंडळाची आवश्यकता, उद्दिष्टे, कार्ये आणि वैचारिक भूमिका इत्यादी संदर्भात वेळोवेळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे हमीद दलवाई यांनी पत्रिकेतून प्रसिद्ध केली. याबर प्रतिक्रिया म्हणून डॉ. मोहम्मद आजम, अहमदनगर यांनी केलेल्या तीन सूचना आणि उपस्थित केलेल्या प्रश्नांना दलवाई यांनी दिलेला प्रतिसाद.)

ऑगस्ट १९७३चा अंक मनःपूर्वक वाचून काढला. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे उद्देश माझ्या (मुस्लीम समाजासंबंधी, त्यांच्या सुधारणासंबंधी) उद्देश्यांशी तंतोतंत मिळते-जुळते आहेत. परंतु तुमचा मार्ग फारच अतिरेकी स्वरूपाचा आहे. त्यामुळे साध्यापर्यंत पोहोचण्याचा साधनमार्ग भिन्न असल्याकारणाने तुमच्या तत्त्वाशी माझा वैचारिक मतभेद आहे. हा तात्त्विक मतभेद नव्हे. मी आपले विचार स्पष्टपणे मांडत आहे, याबद्दल क्षमस्व! जर माझ्या सूचना आपल्या मंडळाला मान्य असतील, तर मी आपल्या मंडळाला सहकार्य द्यायला तयार आहे. माझ्या सूचना खालीलप्रमाणे आहेत –

१) तुमचा मार्ग अतिरेकी आहे. तो विध्वंसक आहे. तो विधायक नाही. टीकास्त्र हेच तुमचे शस्त्र दिसते, परंतु याहूनही अधिक परिणामकारक, परंतु मुलायम शस्त्र आहे. त्याचा तुम्हास उपयोग करावयास हवा होता. ते अस्त्र म्हणजे प्रेम! द्वेष टाकून प्रेमाने तुम्हाला मुसलमानांची मने सहज जिंकता येतील. धर्मवेड्या मुसलमानांची मने तर तुम्ही सहज जिंकू शकाल. यासाठी तुम्ही बहुजन मुस्लीम समाजामध्ये मिळून-मिसळून राहा. त्यांना त्यांच्या चुका दाखवून द्या, पटवून द्या, मतपरिवर्तन घडवून आणा. त्यांच्या पोटात शिरा. त्यांना तुम्ही आपले म्हणणे अदबीने पटवून द्या; शिव्याशापाने नव्हे.

२) मुसलमानांच्या धर्मांधतेस कारणीभूत असलेला सर्वांत मोठा शत्रू म्हणजे त्यांचे अज्ञान होय. तसेच धर्मभोळेपणा व दारिद्र्य होय. यांपैकी आपल्याला अज्ञान नष्ट करून उर्वरित शत्रूचा नायनाट सहजतेने करता येईल. यासाठी तुमचा एक उपक्रम मला अतिशय आवडला. तो म्हणजे,

मुसलमानांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी शैक्षणिक शिबिर भरविणे. याला माझा हार्दिक पाठिंबा आहे. जर आपण मला या बाबतीत संधी द्याल, तर मीही या संबंधी आपले विचार अवश्य प्रकट करीन. यासाठी तुम्ही 'शैक्षणिक पुनरुज्जीवन आघाडी' उघडली, तर फार बरे होईल.

३) घटस्फोट, द्विभार्या व पारित्यक्तांचा कायदा यांना नसता विरोध करू नका. एकदा मुस्लिमांमध्ये शैक्षणिक जागृती झाली, म्हणजे ते आपोआप होईल. मुस्लीम समाजामध्ये घटस्फोट, द्विभार्या यांचे प्रमाण किती आहे, हे मला तुम्ही आकडेवारीनिशी सांगा. याउलट तुम्हास हिंदू समाजामध्ये याचे प्रमाण निश्चितच जास्त असलेले आढळून येईल. शास्त्रोक्त पद्धतीने आकडेवारी काढली, तर खरोखरच वरील समस्या मुसलमानांमध्ये असेल, असे कोणालाही वाटणार नाही.

मी फार सविस्तर लिहू इच्छित होतो, परंतु सध्याला एवढेच पुरे आहे. आपण जर 'असेही, पण एक पत्र' या सदराखाली माझ्या वरील विचारांना स्थान देण्याचे धाडस पुढील अंकी कराल, तर तुमचे करावे तितके कौतुक थोडेच होईल!

उत्तर : आजम यांनी आपल्या पत्रात तीन मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांना क्रमवार, सविस्तर उत्तर देणे आवश्यक आहे.

१) आमच्या कार्याशी त्यांचे तात्त्विक मतभेद नसल्याचे ते म्हणतात आणि लगेच पुढे, तिसरा मुद्दा उपस्थित करताना मुस्लीम विवाह कायद्याचे अप्रत्यक्ष समर्थन करतात. हा मतभेद तात्त्विक नाही काय? आपला साधनमार्ग भिन्न आहे, असे ते मानतात. तसे असेल तर आनंदाची बाब आहे. परंतु समाज परिवर्तनासंबंधी त्यांचे विचार नेमके कोणते, हे ते स्पष्ट करी तनाहीत. त्यांची संबंध भाषा मोघम, मूळ मुद्द्यास बगल देणारी वाटते. वस्तुतः मुस्लीम समाज राजकीयदृष्ट्या जातीयवादी आहे, धर्मदृष्ट्या परंपरावादी आहे आणि सामाजिकदृष्ट्या पुराणमतवादी आहे, ही मुस्लीम सत्यशोधक मंडळाची भूमिका आहे. ही भूमिका आजम यांना मान्य आहे काय? असल्यास साधन मार्गासंबंधी आमचा आग्रह नाही. आपला समाज बदलण्यासाठी कोणती साधने वापरायची, हे आपण आपसात चर्चा करून ठरवू, एकवाक्यता झाली, तर एकत्र काम करू. झाली नाही, तरी वाईट वाटण्याचे कारण नाही. वेगवेगळ्या मार्गांनी, स्वतंत्रपणे काम करू या. सर्वांनी आमच्याच मार्गाने जावे, असा आमचा अजिबात आग्रह नाही.

२) आमचा मार्ग अतिरेकी आहे, समाजाला प्रेमाने जिंकले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणजे नेमके काय केले पाहिजे, हे ते सांगत नाहीत. कुठलाही समाज बदलताना टीका ही आवश्यक असते. ख्रिश्चन समाज अथवा हिंदू समाज यांच्यातील बदलाची प्रक्रिया आजम यांनी समजून घ्यावी. मार्टिन लुथर यांनी केलेली टीका, फुले-आगरकर यांनी केलेली टीका वाचून पाहावी.

टीका करू नका म्हणणारे एकतर लबाड तरी असतात किंवा नेमक्या कोणत्या सुधारणा घडवून आणावयाच्या आहेत, या संबंधी त्यांच्या मनात संदेह तरी असतो. आजम यांचेवर आम्ही लबाडीचा आरोप करू इच्छित नाही. प्रेमाने समाज बदलण्यासंबंधीचे आपले विचार त्यांनी जरा

स्पष्टपणे व उदाहरणासहित मांडावेत. मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेत त्यांच्या विचारांना जरूर प्रसिद्धी देण्यात येईल.

प्रेमाने समाज अथवा विरोधक बदलण्यासंबंधी थोडे अधिक विचार करणे येथे आवश्यक ठरेल. गांधीजींनी मुसलमान समाजाला प्रेमाने जिंकण्याचा प्रयत्न केला. शक्यतो त्या समाजावर टीका करण्याचे टाळले. त्याला कोणते यश आले? गांधीजी प्रेमाने जिंकण्यावर विश्वास ठेवीत, परंतु याचा अर्थ विरोधकाशी लढायचे नाही, असा होत नाही. ते ब्रिटिशांशी लढलेच व त्यांना 'चले जाव' असेही त्यांनी सांगितले.

सध्या इस्राइल अरबांच्या व्याप्त प्रदेशांतून मागे हटत नाही. जागतिक दडपण असूनही इस्राइल जुमानत नाही. इस्राइलने विवेकी मार्ग अवलंबावा म्हणून प्रेमाचा कोणता मार्ग अरबांनी अवलंबावा, असे आजम यांना वाटते? ते अरबांना कोणता सल्ला देऊ इच्छितात, हे कळले तर बरे होईल.

३) मुस्लिमांमध्ये शैक्षणिक जागृती झाली की, ते आपोआपच एकपत्नीत्वाचे पालन करतील, अशी आजम यांची श्रद्धा आहे. शिक्षण घेतले की, माणसे आपोआपच सुसंकृत बनतात, असा त्यांचा समज आहे; वस्तुस्थिती तशी नाही. जिनांसारख्या शिकलेल्या मुसलमान नेत्यांनी जातीयवाद पोसला, हे या संदर्भात आजम यांना सांगावेसे वाटते. शिकलेली माणसे स्त्रियांना चांगली वागवतात अथवा त्यांना समान दर्जा देतात, असे नाही. स्वित्झर्लंडसारख्या शंभर टक्के साक्षरता असलेल्या देशात दोन वर्षांपूर्वीपर्यंत स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता. फ्रान्ससारख्या प्रगत देशात कालपर्यंत स्त्रियांना बँकेत आपले वेगळे खाते उघडता येत नसे.

शिक्षण घेतल्यानंतर सर्व सुधारेल, असे प्रतिपादन करतानाच आजम मुस्लिमांत घटस्फोट व द्विभार्यांचे प्रमाण जास्त नाही, असेही सांगतात. जर प्रमाण जास्त नाही व मुसलमान समाज आताच अशिक्षित अवस्थेत सुधारलेला आहे, असे त्यांचे म्हणणे आहे, तर मग तो शिक्षणाने सुधारणार आहे, असे विधान ते कशाकरता करत आहेत? ही परस्परविरोधी विधाने करून 'आपले प्रतिपादन किती दुबळे आहे' हे त्यांनी दाखवून दिले आहे. बहुपत्नीत्वाचे प्रमाण हिंदू समाजात जास्त आहे, असे त्यांनी विधान केले आहे. तेही वस्तुस्थितीला धरून नाही. कटक येथील एका संस्थेने या बाबतीत पाहणी केली असून हिंदू कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी झालेल्या लग्नांमध्येच बहुपत्नीत्व पाळण्याचे हिंदूंचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले आहे. हिंदू कायदा ५४ साली झाला व त्याला आता वीस वर्षे होऊन चुकली आहेत. आता मुसलमान समाजात ते जास्त आहे, हे या पाहणीत दिसून आले आहे.

हिंदूंत घटस्फोटाचे प्रमाण जास्त की कमी आहे, याला आमचे दृष्टीने काही महत्त्व नाही. अमेरिकेत घटस्फोटाचे प्रमाण सर्वांत जास्त आहे. म्हणून तेथे घटस्फोट विरोधी चळवळ झाली पाहिजे, असे नव्हे. अमेरिकी समाजात, रशियन समाजात किंवा हिंदू समाजात होणारे घटस्फोट व मुस्लिमांत होणारे घटस्फोट यांत एक मूलभूत फरक आहे. तेथे घटस्फोट होताना स्त्रीवर अन्याय होत नाही. तिला नुकसान भरपाई मिळते. मुलांच्या संगोपनाची योग्य ती तरतूद होते व मुख्यतः न्यायालयाकडून घटस्फोट मिळतो. 'तलाक तलाक तलाक' असे तीनदा उच्चारून बायकोला

हाकलून दिले जात नाही. तेव्हा आजम यांनी घटस्फोटासंबंधी हिंदू समाजाचे दिलेले उदाहरण गैरलागू आहे. घटस्फोट होऊच नयेत, अशी मुस्लीम सत्यशोधक समाजाची भूमिका नसून घटस्फोट होताना स्त्रीवर अन्याय होऊ नये, ही आहे. कायदेशीर, समानतेच्या आधारे होणाऱ्या घटस्फोटाला आमचा विरोध नाही.

मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक उन्नतीबाबत आमच्याशी सहकार्य करावयाची इच्छा आजम यांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या सहकार्याचे आम्ही स्वागतच करू. पत्रिकेत शैक्षणिक परिषदेची माहिती देणारे निवेदन प्रसिद्ध केलेले आहे. त्यांनी शिक्षण परिषद यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आम्ही अखेरीला आवाहन करतो. *(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, अंक ४, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर, १९७३, पृ. क्र. ३ ते ५)*

५.६ हमीद दलवाईंची अखेरची मुलाखत – यदुनाथ थत्ते

(सलग तीन-चार वर्षे मूत्रपिंडाच्या आजाराशी सामना करणाऱ्या दलवाईंची ज्येष्ठ पत्रकार यदुनाथ थत्ते यांनी शेवटच्या काळात मुलाखत घेतली आणि दलवाई यांच्या निधनाच्या फक्त दोन दिवस अगोदर साप्ताहिक साधनामध्ये ती प्रकाशित करण्यात आली.)

हमीद दलवाई यांच्याशी झालेली ही बातचीत एकदा त्यांनी नजरेखालून घालावी, अशी कल्पना होती. पण त्यांचे प्रकृतिमान अद्यापी त्या स्थितीला आलेले नाही. त्यामुळे त्यांनी न पाहताच ही बातचीत प्रसिद्ध करावी लागत आहे. सध्या यांत्रिक मूत्रपिंडाच्या साहाय्यानेच रक्तशुद्धीकरण करून घ्यावे लागत आहे. एवढेच नव्हे, तर अशक्तपणाही खूपच आलेला आहे. अशक्तपणा आटोक्यात आल्यानंतर पुनरपी मूत्रपिंड आरोपण करावयाचा निर्णय तज्ज्ञ मंडळी करतील. जसलोक रुग्णालयातील विशेष काळजी (इनटेनसिव्ह केअर) विभागात त्यांना सध्या ठेवण्यात आलेले आहे.

गेल्या वर्षी ते अमेरिका व युरोप येथील काही देशांचा धावता दौरा करून आले होते. त्यानंतर त्यांची गाठभेटही झाली होती. नेहमीच्याच मनोरंजक पद्धतीने त्यांनी तिकडील अनेक हकिगती सांगितल्या होत्या.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सभांना हजर राहून त्यांनी मार्गदर्शन केले होते. एवढेच नव्हे, तर काही केंद्रांना त्यांनी भेटीही दिल्या होत्या.

अमरावती केंद्राने कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांबाबत उत्साहाने काम केल्याबद्दल प्रत्यक्ष तेथे जाऊन त्यांनी त्यांचे जाहीर कौतुक केले होते. लोकसंख्येच्या आर्थिक व सामाजिक परिणामांबाबत लोकशिक्षण करण्याबाबत मुस्लीम सत्यशोधक मंडळाने अग्रभागी असावे, अशी त्यांची इच्छा होती.

पुण्यात अन्य मतावलंबी मुस्लीम कार्यकर्त्यांशी अत्यंत मोकळ्या वातावरणात सुरू झालेला संवाद तसाच पुढे चालावा, अशी त्यांची इच्छा होती. तलाकपीडित स्त्रिया आणि त्यांच्या अपत्यांची होणारी आबाळ हा एक जिव्हाळ्याचा विषय चर्चिला जात होता आणि लोकसंख्यावाढीच्या परिणामांबाबतही विचारविनिमय केला जात होता. मुस्लीम समाज आणि देशातील राजकीय मतप्रवाह या प्रश्नालाही तोंड यायला लागले होते. आजारपणामुळे निर्माण झालेला अंतराय भरून काढण्याची त्यांना उतावीळ झाली होती आणि त्यामुळे कामाचा सपाटा सुरू झाला होता.

अशात त्यांना कावीळ झाल्याचे समजले आणि काळजी वाटू लागली. तरीही 'आजार मामुली आहे आणि त्यातून ते लवकरच बाहेर पडतील' अशी आशा होती.

मूत्रपिंड आरोपणाची त्यांची शस्त्रक्रिया यशस्वी झाली होती. शरीराला मूत्रपिंड नाकारायचे असले, तर ते शस्त्रक्रियेनंतर सहा महिन्यांतच नाकारते, अशी कल्पना असल्याने आणि तो काळ

उलटून गेल्याने सर्व जण निश्चिन्त होते.

काविळीनंतर काही दिवस त्यांना बारीक ताप येत होता. जसलोकमध्ये त्याबाबतच्या तपासण्या सुरू झाल्या होत्या. आरोपित मूत्रपिंडाचे काम थांबले असल्याचे शोधता शोधता आढळले! पण ह्या मधल्या काळात रक्तदोष बराच बाढला होता आणि परिस्थिती चिंताजनक झाली होती. त्यांना बराच थकवाही आला होता.

शेवटी यांत्रिक मूत्रपिंडाने रक्तशुद्धीची क्रिया करून घेणे अपरिहार्य बनले आणि डॉक्टर त्यामागे लागले. दलवाईंना जसलोकमध्ये भरती करणे भाग पडले. त्यांना भेटायला जसलोकमध्येच गेलो. दलवाई बेचैनपणे बिछान्यात पडले होते; ग्लानी बरीच होती. त्यांच्या पत्नी आणि कन्येकडे आजार व उपचार यांबद्दल चौकशी केली. 'पुन्हा एकदा मूत्रपिंड आरोपणाची शस्त्रक्रिया करण्याचा डॉक्टरांचा मानस आहे. त्यासाठी आधी यांत्रिक मूत्रपिंडाचा वापर करून रक्तदोष निवारण करावा लागेल. त्यानंतर अशक्तपणा दूर करावा लागेल. योग्य तऱ्हेचे मूत्रपिंड उपलब्ध व्हावे लागेल आणि नंतर शस्त्रक्रिया. पण तोवर यांत्रिक मूत्रपिंडाचा उपयोग करणे क्रमप्राप्त आहे आणि त्यासाठी रुग्णालयातच राहावे लागेल' असे त्यांनी सांगितले.

ही सर्व चौकशी हलक्या आवाजात सुरू होती, पण हमीदला त्याची चाहूल लागत होती. मग त्याच्याजवळ गेलो. ओळख पटण्याला थोडा वेळ लागला. पण मग म्हणाला, ''काय म्हणते आहे राजकारण? सांगा.''

हमीदला राजकारणात फार गोडी आहे. 'समाजपरिवर्तनाच्या गतिशास्त्राचा अभ्यास' हा त्याच्या आवडीचा विषय. त्यात राजकारणाला अनन्य महत्त्व असते आणि त्याची उपेक्षा कोणीही सार्वजनिक कार्यकर्ता करू शकत नाही. अर्थात, राजकारण म्हणजे पक्षीय आणि सत्तेचे राजकारण एवढाच मर्यादित अर्थ अभिप्रेत नाही.

हमीद प्रथमपासूनच सेक्युलर राजकीय प्रवाहांबद्दल आस्था बाळगणारा. इबादत म्हणजे प्रार्थना. 'त्याबाबत व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य असावे' असे त्याचे मत. पण इहलोकातील सामाजिक संबंधांबाबत मात्र बुद्धिनिष्ठ भूमिकेने विचार करावा व राज्यसत्तेचे सार्वभौमत्व मान्य करावे, असे त्याचे प्रतिपादन आहे. समान भारतीय नागरिकत्वाच्या आधारावरच हे सर्व घडून येईल, अशी त्याची धारणा आहे.

मुस्लीम समाजाला आणि मुख्यतः त्यातील स्त्रियांना आता कुठे वाणीचा अंकुर फुटत होता आणि त्यामुळे विचारांची एक नवी प्रक्रिया मुस्लीम समाजात सुरू झाली होती. धर्मतत्त्वांची आणि तदनुषंगिक कर्मकांडाची चिकित्सा तरुण मंडळी करू लागली होती. हे सामाजिक निकोपतेचे लक्षण होते. आणीबाणीतील बंधनांमुळे या प्रक्रियेला मर्यादा पडल्या होत्या. भीतीचे खरे वा काल्पनिक वातावरण पसरल्यामुळे मुक्त विचारविनिमय आणि अभिसरण कुंठित झाले होते. विचारस्वातंत्र्य मर्यादित झाले की त्याचा सर्वांत जबर तडाखा मागासलेल्या समजांनाच बसत असतो. हमीदसारख्या कलावृत्तीच्या माणसाला त्यामुळे बेचैनी वाटावी, हे स्वाभाविक होते.

पण निवडणुका जाहीर झाल्या आणि वातावरणातला तणाव कमी होऊ लागला. वृत्तपत्रांत

मोकळेपणाने विविध विषयांची चर्चा सुरू झाली. तेव्हा हमीदलाही त्याची खुशी झाली. सामान्य मतदारांनी निश्चयाने आपला मतदानाचा हक्क बजावून मतदान-पेटीतून अपूर्व अशी शांततामय क्रांती घडवून आणली, याबद्दलचा आपला आनंद त्याने बोलून दाखवला.

त्याच्या घशाला कोरड पडत होती, पण त्याला खूप काही बोलायचे होते. आवाज क्षीण येत होता, डोळे मिटत होते, पण तो बोलत होता. त्याच्या तोंडचे शब्द निसटून जाऊ नयेत म्हणून दक्षतापूर्वक ऐकावे लागत होते.

तो म्हणाला, ''झाले ते चांगलेच झाले. सार्वभौम जनतेला त्यामुळे एक नवा आत्मविश्वास आला आहे आणि राज्यकर्त्यांना तिने एक इशाराही देऊन ठेवला आहे की, 'तुम्ही चुकीच्या मार्गाने जाल, तर तुम्हाला सिंहासन खाली करावे लागेल.' या निवडणुकीच्या निमित्ताने तरुणांत प्रचंड जागृती झाली. या वेळी मुसलमानांनी सदैव सत्तेला धरून राहण्याची आपली परंपरा सोडल्यासारखे दिसले, ही घटनाही स्वागतार्ह आहे. पण...'' हमीदचा हा 'पण' काय ते जाणून घेणे महत्त्वाचे होते.

तो म्हणाला, ''शाही इमाम आणि अन्य सनातनी मुस्लीम नेते मोठ्या प्रमाणावर जनता पक्षाच्या व्यासपीठांवरून भाषणे देत होते, इथपर्यंत ठीक होते. मुस्लिमांनी मुस्लीम म्हणून गठ्ठा पद्धतीने नव्हे, तर नागरिक म्हणून व्यक्तिशः मतदान करावे, असे घडायला हवे होते आणि राजकीय मतांनुसार मुस्लीम नागरिकांनी वेगवेगळ्या राजकीय पक्षांबरोबर काम करायला हवे होते. पण खिलाफतीच्या काळासारखे वातावरण यातून जन्म पावेल की काय अशी शंका मला छळीत होती. राजकीय क्षेत्रात धर्मगुरूंची लुडबुड सुरू होणे, हे निकोप लोकशाही, सेक्युलर राजकारणाला उपकारक नाही.''

''विशेषतः रामलीला मैदानावरील विजयसभेत शाही इमाम यांनी केलेल्या भाषणाने चिंता निर्माण झाली. जनता पक्षाच्या मंत्रिमंडळातील मुस्लीम मंत्र्यांची नावे त्यांच्या पसंतीची असावीत, अशी त्यांनी जाहीरपणे सूचना केली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात मुस्लीम लीगचे असेच मागणे असे. विधानसभेत आणि संसदेत बहुमत काँग्रेसचे असे, त्यामुळे त्यांनी आपला मंत्रिसंच निवडावा हे ओघानेच आले. पण लीगला आपल्या पसंतीचा मुस्लीम मंत्री हवा असे! लोकशाहीतील पक्षीय राजकारणात ते शक्य नव्हते. सेक्युलर राजकारणात जातीय विचाराला स्थान असताच कामा नये. परंतु सामाजिक वास्तवता ध्यानी घेऊन सत्तापदांचे वाटप अजून तरी करावे लागते, पण त्या-त्या पक्षाचा तो अंतर्गत प्रश्न आहे. धर्मगुरू, जातपंचायती यांचा अधिकार याबाबत मान्य झाला, तर सेक्युलर राजकारणच संपुष्टात येईल आणि जातीजमातींपायी देश पुनरपी शतखंड होईल! शाही इमाम यांची मागणी मान्य झाली नाही, हे बरेच झाले. नाहीतर आपण पुन्हा ५० वर्षे मागे गेल्यासारखे झाले असते! धार्मिक नेत्यांना राजकारणात किती महत्त्व द्यायचे, याचा विवेक बाळगला पाहिजे. धार्मिक व जातीय नेत्यांनी पत्रके काढून अमक्याला व तमक्याला आपल्या जमातीने मते द्यावीत असे सांगणे आणि त्याला राजकीय पक्षांनी तात्कालिक स्वार्थासाठी प्रोत्साहन देणे उचित ठरणार नाही.''

यानंतर तो लोकसंख्या वाढीच्या प्रश्नाकडे वळला... म्हणाला, ''कुटुंब नियोजनाबाबतचे

अत्याचार क्षम्य नाहीतच, पण त्या अत्याचारांवर प्रमाणाबाहेर भर दिला गेला, तर कुटुंब नियोजनाचा सारा कार्यक्रमच कोसळून पडेल. लोकसंख्यावाढ नियंत्रित ठेवली नाही, तर भारत समृद्ध आणि सुदृढ होऊ शकणार नाही. कुटुंब नियोजनाबाबत विवेकाने वागले पाहिजे. पण निवडणुकीत त्याविरोधी इतके प्रमाणाबाहेर वातावरण निर्माण झाले आहे की, लोकसंख्याविषयक लोकशिक्षणाचे कार्य थांबून जाईल, अशी भीती आहे! याबाबत विवेक सांभाळून कायद्याने काही सक्ती करणे भागच पडेल. देवी-कॉलरा-प्लेग यांच्या साथींच्या वेळी जशी विवेकी सक्ती करावी लागते, सर्वांना सक्तीने लस टोचण्यात येते, तसे धोरण ठेवावे लागेल. कुटुंब नियोजनाऐवजी कुटुंबकल्याण म्हटले तरी त्याने बिघडत नाही; कारण भांडण शब्दाशी नाही, मतल बाशी आहे. भारतासारख्या मागसलेल्या देशात लोकसंख्यावाढीला परिणामकारक आळा घातला गेला नाही, तर दारिद्र्यरेषेखालच्या सत्तर टक्के लोकांना त्या रेषेवर येण्याचीदेखील कधीच आशा नाही. तेव्हा याबाबत लोकांचे शिक्षण सतत झाले पाहिजे. त्यांना वैज्ञानिक व बुद्धिवादी दृष्टी दिली पाहिजे; अंधविश्वास, अपसमज दूर केले पाहिजेत. आणीबाणीच्या काळात अनेक प्रकारचे अत्याचार झाले आणि त्यांत कुटुंब नियोजनविषयक अत्याचारही मोठ्या प्रमाणावर झाले. त्यांची योग्य ती चौकशी सरकारतर्फे होईलच, पण आता त्याच एका प्रश्नावर भर देण्याऐवजी लोकशिक्षण केले पाहिजे. मुस्लीम समाज आता कुठे ह्या प्रश्नाचे स्वरूप ध्यानी घेऊ लागला होता... 'आपले दारिद्र्य, मागासलेपणा लोकसंख्याविषयक अज्ञानातून उगम पावले आहे' हे आता कुठे तो समजून घेऊ लागला होता. त्याबाबतचा तोल बिघडता कामा नये."

"महाराष्ट्र सरकारने त्या मानाने चांगला कायदा केला होता, पण मतांच्या लोभाने उचललेले पुरोगामी पाऊल त्यांनी ऐन निवडणुकीच्या काळात मागे घेतले. संख्यात्मक लक्ष्यांक ठरवून दिल्यामुळे अविवेक आणि अत्याचार घडून आले आणि आणीबाणीमुळे त्याला काही ताळतंत्रच राहिला नाही! अति उत्साही मंडळींनी अत्याचार केले, त्यांना त्याबाबत शासन झाले, तर तेही गैर ठरणार नाही. पण त्या सबबीखाली लोकसंख्यावाढीबाबतचे शिक्षण बंद करता कामा नये आणि विवेकाच्या मर्यादेत सक्तीही करावी लागेल."

हमीद दलवाईंना थकवा येत होता... घशाला कोरड पडत होती... त्यांना घोट घोट पाणी दिले. त्यांनी अशा अवस्थेत बोलू नये असे वाटत होते, पण तळमळ त्यांना स्वस्थ राहू देत नव्हती. ते म्हणाले, "समान नागरी कायद्याशिवाय समान नागरिकत्वाची भावना लोकमानसात रुजणार नाही, ही गोष्ट उघड आहे. त्यासाठी लोकशिक्षण करण्याचा आपण प्रयत्न करीत होतो. निवडणुकींच्या जाहीरनाम्यात आणि प्रचारसभांत ह्या प्रश्नाकडे सर्वस्वी दुर्लक्ष झालेले दिसते! या प्रश्नाबाबतही सतत लोकशिक्षणाचे कार्य होत राहिले पाहिजे; लोकानुनयाला मर्यादा असली पाहिजे. मागसलेल्या देशातील लोकांची मनेही मागसलेली असतात. केवळ लोकानुनय करीत राहिले, तर असे देश कायमचेच मागसलेले राहतील. अधिक्रमशील राजकारणात केवळ लोकानुनय पुरेसा नसतो. लोकप्रिय नेत्यांनी आपल्या लोकप्रियतेचा विनियोग करून समाजाला शिक्षण द्यायचे असते. अस्पृश्यता निवारणाबाबत गांधीजींनी हे केले आणि त्यामुळे सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने काही पावले पुढे पडली. लोकानुनय, लोकशिक्षण, लोकप्रियता यांबाबतचा

विवेकी समतोल बिघडता उपयोग नाही. समान नागरिकत्वाच्या पायावरच राष्ट्रीय एकात्मतेची इमारत उभी राहू शकेल.''

एवढे बोलता बोलताच हमीदला खूप थकवा आणि ग्लानी आली. त्याने डोळे मिटून घेतले. ओठ काही क्षण हलत होते, पण शब्द उमटण्याइतके त्राण त्याच्यात नव्हते. हमीदच्या बिछान्याजवळून उठताना मन अस्वस्थ झाले खरे, पण जसलोकच्या डॉक्टरांनी खात्री दिली आहे की, 'ह्या आजारातून तो बाहेर पडेल. त्यांच्या तब्येतीला तसा धोका नाही.' पुन्हा एकदा नवे मूत्रपिंड आरोपण करण्याची शस्त्रक्रिया करून हमीदला आरोग्यलाभ करून देण्याचा त्यांचा निश्चय आहे.

हमीदच्या परिवाराचा निरोप घेऊन जसलोकमधून बाहेर पडलो. 'डॉक्टरांचा निश्चय लवकर सिद्धीस जावो' असा विचार घोळवीतच चालू लागलो. *('साधना' ता. १ मे १९७७ च्या अंकातून साभार)*

(यदुनाथ थत्ते: ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे चाहते आणि पाठीराखे. यदुनाथ थत्ते हे साधना साप्ताहिकाचे संपादक होते. मुस्लीम विषयांवर त्यांनी विपुल लेखन केलेले आहे.)

५.७ एक इटुकला मोर्चा – विजय तेंडुलकर

हमीद दलवाई यांच्या नेतृत्वाखालील सात मुस्लीम महिलांचा मोर्चा (१८ एप्रिल, १९६६) गेल्या सोमवारी मुंबईत काळ्या घोड्यापाशी (गेला बिचारा! आता केवळ त्याची स्मृती तेवढी राहिली) तुम्ही असायला हवे होते.

विधानसभेचे अधिवेशन मुंबईत चालू असले की, जवळजवळ रोज एक तरी मोर्चा विधानसभेच्या दिशेने काढण्यात येतो... न चुकता, शिरस्त्राणधारी व लाठीधारी पोलीस तो काळ्या घोड्याशी अडवतात आणि मोर्चाच्या शिष्टमंडळाला तरी मंत्र्याच्या भेटीला जाऊ देण्यात येते.

सोमवारीही एक मोर्चा काळ्या घोड्याशी आला आणि रीतीनुसार पोलिसांनी तो रोखला. हा मोर्चा अजब होता. यात फक्त सात, इन-मिन सात मोर्चेवाले होते. या सगळ्या स्त्रिया होत्या. त्या कोणत्याही आक्रस्ताळ्या घोषणा करीत नव्हत्या; लाल झेंडे तर नव्हतेच... झालेच तर, कोणत्याच राजकीय पक्षाने किंवा कामगार संघटनेने हा मोर्चा आखलेला नव्हता. 'पगारवाढ झालीच पाहिजे', 'बोनस लवकर मिळालाच पाहिजे', 'गोऱ्या मॅनेजरची हकालपट्टी करा', 'बेकार कामगारांना कामावर घ्या' असली एकही ठरीव मागणी हे मोर्चेवाले करीत नव्हते. 'मोर्चा' या शब्दाची लाज जावी इतके ते सारे किंवा त्या साऱ्या मर्यादशील आणि शांत होत्या. कुठे पोलिसांचे कडे तोडून झुंडीने विधानसभेच्या दिशेने धावत सुटणारे आमचे एरवीचे लढवय्ये मोर्चेवाले आणि कुठे पोलिसांनीच कडे करून विधानसभेवर नेऊन सोडाव्यात अशा त्या सात मोर्चेवाल्या!

विधानसभेवर मुख्यमंत्र्यांनी या सर्वांत छोट्या मोर्चाची भेट घेतली. काळ्या घोड्यापाशी या इटुकल्या मोर्चाच्या स्वागतार्थ महिला आमदार सामोऱ्या गेल्या होत्या.

मोर्चेवाल्यांनी एकच मागणी केली – 'या राज्यात हिंदूना लागू असलेला द्विभार्या प्रतिबंधक कायदा मुसलमानांनाही लागू करण्यात यावा.'

मोर्चेवाल्या स्त्रिया मुसलमानच होत्या. त्या सात जणीच होत्या, परंतु त्यांची मागणी महाराष्ट्रातल्या मुसलमानांच्या घराघरांत, गोषाच्या बंदीगृहात, एका वेळी दोन-दोन, तीन-तिनांच्या संख्येने खितपत, एखाद्या ओझ्याच्या जनावरासारखे आयुष्य काढणाऱ्या असंख्य स्त्रियांच्या वतीने होती. गतानुगतिके मुसलमान पुरुषांच्या कृपेने या स्त्रियांना शिक्षणाचा गंध नाही, घराबाहेरच्या जगाची ओळख नाही, तिळमात्र आत्मविश्वास नाही, साध्या... खुल्या प्रकाशाचेदेखील भय आहे. पाळण्याच्या झोळीपासून दफनाच्या कफनापर्यंत गुरासारख्या खस्ता उपशीत, बीण वाढवत, आपले स्वतंत्र अस्तित्व विसरून अंधारात झिजत जगणे हेच त्यांचे नशीब आहे.

माणसांनी माणसांवर लादलेल्या या नशिबाविरुद्ध दाद मागण्यासाठी, 'मुसलमान स्त्रीचे हिरावण्यात आलेले माणूसपण तिला हवे आहे' हे जाहीर करण्यासाठी हा मोर्चा होता. 'इतर स्त्रियांसारखे तिलाही खुल्या जगात जायचे आहे, सज्ञान व सुबुद्ध व्हायचे आहे, अनेक क्षेत्रांत

स्त्री म्हणून आपली जबाबदारी उचलायची आहे, स्वावलंबी व्हायचे आहें... हे सारे मुसलमान पुरुषांसकट सर्वांना कळावे, म्हणून हा मोर्चा होता. या मोर्चेवाल्या सात जणांमागे आणखी कितीतरी मनाने उपस्थित असतील. या मोर्चयाच्या शाब्दिक मागणीमागे हजारोंचा निःशब्द पाठिंबा होता. म्हणून तर केवळ सातांच्या या मोर्चयाला पोलीस अडवू धजले नाहीत; आमदारांनी धावत जाऊन त्यांचे स्वागत केले; मुख्यमंत्र्यांनी त्यांची अर्जी जातीने स्वीकारून ती पंतप्रधानांपर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले.

हा मोर्चा पाहत असता, अगदी सहजपणे आपल्या कै. गोपाळ गणेश आगरकरांची आठवण झाली. तो काळ, त्यातली आपल्या हिंदू स्त्रीची – विशेषतः विधवांची – अवस्था... आगरकरांसारख्या हट्टी माणसाने या अवस्थेविरुद्ध पराकाष्ठेची अवहेलना आणि निर्भर्त्सना पत्करूनही केलेल्या बिनगर्दीच्या, एकांड्या, जिद्दी चळवळी... सारे आठवले. तेव्हा आगरकरांच्या काळजातली विधवांच्या दुर्दशेविषयीची वेदना साऱ्या स्त्री जातीचीच तर वेदना होती! स्वतःला माणूस म्हणवणाऱ्या कोणालाही जाणवेल, अशीच ती वेदना होती. तरी आगरकरांच्या त्या 'मोर्चया'त किती मोर्चेवाले होते?

आणि तरीही आज आगरकरांचे हिंदू स्त्री विषयीचे स्वप्न मूर्त स्वरूपात आलेले आपण साक्षात पाहत आहोत. आपली स्त्री आज शिक्षित आहे; स्वावलंबीदेखील आहे... कुठे कुठे संधी पाहून पुरुषांवर दादागिरी गाजवण्यापर्यंत तिच्या कर्तृत्वाचा पल्ला पोहोचला असून गांजलेल्या पुरुषांच्या विमोचनासाठी पुढे-मागे एकदा नवा आगरकर (आगरकरीणदेखील चालेल) निर्माण व्हावा लागेल, अशी चिन्हे दिसताहेत.

त्या मोर्चेवाल्या इन-मिन-सात जणींच्या रूपाने इथल्या मुसलमान स्त्रिया यशस्वी झाल्याखेरीज राहणार नाहीत. कोणीही सर्व काळ दास्यात, अज्ञानात, अंधारात राहत नसते.... अगदी मुसलमान स्त्रीदेखील!

एक विशेष माहिती – स्त्रियांसाठी सुरू झालेल्या याही आंदोलनामागे एक पुरुषच आहे. यंदा महाराष्ट्र सरकारचे हरि नारायण आपटे पारितोषिक मिळालेल्या 'इंधन' कादंबरीचे कर्ते हमीद दलवाई तेच हे.

(डॉ. विजय तेंडुलकर : हे महाराष्ट्रातील एक सुप्रसिद्ध नाटककार आणि विचारवंत आहेत. हमीद दलवाई यांनी काढलेल्या या ऐतिहासिक महिलांच्या मोर्चा काळात तेंडुलकर दै. महाराष्ट्र टाइम्समध्ये 'कोवळी उन्हे' हे सदर लिहीत असत. त्याच वेळी त्यांनी या मोर्चयाविषयी लिहिलेला लेख २२ एप्रिल १९६६ रोजी प्रकाशित झाला होता.)

५.८ मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे एक वर्ष जागृती होत आहे : पुण्याचे सय्यद मुनीर यांची मुलाखत

गेल्या वर्षी, बावीस मार्चला (२२ मार्च १९७०) पुण्याला, आंतरभारती सभागृहात मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली. गेले वर्षभर सत्यशोधक मंडळ आपले काम नेटाने करत आहे. मंडळाचे एक कार्यकर्ते सय्य मुनीर हे पुणे विद्यापीठाचे व्यापारशास्त्राचे पदवीधर असून जवळजवळ गेले वर्षभर मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सर्व वेळ कार्यकर्ता म्हणून कार्य करत होते. त्या निमित्त ते महाराष्ट्रात अनेक ठिकाणी फिरले; पत्रव्यवहारही तेच पाहत असत. त्यामुळे त्यांना मुस्लीम मनाचा बराच मागोवा घेता आला. आता वृत्तपत्र क्षेत्रात त्यांनी प्रवेश केला असून इतर वेळी ते मंडळाचे कार्य करीत असतात. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याला अद्याप पुरेशी आर्थिक मदत उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे जेवढा कार्यविस्तार होण्याची शक्यता आहे, तेवढा तो होऊ शकलेला नाही. परंतु आपापला व्यवसाय सांभाळून कार्य करणारी तरुणांची एक छोटीशी फौज आता उभी राहिली आहे आणि तळमळीने हे तरुण कार्य करतात. मुस्लीम समाजाचे प्रबोधन करण्याचे त्यांचे प्रयत्न स्वागतार्ह आहेत. हमीद दलवाई मंडळाचे मार्गदर्शक असून सय्यदभाई मंडळाचे कार्यवाह आहेत. मंडळाच्या कार्याची ओळख मुनीर यांच्या या मुलाखतीतून चांगल्या तऱ्हेने होईल. मुस्लीम समाजाच्या प्रबोधनाचे कार्य राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. आता मुस्लीम तरुणांनीच त्या कामी नेट धरला आहे, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे.

प्रश्न : मंडळाचे कार्य तुम्ही वर्षभर करत आहात. काय अनुभव आला तुम्हाला?

उत्तर : कुठल्याही कामाचा प्रारंभ नेहमीच लहान असतो. आमच्या कामाचेही तसेच झाले. आम्ही सुरुवातीला मूठभरच मंडळी होतो. आमच्याजवळ संख्येची ताकद नव्हती, ती सत्याची ताकद होती. 'आपण योग्य मार्गाने पावले टाकत आहोत' हा आत्मविश्वास हेच आमचे बळ होते. 'स्वातंत्र्योत्तर काळातील मुस्लीम समाजाची कोंडी फोडताना अभिमन्यूचे क्षणिक प्रसंगी अपयश आपल्या वाट्याला आले, तरी विजय आपलाच आहे' अशी आमच्या मनाची खात्री होती. त्यामुळे संख्या थोडी म्हणून आम्ही नाउमेद झालो नाही. उलट चिकाटीने काम करण्याचा निश्चय केला आणि सांगायला आनंद वाटतो की, मंडळाच्या कार्याचे लोण आता महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पोहोचले आहे आणि भारतात इतरत्रही मंडळाच्या कार्याचे पडसाद उमटत आहेत. पुण्यातल्या मोमिनपुऱ्यात घरोघर जाऊन, व्यक्तिगत चर्चा करून मंडळाच्या कार्याचे महत्त्व पटवताना मार खाण्यापासून तो शनिवार वाड्यावर विमान विध्वंस प्रकरणी पाकिस्तानच्या निषेधाची जाहीर सभा घेण्यापर्यंत आम्ही मजल मारू शकलो. आमच्या कार्याचा हा आलेख आशादायी नाही, असे कोण म्हणेल?

प्रश्न : हा आलेख आशादायक आहे, पण कार्यकर्त्यांचे काय?

उत्तर : आम्हा कार्यकर्त्यांच्या कल्पनाही सुरुवातीला स्पष्ट होत्या, असे मी म्हणणार नाही. परंतु प्रत्यक्ष प्रश्नाला हात घातला, तेव्हा आमची बौद्धिक कुवत वाढत गेली. आम्हालाही अभ्यास करावा लागला. शिकल्या-सवरल्या लोकांचे प्रश्न हे आमची अडवणूक करण्यासाठी उभे केलेले पुस्तकी आणि बायफळ प्रश्न असत. याउलट सामान्य जनतेचे प्रश्न हे प्रांजळ आणि समजून घेण्याच्या बुद्धीने विचारलेले असत. त्यांच्या अशा प्रश्नांमुळे आमच्या विचारात स्पष्टता येत गेली. विशेषतः तरुण मंडळींशी चर्चा होते, तेव्हा ती अधिक फलदायी ठरते. कारण त्यांना खरोखर जिज्ञासाही असते आणि आजच्या स्थितीत अनुभवाला येणाऱ्या कुचंबणेतून सुटका करून घेण्याची त्यांची इच्छा खरी असते. त्यांना बहकवण्याचे प्रयत्न होतात, पण ज्ञानाबद्दलची तृष्णा, सत्य जाणून घेण्याची इच्छा आणि काळाचे अवधान यांमुळे तरुणांशी संवाद करणे सोपे असते. प्रथमतः आमच्या कार्याबद्दल अनेक खोट्यानाट्या कंड्या पसरवण्यात आल्या होत्या. धर्माच्या नावावर गुजारा करणाऱ्यांचा हा नेहमीचाच उद्योग असतो. पण आम्ही जेव्हा लोकांमध्ये उठूबस लागलो, तेव्हा आमच्या कळकळीबद्दल अनेकांची खात्री पटली. तरीही त्यांच्या मनावर भीतीचे दडपण होते, मुल्ला-मौलवी, पुढारी यांची त्यांच्यावर पकड होती. पण आता हे दडपण कमी होत आहे. त्याला न जुमानता ही मंडळी आमच्याकडे आकर्षित होत आहेत. ज्यांना चटके बसतात, ज्यांची होरपळ होते आणि धर्म ज्यांना दिलासा देण्याला असमर्थ ठरतो, त्यांची मने बंडाने पेटलेली असतात. त्यांना ढोंगाचा तिटकारा आलेला असतो. धर्माच्या नावाखाली होणारी फसवणूक आणि सोसावे लागणारे अत्याचार यांचा त्यांना उबग आलेला असतो. मुस्लीम सत्यशोधक मंडळामुळे या मंडळींना धीर आला, वाणी मिळाली, हे निश्चित.

प्रश्न : मंडळाला स्त्रियांकडून प्रतिसाद किती?

उत्तर : हा प्रश्न महत्त्वाचा आहे. मुस्लीम समाजात सर्वांत दडपलेला वर्ग स्त्रियांचा आहे. 'समतेचा दावा करणाऱ्या धर्मात स्त्रियांबद्दल इतका कमी कळवळा कसा?' हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. त्यांना भोगदासी समजण्यात येते. पण त्याबद्दल आता स्त्रियांमध्येही असंतोष आहे. आजवर त्यांना कोणी वाली नव्हता. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याकडे स्त्रिया मोठ्या आशेने पाहतात, असे दिसते. ह्या निरक्षर, दडपलेल्या स्त्रियापर्यंत आमच्या कार्याची माहिती पोहोचली, हे खरोखर आश्चर्यजनक आहे! परित्यक्त मुस्लीम भगिनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यालय शोधत येतात, हा अनुभव हुरूप वाढवणारा वाटतो. धर्मवादी मुस्लीम नेते मुस्लीम महिलांच्या समस्या दूर तर करत नाहीतच, उलट डोळ्यांवर कातडे ओढून बसतात. ते असे का करतात, तेच समजत नाही! लोकशाहीचा उदोउदो होत असताना अशी पक्षपाती बागणूक मुस्लीम स्त्रियांना का? आम्ही कोथरूडला शिबिर घेतले. त्याला ५० मुस्लीम तरुण स्त्री-पुरुष आले होते. मंडळाच्या ध्येयधोरणाने कार्यप्रवण झालेल्या तरुणी आता मोहोल्ल्या-मोहोल्ल्यांत फिरून, घरोघरी जाऊन मंडळाच्या कार्याची माहिती स्त्रियांना देत आहेत आणि अनेक ठिकाणी मुस्लीम स्त्रिया जमू लागल्या आहेत. त्यांच्याही मनात दास्याच्या विरोधात त्वेष धुमसत आहे.

आम्हाला असा विश्वास वाटतो की, येत्या मे महिन्यात मुस्लीम स्त्रियांचे एक संमेलन आम्ही घेऊ शकू. या संमेलनाला महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणांहून स्त्रिया येऊ शकतील आणि तसा आमचा प्रयत्न आहे. हे काम अवघड आहे, पण तेही घडून येईल, अशी आशा आम्ही बाळगून आहोत.

प्रश्न : इस्लामबद्दल जनतेच्या काय कल्पना आहेत?

उत्तर : धर्माबाबत अपार अज्ञान पसरलेले आहे. कितीतरी महत्त्वाच्या गोष्टी सामान्य मुसलमानाला ठाऊकच नाहीत. अज्ञानाच्या आधाराबरच अंधश्रद्धा फोफावत असतात. पैगंबर साहेबांच्या निर्वाणानंतर कुराण संग्रहित झाले, ही गोष्ट बहुतेकांना माहीत नाही. कुराण न पाहिलेले मुसलमान आहेत; अभ्यास करणारे फारच थोडे; कोणीतरी सांगितलेला सोयीस्कर अर्थ हाच मुळातला अर्थ असल्याचे ते गृहीत धरून चालतात. धर्म हा पुष्कळदा रीतीरिवाज आणि रूढीपुरताच शिल्लक राहिलेला आहे. एकाच कुराणाचे वेगवेगळ्या पंडितांनी वेगवेगळे अर्थ लावले आहेत, याची जाण सामान्य मुसलमानाला नाही! कुराणाच्या आयतांचे असे बेगवेगळे अर्थ असू शकतात, ही गोष्टच मुळी त्याच्या कल्पनेपलीकडची आहे! या अज्ञानामुळे फार गोंधळ झाला आहे. यातच अनेक सामाजिक अन्यायांची बिजे आहेत. असे अनेक अर्थ अनेकांकडून काढले गेले. मुस्लीम महिला अशा गोंधळातून काढण्यात आलेल्या चुकीच्या अर्थांच्या बळी ठरत आहेत. या स्त्रियांना आपली वेदना प्रकट करण्यालाही बंदी आहे! त्यांच्या बाट्याला जनावरांचे जिणे आलेले आहे. जणू बाजारातली एखादी क्रय-विक्रयाची ती वस्तू! समाजात चांगले कपडे घालून सुशिक्षित म्हणून मिरवणारी मंडळीही स्त्रियांना अमानुषपणे वागवतात... जणू ती बिनपगाराची घरची मोलकरीण असते. हजारो मुले शाळेत न जाता रस्त्यावरच वाढत असतात. परित्यक्तांचा प्रश्न मुस्लीम समाजात फार बिकट आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने लग्नानंतर महिन्याभरातच टाकून दिलेल्या मुली पाहिल्या आणि तारुण्य लुटून फेकून दिलेल्या स्त्रियाही पहिल्या. पाच वर्षांची मुलगी असलेली, लहरीखातर सोडून दिलेली एक तरुणी जेव्हा आक्रोश लागली, तेव्हा हृदय पिळवटून निघाले! एक सुंदर तरुणी लग्नासाठी व्याकुळली असल्याचे पाहून आणि वर दहा हजार रुपये दक्षिणा मिळण्याची शक्यता असल्याचे पाहून आपल्या बायकोला पैगाम घेऊन जायला सांगणारा एक नीच मनुष्यही पाहायला मिळाला. एक बुरखाधारी बाई आम्हाला शोधत तीनदा हेलपाटे घालून गेल्याचे कळले. भेट झाल्यावर तिने आपबीती सांगितली. ती सात मुलांची आई होती. नवरा परगावी नोकरी करणारा होता. तो पैसे पाठवी, पण त्याने तिकडेच लग्न केले आणि बाईला पैसे पाठवणे बंद करून टाकले! सात कच्च्यांचे हाल तिच्याच्याने पाहवेनात. एकदा डायझोन घेऊन आत्महत्या करण्याचा तिने प्रयत्न केला, पण मृत्यूला तिच्या मुलांची दया आली असावी. ती बाचली! तिच्या कडेवरचे मूल दुबळे झाले होते; बाईही निस्तेज झाली होती. ती काकुळतीने म्हणत होती, 'राहा म्हणावे त्या बाईबरोबर खुशाल तिकडे, पण हया आपल्याच पोरांसाठी चार पैसे तरी पाठव!' मी त्या बाईला सुचवले, 'तुम्ही मोलमजुरीचे काम का करत नाही?' त्या बाई म्हणाल्या, 'आमच्या घरात गोषा आहे. मी मोलमजुरी करू लागले की घराण्याची अब्रू जाईल ना? घरच्या लोकांनी नवऱ्याला

कळवले, तर त्याची भीती असतेच ना?' खरे म्हणजे हा अनेक स्त्रियांचा आक्रोश असेल, पण तो आमच्यापर्यंत अद्याप पोहोचू शकत नाही. अशा बंदीखान्यात त्या असतात की, त्यांना आपला आक्रोश बाहेर पोहोचवताच येत नाही. आजवर दहा-बारा तलाकची प्रकरणे मंडळाकडे आली आहेत. मंडळाने अशा महिलांना व्यक्त होण्याची संधी दिली. त्यानंतर अनेक महिला निर्भयपणे बोलू लागल्या. तेव्हा समाजाला स्त्रियांचे आर्त स्वर ऐकू आले! आजच्या कायद्यान्वये त्यांची सोडवणूक करता आली नाही, तर आम्हाला चळवळीचे पाऊल उचलणे भाग पडेल. आमच्यापैकी एक तळमळीचे कार्यकर्ते तर एकदा म्हणाले की, 'सौम्य आणि सामोपचाराच्या उपायांनी झोपेचे सोंग घेणारे सरकार काही करणार नसेल, तर एक दिवस अशा परित्यक्त स्त्रियांना मुलाबाळांसह पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री यांच्या निवासस्थानी आश्रयार्थ घेऊन जावे लागेल! असा सत्याग्रह केल्यावरच त्यांचे डोळे उघडणार असतील, तर तेही करावे लागेल.' हा प्रश्न मानवतेचा आहे. बेळगाव-कारवार सीमाभागाबाबत मानवतेची भाषा वापरणाऱ्या मुख्यमंत्र्यांना मुस्लीम स्त्रियांच्या प्रश्नाबाबत मात्र मानवतेची आठवण होत नाही! सरकारच्या ह्या अशा वागण्यामुळे कायद्याची व लोकशाही राज्याची कल्पनाच मोडीत निघाली आहे. केंद्र सरकारच्या मुस्लीम नोकरांना पूर्वी दोन बायका करण्याला बंदी होती. ही बंदी निवडणुकीपूर्वी उठवण्यात आली! आता गंमत अशी होणार की, एखाद्या हिंदू नागरिकाने दुसरे लग्न केले, तर दोन बायकांचा दादला असलेले मुस्लीम पोलीस अधिकारी त्याला कायदेभंगाबद्दल अटक करणार आणि चार बायका असलेले मुस्लीम न्यायमूर्ती त्यांना दुसरे लग्न केल्याबद्दल सजा ठोठावणार! या असल्या करुण विनोदाला काय म्हणावे? आमच्या राज्यकर्त्यांच्या ध्यानी ही गोष्ट कशी येत नाही? मुस्लीम सत्यशोधक मंडळाला मूर्ख, सनातनी व मतलबी राजकारणी मुसलमानांचा अडथळा आहे, तसाच अडथळा भोंगळ हिंदू नागरिक आणि स्वार्थी सत्ताधारी यांचाही आहे. या आघाड्यांवर आम्हाला आमचा मार्ग अपयशाकडे नेणारा वाटतो. कारण हे सर्व जण मुस्लिमांना जुन्या, चाकोरीबद्ध परंपरेकडे नेऊ पाहत आहेत. मुस्लिमांनी एकत्र येऊन आपल्या संघटित बळाचा उपयोग करावा, हा त्यांचा सल्ला मजलीस-ए-मुशावरत ने गांधीयांनी घेतला आणि या निर्णयाचा पहिला पवित्रा १९६७ सालच्या निवडणुकीत काँग्रेसविरोधात आपली गठ्ठा मते टाकून त्यांनी काँग्रेसला हादरा दिला. त्यामुळे मुस्लीम जातीय नेतृत्व पुन्हा डोके वर काढू लागले. तामिर-ए-मिल्लत, मुस्लीम लीग यांचे पुनरुज्जीवन झाले. त्यांनी राजकीय सौदेबाजीचा पवित्रा घेतला. 'आपल्या मतशक्तीने आपण राजकारणाचे पारडे इकडे-तिकडे करू शकतो' असे दाखवण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे. पण यात सर्वसामान्य मुसलमानांचे नुकसानच आहे. त्यामुळे पुढाऱ्यांचे उखळ पांढरे होईल, पण सामान्य मुसलमान मागसलेला राहील. धार्मिक व जातीय राजकारण हे समाजाला नेहमीच असे घातक ठरते! राजकीय व धार्मिक शक्तींची ही गल्लत थांबली पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. याच दृष्टीने महाराष्ट्राचे राज्यपाल अली यावर जंग यांना आम्ही एक निवेदन सादर केले आणि 'जातीय व धार्मिक मंडळींना राजकीय क्षेत्रात धुडगूस घालण्याला बंदी करावी' स अशी मागणी केली.

प्रश्न : मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या यशाचे गमक काय?

उत्तर : एकच ढोबळ गमक सांगायचे, तर असे म्हणता येईल की, आमच्या कार्यामुळे सबंध मुस्लीम समाजात विचारमंथनाला गती मिळाली आहे. या निमित्ताने अनेक प्रश्न समोर आले आहेत. 'हे प्रश्न टाळण्यासारखे नाहीत. त्यांची उत्तरे शोधावीच लागतील' ही जाणीव तरुणांना होऊ लागली आहे. 'आता कल्पनेच्या जगात वावरून चालणार नाहीं' हे त्यांना समजू लागले आहे. भारत हे एक लोकशाही राष्ट्र आहे. येथे मुस्लिमांची संख्या हिंदूंच्या मानाने कमीच राहणार आहे. आता हे वास्तव ध्यानी घेऊन समान नागरी हक्क व कर्तव्ये यांचा विचार त्यांना करावाच लागणार आहे. *(नवशक्ती, रविवार आवृत्ती, २१ मार्च १९७१, मुंबई)*

(सय्यद मुनीर: मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य सुरू झाल्यानंतर मंडळाशी जोडल्या गेलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये सय्यद मुनीर यांचा समावेश होतो. ते दै. सकाळमध्ये पत्रकारिता करीत होते. मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे संपादक म्हणूनही काही काळ त्यांनी काम पाहिले होते.)

५.९ मंडळाची कोल्हापूर शाखा – प्रा. आय. एन. बेग

रविवार दि. ३१ मे १९७१ रोजी कोल्हापुरात मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या शाखेचे उद्घाटन झाले. राष्ट्रीय एकात्मता व जातिधर्मातीत वृत्तीच्या विजयाच्या दृष्टीने 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची झालेली स्थापना अतिशय दूरगामी परिणाम करणारी ठरणार आहे. पुण्याच्या खालोखाल कोल्हापूर हे सामाजिक सुधारणांचे एक महत्त्वाचे केंद्र मानले जाते. या समारंभाला उद्घाटक म्हणून पद्मश्री वि. स. खांडेकर लाभले होते. अध्यक्षस्थानी श्री ए. डी. अत्तार, प्राचार्य रा. ना. बोराबके कॉलेज, श्रीरामपूर, हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माधवराव बागल, हमीद दलवाई व बाबुमियाँ बँडवाले हजर होते.

विचारशक्तीची गरज

भाऊसाहेब खांडेकर आपल्या उद्घाटनाच्या भाषणात म्हणाले, 'कोल्हापुरात 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना होत आहे, ही अत्यंत चांगली घटना आहे. सामाजिक परिवर्तन हे आपोआप किंवा सहजासहजी होत नाही. त्यासाठी परिश्रम घ्यावे लागतात. लोकशिक्षणाने परिवर्तन होत असते. भारतामध्ये मुळात लोकशिक्षणच कमी झालेले आहे. सामाजिक परिवर्तनाला अत्यंत आवश्यक अशा लोकशिक्षणामध्ये व्यक्तिस्वातंत्र्य व विचार करण्याची सवय या गोष्टींचा अंतर्भाव होतो. दुर्दैव असे की, सामान्य माणसाला विचार करायला कुणी शिकवलेच नाही. अशिक्षित व सामान्य लोक विचार करू शकत नाहीतच, पण चांगले शिकले-सवरलेले लोकदेखील विचार करू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. विसाव्या शतकामध्ये विकास करून घ्यावयाचा असेल, तर सामान्य माणसाला विचार करावा लागेल. त्याला स्वतःच्या बुद्धीवर अवलंबून राहावे लागेल. हे सर्व व्हायला हवे असेल, तर लोकशिक्षण झाले पाहिजे. यासाठी खरी गरज आहे, ती तळमळीच्या कार्यकर्त्यांची.'

खांडेकरांच्या नंतर बाबुमियाँ बँडवाले बोलावयास उभे राहिले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य व उद्दिष्टे यांविषयी बोलताना ते म्हणाले, 'हमीद दलवाई व त्यांनी सुरू केलेले 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' या विषयी आमच्या समाजात बरेच गैरसमज आहेत. 'हमीद दलवाई हे 'इस्लामके दुश्मन' आहेत, त्यांना इस्लाम धर्मात ढवळाढवळ करावयाची आहे' वगैरे बिनबुडाचे आक्षेप घेतले जातात. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. दलवाईंना व मुस्लीम सत्यशोधक मंडळाला इस्लाम नष्ट करावयाचा नाही किंवा त्यात हस्तक्षेपही करावयाचा नाही. मुस्लीम समाजाने आधुनिक बनावे' एवढेच फक्त सांगावयाचे आहे. यासाठी बदलत्या काळाबरोबर नव्या, बदलत्या जीवननिष्ठा आत्मसात केल्या पाहिजेत; गतानुगतिकता सोडली पाहिजे. उपासना व सामाजिक जीवन या दोन भिन्न गोष्टी आहेत. मुस्लीम सत्यशोधक मंडळ मुसलमानांना 'उपासना पद्धत सोडा किंवा बदला' म्हणून सांगत नाही, तर 'आपले सामाजिक जीवन आधुनिक काळाला साजेशा रीतीने बदला' एवढेच सांगते. मुसलमान राहूनही आधुनिक बनता येते, एवढेच मला सांगावयाचे आहे.'

फाळणी हे वरदान

हमीद दलवाई मुस्लीम राजकारणाची चिकित्सा करताना म्हणाले, ' 'मुस्लीम समाज धर्म-पंडितांच्या मागे गेला' असे म्हटले जाते. परंतु ते खरे नसून, धर्माच्या नावाने राजकारण करणाऱ्या अधार्मिक पुढाऱ्यांच्या मागे तो गेला, हे खरे आहे! 'जीनांसारख्या पाखंडी माणसाला मुस्लीम राजकारणात मिळालेले यश' हे याचेच उदाहरण आहे. जीनांच्या राजकारणाने देशाची फाळणी झाली. त्या वेळी त्याचे अनेकांना दुःख झाले, परंतु फाळणी हे भारताच्या दृष्टीने वरदानच ठरले आहे. कारण त्यामुळे मुसलमानांची एकसंध शक्तीदेखील विभागली गेली आहे. मुस्लीम समाज आता फाळणीपूर्व काळाप्रमाणे एकसंध नसून तो पश्चिम पाकिस्तान, बांगला देश व भारत यांमध्ये विभागला गेला आहे. अखंड भारतातील मुसलमानांची एकसंध शक्ती ही गोष्ट आता भूतकाळात जमा व भविष्यकाळात अशक्य झाली आहे.'

हिंदूंना मागे जाता येणार नाही

ते म्हणाले, ' 'एका जातीयवादाला दुसरा जातीयवाद' हे उत्तर होऊ शकत नाही. मुस्लीम सुधारणेचे अल्पसे का होईना, प्रयत्न चालू असताना हिंदूंना मागे जाता येणार नाही. जातिधर्मनिरपेक्ष लोकशाहीच्या दृष्टीने हिंदू जातीयवाददेखील भयंकर धोकादायक ठरणार आहे. हिंदू बहुसंख्याक असल्यामुळे त्यांचा जातीयवाद साऱ्या देशालाच विनाशाच्या खाईत घेऊन जाईल. म्हणून हिंदूंवरदेखील आता कुणीतरी चाबकाचे आसूड ओढण्याची गरज आहे.'

सर्व धर्म निकामी

हमीद दलवाईनंतर माधवराव बागल यांचे भाषण झाले. ते म्हणाले, 'मी सर्वांकडे माणूस म्हणून पाहतो; धार्मिक गट म्हणून नव्हे. सर्वच धर्मांनी माणसाची स्वतंत्र विचार करण्याची बुद्धी मारली आहे. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी निष्ठावंत कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे. केवळ गरिबी हटवल्याने सामाजिक न्याय मिळणार नाही. तसे असते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 'साहेब' बनून आले, तरी ते केवळ शूद्र असल्याने त्यांच्या हाताखालील कारकुनाने फायली फेकून दिल्या नसत्या!'

नावाचे मुसलमान

प्राचार्य ए. डी. अत्तार अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'सर्वसामान्य मुसलमानांना कुराणाचा अर्थ माहीत नसतो; इस्लाम म्हणजे काय, शरीयत काय आहे, इस्लामी संस्कृती काय आहे वगैरेबाबत त्यांच्यात शुद्ध अज्ञान असते. यामुळेच बहुसंख्य मुसलमानांचा व्यवहार धर्मशास्त्राला सोडून होत असतो!

'भारतातील एकंदर मुसलमानांपैकी तीन ते साडेतीन कोटी (३ कोटी ४२ लक्ष) मुसलमान खेड्यांत राहतात व उरलेले दीड ते दोन कोटी मुसलमान शहर विभागामध्ये राहतात. खेड्यांतील मुसलमान लोकांचा इस्लामशी फारसा घनिष्ठ संबंध नाही. हे लोक दिवसातून पाच वेळाच काय, पण आठवड्यातून एक वेळही (शुक्रवारची) नमाज करत नाहीत. वर्षातून दोन वेळाच त्यांची

ईदची नमाज होते. इतर वेळेला यांचा कुराण, हदीसशी संबंध शून्य! त्याचप्रमाणे शहरातील मुस्लिमांपैकी निम्म्याहून अधिक लोकांचा इस्लाम, कुराण, हदीस वगैरेशी संबंध नाही; असलाच तर पुसट. हे लोक समाजाच्या खालच्या थरातून आलेले असतात. मजुरी करणे, हमाली करणे, जुगार खेळणे, दारू पिणे यांमध्येच त्यांचे आयुष्य व्यतीत होत असते. थोडक्यात म्हणजे, 'बहुसंख्य मुस्लीम समाज हा धर्मशास्त्राने जखडलेला बंदिस्त समाज आहे' ही खरी गोष्ट नसून तो इस्लाम धर्माची पुरती ओळखदेखील नसलेला नावाचा मुसलमान समाज आहे!

सर्वांगीण ओळख हवी

'मग प्रश्न असा निर्माण होतो की, ज्या धर्माची पुरती ओळखदेखील नाही, त्या धर्मासाठी मरावयास मुस्लीम समाज का तयार होतो? यालाही उत्तर आहे... अर्थात हेच ठाम उत्तर आहे, असे मला म्हणावयाचे नाही. कारण कुठल्याही सामाजिक प्रश्नाला ठाम, एकच उत्तर असू शकत नाही. त्या-त्या उत्तरामुळे त्या प्रश्नाची एक एक बाजू स्पष्ट होत जाते. हमीद दलवाईंच्या धर्माच्या नावाने राजकारण करणाऱ्या अधार्मिक पुढाऱ्यांच्या मागे मुस्लीम समाज गेला; धर्मपंडितांच्या मागे नव्हे. या मुद्द्याचा विचार केला तर त्या प्रश्नावर अधिक प्रकाश पडतो. म्हणजे मुसलमान धर्माचरणाच्या बाबतीत उदासीन असला, तरी धर्माच्या नावाने दिलेल्या हाकेचा त्याच्यावर प्रभाव पडतो! यावर पुन्हा 'तसे का?' असा प्रश्न उपस्थित केला, तर मात्र आपणाला त्याच्या शैक्षणिक व आर्थिक प्रश्नाकडे वळावे लागेल. तसे केल्याशिवाय आपणाला उत्तर मिळणार नाही – म्हणजेच मुस्लीम प्रश्नावर आपल्याला उत्तरे शोधावयाची असतील, तर त्यांच्या धर्माचा व राजकारणाचाच विचार करून भागणार नाही; तर त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक बाबींचाही विचार केला पाहिजे. तोही पृथक्पणे नव्हे, तर एकत्रितपणे. थोडक्यात, मुस्लीम समाजाच्या वर्तनाविषयी अनुमान काढावयाचे असेल व त्यावर उपाय सुचवायचे असतील, तर त्या समाजाचा सर्वांगीण विचार झाला पाहिजे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी व त्यांच्या कार्यात रस असणाऱ्या हिंदू बंधूनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, 'आपणाला दीर्घकालीन कार्य करावयाचे आहे व त्यातील पहिला टप्पा म्हणजे मुस्लीम समाजाची सर्वांगीण व पुरती ओळख करून घेणे'

हनीफ बागवान यांनी आभार मानल्यानंतर उद्घाटन समारंभ संपला. समारंभाला हिंदू-मुस्लीम समाजांतील सुशिक्षित तरुण मोठ्या प्रमाणावर हजर होते; मुस्लीम समाजातील काही कट्टर व्यक्तीदेखील हजर होत्या. नेहमीप्रमाणे त्यांनी आततायीपणा करण्याचा प्रयत्न केला, पण तो चालू शकला नाही.

कार्यक्रमानंतर कार्यकर्त्यांची बैठक होऊन त्यामध्ये डॉ. डी. एच. मालदार यांची अध्यक्ष म्हणून, एन. आर. बारगीर यांची उपाध्यक्ष म्हणून व हुसेन जमादार यांची चिटणीस म्हणून बिनविरोध निवड झाली. *(मंडळाच्या दफ्तरातून)*

(निपाणीस्थित आथ. एन. बेग हे कोल्हापूर परिसरातील मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे आरंभापासूनचे कार्यकर्ते आहेत.)

५.१० व्यक्तिगत कायदा अपरिवर्तनीय: एक भ्रामक युक्तिवाद – अ. का. मुकादम

(मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुढाकाराने २७ व २८ डिसेंबर १९७१ रोजी पुण्यात मुस्लीम महिला परिषद भरत आहे. त्या निमित्ताने 'मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करणे का आवश्यक आहे' हे मंडळाचे तत्कालीन कार्यकर्ते अब्दुल कादर मुकादम यांनी या लेखातून मांडले आहे.)

शरीयतच्या कायद्यातील सुधारणांचा प्रश्न हा भारतात नेहमीच चर्चेचा व विरोधाचा विषय झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात हिंदू सामाजिक कायद्यात अनेक सुधारणा झाल्या असताना मुस्लीम समाज मात्र त्यापासून अजून वंचित राहिला आहे. याचे एकमेव कारण म्हणजे, या समाजाचा अशा सुधारणांस असलेला विरोध होय. 'शरीयतच्या कायद्यात बदल म्हणजे धर्मात हस्तक्षेप होय' ही या विरोधामागील भूमिका आहे. ही भूमिका असमंजसपणाची व कालविसंगत असली, तरी या प्रश्नाच्या नाजूक स्वरूपामुळे भारतासारख्या अनेक धर्मीय राष्ट्रात मुस्लीम समाजात सुधारणा घडवून आणणे अडचणीचे होऊन बसले आहे. 'शरीयतच्या कायद्यात बदल करण्याची मागणी मुस्लीम समाजाकडूनच झाल्याशिवाय त्याबाबत काही कृती करावयाची नाही' ही शासनाची भूमिका सोयीचे धोरण म्हणून समजू शकलो, तरी ही परिस्थिती दीर्घ काळ चालू ठेवणे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने योग्य नव्हे, याचीही जाणीव ठेवली पाहिजे. अशी जाणीव मुस्लीम समाजाला होत असल्याची सुचिन्हे दिसू लागली आहेत. दिल्लीस नुकतीच झालेली अखिल भारतीय पुरोगामी मुस्लीम परिषद व पुण्यात मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे भरत असलेली मुस्लीम महिला परिषद या परिषदा या जाणिवेच्या द्योतक आहेत. 'या परिषदेत किती व्यक्तींनी भाग घेतला?' हा प्रश्न या ठिकाणी गौण ठरतो. समाजप्रबोधनाची प्रक्रिया मुस्लीम समाजात सुरू झाली आहे, हीच बाब महत्त्वाची समजली पाहिजे, आणि म्हणूनच या मुस्लीम महिला परिषदेचे स्वागत केले पाहिजे. शासनानेही याची दखल घेऊन आपल्या धोरणात योग्य ते बदल केले पाहिजेत.

मूलभूत साधने

अपरिवर्तनीय मानल्या जाणाऱ्या शरीयतच्या कायद्याचे मूळ स्वरूप काय होते व ते अजूनही तसेच टिकून आहे का, हे मुस्लीम महिला परिषदेच्या निमित्ताने पाहणे आवश्यक आहे. कारण हा कायदा अपरिवर्तनीय असल्याचा दावा किती फोल आहे, हे या प्रश्नांच्या उत्तरातच समजू शकेल. कुराण, हदीस, इज्मा व कयास ही शरीयतच्या कायद्याची मूलभूत साधने आहेत. 'कुराण हा ईश्वरी ग्रंथ असल्यामुळे त्यातील आज्ञा या ईश्वरी आज्ञा आहेत व म्हणून त्या कोणाही मुसलमानाला उल्लंघता येणार नाहीत' अशी सर्व मुसलमानांची श्रद्धा आहे. इ. स. ६२२ ते ६३२

या दहा वर्षांच्या काळात इस्लाम धर्म सुस्थापित झाला होता. तसेच त्याच्या अनुयायांचे स्वतंत्र राज्यही निर्माण झाले होते. साहजिकच या राज्यांकरिता कायदा व शासन व्यवस्थेची आवश्यकता भासू लागली. म्हणूनच या कालखंडात कुराणाच्या प्रकटलेल्या (रिव्हील) आयर्तीमध्ये (श्लोक) शासनव्यवस्थेसंबंधी व समाज जीवनाचे नियमन करणाऱ्या नीतिनियमांसंबंधी आदेश दिलेले आढळतात. कुराणातील एकंदर सहा हजार आयर्तीपैकी जवळजवळ दोनशे आयाती शासनसंस्था व न्यायदान यांविषयी आहेत. त्यांतील शासनसंस्थेसंबंधीच्या आयाती वजा केल्यास उरलेल्या ऐंशी आयाती न्यायतत्त्वीय न्यायदानाशी संबंधित असलेल्या आढळतात. या ऐंशी आयार्तींतसुद्धा संपूर्ण न्यायसंस्थेचे स्वरूप विशद केलेले नसून फक्त पायाभूत तत्त्वेच सांगितली आहेत. साहजिकच प्रत्यक्ष व्यवहारात ही न्यायतत्त्वे अपुरी पडू लागली व या अपुरेपणाच्या जाणिवेतूनच इस्लामी न्यायशास्त्राचे दुसरे साधन 'हदीस' याची निर्मिती झाली.

हदीस म्हणजे प्रथा किंवा परंपरा. महंमद पैगंबरांच्या जीवनकाली, अनेक प्रसंगी ते कसे वागले, कुराणातील तत्त्वांचे मार्गदर्शन त्यांनी कसे केले याचे व त्याचप्रमाणे त्यांच्या वचनांचे व आज्ञांचे संकलित स्वरूप आपणास हदीसमध्ये आढळते. 'महंमद पैगंबर हे आदर्श पुरुष असून, त्यांचे जीवन म्हणजे मानवी जीवनाचे दर्पण आहे' अशी प्रत्येक मुसलमानाची श्रद्धा असल्यामुळे त्यांच्या जीवनातील घटनांना कुराणातील तत्त्वांइतके महत्त्व प्राप्त झाले आहे व म्हणूनच कुराणातील तत्त्वांइतकीच हदीसही प्रमाण समजली जाते. अनेक विद्वान पंडितांनी अशा घटना, वचने व आज्ञा संकलित केल्या असून, त्या प्रमाण म्हणून मान्यता पावल्या आहेत. बुखारी, मुस्लीम, ईब्ने माजह व नासाई यांनी संकलित केलेल्या हदीस या त्यांपैकी काही प्रमुख होत.

न्यायशास्त्राची प्रगती

कुराण व हदीस ही इस्लामी न्यायशास्त्राची सर्वांत महत्त्वाची मूलतत्त्वे मानली जात असली, तरीही पैगंबर व पहिल्या चार खलिफांच्या नंतरच्या काळात मुस्लीम न्यायशास्त्र प्रगत व संक्रमित झालेले आढळते आणि त्याचा प्रत्यय इज्मा व कयास या दोन साधनांतून येतो. इज्मा म्हणजे एखाद्या दाव्याबाबत विद्वान व विधिज्ञांचे झालेले एकमत. अर्थात, कोणाही व्यक्तीला अशा तऱ्हेचे मतप्रदर्शन करण्याची मुभा नव्हती. त्याकरिता विशिष्ट पात्रता प्राप्त करून घ्यावी लागत असे. इज्मातून निष्कर्ष पावलेल्या नियमांत मात्र उच्चनीचता असल्याचे आढळते. म्हणजे हनफी संप्रदाय इज्माला मूलभूत साधन मानतो, तर शाफई संप्रदाय त्याला न्यूनतम महत्त्व देतो. याउलट मालिकी संप्रदायात फक्त मदिनेतील विधिज्ञांच्या मतालाच मान्यता प्राप्त झालेली आढळते. इज्माचाच एक प्रकार म्हणून इज्तिहाद चा निर्देश करता येईल. इज्तिहाद म्हणजे कुराणातील तत्त्वांतून तर्कनि काढलेला निष्कर्ष. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, एखाद्या विद्वानाने आपल्या तर्कनि व बुद्धीने शरीयतच्या कायद्याचा प्रस्थापित केलेला नियम. असा नियम प्रस्थापित करत असताना कुराण व हदीस यांमधील तत्त्वांना बाध येणार नाही, याची मात्र दक्षता घ्यावी लागत असे, परंतु तरीही सामाजिक गरज व बदलत्या काळाचे स्वरूप या बाबीही विचारात घेतल्या जात. इज्मा म्हणजे 'अनेक विद्वानांचे एखाद्या मुद्द्यावर झालेले एकमत', तर इज्तिहाद

म्हणजे 'एखाद्या विद्वानाचे मत' हा या दोघांमधील फरक आहे.

यानंतर क्रम लागतो तो कयासचा. कयास म्हणजे तार्किक अनुमान. यात नवीन तत्त्वप्रणाली मांडली जात नसे; पूर्वीच्या उदाहरणांच्या आधारे निष्कर्ष काढण्यात येत. महंमद इब्ने इद्रीस अस् शाफई याने ही अनुमान पद्धती प्रचलित केली.

दरवाजे बंद झाले

इस्लामी न्यायशास्त्रात कुराण व हदीस या दोन मूलभूत साधनांबरोबरच इज्मा, इज्तिहाद व कयास यांसारख्या बुद्धिप्रामाण्यवादाशी जवळीक साधणाऱ्या तत्त्वांनाही महत्त्वाचे स्थान होते. म्हणजेच मानवी बुद्धी व तर्क यांचा वापर इस्लामी न्यायशास्त्रात काही काळ तरी केला जात होता, हे निश्चित. हिजरी सनाच्या नवव्या व दहाव्या शतकापर्यंत (सोळावे व सतरावे शतक) ही प्रथा चालू होती. त्यानंतर मात्र ती बंद पडलेली दिसते. 'बंद पडलेली दिसते' असे म्हणण्यापेक्षा 'ती बंद पाडण्यात आली' असे म्हणणे वस्तुस्थितीला अधिक धरून होईल. यादरम्यान त्या कालखंडातील जवळजवळ सर्व विद्वान व विधिज्ञ कालवश झाले होते व अशा तऱ्हेच्या बुद्धिप्रामाण्यवादी विद्वानांची नवी पिढी निर्माण होऊ दिली गेली नव्हती. यालाच 'इज्तिहादचे दरवाजे बंद करणे' (बाब-अल-इज्तिहाद) अशी संज्ञा आहे. कदाचित या काळात मुस्लीम साऱ्या जगभर पसरले गेल्यामुळे त्यांच्यातील विद्वानांना परस्परांतील विचार विनिमयाची शक्यता स्थल-दूरत्वामुळे उरली नसेल. कदाचित 'अन्य देशांतील तत्त्वज्ञान व कल्पना आपल्या न्यायशास्त्रात घुसडल्या जाऊ नयेत' म्हणून ही दक्षता घेतली असावी... काहीही असो... एवढे मात्र निश्चित की, बुद्धिप्रामाण्यवादाला दरवाजे बंद करण्यात आल्यामुळे इस्लामी न्यायशास्त्र बदलत्या काळाच्या व समाजाच्या गरजा भागवण्यास असमर्थ झाले.

अनेक संप्रदाय

इस्लामी न्यायशास्त्राच्या या चार साधनांप्रमाणे या धर्मातील पंथभेदाप्रमाणेही अनेक संप्रदाय निर्माण झालेले आहेत. त्यांच्यात जसे साम्य आहे, तसे अनेक मतभेदही आहेत. आजही भारतातील न्यायालयात मुस्लीम दाव्यात निकाल देताना या पंथभेदांचा व संप्रदायाचा प्रामुख्याने विचार केला जातो. हल्ली प्रचलित असलेल्या मुस्लीम कायद्याने हे पंथभेद व संप्रदाय मान्य केले आहेत. इस्लाम धर्मात प्रमुख पंथ शिया व सुन्नी हे असून सुन्नी पंथीयांत हनफी, शाफई, मालिकी व हंबली असे चार विधिसंप्रदाय आहेत. यांपैकी हनफी संप्रदाय हा सर्वांत महत्त्वाचा संप्रदाय समजला जातो. या संप्रदायाचा आद्य प्रवर्तक अबू हनिफा असून तो इ. स. ६९९ ते ७६७ या काळात होऊन गेला. या संप्रदायाचा उगम इराकमध्ये झाला असून तुर्कस्तान, मध्य आशिया, इजिप्त व भारत या देशांतील बहुसंख्य मुसलमान या संप्रदायाचे अनुयायी आहेत. मालिकी संप्रदाय हा मलिक इब्ने अनस (इ. स. ७१३ ते ७९५) याने प्रस्थापित केला. याचा गुरू तर्कशुद्ध विचारसरणी व बुद्धिप्रामाण्यवाद यांचा पुरस्कर्ता होता, परंतु शिष्याचा कल मात्र कुराण व हदीस यांकडेच अधिक होता. काही ठिकाणी मात्र आपले निष्कर्ष काढताना त्याने विधिज्ञांच्या

मताचा (इज्मा) आधार घेतलेला आढळतो. तरीही त्याने मदिनेतील विद्वानांची मतेच गृहीत धरली आहेत. हा संप्रदाय इजिप्तचा काही भाग, पश्चिम आफ्रिका, स्पेन व अरबस्तानचा पूर्व किनारा इत्यादी देशांत प्रचलित आहे. या दोन संप्रदायांप्रमाणेच शाफई संप्रदाय महंमद इब्ने इद्रीस-अस् शाफी (इ. स. ७६७ ते ८२०) याने प्रचलित केला. हा अस् शाफी न्यायकरण व न्याय पद्धतीचा पुरस्कर्ता होता. अनुमान पद्धतीचा (कयास) तो आद्य प्रवर्तक मानला जातो. इज्मा व कयास ही कुराण व हदीसप्रमाणेच इस्लामी न्यायशास्त्राची मूलतत्त्वे असल्याचे यानेच प्रथम मान्य केले. इजिप्त, दक्षिण अरबस्तान, पूर्व आफ्रिका व भारताचा पश्चिम किनारा इत्यादी ठिकाणी या संप्रदायाचा प्रसार झालेला आहे. सुन्नी पंथीयांचा चौथा संप्रदाय म्हणजे हंबली संप्रदाय. या संप्रदायाचा प्रवर्तक अहमद इब्ने हंबल असून तो इ. स. ७८० ते ८५५ या काळात होऊन गेला. मस्नद-अल इमाम हन्बाल, ताऊत-उर-रसूल व किताबुल हे न्यायशास्त्रावरचे त्याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

सुन्नी पंथीयाप्रमाणेच शियांनीही आपला वेगळा न्यायसंप्रदाय प्रचलित केला असून त्याचे जनकत्व इमाम जाफर-अस्-सादीक या सहाव्या इमामाकडे जाते. शिया पंथीयांचे अखबारी व उसुली असे दोन पोटभेद आहेत. अखबारी हे पूर्वीच्या सर्व विद्वानांची मतप्रणाली मान्य करतात, परंतु उसुली मात्र त्यांच्या इमामाने (धर्मप्रमुखाने) मान्यता दिलेल्या मतांनाच प्रमाण मानतात. असा इमाम जवळपास नसल्यास स्वतःच्या बुद्धीचा व तर्काचा वापर करण्याची मुभा मात्र ठेवण्यात आली आहे.

नवी आव्हाने व बदल

हे सगळे इतके विस्ताराने सांगण्याचे कारण इतकेच की, ईश्वरप्रणित व म्हणून अपरिवर्तनीय म्हटला गेलेला शरीयतचा कायदा काळाच्या ओघात अजूनही अपरिवर्तनीय राहिला आहे का, हे पाहणे जरूर आहे. 'कुराण हे प्रत्यक्ष ईश्वरी प्रकटन असल्यामुळे व महंमद पैगंबर हे ईश्वराचे प्रेषित असल्यामुळे त्यांची वचने व आज्ञा या ईश्वराज्ञाच आहेत' ही मुसलमानांची श्रद्धा समजण्याजोगी असली, तरी कुराण व हदीसमध्ये संपूर्ण न्यायशास्त्राचे स्वरूप विशद केलेले नाही, ही वस्तुस्थिती अमान्य करता येत नाही. पैगंबर व पहिल्या चार खलिफांच्या नंतरच्या कालखंडात काळाची निकड व समाजाच्या गरजांची दखल घेऊनच अनेक विधिज्ञांना निर्णय घ्यावे लागले आहेत. यातूनच इज्मा व कयास या दोन न्यायतत्त्वांचा उगम झालेला दिसून येतो. याहीपेक्षा आव्हानात्मक परिस्थिती यानंतरच्या काळात निर्माण झालेली दिसते. अठराव्या व एकोणिसाव्या शतकात अनेक देशांतून मुस्लीम राजसत्तांचे उच्चाटन होऊन त्यांच्या जागी ब्रिटिश, फ्रेंच, डच, स्पॅनिश इत्यादी युरोपीयांची सत्ता आली आणि त्याबरोबरच धर्मसंस्था व राज्यसंस्था यांची फारकत झाली. या फारकतीमुळे एक गोष्ट आपोआपच घडून आली. धार्मिक कायद्यांना केवळ नैतिक संहितेचे स्वरूप प्राप्त झाले. अंमलबजावणी करण्याची धर्मसंस्थेची सत्ता संपुष्टात आल्यामुळे हे घडणे अपरिहार्य होते. यामुळेच शरीयतच्या कायद्यात राजसत्तेचा पहिला हस्तक्षेप होऊ शकला. शरीयतच्या कायद्याप्रमाणे 'न्यायाधीश हा इस्लाम धर्मीयच असला पाहिजे' असा दंडक होता.

मुसलमानांच्या हातात राजसत्ता होती, तोपर्यंत हे शक्य होते, परंतु वर सांगितल्याप्रमाणे सत्तांतर झाल्यानंतर मात्र परिस्थिती बदलली. युरोपीय राजवटीत अनेक गैर मुसलमानांनी न्यायदानाचे काम केले, हा इतिहास आहे. शरीयतच्या अपरिवर्तनतेला हे पहिले आव्हान होते. परंतु ही केवळ सुरुवात होती. या राजसत्तांनी आपल्याबरोबर न्याय, समानता, सदसद्विवेक बुद्धी या न्यायशास्त्रातील नवीन कल्पनाही नेल्या होत्या; आणि जरी त्यांनी शरीयतचा कायदा आमूलाग्र बदलला नसला, तरी या नवीन तत्त्वांवर आधारित अनेक बदल त्यात केले आहेत, हाही इतिहासाचच भाग आहे. खालीदाखल काही उदाहरणे देतो.

१) चोरीच्या गुन्ह्याबद्दल हात तोडण्याची शिक्षा (कुराण ५.४१)

२) व्यभिचाराबद्दल शंभर फटक्यांची शिक्षा (कुराण २४.२)

३) व्याज घेणे हा गुन्हा आहे (कुराण २.२७५)

४) बिगर मुसलमानानी जिझिया कर दिला पाहिजे (कुराण ९.२९)

ब्रिटिश अमदानीत भारतातही यापेक्षा वेगळी परिस्थिती नव्हती. भारतीय दंड संहिता (इंडियन पिनल कोड) या देशात लागू झाल्याबरोबर शरीयतच्या कायद्यातील गुन्ह्यासंबंधीचा भाग संपुष्टात आलाच, परंतु इतर अनेक कायद्यांमुळे या कायद्याचा जवळजवळ ऐंशी टक्के इतका भाग रद्दबातल ठरला. हे विधान खालील काही उदाहरणांवरून स्पष्ट होऊ शकेल. (१) भारतातील न्यायालयात बिगर मुस्लीम न्यायाधीश नेमले जाऊ लागले. (२) गुलामांची पद्धत कायद्याने नष्ट करण्यात आली. (३) आपला धर्म न बदलता मुस्लीम व बिगर मुस्लीम यांच्यात होणाऱ्या विवाहास कायदेशीर मान्यता मिळाली. इतकेच नव्हे, तर अशा विवाह संबंधातून जन्मास आलेली संतती कायद्याने औरस संपत्ती मानली जाऊ लागली. शिवाय स्पेशल मॅरेज ॲक्ट १९५४प्रमाणे अशा संततीला सर्व वारसा हक्कही प्राप्त झाले. (४) इस्लामी धर्मशास्त्राप्रमाणे लागलेले लग्न (निकाह) हे स्पेशल मॅरेज ॲक्ट १९५४प्रमाणे नोंदवता येते व अशा तऱ्हेने नोंद झालेल्या विवाहामुळे पत्नीला व मुलांना वारसा हक्काचा कायदा आपोआपच लागू होतो. (५) नोंदणी पद्धतीने झालेल्या विवाहात संबंधित व्यक्तीच्या धर्माला कसलाही बाध येत नाही.

यांपैकी एकेक बदल म्हणजेसुद्धा शरीयतमध्ये प्रत्यक्ष हस्तक्षेपच आहे. असे अनेक बदल आतापर्यंत झाले आणि ते मुस्लीम समाजाने खपवून घेतले. असे असता, उरलेल्या फक्त २० टक्के बदलाकरिता एवढा अट्टाहास का? या विरोधामागेही विशिष्ट कारणमीमांसा आहे. शरीयतच्या कायद्यात आतापर्यंत झालेले बदल हे मुस्लीम समाजाने प्राप्त परिस्थितीत आपद्धर्म म्हणून मान्य केले आहेत. त्यांमागील तात्त्विक भूमिका त्याला अजूनही मान्य नाही, हे या विरोधाचे रहस्य आहे. खरे पाहिले, तर घटस्फोटाबाबत शरीयतने मुस्लीम पुरुषाला दिलेले अमर्याद हक्क, बहुपत्नीत्व व वारसा हक्काबाबतही मुस्लीम पुरुषाला दिलेले झुकते माप यांमुळे मुस्लीम स्त्रियांवर होत असलेले अन्याय इतके स्वयंसिद्ध आहेत की, त्याकरता वेगळा पुरावा देण्याची आवश्यकताच नाही. तरीही बहुसंख्य मुसलमान अशा सामाजिक सुधारणांना विरोध करतो. का? त्यामुळे त्याच्या अमर्याद हक्कांवर मर्यादा पडतात म्हणून की धर्मकल्पनांच्या पगड्यातून तो स्वतःला अजूनही मुक्त करू शकला नाही म्हणून? यांपैकी कोणतेही कारण खरे

असो, सामान्य मुसलमानांनी, विशेषतः मुस्लीम स्त्रियांनीच पुढाकार घेऊन या सुधारणांचे समर्थन केले पाहिजे. आणि हे समर्थन करीत असताना 'आपण धर्मबाह्य वर्तन करीत आहोत' असे समजण्याचे मुळीच कारण नाही. धर्माचा आध्यात्मिक भाग अपरिवर्तनीय असावा, हे म्हणणे समजू शकते, नव्हे तो तसा असावाच. परंतु समाजाचे नियमन करणारी नीतिमूल्ये व विधिकल्पना या अपरिवर्तनीय असूच शकत नाहीत. कारण समाज स्थिर नसतो. बदलत्या कालानुरूप त्याचे स्वरूप बदलत असते. त्याच्या गरजा बाढत असतात. आणि या बाढत्या गरजांचे ताणच त्या समाजातील घटकांना आपल्या नीति-कल्पना व नीति-नियम बदलण्यास प्रवृत्त करीत असतात. इजिप्त, तुर्कस्तान, इराण, इतकेच काय, पण पाकिस्तानातही शरीयतच्या कायद्यात आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. शरीयतचा कायदा असा कालानुरूप बनविण्यास हे सामाजिक ताणच कारणीभूत झाले आहेत. मग जे या मुस्लीम राष्ट्रांत होऊ शकते, ते इथेही घडले पाहिजे, असे म्हटले, तर त्यात चुकले कुठे?

अप्रत्यक्ष कबुली

सामाजिक सुधारणांच्या अभ्यासकांनीही शरीयतचा कायदा आदर्श नसल्याचे अप्रत्यक्षरित्या का होईना, पण मान्य केले आहे. चर्चेच्या ओघात त्यांनी हे मान्य केले आहे की, हा कायदा घटस्फोटाबाबत सैल असला व बहुपत्नीत्वाला धर्मनि मान्यता दिलेली असली, तरी प्रत्यक्ष व्यवहारात असे क्वचितच घडते. कौटुंबिक व सामाजिक दबावामुळे उठल्यासुटल्या कोणी घटस्फोट देत नाही आणि आर्थिक परिस्थितीमुळे बहुपत्नीत्वही अशक्य झाले आहे. अशी कबुली म्हणजे शरीयतचा कायदा परिपूर्ण नसल्याचीच कबुली आहे, हे मात्र ते सोयीस्करपणे विसरतात. कारण धर्मकल्पनांच्या पलीकडे जाऊन स्वतंत्र बुद्धीने विचार करण्याची त्यांची तयारी नसते. यालाच मी 'वैचारिक गुलामगिरी' म्हणतो. मुस्लीम समाजात सुधारणा घडवून आणण्यात सर्वांत मोठा अडसर या वैचारिक गुलामगिरीचाच आहे. या वैचारिक गुलामगिरीतून हा समाज जितक्या लवकर मुक्त होईल, तितक्या लवकर तो प्रगत व आधुनिक होत जाईल व असे घडणे, हे या समाजाच्या व पर्यायाने राष्ट्राच्याही हिताचे होणार आहे. *(२७ डिसेंबर, १९७१)*

(अब्दुल कादर मुकादम : मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या आरंभ काळात जोडल्या गेलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये अब्दुल कादर मुकादम यांचा समावेश होतो. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सचिव आणि कार्यकारिणी सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले आहे.)

५.११ मुस्लीम महिला: एक दुर्दैव–एक झगडा – अनिल अवचट

(पुणे येथे राज्य शिक्षणशास्त्र संस्थेच्या सभागृहात दि. २७ व २८ डिसेंबर १९७१ रोजी, इंडियन सेक्युलर सोसायटी आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्या द्वारे 'महाराष्ट्र मुस्लीम महिला परिषद' भरली होती. या परिषदेचे उद्घाटन प्रा. असफ ए. ए. फैजी यांनी केले होते. परिषदेच्या अध्यक्ष श्रीमती शरीफा तैय्यबजी होत्या. कार्यक्रमाचे आभार हमीद दलवाई यांनी मानले. या परिषदेस एकूण १७२ मुस्लीम स्त्रिया उपस्थित राहिल्या. त्यांतील काही महाराष्ट्राबाहेरीलही होत्या. उपस्थितांपैकी काही महिलांच्या व काही पुरुषांच्या फक्त मुलाखती येथे दिल्या आहेत.)

१. माझे नाव नसरुद्दीन बारगीर.

राहणार कोल्हापूर, एस. टी. वर्क–शॉपमध्ये कामाला.

एकदा मी रस्त्याने चाललो असता आमच्या अकबर मोहल्ल्यातील एका माणसाने मला घाईघाईने थांबवले आणि सांगितले, "बारगीर साहब, इथे जरा तुमची सही द्या.'' मला वाटले, कसली तरी लोनबरची सही असणार. म्हणून मी दिली.

दुसरे दिवशी एक मुलगी आईसह माझ्या दारात येऊन रडत बसलेली... आणि तिची आई मला विचारू लागली की, "का हो माझ्या पोरीचे तुम्ही वाटोळे केलेत?''

मला काही कळेचना. मग लक्षात आले की, आदल्या दिवशी रस्त्यात घेतलेली सही ही तलाकनाम्यावरची साक्षीदार म्हणूनची सही होती. मी ताडकन त्या माणसाच्या घरी गेलो. त्याला सांगितले की, "माझी सही तुम्ही मला फसवून घेतलीत. ती मी मागे घेत आहे.'' त्यांनी सांगितले, "असे कसे करता? त्यामुळे तलाक बेकायदेशीर होईल.'' मी म्हटले, "होऊ द्यात. पाहिजे तर तुम्ही पुन्हा तलाक द्या, पण या पापात मला गोवू नका.'' तलाक कशावरून दिला होता, याची मी मी आणखी चौकशी केली. त्यांनी सांगितले की, "मुलगी जास्त खाते.'' मी म्हटले, "अहो, मुलीची जात आहे... जास्त खाणारच. तिच्या जिवालाच खाल्ले तिने, पण तुम्हाला ते कसे माहीत पडले?''

त्यांनी उत्तर दिले नाही. मागाहून मुलीने सांगितले, "ते माझ्याकडून गुरासारखे काम करवून घेत आणि खायलाच देत नसत. मग मी भाकरीचे तुकडे ब्लाऊजमध्ये लपवून ठेवत असे आणि संडासात जाऊन खात असे. ह्याच्यावर त्यांनी पाळत ठेवली. एक दिवशी संडासात गेल्यागेल्याच त्यांनी जबरदस्तीने दार उघडून मला खाताना पकडले आणि मारत मारत घरात आणले. लगेच लोक बोलवून तलाक दिला.''

मी तिच्या सासऱ्याला समजावले. मग त्यांचे कॉंप्रमाइज झाले.

मी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे काम करतो. माझे विचार बदलण्यास एक कारण झाले. मी एका मुस्लीम विधवा स्त्रीशी लग्न ठरवले. तिच्या बापाकडे मी मागणी घातली. यावर आमच्या

घरच्यांनी एकच रान उठवले. तिच्या वडलांना परस्पर जाऊन माझ्याविषयी खोटेनाटे सांगितले. त्यावर मशिदीत माझ्यात आणि त्यांच्यात मोठ्या बाचाबाचीचा प्रसंग आला. आठच दिवसांत तिच्या घरच्यांनी तिचे दुसरीकडे लग्न लावून दिले.

दलवाईसाब येऊ लागले... मला त्यांची तत्त्वे पटली... काम करू लागलो. मोहल्ल्यात मला विरोध होऊ लागला. आम्ही दलवाईंचा एक परिसंवाद ठेवला होता. त्यामुळे तेथील मुसलमानांमध्ये खळबळ माजली. त्याला उत्तर देण्यासाठी त्यांनी बेळगावहून दोन मौलवी आणले. ते चौकाचौकात सभा घेत... सांगत, 'ये कौन है ये दळवी? अभी आ जायेगा हमारे पंजेमें। आयेगा मौका जब पकड लूंगा उस दळवीको । फिरौन बादशाहाने मुझाला विरोध केला आणि त्या फिरोनची कबर पाण्यात बांधली गेली... तशी त्या दलवाईंची कबर आम्ही इथल्या गावच्या संडासच्या गटाराखाली बांधू, कहाँ जायेगा वो दळवी!'

मी सत्यशोधकचे काम करू लागल्यापासून मला मोहल्ल्यात विरोध सुरू झाला. लोक म्हणू लागले की, 'पाहा, आपल्या पब्लिसिटीसाठी हा इस्लामचा बळी देतोय.' आम्ही ठेवलेल्या दलवाईंच्या एका कार्यक्रमात लोकांनी भाग घेऊ नये म्हणून येथील एका मुस्लीम संघटनेने 'खबरदार! होशियार!' असे पत्रक काढून 'जो कुणी या कार्यक्रमाला जाईल त्याने इस्लामशी शत्रुत्व केले, असे समजले जाईल' असा दमही दिला होता. त्यावर पोलिसांनी चौकशी केली. अखबारातपण हे प्रकरण छापून आले. तेव्हा त्याचा बोलबाला झाला. आता मला जमातीचा विशेष असा त्रास होत नाही. माझ्या मागून बोलतात तेवढेच... समोर बोलायची ताकद नाही... बहिष्कार घालण्याची तर नाहीच नाही. हा बदल दोन-तीन वर्षांतील आहे.

२. माझं नाव वजीर पटेल. गाव अमरावती. कॉलेजात लायब्ररियन.

माझ्याबरोबर २२ मुस्लीम महिला आलेल्या आहेत. आम्ही एक मुस्लीम नौजवान मंडळ काढले. दलवाईंच्या सेक्युलर विचारांचा आम्ही प्रसार करतो. आम्ही ५० महिला आणणार होतो, पण दोन दिवस आधी काही मुस्लीम नेत्यांनी असे घरोघर जाऊन सांगितले की, 'तुमच्या मुलीला पुण्याला पाठवू नका. तिकडे हिंदू-मुस्लीम दंगा होण्याचा संभव आहे.' एकाने कलेक्टरकडे जाऊन तक्रार केली की, ''हे महिलांना जबरदस्तीने पुण्याला नेत आहेत.'' मला कलेक्टरने बोलवून खुलासा मागितला. मी सांगितले, "तुम्ही घरोघर जाऊन खात्री करून घ्या''... एवढेच काय, ''मी त्यांना बोलवायलासुद्धा जाणार नाही'' एवढी खात्री दिली.

तरी आम्ही पुण्याला निघताना त्या मुस्लीम नेत्यांनी आमच्या सायकलरिक्षा अडविण्याचा घाट घातला. एवढ्या तंग वातावरणातही तिथल्या बावीस महिला निघाल्या. त्यांच्या रिक्षांना घरापासून स्टेशनापर्यंत पोलीस संरक्षण मिळाले. गाडीत बसवून दिल्यावर पोलीस परत गेले.

आता परत गेल्यावर आमच्यापुढे काय काय वाढून ठेवले आहे, याचा पत्ता लागत नाही. या विचाराने आमच्यापैकी बऱ्याचशा महिला धास्तावल्या आहेत, पण आल्या प्रसंगाला तोंड द्यायची त्यांची तयारी आहे.

मी कॉलेजचा लायब्ररियन. त्या निमित्ताने माझा मुस्लीम विद्यार्थी-विद्यार्थिनींशी संबंध

येतो. मी त्यांना दलवाईंचे विचार सांगतो. ज्यांना पटतात, ते आमच्यात सामील होतात. आमच्या मुस्लीम नौजवान मंडळाला गावात खूप विरोध होतो. आमच्या मंडळातल्या मुली चालल्या की, ती माणसे त्यांची टवाळी करतात... 'बघा, या वेश्या निघाल्यात. ये लोक अपने खातिर इस्लामको बेचते हैं' असं म्हणतात... आणखी कितीतरी घाण घाण शिव्या देतात, पण मुलींच्या पालकांना वझीर पटेल कसा आहे, माहीत आहे. म्हणून त्यांनी या मुलींना पुण्याला पाठवलं.

३. माझं नाव मी सांगू शकत नाही.

मी आठ मुलांची आई आहे. माझं लग्न झालं तेव्हा माझ्या घरची परिस्थिती चांगली होती; नवरा एकटाच होता. ते आमच्याकडेच राहत. माझ्या आईने त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. ते शिकून एम. ए. पीएच. डी. झाले... कॉलेजात शिकवू लागले. मला वाटले, 'चला, आता आपल्याला चांगले दिवस आले. आता आईच्या घरी राहायला नको.' पुढे कॉलेजातल्या एका मुलीवर त्यांचे मन बसले, तसे ते मला टाळू लागले... मला वरचेवर घरी पाठवू लागले. तोपावेतो ते प्रिन्सिपॉल झाले होते. त्यांनी मला एकदा सांगितले की, "आठ दिवसांसाठी तू घरी जा." मी गेले. आठ दिवस गेले. गेली आठ वर्षे मला त्यांनी घरी नेले नाही. मी एकदा कॉलेजात भेटायला गेले असता त्यांनी धक्के मारून बाहेर काढले. उभा असलेला हा मुलगा तेव्हा सहा महिन्यांचा पोटात होता. मला त्यांनी तलाक दिला नाही आणि घरातही घेत नाहीत. ते महिना पन्नास रुपये पाठवतात. पन्नास रुपयांत आठ मुलांचा संसार मी कसा ओढणार! माझं मागणं, त्यांनी मला निदान शंभर रु. तरी द्यावेत. पहिले पहिले आईला काही वाटत नसे, पण आता त्या घरात सगळ्यांना माझा बोजा झाला आहे. आईच्या घरी राहण्यापेक्षा भीक मागणेही बरे पडते. गेले दोन दिवस मी या अधिवेशनात हजर आहे, पण माझ्या पोरांच्या पोटात अन्न नाही. इथल्या लोकांनी माझी स्थिती ऐकून मला पैसे दिलेत... अठ्ठावीस रुपये जमले... दलवाई साबने त्यात बावीस घालून पन्नास केले... बहोत बहोत शुक्रिया! आप लोग बहोत अच्छा काम कर रहे हैं. पण मला काहीतरी नोकरी लावून द्या... वाटेल ते काम करायची माझी तयारी आहे.

वरील स्त्रीच्या घटनेसंबंधी बोलताना दलवाई म्हणाले, "हे प्राचार्य गव्हर्मेंट कॉलेजचे प्राचार्य आहेत. 'त्या प्राचार्यांना या स्त्रीला महिना दोनशे रुपये सक्तीने द्यायला लावा' असा आग्रह मी शिक्षणमंत्र्यांना भेटून त्यांच्याकडे धरणार आहे, आणि त्यास नकार मिळाला की, त्या प्राचार्यांविरुद्ध आणि शासनाविरुद्ध आम्ही सामूहिक संघर्ष करणार आहोत. त्याला आम्ही तसे सोडणार नाही."

४. मेरा नाम बिल्किस बेगम.

राहणार दिल्ली. एका मुलींच्या शाळेची हेडमिस्ट्रेस.

माझं आणि नवऱ्याचं भांडण लग्नानंतर लगेचच सुरू झालं. नवरा बाहेरून आला की, 'माझी अमुक वस्तू कुठे आहे, तमुक कुठे आहे' म्हणून घरात गोंधळ घाली. नाही सापडली की म्हणे, "तलाक देतो." साध्या साध्या गोष्टींना 'आत्ता तलाक देतो, मग तलाक देतो' असे तो म्हणे...

चिडला की, सामान इकडे तिकडे फेकून देई. मी अगदी कंटाळून गेले होते, पण त्याने तलाक दिला तर करायचे काय? मला शिक्षण नव्हते; घरचा पैसा नव्हता. मग जाणार कुठे? नवऱ्याचा त्रास पुढे जास्त वाढला. तो मारू लागला... कमरेचा पट्टा काढून मारी किंवा पायातला बूट काढून मारी... येता-जाता लाथा मारी. शेवटी मी त्याला सांगितले, "तुझ्या किक्स खायला मी काही फूटबॉल नाही." त्यावर त्याने मला तलाक दिला. मी वेगळी राहू लागले. मी शिक्षण घेतले; शिक्षिका झाले. आता हेडमिस्ट्रेस झाले. मोहल्ल्यातले लोक कामानिमित्त माझ्याकडे येतात. माझे बोलणे, चालणे, वागणे पाहून ते माझ्या त्या नवऱ्याला विचारतात, 'अरे इतनी अच्छी औरत, तूने उसे छोड क्यूं दिया?'

पण त्या सगळ्या प्रकरणात मी मात्र 'मेंटल पेशंट' झाले. आता मला साध्यासाध्या गोष्टींची काळजी वाटते. माझा मुलगा जरा कुठे बाहेर गेला की, 'तो ट्रकखाली सापडला, त्याचे डोके फुटले, त्याला कुठे लागले, तो जिवंत आहे की नाही..' असे विचार डोक्याला त्रास देतात.

५. माझं नाव असंच काहीतरी. पुण्यातली राहणारी.

माझं लग्न होण्याआधी आठ दिवस माझी सासू आणि तिची एक नातेबाईक घरी येऊन राहिले... तिने माझी चालचलणूक पाहिली... मला पसंत केले आणि माझा निकाह झाला. काही महिन्यांनी माझ्या चेहेऱ्यावर जवानीचे फोड येऊ लागले... घरच्यांनी खोड काढली... 'ही मुलगी नको' म्हणू लागले... 'हिला रक्तपिती आहे' असे म्हणून त्यांनी मला तलाकच देऊन टाकला.

मी घरी आले... वडलांना सांगितले... वडील त्यांना समजवायला गेले, पण यश आले नाही... येवढ्या दिवसांत त्यांनी दुसऱ्या मुलीशी लग्न करूनही टाकले.

माझ्या वडलांनी मला एका मोठ्या कातडीच्या डॉक्टरला दाखवले. त्यांनीही सर्टिफिकेट दिले की, 'ही रक्तपिती नाही... साधे जवानीचे फोड आहेत.' हे सर्टिफिकेट नवऱ्याकडच्यांना दाखवले. त्यांनाही ते पटले. त्यांनी मला परत घरी नेले आणि नव्या बायकोला तलाक दिला.

मधल्यामध्ये त्या मुलीचे मात्र नुकसान झाले. तिच्याकडे पाहिले की, मला वाईट वाटते. साध्या गोष्टीसाठी केवढा मूर्खपणा... केवढे नुकसान!

६. माझ्या आईची स्थिती पाहून मी या परिषदेला आले आहे. मी स्कूलमध्ये दहावीत आहे. पुण्यात, रास्ता पेठेत राहते.

माझी आई कुँवर असताना त्यांच्या घरी एक मुलगा शिकायला ठेवला होता. तो पटन्याचा पठान होता. त्याचे आणि माझ्या आईचे संबंध आले आणि तिला गर्भ राहिला. ही मी पोटात असतानाची गोष्ट. या गोष्टीची बोलवा झाल्यावर अळीतल्या मोठ्या मंडळींनी त्या मुलाला समजावले आणि त्या मुलाचा म्हणजे माझ्या वडलांचा माझ्या आईबरोबर निकाह लागला.

पुढे माझे वडील पटन्यास गेल्यावर त्यांच्या घरच्यांनी त्यांना सुनावले. आपल्या खानदानास हे लग्न शोभत नसल्याचे सांगितले. माझ्या वडलांनाही ते पटले. त्यांनी माझ्या आईस तलाक दिला आणि दुसरे लग्नही करून टाकले.

पुढे माझ्या आईला खूप बाईट दिवस आले. तिला लोकांची धुणी, भांडी करून पोट भरावे लागले, पण तिने मला शिकवले. म्हणून मला इथे यायची बुद्धी तरी झाली. मी आता दहावीत आहे. ही घटना आमच्याच बाबतीत घडली असे नाही, तर मोहल्ल्यातल्या घराघरांत अशा घटना घडतात. हे थांबले पाहिजे.

७. माझं नाव जहाँआरा बेगम.

मी कलकत्त्यानजीकच्या जगदीशपूर या गावी राहते.

मी बारा वर्षांची असताना शाळेत जाऊ लागले. शाळेत जाते म्हणून माझ्या बडलांनी आणि चुलत्यांनी खूप विरोध केला. पण मी तो न जुमानता शाळेत गेले. शिकून एम. ए. झाले... इतिहास हा माझा विषय होता. नंतर पॉलिटिक्स घेऊन दुसऱ्यांदा एम्. ए. झाले. हे करताना मला खूप अडचणी आल्या. आमच्या जमातीत मुलींना इतके शिकून चालत नाही. शिवाय मी पडदा पाळीत नसे, म्हणूनही सगळ्यांचा मोठा राग असे, तो वेगळा.

आम्ही काही मित्र-मैत्रिणी मिळून मुस्लीम समाजाच्या प्रश्नांविषयी चर्चा करीत असू. त्यातून आम्ही १९७० साली 'नवजागरण समिती' काढली. त्यात प्रामुख्याने मुस्लीम स्त्रियांच्या प्रश्नांवर चर्चा होत असे.

आम्ही आमच्या मागण्या एका पत्रकाद्वारे प्रसिद्ध केल्या. त्या अशा होत्या :

१. मुस्लीम स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे. म्हणजे त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायांवर उभे राहता येईल.
२. आपल्या स्वतंत्र शाळा नकोत. इतर शाळांमध्ये त्या विलीन करण्यात याव्यात.
३. पडदा पद्धती ताबडतोब नष्ट झाली पाहिजे.
४. स्त्रियांना सर्व बाबतींत समान हक्क मिळाले पाहिजेत.
५. हुंडा पद्धती बंद झाली पाहिजे.
६. बहुपत्नीत्व व बालविवाह या पद्धतींवर कायद्याने बंदी घातली पाहिजे.
७. एकतर्फी घटस्फोट पद्धती बंद झाली पाहिजे आणि प्रत्येक लग्न रजिस्टर करण्याची सक्ती केली पाहिजे.

हे पत्रक सर्व वर्तमानपत्रांतून छापून आल्यावर सगळीकडे खळबळ माजली. आमच्या घरासमोर मुस्लिमांची एक खूप मोठी सभा झाली. त्यात खूप मौलवींची, पुढाऱ्यांची भाषणे झाली. त्यांतली काही वाक्ये अशी :

'आम्हाला जहाँआराचे शिर पाहिजे', 'आम्हांला तिचे रक्त प्यायचे आहे', 'आम्ही तिची कातडी सोलून काढू आणि आमचे मुल्ला-मौलवी तिचे कच्चे मांस खातील.'

या सभेनंतर आमच्यावर खूपच दडपण आले, पण 'नव जागरण समिती'चे काम चालूच राहिले. त्या वेळी माझ्या घरचेही घाबरले होते. पण माझ्या आत्याने – खालाने – तिला मी बडी मा म्हणते – मला धीर दिला. तिने सांगितले, "माझ्या मयतीलासुद्धा या मुल्ला मौलवींना बोलवू नकोस." माझे काका अब्दूल समर यांनीही मला खूप मदत केली.

बांग्लादेश स्वतंत्र होण्याआधी मी जेसोरपर्यंत जाऊन आले. तिथली निरपराध कत्तल मी पाहिली. पाकिस्तान निर्मितीचा तो परिणाम आहे, असे मी मानते. आता स्वतंत्र बांग्लादेशमुळे आमच्या प. बंगालमधल्या मुसलमानांची बुद्धी ठिकाणावर येवो, अशी आशा करते. इथे दंगल झाली की, आजवर मुसलमान पूर्व बंगालमध्ये निघून जात. आता स्वतंत्र बांग्लादेशात अशा दंगलखोरांना आसरा मिळणार नाही. हे सर्वसामान्य मुसलमानालासुद्धा आता जाणवायला लागू लागले आहे, असे वाटते.

आतापर्यंत मुसलमानांचा प. बंगालच्या राजकारणात बराच उपयोग करून घेतला गेला आहे. स्वातंत्र्यानंतर १९६२पर्यंत काँग्रेसला आणि नंतर सी. पी. एम.लाही मते मिळत गेली. मागच्या मध्यावधी निवडणुकीच्या सुमाराला निवडणुकीच्या ऐन धरात स्टेटस्मन या वृत्तपत्रात सुप्रसिद्ध विचारवंत टॉयन्बी यांचे लेख येत होते. त्यांत पैगंबरांची आणि गांधींची तुलना केली होती. त्यावर लागलीच संबंधित पक्षाच्या प्रेरणेने स्टेटस्मन कचेरीवर मोर्चा आणून जाळपोळ करण्यात आली. या घटनेचा त्या निवडणुकीत मुस्लीम मतदारांवर मोठाच परिणाम झाला. एकूण सगळे चित्रच पालटले.

पुण्यातील महिला परिषद पाहून आणि इथल्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य पाहून मला खूप हुरूप आला आहे.

८. माझं नाव फखर बेगम .

दिल्लीला राहते.

मी एका मोठ्या मौलवींच्या घराण्यातील आहे. माझे सासरे मौलाना अहमद सहीद दिल्लीतील एक मोठे मौलवी समजले जात.

माझे लग्न झाले, तेव्हा मी जरा शिकलेली असल्याने पडदा पाळीत नसे. माझे पतीही जुन्या मताचे नसल्याने तसे चालत असे; पण माझ्या सासूने सांगितले की, "आपले घराणे मौलवींचे... मला हे चालणार नाही.'' मग आम्ही वेगळे राहू लागलो... थोडेफार जाणे-येणे असे.

काही वर्षांनी माझ्या सासऱ्यांच्या मृत्यूनंतर माझ्या थोरल्या दिरांना मौलवी पद मिळाले, पण दोन वर्षांतच त्यांचा हृदयविकाराने मृत्य झाला. तेव्हा प्रश्न आला. माझ्या पतींना मौलवी पदावर बसवण्यात आले. सासूने मला परत घरी बोलावले. माझे पडदा न पाळणे त्यांनी खपवून घेतले.

पुढे दोनच वर्षांनी माझे पतीही हृदयविकाराने मृत्यू पावले. माझ्या मुलाला मी परंपरागत कुराणचे शिक्षण दिले नव्हते. मग वारसाचा प्रश्न आला, तेव्हा आता थोरल्या दिरांचा थोरला मुलगा गादीवर आहे.

मौलवी घराण्याची खूप मोठी इस्टेट आहे. मोठा थोरला वाडा, गावात घरे, जमिनी इ. लोक धर्माला वाहतात ते पैसे, देणग्या हे मौलवी लोक आपसांत वाटून घेतात. यांच्या पैशाला सीमाच नाही. माझे पती हयात असताना या सगळ्याची मी मालकीण होते, पण पतीच्या मृत्यूनंतर ती सर्व जायदाद माझ्या सासूच्या नावावर झाली. आमच्या कायद्याप्रमाणे नवऱ्याची इस्टेट त्याच्यानंतर संपूर्णपणे बायकोला मिळत नाही. त्या इस्टेटीचा आठवा हिस्सा मिळतो... उरलेली मुलांच्या

नावावर होते. मुलाचा मृत्यू आईबापांच्या आधी झाला, तर त्या मुलाच्या बायका-मुलांना मिळण्याऐवजी ती परत आईबापांकडे जाते. आता माझ्या मुलांना अगदीच थोडा हिस्सा मिळणार आहे. तूर्त त्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे, पण मी माझ्या पायावर उभी आहे. मी बी. ए. असल्याने शिक्षिका होऊ शकले... मुले चांगली शिकत आहेत.

आमच्या जुन्या दिल्लीतील मुसलमान समाजात मी काम करते. मुस्लीम स्त्रियांची परिस्थिती फारच वाईट असते. मी पाहते त्या प्रत्येक बाईला सहा ते आठ मुले आहेतच. थोरल्या मुलाच्या कडेवर एक लहान मूल, दुसऱ्याच्या कडेवर आणखी लहान मूल, पुन्हा झोपताना तिच्या प्रत्येक कुशीत दोन-दोन मुले असतातच. सकाळपासून रात्रीपर्यंत ती या पोरवड्यातच राहते. तिच्या डोक्याला केवढा त्रास... केवढे कंटाळवाणे जीवन!

म्हणून स्त्रियांनी शिक्षण घेतले पाहिजे (तालीम हासिल करना चाहिये). केवळ ती शहाणी व्हावी म्हणून नव्हे, तर तिला नोकरी करता येईल आणि या घरच्या चिखलातून ती सात-आठ तास बाहेर पडेल म्हणून ते आवश्यक आहे.

तसे आमच्या दिल्लीला कशिदा काढायचे काम मुसलमान स्त्रिया घरोघर करतात, पण ते तर त्याहून भीषण आहे. साडी संपूर्ण भरण्याचे रुपया-दोन रुपये मिळतात. ती विकणारा मात्र त्याचे पन्नास ते साठ रुपये कमावतो; मधले दलालही खूप असतात. अशा कशिदा काढणाऱ्या स्त्रियांचे डोळे दोन-चार वर्षांत अधू होऊ लागतात. दृष्टी गमावलेल्या अशा कितीतरी स्त्रिया मी तुम्हाला दिल्लीत दाखवून देईन.

तिचे रुपया-दोन रुपये आणि तिच्या मर्दाचे तीन-चार रुपये असे चार-पाच रुपये रोज मिळवून ते आठ-दहा माणसांच्या कुटुंबाला काय पुरा पडणार आहेत? मग मुले उपाशी शाळेत जातात... उपाशीपोटी शिक्षण होत नाही. मग ती लहान वयात इतर उद्योगांना लागतात. असे सगळे हे दुष्टचक्र आहे.

आमच्या दिल्लीत अहमद फिशोरी म्हणून एक गृहस्थ आहेत. त्यांची स्वतःची हॉटेल्स आहेत. त्यांना एकंदर अकरा बायका आहेत. तीन बायका एका घरी राहतात... बाकी दोन या हॉटेलात... दोन दुसऱ्या... अशा रीतीने त्या सगळ्या राहतात. त्या अकरांपैकी बऱ्याच जणींना सहा ते आठ मुले आहेत. हे गृहस्थ बऱ्याच प्रजेचे मालक आहेत.

बरे, इतका संसार वाढवणारा माणूस दिसायला हसीन असेल किंवा तब्येतीने ठणठणीत असेल, असेही नाही... अगदी किडकिडीत, दिसायला खप्पड आहे.

म्हणून काही झाले तरी स्त्रियांनी शिकून आपला प्रपंच उभा केला पाहिजे. म्हणजे पुढचे गाडे बरेचसे वळणावर येऊ शकेल. आम्ही काही स्त्रियांनी दिल्लीला एक नॅशनल वुमेन असोसिएशन काढली आहे. आम्ही शिष्टमंडळ स्थापून निरनिराळ्या मागण्या घेऊन इंदिराजींना भेटलो आहोत. पुण्याच्या मुस्लीम महिला परिषदेला आम्ही पन्नास महिला येणार होतो, पण युद्धामुळे, ब्लॅकआउटमुळे येऊ शकलो नाही.

९. मी अनिस-उर रहमान... पटन्याचा राहणारा.

मी परचम-ए-हिंद या उर्दू साप्ताहिकाचा संपादक आहे. शास्त्रीजींनी दिल्लीत बोलवून घेतले, तेव्हापासून परचम-ए-हिंद दिल्लीत आले. आधी गांधींच्या स्वातंत्र्य चळवळीत, नंतर या पत्राद्वारे मुस्लीम जातीयवादाविरुद्ध आम्ही थोडेफार काम केले.

काम करताना मुस्लीम आणि हिंदू यांचे खूप भिन्न भिन्न अनुभव आले. तीन-चार वर्षांपूर्वीचा एकच प्रसंग बघा... एका मुस्लीम सभेत लीगवाले नेते जोरजोरात सांगत होते की, "आम्हाला हे लोक उगीचच देशद्रोही म्हणतात. आम्ही याच राष्ट्राचे नागरिक आहोत.'' मी मध्येच उठून सांगितले की, "जर तुम्ही राष्ट्रीय आहात, तर ही सभा संपल्याबर राष्ट्रगीत होऊ द्यात.'' त्याबर सभेत खूप गोंधळ झाला. लोक मला मारायला धावले. त्या गोंधळात सभा उधळली गेली. दुसरे दिवशी एका आर्यसमाजिस्ट पेपरमध्ये अशी बातमी छापली होती की, 'अनिस-उर रहमानने स्वतःच्या पब्लिसिटीसाठी हा स्टंट घडवून आणला.' त्यानंतर मी परचम-ए-हिंदचा अग्रलेख लिहिला. त्याला शीर्षक दिले – 'हमको दोनोंने मारा.'

'मुस्लीम कम्युनॅलिझम' विषयी मला विचारले जाते, कम्युनॅलिझम ही काही बाईट गोष्ट नाही. 'मुस्लीम जमातीचे भले व्हावे' असे त्यांना वाटते, तर ठीक होते, पण तसे नाही. त्यांना त्याबरोबर 'हिंदूंचे बाईट व्हावे' असे वाटते. हिंदूंचे बाईट झाले की यांना बरे वाटते. आता तुमच्या हिंदूंच्या मुली परीक्षेत पहिल्या येतात आणि फोटो पेपरमध्ये छापून येतात, तेव्हा हे मुसलमान नाखूश असतात. म्हणून माझे तर असे मत झाले आहे की, इथला इस्लाम हा खरा इस्लाम धर्म नाहीच आहे. हा प्रतिक्रियात्मक, संरक्षणात्मक इस्लाम आहे.

उदाहरण घ्यायचे झाले, तर धार्मिक मनुष्याला नमाज पढायचा असेल, तर तो आपल्या घरी, पश्चिमेला तोंड करून पडू शकतो, पण इथले तसे नसते. 'इतके हजार लोक या वेळेस येथे नमाज पढतात' हा 'शो' त्यांना हिंदूंना दाखवायचा असतो. 'सगळ्यांनी दाढी वाढवायची' असाही त्यांचा हट्ट यापोटीच असतो.

त्यांच्या डोक्यात 'नंबर'चा प्रभाव इतका आहे की, 'तो कसा काढायचा?' हा प्रश्न आहे. आपली लोकसंख्या कोटींमध्ये वगैरे आहे. तुम्ही जर सच्चे धार्मिक असाल, तर मग या लोकसंख्येच्या शक्तिप्रदर्शनाचा प्रश्न येतो कुठे? गांधी म्हणत, 'एकला चलो रे...' म्हणजे मी एकटा असेन किंवा करोडो लोक माझ्याबरोबर असतील, मी सत्याग्रह करणार. तुमचे तसे का नाही? आठ कोटी की दहा कोटी याबर धर्म कसा अवलंबून असू शकतो, हे कळत नाही!

ज्या गोष्टी खतम करायला इस्लामचा जन्म झाला, त्याच गोष्टी इथला इस्लाम आज करून राहिला आहे. मी तर त्याही पुढे जाऊन म्हणेन की, 'कुराणमें लिखा हो तो भी आज तुम्हे दुनियाके साथ चलना होगा!' 'कुराणमध्ये अमुक आहे आणि तमुक नाही' ही भाषा आपण बंद केली पाहिजे. कुराणमध्ये सांगितलंय, मूर्तिपूजा करू नका, तस्वीर काढू नका. मग हज यात्रेला जाताना पासपोर्टवर फोटो का लावता? सिनेमा का पाहता?

आमच्या मुल्ला-मौलवींचा नखराच जास्त... लांब दाढी... लांब कोट-ड्रेपरीबर जास्त भर... पहाटे पाचला नमाज पढायला जायचे. मक्केमध्ये तिकडले सगळे या दाढीवाल्यांचा

तिरस्कारच करतात. मी हजला गेलो होतो, तेव्हा आमच्या उत्तर हिंदुस्थानातील अगदी प्रसिद्ध संत फुलवारीसाब तिथे भेटले. तिकडे त्यांना अक्षरशः कोणी विचारत नव्हते. मला त्यांनी विचारले, "आप इधर कैसे?''

मी म्हणालो, "आपका इस्लाम किधरसे निकला, वो देखने आया।''

हिंदूंमध्येपण जातीयवादी आहेत, पण सर्वसाधारण हिंदू त्यांच्या मागे गेला नाही. तो गांधींच्या मागे गेला. हे आपण लक्षात ठेवलं पाहिजे. मुस्लीम नेते हाक देत असतात, 'एक हो जाओ, आपको हक माँगना है।' हे चूक आहे.

मुसलमानांचे भले दोनच माणसांनी केले. एक म्हणजे, सर सय्यद अहमदखान. त्यांनी मुसलमानांना सांगितले, 'पढते रहो'... आणि त्यानंतर हमीद दलवाई. त्यांनी सांगितले, 'मौलवीझम को खतम करो।'

मुस्लीम महिला परिषदेत आलेल्या बहुतेक महिला नवख्या होत्या.

त्यांतील बऱ्याचशा स्त्रियांनी 'विचार' नावाची गोष्ट प्रथमच ऐकली. साध्या राजकीय सभांनासुद्धा त्या कधी गेलेल्या नव्हत्या. 'आपण आलो खरे, पण याचा परिणाम काय होईल' याची प्रत्येकीच्या मनात धाकधूक होती. प्रत्येक जण या समाजव्यवस्थेत कुठे ना कुठे पोळली गेलेली दिसत होती. त्यामुळे या परिषदेला कमालीचे गांभीर्य आलेले होते. मौजमजेचा कुठेही मागमूस नव्हता. त्यांच्या हकिगती त्या एकमेकांना सांगत होत्या. सारख्या प्रकारच्या वेदनांनी जणू त्यांच्या चळवळीचा पायाच घातला जात होता.

डोके मोठे आहे म्हणून एका स्त्रीला तलाक दिला गेला होता, तर बायकोकडच्यांनी लग्नात फर्निचर जुने दिले म्हणून एका नवऱ्याने तलाक दिला होता, एकीच्या चालण्यात खोट आहे म्हणून नवऱ्याने टाकले होते... अशा अनेक हकिगती ऐकायला मिळत होत्या. दिल्ली स्कूल ऑफ ड्रामाच्या सबा जैदी या मुलीला 'या परिषदेला इतक्या महिला स्वेच्छेने कशा आल्या?' याचे आश्चर्य वाटत होते. म्हणून ती प्रत्येकीला गाठून विचारत होती की, 'तुम्ही प्रेशरखाली आलात की स्वतःहून?' स्त्रिया तिलाच हसत होत्या. परिषदेत रंगीबेरंगी भडक-फिकट रंगाचे संमेलनच भरले होते.

पोटात तीन महिन्यांचा गर्भ असताना अमरावतीच्या एका महिलेला नवऱ्याने तलाक दिला होता. त्यानंतर शिकून ती शिक्षिका झाली होती. तिला विचारले, "तुम्ही दुसरे लग्न का नाही केले?'' त्यावर ती म्हणाली, "पुन्हा मला कुणाकडून 'तलाक' हा शब्द ऐकायची इच्छा नाही. मी आता तशीच राहणार आहे आणि उरलेले आयुष्य याच कार्यासाठी कारणी लावणार आहे.''

ही शक्ती परिषदेनिमित्ताने दिसू लागली आहे, एकत्र येऊ लागली आहे. आता हक्कांचा आवाज पडदा फाडून बाहेर येऊ लागला आहे. काळ्या कपड्याआडचा आणि रेशमी जाळीआडचा म्लान चेहेरा संतप्त होऊ लागला आहे. आता त्यांना प्रकाश हवा आहे. तो प्रकाश कोण आणि कसा थोपवणार?

(अनिल अवचट: महाराष्ट्रातील नामवंत लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते, हमीद दलवाई यांचे जवळचे मित्र. त्यांनी त्यांच्या आणि हमीद दलवाई यांच्या आठवणींवर आधारित 'हमीद' हे पुस्तक लिहिले आहे.)

५.१२ लीगच्या दादागिरीच्या घटका आता भरल्या! – सय्यदभाई

(मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सय्यदभाई यांची साप्ताहिक 'साधना'तील मुलाखत)

प्रश्न : मुस्लीम लीगच्या पुणे शाखेचे सेक्रेटरी मिर्झा हमीद बेग यांचे पत्रक तुम्ही पाहिलेत? तुमची प्रतिक्रिया काय?

उत्तर : त्यांचे पत्रक पाहिले. त्यात नवीन काहीच नाही. स्वातंत्र्यपूर्व काळातील मनाने लीगवाली मंडळीच अजून वावरत आहेत, एवढेच त्यावरून सिद्ध होते! 'मुसलमानांच्या वतीने बोलण्याचा ताम्रपट आपल्याला मिळालेला आहे' असा अहंकार त्यांच्यात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आणि बांग्लादेशच्या स्थापनेमुळे बदललेली परिस्थिती त्यांच्या खिजगणतीतच नसावी, असे त्यांच्या पत्रकावरून वाटते. काळानुसार बदलायचे नाकारणाऱ्यांची काळ गय करत नसतो. तो त्यांना पायदळी तुडवतो. हा इतिहासाचा धडा किती टक्के-टोणपे खाऊन ही मंडळी शिकणार आहेत, कोण जाणे!

बेग यांचे पत्र म्हणजे मुस्लीम जातीयवादी नेतृत्वाचा एक इरसाल नमुना आहे. 'कांगावखोरपणा' हे अशा मंडळीचे खास वैशिष्ट्य असते. सत्याची मुर्वत ते कधीच बाळगत नाहीत. जनतेचे अज्ञान, रूढिग्रस्तता, मागासलेपण यांवर त्यांचे नेतृत्व अवलंबून असल्याने धर्माच्या नावाने या अंधकाराची जपणूक करणे, हा या मंडळीचा धंदा आहे... नाव इस्लामचे घेतात, पण यांना सत्तेची चाड नसते.

आता हे पत्रकच पाहा : मुस्लीम महिलांची अनुपस्थिती असल्याची ग्वाही यांनी दिली आहे! सत्याचा एवढा अपलाप त्यांच्याशिवाय कोण करू शकणार? मुस्लीम स्त्रिया आल्याच नसत्या, तर पत्रक काढण्याची उठाठेव यांनी केली नसती. समस्त मुस्लीम जनतेच्या वतीने बोलण्याचा ठेका घेतल्यासारखी भाषा त्यांनी वापरली आहे. 'मुस्लीम बांधव व भगिनी अमुक पसंत करतील' किंवा 'करणार नाहीत' असे हे बिनदिक्कतपणे ठोकून देतात! आलेल्या मुस्लीम भगिनींची भाषणे यांच्या बहिऱ्या कानांना ऐकूच आलेली नसावीत किंवा ते घालवेडेपणाने त्याकडे दुर्लक्ष करत असावेत. जे अय्युबखानांना ऐकू आले, जे पाकिस्तानला दिसले, ते या दिवाभीतांना दिसत नाही! लीगच्या या नेत्यांनी खरोखर मुसलमानांसाठी काय केले, याचा जमाखर्च एकदा मांडलाच पाहिजे. यांच्या वल्गना मोठ्या आणि तितकीच यांची शरणागतीही मोठी, असा इतिहास आहे! या मंडळींनी कधीही मुस्लीम समाजाचे प्रबोधन केले नाही. त्यांच्या नावावर यांनी फक्त घाऊक मतांचे सौदे पटवले. त्यामुळे पाकिस्तानात मुस्लीम लीगचे बाणदेखील राहिलेले नाही; इथे मात्र यांची टुरटुर चालू आहे. पण मुसलमान फार काळ ह्या गमजा चालू देणार नाहीत.

प्रश्न : धर्मनिरपेक्षतेबद्दल त्या पत्रकात फार कळवळा दाखवला आहे.

उत्तर : लीगवाल्यांच्या कोशातला धर्मनिरपेक्षतेचा अर्थच वेगळा आहे! 'सारे जग इस्लाममय होणे' हीच त्यांची धर्मनिरपेक्षता होय. जीवनाच्या ऐहिक भागात धर्माची वृथा ढवळाढवळ चालू न देणे, म्हणजे धर्मनिरपेक्षता होय! इंग्रजांनी यांना न जुमानता कायद्यात बदल केले, तेव्हा यांची

दातखीळ बसली होती. शरीयतच्या नावाने हे ओरडा करतात, त्यातला फक्त व्यक्तिगत कायद्याचा भागच काही प्रमाणात अबाधित आहे, पण मुसलमानांना या गोष्टी ते कधी समजावून सांगणार नाहीत. शरीयतच्या नावाने फक्त बकवास करत राहतील. जगात कोणत्याही आधुनिक इस्लामी राष्ट्रात शरीयत चालू नाही, ही वस्तुस्थिती आहे.

'रेडियन्स' सारख्या मुस्लीम जातीयवादी वृत्तपत्रालादेखील आधुनिक जीवनाच्या दृष्टीने बदल आवश्यक वाटतात आणि इज्तिहाद आणि कयास यांची कास धरण्याची भूमिका घ्यावी लागते. अशा रीतीने ह्यांचेच एकेक बुरुज जमीनदोस्त होत आहेत. कयास आणि इज्तिहाद यांचा आश्रय करायचा, तर मग इतरांच्या ज्ञानाचीही कदर का करायची नाही? ऐहिक हितासाठी अनेक बदल मुसलमानांनी पत्करलेच आहेत... मग ही शहाजोगपणा कशासाठी?

प्रश्न : मुस्लीम महिलांना शरीयतच्या कायद्याप्रमाणे आदरणीय स्थान दिल्याची ग्वाही त्यांनी दिली आहे.

उत्तर : ही सगळी थापेबाजी आहे. सगळेच मतलबी लोक धर्माची अशी ग्वाही देतात. आदरणीय म्हटले म्हणजे त्यांच्या स्वातंत्र्याचा अपहार करण्याचा जणू परवानाच मिळतो! स्त्रियांना आदरणीय स्थान देणाऱ्या शरीयतच्या ज्या कायद्याविषयी हे सांगतात, तो व्यवहारात आहे काय? असली कुराणातली बानगी खाऊन पोट भरत नसते. स्त्रिया-मुलांची होणारी दैना प्रत्यक्षात आणि आदरणीय स्थान पुस्तकात, असा हा मामला आहे! लीगच्या या कैवाऱ्यांनी मुस्लीम स्त्रियांच्या शैक्षणिक व सामाजिक परिस्थितीची एकदा पाहणी करावी; धंपकपणाने बोलू नये. मुसलमान स्त्रीला समतेचे साधे हक्क द्यायला जे तयार नाहीत, ते आदराच्या गोष्टी बोलत आहेत! 'बायका म्हणजे उपभोगाची वस्तू' यापलीकडे त्यांच्या विचारांची झेप जातच नाही! मुस्लीम स्त्रियांवरील अन्याय निवारणाच्या दृष्टीने यांनी कधी काही केले नाही. आपल्या माता-भगिनींची दैना पाहूनही ज्यांची मने कळवळत नाहीत, त्यांनी धर्माच्या लंब्या बाता कशाला माराव्यात? करुणा-रहम हा तर धर्माचा आत्मा आहे ना? लीगवाल्यांना अशा धर्माचे काहीच सोयरसुतक नाही. आपल्या राजकारणासाठी त्यांना धर्म वापरायचा असतो! 'पाकिस्तानचे अध्यक्ष ज. भुट्टो यांनी शांपेनचे पेले रिचवून जुन्या वर्षाचा निरोप घेतला व नव्या वर्षाचे स्वागत केले' अशी वर्तमानपत्रातील बातमी वाचून ही मंडळी कधी खवळली आहेत काय? तो त्यांना पाकिस्तानचा 'अंतर्गत प्रश्न' वाटतो; इस्लाम धर्माचा प्रश्न वाटत नाही!

प्रश्न : सरकारने तुम्हाला मदत केल्यामुळे या मंडळीचे पित्त खवळलेले दिसते...

उत्तर : इंग्रजांच्या आश्रयाने पोसल्या गेलेल्या लीगला दुसरे काय सुचणार? सरकारने समान नागरी कायदा केला, तर आम्हाला मदत केली, असे म्हणता येईल. पण ते सरकारने कुठे केले आहे? काँग्रेसच्या जाहीरनाम्यातदेखील त्याचा उल्लेख नाही! उलट केंद्र सरकारातील कायदे मंत्र्यांनी पाकिस्तानाइतकाही आपल्या कायद्यात बदल करण्याला नकार दिला! आमचे तर सरकारशी या मुद्द्यावरून भांडण आहे. सरकार अनेक स्मरणिकांना जाहिराती देते, तशीच त्याने

आम्हालाही दिली. पण एकूण ज्या जाहिराती आम्ही मिळवल्या, त्या मानाने सरकारी जाहिराती कमीच मिळवल्या, पण तेवढ्याही त्यांच्या डोळ्यांत त्याच नेमक्या खुपल्या!

लीगवाल्यांना अद्याप वाटते की, निवाडा करणारी एखादी तिसरी सत्ता देशात अस्तित्वात आहे आणि तिच्याकडे आपण दाद मागू. स्वातंत्र्याबरोबरच जातीयवाद्यांची पाठराखण करणारी तिसरी सत्ता नाहीशी झाली आहे.

लोकशाही राष्ट्रात वृत्तपत्रांना संपूर्ण स्वातंत्र्य असते. इथे अय्युबशाही, याह्याशाही किंवा भुट्टोशाही नाही की, सरकारच्या तंत्राने वृत्तपत्रांनी नाचावे! एकूण एक मराठी व पुष्कळशा इंग्रजी पत्रांनी मुस्लीम महिला परिषदेला पाठिंबा दिला, यावरून तरी यांची अक्कल ठिकाणावर यायला हवी होती. लोकशाही राजवटीने वृत्तपत्रांवर दातओठ खाऊन काय साधणार? कोंबडे झाकले म्हणून सूर्य उगवायचा थांबत नाही, हे यांना कधी कळेल? 'बहुसंख्य वृत्तपत्रे बिगर मुसलमानांची आहेत' असे लीगवाले यावर म्हणणार! पण ही वस्तुस्थिती आहे आणि ती मान्यच केली पाहिजे. 'आपण या देशात अल्पसंख्य आहोत हाच आपल्यावर फार मोठा अन्याय आहे' असे वाटणाऱ्या मंडळींना कोण आणि कसे समजावणार? स्वातंत्र्यपूर्व काळाप्रमाणे बहुसंख्याकांना डावलण्याचा यांचा हट्ट चालू आहे. पाकिस्तानने हा हट्ट चालवला आणि स्वतःच स्वतःचे दोन तुकडे पाडून घेतले! पाच कोटींनी साडेसात कोटींचे हक्क डावलण्याचा हेका चालवला आणि बांग्लादेश स्वतंत्र झाला, पण झोपलेल्याला जागे करता येते; झोपेचे सोंग घेणारांना कोण आणि कसे जागे करणार?

प्रश्न : देशाच्या एकात्मतेला तुमच्या कायमे धोका पोहोचतो, असा त्यांचा दावा आहे...

उत्तर : देशाचे तुकडे करण्याच्या पापाच्या धन्यांनी राष्ट्रीय एकात्मतेची उठाठेव करावी, हा केवढा निर्लज्जपणा आहे! व्यापक राष्ट्रीय जीवनापासून आजही मुस्लीम समाज वेगळा राहावा, यासाठी लीगसारख्या संघटनांचा आटापिटा चाललेला आहे. जातिधर्मातीत लोकशाही राज्यात धर्मवादी मुस्लिमांची मानसिकता यापेक्षा काय वेगळी असणार! यांच्या भाईबंदांनी हट्टाने पाकिस्तान मिळवले, पण तेसुद्धा त्यांना एकत्र राखता आले नाही. यांची एकात्मता म्हणजे इतरांना त्यांच्या सांस्कृतिक, भाषिक हक्कांपासून वंचित करणे! विविधतेतील ऐक्याचे आकलन करण्याची या मंडळींमध्ये शक्तीच नाही. 'एकात्मता म्हणजे एकसाचीपणा' अशी यांची कल्पना! यांची एकात्मतेची कळकळ हा शुद्ध भोंदूपणा आहे. एकात्मतेच्या मार्गात लीगसारख्या जातीय संघटना हाच एक मोठा अडथळा आहे. ती लीग चालू ठेवून एकात्मता साधणार कशी? देशाचे तुकडे पाडण्यात ज्यांनी धन्यता मानली आणि अद्यापही ज्यांना त्याबद्दल तिळमात्र पश्चात्ताप होत नाही, त्यांनी एकात्मतेच्या गोष्टी बोलणे निरर्थक आहे. मुसलमानांना व्यापक भारतीय जीवनप्रवाहाशी समरस होता येईल, या विषयी खटपट केली पाहिजे.

प्रश्न : शासनाने चौकशी करावी, अशी त्यांची मागणी आहे.

उत्तर : चौकशी करायचीच असली, तर ती ह्या मंडळींचीच केली पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्यावर

घाला घालणारे मारेकरी हेच आहेत. घटनेने दिलेले मूलभूत हक्क स्त्रियांना मिळू नयेत म्हणून यांचीच गुंडगिरी चालते. हमीद दलवाईंवर हात टाकणारे हेच. मुस्लीम महिला परिषदेला हजर राहिल्याबद्दल मुस्लीम धर्मिनींना धमक्या देणारे हेच. अमरावतीच्या मुस्लीम युवक-युवतींना यांनीच दहशत घातली आहे. जातिबहिष्कृत करण्याच्या धमक्या हेच देत आहेत. घटनेचा अवमान करणाऱ्या या मंडळींनाच सजा ठोठावायला हवी. पण सरकार या मंडळींची फार गय करते.

प्रश्न : मग पुढे काय झाले?

उत्तर : लोकशाहीची, मानवतेची यांना किंमत नाही. 'बांग्लादेश' अस्तित्वात आला, पाक फौजांनी शरणागती पत्करली... भारतीय राष्ट्राचा हा अभिमानाचा क्षण... पण यांचे चेहरे खेटरे खाल्ल्यागत! मी पेढे वाटले. त्यांच्यापैकी एकाला अर्धा पेढा दिला, तर तो रागावून कारण विचारू लागला. मी म्हणालो, "पाकिस्तान अर्धे नष्ट झाले, अर्धा पेढा दिला; सबंध नष्ट झाले असते, तर सबंध दिला असता!" काय संतापले म्हणून सांगू! हिंदुस्थानला शांततेचा उपदेश करणाऱ्या ह्या बहाद्दरांनी बांग्लादेशात लाखोंची हत्या झाली, तेव्हा निषेधाचा शब्दही उच्चारला नाही! पाकिस्तानने काश्मीरमधील जनतेला, नागांना, मिझोंना फितवले, तेव्हा यांना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. इथे लोकशाही आहे म्हणून... जर हे पाकिस्तानात असते, तर त्यांच्या ह्या वर्तनाबद्दल त्यांना गोळ्या घालण्यात आल्या असत्या! बांग्लादेशातील परिस्थिती पाहून तरी यांची माथी ठिकाणावर येतील, अशी आशा करू या. आम्ही हे सगळे उघडपणे बोलतो, म्हणून ते आमच्यावर चिडतात, संतापतात. पण धर्माच्या नावावर आपले स्वार्थी राजकारण यांना आता फार दिवस करता येणार नाही. बांग्लादेशातील साडेसहा कोटी मुसलमानांना आता हे उमजले आहे की, लोकशाही समाजवाद व जातिधर्मातीत राष्ट्रवाद याशिवाय आधुनिक राष्ट्र उभे करता येणार नाही. भारतातल्या मुसलमानांना हे केव्हा उमजेल, ही आमची चिंता आहे. भारतीय मुसलमान आत्मघात करून घ्यायला उतावीळ झाले आहेत की काय, अशी शंका लीगवाल्यांचे वर्तन पाहिल्यावर येते. पण सर्वसामान्य मुसलमान त्यांच्यापेक्षा वेगळा आहे आणि हीच आम्हाला मोठी आशादायक गोष्ट वाटते. आपल्या वर्चस्ववादी अस्तित्वाच्या उच्चाटनाच्या भीतीने घेरले गेल्याने लीगवाल्यांचा संताप होतो आहे. त्या संतापात तेच जळून खाक होतील. अल्पसंख्य मागासलेल्यांची जातीयता त्यांचे हित साधू शकणार नाही, हे ह्या मंडळींनी आता शिकले पाहिजे. *(साधना, शनिवार, १५ जानेवारी १९७२)*

(सय्यदभाई: हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापना काळातील आधाडीचे कार्यकर्ते होते. बहिणीच्या तलाकमुळे अस्वस्थ झालेल्या सय्यदभाईंनी तहहयात याच प्रश्नावर कार्य केले. हमीद दलवाईंनंतरच्या काळात मंडळाचे नेतृत्व करणाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश होतो.)

५.१३ भारतातील मुस्लीम स्त्रिया – कमल पाध्ये

(गेल्या शतकात हिंदू स्त्रियांची जी परिस्थिती होती, तीच आज भारतातील मुस्लीम स्त्रियांची आहे. कर्मठ, सनातनी हिंदूंचा विरोध न जुमानता जोतिबा फुले, आगरकर, कर्वे, रानडे यांच्यासारखे समाजसुधारक पुढे सरसावले. त्यामुळे आज हिंदू स्त्रियांची आणि हिंदू समाजाची प्रगती झाली आहे. स्त्री-शिक्षण, समान हक्क, स्वातंत्र्य, घटस्फोट, वारसा हक्क या सर्व गोष्टी हिंदू स्त्रियांना आज मिळालेल्या आहेत. या समाजसुधारकांपासून प्रेरणा घेऊन मुस्लीम समाजातील काही सुशिक्षित तरुण या कार्यासाठी पुढे सरसावले आहेत. त्यांच्या या कार्याचा परिचय या खास लेखात करून देत आहोत. आमच्या मुस्लीम वाचकवर्गाची प्रतिक्रिया जाणून घेण्यास आम्ही अर्थातच उत्सुक आहोत.)

अगदी लहानपणी जेव्हा आम्ही मुंबईला भेंडीबाजारच्या जवळच काळबादेवी विभागात राहत होतो, तेव्हा 'मुस्लीम स्त्री' म्हणजे आम्हाला एक कुतूहलच होतं. बुरख्यातून चाललेल्या त्या स्त्रिया दिसल्या की, आम्ही त्यांच्याकडे पाहत राहात असू. 'या बायका आत कसला पोशाख करीत असतील? त्यांना गुदमरायला होत नसेल का? आणि मुंबईत सारखा सारखा येणारा तो घाम! किती उकडत असेल यांना!' मग कुणीतरी एकदा एक गोष्ट सांगितली. आगगाडीत एकदा बायकांच्या डब्यात एक बुरखेवाली स्त्री बसली होती आणि गाडीने वेग घेतल्याबरोबर तिने बुरखा बाजूला केला, तर तो हातात सुरा घेतलेला बाबा निघाला. बायकांच्या अंगावरचे दागिने त्याने सुरा दाखवून लुबाडले आणि स्टेशन येण्याच्या आत पसार झाला. तेव्हापासून मग बुरखा घेतलेली स्त्री पाहिली की वाटे, ही 'स्त्रीच असेल ना की एकादा बुवा असेल!' त्या जवळून चालू लागल्या की, भीतीच वाटू लागायची. पुढे एकदा बसमध्ये माझ्याशेजारी एक बुरखेवाली स्त्री येऊन बसली आणि तिने बुरखा बाजूला केला. टपोऱ्या डोळ्यांचा एक नितळ चेहरा पाहून मला बरं वाटलं... रेखीव नाक, बोलके डोळे आणि विशेषतः अतिशय नितळ कांती... वाटलं, 'हळूच तिच्या त्या मऊसूत हातावरून हात फिरवावा. असा सुंदर चेहरा नेहमी दडवून ठेवायला हिला आवडत असेल का? लोकांनी आपल्याकडे लक्ष द्यावं म्हणून आपण नटतो, आपल्याला शोभेसा पोशाख करतो आणि लोकांचं चित्त वेधून घेण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येक स्त्रीला हे स्वाभाविकपणे वाटत असतं आणि ही मुसलमानांची चेहरा झाकून ठेवण्याची कसली पद्धत? त्यांना हा बुरखा आवडत असेल काय? बुरख्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा कमी झालेला नाही का?'

आज याच महिला आपला सामाजिक दर्जा बदलण्यासाठी ठामपणे उभ्या राहिल्या आहेत. मरियम रिफाई, नजमा शेख, मुमताज मोमीन, नुरजहाँ अत्तार आणि शमिम अत्तार या पंचकन्या डिसेंबरच्या २७-२८ तारखेला महाराष्ट्र मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने मुस्लीम स्त्रियांची एक परिषद पुण्याला बोलवत आहेत. या पाच भगिनींना मी बघितले, तेव्हा इतक्या छोट्या तरुण मुली सर्व मुस्लीम समाजाला ढवळून काढण्यास, आपले हक्क मिळवून अन्यायाला दूर करण्यास

निघालेल्या पाहून मला फार आनंद झाला. मरियम रिफाई या पदवीधर असून मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्या आहेत. नजमा शेख वकील आहेत. मुमताज मोमीन मुंबईला एम. ए.च्या वर्गात आहेत. आणि शमिम व नुरजहाँ या अत्तार भगिनी मेडिकल कोर्सला आहेत. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यास, त्याविरुद्ध आंदोलन करण्यास या पंचकन्या कंबर बांधून उभ्या राहिल्या आहेत.

पडदा पद्धती

अर्थात मरियमना भेटल्याबरोबर मला मनातल्या मनात डाचत असलेला पहिला प्रश्न त्यांना विचारला, तो पडद्यासंबंधी. त्या मोठ्या आवेशाने म्हणाल्या, 'हा पडदा म्हणजे आमच्या गुलामगिरीचे एक चालते-बोलते चिन्ह आहे! घरात कुणी परका इसम आला की, आम्ही पडद्यातून बाहेर येऊ शकत नाही, त्याच्याशी बोलू शकत नाही. आपली मालमत्ता कुणी चोरून नेऊ नये म्हणून ती जशी कडीकुलपात बंद करून ठेवली जाते, तशी आमची स्थिती आहे. तसं पाहिलं तर कुराणात पडद्याचा उल्लेख नम्रता व अंगावर घातलेले दागिने लपवण्यासाठी आलेला आहे. नम्रतेच्या त्या काळातील कल्पना आणि आजच्या कल्पना यांत एवढा फरक झाला असताना आम्ही ती जुनाट आचार परंपरा आजही का मानावी? आजच्या जगातील मुस्लीमेतर महिला काय उद्‌घट आहेत म्हणून त्या बुरखा वापरत नाहीत? आणि बुरखा वापरल्याबरोबर काय उद्‌घट स्त्रीचा उद्‌घटपणा नाहीसा होऊन ती अगदी विनम्र बनते? विशिष्ट सामाजिक परिस्थितीत घालून दिलेले विशिष्ट नियम धर्माच्या नावाने रूढ बनवले गेले आहेत. धर्मांध लोक या रूढीला बळी पडले आहेत, आणि कुराणाच्या नावाने आम्हाला जखडू पाहत आहेत. १८७८मध्ये सर सय्यद अहमदखान यांच्यापासून स्फूर्ती घेतलेल्या मुमताझ अलींनी आपले सर्व आयुष्य हिंदुस्थानातील मुस्लीम स्त्रियांचे शिक्षण व हक्क यांच्या कैवारासाठी वेचले. सर सय्यद अहमद यांनी काढलेल्या तहजिब अल्-अखिलाक् या जर्नलची महिला पुरवणी ते तहजिब-अल्-निस्वान या नावाने काढत असत. त्यांनी आपल्या 'हक्क-इ-निस्वान' या महत्त्वाच्या ग्रंथात स्त्री-पुरुषांच्या समानतेचा पुरस्कार केला आहे. इस्लामी संस्कृतीत पुरुषाला स्त्रीपेक्षा दिलेल्या प्रबळ स्थानासंबंधीच्या रूढीप्रिय लोकांच्या मुद्द्यांचे विश्लेषण त्यांनी केले आहे. ते मुद्दे असे – १. पुरुष हा स्त्रीपेक्षा शरीराने अधिक बलवान, अधिक बुद्धिनिष्ठ, कमी भावनाप्रधान आणि वेडगळ समजुतींबर कमी विश्वास ठेवणारा आहे, म्हणून त्याला हे प्रबळ स्थान प्राप्त झाले आहे. २. द्रष्टा बनण्यासारख्या काही दैवी देणग्यांचा स्वीकार फक्त पुरुषच करू शकतो. ३. पुरुष हा परमेश्वराचा पृथ्वीवरील प्रेषित आहे आणि स्त्री ही त्याच्या सुखसोयी पाहणारी, त्याची अन्नदात्री आहे. ४. कुराणाने बहुपत्नीत्वाला परवानगी दिली आहे, बहुपतीत्वाला नाही. ५. धार्मिक पुरुषाला मुस्लीम स्वर्गात अप्सरांचे आश्वासन आहे, धार्मिक स्त्रीला तसे कसलेच आश्वासन नाही.

'या सर्व मुद्द्यांचे त्यांनी फार चांगले खंडन केले आहे. त्या काळात त्यांनी मुस्लीम स्त्रियांच्या शिक्षणाचा पुरस्कार, समान हक्क, लग्नाचा कायदा, पडदा या सर्व प्रश्नांवर स्त्रियांच्या हक्कांचा

जोरदार पुरस्कार केला आहे. पडद्यासंबंधी त्यांनी म्हटले आहे की, 'पूर्वी अरबस्तानात होत असलेल्या सामाजिक दुष्कृत्यांच्या पार्श्वभूमीवर समाजात पडदा ठीक होता. त्याचा अर्थ सर्व वेळी आणि सर्व काळी ती चाल कुराणाची आज्ञा म्हणून बंधनकारक राहू शकत नाही. हिंदुस्थानातील आजची पडदापद्धती ही पुष्कळशी अलीकडेच रूढ झालेली स्थानिक पद्धती असावी. सतराव्या शतकाच्या शेवटी औरंगजेबानेसुद्धा स्त्रियांना चेहरा व हात न झाकता समाजात वावरण्याची मुभा दिली होती.' मुमताझ अर्लीनी आपल्या मुद्द्यांच्या समर्थनार्थ हदीसच्या संग्रहातून पुरावे गोळा केले आहेत आणि असे सिद्ध केले आहे की, 'बायकांना बुरख्याची सक्ती करणे अन्यायकारक आहे आणि धार्मिक कायदा व नीतिमत्तेच्या विरुद्ध आहे. जर समाजातील गुंडांच्या बलात्कारांपासून वाचवण्याकरिता हिंदुस्थानात पडदा पद्धती आली असेल, तर त्यावर निष्पाप स्त्रियांना पडद्याची शिक्षा हे उत्तर नसून समाजकंटकांच्या गुंडगिरीला शिक्षा हे आहे.'

मरियम पुढे म्हणाल्या, '१८७८मध्ये अशा प्रकारचे विचार मुमताझ अर्लीनी मांडले आहेत, पण आमची पडदापद्धती अजूनही तशीच चालू आहे. यावरून काळाच्या मानाने आम्ही फार मागासलेल्या आहोत एवढेच दिसून येते.'

मला एकदम आठवण झाली, कराची युनिव्हर्सिटीत लावलेल्या एका फोटोची हकिकत पार्ध्येनी मला सांगितली होती. ते कराची युनिव्हर्सिटीत गेले होते. तेथे लावलेल्या फोटोत स्त्रिया नव्हत्याच... आणि एका फोटोत असलेली स्त्री बुरखा घेऊन बसलेली होती. ते दृश्य जितकं विनोदी तितकंच करुणही होतं.

मुस्लीम सामाजिक पद्धती

मरियमचं बोलणं संपलं होतं, पण तोच धागा पुढे पकडून नजमा शेख म्हणाल्या, 'आणि आमची विवाहपद्धती आणि मुस्लीम सामाजिक कायदा या कायद्यांतील अन्याय्य तरतुदी यांमुळे अनेक प्रश्न प्रामुख्याने निर्माण झाले आहेत. या कायद्यानुसार मुस्लीम पती आपल्या पत्नीला कोणतेही कारण न देता घटस्फोट देऊ शकतो. इतकंच नव्हे, तर 'पतीने पत्नीला तिऱ्हाईत माणसाकरवी 'मी तुला घटस्फोट दिला आहे' असा जरी निरोप पाठवला, तरी हा घटस्फोट समजण्यात यावा' असं कायद्यात कलम आहे. त्याचबरोबर पुरुष एकाच वेळी चार लग्नं करू शकतो. घटस्फोट देताना पत्नीला पोटगीची सक्ती तर करता येत नाहीच, पण मुलांच्या संगोपनाचीही त्याच्यावर जबाबदारी नसते. पोटगीचा हक्क फक्त तीन महिने असतो, आणि सर्वांत दुर्दैव म्हणजे, लहान मुलं सतरा वर्षांची झाली, मिळवती झाली की, त्यांचा ताबा पती घेऊ शकतो. ही आमची दुर्दशा, विटंबना आणि मानव्याची मानहानी आमच्या स्त्रिया आजपर्यंत भोगत आल्या आहेत. कायद्याच्या नावाखाली आमच्या स्त्रियांनी अपार दुःख सहन केलं आहे आणि करत आहेत. मनात आल्याबरोबर पुरुष स्त्रियांना टाकून देतात, अनेक लग्नं करतात... मुलांची जबाबदारी त्यांच्यावर नसतेच... केव्हाही तलाक देतात. स्त्रिया अशिक्षित असल्यामुळे, 'आम्हावर हा अन्याय का?' असा प्रश्न विचारू शकत नाहीत. 'धर्मानेच आपल्याला असे स्थान

दिले आहें अशी त्यांची समजूत आहे.

'इबादत' आणि 'आदत'

'खरं म्हणजे धर्माची दोन अंगं असतात. एक 'इबादत'चा (उपासना) धर्म आणि दुसरा 'आदत'चा (रीतिरिवाज) धर्म. मुसलमानांच्या दृष्टीने नमाज, रोजा, हजची यात्रा, जकात... या आणि इतर काही गोष्टी 'इबादत'च्या धर्मात मोडतात, आणि 'इबादत'चा धर्म प्रत्येकाला पाळता आला पाहिजे. केवळ मुसलमानांनाच नव्हे, तर सर्वच नागरिकांना त्यांच्या धर्माप्रमाणे उपासना – 'इबादत' करता आली पाहिजे, परंतु त्याचबरोबर धर्मसि 'आदत'चे म्हणजे सामाजिक अंगाचे स्वरूप नेहमी बदलत असतं. जगातल्या प्रत्येक धर्माबाबत ते बदलत असतं, तसं ते इस्लामचंदेखील बदललं आहे. आणि म्हणून आमच्या मुस्लीम बंधूनी हे समजून घेतलं पाहिजे की, समाजाच्या बदलांचा आग्रह धरणं हे धर्मात हस्तक्षेप करणं होत नाही. मुस्लीम सामाजिक कायदा बदलण्याच्या विरुद्ध मुस्लीम सनातनी सतत प्रचार करत असतात आणि 'हा धर्मात हस्तक्षेप आहे' असं म्हणत असतात, परंतु वस्तुस्थिती मी आत्ताच सांगितल्याप्रमाणे आहे. सामाजिक कायदा आणि 'इबादत'चा धर्म या दोन वेगळ्या बाबी आहेत, आणि जगातल्या सर्वच मुस्लीम देशांत सामाजिक कायदे बदलले आहेत. तुर्कस्तानात १९२८ला पाश्चात्त्य धर्तीचा सामाजिक कायदा अस्तित्वात आला. ट्यूनीशिया , इजिप्त, लेबेनॉन, इराण या देशांत नवे कायदे अस्तित्वात आले असून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान अधिकार देण्यात आले आहेत. इतकंच नव्हे, तर केनियासारख्या मुस्लीम अल्पसंख्य असलेल्या देशातदेखील मुस्लीम कायद्यात बदल करण्यात आला आहे. आपल्या स्त्रियांना आपण गुलामीमध्ये ठेवलं तर, त्यांच्यावर अन्याय केला, तर मुस्लीम समाज मागासलेला राहतो, मागे पडतो, हे तिथल्या मुस्लीम नेत्यांनी ओळखलं आहे. 'इस्लाममध्ये हस्तक्षेप झाला' असं या देशांत जर कोणी मानलं नाही, तर येथे हिंदुस्थानात अशी ओरड केली जाणे हास्यास्पद नाही का?'

हिंदू स्त्रियांच्या हक्कांचा विचार केला, तर काय दिसतं? गेल्याच शतकात हिंदू स्त्रियांना तरी काय हक्क मिळाले होते? 'स्त्रियांनी फक्त चूल आणि मूल पाहावं', 'तिला शिक्षणाची गरज काय आहे?', 'ती एक उपभोग्य वस्तू आहे', 'तिला कसलाच हक्क नाही', 'लहानपणी बाप, तरुणपणी नवरा आणि वृद्धावस्थेत मुलगा सांगेल तसं राहावं'... पुरुषाला एकाच वेळी अनेक बायका करण्याची मुभा, तर स्त्रीला पुनर्विवाहाला बंदी... नवरा मेल्यास इस्टेटीची भागीदार ती होऊ शकत नव्हती. हिंदू धर्म आणि वैदिक संस्कृती यांच्या नावाखाली तिलाही अशाच प्रकारच्या जिण्यातून जावे लागले होते. ब्रिटिश लोक हिंदुस्थानात आले. त्यांच्या आचार-विचारांचा, विज्ञानाचा, वाङ्मयाचा अभ्यास हिंदुस्थानातील लोक करू लागले, अनेक नवविचारांचे विचारवंत उदयाला आले आणि त्यांनी हे विचार आचरणात आणण्याचे प्रयत्न सुरू केले. जोतिबा फुले, आगरकर, रानडे, कर्वे यांच्यासारखे अनेक समाजसुधारक पुढे सरसावले. कर्मठ, सनातनी हिंदूंचा विरोध त्यांनाही काही कमी नव्हता, पण या सर्वांतून आज हिंदू स्त्रियांची आणि हिंदू समाजाची प्रगती झाली आहे. स्त्री-शिक्षण, स्त्रियांना समान हक्क, स्वातंत्र्य, घटस्फोट, वारसा

हक्क, सर्वच गोष्टी हिंदू स्त्रियांना मिळालेल्या आहेत. मग सर सय्यद अहमदखान, मुमताज अली यांच्या-सारख्या प्रगत विचारांचे लोक गेल्या शतकात मुस्लीम समाजात निघूनसुद्धा मुस्लीम समाज व मुस्लीम प्रश्न अजून आहेत तिथेच का?

आधुनिक दृष्टीमागील तात्त्विक बैठक

'या आधुनिक दृष्टीने विचार करणाऱ्या मुस्लीम विचारवंतांची या प्रश्नाकडे पाहण्याची दृष्टीच निराळी होती. प्रथम ही गोष्ट कबूल केली पाहिजे की, मुस्लीम समाजात व हिंदू समाजात महत्त्वाचा फरक असा होता की, मुस्लीम समाजात मध्यमवर्गच नव्हता. त्यांचे फक्त दोनच वर्ग होते – अमीर-उमराव जमीनदारांचा वरिष्ठवर्ग व गरीब, दरिद्री लोकांचा कनिष्ठ वर्ग. सुखासीन वरिष्ठ वर्गाला समाजासुधारणेची कधी गरज भासली नाही आणि कनिष्ठ वर्गाची दाद कधी कुणी घेतली नाही. दुसरं असं की, सर सय्यद अहमदखान यांना असं आढळून आलं की, ब्रिटिश आमदानी सुरू झाल्यावर हिंदू लोकांनी भराभर पाश्चात्त्य शिक्षण घेतलं आणि त्यांनी मोठमोठ्या हुद्द्याच्या नोकऱ्या मिळवल्या. मुस्लीम समाज अशिक्षित राहिल्यामुळे स्पर्धेमध्ये मागे पडला होता. तेव्हा त्यांनी मुसलमानांना आदेश दिला की, त्यांनी ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहावं व शिक्षण घ्यावं. सर सय्यद अहमदखान किंवा मुमताज अली अशा विचारवंतांच्या लेखी 'स्त्रियांची सुधारणा' हा दुय्यम महत्त्वाचा प्रश्न होता. मुमताज अलींनी स्त्रियांच्या प्रश्नांचा हात घातला, परंतु या दोन्ही विचारवंतांच्या विचारांत समाज सुधारण्याची तात्त्विक बैठक नव्हती. 'शिक्षण हे नोकऱ्यांसाठी उपयुक्त होतं म्हणून ते घेतले पाहिजे' अशी सर सय्यद व इतर मुस्लीम नेत्यांची धारणा होती. हिंदू विचारवंतांची दृष्टी प्रथम समाजसुधारकाची होती – 'शिक्षण पाहिजे, ते समाजाच्या आणि राष्ट्राच्या सुधारणेसाठी. स्त्रियांनाही शिक्षण दिलं पाहिजे, हक्क दिले पाहिजेत, स्वातंत्र्य व समानता दिली पाहिजे, ते समाजाची सर्वांगीण उन्नती झाली पाहिजे म्हणून.' बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' नावाचं पहिलं पत्र १८३२ साली सुरू केलं. त्याचा उद्देश त्यांनी असा सांगितला होता, 'ज्या ज्ञानामुळे (विज्ञान) पाश्चात्त्यांची प्रगती झाली आणि जे ज्ञान न मिळवल्यामुळे आमची अधोगती झाली, ते ज्ञान मिळवण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.' त्या ज्ञानाच्या प्रसारासाठीच त्यांनी 'दर्पण' पत्र काढलं. लोकहितवादींनी आपल्या सडेतोड, रांगड्या भाषेत हेच सांगितले होतं की, 'रूढीस येकीकडे ठेवून शास्त्राप्रमाणे (विज्ञान) वागावे.' आगरकरांनी समाजसुधारणेचं तत्त्वज्ञान प्रसृत केलं. जोतिबा फुले यांनी समाजसुधारणा प्रत्यक्ष अमलात आणण्याचे प्रयत्न केले. अशा अनेक समाजसुधारकांनी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीवर भर दिला होता. ही तात्त्विक बैठक आधुनिक मुस्लीम विचारवंतांची नसल्यामुळे त्यांनी मांडलेले विचार तिथल्या तिथच राहिले आणि मुस्लीम समाज तसाच मागासलेला राहिला.

हमीद दलवाई

ह्या न्यूनतेवर हमीद दलवाईंनी अचूक बोट ठेवलं. 'मुस्लीम समाजाची उन्नती झाली पाहिजे आणि ती सर्वांगीण झाली पाहिजे' यासाठी ते धडपड करीत आहेत. दलवाई हे मूळचे कोकणचे.

'इंधन' नावाची त्यांची एक दर्जेदार कादंबरीही प्रसिद्ध झाली आहे, पण त्यांनी आज या कार्याला वाहून घेतलं आहे. मुस्लीम समाजाच्या सुधारणेला ज्या ज्या गोष्टी मारक आहेत, त्या त्या बदलण्याचा त्यांनी चंग बांधलेला आहे. मग त्यात आलेला कुठलाही अडथळा प्राण पणाला लावूनही दूर करण्याचा त्यांचा निर्धार आहे. त्यांना 'आदत'चं स्वरूप बदलावयाचं आहे. आणि म्हणून आपल्या मुस्लीम बंधू-भगिनी सुशिक्षित झाल्याचं त्यांना पाहावयाचं आहे. आधुनिक जगात मुसलमानांना मागासलेले ठेवणाऱ्या सर्व जुनाट रूढी आणि चालीरीती मोडावयाच्या आहेत. हेसुद्धा मुस्लीम जनतेला विचार करावयास लावून, त्यांना पटवून देऊन घडवून आणावयाचं आहे. हिंदी मुसलमानांत हे कार्य करावयाचं असेल, तर इथल्या मुसलमानांना 'आपण भारताचेच एक घटक आहोत आणि भारताची सुखदुःखं, संकटं आणि प्रश्न म्हणजे भारतातल्या मुसलमानांचीही सुखदुःखं, संकटं व प्रश्न आहेत' याची जाणीव झाली पाहिजे, ही दलवाईंची तळमळ आहे. त्यासाठी ते झटत आहेत. म्हणूनच ते इंडियन सेक्युलर सोसायटीचे पूर्ण वेळ कार्यकर्ते म्हणून काम करत आहेत. भारतातल्या धर्मनिरपेक्ष चळवळीला बळकटी आणणं, तिचे फायदे जनतेला समजावून सांगणं आनि सर्वच जाती-जमातींच्या जातीयवादाविरुद्ध जनमत संघटित करणं हे इंडियन सेक्युलर सोसायटीचं उद्दिष्ट आहे. सोसायटीच्या कार्यक्रमात मुस्लीम समाजाच्या परिवर्तनावर भर दिला गेला आहे.

पुण्यात भरणारी मुस्लीम महिलांची परिषद 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' आणि 'इंडियन सेक्युलर सोसायटी' या दोन्ही संस्थांच्या वतीने भरत आहे. 'समाज प्रबोधनाच्या आपल्या कार्याचं हिंदुत्ववाद्यांकडून स्वागतही होईल आणि विरोधही होईल' याची जाणीव दलवाईंना आहे. 'हिंदुत्ववाद्यांमध्ये जे लोक 'मुसलमान हा निसर्गतःच (बायोलॉजिकली) वाईट आहे' असे मानतात, त्यांचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करण्याच्या भरीस पडू नये' असे ते म्हणतात. 'परंतु परिस्थितीमुळे मुसलमान समाजाची एक प्रतिगामी व सनातनी प्रतिमा तयार झाली आहे, त्याला विरोध करणारे हिंदुत्वनिष्ठ आपल्याला सहकार्यच देतील' याबद्दल त्यांना खात्री आहे. 'परंतु मुस्लीम समाज हा मागासलेला समाज आहे, म्हणून त्यांची जातीयता टिकवून धरणाऱ्या 'पुरोगामी' हिंदूंपासूनही सावध राहा' असा त्यांचा इशारा आहे.

या सर्व दृष्टीकोनांची पुरेपूर जाणीव ठेवून मुल्लामौलवींच्या अनेक शतकांच्या कर्मठ, जुनाट विचारांच्या दबावाखाली दडपलेल्या, मागासलेल्या समाजावर आघात करण्यासाठी, त्याला ढवळून काढण्यासाठी हमीदभाई आज उभे ठाकले आहेत.

सय्यदभाई

हमीद दलवाईंनी हे कार्य सुरू केल्यानंतर अर्थातच मुस्लीम समाजाला हादरे बसू लागले... मुस्लीम तरुणांत खळबळ माजू लागली. एक दिवस एक उर्दू चौथी यत्ता शिकलेला तरुण दलवाईंकडे आला. म्हणाला, 'तुमच्याशिवाय मला आज त्राता दिसत नाही, म्हणून तुमच्याकडे आलो आहे. माझ्या दोन बहिणी. एकीचे लग्न होऊन चौदा वर्षे संसार झाल्यानंतर तिच्या नवऱ्याने तिला तलाक दिला. तिला दोन बच्चे आहेत. दुसऱ्या बहिणीचे लग्न होऊन तीन वर्षे झाली

आहेत. तिला तीन बच्चे आहेत. तिलाही आता तलाक दिला गेला आहे. त्यांनी आता काय करावे? त्यांची चिंता मला रात्रंदिवस जाळीत आहे. त्यांच्या बाबबीत काही करता येणार नाही का?'

दलवाई म्हणाले, 'आपला सामाजिक कायदा असा आहे की, त्याच्या आधाराने आपण आत्ता काहीच करू शकणार नाही. पण हा कायदा असाच राहिला, तर आपल्या अशा अनेक बहिणी अशीच दुःखे भोगत राहतील. तुमच्या बहिर्णींसाठी आज तुम्ही काही करू शकला नाहीत, तरी हा कायदा बदलला, तर अशा अनेक भगिनी तुम्हाला दुवा देतील. आपण एक संघटना उभारू. मुस्लीम स्त्रियांना समान हक्क मिळावेत, म्हणून आंदोलन करू; समान नागरी संहिता – कॉमन सिव्हील कोड – असावी म्हणून सर्व धर्मनिरपेक्ष संघटनांबरोबर चळवळ उभारू आणि धर्मातील चिरंतन मूल्ये आणि कालबाह्य परंपरा यांत फरक करण्याची विचारसरणी आपल्या मुस्लीम बांधवांत बिंबवू. यासाठी आजपासून कामाला लागा. पण लक्षात ठेवा, हे काम फार कठीण आहे... समाजाला बदलावयाचे आहे... तुम्हाला फार कडवा विरोध होईल... कर्मठ सनातनी मौलवी तुमच्याविरुद्ध उभे राहतील... लोकांना विचार करावयास लावण्याऐवजी त्यांच्या अंधश्रद्धेला आवाहन करतील... पाहा, आहात तुम्ही तयार?' त्या तरुणाने हे कार्य हाती घेण्याची प्रतिज्ञा केली. हा तरुण म्हणजेच आजचे सय्यदभाई – मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे चिटणीस.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ

पुण्यातले मुस्लीम तरुण हळूहळू त्यांच्याभोवती जमू लागले. मकबूल तांबोळी, अमीर शेख, सय्यद मुनीर असे दहा-बारा तरुण एकत्र येऊन चर्चा करू लागले... जागेचीसुद्धा पंचाईत आली, पण भाई वैद्यांनी ती सोडवली. त्यांच्या घरी या तरुणांच्या बैठका भरू लागल्या... विचारांची देवाणघेवाण सुरू झाली... वैद्यांनाही मुस्लीम समाजाचा विरोध होऊ लागला... 'इलेक्शनमें देखेंगे' अशा धमक्या सुरू झाल्या. पण त्याची पर्वा त्यांनी केली नाही. या मंथनातून दहा निष्ठावंत कार्यकर्ते तयार झाले... चर्चा वाढू लागल्या. दलवाई म्हणाले, 'तुम्ही तळमळीचे निष्ठावान कार्यकर्ते आहात. पुरोगामी विचारांची संघटना उभी करा. मला बरोबर घ्या किंवा घेऊ नका, पण हे काम झाले पाहिजे. मी फार आशावादी आहे, आणि हे कार्य तडीस जाईल, असा मला विश्वास आहे.' शेवटची बैठक फेब्रुवारी १९७०मध्ये झाली. त्यात इंडियन सेक्युलर सोसायटीचे अध्यक्ष अ. भि. शहा, बाबा आढाव वगैरे मंडळीही होती.

पाच कार्यकर्ते असले, तरीही संघटना स्थापण्याचा निर्णय घेण्यात आला. 'मंडळाला नाव काय द्यावं?' हा प्रश्न उपस्थित झाला.

सत्यशोधक मंडळ नाव का?

आपल्या समाज प्रबोधनाचा पाया घालताना या मुस्लीम तरुणांपुढे साहजिकच हिंदूंच्या समाज प्रबोधनाचं चित्र उभं राहिलं. तसंच भारतातली हिंदू आणि मुसलमान समाजांमधली प्रबोधनाची

दरी भरून काढल्याशिवाय या दोन समाजांमधले संबंधही सुधारले नसते, याची त्यांना जाणीव झाली. महाराष्ट्रातल्या बहुजन समाजात जागृती घडवून आणण्याचं कार्य गेल्या शतकात जोतिबा फुले यांनी सुरू केलं होतं. त्या कार्यासाठी त्यांनी अपार कष्ट आणि छळ सोसला होता. आपल्या या कार्यासाठी त्यांनी 'सत्यशोधक समाज' स्थापन केला होता. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात 'सत्यशोधक' शब्दाला म्हणूनच एक विशिष्ट अर्थ आहे. त्यामागे सामाजिक सुधारणांच्या प्रखर आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन मंडळाला 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' असं नाव सुचवलं गेलं आणि सर्वांनाच ते पसंत पडलं. २२ मार्च १९७० रोजी आंतरभारतीच्या सभागृहात मंडळाची रीतसर स्थापना झाली. या सभेचं अध्यक्षस्थान हमीद दलवाईंनी स्वीकारलं होतं. सभेला अडीचशे स्त्री-पुरुष उपस्थित होते. त्यांत शंभर मुस्लीम बांधव आणि पंचवीस मुस्लीम स्त्रिया होत्या. तसंच पुण्यातल्या सर्व राजकीय पक्षांचे नेतेही हजर होते. मंडळाचं उद्घाटन एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या यास्मिन लुक्मानी या प्राध्यापिकेने केलं. विशेष म्हणजे, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, कऱ्हाड, श्रीगोंदा, निपाणी, जुन्नर, औरंगाबाद वगैरे ठिकाणांहूनही मुस्लीम प्रतिसाद चांगला मिळाला. ए. जे. शेख यांच्या अध्यक्षतेखाली एक तात्पुरती कमिटी स्थापन झाली आणि सय्यदभाई आणि मकबूल तांबोळी तिचे चिटणीस झाले.

मरियम रिफाई

मंडळ स्थापन झालं; त्याचं प्रचारकार्य सुरू झालं, पण मंडळाला स्त्री-कार्यकर्ती असल्याशिवाय घराघरांतून आणि स्त्रियांमधून हे कार्य कसं होणार, याची चिंता सुरू झाली, आणि मरियम रिफाई दलवाईंच्या डोळ्यांसमोर आल्या. मरियम रिफाई बी. ए. पर्यंत शिकलेल्या आणि हमीद दलवाईंच्या मंडळाच्या कार्याबद्दल आस्था बाळगणाऱ्या होत्या, पण मरियमच्या अब्बाजानांच्या परवानगीशिवाय त्या कार्य सुरू करू शकल्या नसत्या. ९ ऑगस्ट १९७० रोजी मरीयमचे अब्बाजान आणि दलवाईंची बैठक ठरली. मरियमच्या आई आजारी होत्या. शिवाय 'अशी बैठक घेतली, तर मोर्चा आणू' अशी धमकी मुस्लीम बंधूंनी दिलेली होती! तरीही बैठक झाली, पण ती जवळच राहत असलेल्या डॉक्टर आणि आबाबेन देशपांडेंच्या घरी झाली. अब्बाजान, त्यांचे तीन-चार दोस्त, मरियम आणि दलवाई.... समान नागरिक संहिता, घटस्फोट, कुटुंब नियोजन, बारसा हक्क, एकपत्नीत्व वगैरे अनेक विषयांवर चर्चा झाली. अब्बाजानचा मरियमना काम करू देण्यास विरोध नव्हता, पण दोस्त गडबडले... काळी निशाणं, निदर्शनं त्यांना डोळ्यांसमोर दिसू लागली... पिताजी गोंधळले, पण मदतीला त्यांची पत्नी म्हणजेच मरियमच्या आई धावून आल्या. त्या मरियमना म्हणाल्या, 'न तुम किसिका सुनो. दलवाई साबके विचारोंसे हम सहमत है, तुम काम करनेको हां कह दो.' मरियमच्या पिताजींची इच्छा त्यांच्या पत्नीने अशी उचलून धरली आणि आपल्या पतीला नैतिक सामर्थ्य दिलं. 'आमची मुलगी तुमचे काम करील' असे सांगणारे मुस्लीम गृहस्थ इतके दुर्मीळ आहेत की, मंडळाला या पिताजींचा सदैव अभिमान वाटत आला आहे.

कौम के गद्दार चले जाव

मंडळाचं प्रचारकार्य सुरू झालं आणि सनातनी मुसलमानांचा त्याला विरोधही सुरू झाला. दीड-दोन महिन्यांनंतर पुण्यातल्या मोमिनपुऱ्यामध्ये एका रविवारी हमीद दलवाईंसह कार्यकर्ते प्रचारासाठी चालले असताना समोरून सुमारे दीडशे-दोनशे लोकांचा जमाव काठ्यांना काळे झेंडे बांधून आला. 'कौम के गद्दार चले जाव! हमीद दलवाई नाम बदलो, सत्यशोधक वापस जाव!' अशा घोषणा देत तो पुढे आला आणि गोंधळात संधी साधून एकाने गद्दार म्हणून दलवाईंच्या डोक्यावर लाठीहल्ला केला. दलवाईंनी डोकं बाजूला केल्यामुळे मार खांद्याला लागला. या जमावात अहमदखान हे नगरपितेही (नगरसेवकही) होते. खांद्यावर तडाखा बसताच दलवाई परत फिरले. या हल्ल्यामुळे हिंदू तरुणांतही खळबळ माजली, परंतु दलवाईंनी त्यांना शांत केलं. या हल्ल्याबद्दलची आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना ते म्हणाले, 'आम्ही गांधीजींचा मार्ग पत्करला आहे; जिनावाद्यांपुढे नमणार नाही. आमचे कार्य चालूच राहणार आहे.' अलीगढला तर त्यांना ठार मारण्याचा कट झाला होता, पण दलवाई आपली अभंग निष्ठा आणि आशा घेऊन अजूनही तसंच कार्य करत आहेत.

पहिले अधिवेशन

यानंतर मात्र मंडळ भराभरा वाढलं आणि मंडळाचं पहिलं अधिवेशन ता. २८ नोव्हेंबर १९७० रोजी पुणे इथे इंडियन सेक्युलर सोसायटी आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळा यांच्या वतीने झालं. त्यात महाराष्ट्र कमिटी स्थापन झाली आणि गोंद्याचे काँग्रेस कार्यकर्ते बाबुमियाँ बँडवाले एकमताने अध्यक्ष म्हणून निवडले गेले आणि सय्यदभाई चिटणीस झाले.

२१ मार्च १९७१ रोजी मंडळाचा सालगिरा झाला, आणि स्वतंत्र बांग्लादेशाची मागणी करण्यात आली. डिसेंबर चार-पाचला मंडळाची परिषद दिल्लीमध्ये झाली आणि आता २७-२८ डिसेंबरच्या मुस्लीम महिला परिषदेची तयारी जोरात सुरू झाली आहे.

प्रचारकार्य

मरियम रिफाई आणि नजमा शेख या कार्यकर्त्या मुस्लीमेतर महिला मंडळांत जाऊन त्या मंडळांतल्या स्त्रियांना आपली भूमिका समजावून सांगत आहेत.

पुण्यातल्या संयुक्त स्त्री संस्थेने तर त्यांच्या प्रतिनिधी, संयुक्त स्त्री संस्थेतली सर्व प्रातिनिधिक महिला मंडळं आणि सहकार्य देऊ इच्छिणाऱ्या इतर संस्था यांचं एकत्र चहापान (गेट टूगेदर) करण्याचं ठरवलं आहे. २८ डिसेंबरपासून अखिल भारतीय महिला परिषदेचं अधिवेशन पुण्यात होणार होतं. तिच्या पुणे शाखेनेही सहकार्य देण्याचं कबूल केलं होतं, पण हे अधिवेशन पुढे ढकलण्यात आलं आहे. मुंबईत भरलेल्या समाजवादी महिला मंडळाने एकमताने ठराव करून या परिषदेचं स्वागत केलं आहे. शिवाय समाजवादी महिला मंडळाच्या आबाबेन देशपांडे, अनुताई लिमये या इतर मुस्लीम भगिनींना सतत सहकार्य देत आहेत. मालिनीबाई तुळपुळे, कमल भागवत

याही स्त्रियांनी सहकार्याचा हात पुढे केला आहे. पण मुस्लीम स्त्रियांच्या अधिकाधिक सहकार्याची या परिषदेला खरी गरज आहे. म्हणून मी नजमा व मरियमना म्हटलं, 'तुम्हाला मुस्लीमेतर स्त्रियांचा पाठिंबा जरूर मिळेल. 'आपल्या भगिनी मागासलेल्या राहाव्यात' असं त्यांना वाटणार नाही. पण मुस्लीम स्त्रियांचा पाठिंबा, त्यांचा प्रतिसाद तुम्हाला कसा काय मिळतो आहे?'

मुस्लीम समाजाची प्रतिक्रिया

त्या म्हणाल्या, 'परिषद घ्यायची ठरली आणि आम्ही मुस्लीम वस्तीत प्रचार सुरू केला. तसं उठून कुणाच्याही घरी जावं, चर्चा कराव्या, बायकांना पटवून द्यावं अशी आमच्या समाजाची परिस्थिती नाही. पण ज्या स्त्रिया आम्हाला भेटल्या, त्यांना फारसं समजावून सांगावं लागलं नाही. आम्ही जे म्हणत होतो, आम्ही जे सांगत होतो, ते त्यांना एकदम पटत होते. नाहीतरी प्रत्येक स्त्रीची भावनाच आमच्या मुखावाटे बोलत होती. घटस्फोटाबद्दल बोलू लागलो, तर त्या आपले अनुभव सांगू लागल्या... सात-सात मुले पदरी असलेल्या तलाक दिलेल्या स्त्रिया, अधिक हुंडा आणलेल्या मुलीशी लग्न करायचं असल्यामुळे घटस्फोट मिळालेल्या स्त्रिया... पोटगी नाही, वारसा हक्क नाही, शिक्षण नाही... त्यामुळे धुणीभांडी करून मुलांना पोसणाऱ्या स्त्रिया, अशा अनेक दुःखी कहाण्या बोलू लागल्या. पण प्रश्न होता, पुरुषांना पटवून देण्याचा. हे करत असताना अनेक बरेवाईट अनुभव आले. एके ठिकाणी एक गृहस्थ म्हणाले की, 'इस्लाम धर्म १४०० वर्षांपूर्वीच पुरा झाला आहे. समानतेचे हक्क आधीच त्याने तुम्हाला दिले आहेत. आता तुम्ही आणखी काय बदल करणार?' दुसरे एक गृहस्थ म्हणाले, 'तुम्ही काय साधुसंत आहात तर धर्मात हस्तक्षेप करता?' एके ठिकाणी तर आम्हाला असं सांगण्यात आलं की, 'तुम्ही मुसलमान कशाला झालात? हिंदू धर्मामध्ये जा.' एके ठिकाणी आम्हाला सांगण्यात आलं की, 'घटस्फोटाबाबत तुम्ही मुस्लीम सामाजिक कायदा बदलू इच्छिता, हे बरोबर नाही. फार तर तुम्ही मेहरची (स्त्री धन) रक्कम वाढवून घ्या.' कुटुंब नियोजनाबद्दल हे मुस्लीम बंधू म्हणाले की, 'हिंदूंचं मनुष्यबळ वाढावं आणि मुसलमानांचं कमी व्हावं, असा हिंदूंचा विचार आहे. म्हणून हे कुटुंब नियोजन आणलेलं आहे.' या लोकांना आपल्या आर्थिक परिस्थितीची जाणीव नाही, आणि ती सुधारण्याची त्यांची इच्छाही नाही. काही ठिकाणी दलवाईंचं नाव काढताच शिव्यांची लाखोली सुरू झाली. आम्ही काय कामासाठी गेलो होतो, याचीही दखल न घेता 'शैतान, बेवकूफ फूलीश' वगैरे विशेषणं दलवाईंना लावून आणि राजकारणाकडे गाडी फिरवून आमचं बोलणंच ते खुंटवून टाकत होते. मुस्लिमांचं आधुनिकीकरण, पडद्यावरची टीका, स्त्रीशिक्षण वगैरे संबंधीच्या दलवाईंच्या मतांना विकृत स्वरूप देऊन ते विचारू लागले 'आप क्या करना चाहते हैं? मुस्लीम लडकीयों को कॅबेरा डान्सर बनाना चाहते हैं क्या?' असे अनेक प्रश्न आम्हाला विचारण्यात येतात. अशा अनेक प्रश्नांनी आमची मनं जशी निरुत्साही केली आहेत, तसंच अनेक बंधूंनी आम्हाला सहकार्य देऊन उत्तेजनही दिलं आहे.' मरीयम म्हणाल्या, 'मी एक शिवणक्लास चालवते. त्यात पडदे वापरणाऱ्या सुमारे तीस अशिक्षित स्त्रिया आहेत. त्यांना सर्व गोष्टी पटतात, पण शेवटी 'हमारे किस्मत में ऐसा है तो ऐसाही रहना पडेगा!' असा त्या नशिबाचा हवाला देतात.

अनेक मुलींची मंडळात येण्याची इच्छा आहे, पण कुणाच्या भावाने, तर कुणाच्या वडलांनी बंदी केली आहे, पण तरीही परिषदेसाठी शंभर स्त्रिया आणण्याची जिद्द आम्ही धरली आहे. पुष्कळ वेळा लोकांच्या विपरीत, विषारी, विकृत बोलण्याने आमची मनं दुखावली गेली आहेत. आमचा काम करण्याचा उत्साहही कधी कधी मंद झाला आहे. हे काम किती कठीण आणि खडतर आहे, हे यातून जाणवलं आहे. पण जसजसे अनुभव येत आहेत, तसतशी आमची जिद्द वाढते आहे. 'हे कार्य केलंच पाहिजे' ही भावना वाढत चालली आहे. हिंदुस्थानच्या मुस्लीम इतिहासात सामाजिक सुधारणांकरता स्त्रियांनी आयोजिलेली ही पहिलीच परिषद आहे. आज तिचा आवाज लहान आहे. गेली काही वर्षं तुरळक मुस्लीम भगिनी हा आवाज उठवू लागल्या आहेत. मुंबईमध्ये १९६६च्या एप्रिलमध्ये सात मुस्लीम भगिनींनी महाराष्ट्र विधानसभेवर मोर्चा नेऊन महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती आणि समान नागरी विधेयकाची मागणी केली होती. हा छोटा मोर्चा ही मुस्लीम भगिनींच्या न्याय्य हक्कांच्या चळवळीची नांदी आहे. सत्यशोधक मंडळ स्थापन झाल्यावर त्याने समान नागरी संहितेच्या पत्रकावर शेकडो मुस्लीम भगिनींच्या सह्या मिळवण्याचा उपक्रम केला आहे. अशा प्रकारच्या छोट्या प्रयत्नांना संघटित स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य मुस्लीम महिला परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद महाराष्ट्रापुरती मर्यादित असली, तरी इतर राज्यांमधल्या मुस्लीम भगिनींनाही तिच्यात भाग घेता येईल. या परिषदेतून अखेरीला अखिल भारतीय स्वरूपाची महिलांची संघटना उभी राहील, असा आमचा विश्वास आहे. आज हा आवाज लहान असला, तरी तो लवकरच दशदिशा भरून टाकेल, अशी आमची उमेद आहे.'

सत्यशोधक मंडळाने वेळोवेळी केलेले कार्य व मागण्या –

१. सर्वांना समान नागरी संहिता असावी, यासाठी जनमत संघटित करणे.
२. महाराष्ट्रांतील मुस्लिमांना मराठीतून वा मातृभाषेतूनच शिक्षण मिळावे.
३. राजकीय क्षेत्रापासून मंडळाने अलिप्त राहावे.
४. तलाक पद्धती रद्द करण्याची मागणी.
५. धर्मादाय देणग्यांच्या व्यवस्थापनासाठी असलेल्या समितीवर इतर धर्माचे लोक घ्यावेत.
६. रस्ते रुंद करण्याच्या व शहर नियोजनाच्या योजनांच्या आड येणारे मूर्ती, देवळे, मशिदी, थडगी, कबरी, चर्च, समाधी यांचे अडथळे राहू देऊ नयेत.
७. पंथ व धर्म यांच्या अभिनिवेशापासून पाठ्यपुस्तके मुक्त असावीत.
८. हमीद दलवाई व त्यांच्या सहकाऱ्यांवर केलेल्या हल्ल्याचा आणि रायपूरला आचार्य तुलसी यांच्याविरुद्ध हिंदू सनातनान्यांनी चालवलेले आंदोलन यांचा निषेध.
९. भारताच्या फाळणीला आणि पाठोपाठ झालेल्या भीषण जातीय दंगलीला कारणीभूत झालेल्या मुस्लीम लीगच्या पुनरुज्जीवनाबाबत तीव्र चिंता.
१०. भारतीय विमान पळवल्याचे प्रकरणी काश्मीरमधील देशद्रोही पाकिस्तानी हस्तकांना संरक्षण दिल्याबद्दल पाकिस्तानचा तीव्र शब्दांत निषेध व इंदिरा सरकारला पडखाऊ धोरण सोडून

देण्याची विनंती.

११. इतर धर्मनिरपेक्ष संस्था आणि आंदोलने यांच्याशी सहकार्य.

१२. पूर्व पाकिस्तानच्या धर्मनिरपेक्ष चळवळीला पाठिंबा व बांग्लादेशाला मान्यता.

१३. मुस्लीम महिलांच्या दास्यमुक्तीसाठी आंदोलन.

१४. सत्यशोधक मंडळ व इंडियन सेक्युलर सोसायटी यांच्यातर्फे दिल्ली येथे ४-५ डिसेंबर रोजी परिषद.

१५. सत्यशोधक मंडळ व इंडियन सेक्युलर सोसायटी यांच्यातर्फे महाराष्ट्र मुस्लीम स्त्रियांची पुणे येथे परिषद - ता. २७-२८ डिसेंबर १९७१. (कमल पाध्ये, 'माहेर' मासिक, जानेवारी १९७२, पृष्ठ क्र. २२ ते २८.)

('कमल पाध्ये' या वैचारिक लेखन करणाऱ्या मराठी लेखिका होत्या. 'बंध अनुबंध', 'भारतीय मुसलमानांचा राजकीय इतिहास', 'भारतीय स्त्री-धर्माचा आदर्श' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत.)

५.१४ मंडळाचे कार्य : एका कार्यकर्त्याचा दृष्टीकोन – प्रा. आय. एन. बेग

डॉ. सय्यद हुसेन यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये (५ जून १९७२च्या डाक आवृत्तीत) एक लेख लिहून मुस्लीम सत्यशोधक मंडळ अधिक प्रभावी व्हावे म्हणून काही व्यावहारिक सूचना केल्या आहेत. आपण मंडळाचे सहानुभूतीदार असून कुठे दुमत झाल्यास आपला मंडळास विरोध आहे, असा त्याचा अर्थ घेऊ नये, अशी आपली भूमिका त्यांनी आधीच स्पष्ट केली आहे. या सहानुभूतीबद्दल मंडळ त्यांचे ऋणी आहे. परंतु त्यांनी उपस्थित केलेले काही मुद्दे सकृद्दर्शनी बिनतोड वाटत असले, तरी त्याबाबत दुसरी बाजूही लोकांसमोर येणे मंडळाच्या कार्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. मुस्लीम समाजाच्या समस्यांचे अधिकाधिक सत्य स्वरूप स्पष्ट होण्याच्या दृष्टीने त्याबाबत अधिक चर्चा होणेही निकडीचे आहे.

विद्वान दूर का?

मुस्लीम सत्यशोधक मंडळापासून विद्वान दूर असल्यामुळे मंडळाचे कार्य समाजात रुजेल किंवा नाही याबद्दल डॉ. सय्यद हुसेन यांना शंका आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या व्यासपीठावर प्रा. फैजी सोडल्यास विशेष मुस्लीम विद्वान न आल्याने अशी शंका येणे शक्य आहे. असे असले, तरी तेवढ्यावरून 'या विद्वान मंडळींचा मंडळाला विरोध आहे' असे मानण्याचे कारण नाही. विद्वानांनीही मंडळाच्या भूमिकेस कोठे विरोध केल्याचे दिसत नाही. त्यांनी मंडळास सक्रिय पाठिंबा न देण्यापाठी अनेक कारणे असू शकतील. काही विद्वानांचे कार्यक्षेत्र वेगळे असेल, काहींना कार्यबाहुल्यामुळे जमत नसेल, तर काहींच्यात एखादी चळवळ पुढे नेण्याइतपत उत्साह राहिलेला नसेल. अशा कोणत्याही कारणाने असो, हे विद्वान लोक मंडळापासून अलिप्त आहेत. शिवाय आणखी एक शक्यता आहे. काही तथाकथित विद्वान धर्मनिरपेक्ष वृत्तीचे व राष्ट्रवादी असतीलच, असे ठामपणे म्हणता येत नाही. त्यांनी उद्धृत केलेल्या नावांपैकी छगला व प्रा. फैजी यांचा मंडळाच्या कार्याला विरोध नाही, हे उघड आहे. उरलेल्या विद्वानांच्या अलिप्ततेला वर दिल्यापैकी कोणतेही कारण असू शकेल. शिवाय पुरोगामी विचारांच्या विद्वानांमागे मुस्लीम समाज जातोच, असे नाही. उलट अशा विद्वानांची या समाजाने उपेक्षा केलेली आहे. शेवटी एखाद्या चळवळीत किती विद्वज्जन आहेत, यावरून त्या चळवळीच्या यशस्वीतेचे किंवा उपयुक्ततेचे मूल्य ठरवू पाहणे कितपत योग्य आहे, हेही पाहिले पाहिजे.

पसरविलेले गैरसमज

मंडळाचे नाव, मंडळाचे इतरत्र होत असलेले कार्यक्रम, पुरोगामी हिंदू मित्रांचे मंडळाला होत असलेले साहाय्य यांमुळे मुस्लीम समाजात मंडळाविषयी गैरसमज पसरलेले आहेत, असे डॉ. सय्यद हुसेन यांना वाटते. त्याचेही स्पष्टीकरण होणे जरूर आहे.

बहुजन समाजाचे आधुनिकीकरण करण्याचे उद्देशाने जोतिबा फुले यांनी पुण्यामध्ये 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. हमीद दलवाई व त्यांच्या कार्यकर्त्यांना मुस्लीम समाजाच्या संदर्भात हेच अभिप्रेत असल्यामुळे मंडळाचे नाव मुस्लीम सत्यशोधक मंडळ ठेवणे व त्याची स्थापना पुण्यात करणे या पाठीमागे धर्मनिरपेक्षवृत्ती ठेवून वैचारिक व भावनिक संगती साधण्याचा प्रयत्न आहे.

इंडियन सेक्युलर सोसायटी व राष्ट्र सेवा दल या संस्था भारतीय समाजात धर्मनिरपेक्ष लोकशाही रुजविण्याचे कार्य करीत आहेत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे उद्दिष्टही 'मुस्लीम समाजात धर्मनिरपेक्ष लोकशाहीची विचारधारा बिंबविणे' हेच आहे. अशा प्रकारे समान उद्दिष्ट असल्यामुळे वरील संस्थांचे व त्यांच्या विचारांच्या हिंदू मित्रांचे मंडळाला बरेच साहाय्य होत आले आहे. मंडळाचे सर्व सभासद व पदाधिकारी मुस्लीमच आहेत. तरीदेखील हे 'हिंदूंनी मुस्लिमांसाठी चालविलेले मंडळ' आहे असे म्हणावयाचे असल्यास त्याला मंडळाचा नाइलाज आहे.

इथे आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. ती म्हणजे, मुस्लीम समाजात असलेला लोकशाही वृत्तीचा अभाव! या समाजात लोकशाही वृत्ती अद्याप पाहिजे तेवढ्या प्रमाणात रुजलेली नाही (बहुसंख्य मुस्लीम राष्ट्रांत हुकूमशाही राजवटी असण्यामागे हे तर कारण नसावे?). यामुळेच विरोधी विचार शांतपणे ऐकणे वा विरोधी विचार बाळगण्याचा दुसऱ्यांचा हक्क मान्य करणे, त्याला जमत नाही. म्हणून जिथे जिथे मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे जाहीर कार्यक्रम असतात, तिथे तिथे मंडळाविरुद्ध खोडसाळ पत्रके काढणे, मशिदी-मशिदींतून तकरीर ठेवून विरोधी प्रचार करणे वगैरे प्रकार पद्धतशीरपणे चालतात.

वरील सर्व पार्श्वभूमी समोर ठेवली असता, 'मंडळाचे कार्यक्रम समाजाबाहेर का होतात' हे कळून येईल. त्याचप्रमाणे 'मंडळाचे विचार उसने आहेत... त्यांच्यावर हिंदूंचा पगडा आहे' वगैरे आरोपांतील निरर्थकता स्पष्ट होईल. शिवाय धर्मनिरपेक्ष लोकशाही व विज्ञाननिष्ठा या मंडळाच्या आधारशिला असल्यामुळे त्याचे कार्यक्रम कुठेही झाले, तरी मंडळाला ते सारखेच आहेत... नव्हे, तो त्याच्या तत्त्वांचा विजयच आहे. पुन्हा, मंडळाविरुद्ध पसरलेले हे गैरसमज मंडळाच्या कार्य पद्धतीमुळे पसरले आहेत की ते मुद्दाम, जाणीवपूर्वक पसरविण्यात आले आहेत, याचाही शोध घेणे उचित ठरेल.

समस्यांचे मूळ

मुस्लीम समाजाच्या दुःखाचे व समस्यांचे मूळ शिक्षणाच्या अभावात असून त्यामुळेच मुस्लीम समाजावरील धार्मिकतेचा पगडा दूर होत नाही, असे डॉ. सय्यद हुसेनना वाटते. निःसंशय मुस्लीम समाजात शिक्षणाचा अभाव आहे. परंतु या शिक्षणाच्या अभावामुळेच मुसलमानांतील धार्मिक कट्टरता दूर होत नाही. हे म्हणणे वरवर पाहाता खरे वाटत असले, तरी सत्य वेगळे आहे.

मंडळाच्या कामानिमित्त अनेक लोकांना भेटण्याचे, त्यांच्याशी चर्चा करण्याचे प्रसंग येतात. या सर्व भेटींचा व चर्चांचा अनुभव एकच आहे. तो म्हणजे, शिक्षित मुसलमान निर्लेप बुद्धीने विचार करतोच, असे नाही; उलट तोच अधिक धर्मांध व बुरसटलेल्या विचारसरणीचा आहे.

एकदा शिवाजी विद्यापीठातील मुस्लीम विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला. एम. एस्सी. दुसऱ्या वर्षाला असलेला सोलापूरचा एक विद्यार्थी भेटला. त्याचे कुटुंब चांगले सुशिक्षित असून वडील तिथे कॉर्पोरेटर आहेत. त्याच्याशी बोलायला सुरुवात केल्याबरोबर त्याने इशारा दिला. तो म्हणाला, "यह देखो मिस्टर, मुसलमानोंमें नॅशनॅलिटी लाने के लिए हम तुम्हारी मदत करेंगे. लेकिन तुम्हारा यह मंडल कुरान, हदीस और शरीयत के खिलाफ एक लब्जभी जाये तो हम तुम्हारे खिलाफ है." दुसरे एक उदाहरण. धारवाड युनिव्हर्सिटीत, विज्ञान शाखेत, पदव्युत्तर विभागात शिकत असलेल्या एका विद्यार्थ्याला पाकिस्तानने बांग्लादेशात केलेले अत्याचार समर्थनीय वाटतात. इतकेच नव्हे, तर 'बंगाली मुसलमान यजीदची औलाद असून ते काफिर आहेत. म्हणूनच अल्ला त्यांच्यावर वादळ, महापूर, युद्ध यांसारख्या आपत्ती आणून कहर डालत असतो' असे त्याचे ठाम मत आहे. थोडक्यात, कितीही उच्च शिक्षण घेऊन मुसलमान डॉक्टर होवो, इंजिनीअर होवो, वकील होवो अगर प्राध्यापक होवो... त्याच्यावरील धार्मिकतेचा पगडा दूर झालेला असतोच असे नाही. तो उच्च शिक्षण घेईल, टाईट वा बेलबॉटम पॅन्ट घालील, दाढी न ठेवता 'क्लीन शेव्ह' करील, नमाज-रोजा करणार नाही, मिळत असल्यास व्याजही घेईल... पण हे सर्व करून-सवरून तो धार्मिक कट्टरताही दाखवेल. सुशिक्षित मुसलमान हा असा परस्पर-विरोधी विचित्र प्राणी आहे. म्हणून केवळ शिक्षणाने मुस्लिमांवरील धार्मिकतेचा पगडा जाऊन ते पुरोगामी विचारांचे होतील, असे म्हणणे बरोबर नाही. मुसलमानांचे आधुनिकीकरण करण्याचा प्रभावी उपाय म्हणजे त्यांच्यापर्यंत नवा विचार नेणे, त्यांना आधुनिक दृष्टीने विचार करावयास लावणे व ही प्रक्रिया सततची चालू ठेवणे होय. शिक्षण हे फार तर या प्रक्रियेतील एक महत्त्वाचे साधन होऊ शकेल. आजपर्यंत अशी आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली नाही, हेच मुस्लीम समाजाच्या दुःखाचे व समस्यांचे मूळ आहे.

बेकारी निवारण

बेकारी व आर्थिक दारिद्र्य मुस्लीम समाजाला ग्रासून राहिले आहे. परंतु यांच्या कारणाचा शोध घेऊन ती नाहीशी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. शिक्षणाचा अभाव, योग्य तांत्रिक शिक्षणाचा अभाव व आत्मघातकी उर्दू शिक्षणाचा बडेजाव यांमुळे आधीच असलेली बेकारी अधिक तीव्र झालेली आहे. इथे आणखी एक गोष्ट विचारात घेणे आवश्यक आहे. सबंध देशापुढेच आज बेकारी व आर्थिक दारिद्र्य यांचा प्रचंड प्रश्न आ वासून उभा आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी देशामध्ये चालू असलेल्या प्रयत्नांमध्ये मुस्लिमांनी स्वतःहून सहभागी झाले पाहिजे. त्यानेच त्यांचे दारिद्र्य नाहीसे होणार आहे. कारण उघड आहे. सबंध देशाची प्रगती म्हणजे 'एक गट सोडून बाकीच्या सगळ्यांची प्रगती' असे लोकशाही राष्ट्रात होत नाही. परंतु यासाठी प्रथम मुसलमानांनी जातीयवादी पक्षांकडे पाठ फिरवून व त्यांचे राजकारण सोडून देऊन देशांतील इतर राष्ट्रव्यापी, धर्मनिरपेक्ष समाजवादी शक्तींचे हात बळकट केले पाहिजेत. मुस्लीम समाजाचे आर्थिक दारिद्र्य व बेकारी नाहीशी करण्याचा हाच एक प्रभावी उपाय आहे. बेकारी निवारणार्थ मंडळाने काही कृतिशील प्रयास आखून सोयी, सवलती उपलब्ध करून द्यायला

हव्या होत्या, असे डॉ. सय्यद हुसेन यांना वाटते. परंतु काही कृतिशील प्रयोग म्हणजे नेमके काय, व काही सोयी, सवलती म्हणजे कसल्या सोयी, सवलती याचे पुरेसे स्पष्टीकरण देणे आवश्यक होते. त्यांनी व्यक्त केलेली अपेक्षा फारच ढोबळ व संदिग्ध आहे.

मंडळाचे उद्दिष्ट

उर्दू भाषा व उर्दू शाळा यांविषयीचे त्यांचे विचार व मंडळाचे विचार सामान्यतः सारखेच आहेत. समान नागरी कायदा, पडदा पद्धती, शिक्षण, कुटुंब नियोजन, बेकारी निवारण हे समाजाचे ज्वलंत प्रश्न आहेत, असे मंडळाप्रमाणे त्यांनाही वाटते. फक्त, यांपैकी कोणत्या कार्यक्रमाला अग्रक्रम द्यावा, याबाबत त्यांनी व्यावहारिक दृष्टीकोनातून काही वेगळे विचार मांडले आहेत. मंडळ मुस्लीम समाजात प्रबोधनाचे कार्य करत असून सर्वांना समान अधिकार व सर्वांवर समान जबाबदाऱ्या असलेला समाज निर्माण करणे हे मंडळाचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट समोर असल्याने व्यावहारिक दृष्टीचा अवलंब करावा की नाही, केल्यास कितपत करावा असले प्रश्न मंडळासमोर अजून आलेले नाहीत. असो. डॉ. सय्यद हुसेन यांनी व्यक्त केलेले मतभेद हे कार्यपद्धतींविषयीचे आहेत, उद्दिष्टांविषयींचे नाहीत. वरील विवेचनात त्यांच्या काही मुद्द्यांबाबत विरोधी विचार मांडले आहेत, परंतु ते त्यांना विरोधासाठी विरोध म्हणून मांडलेले नाहीत. त्या त्या मुद्द्याची दुसरी बाजू समोर यावी व त्यायोगे मुसलमानांच्या समस्यांचे स्वरूप अधिक स्पष्ट व्हावे, हाच उद्देश त्यामागे आहे. त्यांनी हे आधुनिक विचार त्यांच्या पद्धतीने मुस्लीम समाजांत पसरविण्याचा प्रयत्न केल्यास तेही एक आवश्यक कार्य आहे. असे केल्याने राष्ट्रीय कार्य होऊ शकेल. मला खात्री आहे, मुस्लीम सत्यशोधक मंडळ त्यांच्या कोणत्याही योग्य सूचनेचे स्वागतच करील. कोणत्याही मुद्द्याबाबत शांतपणे विचार विनिमय करण्याला मंडळाची सदैव तयारी आहे. मंडळ समाजाचे आशास्थान बनावे. डॉ. सय्यद हुसेन यांनी सद्हेतूने व्यक्त केलेल्या विचारांबद्दल त्यांचे आभार मानून हा लेख संपवतो. (महाराष्ट्र टाइम्स, १६ जून १९७२)

(प्रा. आय. एन. बेग हे निपाणी, जि. बेळगाव येथील मंडळाच्या आरंभ काळातील कार्यकर्ते आहेत. कोल्हापूर परिसरात मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अनेक कार्यक्रमांत त्यांचा मोलाचा वाटा आहे. मंडळाचे कार्यकारिणी सदस्य आणि सचिव म्हणूनही त्यांनी काम पाहिलेले आहे.)

५.१५ सामाजिक बदल वैचारिक संघर्षातूनच शक्य! – सय्यद मुनीर

आपल्या दिनांक ३ जून १९७२च्या अंकात डॉ. सय्यद हुसेन यांचा मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचे मूल्यमापन करणारा लेख आला आहे. मंडळाच्या कार्याचे मूल्यमापन डॉ. हुसेन यांच्यासारख्या विद्‌वानांकरवी व्हावे, ही फार आनंदाची गोष्ट आहे. मंडळावर केली जाणारी विधायक टीकाही मंडळाच्या कार्याच्या दृष्टीने पोषकच ठरेल. डॉ. हुसेन यांनी मंडळाला आपला विरोध नसल्याचे नमूद केले आहे व त्यांचे प्रतिपादन शेवटी 'मंडळाच्या हातून मुस्लीम समाजाचे परिवर्तन व्हावे व मंडळाची पाळेमुळे खोलवर रुजावीत' या भावनेतून झाले आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे वास्तविक त्यांचे प्रतिपादन कार्याच्या पद्‌धतीवरच केंद्रित व्हावयास हवे व त्या ओघात 'दुमत' झाल्यास (त्यांच्या म्हणण्याप्रमाणे) ते समजण्यासारखे आहे. पण दुर्दैवाने 'मुस्लिमांना काय वाटते' या निमित्ताने लेखकाने मंडळाच्या मूलभूत हेतूंवर व ते चालविणाऱ्या हमीद दलवाईंसारख्या व माझ्यासारख्या तरुणांच्या मुस्लीम असण्यावर शंका घेतली आहे. आम्हाला उसने विचार घेतल्याचा व सामाजिक जाणीव नसल्याचा आरोप लेखकाने केला आहे. शिवाय लेखातील बरीचशी विधाने मंडळाच्या कार्याविषयी अपुरी माहिती असल्यामुळे केली गेली आहेत.

जाणता-अजाणता डॉ. हुसेन यांनी उपस्थित केलेले मुद्‌दे हे मंडळाच्या कार्याला छुपा विरोध करणाऱ्यांनी आपला विरोध नसल्याचे सांगून उपस्थित केलेले मुद्‌देच आहेत, हे येथे नम्रपणे सांगावेसे वाटते.

विद्‌वानांवर सक्ती का?

डॉ. सय्यद हुसेन यांनी नमूद केलेल्या विद्‌वानांपैकी काही विद्‌वान मंडळाच्या कार्याशी निगडित आहेतच, परंतु उरलेल्या विद्‌वानांना हे कार्य करण्यापासून कोणी अडविले होते, हे कळत नाही... की आम्ही हे सुरू करेपर्यंत ते थांबले होते व आम्ही अशी चळवळ सुरू करताच ते आम्हाला येऊन मिळणार होते? शिवाय मंडळासारख्या क्रांतिकारक चळवळी चालवणारी माणसे विद्‌वानच असावी लागतात, असे म्हणणे बरोबर होणार नाही. अशा कार्यासाठी प्रस्थापित चौकटीविरुद्‌ध उभे ठाकण्याची व अलगपणा सहन करण्याची कुवत असलेली माणसे लागतात. अशी माणसे काही वेळा विद्‌वानही असतात; काही वेळा ती विद्‌वान नसतातही. प्रशंसा हवी असणाऱ्यांना, टाळ्या मिळविणाऱ्यांना अथवा नेते बनण्याची महत्त्वकांक्षा असणाऱ्यांना येथे वाव नसतो.

डॉक्टर साहेबांनी लिहिल्याप्रमाणे प्रा. असफ ए. ए. फैजी यांनी मंडळाचे उद्‌घाटन केलेले नसून प्रा. यास्मिन लुक्मानी या महिलेने उद्‌घाटन केले आहे. तरीही प्रा. फैजी मंडळाच्या कार्याशी त्यांच्या उतार वयात आणि तब्येत बरी नसतानाही निगडित आहेत, याची डॉक्टर साहेबांना माहिती दिसत नाही. मंडळाच्या व्यासपीठावरून 'इस्लामकडे पाहण्याचा आधुनिक दृष्टिकोण'

या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले होते. मंडळाच्या उद्घाटनापासून मंडळाच्या महत्त्वाच्या परिषदांत ते सक्रिय सहभागी झाले आहेत. पुण्यात नुकत्याच भरलेल्या महाराष्ट्र मुस्लीम महिला परिषदेला ते सपत्नीक हजर राहिले होते. या परिषदेचे उद्घाटन त्यांच्याच हस्ते झाले. 'उतारवयामुळे आपल्याला जास्त दगदग होत नाही; नाहीतर महाराष्ट्राच्या प्रत्येक खेड्यातून तुमच्याबरोबर फिरण्याची तयारी आहे' असे एकदा ते म्हणाले होते.

प्रा. फैजींप्रमाणे न्यायमूर्ती छगला हेही मंडळाच्या ध्येयधोरणांशी आणि कार्यक्रमाशी पूर्णपणे सहमत असूनही प्रकृतीच्या कारणामुळे व व्यावसायिक अडचणींमुळे मंडळाच्या कार्यात सक्रिय भाग घेऊ शकत नाहीत. तसेच कार्य पद्धतीच्या बाबतीत व विषय प्राधान्याच्या बाबतीत मतभेद असल्यामुळे डॉ. हुसेन यांच्यासारखी विद्वान मंडळी कार्यात प्रत्यक्ष सहभागी होत नाहीत.

डॉ. सय्यद हुसेन यांनी उल्लेख केलेल्या तैय्यबजी व न्यायमूर्ती हिदायतुल्लाह यांची या प्रश्नावरील मते सर्वश्रुत आहेत. न्यायमूर्ती हिदायतुल्लाह यांनी मुस्लीम व्यक्तिगत कायदयात बदल करण्याच्या दृष्टीने भारत सरकार नेमू इच्छित असलेल्या कमिटीचे अध्यक्षपद स्वीकारण्यास नकार दिला आहे. तैय्यबजी व मोहीयुद्दीन हॅरीस यांनी मुस्लीम समाजात आवश्यक असलेल्या मूलभूत सामाजिक परिवर्तनाला विरोधच दर्शविलेला आहे. या मंडळींची नावे मंडळाच्या कार्याच्या संदर्भात डॉ. हुसेन यांनी घ्यावीत, हे आश्चर्यकारक आहे.

मंडळाचे नाव व कार्यक्रम हिंदूंकडून उसने घेतले आहेत, असा आरोप डॉक्टर साहेबांनी केला आहे; आणि मुस्लीम समाज भारतीय समाजाशी एकरूप व समरस झालेला नाही, असेही लेखाच्या सुरुवातीला म्हटले आहे. येथे भारतीय समाजाशी एकरूप व समरस होणे, असे म्हणताना त्यांना नेमके काय अभिप्रेत आहे, ते समजत नाही. मंडळाच्या दृष्टीने महाराष्ट्रामध्ये 'सत्यशोधक' या नावाला एक परंपरा आहे. महाराष्ट्रात मूलभूत सामाजिक परिवर्तन करण्याचा सत्यशोधक चळवळीने प्रयत्न केला होता. अशा प्रकारची चळवळ मुस्लिमांमध्ये यापूर्वी कोठलीच झाली नसल्याने तशी परंपरा असणाऱ्या महाराष्ट्रातील या चळवळीचे नाव महाराष्ट्रात काम करणाऱ्या या मंडळाने स्वीकारल्यास तो एक प्रकारे इथल्या समाजाशी दुवाच साधल्यासारखे होत नाही काय? डॉक्टर साहेबांना महाराष्ट्रात मंडळाचे नाव उर्दू हवे आहे की महाराष्ट्रात असलेल्या अशा परंपरा प्रामुख्याने हिंदू लोकांनी निर्माण केल्या म्हणून त्यांचा विरोध आहे? त्याबद्दल आकस बाळगून महाराष्ट्रातील मुस्लीमेतर समाजाशी समरसता कशी साधता येणार? या परंपरा मुस्लिमांना आपल्या का वाटू नयेत?

मुस्लीम सत्यशोधक मंडळाला मूलभूत सामाजिक बदल अपेक्षित आहेत. कुठल्याही मूलभूत सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला विरोध हा होणारच. मुस्लीम समाजावर मुल्ला-मौलवींचा पगडा आहे. तसेच वैज्ञानिक दृष्टीचा अभाव असून स्वतंत्र धार्मिकता जोपासण्याची वृत्ती आहे, हे डॉक्टर साहेब मान्य करतात. या सर्व गोष्टींच्या विरुद्ध मंडळ उभे ठाकले असताना मंडळाला विरोध होणार नाही किंवा त्या विषयी हितसंबंधी मंडळी चुकीचा प्रचार करणार नाहीत, अशा भाबड्या अपेक्षा मंडळाने तर बाळगलेल्या नाहीतच, किंबहुना सामाजिक परिवर्तन करू इच्छिणाऱ्या कुठल्याही चळवळीला बाळगता येणार नाहीत.

केवळ गैरसमज नाहीत

'मुस्लीम समाजात परिवर्तन होण्याच्या दृष्टीने मंडळाचे नेतृत्व करणारी मंडळी मुस्लीम समाजातून उदयाला आली पाहिजेत' असा मुद्दा डॉ. हुसेन यांनी उपस्थित करून 'सध्या मंडळ चालवीत असलेली मंडळी मुसलमान नाहीत' अशी छुपी शंका व्यक्त केली आहे. मी डॉक्टर साहेबांना असा प्रश्न विचारू इच्छितो की, ज्या वेळी पैगंबर साहेबांनी प्रथम मक्केत धर्म सांगितला, त्या वेळी तो लगेच लोकांत रुजला का? त्यांच्यामागे किती लोक गेले? त्यांना कशी वागणूक मिळाली? त्यांना हिजरत का करावी लागली? या प्रश्नांची उत्तरे शोधल्यास डॉक्टर साहेबांना हे कळून येईल की, तुम्ही प्रस्थापित चौकटीच्या विरुद्ध उभे राहता, तेव्हा अलग पडणे स्वाभाविकच असते. नवीन विचार सहजासहजी रुजत नाहीत. त्याला दीर्घ कालावधी लागतो. कुठल्याही सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अशीच असते. मुस्लीम सत्यशोधक मंडळ चालवणारे आजचे तरुण मुस्लीम समाजातीलच आहेत. मुस्लीम समाजाशी त्यांचा संपर्क आहे (डॉ. हुसेन यांनी सर्व लेखात हमीद दलवाईंचा उल्लेख करण्याचे का टाळावे, ते समजत नाही).

केवळ गैरसमज दूर झाले म्हणजे विरोध दूर होईल, हे मतही बरोबर नाही. 'हिंदूंनी चालविलेले मंडळ' हा गैरसमज नसून जातीयवाद्यांनी व विरोधकांनी मुद्दाम केलेला पद्धतशीर अपप्रचार आहे. केवळ गैरसमज आहे याचा अर्थ तोच काय तो दूर करण्याचे काम आहे, असे लेखकाला सुचवायचे आहे काय? केवळ गैरसमजातून मंडळाला विरोध होत आहे, हाच मुळी गैरसमज असून तो एक प्रकारचा विरोधच आहे, हे डॉक्टर साहेबांनी ध्यानी घ्यावे. लोकशिक्षणातून मंडळाची भूमिका पटवीत राहणे, हाच त्यावरील उपाय आहे.

पुढे डॉक्टर साहेबांनी स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याच्या आवश्यकतेबद्दल लिहिले आहे. त्यांना नेमके काय सुचवायचे आहे, ते कळत नाही. त्यांना मंडळाकडून 'तबलीग' सारखी चळवळ तर अपेक्षित नाही? मंडळाला गंभीर सामाजिक जाणिवा नाहीत, असाही एक आक्षेप लेखकाने घेतला आहे व मंडळाने शिक्षण, बेकारी निवारण व कुटुंब नियोजन यांसारख्या समस्या हाती घ्याव्यात, असा उपदेश केला आहे.

छुपे आरोप

'मुस्लीम समाजाची कुठेतरी एक वेगळी अस्मिता आहे; या समाजाचे इतर भारतीय समाजापेक्षा वेगळे असे अस्तित्वही आहे; त्याची भाषा, परंपरा, रीतीरिवाज, या सर्वांशी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने जुळवून घेऊन काम करायला हवे' असे लेखकाला सुचवायचे आहे, असे वरील सर्व आरोपांवरून वाटते. असे सुचवावयाचे असेल, तर त्यांनी त्याचे अधिक स्पष्टीकरण करावयास हवे. सर्व लेखातच पडद्यामागून आरोप करण्याची वृत्ती दिसून येते; मोकळी चर्चा करण्याची तळमळ दिसत नाही.

मुस्लीम समाजात नवीन विचार कोणीच मांडला नसल्यामुळे तो उसना वाटण्याची शक्यता आहे. याआधी म्हटल्याप्रमाणे, मंडळ महाराष्ट्रात काम करीत असल्यामुळे या प्रदेशाची भाषा, येथील सामाजिक चळवळी यांच्याशी मंडळाला समरसता साधावयाची आहे. डॉ. हुसेन यांना

येथील समाजाशी समरसता तर हवी आहे, पण मंडळ नेमके तेच साधत असताना उसने विचार घेतल्याचा त्यांचा आरोप त्यांच्या लेखातील विसंगती दर्शवितो.

मुस्लीम समाजात विधायक कार्य करून, त्यांची मने जिंकून गैरसमज दूर करणे जरुरीचे आहे, असे डॉ. हुसेन म्हणतात. मंडळाने मुस्लीम स्त्रियांकरिता शिवणकला वर्ग, गरीब मुस्लीम विद्यार्थ्यांना पुस्तके वाटणे, तसेच गरजूंना नोकऱ्या मिळवून देणे इत्यादी उपक्रम यथाशक्ती केले आहेत, याची डॉक्टर हुसेन यांना कदाचित माहिती नाही. शिवाय सामाजिक बदलाच्या प्रक्रियेशी लेखकाचा फारसा परिचय दिसत नाही. लोकांच्या समस्या व अडचणी आपण जोपर्यंत सोडवितो, तोपर्यंत लोक आपल्याजवळ राहतात, पण ज्या वेळी आपण आपला विचार त्यांच्यासमोर मांडतो, त्या वेळी ते निघून गेलेले दिसतील. आमचा अनुभवही असाच आहे. लोक आपल्या अडचणी सोडविण्यासाठी येतात; त्यांना सामाजिक बदलाची आच आहे म्हणून नव्हे. प्रबोधनाचे काम करणाऱ्या कुठल्याही संस्थेला विधायक कामामध्ये आपला वेळ व श्रम फुकट गेल्याचे जाणवते व मुख्य हेतूच डावलला जातो. उलट अतिशय मर्यादित मनुष्यबळामुळे मूळ प्रबोधनाच्या कार्यामध्येच अडथळा उत्पन्न होतो.

मंडळाने मुस्लीम स्त्रियांच्या नागरी हक्कांना प्रथम प्राधान्य दिले आहे, याचा व्यवहारी दृष्टीकोनातून फेरविचार व्हावा, असे लेखकाला वाटते. मुस्लीम स्त्रीला कुटुंबात व समाजात कायद्याचे संरक्षण नसल्यामुळे तिचे फार हाल होतात, कुटुंबामध्ये तिला मानाचे स्थान नाही; 'घरातील केवळ इतर उपयोगी वस्तूंपैकी एक' असेच तिचे स्थान राहते. तोंडी तलाक व बहुपत्नीत्वाच्या चाली समाजाच्या खालच्या थरामध्ये रूढ असून स्त्रिया पुष्कळ वेळा घराबाहेर फेकल्या जातात. याचे विपरीत परिणाम मुलांवर व पर्यायाने समाजाच्या नैतिक घसरणीत होतात. अशा स्त्रियांची यादीच मंडळ तयार करीत आहे. अशा अनेक आपत्तिग्रस्त महिला मंडळाच्या कार्यकर्त्यांना भेटून आपल्या हकिगती सांगत असतात. या विषम बागणुकीला अग्रक्रमाने पायबंध बसावा, असे मंडळाला वाटते. म्हणून 'कायद्यात बदल व्हावा' अशी मागणी मंडळाने केली आहे. या मागणीला जातीयवाद्यांकडून होत असलेला विरोध डॉ. हुसेन यांनी पुढे केलेल्या चुकीच्या अग्रक्रमाच्या मुद्द्यावर होत नसून 'मुस्लीम कायद्यात बदल करण्याचा अधिकार भारतीय संसदेला असता कामा नये' या भूमिकेतून होतो आहे. कारण 'मुस्लीम समाज सार्वभौम (सॉव्हरिन) आहे' अशी त्यांची भूमिका आहे. व्यापक मुस्लीम जातीयवादी व अलिप्ततावादी विचारसरणीचा असा विरोध हा एक बालेकिल्लाच ठरू पाहत आहे. मुस्लीम जातीयवाद्यांनी धर्माच्या नावावर मुस्लीम समाजात निर्माण केलेल्या काही घातक भ्रमांमुळे देशात जातीय तणाव सतत वाढत आहेत. मुस्लीम जातीयवादाला पायबंध घालण्याच्या दृष्टीनेसुद्धा मुस्लीम कायद्यात बदल होणे आवश्यक आहे. इतर बाबींना महत्त्व देऊन लेखकाला हा बदल टाळावयाचा आहे का? शिक्षण, बेकारी निवारण, कुटुंब नियोजन हे देशव्यापी प्रश्न आहेत; बेकारीची व शिक्षणाची समस्या इतर समाजामध्येसुद्धा आहे. शिवाय इतर सामाजिक संस्था मुस्लीम समाजात या दृष्टीने कार्यरत आहेतच. मग मंडळानेच हे कार्य करावे, हा अट्टाहास का?

दुःखाचे मूळ

मुस्लीम समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे, म्हणून या समाजावर धार्मिकतेचा पगडा आहे. सुशिक्षित असलेल्यांमध्ये समाजाचे पुनरुत्थान करण्याची कुवत नाही. म्हणून मंडळाने आपल्या कार्याची उभारणी शैक्षणिक पायावर करावी, असे डॉ. सय्यद हुसैन म्हणतात.

उर्दू शिक्षण मुस्लीम तरुणाला धर्माच्या जुनाट चौकटीत कसे ठेवते, हे लेखकाने सांगितले आहे. त्यामुळे व्यापक दृष्टी व एकात्मतेला अडसर निर्माण होतो, हे लेखकाला मान्य आहे. 'मंडळाने व्यापक शैक्षणिक चळवळ चालवावी' असा सल्ला त्यांनी दिला आहे. सर सय्यद अहमद यांनी आधुनिक पाश्चात्त्य शिक्षण देण्याच्या उद्देशाने अलीगढ विद्यापीठाची पायाभरणी केली. ते स्वतः व त्यांनी निर्माण केलेल्या आधुनिक विद्याविभूषितांनी मुस्लीम अलिप्ततावादाचा पाया घातला व पुढे तो पोसला. स्वातंत्र्यपूर्व काळातील पाकिस्तान निर्मितीच्या चळवळीमध्ये अलीगढ ने बजावलेली कामगिरी सर्वश्रुत आहे. तेव्हा व्यापक आधुनिक समतेची, न्यायाची मूल्ये बाळगणाऱ्या समाजाची निर्मिती केवळ आधुनिक शिक्षणाने होईल, हा भ्रम आहे; मंडळ सुदैवाने यापासून दूर आहे.

उर्दू भाषेचा प्रश्न

उर्दूच्या विकासाला पूर्ण संधी मिळावी, तसेच 'उर्दू' हा एक विषय म्हणून शिकण्याची सोय असावी, असे मंडळाचे मत आहे. उर्दू माध्यमातून शिक्षण घेतल्यामुळे होणाऱ्या तोट्याची कल्पना मंडळ आपल्या शक्तीनिशी करून देत आले आहे, परंतु उर्दू ही मुसलमानांची भाषा ही गल्लत, तसेच मुस्लिमांची वेगळी पृथगात्मकता जोपासण्याची वृत्ती यांमुळे या शाळा चालविल्या जात आहेत.

'प्रादेशिक भाषेच्या माध्यमांच्या शाळांतून उर्दूचे शिक्षण देणे' हा विचार आपल्याला समर्थनीय वाटत असला, तरी उर्दूचे महत्त्व इतरांवर लादता येणार नाही. प्रत्येक शाळेमध्ये सध्या असलेल्या 'पर्शियन' या विषयाऐवजी उर्दू हा एक ऐच्छिक विषय असावा, असे मंडळाने प्रतिपादन केले आहे.

सुशिक्षित मुस्लीम महिलांमध्ये बेकारीची समस्या आहे, असे डॉ. हुसेन यांनी म्हटले आहे. स्त्रियांना नोकरीमध्ये प्राधान्य मिळाल्यास त्या घराबाहेर पडतील. मग इतरांबरोबर मिसळल्यामुळे त्यांना आपल्या हक्कांची जाणीव होईल, असा युक्तिवाद लेखकाने केला आहे. मुस्लीम महिलांचे घराबाहेर पडणे किती कठीण आहे, हे लेखकाच्या प्रतिपादनावरूनच सिद्ध होते. मंडळाने पुण्यामध्ये नोकऱ्या देऊ केल्या, तेव्हा 'घरी काम मिळवून द्या... तर करतो' असे स्त्रियांनी सांगितले. मुस्लीम स्त्रियांना आज मिळणारे शिक्षण सामान्यतः त्यांना लग्नाच्या बाजारात पात्र बनविण्याच्या उद्देशाने दिले जाते. शिक्षण मिळाल्यामुळे मुस्लीम स्त्रिया आपल्या हक्कांसाठी भांडायला समर्थ होतील, हा युक्तिवाद चलाखीचा आहे. गुलामीच्या प्रथेविरुद्ध अमेरिकेत गुलाम भांडले नाहीत; गुलाम ठेवू शकणाऱ्या काहींना ही चाल अमानुष वाटली व त्यांनी गुलामीविरुद्ध जागृती करून ती रद्द करविली. गुलामी टिकून राहावी, असे ज्यांना वाटत होते,

ते 'गुलामांना भांडू द्या. तुम्ही त्यांच्या बतीने का भांडता?' असेच म्हणत होते. या न्यायाने गुलामी आणखी किती वर्षे टिकली असती कोण जाणे! 'मुस्लीम स्त्रीला तिच्या हक्कासाठी भांडू द्या' किंवा 'नोकऱ्या मिळाल्यावर ती भांडेल' असे म्हणणे म्हणजे तिची गुलामी आणखी ५० वर्षे टिकवून धरण्याला मदत करणे नाही काय?

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, मूलभूत सामाजिक बदल समाजाशी जुळते घेऊन, त्यांचे प्रश्न सोडवून किंवा शिक्षणाने होत नसून तो वैचारिक संघर्षातूनच होतो. समाजाशी जुळते घेण्याच्या प्रक्रियेमुळे समाज बदलत नाही, तर तो नवा विचार पचवतो. आशा आहे, वरील विवेचनावरून डॉ. सय्यद हुसेन यांचे समाधान होईल. (महाराष्ट्र टाइम्स, २१ जून १९७२)

(सय्यद मुनीर: मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य सुरू झाल्यानंतर मंडळाशी जोडल्या गेलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये सय्यद मुनीर यांचा समावेश होतो. दै. सकाळमध्ये ते पत्रकारिता करीत होते. मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे संपादक म्हणूनही त्यांनी काही काळ काम पाहिले होते.)

५.१६ निमकहराम – आचार्य प्र. के. अत्रे

स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे झाली, तरी भारतातील बहुसंख्य मुस्लीम समाज अजून जिनांच्याच वैचारिक युगात आहे, असे दिसते. अन्न भारताचे खायचे नि अल्पसंख्याकांच्या नावाखाली सर्व फायदे उठवून इस्टेटी करायच्या, पण या भूमीचा कायदा मात्र मानायचा नाही, हा भारतीय मुस्लिमांचा खाक्या यापुढे चालणार नाही! नि चालूही देता कामा नये. परवा मुंबईत भारतीय मुस्लिमांची परिषद भरली होती. कशाकरतां? तर समान नागरी कायद्याला विरोध करण्यासाठी. भारतातील मुस्लिमांना म्हणे शरीयत प्राणाहून प्रिय आहे. मुसलमान प्राण देईल, पण व्यक्तिगत कायद्यात (शरीयत) बदल होऊ देणार नाही. हीच जर भारतीय मुस्लीम समाजाची ठाम भूमिका असेल, तर त्यांनी भारत सोडून सौदी अरेबियात जावे, हेच बरे! या शरियतातल्या भारतीय मुसलमानांना पाकिस्तानातसुद्धा कोणी उभे करणार नाही. कारण पाकिस्तानात शरीयतचे राज्य नसून मुस्लीम राज्य आहे. भारत हा लोकशाही समाजवाद मानणारा आणि मिश्र समाजव्यवस्था असलेला खंडप्राय देश आहे. येथे हिंदू आहेत, पारशी आहेत, ख्रिश्चन आहेत, यहुदी आहेत, तसेच मुसलमानही आहेत. येथे सर्वांना समान हक्क आहेत... स्त्री असो, पुरुष असो, सर्वांना सारखे अधिकार! भाषण स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य... सर्वांना समान! एकाच भारतीय घटनेने सर्व प्रजाजन बांधले गेले आहेत. हिंदू बहुसंख्य आहेत, म्हणून काही येथे मनुस्मृतीचे राज्य नाही. मग मुस्लिमांचा व्यक्तिगत कायदा (शरीयत) तरी येथे का चालू द्यावा? वस्तुतः सामाजिक प्रगतीचे कायदे करताना जनमत आजमावण्याचे काहीच कारण नाही. हिंदूंच्या सतीबंदीचा कायदा केला, तेव्हा जनमत लक्षात घेतले होते काय? किंवा अगदी अलीकडे अस्पृश्यता विरोधी कायदा झाला, तेव्हा काय जनता कौल घेतला होता? सामाजिक प्रगतीचा कायदा करताना जनमत घेण्याची प्रथा पडली, तर सरकारला कुठलाच सामाजिक कायदा करता येणार नाही. सर्वसाधारण समाज हा पूर्वापार चालत आलेले सामाजिक कायदे, रूढी किंवा प्रथा सोडण्यास तयार नसतो. सामाजिक रूढी तर एवढ्या बलवत्तर आणि सामाजिक जीवनात खोल रुजलेल्या असतात की कायदा करूनही त्या लवकर नष्ट होत नाहीत. त्या बुद्धिजागृतीनेंच नाहीशा कराव्या लागतात. हे काम त्या-त्या समाजातील पुरोगामी विचारांच्या समाजसुधारकांचे असते. हिंदू, ख्रिश्चन या समाजांत असे अनेक बंडखोर समाज सुधारक झाले, ज्यांनी विचारांना धक्के देऊन समाजमानसांत प्रगतीचे बीज रोवले. त्यामुळेच हिंदू समाजासारखा पुरातन नि कर्मठ समाजही विद्याननिष्ठ नि समाजाभिमुख होऊ लागला आहे. मात्र मुस्लीम समाज हा एकच समाज असा आहे की, तो सर्वच दृष्टीने 'बुरख्यांत' आहे. हा समाज शरीयतसारखा कालबाह्य आणि स्त्रियांना गुलामगिरीत खितपत ठेवणारा कायदा कवटाळून बसला आहे, पण मुस्लीम समाजातील हमीद दलवाईंसारखे पुरोगामी विचाराचे तरुण पुढे येत असून, सत्यशोधक मुस्लीम समाजाची स्थापना करून, शरीयत नि इतर जुलमी सामाजिक कायदे आणि रूढी यांविरुद्ध त्यांनी बंड पुकारले आहे. शंभर वर्षांपूर्वी म. जोतिबा फुले यांना हिंदू समाजात जसा कडवा विरोध

करण्यात आला होता, तसा विरोध मुस्लीम सत्यशोधक मंडळाला आजच्या परंपरावादी मुस्लीम समाजाकडून करण्यात येत आहे. मुस्लीम परिषदेच्या नावाखाली मुंबईत जमलेल्या मुसलमान नेत्यांची भाषणे ऐकली, तर भारतात असूनही ते भारतीय नाहीत, असेच वाटते. ते स्वतःला सुशिक्षित आणि बुद्धिवादी मुस्लिमांचे प्रतीनिधी म्हणवितात. पण त्यांची भाषणे ऐकली की, त्यांनी आपली बुद्धी आणि संस्कृतीही धर्मगुरूंच्याकडे गहाण टाकलेली दिसते. ज्या बुद्धिवाद्यांना शरीयतमधील स्त्रियांची गुलामगिरी दिसत नाही, त्यांना बुद्धिवादी किंवा सुसंस्कृत तरी कोण म्हणणार? त्यांना आधुनिक पोशाखांतील आदिमानवच म्हणायला पाहिजे! ते खरे बुद्धिवादी असते, तर त्यांनी हमीद दलवाईंचे स्वागत करून परिषदेत त्यांना आपले विचार मांडण्यास आमंत्रण दिले असते. ते तर दिलेच नाही. उलट २५ युवक-युवतींना बरोबर घेऊन निवेदन देण्यास आलेल्या दलवाईंना दोन हजार कडव्या मुस्लिमांनी घेरून त्यांना मारण्याचा प्रसंग आणला होता. ही त्यांची दानत! बुद्धिवादी हा निर्भय असतो, सहिष्णू असतो, विचारांची देवाणघेवाण त्याला मंजूर असते. पण हे तथाकथित बुद्धिवादी भित्रे आहेत, नापाक आहेत... हे त्यांनी आपल्या कृतीने सिद्ध केले आहे. ते एवढे भित्रे आहेत की, त्यांनी परिषदेत वृत्तपत्र प्रतिनिधींना मज्जाव केला. परिषदेच्या निमित्ताने त्यांना काही कट-कारस्थान करायचे होते, म्हणून तर त्यांनी वृत्तपत्र प्रतिनिधींना बंदी केली नाही ना? दुसरे काहीच कारण दिसत नाही. या मुस्लीम परिषदेला वृत्तपत्र प्रतिनिधींप्रमाणेच स्त्रियांनाही बंदी होती. शरीयत हा संपूर्णतः स्त्रियांसंबंधित कायदा आहे. त्यावर मुस्लीम स्त्रियांची मते न घेता पुरुष वर्गानेच मतप्रदर्शन करणे, म्हणजे सवर्ण हिंदूंनी अस्पृश्यतेसंबंधी निर्णय घेण्यासारखेच आहे. भारतातील मुस्लीम समाज आपल्यातील वेगळा विचार करणाऱ्या लोकांना किती क्रूरपणे वागवितो, हे परवा सत्यशोधक मुस्लीम समाजाच्या मोर्च्याच्या वेळी दिसून आले. 'आपल्याशी सहमत नसलेला तो काफिर' हीच जर मुस्लीम समाजाची वृत्ती असेल, तर त्यांच्याशी कसे वागायचे, याचा इतर समाजालाही विचार करावा लागेल. ब्रिटिशांनी आपल्या फोडा नि झोडा या राजकारणाला अनुसरून मुस्लीम समाजाचे चोचले पुरविले आणि स्वातंत्र्योत्तर गेल्या २५ वर्षांत 'अल्पसंख्याक' म्हणून सरकारने मुस्लीम समाजाचे लाड केले. पण त्या समाजात भारतीयत्व कधीच रुजले नाही. मुस्लीम समाजाचा समान नागरी कायद्याला असलेला विरोध म्हणजे भारतीय घटनेच्या मूलभूत तत्त्वांनाच विरोध होय. हे आता अति झाले. खाल्ल्या अन्नाला न जागणाऱ्या या निमकहराम लोकांना 'परवडले तर राहा, नाहीतर चालायला लागा' असे ठणकावून सांगण्याची वेळ आली आहे, असे आम्हांस वाटते.

(संपादकीय, मराठा, ३० डिसेंबर १९७२)

(आचार्य प्र. के. अत्रे : महाराष्ट्रातील नामवंत पत्रकार आणि साहित्यिक. आचार्य प्र. के. अत्रे यांनी हमीद दलवाईंना समाज प्रबोधन कार्यात प्रेरणा दिली. ते दैनिक मराठाचे संपादक असताना त्यांनी लिहिलेल्या दैनिक मराठा वर्तमानपत्राच्या संपादकीय सदरात 'मुस्लीम महिला आणि समान नागरी कायदा' या संदर्भातील लेख)

५.१७ दक्षता नाही, दिशाभूलही नको! – संपादकीय

(मुंबई येथे भरवण्यात आलेल्या 'भारतीय मुस्लीम परिषदे'च्या पार्श्वभूमीवर दैनिक केसरी या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेला संपादकीय लेख)

देशाला आज एका मोठ्या स्थित्यंतराला तोंड द्यावे लागत असताना बिकट व गंभीर स्वरूपाच्या समस्यांना सामोरे जाणे क्रमप्राप्त आहे. या समस्या जशा अंतर्गत संघर्षातून निर्माण झाल्या आहेत, तशा बाह्य दडपणामुळे अथवा सत्तास्पर्धेच्या डावपेचांतूनही निर्माण झालेल्या आहेत. या दुहेरी आघाडीवर तोंड देण्यासाठी देशाची तयारी करीत असताना योग्य ती दक्षता घेतली जात आहे का नाही, याची चिकित्सा करणे अनिवार्य ठरते. केंद्रीय आरोग्य मंत्री उमाशंकर दीक्षित यांनी कलकत्ता येथे भरलेल्या अ. भा. काँग्रेसच्या ७४व्या वार्षिक खुल्या अधिवेशनात राजकीय ठरावावर भाषण करताना अशी दक्षता बाळगणे अत्यावश्यक असल्याचे म्हटले आहे. पण काँग्रेस पक्षाचे केंद्रीय व राज्यातील शासनकर्ते त्याबाबत प्रत्यक्षात कोणत्या धोरणाने वाटचाल करीत आहेत?

फुटिरांना उत्तेजन

अखिल भारतीय मुस्लीम परिषदेने मुंबई येथे नुकताच एक मेळावा भरवून शरीयतप्रणित व्यक्तिगत मुस्लीम कायद्यात बदल करण्याला सक्त विरोध दर्शविला आहे. 'या कायद्यात बदल करण्याची मागणी जोपर्यंत भारतीय मुस्लीम करीत नाहीत, तोपर्यंत भारत सरकार त्यात हस्तक्षेप करणार नाही' या सरकारच्या धोरणाचे या परिषदेने स्वागत केले आहे. एवढेच नव्हे, तर 'आपण सरकारवर दडपण घालण्यासाठी ही परिषद घेतलेली नसून मुस्लीम समाजात बंडखोरी करू पाहणाऱ्या गटांना मुस्लिमांचा पाठिंबा नाही' हे दाखविण्यासाठीच ही परिषद घेतलेली आहे, असे घोषित केलेले आहे. या परिषदेला काँग्रेस पक्षाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. परिषदेच्या या उद्योगाला विरोध दर्शवून 'बंडखोरां'चे म्हणणे परिषदेला सादर करण्यासाठी एक मोर्चा मुंबईत आयोजित करण्यात आला होता. हा मोर्चा परिषदेच्या जागेपासून दूर अंतरावर रोखण्यात आला, तर आपण त्याला विरोध करणार नाही, असे परिषदेच्या चालकांनी मान्य केले होते. प्रत्यक्षात मात्र तसे न घडता मोर्चेवाल्यांवरच परिषदेचे अनुयायी चालून गेले आणि दगडफेकीने त्यांना सडकवण्याचा प्रयत्न झाला! पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे या प्रसंगाला गंभीर वळण मिळाले नाही, हे खरे असले, तरी या घटनेने मात्र गंभीर स्वरूपाचा इशारा देऊन ठेवला आहे. भारतात धर्म-पंथ-भेदातीत समान नागरिकत्व निर्माण करून सर्वांना एकच कायदा लागू करण्याची राज्यघटनेची घोषणा आहे. मुस्लिमांना त्यात सवतासुभा ठेवण्याचे कारण नाही, पण भारताला स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे उलटून गेली, तरी त्या सवत्यासुभ्याला धक्का देण्याचा विचारही केला जात नाही.

सत्यशोधकांची मागणी

भारतीय मुसलमानांत जागृती करून त्या समाजाला राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्यासाठी प्रवृत्त करण्याकरिता समाज प्रबोधनाचा उपक्रम मुस्लीम सत्यशोधक समाजाने सुरू केला आहे. भारतीय राज्यघटनेने समान नागरी कायदा (कॉमन सिव्हील कोड) जारी करण्याचा आदेश दिलेला आहे. असा समान कायदा अमलात यावा, अशीच मुस्लीम सत्यशोधक समाजाची मागणी आहे, पण मुंबईच्या मुस्लीम परिषदेचा उद्देश या मागणीचा पाया उखडून काढण्याचाच होता. भारतात राहूनही आपले विभक्त समाजजीवन अबाधित राहावे, हा मुस्लिमांचा जुना दृष्टीकोन अद्यापी बदललेला नाही. ते समान नागरिकत्वाच्या भूमिकेवर आलेले नाहीत आणि त्यांच्यावर तसे काही दडपण घालावे, असा भारतातील राज्यकर्त्यांनी कधी प्रयत्नही केलेला नाही. उलट त्यांच्या मर्जीवर हा प्रश्न सोडून त्यांना एक प्रकारे उत्तेजन देण्यात येत आहे. धर्मांध मुसलमान केवळ स्वतःचे राज्य मानतात व स्वतःचे राज्य नसले, तर ते राहत असलेले राज्य शत्रू राज्य मानतात! या राज्यातील कायदा कानून मानावयाला ते अर्थातच तयार नसतात! पण ही आव्हानात्मक भूमिका राज्यकर्त्यांनी चालू द्यावयाची काय? भारतातील उदारमनस्क मुस्लिमांचे वा जगाची नवी वाटचाल ओळखणारे मुस्लीम सत्यशोधकांसारखे गट या प्रश्नाबाबत घेत असलेल्या भूमिकेची दखल घेऊन ती उचलून का धरत नाही? व्यवहारात ज्या उपक्रमाला सत्तेचा पाठिंबा मिळतो, त्या बाजूने अखेर कोणताही समाज जातो, हे सनातन सूत्र आहे. पण मुसलमानांचा सतत अनुनय करण्याची रीत अंगवळणी पडलेल्या सरकारला त्या मार्गापासून दूर होण्याचे धाडस होत नाही, हेच खरे!

परकीयांना वाव

भारत सरकारच्या या बोटचेप्या धोरणामुळेच पाकिस्तानसारख्या नवोदित राष्ट्राला भारतात आपले पंचमस्तंभी पेरून मुस्लीम जगताच्या निर्मितीच्या घोषवाक्याने सहानुभूती बाळगणारी एक फळी निर्माण करणे सुकर ठरते. बांग्लादेशाच्या स्वातंत्र्य लढ्याच्या निमित्ताने भारतात त्याचे दर्शन घडले आहे. बांग्लादेशाच्या निर्मितीनंतरही त्यात फरक पडलेला नाही. त्याची दखल घ्यावयास हवी, पण तिकडे काणाडोळाच केला जात आहे. या धोरणाची री जेव्हा अन्य क्षेत्रांत ओढलेली दिसते, तेव्हां त्याही क्षेत्रांत परकीयांना आपल्या कारवाया करण्याला पुरेसा वाव मिळतो. 'देशातील भाषिक तंटे, विद्यार्थ्यांच्या दंगली किंवा अन्य उठावांना देशाबाहेरील शक्ती हातभार लावतात' असा प्रचार सध्या काँग्रेसच्या अनेक नेत्यांकडून केला जातो. सी. आय. ए.च्या कारवायांवर तर उठसूट खापर फोडण्याचे तंत्र म्हणजे एक चेष्टेचा विषय झाला आहे! प्रश्न एवढाच आहे की, सरकार भय व्यक्त करत असलेल्या गोष्टींची नीट शहानिशा करून देशविरोधी उद्योगांना आळा घालण्यासाठी त्वरित दक्षता का घेत नाही? केवळ प्रचाराने देशातील पंचमस्तंभीयांचा उद्योग थांबेल, असे का सरकारला वाटते? परकीय राष्ट्राचे अनेक नागरिक भारतात या ना त्या मिषाने उघडपणे वावरतात. त्यांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जाते का? त्यांचा भारतातील कोणत्या व्यक्तींची, गटाशी व संघटनेची संबंध वाढत आहे, त्याची योग्य

ती नोंद घेतली जाते का? या संपर्कातून भारतात विद्रोह निर्माण करण्याची कारवाई केली जाते का? असे एक ना अनेक प्रश्न यातून निर्माण होतात. 'आपण त्याबद्दल दक्ष आहोत' असेच भारत सरकार म्हणते. तथापि ज्या परकीय हस्तक्षेपाने विद्रोही वृत्ती निर्माण केल्याचा संशय भारत सरकारला येतो, त्याचे मूळ सरकारला गवसले की नाही? गवसले असेल, तर त्याविरुद्ध सरकारने कोणती उपाययोजना केली आहे?

हितसंबंधाचा लढा

भारत-सरकार आज देशाचे तारू एका विशिष्ट उद्दिष्टाने हाकारीत आहे. नागरिकांना समान कायद्याचा आधार व संरक्षण देऊन सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करून देण्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यात ज्या हितसंबंधीयांचे आसन डळमळीत होणार आहे – मग जातीय असोत, धार्मिक असोत, आर्थिक क्षेत्रातील असोत, राजकीय स्वरूपाचे असोत वा अन्य कोणते असोत – साहजिकपणे आपल्या हितसंबंधांना धक्का लागू नये म्हणून ते सावध होणार आहेत. हा संघर्ष आज देशात अनेक आघाड्यांवर चालू आहे. त्यातूनच विरोधी गटांमध्ये लढा निर्माण होणे अपरिहार्य आहे, पण देशातील या संघर्षात जर कोणी मदतीसाठी बाहेर दृष्टी ठेऊन बागत असेल वा ती घेत असेल, तर त्याच्यावर करडी नजर ठेवणे अगत्याचे आहे. *(केसरी, ३० डिसेंबर १९७२)*

५.१८ उगाच बाऊ कशाला करता? – संपादकीय

(मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील सुधारणाविषयक प्रयत्न आणि त्यास होत असलेल्या विरोधाचा समाचार घेणारे 'दैनिक केसरी' या वर्तमानपत्रातील लेख)

सुजाण, समंजस, विचारी आणि काळाची पावले उमगणाऱ्या सुसंस्कृत मुस्लिमांनी इस्लामी वैयक्तिक कायद्यात बदल करण्याच्या पुन्हा केलेल्या मागणीकडे फार काळ दुर्लक्ष करणे या देशाच्या हिताचे ठरणार नाही. अर्थात, याची जाणीव शासनाला होईल, असे आज तरी वाटत नाही. १८ एप्रिल १९६६ रोजी मुंबईत एका दुपारी सात मुस्लीम स्त्रियांचा मोर्चा मुख्यमंत्र्यांकडे गेला होता आणि मुस्लीम समाजातील बहुपत्नीत्वाच्या जुलमाविरुद्ध त्यांनी एक निवेदन मुख्यमंत्र्यांना सादर केले होते. त्या वेळी 'आपण ज्या समाजात जन्म घेतला, त्या समाजाचे या प्रकरणी मन वळविण्याचा प्रयत्न करा' असे सांगून त्यांची ज्या पद्धतीने बोळवण करण्यात आली होती, त्याच पद्धतीने 'इंडियन सेक्युलर सोसायटी' आणि 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' यांच्यातर्फे रविवार दि. २५ मार्च रोजी मुंबईत भरलेल्या मुस्लीम सामाजिक परिषदेच्या मागण्यांची वाट लावण्यात येईल, या विषयी आम्हाला शंका नाही! कारण उघड आहे. मुल्ला, मौलवी आणि उलेमा यांनी आपल्या स्वार्थासाठी मुस्लीम समाजात पोसलेले अज्ञान आणि मुस्लीम 'राजकीय' पुढाऱ्यांनी आपल्या तुंबड्या भरण्यासाठी या समाजात माजविलेली धर्मांधता आणि फैलाविलेली फुटीरता यांच्याशी सौदेबाजी करणे आजच्या राज्यकर्त्यांना अधिक फायद्याचे वाटते.

झापडे लावणारी भूमिका

या गडबडीत बहुपत्नीत्वाच्या जाचापायी रडकुंडीला आलेली आणि बिड्या वळून नवऱ्याच्या हातावर मुकाट्याने मजुरी ठेवणारी एखादी आयेशा किंवा नवऱ्याने काडीमोड घेऊन घराबाहेर काढल्यामुळे प्राण कंठाशी आलेली एखादी फातिमा किंवा वडिलांच्या निधनामुळे आजोबांच्या संपत्तीत वाटा न मिळालेला एखादा पोरका अब्दुल रस्त्यावर टाचा घासून मेला, तर कोणाचे काय जाते? याबाबत शासनावर थोडीच काही जबाबदारी येते? आत्महत्येचा प्रयत्न फसला, तर संबंधित व्यक्तीवर खटला भरण्यासाठी पुढे सरसावणारे शासन रोज कणाकणाने झुरणाऱ्या या माणसांकडे पाठ फिरवते, हा धर्मनिरपेक्षतेवरील नव्हे, माणुसकीवरील कलंक आहे, याची जाणीव शासनाला कधी होणार आहे? 'एखाद्या अल्पसंख्य समाजातील बहुसंख्य व्यक्तींनी आवाज उठविल्याशिवाय त्या समाजात उघडउघड चालणारे अन्याय आम्ही दूर करणार नाही' अशी झापडे लावणारी भूमिका शासनाने घेतली, तर तिचे परिणाम त्या समाजातील अन्यायापुरतेच मर्यादित राहू शकत नाहीत. शासनाच्या या हटवादी, एकान्तिक आणि स्वार्थी भूमिकेमुळे मुस्लीम समाजात वेगळेपणाची आणि राष्ट्रीय जीवनप्रवाहापासून अलग राहण्याची पोसली जाणारी भूमिका केवळ त्या समाजालाच नव्हे, तर येथील राष्ट्र-शासनालाच सुरुंग लावणारी ठरते.

मुस्लीम समाजातील या घोर अन्यायाकडे काणाडोळा करून आम्ही या देशात न्यायावर आधारलेली समाज रचना निर्माण करू पाहणे, यासारखा हास्यास्पद प्रकार कोणताही नाही.

सुधारणेच्या दिशेने पावले

आज या देशात कायद्याचा बाऊ कशासाठी करण्यात येतो? राष्ट्रीय कर्जे, विमा, प्राप्तिकर, खरेदी-विक्रीचे आजचे व्यवहार, प्रवासी वाहतुकीसंबंधीचे नियम, औद्योगिक कायदे यांच्यापुढे जर इस्लामी कायद्याला अपरिहार्यपणे वाकावे लागते, तर व्यक्तिस्वातंत्र्याच्या आधुनिक कल्पनांपुढे इस्लामी वैयक्तिक कायद्याचा तोरा चालू ठेवून आम्ही काय साधू पाहणार आहोत? १९१५ पर्यंत केवळ व्यापारविषयक आणि फौजदारी कायद्यांचेच बरेचसे आधुनिकीकरण करून थांबलेल्या अरब जगातील मुस्लीम बहुसंख्येच्या अनेक राष्ट्रांनी नंतर इस्लामी कायद्याच्या काळजाला – वैयक्तिक कायद्याला – हात घातलाच ना? 'इस्लामी कायद्याच्या चार पंथांपैकी एखाद्या पंथाचे मत नव्या काळाला अधिक अनुकूल असले, तर त्या प्रश्नापुरता अपवाद करून त्याच मताप्रमाणे आपल्या न्यायालयांत निवाडा करावा' असे बंधन अनेक राज्यकर्त्यांनी घातले! याखेरीज जुन्या कायदेपंडितांनी मांडलेली, पण प्रचलित नसलेली आणि वरील चार पंथांपैकी कोणत्याच पंथाच्या कायदा पद्धतीत नसलेली व्यक्तिगत स्वरूपाची मतेही पुढे करून काही सुधारणा करण्यात आल्याच. न्यायालयापुढे कोणता दावा चालू शकेल, ते ठरविण्याचा अधिकार वापरूनही कधीकधी सुधारणेच्या दिशेने पाऊल टाकण्यात आले. हे सारे परंपरावाद्यांना न बुजता करण्यात येत होते, हे विशेष! ट्युनिशियाने १९५७च्या कायद्याने तर चक्क 'बहुपत्नीत्वावर बंदी' घालण्याचेच स्पष्ट केले! मोरोक्कोने १९५८मध्ये केलेला कायदा यापेक्षा थोडा 'मवाळ' आहे, पण नवऱ्याने दुसरा विवाह केल्यामुळे एखाद्या स्त्रीवर अन्याय होत असेल, तर त्याची दखल कोर्टात घेण्याची तरतूद त्यांनीही केली आहेच. इजिप्तने तर विवाहयोग्य वय ठरविण्यापासून घटस्फोटाच्या पद्धतीतील अनेक प्रकारचे अन्याय दूर करण्यापर्यंत मजल मारली आहे. जॉर्डनने १९५१मध्ये, सीरियाने १९५३मध्ये आणि इराकने १९६१मध्ये इस्लामी वैयक्तिक कायद्यात बदल केले, याचा विसर न व्हावा! पाकिस्ताननेही १९६१च्या 'मुस्लीम कुटुंब कायद्या'च्या आधारे इस्लामी वैयक्तिक कायद्यांतच तथाकथित ढवळाढवळ केली आहे!

सरकार बुजते तरी कशाला?

या देशातील मुस्लिमांना राष्ट्रजीवनाच्या प्रवाहापासून बाजूला राहू द्यावयाचे नसेल, तर शासनाने आपल्या डोळ्यांवरील झापडे काढली पाहिजेत असे वाटते, ते यामुळेच! 'असहिष्णू, धर्मांध मुल्ला-मौलवी आणि स्वार्थांध सौदेबाज पुढारी यांच्या प्रभावाखालून मुस्लीम समाजाला दूर करावयाचे असेल, तर समान नागरी कायदा करावा आणि तो होत नाही तोपर्यंत मुस्लीम वैयक्तिक कायद्यातील दोष दूर करण्यासाठी कायदे करावेत' अशी मागणी प्रा. असफ ए. ए. फैजी यांच्यासारखा इस्लामी कायद्याचा प्रकांड पंडित करीत असताना आणि हमीद दलवाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांसारखे कार्यकर्ते समाजात ठाम उभे असताना सरकार बुजते तरी

कोणाला? मुस्लीम समाज धर्मांध वृत्तीच्या धार्मिक-राजकीय पुढाऱ्यांपासून दूर राहिला, आधुनिक शिक्षणाची त्याने कास धरली, तर त्यात त्या समाजाचेच नव्हे, येथील राष्ट्रजीवनाचेच भले होणार आहे, हे आम्हाला जितक्या लवकर समजेल, तितके बरे! मुस्लीम समाजातील तरुण सुशिक्षितांवर या प्रकरणात विशेषच जबाबदारी येऊन पडते. प्रा. फैजी यांनी या परिषदेत मांडलेले विचार काही नवीन नव्हेत. इस्लामी कायद्यावरील आपल्या गाजलेल्या ग्रंथापासून 'ए मॉडर्न ॲप्रोच टू इस्लाम' यासारख्या पुस्तकापर्यंत विविध ठिकाणी त्यांनी आपले हे विचार खंबीरपणे मांडले आहेत. मौलाना आझाद यांनी उदारमतवादी दृष्टीकोनातून कुराणावर केलेले भाष्य हेही काही नवे नव्हे. अरब जगात या संदर्भात विचारवंतांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शनही काही अपरिचित नाही. अशा परिस्थितीत या नव्या विचारांचा पाठपुरावा करून ते प्रा. फैजींसारखे विचारवंत आणि हमीद दलवाई यांच्या विचारांशी जोडून घेतले पाहिजे. *(केसरी, २८ मार्च १९७३)*

५.१९ तलाक व सवतपीडित मुस्लीम महिला परिषद – यदुनाथ थत्ते

(मंडळाच्या वतीने तलाकपीडित मुस्लीम महिलांची परिषद पुण्यात आयोजित करण्यात आली. या संदर्भात ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार यदुनाथ थत्ते यांनी सकाळ वर्तमानपत्रातील 'मुस्लीम मनाचा कानोसा' या सदरात मुल्कपरस्त या टोपण नावाने लेखन केले.)

पुण्यातील न्यू मोदीखाना मशिदीच्या पेश इमाम साहेबांनी आपली मुलगी सवत म्हणून एका रिक्षावाल्याच्या गळ्यात बांधण्याचा इरादा केला. तो निकाह लागल्यानंतर रिक्षावाल्याच्या पहिला बायकोने हरकत घेतली आणि आपल्या नवऱ्याकडून तिथल्या तिथे फारकत मिळवली. या बातमीने मुस्लीम समाजात चांगलीच खळबळ उडवून दिली आहे. पुण्याच्या वृत्तपत्रांतून हल्ली मुस्लीम समाज जीवनाचे प्रतिबिंब उमटू लागले आहे. त्यामुळे या बातमीचाही गवगवा झाला. पेश इमाम साहेबांनी शरीयतचा हवाला देऊन 'चार बायका करण्याला इस्लाममध्ये मुभा आहे' या सबबीखाली आपल्या कृत्याचे समर्थन करण्याचा केलेला लंगडा प्रयत्न आणि इस्लामचा हवाला देऊन एका मुस्लीम भगिनीने त्यांच्या दुष्कृत्याचे काढलेले वाभाडे याची बातमी पसरायला वेळ लागला नाही. परंतु बऱ्याचशा मुस्लीम स्त्रिया निरक्षर असल्याने त्यांना मात्र कर्णोपकर्णीच या गोष्टी कळल्या. त्यामुळे स्त्रियांमध्ये एक आनंदाची लहर पसरली. धर्माच्या नावाखाली होणाऱ्या अन्यायावरही काही तोडगा आहे, हे पाहून त्यांना दिलासा मिळाला असेल, तर ते स्वाभाविक आहे. या प्रकरणी पुण्यातील मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांचा हात आहे, हे कळल्यामुळे कित्येक स्त्रिया त्या कार्यकर्त्यांचा शोध घेऊ लागल्याचे आढळले.

अडगळीसारखे कलम

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने जबानी तलाकला आणि सवतीला बंदी करावी, अशी मागणी फार पूर्वीच केलेली आहे. 'समान नागरी कायदा' हा त्यांना त्यावरील एक प्रभावी इलाज वाटतो. भारतीय संविधानाने असा कायदा करण्याची जबाबदारी राज्यावर टाकली आहे. संविधानातील ४४वे मार्गदर्शक कलम तसा आदेश देते, पण ते कलम गेली पंचवीस वर्षे संविधानाच्या संहितेत अडगळीसारखे पडून आहे! पुण्यात भरलेल्या मुस्लीम महिला परिषदेत समान नागरी कायद्याची मागणी करण्यात आली होती आणि त्याच वेळी वेगवेगळ्या केंद्रांतून तलाकपीडित मुस्लीम महिलांची माहिती मिळविण्याच्या कामाला सुरुवातही झाली होती. किती मामुली कारणांनी मुस्लीम स्त्रियांना बेदरकारपणे तलाक दिले जातात! त्याच्या कहाण्या अंत:करणात कालवाकालव निर्माण करतात. न्यू मोदीखाना मशिदीच्या पेश इमाम साहेबांच्या कन्येच्या निकाहच्या निमित्ताने पुन्हा एकदा मंडळाच्या कार्यकर्त्यांकडे तलाक-सवतपीडित मुस्लीम स्त्रिया व त्यांचे नातेवाईक मोठ्या आशेने येऊ लागले आहेत.

भरल्या संसारातून उठवले

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे पुण्यातील कार्यकर्ते सय्यदभाई या प्रकरणी विशेष लक्ष घालीत आहेत. त्यांच्या स्वतःच्या दोन बहिणी तलाक-सवतपीडीत असून त्यांच्यावर गुदरलेला प्रसंग त्यांनी स्वतःच अनुभवला आहे. कुठल्याही रास्त कारणावाचूनच त्या दोघींना संसारातून उठवण्यात आले होते आणि त्यांची दाद समाजातले बुजुर्गदेखील लावून देऊ शकले नव्हते. 'सवत' आणि 'तलाक' या वरवर जरी भिन्न गोष्टी दिसत असल्या, तरी त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे उघड आहे. स्वतः सय्यदभाईंचे कुटुंबच त्यात होरपळून निघाले असल्याने त्यांना हा प्रश्न महत्त्वाचा वाटावा, हे स्वाभाविक आहे. 'पुणे-मुंबई रस्त्यावर भारत पेन्सिल या कारखान्याच्या आवारात तलाक-सवतपीडित महिलांनी व त्यांच्या नातेवाइकांनी दुपारी भेटावे' असे त्यांनी वृत्तपत्रात जाहीर केल्यानंतर त्यांच्या कानी आपले गऱ्हाणे घालण्यासाठी लपून-छपून अनेक स्त्री-पुरुष येऊ लागले आणि दर्दनाक कहाण्या सांगू लागले. ही सर्व माहिती आता नीटनेटकी एकत्र करण्यात येत आहे. मुस्लीम स्त्रियांच्या जीवनाचे एक विदारक दृश्य त्यामुळे समोर येऊ लागले आहे.

समाजसेवेची परंपरा नाही

सामाजिक अन्याय आणि जुलूम हे समुद्रात तरंगणाऱ्या एकाद्या बर्फाच्या टेकाडासारखे असतात. त्यांचा जेवढा भाग वर दिसतो, त्याच्या सात-आठ पट भाग पाण्याखाली लपलेला असतो. स्त्रिया आणि मुले यांच्या बाबतीत घडणाऱ्या जुलमांची स्थिती अशीच आहे! अनाथालय आणि महिला सेवाग्राम यांसारख्या संस्थांमुळे आता काही प्रमाणात हिंदूंपुरती तरी नोंद होऊ लागली आहे. मुसलमानांत यतीमखाने आहेत. पण त्यांच्या कामात अद्याप दयाबुद्धीचा भाग जास्त आहे; शास्त्रशुद्ध अभ्यासाची तिथे काहीच तजवीज नसते. स्त्रियांसाठी तर बोटांवर मोजण्याइतक्यादेखील संस्था नाहीत. पीडितांची सेवा करणाऱ्या संस्थादेखील अद्याप पूर्णतः जातिधर्मभेदांतून मुक्त झालेल्या नसल्याने त्या-त्या समाजातील पीडित त्या-त्या जमातींनी चालवलेल्या संस्थांकडेच वळतात. मुस्लीम समाजात दुर्दैवाने धर्म आणि राजकारण यांत उचापती करणारी मंडळी बरीच असली, तरी समाजसेवा करणारी मानवतावादी मंडळी अत्यल्प आहेत! इस्लाम हा शेवटचा किताबी धर्म समजला जातो व त्याने तत्पूर्वीच्या किताबी धर्मांच्या संस्थापकांना प्रेषित म्हणून मान्यता दिली आहे. महंमदांपूर्वीचे प्रेषित म्हणून इसालाही (येशू ख्रिस्त) ते रसूल मानतात. पण इसाई मंडळींमध्ये असलेल्या मानवसेवेच्या परंपरेचा आढळ मात्र इस्लाममध्ये फारसा होत नाही. शिक्षणसंस्था आणि वसतिगृहे यांच्या पलीकडे त्यांच्या समाजसेवेची झेप फारशी गेलेली नाही.

फारकतीसाठी धर्मपरिवर्तन

तलाक-सवत या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि आपल्या संविधानाने धर्म परिवर्तनाची म्हणजे बाटवा-बाटवीची मुभा दिलेली असल्याने अनेक अन्य धर्मीय आपल्या

वासना तृप्तीसाठी इस्लामचा आश्रय घेताना आढळतात. 'धर्म परिवर्तनातील रती-मदन' नावाचा एक लेख पूर्वी प्रसिद्ध झाला होता आणि शुद्धीकरणाच्या बातम्यांना जोडूनच विवाहाच्या बातम्या कशा दिल्या जातात, त्याची हकिकत प्रसिद्ध झाली होती. मुंबईमधील बाटवण्याच्या प्रकारांचा अभ्यास अलीकडेच झाला व त्यावरूनही असाच निष्कर्ष निघाला की, एकट्या मुंबईत फारकत मिळवण्याच्या लालसेने धर्म परिवार्तनाचे अनेक प्रकार घडतात! नवरा-बायकोंपैकी कोणाही एकाने धर्म बदलला, तरी झटपट फरकत मिळते! सवत-तलाकची सोय असल्याने वासनेच्या आहारी गेलेली कित्येक मंडळी इस्लामकडे वळलेली दिसतात. वास्तविक, भिन्न धर्मीयांचे विवाह आता नोंदणी पद्धतीने होऊ शकतात, त्यामुळे धर्म परिवर्तन हे फारकतीचे कारण होता कामा नये, पण अद्‌ध्याप ते होते आणि या सवलतीचा फायदा उपटणाऱ्यांत पुरुषांचे प्रमाण अधिक आहे. इस्लाममध्ये पोटगी देण्याची सोय नसल्याने त्याचाही फायदा लाटता येतो.

सर्वांचा सामाजिक प्रश्न

तलाक-सवत बंदी हा आता एकट्या मुस्लीम भगिनींचा प्रश्न राहिलेला नाही. तो सर्व धर्मीय व निधर्मी मंडळींचा प्रश्न बनला आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुण्यातील कार्यकर्त्यांनी तलाक-सवत पीडित मुस्लीम महिला व त्यांच्याबद्दल सहानुभूती बाळगणारी इतर मंडळी यांची एक परिषद घेण्याचे ठरवले असून त्या दृष्टीने तयारीला प्रारंभ केला आहे. या तयारीचाच एक भाग म्हणजे तलाक-सवतपीडित स्त्रियांची माहिती जमवण्याचे त्यांनी सुरू केलेले काम होय. मुस्लीम सत्यशोधक मंडळाजवळ साधने तुटपुंजी आहेत आणि शास्त्रीय पाहणीसाठी आवश्यक निष्णात अभ्यासकांचाही अभाव आहे. पुणे, नागपूर, मुंबई यांसारख्या ठिकाणी समाजसेवा शास्त्राचे शिक्षण देणाऱ्या नामवंत संस्था आहेत. पुण्याची कर्वे समाजशास्त्र संस्था, मुंबईची टाटा समाजशास्त्र संस्था, निर्मला निकेतन व विद्यापीठाचा समाजशास्त्र विभाग, नागपूरचे महिला समाजसेवा महाविद्यालय यांसारख्या संस्थांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या तळमळीला आपल्या साधनांची व शास्त्रीय ज्ञानाची जोड दिली, तर आंतरराष्ट्रीय महिला वर्षात एक महत्त्वाच्या उपक्रमाला त्यांनी साहाय्य केल्याचे श्रेय त्यांना मिळेल. त्यासाठी सरकारी व निमसरकारी संस्थांचे आर्थिक साहाय्यही मिळवता येईल. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते अशा सहकार्याला उत्सुक आहेत, असे दिसते.

(सकाळ, ३ ऑक्टोबर १९७५)

(यदुनाथ थत्ते: ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे चाहते आणि पाठीराखे. यदुनाथ थत्ते हे साधना साप्ताहिकाचे संपादक होते. मुस्लीम विषयांवर त्यांनी विपुल लेखन केलेले आहे.)

५.२० मुस्लीम समाज व सामाजिक सुधारणा – प्रा. वि. अ. शेख

(मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे फलटण येथील कार्यकर्ते प्राचार्य विलायत शेख यांनी दैनिक सकाळमध्ये मंडळाची महिला प्रश्नांसंदर्भातील भूमिका स्पष्ट करण्यासाठी लिहिलेला लेख)

मुस्लीम सत्यशोधक मंडळींना किंवा समाजसुधारकांना धर्मामध्ये हस्तक्षेप करावयाचा नसून सामाजिक सुधारणा घडवून आणावयाच्या आहेत.

रूढीवादी मुस्लिमांना खरा संताप कोणत्या गोष्टीचा येत असेल, तर समान नागरी कायद्याबाबतच्या समर्थनाचा येतो. सामाजिक नियम कालमानाप्रमाणे बदलतात. जो समाज असा बदल करण्यास तयार होत नाही, तो दूर फेकला जातो. राष्ट्रनिष्ठा, शिक्षण, गोषा पद्धती बंद करणे इ. बाबत धर्माचा बाऊ गैर आहे. सामाजिक जीवनामध्ये धर्माचे स्तोम माजवून आजच्या मानवतेच्या युगामध्ये सांप्रदायिकतेच्या भिंती ऊभ्या करणे अनिष्ट आहे.

धार्मिक आचाराचे स्वातंत्र्य

भारताच्या राज्यघटनेने प्रत्येकाला आपल्या इच्छेप्रमाणे धर्माचे आचरण करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य दिलेले आहे. परमेश्वराची प्रार्थना कशी करावी, हा ज्याचा-त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. परंतु धार्मिक आचार व चालीरीती यांत फरक आहे. चालीरीती कालमानाप्रमाणे बदलतात. सामाजिक बदल ही प्रगतीची निशाणी. 'सामाजिक बदल म्हणजे धर्मात हस्तक्षेप' ही हाकाटी व्यर्थ आहे.

जगातील मुस्लीम राष्ट्रांकडे पाहिल्यास त्यांनी आपल्या सामाजिक नियमांमध्ये वेळोवेळी बदल केल्याचे आपल्याला दिसून येते. तुर्कस्तानने १९१५ पासून आपल्या देशामध्ये पाश्चात्त्य सुधारणांचा अवलंब सुरू केला. लेबनान, इराण इ. देशांमध्ये नवीन नियम बनविण्यात आले व स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार देण्यात आले. केनियासारख्या मुस्लीम अल्पसंख्याक देशामध्येही मुस्लीम कायद्यात बदल करण्यात आला; स्त्रियांना शिक्षण देऊन सुधारणा घडवून आणल्या गेल्या.

भारतीय मुस्लीम कायदा स्त्रियांवर अन्याय करणारा आहे. पुरुष आपल्या इच्छेने लग्न करू शकतो व स्त्रीला एकतर्फी तलाक देऊ शकतो. मग अशी स्त्री निराधार बनते. अशा स्त्रियांची पाहणी करून त्याचा अहवाल तयार केल्यास अशा पीडित स्त्रियांना कोणत्या हालअपेष्टांना तोंड द्यावे लागते, याची प्रचिती येईल. सामाजिक सुधारणांसाठी सुशिक्षित मुस्लीम तरुणांनी पुढे येण्याची गरज आहे. गतानुगतिकतेच्या जोखडामध्ये ते गुंतून राहिल्यास काळ त्यांना क्षमा करणार नाही कारण 'थांबला तो संपला.'

एकपत्नीत्वाच्या कायद्याचा पुरस्कार

आपण बारकाईने निरीक्षण केल्यास अगदी अपवादात्मक परिस्थितीत जास्त लग्न केलेली उदाहरणे आढळतील. मग असा कायदा होण्यास विरोध करण्यात स्वारस्य काय आहे? खरे म्हणजे मुस्लिमांनी स्वतःच या कायद्याच्या पुरस्कारासाठी सज्ज व्हावे. म्हणजे मुस्लिमांच्या विरोधी प्रचारांमधील हवा निघून जाईल. आपल्याच समाजाच्या हितासाठी मुस्लिमांनी या प्रश्नास चालना द्यावी. ज्या राष्ट्रामध्ये वास्तव्य करावयाचे तेथील समान नागरिक अधिकार आज ना उद्या मानावेच लागतील. मुस्लीम सत्यशोधक मंडळ नोव्हेंबरमध्ये 'तलाकपीडित महिला परिषद' घेण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. त्या दृष्टीने अशा पीडित महिलांची माहिती मिळवून त्यांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने कार्यप्रवृत्त होण्याचा मुस्लीम युवकांनी प्रयत्न करावा.

महिला शिक्षण प्रसार व स्वातंत्र्य

आपल्या देशात शिक्षणाचा प्रसार त्या मानाने कमी ; मुस्लिमांमध्ये त्यापेक्षाही कमी व मुस्लीम महिलांमध्ये तर हे प्रमाण नगण्य. शहरामधील काही उदाहरणे अभिप्रेत धरून उपयोग नाही. विशेषतः सुशिक्षित मुस्लिमांनी इतरांना शिक्षित करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. याबाबत दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, सुशिक्षित मुस्लीमही सांप्रदायिकतेच्या फेऱ्यातून बाहेर पडण्यास धजत नाहीत. स्वार्थी मुस्लीम नेते व काही उर्दू पत्राचे संपादक त्यांना वैचारिकदृष्ट्या परावलंबी बनवितात. त्यामुळे मुस्लीम तरुणांची स्थिती चमत्कारिक झालेली आहे. मग स्त्रियांचे बाबत तर बोलावयासच नको. या दृष्टीने युवकांनी स्त्री–शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात करण्याची गरज आहे.

सुरुवातीला थोडा त्रास होईल, पण कोणीतरी हे केले पाहिजे. खेड्यापाड्यांतून विरळपणे पसरलेल्या मुस्लिमांची स्थिती तर फार दयनीय आहे. ते स्वतंत्रपणे विचारच करू शकत नाहीत. मुस्लीम युवकांनी राजकारणाच्या फडाकडे डोकावण्यापेक्षा किंवा केवळ पारंपरिक सांप्रदायिक फेऱ्यामध्ये फिरण्यापेक्षा समाज सुधारणेचे कार्य हाती घ्यावे. सर्वत्र आंतरराष्ट्रीय महिला वर्षाचे पवाडे गायिले जात असताना मुस्लीम महिलांनी मागे राहून चालणार नाही. *(सकाळ, ९ ऑक्टोबर १९७५)*

(प्रा. विलायत हुसेन शेख : हे मंडळाचे सातारा जिल्ह्यातील फलटण येथील बुद्धिप्रामाण्य कार्यकर्ते होते. त्यांनी मंडळाचे कार्यकारिणी सदस्य व उपाध्यक्ष म्हणून काम केले.)

५.२१ जिनांचा सल्ला मानणाऱ्यांचा हमीद दलवाई–द्वेष – संपादकीय

(मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांना मुस्लीम नेत्यांच्या असंतोषाचा सामना करावा लागत असतानाच त्यांना मूत्रपिंडाच्या आजाराने घेरले. या वेळी महाराष्ट्र शासन आणि पंतप्रधान यांनी दलवाईंना आर्थिक मदत जाहीर केली. यासही दलवाई विरोधकांनी आक्षेप नोंदवला. याचा समाचार घेणारे दैनिक महाराष्ट्र टाइम्समधील संपादकीय)

हमीद दलवाई एका गंभीर दुखण्याने आजारी असल्याचे वृत्त प्रस्तुत होताच साऱ्या महाराष्ट्रभर जनतेला हळहळ वाटली. त्यांना सहानुभूती व शुभेच्छादर्शक हजारो पत्रे आली. इंडियन सेक्युलर सोसायटीने काही व्यक्तींकडे आर्थिक मदतीचे आवाहन केले, तेव्हा लोकांनी स्वयंस्फूर्तीने हजारो रुपये धाडले. हा पैशाचा ओघ नसता, तर जसलोकसारख्या हॉस्पिटलमध्ये त्यांना उपचार करणे अशक्य झाले असते. त्यांची दोन्ही मूत्रपिंडे निकामी होत चालली असल्याचे दिसून आल्यावर, दुसऱ्या कोणाचे तरी मूत्रपिंड काढून आरोपण करणे आवश्यक झाल्यावर वृत्तपत्रातून जाहीर आवाहन केले गेले. त्यालाही उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. अनेक जणांनी स्वतःचे मूत्रपिंड काढून हमीद दलवाईंना देण्याची तयारी दर्शविली. त्यात फक्त एवढीच अडचण होती की, बाहेरचे मूत्रपिंड दलवाईंचे शरीर स्वीकारेल की नाही. त्यासाठी टिश्यू मॅचिंग टेस्ट यशस्वी होत नव्हत्या. कमीत कमी ५० टक्के टिश्यू मॅचिंग होणे आवश्यक होते. फाशीची शिक्षा झालेले एक कैदी फिरोज दारूवाला यांनी आपली शिक्षा अमलात आणल्यानंतर दोन्ही मूत्रपिंडे दुसऱ्याचे प्राण वाचविण्यासाठी दान करावयाची इच्छा सुदैवाने याच वेळी व्यक्त केली. आणि चमत्कार असा की, दारूवाला यांचे टिश्यू तपासल्यावर ५० टक्के मॅचिंग होत असल्याचे दिसून आले. हमीद दलवाई यांच्या कार्याची दखल साऱ्या महाराष्ट्राने घेतली आहे. त्यांचे बद्दल जातीयवादी मुस्लीम नेतृत्वाखेरीज इतर सर्वांना आदरभावना आहे. मग महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना दुसरी काही भावना असण्याचा प्रश्नच नव्हता. 'हमीद दलवाई यांचे प्राण वाचले नाहीत, तर साऱ्या महाराष्ट्राची अपरिमित हानी होईल' असे त्यांचे ठाम मत झाले. मंत्रिमंडळातील आपल्या सहकाऱ्यांशी सल्लामसलत करून त्यांनी ५०,००० रु.ची मदत जाहीर केली आणि फिरोज दारूवाला यांची फाशीची शिक्षा तहकूब करण्याची व्यवस्था केली. या निर्णयाचे महाराष्ट्रभर स्वागत झाले.

पंतप्रधानांचेही साहाय्य

मुख्यमंत्र्यांनी ५०,००० रुपयांचे अनुदान जाहीर केले, त्याअगोदर तीनचार महिन्यांपूर्वी इंडियन सेक्युलर सोसायटीच्या आवाहनावरून ज्यांनी ज्यांनी आपणहून मदत पाठवली, त्यांत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचाही समावेश आहे. पंतप्रधानांनी दोन हजार रुपये आणि केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने एक हजार रुपये धाडून जरूर पडल्यास अधिक मदतीचेही आश्वासन दिले होते.

'मूत्रपिंडाचे आरोपण करावे लागेलच' असे निदान त्या वेळी झाले नव्हते. त्यामुळे 'छोट्या छोट्या देणग्यांनी काम होईल' असे वाटले होते. आरोपणाच्या खर्चाचा प्रश्न मुख्यमंत्र्यांनी एका रकमेच्या देणगीने सोडविला.

पंतप्रधान आणि केंद्रीय आरोग्य खाते यांच्या देणग्यांनी एकच गोष्ट सिद्ध झाली. ती म्हणजे, हमीद दलवाई यांच्या कार्याचे चीज नुसत्या महाराष्ट्रातच नव्हे, तर साऱ्या देशभर झालेले आहे. दिल्ली, सिमला, हैदराबाद यांसारख्या महाराष्ट्राबाहेरच्या कित्येक व्यक्तींनीही फूल ना फुलाची पाकळी म्हणून शक्य ती मदत धाडली होती. अशा रीतीने हमीद दलवाई यांच्याबद्दल साऱ्या देशभर चिंता निर्माण झाली असता मुस्लीम लीगसारख्यांनी नतद्रष्टपणा करावा, यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. लीगवाल्यांचा काळा इतिहास साऱ्या देशाला माहीत आहे.

खोटी हाकाटी

आगरकर-फुले यांच्यासारख्या श्रेष्ठ समाज सुधारकांना ज्या दिव्यातून जावे लागले, त्याच दिव्यातून आज अनेक वर्षे हमीद दलवाई आणि त्यांचे सहकारी धैर्याने जात आहेत. जातीयतेच्या नशेने पछाडलेल्यांकडून साध्या माणुसकीचीही अपेक्षा बाळगणे व्यर्थ आहे. आज वर्षानुवर्षे मुस्लीम लीगच्या आणि इतर सनातनी मुसलमान पुढाऱ्यांनी हमीद दलवाई यांनी पैगंबरांची विटंबना केल्याची अत्यंत खोटी हाकाटी चालविली आहे. हा अपप्रचार कैक वर्षे चालू असूनसुद्धा दिवसेंदिवस अधिकाधिक मुसलमान तरुण दलवाईंकडे आकर्षित झालेले आहेत. लीगवाल्यांचे दुःख हे की, त्यांच्या पायाखालची वाळू घसरत चालल्याचे त्यांना कळून चुकले आहे. दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते मुस्लीम वस्त्यांतून उघड उघड प्रचार करीत आहेत; पुण्याच्या सदाशिव-नारायण पेठांतून नव्हे. नुकत्याच झालेल्या ईदच्या दिवशी पुण्याच्या कार्यकर्त्यांनी मशिदींजवळ उभे राहून परित्यक्ता मुसलमान स्त्रियांच्या मदतीसाठी फंड गोळा केला. त्यांना अपेक्षेबाहेर प्रतिसाद मिळाल्यामुळे लीगवाल्यांचे पित्त अधिकच खवळले आहे.

जिनांचा सल्ला मानला

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दोन-तीन महिन्यांनी, म्हणजे नोव्हेंबर १९४७ मध्ये अखिल भारतीय मुस्लीम मेळाव्यात भाषण करताना मौलाना आझादांनी जातीय पक्ष बरखास्त करण्याचे जाहीर आवाहन केले होते. त्यानंतर एकच महिन्याने भारत आणि पाकिस्तान यांतील मुस्लीम लीगचे कार्यकर्ते कराची लीग अधिवेशनात एकत्र आले. या सभेत मौलाना आझाद यांचा धिक्कार होऊन भारतात लीग चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. भारतीय लीगचे नेतृत्व कोणी करावयाचे, हेही ठरले. या सर्व गोष्टी जिनांच्या अध्यक्षतेखाली झाल्या. जिनांनी मौलाना आझाद यांच्या नोव्हेंबरमधल्या भाषणावर अत्यंत कठोर टीका केली. 'लीग कार्यकर्त्यांची इच्छा असल्यास आपण स्वतः स्वतंत्र भारतातल्या मुस्लीम लीगचे नेतृत्व करू' असे जिनांनी जाहीर केले. स्वतंत्र भारताच्या मुस्लीम लीगचे नेतृत्व कोणी करावे, हेही जिनांनीच ठरविले. आजच्या भारतातले

लीगचे नेते आणि कार्यकर्ते यांनी आझादांचा सल्ला न मानता जिनांचा मानला आहे, यातच लीगचे खरे स्वरूप जाणकारांनी समजून घ्यावे.

भारताच्या फाळणीबद्दल लीगला दोषी धरण्यात येते, हे रास्तच आहे. मिर्झा हमीद बेग यांनी १९३७ ते १९४७पर्यंतच्या लीग अधिवेशनांचा आणि लीग कौन्सिल बैठकांचा अभ्यास केला नसल्यास अजून करावा. अर्थात, सर्व पुरावा समोर असल्यानंतर 'लीगकडे पाकिस्तान निर्मितीचा सिंहाचा वाटा आहे' हे प्रामाणिकपणे कबूल करण्याइतके मनोधैर्य आणि निष्पक्षपातीपणा हमीद बेग दाखवतील, असे कोणाला स्वप्नातही वाटणार नाही.

चार व्यक्तींचे निर्घृण खून केलेल्या फिरोज दारूवालांच्या मूत्रपिंडाने हमीद दलवाई यांचे प्राण वाचले. याचा एवढा परिणाम झाला आहे की, दारूवाला यांचे प्राण वाचवेत, अशी मागणी सर्वत्र करण्यात येत आहे. ही मागणी करण्यात करंटचे संपादक अय्युब सईद यांनी पुढाकार घेतला आणि त्यासाठी करंटचा खास अंक काढण्यात आला. कोठे अय्युब सईद आणि कोठे हमीद बेग आणि त्यांचे करंटे सहकारी! खुद्द पंतप्रधानांनी दोन हजार रुपये धाडले, हे ऐकून त्यांच्यापैकी कितीतरी जणांना मूर्छा येईल. *(महाराष्ट्र टाइम्स, २३ ऑक्टबर १९७५)*

५.२२ तलाकपीडित मुस्लिम महिलांचा आवाज – यदुनाथ थत्ते

(पुण्यात सय्यदभाई यांच्या नेतृत्वाखाली जिहाद-ए-तलाक परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेच्या संदर्भात पत्रकार यदुनाथ थत्ते यांनी सय्यदभाईंशी केलेला संवाद दैनिक महाराष्ट्र टाइम्समध्ये प्रकाशित करण्यात आला.)

पुण्यात आज, रविवारी मुस्लीम सत्यशोधक समाजातर्फे तलाकपीडित मुस्लीम महिलांची परिषद भरत आहे. त्या निमित्ताने ही मुलाखत.

सय्यद महबूब उर्फ सय्यदभाई हे पुण्याच्या भारत पेन्सिल कारखान्यात काम करतात. पुण्यात मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली, तेव्हापासून ते त्या कार्यात भाग घेत आहेत. सतत धडपडत राहणे, हा त्यांचा स्वभाव आहे. ते मुस्लीम मोहोल्ल्यातून फेरफटका करून आले म्हणजे तिकडल्या हकिगती इथे खुलून सांगतात. त्यांची हातोटी अशी की, प्रसंग प्रत्यक्ष घडत असावा, असे वाटू लागते. गेल्या ईदच्या नमाजच्या वेळी पुणे कॅन्टोन्मेंटमधील मशिदीपुढे निधीचे डबे घेऊन आपल्या मित्रांसह ते उभे राहिले आणि तलाकपीडित मुस्लीम महिलांसाठी पैसे मागू लागले, तेव्हा मोठी खळबळ माजली.

प्रश्न : तुम्ही इतक्या हिरिरीने या गोष्टीचा पाठपुरावा का करीत आहात?

सय्यदभाई : ज्याचे जळते त्याला कळते. मुसलमानांतल्या जबानी एकतर्फी तलाकाचे चटके मी स्वतःच सोसले आहेत. माझ्या दोन सुस्वभावी बहिणींना त्यांच्या नवऱ्यांनी केवळ स्वतःच्या लहरीखातर असे तलाक दिले! त्यांचे होणारे शारीरिक हाल आणि मानसिक छळ मी जवळून अनुभवला. समाजातल्या पुढारी मंडळींकडे मी त्यांचे गाऱ्हाणे घेऊन गेलो, तर त्यांनी मला मदत करण्याऐवजी इस्लाममधील तलाक आणि अनेक बायका करण्याची पद्धत कशी शास्त्रशुद्ध आहे, ते सांगायला सुरुवात केली!

घटस्फोट गैरहजेरीत, एकतर्फी आणि तोंडीदेखील मिळतो. 'मी तुला तलाक देतो' असे तीनदा पुटपुटले की झाले! लग्नाच्या वेळी बायकोला नवऱ्याने काही रक्कम देण्याची बोली ठरलेली असते. त्याला मेहेर म्हणतात. ही मेहेरची रक्कम घटस्फोटितांच्या वाट्याला क्वचितच येते. प्रॉव्हिडंट फंडासारखी मेहेरची काही शासकीय व्यवस्था असती, तर गोष्ट वेगळी. मेहेरचा पैसा त्या स्त्रीला मिळवून देण्याच्या कामीही बुजुर्ग मंडळी क्वचितच यशस्वी मध्यस्थी करतात. तलाक घेतल्यानंतर बाईला तीन महिने पोटगी देण्याचा इद्दतचा धर्माचा आदेश आहे. पण त्याचे परिपालन करून घेणार कोण?

प्रश्न : हालत खराब होते, म्हणजे काय होते नेमके?

सय्यदभाई : लांबचे कशाला, माझ्या एका बहिणीचेच सांगतो. तेरा वर्षे संसार केल्यावर तिला

तलाक मिळाला. म्हाताऱ्यांच्या सल्ल्याप्रमाणे तिच्यापाशी मी दुसऱ्या लग्नाची गोष्ट काढली. तेव्हा ती रागाने म्हणाली, "एकदा पोळून निघाले तेवढे पुरेसे नाही का? अजमावल्याला पुन्हा आजमावणे हा गाढवपणा आहे. तुला का मी जड झाले? मग मला बिहिरीत ढकलून दे, नाहीतर विष घाल. पुन्हा लग्नाच्या आणि तलाकच्या चक्रात सापडून छळवाद करून घेण्यापेक्षा ते परवडले! मुलांसाठी जीव तुटतो, नाही तर मीच जीव दिला असता. त्यांचे बिचाऱ्यांचे काय पाप? त्यांच्या वाट्याला असा अनुभव येऊ नये म्हणून मी कष्ट उपशीन आणि त्यांना शिकवून शहाणे करीन..." बहुतेक सगळ्या तलाकपीडित महिलांची अशीच मनःस्थिती असते. शिवाय नवरेही काही साधे नसतात. 'बदचलन' हा शिक्का मारूनच ह्या बायकांना घराबाहेर काढले जाते. याबाबतचा न्याय अजब आहे! येथे फिर्यादी आणि न्यायाधीश दोघे एकच आहेत, तेव्हा इन्साफची जातच कुठे नाही. मुस्लीम समाजाचे आणखी एक दुर्दैव असे की, त्यांच्यात महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्यासारखा कोणी सहृदय समाजसेवक झाला नाही.

प्रश्न : तलाकपीडित स्त्रियांचा प्रश्न इतका मोठा आहे काय?

सय्यदभाई : तलाकपीडित स्त्रियांची पाहणी आजवर कोणी केली आहे काय? अर्थशास्त्राच्या आणि समाजशास्त्राच्या नाणावलेल्या संस्था आपल्या राज्यात आहेत, पण त्यांनी कोणी अशी माहिती जमा केल्याचे ऐकिवात नाही. जरा कठोर बोललो, तर राग येऊ देऊ नका, पण आम्ही मुसलमान इथे कोणाच्या खिजगणतीत नसतो. निवडणुकीच्या वेळी येणारा राजापुरी पुळका मात्र वगळायचा. पण त्याही वेळी ह्या स्त्रियांपर्यंत कोण पोहोचते? पुरुषांकडून बळजबरीने त्यांची मते हमखास पेटीत पाडून घेण्याची सोय असताना त्यांना समजावण्याची उरस्फोड करतो कोण? ख्रिश्चन मिशनरीही आमच्या समाजाच्या वाटेला येत नाहीत आणि हिंदू समाजसेवकांनी तर आमची जणू हायच खाल्ली आहे!

पण या तलाकपीडित स्त्रीची हालत बरी म्हणावी, अशी स्थिती चार-चार सवतींसह संसार करणाऱ्या स्त्रियांची होते! त्यांना पोतेऱ्यासारखे वागवले जाते. चार बायकांचा नियम राहतो पुस्तकात, कारण पाचवी बायको करताना एकीला तोंडी तलाक देऊन घराबाहेर काढता येते. देशाच्या पंतप्रधानपदी एक स्त्री आहे, आंतरराष्ट्रीय महिला वर्षाचे समारंभ झडत आहेत, गरिबांच्या कैवाराचे वटहुकूम निघाल्याचे रोज वर्तमानपत्रात येत आहे, पण तलाक आणि सवतबंदी यांसाठी वटहुकूम काढण्याचे काही कोणाला सुचत नाही! मूल रडल्याखेरीज आईदेखील दूध पाजीत नाही. म्हणून तलाकपीडित महिलांच्या सामुदायिक आक्रोशाचा कार्यक्रम म्हणजे दि. २३ नोव्हेंबरची ही तलाकपीडित महिलांची परिषद! हा आक्रोश तरी शासनाच्या, सामाजिक कार्यकर्त्यांच्या आणि सहृदय-सुसंस्कृत मंडळींच्या कानी जातो का पाहायचे!

प्रश्न : मुस्लीम स्त्रियांचा तुम्हाला चांगला पाठिंबा आहे का?

सय्यदभाई : मुस्लीम स्त्रिया किती दबलेल्या आहेत, याची तुम्हा मंडळींना कल्पना नाही. 'धर्म' हा तिचा सर्वांत मोठा दुश्मन ठरला आहे! न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या साऱ्या

संविधानाने स्वीकृत केलेल्या गोष्टींपासून मुस्लीम स्त्री वंचितच राखली गेली आहे. हे सर्व पाहिले म्हणजे संताप येतो. पण आशा सोडलेली नाही, कारण लोकांचा वाढता पाठिंबा आम्हाला मिळत आहे. परिषदेला किती स्त्रिया येतात, हे यशाचे एकमेव गमक नव्हे; आमच्याकडे सल्ला-मसलतीसाठी किती येतात, ते महत्त्वाचे आहे. कोल्हापूरच्या कार्यकर्त्यांकडे वीस दिवसांत तीस प्रकरणे आली आणि अजूनही नित्य येत आहेत. अमरावतीचे आमचे कार्यकर्ते वजीर पटेल अनेक प्रकारच्या विरोध सोसून धडपडत आहेत.

कोल्हापूरच्या तलाकपीडित महिलांच्या परिषदेत स्त्रियांनी आपल्या छळवादाच्या सांगितलेल्या हकिकती शहारे आणणाऱ्या आहेत. तलाकपीडितांपैकी पुष्कळशा स्त्रियांची स्थिती देवदासींसारखीच आढळते. संविधानाने दिलेल्या वाणीच्या स्वातंत्र्याचा अर्थ बडबड करू शकणाऱांना बडबडण्याचे स्वातंत्र्य, असा आम्ही करीत आहोत, पण बेजबानांना जबाब देणे, हाही त्याचा अर्थ नाही काय? आमचा प्रयत्न तोच आहे.

प्रश्न : तुम्ही यातून काय साधू मागता? यामुळे धर्मांध मंडळी चेकाळून शांतता धोक्यात आणतील, अशी धास्ती काही मंडळी व्यक्त करतात, त्याचे काय?

सय्यदभाई : पहिले पाऊल म्हणून एकतर्फी जबानी तलाक बंद झाला पाहिजे आणि पंचांच्या संमतीवाचून दुसरे लग्न करण्याला बंदी झाली पाहिजे. एवढे केले म्हणजे भारतीय मुस्लीम महिलांना निदान पाकिस्तानी महिलांच्या बरोबरीचे अधिकार मिळतील. दुसरे पाऊल, सर्व नागरिकांना जात-धर्म-वंश-भाषा-स्त्री-पुरुष असा कोणताही पक्षपात न करता समान नागरी कायदा लागू करण्याचे. तेही पाठोपाठ पडले पाहिजे. असे सामाजिक अन्याय निवारण करण्यासाठी राष्ट्रपतींनी वटहुकूम काढणेदेखील गैर वाटू नये. फखरूद्दीन अलींसारखे राष्ट्रपती मुस्लीम स्त्रियांच्या दुःखांबाबत नावाकीफ आहेत, असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय करणारे ठरेल. दुसरा मुद्दा, धर्मांधांच्या चेकाळून अशांतता माजवण्याचा. पण ही भीती व्यर्थ आहे. सनातनी हिंदू खवळतील म्हणून हिंदू समाज सुधारकांनी अस्पृश्यता-निवारणाचे कायदे करण्याबाबत माघार घेतली काय? तेव्हा ही भीती व्यर्थ आहे. आधुनिक राज्यसत्तेची ओळख मुसलमानांनाही आहे. इंग्रजांनी प्रारंभी दाखवला तेवढा तरी कणखरपणा आपल्या सरकारने दाखवावा. इंग्रजांनी एका फटक्यात काझी न्यायालये रद्द करून समानतेचे एक पाऊल टाकले. आता कोणताही न्यायाधीश मुस्लीम खटल्यांचे निवाडे देऊ शकतो आणि कोणताही कायदेतज्ज्ञ त्यांच्या वतीने कोर्टाचे कामकाज पाहू शकतो. क्रिमिनल प्रोसिजर कोड आता सर्वांसाठी एकच आहे. तेव्हा धर्मांधांच्या बंडाव्याचा धाक व्यर्थ आहे.

प्रश्न : पण नुसते कायदे करून काय होते?

सय्यदभाई : नुसते कायदे पुरेसे नाहीत, ही गोष्ट खरी आहे. कायद्याबरोबर लोकशिक्षणाची चळवळसुद्धा करावीच लागेल. पण कायदाच नसेल, तर न्यायासाठी धांडताही येणार नाही. कायदे आहेत, म्हणूनच हरिजन माणूस विहिरीवर पाणी भरू दिले नाही, तर दाद मागू शकतो ना...

कायदाच नसता, तर त्यांना आपले गाऱ्हाणे बेशीबर तरी टांगता आले असते का? कायदा पुरेसा नसला, तरी आवश्यक आहे, असे मला वाटते.

(महाराष्ट्र टाइम्स, रविवार पुरवणी, २३ नोव्हेंबर १९७५)

(यदुनाथ थत्ते: ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे चाहते आणि पाठीराखे. यदुनाथ थत्ते हे साधना साप्ताहिकाचे संपादक होते. मुस्लीम विषयांवर त्यांनी विपुल लेखन केलेले आहे.)

५.२३ 'जिहाद-ए-तलाक' परिषद: अनुभव व मर्यादा – यदुनाथ थत्ते

(ऑक्टोबर १९७५ मध्ये पुण्यात आयोजित केलेल्या 'जिहाद-ए-तलाक' या ऐतिहासिक परिषदेला एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर परिषदेच्या परिणामांचे मूल्यमापन व पुढील दिशा समजून घेण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार यदुनाथ थत्ते यांनी घेतलेली सय्यदभाईंची मुलाखत महाराष्ट्र टाइम्सने प्रसिद्ध केली)

पुण्याच्या गोवन्स हॉलमध्ये 'जिहाद-ए-तलाक' नावाने परिषद भरली. त्याला २३ नोव्हेंबर १९७६ रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. पुण्याच्या परिषदेसाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अनेक कार्यकर्ते महिनोन् महिने धडपडत होते. जिहाद-ए-तलाक परिषदेसाठी तीनशे-साडेतीनशे बेबस (असहाय) आणि बेजबान (मुक्या बनवल्या गेलेल्या) स्त्रिया एकत्र करणे आणि आपबीती सुनावण्याइतकी हिम्मत त्यांच्यात निर्माण करणे ही सोपी गोष्ट नव्हे. जिहाद-ए-तलाक परिषद वृत्तपत्रांमुळे देशभर पोहोचली. इतक्या गाजाबाजानंतर अशा परिषदा बहुधा इतिहासजमा होतात आणि कार्यकर्ते समाधानाची ढेकर देत तृप्तपणे बसून राहतात. 'तसे तर या मंडळींचे झाले नसेल' अशी शंका येणे स्वाभाविक म्हणावे लागेल. त्यामुळे एकदा जिहाद-ए-तलाकची सालगिरह होण्यापूर्वी सय्यदभाईंना भेटून माहिती घ्यावी, असा विचार केला. त्यांना भेटलो आणि वर्षभराचा आढावाच हाती आला. मुस्लीम सत्यशोधक मंडळ हा एकखांबी तंबू असल्याची काही मंडळींची समजूत होती आणि हमीद दलवाई मूत्रपिंडाच्या आजाराने पथारीवश झाल्याने मंडळाचे काम आपोआपच बंद होईल, अशी काही विघ्नसंतोषी मंडळींची अटकळ होती. पण जिहाद-ए-तलाक परिषदेमुळे मुस्लीम सत्यशोधक मंडळाला चार चाँद लागले, असेच म्हणावे लागेल. हमीद दलवाईंच्या गैरहजेरीत हा सर्व बनाव घडून आला आणि आजारी दलवाईंना त्यातूनही जीवनाशा वाढवणारे पुष्टीद्रव्य मिळाले, असे म्हणायला हरकत नाही.)

काय केले?

प्रश्न : सय्यदभाई, जिहाद-ए-तलाकची सालगिरह आली. वर्षभर काय काय केलेत?

उत्तर : जिहाद-ए-तलाक ही इस्लामच्या इतिहासातली एक अपूर्व अशी घटना म्हणून नोंदवावी लागेल. १४०० वर्षांत प्रथमच स्त्रियांनी एवढ्या मोठ्या संख्येने एकत्र येऊन आपल्या दुःखांना जाहीरपणे वाचा फोडली. परिषदेचे पडसाद अनेक ठिकाणी उमटल्याशिवाय राहिले नाहीत.

मंडळाने हातात घेतलेले कार्य लोकांपर्यंत पोहोचले आहे. तलाकचे चटके बसलेले कोणी ना कोणी हटकून सापडतेच. त्यामुळे 'आमचे सुधारणावादी विचार मान्य नसले, तरी याबाबत काहीतरी केले पाहिजे' ही गोष्ट त्यांना कबूलच करावी लागली. समान नागरी कायदा हा त्यावर उपाय आहे, असे मंडळ मानते. ह्या गोष्टीला त्यांचा पाठिंबा मिळावा, असा आमचा आग्रह

नाही, पण तलाकशुदा स्त्रिया आणि त्यांचे बालबच्चे यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे, ही गोष्ट त्यांनाही मान्य आहे. या बाबतीत जिथपर्यंत एकत्र वाटचाल करता येईल, तितकी करावी, एवढी गोष्ट त्यांनाही मान्य झाली आहे. एकत्र वाटचालीच्या मार्गाचा शोध आम्ही घेत आहोत.

हे एक विधायक असे कार्य आहे. मुस्लीम समाज एकतर राजकारणाच्या कारस्थानात व्यग्र असतो किंवा धार्मिक कार्यासाठी त्याला उत्साह असतो. पण सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी झटणारे फार थोडे सक्रिय कार्यकर्ते आमच्यात आहेत. मुस्लीम समाजात विधायक कार्याचे नवे पर्व सुरू होण्याची चाहूल अनेकांना लागली, हे परिषदेचे एक मोठे यश आहे, असे मला वाटते.

सार्वत्रिक पडसाद

प्रश्न : हे सर्व वैचारिक क्षेत्रातले यश आहे, पण प्रत्यक्षात वर्षभरात काय घडले?

उत्तर : तुम्हाला पत्रव्यवहारच दाखवतो. त्यावरून जिहाद-ए-तलाक परिषदेचे पडसाद किती ठिकाणी उमटले, याची कल्पना येईल. मंडळाच्या कोल्हापूर शाखेने या बाबतीत फार जोमाने काम केले आहे. पुण्यातील माझ्या घरी रोजच कोणी ना कोणी येत असतात आणि आपली कहाणी सांगतात. समजुतीच्या मार्गाने प्रश्न सुटावा, असा आम्ही प्रयत्न करतो. बीस प्रकरणांत आम्ही समजुतीने प्रश्न सोडवू शकलो आणि आता त्यांचे संसार सुखाने चालले आहेत. काही प्रकरणांत अपयश येते, तेव्हा कायद्याच्या मार्गाकडे वळतो. काही वकील मित्र सल्ला आणि सहकार्य देतात, पण तलाकपीडित महिलेच्या अडचणी अनंत असतात. कायदेशीर मार्ग चोखाळण्यासाठी लागणारे साक्षीपुरावे जमवताना नाकी नऊ येतात. पैशाचाही प्रश्न असतो. त्यासाठी धडपडावे लागते.

कोल्हापूर भागात तलाकपीडित स्त्रियांचे प्रश्न सोडवताना उपऱ्या मोपल्यांच्या लग्नामुळे एक बिकट प्रश्न उभा राहिला. पुण्यातही तोच प्रकार वेगळ्या तऱ्हेने आढळून आला. बेकरीचा धंदा करायला म्हणून मुख्यतः उत्तर प्रदेशातून अनेक मुसलमान येथे येतात. जम बसतोसे वाटले की, ते लग्ने करतात. कालांतराने बायकांना तलाक देऊन ते देशाला परत जातात. पण यापेक्षाही भीषण प्रकार म्हणजे, ते बायकांना घेऊन देशाला म्हणून जातात आणि पुढे त्यांचे काय होते, ते समजत नाही. काही वेश्यांच्या अड्ड्यात जाऊन पडतात, तर काहींची गुलामासारखी विक्री होते. अशा असहाय, अगतिक स्त्रियांच्या कहाण्या कानी येतात आणि मन सुन्न होऊन जाते. कसा मार्ग काढावा, तेच समजत नाही. मुलीचे आईबाप मुलीच्या आठवणीने रडून दिवस काढतात; आमच्याकडे आशेने येतात. त्यांचे कसे समाधान करावे, तेच समजत नाही.

अशा स्त्रियांची माहिती गोळा करण्यासाठी आम्ही फॉर्म्स तयार करून घेतले आहेत. असे फॉर्म्स आम्ही भरून घेतो. हे फॉर्म्स नजरेखालून घाला. बहुतेक स्त्रिया शिक्षित असल्याचे तुम्हाला दिसून येईल. शालान्त परीक्षेच्या पायरीपर्यंत पोहोचलेल्या बऱ्याच आहेत. डी.एड्. झालेलीही एक भगिनी आहे. या स्त्रिया शिकल्यामुळे आपल्या गाऱ्हाण्यांची, अडचणींची निर्भीडपणे माहिती देतात. मुस्लीम स्त्रियांत शिक्षणाची वाढ होणे आवश्यक आहे, याची जाणीव त्यामुळे कार्यकर्त्यांना तीव्रपणाने झाली आहे.

वृत्तपत्रांनी आमच्या कामाला मोठा हातभार लावला. जिहाद-ए-तलाकबद्दल मुसलमानांत उत्सुकता निर्माण झाली आणि लांबून लांबून विचारणा होऊ लागली. ही नवापूरची केस पाहा, ही विजापूरची, ही अहमदनगरची, ही शिरखळची, ही वाईची, ही नाशिकची, ही साताऱ्याची आणि सातारा जिल्ह्यातल्या कव्हेरी पेठ या खेड्याची, ही मुंबईची, पुण्याच्या बहुतेक सर्व पेठांतून प्रकरणे आली आहेत. चार प्रकरणे तर मुतवल्लीच्या घरातली (म्हणजे मशिदीच्या व्यवस्थापकांच्या घरची) आहेत. झोपडीपासून बंगल्यापर्यंतची गाऱ्हाणी यात आहेत. कलमा पढणाऱ्या मुसलमानांपासून हाफीजे कुरान म्हणजे कुराण-पंडितांच्या घरापर्यंत मुली अशा भाजून निघालेल्या आहेत. पाण्यावर तरंगणाऱ्या बर्फासारखी ही प्रकरणे आहेत. या वर दिसणाऱ्या भागाच्या पाच-सात पट तरी प्रकरणे असतील. ही संख्या आमच्या कल्पनेपेक्षा अधिक आहे. कार्यकर्ते मिळतील तेवढ्या प्रमाणात चित्र अधिक स्पष्ट होईल. नव्या-नव्या बायका करणे आणि त्यांना वापरून, त्यांचा उपभोग घेऊन, त्यांचे सामान लुबाडून, त्यांना वाऱ्यावर सोडून देणे हाच काही लोकांचा उद्योग दिसतो! धर्माच्या नावाखाली असले प्रकार राजरोसपणे होतात, हे फार भीषण आहेत.

सर्वांचे काम

प्रश्न : वर्षभराच्या या अनुभवानंतर काय वाटते?

उत्तर : हे एक मोठेच विधायक कार्य आहे, असे वाटते. दुसरी गोष्ट म्हणजे, हे विधायक कार्य फक्त मुसलमानांनी आपल्या समाजासाठी करावे, ही समजूत चुकीची आहे. एक सामाजिक प्रश्न म्हणून त्याच्या सोडवणुकीसाठी सर्वांनीच हातभार लावला पाहिजे. मुस्लीम समाजातील कार्यकर्ते असतील, तर काम सोपे होते, ही गोष्ट खरी असली, तरी दुःखाला जात नसते, हे समजून घेणे राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने उपकारक ठरेल. या बाबतीत वकिलांच्या सहकार्याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. सर्वच जाती-जमातींचे वकील कायद्याची मदत द्यायला तयार आहेत. त्यासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवण्याची त्यांची तयारी आहे. ॲडव्होकेट ए. रहमान यांची मदत फार मोलाची आहे. ते ही कामे जवळजवळ मोफत करतात.

तलाकपीडित स्त्रियांना दाद लावून घेण्याचेही त्राण नसते. त्यासाठी काही किमान निधी हाती असला पाहिजे. पत्रव्यवहार आणि प्रवास याबाबतही अडचणी येतात. आम्ही मंडळाचे कार्यकर्तेही कोणी मालदार नाही. गावोगावहून पत्रे आली आणि आम्ही कोणी तिथे समक्ष गेलो, तर त्याचा दुहेरी परिणाम होतो. एकतर दुःखितांना दिलासा मिळतो आणि हिंमत येते. लोकांशी चर्चा झाली की, जागृती निर्माण होते आणि अनेकदा दुःखे भळाभळा वाहू लागतात.

अज्ञान आणि दारिद्र्य ही अडचण मोठी आहे. मुसलमानांत मध्यमवर्ग जवळ जवळ नाहीच. त्यामुळे कार्यकर्ते मुश्किलीने मिळतात. हैदराबाद, भोपाळ इत्यादी मुस्लीम रियासतीत मालदार, रईस मुसलमान आहेत आणि त्यांची दुःखे हीच आपली दुःखे समजून त्यांच्या राजकारणाला सामान्य मुसलमान बळी पडतात. पाकिस्तानची निर्मिती अशा मनोगंडातूनच झाली. ही परिस्थिती बदलली पाहिजे.

कायद्याचा आधार

मागासलेल्या समाजांना कायद्याचा आधारही उपयोगी पडतो. कायद्यानेच सर्व गोष्टी होत नसतात, हे खरे असले, तरी कायदा उपयोगी असतो. पोटगीसंबंधीचे १२५ कलम फौजदारी कायद्यात आले. त्याचा परिणाम दिसू लागला आहे. पोलीस खात्यात काम करणाऱ्या एका गृहस्थांच्या मुलीची समस्या होती. मेहेरून्निसा नावाच्या तलाकपीडित मुलीला मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या मदतीमुळे तिला दर महा १०० रुपये पोटगी देण्याचा निर्णय न्यायालयातून मिळाला आहे. सदर गृहस्थांनी त्याबद्दल जाहीर रीतीने कृतज्ञता प्रकट केली, तेव्हा आम्हाला धन्य वाटले. याचा परिणाम इतरत्रही झाल्याखेरीज राहणार नाही.

कायदे बहुमताने होत असल्याने मुस्लीमेतरांनीही हे प्रश्न समजून घेतले पाहिजेत. समान नागरी कायदा आम्हाला आवश्यक वाटतो, पण मुस्लीमेतर त्याबाबत उदासीन राहिले, तर तो कायदा होणार कसा? प्रादेशिक भाषेतून शिक्षण घेण्यातले फायदेही मुसलमानांना पटवावे लागतील.

हे इतर प्रश्न आहेत. त्यांची चर्चा अन्यत्र करता येईल. पण महिला संघटनांनी आणि सामाजिक संस्थांनी तलाकपीडित स्त्रियांची माहिती जमवण्यात आणि अशा स्त्रियांच्या पुनर्वसनात मदत केली पाहिजे.

आणि हो, आणखी एका गोष्टीचा उल्लेख मला केलाच पाहिजे. पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत यंदा तलाकपीडित स्त्रियांसंबंधी एक कार्यक्रम ठेवण्यात आला होता, हे विशेष. दोन मुस्लीम स्त्रिया, काँग्रेसमधील एक मुस्लीम वकील आणि ॲड. एफ. ए. रहमान, दलवाई यांनी त्यात भाग घेतला. सामाजिक अभिसरणाच्या दृष्टीने ही एक चांगली घटना म्हटली पाहिजे. ॲडव्होकेट नजमा शेख आणि साबिरा बेग यांची भाषणे हृदयस्पर्शी झाली, असे अनेक श्रोत्यांनी सांगितले. ही जागृतीची चिन्हे आहेत, असे वाटते.

पण सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी दीर्घ काळ प्रयत्न करावे लागतात. जिहाद-ए-तलाकची सालगिरह करताना मला एवढेच सांगायचे आहे, परिषदेच्या वेळी नजमा शेख म्हणाल्या होत्या, "यह चिनगारी कभी बुझेगी नहीं, क्योंकि १४०० साल यह जल रही है और हदीस में बताया गया है की मजलूमों की आहों में इतनी ताकत होती है की, मजलुमियत को (असहायता) यह खाक कर सकती है." हे शब्द आम्हाला बळ देत राहतील. हे काम वाढतच जाईल आणि लवकरच एक दिवस असा येईल की, देशात समान नागरी कायदा होईल आणि सवत आणि तलाक यांच्या कात्रीतून मुस्लीम स्त्री मुक्त झालेली असेल.

(महाराष्ट्र टाइम्स, २३ नोव्हेंबर १९७६)

(यदुनाथ थत्ते: ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे चाहते आणि पाठीराखे. यदुनाथ थत्ते हे साधना साप्ताहिकाचे संपादक होते. मुस्लीम विषयांवर त्यांनी विपुल लेखन केलेले आहे.)

५. २४ मुस्लीम सत्यशोधक मंडळ : दुर्दैवी स्त्रियांना आसरा

(महाराष्ट्र टाइम्स, २८ जून १९७७)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे हमीद दलवाई यांचे निधन झाले आणि सनातनी मुस्लिमांनी सुटकेचा निःश्वास सोडला, पण दलवाई-मुक्तीचे हे सुख त्यांना फार काळ लाभले नाही. कारण दलवाईंनी जाताना आपल्यामागे मुस्लीम सत्यशोधक मंडळ ठेवले होते. या कार्याला वाहून घेतलेले जिद्दीचे कार्यकर्ते ठेवले होते आणि त्याहीपेक्षा 'या कार्यकर्त्यांच्या रूपाने आपल्याला कोणीतरी त्राता आहे' याची जाणीव असणाऱ्या शेकडो तलाक-पीडित महिलाही महाराष्ट्रात कायम होत्याच.

दलवाईंच्या निधनानंतरच्या दीड महिन्याच्या काळात मंडळाचे संघटक सय्यदभाई यांच्याकडे या दुर्दैवी महिला धाव घेत आहेत आणि इन्साफची मागणी करीत आहेत.

समजूतदार वडील

गेल्याच आठवड्यात १९ वर्षांची एक तरुणी आपल्या चिमुकल्या मुलाला घेऊन सय्यदभाईंकडे आली. मोमिनपुऱ्यात राहणाऱ्या, रिक्षा ड्रायव्हर असलेल्या तिच्या नवऱ्याने तिला मुलासकट दोन-चार झापडे देऊन हाकलून लावले होते. कारण काय, तर म्हणे त्याच्या सुटासाठी तिच्या बडिलांनी कमी पैसे दिले. नाहीतरी 'औरत को मारने का मरद को हक ही हैं'.

पण ती त्यासाठी आली नव्हती. तिच्या या नवऱ्याने १७ वर्षांच्या दुसऱ्या पोरसवदा तरुणीशी आता खेळ चालविला होता. 'आपले लग्न झाले नाही' असे सांगून त्याने या मुलीशी लग्न करण्याचा घाट घातला. पण सय्यदभाईंनी तिच्या बडिलांची भेट घेऊन हा प्रकार कथन केला. त्यांनी हे लग्न रद्द करून १९ जूनला दुसऱ्या एका पहिल्या वेळेच्या तरुणाशी तिचे लग्न करून दिले.

अशीच एक बार्शीची मुलगी होती. शबनमसारखी देखणी आणि सुशिक्षित होती. चांगली एफ. वाय. झालेली होती. साहजिकच तिला मराठवाड्यात चांगले स्थळ मिळाले. पण घराचे वासे फिरले. अशा स्थितीतही तिने बुजुर्गांच्या पापवासनेला बळी जाण्यास नकार दिला. झाले, तेवढ्यावरून ती घराबाहेर गेली. पण ही मुलगी सुशिक्षित होती. तिने पोटगीसाठी दावा लावला. दाव्यात तिच्या मुलीला पोटगी मिळाली; तिला नाही.

आपण दोघे सय्यद

एवढ्यानेच थांबले नाही. तिच्या नवऱ्याच्या बाजूने दावा चालविणाऱ्या मुस्लीम वकिलानेच या सुंदर तरुणीला मागणी घातली. त्यांत ते दोघे सय्य . म्हणजे मुसलमानांतील ब्राह्मण. शिवाय तो तिला एल.एल.बी. करणार होता. 'आता तरी सुखाचे दिवस आले' असे तिला वाटले. अर्थात, वयात २० वर्षांचे अंतर होते, पण सगळेच कसे मनासारखे होणार?

मग हा वकील मराठवाड्यातील निकाहचा फॉर्म घेऊन आला. हे लग्न पहिल्या वेळचे, दुसऱ्या

वेळचे, तिसऱ्या वेळचे, चौथ्या वेळचे अशा अर्थाचे अव्वल, दुव्वम, सुव्वम आणि चहरूम अशी सदरे त्यात असतात. या वकिलाला घरी एक बायको आणि सहा मुले होती, पण त्याने चक्क 'अव्वल' या सदरात आपली माहिती दिली; मुलीलाही तसेच सांगितले; "काझीचा शिक्का मागवून घेऊ" असे सांगितले... पोरगी फसली आणि वर्षभर वाट पाहून वकिलाच्या गावी गेली. तिच्याबरोबर वकिलापासून झालेली दुसरी मुलगी होती. अपेक्षेप्रमाणे घरच्यांनी तिला मारझोड करून हाकलून लावले.

असेच एक पत्र खानदेशातील एका मौलानाकडून याच आठवड्यात सय्यदभाईंना आले आहे. अल्लाचे गुणगान करून, धार्मिक प्रवचनांमार्फत धर्माची माहिती पटविणे यात त्यांचा जन्म गेला. 'माझ्या बेटीचा सहारा अल्लाच आहे, पण या निष्पाप मुलीला हाकलून देणाऱ्या नवऱ्याचा आश्रयदाता कोण आहे?' असा कोड्यात टाकणारा प्रश्न या मौलानांनी सय्यदभाईंना विचारला आहे.

खुला तलाक

या तलाकशुदा मुस्लीम भगिनीप्रमाणे एका हिंदू स्त्रीने सय्यदभाईंकडे धाव घेतली आहे. या श्रीमंत मुस्लीम गृहस्थाने तिला कलमा पढवला. म्हणजे, तिला मुस्लीम करून घेतली. तिच्याशी शादी केली. हे सगळे मिया-बिबींच्या राजीखुशीने झाले.

आपल्या प्रेमासाठी सगळ्यांना दुखवून आपल्याशी लग्न करणाऱ्या या तरुणीला हक्काचे काहीतरी दिले पाहिजे, असे या गृहस्थांना वाटले. मग त्यांनी एका कोऱ्या कागदावर तिची सही घेतली. कारण त्यांना बरीच शेतीवाडी तिच्या नावावर करायची होती. तिने सही केली, पण आठ-पंधरा दिवसांतच तिच्या लक्षात आले की, 'आपण आपल्या शेतीवाडीलाच नव्हे, तर प्रेमाला आणि पत्नीत्वालाही मुकलो आहोत.' कारण ती आपण होऊन घटस्फोट म्हणजे खुला तलाक मागत असल्याचे त्या कोऱ्या कागदावर लिहवून घेण्यात आले होते.

असाही अनुभव

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संघटक म्हणून सय्यदभाईंकडे अशी प्रकरणे येत आहेत. समाजाला भीक न घालता या तरुणी जशा निर्भयपणे पुढे येतात, त्याचप्रमाणे स्वतःला कम्युनिस्ट म्हणवून घेणारे महाभागही ऐन वेळी कच खातात. अशीच हकिकत सय्यदभाईंनी सांगितली.

अहमदनगर नगरपालिकेच्या शिक्षण समितीचे अध्यक्ष गनीभाई शक्करभाई यांनी गेल्या आठवड्यात एक दिवस मुक्रर करून सय्यदभाईंना बोलावले. 'मी खूश झालो' सय्यदभाई सांगू लागले, 'नगरमध्ये आपल्या मंडळाचे काम उभे राहत होते. त्यात या मातब्बर माणसाची मदत मिळत होती आणि तो मुस्लिमांची बैठक बोलवत होते, हे छानच झाले होते. या भावनेने मी पहाटे पहिली बस पकडून नगरला सकाळीच पोहोचलो. तेव्हा हे गृहस्थ नव्हते. नंतर दर वेळी निरोप ठेवून रात्रीपर्यंत ७-८ फेऱ्या मारल्या. ते गावात असूनही मला भेटले नाहीत. असेही आम्हाला अनुभव येतात.'

सय्यदभाई पुढे म्हणाले, 'आता हमीदभाईंच्या कामाला गती देण्यासाठी आम्ही नगर, मालेगाव, चिपळूण, पुणे, अमरावती, अकोला, औरंगाबाद, परभणी यांसारख्या ठिकाणी येत्या नोव्हेंबरात तलाकपीडित महिलांच्या परिषदा घेणार आहोत. महाराष्ट्रव्यापी परिषदा पुण्यात नोव्हेंबरात घेणार आहोत. जाहीर सभा घेऊन जिहाद-ए-तलाक चालूच ठेवणार आहोत. परवा पुण्याच्या मुस्लीम भागातील, म्हणजे ए. डी. कॅम्पातील सभा सनातनी मुस्लिमांनी उधळून लावण्याचा प्रयत्न केला. तेव्हा डॉ. बाबा आढाव यांनी त्यांना ठणकावून सांगितले की, 'हमारे मजहबी मामले में किसीको बोलने का अधिकार नही है. ही दमबाजी आता खपवून घेतली जाणार नाही.'

पोलिसांना उशीर का?

'या सनातनी मुस्लिमांच्या भूमिकेचे आम्हाला आश्चर्य वाटत नाही. नवीन सुधारणा पचनी पडण्यापूर्वी, हे असे होणारच. हिंदू समाजातही सनातन्यांनी असा गोंधळ पूर्वी घातलाच आहे, पण आम्हाला आश्चर्य वाटते ते पोलिसांचे. कुठल्याही फडतूस सभेला पोलीस हजेरी लावतात. पण या सभेत विरोधकांनी आरडाओरडा, शिवीगाळ आणि दगडफेक झाल्यानंतर पोलीस तेथे अवतीर्ण व्हावेत याबद्दल मला खेद वाटतो' सय्यदभाई म्हणाले. (महाराष्ट्र टाइम्स, २८ जून १९७७)

५.२५ ही ज्योत आम्ही कधी विझू देणार नाही! – बाबुमियाँ बँडवाले

मी काँग्रेसच्या चळवळीत वाढलेला जुना कार्यकर्ता. रावसाहेब पटवर्धनांच्या तालमीत मी तयार झालो. गांधी-नेहरूंनी शिकवलेल्या राष्ट्रवादाचा मी उपासक आहे. हिंदू-मुस्लीम प्रश्नाकडे मी सुजाणपणे पाहतो. मुस्लीम समाजात आपल्या परीने सुधारणा करण्यासाठी म्हणून मी धडपडकरतो.

पण भारताची फाळणी होऊन देश स्वतंत्र झाला. माझ्यासारख्याला त्याची किती व्यथा जाणवली असेल, त्याची कल्पनाच केलेली बरी! स्वातंत्र्यानंतर अंधारात चाचपडल्यासारखे वाटत होते.

फाळणी होऊनही हिंदू-मुस्लीम प्रश्न नुसता शिल्लकच राहिला होता असे नव्हे, जातीवादी शक्ती दबा धरून बसल्या होत्या; दंग्यांचा उद्‌भव स्वतंत्र भारतातही व्हावा, ही केवढी नामुष्कीची घटना होती!

पण त्यातून मार्ग कोणता?

कोणीच वाट दाखवणारा नव्हता; स्वार्थी सावधपणा सगळीकडे दिसत होता.

मुसलमानांशी मतांचे घाऊक सौदे पटवून मंडळी संतुष्ट होत होती. मुस्लीम समाजाच्या मागासलेपणाची कोणालाच खंत नव्हती; खेद नव्हता.

त्यांना व्यापक राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी तळमळणारे कोणी नव्हते. सर्वत्र कुचंबणाच कुचंबणा!

चाकोरीबाहेरचा नवा रस्ता शोधायला हवा होता.

अशा चिंतातुर अवस्थेत असताना अहमदाबादेत जातीय दंग्यांचा कहर उसळला होता. काय

त्याचा अर्थ? गांधीजींच्या अहमदाबादमध्ये इतका भीषण जातीय दंगा! पण या दंगलीची मीमांसा कोणी करत नव्हते. काही संतप्त, काही करुणेने ग्रस्त, पण एवढ्याने हा प्रश्न कायमचा कसा सुटणार!

आणि याच वेळी त्या दंगलींची मीमांसा करणारा हमीद दलवाईंचा परखड लेख वाचनात आला. मन ज्यासाठी आसुसले होते, ते गवसल्यासारखे वाटले.

त्यांच्या कार्याबद्दल असेच अधूनमधून वाचायला मिळे.

पुण्याला आंतरभारती सभागृहात मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना होणार असल्याचे वाचले आणि आमंत्रण नसता धावत गेलो. त्या कार्याला माझे आशीर्वाद असल्याचे सांगितले; पाठराखण करण्याचे आश्वासन दिले. 'हे तेजस्वी तरुणच भारतीय मुस्लीम समाजाला योग्य नेतृत्व देतील' याची खात्री झाली.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कामाला व्यापक रूप द्यायचे ठरले आणि हमीदभाईंनी अध्यक्षपद स्वीकारण्याची गळ घातली; नकार देणे केवळ अशक्य होते; काम माझ्या पसंतीचे, पण वय गैरसोयीचे, वृद्धापकाळाकडे झुकणारे; पण नकार देणे केवळ अशक्य होते.

हमीदभाईंच्या नेतृत्वाखाली काम करणे हा मला आनंद होता.

निरभ्र विचार, कार्यकर्त्यांबद्दलची असीम आपुलकी, शुद्ध चारित्र्य आणि दलित-पीडितांबद्दलचा असा उमाळा असणाऱ्या व्यक्ती किती दुर्मीळ आहेत!

शिवछत्रपती राज्यारोहण त्रिशताब्दी वर्षात आम्ही श्रीगोंद्याला 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे नाटक केले. माझ्या घरातल्या मुला-मुलींनी नाटकात काम केले होते. हमीदभाई तेवढ्यासाठी मुंबईहून आले. किती हुरूप वाटला सर्वांना!

आपल्या शारीरिक सुखांवर निखारा ठेवून कार्यकर्त्यांना जीव लावणारा असा नेता क्वचितच आढळेल!

त्यांनी मुस्लीम समाजात आधुनिक मानवतावादी दृष्टीकोन रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याभोवती तरुण गोळा झालेले पाहिले की, माझे मन तृप्त होऊन जाई. गांधी-नेहरूंच्या काळात स्वतंत्र भारताच्या आम्ही रंगवलेल्या, हृदयाशी धरलेल्या स्वप्नाचीच परिपूर्ती हमीदभाई करीत होते. हा केवढा सुखद अनुभव होता.

त्यांची खालावलेली प्रकृती पाहून डोळ्यांत अश्रू उभे राहायचे. पण त्याही अवस्थेत ते किती अचल, स्थिर होते!

विचारांवरील असीम विश्वासातूनच अशी स्थिरता लाभते; माणूस बाह्य सुखदुःखांच्या अतीत जातो.

जसलोकमध्ये शेवटी त्यांना घेऊन गेलो, त्याआधी आम्हा कार्यकर्त्यांसमोर त्यांनी निरवानिरवीच्या गोष्टी केल्या. त्या वेळी डोळ्यांतले अश्रू आवरताना पुरेवाट झाली. ते अखेरचे मार्गदर्शन आम्हा सर्वांना दीपस्तंभासारखे मार्ग दाखवीत राहील.

खरे म्हणजे ज्यांच्या खांद्यावरून जाण्यात आनंद आणि धन्यता वाटली असती, त्याला श्रद्धांजली वाहण्याची पाळी यावी, हा नियतीचा केवढा निर्दय खेळ आहे! पण असा कमकुवतपणा

दाखवता कामा नये.

हमीदभाई, तुमच्या स्मृतीला साक्ष ठेवून आम्ही मुस्लीम सत्यशोधक मंडळातले तुमचे साथी ग्वाही देतो की, तुम्ही पेटवलेली ज्योत आम्ही विझू देणार नाही, कधीही विझू देणार नाही! *(हमीद दलवाई विशेषांक, साधना साप्ताहिक, पुणे, १९७७, पृ. क्र. ७.)*

(बाबुभियाँ बँडवाले: श्रीगोंदा, अहमदनगर येथे वास्तव्यास असणारे स्वातंत्र्य सैनिक बाबुभियाँ बँडवाले हे मंडळाच्या स्थापना काळातील अध्यक्ष होते. आस्तिक, उदारमतवादी आणि गांधीवादी कार्यकर्ते होते.)

५.२६ हमीदभाई : एक द्रष्टा – शेख वजीर पटेल

३ मे रोजी सकाळी ८ वाजता आकाशवाणीवरून हमीद दलवाईंच्या निधनाची बातमी प्रसृत करण्यात आली. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा आधारस्तंभ ढासळल्यामुळे मंडळाचे कार्यकर्ते त्यांच्या निधनाची बातमी ऐकून शोकग्रस्त झाले, पण अमरावतीच्या काही मुस्लीम लीगवाल्यांनी ही बातमी ऐकल्याबरोबर चांदणी चौकात पेढ्यांची खैरात केली... शहरातील मुस्लीम मोहल्ल्यात फिरून आनंदोत्सव साजरा केला! दुसऱ्या दिवशी त्यांचा मृतदेह जाळण्यात आल्यामुळे त्यांच्या आनंदाला सीमाच उरली नाही! सत्यशोधक कार्यकर्त्यांना पाहून 'सब साले जलेंगे... इनके लिए मुसलमानोंके कब्रस्तान में जगह नहीं है।' असे टोमणे मारायला लागले. कार्यकर्त्यांनी हे सर्व मुकाट्याने सहन केले व आजही सहन करीत आहेत.

दलवाईंशी प्रथम ओळख

हमीद दलवाई यांनी लिहिलेला एक लेख मी 'धर्मयुग'मध्ये वाचला व माझ्या मनावर एक अद्‌भुत परिणाम झाला. त्यांना प्रत्यक्ष भेटण्याची माझी इच्छा तीव्र झाली. १९६७ साली दलवाई जेव्हा अमरावतीला आले, त्या वेळी मी त्यांना भेटलो. अमरावतीच्या वास्तव्यात त्यांना भेटणाऱ्यांत मी एकटाच मुसलमान होतो! 'मुस्लीम युवकांच्या सभेत आपण काही बोला' असे मी त्यांना निमंत्रण दिले व ते त्यांनी स्वीकारले.

दोन महिन्यांआधी मी काही मुस्लीम तरुणांना संघटित केले होते व 'यंग मुस्लीम सोशल असोसिएशन' नावाची संघटना उभारली होती. अमरावतीला या संघटनेची स्थापना झाली, तेव्हा जमातवादी मंडळी सुरुवातीला आम्हाला खूप मदत करायची. मुस्लीम तरुणांची संघटना पाहून सुरुवातीला त्यांना वाटले होते की, 'आम्ही मुस्लीम परंपरेनुसार, लीगी तत्त्वांना अनुसरून कार्य करू.' त्यांची अशी अपेक्षा असल्यामुळे ही मंडळी आमच्याकडे आपुलकीच्या भावनेने पाहायला लागली. तेव्हा या संघटनेत त्यांचीही मुले होती. हमीद दलवाईंना या संघटनेमार्फत दिलेले आमंत्रण, त्यांनी केलेले मार्गदर्शन व त्याच दिवशी स्थानिक इस्लामी चौकात त्यांचे आयोजित केलेले जाहीर भाषण, हे पाहून अमरावतीचे एकजात सर्व मुसलमान आमच्यावर खवळले! काही दिवसांनंतर याच संघटनेच्या वतीने मोपलिस्तानच्या जातीय मागणीच्या विरुद्ध निषेधाचा एक ठराव पास करण्यात आला. त्यांच्या मते हा आगीवर तेल ओतण्यासारखा प्रकार झाला. या घटना पाहून जमातवादी मंडळींनी आमच्याविरुद्ध रानच उठवले. त्यांची मुलेही संघटना सोडून निघून गेली. माझ्या जिवलग मित्रांनाही माझ्याविरुद्ध भडकवण्यात आले. या सर्व प्रकरणामुळे माझी हिम्मत खचली. मुसलमान माझ्याकडे तिरस्काराने पाहायला लागले, मला पाहून जोराने खाकरून थुंकायचे व माझी विटंबना करायचे. अशा रीतीने आपला तिरस्कार व्यक्त करून आनंद मानायचे. माझ्या आईवडलांना अभद्र शिवीगाळ करायचे. मुसलमान म्हणून जन्माला आल्यामुळे मला हे वातावरण अवघड वाटले व मी हमीदभाईंच्या विरुद्ध एक लेख लिहिला. तो नागपूरच्या दैनिक

तरुण भारतने प्रसिद्धही केला. या लेखामध्ये मी हमीद दलवाईंवर बिनबुडाचे आरोप केले होते. 'हमीद दलवाईंच्या सभेत हिंदूंचाच जास्त भरणा असतो... तेदेखील हिंदूंच्याच सभेत जातात... ते मुसलमानांत मिसळत नाहीत... वगैरे. हा लेख वाचून हमीदभाईंना खूप दुःख तर झालेच, पण माझेही मन मला खाऊ लागले. 'लेख लिहून हमीदभाईंवर मी फार अन्याय केला' असे मला मनोमन वाटले. माझा स्वाभिमान जागा झाला व मला खूप पश्चात्ताप झाला. लगेच मी हमीदभाईंना पत्र लिहून कळवले की, 'मी मुसलमानांच्या दबावामुळे दै. तरुण भारतात तुमच्याविरुद्ध लेख लिहून तुमच्यावर अन्याय केला आहे. मी तुम्हाला मुस्लीम तरुणांच्या सभेत बोलवले, तुम्ही आलात व आम्हाला योग्य मार्गदर्शन केलेत. माझ्याकडे आपण जेवण केलेत. असे असताना मी तुमच्यावर खोटे आरोप करावेत, हे खरोखरच अन्यायकारक आहे. मला आपण क्षमा करावी. राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता व मुस्लीम समाजाच्या प्रबोधनासाठी आपल्यासारख्या नेत्याची नितांत आवश्यकता आहे, याची मला जाणीव झालेली आहे. यानंतर मी आपल्याबरोबर काम करणार आहे. हमीदभाईंनी मोठ्या मनाने मला माफ केले व 'झाले गेले विसरून जाऊ या' असे लिहिले. तेव्हापासून आम्ही खूप जवळ आलो.

जमातवाद्यांशी झगडा सुरू

हमीदभाईंनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे आम्ही कार्याला लागलो. दिल्ली, मुंबई, पुणे व कोल्हापूरच्या परिषदांत आम्ही हिरिरीने भाग घेतला. माझ्या कामाची पद्धत पाहून हमीदभाई माझ्यावर खूप खूश झाले. पुण्यातील महिला परिषदेत अमरावतीच्या २२ मुस्लीम स्त्रियांना पाहून हमीदभाई चकित झाले! विदर्भ हा मुल्ला-मौलवींच्या प्रभावात जखडलेला प्रदेश आहे व अशा ठिकाणाहून कधी बाहेर न पडलेल्या मुस्लीम स्त्रिया मोठ्या संख्येने या परिषदेत सामील झाल्या होत्या.

कुटुंब नियोजन व हमीदभाई

हमीदभाईंनी पुण्यात १९७० साली मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली व या संघटनेच्या वतीने आम्हास कामगिरी बजावण्याचे आदेश दिले. त्यात 'कुटुंब नियोजन' या चळवळीला महत्त्वाचे स्थान होते. तलाकपीडित स्त्रियांवर होणारे अन्याय दूर करणे, मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात बदल घडवून समान नागरी कायदा करण्यात यावा, मराठी मुस्लिमांना मराठी माध्यमातून शिक्षण देण्यात यावे, या धोरणाबरोबरच मुस्लिमांनी कुटुंब नियोजनच्या राष्ट्रीय मोहिमेत बरोबरीने सहभागी व्हावे असे या कामगिरीचे साधारण स्वरूप होते. आम्ही मुस्लीम समाजात लोकशाही पद्धतीने व शांततेच्या मार्गाने चळवळ करावी, असेही त्यांनी आम्हाला बजावले होते.

मुल्ला-मौलवींचे काहूर

पुण्यातील कार्यकर्त्यांनी तलाकपीडित स्त्रियांच्या प्रश्नावर भर दिला, तर अमरावतीच्या

कार्यकर्त्यांनी कुटुंब नियोजन मोहीम हातात घेतली. १९७२ साली १७ मुसलमानांना बरोबर घेऊन मी स्वतःवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतली व तेव्हापासून दर वर्षी मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित करून मुस्लिमांचे कुटुंब नियोजन करण्याला आम्ही सुरुवात केली. आमच्या कार्यालयात असे शिबिर ज्या दिवशी असायचे, त्या दिवशी शहरातील सर्व मुल्ला-मौलवी एकत्र होऊन, मोहल्ल्यात फिरून 'मुस्लिमांनी कुटुंब नियोजन करून अल्लाहच्या नियमांच्या विरुद्ध काम करू नये' असा खुला प्रचार करायचे व मुस्लिमांना शिबिरात येण्यास प्रतिबंध करायचे. तरीदेखील आमचे एकही शिबिर आजपर्यंत असफल झाले नाही. सुरुवातीला अशा शिबिरांमधून आमच्या सर्व कार्यकर्त्यांनी व चाहत्यांनी तीन मुलांनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्या. शिबिर संपल्यावर त्याच रात्री आमच्या या मोहिमेच्या विरुद्ध चांदणी चौकात मुस्लिमांच्या प्रचंड अशा जाहीर सभा झाल्या आहेत. 'इस्लामके दुश्मनोंके खिलाफ आज चांदनी चौक में मौलाना सादीक और काझी आमद शेख तकरीर फरमाएंगे. लेहाजा तमाम मुसलमान चांदनी चौक में रात ८ बजे जमा हो जायें' अशी लाऊड स्पीकरवरून शहरात जाहिरात करायचे व आमच्या विरुद्ध प्रतिकूल वातावरण तयार करायचे. असे असतानासुद्धा आमचे कार्यकर्ते कधी तसूभरही डगमगले नाहीत व कुटुंब नियोजनाची मोहीम आम्ही मुस्लिमांमध्ये लोकप्रिय करून दाखवली.

गेल्या वर्षी महाराष्ट्र शासनाने सक्तीचे नसबंदी बिल जनतेच्या पुढे मांडले तेव्हा हमीदभाई अमेरिकेत होते. त्यांच्या आदेशाची वाट न पाहता आम्ही त्यास पाठिंबा दिला. हमीदभाईंनी अमेरिकेतून आल्यावर माझी पाठ थोपटली व 'या मोहिमेत उत्साहाने भाग घे' असे मला सांगितले.

त्यांची प्रेरणा घेऊन ९ ऑक्टोबर १९७६ रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने आणि जिल्हा परिषदेच्या सहकार्याने अमरावती येथे एक भव्य कुटुंब नियोजन शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात १४६ मुस्लिमांनी स्वखुशीने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्या. महाराष्ट्र राज्याचे आरोग्यमंत्री ना. के. एम. बापू पाटील यांनी श्रीमती प्रतिभा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचे उद्घाटन केले. या यशस्वी शिबिराची संपूर्ण महाराष्ट्रातील वर्तमानपत्रांनी दखल घेतली. दूरदर्शनवरून या शिबिराचे दृश्य दाखवण्यात आले; सिनेमागृहातून न्यूजरीलही दाखवण्यात आली. लगेच हमीदभाईंनी ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात ना. शरद पवार यांच्या बंगल्यावर मंडळाच्या कार्यकर्त्यांची सभा बोलवली व 'अमरावतीप्रमाणे इतर शाखांनी कुटुंब नियोजन मोहीम यशस्वी करण्यासाठी शिबिरे आयोजित करावीत व मुस्लिमांना जास्त संख्येने या राष्ट्रीय मोहिमेत सामील करून घ्यावे' असे आवाहन केले. त्यांची प्रकृती दौरे करण्यासारखी नसतानादेखील आम्हाला सांगितले की, 'जर ५० मुस्लिमांचे नसबंदी शिबिर आयोजित कराल, तर मी त्या शिबिराचे उद्घाटन करीन.'

नसबंदीसाठी स्पर्धा

मी अमरावतीस परत आलो व सर्व सहकाऱ्यांशी चर्चा करून आठ दिवसांत, म्हणजे ६ नोव्हेंबर १९७६ रोजी ५० मुस्लिमांचे नसबंदी शिबिर आयोजित केले आणि हमीदभाईंना निमंत्रण दिले.

माझे निमंत्रण त्यांनी स्वीकारले. 'हमीदभाईंचे दीर्घ काळानंतर दर्शन होणार' म्हणून सर्व कार्यकर्ते खूप खूश झाले व उत्साहाने नव्या जोमाने शिबिर यशस्वी करण्यासाठी तयारीला लागले. ठरल्याप्रमाणे हमीदभाई ६ नोव्हेंबर रोजी आमच्या शिबिरात आले. ते दिवसभर शिबिरात थांबले. त्यांच्या उपस्थितीत ५० मुस्लिमांनी रांगा लावून नसबंदी शस्त्रक्रिया करून घेतली. 'माझे पहिले करा' अशी स्पर्धा मुसलमानांत पाहून हमीदभाईंना खूप आनंद झाला. शिबिराचा समारोप करताना त्यांनी उर्दूमध्ये एक तास सुंदर भाषण केले. 'हमीद दलवाई जिंदाबाद'चे नारेही उत्साही कार्यकर्त्यांनी या वेळी लावले. दिवसभराच्या कार्यक्रमानंतर ते त्याच दिवशी मुंबईला परत गेले. त्यांची प्रकृती बरी नसल्याने त्यांना थांबण्याचा आग्रह न करण्याचे सर्व कार्यकर्त्यांनी मान्य केले. त्यांची प्रकृती बरी असती, तर येथील कार्यकर्त्यांनी त्यांना आठ दिवस तरी जाऊ दिले नसते, इतका जिव्हाळा आमच्या कार्यकर्त्यांत त्यांच्या विषयी निर्माण झाला होता.

लवचीक धोरण

ऑक्टोबर १९७६ ते १९ फेब्रुवारी १९७७पर्यंत अमरावती शाखेच्या वतीने हमीदभाईंच्या प्रेरणेने आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात पाचशे (५००) मुस्लिमांनी स्वखुशीने कुटुंब नियोजन करून घेतले. निवडणुकीच्या धामधुमीतही आमचे हे कार्य सुरूच होते. १९ फेब्रुवारीला आयोजित करण्यात आलेल्या शिबिराचा तपशील मी हमीदभाईंना कळवला व '१५ मार्चला दुसरे शिबिर आयोजित केले आहे' असे लिहिले. सहा मार्च रोजी त्यांनी उलट टपाली पत्र पाठवून 'निवडणूक होईपर्यंत शिबिर घेऊ नको व निवडणूक आटोपल्यानंतर पुन्हा सुरू करा' असे बजावले. त्यांच्या पत्रातील या संदर्भात लिहिलेला मजकूर इथे उद्धृत करीत आहे.

'प्रिय वजीर, माझी तुला एक विनंती आहे की, कुटुंब नियोजनाची शिबिरे ताबडतोब बंद करावीत. वातावरण फार प्रतिकूल आहे. आपले कार्य लवचीक असले पाहिजे. प्रतिकूल परिस्थितीत थोडे थांबवायचे आणि हे थोडे थंड झाल्यास पुन्हा सुरू करावयाचे. सध्या निवडणुका असल्यामुळे आमचे कार्य तूर्त बंद असल्याचे फार तर जाहीर करावे.' हमीदभाईंचा हा आदेश मिळताच आम्ही १५ मार्च १९७७ रोजी आयोजित केलेले कुटुंब नियोजन शिबिर स्थगित केले.

दुआ कबूल झाली. पुढे काय?

जनता सरकार व राजनारायण यांचे कुटुंब नियोजनाविषयीचे धोरण पाहून स्थगित झालेले हे शिबिर घेता आले असते की नसते, याबाबत आम्हाला निश्चितता वाटत नव्हती, कारण आमचे हे कार्य अल्लाहच्या नियमांच्या विरुद्ध वाटत असणाऱ्या व हे कार्य बंद पडावे म्हणून दररोज मशिदीत अल्लाहला दु मागणाऱ्या जात्यंध व धर्मांध मौलवी-मुल्लांची दुवा आता कबूल झालेली दिसत होती! अल्लाह मियांनी त्यांच्या मदतीसाठी राजनारायणसारखा अबलिया पाठवून अल्लाहच्या नियमांच्या विरुद्ध सुरू असलेले हे कार्य बंद पाडले!

'मुस्लीम व्यक्तिगत कायदा बदलला पाहिजे' अशी मागणी करणारे डॉ. लोहिया यांच्या शिष्यांत राजनारायण यांचाही समावेश होता. म्हणून एके काळी हे जातीयवादी व धर्मांध मौलवी-

मुल्ला त्यांच्या नावाने बोटे मोडीत होते. आता तेच 'राजनारायण जुग जुग जियो' अशी प्रार्थना करायला लागले होते!

शेवटची भेट

निवडणुकीनंतर २७ मार्चला हमीदभाईंशी माझी शेवटची भेट झाली. हमीदभाईंना जनता पार्टीच्या विजयाबद्दल आनंद झाला होता, परंतु कुटुंब नियोजनच्या मोहिमेबाबत काळजीही वाटायला लागली होती. 'कुटुंब नियोजन मोहिमेत अतिरेक झाला असेल तर तो दूर करण्यात यावा, पण ही मोहीम राष्ट्राच्या उद्धारासाठी फार गरजेची आहे' असे त्यांनी मला सांगितले. ते खाजगी चर्चा करीत असताना म्हणाले होते की, 'कुटुंब नियोजन मोहीम यशस्वी करण्यासाठी कायदा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय मुसलमान समाजातील जातीयवादी मंडळी या मोहिमेत भाग घेणार नाहीत आणि मुल्ला-मौलवींचा या मोहिमेच्या विरुद्धचा प्रचार थांबणार नाही.'

हमीदभाईंचे विचार कधीही नष्ट होणार नाहीत. १४०० वर्षांच्या परंपरेत हमीदभाईंसारखा मुसलमान द्रष्टा या धरतीवर अवतरला नव्हता. हमीदभाईंचे विचार प्रसृत करणारे हजारो तरुण या देशात, मुस्लीम समाजात आहेत, परंतु जमातवादी मंडळींच्या धमक्या व संघटित प्रतिकारास तोंड देण्याची त्यांची छाती होत नाही, म्हणून ते असंघटित आहेत. त्यांना संघटित करण्याची खरी जबाबदारी आता मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांवर येऊन पडली आहे. हमीदभाईंच्या विचारांची ज्योत नेहमी तेवत ठेवण्यासाठी आपण सगळे संघटित होऊ या, हेच माझे सर्व सहकाऱ्यांना नम्र आवाहन आहे. (*हमीद दलवाई विशेषांक, साधना साप्ताहिक, पुणे, १९७७, पृ. क्र. २१ ते २३*)

(शेख वजीर पटेल: मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते, कार्यकारिणी सदस्य होते. त्यांनी मंडळाच्या महत्त्वाच्या विषयांवर कार्य करतानाच हमीद दलवाई यांच्या सूचनेवरून अमरावती भागात, मुस्लीम समाजात कुटुंब नियोजनाच्या प्रचारार्थ अनन्यसाधारण कार्य केले.)

५.२७ एक क्रांतिकारी समर्पित जीवन! – अण्णासाहेब सहस्रबुद्धे

कोरगावकर धर्मदाय संस्थेच्या सेवक संघाचे संमेलन १९६५च्या सुमारास सेवाग्राम येथे भरले होते. त्या संमेलनासाठी तीन महत्त्वाच्या व्यक्तींना आमंत्रण दिले गेले होते – (१) हमीद दलवाई (२) वसंत नगरकर (३) गारगोटीचे प्रा. मुकुंदराव दाभोलकर या तिघांनी मांडलेले विचार सर्वांनी शांतपणे ऐकून घेतले. विशेषतः हमीद दलवाईंनी इस्लाम धर्माचा तौलनिक अभ्यास करण्याचा विचार मांडला होता. दैनिक मराठामध्ये ते सहसंपादक म्हणून काम करत होते. ते काम सोडून 'एक वर्षभर या तौलनिक अभ्यासासाठी वेळ द्यावा' असे त्यांनी ठरवले. माझ्या आठवणीप्रमाणे या कार्याच्या खर्चाचे रुपये पाच हजाराचे अंदाज पत्रकही त्यांनी या संमेलनात मांडले. हमीद दलवाईंचा व माझा तत्पूर्वी परिचय नव्हता. आम्ही प्रथमच भेटत होतो. त्यांनी इस्लाम धर्माच्या तौलनिक अभ्यासाच्या मांडलेल्या विचाराचे महत्त्व सर्वांनाच पटले. शंकरराव देव यांनी या विषयाचे स्वागत केले. कोरगावकर धर्मदाय संस्थेतर्फे आवश्यक ती मदत करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

सेवग्राम येथील गांधी सेवक संघातर्फे अध्यक्ष या नात्याने मी त्यांना अभ्यासासाठी एक हजार रुपये देण्याचे ठरवले. आंतरभारतीनेही काही भार उचलला. मी त्यांना अशीही विनंती केली की, खर्चासाठी लागणारी रक्कम जमण्याची वाट न पाहता, दैनिक मराठाचे काम त्यांनी लगेच सोडून द्यावे व त्यांनी केलेला संकल्प पूर्ण करण्याच्या कामी लागावे. त्याबरोबरच भारतात व भारताबाहेर हिंडण्याच्या, महत्त्वाच्या व्यक्तींना भेटण्याच्या आणि अभ्यासाचे साहित्य गोळा करण्याच्या कामाला त्यांनी सुरुवातही केली. त्यांनी नंतर मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. गेल्या दहा–बारा वर्षांत मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे झालेले काम, एक सुधारक म्हणून हमीद दलवाईंनी दिलेले लढे याची माहिती सर्वांना आहेच. जो एखादा क्रांतिकारी कार्यक्रम हाती घेतो, त्याला नेहमीच प्राणांची बाजी लावावी लागते, मार खावा लागतो. सनातनी वृत्तीच्या मुस्लिमांनी हमीदभाईंना खुनाच्या धमक्या द्यायलाही कमी केले नाही. याही परिस्थितीतून धीरगंभीर वृत्तीने त्यांनी हे सर्व आघात सहन केले आणि ते निर्भयपणे काम करीत राहिले. मुस्लीम सत्यशोधक मंडळ ही संस्था त्यांनी वाढवली. धर्मविषयक कोणकोणत्या सुधारणा व्हायला पाहिजेत, याबाबत त्यांनी अभ्यासूपणे हिंदू धर्मीयांचेही प्रबोधन केले. मुस्लीम धर्मामधल्या प्रबुद्ध लोकांनाही त्यांनी विचार करायला भाग पाडले. दहा–बारा वर्षांच्या काळात त्यांनी सत्यशोधक चळवळीच्या केलेल्या प्रचाराबद्दल व आचाराबद्दल समाज त्यांचा ऋणी राहील. 'आमचे राष्ट्र सेक्युलर आहे' असे आपण मानतो. पण सेक्युलॅरीझमच्या मर्यादा व परधर्म सहिष्णुता यांचाही अभ्यास करण्याची जरुरी आहे. हमीदभाईंच्या चळवळीने विचारमंथनाला चालना मिळाली आहे.

या दहा–बारा वर्षांच्या काळात त्यांचे व माझे वैयक्तिक संबंध खूप वाढले. त्यांच्या बागण्याच्या, कामाच्या पद्धतीमुळे त्यांचे शरीर पोखरत चालले आहे, याची मला कल्पना आली नाही. आजारी पडल्यावरही शरीर–प्रकृतीकडे पुरेसे लक्ष न देता ते काम करीत राहिले. याबाबत

मला असे वाटते की, योग्य वेळी त्यांच्यावर प्रभाव पाडू शकेल, असा सुहृद-मित्र त्यांना मिळाला असता व त्याने त्यांच्या कार्याच्या व्यापाला, चळवळीला वळण लावण्याचा प्रयत्न केला असता, तर कदाचित त्यांना मूत्रपिंडाच्या आजाराला बळी पडावे लागले नसते. हे कर्तव्य आम्ही बजावले नाही, याची मनाला खंत आहे. *(हमीद दलवाई विशेषांक, साधना साप्ताहिक, पुणे, १९७७, पृ. क्र. २५)*

(अण्णासाहेब सहस्रबुद्धे: हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्ते, गांधीवादी, सामाजिक कार्यकर्ते आणि विनोबा भावे यांनी सुरू केलेल्या भूदान चळवळीतील एक नेते होते. त्यांना भारत सरकारने 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित केले होते. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कामात त्यांनी योगदान दिले.)

५.२८ हमीद : एक तुफान – भाई वैद्य

इंधनकार हमीद प्रथम माझ्या घरी आला, तेव्हा त्याच्याशी इंधनवर गप्पा मारण्याचा माझा विचार! परंतु त्याच्या गप्पांचा धबधबा मुस्लीम प्रश्नांवर सुरू झाला आणि स्फुल्लिंगाचा पाहता पाहता वणवा व्हावा, तसे त्याचे व्यक्तिमत्त्व भासू लागले. त्याची पाकिस्तानवरील लेखमाला गाजली होती. त्यांतून गप्पा निघत निघत मुस्लीम भारतीयांचा प्रश्न, जिनांचे राजकारण, राष्ट्रीय मुस्लिमांचा धोंगळपणा, समाजवाद्यांचा भाबडेपणा आणि सनातनी मुस्लिमांचे स्वार्थी पुढारी असे टप्पे घेत घेत धडाडत गाडी जेव्हा पुढे निघाली, तेव्हा तर मी अवाक झालो! बुरसटलेल्या विचारांच्या घोंघावणाऱ्या वाऱ्याशी झुंजायला ठाकलेले हे तुफान आहे, याची जाणीव झाली. मन विस्मयचकित झाले आणि धास्तावलेही! मात्र एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, आपली जवळीक करू पाहणारे हे स्नेहाळ व्यक्तिमत्त्व फार मोठे असून ते पोलादाच्या मुशीतून निघालेले आहे!

पुण्यातील माझ्या मुस्लीम मित्रांशी माझ्या घरीच त्याची ओळख करून दिली. ते मित्र तर भाराबूनच गेले. त्यांत अमीरशेख, सय्यदभाई, मकबूल तांबोळी, रफीउद्दीन सय्यद, सय्यद मुनीर इत्यादी मित्र होते; नियमित बैठका होऊ लागल्या. हमीदच्या विचारांची ओळख सर्वांना होऊ लागली. त्याच्या विचारांतील निर्भयता प्रत्ययास येऊ लागली. '१९१६ साली लखनौ करार करून लो. टिळकांनी मुस्लिमांना सवलती देण्यास सुरुवात केली. गांधीजी त्या मानाने पक्के बनिये... त्यांनी विशेष सवलती दिल्या नाहीत', '१९३६ साली मुस्लीम लीगबरोबरच्या तडजोडीला पं. नेहरूंनी विरोध केला नसता, तर पाकिस्तानचा ठराव आला नसता' अशा तऱ्हेचे ऐतिहासिक विश्लेषणांचे बारकावे चर्चेत सहजपणाने येऊन जात. सहकारी तयार होऊ लागले आणि विचारवंत हमीदची अमीट छाप पडू लागली, परंतु चर्चेबरोबरच मिस्कीलपणाने, घारे डोळे किलकिले करीत व हातांतील सिगारेटची राख झटकीत आणि 'समजलं काय' म्हणत तो जेव्हा मजेदार किस्से ऐकवी किंवा थोर पुढाऱ्यावर शेरा मारून हास्याचे सात मजले उठवी, तेव्हा त्याच्यातील दोस्त हमीदशी चटकन जवळीक होई. एकदा तो त्याच्या चिरपरिचित लकबीत म्हणाला, 'समजलंय काय? पाकिस्तानचे अध्यक्ष कायदे आझम जिनांना भाषणात म्हणायचे होते – 'हमारी दुवासे और अल्लाके फजले करमसे'... तर महाशय म्हणून गेले की, 'अल्लाकी दुवासे और हमारे फजले करमसे'... तर असले हे सनातनी मुस्लिमांचे पुढारी!' आणि म्हणून मग तो डोळे मिचकावीत आणि हाताला झटके देत खदखदत राहिला आणि सर्व मित्रमंडळी हास्यकल्लोळात बुडून गेली. पुढे तो म्हणाला, 'काय दैवदुर्विलास आहे पाहा, जीना आणि सावरकर हे कट्टर बुद्धिवादी, सुधारक आणि निरीश्वरवादी. त्यांना पुढारीपण करावे लागले, ते मात्र पक्क्या सनातन्यांचे!'

जेव्हा चर्चेत सनातनी प्रथा व अंधश्रद्धा यांचा विषय निघे, तेव्हा मात्र हमीदचा कणखरपणा ध्यानी येई. त्याच्या विचारांची धार प्रकर्षाने जाणवे. कित्येक सहकाऱ्यांनाही त्याच्या विचारात

सहभागी होण्याची हिंमत होत नसे. आपण निरीश्वरवादी असल्याचे त्याने केव्हाच सांगून टाकले होते. कुराणचे आणि हदीस चे परीक्षण करायला आणि त्यांतील कालविसंगत व टाकाऊ भागावर टीका करण्याबाबत तो परखड होता. 'पैगंबर महंमद साहेबांना शेवटचे पैगंबर मानण्यासाठी 'खातिम-उन-नबी' हा सिद्धान्त मानणे ही चलाखी आहे' असे तो बिनदिक्कत म्हणे. एकदा तर थट्टेने म्हणाला की, 'मीच शेवटचा पैगंबर आहे असे जाहीर केल्याशिवाय काही मुसलमान ऐकणार नाहीत.' 'ईश्वराचे अस्तित्व मानणे, कोणताही ग्रंथ ईश्वरदत्त मानणे, शेकडो-हजारो वर्षांपूर्वीच्या ग्रंथांतून भूत-भविष्याचे सर्व ज्ञान ग्रथित केलेले आहे, असे मानणे' हा शुद्ध बाष्कळपणा आहे, हे तो पुनःपुन्हा ठसवी. इतकेच नव्हे, तर काही वेळा पैगंबरांच्या चरित्राचेही परखड परीक्षण करी. यामुळे काही सहकारी चिंतातुर होत. काही म्हणत की, 'कुराण ईश्वरदत्त नाही, हे मान्य, परंतु त्यासाठी नास्तिकच असले पाहिजे का? टीका जरा शुगर कोटेड पिलसारखी नाही का करता येणार? मुस्लीम समाजाच्या भावनांचा विचार नको का करायला?' मी त्यांना सांगे की, 'हमीदच्या विचारांची तीक्ष्ण धार कमी करण्याचा यत्न करू नका. तो बुद्धिवादी आहे; रॅशनॅलिस्ट आहे. तुम्हाला झेपेल तसे बरोबर जा. मात्र त्याचे मूलभूत विश्लेषण मान्य असेल, तर त्याचे नेतृत्व स्वीकारण्यास तुम्हाला अडचण पडू नये.'

मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना

अखेर मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्याचे ठरले. 'मुस्लीम' शब्द घालावा की नाही, याबद्दलही चर्चा झाली. 'या शब्दाने जातीयवाद तर सूचित होत नाही ना?' अशीही शंका एकाने काढली. हमीदने शंकानिरसन केले. 'परंपरागत धर्म मानत असो-नसो, जन्माने आपण मुस्लीमच मानले जातो. शिवाय आपणास मुस्लीम समाजात काम करायचे आहे, त्या समाजात सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय राष्ट्रीय एकात्मता समर्थ बनणार नाही. म्हणून 'मुस्लीम' शब्द हवाच.' 'सत्यशोधक' शब्द डॉ. बाबा आढावांनी सुचवला आणि तो तत्काळ स्वीकारण्यात आला. 'त्यामुळे महाराष्ट्रातील समाजक्रांतीच्या उज्ज्वल परंपरेशी आपला धागा जोडला जातो. म. फुलेंशी नाते जोडल्याने करावयाच्या कामाची स्पष्ट जाणीव होते. म. फुलेंनी हजारो वर्षांच्या दुष्ट रूढींविरुद्ध व ग्रंथनिष्ठेविरुद्ध बंड पुकारले, तसेच काम आपणास करायचे आहे, याचे भान या शब्दातून निर्माण होते आणि अखेर, समाज सुधारणा कोणत्याही जमातीत केल्या तरी त्यांचा परिणाम समाजावर एकत्रितपणे होणार आहे, हेही मानले जाते. हिंदू असोत अगर मुस्लीम असोत, रूढिग्रस्तांशी सामना देण्याने भारतीय एकात्मताच बलवत्तर होणार आहे.' हमीदचे हे विश्लेषण सर्वांनी मान्य केले आणि अखेर तो ऐतिहासिक निर्णय घेतला गेला. हमीद आणि त्याचे मूठभर सहकारी यांची त्या वेळची धुंदी आणि मस्ती अजूनही स्मरते. या धाडसी निर्णयाचा होईल तो परिणाम भोगण्याची तयारी प्रत्येक जण मनोमन करू लागला. मी तर हमीदला थट्टेत म्हटलेही की, 'वर्षभरातच आम्हाला शहीद दिन साजरा करावा लागेल.' हमीद हसला, पण काही बोलला नाही, परंतु माझा अंदाज चुकला. त्याच्यावर हल्ला करण्याचे प्रयत्न झाले नाहीत, असे नाही, परंतु त्यांत तसा जोर नव्हता. निर्भय हमीदची करारी प्रतिमाच प्रत्येक वेळी उजळून निघाली आणि

मंडळाच्या कामाला अधिक चालना मिळाली. मुस्लीम समाजही वाटला तेवढा सुधारणा विरोधक नाही, असेही माझे मत झाले. माझ्या मते ही आशादायक गोष्ट होती.

त्यानंतर हमीदच्या कितीतरी वेळा भेटी झाल्या. माझ्याशी बोलताना 'भाबडे समाजवादी' हा त्याचा थट्टेचा खास विषय असे. पक्षाचा असूनही पक्षाबद्दल दुरून टीका केल्याप्रमाणे बोलल्यामुळे काही वेळा मन खट्टू होई. 'तू आपला जनसंघातच जा ना' असेही आम्ही थट्टेने सुनवीत असू, परंतु त्याचा युक्तिवाद खोडता येत नसे. 'हिंदू-मुस्लीम प्रश्न केवळ एकत्रित सण साजरे करण्याने, 'दोन्ही धर्मांतील अंतिम सत्य एकच आहे' असे कीर्तन करण्याने, 'ईश्वर, अल्ला तेरे नाम, सबको सन्मति दे भगवान' या मंत्राने सुटणार नाहीं असे तो म्हणे. 'आपण या देशात अल्पसंख्याक आहोत आणि कायम तसेच राहणार आहोत ही गोष्ट समजून घेण्यास मुस्लीम मन असमर्थ आहे व कोणाही मुस्लीम विचारवंताने त्यांना हे सांगितलेले नाही. आधुनिक राष्ट्रवादाच्या कल्पनेशी जुळवून घेण्यात त्यामुळे त्यांना अडचण येते' असे तो म्हणे. 'मुस्लीम म्हणून नव्हे, तर भारतीय म्हणून त्यांना विचार करायला कसा लावायचा' हा त्याच्यापुढे प्रश्न होता. आपल्या देशात जेथे उपजातींच्या भाषेतच बहुधा लोक बोलतात, तिथे हे किती अवघड काम होते, हे कोणाच्याही लक्षात येईल. पण असे आव्हान आपणहून स्वीकारण्यात तर हमीदचे मोठेपण होते. हॅरिस साहेबांवर त्याने केलेली कठोर टीका गांधीवादी व समाजवादी पद्धतीने मुस्लीम प्रश्नाचा विचार करणाऱ्यांविरुद्धची टीका होती.

प्रतिसाद

या काळात हमीदचे कार्य चारी दिशांनी वाढले. देशाच्या कानाकोपऱ्यांतून त्याला प्रतिसाद मिळू लागला. सर्वश्री छगला, फैजी, बेग इत्यादी मंडळी त्याची आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाची दखल घेऊ लागली. मंडळाची अधिवेशने, शिबिरे, मोर्चे धडाक्याने सुरू झाले. तलाकपीडित मुस्लीम महिलांनी तर धमाल उडवली आणि सनातन्यांना बरोबर चिमटीत पकडले. जागतिक मुस्लीम समाजामध्ये अशा तऱ्हेची प्रबोधनाची लाट प्रथमच भारतात बहाराला येऊ लागली. मात्र माझ्या व हमीदच्या भेटी तुरळक होऊ लागल्या.

आजार

तशात तो आजारी पडला. सर्वश्री शरद पवार, ए. बी. शहा आदी मित्रांनी प्रयत्नांची शिकस्त केली. १९७५ साली आणीबाणीत अटक होण्यापूर्वी त्याला जसलोक हॉस्पिटलात भेटावयास गेलो. तशाही परिस्थितीत किती स्नेहाने त्याने हात दाबला! आजारातून बरा होऊन हिंदू-फिरू लागला आणि परत व्याधींनी जखडला गेला. १२ फेब्रुवारीला जनता पार्टीच्या निवडणूक विषयक चर्चेसाठी मुंबईला गेलो असताना त्याला भेटलो. त्या वेळचा त्याचा चर्चेचा आवेश पाहून थक्कच झालो! चेहऱ्यावरून त्याच्या आजारपणाची कळा तर दिसत होती, परंतु त्या वेळचा त्याचा ओसंडून वाहणारा उत्साह पाहून फार बरे वाटले. राजबंद्यांची सुटका, जनता पार्टीची निर्मिती, यशाची शक्यता या सर्व गोष्टींबाबत तो किती आत्मीयतेने बोलत होता. हुकूमशाहीचा तिटकारा

आणि लोकशाहीचे समर्थन त्याच्या रोमारोमांत भिनलेले होते. मी आणि बाबुमियाँ बँडवाले त्याचा आवेश नुसता पाहत होतो... वाटले की, खऱ्याखुऱ्या लोकशाहीचे स्वप्न पाहणारा हमीद बरा होईल आणि पुन्हा 'समजलं काय' म्हणून अनेक किस्से ऐकवील, चर्चा घडवील, परंतु अखेर तुफान निमाले. मात्र त्या तुफानाचा आवाज सतत कानांत निनादत राहील आणि युगान्तर घडेपर्यंत तुफान सतत चालूच राहील, याची खात्री वाटू लागली आहे. हे हमीदमुळेच घडले. *(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, जुलै १९७६ ते सप्टेंबर १९७७, पुणे, पृ. क्र. २२-२४)*

(भाई वैद्य: ज्येष्ठ समाजवादी नेते, महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री आणि परिवर्तनवादी चळवळीचे मार्गदर्शक. मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि हमीद दलवाई यांचे कट्टर समर्थक आणि पाठीराखे.)

५.२९ असे होते हमीदभाई – सय्यदभाई

हमीदभाई आमच्यातून एकाएकी निघून गेले, यावर अजिबात विश्वास बसत नाही! हमीदभाई गेल्याचा धक्का असा बसला की, त्यातून मी अजून बाहेर पडू शकत नाही. आताशी कोठे पुरोगामी विचार प्रबोधनाचे कार्य मुस्लीम समाजात रुजत होते. हिंदू समाजात अनेक सुधारक होऊन गेले. हिंदू समाज हा तसा धर्माने बांधलेला नाही, तर रूढीने बांधलेला आहे. तरी त्याला अनेक धक्के द्यावे लागले! इथलं तर विचारू नका. एक धर्म, एक खुदा, एक पैगंबर, एक कुरआन (त्यातले एक अक्षरही बदललेले नाही), एक शरीयत, एक हदीस, आणि 'सारे दुनिया का मुसलमान एक' असा हा जगातला मुस्लीम समाज आणि त्या समाजाचा जातीयवाद, स्त्रीवर अन्याय करणारे धार्मिक कायदे, धार्मिक कडवेपणा या सर्व गोष्टींविरुद्ध जिहाद (लढा) करणारे एकटे एक हमीदभाई!

विचार करा, किती कठीण कार्य हमीदभाईंनी हाती घेतले होते. हमीदभाई काय म्हणत? ते म्हणत, 'आपण मुसलमान नंतर बनू, आधी इन्सान बनू या. एकदा का इन्सान बनलो की सर्व प्रश्नांबाबत इन्सान म्हणून विचार करू. जर का नुसते मुसलमान राहिलो, तर फक्त मुसलमानांचा विचार करू. कोणत्याही माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे. माणसेच माणसाला धर्माच्या टाचेखाली पशू म्हणून जगवतात.' हमीदभाई म्हणाले, 'आता आपण फक्त माणूस आणि माणुसकी म्हणून विचार करू.' तर मुल्ला, मौलवी, राजकीय पुढारी म्हणाले, 'आम्ही फक्त मुसलमान और इस्लाम इतकाच विचार करू. याच्या पलीकडे आम्ही जाणार नाही आणि जो धार्मिक कायद्याचा गैरवापर करील, तो नरकात जाईल!' हमीदभाईंचा सवाल : 'मेल्यानंतरची तुम्ही काळजी करता, जित्याची का नाही?'

गुन्हेगारीचे कायदे पुरुषाच्या सोयीचे नाहीत, म्हणून ते बदलून सौम्य करून घेतले. कारण काय, तर काळ बदलता आहे. गुन्हेगार नष्ट करायचा नसून गुन्हा नष्ट करायचा आहे. तर हमीदभाई विचारीत, 'मग अन्यायकारक सामाजिक कायदा का बदलत नाही?' त्यावर उत्तर 'यहाँ हमारी हुकमत नहीं है और शरीयत कायदे बदलने का हक सिर्फ मुसलमान को है. गैरों को नहीं.' मग हमीदभाई म्हणत, ' 'याचा अर्थ असा की, दिल्ली आमच्या ताब्यात द्या, नाहीतर गप्प बसा. आम्ही आमचे चालू ठेवू.' '

एका बाजूला हमीदभाई, दुसऱ्या बाजूला गल्ली ते दिल्लीतील मुस्लीम राजकीय व धार्मिक पुढारी यांची चर्चा सतत चालू असे. हमीदभाई कोठे गेले नि चर्चा झाली नाही, त्यांना 'काफिर ' ही पदवी मिळाली नाही, असे कधीच झाले नाही. हमीदभाईंच्या प्रश्नाला उत्तर देता आले नाही की, मंडळी म्हणत, 'तुम्ही हेच कार्य का करता?' त्यावर हमीदभाई म्हणत, 'सर्व मुसलमान आपलं सोडून सगळ्या जगाचं बोलतात; मी फक्त आपलंच बोलतो. कारण ज्यांना आपला समाज सुधारता येत नाही, त्यांनी जगाच्या गप्पा मारू नयेत. तर आधी आपल्या घरातली घाण

काढू या.' यावर मंडळी हमीदभाईंना चहा देऊन 'आपण परत बसूं' म्हणून निघून जात.

वाह्यात प्रश्न

असे हमीदभाई समाजाशी सत्यासाठी सतत झगडत राहिले. एकदा हमीदभाईंचे भाषण सोलापुरातील झाकीर हुसेन चौकात रात्री होते. मी बरोबर होतो. चौकातील एका हॉटेलात आम्ही चहासाठी गेलो. हमीदभाईंना गराडा पडला; प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. विरोधकांना त्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मिळत होते. प्रश्न संपत आले, तेव्हा काही मुलांनी हमीदभाईंची टर उडवायला सुरुवात केली, पण हमीदभाई चिडले नाहीत. एकाने प्रश्न विचारला, 'का हो, तुम्ही तुमचे नाव हमीद दलवाई असे लावता. याचा अर्थ तुम्हाला तुमचे बाप कोण हे माहीत नाही की तुम्हाला बाप नाहीच!' यावर खो खो करीत ती सगळी पोरं जोरात हसली! मी चिडलो. मला राग आला. हमीदभाई मात्र सिगारेट ओढत शांतपणे म्हणाले, 'सांगतो... सांगतो, याचेही उत्तर देतो.' आता ती पोरं अगदी शांत होती. त्यांना हमीदभाईंचे उत्तर ऐकायचे होते. नंतर परत टर!

हमीदभाई म्हणाले, 'असे आहे, तुमच्या म्हणण्याप्रमाणे माझे बडील नेमके कोण, हे मला माहीत नाही, त्याप्रमाणे तुमचे बडील कोण, हे तुम्हीही नेमके सांगू शकत नाही; कारण जन्मल्यानंतरच तुम्हाला आईने बडील दाखवले. त्यावर विश्वास ठेवण्यापलीकडे तुम्ही तरी काय करणार? का आईलाही विचारणार, 'हेच माझे बडील कशावरून?' तर आपण अशा फालतू – वाह्यात चर्चेत वेळ घालवू नये, असे आपले मला वाटते.' त्यावर सर्व हॉटेलात अळीमिळी गुपचिळी! हमीदभाईंचा वादविवाद म्हणजे अतिशय मुद्देसूद! त्यांनी विरोधकांची कधी टर उडवली नाही. शेवटी ते असे म्हणत की, 'या विषयावर आपली मते भिन्न आहेत. तरीपण आपण भेटू, ज्या मुद्द्यावर आपले एकमत असेल, त्याच्यावर बरोबर काम करू.'

किंमत द्यावी लागेल

जगातल्या एखाद्या विषयाची त्यांना माहिती नाही, असे मला कधीही वाटले नाही. मी हमीदभाईंना सोळा-सोळा तास सतत वादविवाद करताना पाहिले आहे. आम्ही एकदा दिल्लीला गेलो होतो. मंडळाच्या कार्यासंबंधी दिल्लीत अनेकांशी चर्चा व्हायची. लोक थक्क होत असत. महाराष्ट्रात राहणारा हा माणूस दिल्लीकरांच्या वर उर्दू बोलतो!

हमीदभाई म्हणत, 'समाज आपल्यावर चिडून आहे. हा त्याचा अधिकार आहे. आपण त्यांच्या चुका दाखवतो ना, मग आपल्याला त्यांची टीका सहन करावी लागेल. प्रत्येक कामाची किंमत द्यावी लागते.'

दिल्लीला परचमे हिंद साप्ताहिकाचे संपादक जनाब अनिस-उर्-रहमान यांना आम्ही भेटलो. ते हमीदभाईंना म्हणाले, 'क्यूँ अपना किमती वक्त बरबाद करते हो? है कुछ लिखो... पैसा कमाओ... यह कौम सुधरनेवाली नहीं।' त्यावर हमीदभाई म्हणाले, 'असे नाही. मी जर नुसता बसून राहिलो, तर काळ जातच राहणार. मग आपल्याला शक्य आहे तोवर काम करीत राहिले पाहिजे, असे मला वाटते.'

हमीदभाईंच्या अनेक आठवणी आहेत. त्यांच्याकडून खूप शिकायला मिळाले. त्यांना कार्यासंबंधी वा राजकारणासंबंधी एखादा प्रश्न विचारा. मग हमीदभाई त्याचे सविस्तर उत्तर तर देणारच, पण त्याचबरोबर त्या प्रश्नाचा मागचा पुढचा संपूर्ण इतिहासही सांगणार!

आनंदावर विरजण

कोल्हापूरच्या शिक्षण परिषदेतील गोष्ट. त्या दिवशी परिषदेतील उपस्थिती पाहून हमीदभाई व आम्ही सर्व कार्यकर्ते अतिशय आनंदात होतो, आणि त्याच रात्री हमीदभाईंची तब्येत बिघडली. रात्रभर त्यांना सारख्या उलट्या होत होत्या. दुसऱ्या दिवशी दिवसभर हमीदभाई झोपून राहिले; परिषदेला आले नाहीत; सर्वांनाच वाईट वाटले. डॉ. कुमार सप्तर्षी व डॉ. अनिल अवचट परिषदेला आले होते. त्यांनी तपासले. 'काळजीचे कारण नाही. पित्त झाले आहे. आराम करा.' म्हणाले. एका दिवसात हमीदभाई बरे झाले! ही रोगाची सुरुवात असल्याचे कोणाच्याही लक्षात आले नाही. त्यानंतर त्यांच्या प्रकृतीच्या तक्रारी सारख्या सुरू झाल्या.

किडनी बसवल्यानंतर ते काही काळ बरे झाले. ते म्हणत, 'या किडनीचा काही भरवसा नाही. एखाद्या वेळी दहा वर्षेही चालेल किंवा वर्षभरात 'रिजेक्ट'ही होईल!' मृत्यूबद्दल इतक्या सहजतेने बोलणारा माणूस मी अजून पाहिलेला नाही.

'हमीदभाई गेले, सर्व संपले' असे विरोधक म्हणतात. परंतु दलवाईंचे अनुयायी त्यांनी दाखवलेल्या मार्गाने मंडळाचे कार्य चालू ठेवतील, याबाबत कुणीही शंका बाळगू नये.

(मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, जुलै १९७६ ते सप्टेंबर १९७७, पुणे, पृ. क्र. ४७ – ४९)

(सय्यदभाई: हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापना काळातील आघाडीचे कार्यकर्ते होते. बहिणीच्या तलाकमुळे अस्वस्थ झालेल्या सय्यदभाईंनी तहहयात याच प्रश्नावर कार्य केले. हमीद दलवाईंनंतरच्या काळात मंडळाचे नेतृत्व करणाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश होतो.)

५.३० सय्यदभाई यांचे साताऱ्यात व्याख्यान

(हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाविषयी विरोधकांनी अपप्रचार केला. त्यातून अनेक गैरसमज पसरवण्यात आले. हमीद दलवाई यांच्या निधनानंतर दलवाई आणि मंडळ यांच्या विषयी योग्य आकलन व्हावे, यासाठी मंडळाने काही उपक्रमांचे आयोजन केले. यातीलच एक भाग म्हणजे, दलवाईंच्या निधनानंतर दोन महिन्यांनी सातारा येथे सय्यदभाई यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांच्या निधनानंतर निर्माण झालेली पोकळी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सामुदायिक पद्धतीने भरून काढण्याचा निर्णय घेतला आणि विविध भागांत हमीद दलवाई यांचे जीवनकार्य व 'मुस्लीम सत्यशोधक समाज' या विषयावर लोकांना माहिती देण्यासाठी, तसेच प्रबोधनाच्या विषयांवर लोकशिक्षण करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन केले. साताऱ्यात ज्ञानविकास मंडळाने सोमवार दिनांक १७ जुलै १९७७ रोजी सय्यदभाई यांचे व्याख्यान आयोजित केले. या व्याख्यानाच्या अध्यक्ष स्थानी डॉ. नरेंद्र दाभोलकर होते. ज्ञानविकास मंडळाचे कार्यवाह वि. ल. चाफेकर यांनी हमीद दलवाई आणि त्यांच्या कार्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमात संवादासाठी प्रश्नोत्तरांचाही समावेश होता. 'भारतीय राज्यघटना कोणत्याही एका धर्मावर आधारित नाही, तेव्हा धर्माच्या नावावर कुणी समान अधिकार नाकारून अन्याय करत असतील, तर त्यांचा बंदोबस्त करण्याचे काम शासनाचे आहे. त्यासाठी मागणीची वाट पाहण्याची गरज नाही' असे पाठक भवनात आयोजित केलेल्या ज्ञानविकास मंडळाच्या कार्यक्रमात सय्यदभाई बोलत होते.

पुढे सय्यदभाई आपल्या विषयाचे विवेचन करताना म्हणाले, '३ मे १९७७ला हमीदभाई आम्हास सोडून गेले. अनेकांना दुःख झाले, पण कोठेकोठे पेढे वाटून काहींनी आनंद व्यक्त केला. 'तलाक' पद्धती विरुद्ध हमीदभाईंनी लढा पुकारला होता. त्यामुळे तलाकपीडित महिलांना अति दुःख झाले. हमीदभाईंचे कार्य जगजाहीर आहे. ते स्वतः निधर्मी होते, पण 'मुस्लीम समाजात जन्माला आल्याने आपण या धर्मातील पीडित महिलांची सेवा करणार' असे ते म्हणत. २२ मे १९७०ला त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. 'बहुसंख्याकांशी समजुतीने वागले पाहिजे. मशिदीवरून वाद्ये वाजत गेली म्हणून आपण विरोध करू नये' असे ते म्हणत. मुस्लीम सत्यशोधक मंडळास समाजाचा विरोध का? आमची मागणी अशी की, 'इंडियन पिनल कोड सर्वांना आहे तसा समान नागरी कायदा करा.' पण शरीयत लॉचे शिक्षेच्या तरतुदी असलेले कायदे बाजूस काढून फक्त पुरुषांच्या हिताचे शरीयतचे कायदे तेवढे चालू आहेत. मुसलमानांत अनेक धार्मिक संघटना आहेत. 'पतीच्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्याचा अधिकार मुस्लीम महिलेस असला पाहिजे' असे आमचे म्हणणे. मुसलमानास चार लग्ने करण्याला, काहीही कारण नसता किंवा न देता तलाक देता येण्याला, पोटगी द्यावी न लागण्याला आमचा विरोध आहे. दोन

वर्षांपूर्वी आम्ही जिहाद-ए-तलाकची घोषणा दिली. आम्हाला महिन्यात साडेतीनशे केसेस मिळाल्या. तलाकपीडित महिलांची एक परिषद घेतली, 'एक समान कायदा असावा' अशी मागणी केली. कोणासही अन्यायकारक कायदा नको. माणसांना उपयुक्त होईल, असा कायदा हवा.

बारा मुले झालेल्या एका मुसलमानाने आपली बायको अयोग्य म्हणून दुसरे लग्न केले. एका गरीब मुलीस फसवले व लगेच तिला तलाक देऊन घराबाहेर काढली. ही केस आमचेकडे आली होती. बार्शीला एका वकिलाने असेच आपल्या बायकोस टाकून दिले. अत्याचार होऊनही समाज जागा होत नाही. यावर कायद्याचे बंधन हवे. मुसलमान समाजात नवऱ्याला केव्हाही तलाक देता येतो, पण बायकोस मात्र घटस्फोट घ्यायचा, तर कोर्टात जावे लागते. तलाकपीडित महिलांचे प्रचंड कार्य आमचेकडे चालले आहे.

शरीयत कायद्याप्रमाणे एखाद्या बाईला बदफैली ठरवायची तर पूर्वी चार साक्षीदार लागत, पण आता ते कलम काढून टाकले आहे. तलाक हे धारदार शस्त्र-तलवार मुस्लीम महिलांवर कायमचे टांगून ठेवले आहे, पण पुरुषावर बंधन नाही. आणीबाणीचा फायदा घेऊन इंदिराबाई मुस्लीम महिलांना योग्य असा कायदा करतील, असे वाटत होते, पण ते झाले नाही. आजही जनता पक्षाचे शांतीभूषण सांगतात की, समान नागरी कायद्यामुळे राष्ट्रीय ऐक्यास धोका पोहोचेल. चार-चार लग्ने करणारा माणूस समाजात प्रतिष्ठितपणे राहू शकतो. याला अटकाव करण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ आहे. हजारो स्त्रियांचे शिव्याशाप घेणारा समाज पुढे जाऊ शकणार नाही. सरकारने यात लक्ष घातले पाहिजे. स्त्रियांना माणुसकीने वागवले गेले पाहिजे. माणसांनी माणसाशी कसे वागावे, हा खरा प्रश्न आहे. *(महाराष्ट्र टाइम्स, समर्थ, २१ जुलै १९७७; दैनिक ऐक्य, १९ जुलै १९७७)*

(सय्यदभाई : हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापना काळातील आघाडीचे कार्यकर्ते होते. बहिणीच्या तलाकमुळे अस्वस्थ झालेल्या सय्यदभाईंनी तहहयात याच प्रश्नावर कार्य केले. हमीद दलवाईंनंतरच्या काळात मंडळाचे नेतृत्व करणाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश होतो.)

५.३१ मुस्लीम स्त्रियांचे प्रश्न– मेहेरून्निसा दलवाई

(पवनार येथे आंतरराष्ट्रीय महिला सभा आयोजित करण्यात आली होती. त्यात हमीद दलवाई यांच्या पत्नी, मेहेरून्निसा दलवाई यांनी सहभाग घेतला. हमीद दलवाई यांच्या निधनानंतर मेहेरून्निसा दलवाई अधिक सक्रिय झाल्या. मुस्लीम महिलांच्या बाबतीत सामान्य महिलांच्यामध्ये काय प्रतिमा आहे, मुस्लीम महिलांच्या विविधांगी प्रश्नांची जाणीव त्यांना आहे का हे समजून घेण्यासाठी महिला परिषदेत जाण्यापूर्वी त्यांनी अनेक महिलांशी संवाद केला. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मुस्लीम महिलांचे स्थान समजून घेण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. या निमित्ताने त्यांनी केलेले चिंतन साप्ताहिक राष्ट्रतेजमध्ये प्रकाशित करण्यात आले.)

जवळजवळ जगातील सर्व बहुसंख्य मुस्लीम देशांमध्ये मूलभूतवादाची एक जबरदस्त लाट उसळली आहे. इराणमध्ये झालेल्या तथाकथित इस्लामी क्रांतिकारी चळवळीनंतर या मूलभूतवादी चळवळींना बळ आले. या चळवळींमागील सैद्धान्तिक प्रेरणेचा विचार न करता निरनिराळ्या मुस्लीम देशांतही 'मागे पाहू' चळवळ कशी वाढते आहे, यावर एक धावता दृष्टिक्षेप टाकणे माहितीच्या दृष्टीने आवश्यक आहे.

मी नुकतीच पवनार येथे आंतरराष्ट्रीय महिला सभेकरिता गेले होते. तेथे जाण्यापूर्वी मी मुंबई ग्रूपमधील काही बायकांना भेटले. त्यांना विचारले की, 'तुम्ही कधी मुस्लीम महिलांना भेटलात का? त्यांच्या अडचणींबाबत कधी विचारणा केली का?' त्यावर त्या म्हणाल्या, 'आम्ही त्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. काही प्रश्नही विचारले. पण त्यांनी आम्हास सरळ सांगितले की, 'तुम्ही आधी मौलवी-मुल्लांची परवानगी घ्या, मग आम्हाला काय विचारायचे असेल ते विचारा.' यातून त्यांच्यावर मौलवी-मुल्लांचा पगडा कितपत आहे, ते दिसून येते. बाहेरील देशांत सध्या काय चाललेले आहे, ते पाहा. इराणचे उदाहरण घ्या. शहा ऑफ इराणनंतर अयातुल्ला खोमैनी यांचे राज्य आले. त्यांनी पहिले काम असे केले की, महिलांना बुरखा घालण्याची सक्ती केली. मार्च १९७९मध्ये याविरुद्ध तेहरान येथे ५०,००० महिलांनी मोर्चा काढला. परंतु त्याचा काही फायदा झाला नाही. ही चळवळ येथेच संपुष्टात आली आणि महिलांना बुरखा घालणे सक्तीचे करण्यात आले. इतकेच नव्हे, तर इराणमधील महिलांना रेडिओवर गाण्याची बंदी केली गेली. तेथे शहाच्या राज्यात काही महिला न्यायाधीश पदावर होत्या. त्यांना असे सांगण्यात आले की, 'कोणत्याही केसचा निर्णय लागेल तेव्हा त्यात एका पुरुष साक्षीदाराबरोबर दोन महिला साक्षीदार असे प्रमाण धरावे लागेल.' नोकरीच्या संदर्भातही असे ठरविले गेले की, 'जिथे पुरुष नसतील, तेथेच त्यांनी नोकरी करावी.'

जेव्हा इराण येथे इस्लामबद्दल नवीन घटना बनविली गेली, तेव्हा तेथे ७२ तज्ज्ञांची एक कमिटी नेमली गेली. त्यामध्ये एक महिला होती व तीही आयातुल्ला खोमेनींनी नियुक्त केलेली होती. तेथे निवडणुकीचा प्रचार झाला, तेव्हा जसा आपल्या येथे उमेदवाराचा फोटो काढला

जातो, तसाच तेथेही काढला जातो. मात्र बुरख्यातून त्या बाईचे फक्त नाक व दोन डोळे दिसतील, असा फोटो काढून प्रचार करण्यात आला. अयातुल्ला खोमैनी आणि दुसरे मौलवी-मुल्ला असे म्हणतात की, 'इस्लाममध्ये स्त्री-पुरुष समानता आहे.' हे कुठपर्यंत खरे आहे, याचा अंदाज आपण वरील उदाहरणांवरून लावू शकता आणि इस्लाममध्ये समानता कोठपर्यंत व कशी आहे, तेही पाहू शकता.

हे झाले इराणचे. सौदी अरेबिया घ्या. इराणमध्ये जे काही चालले आहे, ते सौदी अरेबिया येथे मान्य आहे, असे नाही. पण त्याचे कारण वेगळे आहे. इराण हे शिया राष्ट्र आहे व सौदी अरेबिया वहाबी राष्ट्र आहे. मी आता त्यावर चर्चा करणार नाही. पण जेथे महिलांचा प्रश्न येतो, तेथे ही दोन्ही राष्ट्रे त्यांना खालच्या दर्जाची वागणूक देतात. दोन्ही राष्ट्रे मूलभूततावादी आहेत (जैसे थे वादी!). दोघेही असमानतेचा पुरस्कार करतात. काही दिवसांपूर्वी एक ब्रिटिश रिपोर्ट असा होता की, कोठल्यातरी स्त्रीचा एका परकीयाशी संबंध आला. तिला इस्लामी कायद्यानुसार शिक्षा दिली गेली. सौदी अरेबियामध्ये एका राजघराण्यातील मुलीचे लॅबेनॉनच्या राजदूताशी प्रेम जमले. तो मुलगा राजघराण्यातील नव्हता. म्हणून विरोध केला गेला व त्यांना शरीयतच्या कायद्याप्रमाणे दगडाने ठेचून मारण्याची शिक्षा किंग खालिद याने द्यायला लावली. पण त्या मुलीच्या चुलत्याला दया येऊन त्याने खालिद याला विनंती केली की, 'एवढी कडक शिक्षा तिला देऊ नका.' नंतर त्यांना गोळी घालून मारण्यात आले.

मलेशियाचे पाहा. हे इराण व सौदी अरेबिया यांसारखे कडवे राष्ट्र नाही. हे बहुसंख्याक मुसलमान राष्ट्र आहे. त्यांची विचारधारा सौदी अरेबिया व इराण यांच्या इतकी संकुचित नाही. तेथेपण उदारमतवादी विचार करणारे अनेक लोक आहेत. 'तुम्ही ऑफिसमध्ये व कारखान्यात पुरुषांच्या बरोबरीने काम करू नका' असे महिलांना सांगणाऱ्या संघटना तेथेही आहेत. 'कॉलेजमध्ये आम्हाला पुरुष प्रोफेसर नको. आम्हाला बायकांनीच शिकविले पाहिजे. हे आमच्या धर्माच्या विरोधी आहे. कारण 'पुरुषांसमोर येऊ नये', 'बुरख्यात राहावे' असे कुराणामध्ये लिहिलेले आहे' असा काही ठिकाणी विद्यार्थिनींनीच आग्रहही धरला आहे.

मध्यपूर्वेतील राष्ट्रांमध्ये तर भर चौकात लोकांसमोर गोळी घालून मारण्याची प्रथा आजसुद्धा चालू आहे. आपण लोकांनी वर्तमानपत्रात हे वाचलेच असेल की, इराक, सीरिया, इराण व पाकिस्तान या ठिकाणी फटके मारण्याचीही प्रथा चालू आहे. आजच्या विसाव्या शतकात मुस्लीम राष्ट्रे सोडली, तर कोणत्याही सुधारित राष्ट्रांमध्ये हे होत नाही. या सर्व गोष्टींचा अर्थ एवढाच की, त्या समाजाच्या रक्तात भिनलेला हा एक प्रकारचा अमानुषपणा आहे. हा रानटीपणाचा दृष्टीकोन आहे. या लोकांत कसलाही सुसंस्कृत कायदा नाही. हा सुधारित राष्ट्रांचा प्रकार नाही. असे जर आपल्या समाजात झाले, तर आपण गप्प न बसता विरोध करू, झगडू. जेथे मानवी मूल्यांना महत्त्व आहे, तेथे ही गोष्ट होणे अशक्य आहे. पण मुस्लीम राष्ट्रांची गोष्टच वेगळी!

हा मुस्लीम समाज आजही १३०० वर्षे मागे पडला आहे. तो आज एकूण भारतीय समाजाच्या पुनर्रचनेमध्ये कसा सहभागी होईल? एकीकडे हिंदू समाज विसाव्या शतकाबरोबर आगेकूच करीत आहे, प्रगतिशील आहे; दुसरीकडे मुस्लीम समाज १३०० वर्षे मागे पडलेला आहे. याचे कारण

त्यांचा इस्लाम धर्म. त्याने मुस्लीम महिलांना दाबून ठेवलेले आहे. मुस्लीम राष्ट्रांत निजामे इस्लामीची स्थापना करण्याचा प्रयत्न चालू आहे, हे आपणांस ठाऊकच असेल. या मुस्लीम महिलांची स्थिती बदलण्याचा विचार व हिंदू स्त्रीची सद्यःस्थिती यांचा मेळ आपण कसा काय बसवाल? हे माझ्यासमोरील मूलभूत प्रश्न आहेत. आपण सर्वांनी त्यावर गंभीरपणे विचार करावा. इस्लाम धर्म स्त्रीकडे कोणत्या नजरेने पाहतो, याचा विचार झाला पाहिजे. धर्माचे पृथक्करण करण्यास शिकले पाहिजे. भावनेच्या आहारी जाऊन विचार करणे अयोग्य आहे. व्यासपीठावर हे बोलणे सोपे आहे की, 'सर्वधर्म समान आहेत, ते शांती शिकवतात.' नवीन समाज निर्माण करण्याची जी स्वप्ने आपण पाहत आहोत, ती पूर्ण होणार नाहीत. म्हणूनच मी म्हणते, Criticism of religion is the beginning of all criticism. आता आपण गोडीने बोलणे बंद केले पाहिजे. आपण नेहमीच असे बोलतो, 'तुम्ही चांगले, आम्ही चांगले... तुमचा धर्म चांगला, आमचा धर्म चांगला... आपण दोघे भाऊ-भाऊ. मी तुमच्याकडे येऊन सोलकढी प्यायची... तुम्ही माझ्याकडे येऊन बिर्याणी खायची. मग म्हणायचे की, 'तुम्ही आमच्या धर्मात ढवळाढवळ करू नका आणि आम्ही तुमच्या धर्मात ढवळाढवळ करणार नाही.' ' हे मला मान्य नाही. आपल्याला आता धीटपणे खरेखरे बोलायला शिकले पाहिजे, तरच आपले प्रश्न सुटतील.

महिलांचे प्रश्न तर एकसारखेच असले पाहिजेत. स्त्री म्हटली की, कोणत्याही जातीची असली, तरी ती महिलाच. त्यामुळे तिचे प्रश्न सारखेच असले पाहिजेत. पण आपल्या भारतात असे नाही. येथे वेगवेगळ्या जातीचे, धर्माचे लोक राहतात. त्यामुळे सर्वांचे प्रश्न वेगवेगळे असतात... नोकरीचा प्रश्न घ्या, शिक्षणाचा घ्या, सामाजिक समतेचा प्रश्न घ्या, पुरुषांच्या बरोबरीचे स्त्रियांचे प्रश्न घ्या... खरे म्हटले तर ते एकच असले पाहिजेत, वेगळे असण्याचे कारण नाही. पण मुस्लीम महिलांच्या शिक्षणाचा प्रश्न व सामाजिक समतेचा प्रश्न हे दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. त्याला कारण म्हणजे त्यांचा धर्म. स्त्री व गुलाम यांत इस्लाम धर्मात काहीही फरक नाही. एका वेळेस ४ बायका करणे ४ नोकर ठेवण्याबरोबरचेच आहे. त्यांना सोडणे नोकराला काढून टाकण्यासारखेच आहे. समजा आपणांस नोकराचे काम आवडले नाही, तर आपण त्याला कामावरून कमी करतो आणि दुसऱ्याची नेमणूक करतो. अशा तऱ्हेने एक बायको आवडली नाही, तर दुसरी बायको मुसलमान पुरुष आणू शकतो... नावडतीला 'तलाक' दिला की झाले!

आपल्या देशात फार मोठमोठे समाज सुधारक होऊन गेले आहेत. राजा राममोहन राय, महात्मा जोतिबा फुले, अण्णासाहेब कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी हिंदू बायकांच्या शिक्षणासाठी बरेच प्रयत्न केले. त्यांच्या शिक्षणाच्या चळवळीमधूनच एक समानतेची चळवळ हिंदू समाजात सुरू झाली... ती वाढली. त्यांनी आधुनिक शिक्षण प्राप्त केले व आधुनिक विचार आत्मसात केले. १९०६मध्ये पापामियाँ यांनी अलीगढ येथे मुस्लीम स्त्रियांच्या शिक्षणासाठी वुमेन्स कॉलेज काढले. हे कॉलेज फार चांगले आहे. तेथे १००० ते १५०० महिला शिकत आहेत. पण तेथे एक गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे, त्या महिलांनी आधुनिक शिक्षण घेतले, पण त्यांनी आधुनिक विचार मात्र आत्मसात केले नाहीत. कॉलेजच्या चार भिंतीबाहेर एक जग आहे, तेथे मुस्लीम महिला आपल्या अधिकारासाठी झगडत आहेत, हेही त्यांना माहीत नव्हते. अर्थात त्यात त्यांची

काही चूक नाही. त्यांना चांगले नेतृत्व मिळले नाही.

अलीगढमध्ये सर सय्यद अहमदखान यांनी १८८५मध्ये मोहम्मदन अँग्लो ओरिएंटल कॉलेज काढले. १९२०मध्ये सांविधानिक कायद्यानुसार त्याची अलीगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी झाली. सर सय्यद अहमदखान यांनी हे कॉलेज मुस्लीम लोकांना आधुनिक शिक्षण देण्याकरिता सुरू केले होते. त्यांचा एक खास हेतू असा होता की, जर मुसलमानांना हिंदूंच्या बरोबर राहायचे असेल, तर त्यांनी आधुनिक शिक्षण घेतले पाहिजे. त्यांचा हेतू फार चांगला होता, पण या अलीगढमध्ये अलीगढ चळवळ सुरू झाली. त्या चळवळीने मुसलमानांमध्ये अलगतावाद निर्माण झाला.

कर्मवीर भाऊराव पाटील, आंबेडकर, आगरकर, राजा राममोहन राय यांनी हिंदूंमध्ये सुरू केलेल्या चळवळीमुळे हिंदू समाजात एक सामाजिक समतेची चळवळ उभी राहिली. त्यांना आपले अधिकार मिळाले. ही चळवळ पुढे वाढून बळकट झाली. पण मुसलमानांच्या आधुनिकतेच्या शिक्षणाच्या चळवळीमध्ये पाकिस्तानची निर्मिती झाली. मुस्लीम महिला धर्माच्या चौकटीतून बाहेर पडू शकल्या नाहीत. त्याचे कारण मुसलमानांच्या प्रत्येक चळवळीला धर्माची प्रेरणा आहे. ते त्याच्याविरुद्ध बोलू शकत नाहीत. ते जर आपल्या अधिकारासाठी झगडले, तरी त्यांच्याबद्दल असे बोलले जाते की, 'हे आपल्या धर्मातच ढवळाढवळ करतात.'

कोणत्याही विरोधाची पर्वा न करता पहिला बंडाचा झेंडा हमीद दलवाई यांनी फडकविला. एप्रिल १९६६मध्ये त्यांनी सात बायकांचा मोर्चा महाराष्ट्र विधानसभेवर नेला. त्यांच्या मागण्या होत्या समानतेच्या, समान नागरी कायद्याच्या. मुस्लीम बायकांच्या प्रश्नास तोंड फोडण्याचे काम या क्रांतिकारक मोर्चाने केले. त्यातूनच मुसलमानांमध्ये सामाजिक समतेसाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली.

इस्लाम धर्म घ्या. याचा जन्म ट्रायबल सोसायटीत झाला. पैगंबर कुरेश घराण्यातील होते. सगळे खलिफा कुरेश घराण्यातीलच होते; दलबाई घराण्यातील कोणीही खलिफा झाला नाही... कारण घराण्याची मक्तेदारी. इस्लाममध्ये स्त्रीस दुय्यम दर्जाच दिला गेला आहे. वारसा हक्काच्या अनुसार पुरुषास मालमत्तेचा पूर्ण अधिकार, पण स्त्रीस अर्धा मिळतो. पुरुष एका वेळेस ४ बायका करू शकतो, पण स्त्री एका वेळेस चार नवरे करू शकत नाही. इस्लाममध्ये समानता आहे असे म्हणतात, पण ते पुरुषांबाबतही मर्यादित अर्थानेच खरे आहे. मसजिदमध्ये नमाज पढण्यापुरतीच ही समानता मर्यादित आहे. मात्र मशिदीच्या बाहेर, बाहेरील समाजात सर्व पुरुषांनाही बरोबरीचा दर्जा दिला गेलेला नाही. इकबाल या कवींनी एका ठिकाणी म्हटले आहे,

'एक सफ में खडे हो गये महमूद और अयाज, कोई बंदा रहा ना कोई बंदे नवाज'

पण माझ्या मते त्यांचे बोलणे चुकीचे आहे. का? तर मसजिदमध्ये सर्व एका रांगेत उभे राहतात... तो गुलाम असो का राजा, पण जेव्हा ते बाहेर पडतात, तेव्हा गुलाम गुलामच राहतो आणि राजा हा राजाच. त्यांना बरोबरीचा दर्जा दिला जात नाही. व्यभिचाराची केस घ्या... पुरुष आपल्या बायकोवर बदफैलीचा आरोप करू शकतो. त्याने जर हे सिद्ध केले, तर त्या स्त्रीस इस्लाम धर्माच्या कायद्यानुसार दगडाने ठेचून मारण्याची शिक्षा दिली जाते. पण जर एखादा नवरा व्यभिचारी असेल, तर स्त्री त्यावर आरोपही करू शकत नाही. इस्लाम ही एक अशा साच्यात

घडविलेली रचना आहे की, जिला विरोध सहन होत नाही. त्यात जे काही लिहिलेले आहे, ते अखेरचे आहे. त्याला Theory of Finality म्हणतात.

अशा समाजामध्ये आधुनिकतेचे विचार फैलावण्याचे व ती बळकट करण्याचे काम अवघड आहे, पण ते करणे तितकेच गरजेचे आहे. मुसलमान समाजाला कालबाह्यतेतून बाहेर काढण्यासाठी विचारांचे घाव सतत घालीत राहिले पाहिजे. आपण जर हे यशस्वीपणे केले, तर या विचाराचा पुरस्कार करणारे समविचारी आपल्याला जरूर भेटतील आणि आपण प्रबोधनाची चळवळ पुढे नेऊ शकू. *(साप्ताहिक 'राष्ट्रतेज', १ मे १९८०, पान नं. २२ व २४)*

(मेहेरून्निसा दलवाई: हमीद दलवाई यांच्या निधनानंतर मंडळाच्या कार्यात सक्रिय होऊन मंडळाचे नेतृत्व केले. मंडळाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना केली.)

५.३२ मुस्लीम सत्यशोधक मंडळाची दहा वर्षे – सय्यदभाई

(मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पहिल्या दशकातील महत्त्वाचे उपक्रम, हमीद दलवाई यांचे विचार आणि मुस्लीम प्रश्नासंदर्भात मंडळाचे नेते सय्यदभाई यांनी घेतलेला पहिल्या दशकाचा आढावा साप्ताहिक राष्ट्रतेजमध्ये प्रकाशित करण्यात आला.)

१९४७ साली देशाची फाळणी होऊन स्वातंत्र्य मिळाले. गांधीजी सोडून सर्वांनाच असे वाटत होते की, मुसलमानांना पाकिस्तान देऊन टाकल्यानंतर हिंदू-मुस्लीम तेढ कायमची गाडली जाईल. कारण 'भारतात मुसलमानांना हिंदूंकडून न्याय मिळणार नाही' असे मुस्लीम लीगचे पुढारी म्हणत. परंतु घडले नेमके उलटे! पाकिस्तान घेऊनही सगळे मुस्लीम नागरिक पाकिस्तानात गेले नाहीत. पाकिस्तानची लोकसंख्या आणि भारतातील मुसलमानांची लोकसंख्या जवळजवळ सारखीच होती (आज भारत, पाक आणि बांग्लादेश येथील आढावा घेतल्यास भारतातच अधिक मुसलमान आहेत, असे दिसून येईल). ज्या कटकटींना कंटाळून एकदाचे पाकिस्तान देऊन टाकले होते, तीच डोकेदुखी मुस्लीम जातीयवादाच्या रूपाने भारतात उभी राहिली. नोकऱ्यांत मुसलमानांना राखीव जागा, उर्दूला दुसऱ्या राज्यभाषेचा दर्जा, कुटुंब नियोजनाला विरोध, शरीयत कायदा बदलण्यास विरोध, समान नागरी कायद्याला विरोध... म्हणजे एकूण राष्ट्रीय प्रश्नांबद्दल जातीयवादी मुसलमान टोकाची भूमिका घेऊ लागले. याचा परिणाम असा झाला की, स्वतंत्र भारतात हिंदू-मुस्लीम दरी वाढत गेली व देशात या ना त्या कारणाने सतत जातीय दंगली घडू लागल्या. याचा फायदा मुस्लीम जातीयवादी मंडळी घेऊ लागली व 'आम्हाला या देशात न्याय मिळणार नाही' ही मुस्लिमांची स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीची ओरड पुन्हा ऐकू येऊ लागली.

मुसलमानांच्या व देशाच्या हिताबद्दल सत्य सांगणारा कोणीतरी मुसलमानांत निर्माण झाला पाहिजे, असे अनेकांना वाटू लागले आणि काळाची गरज म्हणून हमीद दलवाई निर्माण झाले. भारतीय मुस्लीम राजकारणाचा आणि समाजकारणाचा अभ्यास करण्यासाठी दलवाईंनी देशाचा दौरा केला आणि आपल्या पुरोगामी विचारांचा प्रचार सुरू केला. ते म्हणत, 'देशाची फाळणी करून, सवतासुभा उभा करून मुस्लीम सुटला नाही, हे एकदा सिद्ध झाल्यावर परत त्याच मार्गाने जाणे म्हणजे शुद्ध लबाडी आहे, ढोंगीपणा आहे, चलाखी आहे. आपल्याला खरोखरच मुसलमानांच्या प्रश्नांचा निकाल लावायचा असेल, तर नवीन मूल्ये शोधली पाहिजेत, आणि मूल्ये शोधताना धर्मग्रंथ नव्हे, तर बुद्धिप्रामाण्य मानले पाहिजे. जात, धर्म, वंश, लिंगभेद मोडून आपण मानवी मूल्यांची सांगड घालायला शिकले पाहिजे. इस्लामच्या नावाने वाढत असलेला जातीयवाद मुसलमानांनी गाडून टाकला पाहिजे. मुस्लीम वैयक्तिक कायद्यामध्ये बदल करून मुस्लीम स्त्रियांना समान लेखणारे कायदे करणे आवश्यक आहेत. सातव्या शतकात केलेले कायदे विसाव्या शतकात लागू पडत नाहीत. शरीयत कायदा हा मानवनिर्मित आहे. मुस्लीम जातीयवादाने मुसलमानांचेच नुकसान होणार आहे.'

दलवाईंच्या या प्रचाराने मुस्लीम समाज खवळला. त्याने दलवाईंना धर्म-बुडवा, काफिर, हिंदूंचा एजंट, समाजशत्रू अशा अनेक शेलक्या शिव्या दिल्या. अनेकदा त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्नही झाला, परंतु दलवाईंना समाजाकडून उत्तर हवे होते; दलवाई माघार घ्यायला तयार नव्हते. दलवाईंच्या विचाराला पुण्यातील मुस्लीम तरुणांकडून प्रतिसाद मिळू लागला... विचार होऊ लागला, बैठका घडू लागल्या... दलवाईंचे कार्यक्षेत्र पुणे बनले. 'संघटना उभी करावी' असे शेवटी ठरले. २२ मार्च १९७० रोजी पुण्यात मुस्लीम समाजातील पहिली पुरोगामी संघटना 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' या नावाने जन्माला आली. संघटना उभी राहण्यापूर्वी अनेकांची अभिनंदनपर पत्रे आली. दलवाईंना बरोबर घेऊन संघटना उभी असल्याचे समजताच अनेकांनी पत्रे परत मागितली व आमचा निषेध केला.

सुरुवातीला खूप गमतीजमती झाल्या. अनेक नातेवाइकांनी पुण्यातील कार्यकर्त्यांना बेजार केले. अर्थात, महाराष्ट्रात प्रत्येक ठिकाणी स्थानिक कार्यकर्त्यांना त्रास झाला.

कार्यकर्त्यांनी हमीद दलवाईंच्या नेतृत्वाखाली काम सुरू केले. संघटना उभी राहिल्याबरोबर पहिला कार्यक्रम होता, समान नागरी कायद्यासाठी मुस्लीम महिलांच्या सह्यांची मोहीम... तारीख ८ एप्रिल १९७० रोजी मुंबईला मुख्यमंत्री बसंतराव नाईक यांना समान नागरी कायदा मागणीसाठी ५०० सह्यांचे निवेदन देण्यात आले.

नंतर पुण्यात मंडळातर्फे प्रचार पदयात्रा कार्यक्रम आखण्यात आला.

१९ जून १९७० : रात्री पुण्यात मुस्लिमांचा गजबजलेला भाग म्हणजे मोमीनपुरा येथे जावयाचे ठरले. परंतु गणेश पेठेतल्या पदयात्रेत खूप उशीर झाल्यामुळे २० जूनला सकाळी ९ वाजता मोमीनपुऱ्यात जायचे ठरले. तसा निरोप तेथील चर्चा आयोजित करणाऱ्या कार्यकर्त्यांना देण्यात आला.

२० जूनला : खडक भाग संपवून मोमिनपुऱ्यात जातो तो काय... सगळीकडे काळे झेंडे व 'हमीद दलवाई मुर्दाबाद' असे फलक! दलवाईंबरोबर मी व इतर चौघे पुण्याचे कार्यकर्ते होते. परिस्थिती चिघळत चालली होती. आम्ही परत फिरण्याचे आत दलवाईंवर एकाने हल्ला केलाच. आम्ही पाच जणांनी दलवाईंभोवती कडे करून जमावातून बाहेर काढले. काल रात्री आम्ही येथे आलो असतो तर... आमच्यातील कोणीही जिवंत परत जाऊ शकला नसता असे विरोधक बोलत होते.

१२ जुलै ७० : महाराष्ट्राचे राज्यपाल अली यावर जंग यांना मंडळातर्फे मुस्लीम जातीयवाद्यांविरुद्ध निवेदन देण्यात आले.

२२ नोव्हेंबर ७० : पुण्यात मंडळाची पहिली सामाजिक परिषद भरवण्यात आली. तिला महाराष्ट्रातून खूप समविचारी मंडळी आली. परिषदेत समान नागरी कायदा, जातीयवाद्यांविरुद्ध कडक कारवाईची मागणी, नसबंदी व असे अनेक पुरोगामी ठराव पास करण्यात आले. परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील बहुतेक समविचारी कार्यकर्ते एकत्र आले होते. परिषदेनंतर रात्री मोठी बैठक झाली व त्यात महाराष्ट्राची कमिटी बनवण्यात आली व जुने स्वातंत्र्य सैनिक, श्रीगोंद्याचे बाबुमियाँ बँडवाले यांना अध्यक्षपद स्वीकारण्याची

विनंती करण्यात आली व ती त्यांनी मान्य केली. गेली दहा वर्षे मा. बाबुमियाँचे नेतृत्वाखाली संघटना कार्य करत आहे.

१ जानेवारी ते डिसेंबर १९७१ : महाराष्ट्रभर दौरा करून ठिकठिकाणी शिबिरे, मिळावे घेण्यात आले. त्यांत प्रामुख्याने अमरावती, कोल्हापूर आघाडीवर होते.

४, ५ डिसेंबर ७१ : दिल्लीला ऑल इंडिया फॉरवर्ड मुस्लीम परिषद घेण्यात आली. एकूण ८० प्रतिनिधींपैकी महाराष्ट्रातून ४० प्रतिनिधी उपस्थित होते. दिल्लीच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्राचे कौतुक केले.

येथे हमीद दलवाईंनी पुरोगामी मुसलमानांची एक ॲडहॉक कमिटी बनवली. तीन महिन्यांनी दलवाई व मी दिल्लीला गेलो, परंतु फारशी साथ मिळाली नाही.

२७, २८ डिसेंबर ७१ : जगातील पहिली मुस्लीम महिला परिषद पुणे येथे घेण्यात आली. महाराष्ट्रातून १६९ मुस्लीम महिला आल्या होत्या. या परिषदेमुळे देशभर मुस्लीम समाजात खळबळ उडवून दिली. परिषदेचे उद्घाटन सुप्रसिद्ध विचारवंत प्रा. असफ ए. ए. फैजी यांनी केले; अध्यक्षपदी प्रख्यात सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती शरीफा तैय्यबजी होत्या. मुस्लीम महिलांवर धर्माच्या नावाखाली होणारे अन्याय इतिहासात पहिल्यांदाच जाहीरपणे मांडले होते. या परिषदेमुळे मुस्लीम समाजाची खूप फजिती झाली. त्यातून समाज चवताळून उठला. परिषदेला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून आलेल्या महिलांचा स्थानिक पातळीवर छळ सुरू झाला, परंतु या दगाबाजीला न घाबरता कार्यकर्त्यांनी आपले कार्य निर्धाराने चालू ठेवले. सर्वांत जास्त त्रास झाला तो अमरावतीच्या भगिनींना... परिषदेला आलेल्या महिलांच्या घरावर बहिष्कार घालण्यात आला. तेथील मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते वजीर पटेल यांना जाहीर सभेत खुनाची धमकी देण्यात आली, परंतु तेथील कार्यकर्ते परिस्थितीला खंबीरपणे तोंड देत राहिले. या परिषदेमुळे जातीयवादी मुस्लीम संघटना अस्वस्थ झाल्या. त्यांनी मंडळाला विरोध करण्यासाठी अखिल भारतीय या पातळीवर मोर्चा बांधला. 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ कमिटी इंडिया' या नावाची संघटना उभी केली. यात मुस्लीम लीगपासून ते जमात-ए-इस्लामी, तबलीग जमात आणि काँग्रेसचे, समाजवादी, कम्युनिस्ट व इतर प्रकारचे सर्व मुस्लीम कार्यकर्ते सामील झाले. या पर्सनल लॉ कमिटीने पुण्यापासून सुरुवात करून देशभर मंडळविरोधी आणि ' 'मुस्लीम पर्सनल लॉ'मध्ये बदल करू नका' हे सांगण्यासाठी परिषदा घेतल्या. विरोधकांनी महिलांच्या निराळ्या व पुरुषांच्या निराळ्या परिषदा घेऊन समान नागरी कायद्याला विरोध केला. विरोधकांच्या परिषदांना हजर असलेल्या अनेक महिलांच्या मुलाखती घेतल्यावर समजले – 'तुम्ही जर समान नागरी कायद्याला विरोध केला नाही, तर तुम्हाला तलाक देण्यात येईल, असे आमच्या नवऱ्यांनी बजावले होते.' असे बहुतेक महिलांनी सांगितले.

२८ डिसेंबर ७२ : अशा विरोधकांनी समान नागरी कायद्याला विरोध करण्यासाठी अखिल भारतीय पातळीवर मुंबईत पुरुषांची २० हजारांची परिषद घेतली. तिला विरोध करण्यासाठी मंडळातर्फे विरोधी मोर्चा काढण्यात आला. मोर्चात दलवाईंसहित २० कार्यकर्ते होते.

विरोधकांनी मोर्च्याला घेराव घातला... दगड, विटा, बाटल्या, लाठ्या, काठ्या सुरू झाल्या... पोलीस बोटावर मोजण्याइतके. ते काहीच करू शकले नाहीत. प्रत्येक जण 'दलवाई कौन है?' असे विचारीत होता. त्या दिवशी 'दलवाई राहत नाहीं' असे मला वाटत होते. अधिक पोलीस कुमक आली आणि आम्हालाच अटक झाली.

२५ मार्च ७३ : विरोधकांना मुंबईत उत्तर दिले पाहिजे, असे ठरले व मुंबईला २५ मार्चला मुस्लीम परिषद घेण्यात आली. 'परिषद हॉल बॉम्बने घडवून देऊ' अशी निनावी धमकी विरोधकांनी दिली होती. तरी परिषद प्रचंड प्रमाणात झाली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून कार्यकर्ते उपस्थित होते. उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध विचारवंत प्रा. मोईन शाकीर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध विचारवंत प्रा. फैजी उपस्थित होते.

३०, ३१ डिसेंबर ७३ : मंडळाने आपला मोर्चा मुस्लीम शिक्षणाकडे वळविला व ३०, ३१ डिसेंबरला कोल्हापूरला महाराष्ट्र मुस्लीम शिक्षण परिषद घेण्यात आली; ७५० प्रतिनिधी हजर होते. 'महाराष्ट्रीय मुसलमानांनी मराठी माध्यमामधून शिक्षण घ्यावे' हे प्रामुख्याने मांडण्यात आले. या परिषदेची सर्व जबाबदारी कोल्हापूर शाखेची होती. या परिषदेमुळे संघटनेला खूप नवीन कार्यकर्ते मिळाले. शिक्षण परिषद दोन दिवसांची होती. पहिल्या दिवसाचे कार्यक्रम संपले. रात्री दलवाईंची प्रकृती अचानक बिघडली. 'काळजी करू नका, पित्ताचे आहे' असे अनेक डॉक्टरांनी सांगितले, परंतु सर्व खोटे ठरले. दलवाईंच्या जीवघेण्या आजाराची सुरुवात येथेच झाली, याची कोणालाही कल्पना नव्हती.

चिपळूण : याच सुमारास दलवाईंची जन्मभूमी चिपळूण येथे मुस्लीम महिला परिषद घेण्यात आली. विरोधकांनी निदर्शने केली... गाव दलवाईंचे, विरोधक दलवाईंचे सर्व नातेवाईक... तरी परिषदेला २५० महिला उपस्थित होत्या.

२२ मार्च १९७५ : महाराष्ट्र विधानसभेवर समान नागरी कायद्याच्या मागणीसाठी मंडळातर्फे महिलांचा मोर्चा आयोजित केला होता, परंतु दलवाईंचा आजार बाढला. 'किडनीत दोष निर्माण झाला आहे' असे दिसून आले. म्हणून विधानसभा मोर्चा तात्पुरता रद्द करण्यात आला.

मग 'ठिकठिकाणी महिला परिषदा घेऊन आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे करावे' असे ठरले.

५ नोव्हेंबर ७५ : कोल्हापूरला पहिली मुस्लीम महिला परिषद घेऊन समान नागरी कायद्याची मागणी करण्यात आली व मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले.

८ ऑक्टोबर ७५ : रमजान ईदनिमित्त मशिदीवर जाऊन तलाकपीडित महिलांसाठी मंडळातर्फे निधी गोळा करून समाजास मोठा धक्का दिला. या कार्यक्रमाचा जातीयवादी मुसलमानांकडून जाहीर निषेध करण्यात आला.

२३ नोव्हेंबर ७५ : जगातील पहिली तलाकपीडित मुस्लीम महिला परिषद पुण्यात घेण्यात आली. तिला शहरातून १०७ तलाकपीडित महिला उपस्थित होत्या. अनेकांनी आपल्या 'सत्यकथा' सांगितल्या. या परिषदेमुळे विरोधकांचे तोंड बंद झाले. विशेष म्हणजे, मंडळाला विरोध करण्यासाठी उभी केलेल्या पर्सनल लॉ कमिटीचे अनेक स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.

याच वेळी अनेक मुस्लीम वकिलांनी कायद्याची मदत मोफत देण्याचे जाहीर केले.

या परिषदेमुळे देशभर मुस्लीम समाजाला हादरा बसला. या परिषदेनंतर ऑल इंडिया पर्सनल लॉ कमिटीचे तोंड कायमचे बंद झाले आणि काम थांबले. फक्त आता त्यांची पाटी तेवढी शिल्लक आहे.

या परिषदेला इतर वर्तमानपत्रांबरोबर उर्दू वर्तमानपत्रांनीही खूप प्रसिद्धी दिली. दरम्यान दलवाईंचे दुखणे वाढत गेले. दोन्ही किडन्या बाद झाल्या. डोनरच्या शोधात समाजाकडून दलवाईंची खूप हेटाळणी केली गेली. फिरोज दारूवालाची एक किडनी बसवण्यात आली.

तीही काही महिन्यांनी 'रिजेक्ट' झाली, आणि ३ मे १९७७ रोजी संघटना पोरकी करून दलवाई निघून गेले. 'दर वर्षी ३ मे रोजी कृतिदिन म्हणून संघर्षमय कार्यक्रम घ्यावा' असे ठरले व त्याप्रमाणे ३ मे रोजी मंडळातर्फे ठिकठिकाणी पहिल्या वर्षी मोर्चा व दुसऱ्या वर्षी उपोषण करून समान नागरी कायद्याची मागणी करण्यात आली. दलवाईंच्या मृत्युनिमित्त विरोधकांनी पेढे वाटले. त्यांना वाटले, 'आता संघटना खतम होणार.' परंतु दलवाई गेल्याबरोबर महाराष्ट्रव्यापी मेळावा घेऊन सर्व कार्यकर्त्यांनी निर्धाराने कार्य पुढे नेण्याचा आपला निश्चय व्यक्त केला.

विरोधकांना उत्तर म्हणून वजीर पटेल यांनी अमरावतीला जाहीर करून तलाकपीडित प्रचंड परिषद घेऊन विरोधकांना थप्पड दिली.

मंडळ सोडावे म्हणून अमरावतीला आधी कार्यकर्त्यांना लाच देण्याचा प्रयत्न झाला. कोणी बधत नसल्याचे पाहून वजीर पटेलसहित अनेकांना खुणाच्या धमक्या सुरू झाल्या. तशी अमरावती शाखा अधिक जोमाने कार्यरत झाली.

याच पद्धतीने सातारा आणि अहमदनगर येथील तलाकपीडित महिलांच्या परिषदा घेण्यात आल्या. तसेच अहमदनगरला तलाकपीडित महिलांचा मोर्चा कलेक्टर कचेरीवर नेण्यात आला.

हमीद दलवाईंचा विचारांचा वारसा घेऊन संघटना दलवाईनंतरही त्याच जोमाने उभी आहे. संघटनेतील कुठल्याही कार्यकर्त्याने विचारांशी कधीही तडजोड केली नाही, हे येथे अभिमानाने नमूद करावेसे वाटते. प्रत्येक कार्यकर्ता आपल्या परीने मंडळाच्या ध्येयधोरणाशी सुसंगत असाच कार्यक्रम आखून काम करीत आहे.

मंडळाचे प्रचार साहित्य : मंडळाचे मुखपत्र 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' मराठीतून पुण्याहून प्रसिद्ध होते आहे. ही पत्रिका त्रैमासिक आहे.

दुसरे असे अमरावतीहून निघणारे 'साप्ताहिक बागबान' वजीर पटेल चालवितात.

वरील आणि स्थानिक पातळीवरचे सर्व कार्यक्रम इंडियन सेक्युलर सोसायटी आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ अशा दोघांनी संयुक्तिकपणे पार पाडले आहेत.

शाखांनी केलेली महत्त्वाची कामे

अहमदनगर : तलाकपीडित महिलांचे मेळावे, तलाकपीडित महिलांची परिषद घेतली. २५ महिलांच्या पोटगीचे दावे न्यायालयात दाखल करण्यात आले. त्यांतील आतापर्यंत दहा महिलांना पोटगी मिळवून दिली.

चिपळूण : येथे दादाभाई पटेल मंडळाचे काम पाहतात. हमीदभाई हयात असताना येथे मुस्लीम

महिला परिषद घेण्यात आली होती. त्यानंतर मंडळातर्फे अनेक छोटे-मोठे कार्यक्रम सुरू आहेत.

मुंबई : हमीदभाईंनंतर खरे मुंबईचे काम चालू झाले. हमीदभाईंनंतर दलवाईभाभींनी मुंबई शाखेची जबाबदारी स्वतः घेतली. अंधेरीला मंडळाचे काम जोमाने सुरू आहे. मंडळातर्फे मुंबईला अंधेरी येथे महिला परिषद घेण्यात आली. मुस्लीम मुलांना प्रादेशिक भाषेतील पाठ्यपुस्तके वाटली गेली. मुस्लीम मुलांची वैद्यकीय तपासणी केली गेली. तलाकपीडित महिलांच्या पोटगीसाठी न्यायालयात दावे लावले गेले. दोन प्रकरणाचे निकाल लागून त्यांना पोटगी मिळाली.

येथील प्रमुख कार्यकर्ते मेहेरून्निसा दलवाई, राजेसाहेब मुलाणी, इकबाल, मुसा, महंमद दलवाई आणि अब्दुल कादर मुकादम हे आहेत.

अमरावती : अमरावती शाखा पहिल्यापासून आघाडीवर आहे. 'मुस्लीम जातीयवाद्यांशी लढा देणें' हे त्या शाखेचे प्रमुख काम आहे. ५०० मुसलमानांची नसबंदी करून त्यांनी राष्ट्रीय कार्यक्रम पाळला. अमरावती शाखेच्या या कामाबद्दल मंडळाला नेहमीच अभिमान वाटतो. ५०० गरीब गरजूंसाठे प्रयत्न करून बँकेतून कर्ज मिळवून दिले. गरीब मुसलमानांच्या आजारपणात त्यांना मदत लागल्यास रक्कमसुद्धा दिली.

मराठवाडा दंगलपीडितांसाठी रुपये १७०४/- जमवून दिले. बांग्लादेश निर्वासितांसाठी एक दिवस उपाशी राहून रुपये १५१/- अमरावतीच्या कलेक्टरना दिले. तसेच पोटगीसाठी तलाकपीडित महिलांचे दावे दाखल केले. त्यात अनेकांना पोटगी मिळाली आहे. १९७७मध्ये तलाकपीडित महिला परिषद घेऊन समान नागरी कायद्याची मागणी केली.

लहान मुस्लीम मुलांसाठी बालकमंदिर चालविले आहे. त्याचप्रमाणे शाखा अतिशय जोमाने अनेक प्रकारचे विधायक काम करीत आहे. जातीय दंगली झालेल्या ठिकाणी समक्ष जाऊन दोन्ही समाजात सलोखा निर्माण करण्याचा सतत प्रयत्न असतो. येथील प्रमुख कार्यकर्ते शेख वजीर पटेल, अझीझ बारी हे आहेत. या दोघांना जात्यंध मुसलमानांकडून अनेक वेळा जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे व तसे प्रयत्नही झाले आहेत.

कोल्हापूर: कोल्हापूर शाखा ही सतत कार्यरत शाखा आहे. बांग्लादेश साहाय्य निधी रुपये १०१/- बांग्लादेश साहाय्य समितीकडे पाठविला. समान नागरी कायदा मागणीसाठी सायकल मोर्चा काढला; शिक्षण परिषदेची जबाबदारी कोल्हापूर शाखेने मोठ्या शिताफीने पार पाडली. शिवाय वेळोवेळी केंद्रीय कार्यालयाकडून आलेल्या कार्यक्रमानुसार अंमलबजावणी केली. येथील प्रमुख कार्यकर्ते हुसेन जमादार, मुलाणी व इतर असे आहेत.

पुणे : मंडळाची सुरुवात पुण्यात झाली. या शाखेला दलवाईंचा सतत संपर्क लाभला आहे. त्याचा पुरेपूर फायदा या शाखेने घेतला आहे. समान नागरी कायद्यासाठी शाखा सतत निरनिराळे कार्यक्रम आखत असते. त्यात मोर्चा, उपोषण, शासकीय अधिकाऱ्यांना निवेदन देणे आणि पहिली पत्नी असताना दुसरे लग्न होत असेल, तर कार्यकर्ते प्राण पणाला लावून ते लग्न अडवितात. या शाखेचे पुण्यातील मुस्लीम समाजात फार नाव आहे. आधुनिक शिक्षणाच्या संदर्भात पुना कॉलेजवर पत्रके वाटणे, जातीयवाद्यांविरोधी मोर्चा, बांग्लादेश निधी, दंगल घडल्याच्या दुसऱ्या दिवशी मराठवाडा दंगलपीडितांसाठी, तसेच तलाकपीडित महिलांच्या मदतीसाठी मशिदीबर

जाऊन निधी गोळा करणे व 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ : उद्देश व भूमिका' आणि दलवाईंचे 'मुस्लीम जमातवादाचे स्वरूप : कारणे आणि उपाय' ही दोन पुस्तके मशिदीवरच विकून निधीसंकलन करणे असे अनेक उपक्रम या शाखेने यशस्वीपणे राबवले. दलवाईंच्या निधनानंतर पुणे शहरात ठिकठिकाणी मुस्लीम भागांत जाहीर सभा घेऊन मंडळाची भूमिका मांडली. त्यांत ठिकठिकाणी सभेवर जात्यंधांकडून हल्ला झाला. १५ ऑगस्ट ७५ ला युक्रांदाच्या रक्तदान कार्यक्रमात शाखेने भाग घेतला. वेळोवेळी सभा घेऊन, पत्रके काढून जात्यंध मुसलमानांचा जाहीर निषेध केला गेला. कोल्हापूरकडून सत्यशोधक पत्रिका पुण्यात आली. पुणेकरांनी तिची जबाबदारी घेतली आणि महाराष्ट्रव्यापी अनेक परिषदा-शिबिरांचीही जबाबदारी घेतली. गटागटांनी मुस्लीम भागात चर्चेस जाणे, मराठी माध्यमामधून शिकणाऱ्या मुस्लीम विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके वाटप, मोफत कायदा सल्ला इ. या शाखेचे कार्य आहे. शहरातील कोणतेही वकील मोफत सर्व काम करायला तयार असतात. शाखेने अनेक पोटगीची प्रकरणे जिंकली आहेत. पुणे शहरात होणाऱ्या अनेक परिसंवादांत कार्यकर्ते सतत भाग घेत असतात. बासी ईदच्या दिवशी सारसबाग व इतर बागांत जाऊन समान नागरी कायदे आणि जात्यंधविरोधी पत्रके शाखेच्या महिला कार्यकर्त्यांनी वाटली. या तऱ्हेने अनेक कार्यक्रम शाखा घेत असते. येथील प्रमुख कार्यकर्ते आहेत फजल शेख, अन्वर शेख, अमीर शेख, सय्यद मुनीर, इब्राहिम सिंधवी, एजाज सय्यद, श्रीमती साबिरा बेग इत्यादी.

श्रीगोंदा : तालुक्याचे ठिकाण असूनही केंद्रीय कार्यालयाकडून येणारा प्रत्येक कार्यक्रम नेटाने पार पाडला गेला. मंडळाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष बाबुमियाँ बँडवाले श्रीगोंद्याचे आहेत.

सोलापूर येथे महंमद हनीफ तांबोली व प्रा. फक्रूद्दीन बेन्नूर यांनी मंडळाच्या ध्येयधोरणांशी सुसंगत असे अनेक कार्यक्रम पार पाडले. शिवाय ते वर्तमानपत्रात लिहीत असतात व सत्यशोधक पत्रिकेत अनेक लेख लिहीत असतात. त्यात त्यांची हातोटी आहे.

निपाणी : येथे बेग व महंमद नाईक आपल्या परीने संघटनेचे कार्य चालवतात.

आमच्या इतरांकडून अपेक्षा :

मुस्लीम सत्यशोधक मंडळाला जन्मापासून इंडियन सेक्युलर सोसायटी, युवक क्रांती दल, राष्ट्र सेवा दल, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, साधना कार्यालय, आंतरभारती, समाजवादी महिला सभा, विषमता निर्मूलन समिती आणि हमाल पंचायत यांचे सहकार्य लाभत आले आहे. मंडळ त्यांचे सदैव ऋणी आहे. मंडळासहित वरील सर्व संघटनाचे एक व्यापक व्यासपीठ असावे, हे हमीद दलवाईंचे फार मोठे स्वप्न होते. ते कसे साकार करायचे, याचा सर्वांनी विचार करायचा आहे. समान नागरी कायद्या मागणी व मुस्लीम जातीयवाद्यांविरुद्ध मंडळातर्फे महाराष्ट्र विधानसभेवर व लोकसभेवर मुस्लीम तरुणांचा आणि तलाकपीडित महिलांचा मोर्चा काढायचा आहे. या कामी वरील संघटनांनी सहभागी होऊन आम्हाला साथ द्यावी, अशी अपेक्षा आहे. शिवाय वरील संघटनांनी हिंदू जातीयवाद्यांबरोबर मुस्लीम जातीवाद्यांविरुद्धही फळी उभी करावी.

प्रा. अ. भि. शहा, डॉ. बाबा आढाव, मा. यदुनाथ थत्ते, भाई वैद्य यांचे मार्गदर्शन संघटनेला सतत लाभत आहे. विशेषतः हमीदभाईंनंतर वरील मंडळींनी सतत आपल्या संघटना व कार्यकर्ते वाढण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटी सर्वांच्या आधारे धर्मनिरपेक्ष बुद्धिप्रामाण्याची कास धरून, मानवी मूल्ये डोळ्यासमोर ठेवून संघटना वाटचाल करील, असा परत एकदा निश्चय करीत आहोत. *(साप्ताहिक राष्ट्रतेज, १ मे १९८०, पान क्र. ३१)*

(सय्यदभाई: हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापना काळातील आधाडीचे कार्यकर्ते होते. बहिणीच्या तलाकमुळे अस्वस्थ झालेल्या सय्यदभाईंनी तहहयात याच प्रश्नावर कार्य केले. हमीद दलवाईंनंतरच्या काळात मंडळाचे नेतृत्व करणाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश होतो.)

५.३३ मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे बहुमोल कार्य – नानासाहेब गोरे

(हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यास अनेक प्रतिष्ठित मान्यवरांनी पाठबळ दिले आणि मंडळाच्या कार्याचे स्वागत केले. मंडळाचे कार्य, त्याचे विचार आणि त्याच्या अडचणी यांचा ऊहापोह करणारे एक पत्रक मंडळाच्या पहिल्या दशकानंतर ज्येष्ठ समाजवादी नेते आणि विचारवंत नानासाहेब गोरे यांनी प्रसिद्ध केले.)

महाराष्ट्राच्या अर्वाचीन सामाजिक इतिहासात ब्राह्मणी वर्चस्वावर घणाघाती प्रहार करून बहुजन समाजाला त्याच्या घोर निद्रेतून जागे करणारे जसे महात्मा फुले, 'तुम्ही पशू नाही, माणसे आहात. म्हणून माणुसकीच्या अधिकारासाठी लढायला तयार व्हा' असे दलितांना सांगून तुतारी फुंकणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, तसेच भारतामधील अंध परंपरांच्या आणि रूढींच्या बेड्यात अडकून पडलेल्या मुसलमानांना 'हव्या गंजलेल्या बेड्या म्हणजेच पैगंबराचा इस्लाम' अशा भ्रमातून सोडवण्याचा प्रयत्न शर्थीने सुरू करणारे दिवंगत हमीदभाई दलवाई. महात्मा फुले अथवा डॉक्टर आंबेडकर यांच्या जोडीला हमीद दलवाईंना आम्ही आणून बसवले, यात काही अवास्तव अथवा अतिशयोक्त होत आहे, असे कोणी मानू नये. मुस्लीम समाजात आणि त्यातल्या त्यात भारतीय मुस्लीम समाजात परिवर्तनाचा किंवा परंपरा–त्यागाचा शब्दसुद्धा उच्चारणे किती मुश्कील आहे, याची पूर्ण जाणीव असलेल्यांना हमीद दलवाईंच्या कार्याची थोरवी कळून येईल आणि आमच्या हमीद दलवाईंच्या गुणगानात मुळीच अतिशयोक्ती नसल्याचे ते मान्य करतील.

मुस्लीम समाज सर्व भारतभर पसरलेला असताना सर्वप्रथम महाराष्ट्रातच हमीदभाईंना इस्लाम परिवर्तनाचा विचार सुचावा, ही गोष्ट कोणाला नवलाची वाटेल, पण ती तशी नवलाची नाही. शिवछत्रपतींनी स्वतःच्या आचरणाने महाराष्ट्रात रूढ केलेली, 'महाराष्ट्र धर्म' म्हणून तयार केलेली एक जीवनदृष्टी अथवा आचारसंहिता इस्लामसारख्या परधर्माच्या संबंधात नेहमीच उदारमताची राहिली. औरंगजेबासारख्या कट्टर इस्लामी बादशहाशी लढा देत असतानासुद्धा इस्लामद्वेषाचा स्पर्श छत्रपतींनी आपल्या शासनाला होऊ दिला नाही. त्यामुळे मराठेशाहीचे निशाण अटकेपार गेले, तरीही शनिवारवाड्यापासून हाकेच्या अंतरावरचे बड्या आणि छोट्या शेखसल्ल्यांचे दर्गे शाबूत ठेवण्यात आले आणि शनिवारवाडा धस्मसात होऊन १६० वर्षांहून अधिक काळ उलटून गेला असला, तरी ते दर्गे अजून चालू स्थितीत आहेत. ही उदार परंपरा चालू होती, म्हणूनच सर्व भारतामध्ये महाराष्ट्र देशीच प्रथम महात्मा फुले निपजले, डॉक्टर निपजले आणि हमीदभाईही पैदा झाले.

येथ उल्लेख केलेली महाराष्ट्रातील उदार परंपरा शंभरनंबरी होती, सर्वस्पर्शी होती असा दावा करण्याचा आमचा उद्देश नाही. तिच्यावरदेखील खूप गंज, घाण चढलेली होती. तिच्यात अनेक ठिकाणी विकृतीही निर्माण झाल्या होत्या. त्यांपैकी काही तर इतक्या दृढमूल आणि देशव्यापी झालेल्या होत्या की, तिच्या जातीयवादासारख्या विकृतींनी भारतात आलेल्या नव्या रक्ताच्या इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मांनाही ग्रासले! म्हणून विचारांचे तेजाब वापरून तिच्यावरचे गंज खरडून

जाळून टाकणे आणि तिच्या विकृतीवर टीकेचे घण घालून तिला इष्ट तो आकार देणे... इतकेच नव्हे, तर ती दुरुस्तीच्या पलीकडे गेलेल्या ठिकाणी समांतर अशी नवी विचारसरणी आणि आचारसरणी निर्माण करणे अपरिहार्य झाले होते. ही जशी हिंदू संस्कृतीची अवस्था झाली होती, तशीच इस्लाम आणि ख्रिश्चन संस्कृतींचीही झालेली होती. तथापि ख्रिश्चन परंपरागत धर्मविचाराबर युरोपमध्येच सतत तीन-चार शतके नवीन विचारांचे प्रचंड आघात होत राहिले आणि रशियासारख्या देशात तर निधर्मी राजवटी सुरू झाल्या. त्यामुळे ख्रिश्चन धर्मावरील गंज वारंवार खरडला गेला. भारतामध्ये इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर येथेही नवविचारांचा मारा हिंदू संस्कृतीवर सतत चालू झाला, पण इस्लामी परंपरेच्या बाबतीत ही प्रक्रिया घडली नाही. 'आपल्या हातचे शासन गेले... भारतावरचे आपले वर्चस्व गेले... आता येथे इंग्रज गेल्यावर लोकशाही येणार... मग आपण कायमचे अल्पसंख्य होणार... म्हणजेच अधिकारहीन होणार...' हे समीकरण येथील इस्लामी पुढाऱ्यांनी स्वतःच्या डोक्यात असे काही जाम बसवून घेतले की, त्याचे दोन विपरीत परिणाम घडून आलेले आपण पाहत आहो. एक परिणाम म्हणजे, हिंदुस्थानाचे विखंडन आणि दुसरा परिणाम म्हणजे, मुसलमानांची रूढिशरणता. तख्त गेले तर ताबूतालाच मिठी मारून बसण्यासारखा हा प्रकार झाला! 'आपली चालत आलेली परंपरा कशीही असो, ती जशीच्या तशी जपायची' हाच त्यांचा ध्यास होऊन बसला. स्वतःच्या राष्ट्र-भूमीसाठी लढणारे पॅलेस्टिनी अरब हे कट्टर मुस्लीमच आहेत. पण त्यांचे विचार-आचार आणि भारतीय मुसलमानांचे विचार-आचार यांत जमीन-अस्मानाचे अंतर दिसून येईल. कारण आधुनिक जगात तगून राहायचे असेल आणि वाढायचे असेल, तर आधुनिक झाले पाहिजे हे अराफातसारख्या पॅलेस्टिनी नेत्यांना समजलेले असावे. भारतामधील मुस्लिमांचे स्फूर्तिस्थान मात्र आधुनिक इस्लामी नेते नसून खोमेनीसारखे कट्टर पुराणमतवादी नेते असावेत. नाहीतर मराठवाडा विद्यापीठातल्या मुस्लीम विद्यार्थिनींत बुरखा पुनश्च लोकप्रिय झाला नसता आणि 'मुस्लीम स्त्रियांनी सिनेमा पाहू नयें' म्हणून मुस्लीम समाजात ठिकठिकाणी ठराव होऊ लागले नसते! भारतामधील मुसलमान समाज राष्ट्रीय विकासाच्या आणि परिवर्तनाच्या ऐन प्रवाहात उतरण्याऐवजी आपले वेगळे डबकेच धरून बसण्याचा आग्रह धरीत आहे, ही किती दुर्दैवाची गोष्ट!

अशा कट्टर, पुराणमताभिमानी समाजात हमीदभाई आणि त्यांचे मुस्लीम सत्यशोधक मंडळ अखंड काम करीत राहिले. तलाकसारख्या मुस्लीम पुरुषांच्या मनमानी वृत्तीला निरंकुश वाव देणाऱ्या आणि निरपराध स्त्रियांची गळचेपी करणाऱ्या प्रथांना शह देण्यासाठी समाजजागृतीची धोकादायक जोखीम त्यांनी स्वीकारली. हमीदभाईंना मुस्लीम समाजाने कधीच आपले म्हटले नाही की मानले नाही. पण 'आपण ज्या समाजात जन्मलो त्यातील सदोष आणि अन्याय्य चालीरीती दूर करणे हे आपले कर्तव्य आहे' अशीच हमीदभाईंची अविचल धारणा होती. सुदैव एवढेच की, हमीदभाईंची संघटना फोफावली नसली, तरी त्यांना स्थिर बुद्धीचे आणि निष्ठावंत मुस्लीम कार्यकर्ते लाभलेले असून हमीदभाईंच्या दुःखद निधनानंतरदेखील त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची ध्वजा महाराष्ट्रात फडकवत ठेवलेली आहे.

मुस्लीम परंपरेतील आणि प्रथांतील काळाच्या ओघात विसंगत ठरलेले भाग दूर करण्याबाबत भारताचे शासन सदैव निष्क्रिय राहिलेले आहे, ही तर फारच खेदाची गोष्ट म्हणायला हवी. मध्यंतरीच्या जनता शासनानेसुद्धा ह्याबाबत उदासीन वृत्तीच धारण केलेली होती. मुस्लीम मते मिळवण्याकरता समान नागरी कायदा करण्याचे कर्तव्य सगळीच सरकारे गेली तीस वर्षे टाळीत आलेली आहेत, अशी सत्यस्थिती आहे. समाजपरिवर्तन जर सर्वस्वी समाजाच्या राजीखुशीवर आणि मागणीवर सोपवले, तर मग शासन हवे कशाला? पण शासन जेव्हा बहिरेपणाचे नाटक करत राहते, तेव्हा त्याच्या कानाचे जाड झालेले पडदे फाडून सरळ मेंदूत प्रवेश करील असा बुलंद आवाज जनतेमधून निघावा, यासाठी सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे. असा आवाज निर्माण करण्याचे सामर्थ्य मुस्लीम सत्यशोधक मंडळाला लवकर प्राप्त होवो, अशी शुभेच्छा साधना परिवारामार्फत आम्ही मंडळाच्या अकराव्या वाढदिवशी व्यक्त करतो, आणि हमीदभाईंचे जीवनकार्य त्यांच्या हातून पुरे होईल अशी आशा करतो!

(नानासाहेब गोरे : स्वातंत्र्य सेनानी, ज्येष्ठ समाजवादी विचारवंत आणि लेखक. साधना साप्ताहिकाचे संपादक आणि परिवर्तनवादी चळवळीचे मार्गदर्शक.)

५.३४ मुस्लीम सत्यशोधक मंडळ – रा. ना. चव्हाण

दि. ३ जून १९७२च्या 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये डॉ. हुसेन यांनी सर्वच भारतीय लोकांसाठी वरील विषयावर चिंतनीय विचार मांडले आहेत. या सत्यशोधक मंडळाला मुस्लीम समाजामध्ये नवीन परिवर्तनशीलता निर्माण करावयाची आहे. त्यामुळे या नवमंडळाचा प्रभाव व कार्य दृष्टिपथात येऊन, त्याचे प्रत्यक्ष फलित हातात पडण्यासाठी खुद्द गतिमान मुस्लीम कार्यकर्ते व समंजस सत्यशोधक यांची वाढत्या प्रमाणात मंडळाला जोड होणे फार अगत्याचे आहे. हिंदू पंडितांनी 'धर्मनिर्णय मंडळ' स्थापून त्याच्यादवारे स्वावलंबनाने परिवर्तनशीलतेला नवी गती दिली व देत असतात. त्याप्रमाणेच मुस्लीम पुरोगामी विद्वानांनी व पंडितांनी मंडळापासून दूर व तटस्थ न राहता, या मंडळाचे संवर्धन स्वतःच करावे व मुसलमान समाजात परिवर्तनबुद्धी व कृती वाढवावी. मुस्लीम समाजात परिवर्तन व्हावे म्हणून हिंदू संशोधकांनी व परिवर्तनवादी हिंदू संशोधकांनी शक्यतो लांब-दूर राहून हितचिंतक या बुद्धीने या मंडळाला बौद्धिक व इतर साहाय्य करावे. मुस्लीम सत्यशोधक मंडळ नावाप्रमाणे मुस्लिमांनी मुस्लिमांच्या उद्धारार्थ, स्वावलंबनाने व स्वबुद्धीने चालविले आहे; अशी तर खातरजमा मुसलमानांत निर्माण झालीच पाहिजे. त्यांना मंडळाविषयी परकेपणा वाटता कामा नये, हा डॉ. सय्यद हुसेन यांचा मुद्दा पायाभूत वाटतो. मंडळाच्या प्रभावासाठी या मुद्द्याकडे सर्वांचे लक्ष वेधावे, इतका तो मूलभूत वाटतो व आहे. ज्याप्रमाणे हिंदूंना धर्मनिर्णय मंडळाबाबत निदान परकेपणा तरी वाटत नाही, तशीच आपुलकी मुस्लीम सत्यशोधक मंडळाबद्दल मुसलमानांना वाटली पाहिजे. पडदा पद्धती व कुटुंब नियोजनाविषयी अनास्था यांसारख्या खुद्द मुस्लीम समाजाच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या दोन मुख्य समस्या आहेत. ह्या चालींविरुद्ध आवाज उठवून, स्वतः मुस्लीम सत्यशोधकांनी स्वावलंबनाने जरूर ती वैचारिक क्रांती घडवून आणली पाहिजे. 'बेकारी' हा सार्वजनिक व अखिल भारतीय प्रश्न आहे. तरी सुशिक्षित मुस्लीम महिलांना नोकरीसंबंधी पुरुषापेक्षा जास्त सवलती व अधिक प्रवेश मिळत जाईल, तर जुना पडदा आपोआपच दूर होईल. स्वतःला उच्च म्हणवून घेण्यात आनंद व अभिमान मानणाऱ्या अशा अनेक मराठा श्रीमंत कुटुंबांतूनही काही ठिकाणी पडदा व गोषाचा प्रश्न आढळतो व या मराठा महिला व त्यांचे विचार आणि शैक्षणिक प्रगती मागासलेलीच आहे. अंधश्रद्धा कुठल्याही समाजात 'घर' करून असली, तरी त्या समाजास ती घातकच असते. पदवीधर मराठी महिलांचे प्रमाण ग्रामीण भागात फारच थोडे व दुर्मीळही आहे! शिक्षणप्रसार व बेकारी निवारण हे कोणत्याही सत्यशोधक मंडळाचे मूलभूत कार्य ठरते. उर्दू भाषा मुस्लिमांची, संस्कृत पंडितांची, अर्धमागधी जैनांची, पाली बौद्धांची अशा भाषाविषयक अलग अलग समजुती भारतात आढळतात. राष्ट्रीय भावनिक ऐक्यासाठी विविध भाषांचे तौलनिक भाषाध्ययन व तौलनिक व्याकरण व व्युत्पत्तिशास्त्र यांसारख्या विषयांच्या अध्ययनाला भारतीय विद्यापीठांतून श्रेष्ठ स्थान देणे जरूर वाटते. सर्वच शिक्षणाची पुनर्घटना भारतीय एकात्मतेच्या पायावर झाली पाहिजे व सर्वांना सर्वच भारतीय भाषासंबंधी सारखी सहिष्णू

ता वाटली पाहिजे. तरच सर्वधर्म समानता व सहिष्णू ता मूळ धरू लागेल. भाषेसंबंधीचा आपपर भाव जाईल, तर प्रांतिक दुराग्रहदेखील कमी होण्यास साहाय्य होईल. डॉ. हुसेन यांना अपेक्षित प्रगती त्या प्रगतीला पूरक अशा शिक्षणक्रमातून होईल. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेला अद्याप फक्त दोनच वर्षे झाली आहेत! हजारो वर्षांच्या अंधश्रद्धा, रूढी व अपसमज नाहीसे करण्यासाठी दीर्घ काळ व शतके खडतर परिश्रम घ्यावे लागतील. हिंदू त्या मानाने प्रगत वाटतात खरे... तरी त्यांच्यातूनही ग्रामीण भागात अद्याप बौद्ध –हरिजनांवर अन्याय होतच असतो. सत्यशोधक समाज, धर्मनिर्णय मंडळ व मुस्लीम स. शो. मंडळ यांसारख्या परिवर्तनवादी विविध समाजांचे व मंडळाचे कार्य अधिकाधिक प्रभावी कसे होईल, हा सामाजिक प्रश्न आहे. धर्मनिर्णय मंडळ व महात्मा फुलेंच्या धर्म व समाज सुधारणा यांचा तरी प्रभाव पडून त्यांनादेखील कोठे यश आले आहे? याही चळवळी मूलभूतपणे उपेक्षितच आहेत. *(दै. महाराष्ट्र टाइम्स, २३ जून १९७२)*

(रामचंद्र नारायण चव्हाण : हे विसाव्या शतकातील सत्यशोधक चळवळीचे एकनिष्ठ कार्यकर्ते, मराठी लेखक आणि दलित चळवळीतील व सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते होते.)

५.३५ दलवाईंशी मैत्री माझ्या जीवनातील विशेष उपलब्धी – भाई वैद्य

प्रश्न : भाई, आपली हमीद दलवाईंशी घनिष्ट मैत्री होती. मंडळाच्या उभारणीतही आपण त्यांना अनमोल सहकार्य केलं. या संदर्भातल्या आपल्या आठवणी...

भाई : हमीद दलवाईंशी मैत्री हा माझ्या जीवनातील महत्त्वाची आणि विशेष उपलब्धी आहे आणि त्याचा मला फार अभिमान वाटतो. हमीद दलवाई हे विचाराने कट्टर लोकशाही समाजवादी होते. राष्ट्र सेवा दलातच त्यांच्या विचाराचा परिपोष झाला. चिपळूण हे राष्ट्र सेवा दलाचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. राष्ट्र सेवा दलाने तेथे उत्तम वातावरण तयार केले आहे. अबुशेठ दलवाई यांनी राष्ट्र सेवा दल आणि समाजवादी यांचा रत्नागिरी जिल्ह्यात गड निर्माण केला होता. भाई शेटे, बॅ. नाथ पै. नाथ पै १९५७ साली निवडूनही आले, दंडवते तीन वेळा निवडून आले.

प्रश्न : अशा वातावरणाचा दलवाईंवर परिणाम झाला असणार...

भाई : निश्चितच! चिपळूणचा मुस्लीम समाज आग्रहपूर्वक मराठी बोलणारा, खेड्यापाड्यात राहणारा... समाजवादी विचारांचं बीजारोपण दलवाईंवर सेवादलातच झालं. एस. एम., नानासाहेब गोरे याच भागातील... त्यांच्या बौद्धिक मांडणीचा प्रभाव होता. दलवाई यांच्यावर या सर्वांचा पगडा आहे. जयप्रकाश, लोहिया यांच्यामुळे ते समाजवादी विचाराकडे वळले. आचार्य अत्रे समाजवादी, लाल टोपी घालून अत्रे भाषण करायचे. १९६५ मध्ये याच 'मराठा' मध्ये दलवाईंनी काम केले. 'इंधन' मुळे ते लेखक म्हणून पुढे आले. हिंदू-मुस्लीम संबंध, त्यांच्यातील जवळीक याबरोबरच समाजवादी विचारही या कादंबरीत डोकावतो. समता, स्वातंत्र्य या विचारांबरोबरच समाजवादी विचारांचा खंबीर पाया या काळात निर्माण झाला.

प्रश्न : दलवाईंच्या मांडणीबद्दल...

भाई : एक वेगळी मांडणी दलवाई करीत होते. 'जर भारताची एकात्मता टिकायची असेल, तर त्याचा पाया धर्मनिरपेक्षताच असला पाहिजे' हा त्यांचा पायाभूत विचार होता. या हद्दीपर्यंत (धर्मनिरपेक्षतेच्या) हिंदू समाज बराच पुढे आला आहे. मुस्लीम समाजाने मात्र हा विचार अपरिहार्यता किंवा स्ट्रॅटेजी म्हणून स्वीकारला, परंतु मनोमन स्वीकारला नाही. या विचाराकडे समाजाला घेऊन जायला पाहिजे. त्या दृष्टीने शिक्षण झाले पाहिजे आणि असे झाले, तरच राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईल. 'आपण मुस्लीम समाजातले असल्यामुळे ते आपलं काम आहे' असं त्यांना वाटे. तेव्हा हिंदू समाजात बरेच उदारमतवादी लोक होते.

प्रश्न : या कामाची सुरुवात त्यांनी कशी केली?

भाई : व्याख्यानाने सुरुवात केली. टिळक स्मारक मंदिरातील भाषण खूपच गाजले. 'मुस्लीम

समाजात धर्मनिरपेक्ष मूल्याच्या प्रबोधनाची काय गरज आहे' हे सांगताना, नेत्यांनी दहीखाऊ-मईखाऊ अशी अर्धवट भूमिका घेतली. मुल्ला-मौलवींना आव्हान देण्याचं, जाब विचारण्याचं, अंधश्रद्धा उपटून टाकण्याचं धाडस कोणी केलं? राष्ट्रीय मुस्लीम नेतेसुद्धा जितकं परखडपणे बोललं पाहिजे, तसे बोलत नाहीत. या सर्व दोषांबाबत दलवाईंनी टिळक स्मारक मंदिरात तोफ डागली. हिंदू समाजातली धर्मनिरपेक्ष मंडळीसुद्धा 'दुखवायचं नाही. कसं दुखवायचं?' अशी भूमिका घेऊन वागतात. धर्मनिरपेक्षता इरीस्पेक्टीव्ह ऑफ रिलीजन घ्यायला पाहिजे. मतदारांच्या भयापोटी अशा भूमिका घेतल्या जात नाही. याबरसुद्धा त्यांनी हल्ला चढवला. दोन्ही समाजांना चालना देण्यासाठी हिंदू-मुस्लिमांचे दोष अत्यंत परखडपणे दाखवण्याचे काम केले. हे करताना दलवाईंनी हिंदू धर्मवाद्यांवरसुद्धा टीका केली.

प्रश्न : समाजवादी राजकारणाबद्दल...

भाई : दलवाई समाजवादी असले तरी, समाजवादी पक्षाच्या दैनंदिन कामात किंवा कोणत्याही पदावर ते नव्हते. त्यांनी लिहिलेले लेख खूप गाजले. ते संयुक्त सोशालिस्ट पार्टीमध्ये होते. त्या वेळी 'आपण राज्यसभेत जावं' असं त्यांना वाटत होतं. पण समाजवादी पक्षाला ते परवडणारं नव्हतं. म्हणून पूर्णपणे सामाजिक भूमिका घेऊन काम करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. 'संघटना बांधली पाहिजे' या निर्णयावर आल्यानंतर 'माझे मुस्लीम मित्र तुम्हाला मदत करतील' असं मी त्यांना सांगितलं. अमीर शेख, बशीर शेख, सय्यदभाई, ए. जे. शेख, मकबूल मुबारक तांबोळी हे माझ्या संपर्कात होते. ३३, गुरुवार पेठ, शितळा देवीजवळ बैठक घेतली. या वेळी सेवा दलातले मित्र होते. तसेच कॉर्पोरेटर (नगरसेवक) असल्यामुळे अनेक मुस्लीम सोबत होते....

प्रश्न : मंडळाची स्थापना...

भाई : मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना २२ मार्च १९७० मध्ये झाली... समतेच्या मूल्याने, धर्मनिरपेक्षतेच्या मूल्याने काम करणं ही मंडळाच्या स्थापनेतील भूमिका होती. अशा प्रकारचे प्रखर विचार सबंध जगामध्ये कोणीही मांडले नाहीत. मौलाना आझाद हे सुधारणावादी होते, परंतु ते मौलाना होते; धर्मनिरपेक्ष विचार मांडणारे नव्हते; कुराणाचा उदारमतवादी विचार मांडणारे होते. मौलाना आझाद, मोहंमद इक्बाल यांची धर्माधिष्ठित राष्ट्राची कल्पना चुकीची आहे. धर्म आणि राष्ट्रवाद या एकाच वेळी वैश्विक आणि प्रादेशिकही असलेल्या संकल्पना आहेत. आझादांनी जिनांना फार प्रखरपणे विरोध केला. जीना धार्मिक नसतानाही धर्मवाद वापरतात. जिनांकडे धर्माचा वापर राजकारणासाठी करण्याची वस्तादगिरी होती. परंतु वृत्तीने धार्मिक असणारे मौलाना आझाद, समन्वयवादी भूमिका घेणारे मौलाना आझाद या सर्वांच्या पुढे जाणारे दलवाई होते.

प्रश्न : दलवाईंचं वेगळेपण कसं अधोरेखित करता येईल?

भाई : हमीद दलवाई 'धर्मनिरपेक्ष मूल्यांचाच विचार केला पाहिजे' अशी भूमिका घेणारे होते. धर्मनिरपेक्षता इहवाद हे एक तत्त्वज्ञान आहे. ते धर्माला पूर्णतः छेद देते. हा विषय लौकिकाचा

आहे. मी स्वतः तात्त्विक इहवादी-जडवादी आहे; दलवाईसुद्धा इहवादी-जडवादी होते. ही एक बाजू आहे. आणि 'धर्मनिरपेक्षता' हे एक राष्ट्रीय मूल्य आहे, ती राजकीय कल्पना आहे. ती संविधानातील राजकीय संकल्पना आहे. मूलभूत अधिकाराला छेद न देणारे ते धर्मस्वातंत्र्य आहे. धर्म मांडताच कामा नये, अशी भूमिका ते कधी मांडत नाही.

'जडवादी-इहवादी-तात्त्विक-सेक्युलर समाजाचा आपण सभासद आहोत' अशी दलवाईची भूमिका होती. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने अशी भूमिका घेतली नाही. ते योग्यही आहे. दलवाईंनी व्यक्तिगत आणि संघटनात्मक पातळीवर वेगळी भूमिका घेतली. ती अत्यंत योग्य भूमिका आहे. सेक्युलॅरिझम म्हणजे काय? 'संविधान' हा सर्वांत महत्त्वाचा गाभा असला पाहिजे; धार्मिक ग्रंथ नव्हेत. सांविधानिक मूल्यव्यवस्था त्यांनी अंतिम मानली होती. संविधानाने धर्मस्वातंत्र्य दिले आहे. मात्र धर्म घरात असला पाहिजे; राजकारणात, सार्वजनिक जीवनात त्याने हस्तक्षेप करता कामा नये. ही भूमिका ते मानत. राष्ट्रीय मुस्लिमांच्या गुळगुळीत भूमिकेवर दलवाईंनी हल्ला केला... मुल्ला-मौलवींवर तर केलाच, परंतु पोथीनिष्ठ हिंदूंवरसुद्धा हल्ला केला... कुराणातील दोषांवर चर्चा केली.

प्रश्न : दलवाईंच्या सामाजिक कार्याचं स्वरूप कसं होतं?

भाई : स्त्री-पुरुष समता, तलाक, पोटगी या प्रश्नावर दलवाईंनी हल्ला केला. 'तलाक'चा प्रश्न त्यांनी ज्या पद्धतीने लावून धरला, तसा कोणीच धरला नव्हता. त्यामुळे मुस्लिमांची गोची झाली. तलाकबद्दल दोन प्रवाह आहेत. 'जबानी तलाक कुराणात नाहीं' म्हणणारा गट प्रवाह आणि 'तो कुराणाचा आणि कायद्याचा भाग आहे' असं मानणारा गट. दलवाईचं क्रांतिकारकत्व कशात आहे? तर 'कुराणात असो अगर नसो... जे बाईट आहे, विषम आहे, अन्यायकारक आहे ते बाजूला सारलं पाहिजे' अशी निर्भीड भूमिका जगाच्या पाठीवर कोणीही घेतली नाही. हे दलवाईचं वैशिष्ट्य आहे. धार्मिक प्रश्नांना धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न दोन्ही समाजांत होतो. तलाक विरोधात काम करताना मुल्ला-मौलवींचा विरोध झाला. ते अगदी हल्ला करण्यापर्यंत गेले. यामुळे मुस्लीम समाज खिंडीत सापडला. सुरुवातीला विरोध करणारे, हल्ला करणारेसुद्धा स्वतःच्या घरात 'तलाक' होताना मुस्लीम सत्यशोधक मंडळाकडे येतात. आता स्त्रिया तलाकविरुद्ध आवाज उठवतात. अहिले हदीस, महिला समिती अशा संस्था तलाक-विरोधात बोलतात व 'जबानी तलाक मान्य नाहीं' अशी भूमिका घेतात. याची सुरुवात हमीद दलवाई यांनी केली. हमीदची ही मोठी देणगी आहे. महिलांचे समान अधिकार मान्य करणारा 'नया निकाहनामा' मंडळाने तयार केला, 'निकाहाप्रमाणे तलाकची नोंद असली पाहिजे' अशी मागणी केली आणि पोटगीसंदर्भात भूमिका घेतली आहे. पण मंडळाने त्याही पलीकडे जायला पाहिजे. सनातन्यांची खुशामत करणं, निवडून येणं यासाठी राजीव गांधींनी गुळमुळीत भूमिका घेतली. शहाबानो आणि बाबरी मशिदीचा रामलल्लाचा दरवाजा उघडणं हे दोन अपराध व चुका राजीव गांधींनी केल्या.

प्रश्न : मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य दलवाईंनी कसे केले?

भाई : मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा विचार, सामाजिक भारतीय मूल्यव्यवस्था यांना कसं पुढे घेऊन जाता येईल, याचा विचार दलवाईंनी केला. हमीद दलवाई यांचं आणखी एक वैशिष्ट्य आहे. प्रखर समाज सुधारणेच्या बाबतीत दोन प्रकारच्या भूमिका घेतल्या जातात. पहिली, समाजाला न दुखावता, 'कुराणात सुधारणा आहेतच' अशा असगर अली इंजिनीअर यांच्या भूमिकांसारख्या भूमिका. त्यांनी हमीद दलवाईंना विरोध केला. दुसरी, दलवाईंसारख्याची भूमिका. ज्याप्रमाणे महात्मा फुलेंनी सरळ-सरळ दोषांवर हल्ला केला, समाजाला दुखवण्याचा विचार केला नाही. न्या. रानडे यांचा धर्मव्यवस्था सोबत घेऊन सुधारणा करण्याचा प्रयत्न होता. ती त्यांची भूमिका होती. मात्र महात्मा फुले नसते, तर न्या. रानडे प्रखर सुधारणावादी ठरले असते व तेसुद्धा पचले नसते; सुधारणाही पुढे गेली नसती. महात्मा फुलेंच्या विचारांमुळे न्या. रानडेंना फार विरोध झाला नाही. महात्मा फुलेंचा वारसा हमीद दलवाईंनी बरोबर घेतला, म्हणून असगर अली इंजिनीअरला दलवाईंइतका विरोध झाला नाही. त्यांना असलेला विरोध त्यांच्या धर्मगुरूंचा होता किंवा ते धर्मपीठाला विरोध करतात म्हणून होता. 'ते कुराणाविरोधात बोलतात' असं म्हणून केलेला तो विरोध नव्हता. याउलट हमीद दलवाईंचा विचार अधिक प्रखर, अधिक प्रत्यक्ष व मूलभूत असा आहे. महात्मा फुलेंनी १९व्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकात केले, ते विसाव्या शतकात हमीद दलवाई यांनी केले व तेच काम मुस्लीम सत्यशोधक मंडळ एकविसाव्या शतकात करत आहे.

प्रश्न : एक व्यक्ती म्हणून दलवाई कसे वाटले?

भाई : व्यक्ती म्हणून हमीद फार मोठा होता. तो फार गोड माणूस होता. स्नेहाला फार बांधील आणि दिलखुलास माणूस! तो बेमिसाल माणूस होता. माझा मुस्लीम सत्यशोधक मंडळाशी जो संबंध राहिला, तो हमीद दलवाईमुळेच! जे असाध्य आहे, ते साध्य करणे हा त्याचा पिंड होता. तो साहित्यिक होता. त्याच्यात मिस्कीलपणा होता आणि तो शब्दप्रभूही होता. हमीद दलवाई यांनी असफ ए. ए. फैजी यांच्याशीही संवाद केला. विविध देशांतील मुस्लीम कायदे किंवा वेगवेगळ्या मुस्लीम देशांत अस्तित्वात असणारा समान नागरी कायदा आणि दिला जाणारा न्याय यांवर फैजी यांचा अभ्यास होता. तेथील मुस्लीम समाजाने हे कसे स्वीकारले, याबद्दलचाही त्यांचा अभ्यास होता. तरीही 'हमीद दलवाई यांचे सगळे बरोबर आहे. मात्र त्यांच्याएवढे स्पष्ट बोलण्याचे धाडस माझ्यात नाही. आपल्यात हिम्मत नाही' असे ते सांगत असत. हे सगळे सोपे नाही. हमीद दलवाईंना विरोधकांनाही भेटण्यास अडचण वाटत नव्हती. कोणी विद्वान असो, सनातन असो... त्या सर्वांशी त्यांची मैत्री होती. खासगीत विरोधकांनाही त्यांना भेटण्यास अडचण वाटत नव्हती. खासगीत विरोधकांनीही दलवाईंचे समर्थन केले होते. मारूफ खान आणि दलवाई यांच्यात मैत्री होती व त्यांचा वावर सर्वत्र असायचा. कोणाशीही बोलायची अडचण दलवाईंना वाटत नव्हती. दलवाईंची भूमिका पक्की असल्यामुळे व पुराव्यासह बोलण्याची त्यांची तयारी असल्यामुळे त्यांना हे शक्य झाले.

प्रश्न : हमीद दलवाईंना समकालीन संघटनांनी कसा प्रतिसाद दिला?

भाई : पुरोगामी सेवादल, समाजवादी विचारांच्या माणसांनी दलवाईंना उचलून धरले. पक्षातील, पक्षाबाहेरील व साम्यवादी लोकांनीही त्यांना पाठिंबा दिला. हिंदुत्ववादीसुद्धा आपल्या स्वार्थासाठी दलवाईंना उचलून धरत होते. 'तो परस्पर मुस्लीम समाजाला ठोकतो' म्हणून त्यांना आनंदही व्हायचा, परंतु जेव्हा दलवाई त्यांचे दोष दाखवायचे, तेव्हा त्यांची पळता भुई थोडी व्हायची. पुढेपुढे तर त्यांनी दलवाईंपासून बाजूला राहणेच पसंत केले.

आज दलवाईंच्या जवळपास जाणारा नेता राहिला नाही. जरी दलवाईंच्या तोडीचं नेतृत्व नसलं, तरी सामुदायिक नेतृत्व, संघटनात्मक शिस्त यांतून ही कमतरता भरून काढता आली असती. मात्र या तीनही वैशिष्ट्यांच्या अभावामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. मुस्लीम सत्यशोधक मंडळात शिस्त नसल्यामुळे त्यांच्यात केवळ प्रादेशिक शिलेदार तयार झाले. असं असूनही या शिलेदारांच्या विचारांत दलवाईंसारखी धग असली असती, तर संघटनेचा कमकुवतपणा पाहिला गेला नसता. मात्र या शिलेदारांमध्ये ती धगही जाणवत नाही. थोडक्यात ज्या पद्धतीने कॉम्रेडशीप व्हायला हवी होती, तशी झालेली नाही. आज जर दलवाई असते, तर त्यांनी मानवी मूल्ये, मानवी हक्क, पसमंदा मुस्लीम (मागासलेला मुस्लीम) यांच्यासाठी काम उभे केले असते. मुस्लीम समाजात ऑरिस्टोक्रॅट्स आहेत व त्यांना खो द्यायलाच पाहिजे. प्रादेशिक भाषेला महत्त्व, उर्दू भाषा सर्व धर्मीयांची भाषा... भाषा, शिक्षण आणि नोकरी यासंदर्भात त्यांनी नेमक्या भूमिका मांडल्या. हमीद दलवाई अतिशय संतुलित आणि तार्किक विचार मांडत होते. त्यांनी मांडलेली समान नागरी कायद्याची भूमिका स्त्रियांना न्याय व समता मिळवून देण्यासाठी होती. 'धर्म सोडा' अशी भूमिका त्यांनी मांडली नाही, मात्र धर्माचे थोतांड, धर्मवाद त्यांना तिळमात्रही मान्य नव्हता.

हमीद दलवाई स्वतः निरीश्वरवादी होते, परंतु 'मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा प्रत्येक सभासद निरीश्वरवादी असला पाहिजे' असा आग्रह त्यांनी कधीच धरला नाही. तशी त्यांची इच्छाही नव्हती. 'विश्वास व श्रद्धा बाळगण्याचा व जोपासण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे' यावरही त्यांची श्रद्धा होती. 'मी भारतीय आहे, याचा मला अभिमान आहे' असे म्हणत असतानाच एखादाच म्हणू शकतो की, 'मी समाजवादी आहे, मी धर्मनिरपेक्ष आहे, मी इस्लाम धर्मीय आहे आणि यांच्यात काहीही फरक नाही. हा घटनेने प्रत्येकालाच दिलेला अधिकार आहे.' 'समाजाला बाधक ठरतील असे विचार आणि वर्तन राज्यघटनेला चालणार नाही' असे ते वारंवार सांगत असत. *(पुरोगामी जनगर्जना, दिवाळी विशेषांक : ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१५, पृ. क्र. २२ ते २६)*

(ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, पुणे महानगरपालिकेचे महापौर, महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री, राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष, अ. भा. समाजवादी अध्यापक सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष, सोशालिस्ट पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष, हमीद दलवाई यांचे मित्र आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या उभारणीत व जडणघडणीत मोलाचा वाटा उचलणारे, विविध पदांवरून पुरोगामी, समाजवादी, धर्मनिरपेक्ष विचारांचा प्रचार–प्रसार करणारे मा. भाई वैद्य यांची मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सरचिटणीस प्रा. शमसुदिद्न तांबोळी यांनी, हमीद दलवाई यांचे कार्य व विचार या संबंधी घेतलेली मुलाखत)

५.३६ त्यांचे कार्य पुढे निश्चित चालू राहील – वसंत नगरकर

इतिहास म्हणजे केवळ राजकारणातली स्थित्यंतरे नव्हेत. राजकीय इतिहासाएवढाच सामाजिक इतिहासही महत्त्वाचा असतो. समाजसुधारणा आंदोलनाबाबतीत महाराष्ट्राला देशात एक आगळे स्थान आहे. मानवी समानतेसाठी झालेल्या लढ्यात महाराष्ट्राची एक महान परंपरा आहे. हमीद दलवाईंनी ही परंपरा पुढे चालवली. ते एखाद्या विजेप्रमाणे चमकून गेले. त्यांची बिजली कडाडली, तेव्हा प्रस्थापित हितसंबंध हादरून गेले. तो विजेचा झगमगाट एवढा भव्य होता की, तो क्षणभंगुर राहिला नाही. त्या प्रकाशात अनेकांना नवी दिशा सापडली. शेकडो मुसलमान तरुण-तरुणींना त्यांनी स्फूर्ती दिली. राजकारणापासून दूर राहून, केवळ सामाजिक उत्थानासाठी आपले जीवन अर्पण करणारे असंख्य कार्यकर्ते मुसलमान समाजात उभे राहिले. गेल्या शंभर-दीडशे वर्षांत मुसलमान समाजात अशी घटना घडलेली नव्हती! समाजकार्यासाठी वाहून घेतलेले व राजकारणापासून दूर राहणारे कार्यकर्ते या समाजात यापूर्वी कधीही एवढ्या संख्येने पुढे आले नव्हते. सनातन इस्लामच्या प्रचारासाठी तन-मन-धन अर्पण करणारे मुसलमान शाह वलीऊल्लाह (मृत्यू १७६४) यांच्या काळापासून शेकड्याने ओढळतील, परंतु रूढियुक्त अचेतन समाजाला धक्का देऊन त्याला जागृत करणारे समाजसुधारक विरळाच! गेल्या शतकात सर सय्यद अहमद खान यांनी प्रथम समाजसुधारणेच्या प्रश्नाला वाचा फोडली. परंतु ते जवळजवळ एकाकीच राहिले आणि तेसुद्धा पुढे राजकारणाच्या धकाधकीत पडले. सर सय्यद अहमद खानांपासून जिनांच्या वेळेपर्यंतच्या मुस्लीम समाज सुधारकांचा इतिहास असाच आहे. बहुतेक सारे एकाकी पडले व बहुतेकांच्या सुधारकी कल्पना राजकीय गदारोळात विरून गेल्या.

आगळ्या मुशीतून घडण

हमीद दलवाईंचे व्यक्तित्व एका आगळ्या मुशीतून बाहेर पडले होते. त्यांच्या पूर्वीचे मुसलमान समाज सुधारक हे उच्च वर्णीय म्हणजे अशरफ वर्गातले होते. पण दलवाईंना अरब किंवा इराणी खानदानाचा वारसा मिळालेला नव्हता. त्यांचा जन्म कोकणातल्या मिरजोळी ह्या चिपळूणजवळच्या छोट्या गावातल्या गरीब कुटुंबात झाला होता. छोट्या गावातल्या लहानशा शाळेतून मॅट्रिक झाल्यावर केवळ दारिद्र्यामुळे त्यांना कॉलेजशिक्षण घेता आले नव्हते. मॅट्रिक झाल्यावर ते कोकणी परंपरेप्रमाणे मुंबईला जाऊन नोकरी मिळवण्यासाठी धडपड करू लागले. मोठ्या प्रयासाने त्यांना पहिली नोकरी मिळाली. नोकरीमुळे भूकमुक्ती मिळाली, पण त्यांचा पिंडच बंडखोराचा होता. त्यांचे वडील त्या काळच्या मुस्लीम लीगचे स्थानिक पुढारी होते. उर्दू आणि पाकिस्तान हे त्यांचे मानबिंदू होते. हमीदभाई अवघ्या चौदाव्या वर्षी राष्ट्र सेवा दलात दाखल झाले. मॅट्रिकचा अभ्यास करत असतानाच त्यांनी 'उर्दू आणि कोकणी मुसलमान' हा लेख प्रसिद्ध करून कोकणी मुसलमानांच्या उर्दू व पाकिस्तानप्रेमाचे वाभाडे काढले. सामाजिक विषमता आणि जातीपातीच्या भिंतींमुळे समाज किती पोखरला गेला होता, याचे विदारक चित्र

त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीने रेखाटले होते. त्यातूनच 'कफनचोर' ही कथा व 'इंधन'सारखी कादंबरी निर्माण झाली. राष्ट्र सेवा दल, उर्दू आणि कोकणी मुसलमान, कफनचोर, इंधन आणि मुस्लीम सनातनवाद व जतीयता यांच्या विरुद्धच्या कडक लिखाणामुळे त्यांच्याविरुद्ध टीकेचा गदारोळ उभा राहिला; नाना तऱ्हेचे खोटे आरोप करण्यात येऊ लागले. परंतु त्यांची लेखणी आणि वाणी प्रभावी होती. त्यांच्या चाहत्यांचा एक वर्गच निर्माण झाला होता. पुढे दैनिक मराठात त्यांना नोकरी मिळाली आणि त्यांचे अनेक लेख 'मराठा'तून प्रसिद्ध होऊ लागले. डॉ. राममनोहर लोहिया यांच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला होता. अर्थातच, ते समाजवादी साथीही झाले.

वाढती मैत्री

मी १९६६मध्ये मुंबईला सी. आय. डी. स्पेशल ब्रँचमध्ये अधिकारी म्हणून काम करीत असताना एक दिवस अचानक कोकणी मुसलमानांचे एक शिष्टमंडळ माझ्याकडे आले. त्यात हमीदभाईंचे एक-दोन नातेवाईकही होते. 'हमीदभाईंचे चारित्र्य निर्मळ नाही', 'त्यांच्यामुळे जातीय तेढ वाढत आहे', 'त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे' अशा मागण्या या शिष्टमंडळाने मांडल्या. मी हमीदभाईंना पाहिलेसुद्धा नव्हते, परंतु त्यांचे बरेच लिखाण वाचले होते. त्या लिखाणाच्या आधारे 'कारवाई करण्यासारखे काही आहे' असे मला तरी वाटले नव्हते. पुढे योगायोगाने प्रा. शंकर वैद्य यांच्या घरी माझी आणि त्यांची गाठ पडली. शंकरराव आणि सरोजिनीबाई यांची सोय-गैरसोय विचारात न घेता आम्ही दोघे चांगले तास-दोन तास गप्पा मारत बसलो. शंकररावांच्या घरून बाहेर पडताना जणू लंगोटी यार असल्यासारखे बरोबर निघालो. थोड्याच अवधीत आमची व आम्हा दोघांच्या कुटुंबियांची जिवाभावाची मैत्री झाली. प्रा. अ. भि. शहा यांच्यामुळे ही मैत्री एकसारखी वाढत गेली.

महत्त्वाची पत्रे

प्रा. अ. भि. शहा व माझ्याशी त्यांची मैत्री होती. सी.आय.ए.चे आणि इंटेलिजन्स खात्याचे एजंट असल्याचे अगदी निखालस खोटे आरोप हमीदभाईंवर एकसारखे होत असल्याचे दिसत होते. पण पुढे ते आर.एस.एस., जनसंघाचे एजंट असल्याचेही आरोप करण्यात आले. पैसे चारून हमीदभाईंसारखे पुरुषोत्तम उभे करता आले असते, तर सी. आय.ए., के. जी. बी., इंटेलिजन्स खाते किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांना देशात चमत्कार घडवून आणता आले असते. प्रस्थापित हितसंबंध दुखावले जातात, तेव्हा बेजबाबदार आरोपांची चिखलफेक प्रत्यही घडते. समाजप्रबोधनाच्या आंदोलनात प्रा. अ. भि. शहा यांचा वाटा कोणी नाकारू शकणार नाही. शहा आणि हमीद दलवाई यांची मैत्री होणे अपरिहार्य होते. मी बेचाळीसच्या आंदोलनात भाग घेतला होता. त्यामुळे अनेक राजकीय कार्यकर्ते – विशेषतः समाजवादी – माझे वैयक्तिक मित्र आहेत. फावल्या वेळात मी इस्लामचा सखोल अभ्यास केला व त्यावर बरेच लिखाण केले. त्यामुळे हमीदभाईंशी माझे नाते सौहार्दाचे झाले, यात नवल ते काय! मी पोलीस खात्यात असल्यामुळे दोन

गोष्टी निश्चित घडल्या. त्यांच्यावर सनातन्यांनी हल्ले करण्यास सुरुवात केल्यावर त्यांच्या जिवाला अपाय होऊ नये म्हणून संरक्षण देण्याची व्यवस्था मी करू शकलो. पण अधूनमधून संरक्षण देण्याने धोका संपला, असे म्हणण्यासारखे नव्हते. मी त्यांना स्पष्टच बजावले की, 'समजा, उद्या तुमचा खून झाला, तर तुम्ही किती धडपड करताहात, त्यामागे तुमची तात्पुरती आणि दूरवरची उद्दिष्टे काय आहेत, या गोष्टी अंधारात राहतील. यास्तव तुम्ही दैनंदिनी लिहिण्यास सुरुवात करा.' 'आपल्याला ते जमणार नाही' असे उत्तर मिळाले. तेव्हा मी आग्रह धरला की, 'दर महिन्या-दोन महिन्यांनी मला पत्र पाठवून तुम्ही या काळात काय काय केलेत व पुढचे कार्यक्रम काय ठरवले आहेत, लोकांचा प्रतिसाद किती मिळतो आहे याचा आढावा देत राहा.' या कल्पनेलाही त्यांनी प्रथम विरोध केला. परंतु मी हुज्जत घातल्यावर अत्यंत नाखुशीने संमती दिली. प्रथम-प्रथम त्यांची पत्रे ठरलेल्या वेळेप्रमाणे येत; पुढे दिरंगाई होऊ लागली. तेव्हा मी भेट होईल तेव्हा कानउघाडणी करीत असे. त्याचाही उपयोग होईना, तेव्हा चक्क त्यांच्याकडे माणूस पाठवून लकडा सुरू केला. यासाठी प्रा. शहांचाही मी अनेकदा उपयोग केला. त्यांनी १९६८ ते १९७३ पर्यंत कशीबशी पत्रे धाडली. १९७४मध्ये माझी मुंबईला बदली झाली, तेव्हा गावातल्या गावात पत्रे धाडणे विचित्र वाटले! त्यानंतर त्यांची प्रकृती बिघडत चालली, कामाचा वेग मंदावला. १९७५च्या एप्रिलमध्ये तर ते हॉस्पिटलमध्येच दाखल झाले. १९७६मध्ये त्यांनी पुन्हा काम सुरू करून एक-दोन पत्रेही धाडली. नंतर पुन्हा प्रकृती बिघडली. पत्रांच्या बाबतीत मी पोलिसी केली नसती तर, अनेक गोष्टी अंधारात राहिल्या असत्या. ही पत्रे प्रसिद्ध करण्याचे माझ्या डोक्यात घोळत आहे.

कार्याचा विशाल आवाका

साधनेच्या वाचकांना हमीद दलवाईंच्या कार्याची ओळख करून देणे, म्हणजे कथेकऱ्याला पुराण सांगण्यासारखेच आहे. मुसलमान समाजात आधुनिक उदारमतवादी प्रवाह सुरू करणे, तरुणांमध्ये चिकित्सक बुद्धी जागृत करणे, परंपरागत रूढींनी जखडलेल्या समाजाचे प्रबोधन करणे, अस्पृश्यांहूनही अधिक पीडित अशा गरीब मुसलमान स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता करणे, समान नागरी कायदा करवून घेऊन जाती-जमातींतल्या भिंती पाडून टाकणे इत्यादी उद्दिष्टांसाठी त्यांनी १९६८मध्ये 'मराठा'तील नोकरी सोडून प्रबोधन आंदोलनाची धुरा उचलली. त्या वर्षी त्यांनी साऱ्या महाराष्ट्रात दौरा केला. धर्मनिरपेक्षता, आधुनिकता, मुसलमान स्त्रियांना मानवी हक्क देण्याची आवश्यकता आदी विषयांवर जागोजागी व्याख्याने दिली. त्यांचे विचार नवे होते. ते एक प्रभावी वक्ते होते. ही भाषणे इतकी गाजली की, पुण्यात युवक क्रांती दलाने तिकिटे लावून त्यांची व्याख्याने करवली. या व्याख्यानांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व जनसंघाच्या लोकांवरही परिणाम झाला... अनेकांचे शंकानिरसन झाले... कित्येकांचे पूर्वग्रह दूर झाले. मुसलमान समाजाचे प्रबोधन करावयास निघालेल्या हमीद दलवाईंनी हिंदू तरुणांचेही प्रबोधन केले. शहरातल्या विविध जाती-जमातींत भावनात्मक एकात्मकता निर्माण होण्याची प्रक्रिया सुरू झाली. वर्षभरात हमीदभाईंना महाराष्ट्रात अफाट लोकप्रियता मिळाली. भाषणांखेरीज त्यांनी

कॉलेजा-कॉलेजांतून तरुणांशी चर्चा करण्यास सुरुवात केली. त्यांच्या कार्याला हातभार लावण्यासाठी कित्येक जण पुढे आले. त्यांमध्ये अनेक मुसलमानही होते.

स्त्रियांना वाचा दिली

१९६८मध्येच हमीद दलवाईंनी 'सदा-ए-निसवाँ' नावाची मुस्लीम स्त्रियांची संघटना उभारण्याचा प्रयत्न केला. या संघटनेत हमीद दलवाईंच्या नेतृत्वाखाली १८ एप्रिल १९६६ रोजी काढण्यात आलेल्या मोर्च्यातील सात मुस्लीम महिलांचाही समावेश होता. मुस्लीम महिलांना आपल्या वेदना व्यक्त करण्यासाठी असे हक्काचे संघटन असावे, या भावनेतून त्यांनी या संघटनेची स्थापना केली होती. या संघटनेमार्फत मुस्लीम महिलांई घराबाहेर पडून समान नागरी कायदा अस्तित्वात यावा म्हणून निदर्शने सुरू केली. त्यामुळे रूढियुक्त सनातन्यांचे माथे भडकले. अपेक्षेप्रमाणे हमीदभाईंवर नाही-नाही ते आरोप करण्यात आले, त्यांच्यावर हिंसक हल्लेही सुरू झाले; परंतु डगमगून न जाता त्यांनी अधिक जोमाने आंदोलन चालू ठेवले. त्याआधी प्रा. शहा व हमीद दलवाई यांनी सेक्युलर फोरम (पुढे सेक्युलर सोसायटी) चालू केला. फोरमतर्फे अनेक मेळावे आयोजित करण्यात आले. हमीदभाईंचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रापुरते मर्यादित नव्हते. दिल्ली, अलीगढ, हैदराबाद, कलकत्ता यांसारख्या शहरांतूनही त्यांनी मुसलमान कॉलेज युवकांत प्रचार केला व अनेकांचा पाठिंबा मिळवला.

खरे स्मरण असे करता येईल

हमीदने १९७०मध्ये 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' या संस्थेची स्थापना केली. तिच्या महाराष्ट्रात शाखाही निघाल्या. बाबुमियाँ बँडवाले, सय्यदभाई, वजीर पटेल, हुसेन जमादार, प्रा. मुमताज रहिमतपुरे यांसारखे कार्यकर्ते त्यांच्याभोवती जमा झाले. अमरावती, पुणे आणि कोल्हापूर इथल्या शाखांनी स्वतंत्रपणे उत्कृष्ट कार्य हाती घेतले व करून दाखवले. त्यांच्या पत्नी मेहेरून्निसा यांनीही नोकरी करून आर्थिक आघाडी सांभाळत आणि कुटुंबाची काळजी वाहत हमीदभाईंच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. आंदोलन बाळसे धरू लागले, पण त्याच वेळी एक जबरदस्त फटका बसला! हमीदभाईंची प्रकृती ढासळली. त्यांचे प्राण वाचावेत म्हणून अनेकांनी आर्थिक मदत केली. महाराष्ट्राचे मंत्री शरद पवार यांनी तर हमीदभाईंचे सारे कुटुंब आपल्या घरी आणले व जसलोकमध्ये उपचारांची सोय केली; परंतु हे सर्व प्रयत्न दुर्दैवाने निष्फळ ठरले. हमीदभाई गेले, तरी त्यांचे कार्य पुढे चालू राहील, यात मला तिळमात्र शंका नाही. तेच त्यांचे खरेखुरे स्मारक ठरेल. नाहीतरी 'आपले दगड-विटांचे स्मारक करू नयें' ही त्यांची अखेरची इच्छा होतीच.
(हमीद दलवाई स्मृती विशेषांक, साप्ताहिक साधना, १४ मे १९७७, पृ. क्र. २६ ते २७)

(वसंत नगरकर : माजी सनदी अधिकारी, हमीद दलवाई यांचे स्नेही, मुस्लीम प्रश्नांचे जाणकार आणि मंडळाच्या कार्याचे आणि विचाराचे समर्थक.)

५.३७ मुस्लीम स्त्रियांमधील घटस्फोट – अनु. प्रा. मुमताज रहिमतपुरे

(मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे घटस्फोटित मुस्लीम महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले. या पाहणीचा आढावा घेणारा हमीद दलवाईंचा लेख टाइम्स ऑफ इंडियात प्रसिद्ध झाला होता. त्याचा हा भाषांतरित लेख.)

मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील काही तरतुदींचा विषय मुस्लीम समाजात आणि मुस्लीमेतर समाजात बराच चर्चिला जातो. परंपरागत मुस्लीम समाजाचे नेतेपद मिरविणाऱ्या लोकांनी घटस्फोट आणि वारसा हक्क या संबंधीच्या सध्याच्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी विरोध दर्शविण्यास पद्धतशीर मोहीम उघडली आहे.

शरीयतच्या आधाराबर ते सुधारणा सुचविणाऱ्यांना विरोध करतात. 'शरीयत ही अल्लाने दिलेली देणगी आहे आणि तो योग्य आहे. म्हणूनच त्यामध्ये कसलाही बदल करण्याचे कारण नाही. यातील काही तरतूदी अयोग्य वाटत असल्या तरी त्या मुस्लीम समाजात दुर्लक्ष करण्याइतपत घडतात. उदा : पतीने पत्नीस एकतर्फी तलाक देणे आणि मुस्लीम समाजात असलेली बहुपत्नीत्वाची मान्यता. म्हणूनच मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करण्याच्या गप्पा अयोग्य आहेत. यामुळे मुस्लीम समाजात असुरक्षिततेची भावना मात्र वाढीस लागते.' असा प्रचार ते करत असतात. परंतु ही असुरक्षिततेची भावना मुस्लीम समाजात सन १९४७च्या विभाजनापासून वाढीस लागली आहे.

भारतात ८०पेक्षा जास्त विद्यापीठे आहेत. विशेष आश्चर्याची बाब म्हणजे, यांपैकी एकाही विद्यापीठातून मुस्लीम समाजाचे बहुपत्नीत्व, एकतर्फी देण्यात येत असलेला तलाक या विषयांवर पद्धतशीर अभ्यास केला गेला नाही. कलकत्ता येथील इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटचे डॉ. कांती पत्रासी यांनी काही वर्षांपूर्वी हिंदू व मुस्लीम समाजाची या विषयावर माहिती जमविली, पण ती शहर विभागापुरतीच मर्यादित होती. 'स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज'च्या दिल्ली केंद्रातून काम करणाऱ्या डॉ. गोपाल कृष्ण यांनी मुस्लिमांच्या दृष्टीकोनावर याहीपेक्षा व्यापकपणे अभ्यास केला आहे. परंतु त्यांचा अहवाल अजून प्रसिद्ध व्हावयाचा आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने याच दृष्टीकोनातून मुस्लीम समाजातील घटस्फोटाच्या प्रमाणाची पाहणी करण्याचे काम हाती घेतले. दोन वर्षांपूर्वीपासून देशातील वेगवेगळ्या भागांतून ही पाहणी चालू केली गेली. ती अजून चालू आहे. आतापर्यंत ५०० स्त्रियांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या स्त्रिया पतीने त्यागलेल्या तरी आहेत वा घटस्फोटिता तरी आहेत. बंगलोर, मुंबई, बुलंदशहर, कलकत्ता, कोचीन, दिल्ली, हैदराबाद, कोल्हापूर, लखनौ, सोलापूर, पुणे येथील काही लहान-मोठ्या शहरांतील या स्त्रिया आहेत. ही माहिती मुस्लीम सत्यशोधक मंडळांचे कार्यकर्ते व हितचिंतक यांनी जमा केली. या पाहणीतून असा निष्कर्ष निघतो –

या ५०० स्त्रियांपैकी ५३ स्त्रिया वयस्कर होत्या, तर १७ अगदी तरुण होत्या. यांतील काही

प्राथमिक शाळेत शिक्षिका आहेत. एक नर्सचे काम करते, एक कारकुनी करते, तर बाकीच्या बहुतेक स्त्रिया अशिक्षित, सर्वसाधारण घरकाम करणाऱ्या आहेत. यांपैकी महाराष्ट्रामधील काही अशिक्षित स्त्रिया थोडेफार पैसे मिळणारे काम स्वतःचे पोट भरण्यासाठी करतात. उदा : बिड्या वळण्याचे काम बऱ्याच जणी करतात. त्यांना कारखानदाराकडून बिडीची पानं आणि तंबाखू पुरवले जातात. बिड्यांच्या संख्येनुसार कारखानदार पैसे देतो. सांगली व निपाणी या भागांत एकाच घरात दोन अथवा तीन स्त्रिया हे काम करण्यात मग्न असतात. एका बाईच्या नवऱ्याने दुसरे लग्न केले म्हणून ही बाई आपल्या आई-वडिलांकडे परतू इच्छित होती. पण तिचे वडिलांघरी जाणे म्हणजे, महिना १०० रु.चा फटका बसणार, म्हणून तिच्या नवऱ्याने तिला वडिलांचे घरी परतण्यास आडकाठी केली.

प्रत्येक प्रकरणात, वैवाहिक जीवनातील घटस्फोट वा फारकतीची कालमर्यादा वेगवेगळी आहे. विवाह होऊन केवळ आठ दिवस झालेल्या एका स्त्रीस तलाक देण्यात आला. तर ४० वर्षे संसार केल्यानंतर एका बाईस तलाक दिला गेला. यांतील काही स्त्रियांना मुलेही आहेत. तलाक झाल्यानंतर काही मुले आईजवळ राहतात, तर काही वडिलांजवळ. काहीकाहींनी बालकांना त्यांच्या आईकडून जबरदस्तीने नेले आहे. एक स्त्री गरोदर असताना तिला तलाक दिला गेला. तिने बालकास जन्म दिल्यानंतर काही आठवड्यांच्या आतच त्या बालकास त्या स्त्रीच्या सासरकडील लोकांनी आपल्याकडे नेले. योग्य काळजीअभावी ते बालक वारले, परंतु त्या मुलाच्या आईस ही बातमी अजूनही कळविली गेलेली नाही.

४२ वर्षे वैवाहिक जीवन अनुभविल्यानंतर एका स्त्रीस तलाक दिला गेला. या स्त्रीने आपल्या आयुष्यात गृहकृत्याशिवाय कोणतेही काम केले नव्हते. या स्त्रीच्या नवऱ्याने दुसरे लग्न केले, पण लगेच हिला तलाक दिला नाही. ती आपण होऊन त्याच घरात राहू लागली. तरी तिचा नवरा तिला नाना प्रकारे छळू लागला. या छळाला कंटाळून तिला घर सोडणे भाग पडले. काही दिवसांतच नवऱ्याने तिला पत्राद्वारे तलाक दिला. तिला पोटगीही दिली नाही. तिने आता आपल्या नातेवाइकाकडे आसरा घेतला आहे. आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ती आता नर्सिंगचं शिक्षण घेऊ इच्छिते.

काही प्रकरणांतच अशा घटस्फोटित स्त्रियांना पोटगी मिळाली आहे. अथवा त्यांच्या हक्काचा 'मेहेर' अदा करण्यात आला आहे. अशा प्रकरणांत ठराबीक साऱ्याच्याच घटना घडतात. नवरा काहीतरी कारण शोधतो किंवा भांडण तरी उकरून काढतो आणि बायकोस घराबाहेर काढतो. ती आपल्या आई-वडिलांच्या घरी परतली की, ती तिच्यावर दागिने घेऊन गेल्याचा ठपका ठेवतो. उदा : दोन हजार रु.चे दागिने घेऊन गेल्याचा आरोप. लग्नाच्या वेळी मेहेरची रक्कम ५०० रु. ठरलेली असते. स्त्रीने आपल्या मेहेरच्या रकमेची मागणी करण्याआधी वकिलाद्वारे नोटीस पाठविली जाते की, 'तिने आपल्याबरोबर नेलेले दागिने परत करावेत.' त्यामुळे त्या असाहाय्य स्त्रीला मेहेरबाबत न्यायालयात तक्रार करता येत नाही आणि हे पतिमहाशय सुरक्षितपणे या बंधनातून सुटतात. मेहेरची रक्कम ५१ रु.पासून ते २५०० रु.पर्यंत वेगवेगळी असते. बऱ्याचशा प्रकरणांत मेहेरची रक्कम मुळी देण्यातच येत नाही.

पाहणीसाठी घेण्यात आलेल्या मुस्लीम स्त्रियांच्या मुलाखतींदरम्यान त्यांना मुस्लीम व्यक्तिगत कायद्याविषयी काही प्रश्न विचारण्यात आले. त्यांनी दिलेली उत्तरे विचार करण्यासारखी आहेत. सर्वसामान्य मुस्लीम स्त्रीचे विचार अंतर्मुखत करतात. 'घटस्फोट घेण्याचा हक्क पती-पत्नी या दोघांनाही असावा का फक्त तो पतीस असावा?' असा प्रश्न त्यांना विचारला असता बहुतेक स्त्रियांनी उत्तर दिले की, 'असा हक्क दोघांनाही असला पाहिजे.' एका स्त्रीने मात्र सांगितले की, 'घटस्फोट घेण्याचा हक्क केवळ पुरुषास असावा, कारण पुरुष हा घराचा मालक असतो.' तर काही स्त्रियांनी सांगितले की, 'घटस्फोट घेण्याचा हक्क पती व पत्नीस दोघांनाही नसावा.' काहीना वाटते की, एकमेकांची संमती घेऊन घटस्फोट व्हावा, पण 'हे कसे ठरवायचे' याची निश्चित कल्पना त्यांच्यापाशी नाही.

असाच एक दुसरा प्रश्न. 'पहिली बायको जिवंत असता दुसरे लग्न करण्याचा हक्क पतीस असावा का?' एक स्त्री सोडल्यास साऱ्यांनी नकारार्थी उत्तर दिले. एकच स्त्री तेवढी म्हणाली की, 'पतीस असे दुसरे लग्न करण्याचा हक्क असावा, पण तो पहिल्या बायकोची संमती घेऊन मिळावा.' 'पहिली बायको जिवंत असलेल्या पुरुषाशी आपणास लग्न करणे आवडेल का?' असा प्रश्न विचारला असता सर्वांनी स्पष्टपणे 'नाही' असे उत्तर दिले.

'घटस्फोट देण्याची कोणती पद्धत असावी?' याबाबत प्रश्न विचारला होता. 'सध्या अस्तित्वात असलेला एकतर्फी वा तोंडी पद्धतीचा तलाक नसावा' असे बहुतेक सर्वांनी सांगितले. 'शक्य झाल्यास तलाक टाळता यावा आणि पती-पत्नींत 'जमातीने' समझौता करण्याचा प्रयत्न करावा' असे काही स्त्रिया म्हणाल्या, तर काहींनी सुचविले की, 'तलाक घेण्यास मुळी मनाई असावी. कारण असे झाले, तरच पुरुष आपल्या पत्नीशी चांगले वागतील.' 'कायदेशीरपणे, फक्त न्यायालयातर्फे घटस्फोट देता यावा' असे बहुतेक स्त्रियांनी सुचविले.

घटस्फोट प्रकरणात, 'स्त्रीला जगता येईल इतपत रक्कम कायद्याने देण्यास पतीस भाग पाडावें' असे बऱ्याच जणींनी सुचविले. 'स्त्री व पुरुष या दोघांनाही घटस्फोट प्रकरणी समान हक्क असावेत' असे त्यांना वाटते. 'सध्या अस्तित्वात असणारा मुस्लीम व्यक्तिगत कायदा स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी बदलावा का?' असा प्रश्न विचारला असता, सर्वांनी होकारार्थी उत्तर दिले.

ही पाहणी करीत असताना आणखीही काही प्रश्न त्यांना विचारले गेले. उदाहरणार्थ, 'मुस्लिमांनी कुटुंब नियोजन करावे का?' गमतीची गोष्ट अशी की, 'साऱ्यांनी 'होय' म्हणून उत्तर दिले.' अशा प्रकारेच, 'मुस्लीम स्त्रियांना शिक्षणाची संधी अधिक उपलब्ध व्हावी' असेच मत बहुतेकांनी प्रदर्शित केले (मद्रास उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश मिस्टर बशीर अहमद सय्यद यांच्या म्हणण्याप्रमाणे दीड टक्का स्त्रियांच तेवढ्या सुशिक्षित आहेत).

'मुस्लीम स्त्रियांना निश्चितपणे हक्क मिळण्यासाठी आणि त्यांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी आपण चळवळीत भाग घेण्यास तयार आहात का?' असे विचारले असता, महाराष्ट्रीय मुस्लीम स्त्रियांनी 'होय' म्हणून सांगितले. महाराष्ट्राबाहेरील स्त्रियांची वेगवेगळी उत्तरे मिळाली. 'अशा चळवळीत आपण भाग घेऊ' असे काही म्हणाल्या, तर आपण अशा

चळवळीत भाग घेण्यास असमर्थ असल्याचे काहींनी सांगितले, तर काहींनी अशा चळवळीत भाग घेण्याची अनिच्छा प्रकट केली. 'अशी चळवळ उभारण्याची पुरुषांची जबाबदारी आहे, कारण केवळ सार्वजनिक जीवनात पुरुषच अशा चळवळी उभारू शकतो' असा विचार फार थोड्या जणींनी प्रकट केला. आपली असमर्थता दर्शविताना काही स्त्रिया म्हणाल्या की ''आम्ही' सामाजिक रुढींच्या दास आहोत', तर काहींनी सुचविले की, 'अशी चळवळ सुशिक्षित स्त्रियांनी उभारावी. आम्ही अशी चळवळ उभारू शकत नाही. कारण आम्हाला समाजात मान्यता नाही आणि शिवाय आम्ही अनाडी आहोत.'

ही पाहणी करीत असताना मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. महाराष्ट्राबाहेर काम करताना पुरेशा पैशाअभावी आणि पुरेशा स्वयंसेवकांअभावी अनेक अडचणी आल्या. तर तलाक दिलेल्या वा सोडून देण्यात आलेल्या स्त्रियांशी संपर्क साधणे काही प्रमाणात कठीण गेले. कारण त्या स्त्रियांचे वडील वा भाऊ मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांस अशी भेट घेऊ देण्यास नाराज असत. तरीही अशा स्त्रियांची मुलाखत घेता आली, तरी त्या मोकळेपणाने बोलत नसत. त्यांच्या मनात घरातील पुरुषांची धास्ती असे.

या पाहणीच्या निष्कर्षाकडे एक प्राथमिक चाचणी म्हणूनच पाहावयास हवे. परंतु असे खात्रीने म्हणता येईल की, या पाहणीचा निष्कर्ष सनातन्यांच्या दाव्यांच्या विरुद्ध जातो. या पाहणीत सुचविले आहे, त्यापेक्षा या प्रश्नाचे खरे स्वरूप भयानक असण्याची शक्यता आहे.

(अनुवादक: प्रा. मुमताज रहिमतपुरे. या मुस्लीम सत्यशोधक मंडळाशी जोडल्या गेलेल्या आधाडीच्या महिला कार्यकर्त्या होत्या. कोल्हापूर येथील महाविद्यालयात त्या इंग्रजीच्या प्राध्यापिका होत्या. मंडळाच्या विविध आंदोलनांत त्यांचा सक्रिय सहभाग होता.)

५.३८ व्यक्ती नव्हे शक्ती (कविता) – बाबा आमटे

हमीदने जीवनाला अर्थ दिला, जीवनाची महत्ता जाणली
हमीदचे हृदय किती कुसुमकोमल होते, निष्कलंक होते
आपल्या विवेकाशी त्याने सच्चे इमान राखले,
त्याची क्षमता त्याने स्वतःच्या कायनि सिद्ध केली.
मानवी जीवनातील यातनांची स्पंदने त्याला कशी सहज जाणवत
मानवी आत्म्याचे सुंदर शिल्प घडवण्याची त्याला तळमळ होती
आत्म्याचा आक्रोश त्याला निरंतर ऐकू येत होता
सुदृढ अशा पायांवर त्याने आपल्या विचारांची
देखणी इमारत उभी केली होती
त्याचे जीवन म्हणजे जणू साक्षात उत्कटता,
मनोमंथन करीत त्याने जीवनाचे नवनीत समाजाला अर्पण केले
जीवनाचे ठोके जणू त्याच्या नाडीतून प्रतिध्वनित होत.
जीवन मोडून जावे अशा ताणात ते प्रत्येक श्वास घेत होते.
त्याने गाठलेली उंची कशी डोळ्यांत भरत होती
परंपरेशी त्याने दिलेली झुंज नेत्रदीपक होती.
त्याचा आक्रोश किती तरी हृदयांत प्रतिध्वनित होत होता.
त्याच्या शब्दांत मंत्राची मोहिनी होती
आणि त्यामुळे तरुणांच्या रुंझी त्याच्याभोवती पडत
त्याचे जीवन म्हणजे जणू एक अडथळ्यांची शर्यत होती
हमीदचे ते मिश्कील चमचमणारे डोळे आता पुन्हा दिसणार नाहीत
त्याची ध्येयावरची पराकोटीची श्रद्धा आणि अमर्याद उत्साह
यामुळे त्याच्या व्यक्तित्वाला एक भव्यता आली होती
इतिहासाला त्याने दिलेले नवे वळण तरुणांनी समजून घेतले पाहिजे
त्याची ती धडपड त्याच्या शरीरनाशानंतरही आपल्यात संक्रांत झाली पाहिजे
त्यातील तीव्रता आणि प्रखरता आपण जतन केली पाहिजे
लुथर ही जशी एक व्यक्ती नव्हती, शक्ती होती
तशी हमीद ही व्यक्ती नव्हती, शक्ती होती.

(साप्ताहिक साधना, ४ जून १९७७)
(बाबा आमटे : ज्येष्ठ समाजसेवक आणि साहित्यिक.)

हमीद दलवाई

मुंबई,
८ जुलै १९७१

प्रिय मोमीन,

मी कराडहून परतल्यापासून तुमचे पत्र नाही. मी आझाताई देसायांडे, प्रॉ. खुराके तसेच यदुनाथ थत्तेना बोलले आहे. तुम्ही आता पुढे काय करावयाचे ठरविले आहे हे कळविलेत तर बरे होईल. तेथेच तुम्हाला नोकरी वैगेरे मिळवून देण्यास आमचा काही उपयोग होणार असल्यास कळविणे. या व्यतीत मंडळकमकरांचा सल्ला घ्यावा.

करीमखांचे आणखी एक लांबलचक पत्र आले होते. त्याला मी उत्तर पाठविले आहे. त्याला मी तुम्हाला व मंडळकमकरना भेटावयास सांगीतले आहे. तो भेटला किंवा काय ते कळविणे.

कळावे. पत्र पाठविणे.

आपला,
हमीद दलवाई

इलाही मोमीन
३१ सोमवारपेठ
कराड

हमीद दलवाई यांच्या हस्ताक्षरातील पत्र..

१. ए. जे. शेख (फोटो उपलब्ध नाही.)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेसंदर्भात चर्चा आणि संवाद होत असताना भाई वैद्य यांच्या निकटचे राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते ए. जे. शेख यांची ओळख दलवाईंशी झाली. ए. जे. शेख हे मुस्लीमबहुल भाग असणाऱ्या मोमिनपुऱ्यात राहायला होते. राष्ट्र सेवा दलाचे विचार पाठीशी असल्यामुळे ते प्रागतिक आणि उदारमतवादी विचारांचे होते. त्यांचे शिक्षण एम. कॉम. पर्यंत झाले होते आणि ते पुण्यातील बँक ऑफ इंडियामध्ये नोकरीस होते. मंडळाच्या आरंभ काळातील बैठकांमध्ये सातत्याने उपस्थित राहून हमीद दलवाईंच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. त्यामुळे वाद-प्रतिवाद होत असताना निर्भीडपणे भूमिका मांडण्यात ते अग्रभागी असत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाची हंगामी समिती स्थापन केली, तेव्हा ए. जे. शेख यांच्याकडे अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली होती.

पुढे ते पुणे शाखेचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत होते. मुस्लीम सत्यशोधक मंडळाची अधिकृत स्थापना पुण्यातील साधना साप्ताहिकाच्या आंतरभारती सभागृहात झाली. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख उपस्थितांमध्ये हमीद दलवाई, प्रा. यास्मिन लुकमानी व इतर मान्यवरांसमवेत ए. जे. शेख यांचाही आंतर्भाव होता. मंडळाच्या वैचारिक भूमिकेचा त्यांनी व्यवस्थित अभ्यास केला होता. त्यामुळे अनेक सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये ते प्रास्ताविक करत असत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेनंतरच्या उपक्रमात त्यांचा पुढाकार होता. १९ जुलै १९७० रोजी मुंबईत कौमी एकता युवा समितीच्या परिषदेत ए. जे. शेख व हमीद दलवाई यांनी भाग घेतला. हिंदूंप्रमाणेच मुस्लिमांच्या सामाजिक कायद्यात बदल झाला नाही, तर मुस्लीम समाज झपाट्याने अधोगतीस जाईल, या भूमिकेतून ते मुस्लीम समाजाशी संवाद करत असत आणि घरोघरी जाऊन मुस्लीम प्रश्नांवर संवाद करत असत. या काळात आलेले अनुभव आणि मुस्लीम समाजात बदलाला अनुकूल वातावरण होत असल्याचे अनुभव त्यांनी 'कौमी एकता विवाह परिषदे'त मांडले. या परिषदेत अधिकाधिक मुस्लिमांनी सहभाग घ्यावा, यासाठी त्यांनी युक्रांद या संघटनेसोबत पुढाकार घेतला होता. मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटी यांच्या वतीने समान नागरी कायदा अस्तित्वात यावा म्हणून सह्यांची मोहीम आखली होती. या वेळी ५०० लोकांच्या सह्या घेतल्या होत्या. त्यांत १२५ महिलांचा समावेश होता. हे निवेदन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना १० एप्रिल १९७० रोजी देण्यात आले. मुख्यमंत्र्यांना भेटलेल्या शिष्टमंडळात

हमीद दलवाई, अ. भि. शहा आणि इतर कार्यकर्त्यांसमवेत ए. जे. शेख यांचाही समावेश होता.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या आरंभ काळात हमीद दलवाईंना निर्भीडपणे साथ देणाऱ्या निवडक कार्यकर्त्यांमध्ये ए. जे. शेख यांचा महत्त्वाचा सहभाग होता. मंडळाच्या स्थापनेनंतर अनेक वर्षे त्यांनी मंडळाच्या विविध कार्यक्रमांमध्ये हिरिरीने सहभाग घेतला. जिहाद-ए-तलाक परिषदेचे आयोजन, तसेच तलाकपीडित महिलांसाठी मदत निधी गोळा करण्यासाठी मंडळाने मोहीम आखली. शुक्रवारी मशिदीसमोर आणि ईदच्या दिवशी ईदगाह मैदानावर पत्रके वाटून निधी संकलित करीत असताना ए. जे. शेख अग्रभागी होते. अशाच पद्धतीने पहिल्या पाच वर्षांतील मंडळाच्या विविध उपक्रमांत ए. जे. शेख यांचा उल्लेखनीय सहभाग होता.

२. स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले

(५ सप्टेंबर, १९०५ – ८ डिसेंबर १९९७)

बाबुमियाँचा जन्म नगर जिल्ह्यातील श्रीगोंदे येथे ५ सप्टेंबर १९०५ रोजी झाला. घरची परिस्थिती अतिशय बिकट आणि हलाखीची होती. बाबुमियाँ लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. अतिशय आवड असूनही प्रतिकूल परिस्थितीमुळे औपचारिक शिक्षण त्यांना पूर्ण करता आले नाही, परंतु शिक्षक दिनी जन्म झालेल्या बाबुमियाँनी आपले आयुष्य समाज शिक्षणासाठी खर्च केले. एक आदर्श कार्यकर्ता आणि समाज शिक्षक म्हणून त्यांनी महाराष्ट्रातील शिक्षणाच्या आणि प्रबोधनाच्या चळवळीत योगदान दिले.

शाळा सुटल्यानंतर अगदी लहानपणीच आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी त्यांनी श्रीगोंदे गाव ते श्रीगोंदे रेल्वे स्टेशनपर्यंत छकडा चालविण्याचा व्यवसाय केला. उदरनिर्वाहासाठीच आपले गाव सोडून सोहराब मोदी दिग्दर्शित 'खून-ए-नाहक' या नाटकात स्त्रीची भूमिका केली. हे नाटक म्हणजे जगप्रसिद्ध नाटककार विल्यम शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' या नाटकाचे उर्दू रूपांतर होते. नंतर नाटक हे त्यांच्या आवडीचे क्षेत्र बनले. तेथे ते अनेक वर्षे रमले. दरम्यान, भारत-पाकिस्तान यांच्यात युद्ध सुरू झाले. या कालावधीत त्यांनी 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाचे अनेक प्रयोग केले आणि हजारो रुपये उभारून संरक्षण निधीला दिले.

विशेष म्हणजे, या नाटकामध्ये त्यांनी शिवाजी महाराजांची भूमिका केली आणि त्यांच्याच पत्नीने सोयराबाईंची भूमिका केली. यात त्यांच्या मुलानेही भूमिका केली होती. अशा प्रकारे एकाच कुटुंबातील तिघांनी एकत्र येऊन या ऐतिहासिक नाटकाचे ठिकठिकाणी प्रयोग केले. तेव्हाचे पुण्याचे महापौर भाई वैद्य आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई हे मुद्दाम नाटक पाहण्यासाठी श्रीगोंद्याला गेले होते. आपल्या कुटुंबाच्या उदनिर्वाहासाठीच त्यांनी वाद्यपथकामध्ये वाजंत्री वाजविण्याचे काम केले. पुढे काही वर्षांनंतर, म्हणजे १९२५ मध्ये त्यांनी स्वतःचे 'बाबू ब्रास बँड' वाद्य पथक स्थापन केले. या बँड पथकातील कलाकार खादीचा पोशाख आणि गांधी टोपी वापरत आणि अभिजात संगीत गात असत. उदरनिर्वाहासाठी हे करावे लागत असले, तरी त्यांचे अभिनयावर आणि संगीतावर अगदी मनापासून प्रेम होते.

महात्मा गांधींनी पुकारलेल्या 'असहकार' आणि 'चले जाव' चळवळीत बाबुमियाँनी सहभाग घेतला. स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या निमित्ताने ९ जानेवारी १९४१मध्ये त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. नंतर ९ ऑगस्ट १९४२मध्ये त्यांनी 'चले जाव' चळवळीत स्वतःला अटक करवून घेतली. येरवडा तुरुंगात पावणे दोन वर्षे त्यांना कारावास भोगावा लागला. या कालावधीत त्यांचा रावसाहेब पटवर्धन यांच्याशी संपर्क आला आणि त्यांच्या विचारांचा प्रभाव बाबुमियाँवर पडला. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वपूर्ण कामगिरी केल्याबद्दल १७ ऑगस्ट १९७२मध्ये भारत सरकारतर्फे ताम्रपट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. हा गौरव त्यांनी स्वीकारला, परंतु स्वातंत्र्य सैनिकाला मिळणाऱ्या सर्व सवलती त्यांनी नाकारल्या. कोणत्याही प्रकारची पेन्शन, बस-रेल्वे पास, जमीन त्यांनी घेतली नाही. बाबुमियाँ नेहमीच सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा आणि राजकारण यांपासून दूर राहिले. स्वातंत्र्याच्या काळात त्यांच्या चारित्र्यातील पारदर्शकता, लोकप्रियता आणि समाजसेवा विचारात घेऊन काँग्रेसने त्यांना लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उमेदवारी देण्याचे जाहीर केले. मात्र या सच्च्या कार्यकर्त्याने अतिशय विनम्रपणे त्याला नकार दिला व सक्रिय राजकारणापासून दूर राहण्याचे व्रत स्वीकारले. परंतु मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेविषयीची बातमी वर्तमानपत्रात वाचून ते पुण्यातील साधना कार्यालयात आले तेव्हा, म्हणजे २२ मार्च १९७० रोजी त्यांची मंडळाचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. निधनापूर्वी काही दिवस वय आणि वृद्धापकाळ विचारात घेऊन ते या पदाच्या जबाबदारीतून मुक्त झाले होते.

मंडळाच्या अनेक कार्यक्रमांत अगदी शेवटपर्यंत त्यांचा सहभाग होता. महिलांना न्याय मिळावा, त्यांना इतर महिलांप्रमाणेच कायदयाचे संरक्षण मिळावे यासाठी त्यांनी आवाज उठवला. शहाबानो प्रकरणाच्या वेळी राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग, पंतप्रधान राजीव गांधी, कायदामंत्री अशोक सेन, नजमा हेपतुल्ला यांना भेटून 'पोटगी कायम राहावी' म्हणून त्यांनी विनंती केली. तलाक, बहुपत्नीत्व यांसारख्या विषयांवर ते तळमळीने बोलत. १९८५-८६दरम्यान महाराष्ट्रात आयोजित केलेल्या तलाक मुक्ती मोर्च्यामध्येही ते सक्रिय होते.

हमाल भवन येथे मुस्लीम सत्यशोधक मंडळाची निवासी शिबिरे होत असत. तेव्हा एखादा नवीन तरुण कार्यकर्ता भेटला की, त्याची ते स्वत:हून ओळख करून घेत आणि त्याच्याशी गप्पा मारत. हिंदीमिश्रित उर्दू भाषेत कार्यकर्ता बोलायला लागला की, ते म्हणत, 'आप को मराठी आती ना? तो फिर मराठीमें बोलो.' ते म्हणायचे, 'भाषा आणि धर्माचा संबंध नसतो. कोणी मुसलमान आहे म्हणून त्याची मातृभाषा उर्दू आहे, असे नाही. उत्तर प्रदेशातील आणि पंजाबमधील अनेक हिंदू घराणी आपली मातृभाषा उर्दू मानतात आपल्या महाराष्ट्रात मराठी मातृभाषा असल्याने आपण मराठीतच बोलावे.'

रयत शिक्षण संस्था आणि बाबुमियाँ यांचा जवळचा संबंध होता. १९५३मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील श्रीगोंदयाला आले, तेव्हा त्यांनी बाबुमियाँची भेट घेतली आणि म्हणाले, 'बाबुमियाँ, तुम्ही स्वातंत्र्यासाठी कष्ट घेतले, आपल्याला स्वातंत्र्य मिळालं. आता आपल्याला समाज घडवायचाय. त्यासाठी शिक्षणाविषयी काम करावं लागणार आहे. तुम्ही आता शिक्षणाकडे लक्ष

द्या.' चौथीपर्यंत शिकलेल्या बाबुमियाँनी कर्मवीरांना दिलेला शब्द पाळला आणि नगर जिल्ह्यात शिक्षण संस्था उभारण्यात पुढाकार घेतला.

७ सप्टेंबर १९९७ला श्रीगोंदे येथील नागरिकांनी समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते मानपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. बाबुमियाँ हे हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक होते. ते एक सच्चे मानवतावादी कार्यकर्ते होते. आयुष्यभर त्यांनी गांधीवादाचे व्रत सांभाळले. खादीचे कापडे, गांधी टोपी हा त्यांचा कायमचा पोशाख. निःस्पृह, पारदर्शक व्यक्तिमत्त्व लाभलेल्या बाबुमियाँचे निधन ८ डिसेंबर १९९७ रोजी झाले. या कार्यकर्त्याचे जाणे सर्वांनाच हुरहुर लावणारे होते. समितीमार्फत दिला जाणारा सामाजिक कृतज्ञता निधी पुरस्कारातील 'जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ लेखक पु. ल. देशपांडे यांच्या हस्ते त्यांना देण्यात आला.

बाबुमियाँच्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्यांचे समाजाच्या पुढे जाणारे क्रांतिकारक विचार. आपल्या वाढदिवसाच्या दिवशी घरातील बुरखा पद्धती बंद केल्याचे जाहीर करणे, बकरी ईदच्या दिवशी देशासाठी वैयक्तिक सत्याग्रह करणे, १९५५च्या दरम्यान मुस्लीम समाजातील चालीरीतींना काटशह देण्यासाठी आपल्या मुलाच्या लग्नामध्ये वधू-वरांना स्टेजवर आणून बसवून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देणे या सर्व गोष्टी त्यांच्या सुधारणावादी व क्रांतिकारक विचारांचेच द्योतक होत्या. बाबुमियाँची सांस्कृतिक समज कोणत्याही मूलतत्त्ववादयाइतकी संकुचित नव्हती. भिन्न-भिन्न उपासना पद्धती राखूनही व्यापक, धर्मनिरपेक्ष संस्कृती जोपासता येते, हाच संदेश त्यांनी आपल्या जीवन पद्धतीतून दिला.

स्त्रियांनी पुरुषांची सेवा करावी, ही समाज मानसिकता असताना बाबुमियाँनी आपल्या वृद्ध व आजारी पत्नीची सेवा करून वृद्धापकाळात एक नवा आदर्श घालून दिला. हा आदर्श आजही सर्वांना उपयोगी ठरणाराच आहे. मृदू भाषेत कणखरपणे त्यांनी आपली तत्त्वे सर्वांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. जन्माने मुसलमान असून, घरात सर्व जण मांसाहार करणारे असतानाही त्यांनी आयुष्यभर शाकाहारी राहण्याचे तत्त्व पाळले. त्याग व संयम यांचे ते मूर्तिमंत उदाहरण होते. उदरनिर्वाहाचा व्यवसाय अत्यंत सचोटीने करून समाजाच्या व देशाच्या उन्नतीसाठी ते शेवटपर्यंत कार्यरत राहिले. त्यांचे संपूर्ण जीवनच दीपस्तंभाप्रमाणे सर्वांना मार्गदर्शक ठरणारे होते.

३. मेहेरून्निसा दलवाई

(२५ मे १९३० – ८ जून २०१७)

समाज सुधारक आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांच्या निधनानंतर त्यांचे विचार व कार्य पुढे नेण्यात त्यांच्या पत्नी मेहेरून्निसा दलवाई यांचा मोठा वाटा आहे. हमीदभाईंच्या निधनानंतर त्या मुस्लीम सत्यशोधक मंडळात अधिक सक्रिय झाल्या होत्या.

पुण्यातील प्राथमिक वास्तव्यानंतर मुंबईत १९५४मध्ये त्या 'ऑल इंडिया खादी मिशन'मध्ये नोकरीसाठी रुजू झाल्या. या काळात हमीदभाईंचे कथालेखन सुरू होते.

त्याच वेळी सेवा दलाचे संस्कार व समकालीन समाज प्रबोधनाच्या वातावरणात त्यांचे मुस्लीम समाज प्रबोधनाचे चिंतन सुरू होते. या काळात हमीदभाई मेहेरून्निसा यांना 'खादी मिशन'मध्ये भेटायला गेले. एक मुस्लीम मुलगी खादी मिशनमध्ये नोकरी करत असल्याचे त्यांना कौतुक वाटले. त्यांनी मेहेरून्निसा यांची भेट घेऊन लग्न ठरविले आणि १६ जुलै १९५८ रोजी धार्मिक पद्धतीने विवाह केला; पण हमीदभाई यांच्या धर्मनिरपेक्ष, एकात्म समाज निर्मितीच्या विचारांशी असलेल्या बांधिलकीमुळे एका महिन्यानंतर त्यांनी विशेष विवाह कायदा १९५४ अंतर्गत विवाहाची नोंदणी केली. मुस्लीम वधू-वराचा या कायद्याअंतर्गत नोंदवलेला हा देशातील पहिला विवाह असावा. हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाने पुढील काळात अभियान म्हणून राबविले.

ध्येयवादी सुधारकांच्या जीवनात 'वचन-वर्तन-सुसंगतता' हे एक सूत्र असते आणि या सूत्रावरच हमीदभाई आणि भाभींचे खासगी-सार्वजनिक जीवन आधारित होते. रुबिना, इला या दोन मुलींनंतर त्यांनी कुटुंब नियोजनाचे तत्त्व आचरणात आणले. दोन्ही मुलींना मराठी माध्यमातून शिक्षण दिले. त्यांना चांगले शिक्षण दिले आणि हुंडा न देता-घेता दोघींचे नोंदणी पद्धतीने आंतरधर्मीय विवाह केले. मानवतावादी जीवनमूल्यांशी प्रामाणिक राहून आपल्या निधनानंतर धार्मिक संस्कार न करता देहदान करण्याची इच्छा भाभींनी व्यक्त केली होती. त्यानुसार हडपसर, पुणे येथील साने गुरुजी रुग्णालयात त्यांचे देहदान करण्यात आले.

हमीदभाईंच्या नंतरची चाळीस वर्षे भाभींनी दलवाईंच्या विचारांच्या प्रचारासाठीच वेचली. नोकरी, संसार, मुलींचे संगोपन करतानाच दलवाईंच्या समाज प्रबोधनाच्या कार्यातही त्या सक्रिय राहिल्या. मुस्लीम महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व त्यांना समान न्याय, अधिकार मिळावा यासाठी हमीदभाईंनी १८ एप्रिल १९६६ रोजी सात मुस्लीम महिलांचा मोर्चा काढला व समान नागरी कायद्याची मागणी सरकारकडे केली. त्या महिलांमध्ये भाभीही होत्या. १९६६मध्ये दलवाईंच्या 'इंधन' कादंबरीच्या निमित्ताने काही लोकांनी गावातील लोकांना भडकावले. तेव्हा भाभी गरोदर होत्या. त्या वेळी घरावर दगडफेक झाली, बहिष्कार घातला गेला, जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या गेल्या. अशा परिस्थितीतही भाभी खंबीर राहिल्या. १९७१मध्ये दलवाईंनी दिल्लीमध्ये 'ऑल इंडिया फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम कॉन्फरन्स' आयोजित केली होती. तसेच मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे झालेल्या शिक्षण परिषद, सामाजिक परिषद, महिला परिषद अशा सर्व उपक्रमांत भाभी खांद्याला खांदा लावून समाज प्रबोधनाच्या लढ्यात सैनिक म्हणून वावरल्या. पुढे शहाबानो प्रकरण, १९८६चा महाराष्ट्र तलाक मुक्ती मोर्चा, याबरोबरच राज्य व राष्ट्रीय पातळीवरील आंदोलनांतही भाभींनी सिंहाचा वाटा उचलला.

'आपले स्मारक उभारू नये, पण शक्य झाल्यास जागतिक पातळीवरील इस्लामचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास व्हावा, यासाठी संस्था किंवा ग्रंथालय उभे करावे' अशी इच्छा हमीदभाईंनी मृत्युपत्रात व्यक्त केली होती. या इच्छेला मूर्त रूप देण्यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात, म्हणजे १९९५मध्ये भाभींच्या पुढाकारातून 'हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट'ची स्थापना करण्यात आली. या संस्थेमार्फत भरीव स्वरूपाचे कार्य झाले नसले, तरी त्या दिशेने वाटचाल करण्याचा प्रयत्न नक्कीच झाला. हमीदभाईंचे जन्मगाव मिरजोळी

येथे हमीदभाईंच्या राहत्या घरी वाचनालय सुरू केले गेले. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, हमीदभाईंचे अप्रकाशित साहित्य, प्रकाशित पण संग्रही नसलेले साहित्य, उपलब्ध नसलेले साहित्य पुन्हा नव्या रूपात प्रकाशित करण्याचा निर्णय भार्भीनी घेतला व त्या माध्यमातून 'साधना प्रकाशना'ने गेल्या दोन वर्षांत दलवाईंच्या विचारांची पुनर्भेट घडवून आणण्याचा उपक्रम राबवला. मेहेरून्निसा दलवाई यांनी आपल्या सहजीवनातील आठवणींना उजाळा देणारे आणि हमीद दलवाई यांच्या आठवणीत सांगितलेले 'मी भरून पावले आहे' हे आत्मचरित्र प्रकाशित झाले आहे. त्यास अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले. २०१७मध्ये महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका) यांनी हमीद दलवाईंना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले. या पुरस्काराच्या निमित्ताने देण्यात आलेल्या दोन लाख रुपयांच्या पुरस्काराची रक्कम भार्भीनी मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटला विभागून दिली. ८ जून २०१७ रोजी मेहेरून्निसा दलवाई यांचे आकस्मित निधन झाले. वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांच्या पार्थिवाचे देहदान करण्यात आले.

४. मेहबूब गौस शाह कादरी उर्फ सय्यदभाई

(६ एप्रिल १९३६ – ८ एप्रिल २०२२)



मेहबूब गौस शाह कादरी उर्फ सय्यदभाई यांचा जन्म हैदराबादचा. ६ एप्रिल, १९३६ हे त्यांचे जन्म वर्ष. अत्यंत प्रतिकूल अशा आर्थिक परिस्थितीचा सामना करीत असताना ते बालवयात आपल्या कुटुंबीयांसोबत पुण्यातील रेंजहिल्स-खडकी परिसरात राहायला आले. वडील सय्यद गौस यांची फिरतीची नोकरी आणि बेताची कमाई... पगार कमी आणि परिवार मोठा. अशा परिस्थितीमुळे सय्यदभाईंना बालवयात शिक्षण सोडून नोकरी करणे भाग पडले. वय लहान असल्याने त्यांना कोणी काम देत नसे. काम मिळविण्याची शोधमोहीम चालू असताना ते पुणे-मुंबई रस्त्यावरील भारत पेन्सिल कारखान्याचे मालक तात्या मराठे यांना भेटले आणि तेथेच त्यांनी बालवयात नोकरी करण्यास सुरुवात केली. कालांतराने तात्या मराठेंचे निधन झाले आणि भारत पेन्सिल कारखाना बंद पडला. सय्यदभाईंनी स्वतःचे महाराष्ट्र ग्राइंडिंग मिल सुरू केले.

आपल्या धाकट्या बहिणीला काही कारण नसताना तिच्या नवऱ्याने तलाक दिला. या घटनेमुळे ते अस्वस्थ झाले आणि हीच घटना सय्यदभाईंच्या सहेतुक जीवनाची प्रेरणा ठरली.

१९६७-६८ साली राबात येथे भरलेल्या मुस्लीम राष्ट्रांच्या परिषदेस भारताचे त्या वेळचे परराष्ट्रमंत्री ज. फखरूद्दीन अली अहमद यांना मुस्लीम राष्ट्राचे प्रतिनिधी नसल्याचे कारण देऊन सहभागी होऊ दिले नव्हते. या घटनेचा निषेध करणारी सभा आयोजित करण्यात सय्यदभाईंनी पुढाकार घेतला आणि आपल्या सार्वजनिक जीवनास प्रारंभ केला. १९६८ सालच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त साधना ट्रस्टतर्फे हमीदभाईंनी दिलेल्या व्याख्यानानंतर त्यांचा हमीदभाईंशी परिचय झाला. हमीदभाईंशी झालेल्या चर्चेत 'त्यांचे विचार कृतीत उतरवणे महत्त्वाचे आहे व त्यासाठी संघटना बांधण्याची गरज आहे' या विषयी विचार विनिमय झाला. 'आपल्या प्रश्नांचे उत्तर

म्हणजे हमीद दलवाई' अशी सय्यदभाईंची खात्री झाली आणि ते मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या जन्मकाळाचे साक्षीदार झाले. हमीद दलवाई झपाटून, वादळासारखे मुस्लीम प्रबोधनाचे क्रांतिकारक कार्य करीत असताना त्यांना साथ देणार्या, कार्यकर्त्यांमध्ये सय्यदभाईंचा समावेश होता. दलवाईंच्या आजारपणाच्या काळात सय्यदभाईंनी 'जिहाद-ए-तलाक' मोहीम सुरू केली आणि हाच विषय त्यांनी आयुष्यभर हाती घेतला. समुपदेशन आणि कायद्याचे मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्या काळात मुस्लीम महिला मदत केंद्राची स्थापना करण्यात आली. याच केंद्रामार्फत लोकशिक्षण आणि जनजागृतीचे कार्य करण्यास सुरुवात झाली. दुर्दैवाने मंडळाच्या स्थापनेनंतर सात वर्षांत दलवाई यांचे निधन झाले. या कसोटीच्या काळात हातावर मोजण्याइतक्या शिल्लक राहिलेल्या कार्यकर्त्यांमध्ये सय्यदभाई होते. मुंबईत मेहेरून्निसा दलवाई, पुण्यात सय्यदभाई, कोल्हापुरात हुसेन जमादार, श्रीगोंदा येथे बाबुमियाँ बँडवाले, अमरावतीत वजीर पटेल यांनी दलवाईंचे कार्य पुढे घेऊन जाण्याचा निर्धार केला. त्या-त्या भागातील कार्यकर्ते एकत्र येऊन मंडळाचे कार्य चालू राहिले. सय्यदभाईंनी 'एक सत्यशोधकी कार्यकर्ता' अशी ख्याती मिळविली असली, तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुअंगी आणि बहुगुणी होते.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने शहाबानोचा पुण्यात सत्कार घडवून आणला. शहाबानोची तत्कालीन पंतप्रधानांसोबत भेट घालून दिली. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या शिष्टमंडळाने तत्कालीन राष्ट्रपती, पंतप्रधान, कायदामंत्री आणि संसदेतील लोकप्रतिनिधी यांना निवेदन देऊन सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा कायम राहण्याबद्दल आग्रह केला. विविध राज्यांतील प्रागतिक मुस्लिमांनी मंडळाच्या या कार्याचे स्वागत व समर्थन केले. अशा समविचारी लोकांची परिषद आयोजित करून १९८६मध्ये ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्सची स्थापना केली गेली; विविध राज्यांमध्ये परिषदांचे आयोजन करण्यात आले. मध्य प्रदेश, गुजरात, ओरिसा, दिल्ली, उत्तर प्रदेश, कर्नाटक, गोवा, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये ऑल इंडिया प्रोग्रॅम मुस्लीम कॉन्फरन्सच्या वतीने परिषदांचे आयोजन करण्यात आले. या सर्व कामात सय्यदभाई यांचा पुढाकार होता.

सय्यदभाई यांच्या कार्याची दखल घेऊन विविध संघटनांनी आणि संस्थांनी त्यांना पुरस्कार देऊन गौरवले. सय्यदभाईंचे आत्मकथन 'दगडावरची पेरणी' प्रकाशित झाले. याला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. २०२०मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले.

५. हुसेन जमादार

(१ जून १९४५ – २२ ऑक्टोबर २०१५)

एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या हुसेन जमादार यांचे आयुष्य अत्यंत संघर्षमय राहिले आहे. बी. ए., बी. एड.पर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर हुसेन जमादार यांनी कोल्हापूर येथील वि. स. खांडेकर या विद्यालयात २२ वर्षे शिक्षक म्हणून नोकरी केली. विद्यार्थी दशेपासूनच त्यांना समाज कार्याची आवड होती.

हमीद दलवाई यांच्या भेटीनंतर ते दलवाईंच्या विचारांच्या प्रभावाखाली आले आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यात सहभाग घेतला. दलवाईंच्या समवेत कार्य करण्याचे भाग्य हुसेन जमादार यांना लाभले. जवळपास ४५ वर्षे मंडळाच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. १९७३मध्ये कोल्हापूर येथे हमीद दलवाई यांच्या उपस्थितीत आयोजित केलेल्या मुस्लीम शिक्षण परिषदेच्या आयोजनात त्यांचा मोठा वाटा होता. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' हे मुखपत्र प्रकाशित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या पत्रिकेची सुरुवात कोल्हापूर येथून झाली. त्याचे संपादक हुसेन जमादार होते. कालांतराने ही सत्यशोधक पत्रिका पुणे येथून प्रकाशित करण्यात येऊ लागली. तदनंतर हुसेन जमादार यांनी 'पुरोगामी मुस्लीम' या नावाचे नियतकालिक सुरू केले. हुसेन जमादार यांनी मुस्लीम समाज प्रबोधन व शिक्षण संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत तलाकपीडितांच्या मुलांचे वसतिगृह, तलाकपीडित महिला उद्योग, भाजी-भाकर केंद्र हे उपक्रम चालवले गेले.

१९८५-८६दरम्यान शहाबानो प्रकरण देशभर गाजत असताना तलाकच्या प्रश्नावर जनजागृती करण्यासाठी त्यांनी कोल्हापूर ते नागपूर असा तलाक मुक्ती मोर्चा काढला. याच काळात तत्कालीन राष्ट्रपती, पंतप्रधान, कायदामंत्री यांना भेटून निवेदन देण्यात आलेल्या मंडळाच्या शिष्टमंडळात त्यांचा समावेश होता. १९८६मध्ये 'ऑल इंडिया प्रॉग्रेसिव्ह मुस्लीम कॉन्फरन्स'च्या आयोजनात जमादार यांचा पुढाकार होता. हुसेन जमादारांच्या पुढाकाराने मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या मार्फत मोर्चे, शिबिरे, चर्चासत्रे आणि परिषदांचे आयोजन कोल्हापूर येथे करण्यात आले. १९९१मध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यांतील १२२ गावांतून ५००० मुस्लीम कुटुंबांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक संदर्भात पाहणी केली गेली. या पाहणी कार्यामध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचा सहभाग होता. हुसेन जमादार यांनी दक्षिण महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणूनही कार्य केले. न्या. राजेंद्र सच्चर यांच्या अहवालाचा संक्षिप्त अहवाल 'सच्चरका सच' ही पुस्तिका त्यांनी प्रकाशित केली आणि त्याच्या प्रचारार्थ कार्यक्रमांचे आयोजन केले.

१९९५ मध्ये चीनमधील बीजिंग येथे आयोजित करण्यात आलेल्या महिला परिषदेत त्यांनी सहभाग घेतला. हुसेन जमादार यांनी 'जिहाद' नावाचे आत्मचरित्र प्रकाशित केले. या आत्मचरित्रास अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

आयुष्याच्या उत्तरार्धात हमीद दलवाई यांच्या भूमिकेशी मतभेद व्यक्त करून हुसेन जमादार यांनी सलोखा भाईचारा मंच स्थापन केला होता. आयुष्याच्या उत्तरार्धात झालेल्या आंतरविरोधी मानसिकतेचे बळी ठरले आणि २२ ऑक्टोबर २०१५ रोजी त्यांनी आयुष्य संपवले.

६. वजीर पटेल

(६ ऑगस्ट १९४० – १४ डिसेंबर २०२१)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या आरंभकाळात दलवाईंना साथ देणार्या आणि निर्भीडपणे कार्यक्रम राबवणार्यांम प्रमुख कार्यकर्त्यांच्या यादीत शेख वजीर पटेल यांचे नाव वरच्या क्रमांकावर होते.

अमरावती जिल्ह्यातील आखतवाडा येथे ६ ऑगस्ट १९४० रोजी जन्मलेल्या शेख वजीर पटेल यांचे वृद्धापकाळ आणि आजारपणामुळे १४ डिसेंबर २०२१ रोजी, वयाच्या ८२व्या वर्षी निधन झाले.

हमीद दलवाईंचा 'धर्मयुग'मधील एक लेख वाचून वजीर पटेल भारावून गेले होते. या लेखाचा अद्भुत प्रभाव त्यांच्यावर पडला आणि हमीद दलवाईंना भेटण्याची तीव्र इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली. योगायोगाने त्याच दरम्यान हमीद दलवाई एका कार्यक्रमासाठी (१९६७मध्ये) अमरावतीला गेले असता वजीरभाईंची ओळख झाली. 'किमान एक तरी मुस्लीम तरुण भेटला' याचा दलवाईंना आनंद झाला. 'आगामी दोन-तीन महिन्यांत दलवाईंनी मुस्लीम युवकांच्या सभेत बोलावे' असे निमंत्रण वजीर पटेलांनी दिले. तसेच मुस्लीम तरुणांना संघटित करून 'यंग मुस्लीम सोशल असोसिएशन' ही संघटना उभारली. ही संघटना मुस्लिमांच्या धार्मिक विचारांना अनुसरून कार्य करेल, असे अमरावतीच्या मुस्लीम समाजाला वाटले आणि त्यांनी सहकार्य केले. मात्र हमीद दलवाई या तरुणांना मार्गदर्शन करण्यासाठी आले आणि इस्लामी चौकात त्यांनी जाहीर भाषण केले, तेव्हा स्थानिक मुस्लीम नेते चिडून उठले. शेख वजीर पटेल यांना विरोध होऊ लागला. तरुण मुले संघटना सोडून जात होती. जवळच्या कार्यकर्त्यांना धडकवण्यात येत होते. हर प्रकारे पटेलांना नाउमेद करण्याचे प्रयत्न केले जात होते. तिरस्काराने पाहणे, जवळून जाताना जोराने खाकरून थुंकणे, अवमान होईल असे वर्तन आणि अभद्र शिवीगाळ करण्यापर्यंत मजल गेली होती. 'ज्या मुस्लीम समाजात राहायचे तोच समाज आपल्या विरुद्ध जाऊन अपमानास्पद वागणूक देत आहे' या अबघडलेल्या वातावरणातून मार्ग काढण्यासाठी आणि मुस्लीम समाजाची मर्जी राखण्यासाठी वजीर पटेलांनी सरळ नागपूरच्या दैनिक तरुण भारतमध्ये दलवाईंच्या विरोधात लेख लिहिला. या लेखात अगदी विरोधक करतात, त्याच पद्धतीचे खोटे आरोप केले होते. 'हमीद दलवाई यांच्या सभेत फक्त हिंदू असतात, दलवाई हिंदूंच्याच सभेत जातात, मुस्लीम समाजात मिसळत नाहीत, वगैरे'. हा लेख वाचून हमीदभाई दुखावले होते. तसेच नंतर वजीर पटेल यांनाही अपराधीपणाची जाणीव सलत होती. 'दलवाईंवर आपण अन्याय केला' ही भावना त्यांना अस्वस्थ करीत होती. या गोष्टीचा त्यांना पश्चात्ताप होत होता. त्यानंतर पटेलांचा स्वाभिमान जागा झाला आणि त्यांनी दलवाईंना पत्र लिहून केलेल्या खोट्या आरोपांबद्दल दिलगिरी व्यक्त करून क्षमाही मागितली. राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता आणि मुस्लीम समाजाच्या प्रबोधनासाठी दलवाईंच्या विचारांची गरज असल्याचे सांगून ते दलवाईंसोबत काम करणार असल्याचे त्यांनी दलवाईंना कळवले. मग दलवाईंनीही पटेलांना पत्र लिहून त्यांना आपलेसे केले. त्यानंतर हमीद दलवाई-वजीर पटेल अधिक जवळ आले. दलवाई यांच्या नेतृत्वाखाली मुस्लीम

सत्यशोधक मंडळाने आयोजित केलेल्या दिल्ली, मुंबई, पुणे, कोल्हापूर इत्यादी परिषदांमध्ये पटेलांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि अमरावतीला जोमाने काम सुरु केले. पुण्यात आयोजित केलेल्या मुस्लीम महिला परिषदेत २१ मुस्लीम महिलांना घेऊन ते आले होते. धर्मवाद्यांचा प्रचंड प्रभाव असलेल्या विदर्भातून मुस्लीम महिला या परिषदेत आल्याचे पाहून दलवाईंना आश्चर्य वाटले होते आणि आनंदही वाटला होता.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापना काळात मुस्लीम महिलांच्या समस्या, समान नागरी कायदा, धर्मवादी राजकारण, मराठी माध्यमातून आधुनिक शिक्षण, लोकसंख्या नियंत्रण आणि आधुनिकता हे विषय प्राधान्याने हाताळले गेले. 'मुस्लीम समाजाने कुटुंब नियोजनाच्या राष्ट्रीय मोहिमेत बरोबरीने सहभागी व्हावे' हा दलवाई यांनी सांगितलेला विचार वजीर पटेलांनी जास्त उचलून धरला आणि त्यासाठी झपाटून कार्य केले.

वयाच्या ३२व्या वर्षी, १९७२मध्ये वजीर पटेलांनी १७ मुस्लीम बांधवांसह स्वत:वर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करून घेतली. या घटनेनंतर दर वर्षी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने कुटुंब नियोजन शिबिरे आयोजित करण्यात येऊ लागली. अशा शिबिरांच्या वेळी शहरातील मुल्ला-मौलवी एकत्र येऊन, मोहल्ल्यात फिरून 'कुटुंब नियोजन इस्लामविरुद्ध आहे आणि कुटुंब नियोजन करून अल्लाहच्या नियमांचा भंग करू नये' असे जमातला सांगत. कुटुंब नियोजनाच्या या शिबिरात मुस्लिमांनी सहभागी होऊ नये यासाठी प्रयत्न व प्रतिबंध केले जात. असे असतानाही वजीर पटेलांनी कुटुंब नियोजनाची अनेक शिबिरे यशस्वी केली. विरोधास न जुमानता सहकारी व कार्यकर्ते यांच्यासह लोकसंख्या नियंत्रणाबद्दल त्यांनी केवळ लोकशिक्षण केले नाही, तर हा विषय मुस्लीम समाजात लोकप्रिय केला.

'दोननंतर विनंती आणि तीननंतर सक्ती' ही महाराष्ट्राची कुटुंब नियोजनविषयक नवी भूमिका जाहीर झाली, तेव्हा मुस्लीम समाजात नाराजीची प्रतिक्रिया उमटली. या काळात हमीदभाई अमेरिकेत होते. 'त्यांची याबाबत काय भूमिका असेल' याची वाट न पाहता शासनाच्या भूमिकेचे मंडळाने स्वागत केले आणि पाठिंबा जाहीर केला. या घटनेचा दलवाईंना आनंद झाला आणि 'वजीर पटेलांनी अधिक जोमाने काम करावे' असा सल्ला दिला. ९ ऑगस्ट १९७६ रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने अमरावती येथे एक भव्य कुटुंब नियोजन शिबिर जिल्हा परिषदेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. यात १४६ मुस्लिमांनी स्वखुशीने शस्त्रक्रिया करून घेतल्या. तेव्हाचे महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री के. एम. बापू पाटील यांनी श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचे उद्घाटन केले होते. या कार्यक्रमाची वर्तमानपत्रांनी तर दखल घेतलीच; शिवाय दूरदर्शनवरून चित्रफीत पुन्हा पुन्हा दाखवण्यात आली आणि चित्रपटगृहातही न्यूजरील दाखवण्यात येत होती. हमीद दलवाई यांना हा कार्यक्रम फार आवडला. त्यांनी पंधरा दिवसांतच ना. शरद पवार यांच्या बंगल्यावर मंडळाच्या कार्यकर्त्यांची बैठक बोलवली आणि अमरावतीप्रमाणे मंडळाच्या इतर शाखांनी कुटुंब नियोजन शिबिरे आयोजित करून मुस्लिमांना अधिक प्रमाणात या राष्ट्रीय मोहिमेत सामील करण्याचे आवाहन केले. हमीद दलवाई यांची प्रकृती चांगली नसतानाही त्यांनी सांगितले होते की, 'ज्या ठिकाणी ५० मुस्लिमांचे नसबंदी

शिबिर आयोजित कराल त्या शिबिराच्या उद्घाटनासाठी मी स्वत: येणार.' वजीर पटेलांनी हे मनावर घेतले आणि स्थानिक कार्यकर्त्यांशी चर्चा करून आठच दिवसांत, म्हणजे ६ नोव्हेंबर १९७६ रोजी ५० मुस्लिमांचे नसबंदी शिबिर आयोजित केले. तसे हमीद दलवाईंना कळवले आणि दलवाईंनी हे निमंत्रण स्वीकारले! दलवाईंचे दीर्घ काळानंतर दर्शन आणि भेट होणार म्हणून अमरावतीच्या कार्यकर्त्यांना आनंद झाला. ते उत्साहाने आणि जोमाने कामाला लागले. ठरल्याप्रमाणे हमीदभाई ६ नोव्हेंबर रोजी अमरावतीत दाखल झाले. ते दिवसभर शिबिरात थांबले. त्यांच्या उपस्थितीत ५० मुस्लिमांनी रांगा लावून नसबंदी शस्त्रक्रिया करून घेतल्या. नसबंदीसाठी मुस्लीम बांधवांत लागलेली ही स्पर्धा पाहून दलवाईंना आनंद झाला. या शिबिराच्या समारोपप्रसंगी दलवाईंनी उपस्थितांना एक तास उर्दू भाषेत मार्गदर्शन केले. कार्यकर्ते 'हमीद दलवाई जिंदाबाद!'चे नारे देत होते.

ऑक्टोबर १९७६ ते फेब्रुवारी १९७७दरम्यान अमरावती शाखेच्या वतीने वजीर पटेल यांच्या नेतृत्वाखाली आयोजित नसबंदी शिबिरात पाचशेहून अधिक मुस्लिमांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतली होती. १९ फेब्रुवारीनंतर पुढील शिबिर १५ मार्च रोजी आयोजित करण्यात येत असल्याचे पटेलांनी दलवाईंना कळवले. मात्र निवडणूक काळात हे शिबिर आयोजित न करण्याचा सल्ला दलवाईंनी दिला. 'आपला कार्यक्रम लवचीक असावा, प्रतिकूल परिस्थितीत आपण थांबले पाहिजे आणि ती सुधारली की जोमाने काम करावे' असे दलवाईंना वाटत होते. या निवडणुकीतील जनता पार्टीच्या विजयाबद्दल दलवाईंना आनंद झाला होता. मात्र 'कुटुंब नियोजनविषयक धोरणाचे काय होणार' ही काळजी वाटत होती. कुटुंब नियोजन मोहीम यशस्वी करण्यासाठी कायदा आवश्यक होता. त्याशिवाय जातीयवादी मंडळी सहभागी यात होणार नाहीत, तसेच याविरुद्ध अपप्रचार थांबवणार नाहीत, हे दलवाई जाणून होते. 'प्रबोधन केवळ जाणीव जागृतीने होत नसते, तर त्याला कायद्याचे पाठबळ आवश्यक असते' असे ते मानत. प्रबोधनाच्या सर्व क्षेत्रांत हेच सत्य आजही आहे.

वजीर पटेलांनी त्यांच्या कार्यकाळात मुस्लीम समाजातील पाच हजारांहून अधिक स्त्री-पुरुषांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्या. आजमितीस मुस्लीम समाजाचा जन्मदर कमी झाला आहे, मुस्लीम समाजात कुटुंब नियोजन करणाऱ्यांची संख्या वाढत आहे, लोकसंख्या नियंत्रणाचा विषय आटोक्यात आला आहे, असे अभ्यासक नोंदवतात. याचे श्रेय अनेकांना देता येईल... यांत हमीद दलवाई, मुस्लीम सत्यशोधक आणि त्यातही शेख वजीर पटेल यांचा वाटा मोठा आहे.

१९७८मध्ये, हमीद दलवाईंच्या प्रथम स्मृतिदिनी अनेक ठिकाणी विविध कार्यक्रम झाले. अमरावतीत वजीर पटेल यांच्या नेतृत्वाखाली 'तलाकपीडित मुस्लीम महिला परिषद' आयोजित करण्यात आली. यात सुमारे सातशे महिला उपस्थित होत्या.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पहिल्या दशकात वजीरभाईंनी अमरावतीत केलेले कार्य रचनात्मक तसेच कल्याणकारी होते. मुस्लिमांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि तो समाज आत्मनिर्भर व्हावा, ही त्यांची तळमळ होती. नसबंदी शस्त्रक्रिया, महिला परिषद, याशिवाय जवळपास ५०० गरीब आणि गरजूंना बँकेतून कर्जे मिळवून देणे, गोरगरिबांना आजारपणात

औषधे व आर्थिक मदत करणे, मराठवाड्यातील दंगलपीडितांसाठी आर्थिक मदत करणे, बांग्लादेश निर्वासितांसाठी एक दिवस उपास करून जमवलेली रक्कम अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपुर्द करणे, तलाकपीडित महिलांना पोटगी मिळावी म्हणून दावे दाखल करणे, लहान मुलांमध्ये वाचनसंस्कृती वाढावी यासाठी बालक मंदिर सुरू करणे, जातीय दंगली झालेल्या ठिकाणी जाऊन धार्मिक सलोखा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे... अशा कामांत वजीर पटेल व अझीझ बारी कायम आघाडीवर असत. समाज प्रबोधनासाठी त्यांनी जसे ग्रंथालय चालवले, तसेच लोकशिक्षणासाठी 'बागबान' हे उर्दू साप्ताहिक सुरू केले.

या दोघांना जात्यंध मुस्लिमांनी अनेक वेळा जीवे मारण्याची धमकी दिली होती व तसे प्रयत्नही केले होते. एका प्रसंगी पटेलांवर तलवारीने हल्ला करण्यात आला. ही तलवार हातावर झेलली गेली, म्हणून ते वाचले. या काळात त्यांना मुंबई येथील बाँबे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस संरक्षणही देण्यात आले होते.

१९८५-८६मध्ये शहाबानो प्रकरणादरम्यान मुस्लीम जमातवादी राजकारण उग्र झाले. सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा रद्द करण्याची मागणी वाढत असताना मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या शिष्टमंडळाने तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी, राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग आणि इतर केंद्रीय मंत्र्याच्या भेटी घेतल्या; निवेदन दिले; उपोषण, मेळावे घेतले. यांत शेख वजीर पटेल सक्रिय होते. कोल्हापूर-नागपूर असा तलाक मुक्ती मोर्चा अमरावतीत दाखल होताच त्यांनी या मुक्ती मोर्चाचे स्वागत केले.

समाज सुधारक वजीर पटेल यांच्या कार्याची दखल घेऊन अनेक संस्थांनी त्यांचा गौरव केला. यांत प्रामुख्याने महाराष्ट्र फाउंडेशनने २००३मध्ये त्यांना पुरस्काराने सन्मानित केले. तसेच इंटरनॅशनल रोटरी क्लबतर्फे 'रोटरी इंडिया पुरस्कार' दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. या वेळी भारताचे तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती वेंकटचलैय्या यांच्या हस्ते त्यांना एक लाख रुपयांचे रोटरी पारितोषिक देण्यात आले होते. तिवसा तालुक्यातील आखतवाडा या खेड्यातील एका तरुणाचा हा सन्मान ऐतिहासिक होता.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या ध्येय-उद्दिष्टांना अनुसरून मंडळाच्या स्थापनेनंतर वजीरभाईंनी दोन दशके झपाटून कार्य केले. हमीद दलवाईंना अशा कार्यकर्त्यांना मोठा आधार होता. त्यातून कामासाठी लागणारी निर्भयता कार्यकर्त्यांना मिळत होती. हमीद दलवाई यांच्या अकाली निधनाने मंडळासमोर अनेक आव्हाने उभी होती. या वेळी हमीद दलवाई यांच्या कार्यावर प्रेम करणारे मित्र, विचारवंत, साहित्यिक, कलाकार, पत्रकार मंडळासोबत उभे राहिले आणि त्यांनी विविध पद्धतींनी मुस्लीम सत्यशोधकांस बळ दिले. मात्र नंतरच्या काळात काही मतभेदांमुळे, काहींनी विचार परिवर्तनामुळे, खाजगी कारणांमुळे, व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा किंवा कंटाळून मंडळापासून दूर जाणे पसंत केले. यामुळे चळवळीचे मोठे नुकसान झाले. या दूर गेलेल्या आघाडीच्या कार्यकर्त्यांत वजीरभाईंचाही समावेश होता, हे दुःखाने सांगावे लागते. मात्र असे असले, तरी मंडळाच्या आरंभकाळी आणि त्यानंतरच्या जवळपास दोन दशकांत त्यांनी दिलेले योगदान मंडळाच्या इतिहासातून कधीही पुसले जाणार नाही. विशेषतः कुटुंब नियोजनाच्या प्रश्नावरील त्यांचे कार्य आजही तेवढेच महत्त्वाचे आहे.

७. मुमताज रहिमतपुरे

(२८ मे १९४४ – ३ ऑक्टोबर १९८६)

हमीद दलवाई यांच्या हयात काळातच त्यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यात सहभाग घेतला. मुस्लीम महिलांच्या परिषदा, तलाक मुक्ती मोर्चा यांत त्यांचा सहभाग होताच. याशिवाय तलाकपीडित महिलांच्या दिल्ली येथे शहाबानो प्रकरणी नेण्यात आलेल्या शिष्टमंडळात त्यांचा समावेश होता. राष्ट्रपती आणि तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी, नजमा हेपतुल्ला यांना भेटलेल्या महिलांचे त्यांनी नेतृत्व केले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याध्यक्ष म्हणूनही त्यांनी पदभार सांभाळला. तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, पोटगी या संदर्भात मंडळाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या अग्रभागी होत्या. तसेच या विषयांवर परखडपणे व्याख्यानेही देत होत्या. मुस्लीम महिला म्हणून त्यांचे एकूणच व्यक्तिमत्त्व प्रबोधनकारी होते. अतिशय धाडसाने आणि तळमळीने त्यांनी मंडळाचे कार्य केले.

३ ऑक्टोबर १९८६ला अचानक एका अपघातात रहिमतपुरे यांचा मृत्यू झाला. सायंकाळी दफनविधी करण्याचा निर्णय घेतला गेला. परंतु काही कारणास्तव ४ ऑक्टोबरला जनाजा निघाला. 'शेतकरी कामगार पक्षा'चे ज्येष्ठ नेते प्रा. एन. डी. पाटील आणि हजारभर विद्यार्थी अंत्ययात्रेत सामील होते. सर्वधर्म समभाव मानणाऱ्या लोकांची रहिमतपुरेंच्या अंत्ययात्रेत गर्दी होती. अंत्ययात्रा बागल चौकातील मुस्लिमांच्या दफनभूमीकडे गेली. दरम्यान काही कर्मठ मुस्लिमांनी इतरांना चिथावले होते. 'मुस्लीम सत्यशोधक समाजाला बळ मिळेल अशा प्रकारचं लेखन करणाऱ्या बाईला मुस्लिमांच्या दफनभूमीत जागा का म्हणून द्यायची? आणि मुस्लीम धर्मानुसार तिच्यावर अंत्यसंस्कार तरी का करू द्यायचे?' काही डोकी भडकली. जनाजा दफनभूमीपासून काही अंतरावर रोखण्यात आला... वातावरण तणावग्रस्त बनले... ही स्थिती खूप काळ कायम होती. अखेर मुस्लीम समाजातील समंजस व्यक्तींनी योग्य भूमिका घेतली. मुमताज रहिमतपुरेंना मुस्लीम दफनभूमीत अंत्यसंस्कारासाठी जागा मिळाली. परंतु स्थानिक मौलानांनी नमाज-ए-जनाजा (मृतकासाठी असलेली नमाज) पठण करण्यास नकार दिला. त्यामुळे हुसेन जमादार यांनीच नमाज-ए-जनाजाची इमामत केली, तणाव निवळला. प्रबोधनाची आणि सर्वधर्म समभावाची परंपरा असलेल्या कोल्हापूरची इज्जत बुलंद राहिली. तथापि 'कब्रस्तान नगर पालिकेच्या अखत्यारीत असताना धर्मवादी लोकांनी अंत्यविधी संदर्भामध्ये आपली हुकूमशाही चालवणे' या संदर्भात चर्चा होऊन 'नगरपालिकेने ठोस नियम करावेत' अशी मागणी करण्यात आली.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने हमीद दलवाई यांच्या नावाने १९८९मध्ये सुरू केलेला प्रथम पुरस्कार प्रा. मुमताज रहिमतपुरे यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला.

८. ॲड. अब्दुल शेख

(१० डिसेंबर १९४९ – १९ सप्टेंबर १९८८)

ॲड. अब्दुल हैदरभाई शेख हे हमीद दलवाईंच्या काळात संगमनेर, जिल्हा अहमदनगर येथील कार्यकर्ते होते. दलवाईंच्या नंतरही मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या विविध कार्यक्रमांत ते आघाडीवर होते. १९ सप्टेंबर १९८८ रोजी त्यांचे अनपेक्षित, आकस्मित अपघाती निधन झाले. ॲड. अब्दुल शेख हे दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते असल्याकारणाने त्यांना संगमनेर येथील मुस्लीम बांधवांनी कब्रस्तानात दफन करण्यास विरोध केला होता. ॲड. अब्दुल शेख यांचे प्रेत शेवटी त्यांच्या गावी, निम्हण येथे नेऊन त्यांच्या शेतात दफन करावे लागले. डाव्या चळवळीत लोकप्रिय असणारे अब्दुल शेख हे वेगवेगळ्या संघटनांशी संबंधित होते. मुस्लीम सत्यशोधकबरोबरच राष्ट्र सेवा दल, छात्र भारती, बिडी मजदूर युनियन आणि शेतकरी संघटना यांमध्ये त्यांचा सहभाग होता. वकिलीचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांनी संगमनेर येथील प्रसिद्ध ॲड. नानासाहेब दुर्वे यांचा आदर्श समोर ठेवून वकिलीत प्रवेश केला आणि नानासाहेब दुर्वे यांच्याकडेच ज्युनियर म्हणून काम केले.

अहमदनगर जिल्ह्यातील शेतकरी संघटनेचे ३००० शेतकरी कर्जमुक्ती आंदोलनाचे नादारीचे अर्ज न्यायालयात दाखल करण्यासाठी जमले होते, परंतु तेथील वकील मंडळी त्यांना योग्य सल्ला देत नव्हती. जिल्ह्यातील एकही वकील वकीलपत्राबर सही करण्यास राजी नव्हता, कारण त्यातून त्यांना कोणतीही फी मिळणार नव्हती. वास्तविक, ७००० अर्ज होते आणि ३००० शेतकरी उपस्थित होते. न्यायाधीशांच्या सूचनेनुसार अर्ज दाखल करणारा प्रत्यक्ष हजर असणे गरजेचे होते. या अडचणीतून अब्दुल शेख यांनीच मार्ग काढला. त्यांनी सर्व अर्जांवर वकील म्हणून सह्या केल्या आणि 'स्वतः शेतकरी उपस्थित नसले, तरी त्यांचा वकील अर्ज दाखल करू शकतो' हे न्यायाधीशांना भेटून पटवून दिले आणि न्यायाधीशांनी ते मान्यदेखील केले. शेतकरी संघटनेच्या महत्त्वाच्या आंदोलनात उपस्थित झालेल्या पेचप्रसंगातून ॲड. अब्दुल शेख यांनी मार्ग काढला आणि या प्रसंगातून सुटका केली. यातून एक धाडसी, जिद्दी, चिकाटी असलेले आणि सामाजिक भान ठेवणारे वकील म्हणून त्यांची प्रतिमा तयार झाली. अकोला आणि संगमनेर या तालुक्यांतील अनेक शेतकऱ्यांशी त्यांचा जवळचा संबंध होता.

अब्दुल शेख यांचा विवाह रुबिया सोबत ठरला. लग्नाच्या वेळी अब्दुल शेख यांनी 'आपली पत्नी शेजारी अथवा समोर, खुर्चीवर बसलेली असावी' अशी इच्छा व्यक्त केली. मात्र 'मुस्लीम प्रथा–परंपरेनुसार नववधूला सोबत बसवून निकाह लावला जात नाही' असे काझी आणि उपस्थित लोकांनी सांगितले. मात्र अब्दुल शेख यांचा हट्ट आणि आग्रह लक्षात घेऊन शेवटी काझीने हा निकाह गोंधळात लावला. जे योग्य आणि बरोबर असते, त्याचा हट्ट धरणारे अब्दुल शेख त्यांच्या वर्तनामुळे समाजात बदनाम झाले होते. लोकांनी त्यांच्याबद्दल गैरसमज पसरवून त्यांना अधिक बदनाम केले होते.

कोल्हापूरच्या मुमताज रहिमतपुरे यांचे प्रेत दफन करण्यास समाजाने विरोध केला होता व हे

प्रकरण गाजले होते. त्याच दिवशी अब्दुल शेख यांनी संगमनेरमध्ये निषेधाचे फलक लिहिले आणि त्याच दिवशी त्यांनी आपल्या पत्नीला सांगितले की, ''असे प्रकरण होत राहणार. यातून मार्ग काढला पाहिजे. असे आपल्यासोबतही होऊ शकते.'' त्याच रात्री आपण देहदान करण्याचा निर्णयही घेतला होता. ते पत्नीला म्हणाले, "रुबी, जिवंत असेपर्यंत करता येईल तेवढे करावे, पण मेल्यावरसुद्धा आपला उपयोग समाजाला व्हावा." या पतीपत्नींनी एकमेकांच्या हातात हात घेऊन ठरवले होते की आधी जो मरेल त्याच्या जोडीदाराने शरीर दफन न करता एखाद्या मेडिकल कॉलेजला देहदान करून टाकावे. मृत्यूनंतर नेत्रदान, किडनीदान, देहदान करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती... परंतु अपघाती निधनामुळे आणि त्यानंतर झालेला विलंब आणि विरोध यांमुळे देहदानाची इच्छा त्यांना पूर्ण करता आली नाही.

तलाकपीडित महिलांसाठी त्यांनी अनेक न्यायालयीन खटले चालवले. एका तलाकच्या केसमध्ये त्यांनी भूमिका घेतली की, 'झालेला तोंडी तलाक इस्लामच्या तत्वाप्रमाणे झालेला नाही. एकाच वेळी तीन तलाक उच्चारणे, म्हणजेच तलाक-ए-बिद्दत वापरू नये, असा इस्लामचा आदेश आहे. एक-एक महिन्याच्या अंतराने तलाक उच्चारून समझौता करण्याचा प्रयत्न करावा आणि तलाक देणे अनिवार्य झाल्यास तलाक-ए-सुन्नतचाच वापर करावा, असा इस्लामचा आदेश आहे.' 'तलाक-ए-बिद्दत इस्लाम कायद्याप्रमाणे नाही व तो रद्द झाला पाहिजे' अशीही मागणी त्यांनी न्यायालयात केली आणि न्यायालयाची खात्री पटविण्यासाठी कुराणमधील दाखलेही दिले. या केसमधील नवऱ्याच्या बाजूचे वकील ॲड. बेग हेही मुसलमान होते. त्यांनी ॲड. शेख यांचे म्हणणे मान्य केले. मात्र 'तलाक-ए-बिद्दत ही तरतूद मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात असल्यामुळे तो वापरणे चूक नाही' असा युक्तिवादही त्यांनी मांडला. या दिवाणी स्वरूपाच्या दाव्यात संगमनेर न्यायालयात ॲड. शेख यांनी 'मुस्लीम धर्मिनीच्या नवऱ्याने दुसरे लग्न करू नये' असा मनाई हुकूम मिळवला होता. शहाबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केलेल्या पोटगीच्या अधिकाराचा पुरस्कार ॲड. शेख यांनी केला होता. त्यांनी घेतलेल्या अशा भूमिकांमुळेही मुस्लीम समाज त्यांच्या विरोधात होता. अब्दुल शेख यांचे प्रेत स्थानिक कब्रस्तानात दफन करण्यास केलेला विरोध समजून घेण्यासाठी आणि लोकांशी संवाद करण्यासाठी ३ नोव्हेंबर १९८८ रोजी श्रीमती मेहेरून्निसा दलवाई, हुसेन जमादार आणि सय्यदभाई यांनी संगमनेरला जाऊन संवाद केला. विविध संस्थांच्या कार्यकर्त्यांनी अब्दुल शेख यांच्या कुटुंबाच्या मदतीसाठी एक लाखाचा निधी उभारण्याचा संकल्प केला. मुस्लीम सत्यशोधक मंडळाने त्या निधीत पाच हजार रुपयांची धर घातली.

ॲड. शेख यांच्या प्रेतास दफन करण्यास परवानगी नाकारून संगमनेरमधील मुस्लिमांनी मुस्लीम प्रबोधन चळवळीत काम करणाऱ्या मंडळींना दहशत बसविण्यासाठी अवलंबिलेल्या मार्गाची दखल शासनाने घ्यावी म्हणून महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांची मंत्रालयात भेट घेऊन १७ नोव्हेंबर १९८८ रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने 'महाराष्ट्रातील कब्रस्तान मुस्लीम विश्वस्तांच्या ताब्यातून काढून घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ताब्यात द्यावीत' अशी मागणी केली. त्या संदर्भात कायदेविषयक मागणी घेऊन योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते.

९. प्रा. अ. भि. शहा

(२ सप्टेंबर १९२० – ११ ऑक्टोबर १९८१)

ज्येष्ठ बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंत प्रा. अ. भि. शहा हे इस्लामचे गाढे अभ्यासक होते. हमीद दलवाई आणि प्रा. अ. भि. शहा यांची मैत्री वैचारिक बांधिलकीतून निर्माण झाली. १९६८मध्ये शहा आणि दलवाई यांच्या पुढाकारातून इंडियन सेक्युलर सोसायटीची स्थापना झाली. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेनंतर या दोन संस्थांच्या वतीने अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. दलवाईंच्या मृत्यूनंतरही शहांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळास मोठ्या प्रमाणात पाठबळ दिले.

डॉ. शहा यांचा जन्म २ सप्टेंबर १९२०मध्ये गुजरातमध्ये झाला. मॅट्रिकच्या परीक्षेत ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. पुण्यातील एस. पी. कॉलेजमध्ये त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले. गणित विषयामध्ये एम. एस्सी.च्या दोन पदव्या त्यांनी मिळविल्या. १९४५मध्ये डॉ. शहा यांनी एस. पी. कॉलेजमध्येच अध्यापनास सुरुवात केली. पुण्यातील फर्ग्युसन कॉलेज व जळगाव कॉलेजमध्येही त्यांनी अध्यापनाचे काम केले. १९५५मध्ये मुंबईच्या एस. आई. इ. एस. कॉलेजचे पहिले प्राचार्य म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९६२मध्ये 'काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडम' या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या आशिया विभागाचे ते संचालक झाले. तसेच याच सुमारास कै. जयप्रकाश नारायण यांच्या 'इंटरनॅशनल कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम' या संस्थेच्या 'क्वेस्ट' या नियकालिकाचे संपादक म्हणून डॉ. शहा यांनी काम पाहण्यास सुरुवात केली.

१९६८मध्ये इंडियन सेक्युलर सोसायटी या संस्थेच्या उभारणीमध्ये आणि १९७०मध्ये मुस्लीम सत्यशोधक चळवळीमध्ये डॉ. शहा व हमीद दलवाई यांनी संयुक्त पुढाकार घेऊन या चळवळींना तात्त्विक बैठक व दिशा दिली. ते इंडियन सोसायटीचे अध्यक्षही होते. प्रसिद्ध विचारवंत एम. एन. रॉय यांच्या विचारांचा प्रभाव डॉ. शहा यांच्यावर होता. रॉय यांच्या रॅडिकल ह्युमॅनिस्ट असोसिएशनचे ते सदस्यही होते. सामाजिक समतेसाठी झालेल्या चळवळींमध्ये त्यांनी सक्रिय भाग घेतला.

आणीबाणीच्या काळात व त्यानंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये डॉ. शहा यांनी लोकशाहीचा व विचारस्वातंत्र्याचा हिरिरीने पुरस्कार केला. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्रभर दौरा करून अनेक लहान-मोठ्या सभांमध्ये भाषणे केली आणि लेख लिहिले. जयप्रकाश नारायण यांनी आणीबाणीच्या काळात तुरुंगामध्ये लिहिलेली डायरी प्रसिद्ध करण्यातही त्यांचा पुढाकार होता.

आणीबाणीच्या काळात 'क्वेस्ट'मध्ये सेन्सॉरशिपवर संपादकीय लेख लिहिल्याबद्दल या नियतकालिकाच्या प्रकाशनाला बंदी घालण्यात आली. त्यानंतर डॉ. शहा पुण्यातील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन या संस्थेमध्ये मानद प्राध्यापक म्हणून काम पाहू लागले. वाईच्या प्राज्ञ पाठशाळेची 'इन्स्टिट्यूट फॉर स्टडी ऑफ इंडियन ट्रॅडिशन्स' ही संस्था पुण्यात १९७९ साली स्थापन झाली. या संस्थेच्या संचालकपदी डॉ. शहा अखेरपर्यंत होते. १९७६ ते १९८१ या

काळात 'न्यू क्वेस्ट' व 'द सेक्युलॅरिस्ट' या नियतकालिकांचे संपादकपदही त्यांनी सांभाळले.

शिक्षण, नियोजन व धर्म या विषयांवर डॉ. शहा यांनी पुस्तक रूपाने व संकीर्ण विपुल लेखन केले. त्यांपैकी 'सायंटिफिक मेथड', 'रिलिजन अँड सोसायटी इन इंडिया', 'प्लॅनिंग अँड डेमोक्रसी', 'ट्रॅडिशन अँड मॉडर्निटी', 'चॅलेंजेस टू सेक्युलॅरिझम' ही त्यांनी लिहिलेली व संपादित केलेली पुस्तके अतिशय गाजली. 'एनकाऊंटर' या जागतिक कीर्तीच्या नियतकालिकामध्ये त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. तसेच या विषयांवरील अनेक परिसंवादांमध्ये व चर्चासत्रांमध्ये प्रमुख वक्ते म्हणून त्यांनी भाग घेतला. 'सेक्युलॅरिझम इन इंडिया' हे त्यांनी लिहिलेले शेवटचे पुस्तक आहे.

११ ऑक्टोबर १९८१ रोजी अ. भि. शहांचे निधन झाले. पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीमध्ये त्यांच्या इच्छेनुसार या प्रसंगी कोणतेही धार्मिक विधी करण्यात आले नाहीत, तसेच भाषणेही झाली नाहीत. डॉ. शहा यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पुण्यात १६ ऑक्टोबर १९८१ रोजी शोकसभेचे आयोजन करण्यात आले. या वेळी 'धर्मांतर आणि दलितांच्या समस्या' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. (सकाळ, १२ ऑक्टोबर १९८१)

१०. प्रा. असफ अली असगर फैजी

(१० एप्रिल १८९९ – २३ ऑक्टोबर १९८१)



मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या आरंभीच्या काळात हमीद दलवाई यांच्या प्रबोधन कार्यास समर्थपणे साथ देणाऱ्या मान्यवर विचारवंतांमध्ये असफ अली असगर फैजी यांचे नाव अग्रभागी येते.

प्रा. फैजी इस्लामी धर्मशास्त्र, इतिहास, न्यायशास्त्र इत्यादींचे प्रकांड पंडित होते. 'पौर्वात्य विद्यांचा एक व्यासंगी विद्वान' असाही त्यांचा लौकिक होता. लॉ कॉलेजच्या प्राचार्यपदापासून जम्मू-काश्मीर विद्यापीठाच्या कुलगुरू पदापर्यंत व पुढे इजिप्त, लॅबेनॉन अशा देशांतील भारताचे राजदूत म्हणून अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषविली. भारत सरकारने पद्मभूषण किताब देऊन त्यांच्या विद्वत्तेवर राज्यमान्यतेचे शिक्कामोर्तबही केले. या सर्व गोष्टी महत्त्वाच्या तर खऱ्याच, पण प्राध्यापक फैजी यांनी मुस्लीम समाजातील प्रबोधनाच्या चळवळीला दिलेला नि:संदिग्ध पाठिंबा, हे त्यांच्या जीवनातील सर्वांत महत्त्वाचे कार्य समजले पाहिजे. मुस्लीम समाजातील प्रबोधनाच्या चळवळीत कार्य करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना त्यांच्यापासून निश्चितच प्रेरणा मिळेल.

इतर अनेक मुस्लीम विद्वानांप्रमाणे प्रा. फैजी यांचे हमीद दलवाई व त्यांच्या चळवळीविषयी सुरुवातीला गैरसमज होते. इतर मुस्लीम विद्वानांनी हे गैरसमज सतत कवटाळून बसण्यात धन्यता मानली. पण प्रा. फैजी यांच्यापाशी दुसऱ्याचे विचार समजून घेण्याचा दुर्मीळ गुण होता. त्यामुळेच ते आणि दलवाई जवळ येऊ शकले. त्यांची आणि दलवाईंची एकदा प्रवासात योगायोगाने गाठ पडली. त्या वेळी झालेल्या चर्चेतून व विचारांच्या परस्पर देवाण-घेवाणीतून ते या चळवळीचे पुरस्कर्ते बनले.

महिला परिषदेत सहभाग

दलवाईंनी डिसेंबर १९७१मध्ये पुण्याला, इस्लामी इतिहासातील पहिलीवहिली मुस्लीम महिला परिषद घेतली. या परिषदेचे उद्घाटन प्रा. फैजी यांच्या हस्ते झाले होते. विशेष म्हणजे, या प्रसंगी ते आपल्या पत्नीसह उपस्थित होते व दोघांनीही परिषदेला मार्गदर्शन केले. या प्रसंगी बोलताना त्यांनी केलेली इस्लामी धर्मशास्त्राची व शरीयतची ऐतिहासिक चिकित्सा जितकी परखड, तितकीच उद्बोधक होती. पुढे १९७३मध्ये मुंबईस मराठा मंदिर सभागृहात झालेल्या मुस्लीम सामाजिक परिषदेत त्यांनी प्रमुख पाहुणे म्हणून सक्रिय भाग घेतला. या वेळी बोलताना, "शरीयत एक ढकोलचा (चैतन्यहीन सांगाडा) बनके रह गई है" अशी त्यांनी शरीयतची संभावना केली होती. इस्लामी न्यायशास्त्राच्या अभ्यासकाला त्यांच्या या उद्गारातील यथार्थता कळण्यास वेळ लागणार नाही.

प्रा. फैजीसारखा इस्लामी न्यायशास्त्राचा व्यासंगी विचारवंत व या विषयावर अधिकारवाणीने बोलू व लिहू शकणारा खंदा लेखक व वक्ता मुस्लीम समाजातील प्रबोधनाच्या चळवळीचा पुरस्कर्ता होणे, ही या चळवळीची फार मोठी जमेची बाजू होती. मुस्लीम समाजातील सनातनी, कर्मठ मुल्ला-मौलवींच्या दृष्टीने ही बाब सर्वांत अडचणीचीही होती. 'हमीद दलवाई मुसलमान नाही. त्याला इस्लाम कळलेलाच नाही.' अशी दलवाईंची संभावना करणे या मुल्ला-मौलवींना सहज शक्य होते. पण इस्लामी धर्मशास्त्र व न्यायशास्त्र या विषयांवरचा प्रा. फैझींचा अधिकार सर्व इस्लामी जगतात मान्यता पावला होता. म्हणून त्यांच्यावर बिनबुडाची टीका करून त्यांच्या विरोधी विचारांची वासलात लावणे मुल्ला-मौलवींना कधीच शक्य झाले नाही. म्हणूनच प्रा. फैजी यांच्या निधनामुळे मुस्लीम समाजातील प्रबोधनाची चळवळ एका अर्थाने पोरकी झाली, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

वार्धक्यामुळे व प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे अनेक वर्षे सभा-परिषदांतून व इतर तत्सम कार्यक्रमांतून प्रत्यक्ष भाग घेण्याचे त्यांनी सोडून दिले होते. पण मंडळाचा एखादा कार्यकर्ता त्यांच्या घरी गेला, तर त्याच्याशी मनमोकळी चर्चा करण्यास ते कधीही अनमान करीत नसत. अशी चर्चा करीत असताना त्यांच्या मोठेपणाला व विद्वत्तेला अहंकाराचा दर्प कधीच येत नसे, हा अनुभव अनेकांनी अनेकदा घेतला आहे.

विद्यमान मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील त्रुटींमुळे अनेक मुस्लीम भगिनींना भोगावी लागणारी दुःखे पाहून व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायामुळे ते खूप कष्टी होत असत. समान नागरी कायदा व्हावा, असे त्यांना प्रकर्षाने वाटत असे. पण हा कायदा होईपर्यंत तरी आपल्या मुस्लीम भगिनींना कायद्याचे थोडे संरक्षण मिळावे म्हणून त्यांनी आपल्या 'रिफॉर्म्स इन मुस्लीम पर्सनल लॉ' या पुस्तकात मुस्लीम लग्नाच्या करारनाम्याचा (निकाहनामा) एक नवा मसुदा प्रसिद्ध केला. मुस्लीम रूढी, परंपरा व कायदा यांच्याप्रमाणे मुस्लीम लग्न हा एक करार असतो. तेव्हा घटस्फोटाची किंवा एखाद्या स्त्रीच्या नवऱ्याने दुसरे लग्न करण्याची वेळ आली, तर त्या स्त्रीला कायद्याचे काहीतरी संरक्षण मिळावे, घटस्फोट झालाच तर तिला पोटगी मिळावी अशी ही नवा मसुदा बनविण्यामागील त्यांची भूमिका होती. म्हणून त्यांनी आधुनिक काळाशी सुसंगत अशी

कलमे घालून हा मसुदा तयार केला. 'हा मसुदा शरीयतशी पूर्णपणे सुसंगत आहे' असेही त्यांचे प्रतिपादन होते. मुस्लीम समाजाने त्यांची ही भूमिका समजून घेऊन त्यांच्या करारनाम्याप्रमाणे लग्न लावण्याचा प्रघात पाडला, तर अनेक धर्मिनींचे मोडणारे संसार सावरता येतील. या स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे काही अंशी तरी परिमार्जन करता येणे शक्य होईल आणि समाज सुधारणेच्या मार्गावर पहिलेवहिले का होईना, पण एक पाऊल टाकण्याचे समाधान या समाजाला, आपल्या धार्मिक सिद्धान्ताशी बंडखोरी न करता मिळू शकेल. इस्लामी न्यायशास्त्राच्या या प्रकांड पंडिताला तीच खरी श्रद्धांजली ठरेल. मुस्लीम समाजाने अशी श्रद्धांजली अर्पण करण्याचा मोठेपणा दाखवायला हवा.

प्रा. फैजी तसे प्रसिद्धीपराङमुख होते. त्यामुळेच त्यांच्या अशा सेक्युलर विचारांना, मरहूम न्यायमूर्ती छागलांइतकी प्रसिद्धी मिळू शकली नाही, पण त्यांच्या सहवासात आलेल्या सर्वांनाच त्यांचा हा सेक्युलर दृष्टीकोन माहीत असेल. आजकाल सर्वधर्म समभावाचे स्तोम खूप वाढले आहे. 'सेक्युलॅरिझम' म्हणजे 'सर्वधर्म समभाव' असे समीकरण मांडून अनेक राजकीय नेत्यांनी सेक्युलॅरिझमचा स्वतःला सोयीचा अर्थ लावून प्रत्यक्षात जुन्या सरंजामशाही मूल्यांची व श्रद्धांचीच जोपासना केली आहे. अशा वातावरणात न्या. छगला व प्रा. फैजीसारख्या सच्च्या सेक्युलरवाद्यांच्या मृत्यूचे दुःख अधिकच गडद होते.

६. २ आरंभ काळातील कार्यकर्त्यांची विभागवार नावे

पुणे :

ए. जे. शेख,मेहबूब गौस कादरी (सय्यदभाई), मोहीयुद्दीन शेख (आबा), सय्यद मुनीर, अन्वर शेख, अमीर शेख, बशीर मोहीयुद्दीन शेख, फजल शेख, मकबूल तांबोळी, रसूल शेख, रशीद शेख, एच. एम. शेख, नजमा शेख, सय्यद रफीउद्दिन, महंमद यूसुफ शेख, इब्राहीम सिद्दिकी

मुंबई :

मेहेरून्निसा दलवाई, प्राचार्य कुलसूम पारेख, अब्दुल कादर मुकादम, मुमताज मोमीन, मोहम्मद दलवाई, मरियम रिफाई, ॲड. मुलाणी, लतिफ खाटीक, राजासाब मुलाणी

कोल्हापूर :

हुसेन जमादार, प्रा. के. जी. पठाण, प्रा. मुमताज रहिमतपुरे, मोहम्मद गौस नाईक (निपाणी), आय. एन. बेग (निपाणी), आयेशा जमादार, गाझीयोद्दिन सलाती (इचलकरंजी), मोहम्मदसाहेब सोलापूरे, मोहम्मद नगारजी, नसरुद्दीन बारगीर, खदिजा बागवान, हनीफ बागवान, डॉ. डी. एच. मालदार, अब्दुल कासिम नेसरीकर, गनी फरास, निजाम मुलाणी

अहमदनगर, श्रीगोंदा :

बाबुमियाँ बँडवाले, निसार बाटलीवाला, पठाण टेलर, जमादार कॉन्ट्रॅक्टर, मेहबूब बँडवाले, मीना बँडवाले, अजीज सय्यद.

चिपळूण :

दादाभाई पटेल, जोहरा भाटकर, हुसेन दलवाई, इस्माईल दलवाई.

सातारा :

इलाही मोमीन, करीम खैरत खान, प्रा. ए. डी. अत्तार, डॉ. बाबालाल मणेर, श्रीमती मणेर, प्रा. विलायत शेख, महंमदमियाँ दारूवाले, बशीर तांबोळी (फलटण), डॉ. शमीम अत्तार, प्रा. अमीन मोदी (फलटण), डॉ. आर. बी. मणेर

अमरावती :

वजीर पटेल, अझीझ बारी

सोलापूर :

प्रा. फक्रूद्दीन बेन्नूर, सय्यद मुनीर, इ. र. मुल्ला, महंमद हनीफ, बालम शेख.

संगमनेर :

ॲड. अब्दुल शेख

६.३ मुस्लीमेतर समर्थक आणि मुस्लीम मार्गदर्शक

प्रा. अ. भि. शहा, प्रा. नरहर कुरुंदकर, वसंतराव नगरकर, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, वि. स. खांडेकर, प्रा. गं. बा. सरदार, प्रा. मे. पुं. रेगे, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, डॉ. दिलीप चित्रे, डॉ. बाबा आढाव, नानासाहेब गोरे, प्रा. ग. प्र. प्रधान, यदुनाथ थत्ते, भाई वैद्य, एस. एम. जोशी, पु. ल. देशपांडे, विद्या बाळ, अनिल अवचट, कुमार सप्तर्षी, देवदत्त दाभोलकर, सुरेश शिपूरकर , सा. रे. उर्फ आप्पासाहेब पाटील, विजय तेंडुलकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पु. भागवत, शिरुभाऊ लिमये, नरुभाऊ लिमये, निळू फुले, रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन, मृणालताई गोरे, पन्नालाल सुराणा, विनायकराव कुलकर्णी, शाम पटवर्धन, कमल पाध्ये, दलितमित्र बापूसाहेब पाटील, दिलीप भंडारे, विवेक पुरंदरे, श्रीपतराव शिंदे.

डॉ. असफ ए. ए. फैजी, डॉ. मोईन शाकीर, न्या. एस. एम. दाऊद, डॉ. असगर अली इंजिनिअर, ताहेरभाई पूनावाला यांनी विविध शिबिरे, परिषदा, व्याख्यानमाला यांतून विचार मांडले. तसेच मंडळाच्या भूमिकेच्या समर्थनार्थ लेखन केले.

६.४ मंडळाच्या वाटचालीत समर्थन देणाऱ्या संस्था व संघटना

इंडियन सेक्युलर सोसायटी, राष्ट्र सेवा दल, साधना, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, समाजवादी महिला सभा, मंडलिक ट्रस्ट, महिला दक्षता समिती, आंतरभारती, कोरगावकर ट्रस्ट, हॉटेल पूनम, युवक क्रांती दल, जनवादी महिला (दिल्ली), गांधी पीस फाउंडेशन दिल्ली

पुणे बुधवार दि. ७ मार्च १९७३ (शहर आवृत्ति)

मुस्लिमांच्या घटस्फोटांवर बंध

मुस्लिम समाजा
बंधन घालण्याबाबत
वर बंधन घालणे
णार असल्याचे
दारयमुकीलाई.

७. परिशिष्ट

ई यांचे असते. पण त्या सरसहा घटस्फोट देत नाही
मुलभर असते. मुस्लिम पुरुष हा केव्हाही त्यांनी
कारण न देता, वाटेल्या वेळेस तिरीम देत म्हण
पाठवून घटस्फोट घेऊन मोकळा होता. आता या
समाजा- कारण न देता घटस्फोट घेण्याची तरतूद बाकस आहे.
म्हणाले
ो मुस्लिम सत्यशोधक "महमद पैगंबर यांची एक पत्नी वृद्ध असल्याने त्या बाबतीत काही वेगळा हे बाक
भूमिका आहे. असे श्री. वर्षांची होती, तेव्हापासून मुलगी वय्क झाल्या नाही. मुस्लिम कायदा हा स्थानीय मान
ाई यांनी मंगळवारी येथे वर्षांची झाली की बघात आली, असे प्रमोशिक्षित
गितले. हा समाज मागासलेला आणि त्या दृष्टीकोन जिथ
ला सभेच्या वतीने अनेक प्रकारच्या साडली. मुस्लिम काय
च शक्तिशाली

मिळालेल्या महिलांचे
निधी उभार

७.१ नोंदणी प्रमाणपत्र


सहायक धर्मादाय आयुक्त
मुलुखगिरी विभाग, मुंबई

No. 010170

नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) याअन्वये मुंबई येथील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आली आहे.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे नाव मुस्लिम सत्यशोधक मंडळ

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक ३०५-३२८ मुंबई

हमिद दलवाई यास प्रमाणपत्र दिले.

दिनांक १०-५-७४ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

CHARITY COMMISSIONER GREATER BOMBAY REGION MAHARASHTRA STATE

सही
धर्मादाय उप आयुक्त
हुद्दा मुलुखगिरी विभाग, मुंबई

७. २ मुस्लीम सत्यशोधक मंडळाची घटना

मेमोरँडम ऑफ असोसिएशन

रजिस्टर्ड, अंडर पब्लिक ट्रस्ट ॲक्ट नं. F 3264-B.

१. नाव : –

या संस्थेचे नाव 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' असे आहे. तिचा उल्लेख 'मंडळ' असा पुढे केला आहे.

२. कार्यालय : –

मंडळाचे मुख्य कार्यालय पुणे येथे असेल. त्याचा पत्ता : –

'साधना' ४३०-३१ शनिवार, पुणे ४११०३०

३. उद्दिष्टे : –

१. भारतीय समाजामध्ये प्रबोधनाच्या मार्गाने इहवादी (सेक्युलर) मूल्ये रुजवणे.

२. भारतीय समाजातील विभक्ततावादी प्रवृत्तींविरुद्ध झगडा करून राष्ट्रीय एकात्मता साध्य होण्यास पोषक असे वातावरण निर्माण करणे.

३. भारतीय समाजातील कालविसंगत श्रद्धा घालवणे.

४. भारतीय स्त्रियांना समाजात समान हक्क मिळावेत, ह्यासाठी कार्य करणे.

५. इहवादी मूल्ये रुजवण्यासाठी शाळा-महाविद्यालये चालवणे, संशोधन केंद्रे स्थापन करणे.

६. वाचनालये चालवून त्यांत मुख्यत्वेकरून लोकशाही, राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता ह्या विषयींचे साहित्य ठेवणे.

७. इहवाद, लोकशाही, धर्मसहिष्णू ता इ. मूल्ये रुजवणारी नियतकालिके, पुस्तके, ग्रंथ इ. प्रसिद्ध करणे.

८. जाहीर सभा, व्याख्यानमाला, चर्चासत्रे, अभ्यासवर्ग, परिषदा व संमेलने ह्यांद्वारे इहवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता इ. मूल्यांचा प्रसार करणे.

९. ह्या उद्दिष्टांना पूरक अथवा सदृश्य असे कार्य करणाऱ्या भारतातील किंवा भारताबाहेरील संस्थांशी / व्यक्तींशी संबंध जोडणे; परंतु ह्यासाठी जमा केलेला निधी भारताबाहेर वापरता येणार नाही.

१०. वर निर्देश केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करणे.

नियमावली : –

१. वर्षगणना : –

मंडळाचे वर्ष १ जानेवारी ते ३१ डिसेंबर असे राहील.

२. सभासदत्व : –

१. मंडळाची उद्दिष्टे व नियमावली मान्य असलेल्या व १८ वर्षे पूर्ण झालेल्या भारतीय नागरिकास मंडळाचे सभासद होता येईल. मंडळाची उद्दिष्टे व नियमावली मान्य असलेल्या कोणत्याही संस्थेस मंडळाचे सभासद होता येईल. विद्यार्थी सभासदास वयाची अट राहणार नाही.

२. व्यक्ती – सभासदांचे प्रकार : ––

सन्मान्य सभासद : – नियम २ (८)नुसार नेमलेले.
उपकर्ते : – रु.५०० किंवा अधिक देणगी देणारे.
आश्रयदाते : – रु. ३०० किंवा अधिक देणगी देणारे.
आजीव हितचिंतक : – रु. १०० किंवा अधिक देणगी देणारे.
हितचिंतक : – रु. १२ वार्षिक वर्गणी देणारे.
साधारण सभासद : – वार्षिक वर्गणी रु. १ देणारे.
विद्यार्थी सभासद : – वार्षिक वर्गणी पैसे ५० देणारे.

३. संस्था–सभासदांचे प्रकार : –

उपकर्ते : – रु. १००० किंवा अधिक देणगी देणारे.
आश्रयदाते : – रु. ७५० किंवा अधिक देणगी देणारे.
हितचिंतक : – रु. ३५० किंवा अधिक देणगी देणारे.
साधारण सभासद : – वार्षिक रु. ५० वर्गणी देणारे.

४. सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने मंडळाच्या कार्यकारी समितीकडे छापील नमुन्याबरहुकूम लेखी अर्ज पाठवावा व अर्जासोबत वर्गणी व इहवादी प्रतिज्ञा सही करून पाठवावी.

५. ज्या अर्जदाराचा अर्ज कार्यकारी समितीकडून संमत होईल, त्यासच सभासद म्हणून नोंदले जाईल कोणाही अर्जदाराचा अर्ज कोणतेही कारण न देता नामंजूर करण्याचा अधिकार कार्यकारी समितीस राहील. सभासदत्व रद्द करण्याचा हक्कही कार्यकारी समितीस राहील. मात्र अर्ज नामंजूर झाल्यास अर्जाबरोबरची वर्गणी परत केली जाईल.

६. सन्माननीय सभासद, उपकर्ते, आश्रयदाते व आजीव हितचिंतक या वर्गांतील सभासद मंडळाचे आजीव सभासद मानले जातील.

७. कोणत्याही सभासदाचे निधन/विसर्जन झाल्यास किंवा त्याने राजीनामा दिल्यास किंवा कार्यकारी समितीने सभासदत्व रद्द करण्याचा ठराव संमत केल्यास त्याचे सभासदत्व संपुष्टात येईल.

८. इहवाद, धर्मनिरपेक्षता ह्या मूल्यांचा प्रसार करणाऱ्या व्यक्तींना मंडळाचे सन्माननीय सभासद म्हणून नेमण्याचा अधिकार कार्यकारी समितीस राहील. हे सभासद आजीव सभासद मानले जातील व त्यांना वर्गणी द्यावी लागणार नाही. अशा सन्माननीय सभासदांची नेमणूक कार्यकारी समितीच्या सभेत एकमताने झाली पाहिजे.

३. सभासदांना पुढील अधिकार असतील : –

१. आजीव हितचिंतक व साधारण सभासदास मंडळाच्या वार्षिक साधारण व विशेष साधारण सभांमध्ये भाग घेण्याचा व मतदानाचा हक्क राहील. इतर सर्व प्रकारच्या सभासदांना मंडळाच्या वरील सभांमध्ये भाग घेण्याचा हक्क राहील. मात्र त्यांना मतदानाचा हक्क राहणार नाही.

२. मंडळाच्या सभेत भाग घेण्यासाठी प्रत्येक संस्था–सभासदाला आपला एक प्रतिनिधी अधिकारपत्र देऊन पाठवता येईल. मात्र त्यांना मतदानाचा हक्क राहणार नाही.

४. कार्यकारी समिती :

१. मंडळाचा कारभार कार्यकारी समितीकडे राहील.

२. कार्यकारी समितीत पुढीलप्रमाणे सदस्य असतील :

१. मंडळाचे अध्यक्ष

२. मंडळाने निवडलेले सभासद

३. मंडळाच्या अध्यक्षांनी स्वीकृत केलेले सभासद

३. कार्यकारी समितीची मुदत ३ वर्षे राहील.

४. मंडळाच्या अध्यक्षांची निवड दर ३ वर्षांनंतर वार्षिक साधारण सभेच्या वेळी होईल. निवृत्त होणाऱ्या अध्यक्षांना निवडणुकीस पुन्हा उभे राहता येईल.

५. मंडळाच्या अध्यक्षांना २ सभासद स्वीकृत करता येतील. असे स्वीकृत सभासद पुढील वार्षिक साधारण सभेच्या वेळी निवृत्त होतील.

६. अध्यक्षांची जागा मध्येच रिकामी झाल्यास पुढील वार्षिक साधारण सभेपर्यंत अध्यक्ष म्हणून उपाध्यक्षाची निवड कार्यकारी समिती करील. ते शक्य नसल्यास कार्यकारी समिती समितीच्या एका सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड करील. निवडून आलेल्या सदस्यांची जागा मध्येच रिकामी झाल्यास कार्यकारी समितीने सभासद स्वीकृत करून ती जागा भरावी व अध्यक्षांनी स्वीकृत केलेल्या सभासदाची जागा मध्येच रिकामी झाल्यास अध्यक्षांनी नवीन सभासद स्वीकृत करून जागा भरावी. अशा स्वीकृत सभासदांची मुदत मूळ सभासदाच्या मुदतीइतकी असेल.

७. कमीत कमी एक वर्ष साधारण सभासद किंवा आजीव हितचिंतक सभासद असलेल्या व्यक्तीस कार्यकारी समितीची निवडणूक लढवता येईल.

८. कार्यकारी समितीच्या सभेची गणसंख्या ३ सदस्य राहील.

९. कार्यकारी समितीच्या सभा जरूर असेल त्याप्रमाणे कितीही वेळा होतील.

१०. मंडळाचे अध्यक्ष कार्यकारी समितीच्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारतील. हे शक्य न झाल्यास उपाध्यक्ष स्थान स्वीकारतील. हेही शक्य न झाल्यास सभा उपस्थित सभासदांतून अध्यक्ष निवडील.

११. १० दिवसांच्या पूर्वसूचनेने अध्यक्ष किंवा कार्यवाह किंवा कार्यकारी समितीचे ५ सदस्य कार्यकारी समितीची बैठक बोलावू शकतील. वार्षिक साधारण सभा समाप्त झाल्यानंतर नव्या कार्यकारी समितीची पहिली सभा होईल व त्या सभेस पूर्वसूचनेची आवश्यकता राहणार नाही.

१२. अध्यक्षांना किंवा उपाध्यक्षांना १ दिवसाच्या पूर्वसूचनेने कार्यकारी समितीची तातडीची सभा बोलवता येईल.

५. कार्यकारी समितीचे अधिकार : –

१. पदाधिकाऱ्यांची निवड करणे. उपाध्यक्ष, खजिनदार, कार्यवाह, सहकार्यवाह इ.

२. सभासदत्वाच्या अर्जावर निर्णय घेणे.

३. सभासदांनी पाठवलेल्या सूचनांचा विचार करणे व त्यांवर निर्णय घेणे.

४. ह्या नियमांना बाधक ठरणार नाहीत, असे पोटनियम करणे.

५. मंडळाची वार्षिक साधारण सभा बोलावणे व एखाद्या विशिष्ट कारणासाठी वा कार्यासाठी वा विषयासाठी विशेष साधारण सभा बोलवणे.

६. वार्षिक साधारण सभेला मागील वर्षाचा वृत्तान्त व हिशेब तपासनिसांनी तपासलेले हिशेब व हिशेब तपासनिसांचा अहवाल सादर करणे व पुढील वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे.

७. मंडळासाठी वर्गण्या, देणग्या, अनुदाने, पारितोषिक–निधी बिनव्याजी ठेवी इ. मिळवणे.

८. कार्यालय, सभागृह अगर अन्य मिळकत बांधणे, विकत घेणे, भाड्याने घेणे, अथवा अन्य प्रकारे त्यांची सोय करणे. मात्र स्थावर मालमत्ता घेण्यास राखीव निधीहून जास्त रक्कम खर्च होणार असल्यास व त्यासाठी मंडळाला कर्ज काढावे लागल्यास त्यासाठी साधारण सभेची संमती घ्यावी लागेल.

९. मंडळाचे अधिकारी, सल्लागार व नोकरवर्ग नेमणे व त्यांची वेतनश्रेणी ठरवणे.

१०. मंडळाच्या कार्याला आनुषंगिक असे कार्यक्रम करणे व मंडळाच्या कार्याला प्रसिद्धी देणे.

११. मंडळाच्या शाखा स्थापन करणे व समित्या नेमणे. त्यांच्या कार्यकक्षा व कार्याचे पोटनियम ठरवून त्यांना कार्यकारी समितीचे एक वा अनेक अधिकार देणे आणि त्यांच्यावर देखरेख ठेवणे.

१२. मंडळाची मालमत्ता व कागदपत्रे यांची व्यवस्था ठेवणे.

१३. मंडळाच्या साधनांचा उपयोग करणे व त्यांचा योग्य अटींवर सभासदांना व इतरांना लाभ देणे.

१४. बँकांमध्ये मंडळाची खाती उघडणे व तत्संबंधी योग्य ठराव वेळोवेळी करून योग्य त्या व्यक्तींना सदर खात्यासंबंधीचे अधिकार देणे.

१५. मंडळाचे सन्माननीय सभासद नेमणे.

१६. मंडळाच्या हिताच्या दृष्टीने इतर सर्व कार्य करणे.

१७. एखाद्या सभासदाचे वर्तन मंडळाच्या हिताला बाधक आहे असे वाटल्यास कार्यकारी समितीच्या सभेला उपस्थित सदस्यांपैकी मते मिळवून त्या सभासदाविषयीचा नापसंतीचा ठराव संमत करता येईल व असा ठराव संमत झाल्यापासून त्या सभासदाचे सभासदत्व रद्द होईल. नापसंतीच्या ठरावाची सूचना सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर असली पाहिजे.

६. साधारण सभा : –

१. मंडळाचे वर्ष संपल्यापासून सहा महिन्यांच्या आत मंडळाची वार्षिक साधारण सभा कार्यकारी मंडळाकडून बोलवली जाईल.

२. अध्यक्षांना किंवा कार्यकारी समितीला आवश्यक वाटल्यास किंवा मंडळाच्या किमान २५ सभासदांनी लेखी मागणी केल्यास तशी मागणी कार्यालयाकडे आल्यापासून दोन महिन्यांच्या आत कार्यकारी समिती विशेष साधारण सभा बोलवील. विशेष साधारण सभेत फक्त कार्यक्रम पत्रिकेवरील कार्याचाच विचार होईल.

३. साधारण, विशेष साधारण, वार्षिक साधारण सभेची सूचना व कार्यक्रमपत्रिका सर्व सभासदांना मंडळाच्या दप्तरी असलेल्या पत्त्यावर सभेच्या तारखेच्या कमीतकमी १५ दिवस अगोदर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंगखाली पाठवण्यात येईल. वार्षिक साधारण सभेच्या बाबतीत सूचनेबरोबर वार्षिक वृत्तान्त व हिशेब आणि पुढील वर्षाचे अंदाजपत्रक पाठवण्यात येईल.

४. विशेष साधारण, वार्षिक साधारण, साधारण सभेची गणसंख्या १० राहील. गणसंख्येच्या अभावी सभा १५ मिनिटे स्थगित होऊन पुन्हा त्याच ठिकाणी भरेल व या पुन्हा भरणाऱ्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

५. मंडळाचे अध्यक्ष वार्षिक साधारण, साधारण, विशेष साधारण सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारतील. हे शक्य न झाल्यास उपाध्यक्ष अध्यक्षस्थान स्वीकारतील. हेही शक्य न झाल्यास सभा उपस्थित सभासदांतून आपला अध्यक्ष निवडील.

७. वार्षिक साधारण सभेचे अधिकार : –

साधारण सभेला पुढील अधिकार असतील : –

१. नियमानुसार अध्यक्षांची व कार्यकारी समितीच्या सदस्यांची वार्षिक साधारण सभेत निवड करणे.

२. वार्षिक साधारण सभेत मागील वार्षिक साधारण, विशेष साधारण व साधारण सभांचे इतिवृत्त, कार्यकारी समितीचा वार्षिक वृत्तान्त व पुढील वर्षासाठी अंदाजपत्रक संमत करणे, हिशेब तपासनिसाचा अहवाल व हिशेबपत्रक, ताळेबंद स्वीकारणे व पुढील वर्षासाठी हिशेबतपासनीस नेमणे.

३. अध्यक्षांनी, कार्यकारी समितीने व सभासदांनी मांडलेल्या सूचनांवर निर्णय घेणे, मंडळाच्या पुढील वर्षाच्या कार्याबाबत सूचना करणे.

४. कार्यकारी समितीने सभेपुढे मांडलेल्या इतर कामकाजांसंबंधी विचार करणे.

५. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे मांडलेल्या इतर कामकाजासंबंधी विचार करणे.

८. पदाधिकारी : –

१. मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यवाह, सहकार्यवाह आणि खजिनदार हे पदाधिकारी मानले जातील. कार्यकारी समितीवरून नियमाप्रमाणे निवृत्त होईपर्यंत पदाधिकाऱ्यांची मुदत राहील.

साधारण सभेने निवडून दिलेल्या सदस्यांनाच पदाधिकारी होता येईल.

२. मंडळातर्फे किंवा मंडळाविरुद्ध होणाऱ्या कायदेशीर बाबी अध्यक्षांच्या नावे होतील.

३. कार्यवाहांनी अध्यक्षांच्या व उपाध्यक्षांच्या सल्ल्याने व कार्यकारी समितीच्या आदेशानुसार सर्व कार्य करावे. एकंदर ५०० रुपयांपर्यंत अनामत रक्कम कार्यवाहांना स्वत:जवळ ठेवता येईल. कार्यवाहांनी साधारण सभांची व कार्यकारी समितीच्या सभांची टिपणे लिहावीत; मंडळाचे दप्तर व पत्रव्यवहार संभाळावा. सहकार्यवाह हे कार्यवाहांच्या सल्ल्याने काम करतील.

४. खजिनदारांनी हिशेब ठेवावेत व मंडळातर्फे होणारे खर्च योग्य नियमानुसार व ठरावानुसार होत असल्याची खात्री करून घ्यावी. खजिनदाराची अगर कार्यकारी समितीने अधिकार दिलेल्या अन्य व्यक्तीची स्वाक्षरी असलेलीच पावती कायदेशीर समजली जाईल.

९. निवडणुका : –

१. दर तीन वर्षांनी अध्यक्षांची व कार्यकारी समितीच्या ६ सदस्यांच्या जागांची निवडणूक वार्षिक साधारण सभेत होईल. अध्यक्षांची जागा काही कारणाने मध्येच रिकामी झाल्यास पुढील वार्षिक साधारण सभेत अध्यक्षांची निवडणूक होईल. अशा अध्यक्षांची मुदत मूळ अध्यक्षांच्या मुदतीइतकी राहील.

२. नियम क्र. ४ (७)नुसार निवडणुकीसाठी उभा राहणारा उमेदवार व नियम क्र. ३नुसार मत देणारा वार्षिक साधारण सभेअगोदरील ३१ डिसेंबर रोजी मंडळाचा सभासद असला पाहिजे व सभेच्या दिवशी त्याच्याकडून कोणतीही वर्गणी येणे बाकी असता कामा नये.

३. उमेदवाराची सूचना व अनुमोदनासह लेखी अर्ज वार्षिक साधारण सभेपूर्वी चार दिवस कार्यालयाकडे पोहोचला पाहिजे. या अर्जांची छाननी कार्यवाह करतील व योग्य ठरलेले अर्ज कार्यालयात जाहीर करतील. सभेमध्ये निवडणूक होईपर्यंत उमेदवारी मागे घेण्यास संधी देण्यात येईल.

४. निवडून द्यावयाच्या जागांइतके किंवा कमी उमेदवार उभे असल्यास त्यांची बिनविरोध निवड होईल. निवडून द्यावयाच्या जागांहून जास्त उमेदवार असल्यास निवडणुका होतील. मतदानाचा अधिकार असलेले, व्यक्तिशः उपस्थित सभासद गुप्त मतदान पद्धतीने मते देतील. जितक्या जागा असतील तितक्या किंवा कमी उमेदवारांना प्रत्येकी एक याप्रमाणे मत देण्याचा मतदाराला अधिकार राहील. समान मते पडल्यास चिठ्ठ्या टाकून निर्णय घेण्यात येईल.

५. सभेचे अध्यक्ष निवडणुकीची व्यवस्था बघतील. अध्यक्ष स्वत: उमेदवार असल्यास त्यांच्या निवडणुकीच्या वेळी उमेदवार नसलेल्या सभासदाची या कामी योजना करावी. निवडणुकीचे व्यवस्थापक सभेस निर्णय सादर करतील व तो अंतिम मानला जाईल. निवडून आलेले उमेदवार साधारण सभेनंतर कार्यकारी मंडळाचे सदस्य मानले जातील.

६. मंडळाच्या पहिल्या वार्षिक साधारण सभेत कार्यकारी समितीच्या ७ सदस्यांची निवड होईल

व त्यांपैकी एकाची अध्यक्ष म्हणून निवड होईल. मंडळाच्या संस्थापकांनी निवडलेल्या व्यक्ती पहिल्या वार्षिक साधारण सभेपर्यंत कार्यकारी समितीवर असतील व या सदस्यांपैकी एकाची निवड अध्यक्ष म्हणून संस्थापकांनी करावी.

१०. नियम दुरुस्ती : –

१. मंडळाचे नियमांत बदल करण्याचा अधिकार साधारण सभेला राहील. मंडळाचे नाव किंवा उद्दिष्टे याव्यतिरिक्त अन्य नियम बदलावयाचे असल्यास बदलाची सूचना सभेच्या कार्यक्रम पत्रिकेवर असली पाहिजे. व्यक्तिशः उपस्थित मतदार सभासदांनी सूचनेच्या किंवा सभेत मांडलेल्या उपसूचनांच्या बाजूने बहुसंख्येने मत दिल्यास अशी सूचना व उपसूचना मंजूर होऊन त्यानुसार नियमांत बदल होईल. असंमत झालेली सूचना किमान ६ महिने विचारार्थ घेतली जाणार नाही. नवीन नियम करणे, जुने नियम गाळणे यांचा अंतर्भाव 'नियम बदलणें' ह्यांत होतो.

२. मंडळाचे नाव किंवा उद्दिष्टे बदलावयाची असल्यास त्या विषयीची सूचना सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टनुसार संमत झाली, तरच त्या सूचनेनुसार नाव किंवा उद्दिष्टे यांत बदल होईल.

११. विसर्जन : –

सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टनुसार मंडळाची विसर्जनाची सूचना संमत झाल्यास मंडळाचे विसर्जन होईल.

१२. निधी व मालमत्ता : –

१. सभासद वर्गणी, देणगी, साहाय्य, मदत, अनुदाने, वाङ्मय विक्री आणि मंडळाच्या उद्दिष्टांशी सुसंगत अशा इतर मार्गांनी मंडळाचा निधी उभा करता येईल.

२. आजीव सभासदांच्या वर्गणीचा २५% भाग, कोणत्याही अटी वाचून मिळालेल्या द्रव्यरूपी देणग्यांचा २५% भाग व स्थावर मालमत्तेसाठीच मिळालेले उत्पन्न या सर्वांचा एक राखीव निधी करण्यात येईल व त्याचा वापर मालमत्ता घेण्यासाठी करण्यात येईल. साधारण सभेने संमती दिल्यास अन्य कार्यासाठी या निधीचा उपयोग करता येईल.

३. मंडळाच्या स्थावर व इतर मालमत्तेची व्यवस्था कार्यकारी समितीकडे राहील.

१३. संकीर्ण : –

१. मंडळाचे सर्व व्यवहार प्रामुख्याने स्थानिक भाषेतून होतील.

२. मंडळाच्या वतीने व नियमानुसार कार्य करणाऱ्या सभासदांना त्या कार्यामुळे कायदेशीर किंवा अन्य आक्षेप आल्यास व्यक्तिगत जबाबदार धरले जाणार नाही.

[साधना प्रेस, पुणे ३०]

७.३ मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा जाहीरनामा

भारतीय मुस्लीम समाजापुढे स्वातंत्र्योत्तर काळात नवी आव्हाने उभी राहिली आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील सर सय्यद अहमदखान यांचा मुस्लीम समाजाच्या धार्मिक आणि ऐहिक दृष्टीकोनातून मूलभूत बदल घडवून आणण्याचा आरंभीचा प्रयत्न वगळल्यास एरवी निराशाच पदरी येते. भारतीय मुस्लीम समाज या सर्व काळात आपल्या अल्पसंख्याक स्थानाविषयी विनाकारण अतीव जाणीव बाळगून आपल्या सनातन, परंपरागत श्रद्धा कवटाळून बसला आणि बहुसंख्य हिंदूसमाजविरोधी आंदोलने करीत राहिला. सर सय्यद अहमदखानांच्या प्रयत्नाने सुरू झालेल्या मुस्लीम सुधारणांचा गाडादेखील अखेरीला विभक्त वादाच्या दलदलीत रुतून गेला. पाकिस्तानची निर्मिती आणि भारतातील हिंदूमुस्लीम संबंधातील तफावाचा इतिहास सर्वांना माहीत आहेच.

भारताला सर्वधर्मीय राष्ट्रीयता निर्माण करण्याच्या झालेल्या सर्व प्रयत्नांत एक मूलभूत चूक सतत होत राहिली आहे. ती अशी की, हिंदू समाजाला आधुनिक, विशाल आणि पुरोगामी बनवण्याच्या आड येणाऱ्या जुनाट धर्मनिष्ठा बदलण्याचा एक सततचा प्रयत्न चालला असतानाच मुस्लीम समाजाच्या काल-विसंगत अशा परंपरागत श्रद्धांना हात न लावण्याचा आटापिटा मुस्लीम समाजाकडून करण्यात येत होता, आणि बहुसंख्य हिंदू समाजातील परिवर्तनवादी मंडळीदेखील या प्रक्रियेला कळत-नकळत हातभार लावीत होती. आजदेखील या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. याचा परिणाम म्हणजे, हिंदू समाजात आधुनिक राष्ट्रवादाचे, धर्मनिरपेक्षतेचे आणि समानतेच्या आधुनिक मानवी मूल्यांचे प्रवाह तुलनेने अधिक बळकट होत गेले आणि मुस्लीम समाज मात्र आपल्या जुन्याच श्रद्धांना चिकटून राहिला. सुशिक्षित मुस्लिमांची मजल यामुळे विभक्तवादी प्रवृत्तींपलीकडे कधी जाऊ शकली नाही. बदललेल्या परिस्थितीचे आव्हान यामुळेच मुस्लीम समाज स्वीकारू शकला नाही.

भारतातील हिंदू आणि मुसलमान समाजांतील ही प्रबोधनाची दरी भरून काढल्याशिवाय खऱ्या अर्थाने या दोन्ही समाजांचे संबंध सुधारणार नाहीत; राष्ट्रीय एकात्मता निर्माण होणार नाही, आणि नव्या भारतातील प्रजासत्ताकात राष्ट्रजीवनाचा एक सन्माननीय घटक मुस्लीम समाज म्हणून नांदू शकणार नाही. आपण लोकशाही जीवन पद्धती स्वीकारलेली असल्याने या प्रबोधनाची निकड निर्माण झालेली आहे. त्याशिवाय समाजातील सर्व क्षेत्रांत स्त्री-पुरुष समानता निर्माण होणार नाही व लोकशाहीचा पाया कमकुवतच राहील.

हे कार्य व्हावे म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्यात येत आहे. 'सत्यशोधक' शब्दाला महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात एक विशिष्ट अर्थ आहे. त्यामागे सामाजिक सुधारणांच्या प्रखर आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. या मंडळाचे नाव 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' असे ठेवताना या मंडळाच्या संस्थापक सभासदांपुढे महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची जाणीव आहे.

वास्तविक, स्वातंत्र्यानंतर अशी वेगळी सुधारणावादी का होईना, विशिष्ट धर्मगटांसाठी मंडळे काढण्याची आवश्यकता असायला नको होती, याची जाणीव आहे. परंतु मुस्लीम समाजाच्या प्रबोधनावर भर देण्यासाठी आज तरी मंडळाचे कार्यक्षेत्र त्या समाजापुरते मर्यादित ठेवण्यात आले आहे. जेव्हा सामाजिक बदलाची ही दरी नष्ट होईल, तेव्हा हे मंडळ मुस्लीम समाजापुरते कार्य करणार नाही. आधुनिक विचारांच्या सर्वधर्मीय राष्ट्रवादी परंपरा मानणाऱ्या सर्वच भारतीयांच्या इच्छा-आकांक्षानुसार एखाद्या नव्या आंदोलनात मंडळाच्या वेगळ्या अस्तित्वाची आवश्यकताच उरणार नाही.

ती अवस्था यावी आणि लवकर यावी, म्हणून हे मंडळ कार्य करत राहील.

७.४ सभासदाची प्रतिज्ञा

मी ..... असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, धर्म ही जीवनातील वैयक्तिक बाब आहे, असे मी मानतो. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादावर माझा विश्वास असून मी कोणत्याही धार्मिक व धर्मवादी राजकीय संघटनेचा सभासद नाही; आणि कोणत्याही धर्माच्या धर्मवादी चळवळींना व जातीयवादाला मी उत्तेजन देणार नाही. मंडळाच्या ध्येय-धोरणांशी व उद्दिष्टांशी मी संपूर्णपणे सहमत आहे.

दिनांक : .....

सही : .....

पत्ता : .....

७.५ मंडळाचे पहिले अधिकृत पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य

दिनांक ७ मे १९७२ ची वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यानंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी संध्याकाळी सहा वाजता नवीन कार्यकारिणीची पहिली बैठक झाली. या बैठकीस खालील सभासद उपस्थित होते.

बाबुमियाँ बँडवाले, सौ. मेहेरून्निसा दलवाई, हमीद दलवाई, सय्यद मेहबूब, अब्दुल कादर मुकादम, सय्यद मुनीर, रफीउद्दिन सय्यद व हुसेन जमादार.

या बैठकीचे अध्यक्षस्थान बाबुमियाँ बँडवाले यांनी स्वीकारले होते. या बैठकीत खालील कामकाज झाले.

१) पदाधिकाऱ्यांची निवड. सर्व गोष्टींचा सारासार विचार करून पुढीलप्रमाणे पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली :

स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले – अध्यक्ष

सौ. मेहेरून्निसा दलवाई – उपाध्यक्ष

अब्दुल कादर मुकादम – सरचिटणीस

सय्यद मेहबूब – प्रमुख संघटक

सय्यद मुनीर – प्रसिद्धी प्रमुख

सय्यद रफीउद्दिन – खजिनदार

२) सर्वसाधारण सभेच्या आदेशाप्रमाणे कार्याला त्वरित सुरुवात करण्यात यावी.

३) संध्याकाळी सात वाजता अध्यक्षांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

७.६ हमीद दलवाईंचे व्याख्यान

हिंगणें स्त्री शिक्षण संस्था, कर्वेनगर – पुणे २९
महर्षी कर्वे पुण्यस्मरण व्याख्यानमाला – वर्ष ९ वे
जागा – शिक्षण शास्त्र संस्थेचे सभागृह, पुणे ३०
दिनांक – ७,८,९ नोव्हेंबर ७१

विषय : भारतीय समाज प्रबोधन व स्त्रिया
वक्ते : हमीद दलवाई, मुंबई.

हिंगणें स्त्रीशिक्षण संस्थेतर्फे आपण या व्याख्यानमालेकरिता यंदा मला बोलावलेत, हा मी माझा बहुमान समजतो. महर्षी कर्वे महिलांच्या संदर्भातील काही ध्येयउद्दिष्टे उराशी बाळगून त्याकरिता आयुष्यभर झगडले. 'स्त्रियांची दासमुक्ती' हे जणू त्यांनी आपले जीवित कार्य मानले होते. अण्णांच्या कार्याशी आमचेही एक समान नाते आहे. या पुण्यात त्यांचे कार्य आकाराला आले, तेथेच सुमारे चार वर्षांपूर्वी, त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी मुस्लीम स्त्रियांची एक सभा मी त्यांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी बोलावली होती आणि आता चार वर्षांनंतर पुण्यातच येत्या डिसेंबर अखेरीला महाराष्ट्र राज्य मुस्लीम महिला परिषद भरत आहे. एक प्रकारे अण्णांचेच कार्य आम्ही मुस्लीम समाजात, आमच्या मर्यादित शस्क्तीनुसार पुढे चालवीत आहोत. याचा आम्हाला अभिमान वाटतो.

भारतीय स्त्रियांच्या दास्यमुक्तीचा लढा हा भारतीय समाज प्रबोधनाच्या लढ्याचा एक हिस्सा आहे. हे समाज प्रबोधन हिंदूंच्या बाबतीत तरी एका शतकापूर्वी सुरू झाले. आता आपण स्वतंत्र आहोत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जवळजवळ पंचवीस वर्षांचा कालावधी लोटला आहे. आपल्या देशाच्या पंतप्रधान एक स्त्री आहेत. एका शतकाच्या समाजप्रबोधनाच्या आंदोलनातून आपण काय साध्य केले? भारतीय स्त्रियांना सामाजिकदृष्ट्या समान स्थान देण्यात आपण कितपत यशस्वी झालो ? याचा आपण आजच्या या क्षणी आढावा घेणे चुकीचे ठरणार नाही.

'भारतीय समाज प्रबोधन' असा विषय मी मुद्दामच निवडला आहे. स्त्रियांच्या दास्यमुक्तीचा लढा भारतीय नवसमाज निर्मितीच्या लढ्याचे एक अविभाज्य अंग आहे, याची मला नम्रपणे जाणीव करून देणे आवश्यक वाटेल. हा समाज प्रबोधनाचा इतिहास अनेक खाचखळग्यांनी भरलेला आहे... वेडीवाकडी वळणे घेत गेलेला आहे आणि यात आश्चर्य मानण्याचे कारण नाही. कुठलेही परिवर्तन कधी सरळ रेषेत होत नाही. म्हणून स्त्री जीवनात संपूर्ण समानता असणार्याल फ्रान्ससारख्या देशात काल-परवापर्यंत बेगळे बँक अकाउन्ट ठेवता येत नव्हते. स्वित्झर्लन्डमध्ये अद्याप स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाही. आपल्याकडे स्त्रियांना बँकेत बेगळी खाती उघडता येतात; पैसे मात्र त्यांच्या इच्छेप्रमाणे खर्च करता येत नाहीत. आपल्याकडे

स्त्रियांना न मागताच मतदानाचा अधिकार मिळाला आहे. मात्र मत कोणाला द्यायचे, हे त्यांचा पुरुषच ठरवितो. समाज परिवर्तनाच्या वेड्यावाकड्या वळणांची जाणीव करून देण्यासाठी युरोप आणि आमच्या या परिस्थितीतील हा विरोधाभास मी आपल्या निदर्शनास आणला. या वेड्यावाकड्या वळणांच्या मागे त्या-त्या देशांचे, त्या-त्या समाजगटांचे इतिहास असतात, परंपरा असतात आणि धर्मही असतात.

एके काळी 'आधी राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा' हा वाद झाला. आगरकर सामाजिक सुधारणांबाबत आग्रही होते, तर लोकमान्य टिळक राजकीय सुधारणांवर भर देत होते. वस्तुतः समाजात आमूलाग्र परिवर्तन झाल्यानंतर तो समाज असा शक्तिशाली बनेल की, तो पारतंत्र्यात राहूच शकणार नाही, असे समाज सुधारणावाद्यांना वाटत असले, तर ते चुकीचे नव्हते. याउलट राजकीय सत्ता हाती असल्याखेरीज आपल्याला हवा असलेला समाज निर्माण करताच येणार नाही, असा राजकीय सुधारणावाद्यांचा दावा होता. हा दावाही काही प्रमाणांत खरा होता. वस्तुतः या वादात कुठल्याही एका पक्षाची भूमिका निर्भेळ बरोबर नव्हती. राजकीय सुधारणांचा आग्रह आणि राजकीय बदलाचा आग्रह ही एकाच नाण्याची दोन अंगे आहेत, हे बहुधा गांधीजींनी प्रथम ओळखले. त्यांनी आधी सामाजिक सुधारणा का आधी राजकीय सुधारणा हा वाद घातला नाही. त्यांनी सर्वच सुधारणांना एकदम हात घातला आणि म्हणून स्वातंत्र्य मिळताच येथे प्रौढ मतदारसंघ आला, स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला, लोकशाही अजून कशीबशी का होईना टिकून, राहिली... पुढे हिंदू कोड बिल झाले. भारतीय सुधारणेचे टप्पे पाहताना एक विशेष गोष्ट जाणवते. ती म्हणजे, दबल्या गेलेल्या वर्गाने लढे देऊन, भांडून आपले हक्क मिळवलेले नाहीत. हरिजनांना समान हक्क देण्याची पहिली हाक जोतिबा फुले यांनी दिली; इतर जणांनी नव्हे. सतीबंदीची मागणी राजा राममोहन राय यांनी केली; स्त्रियांनी नव्हे. युरोपात याच्या उलट होते. ज्यांना हक्क नव्हते ते झगडले आणि ते हक्क मिळविले. येथे ज्यांनी हक्क हिरावून घेतले होते, ज्यांचे हक्क हिरावले गेले होते, त्यांच्या कणवेने त्यांच्या हक्कांच्या लढ्याची हाक दिली गेली. त्यामुळे समता खऱ्या अर्थाने रुजू शकलेली नाही. ज्यांनी आपल्या हक्कांकरिता लढण्याची किंमत दिलेली नाही, त्यांना त्याची पुरेशी किंमत कळूच शकणार नाही. कारण गुलामांना गुलामीची सवय लागलेली असते. म्हणूनच जेकेलीन जेडी यांनी पुनर्विवाह केल्यानंतर 'भारतीय संस्कृतीतील वैधव्याची कल्पना किती श्रेष्ठ आहे' असा आक्रोश करणारी पत्रे महर्षी कर्वे यांच्या कर्मभूमीत, पुण्यात, काही वृत्तपत्रांत महिलांनीच लिहिलेली आहेत.

पाश्चात्त्य संस्कृतीच्या संपर्कने आपल्याकडे सुधारणांना आरंभ झाला. आपला ब्रिटिशांशी संबंध आला, या ऐतिहासिक योगायोगाशीदेखील आपल्या सुधारणांचा क्रम निगडित आहे. आपला संबंध पोर्तुगिजांशी अथवा डचांशी आला असता, तर आपल्या सुधारणांचा क्रम आजच्यासारखा राहिला असता की नाही, हे सांगता येत नाही. किनारपट्टीवरील ब्रिटिश प्रथम आलेल्या सर्वत्र प्रदेशांत सुधारणेचे वारे वाहू लागले... आरंभीचे पाऊल उचलले गेले. प्रथमच हिंदू समाजात स्वतःच्या समाज व्यवस्थेकडे तटस्थतेने पाहणाऱ्यांचा वर्ग निर्माण झाला. महाराष्ट्रात पेशवाई बुडाल्यानंतर चाळीस वर्षांनी लोकहितवादींचा उदय झालेला आहे. सत्ता

गेल्याने महाराष्ट्रातील सुधारलेला ब्राह्मण वर्ग अंतर्मुख बनला आहे. बंगालमध्ये हाच क्रम उलटा आहे. 'मुसलमानांचे राज्य गेले, इंग्रजांचे राज्य आले' याबर प्रतिक्रिया व्यक्त करताना 'बरे झाले, मुसलमानांच्या जाचातून आमची सुटका झाली' असे उद्‌गार राजा राममोहन राय यांनी काढले आहेत. नवसुशिक्षितांच्या निर्माण झालेल्या या पहिल्या वर्गाने आपल्याबरोबर नव्या जाणिवा आणल्या. 'स्त्रीविषयक सुधारणा' हा या जाणिवेचाच भाग होता.

सुधारणांचा आरंभ हा नेहमी आपल्या भल्यासाठी, एक प्रकारच्या स्वार्थी हेतूनेच होत असतो. उदाहरणार्थ, बंगालमध्ये आधी सुधारणा आल्या, याचा संबंध परिस्थितीशी आहे. विधवांचे तिथे फार छळ होत. एकदा एका विधवेने मुसलमान होऊन एका मुसलमान गृहस्थाशी पुनर्विवाह केला. न्यायालयात काही हिंदूंनी केस केली व 'हिंदू विधवेला विवाह करता येत नाही' असा दावा मांडला. 'ती मुसलमान झाली असल्यामुळे तिला हिंदू कायदा लागू नाही' असा निकाल न्यायाधीशांनी दिला. त्यामुळे मुसलमान होऊन पुनर्विवाह करण्याचा एक प्रवाह सुरू झाला. हिंदू समाजच नष्ट होईल, असे यामुळे जेव्हा हिंदूंना वाटले, तेव्हा ते विधवा विवाहाचा पुरस्कार करू लागले.

या संदर्भात महाराष्ट्रातील कार्य ठळकपणे नजरेत भरते. लोकहितवादी, आगरकर, महर्षी कर्वे, जोतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे अशा समाज सुधारकांची एक परंपराच येथे दिसते. आधीच्या समाज सुधारकांच्या या प्रयत्नांत स्वातंत्र्यलढ्याने मोठी भर टाकली. किंबहुना समाज प्रबोधनाच्या या प्रयत्नांतूनच राष्ट्रीयतेच्या कल्पनेचा उगम झाला. या राष्ट्रीय चळवळीत गांधीजींच्या काळात सर्व समाजच घुसळून निघाला. फार मोठ्या संख्येने स्त्रियांनी या चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली. येथे गांधीजींच्या कामगिरीचा उल्लेख न करणे अप्रस्तुत ठरेल. त्यांच्या सर्व मतांशी सहमत न होताही भारतीय समाज प्रबोधनाच्या प्रयत्नात त्यांचे स्थान फार मोठे आहे.

शिक्षणाने निर्माण झालेल्या सुधारणांच्या प्रवाहाने अनेक फाटे फुटलेले दिसतात. राष्ट्रीयत्वाची कल्पना, समानतेची जाणीव, व्यक्तिस्वातंत्र्याची बूज या साऱ्या चांगल्या बाबी, तर राष्ट्रीय जाणिवेबरोबर प्रदेशवादाची जाणीव, स्वतःच्या भाषेचा अतिरिक्त अभिमान, धर्माला सिद्धान्ताचे देण्यात आलेले अधिष्ठान या बाबीदेखील झाल्या. सामाजिक प्रबोधनाबरोबरच पुनरुत्थानाचाही एक प्रवाह सुरू झाला. गुजरातेत 'आर्य समाजाची निर्मिती' हा या पुनरुत्थानाचाच भाग होता. पुनरुत्थानात पुन्हा वेगवेगळे प्रकार आढळतात. आर्य समाजाने जाती जोडण्याचा प्रयत्न केला... स्त्रियांना शिक्षणाचे आणि इतर क्षेत्रांतील दरवाजे मोकळे करण्याचा प्रयत्न केला; परंतु राजकीयदृष्ट्या तो पुनरुत्थान करीत राहिला. हेच सावरकरांबाबत म्हणता येईल. हिंदू समाजातील सुधारणावादी पुरोगामी मंडळी हिंदू समाजाचे भले करण्याच्या हेतूने एकत्र येत असलेली दिसत होती. हा पुनरुत्थानवादी वर्गदेखील शिक्षणातून निर्माण झाला. सुशिक्षित बऱ्या-वाईट सगळ्या गोष्टी करीत असतात. शिक्षण माणसाला विचार करायला लावते. म्हणून अनिष्ट सिद्धान्त बाळगणारांचा वर्ग सुशिक्षितांतूनच निर्माण होतो.

हिंदू सुधारणेचे काही टप्पे सहज ओळखून काढता येतात. राजा राममोहन राय हा आरंभ आहे... सावरकर हा दुसरा टप्पा आहे... गांधी हा संपूर्ण मानवतावादी वृत्ती धारण केलेला तिसरा

टप्पा आहे. याच संदर्भात मुस्लीम समाजात सर सय्यद अहमद खान हा पहिला आणि जिना हा दुसरा टप्पा होता... तिसऱ्या टप्प्यापर्यंत मजल गेलेलीच नाही. समाज प्रबोधनाला वेडीवाकडी वळणे असतात, असे मी आधी म्हटले आहे. ते राजकीय संदर्भात अधिक स्पष्ट करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, माणसांच्या धर्मनिष्ठा कमी झाल्या की ती आपोआप उदारमतवादी बनतात, असे नव्हे. जिना आणि सावरकर धर्म फारसा मानीत नव्हते. तरीही ते धर्मसमुदायवादी होतेच. गांधीजी धर्म मानीत होते आणि तरीही मानवतावादी बनू शकत. एखादा हिंदू माणूस स्मृती मानणार नाही, तरीही 'स्त्रियांना समान हक्क असावेत' असे तो मानणार नाही. समाज प्रबोधनाने माणसाच्या दृष्टीकोनात आमुलाग्र बदल घडवून आणायचा असतो व त्यात व्यक्तीकडे पाहण्याची माणसाची दृष्टीच बदलण्याचे कार्य साधावयाचे असते. भारतातील स्त्रियांना समान स्थान देण्याच्या बाबतीत प्रबोधनाच्या या अंगाकडे लक्ष देण्याची फार गरज आहे.

येथे हिंदू समाजाची बरीचशी चर्चा झाली आहे. इतर समाज वगळणे चूक ठरेल. मुस्लीम समाजात आता कोठे स्त्रियांच्या हक्काचे बारे वाहू लागले आहेत. ख्रिश्चन समाजाला हा प्रश्न भेडसावीत नाही. आदिवासी समाजदेखील तसा वेगळा आहे. आदिवासी समाजात ख्रिश्चन होण्याचे प्रमाण जास्त दिसते. याचे कारण, त्यांच्या चालीरीती व स्त्री-विषयक दृष्टीकोन फारसा बदलावा लागत नाही, याच्याशी आहे.

मुस्लीम समाजातील राजकीय विचारांच्या संदर्भातच स्त्रियांच्या दास्यमुक्तीच्या प्रश्नाकडे पाहिले जाते. धार्मिकदृष्ट्या सनातन समाज राजकीयदृष्ट्या काँग्रेसच्या जवळ आहे. सनातन्यांनी सारडा कायदाच्यालादेखील विरोध केला आहे आणि जिनांसारख्या राजकीय जातीयवाद्यांनी सारडा कायदाच्याला पाठिंबा दिला. येथेही अमीदअली, खुदाबक्ष, सर सय्यद अहमदखान, इक्बाल, जिना असे सुशिक्षित पुनरुत्थानवादी नेतृत्वाचे टप्पे आहेत. हे टप्पे सनातनी आणि हे सुधारणावादी विचारांच्या संदर्भात आपला समाज कसा असावा एवढ्यापुरतेच मर्यादित आहेत.

भारतीय मुसलमानांचा विचार करताना तो जागतिक इस्लामच्या संदर्भात करावा लागेल. तुर्कस्तानात स्त्रियांना संपूर्ण अधिकार आहेत. इंडोनेशियात परंपरेने स्त्रिया स्वावलंबी आहेत. अरब जगतापैकी इजिप्त, लेबनॉन आणि ट्युनिशिया येथे स्त्रियांना सामाजिक सुरक्षितता आणि समान स्थान देण्याबाबत काही पावले उचलली आहेत. शरीयत कायदा अरबस्तान वगळता सर्व ठिकाणी क्रमाक्रमाने बदलत आहे. हा बदल पाकिस्तानातही झाला आहे. भारतात राजकीय ताणामुळे हा प्रवाह तीव्र बनलेला नाही. "Men are in charge of women because Allah has made the one of them to excel the other." असे कुराणातील एक वचन आहे. त्यामुळे स्त्रियांचे जीवन नियमित करणे पुरुषांचे कार्य आहे, अशी मुस्लीम सनातन्यांची भूमिका आहे. समाजाचा नैतिक समतोल या व्यवस्थेवर अवलंबून आहे, असे सनातनी मुसलमान मानतात. वस्तुस्थिती याच्या उलट आहे. सुऱ्हावर्दी नावाच्या एका स्त्रीरोग चिकित्सकाच्या पाहणीत आरोग्य आणि नैतिक चारित्र्य या बाबतीत अनुक्रमे ख्रिश्चन, हिंदू आणि मुसलमान असा क्रम लागतो, असे दिसून आले आहे.

आता भारतातील सर्व समाजांना काही समान मूल्यांवर एकत्र आणून एक नवसमाज आपल्याला

निर्माण करावयाचा आहे. येथे स्त्री-पुरुष समतेचा प्रवाह अधिक मजबूत केला जाण्याची शक्यता अधिक आहे. यासंबंधित सर्वच स्त्रियांना समान हक्कांचा लाभ झाला पाहिजे. तो अजून झालेला नाही. उदा. मुसलमान स्त्रीला समान वारसा हक्क नाहीत... सक्तबंदी कायदा नाही. ख्रिश्चनांचा कायदा १८६९ साली बनला. तो आता जुना झाला. पारशांना कायदाच नाही... हिंदू कायदाही निर्दोष नाही. म्हणून Common Code ताबडतोब झाले पाहिजे.

शेवटी सर्व प्रश्न कायद्याने सुटत नाहीत; कायदा बदलाची जाणीव करून देतो. ज्यांना हक्क हवे आहेत, त्यांना हक्कासाठी लढल्याखेरीज समाजात मिळालेले हक्क अमलात येत नाहीत. आज स्वातंत्र्यानंतर सर्वच सामाजिक चळवळी थंडावल्या आहेत, असे दिसून येईल. हिंद-मुसलमानांच्या सततच्या ताणलेल्या संबंधांमुळे गेल्या काही वर्षांत हिंदू सनातनीपणा पुन्हा बळकट करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. 'हिंदू स्त्रियांना वारसा हक्कातून वगळावे' ही मागणी पंजाब-हरियाणामध्ये केली गेली आहे. 'आंतरधर्मीय विवाहांना बंदी घालावी' अशी मागणी पुण्यातील एका पत्राने केली आहे. सौंदर्य स्पर्धेत मुस्लीम स्त्रियांना भाग घेण्याविरुद्ध आघाडी उघडण्यात आली आहे. हा दास्यमुक्तीचा लढा सर्व धर्मीयांपर्यंत पोहोचविल्याखेरीज आज निर्माण झालेले अडथळे दूर करता येणार नाहीत.

भारतीय समाज प्रबोधनात स्त्रियांच्या हक्कांच्या लढ्याला एक खास अर्थ आहे. आर्थिक पुनर्रचनेच्या व आर्थिक समानतेच्या आपण लढत असलेल्या लढ्याचे 'सामाजिक समता' हे अविभाज्य अंग आहे. सामाजिक विषमतेची चौकट कायम ठेवून या देशात आर्थिक समानता प्रस्थापित होणे अशक्य आहे. स्त्रिया यात महत्त्वाचा वाटा उचलू शकतात. त्यांनी आपल्या हक्कांची लढाई तीव्र करणे आणि पर्यायाने सर्व क्षेत्रातील समानतेच्या प्रवाहाला बळकटी आणणे, हे आजच्या संदर्भात महत्त्वाचे कार्य ठरेल.

७.७ Muslim Opposition to Secular Integration
Hamid Dalwai

('धर्मनिरपेक्षता' ही मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेमागील मूळ प्रेरणा आहे आणि तेच मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे उद्दिष्ट आहे. मंडळाच्या स्थापनेनंतर दोन महिन्यांनी हमीद दलवाई यांनी लिहिलेला हा लेख मंडळाची धर्मनिरपेक्षतेची भूमिका समजून घेण्यासाठी महत्त्वाचा ठरतो.)

SECULARISM implies a dissociation of religious considerations from political and social life. The modern view of man and society includes a secular attitude to all political and social activities. It does not insist on abolishing religion altogether but rather regards religion as a matter of personal faith. The ethical values which modern secular society is based are secular ethical values which are rationally derived. Religion may or may not contain a notion of fundamental human rights as we understand them today. As modern men, we do not rely on religion for deriving our concept of social conscience. Our social conscience is inherent in the system of government we have accepted, which is democratic. The democratic ethic is liberal and is therefore heterodox. It is thus necessary for a democracy to be secular, i.e., totally dissociated from religion, to be a democracy at all. All communities and individuals in a democratic society have to conform to the basic liberal democratic ethic.

In many instances, we witness an inevitable conflict between human rights and religion-based social attitudes of communities. In such situations, the only choice we have as modern democratic people is to eliminate the obstacles to democracy created by certain religious attitudes. The very fact that in India we call Muslims a minority and Hindus the majority implies a non-secular attitude. Yet all political parties seem to regard this as a proper division. A secular distinction between people would be in the nature of a class distinction. For instance, a leader of the working class is a secular leader; a leader of Hindus or Muslims is not.

Secularism in India, although embodied in the Constitution, is still a goal to be attained. It has not yet permeated our social life. Indeed, even

the goal is in question today. Among the Hindus there is a strong puritan revivalist movement. A small group of liberals is engaged in fighting it. Among Indian Muslims, however, there is no similar group to lead the movement towards democratic liberalism. Unless Indian liberals, however small their number, are drawn from all communities and join forces on a secular basis, even the Hindu liberal minority will eventually lose the battle to communalist and revivalist Hindus. If Muslims are to be integrated into the fabric of a secular and integrated Indian society, a necessary precondition is to have a class of Muslim liberals who would continuously assail communalist dogmas and tendencies.

Liberal intellectuals emerge in any society only through a long and complex social, cultural and political process. Today Hindus have influential liberal elite only because Hinduism is historically heterodox and can accommodate dissent. The modern Indian liberal tradition starts from Raja Ram Mohan Roy who was a product of Hindu society. It leads, through such secular (as against Hindu) liberals as Nehru to the present time.

The target of Hindu liberals has been Hindu orthodoxy. And due to their continuous critical evaluations and lead in social reform, Hindu society as a whole has benefited to a certain extent. I am not suggesting that Hindu society has accepted the liberal democratic ethic and has modernised itself to any satisfactory extent; it has not. But this continuing liberal tradition places the Hindu community in a culturally better position than the Muslims in India.

Why do Muslims in India lack liberal elite? The answer has many facets, but one thing is certain Muslim backwardness stems from the very make-up of the Muslim mind.

Indian Muslims believe that they are a perfect society and are superior to all other communities in India. One of the foundations of this belief is the assumption that the Islamic faith embodies the vision of a perfect society and that therefore it does not need to make any further progress. This is open to question. To take an example, Islamic personal law runs contrary to our modern notions of human rights. Its anomalies are obvious and so should be the need to remove them.

Another complicating factor is that Indian Muslims resent being a minority and they dream of spreading their faith throughout the land, or at least of ruling India. They suffer from delusions of grandeur and also from a persecution mania. I can cite a number of examples of this from the Muslim press in India and the statements of leaders of the Jamaat-e-Islami and the Muslim Majlis-e-Mushawarat. The roots of this can be traced back to the pre-partition history of Muslim politics in India. Muslims then believed that they were a state within a state, a society within a society. Their ideas of representation are based on this belief, which runs counter to the concept of a democratic society itself. Today they believe in a parallel co-existence with the majority with complete autonomy as a community. This explains their resistance to change in their personal law. If they oppose family planning, it is because they are obsessed with the idea of increasing their numbers to be effective in power politics. This is the same old dangerous attitude that led to the demand and creation of Pakistan.

The only leadership Indian Muslims have is basically communalist. An exceptional Muslim liberal like Chhagla has no place in Indian Muslim society. What Indian Muslims need today is a liberal elite which would identify itself and collaborate with other modern liberals against both Muslim and Hindu communalism. Unless a Muslim liberal intellectual class emerges, Indian Muslims will continue to cling to communalism and obscurantist medievalism, and will eventually perish both socially and culturally.

A worse possibility is that of Hindu revivalism destroying Hindu liberalism which can survive only with the support of Muslim liberals. This leadership, to have credibility and persuasive power, must emerge from amongst the Indian Muslims themselves. Its first task would be to destroy the hold of the communalist leadership over Indian Muslim masses. The influences of organizations such as the Jamaat-e-Islami, the Muslim Majlis-e-Mushawarat, and Tamir-e-Millat has to be eliminated. The so-called nationalist Muslims, who are basically communalist, have to be shown up. The ulema have to be prevented from propagating anti-national ideas in the name of religion. The

communalist Muslim press must be rendered ineffective. In short, the pervasive influence of all kinds of communalists has to be fought.

There are some Muslims in India today who are members of the Indian liberal elite but they are afraid of their community's reaction to modern attitudes. They are not only of no use, but also are a hindrance to the progress of Indian Muslims. They are either moral cowards or are apathetic to a great social problem which is also a problem of democracy in India. They must make a choice now. If they do not provide a liberal intellectual leadership to Indian Muslims, the younger generation has to take it upon itself to carry out this task.

It is often argued that Muslim communalism is only a reaction to Hindu communalism. This is not true. The real conflict in India today is between all types of obscurantism, dogmatism, revivalism, and traditionalism and modern liberalism. Politicians, being short-sighted and opportunistic, take care not to fall foul of communalism and orthodoxy. This is why we need an agreement among all liberal intellectuals to create a non-political movement against all forms of communalism. If this is not done, democracy and liberalism will inevitably collapse in India. The stakes are high. It is a pity that few people realise the gravity of the situation. It is even more unfortunate that they are rarely informed about the true nature of the problem. (The Secularist, July-September 1970, Page no. 18-20.)

७.८ Declaration on Secularism

(हमीद दलवाई, प्रा. अ. भि. शहा आणि समकालीन विचारवंत यांनी एकत्र येऊन १९६८मध्ये इंडियन सेक्युलर सोसायटीची स्थापना केली. मंडळाच्या स्थापनेनंतरही या दोन संस्थांच्या वतीने अनेक उपक्रम संयुक्तपणे राबवण्यात आले. या दोन्ही संघटनांसाठी 'सेक्युलॅरिझम' ही संकल्पना मूलभूत स्वरूपाची होती. सेक्युलॅरिझमचा अभिप्रेत अर्थ स्पष्ट करणारा जाहीरनामा इंडियन सेक्युलर सोसायटीने प्रसिद्ध केला. मुस्लीम सत्यशोधक मंडळासाठीही हाच अर्थ अपेक्षित आहे. सेक्युलॅरिझमचा अर्थ समजून घेण्यासाठी हा महत्त्वाचा ऐवज आहे.)

Religion offers a vision of life and a theory of man and universe that incorporates this vision. However, in the history of every religion a stage arrives when the spiritual vision fades into the background and theory achieves a status unrelated to the historical situation in which it was first formulated. Theology triumphs over conscience, science is subordinated to superstition and ethics itself is perverted into a specious justification for gross social inequities. The human concern which inspired the founders of world religions and which they sought to articulate in the context of their times gets buried under the deadwood of dogma and unchanging injunctions. When this happens, religion proves a fetter on human freedom and creativity, and society begins to stagnate in a world of expanding knowledge and rapid change. What came to liberate remains imprisoned.

This is particularly true for India. Indian society is divided into a number of religious groups, each convinced that its own brand of obscurantism represents the ultimate 'Truth'; others – mlechchhas, kafirs or pagans – are destined for a special kind of hell. Uncritical adherence to the dogmas of a bygone age prevents them from clearly perceiving their own interest and drags religion into the market-place of power politics. Worse still, religion in India does not function as a personal relation between man and his God. It rather functions as a tribal bond that obstructs modernization and inhibits the growth of liberal, secular and territorial nationalism. Instead of ennobling the life of the individual, it debases him and makes him the willing tool of vested interests in various fields of public life.

Developments in India during the past few years bring out this role of

religion. Witness, for example, the Hindus' demand for a total ban on cow-slaughter, the Muslims' opposition to the modernization of a personal law which discriminates against women, and the Muslims and Christians' attitude to family planning in spite of the gravity of the population problem. And all this in the name of religion!

Like corruption and inefficiency, communal tension and frequent riots undermine the polity, weaken economy and gradually render the country incapable not only of all-round development but even of surviving as a single nation. Next, therefore, to external aggression religious obscurantism possess the most serious threat to India as a developing secular democracy.

However, a political approach will not help. Political parties, which by their nature have to pander to popular prejudice in order to secure votes, cannot take up a forthright stand on issues where public sentiment runs counter to the public interest. It is also necessary to combat obscurantism not only in politics but in other spheres of life such as education, in social legislation, administration and the economy as well.

In other words, what is required is a comprehensive approach informed by a forward-looking attitude and a commitment to secular human values regardless of the difficulties of the task. Only those who are not interested in the politics of power and are willing to work with a perspective for the modernization of Indian society can respond to the longterm challenge posed by growing obscurantism. Indian Secular Society has been founded for this purpose. The Society is a non-party organization of secularists committed to the values of democratic secularism and their promotion in India. It believes that religion can be an ennobling influence in man's life provided it is looked upon as a personal relationship between the individual and his God. Looked upon in this way, the true essence of religion would consist in the abiding moral and spiritual values that have inspired the founders of all major religions. Other elements of religion such as its injunction regarding inter-personal relationships would then appear as incidental, having been determined by the specific historical situation in which it first arose. In other words, true religion would be concerned with man's search for

significance in life. It would not seek to lay down the law in secular affairs, which properly belong to the domain of social and natural sciences, and of secular ethics based on the knowledge made available by them. The Society believes that the injunctions of every religion should be examined from the standpoint of science and fundamental human rights as embodied in the Indian constitution or the UN Declaration on Human Rights. Whatever does not stand these tests should be rejected as not belonging to the core of religion.

Indian Secular Society will seek to educate public opinion on these lines and will exert itself to ensure that religion does not play a part in the determination of public policy to the detriment of human welfare.

(Adopted unanimously at the Foundation Conference of the Indian Secular Society held at Bombay on 24 November 1968.)

७.१ Inaugural Address by Major General E. Habibullah (Retd)

Conference of Forward-Looking Muslims, New Delhi
December 4-5, 1971

THE background note by Mr Hamid Dalwai states a good deal of truth. Though it certainly is not everyone's cup of tea, Mr Dalwai may claim that the truth often hurts. However, my purpose here is really not to discuss that paper. Still, I must say that intellectually the general and the particular should, as far as possible, be kept far apart. When it is necessary to bring them together, one should clearly state the purpose. Mr Dalwai rightly says: "There is need for assimilation with other people in fact, with humanity at large. This can only be done, if the community recognises its failings, problems and true needs. An extensive over-hauling of its institutions and attitudes is necessary to attain equality' In order to come to a true understanding of the needs of the Muslims of India, one has to go back a little to study the historical background. Then again one cannot consider a community as a solid whole, undifferentiated like a block of ice. For instance, it may be true that some Muslim groups could do with a more frequent and thorough wash, but no one will say that the Malabar Moplahs are not one of the neatest and cleanest people to be found in India. This is because spotless white clothes and clean bodies are a 'fad of the people of that area and of Kerala. The habits, conditions and lives of Muslims are not one and the same all over India. However, the pernicious system of 'so-called' democratic politics also means, in India, nothing short of leading the ignorant and semi-ignorant by the nose. The simplest and most easily fitted nose-ring is that of religion: the victim is already conditioned to take it from childhood.

When the British and Europeans came to India, they found a society largely dominated by Muslim overlords and served by caste Hindus, Parsees and other people. The lowest echelons of society were filled by those perpetual outcastes for whom it was a punishable crime even to hear the Sanskrit tongue. Their shadow alone was enough to defile food

or water. But Muslim society too varied considerably. It too had begun to sprout castes. In the North, the Central Asian had been largely responsible for the introduction of his way of life. He assimilated also a good deal of the way of life of the Rajput and the Gujar. Having been for generations developers of crafts and high-class manufacture, those who came with these Central Asians also spread these arts and crafts around them. Through the port of Surat and others, there came sea-farers and pioneers who were mainly traders. They penetrated to the plateau and soon were followed by African, Turkish and Arab conquerers. But those who came further south settled there, circumnavigated the peninsula and reached Bengal and the South Seas. This is why East Indian, Polynesian and South Indian dress and architecture are very alike. It thus came about that when the freedom struggle started, the largely trading Muslims of the Central, and Southern regions did not take part in it. Tipoo Sultan, a hero without parallel, is not only a notable exception, but it is interesting to note that once a Hindu dynasty was put on Tipoo's throne, any revolt potential which the Nizam had was withered from its very roots. The coastal Muslims of the West had no feudal roots. Like the Parsees, they soon co-operated with the most wealthy patron. It was in the North where Rajput-Muslim feudalism and flamboyance came to its peak, and in its decadence gave birth to the immortal Taj Mahal itself. When the British usurped power in the Indo-Gangetic plains they met with the stoutest resistance from the most highly cultured and opulent sections of the feudal society. These sections happened to be the Muslims and the Rajputs. Thus in the South Muslim overlords having been overthrown Hindu minions co-operated. In the West, Muslims (largely Khojas and Bohras) rallied behind their sect leaders clinging to their dictates. The large Muslim feudal population resented the new white squire and secretly plotted against his over-lordship. The bureaucrats, scribes, advisers and 'Munshis' of these feudal estates were largely caste Hindus, excluding generally the Rajputs. They gradually took to English books and education and soon found themselves in British employ. It was considered a status symbol to be a 'Babooji' with the John Company. This phase matured in the 19th century. But then, even Brahmins like

Nana Saheb and Tilak started to revolt. The latter even gave history a new turn by not only declaring the British aliens, but also the Muslims. He adorned Shivaji with a new jewel, of being a defender of the old Dharma and of the new India.

In this later context the British turned to the Muslims, who now had become isolated from all the blessings of modern education. Because they also comprised most of the finest artisans and craftsmen, the 19th century also witnessed their ruthless suppression in order to make room for British machine-made goods. This community, together with the Rajputs, thus became completely dispossessed. In this state of frustration, they soon became prey not only to the British inducements but to the 'crumbs' that fell from the Royal table. It is not surprising that the first leader who went with hat-in-hand for the bestowal of British favours was the head of a community of traders. It was this group that was used to lever Muslim opinion, together with the landlords and barons, who had received favours after the mutiny: but the Muslim intellectual, sage and priest as well as the artisan and poor classes put up stout resistance. They were in the forefront of the freedom movement.

Partition, however, dealt a deadly blow to the progress of the Muslims. Such an ogre as Pakistan had never been born in Muslim society before. For Islam transcends country and region. It has always been a question of being a Muslim and belonging to one country. Now we were faced with the fact of some people being Muslims and having a separate country. This has placed Muslim society at sixes and sevens. As Mr M. R. A. Baig has rightly said in a letter to the press (22 November), there are 60,000,000 of them and they have no representative organisation, journal, or acknowledged leader'. We are, therefore, liable to be led into preaching unacknowledged and unheeded homilies to ourselves.

The Muslims as such also have many disadvantages today, primarily because of the creation of Pakistan. For instance, the Chief Minister of my State issued in 1947 a firm instruction that Muslims were no longer to be recruited in the police force. This order, though not strictly followed now, is brought up by individuals when they feel like it. It was quoted last year to a young aspirant. Then in the so-called Hindi states, Urdu has

been forbidden, rejected. Mark you, these were the States in which Urdu was used as the Indian language for administration and law by the British. The community on which the weight fell was almost exclusively the Muslims, not that it was their language alone. This led to their near outcasting from any form of legal and administrative activity in North India for one generation.

I quote Mr Baig again: 'Social conscience and humanitarianism keep pace with education and social development.' I would add, also with economic capability. As their status sinks to match the not very enviable position of the Harijans, to whom do they turn? To soothsayers, faquirs and fake mullas. They turn to them and fall prey to their wiles. For these sellers of God see an easy path for themselves.

The arguments which I have tried to put forth I sincerely hope, also lead to the conclusion that we cannot even hope to ask Muslims to reform themselves from within when they are pushed into their shells by the forces of history and the social structures from without. The Prime Minister has given a lead in the matter. We must wait to see what fruit it will bear. Professor Nurul Hasan's recent speech in Parliament gives hope that there will be an overhaul of the educational system for all. While the parents and the family have every right to impart the proper ritual and religious instruction, the state must make up its mind to have a standard and high-quality system of education for all, not just a privileged few. This enlightenment will, I know, if carried out with diligence and consistency, break like the mid-day sun through the clouds of tradition, prejudice, pride and superstition. This is the only path to the 21st century, not only for the Muslims but for all. This is the only path of higher thinking, higher technology, and so, to higher living.

(The Secularist (December 1971, 18-20))

७.१० PROBLEMS OF INDIAN MUSLIMS
– Hamid Dalwai

(इंडियन सेक्युलर सोसायटी मुंबई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्या वतीने 'फॉरवर्ड लुकींग मुस्लीम कॉन्फरन्स' नवी दिल्ली येथील गांधी पीस फाउंडेशन येथे दिनांक ४ व ५ डिसेंबर १९७१ रोजी आयोजित करण्यात आली होते. या कॉन्फरन्समध्ये हमीद दलवाई आणि इतर वक्त्यांनी मानलेल्या विचारांचे टिपण जसेच्या तसे इंग्रजीमध्ये परिशिष्टात घेतले आहे.)

Background Note for the Conference of Forward-Looking Muslims held at Delhi on December 4-5, 1971

This note purports to set forth in broad outlines the problems that confront the Muslims, in particular, those touching their social life. The note is not exhaustive and certainly not as well documented as I would wish for. A word before I come to the subject. I do not suggest that communities other than Muslims have no problems. Nor is it my view that some of the problems sketched below can be solved only if the Muslims make an effort. Nonetheless it is proper to realise that unless the community comprehends its malaise and makes determined efforts to rejuvenate itself, there is no hope for it but to live for ever as inferiors and in permanent insecurity.

The seeming inconsistency in the first paragraph needs to be explained. Hostility and callous indifference to reform is not the monopoly of reactionaries and no-changers in the Muslim community. But unfortunately, amongst Muslims, this resistance to change is coupled with a determined effort on the part of some to create a vested interest in backwardness. We thus see the curious spectacle of Muslim organizations banding together for political influence and totally ignoring poverty, backwardness and such basic ills as afflict the community. Politics with its usual deleterious results. As on the purely political plane, groups have sprung up to preserve the outmoded and pernicious in all fields. Let's this should be considered an exaggeration, let me quote a few examples from recent history. Sir Syed Ahmad Khan was the first to

realise the need for the spread of English education amongst Indian Muslims. But what led him to bestir himself was an element of envy. It was the sight of Hindus flocking to English schools and government service in large numbers which led him to canvass the same for Muslims. Modern education can and has worked many wonders amongst whole groups of people. But to propagate the virtues of education without making an effort to eradicate superstition, legal anamolies and fanaticism begotten by religion, cannot attain the desired result. An outstanding example of this lop-sided effort is the mind of Mohammed Ali Jinnah. He had a completely secular education, was disdainful of the totems and taboos prevailing in the community and had worked with leaders of other communities. All this was forgotten when he set out to make a mark in politics. To gain ascendancy in politics, Jinnah advocated and accepted the division of the country though he knew then and later that this would be a calamity for the community which had been misled into acclaiming him as its Saviour. In the craze for a place in the political sun, Jinnah paid no heed to such social evils as purdah, polygamy and the inquitous divorce law. Needless to say, he made no effort to modernize the Muslim mind. The nationalist Muslims also committed the same mistake. Maulana Azad and Dr Zakir Husain, to name the most eminent amongst them said nothing on these vital problems. I would submit that the Muslims today have greater need to concentrate on basic problems, though here also the political element has to be squarely faced. The need for the people to come to the fore is great, for the politicians and the administration are either hostile or indifferent to the need for change.

From birth till death, a Muslim is cramped by a system he does not comprehend but is expected to be loyal to. Family planning is a recognized need of the times and no one seriously suggests that any group or nation can do without it. What has representative Muslim opinion to say on this question? The stock answer is that birth control is politically inexpedient in India and, moreover, a sin according to the theology. Neither argument bears serious scrutiny. The result is reckless procreation followed by a miserable and brutish existence for the average family, especially its womenfolk and children. The sheer size of the family makes it difficult

for the wage-earner to ensure more than a marginal subsistence for himself and his dependents.

The need for a clean and healthy environment at home is obvious. But sanitation and ventilation are strangers to an ordinary Muslim home. What is a Muslim told about these elementary matters? Bathing on Fridays and important festivals and wetting of some limbs of the body five times a day are supposed to suffice for the 'pure' Muslims. Cleansing of homes, streets and localities as a daily ritual, or at least doing nothing to add to the litter, is not a subject of discussion in the community. The result is that the dirtiest part of every village or city is that in which Muslims preponderate. As to ventilation, homes are kept tightly sealed for ensuring that no one breaches the purdah considered so essential for females. Veiling of women is a must. Indeed, there are certain periodicals like Hareem which emphasize this as the First Commandment for Muslim women. How ridiculous this adherence to convention in a modern society can be is best depicted by the familiar sight of burqah-clad ladies moving about unveiled in every city. No harm would be done by discarding the purdah instead of indulging in dubious compromises which are inevitable if outmoded theory is to be the guideline for all times to come.

The plight of Muslim children can be realised only if seen. Large families hamper the parents check over the children. Lack of education and the civilising influence of decent social intercourse make the parents an unbecoming model for their children. At a very young age the children's vocabulary is enriched by offensive words and abuses. Gambling, playing truant in schools, smoking, visiting cinemas and ogling women are pastimes to which Muslim boys take at a tender age. When this leads to a confrontation with children of other communities, the result more often than one would like to believe is the generation of dangerous tensions, if not an outright riot. Yet the care and upbringing of children has never troubled the so-called representatives of the community.

The picture is little different if one moves to Muslim schools and colleges. No wonder, for the heroes held up for emulation before the se

impressionable children are the blood-thirsty Aurangzeb, Mulla Do Pyaze and a host of fanatics who are supposed to have worsted the infidels in imaginery encounters. The problem of education for Muslims is in a class by itself. First, is the question whether these parochial schools should exist in a secular state? I can see no justification for such schools, especially those run by Muslims and a few other communities as insular as them. But that apart, and even if their existence is justified for some specious reason, where is the need to impart instruction through the Urdu medium? Insistence upon Urdu as the medium of instruction for Muslims everywhere is the height of folly. It yields no returns to those so educated. Jobs for those proficient in Urdu are virtually non-existent unless Muslim educational institutions and Urdu magazines be deemed the only source of employment for Muslims. That obviously they are not and cannot be. Yet Urdu schools continue and are spreading in regions like Kerala, Tamil Nadu, Bengal and Mysore where once they were not even dreamt of. The consequence is that a Muslim educated in an Urdu school has no qualifications for a career in the region in which he has to live or work. The pity of it is that this short-sighted policy is followed in the name of preserving Muslim culture and the supposed mother tongue of all Muslims. Urdu is not the mother tongue of more than a handful in cities in northern India. Proficiency in Urdu presents an insuperable obstacle to Muslims from almost all regions of the country. As to preservation of Muslim culture, it is not associated with Urdu. Even otherwise, it is first necessary to secure acceptability in the land where one lives rather than attempting a futile cultural homogeneity with a non-existent cultural grouping. I am not against the teaching of Urdu, Arabic and Persian as languages, provided there is a clear understanding that these are mere languages with nothing sacrosanct about them. But none of these can be the language in which all subjects are to be taught. Distortions based on fanaticism or ignorance should not be part of a child's curriculum. The very purpose of education is to broaden the mind of the child. Total lack of schooling would certainly be preferable to feeding misinformation about Muslims as also about other people. The evil is much too deep-seated and I would advocate Muslim students

flocking to non-denominational schools or even those run by other communities the latter provided they do not have its own variant of chauvinism.

Reforms in the personal law are a crying need of the community. Polygamy in the present times is an anachronism. It survives among Indian Muslims solely because of perverse secularism. The ease with which a male can divorce his wife and the corresponding difficulty in the path of the female is another 'privilege' left untouched because of political considerations. The Hindu Code has done wonders in mancipating Hindu society. Yet barbaric remnants of a feudal society govern the life of Indian Muslims. Instead of congratulating the agitators for the preservation of these features and the government for its non-interference, there should have been a hue and cry against depriving Muslims of their legitimate right to a share in the fruits of modernity. Legislation regulating public trusts has somewhat eased the position of religious and charitable trusts. Though checked, the Mutawallis and Managers continue to enrich themselves at the expense of the community. Misuse of funds, whether on account of a desire to conform to conventions or outright misappropriation, has to be prevented. Such instances have to be exposed and widely publicised. To shield the malefactor in this or the co-operative and educational fields is to connive at and encourage crime. Misplaced notions about the need for restraint so as to enable the community to deal with its criminals or prevent the washing of dirty linen in the public gaze can do nothing but harm. There can be no autonomy in matters like these, and the administration has to act where the law has been violated.

A curious attitude is discernible in dealing with priests and mendicants. Most of them are human beings earning a living by the only method known to them. Neither are they entitled to claim reverence, nor should it in any degree be conferred on them. While the small fry amongst them live on pittances, quite a few exact tribute from their devotees and lead wasteful lives in the only way they know. Until the state evolves an overall approach to the problem of beggary we must rely on public opinion to rid the community of parasites. Charity to the disabled or the

unfortunate should not be extended to cover able-bodied loafers who prattle glibly on great sainte and the glory of Islam. Those who profess to utilise offerings made unto them, or to the tombe and shrines they look after, should be compelled to constitute and work with trustees of the wealth accumulated by them so that it is utilized for decorving causes. The rule of oligarchs in the name of preserving the homogeneity of different sects has to be ended. The wealth they have accumulated may not be available but notice should be served on them that no longer shall them exect tribute for their personal glorification. Their fettered right to excommunicate anyone not to their liking must be fettered. Mosques, Rest Houses, Feeding Houses and graveyards shall be opened to all and not for a price whether in terms of financial or pseudo-spiritual.

Humanising the Muslim mind as opposed to its communalisation is a great need. Twenty-five years after the partition of India, the average Muslim still reacts erratically to events and movements. The burning of the Al-Aqsa mosque and the treatment meted out to Arabs in lands occupied by Israel excites him to a feverish pitch. But no pity is wasted on the outrages of the Yahya regime against the people of Bangla Desh and the killings of Jews and communists in Iraq and Indonesia, not to mention the periodical blood-letting among the Arab a themselves. Let's this dichotomy be considered essential in the cause of Jehad, it is necessary to remember that there have not been any holy wars after the first century of Islam. For a change, Muslim would do well to remember that they are human beings first and Muslims next. When assessing killings and violence it will be better to cast off the communal blinkers. Certain organizations have had a baneful effect on the community. They have been gaining an alarming ascendancy in the body politic. The Jamaat-e-Islami, the Muslim League, the Muslim Majlis, the Tamir-e-Millat and the Jamaat-e-Tabligh are the better known among them. All these bodies need to be watched carefully if not totally banned. Political parties for their own ends have temporised with some of these organisations. To the eternal shame of the Indian people, one of these bodies is a constituent of a United Front that rules a State in India. Harangues against communalism sound hollow when the premier

organisation in the country joins hands with the spiritual heir of Mohammed Ali Jinnah. These bodies have enabled few leaders to secure the sceptre of power and little more. A free and liberty-loving nation cannot allow such organisations to peddle their pernicious creed in the name of protecting minority interests. These organizations together with their counterparts in other communities need to be banned. Muslims in particular should be in the forefront of those making this demand. The minority organizations are not furthering their interests but endangering them.

Lastly, there is the need for assimilation with the other people of this country and, in fact, with humanity at large. All those who advocate the preservation of the separate identity of the community are its enemies. The community as such is left with only one common ground, a heritage of fanaticism, ignorance, exploitation, and in recent years a dreadful feeling of insecurity. This can and will go only if the community recognizes its problems, failings and true needs. An extensive overhauling of its institutions and attitudes is necessary to attain equality with the other communities. These communities are ever advancing for they passed the take-off stage long ago, whereas the Muslims seem to be nowhere near it. In a fast-changing universe nothing remains stationary--least of all, outmoded ways and ideas.

७.?? Speech Delivered by Mahabubul Hok

Indian Secular Society, Bombay
Muslim Satyshodhak Mandal, Poona
Conference of Forward-Looking Muslims
New Delhi, December 4-5, 1971
Gandhi Peace Foundation
223 Deen Dayal Upadhyaya Marg, New Delhi – 1

Sabhapatiji, Bahinon aur Bhaion:

May I not be misunderstood. I am not a Muslim. I have an Arabic name as I was born of Muslim parentage. Spiritual experiences and consequent search for truth led to my renounciation of Islam in 1965. In March 1970, I declared in a Pakistani Military Court that I was not a Muslim. Last September Shri M.R.A. Baig, President of the Muslim Progressive Group, New Delhi, invited me to become a member of the Society. I declined to do so as the Group was called Muslim. When my friend Shri Hamid Dalwai invited me to attend this conference of Forward-Looking Muslims I told him that I could join it as a non-Muslim. He confirmed the invitation and promoted me as a speaker.

So, I speak before an assembly of Forward-Looking Muslims who suffer from self-contradiction or lack of courage to abandon either forward look or Muslimhood. Am I impolite? Am I impertinent? Is truth impolite? Is truth impertinent? I am only telling the truth.

Necessary truth has to be made known however unpalatable it may be. This gathering, I understand, is concerned with the emancipation of Muslim community from backwardness, I do hope, its organisers are not driven by communal, Party or group rivalry, they are not motivated by personal ambition or selfish ends. I also do hope that the Muslims of this assembly are desirous to know why their community continues to belong to a rear column in the procession of life towards nobler humanity.

I have read the background note for this Conference, Problems of the Indian Muslims, written by its President. One may not ignore the necessity

of knowing the characters and failures of Sir Syed Ahmed, Mohammad Ali Jinnah, Maulana Azad, Zakir Hussain and their like. Problems of family planning, sanitation, purdah, Urdu, marriage, divorce, wakf etc. may also trouble those who are concerned about the Muslim community and progress of India. But we must fail, like those we have mentioned, to effect a real change in the outlook of those known as Muslims unless we go deeper to find out the root causes of their backwardness. And we must try to know ourselves.

Poverty and present economic system of the country are roots of most of the evils in India Society. At school we read poem named Death the Levellor. In India the leveller is poverty. There is no question of Hindu, Muslim, Sikh, Buddhist or Jain all of them groan under poverty. When the vast majority of this super-nation is landless, shelterless, unfed or underfed, uneducated, jobless and sick a minority section of the people enjoys a luxurious life that the nation cannot afford. And to this minority section belong members of all religious communities. In India this unjust economic system is the greatest hindrance to the progress of the people. Sometimes the protectors of this system themselves create communal and other disturbances to divert the attention of the poor when they struggle to change the system.

But ignorance and fanaticism make people so blind that they do not see how they are exploited even in the name of the religion to which they belong. Ignorance dose not give way to formal institutional education, Nay, men are an ignorant lot. We know so little about self, life, God and the Universe. Yet, reasoning and quest for truth may give us the knowledge that may improve us.

Syed Ahmed, Iqbal, Jinnah, Moulana Azad and Maulana Moudoodi are great Muslim leadars and thinkers of the nineteenth and twentieth century India. But while some of them knew very little about the Holy Book of Islam others did not try to know it in the true perspective. They were either trumpeters or hawkers of Islam. They seldom questiond its authority and never challenged its validity. They surrendered to the dictatorship of obsolence.

Were they prudent and realist in not questioning so? Was Mohammad

stupid and unrealist in questioning and rejecting idolatry? Like all seekers after truth we must have the intelligence, courage and will to question the authority and reject it if it in harmful to the progress of humanity.

The Muslim society is bound by the Koranic laws. The Koran is extraordinarily rigid. No Muslim can amend or repeal any of the Koranic laws. We shall come to this question later. For, the immediate question is: did any corruption creap into the Koran itself?

I do not intend to discuss here the nature and character of divine revelation. Every prophet, indeed every individual, understands God's truth and knowledge according to the capacity of his own intelligence. Every prophet is a human being and to error is human. Times and again Mohammad declared himself to be an ordinary man and subject to error. I do not doubt the honesty of any prophet, nor of Mohammad. But was the compiler of the Koran an honest man?

Osman, the third Caliph of Islam, was one of the most corrupt early Muslim rulers. It was he who arranged the compilation of the Koran as we see it now. Mohammad translated the divine relations into a human language but he could not leave it in the form of a book in his life time. The Koranic verses were with the friend-followers of the prophet. Twelve years had passed since the death of the prophet in 632 A.D. to the ascendency of Osman to caliphate in 644 A.D. but the Koranic verses were not collected into a body. Some of the friends, associates and followers of the prophet, like Abu Baker and Omar, also had died. There appeared not only rival prophets but also a vast number of people who claimed to possess the revelations received by Mohammed. Ali, who claimed to be the successor of the prophet, was clamouring for power like Shri Bhutto of Pakistan. In the face of opposition from Ali and his supporters Osman had recourse to bribary and napotion to maintain power. It became his duty to protect infant Islam from the onslaught of rival prophet's propaganda. Also, he had to stop the controversy over the possession of the Koranic verses.

Under such circumstances Osman, the corrupt politician, set up a Commission to compile the Koran. Does the nature of present and post Arab political system suggest that in such a commission the political

opponents found places? But among such opponents were the prophets' close relatives and followers who, in every possibility, might have possessed some Koranic verses and who, once on the commission, might oppose corruption of any nature. For the sake of expediency could not a character like Osman affect some alterntion in or rejection of the revelations? Could not there be oven inclusion of some verses which were never pronounced by the prophet?

As for rejection we take the following instance. "When the task of compilation of the Koran was in progress once a Muslim came to Ali and said, 'have you heard that an ayat of Sura Ajhab is lost? Osman has asked all the hafizs to assemble at a place.' Ali replied, 'Well done. The Muslim said again, Omar's daughter Hafsa has a Koran in her possession in which we have seen those adulterers, both men and women, have to be killed by throwing stones. Ibn Masud acknowledges that he heard the prophet reciting the ayat". (Shamsul Alam Biplabi Sahaba Abu Jar Giffari in Bengali – p. 26. Abu Jar Giffari Society of Pakistan, Dacon, July 1967). But the Koran which we have received from the Commission of Usman prescribes flogging (100 stripes) for adultery.

As for inclusion we may refer to the verse which declares Mohammad as the last prophet. If this claim was in fact made by Mohammad himself then I am inclined to say that Mohammad misunderstood the divine revelation. There is ample scope for such misunderstanding. Time and again Mohammad said that as a human being he too might commit mistakes. But, most probably, the verse was introduced into the Koran by Osman's Commission to insulate the faith of the Muslims against the claim of the contemporary rival prophets. In any case, the truth is that Mohammad is not the last prophet of mankind.

Now to the question of amendment or annulment of the provision of the Koran handed over to us by the commission of Osman. The Koran says:

This day have I
Perfected your religion
For you, completed
My favour upon you,

And have chosen for you Islam as your religion. (5.4)

The Koranic laws which completed the religion are fixed, static or immobile – they can neither annuled. For the Koran says:

And when the Koran
Is read to them, they
Fall not prostrate,
But on the contrary

The unbelievers reject (84. 21–22). Only 'unbelievers' can reject, repeal, amend or supersede the principles of the Koran. When a Muslim does so he Kafir an unbeliever.

Under these Koranic injuctions the Muslims are compelled to follow each and every Koranic law. If they do not do so and follow different laws they become non–Muslims. Examples of few Koranic laws to show their irrelevence to any human society of our time.

The Koran says that the Muslims cannot fight four months of Zul–qa'd, Zul–Haj, Moharram and Rajab. This not an original law of Islam. It was a custom of Islamic Arab tribes not to fight in those months. The Prophet Mohammad reached an agreement with idolatrous tribes and accepted the custom. So, it became a Koranic law. But is is possible in a complex modern world to follow this law? Even the earlier Muslims could not do so. They fought between themselves the battle of Karbala in the month of Muharram. There is an Urdu saying about this struggle for power: "Islam jinda hota hai har Karbala Kay bad". Perhaps, the modern protector of Islam, General Yahya Khan of Islamabad, was also imbued with the spirit of this Urdu message when he started a war against the Bengalis in last Moharram. But he either forgot the Koranic probibition or trampeled over the Koran when he created another Karbala in Bangladesh.

The Koran prohibits a faithful Muslim to kill another faithful Muslim. There had been so many declared and undeclared wars among the Muslim states themselves. Say, today Pakistan declares a war against India. In Indian army there may be hundreds of faithful Muslims. With

the declaration of war shall Maulana Maudoodi or Maulana Abul Lais also issue a fatwa to the effect that all Muslims belonging to the Indian army are Kafirs? Or, in case of a war between Afghanistan and Pakistan shall each declare the other a land of the Kafirs? Or, were all of them Kafirs who were killed by the Pakistani army in Bangladesh? When the prophet promulgated this law there was not a second Muslim State. And if we look at it from another angle may we suppose that the law suggests permission to faithful Muslim to kill the unfaithful? Or, will there be a difference in punishment when a faithful Muslim kills another faithful Muslim, and a second faithful Muslim kills a Kafir?

The Koran prescribes amputation for fighting against God and prophet. Why was such fighting considered so henious a crime? How many people knew or know about the existence of God? How many of them understood or understand what was or is divine revelation and prophethood? Was not this law meant to terrorise and supress the opposition against Mohammad's claim to prophethood? And if war could be waged in the name of God and prophet, why should war against them be judged so low?

The Koran prescribes amputation also for theft. Spiritual activities may be responsible for any crime. Unless one becomes conscious about such activities of the unseen hand and develops self-restraint, the uneducated, uncultured and reckless mind remains susceptible to crime. There is something more in the crime of theft. In many cases poverty drives people to a crime like stealing in a society which cannot provide food, shelter and security to every member of the society. A society only exposes its injustice when it cannot guarantee food, shelter and economic Solvency but prescribes punishment for theft. It is argued that amputation was prescribed as a deterrent. But we know that even the cruellest punishment cannot eradicate a crime altogether. In our time amputation of any human being, even of an animal, is considered an act of barbarism. From economic point of view, the limbless becomes a burden to the society or state. Usually, he cannot do anything productive. He loses his natural ability to work, physical beauty and mental power.

There are many such laws in the Koran, particularly, relating to the

status of Women, which are not only obsolte but also harmful to any society. But the Koran commands that every Muslim should follow its laws.

I ask not only the 'Forward-Looking Muslims' present here but all the Muslims of the world : Are you willing to support and follow the harmful Koranic laws? You, the forward-looking Muslims of India, want to reform the Muslim society. But before that Islam itself needs reformation which the Koran strongly forbids. Enjoying the benefits of all non-Muslim contributions to modern science and civilization, but constantly and consistantly violating the laws of the Koran, only the unreasonably sentimental, the ignorant and the hypocrites can call themselves Muslims. Yet, their prejudice for the Koran keeps them fanatics. Unless the thought of the people is not changed what effects will the reformations have? You want better sanitation and clean healthy environment for the ordinary Muslim. But there are many educated rich Musline who live in a clean healthy environment with all modern means of sanitation and luxury. Does their outer change make any difference? Are not some of them leaders of the Muslim Community? Don't they inject communalism among the ordinary Muslims? Won't they become the strongest barrier on the way to the people who might honestly try to emancipate those who are known to be Muslims?

You call yourselves "Forward-Looking Muslims". This is a self-contradictory concept and it reflects your own psychological contradictions. A Muslim cannot look forward, for, his sight is obstructed by the Koran. When he defies such obctruction and continues to look forward he ceases to be a Muslim. Only, for lack of courage and strength he cannot declare so.

Even after renouncing Islam why should one look only forward? Look forward, backward, sideways, downword and upward also. Look to the right, to the left, all around, to the depth of the sea, to the sun. And, look at your own self.

You are Indians. This land of India gave birth to so many courageous seekers after truth. The youth of India must uphold that tradition. Youth is not limited by age; it's an energy, an outlook which may be lost at

twenty and retained even after hundred. India has to play her rightful role in the community of nations; again, she has to hold high the torch of noble humanity. I hope, the Indians will prove worthy of their tasks.

MAHBUBUL HOK

(Speech delivered at the Conference of Forward-Looking Muslims, New Delhi, December 4-5, 1971)

७.११ Presidential Address by Hamid Dalwai

Indian Secular Society, Bombay
Muslim Satyshodhak Mandal, Poona
Conference of Forward-Looking Muslims,
New Delhi, December 4-5, 1971

Friends, Let me at the outset thank the Indian Secular Society for the great honour they have done me in asking me to preside over this Conference. Friends who have gathered here from various parts of India are united with each other and with the Indian Secular Society by the common bond of a shared point of view. I also share this point of you and I feel happy and proud to belong to this fraternity. We are here as Professor A. B. Shah, the President of the Indian Secular Society has just explained to us, to pursue the possibility of bringing on a common all-India platform for all muslims who are convinced that modernization of Muslim society is the only effective way of solving its problems. The establishment of such a platform will help Muslims to emerge from their present condition of isolation and despair, give them a new hope and courage, and give a lead tackling their own problems in the problems of the country from the secular point of view, within the framework of a free, egalitarian, secular society. It is this thought and hope which lie behind the effort to organise this Conference.

I do not want to enter into the bitter and tragic history of Hindu-Muslim tensions in this sub-continent, leading to the acceptance of partition as a remedy which has proved worse than the disease. It is a familiar enough story. What is more pertinent is the fact that the Muslim society has not been able successfully to face the challenges with which it was confronted in post-Independence India. We must identify the causes of this failure, for in the absence of this understanding it will not be possible for us to deal effectively with our problems.

Before independence, all sections of Indian Muslims were united in the belief that establishment of a separate state of their own was a

panacea for all their problems. There were different currents of thought prevalent in different sections and strata of the Muslim society though most of them converged on the demand for Pakistan. One line of thinking was that as Muslims were denied recognition as a political entity enjoying parity with the majority community, they were left with no alternative to establishing a state of their own. Others thought that in a united India Muslims all over the sub-continent were bound to remain perpetually at the mercy of the Hindu community. The establishment of the sovereign state of Pakistan would not only liberate a section of Muslims from this thraldom; it would also bring about some kind of parity between Hindus and Muslims by reducing both communities to the position of a minority in one of the two successor states. Muslims who were to remain in India were called upon to sacrifice their security and welfare to ensure a glorious future for fellow-Muslims who would constitute the majority in Pakistan. But they were also assured that the establishment of Pakistan was the only way in which their safety and welfare could be assured. Hindus in Pakistan would be hostages to a secure future for Muslims in India and, the more fair-minded among the champions of this theory would perhaps have added, vice versa. A few liberal, secular Muslim leaders did raise their voice against separatist Muslim nationalism but it remained feeble.

I do not claim to be conversant with the subtleties of sophisticated political theory. I am not a thinker or a theoretician or an academician. I am an ordinary social worker, and have some concern for the state of the society to which I belong. I want merely to place before you the conclusions forced on me by my experience of the Muslim mind and its dominant attitudes, which I have gathered in the course of my social work. The conclusion appears to be inescapable to me that the reasons I have just enumerated are not the only or even the most powerful ones which impelled Muslim society to adopt the doctrine of its separate nationhood. Any such belief would amount to nothing less than self-deception on the part of Muslims. That Muslim society is a nation in itself is a belief firmly rooted in the Muslim mind. History tells us that a people who believe they to be a nation will not rest till they have made

their nationhood a reality in the form of a politically sovereign state. The demand for a sovereign state as an embodiment of its separate nationhood is irrespective of whether the people have received just or unjust treatment at the hands of others. Obviously, such a state can come into existence only in a territory in which this people have a majority. This accounts for the emergence of Pakistan as a sovereign state and its boundaries. To imagine that a section of the people who till the other day fervently believed in their separate nationhood would readily and entirely shed this belief merely because it finds itself in the position of a numerical minority in India would not only be to fly in the face of human nature; it will also give us a distorted picture of the nature of the problems facing Indian Muslims.

Any discerning spectator will be convinced that Muslim politics in post-Independence era continues to be based on the conception that Muslims constitute separate nation. The persistent attempts to organize Muslims into a solid political group cannot be explained in any other way. Muslims continue to regard themselves as an autonomous society within the nation. It is quite true that partition far from proving to be a solution to the Muslim problem has only aggravated it. But it is simply not true that there was a happy solution waiting round the corner only if partition had been avoided. For the Muslims demanded parity as the price for remaining in a politically united India and surely this was an impossible demand. There is no precedent anywhere in the world for granting parity to a minority or any group. The only unexceptionable way to integrate a minority of peoples within nation is to grant equal citizenship to everyone.

The reasons why partition aggravated the problems of Indian Muslims are many. In the first place the relations between Pakistan and India were never happy. And there is no hope of their improving so long as the rulers of Pakistan are not prepared to give up their territorial ambitions and their age-old anti-Hindu prejudices. Now that the revolt in Bangladesh is threatening the very existence and unity of Pakistan, Indo-Pak relations have ceased to have any relevance to the problem of the security and future of Indian Muslims. There is a real possibility that the emergence of

Bangladesh as a sovereign, democratic state will give a new and hopeful turn to Hindu-Muslim relations. Whatever validity the obnoxious 'hostages' theory ever had has been drained away by the fiendish decimation of Hindus in Pakistan, within three months of the creation of Pakistan almost all Hindus and Sikhs were driven out of Pakistan. Then started a steady exodus of Hindus from East Bengal with occasional spurts. Of the nearly 10,000,000 refugees who have fled from the terror deliberately let loose by the Pakistani army in Bangladesh to crush the freedom struggle, 6,500,000 are Hindus. The number of Hindus and Sikhs residing in Pakistan when it came into existence was 16,000,000. Bearing in mind the rate of growth of population in this sub-continent, their strength should have gone up during the last 24 years to about 25,000,000. If one takes into account the number of recent Hindu refugees who have crossed into India, the total strength of the Hindus left in Pakistan cannot be put higher than 3,500,000. This means that Pakistan expelled more than 75 per cent of its minorities. As against this there were 40,000,000 Muslims in India at the time of partition.

According to the 1971 census this figure has gone up to 65,000,000. One of the ostensible reasons behind the demand for a separate state for Muslims was their fear that they would never receive justice at the hands of the Hindus who would always enjoy a brute-majority in undivided India. It will be difficult to say that the Islamic state of Pakistan has set a model of fair and generous treatment of minorities.

The response of Indian Muslims to the struggle for liberation of Bangladesh has also been rather strange. Apart from a few stray individuals and some minor organizations, all Muslim political organizations have rushed to the defence of and have been at considerable pains to justify and even extol the actions of the ruling junta in West Pakistan. Muslims resent the remark that they do not yet seem to have joined without reservations the mainstream of Indian national life. But the fact that when the entire people of India and all political parties are united in supporting the heroic struggle for democracy and human rights that is going on in Bangladesh, only the Muslim public opinion should sound a discordant note seems clearly to indicate that Muslims have not

yet identified themselves with the mainstream of the national life.

It is against the background of these facts that I would like to offer a few remarks on some of the problems facing Indian Muslims. It appears to me that the main challenge before the Muslim community in India is to establish relations with other communities on the basis of equality within the framework of a secular nation. It is a sad fact that Muslims have not yet faced up to this challenge. Nor have they shown the courage necessary for transforming their tradition-bound social structure in accordance with the modern values of individual freedom and social equality. Transformation of the Muslim society and establishment of egalitarian relations with non-Muslim communities in India are not so much two distinct challenges as two sides of the same challenge. For the Muslim reluctance to face them is basically due to their rejection of the concept of equality of individuals. It will just not do to brush aside such criticism by repeating the stock assertion that Islam was the first religion to preach and practise equality. In fact, no religion has shown much concern for the rights of the individual and Islam is no exception. Islam discriminates between men and women, and the awareness of the distinction between a believer and a non-believer has always been rather intense in the Muslim mind. Islamic doctrine does recognise and sanction this distinction and it has often found extreme expression in the actual practice of Muslim individuals and groups. Whenever Muslims are in a majority they have refused to recognize the equal rights of non-Muslim minorities and where they are in a minority they have been generally reluctant to regard themselves as part and parcel of a non-religious nation. The recent revolts of Muslims in the Philippines, Thailand and Ethiopia are merely expressions of the Muslim unwillingness to participate in a common social order on equal terms with others and this unwillingness is rooted in a long and deeply entrenched historical and religious tradition.

It will be useful to examine this question in depth. The fact that Muslims constantly raise the flag of separate nationhood has something to do with the form Muslim society assumed when Islam first became established as a distinct religion. Right from its beginning Islam has been characterised by unification of spiritual authority and temporal power. Muslim society

has therefore become historically conditioned to regard sovereign political power as one of its inalienable rights. This is the real reason why when Muslims are in a minority in a country they are generally at odds with its nationalism which seeks to integrate its diverse elements into a common nation. The demand for Pakistan can be traced to this historically conditioned mentality. The restiveness of Muslim communities in the Philippines, Thailand and Ethiopia which occasionally express itself in open rebellion is rooted in the same mentality as also accounts for the separation of Indian Muslims.

It must be emphasised that it is not a feature peculiar to the Muslim society that its mind and outlook have been conditioned by its history and traditions, there was a time when the Christian society exhibited this feature and so did the Hindu society until very recently. However the Christian society has succeeded in emancipating itself from the narrowness and particularism of its tradition and in basing itself on universal human values. This it could do because of the powerful impact made on it by the movement of renaissance which proclaimed the values of free, critical inquiry and human creativity. The Hindu society is also progressing steadily if slowly in the same direction. If the Muslim society is also doing so it must be confessed that its progress is so slow as to be almost imperceptible. One example should suffice to illustrate the point I am making. When the recent exodus from Bangladesh started Christian missionary organisations were the first to rush to the scene to alleviate human suffering. The Ramkishna Missions have a long tradition of bringing succour and solace to the victims of man-made or natural calamities irrespective of their caste and creed. The Ramkrishna Mission has also been working in the same spirit in this sub-continent. But it is significant that there is no Muslim religious organisation which works in the same spirit, trying to help human beings in distress irrespective of their caste or creed. It is significant because it is symptomatic of the lack of concern for human values displayed by contemporary Muslim society.

By and large Muslims have not yet mentally accepted the need for the separation of religion from Government and the state. Theologians refuse to countenance such separation and even educated Muslims on

whom their religious faith sits lightly but who are prone to seek mental security in a collectivist Muslim nationalism reject it. It would be wrong to conclude that just because educated Muslims are not very religious they must therefore be secular. Jinnah was not particularly religious but neither was he secular. And it would appear that the thought and actions of the educated Indian Muslims of today have been profoundly influenced by the example of Jinnah, whom they seem to have taken as a model. Jinnah, because of his loyalty to Muslim collectivism continued even after the creation of Pakistan, to be exclusively concerned with the welfare of the Muslims. Even today eminent political leaders like Dr A.J. Faridi, Mr Baddruddin Tyabji, Sheikh Abdullah, Mr Mohammed Ismail and political commentators like Mr A.G. Noorani continue to play the same game with varying skill and finess.

This tendency to accord supremacy to a collectivist loyalty to Islam, to which every other consideration is sought to be subordinated, and the resulting indifference to human values are by no means confined to Indian Muslims alone. Muslim communities everywhere in the world display the same attitude. When Muslims stage a revolt in the Philippines, or when there is a riot in Ahmedabad, the chief theologian of the Al Azhar University of Cairo raises his voice in protest, bemoans the massacres of Muslims and condemns the governments of the Philippines and India. But when West Pakistanis, who after all constitute a minority of the population of Pakistan, massacre East Bangalis the same divine feels no hesitation in defending this inhuman action as necessary for maintaining the integrity of Pakistan.

Spokesman of Muslim nations and organisations habitually adopt double standards when faced with situations of this kind. This is strikingly illustrated by the curious resolution passed by the Afro-Asian Muslim Conference which met at Jakarta in 1964. This resolution demanded for Muslim minorities in all countries their fundamental rights recognised by the United Nations Charter of Human Rights. So far, very good. But for non-Muslim minorities in Islamic countries it asked for a fair and just treatment in accordance with the ideals of Islam. This kind of double-talk is sufficient evidence to convince a person like me of the fairness of

the remark made by G.E. von Grunebaum in his Modern Islam that Muslim society is 'essentially humanistic.'

The fact is that Muslim society has not yet thrown up in significant number individuals who are genuinely committed to liberalism and humanism. It continues to be a tribal society held together by a collectivist loyalty. Even educated Muslims whose religious faith is often skin-deep rarely rise to a broad, humanint outlook. Their sensitivity to human suffering as human suffering is as yet feeble. This is perhaps the reason why even a person like Badshah Khan, who was a close associate of Gandhi, while commenting on current happenings in Pakistan expresses his sorrow over the massaore of Muslims by Muslims. The cruelty to which innocent and helpless Hindus are being subjected is apparently a matter beneath his notice. The resolution passed by the Jamia Millia Islamia of Delhi also confines the expression of its unhappiness to the fact that 'Muslims were killing Muslims'. Some Muslim leaders have indeed made a reference to the atrocities against the Hindus. Such things, according to them, are condemnable because they tarnish the high ideals of Islam. In view of the uniformly unfair treatment meted out by Muslim societies to others everywhere in the world, one feels compelled to ask : That precisely are these high ideals of Islam? Surely the actual practice of the persons following a religion provides a much more reliable guide to its values than their professions. If this criterion is adopted then surely religious fanaticism expressing itself in religious persecution will have considerable claim to be recognised as one of the ideals of Islam.

Curiously enough, this is a point where the two extremes-viz. the so-called liberal Muslims and Sanatani Hindus--meet, Sanatani Hindus, while trying their best all the while to make Hindus intolerant, are constantly proclaiming that Gandhiji never asserted that Hindus were as a matter of fact, tolerant. He only insisted that they should cultivate tolerance. To assert that Muslims in their actual practice are committed to high, humanitarian ideals would amount to fostering the anti-humanitarian tendencies entrenched in the Muslim society. Jinnah, for instance, averred that love of justice was a part of Islam. It is a misfortune of the Muslim society that a Muslim Gandhi who would insist on Muslims

cultivating love of justice is yet to be born in it.

The problems of Indian Muslims are rooted in this predicament of Islam. So long as Muslims do not acquire a genuinely secular outlook and a concern for human values, so long as they do not develop a capacity for viewing their own problems and the problems of others with whom they have to live in intimacy in the framework of human values, their situation is bound to remain unaltered. The remedies which have been suggested or applied so far were superficial. They never sought to induce in Muslims an introspective mood or to transform radically their outlook. The Muslim mind remains un-touched by modern thought and values. I am convinced that a new Muslim mind can emerge only if the Muslim society experiences an authentic renaissance.

While all this is true and needs to be said one must not ignore other relevant aspects of the situation. One must not be so very naive as to imagine that secularising Muslim society will by itself provide a final solution to all their problems. There are situations in which any amount of reason, good sense and accommodation displayed by a minority is of no avail against the fanaticism and exclusiveness of the majority community Hitler's Germany and Pakistan are examples that come readily to mind. Jews were either massacred in Germany or flushed out and the fate of Hindus in Pakistan has not been very dissimilar. What happened in Germany and Pakistan can be understood only in the context of the history and social traditions of these countries. It will not be far-fetched to say that the expulsion of Jews and Christians from Arabia in the regime of Caliph Omar has furnished a precedent sanctioning the expulsion of Hindus from Pakistan. The nightmarish doings in Hitler's Germany which pass belief appear not very unnatural when viewed as the culmination of the deeply rooted racialist, militaristic traditions of Germany which are not without some connection with the teachings of Martin Luther.

I said some time ago that a Muslim Gandhi is yet to be born. It migh, perhaps, be helpful if I explain this remark. Gandhi was not a historical accident. He represented the high-water mark of the Hindu renaissance and embodied in his life and works some of its highest impulses and achievements. He symbolised the universalistic, humanist outlook

towards which this renaissance was steadily working. The activities of Muslim communalists can only have the effect of striking at the roots of this powerful secularist, humanist movement and debilitating it. Even if Hitler's misdeeds were made possible by certain dominant trends in German history it would not do totally to ignore the contribution made towards realising this dark possibility by the fanaticism which marked the Zionist movement. At least some Germans must have been pushed into following Hitler by Jewish extremism. There is, I think, a salutary lesson in this history which Indian Muslims will do well to ponder.

It is necessary to consider the problems facing Indian Muslims in the context of these historical and social currents because it is the same currents which determine the possible directions history can take at any critical juncture. It would be unduly naive to suppose that partition and the shameful and tragic events which preceded and followed it could have been averted only if Gandhi and Jinnah had come to an understanding or if the Congress leaders had done something to satisfy Jinnah's vanity. Individuals can play only a secondary and subordinate role in history. It is the historical forces that determine both the concrete setting within which individuals have to act and the possibilities they can effectively pursue.

If Muslims do not have the courage to confront these historical for and the religious and social traditions which create and sustain them, they will be able to do very little to help their society to extricate itself from its present predicament. That is necessary is that Muslim society should experience the emancipating and vitalising influence of modern thought. But so long as Muslims are unwilling to consider their tradition, history and religion from a detached point of view and subject them to rational criticism, they will be unable to assimilate modern norms and values. And so long as this does not happen, the hope of any radical and lasting reform is bound to remain futile.

I am aware that the task I am urging you to undertake is not very easy. But I must also add that it is not impossibly difficult. If you will not charge me with excessive vanity, I would like to state that I have been able to work along these lines with some success and I feel quite proud of my achievement. I have been deliberately maligned because of this by

interested parties. I have had to face bitter criticism and I have been at least twice subjected to physical assault. I am not saying this in a complaining mood because it is my firm conviction that unless an increasing number of Muslim men and women come forward in a spirit of self-sacrifice to work with courage and patience and determination, they will not be able to lift their society out of the morass into which it has landed itself. I am happy to say that quite a few Muslims in Maharashtra have been steadily working in this direction under the banner of the Muslim Satyashodhak Mandal and their efforts have not been altogether unfruitful. We can at least claim to have made a breach in the citadel of Muslim communalism and obscurantism which a few years ago appeared to be quite impenetrable. Incidentally, about thirty-five members of the Satyashodhak Mandal are attending this Conference as delegates. The Satyashodhak Mandal has also planned to hold Conference of Muslim women at the end of this month and it is to be hoped that the Conference will mark the beginning of an organised struggle by Muslim women against injustice and for elementary human rights. The Mandal has kept a two-fold aim before itself. It aims at bringing about a transformation of Muslim society in accordance with the modern values of freedom and dignity of the individual and social equality. Secondly, it aims at establishing harmonious relations between individual Muslims and individual non-Muslims on the basis of equality within the framework of a secular nation. This, according to it, is the best way to promote national integration. I have made this somewhat the detailed reference to the work of the Satyashodhak Mandal in the hope that their activities and experience may have some relevance to the issues we will be deliberating on in this Conference.

I have no doubt that our collective deliberations will give us a better understanding of the problems of Indian Muslims and some guidelines for future action. I can only hope that the thoughts I have placed before you make even a little contribution towards this end. I once again thank the Indian Secular Society for the honour they have done me and I thank you, Ladies and Gentlemen, for the indulgence with which you have heard me.

७.१३.१ निमंत्रणपत्रिका



मुस्लिम सत्यशोधक मंडळ, कोल्हापूर.

स. न. वि. वि.

दि. २३ व २४ सप्टेंबर ७२ रोजी मंडळातर्फे ' स्नेहसंमेलन शिबिर ' आयोजित केले आहे.

शिबिराचे उद्घाटन शनिवार दि. २३ रोजी दुपारी ३ वाजता

मा. पद्मभूषण आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे करतील.

शिबिर स्थळ– आंतर भारती विद्यालयाचे सभागृह शाहूपुरी व्यापारपेठ कोल्हापूर.

या शिबिरात इब्रिमम सेक्युलर सोसायटीचे अध्यक्ष अ. भि. शेख, मंडळाचे नेते हमीद दलवाई, आंतर भारतीचे सचिव श्री मधुभाय बसे, श्री बाबुसिंग बैसवाले, सौ. मेहरुन्निसा दलवाई, श्री अ. का. मुकादम, श्री मराजदभाई व कु. मरियम रफाई इ. मंडळी भाग घेऊन मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाचे महत्व लक्षात घेऊन आपण आपले मित्र व कुटुंबियासह घेऊन शिबिरास यावे ही विनंती.

आ.

हुसेन जमादार चिटणीस

रविवार सायं. ६-३० वा. जाहीर सभेने होईल स्थळ: राजाराम हायस्कूल शुभ राजवाडा

वेषण व रहण्याची सोय आहे. येताना पांघरुण आणावे. प्रवेश फी २ रु. फक्त

७.१३.२ हमीद दलवाईंना मूत्रपिंड देण्याबाबतचे आवाहन



साधना

अशा सहृदयतेची ही जरुरी आहे

मुस्लिम समाजात प्रबोधनाचे कार्य सुरू करण्यात श्री हमीद दलवाई यांचा वाटा मोठा आहे. या कार्यात संघर्षाला सामोरे जाऊन देण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली आणि अनेक निष्ठावंतांच्या सहकार्याने राज्यभर संघटना उभी केली. या त्यांच्या संघर्षात कार्यात त्यांच्या मातृशयाने विशेष निर्धाराने आपला अमूल्य मूत्रपिंडदानाचा आदेशकार्यी दाखविला आणि तो त्यांनी मुस्लिमांनीच नाकारले आदेशाच्याने कार्य पूर्ण पावणार नाही.

मेडिकल सायन्सने या असे आहे की, मूत्रपिंडाची अशा प्रकारची शस्त्रक्रिया जास्त प्रायश्चित्त आवश्यकतेत असल्या त्यासाठी योग्य व्यक्तीने मूत्रपिंड उपलब्ध झाले पाहिजेत. अनेक व्यक्तींना दोन मूत्रपिंड असतात, व एकाच्याद्वारे जिवंत राहत मूत्रपिंडाच्याही पूर्णता प्रमाणात चालत राहू शकते. परंतु विशिष्ट रक्तगटाचीही मूत्रपिंड उपलब्ध झाले पाहिजेत. मूत्रपिंड दानाच्या संबंधात प्रत्यारोपण रक्ताचा गट 'ओ-आर. एच्. निगेटिव्ह' हा असला पाहिजे. रक्ताच्या गटाची तपासणी करण्यासाठी रक्तपेढीकडून या वैशिष्ट्यांकडून घेतला जातो. याशिवाय, रक्तदाता या मूत्रपिंडदात्रीचा रोग असलेल्यांच्या मूत्रपिंडाचा उपयोग होऊ शकेल.

श्री हमीद दलवाई यांच्यासाठी मूत्रपिंड देऊ पाहणाऱ्यांनी आपला रक्तगट तपासून आणि इतर तपशील कळवा त्यासाठी, व अधिक निर्देश आवश्यक असतील त्यांनीही संपर्क साधावा.

- साधना कार्यालय, ४१० प्रभात पेठ, पुणे ४११ ०३०, टेली. ५६३०४
- राजू तेरवा दार, साने गुरुजी स्मारक, सिताराम गल्ली, पुणे ४११ ०३०, टेली. २१४१०
- डा. अशोक मेहता, कलिनानगर, सिमाशुल्क गल्ली, गोवा टोलीग्रामसह, मुंबई ४०० ०५०, टेली. ५४४४५५
- डॉ. सत्यकर महाजन, १२० शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२, टेली. ४०२२०

७.१४ निवेदन

(इंडियन सेक्युलर सोसायटी व महाराष्ट्र मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे दि. २७ व २८ डिसेंबर १९७१ रोजी पुणे येथे महाराष्ट्र मुस्लीम महिला परिषद आयोजित करण्यात आली. याप्रसंगी प्रसिद्ध केलेले निवेदन.)

इंडियन सेक्युलर सोसायटी
४ जूथिका, नौशीर भरूचा रोड, मुंबई ७
मुस्लीम सत्यशोधक मंडळ
४३०/३१, शनिवार पेठ, पुणे ३०

स्वातंत्र्यानंतर २४ वर्षे झाली, तरीही मुस्लीम स्त्रियांचे जिणे सामाजिकदृष्ट्या हलाखीचेच राहिले आहे. देशात या काळात अनेक बदल झाले, अनेक समाजघटकांना न्यायाचे व समानतेचे दरवाजे खुले झाले, परंतु मुस्लीम स्त्रियांना मात्र ते अद्यापही बंदच राहिले आहेत.

एके काळी मुस्लीम स्त्रिया पडद्यात राहत होत्या. त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण फार कमी होते; पुरुषांच्या बरोबरीने समाजात बाहेर वावरण्याची त्यांना परवानगी नव्हती. आज बुरखा पद्धती कमी झालेली आहे... मुस्लीम स्त्रियांत शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे... हळूहळू त्या नोकरी-व्यवसाय करू लागल्या आहेत.

काळाबरोबर हे बदल होत असले, तरी या स्त्रियांचा सामाजिक दर्जा मात्र बदललेला नाही. भारतीय घटनेने सर्व नागरिकांना समाज दर्जा दिलेला आहे. तथापि, मुस्लीम स्त्रियांच्या वाट्याला मात्र ही समानता अद्याप आलेली नाही, असे मोठ्या दुर्दैवाने म्हणावे लागते.

मुस्लीम स्त्रियांसमोर असलेल्या अनेक प्रश्नांपैकी मुस्लीम सामाजिक कायद्यातील (Muslim Personal Law) अन्याय्य तरतुदींमुळे निर्माण होणारे प्रश्न प्रमुख आहेत. या कायद्यानुसार मुस्लीम पती आपल्या पत्नीला कोणतेही कारण न देता घटस्फोट देऊ शकतो. इतकेच नव्हे, तर 'पतीने पत्नीला तिऱ्हाईत माणसाकरवी 'मी तुला घटस्फोट दिला आहे' असा जरी निरोप पाठविला, तरी हा निरोप घटस्फोट समजण्यात यावा' असे कायद्यातील कलम आहे. त्याचबरोबर पुरुष एकाच वेळी चार स्त्रियांशी लग्न करू शकतो. घटस्फोट देताना पत्नीला पोटगी देण्याची पतीवर सक्ती करता येत नाही व घटस्फोटानंतर फक्त तीन महिने तिला हक्काची पोटगी मिळते. मुले असल्यास त्यांच्या संगोपनाची जबाबदारीही घटस्फोटानंतर पती घेत नाही व त्याला घ्यायला लावण्याची कायद्यात तरतूद नाही.

वारसा हक्काबाबतदेखील स्त्रियांवर फार अन्याय होतो. सध्याच्या कायद्याप्रमाणे पत्नीला नवऱ्याच्या मालमत्तेचा एक चतुर्थांश वाटा मिळतो. तसेच सासरा हयात असताना नवरा मृत्यू पावला, तर नवऱ्याच्या वडिलोपार्जित मालमत्तेचा काहीही वाटा तिला किंवा तिच्या मुलांना

मिळत नाही. लग्नविषयक व मालमत्ताविषयक कायद्यातील या तरतुदीमुळे होणाऱ्या अन्यायाची काही उदाहरणे येथे देणे गैर ठरणार नाही. बयाच्या पन्नासाव्या वर्षी घटस्फोट दिल्या गेलेल्या स्त्रीला दुसरे लग्न करणे शक्य नसते, तिला पोटगी मिळत नसते आणि म्हाताऱ्या वयात तिला कुठेतरी कामधंदा बघावा लागतो. तिला मुले असल्यास तिची अधिकच दुर्दशा होते. अनेकदा लग्न होताच 'बायको आपल्याला पसंत नाही' म्हणून दोन महिन्यांत नवरा तिला घराबाहेर काढतो. तिला पोटगी मिळत नाही आणि नवऱ्याने लग्नानंतर लगेच टाकल्यामुळे तिची समाजात बदनामी होते. तिचे पुन्हा लग्न होणे कठीण होऊन बसते. अनेकदा पुरुष 'आपली बायको बदफैली आहे' असा खोटा आरोप करून तिला घटस्फोट देऊन बाहेर काढतो. एकतर्फी व तोंडी होणाऱ्या घटस्फोटांमुळे स्त्रीला हा आरोप खोडून काढण्याची कायद्यात कोणतीही तरतूद नाही. कारण सध्याच्या कायद्यानुसार न्यायालयात किंवा न्यायालयाबाहेर तो सिद्ध करण्याची नवऱ्यावर काहीच जबाबदारी टाकलेली नाही. अशा स्त्रीचे समाजातील जिणे बिकट होते आणि ती समाजातून उठविली जाते. मालमत्तेच्या वारसा हक्कातील तरतुदीमुळेदेखील असेच प्रकार घडतात. सासरा हयात असताना जिचा नवरा वारला असेल, तिचे जिणे परावलंबी बनते. इतर दिरांच्या आणि सासऱ्याच्या दयेवरच तिला आणि तिच्या मुलांना अवलंबून राहावे लागते. सध्याच्या कायद्याखालील या अन्याय्य तरतुदी आणि उणिवा बदलल्या गेल्या पाहिजेत. त्याखेरीज मुस्लीम स्त्रियांना खऱ्या अर्थाने सामाजिक समतेचा लाभ होणार नाही.

या अन्यायामुळे मुस्लीम समाजाचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन कसे अधःपतित झाले आहे, याची फारच थोडी जाणीव मुस्लीम समाजाचे धुरीण आणि राजकीय व धार्मिक नेते बाळगताना दिसतात, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. 'मुस्लीम सामाजिक कायदा अबाधित आहे', 'त्यात बदल करणे म्हणजे धर्मात हस्तक्षेप करणे होय' असा आरडाओरडा करून समाज सुधारकांविरुद्ध हाकाटी पिटण्याची व सुधारणेच्या पुरस्कर्त्यांना गप्प करण्याची भूमिका बजावून मुस्लीम स्त्रियांना कायमचे गुलाम ठेवण्याची नामी युक्ती त्यांनी शोधून काढली आहे. वस्तुतः सध्याचा, १९३७मध्ये झालेला मुस्लीम कायदा ब्रिटिशांनी केला आहे व त्यामुळे आधीचा कायदा बदलला गेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. असे असताना 'मुस्लीम कायद्यात बदल होत नाही' असे म्हणणे म्हणजे शुद्ध फसवणूक आहे.

भारतीय घटनेने धर्मस्वातंत्र्य अबाधित ठेवले आहे आणि प्रत्येकाला त्याच्या धर्माप्रमाणे ईश्वरोपासनेचे स्वातंत्र्य दिले आहे. त्याचबरोबर भारतीय घटनेने सर्व नागरिकांना समान अधिकार बहाल केले आहेत आणि धर्मस्वातंत्र्याचा अधिकार देताना कुठल्याही वर्गाविरुद्ध अन्याय करणाऱ्या धार्मिक चालीरीती आणि कायदे अबाधित ठेवण्याचे स्वातंत्र्य दिलेले नाही. भारतीय घटनेने दिलेले धर्मस्वातंत्र्य व धार्मिक समानता, तसेच जात, धर्म, वंश आणि लिंग यांच्या भेदातीत नागरिकत्वाचे समान हक्क यांचा नीट मेळ घातला जाण्याची आवश्यकता आहे. याचाच अर्थ असा की, प्रत्येक व्यक्तीला त्याच्या धर्मश्रद्धेप्रमाणे ईश्वरोपासनेचे स्वातंत्र्य असले पाहिजे. तसेच कुठल्याही व्यक्तीला भारतीय घटनेने दिलेल्या समान अधिकारापासून धार्मिक अथवा अन्य कोणत्याही कायद्यामुळे व चालीरीतीमुळे वंचित केले जाता कामा नये. याचाच अर्थ असा की,

मुस्लीम समाजाचे धर्मस्वातंत्र्य अबाधित ठेवून त्या समाजातील अन्याय्य सामाजिक चालीरीती बदलल्या गेल्या पाहिजेत व स्त्रियांना समान हक्क मिळाले पाहिजेत. तरच 'घटनेने दिलेले मूलभूत अधिकार मुस्लीम स्त्रियांना उपभोगावयास मिळाले' असे होईल.

या दृष्टीने मुस्लीम स्त्रियांत जागृती निर्माण करण्यासाठी व त्यांना त्यांच्या मूलभूत हक्कांकरिता झगडण्याची प्रेरणा देण्यासाठी इंडियन सेक्युलर सोसायटी व महाराष्ट्र मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे दि. २७ व २८ डिसेंबर १९७१ रोजी पुणे येथे महाराष्ट्र मुस्लीम महिला परिषद आयोजित होत आहे. महाराष्ट्र मुस्लीम सत्यशोधक मंडळ गेली दोन वर्षे मुस्लीम समाजात प्रबोधन घडवून आणण्याच्या ईर्ष्येने महाराष्ट्रात कार्य करीत आहे. या मंडळाच्या पुणे, कोल्हापूर, श्रीगोंदे आणि सोलापूर अशा चार ठिकाणी शाखा स्थापन झाल्या असून सुमारे २०० तरुण मंडळाच्या झेंड्याखाली गोळा झाले आहेत. मंडळात मुस्लीम महिलाही सामील होत आहेत आणि पुण्यात एक पदवीधर मुस्लीम तरुणी मंडळाची कार्यकर्ती आहे.

मुस्लीम महिलांच्या सामाजिक आणि अन्य प्रश्नांवर विचार करण्यासाठी भारतातील ही बहुधा पहिलीच परिषद असेल. याच्या आधी मुस्लीम महिलांच्या परिषदा झाल्या नाहीत, असे नव्हे. स्वातंत्र्यपूर्व काळात अखिल भारतीय मुस्लीम महिला संघटना होती, परंतु ही संघटना मुस्लीम लीगचे बाहुले म्हणून वावरत होती आणि मुस्लीम लीगच्या पाकिस्तानच्या मागणीला मुस्लीम भगिनींचा पाठिंबा मिळविण्याच्या उद्देशाने कार्य करीत होती. स्वातंत्र्योत्तर काळात मुस्लीम भगिनींची देशव्यापी अशी कोणतीच संघटना उरली नाही व त्यांचे असे काही सामाजिक प्रश्न असल्याची कुणाला जाणीवही राहिली नाही. अखिल भारतीय महिला परिषद समान नागरी विधेयकाचा पुरस्कार करून अधूनमधून मुस्लीम भगिनींच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य करीत असते, यात शंका नाही; परंतु हे प्रयत्न पुरेसे नाहीत. मुस्लीम भगिनींना त्यांचे सामाजिक हक्क मिळायला हवे असतील, तर त्यांच्यात जागृती झाली पाहिजे आणि त्यांनी संघटितरीत्या आपल्या हक्कांसाठी आवाज उठविला पाहिजे.

गेली काही वर्षे तुरळक मुस्लीम भगिनी आवाज उठवू लागल्या आहेत. मुंबई येथे १९६६ च्या एप्रिलमध्ये सात मुस्लीम भगिनींनी महाराष्ट्र विधानसभेवर मोर्चा नेऊन महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेतली व समान नागरी विधेयक करण्याची मागणी केली. हा छोटा मोर्चा ही मुस्लीम भगिनींच्या न्याय्य हक्कांच्या चळवळीची नांदी ठरली आहे आणि अशा प्रकारच्या छोट्या प्रयत्नांना संघटित आकार देण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य मुस्लीम महिला परिषद' आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद महाराष्ट्रापुरती मर्यादित असली, तरी इतर राज्यांतील मुस्लीम भगिनींनादेखील तिच्यात भाग घेता येईल. या परिषदेतून अखेरीला अखिल भारतीय स्वरूपाची मुस्लीम महिलांची संघटना उभी राहील, असा प्रयत्न केला जाईल.

महाराष्ट्र राज्यातील मुस्लीम भगिनींना आम्ही अशी विनंती करतो की, आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी सुरू होणाऱ्या या लढ्यात त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभागी व्हावे.

(मंडळाच्या दफ्तारातून)

७.१५ मुस्लीम महिला परिषदेतील प्रमुख वक्त्या

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने दि. २७-२८ डिसेंबर १९७१ रोजी पुणे येथे भारतातील पहिल्या मुस्लीम महिला परिषदेचे आयोजन केले. या परिषदेमध्ये महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील स्त्रियांनी सहभाग घेतला. मुस्लीम स्त्रियांच्या विविधांगी प्रश्नावर या परिषदेत चर्चा करण्यात आली. या परिषदेमध्ये प्रमुख वक्ते म्हणून पुढील स्त्रियांचा समावेश होता.

१) श्रीमती आस्मा मस्कती (सुरत) :

श्रीमती आस्मा मस्कती बहुभाषिक होत्या. त्यांना हिंदी, उर्दू, गुजराती आणि इंग्रजी भाषा अवगत होत्या. परिषदेत बोलताना आपल्या मनोगतात त्यांनी या चारही भाषांचा वापर केला आणि उपस्थितांना चकित केले. राष्ट्रीय एकात्मतेची ही एक चोख प्रचीती म्हणता येईल. त्या सुरत नगरपालिकेच्या माजी सदस्य होत्या. 'इनरव्हील' या संस्थेच्या चळवळीत यांचा महत्त्वाचा वाटा आहे. आशियातील रोटरीच्या त्या पहिल्या अध्यक्ष होत्या. याखेरीज एक उल्लेखनीय बाब म्हणजे, बंदुकीच्या नेमबाजीत त्यांनी अनेक बक्षिसं मिळवली होती.

२) श्रीमती फखर बेगम (दिल्ली) :

फखर बेगम यांचा जन्म एका मौलवी घराण्यात झाला होता, हे सांगितले, तर त्यांच्या पुरोगामी प्रवृत्तीचे आश्चर्य वाटल्याबाचून राहणार नाही. त्या व्यवसायाने शिक्षिका होत्या आणि पिंडाने समाजकार्यकर्त्या होत्या. 'आपली न्याय्य गाऱ्हाणी घेऊन सर्व भगिनींनो तुम्ही दिल्लीला या, आपण इंदिराजींना आपल्या मागण्या सादर करू' असे त्यांनी परिषदेत जाहीर आवाहन केले होते.

३) श्रीमती शरीफा तैय्यबजी (श्रीरामपूर) :

तैय्यबजी घराणे हे खानदानी देशभक्त घराणे म्हणून प्रसिद्ध आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात या घराण्याने सक्रिय भाग घेतला होता. या तैय्यबजी घराण्यातील सासुरवाशीण शरीफाजी या कार्यकर्त्या होत्या. अखिल भारताच्या इतिहासात प्रथमच राजकीय हेतूखेरीज, खासकरून सामाजिक न्यायासाठी धरणाऱ्या या मुस्लीम महिला परिषदेच्या अध्यक्ष म्हणून शरीफाजींची निवड होण्यात विशेष औचित्य होते.

४) श्रीमती जहाँआरा बेगम (कोलकाता) :

या कोलकात्यात इंग्रजीच्या प्राध्यापक होत्या. त्या बांगला रिलीफ कमिटीच्या सदस्य होत्या. कोलकात्यातत 'युनिफॉर्म सिव्हिल कोड' ची चळवळ सुरू करण्यात या अग्रेसर होत्या. त्यासाठी कोलकात्यात घेराव, निषेध, घोषणा, मोर्चा यांसारखा अनेक तऱ्हेचा विरोध त्यांनी धीटपणे अंगावर घेतला.

५) श्रीमती बानूबी पठाण (इचलकरंजी) :

इचलकरंजी नगरपालिकेच्या या सदस्य होत्या. पुण्यात हमीद दलवाईंवर लाठीहल्ला झाला, तेव्हा इचलकरंजी नगरपालिकेत बानूबींनीच निषेधाचा ठराव खंबीरपणे मांडला. त्या एक कुशल विमाप्रतिनिधी असून या व्यवसायात त्यांनी बक्षिसं मिळवली होती.

६) श्रीमती मुमताज मोमीन (मुंबई) :

या युवती 'राज्यशास्त्र' विषय घेऊन मुंबई विद्यापीठातून एम. ए.चा अभ्यास करीत होत्या. पुण्यात आयोजित केलेल्या मुस्लीम महिला परिषदेच्या निमंत्रकांपैकी त्या एक होत्या. अस्खलित मराठी व उत्तम वक्तृत्व हे त्यांचे विशेष त्यांनी मनोगत मांडताना जाणवले.

७) श्रीमती नजमा शेख (पुणे) :

बी. ए. एल. एल. बी. पूर्ण करून श्रीमती नजमा शेख यांनी वकिली व्यवसायात पदार्पण केले. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या अनेक उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग असे. घरचा आणि घराबाहेरचा विरोध पत्करून त्या या कामात निश्चयपूर्वक वाटा उचलत होत्या. त्या परिषदेच्या निमंत्रकांपैकी एक होत्या. .पुणे येथील कुटुंब न्यायालयातून त्या न्यायाधीश म्हणून सेवानिवृत्त झाल्या.

८) श्रीमती मरियम रिफाई (पुणे) :

शिक्षण, बी. ए. पर्यंत. त्यांनी मुस्लीम महिलांच्या जागृतीच्या कामासाठी स्वतःला वाहून घेतले होते. त्यामुळे त्यांच्यापुढे उभ्या राहिलेल्या मुस्लीम समाजाच्या विरोधाला त्या खंबीरपणे तोंड देत होत्या. त्या परिषदेच्या निमंत्रकांपैकी एक होत्या.

९) श्रीमती सबा जैदी (दिल्ली):

या युवतीने अलिगढ विद्यापीठातून बी. ए. (ऑनर्स) केले होते. परिषदेच्या काळात ती दिल्ली येथील नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा येथे अल्काझींच्या मार्गदर्शनाखाली शिष्यवृत्ती मिळवून शिकत होती.

७.१६ MUSLIM SOCIAL CONFERENCE

(मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटीच्या वतीने मुंबई येथे दिनांक २५ मार्च १९७३ रोजी मुस्लीम सामाजिक परिषदेचे आयोजन करण्यात आले. परिषदेचे उद्घाटन राज्यशास्त्र विभाग, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (सध्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) येथील डॉ. मोईन शाकीर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी त्यांनी केलेले भाषण)

Jointly organized by Indian Secular Society and Muslim Satyashodhak Mandal

INAUGURAL ADDRESS by

DR MOIN SHAKIR Department of Politics, Marathwada University, Aurangabad

Bombay, 25 March 1973

Secularists ought to feel greatly concerned over the recent developments in Indian public life along communal lines. Even those political parties which have a secular programme seem to postpone it in favour of short-term goals, inconsistent with their professed objectives and thus undermine the secular basis of the Indian polity. Pronouncedly reactionary parties cast off the secular mask and work against the national ideal. Leaders in general have been yielding to communal pressures and have been maintaining a discreet silence in order to retain their 'base' in the community. It is imperative that we take note of the issues which are being raised by the communalists and the obscurantists of all shades and varieties. The gravity of the issues can be understood by those who are familiar with the pre-independence politics of the country, the result of which was the disastrous Partition. It was a great set-back to the forces of composite nationhood and secular democracy. It "settled nothing and satisfied none". A small section of the Indian Muslims, after 1947, realized that the consciousness of being a separate "nation" could not offer a solution to their problems arising out of the fear of Hindu domination. It also realized that no uniform policy could be formulated in view of the regional diversification of the community. Before the partition of the country, the political strategy and vague sense of religious

identity provided a so-called homogeneity to the Indian Muslims. Consequently the obsession with religion and politics kept them indifferent to the vital problems of social change and economic uplift.

In the post-partition period certain subjective considerations and the absence of effective, enlightened leadership on the one hand and the lack of courage and imagination on the part of the modernizing non-political elite on the other, hampered the process of adjustment with the now secular order, devoted to the ideal of the welfare state. The Muslim leadership failed to comprehend the extent to which the sinister two-nation theory could be and can be positively injurious. It was partly because the Muslims had never been confronted with such a situation in the past. Now they were obliged to join a common national stream on an equal basis, irrespective of religious considerations unless they chose to hold back in sullen isolation. It meant giving up the traditional categories of ruler and ruled. It also implied integration breaking up of the communal identities and the consequent emergence of an Indian identity. The obvious hindrance in the way of such integration in the tendency to live in the past and the demoralisation resulting from the events of the Partition. The Muslim community was wrongly led to believe that any change in the status quota should be resisted lost it should be assimilated and absorbed into the Hindu mass and deprived of its identity. This has resulted in a narrow communitarian orientation. The net effect is that non-religious problems are not perceived in the context of a democratic and secular perspective.

The projection of the community-oriented outlook was the establishment of the All India Muslim Majlis-e-Mushawarat. This federation of the various Muslim organizations got the support of the various political parties in 1967. It gave respectability and vigour to the Muslim political groups. The greatest beneficiary was, of course, the Muslim League. It grew to such an extent that Mr Suleiman Sait, General Secretary of the All India Muslim League, claimed that his organization was "the sole representative of Indian Muslims".

The beginning of the seventies marks a turning point in Muslim politics. The question of the reform of Muslim Personal Law, reform of the

constitution of the Aligarh Muslim University and the Vande Mataram issue and the Bombay Municipal elections provide evidence of this new development. The speeches delivered in the Muslim Personal Law Convention held at Bombay (December 1972), and the Aligarh Muslim University Convention at Delhi (March 1973) highlight the emergence of a communal consensus in a new and virulent form. The electoral gains of the Muslim League in the Bombay Municipal elections show the Muslims style of articulating their diffuse but particularistic political interests seeking the aid of a cultural insecurity phobia. This has produced two results: one, the continuity of a type of unenlightened leadership wedded either to obscurantism or hypocrisy, and two, the absence of a conflict and confrontation between secular forces on the one hand, and inertia and orthodox fundamentalism in the life of the community, on the other.

Unlike the other segments of the Indian population, there has surprisingly been no change in the class character of the Muslim leadership. This has created the false impression that there are no competing interests within the community. But the reality should be perceived in the context of a stable and self-perpetuating sub-culture of the Muslims; it would explain why the process of political recruitment favourable to a particular type of leadership or elite groups has not been affected by the competitive democratic federal polity in the country. It is not surprising that the Muslim leadership vigorously raises only those issues which automatically alienate the non-Muslim leaders and reinforce their own obscurantist grip. The "Durbari" politics of the ruling party and the electoral opportunism of the opposition parties keep the Muslim masses in the wilderness.

In these circumstances, one feels pessimistic about the Muslim situation. The most discouraging thing is the alliance, the considerable degree of understanding, between the religious and non-religious leadership of the community. It is considered desirable as it has produced excellent results in the immediate past. It should be noted that the grievances of the community are never carefully analysed but they are voiced vigorously for perpetuating a conservative and reactionary sway

over the community. The common Muslims are viewed by these leaders as material to be manipulated. The in-built conservatism of the Muslim mind is exploited by pandering to its obscurantist leaning. The working of the Muslim League clearly bears it out. This type of leadership is not concerned with the secularisation of the Muslim attitudes as it has developed a vested interest in communalism.

The Muslim leaders belonging to the secular parties, particularly to the ruling party, generally play to the gallery rather than make any real effort at promoting the political advance of the community. Their stand on the issue of Muslim Personal Law is an instance in point. They feel that the process of modernization and secularisation of the community will undermine their political position. There is nothing wrong if the Muslims feel that "as a community they have their beliefs and traditions, that they represent certain moral and social values and have their own way of life" but one fails to understand why this should be smuggled into public life; and why the areas of identity with other communities should not lead to joint activity. Herein lays the tragedy of the Muslim leadership.

The communal leadership wants to organize the community as a separate political party. Such an attitude is inimical to the community itself. It ignores the Hindu backlash and gives a filip to the militant Hindu communal organizations. It also gives a new lease of life to tribal thinking and action within the community. One does not know how long the Muslims shall be victims of the viewpoint that Muslim leaders alone, particularly leaders of the brand now popular, can safeguard their interests. What is needed is the creation of a secular atmosphere. And for this the Muslims must contribute their mite and not merely wait and see. The minimum they can do is to discard this type of leadership.

The role of Muslim intellectuals has been equally deplorable. They may express differences with the present religious and political elites but they have failed to project any fresh ideas or new issues. Their attitude to the common man has been characterised by snobbery. They neither know the poor Muslim masses nor do they seem to have any interest in knowing them. They are similar to other leaders in the sense that they also just want to speak in the name of Muslims. They do not believe in

structural change but in the change of personnel in the system of power. To them the biggest problem of the community is the employment of the educated few and they foster the falsehood that the Muslims are a sophisticated urban community.

Two factors should be taken into account regarding the ineffectiveness of the non-political elite. It cannot succeed in the given circumstances, as the community has "inordinate respect for wealth and position". The non-political elite do not have either of the two. To work on the non-political plane appears to be a thankless task. The prevailing cultural backwardness, absence of independent thinking and the low educational level of the common Muslims makes every effort a highly frustrating venture.

Secondly, the political situation offers many opportunities to the communalists to operate. The validity of the traditional bonds and their projection into the democratic and competitive polity obstructs the establishment of a really modern and secular system. It should be admitted that the Muslim community has a capacity to adjust but this process is certainly slow. The secular Hindu leadership has an awareness of the need to strengthen the non-communal forces in the Muslim community but it has failed to act with firmness. What is urgently needed is an effort to bring about the unity of secular leadership to renounce traditional allegiances and particularistic appeals and to set the community resolutely and irrevocably on the nation's chosen road to secularism, modernization and unity.

७.१७ केंद्रीय कार्यकारिणी सभा वृत्तान्त

मुस्लीम सत्यशोधक मंडळ (महाराष्ट्र)

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेनंतर मंडळाचे कामकाज व्यवस्थितपणे चालवण्यासाठी केंद्रीय कार्यकारिणीची निवड वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात आली. दिनांक ७ मे १९७२ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत बाबुमियाँ बँडवाले, हमीद दलवाई, मेहेरून्निसा दलवाई, सय्यद मेहबूब, अब्दुल कादर मुकादम, सय्यद मुनीर, सय्यद रफिउद्दीन, हुसेन जमादार हे सभासद उपस्थित होते. यांत विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

याच पद्धतीने मंडळाचे कार्यक्रम, ध्येयधोरणे आणि भूमिका स्पष्ट करण्यासाठी अशा पद्धतीच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठका प्रत्येकी ३–४ महिन्यांनी होत गेल्या. हमीद दलवाई यांच्या आजारपणाच्या काळात त्यांच्या उपलब्धतेनुसार कार्यकारिणी सदस्यांच्या बैठका होत राहिल्या. पुण्यात अशा बैठका डेक्कन जिमखान्याबरील हॉटेल पूनम येथे होत असत. कोल्हापूर, पुणे, चिपळूण, अंधेरी, मुंबई अशा विविध ठिकाणी बैठका घेऊन मंडळाच्या भावी उपक्रमासंदर्भात चर्चा व ठराव करण्यात येत असत. हमीद दलवाई यांच्या निधनापूर्वी मुंबई येथे दिनांक २१ नोव्हेंबर १९७६ रोजी केंद्रीय कार्यकारिणीची सभा रामटेक, मुंबई येथील हमीदभाईंच्या तात्पुरत्या निवासस्थानी भरली होती. या सभेत बाबुमियाँ बँडवाले, सय्यद मेहबूब, हमीद दलवाई, वजीर पटेल, अ. का. मुकादम, हुसेन जमादार हे सदस्य आणि सर्वश्री दादाभाई पटेल (चिपळूण), मुहम्मदबी सोलापूरे (कोल्हापूर), राजेसाहेब मुलाणी (अंधेरी), हुसेन गुलाम मुल्ला (अंधेरी), अब्दुल रेहमान शेख (अंधेरी) इब्राहिम भाटकर (चिपळूण) व जे. आय. शेख (मुंबई) हे आमंत्रित म्हणून उपस्थित होते.

या सभेत पुढील कामकाज झाले.

सुरुवातीस १७ ऑक्टोबर, १९७६ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तास मंजुरी देण्यात आली.

विविध शाखांनी आपल्या कार्याचे इतिवृत्त पुढील प्रमाणे सादर केले :

कोल्हापूर हुसेन जमादार –

मोफत वकिली सल्लाकेंद्र चांगले चालले असून आतापर्यंत मंडळाकडे कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली इस्लामपूर अशा विविध ठिकाणांहून ५० घटस्फोट प्रकरणे आली आहेत. त्यांपैकी १५ प्रकरणे पोटगीकरिता न्यायालयात दाखल करण्यात आली आहेत. एका प्रकरणी विरोधी निर्णय लागला असून त्याचे अपील दाखल करण्यात आले आहे.

आय. टी. आय. तर्फे चालविण्यात येत असलेल्या सोसायटीमध्ये काही स्त्रियांना शिवणकाम मिळवून देण्याचे प्रयत्न करण्यात आले. परंतु आय. टी. आय. मध्ये शिक्षण घेतलेल्यांनाच तिथे काम मिळू शकते, असा त्यांचा नियम असल्यामुळे या प्रयत्नास यश आले नाही. परंतु मंडळाने क्लास काढल्यास ते काम देऊ शकतील. त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत. वारणानगर येथे पापडाचे एक केंद्र आहे. तिथून काही काम मिळेल का, या विषयी माहिती मिळवण्यात येत आहे.

पुणे : सय्यदभाई –

पुण्याचे मोफत वकिली सल्ला केंद्रही चांगले चालले आहे. घटस्फोटित स्त्रियांचे पोटगीचे अनेक दावे न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, मुल्ला-मौलवीही मंडळाकडे केसेस पाठवू लागले आहेत. स्त्रियांना काही काम मिळवून देण्याचे प्रयत्न चालू आहेत. अशा स्त्रियांना अगरबत्त्या बनविणे किंवा यांसारखी इतर काही कामे मिळू शकतील.

अमरावती: वजीर पटेल –

वजीर पटेल यांनी अमरावती शाखेचे नोव्हेंबर १९७५ ते ऑक्टोबर १९७६पर्यंतचे प्रतिवृत्त सादर केले. गेल्या वर्षी नेहरू जयंतीच्या मुहूर्तावर सुरू करण्यात आलेले 'बागबान' साप्ताहिक व्यवस्थित चालले आहे. १६ जून १९७६ रोजी महिलांचे एक शिष्टमंडळ आचार्य विनोबाजींना भेटले. त्यांच्या सूचनेप्रमाणे सौ. शोभना ताई रानडे यांच्यामार्फत दिनांक ६ ऑगस्ट १९७६ रोजी हे महिला शिष्टमंडळ मुख्यमंत्री माननीय शंकरराव चव्हाण यांना भेटले. स्त्रियांना शिवणकाम वगैरे मिळवून देण्याचे प्रयत्न चालू आहेत. श्रीमती जखिया खातूनला शिवण्याचे मशीन घेऊन दिले आहे.

बालक मंदिर व्यवस्थित चालू आहे.

अमरावतीला मंडळातर्फे 'कुटुंब नियोजन शिबिर घेतले.' या शिबिरात १४६ जणांवर संतति प्रतिबंधक शस्त्रक्रिया करण्यात आली. शिवाय नोव्हेंबर १९७५ ते जानेवारी १९७६पर्यंत जिल्ह्यात तीन ठिकाणी अशी शिबिरे घेण्यात आली. तिथे ५० जणांवर शस्त्रक्रिया करण्यात आली; डिसेंबर १९७६पर्यंत आणखी काही शिबिरे घेण्याचा विचार आहे.

अंधेरी (मुंबई): अब्दुल कादर मुकादम –

१. अरुण कुमार सोळंकी यांच्या संस्थेतर्फे स्त्रियांना शिवणकाम मिळवून देण्याचे प्रयत्न या संस्थेच्या 'तयार झालेला माल आपण विकला पाहिजे' या नियमामुळे अयशस्वी झाले. आता अंधेरी रिक्रिएशन क्लबच्या रावळ यांच्यातर्फे पापड लाटण्याचे काम मिळविण्याचा हमीदभाई प्रयत्न करीत आहेत. त्याकरिता अंधेरी रिक्रिएशन क्लब येथे रावळ व अंधेरीचे कार्यकर्ते यांची संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे.

२. यानंतर कार्यकारिणीने 'कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम' हा विषय विचारार्थ घेतला.

कार्यकारिणीच्या दिनांक २६ जुलै १९७६ रोजी पुणे येथे झालेल्या खास बैठकीत शासनाच्या कुटुंब नियोजन सक्तीचे करण्याविषयीच्या नव्या धोरणास पाठिंबा देणारा ठराव व्हावयास हवा होता. शासनाचे हे धोरण मंडळाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असल्यामुळे मंडळाची त्यासंबंधीची भूमिका जाहीर होणे अतिशय आवश्यक होते, असे विचार सरचिटणीस हमीद दलवाई यांनी कार्यकारिणी समोर मांडले.

या विषयावर साधकबाधक चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की, डिसेंबर १९७६पर्यंत मंडळाच्या सर्व शाखांनी संतति प्रतिबंधक शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित करावीत, तसेच या

शिबिरांची माहिती पत्रके आणि निमंत्रणे सर्व शाखांना पाठविण्यात यावीत. मात्र ज्यांना जावयाचे असेल, त्यांनी स्वखर्चाने जावे.

असेही ठरविण्यात आले की, कुटुंब नियोजनासंबंधी एक व्यापक प्रचार मोहीम काढण्यात यावी. या प्रचार मोहिमेचे स्थूल स्वरूप पुढील प्रमाणे असावे :

१) सेक्युलॅरिस्टमध्ये प्रसिद्ध झालेल्या 'कुटुंब नियोजन' या विषयावरील लेखाचे मराठी भाषांतर करून ते प्रसिद्ध करावे व त्याच्या ऑफसेटच्या २००० प्रती छापून त्या सर्वत्र वाटण्यात याव्यात.

२) भित्तिपत्रके छापून ती सर्वत्र लावण्यात यावीत.

३) इस्लामचा कुटुंब नियोजनाला तत्वतः विरोध नाही, ही वस्तुस्थिती लोकांसमोर मांडण्यात यावी.

३. यानंतर कार्यकारिणीने मंडळाच्या आर्थिक प्रश्नासंबंधी चर्चा केली. ही चर्चा प्रामुख्याने :

अ) 'सत्यशोधक पत्रिका' आणि 'बागबान' यांच्या प्रकाशन खर्च

आ) केंद्रीय कार्यकारिणीचा पत्रव्यवहाराचा व तिच्या दैनंदिन कामाचा खर्च आणि

इ) हुसेन जमादार यांचे मानधन

या संदर्भात झाली.

या ठिकाणी सय्यद मेहबूब यांनी 'तातडीच्या आर्थिक गरजा भागविण्याकरिता एखादा नाटक किंवा सिनेमाचा प्रयोग धर्मार्थ घेऊन त्यातून काही पैसा उभा करण्यात यावा' असे सुचविले.

या सूचनेवर कार्यकारिणी विचार करीत असताना मंडळाच्या तातडीच्या आर्थिक गरजांचा पुढीलप्रमाणे आढावा घेण्यात आला :

कार्यकारिणीचा पत्रव्यवहाराचा व इतर खर्च – रू. २००/–

पोस्टर्स छपाई व प्रसिद्धी – रू. ५००/–

या तातडीच्या खर्चाकरिता पैसा उभा करण्यासंबंधी सय्यद यांची सूचना तपशीलवार चर्चेनंतर स्वीकारण्यात आली. या सूचनेसंबंधी दलवाई यांनी कार्यकारिणीस असे सांगितले की ते विजय तेंडुलकर किंवा मोहन वाघ यांना भेटून नाटकाचा एखादा प्रयोग मिळवू शकतील. त्याचप्रमाणे सिनेमाच्या चॅरिटी शोकरिता ते तावडे यांना भेटून रविवारी सकाळी मराठा मंदिर थिएटर मिळविण्याबाबत प्रयत्न करू शकतील. त्याचप्रमाणे 'प्रीमियर शो' मिळविण्यासंबंधी ते प्रयत्न करतील असेही त्यांनी पुढे सांगितले.

चर्चेनंतर 'सय्यद यांची सूचना कार्यान्वित करण्याकरिता संपूर्ण योजना कार्यकारिणीच्या पुढील सभेत तयार करण्यात यावी' असा कार्यकारिणीने निर्णय घेतला.

सत्यशोधक पत्रिका व बागबान यांना घ्यावयाच्या अनुदानासंबंधी कार्यकारिणीने असा निर्णय घेतला की, 'इतर काही मार्गांनी देणग्या वगैरे जमविण्यात याव्यात व हा खर्च भागवावा.'

'हुसेन जमादार यांनी सत्यशोधक मंडळाचे पूर्ण वेळ काम करावे म्हणून त्यांना कोरगावकर

ट्रस्टतर्फे दरमहा रु. २००/- गेली पाच वर्षे मिळत आहेत; यापुढेही मिळणार आहेत, परंतु त्यात त्यांचे भागत नसल्यामुळे त्याचा कार्यकारिणीने विचार करून त्यातून काही पर्यायी मार्ग काढावा' अशी जमादार यांनी कार्यकारिणीस विनंती केली. यावर चर्चा करून कार्यकारिणीने असे ठरविले की, जमादार यांनी अर्ध वेळ नोकरी करावी. अशी नोकरी त्यांना मिळवून देण्याकरिता हमीदभाई कोल्हापूरला आल्यावर प्रयत्न करणार होते. 'पंडित कुलकर्णी व कोल्हापूरचे इतर परिचित कारखानदार या बाबतीत काही मदत करतील' अशी आशा दलवाईंनी व्यक्त केली.

या सभेच्या विषय पत्रिकेवरील विषय संपले होते. म्हणून वजीर पटेल यांनी अध्यक्षांच्या परवानगीने अशी सूचना केली की, 'मुख्यमंत्र्यांनी हमीद दलवाईंच्या शस्त्रक्रियेसाठी व उपचारासाठी मुख्यमंत्री फंडातून रू. ५० हजार दिल्याबद्दल मंडळाच्या प्रत्येक शाखेने मुख्यमंत्र्यांचे आभार मानणारे ठराव मंजूर करून ते मुख्यमंत्र्यांना पाठवावेत.' ही सूचना कार्यकारिणीने एकमताने मंजूर केली व हुसेन जमादार (कोल्हापूर), सय्यदभाई (पुणे), मुकादम (मुंबई), दादाभाई पटेल (चिपळूण) यांना असे ठराव मंजूर करून घेण्याचे आदेश दिले.

एवढे कामकाज झाल्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून सभा दुपारी १ वा. बरखास्त झाली.

अ. का. मुकादम
२२.११.७६
चिटणीस
बाबुमियाँ बँडवाले
२१.११.७६

(संदर्भ – मुस्लीम सत्यशोधक मंडळ केंद्रीय कार्यकारिणी बैठक वृत्तान्त नोंद दप्तर (रजिस्टर))

७.१८ अखेरची इच्छा (मृत्युपत्र)

मृत्यूनंतर माझे शव माझ्या गावी नेऊ नये. विद्युत दाहिनीत माझ्या शवाचे दहन करावे. मुसलमान किंवा हिंदू, कोणत्याही पद्धतीने कोणताही धार्मिक संस्कार अगर श्रद्धांजलीची भाषणे करू नयेत. मी निरीश्वरवादी म्हणून जगलो व निरीश्वरवादी म्हणूनच मला मरायचे आहे. माझे स्मारक उभारू नये.

या देशात इस्लामिक संशोधन संस्था स्थापन व्हावी, ही माझी आवडती इच्छा. काही खाजगी व निमसरकारी यंत्रणांनी चालविलेल्या तशा काही संस्था आहेत, पण त्यांच्या कामाने माझे समाधान झालेले नाही. इस्लाम व त्याची संस्कृती सुधारू इच्छिणाऱ्या माझ्या मित्रांनी अशी संस्था स्थापन करावी. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय अशा मूलभूत चळवळीचे, तसेच शहरी व सुशिक्षित मुसलमानांनी चालविलेल्या मुस्लीम राष्ट्रवादी, जातीय चळवळीचे प्रतिबिंब या संशोधनात दिसले पाहिजे. इस्लामच्या समस्यांना वाहिलेले एक नियतकालिकही या संस्थेने सुरू करावे. जगातल्या इस्लामिक चळवळीची दखल त्या नियतकालिकांनी घ्यावी. मी सुखाने जगलो. माझी आता कोणाही विरुद्ध तक्रार नाही. माझ्याशी मतभेद असलेल्यांशी मी झगडलो, पण माझा कोणाही विरुद्ध आकस नाही. म्हणून त्यांच्याशीही वैयक्तिक संबंध ठेवण्याचा मी प्रयत्न केला.

– हमीद दलवाई, मुंबई
९ एप्रिल १९७७

७.१९ मुस्लीम सत्यशोधक विश्वस्त निधी

'साधना', ४३१, शनिवार, पुणे ४११०३०

(हमीद दलवाई यांच्या निधनानंतर मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य थांबू नये, तसेच मंडळाचे कार्य अधिक गतिमान करता यावे, हे उद्दिष्ट ठेवून विश्वस्त निधी स्थापन करण्यात आला होता. या संदर्भात करण्यात आलेले निवेदन येथे देण्यात आले आहे – संपादक, मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचा इतिहास.)

मुस्लीम समाजात प्रबोधनाची व रचनात्मक कामाची परंपरा सुरू व्हावी, यासाठी हमीद दलवाई यांनी प्रयत्नांची शर्थ केली. त्यांनी आरंभिलेल्या या कार्याला एका चळवळीचे स्वरूप यावे, या दृष्टीने मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली; लेखन, भाषणे व संभाषणे इत्यादी मार्गांनी मुसलमानांच्या विविध प्रश्नांबाबत जागृती निर्माण केली. विशेषतः तलाक व सवत या धाकापोटी मुस्लीम स्त्रियांवर होणारी जुलूम-जबरदस्ती आणि मुलांची होणारी आबाळ त्यांना असह्य वाटत असे. त्या दृष्टीने त्यांनी मुस्लीम समाजात अनेकविध कार्य सुरू केले होते. त्यांच्याभोवती मुस्लीम तरुण गोळा झाले आणि समाजातील दुःख व अन्याय दूर करण्याच्या कामाला लागले. हमीद दलवाई हे त्यांचे नुसते स्फूर्तिस्थान नव्हते, तर त्यांची सामाजिक कार्याची प्रेरणा धगधगती राहावी, यासाठी ते साधनांचीही जुळवाजुळव करीत असत.

हमीद दलवाई यांच्या निधनामुळे क्षणकाळ मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या तरुण कार्यकर्त्यांना धक्का बसला, पण त्यांनी हमीद दलवाई यांच्या प्रेरणेने सुरू झालेले मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्य जिद्दीने पुढे चालवावयाचा निर्धार केला आहे. दलवाई यांचे कार्य लोकाधारित होते. त्याच पद्धतीने हे कार्य पुढे चालणार आहे. शैक्षणिक शिबिरे, परिसंवाद, परिषदा, बालवाड्या, उत्पादन केंद्रे, बेसहारा स्त्रिया-मुलांना निवारा अशा विविध संस्थांची उभारणी व अडीअडचणींत कायदेविषयक मदत देणारी केंद्रे, असा हा कामाचा मोठाच व्याप आहे. या कामासाठी सर्व वेळ सेवकांची योजना करावी लागेल. हे सर्व करावयाचे तर त्यासाठी पैसे आणि साधने जमवावी लागतील. त्या हेतूने मुस्लीम सत्यशोधक विश्वस्त निधी उभारण्याचे ठरवले आहे. हा निधी एक विश्वस्त मंडळ निर्माण करून त्याच्या स्वाधीन करण्यात येईल. श्रीमती मेहेरून्निसा दलवाई (हमीदच्या पत्नी), बाबुमियाँ बँडवाले (अध्यक्ष, मुस्लीम सत्यशोधक मंडळ), डॉ. बाबा आढाव (अध्यक्ष, महात्मा फुले समता प्रतिष्ठान) आणि यदुनाथ थत्ते (संपादक, साधना) इत्यादींचे विश्वस्त मंडळ त्यासाठी स्थापन करण्यात येईल. विश्वस्त कायद्यानुसार व निधीच्या संविधानानुसार संस्थेचे काम चालेल. हमीद दलवाई यांनी सुरू केलेल्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याला त्यामुळे यापुढे सातत्य राहील. भारतीय संविधानात म्हटल्याप्रमाणे जात, धर्म, वंश, प्रदेश व स्त्री-पुरुष भेदरहित अखिल भारतीय नागरिकत्व विकसित व्हावे, हीच हमीद दलवाईची आकांक्षा होती. त्यासाठीच या निधीला जनतेने आपुलकीने साहाय्य करावे, अशी

विनंती आहे. निधीची रक्कम 'मुस्लीम सत्यशोधक विश्वस्त निधी' या नावाने, 'साधना' ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३० या पत्त्यावर पाठवावी.

(संदर्भ: मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, संपादक, सय्यद मुनीर, वर्ष५ वे, जुलै १९७६ ते सप्टेंबर १९७७, पृष्ठ क्र. ३८)

७. २० हमीद दलवाई प्रथम स्मृतिदिनाच्या निमित्ताने निवेदन

मुस्लीम सत्यशोधक मंडळ, पुणे

आज ३ मे १९७८ रोजी हमीद दलवाई यांचा प्रथम स्मृतिदिन आहे. त्यांनी सुरू केलेले मुस्लीम समाजसुधारणेचे कार्य पुढे नेणे, हीच आजच्या दिवशी त्यांना योग्य श्रद्धांजली ठरेल.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ मुस्लीम समाजामध्ये दोन स्तरांवर कार्य करते – समाजांतर्गत सुधारणा आणि राष्ट्रीय उभारणीत मुस्लिमांचा हातभार. समाजांतर्गत सुधारणांमध्ये मंडळाला खालील सुधारणा महत्त्वाच्या वाटतात :

१. मुस्लीम स्त्रियांना वैवाहिक व वारसा हक्क यांबाबत न्याय देणारे कायदे त्वरित अमलात यावेत.
२. जुबानी तलाक व बहुपत्नीत्वाचा कायदा ताबडतोब रद्द करावा.
३. वक्फ निधीचा समाजातल्या गरीब मुलांच्या शिक्षणासाठी वापर करता यावा, म्हणून शासकीय नियंत्रण आणावे.
४. बोहरी समाजातल्या अंतर्गत बहिष्कार प्रथेविरुद्ध शासनाने त्वरित कडक कारवाई करावी.
५. समान नागरी कायदा लागू करावा.

मंडळ मुस्लीम जातीयवादी राजकारणाविरोधी आहे. जातीयवादी मुस्लीम नेते व पक्ष मुसलमानांना मागासलेले ठेवून आपले नेतृत्व कायम करतात. समाजाने वेळीच जागृत व्हावे.

सर्व माणसे समान आहेत, असे मंडळ मानते. माणसामाणसांत धर्मावरून, जातीवरून, लिंगावरून, वर्णावरून भेद केला जाता कामा नये. सर्वांना समान अधिकार व सर्वांवर समान जबाबदाऱ्या असलेला समाज निर्माण करण्यासाठी हे मंडळ कार्य करीत आहे. या कार्यात आम्हांला सर्वांचे सहकार्य हवे आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्याविषयी आवाहन वाचल्यानंतर पुष्कळांचे समाधान होईल. तसे झाल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा, अशी विनंती आहे. कोणाची काही शंका असल्यासही संपर्क साधावा. कोणत्याही मुद्द्याबाबत शांतपणे विचारविनिमय करण्याला मंडळाची सदैव तयारी राहील.

पत्ता : मुस्लीम सत्यशोधक मंडळ, ४३० शनिवार, पुणे ३०
साधना प्रेस, पुणे ३०

७. २१ हमीद दलवाई यांची ग्रंथसंपदा

१) लाट – हमीद दलवाई – मंजुळ प्रकाशन, पुणे, १९६१
२) इंधन – हमीद दलवाई, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९६६
३) आग्नेय आशियातील संघर्ष – ब्रायन क्रोझियर, मराठी अनुवाद – हमीद दलवाई, जनपद प्रकाशन, मुंबई, १९६७
४) मुस्लीम जातीयतेचे स्वरूप कारणे व उपाय (४ लेख) – हमीद दलवाई, साधना प्रकाशन, पुणे, १९६८
५) Muslim Politics in India – Hamid Dalwai (Ed. and Trans. by Dilip Chitre), Nachiket Publications, Mumbai, 1968.
६) 'इस्लामचे भारतीय चित्र' – हमीद दलवाई (दै. 'मराठा'त १९६८ मध्ये क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला) श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती १९८२, दुसरी आवृत्ती, साधना प्रकाशन, पुणे, २०१६)
७) राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान (लेखसंग्रह) – हमीद दलवाई, साधना प्रकाशन, पहिली आवृत्ती, २००२, दुसरी आवृत्ती, २००५, तिसरी आवृत्ती, २०१२ (सुगावा प्रकाशन) पुणे
८) जमीला जावद आणि इतर कथा – हमीद दलवाई यांचे १९५२-६६ काळात प्रसिद्ध झालेल्या कथा, साधना प्रकाशन, पुणे, २०१६
९) भारतातील मुस्लीम राजकारण ('मुस्लीम पॉलिटिक्स इन इंडिया'चा अनुवाद) – हमीद दलवाई, अनुवादक – मिलिंद चंपानेरकर साधना प्रकाशन, पुणे, २०१७.
१०) कानोसा : भारतातील मुस्लीम मनाचा – हमीद दलवाई, साधना प्रकाशन, पुणे, २०१७

७. २२ हमीद दलवाई यांच्याविषयीची संदर्भसाधने

१. जिहाद – हुसेन जमादार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९३
२. दगडाबरची पेरणी – सय्यदभाई, अक्षरमानव प्रकाशन, पुणे, २००९
३. हमीद (आठवणी मित्राच्या) – अनिल अवचट, नीलकंठ प्रकाशन, १९७७
४. हमीद दलवाई स्मृतिविशेषांक, साधना साप्ताहिक विशेषांक, १४ मे १९७७
५. हमीद दलवाई स्मृती अंक, मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, १९७७
६. मी भरून पावले आहे – मेहेरून्निसा दलवाई, साधना प्रकाशन, पुणे, १९९५
७. हमीद दलवाई विशेषांक, मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, १९९८
८. हमीद दलवाई – क्रांतिकारी विचारवंत – संपादक प्रा. शमसुद्दिन तांबोळी, डायमंड पब्लिकेशन्स, पहिली आवृत्ती, २००९
९. पुनर्भेट हमीद दलवाईंची, साधना साप्ताहिक विशेषांक, १५ ऑगस्ट २०१५
१०. अँग्री यंग सेक्युलॅरिस्ट : संकलन – मेहेरून्निसा दलवाई, साधना प्रकाशन, पुणे, २०१७

७.२३ संदर्भसूची

१. अवचट, अनिल, 'हमीद', नीलकंठ प्रकाशन, पुणे, १९७७.
२. उगले, जी. ए., 'सत्यशोधक चळवळीचा समग्र इतिहास', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०२२.
३. कुंभार, नागोराव, 'मुस्लीम साहित्य व समाज चिंतन', प्रबोधन प्रकाशन, लातूर, १९९७.
४. कुरुंदकर, नरहर, 'जागर', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., सहावी आवृत्ती, पुणे, २००८.
५. गर्गे, स. मा., 'भेटी-गाठी', मानसन्मान प्रकाशन, पुणे, २००२.
६. चंद्र, बिपन, 'कम्युनलिझम इन मॉडर्न इंडिया', अनु. तरवडे विजय, चेतक बुक्स, पुणे, २०२१.
६. जमादार, हुसेन, 'जिहाद', मानसन्मान प्रकाशन, पुणे, १९९३.
७. डॉ. दाभोलकर, नरेंद्र, 'समता-संगर', साधना प्रकाशन, तिसरी आवृत्ती, पुणे, २०१८.
८. डॉ. पठाण, अक्रम, हबीबखान, 'मुस्लीम मराठी साहित्य', युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २०१४.
९. डॉ. फडके,य.दि., 'स्वातंत्र्य आंदोलनातील मुसलमान', लोकमित्र सहकारी मुद्रण प्रकाशन संस्था मर्यादित, मुंबई, १९८६.
१०. डॉ. मोरे, सदानंद, 'महाराष्ट्राची लोकयात्रा', सकाळ प्रकाशन, पुणे, २०२२.
११. डॉ. राजूरकर न. गो., 'वेगळी माणसं, वेगळ्या वाटा', संगत प्रकाशन, नांदेड, २०१३.
१२. तांबोळी, शमसुदिद्न, 'आझाद कलाम', अक्षर मानव प्रकाशन, पुणे, २०११.
१३. तांबोळी, शमसुदिद्न, 'मुस्लीम समाज व्यक्ती-विचार-साहित्य', नवीन उद्योग, पुणे, २०१०.
१४. तांबोळी, शमसुदिद्न (संपा.), 'हमीद दलवाई - क्रांतिकारी विचारवंत', डायमंड पब्लिकेशन्स, दुसरी आवृत्ती, पुणे, २०१४.
१५. थत्ते, यदुनाथ, 'निवडक तवारीख', मंजुल प्रकाशन, पुणे, १९८१.
१६. थत्ते, यदुनाथ, 'मुसाफिरनामा', आन्तरभारती प्रकाशन, औरादशहाजानी, १९९३.
१७. थत्ते, यदुनाथ, 'मुस्लीम मनाचा कानोसा', साधना प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पुणे, २०२१.
१८. थत्ते, यदुनाथ, 'मुस्लीम समाजातील वाहते वारे', साधना प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पुणे, २०२१.
१९. दलवाई हमीद, 'जमीला जावद आणि इतर कथा', साधना प्रकाशन, चौथी आवृत्ती, पुणे, २०२२.
२०. दलवाई हमीद, 'भारतातील मुस्लीम राजकारण', अनु. चंपानेरकर मिलिंद, साधना प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पुणे, २०१९.
२१. दलवाई, मेहेरून्निसा, 'अँग्री यंग सेक्युलॉरिस्ट', साधना प्रकाशन, पुणे, २०१७.

२२. दलवाई, मेहेरून्निसा, 'मी भरून पावले आहे', साधना प्रकाशन, सातवी आवृत्ती, पुणे, २०२०.
२३. दलवाई, हमीद, 'इंधन', मौज प्रकाशन, अकरावी आवृत्ती, मुंबई, २०२१.
२४. दलवाई, हमीद, 'इस्लामचे भारतीय चित्र', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८२.
२५. दलवाई, हमीद, 'मुस्लीम जातीयतेचे स्वरूप – कारणे व उपाय', साधना प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पुणे, १९७८.
२७. दलवाई, हमीद, 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान', चौथी आवृत्ती, पुणे, २०२२.
२८. दलवाई, हमीद, 'लाट', मौज प्रकाशन गृह, तिसरी आवृत्ती, मुंबई, २००३.
२९. देशपांडे, पु. ल., 'मैत्र', मौज प्रकाशन, सातवी आवृत्ती, मुंबई, २००६.
३०. नाईक, एम. ए., 'एका सत्यशोधकाची स्मरणगाथा', मुस्लीम समाज प्रबोधन व शिक्षण संस्था, कोल्हापूर, २०१६.
३०. पगडी, सेतुमाधवराव, 'भारतीय मुसलमान : शोध आणि बोध', परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, तिसरी आवृत्ती, २००६.
३१. पवार शरद, 'लोक माझे सांगाती...', राजहंस प्रकाशन पुणे, सुधारित आवृत्ती,२०२३
३२. प्रा. तांबोळी, शमसुद्दिन, 'मुस्लीम समाज प्रबोधन आणि विकास', नवीन उद्योग प्रकाशन, पुणे, २०१०.
३३. प्रा. फ. म. शहाजिंदे आणि प्रा. तांबोळी, फारुख, 'मुस्लीम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप', मुस्लीम मराठी साहित्य सांस्कृतिक मंडळ आणि भूमी प्रकाशन, लातूर, २०१४.
३४. प्रा. फ. म. शहाजिंदे, 'मुस्लीम मराठी साहित्य : परंपरा, स्वरूप आणि लेखकसूची', भूमी प्रकाशन, लातूर, दुसरी आवृत्ती, २०१३.
३५. प्रा. बेन्नूर, फक्रूद्दीन, 'भारतीय मुसलमानांची समाजरचना आणि मानसिकता', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१२.
३६. प्रा. बेन्नूर ,फक्रूद्दीन , 'हिंदुत्व, मुस्लीम आणि वास्तव', भूमी प्रकाशन, लातूर, २००७.
३७. प्रा. मुजीब, 'भारतीय मुसलमान', अनु. वसंत नगरकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८९.
३८. फैजी, असफ, ए. ए., 'इस्लामसंबंधी एक आधुनिक दृष्टीकोन', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.
३९. बेग, एम. आर. ए., 'भारतातील मुसलमानांपुढील पेच', अनु. खोडवे, अच्युत, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८.
४०. माळी, संदीप, कडू, 'हमीद दलवाई निवडक कथा : आकलन आणि आस्वाद', अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०१८.
४१. मुकादम, अब्दुल कादर, 'इस्लाम – ज्ञात आणि अज्ञात', अक्षर प्रकाशन, मुंबई, २०१९.
४२. मुकादम, अब्दुल कादर, 'दास्तान भारतीय मुसलमानांची', बॉम्बे सर्वोदय फ्रेन्डशिप सेंटर,

मुंबई, २००५.
४३. मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, जानेवारी १९७३, कोल्हापूर.
४४. हमीद दलवाई स्मृति विशेषांक, साधना प्रकाशन, १४ मे १९७७, पुणे.
४५. मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, जुलै १९७६ ते सप्टेंबर १९७७, पुणे.
४६. मुस्लीम सत्यशोधक पत्रिका, जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२०, पुणे.
४७. मुस्लीम सत्यशोधक मंडळ, 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ - उद्देश व भूमिका', इंडियन सेक्युलर सोसायटी, पुणे, १९७९.
४८. रानडे, प्रतिभा, 'बुरख्याआडच्या स्त्रिया', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८७.
४९. रॉय. एम. एन, 'इस्लामचे ऐतिहासिक योगदान', अनु. प्रा. भिंगे सुभाष, हरिती पब्लिकेशन्स, पुणे, २०२२.
५०. लिमये, मधु, 'धर्माधता राज्यसंस्थेवरील घोर संकट', अनु. दामले, वासंती, केशव गोरे स्मारक ट्रस्ट, मुंबई आणि साधना प्रकाशन, पुणे, २०२२.
५१. लेव्ही, रूबेन, 'इस्लामची सामाजिक रचना', अनु. केळकर, श्रीपाद, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथामावृत्ती, पुनर्मुद्रण, २०१९.
५२. वकील, अलीम, 'सुफी संप्रदायाचे अंतरंग', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०००.
५३. वैद्य, द्वा. गो. आणि दीक्षित राजा, 'प्रार्थनासमाजाचा इतिहास', एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई, द्वितीयावृत्ती, मुंबई, २०१९.
५४. शरीफ, जफर, 'इस्लामची जीवनपद्धती', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६.
५५. शिरसाठ, विनोद (संपा.), 'पुनर्भेट हमीद दलवाईंची', साधना प्रकाशन, पुणे, २०१५.
५६. सय्यदभाई, 'दगडावरची पेरणी', अक्षर मानव प्रकाशन, पुणे, २००९.
५७. सरदार, बाळकृष्ण गंगाधर, 'महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाची वाटचाल', नवनिर्माण प्रकाशन, पुणे, १९८६.

English:

1. Dalwai, Hamid, 'Muslim Politics in India', Trans. Chitre, Dilip, Penguin Random House India, Gurugram, 2023.
2. Fayzee, Asaf, A. A., 'A Modern Approach to Islam', Oxford University Press, Delhi, 1981.
3. Fyzee, Asaf A. A., 'The Reform of Muslim Personal Law in India', Nachiketa Publications Limited, Bombay, 1971.
4. Guha, Ramachandra, 'Makers of Modern India', Viking in Penguin Books India, New Delhi, 2010.
5. Sayyadbhai, 'Jihad-E-Teen Talaq', Trans. Patwardhan-Kulkarni

Anjali, Samakalin Prakashan, Mumbai, 2014.
6. Shah, A. B. , 'What Ails Our Muslims?', Indian Secular Society, Pune, 1981.
7. Shahin, Sultan, 'Introducing New Age Islam', New Age Islam Foundation, 7th Vol. , New Delhi, 2013.
8. The Secularist, Bulletin of Indian Secular Society, July-September 1970, Pune.
9. The Secularist, Journal of Indian Secular Society, January-February 1972, Pune.
10. The Secularist, Journal of Indian Secular Society, January-February 1973, Pune.
11. The Secularist, Journal of Indian Secular Society, September-October 1973, Pune.
12. The Secularist, Journal of Indian Secular Society, November-December 1973, Pune.
13. The Secularist, Journal of Indian Secular Society, January-February 1974, Pune.
14. The Secularist, Journal of Indian Secular Society, March-April 1974, Pune.
15. The Secularist, Journal of Indian Secular Society, May-June 1977, Pune.
16. The Secularist, A Journal of Secularism, Rationalism and Humanism, July-August 2002, Pune.

वृत्तचित्र

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वाटचालीची विविध वर्तमानपत्रांनी घेतलेली दखल.

२३ मार्च १९७०, दै. विशाल सह्याद्री

सामाजिक सुधारणेच्या कार्यात धर्माचा आधार घेणे अयोग्य

पुण्यात मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना

पुणे, दि. २२–सामाजिक सुधारणेचा विचार करताना किंवा विशिष्ट सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करताना धर्माचा आधार घेऊ नका असे विचार श्री. एम्.डी. शमसुद्दीन यांनी व्यक्त केले. एम्.डी. शमसुद्दीन यांनी मुस्लिम सत्य शोधक मंडळाची स्थापना नवरात्रात [illegible] व्यक्त केले.

श्री. शमसुद्दीन पुढे म्हणाले, प्रत्येक सामाजिक सुधारणेचे समर्थन करताना धर्माचा आधार घेतला जातो. परंतु सुधारणा ही धर्माच्या पलीकडे जाणारी असली पाहिजे. [illegible] असे ते म्हणाले. [illegible] मुस्लिम समाजातील सुधारणा करताना [illegible] मुस्लिम समाजातील सुधारणा करताना [illegible] मुस्लिम समाजातील सुधारणा करताना [illegible]

२५ मुस्लिम संस्थांची उपस्थिती

श्री. शमसुद्दीन यांनी सांगितले की, [illegible] मुस्लिम समाजातील [illegible] २५ मुस्लिम संस्थांचे प्रतिनिधी हजर होते. डॉ. [illegible] मुस्लिम समाजातील सुधारणा [illegible] २५ मुस्लिम संस्थांचे प्रतिनिधी हजर होते. डॉ. [illegible] मुस्लिम समाजातील सुधारणा [illegible]

पुरोगामी मंडळ

[illegible] मुस्लिम समाजातील सुधारणा [illegible] मुस्लिम समाजातील सुधारणा [illegible] मुस्लिम समाजातील सुधारणा [illegible]

[illegible]

[illegible] मुस्लिम समाजातील सुधारणा [illegible] मुस्लिम समाजातील सुधारणा [illegible] मुस्लिम समाजातील सुधारणा [illegible]

२० मार्च १९७०

मुस्लीम जागृतीसाठी पुण्यांत सत्यशोधक मंडळ स्थापणार

श्री. हमीद दलवाई यांचे पत्रपरिषदेत निवेदन

पुणे, दि. १९ (आमच्या प्रतिनिधीकडून) :–मुस्लीम समाजात धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद निर्माण व्हावा आणि सामाजिक समतेची बांधणी मानवीमूल्ये प्रस्थापित व्हावीत या हेतूने सामाजिक जागृति करण्यासाठी पुणे शहरात २२ मार्च रोजी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ' स्थापन होत आहे. भारतात अशा प्रकारचे मंडळ प्रथम पुण्यातच स्थापन करण्याचा प्रयत्न होईल. हे मंडळ केवळ मुस्लीम बांधवांपुरतेच मर्यादित काम करणार नाही, असे मंडळाचे स्वातंत्र्य सैनिक, मुस्लीम समाजातील समाजसुधारक श्री. हमीद दलवाई यांनी आज पत्रपरिषदेत सांगितले.

वैचारिक दृष्टिकोन

या मंडळाची तात्त्विक बैठक आणि सामाजिक अपेक्षा काय आहेत? याची माहिती सांगताना सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते श्री. हमीद दलवाई यांनी सांगितले की, "स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय मुस्लिमांपुढे नवी आव्हाने उभी आहेत. भारतातील हिंदूंनी परकीयांच्या वर्चस्वाविरुद्ध क्रांतीची केली. पण मुस्लीम समाज मात्र परंपरागत धर्म व श्रद्धांना कवटाळून बसला. बदललेल्या परिस्थितीत भारतातील हिंदू मनांमध्ये सामाजिक प्रबोधनाची निर्माण झालेली दरी भरून काढावी असा या मंडळाचा वैचारिक दृष्टिकोन आहे."

पुण्यातून वैचारिक क्रांति घडवून

श्री. हमीद दलवाई आणखी म्हणाले की, "मुस्लीम समाजाच्या प्रबोधनाचा विचार पुणे शहरात जागल्या रीतीने बळावा, त्यामुळे मंडळाच्या स्थापनेस या शहराची निवड केली. पुणे शहरातूनच या वैचारिक क्रांतीचे लोण सर्वत्र पसरेल अशी आशा वाटते.

पुणे शहरात आतापर्यंत या मंडळाचे ५० सभासद झाले असून त्यात ७ महिला आहेत. भारतात हिंदू-मुसलमानांसाठी एकाच प्रकारचा सामाजिक कायदा (कॉमनकोड) असावा या संबंधी जनमत संघटित करण्यासाठी या मंडळातर्फे स्वाक्षरी संघह मोहीम सुरू होईल. तसेच महाराष्ट्रात उर्दूचा आग्रह न धरता मराठी भाषेच्या माध्यमाचा स्वीकार मुसलमानांनी करावा यासाठीही हे मंडळ प्रयत्नशील राहील."

प्रतिसाद मिळण्याची आशा

मंडळाच्या कार्याला कितपत प्रतिसाद मिळेल ? या प्रश्नावर उत्तर देताना श्री. हमीद म्हणाले, "मुस्लीम समाजातील तरुण मंडळी हा विचार तीकर स्वीकारतील अशी परिस्थिति आहे. देवळाली, कोल्हापूर इत्यादि भागात दौरा करीत असताना मंडळाच्या कार्याबद्दल आम्हा उत्सुकता दिसून आली. मुस्लीम समाजातील पुढारी मंडळी राजकारणात गुरफटून स्वार्थी बनली आहेत. आणि बहुतेक वृद्ध लोक धार्मिक विचारांनी संकुचित वृत्तीचे बनले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून या कार्याला विरोधच होण्याची शक्यता आहे. परंतु भारतातील काही राज्यांतून तरुण लेखकांचे विचार वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेले पाहून मुस्लीम समाजात सुधारणेची लाट येईल असे वाटते."

हमीद पुढे म्हणाले, " वास्तविकरीत्या, स्वातंत्र्योत्तर अशाप्रकारचे सुधारणेसाठी स्वतंत्र मंडळ विशिष्ट धर्मगटासाठी काढण्याची आवश्यकता निर्माण व्हावयाची नको होती. परंतु मुस्लीम समाजाच्या प्रबोधनाकडे लक्ष देण्यासाठी निदान पुणे येथे या मंडळाचे कार्यक्षेत्र या समाजापुरते मर्यादित ठेवले आहे. कालांतरी सामाजिक प्रबोधनाची दरी नष्ट होईल त्यावेळी हे मंडळ केवळ या समाजापुरते कार्य करणार नाही."

२० मार्च १९७०

आधुनिक समाजप्रवाहाशीं मुस्लिमांना जोडण्याचे प्रयत्न

पुणें, दि. १९—(भारती) परंपरागत अंधश्रद्धा उरीं कवटाळून बसलेल्या मुस्लिम समाजाला आधुनिक मानवी मूल्यांच्या प्रवाहपातळ वर आणण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली आहे, असें मुस्लिम नेते श्री हमीद दलवाई यांनीं आज सकाळीं पत्रकारांना सांगितलें.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना कांहीं विचारवंत तरुणांनीं स्वयप्रेरणेनें केली असून मुस्लिम समाजाला योग्य दिशा दाखवण्याचा प्रयत्न मंडळ करील असें ते म्हणाले. या मंडळाला सुशिक्षित मुस्लिमांचा व तरुणवर्गाचा वाढता पाठिंबा मिळत असल्याचें त्यानी सांगितलें.

या मंडळाच्या महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं शाखा स्थापन करण्यात येणार आहेत. मंडळाच्या कार्यक्रमाचे अनेक भागांत उत्स्फूर्तता निर्माण झाल्याचें सांगून श्री. दलवाई म्हणाले कीं, मुस्लिम स्त्रियानाहि मंडळाच्या कार्यांत भाग घेता यावा म्हणूनें वेगळें मंडळ स्थापण्यांत येईल.

महाराष्ट्रांतील मुस्लिमानीं उर्दूएवजी मराठी माध्यम स्वीकारावें या दृष्टीनें दि. २२ मार्चच्या बैठकींत विचार विनिमय करण्यांत येणार आहे.

२० मार्च १९७०

मुस्लिमांची धार्मिक भूमिका बदलणे जरूर : हमीद दलवाई

पुण्यात 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' स्थापन

पुणे :- मुस्लिम समाजाच्या सामाजिक आणि धार्मिक भूमिकेत मूलभूत बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. पुण्यामध्ये या मंडळाचे एक शाखा कार्यालय सुरू करण्यात आले असून त्याच्या उद्घाटनाचे भाषण करताना हमीद दलवाई यांनी वरील माहिती दिली. या संस्था विकासाचे उद्घाटन श्री. हमीद दलवाई यांनी मुख्यतः वेगवेगळ्या मुस्लिम प्रतिनिधींनी केलेल्या भाषणांचा आढावा घेतला.

मुस्लिम समाजामध्ये सार्वजनिक जागृतीचा अभाव आहे आणि मुस्लिम कौमेतील प्रतिनिधींचा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे, असे श्री. दलवाई यांनी सांगितले.

स्थापनेच्या कार्याबद्दल बोलताना ते म्हणाले, "भारतीय मुस्लिम समाज आपली आध्यात्मिक स्वातंत्र्याविषयी विलक्षणच जागरूक आहे. त्यामुळे बाहेरून आपल्या समाजात, धर्मात काही घुसू नये म्हणून तो सतत खबरदारी घेत असतो. त्यामुळे अनेक चांगल्या सुधारणा आपल्या समाजात घडवून आणणे कठीण होऊन बसते. मुस्लीम समाजाच्या या मनोवृत्तीचा फायदा घेऊन काही हितसंबंधी लोक मुस्लीम समाजाच्या सुधारणेचा प्रश्न केला, तर मुस्लिम विभक्तवादाच्या हातातील तो प्रश्न खेचून घेतात. मुस्लीम समाजाच्या कार्यकर्त्यांना आपल्या धर्मग्रंथांचा अभ्यास करून त्यांच्यामध्ये आढळणाऱ्या या समाजाकुल होत चालेल्या आहेत. आजपर्यंत या परिस्थितीत बदल झालेला नाही. हे सर्व बदलण्यासाठी हे स्वतंत्र व्यासपीठ स्थापन होणे आवश्यक आहे.

जबरी

"स्थानांतरानंतर अशी एकही वेगळी सुधारणावादी दिशाभूल धर्मगटासाठी मांडले जाण्याची वास्तविक आवश्यकता असायला नको होती. हे जरी खरे, तरी पण मुस्लिम समाजाच्या प्रबोधनासाठी अशा प्रकारच्या आज तरी मंडळाच्या कार्यक्षेत्र तसेच समाजापुरत्या मर्यादित ठेवणे भाग आहे. सामाजिक बदलाची ही दिशा जेव्हा स्पष्ट होईल तेव्हा हे मंडळ मुस्लिम समाजापुरते कार्य करणार नाही.

मुस्लिम समाजाचे मत्सर हे काही [illegible] विशेषतः उच्च पदवीचे पदवीधर यांनी आपली ही पदवी बदलणे आवश्यक आहे असे आपले ते म्हणाले. "समाजसुधारणेचे काम हा कायमस्वरूपी चालणारा [illegible] साठी सभा तहार झाले आहेत. मुस्लिम मुलांनी, महाराष्ट्रात मराठी माध्यमातून शिक्षण घेतले पाहिजे. स्त्री-पुरुष समाजाने एकत्र सभांनी पाहिजेत असा [illegible] आग्रह धरला गेला.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाची [illegible] कार्यालय सुरू करण्यासाठी येथील [illegible] दि. २१ मार्च [illegible]

२० मार्च १९७०

'तलाक' पद्धत रद्द करण्याची मागणी : स्वाक्षरी मोहीम सुरू

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा उपक्रम

(आजच्या बातमीदाराकडून)

पुणे ता. १–मुस्लीम समाजातील तोंडी तलाक (घटस्फोट) पद्धत मुस्लीम स्त्रीयांवर घोर अन्याय करणारी असल्याने ती रद्द करण्यासाठी महाराष्ट्रात नव्याने स्थापन झालेल्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाने मोहीम सुरू केली आहे.

पंचावन्न तीन वेळा तोंडाने तलाक म्हटल्यावर विवाह बंधनातून मुस्लीम स्त्रीला मुक्त करता येते या अर्थाच्या कुराणचा पुरुषाकडून गैरवापर झाल्याचे असंख्य दाखले समाजात सापडतात आणि ही पद्धत चुकीची आहे याची जाणीव बहुसंख्य कुटुंबवत्सल मुस्लीमांना आहे हे ध्यानात घेऊन या मंडळातर्फे प्रथम 'स्वाक्षरी मोहीम' हाती घेण्यात आली आहे.

मुस्लीम नागरिकांचे आणि विशेषकरून स्त्रियांच्या सह्या जमविण्याचे कार्य या मंडळाने गेले काही दिवस चालविले असून अशा सह्यांचा पहिला हप्ता आणि निवेदन या महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांना देण्यात येणार आहे.

२० मार्च १९७०

मुस्लिमांनाही समान कायदा हवा : सत्यशोधकांची मागणी

पुणे, ता. १०–मुस्लिम समाजात सुधारणा करण्याच्या दृष्टीने [illegible] ५०० सह्यांचे एक निवेदन मुस्लीम सत्यशोधक मंडळातर्फे [illegible] श्री. वसंतराव नाईक यांना सादर करण्यात आले.

[illegible] मंडळाच्या [illegible] श्री. वसंतराव नाईक यांनी शिष्टमंडळाच्या [illegible] स्वीकारले. [illegible] मंडळाच्या [illegible] यांनी शिष्टमंडळाचे स्वागत केले. [illegible] मंडळाच्या [illegible] सत्यशोधक विवाह लावण्याचा अधिकार [illegible] यांना देण्यात यावा, [illegible] यांनी केली.

[illegible] तोंडी घटस्फोट) पद्धत बंद व्हावी, मालमत्तेच्या संबंधात मुस्लीम स्त्रियांना समान नागरी कायदा असावा, मुस्लीम धार्मिक संस्थांनी शिक्षणावर [illegible] खर्च करावा अशा [illegible] सुधारणांसाठी मुस्लीमांचे जनमत तयार करण्याचे काम हे मंडळ हाती घेणार असून त्यासाठी सह्यांची मोहीम सुरू केली आहे.

शिष्टमंडळात महिला

शिष्टमंडळात मंडळाचे अध्यक्ष श्री. ए. के. शेख, चिटणीस श्री. बशीरभाई, मुस्लीम नेते श्री. युसीफ इनामदार व डॉक्टर मेहबूबनगर कॉलेजचे प्रो. ए. बी. कुरेशी, श्रीमती शरीफा [illegible] श्री. [illegible] हे कार्यकर्ते होते. याशिवाय [illegible] मंडळाच्यावतीने [illegible] मंडळाचे [illegible] होते.

२० मार्च १९७०

महाराष्ट्र टाइम्स

दलबाई हल्ला प्रकरणावरून पुणे महापालिकेत खडाजंगी

दलबाई हल्ला प्रकरणी शिवसेनेवर खटला

२० मार्च १९७०

सरकारने कोणत्याहि एका धर्माला उत्तेजन देऊ नये

प्रगत मुस्लिमांच्या परिषदेत येणारा ठराव

४ डिसेंबर १९७०, संचार

निधर्मी तत्वज्ञानच भारताला तारू शकेल

डा. केजी थांचे विचार

पुणे, दि. २८— "धर्मनिरपेक्ष दिसणे सोपे आहे. परंतु धर्मनिरपेक्ष असणे कठीण आहे. त्यासाठी धर्माचे तत्वज्ञान समजून घेतले पाहिजे. आणि त्यानंतरच धर्मनिरपेक्ष तत्वज्ञान निर्माण करता येईल," असे विचार डा. केजी थांनी व्यक्त केले.

[illegible]

मुस्लिम स्त्रियांची पहिलीच परिषद पुण्यांत भरणार

[illegible]

६ जानेवारी १९७३ दै. महाराष्ट्र टाइम्स

टाइम्स

मुस्लिम सत्यशोधक पत्रिकेचे प्रकाशन

कोल्हापूर, दि. ५— महाराष्ट्र मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे मुखपत्र "मुस्लिम सत्यशोधक पत्रिका" या मासिकाचा प्रकाशन समारंभ मुकुंदास मंदिरात श्री. हमीद दलवाई यांच्या हस्ते थाटात झाला.

[illegible]

१२ जानेवारी १९७२, लोकसत्ता

अठरा मुस्लिम महिलांचा सामाजिक छळ थांबवा

मुख्यमंत्र्यांना सय्यद मेहबूब यांची विनंती

(लोकसत्ता प्रतिनिधीकडून)

पुणे, दि. १२ — महाराष्ट्र राज्य मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे निमंत्रक श्री. सय्यद मेहबूब यांनी अठरा मुस्लिम महिलांना सामाजिक छळाला तोंड द्यावे लागत असल्याबद्दल खेद व्यक्त केला आहे. ...

मुस्लिम सत्यशोधक मंडळापुढे अशांत घेरावचा मार्ग

(लोकसत्ता प्रतिनिधीकडून)

पुणे, दि. १९ — गुरु वारी झालेल्या अखिल भारतीय प्रेरणा मेळाव्यात मुस्लिम सत्यशोधक मंडळाने अशांत घेरावचा मार्ग अवलंबिण्याचे ठरविले आहे. ...

२८ डिसेंबर १९७१, लोकसत्ता

शरियत कायद्याचें जुनेपुराणे जुलमी जोखड भिरकावून द्या

प्रा. फैजींचें मुसलमान स्त्रियांस आवाहन

पुणे, दि. २७.

"मुस्लिम कायद्याच्या मर्यादेत सुधारणा करता येत नाहीत, असे जे आजचे आपले नेते व तथाकथित पंडितजन्ये म्हणणे आहे ते सपशेल चुकीचे असून, मुस्लिम महिलांचे शोषण करणाऱ्या १९३७ सालच्या जोखड भिरकावून देऊन, नवे व्यवहार करण्यासाठी मुस्लिम पर्सनल कायद्यात आवश्यक त्या सुधारणा घडवून आणण्याचे आवाहन डॉ. फैजी यांनी केले आहे.

शांतता देश विजय हुए स्त्रियांचा विजय

पुणे, दि. २७ — मुस्लीम महिला परिषदेच्या अध्यक्ष फैजी यांनी परिषदेचा समारोप करताना केलेल्या भाषणात फैजी यांनी ...

१२ जानेवारी १९७२, प्रभात

पुण्यांतील मुस्लिम महिला परिषदेत भाग घेणाऱ्या महिलांचा छळ थांबवं

सय्यद मेहबूब यांची मुख्यमंत्र्यांना तार

पुणे, दि. ११—" महाराष्ट्र राज्य मुस्लिम महिला परिषदेच्या पुण्यांत नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात भाग घेणाऱ्या अमरावतीच्या मुस्लिम महिलांचा छळ थांबविण्याची विनंती मुस्लीम सत्यशोधक मंडळ महाराष्ट्राचे चिटणीस श्री. सय्यद मेहबूब यांनी आज मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांना एक तार पाठवून केली आहे.

छळ थांबला नाही तर नाईकांना घेराव

" मंडळ अशा धमकावण्या अगर दबाव यांना भीक घालणार नाही. उलट पहिली बायको हयात असताना निकाह – दुसरा – विवाह करणाऱ्या मुस्लीम सद्गृहस्थांना घेराव घालण्याचा कार्यक्रम मंडळ तातडीने अमलात आणणार आहे. तसेच मुस्लीम महिलांचा छळ ताबडतोब थांबला नाही तर मुख्यमंत्र्यांच्या निवास स्थानापुढेही धरणे धरण्यात येईल असा इशारा श्री. सय्यदभाईंनी दिला आहे.

मुस्लिमांबरोबर हिंदूंचेही भारतीयकरण झाले पाहिजे

दलवाई यांचे शांतिनिकेतन लोकविद्यापीठात भाषण

सांगली, ता. २८– "राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही व धर्म निरपेक्ष शासन व्यवस्था" याबद्दल मुस्लिम सत्यशोधक समाजाचे प्रवर्तक श्री. हमीद दलवाई यांनी शांतिनिकेतन लोकविद्यापीठाच्या विद्यार्थ्यांबरोबर उद्बोधक चर्चा केली.

हा कार्यक्रम साहित्य मंडळ व सांस्कृतिक मंडळाने आयोजित केला होता. प्रथम डा. सौ. माया पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. यानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक गोष्टींसंबंधीत प्रश्नांची मुक्त उत्तरे दिली.

धर्माच्या श्रद्धा बदलाव्या

जातीयवादाबद्दल बोलताना ते म्हणाले की, जातीव्यवस्था व वारीदय असेच राहिले तर लोकशाही टिकू शकणार नाही. म्हणून सर्वांमध्ये एकात्मतेची भावना आली पाहिजे. मुस्लिमांबरोबर हिंदूंचेही भारतीयकरण झाले पाहिजे. जोपर्यंत धर्माचा काल संपत नाही. जास्तीत जास्त माणसाने व सुखाने कसे जगावे या दृष्टीचा विचार करण्याचा काळ आली आहे. तेव्हा भारतीय करण होऊन सामाजिक समतोल साधण्यासाठी धर्माच्या श्रद्धा बदलल्या पाहिजेत.

धर्मनिरपेक्ष शासन

शासनाचे धर्मनिरपेक्ष स्वरूप कसे असावे याबद्दल चर्चा करताना त्यांनी असे उद्गार काढले की, धर्म निरपेक्षता म्हणजे धर्म सोडून देणे नव्हे तर आपल्या धर्मामुळे सामाजिक सर्वसमतोलात अडथळा न येऊ देणे होय. धर्मनिरपेक्ष शासन व्यवस्थेत शासन कोणत्याही धर्माच्या आधाराने चालणार नाही तेव्हा धर्माची आध्यात्मिक व सामाजिक दृष्टी ही बाजूला ठेवता आली पाहिजे. स्वतंत्रता समता व बंधुता या राष्ट्रतत्त्वांचे प्रत्यक्ष जीवनात रूपांतर दिलेले आहे. तसेच व्यक्तिगत धर्मकल्पनांना सामाजिक मर्यादा आहेत.

या मुख्य प्रश्नाबरोबरच मुस्लिमांसाठी हिंदूंसाठी प्रतिबंधक कायदा मुलकी संघटना व त्यांचे कार्य या संबंधीचे अनेक प्रश्नांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली. कार्यक्रम एकंदर अतिशय माहितीपूर्ण व मनोरंजक झाला.

शेवटी प्रा. आर. एस. पाटील यांनी आभार मानले.

२९ डिसेंबर १९७२, मराठा

मुस्लिम सत्यशोधकांच्या मोर्चाला धराव नि दगडफेक

मराठा

कोंडींत सांपडलेल्या सत्यशोधकांना पोलिसांनी सुखरूप बाहेर काढलें !

दगडफेकींत ४ निदर्शक जखमी : वातावरण तंग

मुंबई, शुक्रवार—(वार्तापत्र) आज संध्याकाळी अ. भा. मुस्लिम सत्यशोधक [illegible] अधिवेशनावर मुस्लिम सत्यशोधक मंडळ व युवक क्रांतिदलातर्फे नेलेल्या मोर्चाला [illegible] नाक्या पाडिराम्या कडव्या मुसलमानांनी धराव घातला. त्यांनी निदर्शकांना वांद्रे [illegible] साठी पोलिसांनी गार्डात घातले तेव्हां कडव्या मुसलमानांनी दगडफेकीला सुरुवात केली. तेव्हां पोलिसांनी लाठीमार करून जमाव पांगविला.

[illegible] मुस्लिम सत्यशोधक समाजाचे संस्थापक स्व. हमीद मेमन, समाजाच्या अध्यक्षा श्रीमती जेबा दोश, श्रीमती ठाकरे, कार्याध्यक्ष [illegible] साथी नाईक, निरंजन सावंत, [illegible] पोळेकर, अहमद खान, कमालाकर सुमेधा, सुरेश दळवी, मधुसूदन पेंडसे, सुरेंद्र केतुलकर आदि युवक होते.

'हमारा भाई [illegible] चाहिये' 'मुसलमान सत्यशोधक [illegible] करो', 'मुस्लिम महिलाओं को [illegible] करो' 'यह की मुस्लिम बाद [illegible] हो सकती' 'हम मुसलमानों के [illegible] गयी है' 'हम उनके [illegible] विरोध है' 'अल निदर्शकांचा [illegible] धडक होते, 'हमीद दलवाई [illegible] 'जाँस्ट्रीस नेवर [illegible]' 'डाऊन विथ [illegible]' [illegible] क्या है औरतों की गुलामी है' 'औरतों को आजाद करो' 'हमारी [illegible] रद्द करो' यासा घोषणा [illegible] होते.

२९ डिसेंबर १९७२, मराठा

सत्यशोधकांच्या माचाला घराव

७ मार्च १९७३, केसरी

मुस्लिमांच्या घटस्फोटांवर बंधन हवें

पुणे : मुस्लिम समाजातील घट- [illegible] या विधानावर खेद व्यक्त करून [illegible]
स्फोटांवर बंधन आलेच पाहिजे असे [illegible] मांडले.
प्रतिनिधि

श्री. इनामदार यांनी मुस्लिम समाजा- [illegible]
लील घटस्फोटांचे दुःख केले. ते म्हणाले, [illegible]
"महंमद पैगंबरांनी एक पत्नी असे- [illegible]
असली तरी पहिल्या पत्नीची [illegible]
संमती घेतली पाहिजे. [illegible]
ही सूचना मांडली. [illegible]

२३ ऑगस्ट १९७५



मशिदीत शिरून महिलेने घटस्फोट मिळविला

पतीच्या दुसऱ्या लग्नाने संताप

पुणे, ता.२३—पहिली पत्नी असताना दुसरे लग्न करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका मुस्लीम तरुणाकडून पहिल्या पत्नीने तिसऱ्या लग्नाचा मशिदीत चालू असताना धाडसाने मशिदीत शिरून घटस्फोट मिळविला असे समजते. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे प्रमुख श्री. सय्यदभाई हे या ठिकाणी वकीलांच्या हजेरीत होते आणि या प्रकरणाविषयी मुस्लीम तरुणाकडून पहिल्या पत्नीला घटस्फोट मिळवण्याकामी त्यांनी मदत केली असे समजते. या प्रकरणात काही मंडळींनी पोलिसांना पाचारण केल्यामुळे मंडळीत खळबळ माजली होती.

या मुस्लीम तरुणाचे दुसरे लग्न करण्याचा प्रयत्न चालू होता. त्यातील वधू ही मशिदीच्या एका प्रमुख [illegible] असल्याचेही [illegible] या प्रकरणात पहिल्या पत्नीने आपल्या पतीला गाठण्याकरिता मशिदीत प्रवेश केला. वस्तुतः मशिदीत [illegible] नसतो. पण त्यादृष्टीने [illegible] मंडळाचे पदाधिकारी [illegible]

७ सप्टेंबर १९७५

मुस्लीम स्त्रियांना पोटगीसाठी मोफत कायदेशीर सल्ल्याची सोय

पुणे, ता. २२—तलाक (घटस्फोट) दिलेल्या व घटस्फोट न देता टाकून दिलेल्या मुस्लीम स्त्रियांना पोटगी आणि इतर हक्क मिळण्यासंबंधी वकिलांकडून मोफत कायदेशीर सल्ला देण्याची सोय मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या पुढाऱ्यांनी केली असून त्यासाठी श्री. सय्यदभाई (भारत पेन्सिल्स, बाजीराव रोड, रेल्वे गेट-जवळ, १२ मुंबई रस्ता, पुणे ३) यांचे दुपारी १॥ ते ३॥ या वेळात भेटावे, असे सय्यदभाई यांनी जाहीर केले आहे.

मुस्लिम स्त्रियांनीच पुढाकार घ्यावा

...

...

...

१ ऑक्टोबर १९७५, सकाळ

तलाक मिळालेल्या महिलांचे मदतीसाठी निधी उभारला

Anti-divorce drive launched in Pune

११ ऑक्टोबर १९७५, महाराष्ट्र टाइम्स



दलवाईंना दिलेल्या देणगीवर आक्षेप

९ ऑक्टोबर १९७५, मराठवाडा

मराठवाडा

'जिहाद-ए-तलाक' च्या चळवळीस पुण्यात प्रारंभ

मुस्लिम सत्यशोधक मंडळाची मोहीम

१९ ऑक्टोबर १९७५, महाराष्ट्र टाइम्स

लग्नपिपासू नवऱ्याविरुद्ध
मुस्लिम युवतीची तक्रार

मुस्लिम सत्यशोधक मंडळ
जामा मशिदीसमोर निरोधने

२६ नोव्हेंबर १९७५, लोकसत्ता

'शरियत' कायदा त्वरित
रद्द करण्याची मागणी

२४ नोव्हेंबर १९७५, पूना हेराल्ड



POONA HERALD

MUSLIM WOMEN PLEAD FOR CHANGE IN MARRIAGE LAW

CONFERENCE DEMANDS OFFICIAL AND SOCIAL RELIEFS FOR DIVORCEES

By our Staff Reporter

POONA, [illegible] the prices of their arrest in a spectacular but [illegible] picture, a large number of divorced Muslim women staged [illegible] rights at a conference held here [illegible] afternoon.

[illegible] Tolaq Pidit Muslim Mahila Parishad, [illegible] the Muslim Satya Shodak Mandal. Many of them narrated their [illegible] the provisions of the "Shariat Law," under which men [illegible] to divorce their wives at their [illegible] will.

[illegible] "Talaq" and unconstitutional, under which they had been spurned by their spouses and forced to lead lives of misery and humiliation and, in many cases, having had even to look after young children.

The discarded women denounced justice and anyone from the society which, they complained had reduced the lives of Muslim women to those of "mere playthings" in the hands of men who dissolved their marriages by the utterance thrice of the word, "Talaq" under the Shariat Law.

The burden of these women's deliberations was: banish this inequitable law as it applies to marriage and replace it with a Common Civil Code to provide women with security in wedded life, which was otherwise beset by the constant threat of divorce.

Mr. Kalsum Parekh, Professor of Political Science at the Ismail Yusuf College, Bombay, who inaugurated the conference, narrated how a 50-year-old man had divorced his 28-year-old wife all because he preferred a sari-clad women to one wearing salwar and kameez. He got a girl of his choice, younger than his first wife, while the divorced woman had to take a husband much older than the first.

Hamid Dalwai's lead

Mrs. Parekh, in the course of her address, commended the inspiration provided by Mr. Hamid Dalwai, the founder of the Muslim Satiya Shodak Mandal, who, she recalled, had been her pupil at college. "At first I was not very hopeful when Hamid Dalwai explained his views to me about changing the Muslim Law," she said, adding: "Today Hamid seems to be on his way to achieving his goal."

"Aaj ke shahir kal ke paigambar hai." Today's martyrs are tomorrow's prophets Prof. Parekh said. She added: "Today, Hamid Dalwai is fighting for women's rights. Tomorrow every woman will thank him."

The conference, which was organised by Mr. Mehboob Sayyidbai, President of the Poona unit of the Mandal, was presided over by Begum Nasima Shaikh, an advocate working with the Bombay Municipal Corporation. It passed three resolutions which, inter alia, demanded abolition of the Shariat Law and its replacement by a Common Civil Code, compensation and maintenance for women divorced on illegal grounds till they get remarried, provision of employment opportunities for divorced women in public and private undertakings, provision of concessional educational and boarding facilities for the children of the divorced women, and the institution of a Rs. 10 crore fund with contributions from Waqfs and other philanthropic and social welfare organisations.

WOES OF THE DIVORCEES

Poona, Sunday: Tales of woe, untold suffering, humiliation and uncertainty were narrated by over a dozen Muslim women divorced by their spouses, at the one-day conference of the "Talaq Pidit Muslim Parishad" here. There must have been few among the audience whose heart must not have been touched on hearing the sufferings of these unfortunate victims what they called an inequitable law.

A 21-year old divorcee bemoaned that even inspite of securing a diploma in education after being divorced by her husband with whom she was living for only a year and a half, she had failed to get a job during the last four years—"all because I am a divorcee woman."

Another divorcee, Raziya Begum, said: "Ours was a happy married life for seven years. Then my husband took fascination for our neighbour and developed an illicit affair with her. He hastily threw me out of a window which resulted in my being confined in a hospital with a broken back. After divorcing me, he married the other woman."

A 40-year old woman, Zainabi, said that she was a Hindu when at the age of 17 she was abandoned by her husband. To earn her living she sold bidis. She was then protected by a Muslim who promised to marry her and thus wrote 30 tolas of gold and utensils from her. He however, married some other woman, a nurse, who left him on the legend about his relationship with Zainabi. Thereafter, Zainabi begged of him to marry her, which he did after she changed her religion from Hindu to Muslim. This marriage resulted in her getting her also children. The husband found yet a third woman as a partner and divorced Zainabi, who had to fend for herself to look after her children. Because her husband had deserted her, even the normal daughters-in-law do not look after her. Living alone, Zainabi depends on what ever little her kind neighbours can provide for her by way of succour.

Many of the divorcees mentioned that their husbands were very good to them for a short while after their marriage, but soon changed their attitude when some other woman attracted their attention. Some even mentioned witchcraft practised by other women to wean their husbands away from them.

Begum Nazima Shaikh, who presided over the function, told the "Poona Herald" at the end of the conference that she had talked about 25 cases of divorced women in Poona yesterday and was terribly moved by what she saw and was told by these women, most of whom were living as widowers, abandoned by their husbands, yet often secretly

४ मे १९७७, महाराष्ट्र टाइम्स

हमीद दलवाई यांचे निधन : विद्युतदाहिनीत अंत्यविधी

(आमच्या प्रतिनिधीकडून)

मुंबई, बुधवार — थोर मुसलमान समाज सुधारक हमीद दलवाई यांचे आज सकाळी ७ वाजता खासगी रुग्णालयात निधन झाले. ते ४९ वर्षांचे होते.

मुस्लिमांच्या विकासात ही दलवाई यांनी महत्त्वाची भूमिका घेतली होती.

अखेरची इच्छा

मृत्युपत्रात त्यांनी एक इच्छा व्यक्त केली होती. विद्युतदाहिनीत माझ्या शवाचे दहन करावे. मुसलमान किंवा हिंदू पद्धतीने कोणतेही सोपस्कार करू नयेत. निरपेक्षतेची भावना ही जगात व विशेषकरून मुसलमानांत वाढीस लागावी, यासाठी असे करावे, असे त्यांचे म्हणणे होते.

या इच्छेनुसार इस्लामिक मेडिसिन असोसिएशनचे डॉक्टर, हमीद दलवाई यांचे काही सहकारी व नातेवाईक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी मेहरुन्निसा, मुलगा इक्बाल व मुलगी सलमा असा परिवार आहे.

हमीद दलवाई यांनी मुस्लिम समाजातील अनिष्ट रूढी, धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व अन्य मुद्द्यांवर सातत्याने लेखन केले. मुस्लिम समाजातील सुधारणांसाठी त्यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली होती. मुस्लिम समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांच्यावर त्यांनी सडेतोड टीका केली होती. मुस्लिम समाजातील सुधारणांसाठी त्यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांना १९७६ साली पद्मश्री किताब देऊन गौरविण्यात आले होते.

हमीद दलवाई यांच्या निधनाने थक्का बसला —छगला

(आमच्या प्रतिनिधीकडून)

मुंबई, बुधवार— मुसलमान समाजे सुधारक हमीद दलवाई यांच्या निधनाने सामान्यांना धक्का बसला. सकाळ वृत्तपत्र मुंबई इलेक्ट्रिसिटी सप्लाय ॲण्ड ट्रान्सपोर्ट (बी. बी. इ. एस. टी.) इलेक्ट्रिक हाऊस, दादर, मुंबई ४०० ०२८ येथे दिनांक ४ मे १९७७ रोजी सकाळी ७ वाजता निधन झाले. ते ४९ वर्षांचे होते.

श्री. दलवाई यांनी मुस्लिम समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांच्यावर सडेतोड लेखन केले. मुस्लिम समाजातील सुधारणांसाठी त्यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली होती. मुस्लिम समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांच्यावर त्यांनी सडेतोड टीका केली होती. मुस्लिम समाजातील सुधारणांसाठी त्यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांना १९७६ साली पद्मश्री किताब देऊन गौरविण्यात आले होते.

४ मे १९७७, महाराष्ट्र टाइम्स

मुस्लिम समाजात नवजागृती करणारे हमीद दलवाई

हमीद दलवाईंचा जन्म १९३३ साली कोकणातील एका संपन्न कुटुंबात झाला. घरात गरीब, त्यामुळे कायमची काटकसरी अनुकूलता त्यांच्या वाट्यात आली नाही – फारसे ते कधी दिसले नाही. इंग्रजी घराणे सोडल्यावर त्यांचे अनुभवविश्व खूप विस्तारले. त्यांचा मुस्लीम समाजाबाहेर संपर्क येऊ लागला. १९४६ साली हाफुसेचा इलाज ते जाऊ लागले आणि एक नवा इतिहास त्यांना घडवू लागला. ते संघटनेला जोडले ही गोष्ट त्यांच्या समाजातील अनेकांना पसंत नव्हती, त्या काळात पाकिस्तानी वातावरण प्रबळ लागले होते. समाजात भिंती कुभ्या होऊ लागल्या होत्या. हमीद मोठ्या अस्वस्थतेत वावरत होते. लहानपणी जाड्या. लागेल्या होत्या. ते जन्मले होते कोकणी मुसलमानाने पाकिस्तानचे प्रेम का दाखवावे हे त्यांच्या स्वतःची पटत नव्हते. व्यापक समाजजीवनापासून स्वतःला का तोडायचे हे त्यांना विचार करूनही आकलन होत नव्हते.

मुस्लिमबहुलांचा शिक्षक

हमीद दलवाईंच्या लेखनाच्या उगम या वैचारिक संघातून झालेला आहे. मॅट्रिकच्या आसपास असताना या तरुणाने 'उर्दू आणि मराठी मुसलमान' हा लिहायलेला लेख मुंबईच्या ईदीनकात आला आणि लोक चमकले. सगळ्यांनी मुस्लीम राणाचले. 'मुस्लीम द्रोहाचा शिक्षक' मानून त्यांना जाहीर पाडण्याचा यत्न चालू झाला.

मॅट्रिक होताच ते मुंबईला आले. नोकरीसाठी वणवण फिरू लागले. अखेरीस नोकरी लागली. पुन्हा एकदा त्यांनी लेखणी हाती घेतली. 'कल्पनचारी' ही त्यांची कथा गाजली. सगळीतील विसंगतीने ते अस्वस्थ होते. नोकरीबाहेरून ते पत्रकार बनले. 'मराठा'त नोकरी चालू असतानाच ते भारतात दौरा करून आले. वार्तापत्रांतूनही चालून आले.

समाजकार्याची विचारसरणीही त्यांना कळू लागली. मानवेंद्रनाथांनी होता आणि अखेरीस पसाणिस्टकेंद्रात ते दाखलही झाले. त्यांची जीवनसाथीसुद्धा याच 'स्वातंत्र्योत्तर भारतीय मुस्लीम मानसा'चा अभ्यास करण्यासाठी त्यांनी देशभरातून दौरा केला. फकीरलाल त्यांनी रामराव ढाकरा, अनेक विचारवंतांशी त्यांचा संपर्क आला. मुसलमानांत जातीय्य प्रवृत्तीपेक्षा आणि लोकशाही जाणीवा रुजलेल्याकारण हिंदू-मुस्लीम प्रश्नाची उकल होणार नाही याबद्दल त्यांची खात्री झाली. अशा त्यासाठीच सर्व पंथ सर्व करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. हा मोठा जबरदस्त निर्णय होता. त्यांच्या पत्नीनेही त्यांना या कामात पूर्ण सहकार्य दिले.

याच काळात त्यांची 'इन्सान' ही कादंबरी आली व साऱ्यांनी. त्यामुळे त्यांच्या दूरच्या विश्वासाही काहीत टाकण्यात आले. परंतु त्याही संकटांचे ते शांत सहन केले.

मुस्लीम स्त्रीची गुलामगिरीतून मुक्तता करण्याचे काम हमीद दलवाईंनी हाती घेतले. मुस्लिमांत सर्वप्रथम त्यांनी मुस्लीम मोहल्ल्यात एक मोर्चा सबल बंदी व तलाक बंदीसाठी आयोजित केला. त्यामुळे मुस्लीम समाजात मोठीच खळबळ माजली. त्यातून एवं मुस्लीम मोहल्ला पोरकट भरीसली गेली.

हळूहळू हमीद मुस्लिमांमधील मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा जन्म झाला.

या परिषदेतर्फे कोल्हापूर-पुणे सभे 'जिहाद' मोर्चा पोरकटा घेतल्या गेल्या आणि मुस्लीम स्त्रीच्या अपरवार दुःखाला वाचा फुटली. कोल्हापूरला मुस्लिम शिक्षण परिषद भरून धर्म व भाषा यासंबंधी नव्या विचारांचे प्रबोधन त्यांनी सुरू केले.

गेली दोन वर्षे त्यांची मृत्यूशीही सुरूच चालू होती. मृत्यूचा पहारा एकूनही ते कधी भूमी या प्रसंगी थिकत झाले नव्हते. मूत्रपिंडाची एक शस्त्रक्रिया यशस्वी झाली. अमेरिकेतही त्यांच्यावर काही उपचार झाले. परंतु दुसरा त्यांचे मूत्रपिंड काम देईनासे झाले आणि त्यांचा जीवनसंघर्षाची जाग[illegible] मालवली.

११ मे १९७७, महाराष्ट्र टाइम्स

हमीद दलवाईंचा प्रहार सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांवर

पुणे, दि. १० (प्रतिनिधी) — मुस्लिम सत्यशोधक समाजाचे संस्थापक श्री. हमीद दलवाई यांच्या निधनाने एक संघर्षमय व कर्तृत्ववान व्यक्तिमत्व हरपल्याच्या पडछायेखाली निपुण संघर्ष, लढा यांच्यात श्री. नानासाहेब गोरे यांनी आज श्री. दलवाई यांना श्रध्दांजली वाहिली.

हमीदभाई यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सभेच्या संयोजक श्री. गोरे बोलत होते.

श्री. पु. ल. देशपांडे, मुख्यमंत्री श्री. शरद पवार, डॉ. बाबा आढाव, श्री. भाई वैद्य, प्रा. न. कि. फडके, श्री. सदाशिवभाई, श्री. बाबूभाई भेंडवाले, डॉ. रत्नाकर महाजन, प्रा. मुमताज तांबोळी यांनी श्रद्धांजली भाषणे केली.

न. ज्योतिबा फुले यांनी लावलेल्या वृक्षाला आलेले सुंदर फळ अशा शब्दात हमीदभाईंचे वर्णन करून श्री. पु. ल. देशपांडे म्हणाले की, हमीदभाईंचे समाज प्रबोधनाचे कार्य केवळ मुसलमान समाजापुरते मर्यादित होते असे म्हणणे चूक होईल. त्यांचा प्रहार हा मुख्यत: सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांवर होता.

हमीदभाईंच्या निधनाने मुस्लिम स्त्रियांच्या मुक्तीची आशा मालवली आहे, असा उल्लेख हमीद केला जरूरी पडले, असे स्पष्ट प्रहार श्रीमती मुमताज तांबोळी यांनी

काढले.

आपल्या मृत्यू समयी देखील हमीदभाई यांनी धीराहून एकही त्यांना कामी सोडून गेली नाही, असे सांगून श्री. शरद पवार म्हणाले की, ही त्यांच्या मैत्रीमधील संघर्ष असला तरी त्यांच्या विचारांचा प्रहार त्यांनी हयातीत केला. "संसदेतील ५० खासदार सोबतच आले आहेत. माझ्याबरोबर या संघर्ष लढाचा काय ? असे त्यांनी विचारले होते.

७ ऑक्टोबर १९८२, महाराष्ट्र टाइम्स

मुस्लिमांनीही नसबंदी करून लोकसंख्येला आळा घालावा

७ मे १९७८, सकाळ

तलाकविरोधी मोर्चाने दलवाईंचा स्मृतिदिन

१२ मे १९७७, सकाळ

फुले, आंबेडकरांच्या तोडीचे
हमीद दलवाई यांचे कार्य

७ ऑक्टोबर १९८२, केसरी

नवविवाहित तरुणीस जाळून मारल्याची तक्रार

(सातपत्ता वार्ताहराकडून)

सातारा : सुस्थित समाजातील बीस वर्षांच्या एका तरुणीला तिच्या सासरच्या मंडळीनी पैसे मिळवण्यासाठी जाळून ठार केल्याची तक्रार मुस्लिम सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांकडे केली असून त्याबाबत चौकशीही सुरू झाली आहे.

मुस्लिम सत्यशोधक समाजाचे सत्यशोधक कार्यकर्ते अब्दुररज्जाक व अन्य कार्यकर्त्यांनी या मुलीची मुलीच्या वडिलांशी तिच्या पोलिसांत उपलब्ध असलेल्या जबाबावरून भेट घेऊन या प्रकरणी तक्रार केली. मुलीचे वडील मंजूरीचे शिक्षण मुलाबरोबर ते बाराबतीचे पहाणारे असून ते सिमेंटचे वी. साठी मुलाची रक्कम हिचे होते. सोन वर्षांपूर्वी केलीच मुलाबरोबर हिचे लग्न सत्यशोधक समाजाची साक्षी निघाले म्हणून तिचा सासरी खरात छळ केला जात असे.

दि. २५ ऑगस्ट ८२ रोजी दुपारी सेवाभावी भरातून घर पेटताना पाहिला. तेव्हा कोणाची चिकाटी ऐकू आली नाही. आतून रक्षिताचे शरीर बाहेर तिचा पेटला असल्याचे समजले. पतीच्या डाव्या हाताला जाळून मारी होती व तिची सासू सुवासामध्ये होती. तसेच मारल्याना माहीत असेल.

काहून पेटले असा प्रकार करण्यात आला. पण रक्षिताचा नवरा, सासू व दीर यांनी मदत केल्यामुळे तिला सुन केला व बाहेर तिला काढले असल्याचे अशी शंका श्री. सुर्वाचर यांनी व्यक्त केली. त्यांनी या प्रकरणी प्रथम सत्यशोधक समाजाकडे तक्रार केली. तसेच सातर पोलिसांकडे तक्रार केली.

तिच्या दोन वर्षाच्या मुलाच्या प्रकरणाच्या तीन घटना या पेटल आलेल्या होत्या. एक याबाबत सासूची कोणी चिंतित आरोपांनी तक्रारी केलेल्या आहेत, असे सांगण श्री. सत्यशोधकांनी म्हणाले की पैशासाठी जिवंत जाळले या सारखी रानटी असून या सारखे प्रकरणात एवढ्या पद्धतीने तरुणीची विल्हेवाट लावण्याचा आलेली आहे. पोलिसांनी त्वरीत कडक कारवाई करावी. तसेच शासन यांचेकडे तरुण जणा मागणी करणार आहे असेही श्री.

२० नोव्हेंबर १९७५, दै. प्रभात

तलाकविरोधी जागृतीकरण्यासाठीपरिषद

पुणे, दि. १९ (प्रतिनिधी)— तलाक देवाला मुस्लिम महिलांच्या परिषद सत्या रविवारी दि. २३ रोजी पुण्यात भरत असून मुस्लिम सत्यशोधक मंडळाने हा परिषद आयोजित केली आहे.

मुस्लिम समाजात, इतर धर्मा प्रमाणे कायम स्वरूपी मुस्लिम कुटुंबाला मुस्लिम सत्यशोधक मंडळाने कुप्रथा' ठरवली. तलाक विरुद्ध महिला' उघडली असून सध्या एक महिना झाला आहे. या महिलाभरात्या काळात सत्यशोधक कार्यकर्ते तलाक देवाने मुस्लिम महिलांना मार्गदर्शन करीत आहेत. सध्याच्या घडीला १०० वरून जास्त महिलांचा या संघटनेत समावेश झाला आहे. यापैकी मुस्लिम महिलांना करावा लागणारा संघर्ष लक्षात घेऊन मंडळाने ही परिषद आयोजित केली आहे.

आकडेवारी

या तलाकविरोधी मुस्लिम महिलांची संख्या मुख्यत: ६५ ते ७५ वर्षांपर्यंत वयाच्या महिलांचा आहे. यापैकी ५८ टक्के महिला अशिक्षित आहेत. साधारणत: ५० टक्के महिला मध्यमवर्गीय असून बरीच विधवा किंवा घटस्फोटित आहेत. यापैकी ६५ टक्के महिलांना दोन पेक्षा जास्त मुले आहेत. ५५ टक्के महिलांना दरमहा ५० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न आहे. तलाक देवाला कारण काही असले तरी ६९ ते ८० टक्के मुस्लिम महिलांचा बाबा पोट असल्याचे आढळून आले आहे.

६० वर्षांचा वकील

मुस्लिम सत्यशोधक मंडळाकडे २० वर्षे वयाच्या मुलाने पत्र लिहिले आहे. त्याचे तो म्हणतो, 'माझे वडील ६० वर्षांचे आहे ९२ वर्षांच्या आजी होत्या आहेत. परंतु वडिलांचा आईचा तलाकची तलाक दिला. ती माझ्या सख्ख्या आईस भेटत नाही. माझे वडील ६० वर्षांचे वकील असून ते दुसरे लग्न करीत आहेत.

७ वर्षांत चौथे लग्न

अशीच एक घटना. एका ७५ वर्षांच्या वृद्ध मुसलमान गृहस्थ तलाक दिला. व नंतर चार वर्षांत त्यांनी दोन लग्ने केली. या प्रकारचा त्रास सहन मुस्लिम समाजातील महिलांना असल्याचा एका ७० वर्षांच्या इसमाने नेला. ७ वर्षांत तीन लग्ने केली व तिसरी बायकांना तलाक दिला. या तिसरीची काजी वय ६५, ६२ व ६८ वर्षे आहेत. [illegible]

मुस्लिम सत्यशोधक मंडळाकडे या परिषदेच्या निमित्ताने मुस्लिम सत्यशोधक मंडळाने एसाबाकडे व सासवाकडे महिलांना संरक्षण केला आहेत. [illegible] मंडळ त्यांना मदत करीत आहे. [illegible] तलाक देवाला महिलांना विरोध करणाऱ्या आहे. उपेक्षाचा अंत्य घेऊ करावा, त्यात तीन तलाकचा तलाकांचा बंदी आणावा, कटघरोटीत तलाक दुसरे लग्न झाल्याशिवाय नवऱ्याने पोटगी मिळावी, तलाकपिडीत महिलांच्या. मुलांना वैधानिक संरक्षणी मिळावेत, तलाक या महिलांना सामाजिक अधिकार मिळावे म्हणून मंडळाने आवाज उठवला आहे. आणि त्यासाठी त्यांचा संघर्ष चालू आहे.

२४ फेब्रुवारी १९७३, दै. महाराष्ट्र टाइम्स

मुंबई, शनिवार, २४ फेब्रुवारी १९७३

ढोंगी मुस्लीम नेत्यांवर दलवाईंचा हल्ला

वंदेमातरम् प्रकरणी पुण्यात सभा

(आमच्या प्रतिनिधीकडून)

पुणे, दि. २३ — [illegible] ढोंगी मुस्लीम नेत्यांवर हल्ला चढविला. [illegible] मुस्लीम समाजाला [illegible] मुस्लीम समाजाच्या [illegible] मुस्लीम समाजाच्या [illegible] मुस्लीम समाजाच्या

निवडक छायाचित्रे

छायाचित्रे : हमीद दलवाई यांचे स्नेही आणि मंडळाचे कार्यकर्ते आमिर शेख

हमीद दलवाई.

मुस्लीम महिला परिषदेत मेहेरुन्निसा दलवाई आणि इतर (१९७१).

मुस्लीम महिला परिषदेत प्रा. अ. भि. शहा (१९७१).

मुस्लीम महिला परिषद, पुणे। १५–२६ डिसेंबर, १९७१.

महिला परिषदेत बोलताना असफ ए. ए. फैजी यांच्या पत्नी सुलताना फैजी। २५ डिसेंबर १९७१

मुस्लीम महिला परिषद, महात्मा फुले सभागृह, पुणे येथे श्रीमती तय्यबजी. (सुरत)

सय्यदभाई, हमीद दलवाई आणि बाबुमियाँ बंडवाले.

कोल्हापूर येथील कार्यक्रमात डॉ. कुमार सप्तर्षी, दलवाई आणि इतर.

श्रीरामपूर येथील कार्यक्रमात दलवाई, वि. स. खांडेकर आणि माधवराव बागल.

सांगली येथील कार्यक्रमात हमीद दलवाई यांना सितारमेकर सतार भेट देताना.

व्याख्यान देताना हमीद दलवाई, सोबत हुसेन जमादार.

मा. यशवंतराव चव्हाण यांच्याममवेत हमीद दलवाई आणि इतर. (१९७४)

मा. यशवंतराव चव्हाण यांच्यासोबत हमीद दलवाई.

असफ ए. ए. फैजी आणि दलवाई (१९७४)

हुसेन जमादार, हमीद दलवाई, बाबुमियाँ बँडवाले, अब्दुल कादर मुकादम आणि इतर

मा. शंकरराव चव्हाण यांच्यासमवेत हुसेन जमादार, प्रा. मुमताज रहिमतपुरे.



हमीद दलवाई, यदुनाथ थत्ते आणि बाबा आमटे.

बशीर शेख, फजल शेख, सय्यदभाई आणि रजिया पटेल.

मे. पुं. रेगे बोलताना, सोबत फैजी, शहा आणि दलवाई.

मंडळाच्या कार्यक्रमात सहभागी महिला.

दलवाई यांच्यासोबत प्रमुख कार्यकर्ते.

मंडळाच्या कार्यक्रमात सहभागी श्रोतावर्ग.

कोल्हापूर येथील कार्यक्रमात दलवाई यांच्यासोबत मंडळाचे कार्यकर्ते.

ऑल इंडिया फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम्स कॉन्फरन्स, नवी दिल्ली। ५ डिसेंबर १९७१

ऑल इंडिया फॉरवर्ड लुकिंग मुस्लीम्स कॉन्फरन्स, नवी दिल्ली। उजवीकडे मुशिरुल हसन

शेख अब्दुल्ला पुणे दौऱ्यावर असताना त्यांचा सत्कार करताना सय्यदभाई.

मुस्लीम महिला परिषदेत बोलताना महिला प्रतिनिधी.

गांधी भवन, कोथरूड येथील मंडळाच्या अभ्यास शिबिरात प्रा. गं. बा. सरदार आणि अ. भि. शहा. (१९७२)

सोलापूर येथील बैठकीत बोलताना हमीद दलवाई. २ आक्टोबर १९७१

हमीद दलवाई यांच्या सोबत हुसेन जमादार आणि कोल्हापूर येथील कार्यकर्ते

संपादकाचा अल्प परिचय

डॉ. शमसुद्दिन तांबोळी

एम. ए., एम. एड., एल. एल. बी., पीएच. डी.

निवास : सी ८/२३, स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण रोड, पुणे ४११००८

मूळ गाव : राणीसावरगाव, जि. परभणी

भ्रमण ध्वनी : ९८२२६७९३९१ आणि ९१७२०६१९६२

इमेल : tambolimm@rediffmail.com

पीएच.डी. : 'हमीद दलवाई यांचे लोकशिक्षणातील योगदान', शिक्षणशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

- **पद आणि कार्य :**
  सेवानिवृत्त उपप्राचार्य, मराठवाडा मित्रमंडळाचे वाणिज्य महाविद्यालय, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४
- **अध्यक्ष :** मुस्लीम सत्यशोधक मंडळ
- **संपादक :** मुस्लीम सत्यशोधक पत्रिका
- **माजी सचिव :** हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट
- **सदस्य :** महाराष्ट्र राज्य भाषा सल्लागार समिती
- **प्रकाशित पुस्तके**
  १. हमीद दलवाई : क्रांतिकारी विचारवंत,
  २. प्रभावशाली शिक्षण तज्ज्ञ
  ३. आझाद कलाम
  ४. शहाबानो ते शबानाबानो (मुस्लीम महिला अधिकार संघर्ष)
  ५. मुस्लीम समाज : प्रबोधन व विकास
  ६. मुस्लीम समाज : व्यक्ती, विचार व साहित्य
  ७. समान नागरी कायदा : अपेक्षा व वास्तव
  ८. महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास : नवे दालन, नव्या संधी
  ९. तिमिरभेद

- **सह संपादक :**

  १०. बहुजनांचे शिक्षण : वास्तव व अपेक्षा

  व्यक्ती, घटना, विशेष या विषयांबरील विशेषांक, तसेच दीपावली व अनियमित विशेषांकांचे संपादन. याचबरोबर विविध साप्ताहिके, मासिके तसेच वर्तमानपत्रे यांमधून नियमित लेखन

- **पुरस्कार :**
  - गांधी नॅशनल मेमोरियल ट्रस्ट : बा-बापू विधायक कार्यकर्ता पुरस्कार, २००८
  - महाराष्ट्र जर्नालिस्ट फाउंडेशन : भास्कर अवॉर्ड, २००९
  - मुंबई मराठी पत्रकार संघ : भाई तांबे पुरस्कार, २०१०
  - महाराष्ट्र ग्रंथोत्तोजक सभा : उत्कृष्ट साहित्य पुरस्कार, २०११
  - मौलाना आझाद बहुउद्देशीय संस्था, वाई : कृष्णा साहित्य गौरव पुरस्कार, २०१२
  - आबाबेन देशपांडे नवरचना केंद्र : सुमतीबाई साठे आदर्श कार्यकर्ता पुरस्कार, २०१४
  - शुभचिंतक फाउंडेशन : अहिंसा सन्मान, २०१४
  - आझम कॅम्पस, पुणे : पी. ए. इनामदार सामाजिक कृतज्ञता पुरस्कार, २०१५
  - सत्यशोधक रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार, २०१६
  - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वर्धापनदिनानिमित्त दिला जाणारा जगन्नाथ राठी पुरस्कार, २०१७
  - मराठवाडा समन्वय समिती : मराठवाडा साहित्य भूषण पुरस्कार, २०१७
  - प्रा. पाटील सेवा प्रतिष्ठान, महात्मा फुले पुरस्कार, जळगाव, २०१८
  - पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील समाजप्रबोधन पुरस्कार, लोणी, प्रवरानगर, ऑगस्ट, २०१९
  - कोविड योद्धा पुरस्कार, आरोग्य मंत्री मा. राजेश टोपे आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री मा. अमित देशमुख, महाराष्ट्र राज्य, २०२१
  - कृतज्ञता सन्मान पुरस्कार, २०२१, मा. एकनाथ शिंदे, नगरविकास आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य
  - लोकहक्क फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य : मा. बाळासाहेब भारदे गांधी विचार प्रसार पुरस्कार, २०२३
  - महाराष्ट्र साहित्य परिषद : डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार, २०२३
  - सामाजिक-सांस्कृतिक प्रतिष्ठान : त्रिनेत्र कृतज्ञता पुरस्कार, हडपसर, पुणे, नोव्हेंबर, २०२३
  - कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाशिक : गोदावरी गौरव पुरस्कार (लोकसेवा), १० मार्च २०२४

- **आदित्य साने निर्मित आणि दिग्दर्शित 'व्हेन द केज बर्ड सिंग्ज' हा माहितीपट प्रदर्शित.**
  (डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक कार्यावर आधारित)

"... माणसांनी माणसांवर लादलेल्या या नशिबाविरुद्ध दाद मागण्यासाठी,
'मुसलमान स्त्रीचे हिरावण्यात आलेले माणूसपण तिला हवे आहे'
हे जाहीर करण्यासाठी हा मोर्चा होता. 'इतर स्त्रियांसारखे तिलाही
खुल्या जगात जायचे आहे, सज्ञान व सुबुद्ध व्हायचे आहे, अनेक क्षेत्रांत
स्त्री म्हणून आपली जबाबदारी उचलायची आहे, स्वावलंबी व्हायचे आहे'
... हे सारे मुसलमान पुरुषांसकट सर्वांना कळावे, म्हणून हा मोर्चा होता.
या मोर्चेवाल्या सात जणांमागे आणखी कितीतरी मनाने उपस्थित असतील.
या मोर्च्याच्या शाब्दिक मागणीमागे हजारोंचा निःशब्द पाठिंबा होता.
म्हणून तर केवळ सातांच्या या मोर्च्याला पोलीस अडवू धजले नाहीत;
आमदारांनी धावत जाऊन त्यांचे स्वागत केले; मुख्यमन्त्र्यांनी त्यांची अर्जी
जातीने स्वीकारून ती पंतप्रधानांपर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले."
– विजय तेंडुलकर

"... धर्म आणि ईश्वर या संकल्पना मुस्लीम सत्यशोधक मंडळ नाकारतं,
असा काही लोकांचा समज आहे. मंडळ आस्तिकता–नास्तिकता,
धार्मिकता–निधर्मीपणा हा व्यक्तीचा खाजगी अधिकार समजते. ज्यांना जे मानायचे आहे,
ते मानण्याचे व्यक्तिगत पातळीवर स्वातंत्र्य असावे. धर्म व ईश्वर या संकल्पना
समाजाचे शोषण करणाऱ्या नसाव्यात. त्यांच्यातून विषमता, अन्याय यांना
उत्तेजन दिले जाऊ नये, अशी कल्पना आहे. धर्मसंकल्पना ही कालसापेक्ष असली पाहिजे.
त्यात पुरोहितवर्गाचा वरचष्मा असू नये व ती प्रगतीच्या आड येऊ नये.
आज मौलाना आझाद किंवा डॉ. असगर अली इंजिनिअर यांना अपेक्षित असणारा धर्म
मुस्लिमांनी स्वीकारल्यास बरेच प्रश्न कमी होतील. हा धर्म आधुनिक काळाशी
सुसंगत असेल; पण प्रत्येक ठिकाणी धर्माज्ञा शोधण्यापेक्षा 'आज सुसंगत काय आहे',
'विवेकी काय आहे' आणि 'संविधानात्मक काय आहे' यावर अधिक जोर दिला पाहिजे.
धर्मापलीकडे जाण्याची तयारी ठेवणे, हेच याला उत्तर आहे..."
– संपादकीय

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.